सन १९३२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ ;
सन १९३२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ ;
सन १९३२ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३ ;
सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३ ;
सन १९३४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ ;
सन १९३४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४ ;
सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १० ;
सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२ ;
सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ ;
सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२ ;
सन १९३६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १० ;
सन १९३६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२ ;
सन १९३६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३ ;
सन १९३६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २४.

या अधिनियमात पुढील अधिनियमांन्वये भर घालण्यात आली :—

सन १८८८ चा अधिनियम क्रमांक १२ ;

सन १८८९ चा अधिनियम क्रमांक २ ;

सन १८९० चा अधिनियम क्रमांक ५ ;

सन १८९८ चा अधिनियम क्रमांक १ ;

सन १८९९ चा अधिनियम क्रमांक २ ;

सन १९२० चा अधिनियम क्रमांक १५.

या अधिनियमात सन १९२० चा अधिनियम क्रमांक ३८ याअन्वये सुधारणा करण्यात आल्या.

या अधिनियमात भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये अनुकूलन व फेरबदल करण्यात आले.

या अधिनियमात पुढील अधिनियमांन्वये सुधारणा करण्यात आल्या :—

सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ ;

सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५ ;

सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३* ;

सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७ ;

सन १९३९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७ ;

सन १९३९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १९ ;

सन १९३९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१ ;

सन १९४२ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ ;

सन १९४२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ ;

---

* व्यावृत्तीच्या तरतुदी अंतर्भूत असलेली या अधिनियमाची कलमे ३२ व ३३ खाली उदधृत केली आहेत. खालील कलम ३२ यामध्ये निर्देश करण्यात आलेली कलमे २६, २८ व २९ यांच्या अन्वये सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ ची कलमे ३७, ७४ व ८० ब यांमध्ये सुधारणा झाली आहे.

**३२.** या अधिनियमाची कलमे २६, २८ किंवा २९ यांमध्ये असलेली कोणतीही गोष्ट उक्त कलमांमध्ये निर्देशिलेली पदे धारण करण्यासाठी नेमलेल्या व्यक्तींना, त्यांची या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी ज्या कालावधीसाठी नेमणूक करण्यात आली असती अशा कालावधीसाठी लागू होणार नाही. विद्यमान पदधारकांच्या बाबतीतील व्यावृत्ती.

**३३.** (१) या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीचा १ एप्रिल १९३९ च्या लगतपूर्वी रचना करण्यात आलेली महानगरपालिका, स्थायी समिती, शाळा समिती किंवा सुधार समिती यांच्या रचनेवर परिणाम होणार नाही आणि यांच्या संबंधातील किंवा याप्रमाणे रचना करण्यात आलेल्या महानगरपालिकेने किंवा समितीने काढलेली किंवा बसविलेली, केलेली कोणतीही नेमणूक, अधिसूचना, नोटीस, कर, आदेश, परियोजना, लायसने, तरतूद, नियम, उपविधी किंवा नमुना हे, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आल्या आहेत, याच केवळ कारणामुळे विधिअग्राह्य मानण्यात येणार नाही. व्यावृत्ती.

(२) या अधिनियात काहीही अंतर्भूत केलेल असले तरी, १ एप्रिल १९३९ पूर्वी होणारी पालिका, सदस्याच्या किंवा कोणत्याही उक्त समितीच्या सदस्याच्या अधिकारपदाची कोणतीही नैमित्तिक रिकामी जागा उक्त अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, जणू काही हा अधिनियम अंमलात आलेला नसावा त्याप्रमाणे भरण्यात येईल.

सन १९४३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ ;†
सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९ ;†
सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२ ;†
सन १९४६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ ;‡
सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४ ;
सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२ ;
सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक २० ;
सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१.

या अधिनियमात भारतीय (विद्यमान भारतीय विधि अनुकूलन) आदेश, १९४७ या अन्वये अनुकूलन करण्यात आले.

या अधिनियमात पुढील अधिनियमांन्वये सुधारणा करण्यात आल्या :—

सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ ;
सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ ;
सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ ;
सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६९ ;
सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६ ;
सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७.

या अधिनियमात विधि अनुकूलन आदेश, १९५० या अन्वये अनुकूलन व फेरबदल करण्यात आले.

या अधिनियमात पुढील अधिनियमांन्वये सुधारणा करण्यात आल्या :—

सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ ;
सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९ ;
सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३० ;
सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २० ;
सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४ ;
सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ ;
सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ ;
सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१ ;
सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४ ;
सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६२ ;
सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५ ;

---

† सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ अन्वये हा अधिनियम निरसित व पुन्हा अधिनियमित करण्यात आला.

‡ वरील अधिनियमान्वये हा अधिनियम निरसित करण्यात आला व फेरबदलांसह पुन्हा अधिनियमित करण्यात आला.

सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५४ ;‡

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२ ;

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६ ;

या अधिनियमात मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ याअन्वये अनुकूलन व फेरबदल करण्यात आले ;

या अधिनियमात पुढील अधिनियमांन्वये सुधारणा करण्यात आल्या :—

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५१ ;§

सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८ ;

सन १९५७ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८ ;

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३ ;

सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६५ ;

सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ ;

या अधिनियमात महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० याअन्वये अनुकूलन व फेरबदल करण्यात आले ;

या अधिनियमात पुढील अधिनियमांन्वये सुधारणा करण्यात आल्या :—

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ ;

सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९ ;

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ ;

सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० ;

सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ ;

---

‡ सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५४, याचे कलम १३ पुढीलप्रमाणे आहे :—

"**१३.** या अधिनियमाची कलमे २ ते ४ (दोन्ही धरून), कलम ५ त्याद्वारे अंतर्भूत करण्यात आलेले कलम २८ ह वगळून, कलम ६ चा खंड (२) आणि कलमे ७ व ८ याअन्वये उक्त अधिनियमात करण्यात आलेल्या सुधारणा, ३१ डिसेंबर १९५५ नंतर होणाऱ्या सार्वत्रिक निवडणुकीला आणि त्यानंतरच्या सर्व निवडणुकांना लागू होतील." या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या विवक्षित सुधारणा ३१ डिसेंबर १९५५ नंतर होणाऱ्या निवडणुकीला लागू होणे.

§ या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या सुधारणा, १ एप्रिल १९५६ पासून करण्यात आल्याचे मानण्यात येईल (सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५१, कलम २ पहा).

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १ ;*

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ ;

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ व त्याचबरोबर सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ ;

सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ ;†

सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ ;‡

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ ;

---

* सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम ११ पुढीलप्रमाणे आहे :—

व्यावृत्ती. "**११.** अर्थसंकल्प "ड" व "फ" यांचे अर्थसंकल्प "अ" शी एकत्रीकरण करण्यात आले असले तरीही आणि त्याकरिता या अधिनियमाची कलमे ४ ते १० (दोन्हीही धरून) याअन्वये मुख्य अधिनियमात सुधारणा करण्यात आल्या असल्या तरीही, १९६३-६४ या सरकारी वर्षासाठी महानगरपालिकेने अंतिमरित्या अंगीकार केलेले "अ", "ड" आणि "फ" हे अर्थसंकल्प आणि दिनांक २८ ऑक्टोबर १९६३ च्या निकटपूर्वी त्यांच्या बाबतीत लागू होणाऱ्या मुख्य अधिनियमाच्या सर्व तरतुदी प्रवर्तनात राहतील आणि त्या, त्या वर्षाच्या अखेरपर्यंत उक्त अर्थसंकल्पाना लागू असण्याचे चालू राहील."

† सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, याचे कलम २३ खालीलप्रमाणे आहे :—

व्यावृत्ती. "**२३.** नगरशुल्क नाहीसे करण्यात आले असले तरीही व त्यासंबंधातील उक्त अधिनियमाच्या तरतुदी निरसित करण्यात येऊन त्याऐवजी या अधिनियमान्वये केलेल्या जकाती संबंधीच्या तरतुदी दाखल करण्यात आल्या असल्या तरीही, नगरशुल्कासंबंधीच्या सर्व तरतुदी या शुल्क बसविणे, निर्धारित करणे, गोळा करणे किंवा परतावा देणे या प्रयोजनांकरिता, किंवा कोणतीही शास्ती लादण्याच्या प्रयोजनाकरिता किंवा कोणत्याही चीजवस्तूचे अधिहरण करण्याकरिता किंवा पूर्वोक्त कोणत्याही प्रयोजनांशी संबंधित किंवा आनुषंगिक, असलेल्या कोणत्याही इतर प्रयोजनांकरिता परिणामक असण्याचे चालू राहील ; आणि पूर्वोक्त तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनांकरिता कोणताही अधिकारी, प्राधिकारी, न्यायाधिकरण किंवा न्यायालय यांच्या संबंधातील कोणताही उल्लेख हा जकातीच्या संबंधातील तत्सम अधिकारी, प्राधिकारी, न्यायाधिकरण किंवा न्यायालय याच्या संबंधात केलेला उल्लेख आहे असा अर्थ लावण्यात येईल आणि असा तत्सम अधिकारी, प्राधिकारी कोण आहे किंवा न्यायाधिकरण किंवा न्यायालय कोणते आहे या संबंधात कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, त्यावरील राज्य शासनाचा निर्णय हा अंतिम असेल.

‡ सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलमे २२ व २३ खालीलप्रमाणे आहे :—

व्यावृत्ती. "**२२.** या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे, महानगरपालिका, स्थायी समिती किंवा सुधार समिती याच्या किंवा या अधिनियमाच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी मुख्य अधिनियमान्वये रचना केल्याप्रमाणे असलेल्या किंवा नेमण्यात आल्याप्रमाणे असलेल्या कोणत्याही इतर समितीच्या किंवा उपसमितीच्या रचनेस बाध होणार नाही, आणि दिनांक १ एप्रिल १९६५ पूर्वी (किंवा कलम ७ खाली राज्य शासन कालावधी वाढवील तर दिनांक १ एप्रिल १९६६ पूर्वी) एखाद्या पालिका-सदस्याच्या किंवा उपरोक्त समित्यांपैकी किंवा उपसमित्यांपैकी कोणत्याही समितीतील किंवा उपसमितीतील एखाद्या पालिका-सदस्याच्या किंवा सदस्याच्या अधिकारपदाची कोणतीही नैमित्तिक रिकामी जागा ही, मुख्य अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, जणू काही हा अधिनियम पारित झालेला नसावा त्याप्रमाणे भरण्यात येईल."

अडचण दूर करणे. **२३.** या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या बाबतीत कोणतीही अडचण उपस्थित झाल्यास, राज्य शासनास, प्रसंगानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे, अशी अडचण दूर करण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट, आदेशाद्वारे, करता येईल :

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या तारखेपासून दोन वर्षे पूर्ण झाल्यानंतर या कलमान्वये कोणताही आदेश काढता येणार नाही."

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ ;§
सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ ;
सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ ;
सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ ;
सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ ;
सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ ;
सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० ;
सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ ;
सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ ;
सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ ;
सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ ;
सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ ;
सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ ;***
सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ ;
सन १९७२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२ ;
सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४ ;
सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ ;
सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ ;† (३०-४-१९७३)††
सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३ ; (२७-१२-१९७३)††
सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ ; (१-५-१९७५) ††
सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ ; (७-९-१९७४)††
सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१ ; (१-११-१९७५)††
सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६३ ;** (२२-९-१९७५)††
सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७० ;¶

---

§ सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ८ पुढीलप्रमाणे आहे :—

"**८.** या अधिनियमाची कलमे २ आणि ५ या अन्वये मुख्य अधिनियमात करण्यात आलेल्या सुधारणा दिनांक १ एप्रिल १९६६ रोजी करण्यात आल्याचे व उक्त तारखेपासून त्या अंमलात आल्या असल्याचे मानण्यात येईल." कलमे २ आणि ५ यांचे भूतलक्षी प्रवर्तन

*** सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ३ अन्वये सन १९७१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ निरसित करण्यात आला.

† सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम २३ अन्वये सन १९७३ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ निरसित करण्यात आला.

†† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शविते.

** सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६३, कलम ११ अन्वये सन १९७५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ निरसित करण्यात आला.

¶ सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७०, कलम २२ अन्वये सन १९७५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १७ निरसित करण्यात आला. संपूर्ण अधिनियम (सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७०) हा, कलम २ चा खंड (अ), कलम ४ व कलमे १६ ते २० (दोन्ही धरून) वगळता, दिनांक ८ नोव्हेंबर १९७५ पासून अंमलात आल्याचे मानण्यात आले. कलम २ चा खंड (अ) व कलम ४, दिनांक २४ डिसेंबर १९७५ रोजी अंमलात आली. कलमे १६ ते २० (दोन्ही धरून), १ एप्रिल १९७६ पासून अंमलात आली. (सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७०, कलम १(२) पहा).

सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२ ; (१-१०-७६)††
सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२ ;
सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२ ;
सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ ; (३१-५-१९७८)††
सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ ; (२-१०-१९७८)††
सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३ ;** (५-५-१९७९)††
सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ ; (३१-३-१९७९)††
सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ ; (१३-२-१९८०)††
सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० ;$ (१६-१०-१९८०)††
सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ ;
सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७ ; (१-१०-१९८१)††
सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५० ;
सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३ ;
सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७१ ;
सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० ;
सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ ;
सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ ;
सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ ; (२५-१०-१९८३)††
सन १९८४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ ;
सन १९८५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ ;
सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ ;
सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ ; (२०-१२-१९८५)††
सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० ; (१-११-१९८७)††
सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ ;
सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ ;¶ (१२-६-१९८९)
सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ ; (१-११-१९८९) ;
सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ ;*** ‡ (१६-३-१९९०)††

---

†† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शविते.

** सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, कलम ३ अन्वये सन १९७९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ निरसित करण्यात आला.

$ सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २३ अन्वये सन १९८० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ निरसित करण्यात आला.

¶ सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम ८ अन्वये सन १९८९ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ निरसित करण्यात आला.

*** सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ११ अन्वये सन १९९० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ निरसित करण्यात आला.

‡ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, याची कलमे ६ व ७ पुढीलप्रमाणे आहेत :—

पालिका सदस्यांचा पदावधी वाढवल्यामुळे होणारे परिणाम.

"**६.** ज्या मुदतीत पालिका-सदस्य पद धारण करण्याचे चालू ठेवतील त्या पदावधीत, १ एप्रिल १९९० रोजी मध्यान्होत्तर ज्या मुदतीकरिता वाढ करण्यात येईल त्यामुळे तसेच अशा वाढीव मुदतीत सार्वत्रिक प्रभाग (वॉर्ड) निवडणुका घेण्यामुळे व अशा सार्वत्रिक निवडणुकांचा निकाल ३१ मार्च १९९० नंतरच्या एखाद्या दिवशी घोषित होणार असल्यामुळे पुढील परिणाम होतील व या कलमात यापुढे विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या बाबींशी, मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदी जेथवर संबंधित असतील तेथवर त्या तरतुदींमध्ये तद्नुसार सुधारणा करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल."

सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ ;**** (१२-२-१९९०)††
सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ ; (२४-४-१९९०)††

१९९० चा महाराष्ट्र ११.

(एक) महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९९० (या कलमात यापुढे ज्याचा निर्देश "उक्त अधिनियम" असा करण्यात आला आहे) याच्या कलम ४ च्या खंड (अ) द्वारे दाखल करण्यात आलेल्या कलम २२ च्या पहिल्या परंतुकात निर्दिष्ट केलेल्या सार्वत्रिक प्रभाग (वॉर्ड) निवडणुकांमध्ये निवडून आलेले सर्व पालिका-सदस्य यांनी उक्त सुधारणा अधिनियमाच्या कलम ५ द्वारा जादा दाखल करण्यात आलेल्या कलम ३६ खंड (ब) च्या परंतुकात निर्दिष्ट केलेल्या त्यांच्या पहिल्या बैठकीच्या दिवशी पद धारण केले असल्याचे मानण्यात येईल आणि असे पालिका-सदस्य व त्यानंतर अशा पालिका सदस्यांचीनैमित्तिक रिक्त पदे भरण्यासाठी निवडण्यात येतील असे सर्व पालिका-सदस्य हे, मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ७ व ९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, दिनांक १ एप्रिल १९९५ रोजी मध्यान्होत्तर पदावरून निवृत्त होतील.

(दोन) अशा सार्वत्रिक निवडणुकांनंतर घेण्यात आलेल्या आपल्या पहिल्या बैठकीत हे पालिका-सदस्य आपल्यातील एकाला, १ एप्रिल १९९१ ला सुरू होणाऱ्या सरकारी वर्षातील महापालिकेच्या पहिल्या बैठकीपर्यंतच्या मुदतीकरता, महापौर म्हणून नियुक्त करतील.

(तीन) अशा सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या, पालिका-सदस्यांच्या पहिल्या बैठकीत किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर, स्थायी समिती, सुधार समिती, मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन समिती, शिक्षण समिती व इतर समित्यांचे सदस्य नियुक्त करण्यात येतील.

(चार) खंड (तीन) अन्वये नियुक्त करण्यात आलेली स्थायी समिती, सुधार समिती, मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन समिती व शिक्षण समिती यांपैकी प्रत्येक समिती आपल्या पहिल्या बैठकीत आपल्यापैकी एका व्यक्तीची एप्रिल १९९१ मध्ये अशा समितीची पहिली बैठक होईतोपर्यंत आपला अध्यक्ष म्हणून नियुक्ती करील.

(पाच) खंड (तीन) अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या स्थायी समितीचे व सुधार समितीचे निम्मे सदस्य १ एप्रिल १९९१ च्या मध्यान्ही निवृत्त होतील. अशा प्रकारे निवृत्त होणाऱ्या सदस्यांची निवड ही संबंधित समितीच्या अध्यक्षांकडून निर्धारित करण्यात येईल अशा १ मार्च १९९१ पूर्वीच्या तारखेस व अशा रीतीने चिठ्ठ्या टाकून करण्यात येईल.

(सहा) खंड (तीन) अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या मुंबई विद्युत पुरवठा व परिवहन समितीच्या सदस्यांपैकी निम्मे सदस्य १ एप्रिल १९९० रोजी निवृत्त होतील. अशा प्रकारे निवृत्त होणाऱ्या सदस्यांची निवड त्या समितीचा अध्यक्ष निर्धारित करील, अशा १ मार्च १९९२ पूर्वीच्या तारखेस व अशा रीतीने चिठ्ठ्या टाकून करण्यात येईल.

(सात) पालिका-सदस्यांपैकी निम्मे सदस्य व खंड (तीन) अन्वये नियुक्त करण्यात आलेल्या शिक्षण समितीच्या इतर सदस्यांपैकी निम्मे सदस्य १ एप्रिल १९९१ च्या मध्यान्ही निवृत्त होतील. अशा प्रकारे निवृत्त होणारे सदस्य हे, अध्यक्ष निर्धारित करील अशा १ मार्च १९९१ पूर्वीच्या तारखेस व अशा रीतीने चिठ्ठ्या टाकून निवडण्यात येतील.

१९९० चा महाराष्ट्र ११.

मुंबई महानगरपालिका अधिनियम लागू होणे.

"**७.** महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९९० या द्वारे किंवा तद्न्वये अन्यथा तरतूद करण्यात आली असेल त्या व्यतिरिक्त उक्त सुधारणा अधिनियमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही बाबीसंबंधात किंवा तिच्याशी संबंधित कोणत्याही बाबीसंबंधात मुंबई महानगरपालिका अधिनियम योग्य त्या फेरफारासह लागू होईल."

†† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शविते.

**** सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम १४ अन्वये सन १९९० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ निरसित करण्यात आला.

सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ ;* § (८-१०-१९९०)†

सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६ ;@ (१४-११-१९९०)†

सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ ;@@ (१६-२-१९९१)†

सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २६ ;@@@ (२९-१०-१९९१)†

सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ ; (२८-४-१९९२)†

---

* सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ६ अन्वये १९९० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ निरसित करण्यात आला.

§ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ५ पुढीलप्रमाणे आहे :—

"**५.** कोणत्याही न्यायालयाच्या, कोणत्याही न्यायनिर्णयात, हुकूमनाम्यात किंवा आदेशात काहीही अंतर्भूत असले तरी, दिनांक १५ ऑक्टोबर १९८८ पासून सुरू करण्यात आलेल्या, शुल्क भरून वाहने उभी करून ठेवण्याच्या योजनेअन्वये बृहन्मुंबई महानगरपालिकेने आकारलेली, मागणी केलेली किंवा गोळा केलेली कोणतीही फी किंवा शुल्क हे, जणू काही कलम ३२६अ च्या तरतुदी सर्व वेळी अखंडपणे अंमलात असल्याप्रमाणे, कायद्यानुसार आकारण्यात, मागणी करण्यात व गोळा करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल. दिनांक १५ ऑक्टोबर १९८८ ला सुरू होणाऱ्या व या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वीच्या दिवशी समाप्त होणाऱ्या कालावधीत कोणत्याही व्यक्तीवर अशी फी किंवा शुल्क आकारण्याकरिता, तिच्याकडून अशा फिची मागणी करण्याकरिता किंवा तिच्याकडून ती गोळा करण्याकरिता केलेली कोणतीही कार्यवाही किंवा कृती ही वैधरित्या करण्यात आली असल्याचे व ती नेहमीकरिताच तशी करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल, आणि वाहने उभी करून ठेवण्याकरिता अशा जागा राखून ठेवण्याचा किंवा अशा जागेचा वापर करण्यासाठी अशी फी किंवा शुल्क आकारण्याचा अधिकार अस्तित्वात नव्हता किंवा अशी आकारणी केलेली, मागणी केलेली किंवा गोळा केलेली फी ही मुख्य अधिनियमान्वये करण्यात आली नव्हती याच केवळ कारणावरून त्यास कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकरणामुळे हरकत घेण्यात येणार नाही आणि तद्नुसार,— शुल्क भरून वाहने उभी करून ठेवण्याच्या योजनेअन्वये महानगर-पालिकेने आकारलेल्या व गोळा केलेल्या फीचे किंवा शुल्काचे विधि-ग्राह्यीकरण.

(अ) अशी फी किंवा शुल्क यांच्या स्वरूपात प्राप्त झालेल्या किंवा वसूल केलेल्या कोणत्याही रकमेच्या परताव्यासाठी कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकरणापुढे कोणताही दावा किंवा कार्यवाही दाखल करता येणार नाही किंवा चालू ठेवता येणार नाही ;

(ब) कोणतेही न्यायालय किंवा अन्य कोणतेही प्राधिकरण, अशी फी किंवा शुल्क यांच्या स्वरूपात प्राप्त झालेल्या किंवा वसूल केलेल्या कोणत्याही रकमेच्या परताव्याचा निदेश देणारा कोणताही हुकूमनामा किंवा आदेश काढणार नाही ;"

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शविते.

@ सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३६, कलम १० अन्वये सन १९९० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १३ निरसित करण्यात आला.

@@ सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम ११ अन्वये सन १९९१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ निरसित करण्यात आला.

@@@ सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनिय क्रमांक २६, कलम ८ अन्वये सन १९९१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ निरसित करण्यात आला.

सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ ; (१०-८-१९९२)†
सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ ;* (४-१-१९९३)†
सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ ;
सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ ;** (३१-५-१९९४)†
सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ ;*** (११-११-१९९४)†
सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ ;@ (३१-५-१९९४)†
सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० ; (३१-८-१९९५)†
सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ ;@@ (२३-११-१९९५)†
सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ ; (२९-१-१९९६)†
सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ ; (४-९-१९९६)†
सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ ;@@@ (२६-११-१९९६)†

---

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शविते.

* सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ११ पुढीलप्रमाणे आहे :—

१८८८ चा मुंबई ३. १९९३ चा महाराष्ट्र १२.

नैसर्गिक गॅस व द्रवीकृत पेट्रोलियम गॅस यांवर आकारलेली जकात विधिग्राह्य करणे.

"**११.** शंका निरसनार्थ, याद्वारे असे घोषित करण्यात येत आहे की, १ एप्रिल १९७८ रोजी किंवा त्यानंतर पेट्रोलियम उत्पादने म्हणून, नैसर्गिक गॅस व द्रवीकृत पेट्रोलियम गॅस यांवर आकारलेली कोणतीही जकात, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९९३ याच्या कलम ९ द्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या अनुसूची ह मधील नोंद २२ ही, जणू काही जकात अशा प्रकारे ज्या दिवशी आकारण्यात आलेली होती त्या दिवशी त्या सुधारलेल्या स्वरूपात अंमलात असल्याप्रमाणे त्या नोंदीअन्वये आकारण्यात आलेली आहे असे मानण्यात येईल ; आणि तद्नुसार,—

(अ) अशी जकात म्हणून भरलेली किंवा देय असलेली कोणतीही रक्कम, कायद्यानुसार भरलेली असल्याचे किंवा देय असल्याचे मानण्यात येईल ; आणि

(ब) "पेट्रोलियम उत्पादने" या शब्दप्रयोगामध्ये, नैसर्गिक गॅस आणि द्रवीकृत पेट्रोलियम गॅस अंतर्भूत असल्याचे स्पष्टपणे नमूद करण्यात आले नव्हते याच केवळ कारणामुळे असा कर आकारण्याविरूद्ध किंवा अशा प्रकारे भरलेल्या किंवा देय असलेल्या कोणत्याही रकमेच्या परताव्याकरिता कोणत्याही न्यायालयात कोणताही दावा दाखल करता येणार नाही ;"

** सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम १६३ अन्वये सन १९९४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १० निरसित करण्यात आला.

*** सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४, कलम ११ अन्वये सन १९९४ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १८ निरसित करण्यात आला.

@ सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम १३ अन्वये सन १९९५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ५ निरसित करण्यात आला.

@@ सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ७ अन्वये सन १९९५ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १८ निरसित करण्यात आला.

@@@ सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ६ अन्वये सन १९९६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २० निरसित करण्यात आला.

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम १ चे पोट-कलम (२) पुढीलप्रमाणे आहे :—

"(२) हे कलम व कलम ५ हे दिनांक २६ नोव्हेंबर १९९६ रोजी अंमलात आले असल्याचे मानण्यात येईल आणि २, ३, व ४ ही कलमे दिनांक ३१ मे १९९४ रोजी अंमलात आली असल्याचे मानण्यात येईल"

सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ५ पुढीलप्रमाणे आहे :—

शंकानिरसन.

"**५.** शंकानिरसनार्थ याद्वारे असे जाहीर करण्यात येते की, या अधिनियमाची कलमे २, ३ व ४ द्वारे करण्यात आलेल्या सुधारणा या भूतलक्षी प्रभावाने करण्यात आलेल्या असल्याने या अधिनियमाद्वारे सुधारणा केलेल्या मुख्य अधिनियमांच्या तरतुदींद्वारे राज्य निवडणूक आयुक्ताने त्यास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांना अनुसरून किंवा अनुसरण्याच्या उद्देशाने केलेल्या सर्व कृती किंवा कारवाई या वैधरित्या करण्यात आल्या असल्याचे मानण्यात येईल आणि त्या नेहमीच वैधरित्या करण्यात आल्या असल्याचे मानण्यात येईल आणि नागरिकांच्या मागासवर्गासाठी राखून ठेवलेल्या जागा या वैधरित्या किंवा कारदेशीररित्या राखून ठेवलेल्या नव्हत्या एवढ्याच केवळ कारणावरून अशा प्रकारची कोणतीही कृती किंवा कारवाई ही विधिअग्राह्य मानण्यात येणार नाही किंवा त्यावर हरकत घेण्यात येणार नाही."

सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० ;* (१९-४-१९९८)†
सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ ; (३-५-१९९८)†
सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ ;** (२३-४-१९९९)†
सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ ;*** (४-३-२०००)†
सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३ ; (१३-९-२०००)†
सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ ;@ (१९-९-२०००)†
सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ ;@@ § (५-१-२००२)†
सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ ;
सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५ ; (४-१-२००५)†
सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ ; (१५-४-२००५)†

---

* सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २५६ अन्वये सन १९९८ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ४ निरसित करण्यात आला.

या अधिनियमातील कलमे ५६, ९०(ब), ९१, ९७, १०२, १०४ (अ) आणि ११३ ही दिनांक २ मार्च १९९८ रोजी अंमलात आली असल्याचे मानन्यात येईल. या अधिनियमातील उर्वरित तरतुदी शासकीय अधिसूचना, नगरविकास विभाग, क्रमांक बृ.म.पा./प्र.क्र. २१/९६/नवि-३२, दिनांक १८ एप्रिल १९९८ द्वारे दिनांक १९ एप्रिल १९९८ रोजी अंमलात आल्या.

सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २५५ पुढीलप्रमाणे आहे :—

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

"**२५५.** या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना किंवा त्यामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीच्या कारणामुळे किंवा या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या बाबींच्या संबंधात मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी या अधिनियमांद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसणारी त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी कोणतीही गोष्ट प्रसंग उद्‌भवेल त्यानुसार आदेशाद्वारे करता येईल :

परंतु, असे की, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षाचा कालावधी समाप्त झाल्यानंतर असा आदेश देता येणार नाही."

† ही खूण अधिनियमाच्या प्रारंभाची तारीख दर्शविते.

** सन १९९९ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २०९ पुढीलप्रमाणे आहे :—

अडचणी दूर करण्याचा अधिकार.

"**२०९.** या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना किंवा त्यामध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे किंवा या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या बाबींच्या संबंधात मुख्य अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, राज्य शासनास अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी या अधिनियमांद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसणारी, त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटेल अशी कोणतीही गोष्ट प्रसंग उद्‌भवेल त्यानुसार आदेशाद्वारे करता येईल."

*** सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम ५ अन्वये सन २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ निरसित करण्यात आला.

@ सन २००१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ५ अन्वये सन २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १७ निरसित करण्यात आला.

@@ सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ अन्वये सन २००१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २८, सन २००१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३२, सन २००१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३४ आणि सन २००१ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३७ निरसित करण्यात आले.

§ सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८ च्या कलम १ चे पोट-कलम (२) आणि कलम २३ पुढीलप्रमाणे आहे :—

"(२) (एक) या अधिनियमातील कलमे २, ३, ५ (दोन), ६, ८(अ), ९, ११ आणि १३ ते २० आणि २३ (एक) ही दिनांक ७ सप्टेंबर २००१ रोजी अंमलात आली असल्याचे मानण्यात येईल.

(दोन) कलम ४ हे दिनांक २० ऑक्टोबर २००१ रोजी अंमलात आले असल्याचे मानण्यात येईल.

(तीन) कलमे ५(एक), ७, ८(ब), १०, २१ आणि २३ (दोन) ही दिनांक ७ नोव्हेंबर २००१ रोजी अंमलात आले असल्याचे मानन्यात येईल.

(चार) कलमे १२ आणि २२ ही दिनांक १६ ऑक्टोबर २००१ रोजी अंमलात आलेली असल्याचे मानण्यात येईल."

सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४ ; (२५-८-२००५)[१]
सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९ ; (२१-६-२००६)[२]
सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ ; (१८-७-२००६)[३]
सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ ; (२०-६-२००६)[४]
सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५ ; (१९-८-२००६)
सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९ ; (२७-१०-२००६)[५]
सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ ; (२७-२-२००७)[६]
सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५ ; (२७-१०-२००६)[७]
सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३ ; (१-३-२००५)[८]
सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३ ; (४-१-२००८)[९]
सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ ; (२-५-२००८)[१०]
सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ ; (१२-५-२००८)[११]
सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ ; (२-५-२००८)[१२]
सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८ ; (८-५-२००८)[१३]
सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ ; (१४-१-२००९)
सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७ ; (६-२-२००९)[१४]

---

[१] अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक

[२] शासकीय अधिसूचना, नगरविकास क्रमांक बी. एन. एम. ५००५/२१८/प्र. क्र. ४३/२००५/नवि-३२, दिनांक २१ जून २००६ द्वारे.

[३] अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक

[४] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३ अन्वये सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ७ निरसित करण्यात आला.

[५] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४९, कलम ६ अन्वये सन २००६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ निरसित करण्यात आला.

[६] सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १३ अन्वये सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २ निरसित करण्यात आला.

[७] अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक.

[८] शासकीय अधिसूचना, नगरविकास क्रमांक बी.एन.एम. ५००६/३५१/प्र.क्र. ७९/नवि-३२, दिनांक २८ फेब्रुवारी २००८ द्वारे.

[९] अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक.

[१०] अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक.

[११] शासकीय अधिसूचना, नगरविकास क्रमांक बी.एन.एम. ५००७/४३४/प्र.क्र. ११९/नवि-३२, दिनांक १२ मे २००८ द्वारे.

[१२] अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक.

[१३] अधिनियमाच्या प्रारंभाचा दिनांक.

[१४] शासकीय अधिसूचना, नगरविकास क्रमांक एम.एम.सी. २००८/२९१/प्र.क्र. १०३/नवि-३२, दिनांक ६ फेब्रुवारी २००९ द्वारे.

सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ ; (१-४-२०१०)[१]

सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ ; *

सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ ; (२-८-२०१०)[२]

सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९ ; @

सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११ ; (१०-३-२०११)[३]

सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ ; (१०-३-२०११)[४]

सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४ ; (१०-३-२०११)[५]

सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० ; (२१-४-२०११)

सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९ ; (१२-९-२०११)[६]

सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ ; (२१-५-२०११)[७]

सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४० ;

सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २ ;

सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६ ; (१२-३-२०१२)

सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७ ; (४-८-२०१२)

सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २० ;

सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८ ;

सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४ ;

सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ ;

---

[१] शासकीय अधिसूचना, नगरविकास क्रमांक बी.एम.सी. १००५/१८५/प्र.क्र. २४/२००५/नवि-३२, दिनांक १ एप्रिल २०१० द्वारे.

[२] कलम १ आणि १२ या दिनांकास अंमलात आले, कलम २ ते ९, ११ आणि १३ ते १९ दिनांक २६ ऑगस्ट २०१० रोजी अंमलात आले. या अधिनियमाच्या कलम २० अन्वये सन २०१० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ आणि १० निरसित करण्यात आले.

[३] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १७ अन्वये सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १० निरसित करण्यात आला.

[४] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ८ अन्वये सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ९ निरसित करण्यात आला.

[५] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम १३ अन्वये सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ११ निरसित करण्यात आला.

[६] शासकीय अधिसूचना, नगरविकास क्रमांक एम.एम.सी. २०१०/५/प्र.क्र. ६/नवि-३२, दिनांक ९ सप्टेंबर २०११ द्वारे.

[७] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ४९ अन्वये सन २०११ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १२ निरसित करण्यात आला.

* सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१ हा अद्यापपर्यंत, अंमलात आणण्यात आलेला नाही.

@ या अधिनियमाचे कलम ३ हे शासकीय अधिसूचना, नगरविकास विभाग, क्रमांक बी.एम.सी. ५००७/२६७/प्र.क्र. ७१/नवि-३२, दिनांक २७ एप्रिल २०११ द्वारे दिनांक १ मे २००९ रोजी अंमलात येईल. या अधिनियमाच्या कलम २ ची तरतूद कलम ३५४ अक शी जेथवर संबंधित असेल तेथवर शासकीय अधिसूचना, नगरविकास विभाग, क्रमांक बी.एम.सी. ५००७/२६७/प्र.क्र. ७१/नवि-३२, दिनांक १ नोव्हेंबर २०११ द्वारे दिनांक १ नोव्हेंबर २०११ रोजी अंमलात येईल.

**[1][बृहन्मुंबई] महानगरपालिका शासनाशी संबंधित असलेला कायदा एकत्रित करण्याबाबत व त्यात सुधारणा करण्याबाबत अधिनियम.**

**उद्देशिका.** **ज्याअर्थी [1][बृहन्मुंबई] महानगरपालिका शासनाशी संबंधित असलेला कायदा एकत्रित करून त्यात सुधारणा करणे इष्ट आहे ; त्याअर्थी पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येत आहे :—**

## प्रकरण एक

## प्रारंभिक

**संक्षिप्त नाव व व्याप्ती.** **१.** या अधिनियमास [2][ [3][मुंबई महानगरपालिका] अधिनियम] असे म्हणावे. [4][तो] फक्त [5][बृहन्मुंबईस] लागू होईल.

**अधिनियमितींचे निरसन.** **२.** अनुसूची 'अ' मध्ये नमूद केलेल्या अधिनियमिती उक्त अनुसूचीच्या तिसऱ्या स्तंभात विनिर्दिष्ट केलेल्या व्याप्तीपर्यंत निरसित करण्यात आल्या आहेत :

परंतु,—

(अ) उक्त अधिनियमितींपैकी कोणत्याही अधिनियमितीखाली केलेले व अजून अंमलात असलेले सर्व नियम आणि उपविधी, प्रसिद्ध केलेल्या सर्व अधिसूचना, काढलेले सर्व आदेश आणि दिलेली सर्व लायसने व परवानग्या या सर्व गोष्टी या अधिनियमाच्या तरतुदींशी सुसंगत असतील तेथवर, अनुक्रमे या अधिनियमाखाली केलेल्या, प्रसिद्ध केलेल्या, काढलेल्या आणि दिलेल्या आहेत असे मानण्यात येईल ; आणि

(ब) हा अधिनियम अंमलात येण्यापूर्वी महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेसाठी काढलेली सर्व ऋणे आणि पत्करलेली सर्व दायित्वे व महानगरपालिकेने, महानगरपालिकेबरोबर किंवा महानगरपालिकेसाठी केलेल्या सर्व संविदा आणि करावयाचे कबूल केलेल्या सर्व बाबी आणि गोष्टी या अधिनियमाखाली रचना करण्यात आलेल्या, महानगरपालिकेकडून किंवा महानगरपालिकेसाठी काढण्यात किंवा पत्करण्यात आलेल्या आहेत किंवा अशा महानगरपालिकेकडून, महानगरपालिकेसाठी, महानगरपालिकेबरोबर करण्यात किंवा करावयाचे कबूल करण्यात आलेल्या आहेत असे मानले जाईल ; आणि

(क) हा अधिनियम अंमलात येण्याच्या वेळी महानगरपालिकेस येणे असलेल्या सर्व पट्ट्या, कर व रकमा या अधिनियमाखाली महानगरपालिकेस येणे आहेत असे मानले जाईल ; आणि

(ड) महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेविरुद्ध अथवा आयुक्ताने किंवा आयुक्ताविरुद्ध दाखल केलेले किंवा हा अधिनियम पारित झाला नसता तर उक्त महानगरपालिकेस किंवा महानगरपालिकेविरुद्ध किंवा आयुक्तास किंवा आयुक्ताविरुद्ध दाखल करता आले असते असे सर्व दिवाणी किंवा फौजदारी दावे किंवा इतर कायदेविषयक कार्यवाह्या या जणू हा अधिनियम पारित झालेला नसावा त्याप्रमाणे अनुसूची 'र' मधील कलम १३ च्या तरतुदींच्या अधीनतेने, चालू ठेवता व दाखल करता येतील ; आणि

---

[1] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची अन्वये " ग्रेटर बॉम्बे " या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[2] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ४ (अ) अन्वये " मुंबई शहर नगरपालिका अधिनियम, १८८८ " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[3] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) २(अ) अन्वये " बॉम्बे महानगरपालिका " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम २ अन्वये " यात अन्यथा स्पष्टपणे जी तरतूद केलेली असेल ते खेरीज करून एरव्ही तो " या मजकुराऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[5] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) २(ब) अन्वये " ग्रेटर बॉम्बे " या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(ई) * मुंबईचे गव्हर्नर इन कौन्सिल यांच्या अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमात कोणत्याही अधिनियमितींच्या संबंधात केलेला उल्लेख हा जणू या अधिनियमाच्या संबंधात किंवा त्याच्या तत्सम भागांच्या संबंधात केलेला उल्लेख असावा त्याप्रमाणे त्यांचा अर्थ लावण्यात येईल.

**संज्ञांच्या व्याख्या.** **३.** विषयात किंवा संदर्भात प्रतिकूल असे काहीही नसेल तर, या अधिनियमात—

[१][(अ) " शहर " म्हणजे, बृहन्मुंबई कायदे व मुंबई उच्च न्यायालय (हद्दी जाहीर करणे) अधिनियम, १९४५ यातील अनुसूची (अ) च्या भाग एक मध्ये विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र ; १९४५ चा मुंबई १७.

[२][(अअ) " वाढवलेली उपनगरे " म्हणजे, बृहन्मुंबई कायदे व मुंबई उच्च न्यायालय (हद्दी जाहीर करणे) अधिनियम, १९४५ याची अनुसूची (अ) च्या भाग चार यात विनिर्दिष्ट केलेले क्षेत्र ; ] ; १९४५ चा मुंबई १७.

(अ-१) " [३][बृहन्मुंबई] " म्हणजे, बृहन्मुंबई कायदे व मुंबई उच्च न्यायालय (हद्दी जाहीर करणे) अधिनियम, १९४५ याची अनुसूची ' अ ' च्या भाग एक, दोन व तीन यांमध्ये विनिर्दिष्ट केलेली क्षेत्रे [४][आणि तीमध्ये मुंबई नगरपालिका [हद्दी आणखी वाढवणे व अनुसूची ब-ब-अ (सुधारणा)] अधिनियम, १९५६ यांच्या प्रारंभाच्या तारखेस व त्या तारखेपासून वाढवलेल्या उपनगराचा, म्हणजेच त्या अनुसूचीच्या चौथ्या भागात विनिर्दिष्ट केलेल्या [५][क्षेत्राच्या संबंधात भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३थ याच्या खंड (२) अन्वये काढण्यात आलेल्या अधिसूचनेमध्ये अधिक मोठे नागरी क्षेत्र म्हणून विनिर्दिष्ट केलेल्या] क्षेत्राचा समावेश होतो] ; १९४५ चा मुंबई १७. १९५६ चा मुंबई ५८.

(अ-२) " उपनगरे " म्हणजे, बृहन्मुंबई कायदे व मुंबई उच्च न्यायालय (हद्दी जाहीर करणे) अधिनियम, १९४५ याच्या अनुसूची ' अ ' मधील भाग दोन व तीन यांत विनिर्दिष्ट केलेली क्षेत्रे] ; १९४५ चा मुंबई १७.

[६][(अ-३) " नागरिकांचा मागासवर्ग " म्हणजे, राज्य शासनाने इतर मागासवर्ग आणि विमुक्त जाती व भटक्या जमाती म्हणून वेळोवेळी घोषित केलेले असे वर्ग किंवा अशा वर्गांचे भाग अथवा त्यांमधली गट ;]

(ब) " महानगरपालिका " म्हणजे, [७][या अधिनियमान्वये रचना करण्यात आलेली किंवा रचना करण्यात आलेली असल्याचे मानलेली [८][बृहन्मुंबई]] महानगरपालिका ;

[९][(क) " पालिका सदस्य " म्हणजे, महानगरपालिकेचा सदस्य म्हणून रीतसर निवडून आलेली व्यक्ती आणि त्यामध्ये ज्याला,—

(एक) महानगरपालिकेच्या आणि महानगरपालिकेच्या समितीच्या कोणत्याही बैठकीमध्ये मत देण्याचा ; आणि

(दोन) महानगरपालिकेचा महापौर म्हणून किंवा महानगरपालिकेच्या कोणत्याही समितीचा सभापती म्हणून निवडून येण्याचा हक्क असणार नाही अशा नामनिर्देशित पालिका सदस्याचा समावेश होतो ;]

---

* मुंबईचे गव्हर्नर या शब्दांत फेरबदल करण्यात येणार नाही, पहा महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६०.

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ५ (एक) अन्वये खंड (अ) ऐवजी हे खंड दाखल करण्यात आले.

[२] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम ३ (१) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ३ (अ) अन्वये, मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम ३ (२) अन्वये हा भागांश दाखल करण्यात आला.

[५] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ३(अ) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ब) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ३ (क) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ३ (ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ३ (ड) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[१][(कक) " आयोग " म्हणजे, भारताचे संविधान याखाली † [महाराष्ट्र राज्यासाठी] रचना केलेला लोकसेवा आयोग ;]

(ड) " आयुक्त " म्हणजे, कलम ५४ खाली नेमलेला [२][बृहन्मुंबई] महानगरपालिका आयुक्त व तीत [३][कलम ५४, पोट-कलम (३) खाली नेमलेल्या महानगरपालिका अपर आयुक्ताचा आणि] कलम ५९, पोट-कलम (३) खाली नेमलेल्या कार्यकारी आयुक्ताचा समावेश होतो] ;

(ई) " उप आयुक्त " म्हणजे, कलम ५५ खाली नेमलेला महानगरपालिका उप आयुक्त, [४][व कलम ५६अ खाली नेमलेला महानगरपालिका उप आयुक्त (सुधारणा)] आणि त्या संज्ञेत कलम ५९, पोट-कलम (३) खाली नेमलेल्या कार्यार्थ उप आयुक्ताचा [५][व कलम ५५, पोट-कलम (१अ) खाली नेमलेल्या महानगरपालिका अपर उप आयुक्ताचा] समावेश होतो ;

[६][(ईब) " पदनिर्देशित अधिकारी " म्हणजे, कलम ३५१ च्या पोट-कलम (१) अन्वये पदनिर्देशित केलेला एखादा अधिकारी ;]

[७]["(ईअ) " संचालक " म्हणजे, कलम ५४अ खाली नेमलेला संचालक (अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प) ;]

(फ) " पोलीस आयुक्त " म्हणजे, [८][बृहन्मुंबईचा] पोलीस आयुक्त ;

[९][(ग) " शिक्षण अधिकारी " म्हणजे, कलम ७६अ खाली नेमलेला महानगरपालिका शिक्षण अधिकारी व त्यामध्ये कलम ८५ खाली नेमलेल्या कार्यकारी महानगरपालिका शिक्षण अधिकाऱ्याचा समावेश होतो] ;

[१०][(ह) " निवडणूक " म्हणजे, या अधिनियमाखाली पालिका सदस्याची किंवा पालिका सदस्यांच्या जागा भरण्यासाठी घेण्यात आलेली निवडणूक ;] ;

[११][(आय) " विधानसभा मतदारसंघ " म्हणजे, महाराष्ट्र विधानसभेच्या निवडणुकीसाठी कायद्याने तरतूद केलेला जो कोणताही मतदारसंघ त्या त्या वेळी [१२][बृहन्मुंबईत] समाविष्ट असेल तो मतदारसंघ किंवा त्याचा कोणताही भाग ;

(जे) " विधानसभा मतदार यादी " म्हणजे, लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५० याच्या तरतुदींअनुसार विधानसभेच्या कोणत्याही मतदारसंघासाठी तयार करण्यात आलेली मतदारांची यादी ;] ;

(के) " लायसनदार नळकारागीर " आणि " लायसनदार सर्वेक्षक " म्हणजे, अनुक्रमे या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी नळकारागीर व सर्वेक्षक म्हणून कलम ३५५ खाली लायसन दिलेली व्यक्ती ;

---

१ सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम २ (२) अन्वये खंड (कक) समाविष्ट करण्यात आला.
२ सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ३(क) अन्वये "ग्रेटर बॉम्बे" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.
३ सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम २ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
४ सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ३(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
५ सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ५(तीन) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.
६ सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम २ अन्वये खंड (ईअ) समाविष्ट करण्यात आला.
७ सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम २ अन्वये खंड (६अ) समाविष्ट करण्यात आला.
८ सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ५(चार) अन्वये "मुंबईचा" या ऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.
९ सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम २(३) अन्वये खंड (ग) समाविष्ट करण्यात आला.
१० सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५४, कलम २ अन्वये खंड (ह) समाविष्ट करण्यात आला.
११ सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम २ अन्वये खंड (आय) व (जे) समाविष्ट करण्यात आले.
१२ सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ३(इ) अन्वये "ग्रेटर बॉम्बे" या ऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.
† महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये "मुंबई राज्य" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[1][(केअ) " अनुसूचित जाती " म्हणजे, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४१ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात अनुसूचित जाती असल्याचे मानण्यात येत असलेल्या अशा जाती, वंश किंवा जनजाती (जमाती) किंवा अशा जाती, वंश किंवा जनजाती यांचे भाग किंवा त्यामधील गट ;

(केब) " अनुसूचित जनजाती " म्हणजे, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३४२ अन्वये महाराष्ट्र राज्याच्या संबंधात अनुसूचित जनजाती असल्याचे मानण्यात येत असलेल्या अशा जनजाती किंवा जनजाती समूह किंवा अशा जनजाती किंवा जनजाती समूह यांचे भाग किंवा त्यांतीत गट ;]

(ल) " लघुवाद न्यायालय " म्हणजे, मुंबई येथील लघुवाद न्यायालय ;

[2][(लअ) " राज्य निवडणूक आयोग " म्हणजे, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३-ट, खंड (१) यांच्या तरतुदींनुसार नियुक्त करण्यात आलेल्या राज्य निवडणूक आयुक्ताचा समावेश असलेला राज्य निवडणूक आयोग ;]

(म) " मालक " याचा कोणत्याही परिवास्तूच्या संदर्भातील अर्थ, जी व्यक्ती उक्त परिवास्तूचे भाडे घेते ती किंवा जी परिवास्तू भाड्याने दिली असती तर, जिला तिचे भाडे घेण्याचा हक्क असता ती व्यक्ती असा आहे व त्यामध्ये पुढील व्यक्तींचा समावेश होतो—

(एक) जो मालकाच्या वतीने असे भाडे घेतो तो अभिकर्ता किंवा विश्‍वस्त ;

(दोन) जो धार्मिक किंवा धर्मदाय प्रयोजनांसाठी असलेल्या कोणत्याही परिवास्तूचे भाडे घेतो किंवा अशी परिवास्तू ज्याच्याकडे सोपवली आहे किंवा तिच्याशी ज्याचा संबंध आहे असा अभिकर्ता किंवा विश्वस्त ;

(तीन) उक्त परिवास्तूचा ताबा घेण्यास किंवा तिचा मालक म्हणून असलेल्या हक्कांचा वापर करण्यास, सक्षम अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयाने नेमलेला धारक, समपहर्ता किंवा व्यवस्थापक ;

(न) एखादी व्यक्ती कोणत्याही वास्तव्य-स्थळाचा अधूनमधून वापर करीत असेल किंवा तिच्या काही भागांशाचा झोपण्याची खोली म्हणून, अखंडितपणे नसला तरी, वापर करीत असेल तर ती त्या जागेत " राहते " असे मानले जाईल ;

आणि एखादी व्यक्तीस अशा कोणत्याही वास्तव्य-स्थळी कोणत्याही वेळी परत येण्याची मुभा असेल तर किंवा तेथे परत येण्याचा इरादा सोडून देण्यात आला नसेल तर, ती व्यक्ती वास्तव्य-स्थळी नसते किंवा तिचे इतरत्र दुसरे वास्तव्य-स्थळ असून ती तेथे राहते केवळ याच कारणावरून तिचे अशा वास्तव्य-स्थळी " राहणे " बंद झाले आहे असे मानण्यात येणार नाही ;

(ओ) " सार्वजनिक कर्जरोखे " म्हणजे, [3][केंद्र सरकारचे] कर्जरोखे आणि [4][केंद्र सरकारने किंवा कोणत्याही [5][राज्य] शासनाने] हमी दिलेले कोणतेही कर्जरोखे, मुंबई बंदर विश्‍वस्तव्यवस्थेचे कर्जरोखे, या अधिनियमाखाली काढलेले कर्जरोखे आणि यापूर्वीही काढलेली कोणतीही मुंबई महानगरपालिका ऋणपत्रे किंवा इतर कर्जरोखे [6][आणि मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ आणि मुंबई शहर सुधारणा विश्‍वस्तव्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ याखाली काढलेली कोणतीही ऋणपत्रे किंवा इतर कर्जरोखे] ; १८९८ चा मुंबई ४. १९२५ चा मुंबई १६.

---

[1] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ३(ई) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ३(फ) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[3] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये "भारत सरकार " या शब्दाऐवजी " केंद्र सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[4] वरील आदेशान्वये " सरकारने " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[5] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी " राज्य " हा शब्द दाखल करण्यात आला.

[6] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ३(ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(प) " कर " या संज्ञेत, या अधिनियमान्वये बसवता येईल अशा कोणत्याही कराचा समावेश होतो ;

[१][(पअ) " वस्तू " या संज्ञेचा जकातीच्या संबंधातील अर्थ, कोणताही माल, असा आहे ;]

(क्यू) " वाहन " या संज्ञेत गाडी, खटारा, यान, छकडा, मालमोटार, हातगाडी यांचा आणि शहराच्या सडकांवर वापरता येण्याजोगे कोणत्याही वर्णनाचे, चाक असलेले कोणतेही वाहन याचा समावेश होतो ;

(र) " जमीन " या संज्ञेत, [२][जिच्यावर बांधकाम करण्यात येत आहे किंवा करण्यात आले आहे] किंवा जी पाण्याने आच्छादलेली आहे अशी जमीन [३][जमिनीपासून मिळणारे फायदे किंवा भू-संलग्न वस्तू किंवा भू-संलग्न असलेल्या कोणत्याही वस्तूशी कायमच्या जखडलेल्या वस्तू आणि विधानमंडळ अधिनियमितींअन्वये कोणत्याही सडकेवर निर्माण करण्यात आलेला हक्क यांचा समावेश होतो] ;

(स) " इमारत " या संज्ञेत, घर, उप-घर, तबेला, छपरी, झोपडी [४][टाकी (इमारतीमध्ये किंवा इमारतीच्या कोणत्याही भागामध्ये पिण्याचे पाणी साठविण्यासाठी असलेली टाकी वगळून)] व अशी इतर प्रत्येक संरचना यांचा समावेश होतो—मग ती चिरेबंदी असो किंवा विटा, लाकूड, माती, धातू किंवा कोणतेही इतर सामान याने बांधलेली असो ;

[५][(सअ) " गाळा " या संज्ञेचा अर्थ, तात्पुरती इमारत किंवा तिचा भाग यांव्यतिरक्त भाड्याने दिलेली किंवा भाड्याने देण्याचा इरादा असलेली किंवा स्वतंत्रपणे भोगवट्यात असलेली इतर इमारत किंवा तिचा भाग, असा आहे ;

(सब) " तात्पुरती इमारत " या संज्ञेचा अर्थ, जी इमारत मुख्यतः मातीची, पानांची, गवताची, कापडाची, गवती छपराची, लाकडाची, पन्हळीदार लोखंडी पत्र्याची किंवा ॲस्बेस्टॉस सिमेंटच्या पत्र्यांची किंवा अशाच इतर सामानाने बांधलेली असेल अशी कोणतीही इमारत, असा आहे व तिच्यात आयुक्ताने तात्पुरती उपाययोजना म्हणून जी इमारत बांधण्यास परवानगी दिली असेल अशा कोणत्याही आकाराच्या व कोणत्याही सामानाने बांधलेल्या इमारतीचा समावेश होतो ;]

(ट) " जलदाय व्यवस्था " या संज्ञेत तलाव, ओढा, झरा, विहीर, पंप, जलाशय, हौद, टाकी, [६][बोगदा], वाहिनी—मग ती झाकलेली असो अगर उघडी असो—जलद्वार, मुख्य नळ अधःप्रणाल, पाण्याचा पुरवठा करणारे किंवा त्यासाठी वापरण्यात येणारे इंजिन आणि यंत्रसामग्री, जमीन, इमारत व इतर वस्तू यांचा समावेश होतो ;

[७][(यू) " नाली " या संज्ञेत, मलप्रवाह, घृणास्पद पदार्थ, प्रदूषित पाणी, घाणपाणी, सांडपाणी, पावसाचे पाणी किंवा भूपृष्ठाखालील पाणी वाहून नेण्यासाठी केलेले मलप्रणाल, नळ, खड्डा, वाहिका, [८][बोगदा], आणि इतर कोणतेही साधन यांचा तसेच कोणतेही निष्कासक, संपीडित

---

[१] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम २ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९१८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम २ अन्वये "बांधलेल्या" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ३(क) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९५७ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम २ अन्वये हे खंड समाविष्ट करण्यात आले.

[६] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम २(अ) अन्वये हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

[७] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम २ अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (यू) दाखल करण्यात आला.

[८] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम २(ब) अन्वये हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

हवा प्रधानवाही मलप्रवाह, वाहून नेणारे बंद प्रधानवाही आणि मलप्रवाह किंवा घृणास्पद पदार्थ उपसून काढणारी, गोळा करणारी, त्यांचे निस्सारण करणारी किंवा ते हलविणारी विशेष यंत्रसामग्री किंवा उपकरण संच यांचा समावेश होतो ;]

(व्ही) " घराची बोळकांडी " म्हणजे, नाली म्हणून उपयोगात आणण्यासाठी किंवा संडास, मुत्री किंवा मलकुंड किंवा दुर्गंधियुक्त अगर प्रदूषित पदार्थासाठी ठेवलेले इतर पात्र याकडे जाण्यासाठी महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यास किंवा ती साफ करण्यासाठी अगर त्यातील घाण काढून नेण्याकरिता नेमलेल्या व्यक्तीस जाऊ देण्यासाठी बांधलेला, अलग राखलेला किंवा उपयोगात आणलेला एखादा मार्ग किंवा जमिनीची पट्टी ;

(डब्ल्यू) " सडक " या संज्ञेत कोणताही महामार्ग आणि ज्यावर लोकांना जाण्यायेण्याचा हक्क असेल किंवा जेथे लोकांस जाता येईल असा किंवा २० वर्षांच्या काळात ज्यावरून लोकांनी निर्वेधपणे ये-जा केलेली असेल किंवा जेथे त्यांना जाता येते असा कोणताही महामार्ग, सेतू, पूल, पारमार्ग, कमान, रस्ता, गल्ली, पायवाट, चौक, प्राकार, बोळ किंवा मार्ग यांचा समावेश होतो—मग ते रहदारीचे असोत किंवा नसोत–; आणि जेव्हा कोणत्याही सडकेत पायवाट तसेच वाहनांचा मार्ग असेल तेव्हा या संज्ञेत या दोहोंचाही समावेश होतो ;

(क्ष) " सार्वजनिक सडक " म्हणजे, जी आतापर्यंत महानगरपालिकेने समतल केलेली आहे किंवा जिच्यावर फरसबंदी केलेली आहे, खडी टाकली आहे, पाणी वाहून जाण्यासाठी पाट काढलेले आहेत, गटारे केलेली आहेत किंवा जिची दुरुस्ती केलेली आहे अशी कोणतीही सडक आणि या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये जी सार्वजनिक सडक होते [१][किंवा जी सार्वजनिक सडक म्हणून महानगरपालिकेमध्ये निहित होते], अशी कोणतीही सडक ;

(य) " खाजगी सडक " म्हणजे, जी सार्वजनिक सडक नाही अशी सडक ;

[२][(यय) " उदिमाच्या जागेतील केरकचरा " म्हणजे, कोणताही व्यवसाय, कारखाना किंवा व्यवसाय यामुळे निर्माण होणारा केरकचरा ; व या संज्ञेत अशा केरकचऱ्याचा समावेश होतो ;]

(झ) " उपद्रव " या संज्ञेत ज्याच्या योगे उक्त चक्षुरिंद्रियास, घ्राणेंद्रियास किंवा श्रवणेंद्रियास इजा, धोका, त्रास किंवा पीडा होते किंवा होण्याचा संभव आहे किंवा जे जीवितास धोकादायक किंवा मालमत्तेस अपायकारक आहे किंवा होण्याचा संभव आहे अशा कोणत्याही कृत्याचा, वर्जनाचा, जागेचा किंवा वस्तूचा समावेश होतो ;

(अअ) " घातक रोग " म्हणजे, पटकी किंवा ज्यायोगे मानवी जीवितास धोका उत्पन्न होतो असा कोणताही देशज रोग, साथरोग किंवा संक्रामक रोग ;

(बब) " सरकारी वर्ष " म्हणजे, एक एप्रिलपासून सुरू होणारे वर्ष ;

(कक) " सार्वजनिक सुट्टी " म्हणजे, [३][**शासकीय राजपत्रात**] प्रसिद्ध केलेल्या [४][[५][राज्य] शासनाच्या] आदेशान्वये शहरातील सरकारी कार्यालये ज्या दिवशी किंवा ज्या इतर अवधीत बंद राहतात तो दिवस किंवा तो अवधी ;

---

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ५ (पाच) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२] सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम २ (ब) अन्वये खंड (यय) जादा दाखल करण्यात आला.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याअन्वये "**मुंबई सरकार राजपत्र**" याऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याअन्वये "शासनाच्या" या शब्दाऐवजी "प्रांतिक शासनाच्या" हे शब्द दाखल करण्यात आले.

[५] विधि अनुकूलन परिषद आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(डड) " पोट-कलम " आणि " खंड " हे शब्द, ते ज्या कलमात येतात त्या कलमाचे अनुक्रमे पोट-कलम किंवा खंड दर्शवितात ;

[१][(ईई) " भटारखाना " म्हणजे, जो पाव, बिस्किटे किंवा मिठाई भाजण्यापासून किंवा विकून नफा मिळवला जातो असे पाव किंवा बिस्किटे जेथे भाजली जातात किंवा अशी मिठाई जेथे तयार करण्यात येते अशी कोणतीही जागा ;

(फफ) " खाद्यगृह " म्हणजे, ज्या कोणत्याही परिवास्तूमध्ये लोकांना प्रवेश दिला जातो व ज्या परिवास्तूमध्ये तिची मालकी असणाऱ्या किंवा तिच्यात हितसंबंध असणाऱ्या किंवा तिचे व्यवस्थापन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या नफ्यासाठी किंवा प्राप्तीसाठी, कोणत्याही प्रकारचे अन्न त्या जागी सेवन करण्यासाठी तयार केले जाते किंवा पुरविले जाते ती परिवास्तू ;

(गग) " परिवास्तू " या संज्ञेत घरवाड्या, इमारती व कोणत्याही धारणाधिकाराखालील जमिनी यांचा समावेश होतो, मग त्या खुल्या असोत किंवा परिवेष्टित असोत, त्यांच्यावर बांधकाम करण्यात आलेले असो किंवा नसो आणि त्या सार्वजनिक असोत किंवा खाजगी असोत ;]

[२][(हह) " मिष्ट पदार्थाचे दुकान " म्हणजे, कोणतेही आईस्क्रीम किंवा मिठाई किंवा मिष्ट पदार्थ विक्रीसाठी तयार करण्याकरिता, त्यावर प्रक्रिया करण्याकरिता किंवा साठविण्याकरिता किंवा त्यांची घाऊक अथवा किरकोळ विक्री करण्याकरिता, वापरण्यात येत असेल अशी कोणतीही परिवास्तू किंवा अशा कोणत्याही परिवास्तूचा भाग, मग तो कोणत्याही प्रकारचा असो, कोणाहीकरिता केलेला असो व कोणत्याही नावाने ओळखण्यात येत असो आणि तो त्या परिवास्तूत किंवा परिवास्तूच्या बाहेर सेवन करण्याकरिता ठेवलेला असो ;]

[३] * * * *

[४][(लल) " बाजार " या संज्ञेत ज्या कोणत्याही जागेत सागुती, मासळी, फळे, भाजीपाला, मानवी खाद्य म्हणून असलेली जनावरे किंवा मानवी खाद्य म्हणून असलेले कोणतेही इतर पदार्थ यांची विक्री करण्याकरिता किंवा ते विक्रीसाठी मांडण्याकरिता लोक अशा जागेच्या मालकांच्या संमतीने किंवा संमतीवाचून जमतात त्या जागेचा समावेश होतो, मग तेथे खरेदीदार व विक्रेते एकत्र जमण्याबाबत कोणतेही सर्वसामान्य विनियमन असो वा नसो, तसेच अशा, जागेच्या मालकाकडून किंवा कोणत्याही इतर व्यक्तीकडून बाजारात चालणाऱ्या धंद्यावर किंवा तेथे येणाऱ्या व्यक्तींवर कोणतेही नियंत्रण ठेवण्यात येवो किंवा न येवो ;]

[५][(मम) " [६][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रम] " म्हणजे, लोकांची ने-आण करण्यासाठी ट्राम-मार्ग, बिनरूळाच्या ट्राम किंवा यंत्रचालित वाहतुकीची साधने पुरवण्यासाठी किंवा लोकांना विद्युत ऊर्जेचा पुरवठा करण्यासाठी महानगरपालिकेने संपादन केलेले, संघटित केलेले, रचना केलेले, सुस्थितीत राखलेले, वाढवलेले किंवा व्यवस्थापन केलेले किंवा चालवलेले सर्व उपक्रम असा असून तीत अशा प्रत्येक उपक्रमासाठी महानगरपालिकेमध्ये निहित करण्यात आलेली किंवा ती निहित असलेली सर्व जंगम व स्थावर मालमत्ता व हक्क यांचा समावेश होतो ;

(नन) " महाव्यवस्थापक " म्हणजे, कलम ६०अ खाली नेमणूक करण्यात आलेला [६][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाचा] महाव्यवस्थापक असून तीत कलम ६०ब खाली नेमलेल्या कार्यकारी महाव्यवस्थापकाचा समावेश होतो.

---

[१] सन १९१६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम २ अन्वये खंड (ईई), (फफ) व (गग) समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९२० चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम २ अन्वये खंड (हह) समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम २(५) अन्वये खंड (आयआय), (जेजे) व (केके) वगळण्यात आले.

[४] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम २ अन्वये हा खंड जादा दाखल करण्यात आला.

[५] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम २ अन्वये हे खंड जादा दाखल करण्यात आले.

[६] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) (३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][(ओओ) " प्रभाग समिति " म्हणजे, कलम ५० टट अन्वये रचना करण्यात आलेली प्रभाग समिती ;

(पीपी) " वित्तीय आयोग " म्हणजे, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २४३ झ च्या तरतुदींनुसार स्थापन करण्यात आलेला वित्तीय आयोग ;]

[२][(क्यूक्यू) " महापौर " म्हणजे, कलम ३७-एक-ब खाली निर्वाचित पालिका सदस्यांनी त्यांच्यामधून निवडलेला महानगरपालिकेचा महापौर ;

[३]* * * *

(टट) " विहित " म्हणजे, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित.]

## प्रकरण दोन
## महानगरपालिकेची रचना
### महानगरपालिका प्राधिकरणे

**नगरपालिका प्राधिकारी.** [४][**४.** या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्याचे काम ज्या महानगरपालिका प्राधिकरणांकडे सोपविण्यात आले आहे ती पुढीलप्रमाणे आहेत :—

(अ) महानगरपालिका ;

(ब) स्थायी समिती ;

(क) सुधार समिती ;

(ड) [५][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समिती] ;

(ई) शिक्षण समिती ;

(फ) प्रभाग समिती ;

(ग) महापौर ;

(ह) महानगरपालिका आयुक्त ;

(आय) [६][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमांचा] महाव्यवस्थापक.]

### (अ) महानगरपालिका

**महानगरपालिकेची रचना.** [७][**५.** (१) महानगरपालिका पुढील सदस्यांची मिळून बनलेली असेल :—

(अ) प्रभाग निवडणुकींच्यावेळी प्रत्यक्ष निवडून आलेले [८][दोनशे सत्तावीस] पालिका सदस्य ; आणि

(ब) महानगरपालिकेने विहित रीतीने नामनिर्देशित करावयाचे, पालिका प्रशासनाचे विशेष ज्ञान किंवा अनुभव असलेले पाच पालिका सदस्य :

परंतु, महानगरपालिकेची सध्याची मुदत समाप्त होईपर्यंत या पोट-कलमातील कोणतीही गोष्ट परिणामकारक नाही.

(२) महानगरपालिका ही ' [९][बृहन्मुंबई] महानगरपालिका ' या नावाचा एक निगम निकाय असेल आणि तिची अखंड परंपरा असेल आणि एक सामान्य मुद्रा असेल व अशा नावाने तिला किंवा तिच्यावर दावा लावता येईल.]

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ३(ग) अन्वये हे खंड जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २ अन्वये हे खंड जादा दाखल करण्यात आले.

[३] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २ अन्वये समाविष्ट करण्यात आलेले खंड (रर) व (सस) हे सन १९९९ चा महाराष्ट्र क्रमांक २७, कलम २ अन्वये वगळण्यात आले.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[५] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) (४) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) (३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ५ अन्वये हे कलम दाखल करण्यात आले.

[८] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम २ अन्वये 'दोनशे एकवीस' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][**५अ**. (१) कलम ५ चे पोट-कलम (१) खंड (अ) किंवा कलम १९ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) अधिनियम, १९९४ याच्या प्रारंभानंतर घेतल्या जाणाऱ्या कोणत्याही सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रयोजनार्थ प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येपैकी, पोट-कलमे (२) ते (५) (दोन्ही धरून) यामध्ये तरतूद केलेल्या अशा संख्येइतकी पदे अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती यांमधील व्यक्ती, स्त्रिया व नागरिकांचा मागासवर्ग यांच्यासाठी राखून ठेवण्यात येतील. **जागा राखून ठेवणे.**

(२) (अ) अनुसूचित जातींमधील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागांच्या संख्येचे, महानगरपालिकेमधील, प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येशी असलेले प्रमाण हे जास्तीत जास्त शक्य असेल तेथवर, [२][बृहन्मुंबईतील] अनुसूचित जातीच्या लोकसंख्येचे [२][बृहन्मुंबईच्या] एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल त्या प्रमाणाइतकेच असेल ;

(ब) खंड (अ) अन्वये राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या [३][एक-द्वितीयांश] जागा अनुसूचित जातींच्या स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील :

परंतु, अनुसूचित जातींसाठी केवळ एक जागा राखून ठेवलेली असेल तर, अनुसूचित जातींच्या स्त्रियांसाठी कोणतीही जागा राखून ठेवण्यात येणार नाही. [३] * * * *

(३) (अ) अनुसूचित जनजातींमधील व्यक्तींसाठी राखून ठेवावयाच्या जागांच्या संख्येचे, महानगरपालिकेमधील, प्रत्यक्ष निवडणुकींद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येशी असलेले प्रमाण हे जास्तीत जास्त शक्य असेल तेथवर, बृहन्मुंबईतील अनुसूचित जनजातींच्या लोकसंख्येचे [२][बृहन्मुंबईच्या] एकूण लोकसंख्येशी जे प्रमाण असेल त्या प्रमाणाइतकेच असेल ;

(ब) खंड (अ) अन्वये राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या [४][एक-द्वितीयांश] जागा अनुसूचित जनजातींच्या स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील :

परंतु, अनुसूचित जनजातींसाठी केवळ एक जागा राखून ठेवलेली असेल तर, अनुसूचित जनजातींच्या स्त्रियांसाठी कोणतीही जागा राखून ठेवण्यात येणार नाही. [५] * * * *

(४) (अ) प्रत्यक्ष निवडणुकींद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येपैकी, शक्य असेल तेथवर, [६][सत्तावीस टक्के] जागा नागरिकांच्या मागासवर्गातील व्यक्तींसाठी राखून ठेवण्यात येतील ;

(ब) खंड (अ) अन्वये राखून ठेवलेल्या जागांच्या एकूण संख्येच्या [७][एक-द्वितीयांश] जागा नागरिकांच्या मागासवर्गातील स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील ;

(५) प्रत्यक्ष निवडणुकीद्वारे भरावयाच्या जागांच्या एकूण संख्येच्या [८][एक-द्वितीयांश] जागा (अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती आणि नागरिकांचा मागासवर्ग यांमधील स्त्रियांसाठी राखून ठेवलेल्या जागांच्या संख्येसह), स्त्रियांसाठी राखून ठेवण्यात येतील.

---

१ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ६ अन्वये हे कलम दाखल करण्यात आले.

२ सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (१) अन्वये "ग्रेटर बॉम्बे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २ (१) (क) अन्वये "एक तृतीयांश" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

४ वरील अधिनियमाच्या कलम २ (१) (ख) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

५ वरील अधिनियमाच्या कलम २ (२) (क) अन्वये "एक तृतीयांश" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६ वरील अधिनियमाच्या कलम २ (२) (ख) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

७ सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम २ अन्वये 'शक्य असेल तेथवर सत्तावीस टक्के' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

८ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २ (३) अन्वये "एक तृतीयांश" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

९ वरील अधिनियमाच्या कलम २ (४) अन्वये "एक तृतीयांश" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(६) राज्य शासन, पोट-कलमे (२), (३), (४) व (५) यांअन्वये राखून ठेवण्यात आलेल्या जागा निरनिराळ्या प्रभागांना आळीपाळीने नेमून देईल.

(७) पोट-कलम (५) मधील स्त्रियांसाठी असलेले आरक्षण वगळून पोट-कलमे (२) आणि (३) अन्वये अनुसूचित जातींसाठी व अनुसूचित जनजातींसाठी असलेले जागांचे आरक्षण, भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३३४ मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कालावधीनंतर परिणामकारक असण्याचे बंद होईल.]

राखीव जागेकरिता निवडणूक लढविणाऱ्या व्यक्तीने जातीचे प्रमाणपत्र व वैधता प्रमाणपत्र सादर करणे.

[१][**५ब.** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिति, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या जागेसाठी निवडणूक लढवण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने नामनिर्देशन पत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागासप्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० च्या तरतुदींना अनुसरून, सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल.] २००१ चा महा. २३.

[२] * * * *

[३][“परंतु, राज्य निवडणूक आयोगाने जाहीर केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार, सार्वत्रिक किंवा पोट-निवडणुकांसाठी नामनिर्देशनपत्र भरण्याचा शेवटचा दिनांक ३१ डिसेंबर २०१७ किंवा त्यापूर्वीचा असेल, त्याबाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला जिला वैधता प्रमाणपत्र मिळालेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,–

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा; आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दलचे हमीपत्र, सादर करील :

परंतु आणखी असे की, त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती पालिका सदस्य राहण्यास निरर्ह ठरेल.]

[४][**महानगरपालिकेची मुदत : पालिका-सदस्यांचा पदावधी : नैमित्तिक रिकाम्या जागा, इत्यादी**]

महानगरपालिकेची मुदत.

[५][**६.** महानगरपालिका तिच्या पहिल्या सभेसाठी नेमून दिलेल्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीपर्यंत चालू राहील आणि त्यापेक्षा अधिक काळ चालू राहणार नाही.

---

[१] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम २ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[२] सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम २ अन्वये दोन्ही परंतुके वगळण्यात आली.

सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३ याचे कलम ६ पुढीलप्रमाणे वाचावे :—

शंका दूर करणे.

“ **६.** शंका दूर करण्याकरिता, याद्वारे असे जाहीर करण्यात येत आहे की, हा अधिनियम अंमलात येण्याच्या दिनांकापूर्वी, महानगरपालिका किंवा नगरपरिषदा यांच्या राखीव जागेसाठीची निवडणूक, मुंबई महागरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ किंवा यथास्थिति, महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ यांच्या अशा प्रारंभाच्या दिनांकाच्या लगतपूर्वी अस्तित्वात असलेल्या संबंधित तरतुदींद्वारे विनियमित करण्यात येईल.”

१९८८ चा मुंबई ३.
१९४९ चा मुंबई ५९.
१९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.
१९६५ चा महा. ३.

[३] सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम २ ही परंतुके जादा दाखल करण्यात आली.

[४] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ७ अन्वये मूळ शीर्षकाऐवजी हे शीर्षक दाखल करण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ८ अन्वये कलम ६ ऐवजी ही कलमे दाखल करण्यात आली.

**६अ.** पालिका सदस्यांचा पदावधी महानगरपालिकेच्या मुदतीबरोबरच समाप्त होईल. पालिका सदस्यांचा पदावधी.

**६ब.** महानगरपालिकेची रचना करण्यासाठी घ्यावयाची निवडणूक कलम ६ मध्ये विनिर्दिष्ट केलेली तिची मुदत समाप्त होण्यापूर्वी पूर्ण करण्यात येईल.] महानगरपालिकेची रचना करण्यासाठी निवडणूक.

**७.** [पालिका सदस्य सेवानिवृत्त होण्याचा दिवस.] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ९ अन्वये वगळण्यात आले.

**७अ.** [पालिका सदस्यांचा नेहमीचा पदावधी समाप्त झाल्यानंतर प्रशासकाची नेमणूक करण्यासाठी तरतूद.] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम १० अन्वये वगळण्यात आले.

[१][**७ब.** [२][या अधिनियमाची कलमे ४७, ४९, ५०ब किंवा ५०म किंवा इतर कोणत्याही तरतुदी यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी] पालिका सदस्य असण्याचे बंद होईल अशी व्यक्ती, ती पालिका सदस्य असण्याच्या आधारे महानगरपालिकेच्या कोणत्याही समितीवर धारण करीत असलेले कोणतेही अधिकारपद वस्तुतः रिकामे करील.] पालिका सदस्याने, तो पालिका सदस्य असण्याचे बंद झाल्यास सर्व अधिकारपदे रिकामी करणे.

**८.** जी कोणतीही व्यक्ती पालिका-सदस्य असण्याचे बंद होईल ती व्यक्ती निरर्ह ठरविण्यात आली नसल्यास पुन्हा पात्र असेल. पालिका सदस्य असण्याचे बंद झालेल्या व्यक्ती पुन्हा पात्र होणे.

**९.** पालिका-सदस्य म्हणून निवडून आलेल्या [३]* * * व्यक्तीने अधिकारपद स्वीकारण्याचे नाकारले असता अथवा असा पालिका-सदस्य मरण पावला असता, त्याने राजीनामा दिला असता, तो निरर्ह झाला असता किंवा [४][त्याच्या पदावधीमध्ये] तो काम करण्यास असमर्थ झाला असता, त्याच्या नैमित्तिक रिकाम्या जागा कशा भराव्या.

---

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ४ अन्वये कलम ७ ब ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलमे ६ व ७ अन्वये "यथास्थिति किंवा नेमलेल्या" आणि "किंवा नेमणूक" हा मजकूर वगळण्यात आला.

[४] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम १२(अ) अन्वये "निवृत्तीच्या दिवसापूर्वी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

अधिकारपदाची जागा नैमित्तिकरित्या रिकामी झाली आहे असे मानले जाईल आणि अशी रिकामी झालेली जागा सोईस्करपणे शक्य होईल तितक्या लवकर आणि त्या जागी एखाद्या व्यक्तीची निवडणूक [१]* * * * करून भरण्यात येईल. अशी व्यक्ती ज्या पालिका-सदस्यांच्या जागी ती निवडून आली असेल [१]* * * त्या पालिका-सदस्याला ती जागा रिकामी झाली नसती तर जितक्या अवधीपर्यंत अधिकारपद धारण करण्याचा हक्क असता तितक्याच अवधीपर्यंत अधिकारपद धारण करील.

[२][निवडून आलेल्या पालिका-सदस्याची नैमित्तिकरित्या रिकामी झालेली जागा, कलम ३४ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने भरण्यात येईल :]

[३][परंतु, [४][अशा जागा पालिका सदस्याचा पदावधी कलम ६ अन्वये ज्या दिनांकास समाप्त होईल त्या दिनांकाच्या मागील सहा महिन्यांत] रिकामी झाल्यास ती भरण्यासाठी कोणतीही निवडणूक घेता येणार नाही.]

[५]* * * * * * *

पालिका सदस्यांची नावे **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करणे.

**१०.** [६][ राज्य निवडणूक आयुक्त] पालिका-सदस्य म्हणून निवडून आलेल्या [१]* * * सर्व पालिका-सदस्यांची नावे [७][**शासकीय राजपत्रात**] प्रसिद्ध करील.

## मतदारांच्या आणि पालिका-सदस्यांच्या अर्हता व निरर्हता

[९][मतदान करण्यास अर्ह असलेल्या व्यक्ती.]

**११.** (१) ज्या प्रभागासाठी निवडणूक घेण्यात येत असेल, त्या प्रभागाचा मतदार म्हणून नगरपालिका मतदार यादीत एखाद्या व्यक्तीचे नाव दाखल झालेले नसेल तर तिला अशा प्रभागाच्या निवडणुकीत मतदानाचा हक्क असणार नाही.

[८]* * * * * * *

**११अ.** [प्रतिनिधींच्या निवडणुकीतील मतदारांची अर्हता.] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ६ अन्वये निरसित करण्यात आले.

**१२.** आणि **१३.** [सन १९२२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ या अन्वये निरसित करण्यात आले.]

---

[१] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलमे ६ व ७ अन्वये "यथास्थिति किंवा नेमलेल्या" आणि "किंवा नेमणूक" हा मजकूर वगळण्यात आला.

[२] सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम २ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[३] सन १९३६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम २ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[४] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम १२(ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १२ (क) अन्वये हे परंतुक वगळण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या कलम १३ अन्वये 'आयुक्त' या शब्दाऐवजी ' राज्य निवडणूक आयुक्त' हे शब्द दाखल करण्यात आले.

[७] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश अन्वये "मुंबई सरकार **राजपत्र**" याऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[८] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ५(अ) अन्वये पोट-कलमे (२), (३), (४), (५) व (६) वगळण्यात आली.

[९] वरील अधिनियमाच्या कलम ५(ब) अन्वये मूळ समासटीप ऐवजी ही समासटीप दाखल करण्यात आली.

**१४.** [१]* * कोणतीही व्यक्ती [२][तिचे नाव, कोणत्यातरी प्रभागाच्या नगरपालिका मतदार यादीमध्ये दाखल केलेले असल्यावाचून] एखाद्या प्रभागाच्या निवडणुकीत पालिका-सदस्य म्हणून निवडून येण्यास अर्हता असणार नाही. प्रभागाच्या निवडणुकीत पालिका-सदस्य म्हणून निवडून येण्यासाठी अर्हता.

[३]* * * *

[४]* * * *

**१४अ.** [प्रतिनिधींकडून सदस्य म्हणून निवडणूक होण्यासाठी अर्हता.] १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ या अन्वये निरसित करण्यात आले.

**१५.** [चेंबर, वगैरे यांनी करावयाच्या निवडणुकीसाठी अर्हता.] १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ या अन्वये निरसित करण्यात आले.

**१५अ.** [स्वीकृत केले जाण्यासाठी अर्हता.] १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७ याच्या कलम ३ अन्वये निरसित करण्यात आले.

**१६.** (१) कोणतीही व्यक्ती पुढील परिस्थितीत पालिका-सदस्य म्हणून निवडून येण्यास [५]* * [६]* * व पालिका-सदस्य राहण्यास निरर्ह होईल :— पालिका-सदस्य होण्यासाठी निरर्हता.

[७][(अ-एक) तिला,–

(एक) राज्य विधानमंडळाच्या निवडणुकीच्या प्रयोजनार्थ त्या-त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तद्न्वये अशा प्रकारे निरर्ह ठरवण्यात आले असेल :

परंतु, कोणत्याही व्यक्तीच्या वयाची एकवीस वर्षे पूर्ण झालेली असतील तर, तिचे वय पंचवीस वर्षांपेक्षा कमी आहे. या कारणावरून तिला निरर्ह ठरवण्यात येणार नाही ;

(दोन) महाराष्ट्र राज्य विधानमंडळाने केलेल्या कोणत्याही कायद्याद्वारे किंवा तद्न्वये अशा प्रकारे निरर्ह ठरवण्यात आले असेल तर, किंवा ;]

१९७१ चा महा. १३. १८६० चा ४५. [८][(अ) महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९७० याच्या कलम २ च्या प्रारंभानंतर, कोणत्याही वेळी, भारतीय दंड संहितेचे कलम १५३अ किंवा कलम ५०५ चे पोट-कलम (२) किंवा (३) खाली, शिक्षापात्र अपराधाबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आली असेल :

परंतु, अशी निरर्हता अशा अपराधसिद्धीच्या तारखेपासून सहा वर्षांच्या कालावधीकरिता राहील ; किंवा]

[९][(अअ) कलम १८-१अ अन्वये पदावरून दूर करण्यात आली असेल आणि अशाप्रकारे पदावरून दूर करण्याच्या दिनांकापासून पाच वर्षांचा काळ लोटला नसेल ; किंवा]

---

[१] सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम २(अ) अन्वये कंस व अंक " (१) " वगळण्यात आला.

[२] सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २ अन्वये " तिचे नाव कोणत्यातरी प्रभागाच्या अंतिम मतदार यादीच्या भाग एक मध्ये दाखल केलेले असल्यावाचून " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९२२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम ६ अन्वये निरसित करण्यात आलेला मजकूर वगळण्यात आला.

[४] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ९(१) अन्वये पोट-कलम (२) वगळण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १० अन्वये "किंवा नियुक्त" हे शब्द वगळण्यात आले.

[६] सन १९२२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम ८ अन्वये जादा दाखल केलेले व सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७, कलम ४ अन्वये वगळण्यात आलेले "किंवा स्वीकृत केलेले" हे शब्द गाळण्यात आले.

[७] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम १४(अ) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[८] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम २ अन्वये खंड (क) समाविष्ट करण्यात आला.

[९] सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम २ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[१][(ब) नैतिक अधःपाताचा अंतर्भाव असलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल भारतातील न्यायालयाने तिला सिद्धापराध ठरवलेले असेल तर—मात्र अशा अपराधसिद्धीच्या दिनांकापासून सहा वर्षांचा कालावधी उलटून गेलेला असेल तर ती गोष्ट वेगळी ; किंवा]

[२][(ब-अ) तिला दोनपेक्षा अधिक मुले असतील तर :

परंतु, महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा, नगर पंचायती आणि औद्योगिक नगरी (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९९५ याच्या प्रारंभाच्या दिनांकास (या खंडास यापुढे ज्याचा निर्देश "अशा प्रारंभाचा दिनांक" असा करण्यात आला आहे,) दोन मुलांपेक्षा अधिक मुले असणारी व्यक्ती, अशा प्रारंभाच्या दिनांकास तिला असणाऱ्या मुलांच्या संख्येत वाढ होत नाही तोपर्यंत या खंडान्वये निरर्ह ठरणार नाही :

परंतु, आणखी असे की, अशा प्रारंभाच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीत एकाच प्रसुतीमध्ये जन्माला आलेले एक मूल किंवा एकापेक्षा अधिक मुले या खंडात नमूद केलेल्या निरर्हतेच्या प्रयोजनाकरिता विचारात घेतली जाणार नाहीत.

**स्पष्टीकरण.—**या खंडाच्या प्रयोजनार्थ

(एक) ज्या वेळी एखाद्या जोडप्याला, अशा प्रारंभाच्या दिनांकाला किंवा त्या दिनांकानंतर आणि त्यानंतर फक्त एकच मूल असेल आणि त्यानंतरच्या एकाच प्रसूतीमध्ये कितीही मुलांचा जन्म झाला तरी ते एकच मूल असल्याचे समजण्यात येईल ;

(दोन) "मूल" यामध्ये दत्तक घेतलेले मूल किंवा मुले यांचा समावेश होत नाही.

जर व जोपर्यंत अशी व्यक्ती—

[३][(क) नादार असल्याचे न्यायनिर्णीत करण्यात आले असून किंवा पुन्हा नादार असल्याचे न्यायनिर्णीत करण्यात आले असून, इलाखा शहर नादारी अधिनियम, १९०९ याचे कलम १०३अ किंवा प्रांतातील नादारी अधिनियम, १९२० याचे कलम ७३ अन्वये कोणतीही निरर्हता तिला प्राप्त झालेली असेल तर व तोपर्यंत ; अथवा] १९०९ चा ३. १९२० चा ५.

(ड) ती, आयुक्त [४][संचालक किंवा उप आयुक्त] असेल किंवा महानगरपालिकेची अधिकारी किंवा कर्मचारी असेल तर, किंवा ती लायसनदार सर्वेक्षक किंवा नळकारागीर असेल [५][किंवा एखादा लायसनदार सर्वेक्षक किंवा नळकारागीर जिचा सदस्य असेल त्या भागीदारी संस्थेची ती सदस्य असेल] तर व तोपर्यंत ; अथवा

(ई) ती लघुवाद न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश असेल तर किंवा असा न्यायाधीश म्हणून काम पहात असेल तर व तोपर्यंत ; अथवा

[६][(ईई) (विश्वस्त या नात्याहून अन्य नात्याने) महानगरपालिकेस देणे असलेली कोणत्याही प्रकारची थकबाकी देण्याबद्दल, विशेष नोटीस बजाविण्यात आल्यानंतर, तीन महिन्यांच्या आत ती भरण्यात ती कसूर करील तर व तोपर्यंत ; अथवा]

(फ) महानगरपालिकेबरोबर, महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या किंवा असलेल्या कोणत्याही संविदेत किंवा नोकरीत तिचा स्वतःचा किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल तर व तोपर्यंत ; [७][अथवा]

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम १४(ब) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[२] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम २ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम ३(अ) व सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ४ अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (क) दाखल करण्यात आला.

[४] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम ३ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९४६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम ३(क) अन्वये व सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ३(ख) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[६] सन १९३२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११, कलम २ अन्वये खंड (ईई) समाविष्ट करण्यात आला.

[७] सन १९४६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम ३(ई) व सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ४ अन्वये "किंवा" हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

[1][(फअ) पालिका-सदस्य, म्हणून निवडून आल्यामुळे, पालिका-सदस्य म्हणून असलेल्या आपल्या पदावधीत, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे, तिचा स्वतःचा किंवा तिच्या भागीदाराचा, कोणतीही संमती-नि-परवाना धरून (मात्र महानगरपालिकेने दिलेले कोणतेही अधिकृत निवासस्थान वगळून) कोणत्याही भाडेपट्ट्यात किंवा महानगरपालिकेने केलेल्या किंवा तिच्या वतीने करण्यात आलेल्या जमिनीच्या विक्रीत किंवा खरेदीत किंवा त्यासाठी करण्यात आलेल्या कोणत्याही संविदेत, कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल ; किंवा]

[2][(फफ) ज्यात महानगरपालिकेचा किंवा आयुक्ताचा हितसंबंध असेल किंवा संबंध असेल अशा कोणत्याही दाव्याच्या किंवा कार्यवाहीच्या बाबतीत, त्यास, पालिका-सदस्य म्हणून निवडून आल्यानंतरही व्यावसायिक नात्याने व्यक्तिशः किंवा जिचा तो भागीदार आहे किंवा जिने त्यास व्यावसायिक नात्याने कामावर लावले आहे अशा भागीदारी संस्थेच्या नावाने नोकरीवर ठेवून घेतले असेल किंवा नोकरीला लावून घेतले असेल तर :

परंतु, जो पालिका-सदस्य नागरी हक्क मिळविण्यासाठी किंवा न्याय्य सार्वजनिक गाऱ्हाणी दूर करण्यासाठी विनामूल्य सेवा करीत असेल त्यास ही निरर्हता लागू असणार नाही.]

[3][(ग) राज्य विधानमंडळाची किंवा संसदेची सदस्य असेल :

परंतु, विद्यमान सदस्यांच्या सदस्यत्वावर, असा पालिका सदस्य म्हणून असलेला त्याचा चालू पदावधी समाप्त होईपर्यंत, या खंडातील कोणत्याही गोष्टीचा परिणाम होणार नाही :

परंतु आणखी असे की, अशा पालिका सदस्याने, दिनांक ७ ऑक्टोबर २००१ पासून २० ऑक्टोबर २००१ या महाराष्ट्र महानगरपालिका व नगरपरिषदा (सुधारणा) (सुधारणा) अध्यादेश, २००१ च्या प्रसिद्धीच्या दिनांकापर्यंतच्या कालावधीत केलेली कोणतीही कारवाई, वैधरित्या करण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि उक्त कालावधीत या खंडान्वये त्याला अनर्ह ठरविण्यात आलेले होते, केवळ याच कारणावरून, अशा कारवाईस कोणत्याही न्यायालयात आव्हान देण्यात येणार नाही.]

२००१ चा महा. अध्या. ३१.

[4][**स्पष्टीकरण** [5]**[एक]**.— खंड (फ) च्या प्रयोजनार्थ,—

(एक) महानगरपालिका निवृत्तिवेतनधारीस निवृत्तिवेतन मिळते याच केवळ कारणावरून महानगरपालिकेच्या किंवा तिच्या वतीने असलेल्या कोणत्याही नोकरीत त्याचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध आहे असे मानण्यात येणार नाही ;

(दोन) एखाद्या व्यक्तीचा कोणताही नातेवाईक महानगरपालिकेत, महानगरपालिकेने किंवा तिच्या वतीने, तिचा अधिकारी किंवा कर्मचारी म्हणून नोकरीवर ठेवण्यात आला आहे याच केवळ कारणावरून उक्त व्यक्तीचा महानगरपालिकेत किंवा तिच्या किंवा तिच्या वतीने असलेल्या कोणत्याही नोकरीत कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध आहे असे मानण्यात येणार नाही.

[5][**स्पष्टीकरण दोन.—**खंड (फअ) च्या प्रयोजनार्थ—

(एक) पालिका-सदस्याने, पालिका-सदस्य म्हणून आपल्या स्थानाचा किंवा अधिकारपदाचा प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे वापर करून, हिस्सा किंवा हितसंबंध संपादित केलेला नसेल तर, महानगरपालिकेकडून किंवा तिच्या वतीने करण्यात आलेल्या, कोणतीही परवानगी किंवा लायसन यासह, कोणत्याही पट्ट्यात, जमिनीच्या खरेदीत किंवा विक्रीत किंवा त्यासाठी असलेल्या कोणत्याही करारात त्याचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असल्याचे मानण्यात येणार नाही.

---

[1] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम २ (अ) अन्वये दिनांक १ एप्रिल १९६८ पासून खंड (फअ) समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात आले.

[2] सन १९४६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम ३(ड) अन्वये खंड (फफ) समाविष्ट करण्यात आला.

[3] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ३ अन्वये खंड (ग) (७ सप्टेंबर २००१ रोजी व तेव्हापासून) जादा दाखल करण्यात आला.

[4] सन १९६७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम २ अन्वये हे स्पष्टीकरण बदली दाखल करण्यात आले.

[5] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१, कलम २ अन्वये विद्यमान स्पष्टीकरणाला स्पष्टीकरण एक असा फेरक्रमांक देण्यात आला व स्पष्टीकरण दोन जादा दाखल करण्यात आले.

(दोन) " परवानगी " किंवा " लायसन " या शब्दप्रयोगाचा अर्थ, भारतीय सुविधाधिकार अधिनियम, १८८२ याच्या कलम ५२ यात व्याख्या केल्याप्रमाणे लायसन, असा असेल.]] १८८२ चा ५.

[१][ (१-१अ) जर, एखादा पालिका-सदस्य किंवा एखादी व्यक्ती, महापौर किंवा, यथास्थिति, उप महापौर हे पद धारण करीत असताना किंवा जेव्हा ती महापौर अथवा उप महापौर हे पद धारण करीत होती त्यावेळी तिचे पदीय कर्तव्य पार पाडतांना तिने केलेल्या गैरवर्तणुकीबद्दल किंवा कोणत्याही अशोभनीय वर्तनाबद्दल दोषी असल्याचे आढळून आल्यास, राज्य शासनास, अशा पालिका-सदस्यास अथवा व्यक्तीस आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर,—

(अ) अशा पालिका-सदस्यास त्याच्या पालिका-सदस्य म्हणून असलेल्या उर्वरित कालावधीसाठी पालिका-सदस्य म्हणून राहण्यास निरर्ह ठरविता येईल ; आणि तसेच अशा निरर्हतेच्या आदेशाच्या दिनांकापासून सहा वर्षांच्या कालावधीसाठी पालिका-सदस्य म्हणून निवडून येण्यास निरर्ह ठरविता येईल ;

(ब) अशा व्यक्तीस अशा निरर्हतेच्या आदेशाच्या दिनांकापासून सहा वर्षांच्या कालावधीसाठी पालिका-सदस्य म्हणून निवडून येण्यास निरर्ह ठरविता येईल].

[२][ (१अ) पालिका-सदस्य म्हणून पद धारण करताना, एखाद्या व्यक्तीस त्या पदावधीत महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्यांची निरर्हता अधिनियम, १९८६ अन्वये पालिका-सदस्य असल्यास निरर्ह ठरवण्यात आल्यास ती व्यक्ती असा पालिका-सदस्य म्हणून पद धारण करण्याचे बंद होईल.] सन १९८७ चा महा. २०.

[३] * * * *

[४][ (१ड) जर पालिका सदस्याने, स्वतः, त्याच्या बायकोने/तिच्या नवऱ्याने किंवा त्याच्या अवलंबिताने या अधिनियमाच्या किंवा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ याच्या किंवा उक्त अधिनियमाखाली करण्यात आलेल्या नियमांच्या किंवा उपविधींच्या तरतुदींचा भंग करून, कोणतेही बेकायदेशीर किंवा अनधिकृत बांधकाम केलेले असेल किंवा करीत असेल किंवा असे बेकायदेशीर किंवा अनधिकृत संरचनात्मक बांधकाम करण्यास प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे जबाबदार असेल किंवा पालिका-सदस्य या नात्याने मदत केलेली असेल किंवा कोणतेही बेकायदेशीर किंवा अनधिकृत बांधकाम पाडून टाकत असताना त्याचे शासकीय कर्तव्य पार पाडण्यात कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्यास लेखी पत्र देऊन किंवा प्रत्यक्ष जागेवर जाऊन अडथळा आणला असेल किंवा अडथळा आणण्याचा प्रयत्न केलेला असेल तर, असा पालिका-सदस्य, पालिका-सदस्य म्हणून राहण्यास अनर्ह ठरेल. अशी अनर्हता उक्त अधिनियमाच्या तरतुदींअन्वये संबंधित प्राधिकाऱ्याने, अशी संरचना बेकायदेशीर किंवा अनधिकृत असल्याचे घोषित केल्याच्या दिनांकापासून किंवा, यथास्थिति, सक्षम प्राधिकाऱ्याविरूद्ध पालिका-सदस्याने हस्तक्षेप किंवा अडथळा केल्याच्या दिनांकापासून पालिका-सदस्य म्हणून त्याचा पदावधी शिल्लक असेपर्यंत असेल.] सन १९६६ चा महा. ३७.

---

[१] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम २, अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, अनुसूचीअन्वये पोट-कलम (१अ) समाविष्ट करण्यात आले.

[३] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम ३ अन्वये पोट-कलमे (१ब) व (१क) वगळण्यात आली.

[४] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २ अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[1][ (१ई) जर राज्य निवडणूक आयोगाची अशा खात्री झाली असेल की, एखाद्या व्यक्तीने,—

(अ) राज्य निवडणूक आयोगाने निर्धारित केलेल्या वेळेमध्ये आणि आवश्यक केलेल्या रीतीने, निवडणूक खर्चाचा हिशेब देण्यात कसूर केली आहे, आणि

(ब) अशा प्रकारे, कसूर होण्यासाठी तिच्याकडे कोणतेही योग्य कारण किंवा समर्थन नाही,

तर, राज्य निवडणूक आयोग, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, ती व्यक्ती अनर्ह असल्याचे घोषित करील ; आणि अशी व्यक्ती, अशा आदेशाच्या दिनांकापासून तीन वर्षांच्या कालावधीकरिता, पालिका सदस्य म्हणून राहण्यास किंवा पालिका सदस्य होण्यासाठी निवडणूक लढविण्यास अनर्ह असेल.

(१फ) राज्य निवडणूक आयोगास, कारणे लेखी नोंदवून, पोट-कलम (१ई) खालील कोणतीही अनर्हता दूर करता येईल किंवा अशा कोणत्याही अनर्हतेचा कालावधी कमी करता येईल.]

(२) कोणत्याही व्यक्तीस [2][ [3][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीच्या] सभेस उपस्थित राहण्याबद्दल फी मिळते] याच केवळ कारणावरून किंवा तिचा—

[4][ (ग) पोट-कलम (१), खंड (फअ) च्या तरतुदींच्या अधीनतेने, महानगरपालिकेने किंवा तिच्या वतीने केलेला जमिनीचा कोणताही भाडेपट्टा, कोणतीही परवानगी किंवा लायसन यांसह जमिनीची विक्री किंवा खरेदी किंवा त्यासंबंधी केलेला कोणताही करार ; किंवा]

(ह) पैशांच्या कर्जासाठी केलेला कोणताही करार किंवा पैशांच्या फेडीसाठीच फक्त दिलेली कोणतीही प्रतिभूती ; अथवा

(आय) महानगरपालिकेच्या कारभारासंबंधी कोणतीही जाहिरात ज्यात देण्यात येते असे कोणतेही वृत्तपत्र ; अथवा

(जे) महानगरपालिकेच्या वतीने आयुक्ताबरोबर जी संविदा करील किंवा त्याच्याकडून जिची योजणूक केली जाईल अशी कोणतीही संयुक्त भांडवल कंपनी ; अथवा

(के) ती, ज्या कोणत्याही वस्तूचा नियमितपणे व्यापार करीत असेल त्या वस्तूची कोणत्याही एका सरकारी वर्षात एकूण दोन हजार रुपयांहून अधिक नसेल इतक्या किंमतीपर्यंत महानगरपालिकेच्या वतीने आयुक्तास अधूनमधून जी विक्री करण्यात येते ती विक्री ;

यात तिचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध आहे याच केवळ कारणावरून, ती याप्रमाणे निरर्ह असणार नाही किंवा अशा संविदेत किंवा नोकरीत तिचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध आहे असे मानण्यात येणार नाही.

[5]* * * *

---

[1] सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम २ अन्वये ही पोट-कलमे समाविष्ट करण्यात आली.

[2] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ४ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[3] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) (४) अन्वये 'मुंबई वीजपुरवठा व परिवहन समिती' या 'बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समिती' हा मजकूर व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

[4] सन १९७८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अन्वये २ ऑक्टोबर १९७८ पासून खंड (ग) समाविष्ट करण्यात आला.

[5] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ९ अन्वये पोट-कलम (३) वगळण्यात आले.

निरर्ह झालेली व्यक्ती पालिका-सदस्य असण्याचे बंद होणे.

**१७.** जो कोणताही पालिका-सदस्य—

(अ) निकटपूर्वीच्या कलमात नमूद केलेल्या कोणत्याही कारणांमुळे पालिका-सदस्य असण्यास निरर्ह ठरेल ; अथवा

(ब) तात्पुरता आजार किंवा महानगरपालिका मान्य करील असे कोणतेही इतर कारण खेरीज करून एरव्ही लागोपाठ तीन महिन्यांच्या अवधीत महानगरपालिकेच्या सभांना स्वतः अनुपस्थित राहील ; अथवा

† [१]* * * * [२][किंवा

(ड) कोणत्याही कारणामुळे—मग ते महानगरपालिकेने मान्य केलेले असो वा नसो,—लागोपाठ बारा महिन्यांच्या अवधीत महानगरपालिकेच्या सभांना स्वतः अनुपस्थित राहील किंवा हजर राहण्यास असमर्थ होईल] , [३]*

[४]* * * * * *

तो पालिका-सदस्य असण्याचे बंद होईल आणि लागोलाग त्याचे अधिकारपद रिकामे होईल.

निरर्हतेसंबंधीच्या प्रश्नांचा निर्णय लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाने करणे.

**१८.** कोणताही पालिका-सदस्य, वर सांगितलेल्या कोणत्याही कारणामुळे त्या अधिकारपदासाठी निरर्ह झाला आहे असे अभिकथन करण्यात आले असेल, आणि अशा पालिका-सदस्यास ते अभिकथन मान्य नसेल तेव्हा, अथवा आपण पालिका-सदस्याच्या अधिकारपदासाठी निरर्ह झालो आहोत की नाही अशी कोणत्याही पालिका-सदस्यास शंका असेल तेव्हा, अशा पालिका-सदस्यास किंवा इतर कोणत्याही पालिका-सदस्यास लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाकडे अर्ज करता येईल आणि महानगरपालिकेने विनंती केल्यास, आयुक्ताने अशा न्यायाधीशाकडे अर्ज केला पाहिजे ; आणि उक्त मुख्य न्यायाधीश त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर असा पालिका-सदस्य हा, पालिका-सदस्य असण्यास निरर्ह झाला आहे किंवा नाही याची निर्णिती करील आणि त्याचा निर्णय अंतिम असेल.

पालिका सदस्य पदावरून काढून टाकण्यास पात्र ठरणे.

[५][ **१८-१अ.** (१) जर कोणताही पालिका-सदस्य, पालिका-सदस्य म्हणून असलेल्या त्याच्या चालू पदावधीमध्ये किंवा चालू पदावधीच्या लगतपूर्वीच्या पदावधीमध्ये, पालिका-सदस्य म्हणून त्याची कर्तव्ये बजावत असताना, कोणत्याही गैरवर्तणुकीबद्दल किंवा कोणत्याही अशोभनीय वर्तणुकीबद्दल दोषी ठरला असेल तर राज्य शासनास, स्वतःहून किंवा महानगरपालिकेच्या शिफारशीवरून, त्या सदस्यास पदावरून दूर करता येईल.

(२) पोट-कलम (१) च्या प्रयोजनार्थ, कोणत्याही पालिका सदस्यास दूर करण्याची शिफारस करणारा कोणताही ठराव, महानगरपालिकेकडून आणि पदावरून दूर करण्याचा कोणताही आदेश राज्य शासनाकडून, तो ठराव किंवा आदेश, ज्या कोणत्याही पालिका-सदस्याशी संबंधित असेल त्यास अशी शिफारस किंवा, यथास्थिति, आदेश का काढण्यात येऊ नये, याचे कारण दर्शविण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज संमत करण्यात येणार नाही :

---

† सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८; कलम ७९ पुढीलप्रमाणे आहे :—

"७९. कलमे (१), (४) आणि (५) आणि ४ ते १६ यांमधील कोणत्याही गोष्टीमुळे, हा अधिनियम प्रवर्तनात येण्याच्या लगतपूर्वी उक्त अधिनियमाखाली रचना करण्यात आलेली किंवा नेमण्यात आलेली महानगरपालिका, स्थायी समिती, सुधार समिती किंवा इतर कोणतीही समिती किंवा उपसमिती यांची रचना करण्यात कोणताही बाध येणार नाही आणि पालिका सदस्य उक्त समिती अथवा उपसमिती यांच्या सदस्याची १ एप्रिल १९५२ पूर्वी नैमित्तिकरित्या रिकामी झालेली कोणतीही जागा उक्त अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, जणू काही हा अधिनियम पारित झालेला नसावा त्याप्रमाणे भरता येईल."

[१] १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम १० (१) अन्वये खंड (क) वगळण्यात आला.

[२] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ४ अन्वये 'किंवा' हा शब्द आणि खंड (ड) समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम १०(२) अन्वये 'किंवा' हा शब्द वगळण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १०(३) अन्वये खंड (ई) वगळण्यात आला.

[५] सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३, कलम (३) द्वारे कलम १८ नंतर हे कलम समाविष्ट करण्यात आले.

परंतु असे की, महानगरपालिकेला त्याबाबतीत आवश्यक कारवाई करण्याकरिता एक महिन्याचा कालावधी दिल्याखेरीज, राज्य शासन स्वतःहून पालिका सदस्याला दूर करण्याचा कोणताही आदेश काढणार नाही.

(३) ज्या प्रकरणात, राज्य शासनाने पोट-कलम (१) अन्वये आदेश दिला आहे, अशा प्रत्येक प्रकरणामध्ये, अशा पालिका-सदस्यास राज्य शासनाने आदेश काढून निरर्हतेपासून मुक्त केले नसेल तर, अशा आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी, पालिका-सदस्य म्हणून राहण्यास किंवा पालिका-सदस्य होण्यास किंवा इतर एखाद्या स्थानिक प्राधिकरणाचा परिषद सदस्य किंवा सदस्य होण्यास निरर्ह असेल आणि असा निरर्हतेपासून मुक्त करणारा आदेश काढण्याचा अधिकार राज्य शासनास, याद्वारे, देण्यात येत आहे.]

## महानगरपालिका मतदार यादी

[1][**१८अ.** (१) महानगरपालिकेच्या सर्व निवडणुकांसाठी मतदार याद्या तयार करण्याच्या कामावर देखरेख ठेवणे, त्यासाठी निदेश देणे व त्यावर नियंत्रण ठेवणे आणि अशा सर्व निवडणुका घेणे ही कामे राज्य निवडणूक आयोगाकडे निहित असतील. राज्य निवडणूक आयोग.

(२) राज्य निवडणूक आयुक्ताला, त्याच्या अधिकारांपैकी आणि कामांपैकी कोणतेही अधिकार व कामे आदेशाद्वारे राज्य निवडणूक आयोगाच्या कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा राज्य शासनाच्या, उप जिल्हाधिकाऱ्यापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याकडे किंवा महानगरपालिकेच्या, प्रभाग अधिकाऱ्यापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याकडे सोपवता येतील.

(३) हा अधिनियम किंवा नियम या अन्वये मतदार याद्या तयार करणे आणि महानगरपालिकेच्या निवडणुका घेणे यांसाठी नेमण्यात आलेले किंवा विशेष रीतीने नेमण्यात आलेले सर्व अधिकारी आणि कर्मचारी राज्य निवडणूक आयुक्ताच्या देखरेखीखाली, निदेशानुसार व नियंत्रणाखाली काम करतील.

(४) या अधिनियमामध्ये आणि नियमांमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, राज्य निवडणूक आयुक्ताला न्याय्य आणि निःपक्षपाती निवडणुकांसाठी अधिनियमाच्या व नियमांच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे विशेष किंवा सर्वसाधारण आदेश अथवा निदेश काढता येतील.]

[2][**१८अअ.** निवडणूकीच्या वेळी मतदारांच्या तोतयेगिरीस प्रतिबंध करण्याच्या दृष्टीने राज्य निवडणूक आयुक्त, त्यास योग्य वाटतील असे निदेश, मतदान केंद्राध्यक्षांना देऊ शकेल, आणि अशा निदेशांमध्ये, मतदारांना लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ याच्या तरतुदीअन्वये देण्यात आलेली, छायाचित्रासहित ओळखपत्रे, त्यांना मतदानाच्या वेळी सादर करण्याच्या सूचनांचाही समावेश असेल.] तोतयेगिरीस प्रतिबंध करण्यासाठी निदेश देण्याचा राज्य निवडणूक आयुक्ताचा अधिकार.

१९५१ चा ४३.

---

[1] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम १५ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४, कलम २ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

बृहन्मुंबईची एक-सदस्य प्रभागात विभागणी करणे आणि [२][त्यासाठी महानगरपालिका मतदार यादी तयार करणे.]

[१][**१९.** (१) महानगरपालिकेसाठी घ्यावयाच्या निवडणुकीच्या प्रयोजनार्थ,—

[३][(अ)[४][राज्य निवडणूक आयुक्त] वेळोवेळी, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे [५][बृहन्मुंबईच्या] क्षेत्राची प्रभागांमध्ये विभागणी करील व त्याच्या सीमा विनिर्दिष्ट करील ; त्यायोगे, व्यवहार्य असेल तेथवर, सर्व प्रभाग आटोपशीर क्षेत्रे असतील व अगदी अलिकडच्या जनगणनेच्या आकडेवारीनुसार प्रत्येक प्रभागातील व्यक्तींची संख्या अदमासे सारखीच असेल. प्रत्येक प्रभाग केवळ एकच सभासद निवडून देईल :]

परंतु, अशी अधिसूचना प्रसिद्ध करण्यापूर्वी, त्या अधिसूचनेचे प्रारूप **शासकीय राजपत्रात** व तसेच [४][राज्य निवडणूक आयुक्ताच्या] मते तिचा परिणाम होण्याचा संभव असलेल्या सर्व व्यक्तींना ज्या रीतीने ती अधिक चांगल्या प्रकारे माहीत होईल अशा इतर कोणत्याही रीतीने प्रसिद्ध करण्यात येईल आणि त्यासोबत एक नोटीस जोडण्यात येईल. या नोटिशीत ज्या तारखेस किंवा ज्या तारखेपूर्वी कोणतेही आक्षेप अगर सूचना स्वीकारण्यात येतील ती तारीख व ज्या तारखेनंतर असे प्रारूप विचारात घेण्यात येईल ती तारीख विनिर्दिष्ट करण्यात येईल.

[६] * * * * * * * *

[७][(ब) राज्य निवडणूक आयुक्त, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे अधिसूचित करील अशा दिनांकास, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या विधानसभा मतदार यादीची राज्य निवडणूक आयुक्ताकडून [५][बृहन्मुंबईतील] निरनिराळ्या प्रभागांशी अनुरूप असलेल्या निरनिराळ्या भागांत विभागणी करण्यात येईल, आणि राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा त्याने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्याने अशाप्रकारे विभागणी केलेल्या व अधिप्रमाणित केलेल्या मतदार यादीच्या प्रत्येक भागाची मुद्रित प्रत ही, प्रत्येक प्रभागासाठी प्रभाग यादी असेल.]

[८] * * * * * * * *

(२) प्रत्येक प्रभागाच्या निवडणुकीत फक्त एक पालिका सदस्य निवडून देण्यात येईल.

---

[१] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ६ अन्वये कलम १९ बदली दाखल करण्यात आले.

[२] सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम ३ (अ) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम ३(अ) अन्वये राज्य शासनाने " या मजकुराने सुरू होणाऱ्या व " अधिसूचित करील " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम १६ (अ) (१) अन्वये 'राज्य शासन' हे शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारासह जेथेजेथे आले असतील तेथे तेथे त्याऐवजी 'राज्य निवडणूक आयुक्त' हे शब्द त्या त्या व्याकरणिक फेरफेरासह दाखल करण्यात आले.

[५] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(१) अन्वये " अधिसूचित करील " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९९१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम ३ (ब) अन्वये स्पष्टीकरण वगळण्यात आले.

[७] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २ (अ) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम २ (ब) अन्वये पोट-कलम (१अ) वगळण्यात आले.

(३) [१] * * * * * * * *

(४) [२] * * * * * * *

[३][२०. * * * * * * * * ]

[४][**२१.** या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, जिचे नाव [५][महानगरपालिका मतदार यादीत असेल त्या प्रत्येक व्यक्तीस प्रभागाच्या निवडणुकीत मतदान करण्याचा हक्क आहे असे मानले जाईल] व उक्त यादीत जिचे नाव नसेल त्या प्रत्येक व्यक्तीस याप्रमाणे मतदान करण्याचा हक्क नाही, असे मानले जाईल. ] मतदानाचा हक्क.

[*]**२१अ.** [ प्रतिनिधी व पालिका-सदस्य यांच्या निवडणुकीसंबंधीची कार्यपद्धती.] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ११ अन्वये निरसित करण्यात आले.

**२१ब.** [ मतदारांच्या पुरवणी याद्या तयार करणे व त्या दुरूस्त करणे. ] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ९ अन्वये वगळण्यात आले.

**२१क.** [ मतदारांच्या पुरवणी याद्या पूर्ण करणे. ] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ९ अन्वये वगळण्यात आले.

**२१ड.** [ मतदारांच्या पुरवणी याद्या एकत्रित करणे. ] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ९ अन्वये वगळण्यात आले.

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २ (ब) अन्वये पोटकलम (३) वगळण्यात आले.

[२] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम २ (ब) अन्वये पोटकलम (४) वगळण्यात आले.

[३] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३ अन्वये कलम २० वगळण्यात आले.

[४] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम ४अन्वये मूळ कलमाऐवजी कलम २१ समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ४ अन्वये, " कोणत्याही प्रभागाच्या कोणत्याही अंतिम प्रभाग यादीच्या भाग एक किंवा भाग दोनमध्ये जिचे नाव असेल त्या प्रत्येक व्यक्तीस त्या प्रभागातील निवडणुकीत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[*] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ७९ पुढीलप्रमाणे आहे :—

" ७९. कलमे २(१), (४) आणि (५) आणि ४ ते १६ यांमधील कोणत्याही गोष्टीमुळे, हा अधिनियम प्रवर्तनात येण्याच्या लगतपूर्वी उक्त अधिनियमाखाली रचना करण्यात आलेली किंवा नेमण्यात आलेली महानगरपालिका, स्थायी समिती, सुधार समिती किंवा इतर कोणतीही समिती किंवा उपसमिती यांची रचना करण्यात कोणताही बाध येणार नाही आणि पालिका-सदस्य उक्त समिती अथवा उपसमिती यांच्या सदस्याची १ एप्रिल, १९५२ पूर्वी नैमित्तिकरीत्या रिकामी झालेली कोणतीही जागा उक्त अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, जणू काही हा अधिनियम पारित झालेला नसावा त्याप्रमाणे भरता येईल." व्यावृत्ती.

## पालिका-सदस्यांच्या निवडणुका

निवडणुकीचा दिनांक.

[१][**२२.** पालिका सदस्यांच्या सार्वत्रिक प्रभाग निवडणुका आणि नैमित्तिकरित्या रिकाम्या झालेल्या जागा भरण्यासाठी घ्यावयाच्या निवडणुका यांचे दिनांक राज्य निवडणूक आयुक्त निश्चित करील.]

[२][**२३.*** * * * * * ]

**२४.** [ निवडणुकांच्या प्रयोजनांसाठी शहराची प्रभागांमध्ये विभागणी करणे.] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ११ अन्वये वगळण्यात आले.

प्रभाग निवडणुकांसाठी निश्चित केलेल्या दिवसांबाबत नोटिसा देणे.

**२५.** [३][ (१) ] प्रभाग निवडणुकीसाठी निश्चित केलेल्या दिवसापूर्वी किमान [४][ सात दिवस] अगोदर [५]* * *, [६][ राज्य निवडणूक आयुक्त] अशा निवडणुकीबाबत नोटीस देईल. अशी नोटीस [७][ **शासकीय राजपत्रात** ] व स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन आणि [५]* * * अशी निवडणूक ज्या प्रभागासाठी घेण्यात येणार असेल त्या प्रभागात ठळक जागी मोठ्या जाहिराती लावून देण्यात येईल.

[८][ (२) पोट-कलम (१) मध्ये निर्देशलेल्या नोटिशीमध्ये, निवडणुकीसाठी निश्चित केलेल्या दिवसांबरोबरच, मतदान कोणत्या दिवशी घेतले जाईल तो दिवसही आवश्यक वाटल्यास विनिर्दिष्ट करण्यात येईल आणि असा दिवस हा, निवडणुकीसाठी निश्चित केलेल्या दिवसानंतरच्या एकविसाव्या दिवसाअगोदरचा नसेल.]

प्रभाग निवडणुकीतील उमेदवार नामनिर्देशित करण्यात आले पाहिजेत.

**२६.** (१) प्रभाग निवडणुकीतील उमेदवार [९][ * * * *] यापुढे असलेल्या तरतुदींस अनुसरून रीतसर लेखी नामनिर्देशित करण्यात आले पाहिजेत.

नामनिर्देशना-संबंधीच्या तरतुदी.

(२) अशा नामनिर्देशनांच्या बाबतीत पुढील तरतुदी लागू होतील,—

(अ) [६][राज्य निवडणूक आयुक्त] नामनिर्देशनपत्राचे छापील नमुने पुरवील आणि निवडणुकीत मतदानाचा हक्क असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, नामनिर्देशनासाठी निश्चित केलेल्या दिवसापूर्वी सात दिवसांच्या आत कोणत्याही वेळी [१०][ व नामनिर्देशनाच्या तारखेला दुपारी ४ वाजेपर्यंत ] नामनिर्देशनपत्राच्या नमुन्यांच्या जितक्या प्रती तिला पाहिजे असतील तितक्या प्रती विनामूल्य पुरवील ;

(ब) प्रत्येक नामनिर्देशनपत्रात उमेदवाराचे पूर्ण नाव, वसतिस्थान व त्याचे वर्णन या गोष्टी नमूद केल्या पाहिजेत आणि निवडणुकीत मतदानाचा हक्क असलेल्या दोन व्यक्तींनी प्रस्तावक व अनुमोदक म्हणून त्यावर अनुमतिदर्शक सह्या केल्या पाहिजेत [११][ आणि नामनिर्देशित

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम १७ अन्वये कलम २२ दाखल करण्यात आले.

[२] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ५ अन्वये कलम २३ वगळण्यात आले.

[३] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम ४(१) अन्वये कलम २५ ला त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ४(१) अन्वये " पंधरा दिवस " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[५] सन १९२२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम १३ अन्वये निरसित करण्यात आलेले शब्द वगळण्यात आले.

[६] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम १८ अन्वये ' आयुक्त ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " मुंबई सरकारी **राजपत्रात** " या शब्दांऐवजी " **शासकीय राजपत्रात** " हे शब्द दाखल करण्यात आले.

[८] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम ४(२) अन्वये हे पोट-कलम (२) समाविष्ट करण्यात आले.

[९] सन १९२२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम १४(अ) अन्वये निरसित करण्यात आलेले शब्द वगळण्यात आले.

[१०] सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम ७(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[११] सन १९४६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम ९(अ) व सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ४ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

व्यक्तींची याप्रमाणे नामनिर्देशित केले जाण्यास तयारी आहे याचे निदर्शक म्हणून त्यावर तिची सही असली पाहिजे.]

(क) पूर्वी सांगितल्याप्रमाणे अनुमतिदर्शक सही केलेले [१][ व सही केलेले ] प्रत्येक नामनिर्देशनपत्र [२][ राज्य निवडणूक आयुक्ताच्या कार्यालयात ] नामनिर्देशनासाठी निश्चित केलेल्या दिवशी दुपारी पाच वाजण्यापूर्वी सुपूर्द करण्यात आले पाहिजे ;

[३][ (ड) प्रत्येक उमेदवाराचे नामनिर्देशन स्वतंत्र नामनिर्देशनपत्राद्वारे करण्यात आले पाहिजे, तसेच एखाद्या उमेदवाराचे नामनिर्देशन एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्राद्वारे करता येईल, मात्र मतदानाचा हक्क असलेल्या कोणत्याही व्यक्तीस प्रस्तावक किंवा अनुमोदक म्हणून एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रांवर सही करता येणार नाही ; ]

[४][ (डड) कोणत्याही व्यक्तीने एकापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रांवर सही केली असेल तर पहिले नामनिर्देशनपत्र पोचल्यावर जे नामनिर्देशनपत्र किंवा जी नामनिर्देशनपत्रे मिळाली असतील ते नामनिर्देशनपत्र किंवा ती नामनिर्देशनपत्रे विधिअग्राह्य असतील ;]

(ई) पुढील बाबतीत कोणत्याही नामनिर्देशित व्यक्तीचे नामनिर्देशनपत्र [५][राज्य निवडणूक आयुक्त] विधिअग्राह्य म्हणून घोषित करील—

[६][(एक) जर नामनिर्देशित व्यक्ती, कलम १४ अन्वये, पालिका-सदस्य म्हणून निवडली जाण्यास पात्र नसेल तर, किंवा]

[७][(दोन) कलम २६अ, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली रक्कम तिने अनामत ठेवली नसेल किंवा ठेवण्याची तजवीज केली नसेल तर, अथवा]

(तीन) कलम १६ मध्ये दर्शविलेल्या कोणत्याही कारणामुळे ती पालिका-सदस्य होण्यास निरर्ह असेल तर ;

(फ) एकही विधिग्राह्य नामनिर्देशन नसेल तर कोणताही पालिका-सदस्य निवडून आला नाही असे मानण्यात येईल आणि रिकामी जागा किंवा रिकाम्या जागा भरण्यासाठी कलम ३४ खालील कार्यवाही करण्यात येईल ;]

[८]* * * * * *

[९][(ह) केवळ एकच विधिग्राह्य नामनिर्देशन असेल तर, नामनिर्देशित व्यक्ती निवडून आली असल्याचे मानण्यात येईल ;]

[१०][(जे) विधिग्राह्य नामनिर्देशनांची संख्या एकापेक्षा अधिक असेल तर नामनिर्देशित व्यक्तींमधून पालिका-सदस्याची निवडणूक करण्यात येईल आणि अशा निवडणुकीस " लढवण्यात आलेली निवडणूक " असे म्हटले जाईल :

---

[१] सन १९४६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम ९(ब) अन्वये " व सही केलेले " हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम १९(ब) अन्वये ' आयुक्ताच्या कार्यालयात ' या मजकुराऐवजी ' राज्य निवडणूक आयुक्ताच्या कार्यालयात ' हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम १२(अ) अन्वये हा खंड बदली दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १२ (ब) अन्वये खंड (डड) बदली दाखल करण्यात आला.

[५] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम १९(क) अन्वये ' आयुक्त ' या शब्दाऐवजी ' राज्य निवडणूक आयुक्त ' हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ३ अन्वये मूळ उपखंडाऐवजी हा उपखंड दाखल करण्यात आला.

[७] सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम ३ अन्वये नवीन खंड (दोन) समाविष्ट करण्यात आला.

[८] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम १२(क) अन्वये खंड (छ) वगळण्यात आला.

[९] वरील अधिनियमाच्या कलम १२(ड) अन्वये खंड (ह) बदली दाखल करण्यात आला.

[१०] वरील अधिनियमाच्या कलम १२(ई) अन्वये खंड (जे) बदली दाखल करण्यात आला.

परंतु, विधिग्राह्यरीत्या नामनिर्देशित झालेला कोणताही उमेदवार मरण पावला किंवा नामनिर्देशनासाठी असलेल्या तारखेनंतर [१][तीन दिवसांपेक्षा] उशिरा नसेल अशा दिवशी, निवडणूक न लढविण्याचा आपला इरादा असल्याविषयी [२][राज्य निवडणूक आयुक्तास] त्याने लेखी कळविले आणि त्यानंतर फक्त एकच विधिग्राह्य नामनिर्देशन राहिले तर विधिग्राह्यरीत्या नामनिर्देशित झालेला उर्वरित उमेदवार हा निवडून आला असे मानले जाईल :

परंतु आणखी असे की, ज्या उमेदवाराने आपली उमेदवारी मागे घेतली असेल त्यास उमेदवारी मागे घेतल्याचा त्याचा निर्णय रद्द करण्याची किंवा त्याच निवडणुकीसाठी उमेदवार म्हणून पुन्हा नामनिर्देशित केले जाण्याची मुभा दिली जाणार नाही ;]

(के) निरनिराळ्या प्रभागांसाठी दोन किंवा अधिक प्रभाग निवडणुका एकाच वेळी घेण्यात आल्या असतील तेव्हा कोणतीही व्यक्ती एकापेक्षा अधिक प्रभागांकरिता [३] * * * खंड (ह) खाली निवडून आलेला पालिका-सदस्य आहे असे मानण्यात आले असेल तर अशी व्यक्ती [२][राज्य निवडणूक आयुक्ताकडून] त्यासंबंधी लेखी नोटीस तिला मिळाल्यानंतर चोवीस तासांच्या आत [२][राज्य निवडणूक आयुक्तास] लेखी पसंती, त्यावर सही करून, कळवून त्याद्वारे, ज्या एका प्रभागासाठी ती काम करणार असेल तो प्रभाग कळवील आणि तसे करण्यात तिने कसूर केल्यास[२] [राज्य निवडणूक आयुक्त] पसंतीसाठी दिलेला अवधी संपेल तेव्हा ज्या एका प्रभागासाठी ती काम करील तो प्रभाग घोषित करील. याप्रमाणे कळविलेली पसंती किंवा केलेली घोषणा निर्णायक असेल आणि ज्या प्रभागासाठी किंवा प्रभागांसाठी अशा व्यक्तीने काम करावयाचे नसेल त्या प्रभागासाठीचे किंवा प्रभागांसाठीचे तिचे नामनिर्देशन रद्दबातल झाले आहे असे मानले जाईल.

(ल) पूर्वोक्तप्रमाणे प्रभाग निवडणुका घेण्यात येतील तेव्हा जी कोणतीही व्यक्ती कोणत्याही एका किंवा अधिक प्रभागांसाठी [४] * * * * खंड (ज) खाली निवडून आलेली पालिका-सदस्य आहे असे मानण्यात आले असेल ती जर, ज्या कोणत्याही एका किंवा अधिक प्रभागांच्या नामनिर्देशनांची संख्या रिकाम्या जागांच्या संख्येपेक्षा अधिक असेल त्या प्रभागासाठी किंवा प्रभागांसाठीसुद्धा रीतसर नामनिर्देशन झालेली असेल तर, अशी व्यक्ती त्यासंबंधी [२] [राज्य निवडणूक आयुक्ताकडून] लेखी नोटीस तिला मिळाल्यानंतर चोवीस तासांच्या आत [२] [राज्य निवडणूक आयुक्तास] लेखी पसंती, त्यावर सही करून, कळवून त्याद्वारे त्या प्रभागासाठी किंवा ज्या कोणत्याही एका प्रभागासाठी ती निवडून आली असेल त्या प्रभागासाठी ती काम करणार आहे किंवा कसे अथवा इतर प्रभागासाठी किंवा अनेक प्रभागांसाठी लढविण्यात येणाऱ्या निवडणुकीत किंवा निवडणुकांत ती उमेदवार म्हणून उभी राहणार आहे किंवा कसे हे कळवील, अशी पसंती कळविण्यात तिने कसूर केल्यास [२] [राज्य निवडणूक आयुक्त] तिला पसंतीसाठी दिलेला अवधी संपेल तेव्हा अशी व्यक्ती ज्या प्रभागासाठी ती निवडून आली असेल त्या प्रभागासाठी किंवा ज्या प्रभागांसाठी निवडून आली असेल त्यांपैकी एखाद्या प्रभागासाठी काम करील असे घोषित करील आणि कोणत्याही इतर प्रभागांसाठी झालेले तिचे नामनिर्देशन रद्दबातल झाले आहे असे मानले जाईल, अशा व्यक्तीने पूर्वोक्तप्रमाणे लढविण्यात येणाऱ्या निवडणुकीत किंवा निवडणुकांमध्ये उमेदवार म्हणून उभे राहण्याचे लेखी पसंतीद्वारे कळविले असेल तर ज्या इतर प्रभागासाठी किंवा प्रभागांसाठी ती निवडून आली असेल त्या प्रभागासाठी किंवा प्रभागांसाठी झालेले तिचे नामनिर्देशन रद्दबातल झाले आहे असे मानले जाईल. या खंडाखाली कळविलेली कोणतीही पसंती किंवा केलेली कोणतीही घोषणा निर्णायक असेल.

---

[१] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ३ अन्वये " सात दिवसांपेक्षा " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम १९(ई) अन्वये, " आयुक्ताकडून, आयुक्तास, आयुक्त " या मजकुराऐवजी " अनुक्रमे, राज्य निवडणूक आयुक्ताकडून, राज्य निवडणूक आयुक्तास आणि राज्य निवडणूक आयुक्त " हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १२(फ) अन्वये " खंड (छ) किंवा " हे शब्द, कंस व अक्षर वगळण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १२(ग) अन्वये " खंड (छ) किंवा " हे शब्द, कंस व अक्षर वगळण्यात आले.

[१][**२६अ.** [२][ (१). प्रभाग निवडणुकीसाठी उमेदवारांच्या नामनिर्देशनाकरिता नेमलेल्या तारखेस किंवा तारखेपूर्वी प्रत्येक उमेदवार निवडणूक निर्णय अधिकाऱ्याकडे पाच हजार रुपये इतकी रक्कम रोखीने अनामत म्हणून ठेवील किंवा ठेवण्याची तजवीज करील आणि अशा प्रकारे अनामत रक्कम ठेवण्यात आली नसेल तर, कोणताही उमेदवार रीतसर नामनिर्देशित झालेला आहे असे मानण्यात येणार नाही : उमेदवारांनी अनामत रक्कम ठेवणे.

परंतु, उमेदवार अनुसूचित जातीचा, अनुसूचित जमातीचा, नागरिकांच्या मागासवर्गांचा किंवा महिला असेल तर, ही अनामत रक्कम दोन हजार पाचशे रुपये इतकी असेल :

परंतु, आणखी असे की, उमेदवाराने एकापेक्षा जास्त नामनिर्देशनपत्रे भरली असतील तर, प्रत्येक नामनिर्देशनपत्राकरिता स्वतंत्र रक्कम अनामत म्हणून ठेवण्याची आवश्यकता असणार नाही.]

(२) पुढील परिस्थितीत अनामत रक्कम परत करण्यात येईल :–

(अ) उमेदवार रीतसर निवडून आला आहे असे घोषित करण्यात आले तर किंवा असे मानण्यात आले तर, अथवा

[३][(ब) नामनिर्देशनाच्या दिवसानंतर [४][तीन दिवसांपेक्षा] उशिरा नसेल अशा वेळी उमेदवाराने निवडणूक न लढवण्याचा आपला इरादा [५][राज्य निवडणूक आयुक्तास] लेखी कळविला असेल तर, अथवा]

(क) उमेदवाराचे नामनिर्देशन विधिअग्राह्य असल्याचे घोषित करण्यात आले तर, अथवा

(ड) [६] * * * नामनिर्देशनपत्रांच्या छाननीनंतर आणि मतदान सुरू होण्याच्यापूर्वी [७]* [८]* * * * उमेदवार मरण पावला तर अथवा

(ई) उमेदवार निवडून आला नसेल परंतु त्याने [९] * * * * * * * पोट-कलम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या संख्येपेक्षा अधिक विधिग्राह्य मते मिळविली असतील तर.

(३) अनामत रक्कम ज्या व्यक्तीने दिली असेल त्या व्यक्तीला ती परत करण्यात येईल. [१०]* * * * * * मतदानासाठी निश्चित केलेल्या तारखेपूर्वी [१०]* * * * * उमेदवार मरण पावल्यास अनामत रक्कम त्याने दिलेली असेल तर ती त्याच्या कायदेशीर प्रतिनिधीस परत करण्यात येईल, किंवा त्या उमेदवाराने दिलेली नसेल तर ज्या व्यक्तीने ती दिली असेल त्या व्यक्तीला परत करण्यात येईल.

---

१ सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम ४ अन्वये नवीन कलम २६अ समाविष्ट करण्यात आले.

२ सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम २ अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

३ सन १९४६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम १० व सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ४ अन्वये खंड (ख) बदली दाखल करण्यात आला.

४ सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ४ अन्वये " सात दिवसांपेक्षा " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५ सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम २०(अ) अन्वये ' आयुक्ताकडे ' व ' आयुक्तास ' या शब्दाऐवजी अनुक्रमे ' राज्य निवडणूक आयुक्ताकडे ' व ' राज्य निवडणूक आयुक्तास ' हा मजकूर दाखल करण्यात आला.

६ सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२, कलम ३(ब) (एक) अन्वये " प्रभाग निवडणुकीच्या बाबतीत " हा मजकूर गाळण्यात आला.

७ सन १९३६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २४, कलम २, अनुसूची अन्वये " आणि " हा शब्द वगळण्यात आला.

८ सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२, कलम ३(ब) (एक) अन्वये " स्वीकृतीद्वारे निवडून देण्याच्या बाबतीत स्वीकृतीद्वारे निवडून देण्यासाठी निश्चित केलेल्या दिवसापूर्वी " हा मजकूर गाळण्यात आला.

९ वरील अधिनियमाच्या कलम ३(ब) (दोन) अन्वये " स्वीकृतीद्वारे निवडणुकीच्या बाबतीत आणि प्रभाग निवडणुकीच्या बाबतीत पहिले मत " हा मजकूर वगळण्यात आला.

१० वरील अधिनियमाच्या कलम ३(क) अन्वये अनुक्रमे " प्रभाग निवडणुकीच्या बाबतीत " आणि " किंवा स्वीकृतीद्वारे निवडून देण्याच्या बाबतीत स्वीकृतीद्वारे निवडून देण्यासाठी निश्चित केलेल्या तारखेपूर्वी " हा मजकूर वगळण्यात आला.

(४) उमेदवार निवडून आला नाही आणि[१] * * * * त्यास मिळालेल्या विधीग्राह्य मतांची संख्या [२] * * * * विधिग्राह्य मतांच्या एकूण संख्यांच्या एक अष्टमांश इतक्या संख्येपेक्षा अधिक नसेल तर त्याची अनामत रक्कम महानगरपालिकेकडे समपहृत होईल.

(५) अनामत रक्कम समपहृत झाली नाही तर ती कलम ३२ खाली निवडणुकीचा निकाल घोषित करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर परत करण्यात येईल :

परंतु, जर एखादा उमेदवार सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी एकापेक्षा अधिक प्रभागांसाठी रीतसर नामनिर्देशित झाला असेल, तर, त्याने किंवा त्याच्या वतीने दिलेल्या अनामत रकमांपैकी एकाहून अधिक अनामत रकमा परत करण्यात येणार नाहीत व उर्वरित रकमा महानगरपालिकेकडे समपहृत होतील.]

प्रभागासाठी निवडणूक लढवण्यात येईल तेव्हा मतदान घेणे.

**२७.** (१) प्रभागासाठी निवडणूक [३] * * * * लढविण्यात येईल तेव्हा [४][नामनिर्देशनासाठी निश्चित केलेल्या दिवसानंतरच्या एकविसाव्या दिवसापूर्वीचा नसेल, अशा कोणत्याही दिवशी मतदान घेण्यात येईल.] अशा मतदानाच्या वेळी, नामनिर्देशनासाठी निश्चित केलेल्या दिवशी अंमलात असलेली महानगरपालिका मतदार यादी ही निवडणुकीच्या प्रयोजनांकरिता जिचा उल्लेख केला पाहिजे ती यादी असल्याचे मानण्यात येईल.

विधिग्राह्यरित्या नामनिर्देशित झालेल्या उमेदवारांची नावे प्रसिद्ध करणे.

(२) आयुक्त, मतदानाच्या तारखेपूर्वी किमान [५][तीन] दिवस अगोदर, विधिग्राह्यरीत्या नामनिर्देशित झालेल्या सर्व व्यक्तींची नावे आणि त्यांच्या घरांचे पत्ते व वर्णन [६] * * * [७]**[शासकीय राजपत्रातून]** आणि [८][प्रभागवार नामनिर्देशित झालेल्या व्यक्तींची नावे प्रत्येक संबंधित प्रभाग (वॉर्ड) कार्यालयांच्या सूचना फलकावर लावून] प्रसिद्ध करील.

मतदान केंद्रांत किंवा त्यांच्या जवळपास प्रचार करण्यास मनाई.

[९][**२७अ.** (१) कोणत्याही व्यक्तीने कोणत्याही मतदान केंद्रात मतदान घेण्यात येईल, त्या तारखेस किंवा तारखांना मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्रापासून १०० यार्डाच्या आतील कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेत पुढीलपैकी कोणतेही कृत्य करता कामा नये :—

(अ) मतांसाठी प्रचार करणे ; किंवा

(ब) कोणत्याही मतदाराची मतासाठी अभ्यर्थना करणे ; किंवा

(क) कोणत्याही विवक्षित उमेदवारास मत न देण्याविषयी कोणत्याही मतदाराचे मन वळवणे ; किंवा

---

[१] सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२, कलम ३(ड) अन्वये " स्वीकृतीद्वारे निवडणुकीच्या बाबतीत, त्याला पहिले मत मिळाले नाही किंवा प्रभाग निवडणुकीच्या बाबतीत " हा मजकूर गाळण्यात आला.

[२] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम १३ अन्वये " भागिले विभागासाठी तो उमेदवार नामनिर्देशित झाला असेल त्या विभागात निवडून द्यावयाच्या पालिका-सदस्यांच्या संख्या " हा मजकूर वगळण्यात आला.

[३] सन १९२२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम १५ अन्वये निरसित करण्यात आलेले शब्द गाळण्यात आले.

[४] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम ५ अन्वये " नामनिर्देशनासाठी ठरवलेल्या दिवसापासून एकवीस दिवसानंतर मतदान घेण्यात येईल. " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम ३(अ) अन्वये " चार " या शब्दाऐवजी " तीन " हा शब्द दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ३(ब) अन्वये निरसित करण्यात आलेले शब्द गाळण्यात आले.

[७] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " मुंबई सरकार राजपत्रात " याऐवजी " शासकीय राजपत्रात " हे शब्द दाखल करण्यात आले.

[८] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ५ अन्वये " स्थानिक वर्तमानपत्रात " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५४, कलम ३ अन्वये कलमे २७अ ते २७क समाविष्ट करण्यात आली.

(ड) निवडणुकीत मतदान न करण्याविषयी कोणत्याही मतदाराचे मन वळवणे ; किंवा

(ई) निवडणुकीसंबंधी (कार्यालयीन नोटिशीहून अन्य) कोणतीही नोटीस अगर निशाणी प्रदर्शित करणे.

(२) जी कोणतीही व्यक्ती पोट-कलम (१) च्या तरतुदीचे उल्लंघन करील तिला, अपराधसिद्धीनंतर दोनशे पन्नास रुपयांपर्यंत वाढवता येईल इतकी दंडाची शिक्षा होईल.

(३) या कलमाखाली शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध दखली असेल.

मतदानाच्या दिवसाच्या अगोदरच्या दिवशी व मतदानाच्या दिवशी सार्वजनिक सभा घेण्यास मनाई.

[१][**२७अ.** (१) कोणत्याही व्यक्तीला एखाद्या मतदान क्षेत्रातील कोणत्याही निवडणुकीतील मतदान संपण्यासाठी जी वेळ निश्‍चित करण्यात आली असेल त्या वेळेच्या अठ्ठेचाळीस तास अगोदर, त्या मतदान क्षेत्रात सार्वजनिक सभा बोलाविता, भरविता येणार नाही किंवा तिला हजर राहता येणार नाही.

(२) जी कोणतीही व्यक्ती पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करील, तिला अपराध-सिद्धीनंतर अडीचशे रुपयांपर्यंत वाढवता येईल इतकी दंडाची शिक्षा होईल.]

मतदान केंद्रांत किंवा त्यांच्या जवळपास बेबंद वर्तणूक केल्याबद्दल शास्ती.

**२७ब.** (१) कोणत्याही व्यक्तीने, कोणत्याही मतदान केंद्रात, मतदान होईल त्या तारखेस किंवा तारखांना, मतदानासाठी मतदान केंद्रात येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला उपद्रव होईल अशा रीतीने किंवा मतदान केंद्राच्या ठिकाणी कामावर असलेल्या अधिकाऱ्यांच्या आणि इतर व्यक्तींच्या कामात व्यत्यय येईल अशा रीतीने,—

(अ) ध्वनिवर्धक किंवा ध्वनिक्षेपक यासारखे मानवी आवाज प्रवर्धित किंवा पुनर्निर्मित करणारे कोणतेही उपकरणसंच मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राच्या प्रवेशद्वाराजवळ किंवा त्याच्या आसपासच्या कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेत वापरता किंवा चालविता कामा नये, अथवा

(ब) मतदान केंद्रात किंवा मतदान केंद्राच्या प्रवेशद्वाराजवळ किंवा त्याच्या आसपासच्या कोणत्याही सार्वजनिक किंवा खाजगी जागेत ओरडता किंवा अन्य प्रकारे बेबंद वागता कामा नये.

(२) जी कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करील किंवा असे उल्लंघन करण्यास बुद्ध्या सहाय्य करील किंवा अपप्रेरणा देईल तिला अपराधसिद्धीनंतर दोनशे पन्नास रुपयांपर्यंत वाढविता येईल इतकी दंडाची शिक्षा होईल.

(३) जर कोणतीही व्यक्ती या कलमाखाली शिक्षापात्र असलेला अपराध करीत आहे किंवा तिने तो केला आहे असे मतदान केंद्राच्या केंद्राध्यक्षासच सकारण वाटत असेल तर, तो अशा व्यक्तीस अटक करण्याविषयी कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास निदेश देऊ शकेल आणि लागोलाग पोलीस अधिकारी तिला अटक करील.

(४) कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास, पोट-कलम (१) च्या तरतुदींचे कोणत्याही प्रकारे उल्लंघन होऊ नये म्हणून वाजवीरीत्या आवश्यक असतील अशा उपाययोजना करता येतील आणि अशा बळाचा वापर करता येईल आणि असे उल्लंघन करण्याच्या कामी वापरण्यात आलेला कोणताही उपकरणसंच सक्तीने ताब्यात घेता येईल.

१ सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम ६ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

मतदान केंद्रांत गैरवर्तणूक केल्याबद्दल शास्ती.

**२७क.** (१) कोणत्याही व्यक्तीने मतदान केंद्रात मतदानासाठी ठरवलेल्या वेळात गैरवर्तणूक केल्यास किंवा मतदान केंद्राध्यक्षाने दिलेले विधिसंमत निदेश पाळण्यात कसूर केल्यास तिला मतदान केंद्राध्यक्ष किंवा कामावर असलेला कोणताही पोलीस अधिकारी किंवा अशा मतदान केंद्राध्यक्षाने याबाबत प्राधिकृत केलेली कोणतीही व्यक्ती, मतदान केंद्रातून घालवून देऊ शकेल.

(२) पोट-कलम (१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर, मतदान केंद्रात मतदान करण्याचा अन्यथा हक्क असलेल्या कोणत्याही मतदारास त्या केंद्रात मत देण्याची संधी मिळण्यास ज्यामुळे प्रतिबंध होईल अशा रीतीने केला जाणार नाही.

(३) याप्रमाणे मतदान केंद्रातून घालवून देण्यात आलेली कोणतीही व्यक्ती मतदान केंद्राध्यक्षाच्या परवानगीवाचून मतदान केंद्रात पुन्हा प्रवेश करील तर तिला सिद्धापराध ठरविण्यात आले असता अडीचशे रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

(४) पोट-कलम (३) खाली शिक्षापात्र असलेला अपराध दखली असेल.]

लढवण्यात येणाऱ्या प्रभाग निवडणुकीसंबंधी तरतुदी.

[१][**२८.** लढवण्यात येणाऱ्या प्रभाग निवडणुकांच्या बाबतीत पुढील तरतुदी लागू होतील :—

(अ) [२][कलम २९ खाली करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात येईल अशा रीतीने, [३][किंवा इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्राद्वारे] मते गुप्त मतदान पद्धतीने देण्यात येतील.] कोणतीही मते प्रतिनिधीमार्फत स्वीकारली जाणार नाहीत ;

(ब) ज्या कोणत्याही उमेदवाराचे नाव कलम २७, पोट-कलम (२) खाली विधिग्राह्य रीतीने नामनिर्देशित म्हणून [४][राज्य निवडणूक आयुक्ताने] प्रसिद्ध केले नसेल अशा उमेदवारासाठी कोणतीही मते घेतली जाणार नाहीत ;

[५][(क) सार्वत्रिक निवडणुकीच्या वेळी, कोणतीही व्यक्ती एकापेक्षा अधिक प्रभागांत मतदान करणार नाही आणि जर एखादी व्यक्ती एकापेक्षा अधिक प्रभागांत मतदान करील तर, अशा सर्व प्रभागांतील तिची मते शून्यवत होतील ;

(कअ) कोणत्याही व्यक्तीने [६]* * * * * तिचे नाव एखाद्या प्रभागाच्या मतदारांच्या यादीत एकापेक्षा अधिक वेळा आले असले तरीही एकाच प्रभागात एकापेक्षा अधिक वेळा मतदान करता कामा नये आणि जर एखाद्या व्यक्तीने एकाच प्रभागात एकापेक्षा अधिक वेळा मतदान केले तर त्या प्रभागातील तिची सर्व मते शून्यवत होतील ;]

[७](ड) * * * * * * *

[७](फ) * * * * * * *

[८][(ग) जिला सर्वात अधिक विधिग्राह्य मते मिळाली असतील ती व्यक्ती निवडून आली असल्याचे मानले जाईल ;]

---

[१] १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम ८ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम २८ दाखल करण्यात आले.

[२] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम ७ अन्वये " मते गुप्त मतदान पद्धतीने आणि जातीने देण्यात आली पाहिजेत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम २ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम २२ अन्वये 'आयुक्त' या शब्दाऐवजी 'राज्य निवडणूक आयुक्त' हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

[५] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५४, कलम ४ अन्वये खंड (क) ऐवजी हे खंड दाखल करण्यात आले.

[६] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम १४(अ) अन्वये " खंड ११ मध्ये " या शब्दांनी सुरू होणारा व " या मुद्यांवर " या शब्दांनी संपणारा हा मजकूर वगळण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम १४ (ब) अन्वये खंड (ड) व (फ) वगळण्यात आले.

[८] वरील अधिनियमाच्या कलम १४(क) अन्वये खंड (ग) बदली दाखल करण्यात आला.

(ह) काही उमेदवारांना समसमान मते पडली असल्याचे आढळून आले आणि एका मताची भर घातली असता त्यांच्यापैकी कोणत्याही उमेदवारास निवडून आल्याचे घोषित केले जाण्याचा हक्क प्राप्त होणार असेल तर, ज्या एका किंवा अनेक व्यक्तींना असे जादा मत देण्यात आले आहे असे मानण्यात यावे, ती व्यक्ती किंवा त्या व्यक्ती [१][राज्य निवडणूक आयुक्ताच्या] समक्ष आयुक्त निर्धारित करील अशा रीतीने चिठ्ठ्या टाकून निर्णीत करण्यात येईल/येतील ;

(आय) जर एखादा उमेदवार एकापेक्षा अधिक प्रभागांसाठी नगरपालिका सदस्य म्हणून निवडून आला तर, तो [१][राज्य निवडणूक आयुक्ताकडून] त्यासंबंधी लेखी नोटीस मिळाल्यानंतर तीन दिवसांच्या आत [१][राज्य निवडणूक आयुक्तास] लेखी पसंती कळवून त्याद्वारे ज्या प्रभागासाठी तो काम करणार असेल तो प्रभाग कळवील आणि त्याने तसे कळविण्यात कसूर केल्यास [१][राज्य निवडणूक आयुक्त], पसंतीसाठी त्यास दिलेला अवधी संपेल तेव्हा, ज्या प्रभागासाठी तो काम करील तो प्रभाग घोषित करील आणि अशी पसंती किंवा घोषणा निर्णायक असेल ;

(ज) जेव्हा अशी पसंती किंवा घोषणा करण्यात आली असेल तेव्हा उपरोक्त उमेदवार ज्या प्रभागासाठी काम करणार नसेल त्या कोणत्याही प्रभागात अशा उमेदवारासाठी नोंदली गेलेली मते देण्यात आलेली नाहीत असे मानले जाईल आणि अशी मते देण्यात आली असती तर जो कोणताही उमेदवार अशा प्रभागासाठी निवडून आल्याचे घोषित करण्यात आले असते तो उमेदवार त्या प्रभागासाठी निवडून आला आहे असे मानले जाईल ;

(के) [१][राज्य निवडणूक आयुक्त] शक्य असेल तितक्या लवकर, निवडणुकीचा निकाल घोषित करील व अशा निकालात प्रत्येक उमेदवारास मिळालेल्या विधिग्राह्य मतांची संख्या विनिर्दिष्ट करील [२]* * * * आणि तो प्रत्येक प्रभागासाठी याद्या तयार करवून घेईल व त्यात सर्व उमेदवारांची नावे तो प्रत्येक उमेदवारास मिळालेल्या विधिग्राह्य [३]* * * मतांची संख्या विनिर्दिष्ट केलेली असेल. या प्रयोजनासाठी आयुक्त जे नियम करील त्यास अनुसरून आणि तो विहित करील अशी फी देण्यात आल्यावर अशा यादीची एक प्रत प्रभागाच्या कोणत्याही उमेदवारास पुरविण्यात येईल आणि त्या प्रभागाच्या कोणत्याही मतदारास निरीक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात येईल.]

[४][**२८अ.** (१) निवडणुकीत मत नोंदणीशी किंवा मत मोजणीशी संबंध असलेले कोणतेही काम करणारा प्रत्येक अधिकारी, लिपिक, अभिकर्ता किंवा इतर व्यक्ती मतदानाची गुप्तता राखील व गुप्तता राखण्याच्या कामी मदत करील आणि अशा गुप्ततेचा भंग करण्याच्या हेतूने (कोणत्याही कायद्यान्वये किंवा त्याखाली अधिकृत अशा एखाद्या प्रयोजनासाठी असेल ते खेरीज करून एरव्ही) कोणत्याही व्यक्तीस कोणतीही माहिती देणार नाही. मतदानाची गुप्तता राखणे.

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम २२ अन्वये ' आयुक्त ' या शब्दाऐवजी ' राज्य निवडणूक आयुक्त ' हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

[२] सन १९४६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम १२ अन्वये आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ४ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या वरील कलमान्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[४] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५४, कलम ५ अन्वये कलमे २८अ ते २८आय समाविष्ट करण्यात आली.

(२) जी कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करील तिला सिद्धापराध ठरविण्यात आले असता, तीन महिन्यांपर्यंत वाढवता येईल इतक्या अवधीची कैदेची शिक्षा होईल किंवा दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

निवडणुकीच्या संबंधातील अधिकारी वगैरे यांनी उमेदवाराच्या वतीने काम न करणे किंवा मतदानाच्या बाबतीत वजन खर्च न करणे.

**२८ब.** [१][(१) जी कोणतीही व्यक्ती निवडणुकीतील मतदान केंद्राध्यक्ष किंवा मतदान अधिकारी असेल अथवा निवडणुकीसंबंधीचे कोणतेही काम करण्यासाठी राज्य निवडणूक आयुक्ताने किंवा अशा मतदान केंद्राध्यक्षाने नेमलेला, पदनिर्देशित केलेला किंवा अधिकार प्रदान केलेला अधिकारी किंवा कर्मचारी असेल ती व्यक्ती, निवडणूक घेताना किंवा निवडणुकीची व्यवस्था बघताना एखाद्या उमेदवाराची निवडणुकीतील यशाची संभाव्यता वाढवण्यासाठी मत देण्याव्यतिरिक्त इतर, कोणतीही कृती करणार नाही.]

(२) पूर्वोक्त अशा कोणत्याही व्यक्तीने आणि पोलीस दलातील कोणत्याही व्यक्तीने—

(अ) निवडणुकीत कोणत्याही व्यक्तीने आपले मत द्यावे म्हणून तिचे मन वळविण्याचा ; अथवा

(ब) निवडणुकीत आपले मत देण्यापासून कोणत्याही व्यक्तीला परावृत्त करण्याचा ; अथवा

(क) निवडणुकीत कोणत्याही व्यक्तीने मत देण्याच्याबाबतीत कोणत्याही प्रकारे वजन खर्च करण्याचा ;

प्रयत्न करता कामा नये.

(३) जी कोणतीही व्यक्ती पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) याच्या तरतुदींचे उल्लंघन करील, तिला सिद्धापराध ठरविण्यात आले असता, सहा महिन्यांपर्यंत वाढविता येईल इतक्या अवधीच्या कैदेची शिक्षा होईल किंवा दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

निवडणुकांच्या संबंधातील कार्यालयीन कर्तव्याचा भंग.

**२८क.** (१) हे कलम जिला लागू आहे अशी कोणतीही व्यक्ती, वाजवी कारण नसताना आपल्या कार्यालयीन कर्तव्याचा भंग करून कोणतेही कृत्य किंवा वर्जन केल्याबद्दल दोषी असेल तर, तिला सिद्धापराध ठरविण्यात आले असता, पाचशे रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

(२) पूर्वोक्त असे कोणतेही कृत्य किंवा वर्जन केल्याबद्दल अशा कोणत्याही व्यक्तीविरुद्ध नुकसानभरपाईचा कोणताही दावा किंवा इतर कोणतीही कायदेविषयक कार्यवाही दाखल करता येणार नाही.

(३) हे कलम ज्यांना लागू आहे त्या व्यक्ती म्हणजे [२][ * * * * ] मतदान केंद्राध्यक्ष, मतदान अधिकारी आणि महानगरपालिकेच्या मतदारांची यादी तयार करणे, उमेदवारांची नामनिर्देशनपत्रे स्वीकारणे किंवा उमेदवारी मागे घेणे किंवा निवडणुकीत मतनोंदणी करणे किंवा मतमोजणी करणे यासंबंधी कोणतेही काम करण्यासाठी [३][नेमलेली, पदनिर्देशित केलेली किंवा अधिकार प्रदान केलेली इतर कोणतीही व्यक्ती किंवा अधिकारी] या होत ; आणि " कार्यालयीन कर्तव्य " या शब्दप्रयोगाचा अर्थ, या कलमाच्या प्रयोजनांकरिता तद्नुसार लावण्यात येईल. मात्र या शब्दप्रयोगात प्रस्तूत अधिनियमान्वये किंवा त्याखाली सोपविण्यात आलेल्या कर्तव्याहून अन्य कर्तव्यांचा समावेश होणार नाही.

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम २३ अन्वये हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २४(अ) अन्वये 'आयुक्त ' हा शब्द वगळण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २४(ब) अन्वये ' नेमलेली इतर कोणतीही व्यक्ती ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**२८ड.** (१) जी कोणतीही व्यक्ती कोणत्याही निवडणुकीच्या वेळी एखाद्या मतदान केंद्रातून मतपत्रिका कपटाने घेईल किंवा घेण्याचा प्रयत्न करील किंवा असे कोणतेही कृत्य करण्यास जाणूनबुजून सहाय्य करील किंवा अपप्रेरणा देईल तिला, सिद्धापराध ठरविण्यात आले असता एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या अवधीची कैदेची किंवा पाचशे रुपयांपर्यंत वाढविता येईल इतकी दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

मतदान केंद्रांतून मतपत्रिका काढून नेणे हा अपराध असणे.

(२) कोणतीही व्यक्ती पोट-कलम (१) खाली शिक्षापात्र असलेला अपराध करीत आहे किंवा तिने तो केला आहे असे मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्षास सकारण वाटेल तर, अशा अधिकाऱ्यास, अशी व्यक्ती मतदान केंद्र सोडून जाण्यापूर्वी तिला अटक करता येईल किंवा तिला अटक करण्याविषयी एखाद्या पोलीस अधिकाऱ्यास निदेश देता येईल आणि अशा व्यक्तीची झडती घेता येईल किंवा एखाद्या पोलीस अधिकाऱ्याकरवी तिची झडती घेवविता येईल :

परंतु, एखाद्या स्त्रीची झडती घेणे आवश्यक असेल तेव्हा, अशी झडती सभ्यतेचे नियम काटेकोरपणे पाळून दुसऱ्या एखाद्या स्त्रीकरवी घेवविता येईल.

(३) अटक केलेल्या व्यक्तीजवळ झडतीमध्ये कोणतीही मतपत्रिका सापडल्यास मतदान केंद्राध्यक्ष ती सुरक्षित अभिरक्षेत ठेवण्यासाठी पोलीस अधिकाऱ्याच्या स्वाधीन करील, किंवा अशी झडती एखाद्या पोलीस अधिकाऱ्याने घेतली असेल तर, ती मतपत्रिका, असा अधिकारी सुरक्षित अभिरक्षेत ठेवील.

(४) पोट-कलम (१) खालील शिक्षापात्र असलेला अपराध दखली असेल.

**२८ई.** (१) जी कोणतीही व्यक्ती कोणत्याही निवडणुकीच्या वेळी—

इतर अपराध व त्याबद्दल शास्ती.

(अ) कोणतेही नामनिर्देशनपत्र कपटाने खराब करील किंवा कपटाने नष्ट करील ; अथवा

(ब) [१][राज्य निवडणूक आयुक्ताने] दिलेल्या प्राधिकारान्वये किंवा त्याखाली चिकटविलेली कोणतीही यादी, नोटीस किंवा इतर कागदपत्रे कपटाने खराब करील किंवा नष्ट करील किंवा काढून टाकील ; अथवा

(क) कोणतीही मतपत्रिका किंवा कोणत्याही मतपत्रिकेवरील अधिकृत निशाणी कपटाने विरूपित करील किंवा कपटाने नष्ट करील ; अथवा

(ड) योग्य प्राधिकारावाचून कोणत्याही व्यक्तीस कोणतीही मतपत्रिका पुरवील ; अथवा

(ई) एखाद्या मतपेटीत तिला जी मतपत्रिका टाकण्याचा कायद्यानुसार अधिकार असेल त्या मतपत्रिकेहून अन्य कोणतीही वस्तू अशा मतपेटीत कपटाने टाकील ; अथवा

(फ) निवडणुकीच्या प्रयोजनासाठी त्यावेळी उपयोगात असलेली कोणतीही मतपेटी किंवा मतपत्रिका योग्य प्राधिकारावाचून नष्ट करील, घेईल, उघडील किंवा अन्यथा तिच्यात ढवळाढवळ करील ; अथवा

(ग) यथास्थिति, कपटाने किंवा योग्य प्राधिकारावाचून वरील कृत्यांपैकी कोणतेही कृत्य करण्याचा प्रयत्न करील किंवा अशी कोणतीही कृत्ये करण्यास जाणूनबुजून सहाय्य करील किंवा अपप्रेरणा देईल, ती गुन्हा केल्याबद्दल दोषी आहे असे मानण्यात येईल.

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम २५(अ) अन्वये 'आयुक्ताने' या शब्दाऐवजी 'राज्य निवडणूक आयुक्ताने' हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) या कलमाखालील अपराध केल्याबद्दल दोषी असलेली कोणतीही व्यक्ती—

(अ) जर ती, [१][ * * * * ] एखाद्या मतदान केंद्रावरील मतदान केंद्राध्यक्ष किंवा निवडणुकीच्या संबंधात कार्यालयीन कर्तव्यार्थ नेमलेला कोणताही इतर अधिकारी किंवा लिपिक असेल तर तिला सिद्धापराध ठरविण्यात आले असता, दोन वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या अवधीची कैदेची किंवा दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील ;

(ब) जर ती, इतर कोणतीही व्यक्ती असेल तर तिला सिद्धापराध ठरविण्यात आले असता, सहा महिन्यांपर्यंत वाढवता येईल इतक्या अवधीची कैदेची किंवा दंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील.

(३) मतमोजणी धरून एखाद्या निवडणुकीचे किंवा अशा निवडणुकीच्या भागाचे काम चालविण्यात सहभागी होणे किंवा अशा निवडणुकीनंतर उपयोगात आणलेल्या मतपत्रिका व अशा निवडणुकीसंबंधीची इतर कागदपत्रे याबद्दल जबाबदार असणे हे एखाद्या व्यक्तीचे कर्तव्य असेल तर, या कलमाच्या प्रयोजनाकरिता ती व्यक्ती कार्यालयीन कर्तव्यार्थ असल्याचे मानण्यात येईल ; मात्र " कार्यालयीन कर्तव्य " या संज्ञेत या अधिनियमान्वये किंवा त्याखाली सोपविण्यात आलेल्या कर्तव्यांहून अन्य कोणत्याही कर्तव्याचा समावेश असणार नाही.

(४) पोट-कलम (२), खंड (ब) खाली शिक्षापात्र असलेला अपराध दखली असेल.

भ्रष्टाचार म्हणजे काय.

**२८फ.** जी कोणतीही व्यक्ती—

(एक) कोणत्याही उमेदवाराला मत देण्यासाठी किंवा देण्यापासून परावृत्त राहण्यासाठी कोणत्याही मतदाराचे मन वळविण्याच्या हेतूने कोणत्याही व्यक्तीस कोणताही पैसा किंवा मूल्यवान मोबदला देऊ करील किंवा देईल अथवा व्यक्तिगत फायदा करून देण्याचे कोणतेही वचन देईल किंवा इजा करण्याची कोणत्याही प्रकारची धमकी देईल ; अथवा

(दोन) मत देणारी व्यक्ती नसेल अशा एखाद्या मतदाराच्या नावे मत देईल, मिळवील किंवा देण्यास अपप्रेरणा देईल ; अथवा

(तीन) कोणत्याही मतदारास कोणत्याही मतदान केंद्राच्या ठिकाणी किंवा तेथून नेण्यासाठी कोणतेही वाहन किंवा जलयान पैसे देऊन किंवा अन्य प्रकारे भाड्याने घेईल किंवा मिळवील ;

तिने कलम ३३ च्या अर्थांतर्गत भ्रष्टाचार केला आहे असे मानले जाईल :

परंतु,—

(अ) उमेदवाराने स्वतःकरिता किंवा आपल्या कुटुंबाकरिता किंवा निवडणूक अभिकर्त्यांकरिता एखादे वाहन किंवा जलयान भाड्याने घेणे हा या कलमाखाली भ्रष्टाचार आहे असे मानण्यात येणार नाही ;

(ब) अशा कोणत्याही मतदान केंद्राकडे किंवा तेथून दुसरीकडे एखाद्या मतदाराने स्वतःस नेण्यासाठी किंवा अनेक मतदारांनी आपल्या सामाईक खर्चाने आपणास नेण्यासाठी एखादे वाहन भाड्याने घेतलेले

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम २५(ब) अन्वये 'आयुक्त किंवा ' हा मजकूर वगळण्यात आला.

असेल आणि याप्रमाणे भाड्याने घेतलेले वाहन किंवा जलयान यांत्रिक शक्तीने चालणारे नसेल तर, याप्रमाणे भाड्याने घेणे हा या कलमाखाली भ्रष्टाचार आहे असे मानण्यात येणार नाही ;

(क) कोणत्याही मतदाराने अशा कोणत्याही मतदान केंद्राच्या ठिकाणी जाण्यासाठी किंवा तेथून परत येण्यासाठी आपल्या खर्चाने कोणत्याही सार्वजनिक वाहतुकीच्या वाहनाचा किंवा जलयानाचा किंवा कोणत्याही ट्रामगाडीचा किंवा आगगाडीचा उपयोग करणे हा, या कलमाखाली भ्रष्टाचार आहे असे मानण्यात येणार नाही ;

आणि जर निवडणुकीच्या संबंधात एखादा भ्रष्टाचार एखाद्या उमेदवारास माहीत असून व त्याच्या संमतीने घडला असेल तर, तो अशा उमेदवारांकडून घडला असे मानले जाईल.

**स्पष्टीकरण.—**" व्यक्तिगत फायदा करून देण्याचे वचन " या शब्दप्रयोगात,—

(एक) महानगरपालिकेपुढे विचारासाठी येणाऱ्या कोणत्याही विशिष्ट उपाययोजनेच्या बाजूने किंवा विरूद्ध मत देण्याविषयी दिलेल्या वचनाचा समावेश होत नाही, मात्र

(दोन) या तरतुदींच्या अधीनतेने, अशा व्यक्तीने खुद्द आपल्या लाभासाठी किंवा तिच्याविषयी जिला आस्था वाटते अशा कोणत्याही व्यक्तीच्या लाभासाठी दिलेल्या वचनाचा त्यात समावेश होतो.

भ्रष्टाचार, फौजदारी अपराध व कार्यपद्धती.

**२८ग.** (१) जी कोणतीही व्यक्ती,—

(अ) कोणत्याही निवडणुकीत प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणत्याही उमेदवाराप्रीत्यर्थ मत देण्याविषयी किंवा न देण्याविषयी कोणत्याही मतदाराचे मन वळविण्याच्या हेतूने कोणत्याही व्यक्तीस कोणताही पैसा किंवा मूल्यवान मोबदला देऊ करील किंवा देईल अथवा व्यक्तिगत फायदा करून देण्याचे वचन देईल किंवा इजा करण्याची कोणत्याही प्रकारची धमकी देईल, अथवा

(ब) मत देणारी व्यक्ती नसेल अशा मतदाराच्या नावे मत देईल, मिळवील किंवा देण्यास अपप्रेरणा देईल, अथवा

(क) कलम २८फ, खंड (तीन) मध्ये वर्णन केलेल्या परिस्थितीत कोणत्याही मतदारास, कोणत्याही मतदान केंद्राच्या ठिकाणी किंवा तेथून नेण्यासाठी कोणतेही वाहन किंवा जलयान भाड्याने घेईल किंवा मिळवील तर,

ती अशा प्रत्येक अपराधाबद्दल दोनशे रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र असेल.

(२) कोणत्याही निवडणुकीत मत देण्यास अर्ह असलेली किंवा आपण याप्रमाणे अर्ह आहोत असा दावा सांगणारी जी कोणतीही व्यक्ती अशा कोणत्याही निवडणुकीमध्ये आपले मत देण्यासाठी किंवा देण्यापासून परावृत्त होण्यासाठी प्रवर्तकदान म्हणून किंवा बक्षीस म्हणून कोणताही पैसा किंवा मूल्यवान मोबदला किंवा कोणताही व्यक्तिगत फायदा स्वतःकरिता किंवा दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीकरिता घेईल किंवा मिळवील किंवा घेण्याचे कबूल करील किंवा मिळविण्याचा प्रयत्न करील ती, अशा प्रत्येक अपराधाबद्दल शंभर रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

**स्पष्टीकरण.—**पोट-कलमे (१) व (२) यांतील " व्यक्तिगत फायदा " या शब्दप्रयोगात त्या व्यक्तीला स्वतःला होणाऱ्या किंवा तशा ज्या व्यक्तीविषयी आस्था असेल अशा कोणत्याही व्यक्तीला होणाऱ्या लाभाचा समावेश होतो. मात्र त्या शब्दप्रयोगात महानगरपालिकेपुढे विचारासाठी येणाऱ्या कोणत्याही विवक्षित उपाययोजनेच्या बाजूने किंवा विरुद्ध मतदान करण्याविषयी दिलेल्या वचनाचा समावेश होत नाही.

[१][(२अ) जी कोणतीही व्यक्ती, कोणत्याही निवडणुकीच्या संबंधात, भारतातील निरनिराळ्या वर्गातील नागरिकांमध्ये धर्म, वंश, जात, समाज किंवा भाषा या कारणांवरून शत्रुत्वाची किंवा द्वेषाची भावना स्वतः होऊन किंवा स्वतःच्या वतीने अन्य कोणत्याही व्यक्तीकरवी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे निर्माण करील किंवा करण्याचा प्रयत्न करील, ती व्यक्ती, तीन वर्षांपर्यंत वाढवता येईल एवढ्या कैदेच्या किंवा दंडाच्या किंवा या दोन्ही शिक्षांस पात्र असेल.]

(३) पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) [२][किंवा पोट-कलम (२अ)] खाली सिद्धापराध ठरविण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती न्यायालय निदेशित करील अशा, अपराधसिद्धीच्या तारखेपासून सात वर्षांपेक्षा जास्त नसेल इतक्या कालावधीकरिता कोणत्याही निवडणुकीत मतदान करण्यास निरर्ह असेल.

(४) कोणतेही न्यायालय, कलम ३३ खाली ज्याने चौकशी केली आहे किंवा ज्याच्यापुढे अशी चौकशी प्रलंबित असेल त्या न्यायाधीशाने तक्रार केलेली असेल त्याखेरीज एरव्ही या कलमाखालील कोणत्याही अपराधाची दखल घेणार नाही.

(५) या कलमाखालील अपराधाबाबतचा कोणताही खटला निवडणुकीचा निकाल घोषित करण्यात आल्याच्या तारखेच्या लगतनंतर सहा महिन्यांच्या आत दाखल केलेला नसेल तर, तो दाखल करता येणार नाही.

(६) दंडाधिकाऱ्याने पोट-कलम (१), पोट-कलम (२) [३][किंवा पोट-कलम (२अ)] किंवा पोट-कलम (३) खाली दिलेल्या कोणत्याही शिक्षादेशाविरूद्ध किंवा आदेशाविरूद्ध उच्च न्यायालयाकडे अपील करता येईल.

निकडीच्या परिस्थितीत मतदान स्थगित करणे.

**२८ह.** (१) कोणत्याही निवडणुकीत कोणत्याही मतदानकेंद्रावरील कामकाजात कोणत्याही दंगलीमुळे किंवा उघड हिंसाचारामुळे व्यत्यय किंवा अडथळा आला असेल, अथवा कोणत्याही नैसर्गिक आपत्तीमुळे किंवा इतर कोणत्याही पुरेशा कारणामुळे कोणत्याही मतदान केंद्रात मतदान घेणे शक्य नसेल तर, [४][यथास्थिति, राज्य निवडणूक आयुक्त किंवा राज्य निवडणूक आयुक्त या संबंधात देईल अशा निदेशांच्या अधीन राहून अशा मतदान केंद्राचा केंद्राध्यक्ष, नंतर अधिसूचित करण्यात येईल अशा दिनांकापर्यंत मतदान स्थगित करण्यात आले असल्याचे घोषित करील आणि मतदान केंद्राध्यक्षाने मतदान या प्रकारे स्थगित केले असेल त्याबाबतीत तो राज्य निवडणूक आयुक्तास त्यासंबंधी ताबडतोब कळवील.]

(२) पोट-कलम (१) खाली मतदान स्थगित करण्यात येईल तेव्हा [५][राज्य निवडणूक आयुक्त], शक्य तितक्या लवकर, ज्या दिवशी पुन्हा मतदान घेण्याचे काम सुरू होईल तो दिवस आणि ज्या मतदान केंद्रात आणि ज्या वेळांमध्ये मतदान घेण्यात येईल ते मतदान केंद्र आणि त्या वेळा निश्चित करील. [५][राज्य निवडणूक आयुक्ताने] असे स्थगित केलेले मतदान पूर्ण होईपर्यंत अशा निवडणुकीत देण्यात आलेल्या मतांची मोजणी केली जाणार नाही.

---

[१] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३(अ) अन्वये पोट-कलम २अ समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३(ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३(क) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम २६(अ) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २६(ब) अन्वये ‘ आयुक्त ’ व ‘ आयुक्ताने ’ या शब्दाऐवजी अनुक्रमे ‘ राज्य निवडणूक आयुक्त ’ व ‘ राज्य निवडणूक आयुक्ताने ’ हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) पोट-कलम (२) खाली निश्चित केलेले मतदान केंद्र व तारीख आणि वेळ यासंबंधीची नोटीस [१][राज्य निवडणूक आयुक्त] नव्या मतदानाच्या दिनांकापूर्वी निदान तीन दिवस अगोदर **शासकीय राजपत्रात** आणि स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करील.

**२८आय.** (१) जर कोणत्याही निवडणुकीत [२][राज्य निवडणूक आयुक्ताच्या] किंवा कोणत्याही मतदान केंद्राध्यक्षाच्या ताब्यातून कोणतीही मतपेटी किंवा कोणत्याही मतपेट्या बेकायदेशीरपणे काढून नेण्यात आल्या तर, किंवा त्यात कोणत्याही प्रकारे अनधिकृतपणे फिरवाफिरव करण्यात आली तर कोणतीही मतपेटी किंवा मतपेट्या एकतर आकस्मिकरीत्या किंवा हेतुपुरस्सर नष्ट किंवा गहाळ करण्यात आल्या असतील तर, अशी मतपेटी किंवा मतपेट्या यांचा ज्या निवडणुकीशी संबंध असेल ती निवडणूक, अशी मतपेटी किंवा अशा मतपेट्या ज्या मतदान केंद्रात वापरण्यात आल्या असतील, केवळ त्याच मतदान केंद्रातील किंवा केंद्रांतील मतदानाच्या संबंधात निरर्थक होईल ; इतर मतदान केंद्रांतील मतदानाच्या संबंधात नाही.

मतपेट्या नष्ट, वगैरे झाल्या असतील त्याप्रसंगी नव्याने मतदान घेणे.

(२) पोट-कलम (१) खाली कोणत्याही मतदान केंद्रातील किंवा केंद्रांतील मतदान निरर्थक होईल तेव्हा [३][राज्य निवडणूक आयुक्त] ज्या कृत्यामुळे किंवा घटनेमुळे मतदान अशा रीतीने निरर्थक झाले ते कृत्य किंवा घटना त्यास माहीत झाल्यानंतर व्यवहार्य असेल तितक्या लवकर, अशा मतदान केंद्रात किंवा अशा प्रत्येक मतदान केंद्रात मतदान घेण्यासाठी दिवस नेमील आणि ज्या वेळेमध्ये मतदान घेण्यात येणार असेल ती वेळ ठरवील आणि नव्याने घेतलेले असे मतदान घेण्याचे काम पूर्ण होईपर्यंत अशा निवडणुकीत देण्यात आलेली मते मोजण्यात येणार नाहीत.

(३) पोट-कलम (२) खाली निश्चित केलेले मतदान केंद्र, तारीख व वेळ या गोष्टींसंबंधीची नोटीस [३][राज्य निवडणूक आयुक्त] नव्या मतदानापूर्वी निदान तीन दिवस अगोदर **शासकीय राजपत्रात** आणि स्थानिक वृत्तपत्रांत प्रसिद्ध करील.]

[४][**२९.** [५][या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने [६][राज्य शासनास, राज्य निवडणूक आयुक्ताबरोबर विचारविनिमय करून] निवडणूक चालवण्यासाठी आणि विशेषतः पुढील गोष्टींची तरतूद करण्यासाठी [६][नियम करता येतील.]—

निवडणूक चालवण्यासाठी [७][राज्य शासनास] नियम करता येतील.

[८] * * * *

(अ) प्रत्येक प्रभागासाठी मतदान केंद्रे नेमणे ;

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम २६(क) अन्वये ‘ आयुक्त ’ या शब्दाऐवजी ‘ राज्य निवडणूक आयुक्त ’ हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २७ अन्वये ‘ आयुक्त ’ या शब्दाऐवजी ‘ राज्य निवडणूक आयुक्त ’ हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

[३] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम २७ अन्वये ‘आयुक्त ’ या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम ९ अन्वये कलम २९ हे नवीन कलम समाविष्ट करण्यात आले. सन १९२२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ अन्वये मूळ कलम २९ निरसित करण्यात आले.

[५] सन १९३६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २४, कलम २, अनुसूची अन्वये कलम २९ (१) ला कलम २९ असा फेरक्रमांक देण्यात आला.

[६] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम २८(अ) अन्वये ‘महानगरपालिका राज्य शासनाच्या मंजुरीने ’ या मजकुराऐवजी आणि ‘ नियम करील ’ या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम २८(क) अन्वये ‘महानगरपालिकेस ’ या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन १९८० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ५अन्वये खंड (अअ) वगळण्यात आला.

(ब) [१][मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी] यांची आणि मतदानाच्या कामी सहाय्य करण्यासाठी इतर व्यक्तींची नेमणूक करणे आणि असे [१][मतदान केंद्राध्यक्ष व मतदान अधिकारी] आणि इतर व्यक्ती यांना त्यांच्या सेवांबद्दल द्यावयाचे पारिश्रमिक ;

(क) मते नोंदविण्यासाठी मतदान केंद्रे ज्या वेळेत उघडी राहतील ती वेळ ;

(ड) मतपत्रिका छापणे व त्या देणे ;

(ई) [२][महानगरपालिका मतदार] यादीच्या अनुषंगाने मतदारांची तपासणी करणे ;

[३][(ईई) तोतयेगिरीस प्रतिबंध करण्यासाठी, मतपत्रिका मागणाऱ्या प्रत्येक मतदाराच्या डाव्या तर्जनीवर किंवा इतर कोणत्याही बोटावर, पक्क्या शाईने निशाणी करणे, तसेच जो कोणताही मतदार आपल्या डाव्या तर्जनीवर किंवा इतर कोणत्याही बोटावर पक्क्या शाईने निशाणी करू देण्याचे नाकारील किंवा ज्या कोणत्याही मतदाराच्या डाव्या तर्जनीवर किंवा इतर कोणत्याही बोटावर अशी पक्क्या शाईची निशाणी केलेली असल्याचे आढळून येईल त्या मतदाराला देण्यात आलेली मतपत्रिका परत घेणे ;]

(फ) मते ज्या रीतीने द्यावयाची ती रीत, विशेषतः निरक्षर मतदारांच्या किंवा शारीरिक किंवा इतर निःसमर्थता असलेल्या मतदारांच्या बाबतीत, मते ज्या रीतीने द्यावयाची ती रीत;

(ग) आक्षेपित मतांच्या बाबतीत किंवा मतदार म्हणून इतर व्यक्तीने मत दिल्यानंतर, असा मतदार आपण आहोत असे सांगणाऱ्या व्यक्तीच्या प्रदत्त मतांच्या बाबतीत अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(ह) मतांची छाननी ;

(आय) मतपत्रिका आणि निवडणुकीसंबंधीचे इतर कागदपत्र, ते जेवढ्या कालावधीकरिता जतन करून ठेवावयाचे असतील तेवढ्या कालावधीकरिता ते सुरक्षित अभिरक्षेत ठेवणे आणि अशा कागदपत्रांचे निरीक्षण करणे व ते हजर करणे ;

आणि निवडणूक चालवण्यासंबंधी तिला योग्य वाटतील असे इतर नियम करता येतीलः]

[४][परंतु अशा कोणत्याही नियमांमध्ये निवडणुकीच्या कोणत्याही प्रयोजनांसाठी शुल्क आकारण्याची तरतूद करता येईल.]

**३०.** [सन्माननीय सदस्यांच्या निवडणुकीतील कार्यपद्धती.] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम १४ अन्वये निरसित करण्यात आले.

**३०अ.** [स्वीकृत करून घेतलेल्या पालिका-सदस्यांच्या निवडणुकीतील कार्यपद्धती.] सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ अन्वये निरसित करण्यात आले.

---

[१] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५४, कलम ६(१) अन्वये 'मतदान अधिकारी' या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] सन १९४६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम १३ व सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ४ अन्वये "मतदार" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५४, कलम ६(१) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम २८ (ब) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

**†३१.** [चेंबर किंवा अधिसंघ यांनी करावयाच्या निवडणुकीतील कार्यपद्धती. ] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम १५ अन्वये निरसित करण्यात आले.

**३१अ.** सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७, कलम ३ अन्वये निरसित करण्यात आले.

निवडणुकांचे निकाल घोषित करणे.

**३२.** (१) [१][ * * * ] ज्या कोणत्याही व्यक्ती निवडून आल्या असतील त्यांची नावे आणि लढविण्यात आलेल्या निवडणुकीच्या बाबतीत प्रत्येक उमेदवारासाठी नोंदण्यात आलेल्या मतांची संख्या [१][प्रमाणित करून राज्य निवडणूक आयोगास योग्य वाटेल अशा रीतीने प्रत्येक निवडणुकीचा निकाल घोषित करण्यात येईल.]

[२]* * * * * *

लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाने निवडणूक अर्जांची सुनावणी करणे आणि ते निकालात काढणे.

**३३.** (१) पालिका-सदस्यांच्या जागेसाठी जी व्यक्ती निवडून आलेली आहे असे घोषित करण्यात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीच्या अर्हतेसंबंधी वाद असेल तर किंवा [३][राज्य निवडणूक आयुक्ताने] नामनिर्देशन अयोग्यरीत्या नामंजूर केल्यामुळे किंवा अयोग्यपणे मत घेण्यात किंवा नाकारण्यात आल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे कोणत्याही निवडणुकीच्या विधिग्राह्यतेस आक्षेप घेण्यात आला असेल तर [४][किंवा एखाद्या व्यक्तीने कलम २८फ च्या अर्थांतर्गत भ्रष्टाचार केला आहे या मुद्यावर तिच्या निवडणुकीच्या विधिग्राह्यतेस आक्षेप घेण्यात आला असेल तर] महानगरपालिका मतदार यादीत नाव असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, [५][कलम २८, खंड (के) खाली विहित केलेली यादी [६][ * * * * ] ज्या तारखेस विक्रीसाठी किंवा निरीक्षणासाठी ठेवण्यात आली असेल त्या तारखेपासून] [७][दहा दिवसांच्या] आत कोणत्याही वेळी, लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाकडे अर्ज करता येईल. [८][जर असा अर्ज कोणताही विवक्षित उमेदवार निवडून आल्याचे घोषित केले जावे यासाठी असेल तर, अर्जदार, कलम ३२ खाली [३][राज्य निवडणूक आयुक्ताने] घोषित केलेल्या निकालानुसार ज्यांना, उक्त उमेदवारापेक्षा अधिक मते मिळाली असतील अशा सर्व उमेदवारांना, ते निवडून आलेले आहेत असे घोषित करण्यात आले नसले तरीही आपल्या अर्जातील पक्षकार करील आणि ज्या रीतीने उक्त उमेदवारांविरुद्ध कार्यवाही चालविण्यात येईल त्याच रीतीने त्यांच्याविरुद्ध कार्यवाही चालवील.]

---

† सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ७९ पुढीलप्रमाणे आहे :—

"**७९.** कलमे २(१), (४) आणि (५) आणि ४ ते १६ यांमधील कोणत्याही गोष्टीमुळे हा अधिनियम प्रवर्तनात येण्याच्या लगतपूर्वी उक्त अधिनियमाखाली रचना करण्यात आलेली किंवा नेमण्यात आलेली महानगरपालिका, स्थायी समिती, सुधार समिती किंवा इतर कोणतीही समिती किंवा उप समिती यांची रचना करण्यास कोणताही बाध येणार नाही आणि पालिका-सदस्य किंवा उक्त समिती अथवा उप समिती यांच्या सदस्यांची १ एप्रिल १९५२ पूर्वी नैमत्तिकरीत्या रिकामी झालेली कोणतीही जागा उक्त अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, जणू काही हा अधिनियम पारित झालेला नसावा त्याप्रमाणे भरता येईल."

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ कलम २९ अन्वये मूळ मजकूर वगळण्यात आला व ' नमूद करून ती प्रमाणित करण्यात येईल ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम १६(२) अन्वये पोट-कलम (२) वगळण्यात आले.

[३] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ३०(अ) अन्वये 'आयुक्ताने ' या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५४, कलम ७(१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम १२ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ३०(ब) अन्वये 'आयुक्ताच्या कार्यालयात ' हे शब्द गाळण्यात आले.

[७] १९९८ या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ६ अन्वये " पंधरा दिवसाच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ५(एक) (ब) हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[१][(१अ) मुख्य न्यायाधीश तसे फर्मावील तेव्हा, उक्त अर्जातील इतर पक्षकारांस जो परिव्यय देण्याविषयी अर्जदारांना फर्माविण्यात येईल त्या परिव्ययादाखल प्रतिभूती म्हणून, अर्जदार ५०० रुपये इतकी रक्कम रोख किंवा त्या दिवशीच्या बाजारभावाप्रमाणे तेवढ्याच किमतीच्या सरकारी कर्जरोख्यांच्या रूपात न्यायालयात अनामत ठेवील.]

(२) उक्त मुख्य न्यायाधीशास, त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, उक्त निवडणूक ही विधिग्राह्य निवडणूक होती आणि जिच्या निवडणुकीस आक्षेप घेण्यात आला होता ती व्यक्ती निरर्ह नाही असे आढळून आले तर, तो निवडणुकीचा घोषित केलेला निकाल कायम करील. [२][जिच्या निवडणुकीस आक्षेप घेण्यात आला होता ती व्यक्ती पालिका-सदस्य असण्यास निरर्ह आहे असे त्यास आढळून आले तर, तो अशा व्यक्तीची निवडणूक रद्दबातल आहे असे घोषित करील. उक्त निवडणूक विधिग्राह्य नाही असे त्यास आढळून आले तर, तो, ती अपास्त करील. वरील कोणत्याही बाबतीत तो असा निदेश देईल की, उक्त व्यक्तीनंतर [३] * * * * ज्या कोणत्याही उमेदवाराच्या नावे त्यानंतर सर्वात अधिक मते नोंदण्यात आली असतील आणि ज्याच्या निवडणुकीस आक्षेप घेण्यास कोणतेही वादकारण आढळून आले नसेल तो उमेदवार, निवडून आला आहे असे मानण्यात येईल.]

[४][(२अ) एखाद्या व्यक्तीने कलम २८फ च्या अर्थांतर्गत भ्रष्टाचार केला आहे, केवळ या मुद्यावर तिच्या निवडणुकीस आक्षेप घेण्यात आला असेल तेव्हा, उमेदवाराने भ्रष्टाचार केला आहे अशी मुख्य न्यायाधीशाची खात्री झाल्यास तो, असा उमेदवार हा, त्या निवडणुकीच्या प्रयोजनासाठी आणि सार्वत्रिक निवडणुकीत निवडून आलेल्या पालिका-सदस्यांच्या चालू पदावधीमध्ये घेण्यात येईल अशा नवीन निवडणुकीच्या प्रयोजनांसाठी निरर्ह आहे असे घोषित करील आणि जर असा उमेदवार निवडून आलेला असेल तर त्याची निवडणूक अपास्त करील.]

(३) उक्त मुख्य न्यायाधीशाचा आदेश निर्णायक असेल.

[५][ * * * * * * ]

(५) पूर्वगामी तरतुदींअनुसार हरकत घेण्यात न आलेली प्रत्येक निवडणूक सर्व उद्देशांकरिता निर्दोष व विधिग्राह्य निवडणूक असल्याचे मानण्यात येईल.

निवडणूक निष्फळ झाली किंवा अपास्त करण्यात आली तर अनुसरावयाची कार्यपद्धती.

[६][ **३४**. [७][(१) कोणत्याही निवडणुकीच्या वेळी, किंवा नैमित्तिक रिकामी जागा भरण्यासाठी घेतलेल्या निवडणुकीच्या वेळी, कोणताही पालिका-सदस्य निवडून आला नसेल किंवा कलम ३३, पोट-कलम (२) खाली कोणत्याही पालिका-सदस्यांची निवडणूक अपास्त करण्यात आली असेल आणि उक्त पोट-कलमाखाली अशा पालिका-सदस्याच्या जागी जो निवडून आल्याचे मानता येईल असा इतर कोणताही उमेदवार नसेल तर [८][राज्य निवडणूक आयुक्त] नव्याने निवडणूक घेण्यासाठी दुसरी तारीख नेमून देईल व त्यानुसार नवीन निवडणूक घेण्यात येईल.

---

[१] सन १९४६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम १४ व सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ४ अन्वये पोट-कलम (१अ) दाखल करण्यात आले.

[२] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ५(२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम १५, अन्वये " किंवा उक्त निवडणुकीत, जे निवडून आल्याचे जाहीर करण्यात आले असेल त्या सर्व इसमांनंतर " हा मजकूर वगळण्यात आला.

[४] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५४, कलम ७(२) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम ३ अन्वये पोट-कलम (४) गाळण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ४ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम ३४ दाखल करण्यात आले.

[७] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम १६ अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[८] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ३१ अन्वये 'आयुक्त ' या शब्दाऐवजी "राज्य निवडणूक आयुक्त" हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) या कलमाखाली निवडून आलेला पालिका-सदस्य कलम ९ खालील नैमित्तिक रिकामी जागा भरण्यासाठी निवडून आला आहे, असे मानण्यात येईल.]

**[1][ राज्य ] शासनाने पालिका-सदस्यांची नेमणूक करणे**

**३५.** [1][ राज्य ] शासनाने पालिका-सदस्यांच्या नेमणुका केव्हा कराव्यात.] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम १४ अन्वये निरसित करण्यात आले.

**महानगरपालिकेचे कामकाज**

महानगर-पालिकेच्या कामकाजाचे विनियमन करण्यासंबंधी तरतुदी.

**३६.** [2][ (१) ] महानगरपालिका पुढे दिलेल्या शर्तीच्या अधीनतेने आपले कामकाज चालविण्यासाठी आपल्या सभा भरवील आणि अशा सभा बोलावणे, अशा सभांची नोटीस, जागा आणि व्यवस्थापन तसेच त्या तहकूब करणे यांविषयी तसेच सर्वसाधारणपणे [3][कलम ६६ अ खाली प्रश्न सादर करणे व विचारणे आणि प्रश्नांची उत्तरे देणे] या गोष्टी धरून महानगरपालिकेचे कामकाज चालविण्याच्या आणि त्यांचे व्यवस्थापन करण्याच्या पद्धतीविषयी, तिला योग्य वाटतील असे विनियम वेळोवेळी करील त्या शर्ती अशा :—

[4][(अ) प्रत्येक महिन्यात महानगरपालिकेची एक साधारण बैठक भरविण्यात येईल ; मार्च महिन्यातील साधारण बैठक, त्या महिन्याच्या विसाव्या दिवसांपेक्षा उशिराची नसेल अशा दिवशी भरविण्यात येईल ;

(ब) सार्वत्रिक निवडणुकीनंतरची एप्रिल महिन्यातील पहिली बैठक सोयीस्करपणे शक्य होईल तितक्या लवकर उक्त महिन्यात आयुक्त निश्चित करील अशा दिवशी, अशा वेळी, अशा जागी भरविण्यात येईल आणि ती त्या दिवशी भरविण्यात आली नाही तर, आयुक्त निश्चित करील अशा नंतरच्या दिवशी भरविण्यात येईल ;

(क) इतर प्रत्येक बाबतीत बैठकीचा दिवस, वेळ व जागा या गोष्टी महापौर निश्चित करील किंवा महापौरांचे पद रिकामे असेल किंवा तो मरण पावला असेल किंवा त्याने राजीनामा दिला असेल किंवा तो पालिका-सदस्य म्हणून असण्याचे बंद झाले असेल किंवा तो काम करण्यास असमर्थ असेल तर, उप महापौर व दोघांच्याही अनुपस्थितीच्यावेळी स्थायी समितीचा अध्यक्ष निश्चित करील ;

(ड) महापौरास किंवा उपरोक्तप्रमाणे असेल अशा कोणत्याही प्रसंगी स्थायी समितीच्या सभापतीस त्यास योग्य वाटेल तेव्हा आणि पालिका-सदस्यांच्या एकूण संख्येपैकी एक षष्ठांशापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी सह्या केलेली लेखी मागणी केल्यावर त्यास अशी विशेष बैठक बोलावता येईल ;]

(ई) प्रत्येक सभा लोकांना खुली असेल, मात्र महानगरपालिकेपुढे चालू असलेली कोणतीही चौकशी किंवा कोणतीही चर्चा ही अशा स्वरूपाची असेल की, ती खाजगी रीतीने चालविली पाहिजे असे त्या सभेस हजर असलेल्या बहुसंख्य पालिका-सदस्यांनी ठराव संमत करून ठरविले असेल, तर अशी सभा लोकांना खुली असणार नाही असा ठराव अध्यक्ष-प्राधिकारी स्वतः होऊन किंवा हजर असलेल्या कोणत्याही पालिका-सदस्याने विनंती केली असता, आगाऊ चर्चा न करता मांडील. तसेच अध्यक्ष-प्राधिकाऱ्यास, जी कोणतीही व्यक्ती सभेच्या कामकाजात अडथळा आणील त्या व्यक्तीस कोणत्याही वेळी बाहेर काढता येईल ;

---

[1] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[2] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ३ अन्वये कलम ३६ ला त्याचे पोट-कलम (१) असा नव्याने क्रमांक देण्यात आला.

[3] सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक २३, कलम २(एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५(अ) अन्वये, खंड (अ) ते (ड) हे खंड दाखल करण्यात आले.

(फ) जर सभा चालू असताना कोणत्याही वेळी [१][अध्यक्ष-प्राधिकारी धरून हजर असलेल्या पालिका-सदस्यांची संख्या पालिका-सदस्यांच्या एकूण संख्येच्या एक-पंचमांशाहून कमी आहे] असे अध्यक्ष-प्राधिकाऱ्याच्या नजरेस आणून देण्यात आले तर अध्यक्ष-प्राधिकारी ती सभा त्यास सोईस्कर वाटेल अशी वेळ व जागा ठरवून, इतर एखाद्या दिवसापर्यंत तहकूब करील आणि अशा सभेत निकालात न काढलेले कामकाज अशा तहकूब केलेल्या नंतरच्या सभेत निकालात काढण्यात येईल किंवा ही तहकुबीनंतरची सभा जर पुन्हा तहकूब करण्यात आली तर ते कामकाज त्यानंतरच्या कोणत्याही तहकूब करून भरलेल्या सभेत निकालात काढण्यात येईल ; [२][मग त्या सभेत गणपूर्ती झालेली असो वा नसो] ;

[३][(ग) प्रत्येक बैठकीमध्ये ती बैठक घेण्यासाठी नेमलेल्या वेळेस महापौर हजर असेल तर तो अध्यक्षस्थानी असेल, आणि महापौराचे पद रिकामे असेल किंवा महापौर अनुपस्थित असेल तर उप महापौर आणि महापौर व उप महापौर हे दोघेही अनुपस्थित असतील तर, बैठकीकडून उपस्थित असलेल्या सदस्यांपैकी त्या प्रसंगी सभापती म्हणून निवडण्यात येईल असा एखादा पालिका-सदस्य अध्यक्षस्थानी असेल ;]

(ह) सामान्यतः तहकूब केलेल्या सभेखेरीज इतर प्रत्येक सभेची किमान सात पूर्ण दिवसांची नोटीस देण्यात येईल. मात्र निकडीच्या प्रसंगी अशी कोणतीही सभा, वार्षिक अर्थसंकल्पाच्या विचारार्थ असेल ते खेरीज करून एरव्ही [४][पूर्ण तीन दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या मुदतीची नोटीस दिल्यानंतर [५][स्थायी समितीच्या चारपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी] सही केलेल्या लेखी मागणीनुसार बोलावता येईल. तहकूब करण्यात आलेल्या सभांच्या बाबतीत], तहकुबीचा कालावधी लक्षात घेऊन व्यवहार्य असेल अशी आगाऊ नोटीस देण्यात येईल ;

(ज) सभेच्या प्रत्येक नोटिशीत, अशी सभा ज्यावेळी व ज्या जागी भरावयाची असेल ती वेळ व ती जागा आणि [६][कलम ६६अ खालील प्रश्नांखेरीज] सभेत चालवावयाचे कामकाज या गोष्टी, विनिर्दिष्ट करण्यात येतील आणि महानगरपालिकेचा सचिव, स्थानिक वृत्तपत्रांत जाहिरात देऊन अशी नोटीस देईल.

[७]* * * * * *

(के) कोणत्याही सभेत [६][कलम ६६अ खालील प्रश्नाहून अन्य] कोणतेही कामकाज पुढे आणण्याची किंवा जो कोणताही महत्त्वाचा प्रस्ताव अशा सभेच्या नोटिशीत अगोदर विनिर्दिष्ट करण्यात आला असेल असा प्रस्ताव मांडण्याची ज्याची इच्छा असेल असा कोणताही पालिका सदस्य त्या सभेसाठी निश्चित केलेल्या दिवसापूर्वी किमान तीन पूर्ण दिवस अगोदर त्यासंबंधी लेखी नोटीस महानगरपालिकेच्या सचिवास देईल ; आणि ज्या कामकाजाची किंवा प्रस्तावांची याप्रमाणे

---

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ८(दोन) अन्वये “ अध्यक्ष-प्राधिकारी धरून, पंचवीसहून कमी ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या वरील कलमाद्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५(ब) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ५(क)(दोन) हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ५(अ)(एक) अन्वये “ महापौराने ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक २३, कलम २(दोन) ३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१, कलम ३ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

नोटीस देण्यात आली असेल, त्या कामकाजाची किंवा सूचनांची एक अनुपूरक घोषणा, उक्त सचिव सभेच्या आदल्या दिवसापेक्षा उशिरा नसेल अशा दिवशी एखाद्या स्थानिक दैनिक वृत्तपत्रात प्रसिद्ध करील.

[१][(ल) निकडीच्या प्रसंगामुळे केलेल्या मागणीवरून बोलावण्यात आलेल्या बैठकीव्यतिरिक्त इतर बैठकीत किंवा कोणत्याही बैठकीतील अर्थसंकल्पावरील चर्चेव्यतिरिक्त इतर चर्चेच्या वेळी, खंड (ज) खाली प्रसिद्ध करण्यात आलेल्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या कामकाजाखेरीज आणि कलम ६६-अ खाली विचारण्यात आलेल्या कोणत्याही प्रश्नांखेरीज किंवा स्थायी समितीला, सुधार समितीला, [२][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समितीला], शिक्षण समितीला किंवा आयुक्ताला त्या बैठकीपुढे आणणे इष्ट वाटेल असे जे कामकाज उक्त नोटिशीत विनिर्दिष्ट केलेले नसेल त्या निकडीच्या कामकाजाखेरीज इतर कोणतेही कामकाज, कोणत्याही बैठकीत चालवता येणार नाही आणि जो कोणताही महत्त्वाचा प्रस्ताव उक्त नोटिशीत किंवा खंड (के) खाली प्रसिद्ध करण्यात आला असेल अशा कोणत्याही अनुपूरक घोषणेत विनिर्दिष्ट करण्यात आला नसेल किंवा जो कोणताही महत्त्वाचा प्रस्ताव यथास्थिति, स्थायी समिती, सुधार समिती, [२][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समिती], शिक्षण समिती किंवा आयुक्त या प्राधिकरणांपैकी अनुक्रमे कोणत्याही प्राधिकरणाने, बैठकीपुढे आणलेल्या कोणत्याही निकडीच्या कामकाजासंबंधीच्या शिफारशीस पुष्टी देणारा नसेल असा कोणताही महत्त्वाचा प्रस्ताव करता येणार नाही किंवा त्याबद्दल चर्चा करता येणार नाही :

परंतु, कोणत्याही बैठकीपुढे पूर्वोक्तप्रमाणे असे कोणतेही निकडीचे कामकाज आणण्यास अशा बैठकीस हजर असलेल्या पालिका-सदस्यांपैकी तीन-चतुर्थांश इतक्या सदस्यांनी—असे पालिका-सदस्य पालिका-सदस्यांच्या एकूण संख्येच्या एक-षष्ठांशापेक्षा कमी असता कामा नयेत—संमती दिलेली नसेल, तर असे कामकाज अशा बैठकीपुढे आणता येणार नाही.]

(म) निकडीच्या मागणीवरून बोलावण्यात आलेल्या सभेत आणि कोणत्याही वेळेस अर्थसंकल्पावर चर्चा चालू असतांना ज्या कामकाजासाठी अशी निकडीची सभा बोलावण्यात आली असेल त्या कामकाजाशी ज्याचा प्रत्यक्षपणे संबंध नसेल किंवा यथास्थिति, ज्याचा अर्थसंकल्पाशी प्रत्यक्षपणे संबंध नसेल असे कोणतेही कामकाज चालवता येणार नाही किंवा असा कोणताही महत्त्वाचा प्रस्ताव मांडता येणार नाही किंवा त्याबद्दल चर्चा करता येणार नाही ; आणि स्थायी समितीने [३][स्थायी समितीने जे कर बसवण्याचे योजिले असेल] अशा करांत ज्यायोगे बदल होईल किंवा अर्थसंकल्पातील खर्चाच्या कोणत्याही बाबीतील वाढ किंवा घट यात ज्यायोगे बदल होईल असा कोणताही महत्त्वाचा प्रस्ताव हा, ज्या कोणत्याही सभेत अर्थसंकल्प विचाराधीन असेल त्या सभेत मांडता येणार नाही किंवा त्याच्याबद्दल चर्चा करता येणार नाही ; मात्र असा प्रस्ताव खंड (ज) खाली प्रसिद्ध करण्यात आलेल्या सभेच्या नोटिशीत किंवा खंड (के) खाली प्रसिद्ध करण्यात आलेल्या कोणत्याही अनुपूरक घोषणेत विनिर्दिष्ट करण्यात आलेला असेल तर किंवा एखाद्या स्थगित सभेच्या बाबतीत खंड (न) च्या परंतुकात निर्दिष्ट करण्यात आलेल्या शर्तीपैकी प्रत्येक शर्त पाळण्यात आलेली असेल तर ती बाब वेगळी.

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५(ड) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) (४) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५(ई) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][(मअ) खंड (ल) आणि (म) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आयुक्तास कोणत्याही वेळी स्वतः होऊन किंवा यात यापूर्वी उल्लेखिलेल्या कोणत्याही समितीच्या वतीने, महापौरास किंवा खंड (क) मध्ये नमूद केलेल्या परिस्थितीत उप महापौरास किंवा त्याच्या अनुपस्थितीत स्थायी समितीच्या सभापतीस, निदान एक दिवस आधी अशी सूचना देता येईल की, आपण किंवा संबंधित समिती महानगरपालिकेला ज्यावर तात्काळ विचार घेणे आवश्यक असेल अशा, सूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या बाबीसंबंधीचे तातडीचे कामकाज, विनिर्दिष्ट तारखेस घ्यावयाच्या सभेत आणू किंवा आणील, अशी सूचना देण्यात येईल तेव्हा उक्त सभेमध्ये उक्त कामकाजाला आयुक्ताने त्याच्या सूचनेत विनिर्दिष्ट केलेल्या प्राथम्यक्रमात इतर कामाकाजाच्या वरचा प्राथम्यक्रम राहील आणि उक्त कामकाज झाल्याशिवाय त्या सभेत त्यावर निर्णय घेण्यात आल्याशिवाय इतर कोणतेही काम विचारात घेतले जाणार नाही ;]

(न) कोणतीही सभा, त्या सभेत हजर असलेल्या बहुसंख्य पालिका-सदस्यांच्या संमतीने वेळोवेळी स्थगित करता येईल, मात्र स्थगित करण्यात आलेली जी कोणतीही सभा पुढे भरेल त्या सभेत जी सभा स्थगित करण्यात आली होती त्या सभेत निकालात न काढलेल्या कामकाजाखेरीज किंवा प्रस्तावाखेरीज इतर कोणतेही कामकाज चालवता येणार नाही आणि यात यापुढे जी तरतूद असेल त्याखेरीज इतर कोणत्याही प्रस्तावावर चर्चा करता येणार नाही :

परंतु, ज्या कोणत्याही स्थगित सभेत अर्थसंकल्पावर विचारविनिमय करण्यात येणार असेल तिच्यात, खंड (म) मध्ये वर्णन केल्याप्रमाणे बदल घडवून आणणारा प्रस्ताव, असा प्रस्ताव हा स्थगित सभेत निकालात न काढलेला प्रस्ताव नसला तरीही, पुढील शर्तीपैकी प्रत्येक शर्त पुरी करण्यात आल्यास मांडता येईल व त्याबाबत चर्चा करता येईल :—

(एक) जी सभा स्थगित करण्यात आली असेल त्या सभेत अशा प्रस्तावाची लेखी नोटीस देण्यात आलेली असली पाहिजे ;

(दोन) सभा [२][दोन] पूर्ण दिवसांपेक्षा कमी नसेल अशा अवधीसाठी स्थगित करण्यात आलेली असली पाहिजे ; आणि

(तीन) त्या प्रस्तावाची खास घोषणा महानगरपालिका सचिवाने (ज्याला अशी घोषणा करणे बंधनकारक आहे) स्थगित सभा ज्या दिवशी भरेल त्या दिवसापूर्वीच्या दिवसापेक्षा उशिरा नसेल अशा बेताने एकापेक्षा कमी नसतील इतक्या स्थानिक दैनिक वृत्तपत्रात दिलेली असली पाहिजे ;

(ओ) महानगरपालिकेचा सचिव, प्रत्येक सभेस उपस्थित असलेल्या पालिका-सदस्यांची नावे असलेले व तिच्या कामकाजाचे कार्यवृत्त सभेच्या दुसऱ्या दिवशी किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर, त्या प्रयोजनासाठी [३][ठेवावयाच्या] कार्यवृत्त पुस्तकात ठेवील व नंतरच्या आगामी सभेमध्ये [४][किंवा त्यानंतर लगेच भरलेल्या कोणत्याही सभेमध्ये महानगरपालिकेने त्यास पुष्टी दिल्यानंतर]

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५(फ), अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम २ अन्वये 'तीन' या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम २(अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २(ब) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

त्या सभेचा अध्यक्ष-प्राधिकारी त्यावर सही करील आणि उक्त कार्यवृत्त पुस्तक प्रमुख महानगरपालिका कार्यालयात सर्व वाजवी वेळी, कोणत्याही पालिका-सदस्यासाठी विनामूल्य व इतर कोणत्याही व्यक्तीसाठी तिने [१][पन्नास नवे पैसे इतकी किंवा महानगरपालिका निश्चित करील अशी, दोन रुपयांहून अधिक नसेल इतकी फीची रक्कम दिल्यानंतर निरीक्षणासाठी उपलब्ध असेल ;]

(प) पालिका-सदस्यास सभेपुढे चालू असलेल्या ज्या कोणत्याही बाबीमध्ये त्याचा, प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे स्वतःचा किंवा आपल्या भागीदारामार्फत, कलम १६, खंड (ग) ते (ल) दोन्ही धरून, यात वर्णन केलेल्या प्रकारचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल किंवा ज्यात अशिलाच्या, प्रकर्त्याच्या किंवा इतर व्यक्तीच्या वतीने त्याचा व्यावसायिकदृष्ट्या हितसंबंध असेल, त्या बाबीवरील चर्चेत मतदान करता येणार नाही किंवा तिच्यात भाग घेता येणार नाही. [२][किंवा त्या बाबीच्या संबंधात कलम ६६अ खाली कोणताही प्रश्न विचारता येणार नाही ;]

[३][(क्यू) एखाद्या बैठकीपुढे नोटीस न देता निकडीचे कामकाज आणण्यास स्थायी समितीला, सुधार समितीला, [४][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीला], शिक्षण समितीला किंवा आयुक्ताला परवानगी द्यावी किंवा कसे या प्रश्नाहून अन्य प्रत्येक प्रश्न बैठकीत उपस्थित असलेल्या व त्या प्रश्नावर मतदान करणाऱ्या पालिका-सदस्याच्या बहुमताने निकालात काढण्यात येईल आणि समसमान मते पडतील तेव्हा पीठासीन-प्राधिकाऱ्यास दुसरे किंवा निर्णायक मत असेल :

परंतु, कलम ५, पोट-कलम (१) च्या खंड (ब) मध्ये, निर्दिष्ट केलेल्या पालिका-सदस्यांना महानगरपालिकेच्या कोणत्याही सभेमध्ये मत देण्याचा हक्क असणार नाही ; ]

(र) प्रस्ताव संमत झाला आहे अशा अर्थाची अध्यक्ष-प्राधिकाऱ्याने केलेली घोषणा आणि त्या अर्थाची कार्यवृत्त पुस्तकात केलेली नोंद ही, अशी घोषणा करतेवेळी चारांपेक्षा कमी नसतील इतक्या पालिका-सदस्यांनी मतदान घेण्याची मागणी केली नसेल तर, त्या गोष्टीचा निर्णायक पुरावा असेल. मग अशा प्रस्तावांच्या बाजूने किंवा प्रस्तावांविरूद्ध दिलेल्या मतांची संख्या सिद्ध करण्याची आवश्यकता नाही.

(स) मतदान घेण्यात येईल तेव्हा अध्यक्ष-प्राधिकाऱ्याने नेमलेला गणक उपस्थित असलेल्या व प्रस्तावावर मतदान करणाऱ्या प्रत्येक सदस्याचे मत घेईल आणि अनुक्रमे प्रस्तावाच्या बाजूने व प्रस्तावाविरूद्ध मत देणाऱ्या सदस्यांच्या नावांची कार्यवृत्त पुस्तकात नोंद करील.

[५][(ट) पालिका-सदस्यास महानगरपालिकेच्या सभेत उपस्थित राहण्याच्या आणि तेथे होणाऱ्या चर्चेत भाग घेण्याचा जो अधिकार असतो तोच अधिकार आयुक्तास अथवा अनुपस्थितीमुळे किंवा आजारामुळे अथवा इतर कोणत्याही वाजवी कारणामुळे आयुक्तास उपस्थित राहणे शक्य नसेल त्याबाबतीत, उप आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यास असेल आणि त्यास,

---

[१] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम २(क) अन्वये हे “ आठ आणे इतकी फी ” या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक २३, कलम २(पाच) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५(ज) अन्वये खंड (थ) समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (४) अन्वये मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ३(क) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

महापौराच्या परवागीने कोणत्याही वेळी वस्तुस्थितीवषयी निवेदन किंवा स्पष्टीकरण करता येईल. मात्र, त्यास अशा बैठकीत कोणत्याही महत्त्वाच्या प्रस्तावावर मतदान करण्याची किंवा असा प्रस्ताव मांडण्याची मुभा असणार नाही. आयुक्ताची किंवा अशा कोणत्याही अधिकाऱ्यांची एखाद्या सभेत वस्तुस्थितीविषयक निवदेन किंवा स्पष्टीकरण करण्याची इच्छा असेल आणि पूर्वोक्तप्रमाणे परवानगी दिली गेली नसेल त्याबाबतीत, आयुक्तास किंवा अशा कोणत्याही अधिकाऱ्यास त्याची प्रत सभागृहाच्या पटलावर मांडण्याचा हक्क असेल. मात्र महानगरपालिका किंवा महापौर फर्माविल तेव्हा, अनुपस्थिती, आजारपण किंवा इतर कोणतेही वाजवी कारण यामुळे महानगरपालिकेच्या सभेस उपस्थित राहण्यास आयुक्तास प्रतिबंध झाला नसेल तर, आयुक्त स्वतः महानगरपालिकेच्या सभेस उपस्थित राहील ;]

[१][(यू) महानगरपालिकेस, तिच्या कोणत्याही अधिकाऱ्याने आपली कर्तव्ये बजावीत असताना ज्या बाबींवर कार्यवाही केली असेल अशा कोणत्याही बाबीसंबंधीची चर्चा महानगरपालिकेच्या ज्या कोणत्याही बैठकीत किंवा बैठकींमध्ये चालू असेल त्या बैठकीत किंवा बैठकींना हजर राहण्याविषयी अशा अधिकाऱ्यास फर्माविता येईल. कोणत्याही अधिकाऱ्यास याप्रमाणे फर्माविण्यात आले असेल तेव्हा, वस्तुस्थितीविषयी निवेदन किंवा स्पष्टीकरण करण्याविषयी किंवा त्याने कार्यवाही केलेल्या कोणत्याही बाबीसंबंधी त्याच्याजवळ असलेली जी माहिती देण्यास महानगरपालिका त्यास सांगेल ती माहिती पुरवण्याविषयी त्यास महानगरपालिका फर्मावू शकेल.]

[२][(२) आयुक्ताच्या कोणत्याही प्रस्तावास महानगरपालिकेच्या मंजुरीची किंवा मान्यतेची आवश्यकता असेल त्याबाबतीत, महानगरपालिका, नगरपालिका सचिवाकडे तो प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर, महानगरपालिकेच्या लगतच घेण्यात आलेल्या सभेच्या दिनांकापासून नव्वद दिवसांच्या आत असा कोणताही प्रस्ताव विचारात घेईल आणि तो प्रस्ताव निकालात काढील-मग अशा प्रस्तावाशी निगडीत बाब अशा सभेच्या कार्यसूचीवर घेतलेली असो किंवा नसो-तसे न केल्यास, अशा प्रस्तावाला महानगरपालिकेने मंजुरी किंवा मान्यता दिलेली असल्याचे मानण्यात येईल, आणि तशा आशयाचा अहवाल आयुक्ताकडून शासनाला पाठविण्यात येईल ; आणि तो, शासनाच्या निदेशानुसार पुढील कार्यवाही करील :

परंतु, अशी कोणतीही मानीव मंजुरी किंवा मान्यता या अधिनियमाच्या किंवा त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींना अनुरुप असलेल्या प्रस्तावाच्या व्याप्तीपुरतीच मर्यादित असेल.]

सदस्यास निघून जाण्याविषयी आदेश देण्याचा अधिकार.

[३][**३६अ.** (१) [४][अध्यक्ष-प्राधिकारी] सभेत सुव्यवस्था राखील आणि त्यास, त्याच्या मते ज्या पालिका-सदस्याची वर्तणूक अत्यंत गैरशिस्तीची असेल अशा कोणत्याही पालिका-सदस्यास, महानगरपालिकेच्या सभेतून ताबडतोब निघून जाण्याचा निदेश देता येईल. याप्रमाणे निघून जाण्याचा आदेश ज्याला दिलेला आहे. अशा पालिका-सदस्याने ताबडतोब निघून गेले पाहिजे व त्या दिवशीच्या

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५(ह) अन्वये खंड (यू)) समाविष्ट करण्यात आला.
[२] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ३ (ख) अन्वये हे पोट-कलम दाखल करण्यात आले.
[३] सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम ६ अन्वये नवीन कलम ३६अ समाविष्ट करण्यात आले.
[४] सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१, कलम २ (दोन) अन्वये " अध्यक्ष " या शब्दाऐवजी " अध्यक्ष प्राधिकारी " हे शब्द दाखल करण्यात आले.

सभेच्या उरलेल्या अवधीत त्याने अनुपस्थित राहिले पाहिजे. जर कोणत्याही पालिका-सदस्यास १५ दिवसांच्या आत दुसऱ्यांदा निघून जाण्यासाठी आदेश दिला असेल तर, [१][अध्यक्ष-प्राधिकाऱ्यास] पंधरा दिवसांपेक्षा अधिक नसेल अशा कोणत्याही कालावधीकरिता, अशा पालिका-सदस्यास महानगरपालिकेच्या सभेस हजर राहण्यापासून निलंबित करता येईल आणि याप्रमाणे आदेश देण्यात आलेल्या पालिका-सदस्याने त्याप्रमाणे अनुपस्थित राहीले पाहीजे :

परंतु, निलंबनाधीन पालिका-सदस्याने अध्यक्ष-प्राधिकाऱ्याचे समाधान होईल अशा रीतीने माफी मागितली असता [१][अध्यक्ष-प्राधिकारी] त्याच्या निलंबनात सूट देऊ शकेल :

परंतु आणखी असे की, महानगरपालिकेच्या सेवेतून अशा प्रकारे निलंबित करण्यात आल्यामुळे कोणत्याही पालिका-सदस्यास कोणत्याही समितीवर काम करण्यास प्रतिबंध होणार नाही.

(२) सभेमध्ये अतिशय गैरशिस्त निर्माण होईल तेव्हा, [१][अध्यक्ष-प्राधिकाऱ्यास] ती सभा तीन दिवसांहून अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी निलंबित करता येईल.]

[२][**३७.** [३][(१) पोट-कलम (२) च्या तरतुदींच्या अधीन राहून, महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुकीनंतरच्या घेण्यात येणाऱ्या पहिल्या बैठकीत, पालिका सदस्यांमधून एकाची महापौर म्हणून व दुसऱ्यांची उपमहापौर म्हणून निवड करील. महापौर आणि उपमहापौर यांचा पदावधी अडीच वर्ष इतका असेल : महापौर व उपमहापौर.

२००० चा महा. २५. परंतु, महाराष्ट्र महानगपालिका (सुधारणा) अधिनियम, २००० अंमलात आला असल्याच्या दिनांकास पदावर असलेल्या महापौर व उपमहापौर यांचा पदावधी निवडून आलेल्या पालिका सदस्यांच्या पदावधीपर्यंत येईल आणि त्यांच्या पदावधीबरोबरच समाप्त होईल :

परंतु, आणखी असे की, महापौराचे पद आळीपाळीने राखून ठेवण्याच्या नामावलीमध्ये, महापौराच्या या वाढवलेल्या पदावधीच्या दृष्टीने सुधारणा करण्यात आली असल्याचे मानण्यात येईल.]

(२) महानगरपालिकेतील महापौर पद अनुसूचित जाती, अनसूचित जमाती, स्त्रिया आणि नागरिकांचा मागासवर्ग यांच्यासाठी विहित रीतीने आळीपाळीने राखून ठेवण्यात येईल.

[४][(२अ) अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती किंवा, यथास्थिती, नागरिकांचा मागासवर्ग यांच्याकरिता राखीव असलेल्या महापौरांच्या पदासाठी निवडणूक लढविण्यास इच्छुक असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, नामनिर्देशनपत्राबरोबर, महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, २००१ चा महा. २३. इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग (जातीचे प्रमाणपत्र देण्याचे व त्याच्या पडताळणीचे विनियमन) अधिनियम, २००० यांच्या तरतुदींना अनुसरून सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र व पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असेल :]

---

[१] सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१, कलम २ (दोन) अन्वये " अध्यक्ष " या शब्दाऐवजी " अध्यक्ष प्राधिकारी " हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ६ अन्वये कलम ३७ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[३] सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[४] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम २ अन्वये पोट-कलम (२-अ) समाविष्ट करण्यात आले.

[१][“परंतु, महापौर पदाच्या निवडणुकीसाठी शेवटचा दिनांक ३१ डिसेंबर २०१७ किंवा त्यापूर्वीचा असेल, त्याबाबतीत, जिने नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकापूर्वी, आपल्या जातीच्या प्रमाणपत्राच्या पडताळणीसाठी पडताळणी समितीकडे अर्ज केलेला असेल परंतु नामनिर्देशनपत्र भरण्याच्या दिनांकाला जिला वैधता प्रमाणपत्र मिळलेले नसेल अशी व्यक्ती, नामनिर्देशन पत्रासोबत,–

(एक) वैधता प्रमाणपत्र देण्यासाठी तिने पडताळणी समितीकडे सादर केलेल्या अर्जाची सत्य प्रत किंवा पडताळणी समितीकडे तिने असा अर्ज केला असल्याबद्दलचा अन्य कोणताही पुरावा ; आणि

(दोन) ती निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत, पडताळणी समितीने दिलेले वैधता प्रमाणपत्र ती सादर करील याबद्दलचे हमीपत्र, सादर करीलः परंतु आणखी असे की, त्या व्यक्तीने, ती निवडून आल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या मुदतीत वैधता प्रमाणपत्र सादर करण्यात कसूर केल्यास, तिची निवड भूतलक्षी प्रभावाने रद्द झाली असल्याचे मानण्यात येईल आणि ती महापौर राहण्यास निरर्ह ठरेल.”]

(३) पोट-कलम (१) अन्वये, जोपर्यंत नवीन महापौर व नवीन उपमहापौर निवडण्यात येत नाहीत तोवर महापौर व उपमहापौर आपले पद धारण करतील आणि काहीही असले तरी ज्या वर्षात सार्वत्रिक निवडणुका घेण्यात येतील अशा वर्षामध्ये निवडणुकीत पालिका-सदस्य म्हणून निवडून येता आले नाही तरीही त्यांना तसे करता येईल.

(४) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९९९ याच्या प्रारंभाच्या दिनांकाला महापौर पदावर असणाऱ्या महापौराचा पदावधी अशा दिनांकाला संपल्याचे मानण्यात येईल आणि तो आपले पद उक्त दिनांकाला रिक्त करेल. अगोदर पदावर असणाऱ्या महापौराने अशा प्रकारे पद रिक्त केल्यानंतर नवीन महापौराच्या निवडणुकीच्या प्रयोजनांसाठी उक्त दिनांकाच्या नंतरची पहिली बैठक आयुक्ताकडून उक्त दिनांकापासून सात दिवसांच्या कालावधीत घेण्यात येईल आणि या अधिनियमाच्या अशा निवडणुकीशी संबंधित असलेल्या इतर सर्व तरतुदी योग्य त्या फेरफारांसह लागू होतील : १९९९ चा महा. २७.

परंतु, उक्त दिनांकाअगोदर महापौर पदावर असणारी व्यक्ती नवीन महापौर पदावर येईपर्यंत त्या पदावर असण्याचे चालू राहील.

(५) निवृत्त होणारा महापौर किंवा उपमहापौर त्यापैकी कोणत्याही पदाच्या पुन्हा होणाऱ्या निवडणुकीसाठी पात्रता प्राप्त असेल.

(६) उप महापौराला कोणत्याही वेळी महापौराकडे लेखी सूचना देऊन आपल्या पदाचा राजीनामा देता येईल आणि महापौराला कोणत्याही वेळी महापालिकेकडे लेखी सूचना देऊन आपल्या पदाचा राजीनामा देता येईल.

(७) महापौराचे किंवा उपमहापौराचे पद नैमित्तिकरीत्या रिक्त झाल्यास महानगरपालिका असे पद रिक्त झाल्यापासून सोईस्कर होईल इतक्या लवकरात लवकर आपल्या सदस्यांमधून एकाची निवड करून असे रिक्त पद भरेल. अशा रीतीने निवडण्यात आलेला प्रत्येक महापौर किंवा उपमहापौर ज्या व्यक्तीच्या जागी पद धारण करीत असेल त्या व्यक्तीने पद रिक्त झाले नसते तर जोपर्यंत अधिकार पद धारण केले असते तोपर्यंतच ते अधिकारपद धारण करील.]

[२][(८) जर महापौर किंवा उपमहापौर या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये केल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या लागोपाठ दोन सभा बोलावण्यात कसूर करील तर, त्याला राज्य शासन पदावरून दूर करू शकेल, आणि अशारीतीने दूर केलेला महापौर किंवा उपमहापौर, त्याच्या पदाच्या उर्वरित कालावधीत, महापौर किंवा, यथास्थिति, उप महापौर म्हणून पुन्हा निवडून येण्यास किंवा पुर्ननियुक्ती केली जाण्यास पात्र असणार नाही :

परंतु, अशा महापौराला किंवा उपमहापौराला आपले स्पष्टीकरण सादर करण्याची वाजवी संधी देण्यात आल्याखेरीज त्याला पदावरून दूर करण्यात येणार नाही :

परंतु, आणखी असे की, या पोट-कलमान्वये महापौर किंवा उप महापौर याला पदावरून दूर केल्यामुळे त्याच्या पदाच्या उर्वरित कालावधीत तो पालिका-सदस्य म्हणून असण्याचे चालू राहण्यास बाधा येणार नाही.]

---

[१] सन २०१५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ३ अन्वये ही परंतुके जादा दाखल करण्यात आली.

[२] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ४ अन्वये पोट-कलम (८) जादा दाखल करण्यात आले.

[१][**३७-१अ.** (१) सर्वात जास्त संख्याबळ असलेल्या आणि ज्यास महापौराकडून तशी मान्यता देण्यात आलेली असेल अशा विरोधी पक्षाचा त्या त्या वेळी नेता असलेला महानगरपालिकेचा निर्वाचित सदस्य हा विरोधी पक्षनेता असेल. विरोधी पक्ष नेता.

**स्पष्टीकरण.—**जेव्हा समान संख्याबळ असलेले दोन किंवा अधिक विरोधी पक्ष असतील तेव्हा महापौर, पक्षाचे स्थान लक्षात घेऊन, या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, अशा पक्षांच्या नेत्यापैकी कोणत्याही एका नेत्यास विरोधी पक्षनेता म्हणून मान्यता देईल आणि अशी मान्यता ही अंतिम व निर्णायक असेल.

(२) विरोधी पक्ष नेत्याला महानगरपालिकेकडून या बाबतीत करण्यात आलेल्या विनियमांद्वारे तरतूद करण्यात येईल असे मानधन व भत्ते आणि इतर सुविधा देण्यात येतील.]

[२][**३७-एक-अ-१.** (१) जो निर्वाचित पालिका-सदस्य मोठे संख्या बळ असलेल्या पक्षाचा त्यावेळी नेता असेल, आणि महापौराकडून ज्याला तशी मान्यता मिळाली असेल, तो सभागृहातच नेता असेल. सभागृहाचा नेता.

**स्पष्टीकरण**.— जेव्हा एक समान संख्याबळ असलेले दोन सत्ताधारी पक्ष असतील तेव्हा, महापौर, पक्षाचा दर्जा लक्षात घेऊन अशा पक्षामधून कोणत्याही एका पक्षातील नेत्याला सभागृहाचा नेता म्हणून मान्यता देईल.

(२) सभागृहाच्या नेत्याला मानधन, भत्ते व इतर सुविधा देण्याबाबत महानगरपालिकेने केलेल्या विनियमांद्वारे तरतूद केल्यानुसार मानधन, भत्ते व इतर सुविधा देण्यात येतील.]

### [३][**मानधन, फी व भत्ते**

**३७अ.** (१) राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने, महानगरपालिकेला ती या कलमाखाली केलेल्या नियमांद्वारे विहित करील असे मानधन, फी किंवा इतर भत्ते [४][महापौर किंवा उपमहापौर], प्रत्येक पालिका-सदस्यास देता येतील : मानधन, फी किंवा भत्ते.

[५][परंतु, शिक्षण समितीच्या पालिका सदस्येतर सदस्यांना मानधन व बैठक भत्ता यांऐवजी प्रतिदिनी शंभर रुपये एवढी फी देण्यात येईल, व अशा फीची रक्कम दरमहा चारशे रुपयांहून अधिक होणार नाही.]

(२) [६][महानगरपालिका दरसाल महापौराकडे, [७]* * * राज्य शासन, वेळोवेळी आदेशाद्वारे निर्धारित करील अशी रक्कम आतिथ्य भत्ता म्हणून सुपूर्द करील.]

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ७ अन्वये कलम ३७ एक-अ ते ३७-ई ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[२] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २ अन्वये हे शीर्षक आणि कलम ३७अ समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ८(अ)(एक) अन्वये " महानगरपालिकेच्या अध्यक्षास, उपाध्यक्षास, महापौरास, उप महापौरास, महापौरासह परिषदेतील सदस्यास आणि " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ८(अ)(दोन) अन्वये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[६] सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम २ अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[७] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ८ (ब) अन्वये " महानगरपालिकेचा अध्यक्ष आणि उपाध्यक्ष " हा मजकूर वगळण्यात आला.

(३) कलम १६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी पालिका-सदस्यास उपरिनिर्दिष्ट मानधन, फी अगर भत्ता मिळत आहे म्हणून अशी कोणतीही व्यक्ती पालिका-सदस्य म्हणून निवडून येण्यास किंवा पालिका-सदस्य असण्यास निरर्ह ठरणार नाही.]

[१][* * * *]

## समित्या

विशेष प्रयोजनासाठी संमंत्रक समित्या नेमणे.

***३८.** महानगरपालिकेस, वेळोवेळी [२][या संबंधात तयार करण्यात आलेल्या विनियमांद्वारे घालून दिल्याप्रमाणे] आपल्या सदस्यांपैकी तिला योग्य वाटतील इतके सदस्य असलेल्या, तिला योग्य वाटतील अशा आणि तिला योग्य वाटतील तितक्या समित्या नेमता येतील. या अधिनियमाच्या प्रयोजनांशी संबंध असलेले तिला योग्य वाटतील असे खास विषय, त्यासंबंधात चौकशी करून अहवाल सादर करण्यासाठी किंवा त्याबाबत अभिप्राय देण्यासाठी अशा समित्यांकडे निर्देशित करता येतील.

---

[१] सन १९९७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ९ अन्वये 'कलम ३७ब' वगळण्यात आले.

[२] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

*सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २६ पुढीलप्रमाणे वाचावे :—

समित्यांची पुनर्रचना.

**२६.** महानगरपालिकेच्या किंवा यथास्थिती, नगरपरिषदेच्या वेगवेगळ्या समित्यांवरील सदस्यांची संख्या, संबंधित नगरपालिका कायद्यांमध्ये केलेल्या सुधारणांच्या आधारे वाढविण्यात आली असेल त्याबाबतीत, जमेल तितक्या लवकर, तिच्या वाढीव सदस्यसंख्येचा समावेश असलेल्या समित्यांची पुनर्रचना करण्यात येईल, आणि संबंधित नगरपालिका कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी,—

(अ) वाढीव सदस्यसंख्येच्या अनुरोधाने असे सदस्य म्हणून पद धारण करणाऱ्या सदस्यांचा पदावधी, पूर्वी म्हटल्याप्रमाणे समितीच्या पुनर्रचनेच्या दिनांकास तिचा असा सदस्य म्हणून पद धारण करणाऱ्या सदस्यांच्या पदावधीच्या समाप्तीबरोबरच समाप्त होईल ;

(ब) कोणत्याही समितीची कोणतीही कृती किंवा कार्यवाही ही, वाढीव जागांवरील कोणतेही सदस्य, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास सुरू होणाऱ्या व समितीच्या पुनर्रचनेच्या दिनांकास संपणाऱ्या कालावधीत पद धारण करण्यासाठी उपलब्ध नव्हते याच केवळ कारणामुळे अवैध असल्याचे समजण्यात येणार नाही ; आणि

(क) केवळ पूर्वोक्त कारणावरून कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही प्राधिकरणापुढे किंवा अधिकाऱ्यापुढे अशा कृतीच्या किंवा कार्यवाहीच्या वैधतेस हरकत घेता येणार नाही.

**स्पष्टीकरण.—**" संबंधित नगरपालिका कायदा " म्हणजे,—

(अ) बृहन्मुंबई महानगरपालिकेच्याबाबतीत, मुंबई महानगरपालिका अधिनियम ; १८८८ चा मुंबई ३.

(ब) नागपूर शहर महानगरपालिकेच्याबाबतीत, नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ ; १९५० चा मध्यप्रांत व वऱ्हाड २.

(क) अन्य कोणत्याही शहराच्या महानगरपालिकेच्या बाबतीत, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ ; १९४९ चा मुंबई ५९.

(ड) नगरपरिषदेच्याबाबतीत, महाराष्ट्र नगरपालिका अधिनियम, १९६५." १९६५ चा महाराष्ट्र ४०.

[1][**३८अ.** (१) महानगरपालिकेस वेळोवेळी आपल्या सदस्यांमधून महिला व बालकल्याण समितीसह विशेष समित्या नेमता येतील. तसेच तिला, आपल्या बैठकीत हजर असलेल्या सदस्यांपैकी निदान दोन तृतीयांश सदस्यांनी मत देऊन संमत केलेल्या विशिष्ट ठरावाद्वारे अशा समित्यांकडे आपले कोणतेही अधिकार व कर्तव्ये प्रत्यायोजित करता येतील; तसेच, तत्सम ठरावाद्वारे याप्रमाणे नेमण्यात आलेल्या प्रत्येक विशेष समितीच्या कामकाजाचे क्षेत्र ठरविता येईल व ती, कामाच्या अशा कोणत्याही क्षेत्रात समाविष्ट होणाऱ्या सर्व बाबी व प्रश्न पहिल्याप्रथम समुचित समितीपुढे ठेवले पाहिजेत व ते अशा समितीच्या शिफारशींसह महानगरपालिकेस सादर केले पाहिजेत असा निदेश देऊ शकेल.

महानगरपालिकेच्या विशेष समित्या.

(१-अ) महिला व बालकल्याण समितीवर, त्यातील सदस्यांपैकी पंच्याहत्तर टक्क्यांपेक्षा कमी नसतील असे सदस्य हे महिला पालिका सदस्यांमधील असतील.

**स्पष्टीकरण**.—सदस्यांची पंच्याहत्तर टक्के संख्या मोजण्याच्या प्रयोजनासाठी कोणताही अपूर्णांक असल्यास तो पूर्णांकात धरण्यात येईल.

(२) प्रत्येक विशेष समिती, महानगरपालिका तिला वेळोवेळी जे अनुदेश देईल त्यांचे पालन करील.

(३) महानगरपालिकेस कोणत्याही वेळी कोणतीही विशेष समिती विसर्जित करता येईल किंवा या बाबतीत तिने केलेल्या कोणत्याही नियमांना अधीन राहून कोणत्याही विशेष समितीच्या रचनेत फेरफार करता येतील.

(४) प्रत्येक विशेष समिती आपल्या सदस्यांपैकी दोन सदस्यांची सभापती व उप सभापती म्हणून नेमणूक करील :

परंतु, कोणताही सदस्य एकाच वेळी एकापेक्षा अधिक विशेष समित्यांचा सभापती असणार नाही :

परंतु आणखी असे की, महिला व बालकल्याण समितीवरील अध्यक्षा व उपाध्यक्षा, या त्यातील महिला पालिका सदस्यांमधील असतील.

(५) सभापतीच्या किंवा उप सभापतीच्या अनुपस्थितीत विशेष समितीचे जे सदस्य बैठकीत उपस्थित असतील ते आपल्यापैकी एकाची बैठकीच्या अध्यक्षस्थानी निवड करतील.

(६) प्रत्येक विशेष समितीचे सर्व कामकाज महानगरपालिकेने कायम करण्याच्या अधीन असेल :

परंतु, कोणत्याही विशेष समितीस आपल्या निर्णयानुसार कार्यवाही करण्यास विलंब झाल्यास त्यामुळे गंभीर गैरसोय होईल असे वाटत असेल तर, तिला आपले कामकाज महानगरपालिकेने कायम करण्याची वाट न पाहता अशी कार्यवाही करण्यात यावी, असा निदेश एकूण सदस्यांपैकी किमान निम्म्या सदस्यांनी पाठिंबा दिलेल्या ठरावाद्वारे देता येईल; मात्र, महानगरपालिकेने विशेष समितीचे कामकाज कायम न केल्यास महानगरपालिकेने दिलेले कोणतेही आदेश पार पाडण्यासाठी त्यावेळी व्यवहार्य असेल अशी कार्यवाही करण्यात येईल :

---

[1] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १० अन्वये कलम ३८-अ ऐवजी ही कलमे नव्याने दाखल करण्यात आली.

परंतु आणखी असे की, आपले कोणतेही अधिकार किंवा कर्तव्ये पोट-कलम (१) खाली विशेष समितीकडे सोपविताना, महानगरपालिकेने, अशा समितीचा निर्णय अंतिम असावा असा निदेश दिला असेल तर, अशा अधिकारांशी व कर्तव्यांशी संबंधित असणारे अशा समितीचे जे कामकाज असेल ते महानगरपालिकेने कायम करण्याच्या अधीन असणार नाही, मात्र अशा निर्णयास अशा समितीच्या एकूण सदस्यांपैकी किमान निम्म्या सदस्यांनी पाठिंबा दिलेला असला पाहिजे.

(७) महानगरपालिकेस, विशेष समित्यांची रचना व अशा समित्यांच्या बैठकीत कामकाज चालविणे, कार्यवृत्ते ठेवणे व अहवाल सादर करणे या गोष्टींचे विनियमन करण्यासाठी नियम करता येतील.

स्थायी समिती, सुधार समिती किंवा शिक्षण समिती यांच्या विशेष समित्या.

**३८ब.** स्थायी समिती, सुधार समिती किंवा शिक्षण समिती यांना आपल्या बैठकीत हजर असलेल्या सदस्यांपैकी किमान दोन-तृतीयांश इतक्या सदस्यांनी मतदान करून संमत केलेल्या ठरावाद्वारे कलम ३८-अ खाली नेमण्यात आलेल्या कोणत्याही विशेष समितीकडे जी कोणतीही बाब निकालात काढण्यासाठी अशी विशेष समिती सक्षम असेल ती बाब निकालात काढण्यासाठी आपले कोणतेही अधिकार व कर्तव्ये प्रत्यायोजित करता येतील किंवा कोणतीही बाब निकालात काढण्यासाठी किंवा त्यासंबंधी अहवाल देण्यासाठी ती अशा कोणत्याही समितीकडे सोपविता येतील. तसेच अशी प्रत्येक विशेष समिती याबाबतीत तिला, यथास्थिति, स्थायी समिती, सुधार समिती किंवा शिक्षण समिती वेळोवेळी जे अनुदेश देईल त्यांचे पालन करील :

परंतु, यथास्थिति, स्थायी समिती, सुधार समिती किंवा शिक्षण समिती असा प्रत्येक ठराव शक्य तितक्या लवकर, महानगरपालिकेस कळवील आणि महानगरपालिकेला कोणत्याही वेळी, असा ठराव रद्द करता येईल.

सुधार समितीने उप समित्या नेमणे.

**३८क.** सुधार समितीस आपल्या सदस्यांमधून तिला योग्य वाटेल इतकी संख्या असलेल्या व्यक्तींनी मिळून बनलेल्या उप समित्या नेमता येतील आणि सुधार समिती या अधिनियमाच्या तरतुदीखाली जी कोणतीही बाब हाताळण्यास सक्षम असेल अशी कोणतीही बाब अशा समितीकडे, तिने चौकशी करून अहवाल पाठवण्यासाठी किंवा अभिप्राय देण्यासाठी निदेशित करता येईल.

प्राथमिक शिक्षण संमंत्रक समिती नेमणे.

**३९.** (१) महानगरपालिकेस प्राथमिक शिक्षण संमंत्रक समिती नेमता येईल.

(२) अशा समितीची नेमणूक महानगरपालिकेस स्वतः किंवा राज्य शासनाशी विचारविनिमय करून करता येईल.

(३) अशा समितीची रचना ही, कलम ४६१ खाली केलेल्या उपविधीअन्वये तरतूद केल्याप्रमाणे असेल.

(४) महानगरपालिकेस, राज्य शासनाशी याबाबत कोणताही करार करून, कलम ६१, खंड (क्यू) च्या प्रयोजनांशी संबंधित असलेला कोणताही प्रश्न अशा समितीकडे तिने त्यासंबंधी चौकशी करून अहवाल पाठविण्यासाठी किंवा त्यावर अभिप्राय देण्यासाठी पाठविता येईल.

इतर शैक्षणिक प्रयोजनांसाठी समिती नेमणे.

**४०.** महानगरपालिकेस, माध्यमिक शिक्षणाच्या किंवा तंत्र शिक्षणाच्या अथवा इतर शिक्षणाच्या कोणत्याही शाखेच्या पुरःसरणासाठी करावयाच्या उपाययोजना आणि व्यवस्था अंमलात आणण्यासाठी कलम ४६१ खाली केलेल्या कोणत्याही उपविधीद्वारे निर्धारित करण्यात येईल त्याप्रमाणे समिती नेमता येईल किंवा ती नेमण्याच्या कामात सहभागी होता येईल, आणि अशी समिती ज्या शिक्षण शाखेसाठी व परिसंस्थांसाठी नेमण्यात आली असेल त्या शिक्षण शाखेच्या व परिसंस्थांच्या संबंधात अशा समितीला (शिक्षण समितीला) जे अधिकार व कर्तव्ये अधिनियमात

नेमून देण्यात आली असतील तेच अधिकार व तीच कर्तव्ये, उक्त कलमाखाली केलेल्या कोणत्याही उपविधीअन्वये त्यात जे फेरफार करण्यात येतील ते खेरीज करून असतील.

रुग्णालय समितीची नेमणूक.

**४१.** महानगरपालिका स्वतः होऊन किंवा राज्य शासनाच्या सहमतीने, महानगरपालिकेमध्ये पूर्णतः किंवा अंशतः निहित होणारी आणि तिच्या निधीतून ज्यांचा खर्च चालत असेल अशी किंवा तिचे अनुदान मिळणारी जी रुग्णालये व ज्या परिसंस्था वृद्ध, आजारी आणि दुर्बल व्यक्तींच्या हितासाठी असतील अशा रुग्णालयांच्या किंवा परिसंस्थांच्या संबंधात, कलम ४६१ खाली केलेल्या उपविधीअन्वये किंवा राज्य शासनाशी केलेल्या कोणत्याही कराराद्वारे निरूपित केल्याप्रमाणे किंवा तरतूद केल्याप्रमाणे रचना, अधिकार व कर्तव्ये असलेल्या एका रुग्णालय समितीची नेमणूक करू शकेल.

स्थायी समितीची रचना.

**४२.** स्थायी समिती सत्तावीस सदस्यांची मिळून बनलेली असेल.

स्थायी समितीच्या सदस्यांची नेमणूक केव्हा करावी.

**४३.** (१) महानगरपालिका, सार्वत्रिक निवडणुकांनंतर एप्रिल महिन्यातील आपल्या पहिल्या बैठकीत आपल्या सदस्यांमधून सव्वीस व्यक्ती स्थायी समितीचे सदस्य म्हणून नेमील.

(२) शिक्षण समितीचा सभापती हा, स्थायी समितीचासुद्धा सदस्य असेल.

स्थायी समितीच्या सभापतीची नेमणूक.

**४४.** (१) स्थायी समिती, प्रत्येक सरकारी वर्षातील आपल्या पहिल्या बैठकीत आपल्या सदस्यांपैकी एकाची स्थायी समितीच्या लगतपुढील सरकारी वर्षातील पहिल्या बैठकीपर्यंत, सभापती म्हणून नेमणूक करील.

(२) स्थायी समितीचा जो सदस्य सभापती म्हणून असणे बंद होईल तो पुन्हा पात्रताप्राप्त असेल.

(३) सभापतीचे अधिकारपद कोणत्याही वेळी नैमित्तिकरित्या रिकामे झाल्यास, स्थायी समिती असे अधिकारपद रिकामे झाल्यानंतर, सोईस्करपणे शक्य होईल तितक्या लवकर, अशी रिकामी जागा भरण्यासाठी आपल्या सदस्यांपैकी एकाची निवड करील आणि याप्रमाणे निवडण्यात आलेला प्रत्येक सभापती हा, ज्या व्यक्तीच्या जागी त्याला नेमण्यात आले असेल त्या व्यक्तीने, ती जागा रिकामी झाली नसती तर जोवर अधिकारपद धारण केले असेल तोवर अधिकारपदावर राहील.

स्थायी समितीच्या सदस्यांनी आळीपाळीने सेवानिवृत्त होणे.

**४५.** (अ) स्थायी समितीच्या सदस्यांपैकी निम्मे सदस्य प्रत्येक वर्षी १ एप्रिल रोजी मध्यान्ही सेवानिवृत्त होतील.

(ब) कलम ४३ खाली स्थायी समितीची रचना करण्यात आल्यानंतर एक वर्षानंतर कोणते सदस्य सेवानिवृत्त झाले पाहिजेत, हे सभापती निकटपूर्वीच्या १ मार्च पूर्वी निर्धारित करील अशा वेळी व अशा रीतीने चिठ्ठ्या टाकून ठरविण्यात येईल.

(क) त्यानंतरच्या वर्षात, स्थायी समितीचे जे सदस्य आपल्या अधिकारपदावर सर्वाधिक काळ असतील ते या कलमाखाली सेवानिवृत्त होतील :

परंतु, [१][पुन्हा नियुक्त केलेल्या] सदस्यांच्या बाबतीत, या खंडाच्या प्रयोजनाकरिता त्याचा पदावधी त्याच्या [२][पुनर्नियुक्तीच्या] तारखेपासून मोजण्यात येईल.

(ड) शिक्षण समितीच्या सभापतीचा स्थायी समितीचा सदस्य म्हणून असलेला पदावधी तो असा सभापती असण्याचे चालू असेल तोवर चालू राहील.

स्थायी समितीचे जे सदस्य सेवानिवृत्त होतील त्यांच्या जागी सदस्य नेमणे.

**४६.** (१) महानगरपालिका मार्च महिन्यातील आपल्या सामान्य बैठकीत, तिने पूर्वी नेमलेल्या सदस्यांपैकी जे सदस्य वर सांगितल्याप्रमाणे वेळोवेळी सेवानिवृत्त होणार असतील अशा सदस्यांची अधिकारपदे भरण्यासाठी स्थायी समितीच्या नवीन सदस्यांची नेमणूक करील.

---

[१] सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २ (एक) अन्वये "पुन्हा निवडून आलेल्या" या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २ (दोन) अन्वये "फेर निवडणुकीच्या" या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

(२) जो कोणताही पालिका-सदस्य स्थायी समितीचा सदस्य असण्याचे बंद होईल तो पुन्हा पात्रताप्राप्त असेल.

स्थायी समितीच्या बैठकींना तीन महिन्यांच्या काळात अनुपस्थित राहणाऱ्या सदस्याने जागा रिकामी करणे.

**४६अ.** स्थायी समितीचा जो कोणताही सदस्य तात्पुरता आजार किंवा समिती मान्य करील असे कारण सोडून इतर कारणांमुळे लागोपाठ तीन महिन्यांच्याकाळात समितीच्या बैठकींना अनुपस्थित राहील अथवा कोणत्याही कारणामुळे—मग ते समितीने मान्य केलेले असो वा नसो -लागोपाठ आठ महिन्यांच्या काळात समितीच्या बैठकींना अनुपस्थित राहील किंवा उपस्थित राहण्यास असमर्थ होईल तो स्थायी समितीचा सदस्य म्हणून असण्याचे बंद होईल आणि लागोलाग त्याची जागा रिकामी होईल.

स्थायी समितीतील नैमित्तिक रिकाम्या जागा कशा भराव्या.

**४७.** स्थायी समितीचा सदस्य म्हणून नेमलेल्या पालिका-सदस्याने अधिकारपद न स्वीकारल्यास किंवा उक्त समितीचा सदस्य आपला पदावधी संपण्यापूर्वी मरण पावला असेल, त्याने राजीनामा दिला असेल, तो निरर्ह झाला असेल किंवा तो काम करण्यास असमर्थ झाला असेल किंवा कलम ४६-अ खाली त्याची जागा रिकामी झाली असेल त्याप्रसंगी रिकामी झालेली जागा, त्या जागी एखाद्या व्यक्तीची नेमणूक करून सोईस्करपणे शक्य तितक्या लवकर भरण्यात येईल, आणि अशी व्यक्ती ज्या व्यक्तीच्या जागी ती नेमण्यात आली असेल त्या व्यक्तीस ती जागा रिकामी झाली नसती तर जोवर अधिकारपद धारण करण्याचा हक्क असता तोवरच सदस्य म्हणून अधिकारपद धारण करील.

नवीन समितीची नेमणूक होईपर्यंत प्रत्येक स्थायी समिती अधिकारपदावर असण्याचे चालू राहणे.

**४८.** पालिका सदस्य सेवानिवृत्त होण्याच्या दिवशी अस्तित्वात असलेली स्थायी समिती ही कलम ४३ खाली नवीन स्थायी समितीची नेमणूक होईतोपर्यंत, उक्त समितीचे सदस्य किंवा त्यांच्यापैकी काही सदस्य हे त्यानंतर पालिका-सदस्य म्हणून राहणार नसले तरीही अधिकारपद धारण करण्याचे चालू ठेवील.

स्थायी समितीच्या कामकाजाचे विनियमन करण्यासंबंधी तरतुदी.

**४९.** कामकाज चालविण्यासाठी, महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात स्थायी समितीची बैठक भरेल आणि स्थायी समितीस पुढील शक्तींच्या अधीनतेने, अशा बैठकींच्या संबंधी आणि महानगरपालिकेच्या हिशेबाचे परिनिरीक्षण करण्यासंबंधी तिला योग्य वाटतील असे विनियम वेळोवेळी करता येतील, त्या शर्ती अशा :—

(अ) स्थायी समितीची बैठक आठवड्यातून एकदा आणि आवश्यक वाटेल अशा इतर वेळी घेण्यात येईल ;

(ब) प्रत्येक स्थायी समितीची पहिली बैठक आयुक्त निश्चित करील त्या दिवशी व त्यावेळी घेण्यात येईल, आणि त्या दिवशी घेतली गेली नाही तर आयुक्त निश्चित करील अशा नंतरच्या कोणत्याही दिवशी घेण्यात येईल ; आणि स्थायी समितीची त्यानंतरची प्रत्येक सभा उक्त समिती वेळोवेळी निर्धारित करील अशा दिवशी आणि अशा वेळी घेण्यात येईल ;

(क) आयुक्ताच्या मते जे कोणतेही काम स्थायी समितीच्या पुढील सामान्य बैठकीपर्यंत लांबणीवर टाकता येणार नसेल असे कामकाज पार पाडण्यासाठी स्थायी समितीचा सभापती आयुक्ताने सही केलेल्या लेखी मागणीवरून चोवीस तासांच्या आत उक्त समितीची विशेष बैठक बोलावील ;

(ड) स्थायी समितीच्या बैठकीत अशा बैठकीच्या सुरुवातीपासून अखेरपर्यंत किमान नऊ सदस्य उपस्थित असल्याखेरीज कोणतेही काम चालवता येणार नाही ;

(ई) स्थायी समितीच्या प्रत्येक बैठकीत, जर ती बैठक घेण्याकरिता नेमलेल्या वेळी सभापती उपस्थित असेल तर, सभापती अध्यक्षस्थानी राहील आणि सभापती अनुपस्थित असेल तर, उपस्थित असलेल्या सदस्यांतून बैठकीने त्या वेळेसाठी सभापती म्हणून निवडलेला एक सदस्य अध्यक्षस्थानी राहील ;

(फ) प्रत्येक प्रश्नाचा निर्णय स्थायी समितीच्या उपस्थित असलेल्या व त्या प्रश्नावर मतदान करणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने करण्यात येईल आणि समसमान मते पडतील तेव्हा पीठासीन-प्राधिकाऱ्यास दुसरे किंवा निर्णायक मत देता येईल ;

(ग) कलम ४६१, खंड (ट) खाली याबाबत केलेल्या कोणत्याही उप-विधीच्या अधीनतेने, स्थायी समितीस वेळोवेळी, याबाबत केलेल्या विनिर्दिष्ट ठरावान्वये अशा प्रत्येक उप-समितीस तीनपेक्षा कमी नसतील इतके तिला योग्य वाटतील असे सदस्य मिळून बनणाऱ्या उप-समित्यांकडे आपले कोणतेही अधिकार किंवा कर्तव्ये प्रत्यायोजित करता येतील ; आणि याप्रमाणे तयार केलेली कोणतीही उप-समिती स्थायी समितीकडून तिला वेळोवेळी देण्यात येतील अशा कोणत्याही अनुदेशांचे पालन करील आणि उक्त समितीला याप्रमाणे तयार केलेली कोणतीही उप-समिती कोणत्याही वेळी बंद करता येईल किंवा तिच्या रचनेत फेरफार करता येतील ;

(ह) उप-समितीला आपल्या बैठकींसाठी सभापती निवडून देता येईल आणि जर असा कोणताही सभापती निवडून देण्यात आलेला नसेल किंवा जर कोणतीही सभा घेण्याकरिता नेमलेल्या वेळी तो उपस्थित नसेल तर, उप समितीचे उपस्थित सदस्य, आपल्यापैकी एक सदस्य अशा बैठकीचा सभापती म्हणून निवडतील ;

(ज) उप-समित्यांना योग्य वाटेल त्याप्रमाणे सभा भरविता आणि ती तहकूब करता येईल. मात्र स्थायी समितीच्या सभापतीस, जेव्हा तेव्हा योग्य वाटेल तेव्हा तेव्हा, अशा उप-समितीची विशेष सभा बोलविता येईल व उप-समितीच्या दोनपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी लेखी विनंती केली असता, तो अशा उप-समितीची विशेष सभा बोलावील ;

(के) उप-समितीच्या कोणत्याही बैठकीतील प्रश्नांचा निर्णय हजर असलेल्या सदस्यांच्या बहुमताने करण्यात येईल आणि मते समसमान पडतील त्या प्रसंगी बैठकीच्या सभापतीला दुसरे किंवा निर्णायक मत देता येईल. मात्र अशा कोणत्याही बैठकीत, तिच्या सुरुवातीपासून अखेरपर्यंत, उप-समितीच्या सदस्यांपैकी किमान दोन-तृतीयांश सदस्य उपस्थित असल्याखेरीज कोणतेही काम चालविता येणार नाही ;

(ल) महानगरपालिका सचिव, स्थायी समितीच्या प्रत्येक बैठकीत व उप-समितीच्या प्रत्येक बैठकीत उपस्थित असलेल्या सदस्यांची नावे असलेले व त्या बैठकीतील कामकाजाचे कार्यवृत्त, या प्रयोजनासाठी तरतूद केलेल्या कार्यवृत्त पुस्तकात ठेवील, आणि आगामी बैठकीत त्या बैठकीचा पीठासीन-प्राधिकारी त्यावर सही करील ;

(म) ज्या बाबीमध्ये स्थायी समितीच्या सदस्याचा प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे, स्वतःचा किंवा आपल्या भागिदारामार्फत कलम १६, खंड (ग) ते (ल), दोन्ही धरून, यात वर्णन केलेल्या प्रकारचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध अथवा अशिलांच्या, प्रकर्त्यांच्या किंवा इतर व्यक्तींच्या वतीने व्यावसायिक हितसंबंध असेल अशा उक्त समितीपुढे किंवा कोणत्याही उप समितीपुढे असलेल्या कोणत्याही बाबीच्या चर्चेत अशा सदस्याला मत देता येणार नाही किंवा कोणत्याही बाबीवरील चर्चेत भाग घेता येणार नाही.

(न) आयुक्तास किंवा आयुक्त आजारामुळे अथवा कोणत्याही इतर ज्या काही वाजवी कारणामुळे उपस्थित राहू शकणार नसेल त्या बाबतीत, संचालकास किंवा उप आयुक्तास स्थायी समितीच्या बैठकीत उपस्थित राहण्याचा व तीत होणाऱ्या चर्चेत भाग घेण्याचा उक्त समितीच्या सदस्याप्रमाणेच हक्क असेल, मात्र त्यास अशा बैठकीत कोणत्याही प्रस्तावावर मत देण्याची किंवा असा प्रस्ताव मांडण्याची मुभा असणार नाही ; पण स्थायी समिती किंवा त्या समितीचा सभापती फर्मावील तेव्हा अनुपस्थिती, आजारपण किंवा इतर कोणतेही वाजवी कारण यामुळे स्थायी समितीच्या बैठकीस उपस्थित राहण्यास आयुक्तास प्रतिबंध झाला नसेल तर, आयुक्त,स्थायी समितीच्या बैठकीत स्वतः उपस्थित राहील.

शहराची सुधारणा पार पाडण्यासाठी सुधार समितीची रचना करणे.

**४९अ.** महानगरपालिका, या अधिनियमाच्या तरतुदीनुसार, आणि या अधिनियमात अंतर्भूत असलेल्या शर्तींच्या आणि मर्यादांच्या अधीनतेने, शहराच्या सुधारणेसाठी, सुधार समिती नावाची एक समिती नेमील.

सुधार समितीची रचना.

**४९ब.** सुधार समिती सव्वीस सदस्यांची मिळून बनलेली असेल.

सुधार समितीच्या सदस्यांची नेमणूक केव्हा करावी.

**४९क.** महानगरपालिका प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीनंतर, एप्रिल महिन्यातील तिच्या पहिल्या बैठकीत आपल्या सदस्यांपैकी सव्वीस सदस्यांची सुधार समितीचे सदस्य म्हणून नेमणूक करील.

सुधार समितीच्या सभापतीची नेमणूक.

**४९ड.** (१) सुधार समिती, तिच्या पहिल्या बैठकीत आपल्या सदस्यांपैकी एकाची उक्त समितीच्या लगतपुढील सरकारी वर्षातील पहिल्या बैठकीपर्यंत सभापती म्हणून नेमणूक करील आणि त्यानंतर उक्त समिती प्रत्येक सरकारी वर्षातील तिच्या पहिल्या बैठकीत आपल्या सदस्यांपैकी एकाची सभापती म्हणून नेमणूक करील. अशी नेमणूक, लगतपुढील सरकारी वर्षात उक्त समितीची जी पहिली बैठक भरेल त्या बैठकीपर्यंत राहील.

(२) सुधार समितीचा जो सदस्य सभापती म्हणून राहणे बंद होईल तो पुन्हा पात्रताप्राप्त असेल.

(३) सभापतीच्या अधिकारपदाची जागा कोणत्याही वेळी नैमित्तिकरीत्या रिकामी झाल्यास सुधार समिती, सोईस्करपणे शक्य होईल तितक्या लवकर अशी रिकामी झालेली जागा भरण्यासाठी आपल्या सदस्यांपैकी एकाची निवड करील आणि याप्रमाणे निवडण्यात आलेला प्रत्येक सभापती हा ज्या व्यक्तीच्या जागी तो नेमण्यात आला असेल त्या व्यक्तीने ती जागा रिकामी झाली नसती तर जोवर अधिकारपद धारण केले असते तोवर अधिकारपदावर राहील.

सुधार समितीच्या सदस्यांनी आळीपाळीने सेवानिवृत्त होणे.

**४९ई.** (अ) सुधार समितीच्या सदस्यांपैकी निम्मे सदस्य प्रत्येक वर्षी एक एप्रिल रोजी मध्यान्ही सेवानिवृत्त होतील.

(ब) कलम ४९ब खाली सुधार समितीची रचना करण्यात आल्यानंतर एक वर्षाने कोणते सदस्य सेवानिवृत्त झाले पाहिजेत हे निकटपूर्वीच्या एक मार्चपूर्वी सभापती निर्धारित करील अशा वेळी व अशा रीतीने चिठ्ठ्या टाकून ठरविण्यात येईल.

(क) त्यानंतर पुढील वर्षी जे सदस्य आपल्या अधिकारपदावर सर्वाधिक काळ असतील ते या कलमाखाली सेवानिवृत्त होतील :

परंतु, पुन्हा निवडून आलेल्या सदस्यांच्या बाबतीत या खंडाच्या प्रयोजनाकरिता त्याच्या अधिकारपदाचा अवधी हा ज्या तारखेस तो पुन्हा निवडून आला असेल त्या तारखेपासून मोजण्यात येईल.

**४९फ.** (१) महानगरपालिका मार्च महिन्यातील आपल्या सामान्य बैठकीत तिने पूर्वी नेमलेले जे सदस्य वर सांगितल्याप्रमाणे वेळोवेळी सेवानिवृत्त होणार असतील अशा सदस्यांच्या जागा भरण्यासाठी सुधार समितीच्या नवीन सदस्यांची नेमणूक करील.

सुधार समितीचे जे सदस्य सेवानिवृत्त होतील त्यांच्या जागी सदस्य नेमणे.

(२) जो कोणताही पालिका सदस्य सुधार समितीचा सदस्य म्हणून असण्याचे बंद होईल तो पुन्हा पात्रताप्राप्त असेल.

**४९ग.** सुधार समितीचा सदस्य म्हणून नेमलेल्या पालिका सदस्याने अधिकारपद स्वीकारले नाही किंवा उक्त समितीचा सदस्य आपला पदावधी संपण्यापूर्वी मरण पावला असेल, त्याने राजीनामा दिला असेल, तो निरर्ह ठरला असेल किंवा तो काम करण्यास असमर्थ झाला असेल किंवा कलम ४९आय, खंड (ज) खाली त्याचे अधिकारपद रिकामे झाले असेल त्या प्रसंगी रिकामी झालेली जागा त्या जागी एखाद्या व्यक्तीची नेमणूक करून, सोयीस्करपणे शक्य होईल तितक्या लवकर भरण्यात येईल, आणि अशी व्यक्ती, ज्या सदस्याच्या जागी ती नेमण्यात आली त्या सदस्यास ती जागा रिकामी झाली नसती तर जोवर अधिकारपद धारण करण्याचा हक्क असता तोवरच अधिकारपद धारण करील.

सुधार समितीतील नैमित्तिक रिकाम्या जागा कशा भराव्या.

**४९ह.** पालिका सदस्य सेवानिवृत्त होण्याच्या दिवशी अस्तित्वात असलेली सुधार समिती ही उक्त समितीचे सदस्य किंवा त्यापैकी काही सदस्य त्यानंतर पालिका सदस्य नसले तरीही कलम ४९क खाली नवीन सुधार समितीची नेमणूक होईल त्या वेळेपर्यंत अधिकारपद धारण करण्याचे चालू ठेवतील.

नवीन समितीची नेमणूक होईपर्यंत सुधार समिती अधिकारपदावर असण्याचे चालू राहणे.

**४९आय.** कामकाज चालविण्यासाठी सुधार समिती आपली बैठक महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात भरवील ; उक्त समितीस, अशा बैठकीच्या संबंधात तिला योग्य वाटतील असे विनियम पुढील अधिकारांना अधीन राहून, वेळोवेळी करता येतील ; त्या शर्ती अशा :—

सुधार समितीच्या कामकाजाचे विनियमन करण्यासंबंधी तरतुदी.

(अ) सुधार समितीची बैठक महिन्यातून एकदा आणि आवश्यक असेल अशा इतर वेळी भरेल;

(ब) सुधार समितीची पहिली बैठक महापौर निश्चित करील त्या दिवशी व त्या वेळेला घेण्यात येईल आणि त्या दिवशी ती घेण्यात आली नाही तर, महापौर निश्चित करील अशा नंतरच्या कोणत्याही दिवशी ती घेण्यात येईल, आणि सुधार समितीची त्यानंतरची प्रत्येक बैठक उक्त समिती वेळोवेळी निर्धारित करील अशा दिवशी आणि अशा वेळी घेण्यात येईल;

(क) सुधार समितीच्या सभापतीस, त्यास योग्य वाटेल त्या त्या वेळी उक्त समितीची विशेष बैठक बोलविता येईल, आणि आयुक्ताने किंवा समितीच्या सदस्यांपैकी चारपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी सहीनिशी लेखी मागणी केली असता सभापती कोणतेही कामकाज चालविण्यासाठी अठ्ठेचाळीस तासांच्या आत विशेष बैठक बोलावील;

(ड) सुधार समितीच्या बैठकीस सुरूवातीपासून अखेरपर्यंत निदान नऊ सदस्य उपस्थित असल्याखेरीज त्या बैठकीचे कोणतेही कामकाज चालविण्यात येणार नाही;

(ई) सुधार समितीची बैठक भरण्याकरिता नेमलेल्या वेळी सभापती उपस्थित असेल तर, तो अध्यक्षस्थानी असेल आणि सभापती अनुपस्थित असेल तर, उपस्थित असलेल्या सदस्यांतून बैठकीने त्या वेळेसाठी सभापती म्हणून निवडलेला एक सदस्य अध्यक्षस्थानी असेल;

(फ) प्रत्येक प्रश्नाचा निकाल हा बैठकीत, सुधार समितीचे जे सदस्य उपस्थित असतील व त्या प्रश्नावर मतदान करतील त्यांच्या बहुमताने करण्यात येईल आणि समसमान मते पडतील तेव्हा पीठासीन-प्राधिकाऱ्यास दुसरे किंवा निर्णायक मत असेल;

(ग) महानगरपालिका सचिव सुधार समितीच्या प्रत्येक बैठकीत उपस्थित असलेल्या सदस्यांची नावे व त्यातील कामकाज, याचे कार्यवृत्त, त्यासाठी तरतूद करण्यात आलेल्या कार्यवृत्त पुस्तकात नमूद करून ठेवील; पुढील बैठकीत पीठासीन-प्राधिकारी त्यावर सही करील;

(ह) सुधार समितीचा सदस्य उक्त समितीपुढील किंवा तिच्या कोणत्याही उपसमिती पुढील ज्या कोणत्याही बाबीमध्ये प्रत्यक्षपणे वा अप्रत्यक्षपणे त्याचा स्वतःचा किंवा आपल्या भागीदारामार्फत कलम १६, खंड (ग) ते (ल) दोन्ही धरून, यात वर्णन केल्याप्रमाणे असलेला कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल किंवा अशिलाच्या, प्रकर्त्याच्या किंवा इतर व्यक्तीच्या वतीने व्यावसायिक हितसंबंध असेल अशा बाबीसंबंधीच्या चर्चेत, मतदान करणार नाही किंवा तिच्यावरील चर्चेत भाग घेणार नाही;

(आय) आयुक्तास किंवा महानगरपालिका उप आयुक्तास (सुधारणा) अथवा महानगरपालिका उप आयुक्त (सुधारणा) अनुपस्थित असल्यास याबाबत आयुक्त प्राधिकृत करील तेव्हा संचालकास किंवा महानगरपालिका उप आयुक्तास सुधार समितीच्या सदस्यांस असलेला, सुधार समितीच्या बैठकीत उपस्थित राहण्याचा व तीत होणाऱ्या चर्चेत भाग घेण्याचा हक्क असेल, मात्र त्यास अशा बैठकीत कोणत्याही प्रस्तावावर मतदान करण्याची किंवा तो मांडण्याची मुभा असणार नाही;

(ज) सुधार समितीचा जो कोणताही सदस्य तात्पुरता आजार किंवा समिती मान्य करील असे कारण सोडून इतर कारणांमुळे लागोपाठ तीन महिन्यांच्या काळात समितीच्या बैठकींना अनुपस्थित राहील अथवा कोणत्याही कारणामुळे, मग ते समितीने मान्य केलेले असो किंवा नसो, लागोपाठ आठ महिन्यांच्या काळात समितीच्या बैठकींना अनुपस्थित राहील किंवा उपस्थित राहण्यास असमर्थ होईल, तो समितीचा सदस्य म्हणून असण्याचे बंद होईल आणि लागोलाग त्याचे अधिकारपद रिकामे होईल.

[२][बृहन्मुबई वीज पुरवठा व परिवहन समितीची] रचना आणि तिच्या सदस्यांचा कालावधी.

**५०.** (१) महानगरपालिका, या अधिनियमाच्या तरतुदींअनुसार व त्यात अंतर्भूत असलेल्या अशा शर्तींच्या व मर्यादांच्या अधिनतेने, [१][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रम] चालविण्याच्या प्रयोजनासाठी, बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समिती नावाची समिती नेमील.

(२) उक्त समिती सतरा सदस्यांनी मिळून बनलेली असेल.

(३) स्थायी समितीचा सभापती हा या समितीचा पद्सिद्ध सदस्य असेल आणि इतर सदस्य हे महानगरपालिकेच्या मते ज्यांना प्रशासन, परिवहन किंवा वीज पुरवठा यामधील अथवा अभियांत्रिकीविषयक, उद्योगविषयक, वाणिज्यविषयक, वित्तविषयक किंवा मजूरविषयक बाबींमधील अनुभव असेल व त्यामध्ये ज्यांची सक्षमता दिसून आली असेल अशा व्यक्तींमधून नेमले जातील व यापैकी निदान एक व्यक्ती पालिका सदस्य असेल व बाकीच्या व्यक्ती या पालिका सदस्य असतीलही किंवा नसतीलही.

(४) (अ) बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समितीच्या सदस्यांपैकी निम्मे सदस्य प्रत्येक वर्षी एक एप्रिल रोजी मध्यान्ही सेवानिवृत्त होतील.

(ब) या कलमाखाली समितीची रचना करण्यात आल्यानंतर एक वर्षाने कोणते सदस्य सेवानिवृत्त झाले पाहिजेत हे निकटपूर्वीच्या एक मार्चपूर्वी सभापती निर्धारित करील अशा वेळी व अशा रीतीने चिठ्ठ्या टाकून ठरविण्यात येईल.

(क) त्यानंतर पुढील वर्षी जे सदस्य आपल्या अधिकारपदावर सर्वाधिक काळ असतील ते या कलमाखाली सेवानिवृत्त होतील :

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची ४(३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या अनुसूची ४(४) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु, [१][पुन्हा नियुक्त केलेल्या] सदस्याच्या बाबतीत या खंडाच्या प्रयोजनाकरिता त्याच्या अधिकारपदाचा अवधी हा ज्या तारखेस तो [२][पुन्हा नियुक्त झाला असेल] त्या तारखेपासून मोजण्यात येईल.

(५) एखादी व्यक्ती कलम १६ च्या तरतुदीखाली पालिका सदस्य म्हणून निवडून येण्यास व सदस्य म्हणून राहण्यास निरर्ह असेल तर ती उक्त समितीची सदस्य नेमली जाण्यास व सदस्य म्हणून राहण्यास निरर्ह ठरेल.

[३][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समितीच्या] सदस्यांच्या निरर्हता.

**५०अ.** (१) जी कोणतीही व्यक्ती [३][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समितीचा] सदस्य म्हणून तिची नेमणूक झाल्यावर,—

(अ) कलम ५०, पोट-कलम (५) च्या तरतुदीखाली समितीची सदस्य म्हणून राहण्यास निरर्ह होईल ; अथवा

(ब) तात्पुरता आजार किंवा समितीने मान्य केलेले कोणतेही इतर कारण सोडून इतर कारणासाठी लागोपाठ सहा सभांना अनुपस्थित राहील ; अथवा

(क) कोणत्याही कारणामुळे लोगोपाठ सहा महिन्यांच्या काळात समितीच्या सभांना अनुपस्थित राहील, किंवा उपस्थित राहण्यास असमर्थ होईल तर,

ती समितीचा सदस्य म्हणून असण्याचे बंद होईल आणि लागोपाठ तिचे अधिकारपद रिकामे होईल.

(२) पोट-कलम (१) खाली कोणतीही जागा रिकामी झालेली आहे किंवा कसे, याविषयी कोणताही प्रश्न किंवा विवाद उद्‌भवल्यास आयुक्त महानगरपालिकेच्या विनंतीवरून तो प्रश्न लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाकडे पाठवील आणि उक्त न्यायाधीश, त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, जागा रिकामी झालेली आहे किंवा नाही याविषयी निर्णय देईल आणि त्याचा निर्णय अखेरचा असेल.

नैमित्तिक रिकाम्या जागा कशा भराव्या.

**५०ब.** [३][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समितीचा] सदस्य म्हणून नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीने अधिकारपद स्वीकारले नाही किंवा त्या समितीचा सदस्य मरण पावला असेल, त्याने राजीनामा दिला असेल किंवा तो निरर्ह झाला असेल किंवा तो काम करण्यास असमर्थ झाला असेल किंवा कलम ५०अ च्या तरतुदीखाली त्याचे अधिकारपद रिकामे झाले असेल त्या प्रसंगी रिकामी झालेली जागा महानगरपालिका त्या जागी यथोचित अर्हताप्राप्त व्यक्तीची नेमणूक करून सोईस्करपणे शक्य होईल तितक्या लवकर भरील आणि अशी व्यक्ती जागा रिकामी झाली नसती तर ज्या व्यक्तीच्या जागी ती नेमण्यात आली असेल त्या व्यक्तीने जोवर अधिकारपद धारण केले असते तोवरच अधिकारपद धारण करील.

[३][बृहन्मुबई वीज पुरवठा व परिवहन समितीचा] सभापती.

**५०क.** (१) [३][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समिती], तिची नेमणूक झाल्यानंतर प्रत्येक सरकारी वर्षातील तिच्या पहिल्या सभेत आपल्या सदस्यांपैकी जी पालिका-सदस्य असेल अशा एका व्यक्तीस पुढील सरकारी वर्षातील समितीच्या पहिल्या सभेपर्यंत सभापती म्हणून नेमील.

(२) त्यानंतर समिती प्रत्येक सरकारी वर्षातील तिच्या पहिल्या सभेत आपल्या सदस्यांपैकी पालिका सदस्य असणाऱ्या एका व्यक्तीची लगतपुढील वर्षातील तिच्या पहिल्या सभेपर्यंत सभापती म्हणून नेमणूक करील.

(३) सेवानिवृत्त होणारा सभापती हा सभापती म्हणून फेरनेमणूक होण्यास पात्र असेल.

---

[१] सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३ (एक) अन्वये " पुन्हा निवडून आलेल्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३ (दोन) अन्वये " पुन्हा निवडून आला असेल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची ४(४) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(४) पोट-कलमे (१) व (२) च्या तरतुदींत काहीही अंतर्भूत असले तरी सभापती हा समितीचा सदस्य म्हणून असण्याचे बंद झाल्याबरोबर लगेच तो आपले अधिकारपद सोडून देईल.

(५) सभापतीचे अधिकारपद त्याचा अवधी संपण्यापूर्वी रिकामे झाले तर, अधिकारपद रिकामे झाल्यानंतर सोईस्करपणे शक्य होईल तितक्या लवकर समिती आपल्या सदस्यांपैकी पालिका सदस्य असणारा एक सदस्य अशा रिकाम्या जागेवर नेमील आणि याप्रमाणे नेमलेला सभापती हा ज्या व्यक्तीच्या जागी नेमण्यात आला असेल त्या व्यक्तीने ती जागा रिकामी झाली नसती तर जोवर अधिकारपद धारण केले असते तोवरच अधिकारपद धारण करील.

[१][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समितीच्या] सभा.

**५०ड.** (१) [१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समिती] आपले कामकाज चालविण्यासाठी तिच्या सभा ती वेळोवेळी ठरवील अशा जागी भरवील आणि सभा इतरत्र भरण्याविषयी निर्णय घेण्यात येईतोपर्यंत त्या महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात भरवण्यात येतील.

(२) समितीस तिच्या व उप समित्यांच्या संबंधी पुढे दिलेल्या शर्तींच्या अधीनतेने तिला योग्य वाटतील असे विनियम वेळोवेळी करता येतील :—

(अ) समितिची सभा पंधरवड्यातून एकदा आणि आवश्यक वाटेल अशा इतर वेळी भरवण्यात येईल;

(ब) समितीची पहिली सभा महापौर निश्चित करील त्या दिवशी व त्या वेळेला घेण्यात येईल आणि जर त्या दिवशी घेतली गेली नाही तर महापौर निश्चित करील अशा नंतरच्या कोणत्याही दिवशी घेण्यात येईल, आणि समितीची त्यानंतरची प्रत्येक सभा समिती वेळोवेळी निर्धारित करील अशा दिवशी व अशा वेळी घेतली जाईल;

(क) समितीच्या सभापतीला जेव्हा जेव्हा योग्य वाटेल तेव्हा, कोणतेही कामकाज चालविण्यासाठी विशेष सभा बोलविता येईल व आयुक्ताने किंवा महाव्यवस्थापकाने किंवा समितीच्या तीनपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी सही करून लेखी मागणी केल्यास, अशी मागणी त्यास मिळाल्यापासून अठ्ठेचाळीस तासांच्या आत कोणतेही काम चालविण्यासाठी विशेष सभा बोलविल;

(ड) समितीच्या कोणत्याही सभेत, त्या सभेच्या सुरवातीपासून अखेरपर्यंत किमान सात सदस्य उपस्थित असल्याखेरीज कोणतेही कामकाज चालविण्यात येणार नाही;

(ई) समितीच्या प्रत्येक सभेत ती भरविण्याच्या वेळी सभापती उपस्थित असेल तर, सभापती अध्यक्षस्थानी राहील आणि सभापती जर अनुपस्थित असेल तर सदस्यांतून सभेसाठी सभापती म्हणून निवडलेला एक सदस्य त्या सभेत अध्यक्षाचे काम चालविल;

(फ) प्रत्येक प्रश्नाचा निर्णय हजर असलेल्या व मतदान करणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने करण्यात येईल आणि मते समसमान पडतील त्या प्रसंगी पीठासीन प्राधिकाऱ्यास दुसरे किंवा निर्णायक मत असेल;

(ग) समिती, तिच्या प्रत्येक सभेस उपस्थित असणाऱ्या सदस्यांची नावे व त्या सभेतील कामकाज यांचे कार्यवृत्त त्या प्रयोजनासाठी तरतूद केलेल्या कार्यवृत्त पुस्तकात नमूद करून ठेवण्याची तजवीज करील आणि आगामी सभेच्या वेळी समितीने ते कायम केल्यानंतर त्या सभेत व त्या सभेचा पीठासीन प्राधिकारी त्यावर सही करील;

(ह) समितीपुढे किंवा उपसमितीपुढे असलेल्या ज्या कोणत्याही बाबींमध्ये समितीच्या सदस्याचा प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे, स्वतःच्या किंवा आपल्या भागीदारामार्फत कलम १६, पोट-कलम (२) च्या खंड (ग) ते (ल) दोन्ही धरून यात वर्णन केलेला कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल किंवा अशिलाच्या, प्रकर्त्याच्या किंवा इतर व्यक्तीच्या वतीने व्यावसायिक हितसंबंध असेल अशा बाबींसंबंधाने तो मतदान करणार नाही किंवा अशा कोणत्याही बाबींवरील चर्चेत भाग घेणार नाही.

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची ४(४) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) आयुक्तास आणि त्याच्या अनुपस्थितीत त्याने याबाबत प्राधिकृत केलेल्या संचालकास किंवा उप आयुक्तास आणि महाव्यवस्थापकास आणि महाव्यवस्थापकाच्या अनुपस्थितीत त्याने याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास समितीच्या सभेत हजर राहण्याचा व त्यात होणाऱ्या चर्चेत भाग घेण्याचा समितीच्या सदस्याप्रमाणेच अधिकार असेल; मात्र त्यास अशा सभेत कोणत्याही प्रस्तावावर मतदान करण्याची किंवा तो मांडण्याची मुभा असणार नाही.

**५०ई.** [१][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समितीच्या] सभापतीस व सदस्यांस समितीच्या सभांना उपस्थित राहण्यासाठी महानगरपालिकेने या कलमाखाली राज्य शासनाच्या मंजुरीने केलेल्या नियमांन्वये विहित करण्यात येईल अशी फी देण्यात येईल. [१][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समितीच्या] सभांना उपस्थित राहण्यासाठी फी.

**५०फ.** (१) [१][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समितीस] वेळोवेळी आपल्या सदस्यांमधून उपसमित्या नेमता येतील. अशा उपसमित्या समितीस योग्य वाटतील इतक्या व्यक्तींच्या मिळून बनलेल्या असतील. [१][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समितीच्या] उपसमित्या.

(२) समितीस आपल्या सभेत उपस्थित असलेल्या सदस्यांपैकी किमान दोन तृतीयांश सदस्यांनी मतदान करून सभेत संमत केलेल्या विनिर्दिष्ट ठरावाद्वारे आपले कोणतेही अधिकार व कर्तव्ये उपसमितीकडे प्रत्यायोजित करता येतील, तसेच तिला तशाच ठरावाद्वारे अशा उपसमितींच्या कामकाजाचे क्षेत्र निर्धारित करता येईल.

(३) ज्या बाबींवर कार्यवाही करण्यास समिती सक्षम असेल अशा कोणत्याही बाबीची चौकशी करून त्यावर अहवाल सादर करण्याकरिता किंवा त्यावर अभिप्राय देण्याकरिता समितीस अशी बाब पोट-कलम (१) खाली नेमलेल्या उपसमितीकडे निर्देशित करता येईल.

## शिक्षण समिती

**५०ग.** (१) महानगरपालिका, या अधिनियमातील किंवा त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कायद्यांतील प्राथमिक शिक्षणासंबंधीच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनासाठी शिक्षण समिती नावाची एक समिती नेमील. शिक्षण समितीची रचना.

(२) शिक्षण समिती, सव्वीस सदस्यांची मिळून बनलेली असेल आणि त्यापैकी बावीस सदस्य पालिका सदस्य असतील आणि चार सदस्य हे पालिका सदस्य नसलेल्या व्यक्ती असतील.

(३) बिगर पालिका सदस्य म्हणून नेमणूक करावयाच्या व्यक्ती या,—

(अ) ज्यांची नावे महानगरपालिका मतदार यादीत मतदार म्हणून दाखल झालेली आहेत;

(ब) ज्या, महानगरपालिकेने याबाबत मान्यता दिलेल्या विद्यापीठाच्या स्नातक आहेत;

(क) ज्यांना शैक्षणिक परिसंस्थेतील अध्यापनाचा किंवा प्रशासनाचा पाच वर्षांचा अनुभव आहे; आणि

(ड) ज्यांना महानगरपालिका याबाबत निर्धारीत करील अशा इतर अर्हता आहेत; अशा व्यक्ती असतील.

१९९९ चा महा.२७. **५०ह.** महानगरपालिका ही मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९९९ याच्या प्रारंभानंतर शक्य तितक्या लवकर आणि त्यानंतर प्रत्येक सार्वत्रिक निवडणुकीनंतर एप्रिल महिन्यातील महानगरपालिकेच्या पहिल्या सभेच्या वेळी यथोचित अर्हताप्राप्त अशा सोळा व्यक्तींची, शिक्षण समितीचे सदस्य म्हणून नेमणूक करील. शिक्षण समितीच्या सदस्यांची नेमणूक केव्हा करावी.

**५०आय.** (१) जर,— शिक्षण समितीच्या सदस्यांच्या निरर्हता.

(अ) एखाद्या व्यक्तीचा, महानगरपालिकेची कोणतीही शाळा किंवा कोणतेही कार्यालय ज्या कोणत्याही स्थावर मालमत्तेवर किंवा मालमत्तेत असेल त्या मालमत्तेमध्ये किंवा ज्या कोणत्याही परिसंस्थेस किंवा शाळेस महानगरपालिकेकडून देणगी किंवा सहायक अनुदान मिळत असेल अशा परिसंस्थेमध्ये किंवा शाळेमध्ये प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे हितसंबंध असेल; अथवा

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची ४(४) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ब) पालिका सदस्य नसलेली एखादी व्यक्ती अशी सदस्य म्हणून निवडून दिली जाण्यास कलम १६ खाली निरर्ह असेल,

तर अशी व्यक्ती शिक्षण समितीची सदस्य म्हणून नेमली जाण्यास पात्र असणार नाही.

**स्पष्टीकरण.—**एखाद्या व्यक्तीस अशा मालमत्तेपासून, परिसंस्थेपासून किंवा शाळेपासून किंवा अशा मालमत्तेच्या संस्थेच्या किंवा शाळेच्या संबंधात प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे पैशाच्या स्वरूपात कोणताही लाभ मिळत असेल किंवा तसा लाभ मिळेल असे वचन देण्यात आले असेल तर या पोट-कलमाच्या खंड (अ) याच्या अर्थांतर्गत अशा व्यक्तीचा हितसंबंध आहे असे मानण्यात येईल. मग असा लाभ, किमतीच्या किंवा भाड्याच्या किंवा पट्टामूल्याच्या रूपाने असो किंवा तशाच स्वरूपाच्या असलेल्या किंवा नसलेल्या इतर वस्तूच्या रूपाने असो.

(२) जर कोणतीही व्यक्ती, शिक्षण समितीची सदस्य म्हणून तिची नेमणूक झाल्यावर,—

(अ) पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही निरर्हतांच्या अधीन होईल;

(ब) तात्पुरता आजार किंवा समितीने मान्य केलेले इतर कोणतेही कारण सोडून इतर कारणांमुळे समितीच्या लागोपाठ सहा सहा सभांना अनुपस्थित राहील; अथवा

(क) कोणत्याही कारणामुळे लागोपाठ आठ महिन्यांच्या काळात समितीच्या सभांना अनुपस्थित राहील अथवा उपस्थित राहण्यास असमर्थ होईल,

तर ती समिती सदस्य असण्याचे बंद होईल आणि लागोलाग तिचे अधिकारपद रिकामे होईल.

शिक्षण समितीच्या सभापतीची नेमणूक.

**५०ज.** (१) शिक्षण समिती प्रत्येक सरकारी वर्षातील तिच्या पहिल्या सभेत, आपल्या सदस्यांपैकी पालिका सदस्य असलेल्या एकास समितीच्या पुढील सरकारी वर्षातील पहिल्या सभेपर्यंत सभापती म्हणून नेमील.

(२) सेवानिवृत होणारा सभापती फेरनिवडणुकीस पात्रताप्राप्त असेल.

(३) सभापतीचे अधिकारपद नैमित्तिकरित्या रिकामे झाल्यास, शिक्षण समिती अशी जागा रिकामी झाल्यानंतर सोईस्करपणे शक्य होईल तितक्या लवकर अशी रिकामी झालेली जागा भरण्यासाठी आपल्या सदस्यांपैकी पालिका सदस्य असलेल्या एका सदस्यास नेमील आणि याप्रमाणे नेमण्यात आलेल्या प्रत्येक सभापती हा, ज्या व्यक्तीच्या जागी तो नेमण्यात आला असेल त्या व्यक्तीस ती जागा रिकामी झाली नसती तर जोवर अधिकारपद धारण करण्याचा हक्क असता, तोवरच अधिकारपदावर राहील.

शिक्षण समितीच्या सदस्यांनी आळीपाळीने सेवानिवृत्त होणे.

**५०के.** (१) शिक्षण समितीच्या सदस्यांपैकी पालिका सदस्य असलेल्या सदस्यांपैकी निम्मे सदस्य आणि इतर सदस्यांपैकी निम्मे सदस्य दरवर्षी १ एप्रिल रोजी सेवानिवृत्त होतील.

(२) कलम ५०ह खाली शिक्षण समितीची रचना करण्यात आल्यानंतर लगतनंतर येणाऱ्या १ एप्रिल रोजी कोणते सदस्य सेवानिवृत्त व्हावेत हे सभापती निकटपूर्वीच्या १ मार्च पूर्वी निर्धारित करील अशा वेळी व अशा रीतीने चिठ्ठ्या टाकून ठरवील.

(३) त्यानंतरच्या वर्षात जे सदस्य जास्तीतजास्त काळपर्यंत अधिकारपदावर असतील ते पोट-कलम (१) खाली सेवानिवृत्त होतील :

परंतु फेरनेमणूक करण्यात आलेल्या सदस्याच्या बाबतीत या पोट-कलमाच्या प्रयोजनाकरिता त्याचा पदावधी त्याच्या फेरनेमणुकीच्या तारखेपासून मोजण्यात येईल.

शिक्षण समितीचे जे सदस्य सेवानिवृत्त होतील त्यांच्या जागी सदस्य नेमणे.

**५०ल.** (१) कलम ५०ह च्या तरतुदीच्या अधीनतेने महानगरपालिका, मार्च महिन्यातील तिच्या सामान्य सभेत, उपरोक्तप्रमाणे वेळोवेळी जे सदस्य सेवानिवृत्त होणार असतील त्यांची अधिकारपदे भरण्यासाठी शिक्षण समितीच्या नवीन सदस्याची नेमणूक करील.

(२) शिक्षण समितीचा सेवानिवृत्त होणारा कोणताही सदस्य [१][पुनर्नियुक्तीस] पात्रताप्राप्त असेल.

---

[१] सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४ अन्वये " फेरनिवडणुकीस " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**५०म.** (१) शिक्षण समितीचा सदस्य म्हणून नेमण्यात आलेल्या व्यक्तीने अधिकारपद स्वीकारले नसेल किंवा समितीचा सदस्य आपल्या अधिकारपदाचा अवधी संपण्यापूर्वी मरण पावला असेल, त्याने राजीनामा दिला असेल किंवा तो निरर्ह झाला असेल किंवा काम करण्यास असमर्थ झाला असेल किंवा कलम ५० आय, पोट-कलम (२) खाली त्याची जागा रिकामी झाली असेल त्या प्रसंगी ती रिकामी झालेली जागा महानगरपालिका त्या जागी एखाद्या व्यक्तीची नेमणूक करून, सोईस्करपणे शक्य होईल तितक्या लवकर भरील आणि अशी व्यक्ती ज्या व्यक्तीच्या जागी तिला नेमण्यात आले असेल त्या व्यक्तीस ती जागा रिकामी झाली नसती तर जोवर अधिकारपद धारण करण्याचा हक्क असता तोवरच अधिकारपद धारण करील.

शिक्षण समितीतील नैमित्तिकरित्या रिकाम्या जागा कशा भराव्या.

(२) या कलमाखाली कोणतीही जागा रिकामी झाली आहे किंवा कसे याविषयी कोणताही प्रश्न किंवा विवाद उद्‌भवल्यास तो महानगरपालिकेकडे निर्देशित करण्यात येईल आणि महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल.

**५०न.** पालिका सदस्य सेवानिवृत्त व्हावयाच्या दिवशी अस्तित्वात असलेली शिक्षण समिती कलम ५०ह खाली नवीन शिक्षण समितीची नेमणूक होईतोपर्यंत अधिकारपद धारण करण्याचे चालू ठेवील, मग उक्त समितीचे सदस्य किंवा त्यापैकी काही सदस्य त्यानंतर पालिका सदस्य नसले तरी हरकत नाही.

प्रत्येक शिक्षण समिती ही, नवीन समितीची नेमणूक होईतोपर्यंत अधिकारपदावर असण्याचे चालू राहणे.

**५०ओ.** कोणत्याही सदस्याची नेमणूक करण्यात कोणत्याही प्रकारे कसूर, विलंब किंवा दोष असला तरीही रीतसर नेमणूक झालेल्या सदस्यांना शिक्षण समितीशी कायदेशीरपणे संबंधित असलेली सर्व कर्तव्ये पार पाडता येतील.

सदस्यांची नेमणूक करण्यात कसूर, वगैरे झाली असली तरीही शिक्षण समितीने काम करणे.

**५०प.** शिक्षण समिती आपले कामकाज चालविण्यासाठी आपल्या बैठकी मुख्य महानगरपालिका कार्यालयात भरवील ; व तिला योग्य वाटल्यास, अशा बैठकींच्या संबंधात आणि तिच्या नियंत्रणाखालील शाळांच्या व्यवस्थापनाच्या संबंधात, पुढील शर्तींना अधीन राहून वेळोवेळी विनियम करता येतील :—

शिक्षण समितीच्या बैठकी.

(अ) शिक्षण समितीची बैठक महिन्यातून एकदा आणि आवश्यक वाटेल अशा इतर वेळी भरविण्यात येईल ;

(ब) प्रत्येक शिक्षण समितीची पहिली बैठक महापौर निश्चित करील त्या दिवशी व त्या वेळी घेण्यात येईल आणि त्या दिवशी घेण्यात आली नाही तर, महापौर निश्चित करील अशा नंतरच्या कोणत्याही दिवशी ती बैठक घेण्यात येईल आणि शिक्षण समितीची त्यानंतरची प्रत्येक बैठक उक्त समिती वेळोवेळी निर्धारित करील अशा दिवशी व अशा वेळी घेण्यात येईल ;

(क) शिक्षण समितीच्या सभापतीला, कोणतेही कामकाज चालविण्यासाठी त्याला योग्य वाटेल तेव्हा तेव्हा, विशेष बैठक बोलावता येईल. तसेच तो चार सदस्यांपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी लेखी विनंती केल्यावरून अशी बैठक बोलविल ;

(ड) शिक्षण समितीच्या कोणत्याही बैठकीत निदान नऊ सदस्य उपस्थित असल्याखेरीज कोणतेही कामकाज चालविले जाणार नाही ;

(ई) शिक्षण समितीची बैठक घेण्यासाठी नेमून देण्यात आलेल्या वेळी सभापती उपस्थित असेल तर तो अशा प्रत्येक बैठकीत अध्यक्षस्थानी असेल आणि सभापती अनुपस्थित असेल

तर बैठकीत, पालिका सदस्यांपैकी जो कोणी त्यावेळेपुरता सभापती म्हणून निवडील तो अध्यक्षस्थानी असेल ;

(फ) प्रत्येक प्रश्नाचा निर्णय शिक्षण समितीच्या उपस्थित असलेल्या व मते देणाऱ्या सदस्यांच्या बहुमताने करण्यात येईल आणि मते समसमान पडतील त्या प्रसंगी पीठासीन प्राधिकाऱ्यास दुसरे किंवा निर्णायक मत असेल ;

(ग) महानगरपालिका सचिव, शिक्षण समितीच्या प्रत्येक बैठकीतील उपस्थित सदस्यांची नावे व कामकाज यांचे कार्यवृत्त त्या प्रयोजनासाठी तरतूद केलेल्या कार्यवृत्त पुस्तकात नमूद करून ठेवील आणि समितीने आगामी बैठकीत ते कायम केल्यावर त्या बैठकीचा पीठासीन प्राधिकारी त्यावर सही करील ;

(ह) शिक्षण समितीच्या सदस्य समितीपुढे किंवा तिच्या कोणत्याही उप समितीपुढे असलेल्या ज्या कोणत्याही बाबीमध्ये त्याचा प्रत्यक्षपणे, किंवा अप्रत्यक्षपणे स्वतःचा किंवा आपल्या भागीदारामार्फत कलम १६, पोट-कलम (२) चे खंड (ग) ते (ल), दोन्ही धरून, यात वर्णन केलेला कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल किंवा अशिलाच्या प्रकर्त्याच्या किंवा इतर व्यक्तीच्या वतीने व्यावसायिक हितसंबंध असेल अशा कोणत्याही बाबीसंबंधात तो मतदान करणार नाही किंवा अशा कोणत्याही बाबींवरील चर्चेत भाग घेणार नाही.

महानगरपालिका आयुक्त आणि शिक्षण अधिकारी यांचा उपस्थित राहण्याचा हक्क.

**५०क्यू.** आयुक्तास आणि शिक्षण अधिकाऱ्यास आणि आयुक्ताच्या अनुपस्थितीत त्याने याबाबत प्राधिकृत केलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्यास समितीच्या बैठकीत हजर राहण्याचा व तीत होणाऱ्या चर्चेत भाग घेण्याचा उक्त समितीच्या सदस्यास असणारा हक्क असेल, मात्र त्यापैकी कोणीही अशा बैठकीत कोणत्याही प्रस्तावावर मतदान करणार नाही किंवा तो मांडणार नाही.

शिक्षण समितीने उप समित्यांची नेमणूक करणे.

**५०र.** शिक्षण समितीस वेळोवेळी आपल्या सदस्यांमधून तिला योग्य वाटेल इतक्या सदस्यांच्या मिळून बनणाऱ्या उप समित्या नेमता येतील. आणि या अधिनियमान्वये किंवा त्याखाली ज्या कोणत्याही बाबीवर कार्यवाही करण्यास शिक्षण समिती सक्षम असेल अशा कोणत्याही बाबीची चौकशी करून त्यावर अहवाल सादर करण्याकरिता किंवा त्यावर अभिप्राय देण्याकरिता अशी कोणतीही बाब अशा उप समित्यांकडे निर्देशित करता येईल.

समित्यांच्या निवडणुका प्रमाणशीर प्रतिनिधित्वाच्या तत्त्वावर असणे.

**५०स.** [१][(१)] या अधिनियमान्वये किंवा त्याखाली केलेल्या उपविधीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, समित्यांच्या बाबतीत, तेथे या समित्यांवरील पालिका सदस्यांची नेमणूक-मग ती नियमित असो किंवा नैमित्तिक असो—ही, तो पालिका सदस्य एखादे अधिकारपद धारण करीत असण्याच्या सामर्थ्याने करण्यात येईल अशी या अधिनियमान्वये तरतूद केलेली असेल त्या व्यतिरिक्त एरव्ही, या समित्यावरील पालिका सदस्यांची नेमणूक ही, [१][पोट-कलम (२) च्या तरतुदींनुसार महानगरपालिकेकडून पालिका सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल.] **:—**

(१) कलम ३८ खाली नेमलेली कोणतीही संमंत्रक समिती.

(२) कलम ३८अ खाली नेमलेली कोणतीही विशेष समिती.

(३) स्थायी समिती.

(४) सुधार समिती.

(५) बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समिती.

(६) शिक्षण समिती.

---

[१] सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ५(अ) अन्वये कलम ५०स ला त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला आणि "महानगरपालिका एकल संक्रमणीय मताद्वारे" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "महानगरपालिकेला नियम करता येतील" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][(२) समितीवर पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करताना, महानगरपालिका, मान्यताप्राप्त पक्षांचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेईल आणि सभागृह नेता, विरोधी पक्षनेता व असा प्रत्येक पक्षाचा किंवा गटाचा नेता यांच्याशी विचारविनिमय करून, शक्यतोवर, महानगरपालिकेतील अशा पक्षांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करील :

[२][परंतु, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांचे तौलनिक संख्याबळ हे, प्रथमतः पालिका सदस्यांच्या एकूण संख्येला त्या समितीच्या सदस्यांच्या एकूण संख्याबळाने भागून परिगणित करण्यात येईल व तद्नंतर या भागाकाराच्या संख्येने मान्यता-प्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष किंवा गट किंवा आघाडी किंवा फ्रंट यांच्या पालिका सदस्यांच्या संख्येस भागण्यात येईल. अशाप्रकारे आलेली संख्या ही त्या त्या मान्यताप्राप्त पक्षांचे किंवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे किंवा आघाडीचे किंवा फ्रंटचे तौलनिक संख्याबळ असेल. अशाप्रकारे निश्चित केलेल्या तौलनिक संख्याबळाची संपूर्ण संख्या प्रथम विचारात घेऊन मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला जागा वाटून देण्यात येतील. अशा रीतीने जागा वाटून दिल्यांनंतर, एक किंवा अधिक जागा वाटून द्यावयाच्या राहून गेल्यास, त्या जागा, तौलनिक संख्याबळातील सर्वात मोठ्या अपूर्णांक संख्येपासून सुरूवात करून, तौलनिक संख्याबळातील अपूर्णांक संख्येच्या उतरत्या क्रमाने, त्या सर्व जागा वाटून दिल्या जाईपर्यंत, मान्यताप्राप्त पक्षांना किंवा नोंदणीकृत पक्षांना किंवा गटांना किंवा आघाडीला किंवा फ्रंटला प्रत्येकी एक याप्रमाणे वाटून देण्यात येतील.]

१९८७ चा महा.२०. परंतु अणखी असे की, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, १९८६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोदणीकृत पक्ष वा गट यांचे तौलनिक संख्याबळ निश्चित करण्याच्या प्रयोजनाकरिता, निवडणूक निकालांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीच्या आत, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट अथवा अशा कोणत्याही पक्षाचे किंवा गटाचे नसलेले निर्वाचित पालिका सदस्य यांना एकत्र येऊन आघाडी किंवा फ्रंट तयार करता येईल आणि अशा आघाडीची किंवा फ्रंटची नोंदणी झाल्यावर, अशा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यांना, उक्त अधिनियमाच्या तरतुदी, जणू काही ही आघाडी किंवा फ्रंट निवडणुकीपूर्वीच नोंदणीकृत असल्याप्रमाणे, लागू होतील.

(३) असा पक्षाच्या किंवा गटांच्या वतीने नामनिर्देशित करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्भवल्यास, त्याबाबतीत, महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल.]

[३][*****]

### [२][प्रभाग समित्या

**५०टट.** (१) महानगरपालिका, पंचवीस पेक्षा अधिक नसतील इतक्या प्रभाग समित्यांची रचना करील, प्रत्येक समितीमध्ये महानगरपालिका ठरवील अशा लागून असलेल्या निवडणूक प्रभागांचा समावेश असेल. प्रभाग समित्यांची रचना.

(२) प्रत्येक प्रभाग समितीमध्ये पुढील व्यक्तींचा समावेश असेल :—

(अ) प्रभाग समितीच्या प्रादेशिक क्षेत्रामधील निवडणूक प्रभागांचे प्रतिनिधीत्व करणारे पालिका सदस्य ;

---

[१] वरील अधिनियमाच्या कलम ५(ब) अन्वये ही पोट-कलमे (२) व (३) जादा दाखल करण्यात आली.

[३] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम २ अन्वये मूळ परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल करण्यात आले.

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १४ अन्वये कलम ५०ट वगळण्यात आले.

[२] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ३४ अन्वये शीर्षक व कलम ५०टट समाविष्ट करण्यात आले.

[१][*****]

(ब) प्रभाग समितीच्या प्रादेशिक क्षेत्राचा प्रभारी असलेला प्रभाग अधिकारी ;

(क) खंड (अ) मध्ये निर्देशिलेल्या पालिका सदस्यांनी प्रभाग समितीच्या क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या, समाजकल्याणाच्या कार्यात गुंतलेल्या अशा मान्यताप्राप्त संघटना व समाजलक्षी संघटना यांच्या सदस्यांमधून नामनिर्देशित केलेले तीनपेक्षा अधिक नसेल इतक्या संख्येतील इतर सदस्य :

परंतु, अशा व्यक्तींची, प्रभाग समितीच्या अधिकारितेमधील प्रभागांतील मतदार म्हणून नोंदणी झालेली असेल :

परंतु, आणखी असे की, स्वयंसेवी संघटनांना मान्यता देण्यासंबंधीची प्रमाणके, सदस्य म्हणून नामनिर्देशित केले जाण्यासाठी आवश्यक असलेल्या अर्हता आणि ज्या रीतीने त्यांना नामनिर्देशित करावयाचे ती रीत या गोष्टी राज्य शासन विहित करील त्याप्रमाणे असतील.

(३) प्रभाग समितीची मुदत महानगरपालिकेच्या मुदतीबरोबरच समाप्त होईल.

(४) पोट-कलम (२) च्या खंड (अ) मध्ये निर्देशिलेले, निवडून आलेले पालिका सदस्य प्रभाग समितीच्या, प्रत्येक सरकारी वर्षातील पहिल्या बैठकीमध्ये त्यांच्या स्वतःमधून सभापती निवडून देतील आणि लगतनंतरच्या सरकारी वर्षातील पहिल्या बैठकीपर्यंत अधिकारपद धारण करील.

(५) प्रभाग समितीचा सभापती पालिका सदस्य असण्याचे बंद झाल्याबरोबर त्याने आपले अधिकारपद रिकामे केले असल्याचे मानण्यात येईल.

(६) सभापतीच्या अधिकारपदाचा अवधी समाप्त होण्यापूर्वी ते रिकामे होईल त्यावेळी प्रभाग समिती नवीन सभापती निवडून देईल :

परंतु, अशा प्रकारे निवडून दिलेला सभापती, ज्याच्या जागी त्याला निवडून दिलेले असेल त्या सभापतीने, अधिकारपद रिकामे झाले नसते तर जोपर्यंत ते धारण केले असते तोपर्यंत केवळ ते अधिकारपद धारण करील.

(७) प्रभाग समितीची कामे, महानगरपालिकेच्या सर्वसाधारण देखरेखीच्या व नियंत्रणाच्या अधीन राहून पुढीलप्रमाणे असतील :—

(अ) पाणीपुरवठा, जलनिस्सारण, स्वच्छता आणि पावसाच्या तुंबलेल्या पाण्याची विल्हेवाट यांसारख्या स्थानिक व अत्यावश्यक पालिका सेवांच्या संबंधातील, नागरिकांची सर्वसाधारण गाऱ्हाणी त्वरेने दूर करणे ;

(ब) प्रभागांशी संबंधित खर्चाच्या अंदाजाबद्दलचे अर्थसंकल्पाच्या निरनिराळ्या लेखाशीर्षाखालील प्रस्ताव [२][आयुक्तांकडे] पाठवण्यापूर्वी त्यावर विचार करणे व त्याबाबत शिफारशी करणे ;

(क) प्रभाग समितीच्या प्रादेशिक क्षेत्रात पार पाडावयाच्या, पाच लाख रुपयापर्यंतच्या खर्चाच्या पालिका बांधकामाच्या नकाशांना प्रशासकीय मान्यता व वित्तीय मंजुरी देणे, मात्र, महानगरपालिकेने मंजूर केलेल्या अर्थसंकल्पात त्यासाठी विनिर्दिष्ट तरतूद केलेली असली पाहिजे.

(८) पोट-कलम (७) मध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, महानगरपालिका एक ठराव करून त्याद्वारे तिला योग्य आणि इष्ट वाटतील असे इतर अधिकार, प्राधिकार आणि कामे प्रभाग समितीकडे सोपवू शकेल.

(९) प्रभाग समितीची बैठक महिन्यातून किमान एकदा प्रभाग कार्यालयात होईल.]

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ११(अ) अन्वये हे परंतुक वगळण्यात आले.
[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ११ (ब) अन्वये "महापौरासह परिषदेकडे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## कामकाजाच्या विधिग्राह्यतेसंबंधी तरतुदी

[१][ **५१.** महानगरपालिकेच्या किंवा या अधिनियमान्वये नियुक्त केलेल्या कोणत्याही समितीच्या कोणत्याही कृतीसंबंधात किंवा कामकाजासंबंधात महानगरपालिकेमध्ये किंवा, यथास्थिति, अशा कोणत्याही समितीमध्ये कोणतीही जागा रिकामी असल्याच्या कारणावरून हरकत घेण्यात येणार नाही.]

महानगरपालिकेत किंवा कोणत्याही समितीत कोणतीही जागा रिकामी असण्यामुळे तिचे कामकाज विधिअग्राह्य न ठरणे.

**५२.** महानगरपालिकेचा सदस्य म्हणून किंवा [२][महापौर] म्हणून किंवा [३][सभापती] प्राधिकारी म्हणून किंवा या अधिनियमाखाली नेमलेल्या [४][स्थायी समितीचा किंवा कोणत्याही समितीचा अथवा उपसमितीचा सभापती किंवा सदस्य म्हणून काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने महानगरपालिकेच्या किंवा स्थायी समितीच्या किंवा यथास्थिति, अशा कोणत्याही समितीच्या] किंवा उपसमितीच्या ज्या कोणत्याही कृतीत " किंवा कामकाजात भाग घेतला असेल अशा कोणत्याही कामकाजात किंवा कृतीत" भाग घेणाऱ्या बहुसंख्य व्यक्तींना ज्या ज्या वेळी कृती करण्याचा हक्क असेल तेव्हा तेव्हा त्या कृती किंवा ते कामकाज, अशी कोणतीही व्यक्ती निरर्ह झाली होती किंवा तिच्या निवडणुकीत किंवा नेमणुकीत [५]* * * * कोणताही दोष होता या कारणामुळे निष्फळ होते असे मानले जाणार नाही.

महानगरपालिका, वगैरे यांचे कामकाज त्यांच्या सदस्यांची निरर्हता वगैरे यांमुळे निष्फळ न होणे.

**५३.** महानगरपालिकेच्या [६][* * * *] किंवा [७][समितीच्या किंवा उपसमितीच्या] ज्या ज्या सभेत चालविलेल्या कामकाजाचे या अधिनियमास अनुसरून कार्यवृत्त तयार करण्यात येऊन त्यावर सही करण्यात आली असेल ती प्रत्येक सभा रीतसर बोलविण्यात व भरविण्यात आली होती असे तद्विरुद्ध सिद्ध करण्यात येईतोपर्यंत मानण्यात येईल. तसेच त्या सभेचे सर्व सदस्य यथोचित अर्ह होते असे मानण्यात येईल ; आणि ते कामकाज एखाद्या [७][समितीचे किंवा उपसमितीचे] कामकाज असेल त्या बाबतीत, अशा [७][समितीची किंवा उपसमितीची] रीतसर रचना करण्यात आलेली होती व अशा कार्यवृत्तात उल्लेख केलेल्या गोष्टीवर कार्यवाही करण्याचा तिला अधिकार होता असे मानण्यात येईल.

सभांचे कामकाज हे तद्विरुद्ध सिद्ध करण्यात येईतोपर्यंत निर्दोष व विधिग्राह्य मानणे.

[८][ **५३अ.** जर, या अधिनियमाखालील कोणतीही समिती किंवा विशेष समिती कोणत्याही वेळी घटित केली नसेल, किंवा ती कोणत्याही कारणामुळे या अधिनियमाखालील आपल्या अधिकारांचा वापर करण्याच्या किंवा आपली कर्तव्ये पार पाडण्याच्या स्थितीत नसेल तर, अशी समिती घटित करण्यात येईपर्यंत किंवा आपल्या अधिकारांचा वापर करण्याच्या किंवा आपली कर्तव्ये पार पाडण्याच्या स्थितीत येईपर्यंत, महानगरपालिका, समितीच्या अधिकारांचा वापर करील आणि तिची कर्तव्ये पार पाडील.

महानगरपालिकेने कोणत्याही समितीच्या अधिकारांचा वापर करणे व तिची कर्तव्ये पार पाडणे.

---

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ९ अन्वये हे कलम दाखल करण्यात आले.

[२] सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २१, कलम २ (एक) अन्वये मूळ शब्दाऐवजी "महापौर" हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १२ (अ) अन्वये "महानगरपालिकेचा अध्यक्ष" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १२(ब) अन्वये "स्थायी समितीचा" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "कोणत्याही समितीचा" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९२२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम २१ अ अन्वये "किंवा स्वीकृतीकरण" व जादा दाखल केलेले जे शब्द, सन १९३१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १७, कलम ७ अन्वये वगळण्यात आले ते गाळण्यात आले आहेत.

[६] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १८(अ) अन्वये "किंवा स्थायी समितीच्या" हा मजकूर वगळण्यात आला.

[७] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १३ अन्वये "समितीच्या" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ५ अन्वये कलमे ५३ अ व ५३ ब ही समाविष्ट करण्यात आली.

समितीचे सभापती किंवा उप सभापती यांना पदावरून दूर करणे.

**५३ब.** या अधिनियमान्वये घटित केलेल्या कोणत्याही समितीच्या सभापतीने किंवा उप सभापती असल्यास त्याने, या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे, समितीच्या लागोपाठच्या दोन सभा बोलावण्यात कसूर केली तर, राज्य शासन त्यास पदावरून दूर करू शकेल, आणि अशा प्रकारे पदावरून दूर केलेला सभापती किंवा उप सभापती, त्यांच्या पदाच्या उर्वरित कालावधीत, त्या समितीचा सभापती किंवा, यथास्थिति, उप सभापती म्हणून पुन्हा निवडून येण्यास किंवा पुनर्नियुक्ती केली जाण्यास पात्र असणार नाही :

परंतु, अशा कोणत्याही सभापतीस किंवा उप सभापतीस आपले स्पष्टीकरण सादर करण्याची वाजवी संधी दिल्याखेरीज, पदावरून दूर करण्यात येणार नाही :

परंतु आणखी असे की, या कलमान्वये सभापती किंवा उप सभापती याला पदावरून दूर केल्यामुळे त्याच्या पदाच्या उर्वरित कालावधीत तो पालिका-सदस्य म्हणून असण्याचे चालू राहण्यास बाधा येणार नाही.]

### [१][**(फ) महानगरपालिका आयुक्त**]

आयुक्ताची नेमणूक.

**५४.** (१) [२][बृहन्मुंबईच्या] महानगरपालिका आयुक्ताची नेमणूक वेळोवेळी [३][[४]राज्य] शासन] करील. [५][त्याला राज्य शासन निश्चित करील अशा तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी अधिकारपद धारण करता येईल आणि राज्य शासनास तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा आणखी कालावधीसाठी त्याच्या नेमणुकीचे नवीकरण करता येईल :

परंतु, आयुक्ताचा राज्य शासनाच्या सेवेवर धारणाधिकार असेल तेव्हा, राज्य शासनास [६][* * *] त्याला कोणत्याही वेळी अशा सेवेत परत बोलवता येईल.]

(२) [७][पोट कलम (१) च्या तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही], महानगरपालिकेच्या सभेत [८][एकूण पालिका सदस्यांपैकी पाच-अष्टमांशाहून] कमी नसतील इतक्या पालिका सदस्यांनी या बाबतीतील प्रस्तावाच्या बाजूने मतदान केले असेल तर [३][[४][राज्य] शासन] [७][आयुक्तास] पदावरून ताबडतोब दूर करील, आणि तो आपल्या अधिकारपदांची कर्तव्ये पार पाडण्यास अक्षम असल्यामुळे किंवा कोणत्याही गैरवर्तणुकीबद्दल किंवा निष्काळजीपणाबद्दल दोषी ठरला असल्यामुळे त्यास अधिकारपदावरून दूर करणे इष्ट ठरेल असे राज्य शासनास दिसून आले तर, [३][[४][राज्य] शासन,] त्यास कोणत्याही वेळी दूर करू शकेल :

[९][परंतु, आयुक्तास [३][राज्य] [४][शासनाच्या] सेवेवर धारणाधिकार असेल तेव्हा आयुक्त म्हणून केलेल्या त्या नेमणुकीच्या कालावधीत, महानगरपालिकेच्या मान्यतेवाचून त्यास अधिकारपदावरून दूर करता येणार नाही.]

---

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम २६ अन्वये "(क) महानगरपालिका आयुक्त" या शीर्षकाऐवजी हे शीर्षक दाखल करण्यात आले.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची ४(१) अन्वये "ग्रेटर बॉम्बे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेशान्वये "गव्हर्नर इन कौन्सिल" या शब्दांऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २२, कलम २ (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ३ अन्वये "महनगरपालिकेशी विचारविनिमय केल्यानंतर" हा मजकूर वगळण्यात आला आणि तो दिनांक १ नोव्हेंबर १९९१ रोजी वगळण्यात आला असल्याचे मानण्यात येईल.

[७] वरील अधिनियमाच्या कलम २(ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ९ अन्वये "चौसष्ट सदस्य" शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[९] सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम १४ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[१][(३) राज्य शासनास महानगरपालिका अपर आयुक्त म्हणून संबोधण्यात येणाऱ्या एक किंवा त्यापेक्षा अधिक व्यक्ती नेमता येतील. त्या व्यक्ती, आयुक्ताच्या नियंत्रणाधीन, आयुक्ताच्या सर्व किंवा कोणत्याही अधिकारांचा वापर करतील आणि त्याची सर्व किंवा कोणतीही कर्तव्ये पार पाडतील.

(४) महानगरपालिका अपर आयुक्त म्हणून नेमण्यात येणाऱ्या व्यक्तीच्या सेवेच्या अटी व शर्ती, राज्य शासन, सर्वसाधारण अथवा विशेष आदेशान्वये, वेळोवेळी निर्धारित करील त्याप्रमाणे असतील.

(५) पोट-कलम (४) च्या तरतुदींच्या अधीनतेने याप्रमाणे नेमलेली प्रत्येक व्यक्ती ही, आयुक्त ज्यांना अधीन असेल त्याच दायित्वांच्या, निर्बंधांच्या व शर्तींच्या अधीन असेल.]

[२][**संचालक**

**५४अ.** (१) महानगरपालिकेस, कोणत्याही वेळी वेळोवेळी, तिला तसे करणे इष्ट वाटल्यास एखाद्या व्यक्तीची संचालक (अभियांत्रिकी सेवा व प्रकल्प) म्हणून नेमणूक, अशी नेमणूक राज्य शासनाने कायम करण्याच्या अधीनतेने, करता येईल. संचालकाची नेमणूक.

(२) याप्रमाणे नेमलेली प्रत्येक व्यक्ती, आयुक्त ज्यांना अधीन असेल त्याच दायित्वांच्या, निर्बंधांच्या व शर्तींच्या अधीन असेल.]

**महानगरपालिका उप आयुक्त**

**५५.** (१) महानगरपालिकेस, तिला महानगरपालिका उप आयुक्ताची नेमणूक करणे इष्ट वाटत असेल तर कोणत्याही वेळी आणि वेळोवेळी, एखाद्या व्यक्तीची महानगरपालिका उप आयुक्त म्हणून नेमणूक, अशी नेमणूक [३][[४][राज्य] [शासनाने] कायम करण्याच्या अधीनतेने करता येईल. महानगरपालिका उप आयुक्ताची नेमणूक.

[५][(१अ) महानगरपालिकेस, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने कोणत्याही वेळी आणि वेळोवेळी तिला आवश्यक वाटेल अशी महानगरपालिका उप आयुक्ताची आणखी एक किंवा त्यापेक्षा अधिक पदे निर्माण करता येतील आणि महानगरपालिकेस असे पद किंवा अशी पदे धारण करण्यासाठी योग्य व्यक्तीची किंवा व्यक्तींची नेमणूक, अशी नेमणूक राज्य शासनाने कायम करण्याच्या अधीनतेने करता येईल.]

(२) याप्रमाणे नेमलेली प्रत्येक व्यक्ती आयुक्त ज्यांना अधीन असेल त्याच दायित्वांच्या, निर्बंधांच्या आणि शर्तींच्या अधीन असेल.

**५६.** (१) याप्रमाणे नेमलेला [६][संचालक किंवा उप आयुक्त] [७][किंवा अपर उप आयुक्त], हा आयुक्तास अधीन असेल व तो आयुक्ताच्या आदेशांच्या अधीनतेने, आयुक्त त्याच्याकडे वेळोवेळी नेमून देईल अशा त्याच्या अधिकारांचा वापर करील व अशी कर्तव्ये पार पाडील: [९][संचालकाची व उप आयुक्ताची] कार्ये.

(२) परंतु,–

[८]* * * * *

---

[१] सन १९८३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४३, कलम ८ अन्वये पोट कलमे (३), (४) आणि (५) जादा दाखल करण्यात आली.

[२] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम ८ अन्वये हे शीर्षक व कलम ५४अ समाविष्ट करण्यात आले.

[३] भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेशान्वये "सरकार" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] विधि अनुकुलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम १० अन्वये पोट-कलम (१अ) समाविष्ट करण्यात आले.

[६] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम ९(अ) अन्वये "उप आयुक्त" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[७] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ११(अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[८] सन १८९७ चा मुंबई अधिनियम क्रमांक १ अन्वये खंड (अ) वगळण्यात आला.

[९] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम ९(ब) अन्वये "उप आयुक्त" या शब्दा ऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(ब) आयुक्त, तो वेळोवेळी [१][संचालककाकडे किंवा उप आयुक्ताकडे] जे अधिकार व जी कर्तव्ये नेमून देईल ती महानगरपालिकेस कळवीलः

[२][(२अ) परंतु आणखी असे की, अपर उप आयुक्त नेमण्यात आला असेल किंवा एकापेक्षा अधिक अपर उप आयुक्त नेमण्यात आले असतील तेव्हा, आयुक्त अशा प्रत्येक अपर उप आयुक्ताचे संबंधित कार्यक्षेत्र विहित करील आणि तसे करताना, आयुक्त यास, त्याने नेमलेल्या उप आयुक्ताकडे किंवा अपर उप आयुक्ताकडे उपनगरातील नगरपालिकेच्या कारभाराची जबाबदारी, पोट-कलम(१) खाली त्यांच्याकडे सोपविण्यात आलेले अधिकार व कर्तव्ये यांच्याशी ती जेथवर सुसंगत असेल तेथवर सोपविता येईल ; अशा जबाबदारीच्या संबंधात उक्त उप आयुक्त किंवा अपर उप आयुक्त हा आयुक्ताच्या नियंत्रणाच्या अधीन असेल.]

(३) [३][संचालकाने किंवा उप आयुक्ताने] [४][आणि अपर उप आयुक्ताने] आपल्या उक्त अधिकारपदाच्या पदावरील व आपल्या पदपरत्वे केलेल्या सर्व कृती आणि गोष्टी, सर्व प्रयोजनांकरिता आयुक्ताने पार पाडल्या आहेत व केल्या आहेत असे मानण्यात येईल.

महानगरपालिका उप आयुक्त (सुधारणा) याची नेमणूक.

[५][**५६अ.** (१) महानगरपालिका, [६][[७][राज्य] शासनाच्या] पूर्वमंजुरीने मुंबई शहर नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९३३, याच्या प्रारंभानंतर सोईस्करपणे शक्य होईल तितक्या लवकर महानगरपालिका उप आयुक्ताची नेमणूक करील आणि त्यास महानगरपालिका उप आयुक्त (सुधारणा) असे संबोधण्यात येईल. अशी नेमणूक ही, कलम ५५, पोट-कलम (१) खाली करण्यात आलेल्या महानगरपालिका उप आयुक्ताच्या नेमणुकीच्या भरीला असेल.

(२) याप्रमाणे नेमण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती ही, या अधिनियमाखाली आयुक्त ज्यांच्या अधीन असेल त्या सर्व दायित्वांच्या, निर्बंधांच्या व शर्तींच्या अधीन असेल.

(३) महानगरपालिका उप आयुक्त (सुधारणा) म्हणून नेमावयाची व्यक्ती ही प्रथमतः पाच वर्षांच्या कालावधीसाठी नेमण्यात येईल ; त्यानंतर, तिची नेमणूक तितक्याच किंवा त्यापेक्षा कमी कालावधीकरिता वेळोवेळी वाढवता येईल :

[८][परंतु, अशी व्यक्ती महानगरपालिका अधिकारी असेल व ती कलम ८१ खाली केलेल्या व तिला लागू होणाऱ्या विनियमांखाली तिच्या नेमणुकीच्या किंवा फेरनेमणुकीच्या तारखेपासून पाच वर्षांचा कालावधी संपण्यापूर्वीच्या तारखेस निवृत्त होणार असेल तर, तिला पाच वर्षांच्या कालावधीसाठी किंवा त्यापेक्षा कमी कालावधीसाठी नेमता येईल.]

---

[१] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम ९(ब) अन्वये "उप आयुक्त" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ११(ब) अन्वये पोट-कलम (२अ) समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम ९(क) अन्वये "उप आयुक्त" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ११(क) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ७ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[६] भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेशान्वये "सरकार" या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[७] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[८] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम ३ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

१९२५ चा मुंबई १६. १९३३ चा मुंबई १६.

(४) मुंबई शहर सुधारणा विश्वस्त व्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ याच्या कलम २६ खाली मुख्य अधिकारी म्हणून नेमणूक झालेली आणि मुंबई शहर नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९३३, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळी ते अधिकारपद धारण करणारी व्यक्ती महानगरपालिका, पोट-कलम (१) च्या तरतुदींखाली महानगरपालिका उप आयुक्त (सुधारणा) याची नेमणूक करीतोपर्यंत आणि असा महानगरपालिका उप आयुक्त आपल्या अधिकारपदाची कर्तव्ये पार पाडण्याच्या कामास सुरुवात करीतोपर्यंत, या अधिनियमाखाली महानगरपालिका उप आयुक्त (सुधारणा) म्हणून राहील.]

महानगरपालिका उप आयुक्त (सुधारणा) याची कार्ये.

[१][**५६ब.** (१) महानगरपालिका उप आयुक्त (सुधारणा) हा आयुक्तास दुय्यम असेल व तो आयुक्ताच्या आदेशांच्या अधीनतेने आयुक्त वेळोवेळी निदेश देईल त्यानुसार आयुक्ताच्या कर्तव्यांपैकी शहराच्या सुधारणेसंबंधात असतील अशा अधिकारांचा वापर करील व अशी कर्तव्ये पार पाडील आणि महानगरपालिका उप आयुक्ताची अशी इतर कर्तव्ये पार पाडील :

परंतु, आयुक्त तो महानगरपालिका उप आयुक्त (सुधारणा) यास वेळोवेळी नेमून देईल असे अधिकार व कर्तव्ये यासंबंधी महानगरपालिकेस कळवील.

(२) उक्त अधिकारपदाच्या पदावधीत व त्यापरत्वे महानगरपालिका उप आयुक्त (सुधारणा) याने पार पाडलेल्या सर्व कृती व गोष्टी या सर्व प्रयोजनांसाठी, आयुक्ताने पार पाडल्याचे व केल्याचे मानण्यात येईल.]

## आयुक्त, [२][संचालक] व उप आयुक्त यांचे पारिश्रमिक

आयुक्ताचे वेतन.

**५७.** (१) आयुक्तास [३][[४][[५][राज्य] शासन वेळोवेळी निर्धारित करील त्याप्रमाणे] मासिक वेतन] मिळेल, आणि त्याच्या बदल्यात तो यात यापुढे तरतूद केलेल्या बाबी सोडून एरव्ही, अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमितीत विहित केलेली आपल्या अधिकारपदाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी आपला सर्व वेळ खर्च करील व त्याकडे आपले सर्व लक्ष पुरवील :

आयुक्ताला हाती घेता येतील अशी, या अधिनियमाच्या कक्षेबाहेरील कर्तव्ये.

(२) परंतु, आयुक्तास कोणत्याही वेळी,–

(अ) मुंबई बंदर विश्वस्ताचे अधिकारपद धारण करता येईल ;

(ब) महानगरपालिकेच्या मंजुरीने, कोणत्याही स्थानिक चौकशीच्या प्रयोजनाकरिता किंवा स्थानिक महत्त्वाच्या किंवा हिताच्या उद्दिष्टाने पुरःसरणार्थ रचना केलेल्या कोणत्याही समितीवर काम करता येईल.

[६]* * * * *

---

[१] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ७ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम १० अन्वये हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २६(१) अन्वये मूळ शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ४ अन्वये "राज्य शासन निर्धारित करील त्याप्रमाणे तीन हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल आणि दोन हजार रुपयांपेक्षा कमी नसेल इतके" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[६] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २६(२) अन्वये पोट-कलम (३) वगळण्यात आले.

[४][संचालकाचे व उप आयुक्ताचे] पारिश्रमिक.

**५८.** [१][संचालकास आणि उप आयुक्तास] [२][महानगरपालिका राज्य शासनाच्या मान्यतेने वेळोवेळी निर्धारित करील असे मासिक वेतन मिळेल :

परंतु, [३][संचालकाच्या किंवा उप आयुक्ताच्या] वेतनात, त्याच्या अधिकारपदाच्या कालावधीमध्ये, त्यास अहितकारक होईल अशा रीतीने, फेरफार केले जाणार नाहीत.]

महानगरपालिका उप आयुक्त (सुधारणा) याचे पारिश्रमिक.

[५][**५८अ.** महानगरपालिका, उप आयुक्त (सुधारणा) यास, [६][महानगरपालिका राज्य शासनाच्या मान्यतेने, वेळोवेळी निर्धारित करील असे] मासिक वेतन मिळेल] :

परंतु, मुंबई शहर नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९३३ याच्या प्रारंभाच्या वेळी मुंबई शहर सुधारणा विश्वस्त व्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ याच्या कलम २६ खाली मुख्य अधिकाऱ्याचे अधिकारपद धारण करणारी व्यक्ती ही, कलम ५६ क, पोट-कलम (४) च्या तरतुदींखाली महानगरपालिका उप आयुक्त (सुधारणा) म्हणून राहील तोवर तिला दोन हजार पाचशे रुपये मासिक वेतन मिळेल : १९२५ चा मुंबई १६. १९३३ चा मुंबई १३.

परंतु आणखी असे की, उक्त व्यक्तीस ५६क याच्या पोट-कलम (१) खाली महानगरपालिका उप आयुक्त (सुधारणा), म्हणून नेमण्यात आले असेल तर, तिला मुंबई शहर नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९३३, याच्या प्रारंभापासून, महानगरपालिका वेळोवेळी निर्धारित करील असे [७][* * * *] मासिक वेतन मिळेल : १९३३ चा मुंबई १३.

[८][परंतु आणखी असे की, महानगरपालिका उप आयुक्त (सुधारणा) यांच्या वेतनात, त्याच्या अधिकारपदाच्या कालावधीमध्ये, त्यास अहितकारक होईल अशा रीतीने फेरफार केले जाणार नाहीत.]

---

[१] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम ११ (अ) अन्वये "महानगरपालिका उप आयुक्त" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम २ अन्वये दिनांक १ एप्रिल १९६६ पासून मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम ११(ब) अन्वये "महानगरपालिका उप आयुक्त" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ११(क) अन्वये "महानगरपालिका उप आयुक्त" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[५] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ८ अन्वये नवीन कलम ५८अ समाविष्ट करण्यात आले.

[६] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ३(अ) अन्वये १ एप्रिल १९६६ पासून हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १९ अन्वये "दोन हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल इतके" हा मजकूर वगळण्यात आला.

[८] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ३(ब) अन्वये १ एप्रिल १९६६ पासून हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

## आयुक्त, [१][संचालक] किंवा उप आयुक्त यांच्या रजा काळातील अनुपस्थितीसंबंधी तरतुदी

आयुक्त, [७][संचालक] किंवा उप आयुक्त यांस अनुपस्थितीची परवानगी देणे.

**५९.** (१) (अ) [२][[३][राज्य] शासनास] [४][स्थायी समितीच्या] संमतीने, आयुक्तास वेळोवेळी अनुपस्थितीची परवानगी देता येईल ;

(ब) [५][आयुक्तास,] [६][संचालकास किंवा उप आयुक्तास] वेळोवेळी अनुपस्थितीची परवानगी देता येईल.

रजेवर असताना द्यावयाचा भत्ता.

(२) आयुक्त किंवा [८][संचालक किंवा उप आयुक्त] याप्रमाणे रजेवर असताना द्यावयाचा भत्ता त्याच्या वेतनाहून कमी नसेल अशी जी रक्कम अनुक्रमे [२][[३][राज्य] शासन] किंवा महानगरपालिका निश्चित करील त्या रकमेइतका असेल, परंतु आयुक्त [९][किंवा संचालक किंवा उप आयुक्त] हा [१०][सरकारी अधिकारी] असेल तर अशा भत्त्याची रक्कम ही, त्याच्या वर्गातील अधिकाऱ्यांच्या रजेच्या भत्त्याच्या संबंधात त्यावेळी जे नियम अंमलात असतील त्या नियमांन्वये विनियमित करण्यात येईल.

कार्यकारी आयुक्त किंवा कार्यकारी [१३][संचालक] किंवा उप आयुक्त यांची नेमणूक व पारिश्रमिक.

(३) आयुक्ताच्या किंवा [११][संचालकाच्या किंवा उप आयुक्ताच्या] कोणत्याही अनुपस्थितीच्या काळात [२][[३][राज्य] शासन] किंवा महानगरपालिका एखाद्या व्यक्तीस यथास्थिति, आयुक्त म्हणून किंवा [१२][संचालक किंवा उप आयुक्त म्हणून] काम करण्याकरिता नेमू शकेल. याप्रमाणे नेमलेली प्रत्येक व्यक्ती, ज्या व्यक्तीच्या जागी काम करण्यासाठी तिला नेमले असेल त्या व्यक्तीस या अधिनियमान्वये व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर अधिनियमितीअन्वये प्रदान केलेले अधिकार वापरील व तिच्यावर लादलेली कर्तव्ये पार पाडील. तसेच अशा व्यक्तीवर जी दायित्वे असतील ती सर्व दायित्वे त्याच्याकडे येतील व तिला जे निर्बंध व ज्या शर्ती लागू असतील ते सर्व निर्बंध व त्या सर्व

---

[१] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम १२(अ) अन्वये हा शब्द समविष्ट करण्यात आला.
[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये “ गव्हर्नर इन कौन्सिल ” या शब्दाऐवजी व्याकरणिक रुपभेदांसह “ प्रांतिक सरकार ” हे शब्द दाखल करण्यात आले.
[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये “ प्रांतिक ” या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.
[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १४ अन्वये “ महापौरासह परिषदेच्या ” या मजकुराऐवजी “ स्थायी समितीच्या ” हा मजकूर दाखल करण्यात आला.
[५] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २० (ब) अन्वये “ महानगरपालिकेस ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[६] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम १२(ब) (एक) अन्वये मूळ शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.
[७] वरील अधिनियमाच्या कलम १२ (ब) (दोन) अन्वये हा शब्द समाविष्ट करण्यात आला.
[८] वरील अधिनियमाच्या कलम १२ (क) (एक) अन्वये “ उप आयुक्त ” या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.
[९] वरील अधिनियमाच्या कलम १२ (क) (दोन) अन्वये “ किंवा उप आयुक्त ” या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.
[१०] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये “ राजाचा सेवक ” या शब्दाऐवजी “ सरकारी अधिकारी ” हे शब्द दाखल करण्यात आले.
[११] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम १२ (ड) (एक) अन्वये “ उप आयुक्त ” या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.
[१२] वरील अधिनियमाच्या कलम १२ (ड) (दोन) अन्वये मूळ शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.
[१३] वरील अधिनियमाच्या कलम १२ (ई) अन्वये “ कार्यकारी उप आयुक्त ” या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

शर्ती अशा व्यक्तीस लागू होतील आणि तिला [१][आयुक्त, संचालक व उप आयुक्त] यांच्या बाबतीत कलमे ५७, [२][५८ आणि ५८क] यात विहित केलेल्या मर्यादेपर्यंत अनुक्रमे [३][[४][राज्य] शासन] किंवा महानगरपालिका निर्धारित करील असे मासिक वेतन मिळेल.

### आयुक्त, [५][संचालक] किंवा उप आयुक्त यांच्या निरर्हता

महानगरपालिकेबरोबर केलेल्या कोणत्याही [८][संविदेमध्ये] [९][आयुक्तांचा, संचालकाचा] व उप आयुक्ताचा हितसंबंध असता कामा नये.

**६०.** (१) महानगरपालिकेबरोबर, महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत [६]* * * * कोणत्याही व्यक्तीचा स्वतःचा किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल तर ती, आयुक्त [७][किंवा संचालक] किंवा उप आयुक्त म्हणून नेमली जाण्यास किंवा तशी असण्यास अर्ह असणार नाही.

(२) उपरोक्तप्रमाणे असेल अशा कोणत्याही संविदेत [१०]* * * * जो कोणताही आयुक्त [११][संचालक] किंवा उप आयुक्त स्वतः किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध संपादन करील तो यथास्थिति आयुक्त, [१२][ संचालक किंवा उप आयुक्त] म्हणून असण्याचे बंद होईल व त्याचे अधिकारपद रिकामे होईल.

(३) महानगरपालिकेबरोबर, महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत [१३]* * * * जो कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध धारण करण्यास कलम १६, खंड (ज) (ट) यांखाली पालिका सदस्यास परवानगी असेल व जो धारण केल्यामुळे पालिका सदस्य असण्यास तो निरर्ह ठरत नसेल अशा कोणत्याही हिश्श्यास किंवा हितसंबंधास या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.

---

[१] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम १२ (ड) (तीन) अन्वये " आयुक्त आणि उप आयुक्त " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ९ अन्वये " ५८ आणि ५८अ " हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " सरकार " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम १३ (अ) अन्वये हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

[६] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम २ (अ) अन्वये " अथवा महानगरपालिकेच्या नियंत्रणाखाली असलेल्या किंवा महानगरपालिकेने दिलेल्या किंवा तिच्या वतीने असलेल्या आयुक्ताच्या किंवा यथास्थिति उप आयुक्ताच्या नोकरीव्यतिरिक्त " हा मजकूर वगळण्यात आला.

[७] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम १३ (ब) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[८] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम २ (ड) अन्वये " संविदा इत्यादी " या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[९] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम १३ (ड) अन्वये " आयुक्त आणि उप आयुक्त " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[१०] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम २ (ब) अन्वये " किंवा सेवेत " हे शब्द वगळण्यात आले.

[११] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम १३ (क) (एक) अन्वये हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

[१२] वरील अधिनियमाच्या कलम १३ (क) (दोन) अन्वये " आयुक्त किंवा उप आयुक्त " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[१३] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम २ (क) अन्वये अथवा " महानगरपालिकेच्या " या शब्दांनी सुरू होणारा व " कोणत्याही नोकरीत " या शब्दांनी संपणारा मजकूर वगळण्यात आला.

## [१][(ग) महाव्यवस्थापक]

[२][**६०अ.** (१) महानगरपालिका, [३][राज्य] शासनाच्या मान्यतेच्या अधीनतेने, [४][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाचा] महाव्यवस्थापक म्हणून योग्य व्यक्तींची नेमणूक करील आणि तो— महाव्यवस्थापकाची नेमणूक.

(अ) आपल्या अधिकारपदाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी आपला सर्व वेळ खर्च करील व त्याकडे आपले लक्ष पुरवील :

परंतु, जी कोणतीही मानसेवी किंवा इतर प्रकारची नेमणूक स्वीकारल्यामुळे महाव्यवस्थापकास आपली कर्तव्ये पार पाडण्यात व्यत्यय येणार नाही असे महानगरपालिकेस वाटत असेल तर ती नेमणूक स्वीकारण्याची परवानगी महानगरपालिका त्यास देऊ शकेल ;

(ब) महाव्यवस्थापकास, महानगरपालिका [३][राज्य] शासनाच्या मान्यतेने वेळोवेळी निर्धारित करील असे मासिक वेतन मिळेल ; [५][मात्र महाव्यवस्थापकाच्या वेतनात त्याच्या अधिकारपदाच्या कालावधीमध्ये त्यास अहितकारक होईल अशा रीतीने फेरबदल केला जाणार नाही] ;

(क) महाव्यवस्थापकास, त्याने गैरवर्तणूक केल्याबद्दल किंवा त्याने आपल्या पदाची कर्तव्ये पार पाडण्यात हयगय केल्याबद्दल किंवा ती पार पाडण्यात तो अक्षम असल्याबद्दल, एकूण पालिका सदस्यांपैकी निम्म्याहून कमी नसतील इतक्या सदस्यांनी मतदान केले असता कोणत्याही वेळी अधिकारपदावरून दूर करता येईल.

(२) महाव्यवस्थापकाची नेमणूक प्रथमतः पाच वर्षांहून अधिक नसेल इतक्या कालावधीसाठी करण्यात येईल व ती, वेळोवेळी [३][राज्य] शासनाच्या मंजुरीने, एकावेळी पाच वर्षांहून अधिक नसेल इतक्या कालावधीने वाढविता येईल.

[६]* * *

**६०ब.** (१) [७][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीस महानगरपालिकेच्या अनुमतीने] महाव्यवस्थापकास वेळोवेळी अनुपस्थितीची परवानगी देता येईल. महाव्यवस्थापकास अनुपस्थितीची परवानगी.

(२) महाव्यवस्थापक याप्रमाणे रजेवर असताना त्यास द्यावयाचा भत्ता, त्याच्या वेतनाच्या रकमेहून अधिक नसेल अशी जी रक्कम महानगरपालिका निश्चित करील त्या रकमेइतका असेल.

(३) महाव्यवस्थापक रजेवर असेल त्या काळात [८][समितीस, महानगरपालिकेच्या अनुमतीने] एखाद्या व्यक्तीस महाव्यवस्थापक म्हणून काम करण्याकरिता नेमता येईल. याप्रमाणे नेमलेली प्रत्येक व्यक्ती महाव्यवस्थापकास जे अधिकार प्रदान करण्यात आलेले असतील त्या अधिकारांचा वापर करील व त्याच्यावर जी कर्तव्ये लादण्यात आली असतील ती कर्तव्ये पार पाडील आणि ती महाव्यवस्थापकावर असतील त्या दायित्वांच्या, निर्बंधांच्या व शर्तींच्या अधीन असेल, अशा व्यक्तीस महानगरपालिका निर्धारित करील असे महाव्यवस्थापकाच्या वेतनाहून अधिक नसेल इतके मासिक वेतन मिळेल.

---

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम २९ (ड) अन्वये " (ड) महाव्यवस्थापक " या शीर्षकाऐवजी हे शीर्षक दाखल करण्यात आले.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ७ अन्वये कलमे ६०अ ते ६०क समाविष्ट करण्यात आली.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " ह्या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ४ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ६ अन्वये पोट-कलम (३) वगळण्यात आले.

[७] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १५ (अ) अन्वये " बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या प्रभारी सदस्यास महापौराच्या अनुमतीने " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम १५ (ब) अन्वये " महापौरास " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

महाव्यवस्थापकाच्या निरर्हता.

**६०क.** (१) महानगरपालिकेबरोबर, महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत [१]* * * * कोणत्याही व्यक्तीचा स्वतःचा किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल तर, ती महाव्यवस्थापक म्हणून नेमली जाण्यास किंवा महाव्यवस्थापक असण्यास अर्ह असणार नाही.

(२) जो कोणताही महाव्यवस्थापक, उपरोक्तप्रमाणे असेल अशा कोणत्याही संविदेत [२]* * * * स्वतः किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध संपादन करील, तो महाव्यवस्थापक म्हणून असण्याचे बंद होईल.

(३) महानगरपालिकेबरोबर, महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने असलेल्या कोणत्याही संविदेत [३]* * * * जो कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध धारण करण्यास कलम १६, पोट-कलम (२), खंड (ज) आणि (ट) खाली पालिका सदस्यास परवानगी असेल व जो धारण केल्यामुळे पालिका सदस्य होण्यास तो निरर्ह ठरत नसेल अशा कोणत्याही हिश्श्याच्या किंवा हितसंबंधाच्या बाबतीत किंवा [४][मुंबई वीजपुरवठा व ट्राममार्ग कंपनी लिमिटेड] हिच्यात असलेल्या कोणत्याही हिश्श्याच्या किंवा इतर हितसंबंधाच्या बाबतीत या कलमातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही.]

मुख्य लेखा अधिकाऱ्याची नेमणूक.

[५][**६०ड.** (१) [६][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समिती] योग्य व्यक्तीची, [७][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाचा] मुख्य लेखा अधिकारी म्हणून नेमणूक करील. तो अधिकारी—

(अ) [७][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाचे] लेखे ठेवील आणि [८][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समिती] किंवा महाव्यवस्थापक फर्मावील अशा, उपक्रमाच्या लेख्यांच्या संबंधातील कर्तव्ये पार पाडील ;

(ब) तो आपला संपूर्ण वेळ आणि लक्ष आपल्या पदीय कर्तव्याला वाहील ;

(क) [९][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समिती] महानगरपालिकेच्या मान्यतेने वेळोवेळी निर्धारित करील असे मासिक वेतन त्याला मिळेल ; मात्र अशा अधिकाऱ्याच्या वेतनामध्ये त्याच्या अधिकारपदाच्या कालावधीमध्ये त्याला अहितकारक ठरतील असे फेरबदल करण्यात येणार नाहीत ;

(ड) गैरवर्तणुकीबद्दल किंवा त्याच्या अधिकारपदाच्या कर्तव्यांकडे दुर्लक्ष केल्याबद्दल किंवा त्यासाठी अक्षम असल्याबद्दल [१०][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीकडून] कोणत्याही वेळी अधिकारपदावरून काढून टाकला जाण्यास तो पात्र असेल.]

[११]* * * *

---

[१] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ३ (अ) अन्वये " अथवा महानगरपालिकेच्या " या शब्दांनी सुरू होणारा व " कोणत्याही नोकरीत " या शब्दांनी संपणारा मजकूर वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ब) अन्वये " किंवा सेवा " हे शब्द वगळण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३ (क) अन्वये " किंवा सेवा " हे शब्द वगळण्यात आले.

[४] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) (७) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ४ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[६] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १६ (अ) अन्वये " महापौरासह परिषद " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची ४(३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १६ (ब) अन्वये " बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमांचे प्रभारी सदस्य " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] वरील अधिनियमाच्या कलम १६ (क) अन्वये " महापौरासह परिषद " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१०] वरील अधिनियमाच्या कलम १६ (ड) अन्वये " महापौरासह परिषदेकडून " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[११] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ७ अन्वये पोट-कलम (२) वगळण्यात आले.

## प्रकरण तीन

## महानगरपालिका प्राधिकरणांची कर्तव्ये व अधिकार

### महानगरपालिकेची आवश्यक व स्वविवेकाधीन कर्तव्ये

महानगर-पालिकेने तरतूद करावयाच्या बाबी.

**६१.** जी साधने वापरण्यास किंवा जी उपाययोजना करण्यास महानगरपालिका विधितः सक्षम असेल अशी कोणतीही साधने वापरून किंवा अशी कोणतीही उपाययोजना करून पुढील गोष्टींपैकी प्रत्येक गोष्टीसाठी पुरेशी तरतूद करणे महानगरपालिकेचे अवश्य कर्तव्य असेल त्या गोष्टी अशा :—

(अ) गटारे व जलनिस्सारणाची कामे आणि सार्वजनिक शौचकूप, मुताऱ्या व तत्सम सोयीची साधने बांधणे, ती सुस्थितीत ठेवणे व साफ करणे ;

[१][(अअ) आर्थिक व सामाजिक विकासाच्या योजना आखणे ;

(अब) नागरी वनीकरण, पर्यावरण संरक्षण आणि पारिस्थितिकीय गोष्टीस चालना देणे ;]

(ब) सार्वजनिक व खाजगी प्रयोजनांसाठी पाणीपुरवठा करणारी पाण्याची बांधकामे व साधने उभी करणे व ती सुस्थितीत ठेवणे ;

(क) विष्ठा व इतर गदळ व सर्व प्रकारची राख, केरकचरा व कचरा साफ करणे, हलविणे वा त्यांची विल्हेवाट लावणे ;

(ड) आरोग्यास हानिकारक वस्त्या सुधारणे, उपद्रवकारक झाडे-झुडपे काढून टाकणे व सर्वसाधारणपणे सर्व उपद्रवांचे उपशमन करणे ;

(ई) प्रेतांची व्यवस्था लावण्यासाठी असलेल्या जागांचे विनियमन करणे आणि उक्त प्रयोजनांसाठी नवीन जागांची तरतूद करणे ;

(फ) जन्म-मृत्यूंची नोंदणी करणे ;

१८७७ चा १. [२][(फफ) मुंबईचा लसटोचणी अधिनियम, १८७७, याच्या तरतुदींअनुसार सार्वजनिक लसटोचणीची व्यवस्था करणे ;]

(ग) घातक रोगांच्या प्रसारास प्रतिबंध करण्यासाठी व आळा घालण्यासाठी उपाययोजना करणे ;

[२][(गग) सार्वजनिक रुग्णालये व दवाखाने स्थापन करणे आणि ते सुस्थितीत ठेवणे आणि सार्वजनिक वैद्यकीय सहाय्यासाठी आवश्यक असतील अशा इतर उपाययोजना करणे ;]

(ह) सार्वजनिक बाजार व कत्तलखाने बांधणे आणि ते सुस्थितीत ठेवणे, आणि सर्व बाजार व कत्तलखाने यांचे विनियमन करणे ;

(जे) घृणास्पद व घातक उदिमांचे विनियमन करणे ;

(के) अग्निशामक पथक ठेवणे व आगीपासून जीविताचे व मालमत्तेचे रक्षण करणे ;

(ल) धोकादायक इमारती आणि जागा सुरक्षित करणे किंवा काढून टाकणे ;

(म) सार्वजनिक सडका, पूल, अधःप्रणाल, सेतू व तत्सम गोष्टी बांधणे, त्या सुस्थितीत ठेवणे, त्यात फेरफार करणे व त्यात सुधारणा करणे [३][आणि तसेच, रस्त्यांवरील वाहनांचे मार्ग व पादचारी रहदारी सुरक्षित व सुव्यवस्थित ठेवण्यासाठी इतर उपाययोजना करणे ;]

(न) सार्वजनिक सडकांवर दिवाबत्तीची व्यवस्था करणे, पाणी शिंपणे व त्या साफ करणे ;

(ओ) सडका, पूल व इतर सार्वजनिक जागा यांतील किंवा यांवरील अडथळे व प्रक्षेप काढून टाकणे ;

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ३५ अन्वये हे खंड समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९०७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३, कलम ९(१) अन्वये खंड (फफ) व (गग) समाविष्ट करण्यात आले.

[३] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

(प) सडकांस नावे देणे व परिवास्तूंना क्रमांक देणे ;

(क्यू) [१][त्या त्या वेळी अंमलात असलेल्या शासकीय सहायक अनुदान संहितेअनुसार [२][[३][राज्य] शासनाकडून] मिळणाऱ्या इमारत अनुदानांस नेहमी अधीन राहून] प्राथमिक शिक्षणासाठी शाळा चालविणे, त्यांना सहाय्य करणे व त्यांच्यासाठी जागेची व्यवस्था करणे ;

(र) महानगरपालिका कार्यालय व महानगरपालिकेमध्ये निहित असलेली सर्व सार्वजनिक स्मारके व इतर मालमत्ता सुस्थितीत ठेवणे ;

[४][(स) मुंबई शहर सुधारणा विश्वस्त व्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ या खाली मुंबई शहराच्या सुधारणेकरिता रचना करण्यात आलेल्या विश्वस्त मंडळाचे अधिकार, कर्तव्ये, मत्ता व दायित्वे महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यातून निर्माण झाल्यामुळे व मुंबई शहर नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९३३ याअन्वये महानगरपालिकेवर लादण्यात आलेली आबंधने ; १९२५ चा मुंबई १६. १९३३ चा मुंबई १३.

(ट) [५][बृहन्मुंबईची] सुधारणा.]

[७][मुंबई]तील वैद्यकीय परिसंस्था चालविण्यासाठी महानगरपालिकेने [३][राज्य] शासनास दरमहा रक्कम देणे.

[६][**६२.** (१) महानगरपालिका प्रत्येक महिन्याच्या पहिल्या दिवशी चौतीस हजार पाचशे एकेचाळीस रुपये दहा आणे आणि आठ पै इतक्या रकमेची तरतूद करील व ती [२][[३][राज्य] शासनास] देईल आणि अशा दरमहा भरलेल्या रकमेच्या मोबदल्यात [२][[३][राज्य] शासन]अनुसूची " प " मध्ये निर्दिष्ट केलेल्या परिसंस्थांवर नियंत्रण ठेवणे व त्या चालविणे या गोष्टी चालू ठेवील.

(२) कलम ६१ चा खंड (छछ) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, दर महिन्यास वर दिल्याप्रमाणे रकमा दिल्यावर उक्त परिसंस्था चालविण्यासाठी महानगरपालिकेने पुरेशी तरतूद केली आहे असे मानले जाईल आणि त्या परिसंस्थांच्या बाबतीत आणखी कोणताही खर्च करण्यास ती दायी असणार नाही.]

महानगरपालिकेने सार्वजनिक रुग्णालयांत व दवाखान्यांत आकारावयाची फी.

[८][**६२अ.** कलम ६१, खंड (छछ) खाली स्थापन केलेल्या व चालविण्यात येणाऱ्या सार्वजनिक रुग्णलयांत व दवाखान्यांत आणि करण्यात आलेल्या इतर उपाययोजनांच्या संबंधात महानगरपालिका विहित करील अशी कोणतीही फी असल्यास, ती आकारता येईल.]

---

[१] सन १९०७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३, कलम ९ (२) अन्वये हे शब्द जादा दाखल करण्यात आले.
[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे " सरकार " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.
[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.
[४] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम १० अन्वये नवीन खंड (स) आणि (ट) समाविष्ट करण्यात आले.
[५] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची ४(१) अन्वये " ग्रेटर बॉम्बे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[६] सन १९०७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३, कलम १० अन्वये कलम ६२ ऐवजी कलमे ६२ ते ६२ड बदली दाखल करण्यात आली.
[७] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची ४(२) अन्वये " बॉम्बे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[८] कलमे ६२अ व ६२क १ मार्च १९०९ रोजी अंमलात आली. पहा, मुं.स.रा., १९०९, भाग एक, पृष्ठ २२९.

[१][**६२ब.** प्राथमिक शिक्षणाच्या संबंधातील [२][[३][राज्य] शासनाच्या] उत्तर दायित्वाच्या बाबतीत [२][[३][राज्य] शासनाच्या] सर्वसाधारण धोरणात कोणत्याही वेळी बदल झाला तर, असा बदल झाल्यामुळे एखाद्या शहर नगरपालिकेला जेवढा लाभ होईल तेवढाच लाभ महानगरपालिकेस मिळण्याचा हक्क असेल.]

प्राथमिक शिक्षणाच्या संबंधात [३][राज्य] शासनाच्या उत्तर दायित्वाच्या बाबतीत राज्य शासनाच्या धोरणात बदल झाल्यामुळे महानगर-पालिकेस होणाऱ्या लाभाची व्याप्ती.

[४][**६२बब.** राज्य शासन, महानगरपालिकेमध्ये पूर्णतः किंवा अंशतः निहित असलेल्या प्राथमिक शाळातील आणि नगरपालिका निधीतून देण्याजोग्या अनुदानाच्या सहाय्याने पूर्णतः किंवा अंशतः चालविण्यात येणाऱ्या शाळांतील विषय, अभ्यासक्रम, पाठ्यपुस्तके आणि अध्यापनाचा दर्जा यांच्या बाबतीत आवश्यक वाटतील असे सर्व निदेश महानगरपालिकेला देण्याचा राज्य शासनास अधिकार असेल, आणि महानगरपालिका अशा निदेशांचे अनुपालन करील.]

शाळांतील विषय वगैरेंच्या संबंधातील राज्य शासनाचे निदेश.

[५][**६२क.** (१) महानगरपालिकेमध्ये पूर्णतः किंवा अंशतः निहित असलेल्या सर्व प्राथमिक शाळा आणि महानगरपालिका निधीतून देण्याजोग्या अनुदानाच्या सहाय्याने पूर्णतः किंवा अंशतः चालविण्यात येणाऱ्या सर्व शाळा [२][[३][राज्य] शासनाने] शाळांच्या निरीक्षणासाठी नेमलेल्या सर्व अधिकाऱ्यांना सर्व वेळी खुल्या असतील, आणि निरीक्षण करण्याच्या किंवा परीक्षा घेण्याच्या प्रयोजनाकरिता अशा कोणत्याही शाळेला भेट देण्यासाठी अशा कोणत्याही अधिकाऱ्यास सर्व वाजवी सवलती देण्यात येतील.

प्राथमिक शाळा व अनुदानांच्या सहाय्याने चालविण्यात येणाऱ्या शाळा निरीक्षणासाठी [३][राज्य] शासनाने नेमलेल्या अधिकाऱ्यांना खुल्या असणे.

---

[१] सन १९२० चा मुंबई अधिनियम क्रमांक १५, कलम २० अन्वये मूळ कलम ६२ब ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाद्वारे “ सरकार ” या शब्दाऐवजी “ प्रांतिक सरकार ” हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये “ प्रांतिक ” या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ३० अन्वये कलम ६२ बब समाविष्ट करण्यात आले.

[५] कलम ६२अ व ६२क १ मार्च १९०९ रोजी अंमलात आली. पहा मु.स.रा. १९०९,भाग एक पृष्ठे २२९.

(२) अशा कोणत्याही शाळेसंबंधाने, अशा कोणत्याही अधिकाऱ्याने केलेल्या प्रत्येक शिफारशीचा [१][महानगरपालिका] रीतसर विचार करील आणि लागोलाग [१][महानगरपालिका] तिच्या मते आवश्यक असेल अशी उपाययोजना करील आणि एखाद्या विशिष्ट प्रकरणी महानगरपालिकेचा निर्णय आणि तिने केलेली उपाययोजना कळविण्याविषयी [२][शिक्षण संचालकाने] विनंती केली असेल तर असा कोणताही निर्णय घेण्यात किंवा कार्यवाही करण्यात आली असेल तर त्याबाबत त्या अधिकाऱ्याला तसे कळवील.

(३) महानगरपालिका शाळांहून अन्य प्राथमिक शाळांना सहाय्य करण्याकरिता देण्यात येणाऱ्या अनुदानांशी संबंध असलेल्या सर्व बाबतीत [१][महानगरपालिका] शासकीय सहाय्य अनुदान संहितेच्या तरतुदींअनुसार, तसेच [३][[४][राज्य] शासनाच्या] पूर्वमंजुरीने उक्त संहितेत महानगरपालिका वेळोवेळी जे कोणतेही फेरफार करील त्या फेरफारांच्या अधीनतेने आवश्यक शर्तींचे पालन करणाऱ्या शाळांना सहाय्य देईल.

पश्चिम भारतातील प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालयाकरिता महानगरपालिकेने वार्षिक रकमेची तरतूद करणे.

[५][**६२ड.** महानगरपालिका पश्चिम भारतातील प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालयासाठी प्रत्येक सरकारी वर्षाच्या प्रारंभी उक्त संग्रहालयाच्या प्रयोजनाकरिता पन्नास हजार रुपये इतक्या रकमेची तरतूद करील व ती संग्रहालयाच्या विश्वस्तांकडे देईल.]

वेड्या व्यक्तींची देखभाल करण्यासाठी महानगरपालिकेने तरतूद करणे.

[६][**६२ई.** [७][(१)] *फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८, प्रकरण चौतीस खाली ज्यांच्या बाबतीत बंदिवासात ठेवण्यासंबंधी आदेश अंमलात असेल अशा वेड्या व्यक्तींच्या व्यतिरिक्त शहरात राहणाऱ्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमितीखाली शहरांतून बाहेर नेलेल्या नादार वेड्या व्यक्तींना औषधोपचारासाठी शहरात किंवा त्या प्रयोजनार्थ योग्य ठिकाण म्हणून [३][[४][राज्य] शासन] अधिसूचनेद्वारे घोषित करील अशा शहरातील किंवा शहराबाहेरील कोणत्याही पागलखान्यात, रुग्णालयात किंवा गृहात देखभाल करण्याकरिता व त्यांच्यावर औषधोपचार करण्याकरिता [३][[४][राज्य] शासन] सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, वेळोवेळी, दरडोई विहित करील अशा दरांनी महानगरपालिका पैसे देईल :

१८९८ चा ५.

---

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ३१ अन्वये " शाळा समिती " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] मुंबई विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९५६ अन्वये मूळ मजकुराऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] भारतीय विधि अनुकूल परिषद आदेशान्वये " सरकार " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] विधि अनुकूलन आदेश १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ३२ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[६] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम १६ अन्वये नवीन कलम ६२ ई दाखल करण्यात आले.

[७] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम ४ (१) अन्वये या कलमाला मूळ कलमाचे पोट-कलम (१) असा फेरक्रमांक देण्यात आला.

*आता पहा—फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ (१९७४ चा २).

परंतु, कोणतीही वेडी व्यक्ती पूर्वोक्तप्रमाणे, कोणत्याही पागलखान्यात, रुग्णालयात किंवा गृहात दाखल करून घेतली गेली त्याच्या निकटपूर्वी ती अशा शहरात किमान एक वर्ष राहत असल्याखेरीज तिची देखभाल करण्यास व तिच्यावर औषधोपचार करण्यास महानगरपालिका या कलमाखाली उत्तरदायी असणार नाही :

१९१२ चा ४. [१][परंतु असे की, भारतीय वेड अधिनियम, १९१२, कलम ८८ च्या तरतुदींखाली उच्च न्यायालयाकडे अर्ज करण्यात आला असेल त्या बाबतीत, अशी वेडी व्यक्ती नादार नाही व अशा वेड्या व्यक्तींची तिच्या देखभालीसाठी उपयोजित करता येईल अशी मालमत्ता आहे किंवा तिची देखभाल करण्यास कायद्याने बांधलेली व पोसण्याची ऐपत असलेली अशी व्यक्ती अस्तित्वात आहे असे दाखविण्याची महानगरपालिकेस संधी दिल्यावाचून, अशा वेड्या व्यक्तींच्या देखभालीचा परिव्यय महानगरपालिकेने देण्याविषयी कोणताही आदेश देण्यात येणार नाही]:

परंतु आणखी असे की, या कलमाखाली [२][[३][राज्य] शासनाने] विहित केलेले दर हे, ज्या वेड्या व्यक्तींच्या देखभालीकरिता व औषधोपचाराकरिता महानगरपालिका या कलमाखाली दायी असेल तिच्या दरडोई देखभालीकरिता व औषधोपचाराकरिता आलेल्या एकूण परिव्ययाच्या निम्म्याहून अधिक असणार नाही.

[४][(२) या कलमाखाली ज्यांची देखभाल करण्यास व औषधोपचार करण्यास महानगरपालिका उत्तरदायी असेल त्या वेड्या व्यक्तींना ज्यात दाखल करण्यात आले असेल तो पागलखाना, रुग्णालय किंवा गृह यांचा प्रभारी अधिकारी, अशा पागलखान्यात, रुग्णालयात किंवा गृहात अटकावून ठेवलेल्या अशा प्रत्येक वेड्या व्यक्तीच्या देखभालीवर व तिच्यावरील औषधोपचारावर या प्रीत्यर्थ केलेल्या खर्चाचा तपशिलवार हिशेब ठेवील ; आणि त्या हिशेबाची एक प्रत महानगरपालिकेस पुरवील.]

महानगरपालिकेस स्वविवेकानुसार तरतूद करता येईल अशा गोष्टी.

**६३.** महानगरपालिकेस स्वविवेकानुसार, पुढील गोष्टींपैकी सर्व किंवा कोणत्याही गोष्टींसाठी वेळोवेळी पूर्णतः किंवा अंशतः तरतूद करता येईल :–

[५][(अ) गलिच्छ वस्त्यांची सुधारणा व त्यांचा दर्जा वाढविणे ;

(अअ) नागरी क्षेत्रातील गरीबी कमी करणे;]

[६][(ब) कलम ६१ चा खंड (क्यू) यात नमूद केलेल्या शैक्षणिक उद्दिष्टांहून अन्य इतर शैक्षणिक उद्दिष्टे पुरःस्कृत करणे ;

(क) ग्रंथालये, संग्रहालये व कलावीथी आणि वनस्पतिशास्त्रविषयक किंवा प्राणिशास्त्रविषयक संग्रह निर्माण करणे, त्यांना मदत देणे किंवा ते सुस्थितीत ठेवणे ;

(ड) सार्वजनिक उपवने व उद्याने आणि मनोरंजनासाठी जागा उभारणे व त्या सुस्थितीत ठेवणे ;

(ई) रस्त्यांच्या बाजूस व इतरत्र झाडे लावणे व त्यांची काळजी घेणे] ;

[७][(ई-१) महानगरपालिकेकडे निहित असलेला कोणताही सार्वजनिक रस्ता किंवा सार्वजनिक ठिकाण यांच्या कोणत्याही भागामध्ये वाहने उभी करून ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागांची किंवा ठिकाणांची तरतूद करणे ;]

(फ) इमारतींचे किंवा जमिनींचे सर्वेक्षण करणे ;

(ग) विवाह नोंदणी करणे ;

[८][(ह) जनगणना करणे ;]

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम ४ (१) अन्वये हे परंतुक दाखल करण्यात आले.

[२] भारतीय विधि अनुकूलन आदेशान्वये, " सरकार " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम ४ (२) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ३६ अन्वये हे खंड समाविष्ट करण्यात आले.

[६] सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम (२) (एक) अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (ब) ते (ई) दाखल करण्यात आले.

[७] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम २ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला आणि तो १५ ऑक्टोबर १९८८ पासून समाविष्ट करण्यात आल्याचे मानण्यात येईल.

[८] सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम २ (दोन) अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (ह) दाखल करण्यात आला.

(ज) मानविशेष प्राप्त झालेल्या व्यक्तींना देण्यासाठी मानपत्रे तयार करणे व ती त्यांना बहाल करणे ;

[१][(जज) सार्वजनिक जागी किंवा सार्वजनिक राबत्याच्या जागी संगीताची योजना करणे ;

(जजअ) लोकांची ने-आण करण्यासाठी ट्राममार्ग, बिनरुळाच्या ट्राम किंवा यंत्राच्या सहाय्याने चालणारी परिवहन साधने बांधणे, ती खरेदी करणे, त्यांची व्यवस्था राखणे, ती सुस्थितीत ठेवणे, त्यांचा विस्तार करणे व त्यांचे व्यवस्थापन करणे ;

(जजब) लोकांना विद्युत पुरवठा किंव गॅस पुरवठा करण्यासाठी कोणताही उपक्रम खरेदी करणे, तो चालविणे, त्याचे व्यवस्थापन करणे व त्याचा कारभार पाहणे किंवा अशा उपक्रमास अर्थसहाय्य करणे ;

(जजक) यापूर्वी निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी स्थावर किंवा जंगम मालमत्ता संपादन करणे यांत, त्यासंबंधीच्या अन्वेषण, सर्वेक्षण किंवा तपासणी याबाबतचा खर्च देणे किंवा अशा प्रयोजनांसाठी आवश्यक अशा इमारती बांधणे किंवा त्यांचे अनुकूलन करणे याचा समावेश होतो] ;

[२][(जजड) राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने राज्य शासन लादील अशा अटींच्या व शर्तींच्या अधीनतेने हा अधिनियम किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा याखाली महानगरपालिकेवर लादलेली कोणतीही कर्तव्ये पार पाडताना महानगरपालिकेला प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे उपयुक्त असतील अशा, बृहन्मुंबईमध्ये कोणत्याही सेवा पुरविण्यासाठी स्थापन केलेल्या किंवा स्थापन करावयाच्या अशा मर्यादेत दायित्व असणाऱ्या कोणत्याही कंपनीच्या किंवा सहकारी संस्थेच्या भाग-भांडवलात वर्गणी देणे ;]

[३][(जजई) महानगरपालिका क्षेत्राच्या हद्दीत वास्तव्य करणाऱ्या अनुसूचित जाती, अनुसूचित जनजाती, विमुक्त जाती व भटक्या जनजाती व नवबौद्ध यांच्याकरिता कल्याणकारी उपाययोजना आखणे व विशेषकरून, या वर्गांची स्थिती सुधारण्याकरिता राज्य शासन, वेळोवेळी निदेश देईल त्यानुसार उपाययोजना करणे ;]

(के) सार्वजनिक सुरक्षितता, आरोग्य, सौकर्य किंवा शिक्षण वृद्धिंगत होईल अशी यात या पूर्वी विनिर्देशपूर्वक न उल्लेखिलेली कोणतीही उपाययोजना करणे ;

[४][(ल) कोणताही सार्वजनिक स्वागत समारंभ, समारंभ किंवा करमणुकीचा कार्यक्रम यासाठी कोणतेही अंशदान देणे :

परंतु, कोणत्याही सरकारी वर्षामध्ये अशा अंशदानासाठी केलेला एकूण खर्च एक लाख रुपयांपेक्षा किंवा राज्य शासन याबाबतीत **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेअन्वये वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा, त्यापेक्षा अधिक असणाऱ्या रकमेपेक्षा अधिक असता कामा नये.]

---

[१] सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम २ (तीन) अन्वये खंड (जज) ऐवजी खंड (जज), (जजअ), (जजब), व (जजक) दाखल करण्यात आले.

[२] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ५ अन्वये खंड (जजड) समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ११ (अ) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ४ अन्वये " आणि राज्य शासनाच्या " या शब्दांनी सुरू होणाऱ्या व " अंशदान देता येईल " या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][(म) महानगरपालिकेला ज्या अटी व शर्ती लादणे आणि त्यासमवेत नियंत्रणाच्या व पर्यवेक्षणाच्या ज्या तरतुदी करणे योग्य वाटेल त्यांच्या अधीनतेने, [२][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रम] यांच्या कर्मचाऱ्यांना किंवा त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींना वैद्यकीय सुविधा पुरविण्यासाठी रुग्णालय स्थापन करण्याकरिता किंवा चालविण्याकरिता, मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० खाली नोंदणी केलेल्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेला कोणतेही अंशदान देणे.]

१९५० चा मुंबई २९.

कामे अभिकरणांनी पार पाडणे.

[३][**६३अ.** या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यान्वये महानगरपालिकेवर कोणतेही कर्तव्य लादण्यात आलेले असेल किंवा कोणतेही काम तिला नेमून देण्यात आलेले असेल, किंवा एखादी योजना राबवण्याचे काम महानगरपालिकेकडे सोपविण्यात आलेले असेल, त्या बाबतीत,—

(अ) महानगरपालिकेला स्वतःच अशी कर्तव्ये पार पाडता येतील, किंवा अशी कामे करता येतील, किंवा अशी योजना राबवता येईल ; किंवा

(ब) राज्य शासन देईल अशा निदेशांच्या आणि ठरवून देईल अशा अटींच्या व शर्तींच्या अधीन राहून, कोणत्याही अभिकरणाकरवी ती पार पाडण्याची, करण्याची किंवा राबविण्याची व्यवस्था करता येईल :

परंतु, महानगरपालिकेला अशा अभिकरण व्यवस्थेसाठी, राज्य शासन ठरवून देईल अशा अटींशी व शर्तींशी विसंगत नसलेल्या अटी व शर्तीदेखील विनिर्दिष्ट करता येतील.

पर्यावरणाच्या स्थितिबाबत अहवाल.

**६३ब.** [४][आयुक्त,] [५][बृहन्मुंबई]तील पर्यावरणाच्या स्थितीबाबतचा, राज्य शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात येतील अशा बाबींचा समावेश असलेला लगतपूर्ववर्ती वित्तीय वर्षासंबंधीचा अहवाल राज्य शासनाकडून वेळोवेळी विहित करण्यात येईल अशा पद्धतीने दरवर्षी ३१ जुलै पूर्वी महानगरपालिकेसमोर ठेवील.]

---

[१] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम (ब) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची ४(३) अन्वये " मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रम " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ३७ अन्वये कलमे ६३अ व कलम ६३ब समाविष्ट करण्यात आली.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १७ अन्वये " महापौर " या शब्दाऐवजी हा हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची ४(१) अन्वये " ग्रेटर बॉम्बे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## विविध महानगरपालिका प्राधिकरणांची कार्ये

[१][विविध महानगरपालिका प्राधिकरणांची कार्ये.

**६४.** (१) निरनिराळ्या महानगरपालिका प्राधिकरणांची आणि कलम ३९, ४०, ४१, ४९अ किंवा ५० खाली नेमलेल्या कोणत्याही समितीची कार्ये ही, या अधिनियमामध्ये किंवा त्याखाली विनिर्देशपूर्वक विहित करण्यात येतील अशी असतील.

(२) या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे जी तरतूद केली असेल तेवढे खेरीजकरून एरव्ही [२][बृहन्मुंबई]तील नगरपालिका शासन महानगरपालिकेमध्ये निहित असेल.

(२अ) महानगरपालिकेच्या कोणत्याही मालमत्तेस ज्यायोगे मोठ्या प्रमाणावर नुकसान पोहोचेल किंवा पोहोचण्याचा संभव असेल किंवा माणसांच्या किंवा प्राण्यांच्या जिवितास ज्यायोगे धोका पोहोचेल किंवा पोहोचण्याचा संभव असेल असा कोणताही अपघात किंवा अकल्पित घटना घडली असेल किंवा घडण्याचा धोका असेल किंवा कोणताही अनर्थ घडला असेल किंवा घडण्याचा संभव असेल अशा प्रसंगी महापौर आणि महापौरांच्या मान्यतेने आयुक्त, निकडीच्या परिस्थितीनुसार त्यास समर्थनीय व आवश्यक वाटेल अशी तातडीची उपाययोजना करील आणि केलेली उपाययोजना, त्याबाबतची कारणे व चालू अर्थसंकल्पीय अनुदानात अंतर्भूत न होणारा असा जो कोणताही परिव्यय अशा उपाययोजनांमुळे झाला असेल किंवा होण्याचा संभव असेल तो परिव्यय याविषयीचे प्रतिवेदन स्थायी समिती किंवा महानगरपालिका यांच्याकडे ताबडतोब पाठवील :

परंतु, महापौर किंवा आयुक्त यांपैकी एखादा अनुपस्थित असल्यास, जो कोणी उपस्थित असेल तो, असा तातडीचा निर्णय घेईल आणि कार्यवाही करील.

(३) ज्या ज्या वेळी या अधिनियमात स्पष्टपणे तसे निदेशित केलेले असेल त्या त्या वेळी, महानगरपालिकेच्या किंवा स्थायी समितीच्या किंवा सुधार समितीच्या किंवा शिक्षण समितीच्या मान्यतेच्या किंवा मंजुरीच्या अधिनतेने, तसेच या अधिनियमान्वये घातलेले इतर सर्व निर्बंध, मर्यादा व शर्ती यांच्या अधीनतेने, या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणण्यासाठी आवश्यक असलेला संपूर्ण कार्यकारी अधिकार आयुक्तामध्ये निहित असेल, तसेच तो—

(अ) या अधिनियमान्वये त्याच्याकडे विनिर्देशपूर्वक सोपविलेली सर्व कर्तव्ये पार पाडील प्रदान केलेल्या सर्व अधिकारांचा वापर करील ;

(ब) महानगरपालिका सचिव व त्याला लगत दुय्यम असणारे अधिकारी व कर्मचारी यांहून अन्य सर्व महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांची कर्तव्ये विहित करील. तसेच त्यांच्या कृत्यांवर व कामांवर पर्यवेक्षण व नियंत्रण ठेवील आणि कलम ८१ खाली त्या त्या वेळी अंमलात असलेल्या विनियमांच्या अधीनतेने, अशा अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची सेवा, त्यांची वेतने, विशेषाधिकार व भत्ते यासंबंधीचे सर्व प्रश्न निकालात काढील;

(क) या अधिनियमान्वये महाव्यवस्थापकाकडे सोपविलेली कर्तव्ये व त्यास प्रदान केलेले अधिकार त्याच्या अनुपस्थितीत किंवा अशी कर्तव्ये बजाविण्यात किंवा असे अधिकार वापरण्यात तो कसूर करील तेव्हा, बजावील व वापरील;

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १८ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची ४(१) अन्वये " ग्रेटर बॉम्बे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ड) आयुक्त, त्यास वेळोवेळी आवश्यक वाटतील त्याप्रमाणे, महाव्यवस्थापकास, त्याची कर्तव्ये पार पाडण्यामध्ये व त्याच्या अधिकारांचा वापर करण्यामध्ये निदेश देईल. असे कोणतेही निदेश देण्यात येतील त्या बाबतीत, महाव्यवस्थापक हा अशा निदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत किंवा आयुक्त महाव्यवस्थापकाच्या विनंतीवरून स्वतः होऊन देईल अशा वाढीव कालावधीत त्यांचे पालन करण्यास बांधलेला राहील; मात्र असा वाढीव कालावधी एकूण तीन महिन्यांपेक्षा अधिक असणार नाही. महाव्यवस्थापक वाढीव कालावधीत देखील निदेशांची अंमलबजावणी करण्यात कसूर करील तर जणू काही महाव्यवस्थापकाने आपल्या कर्तव्यांचे पालन करण्यात किंवा आपल्या अधिकारांचा वापर करण्यात कसूर केलेली असावी त्याप्रमाणे वरील खंड (क) खाली कृती करण्याचा आयुक्तास हक्क असेल :

परंतु, [१][बृहन्मुंबई वीज पुरवठा आणि परिवहन समिती], आपल्या एकूण सदस्यांपैकी तीनचतुर्थांशापेक्षा कमी नसणाऱ्या सदस्यांनी बहुमताने ठराव संमत करून महाव्यवस्थापकास, त्याला आयुक्ताकडून मिळालेल्या अशा कोणत्याही एका किंवा अनेक निदेशांची अंमलबजावणी करण्यास निरोध करू शकेल; आणि असा निरोध करण्यात आला असता महाव्यवस्थापकाने अशा कोणत्याही निदेशाची अंमलबजावणी करण्यात कसूर केल्याचे मानण्यात येणार नाही;

(ई) महानगरपालिकेचा, स्थायी समितीचा, सुधार समितीचा, बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाचा आणि शिक्षण समितीचा निर्णय अंमलात आणण्यासाठी जबाबदार असेलः

परंतु, यथास्थिति, महानगरपालिका, स्थायी समिती किंवा इतर समिती कोणताही निर्णय घेण्यापूर्वी आयुक्ताचा अभिप्राय प्राप्त करील आणि तो विचारात घेईल :

परंतु, आणखी असे की, आयुक्ताच्या मते, महानगरपालिकेने किंवा इतर कोणत्याही समित्यांनी संमत केलेला निर्णय किंवा घेतलेला निर्णय त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींच्या विरुद्ध असेल किंवा त्यामुळे महानगरपालिका निधीचा अपव्यय होईल किंवा त्यामुळे महानगरपालिकेची कोणतीही आवश्यक कर्तव्ये पार पाडण्यासाठी किंवा तत्सम इतर प्रयोजनासाठी नियत वाटप केलेला निधी इतरत्र वळविला जात आहे किंवा तो राज्य शासनाच्या धोरणांच्या विरुध्द असेल तर तो, अशा, निर्णयाची अंमलबजावणी करण्यापूर्वी, राज्य शासनाच्या निदेशासाठी पाठवील आणि राज्य शासन, आयुक्तांकडून असा निर्देश आल्यापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत, असा निर्णय अंमलात आणावा किंवा नाही याबाबत महानगरपालिकेला निदेश देईल आणि राज्य शासनाने दिलेला निदेश, यथास्थिति, महानगरपालिकेवर, किंवा संबंधित समितीवर बंधनकाराक असेल.

[२][(३अ) आयुक्ताच्या कोणत्याही प्रस्तावास, या अधिनियमाच्या तरतुदींन्वये घटित करण्यात आलेल्या कोणत्याही समितीच्या मंजूरीची किंवा मान्यतेची आवश्यकता असेल त्याबाबतीत, समिती, नगरपालिका सचिवाकडे तो प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर, समितीच्या लगतच घेण्यात आलेल्या सभेच्या दिनांकापासून पंचेचाळीस दिवसांच्या आत, असा कोणताही प्रस्ताव विचारात घेईल आणि तो प्रस्ताव निकालात काढील. मग अशा प्रस्तावाशी निगडीत बाब अशा सभेच्या कार्यसूचीवर घेतलेली असो किंवा नसो तसे न केल्यास, अशा प्रस्तावाला समितीने मंजुरी किंवा मान्यता दिलेली असल्याचे मानण्यात येईल, आणि तशा आशयाचा अहवाल आयुक्ताकडून महानगरपालिकेला पाठविण्यात येईल :

परंतु, अशी कोणतीही मानीव मंजुरी किंवा मान्यता, या अधिनियमाच्या किंवा त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींना अनुरुप असलेल्या प्रस्तावाच्या व्याप्तीपुरतीच मर्यादित असेल. ]

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) (४) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ८ अन्वये पोट-कलम (३अ) समाविष्ट करण्यात आले.

(४) ज्या ज्या वेळी या अधिनियमात स्पष्टपणे तसा निदेश देण्यात आला असेल त्या त्या वेळी महानगरपालिकेच्या किंवा बृहन्मुंबई वीज पुरवठा आणि परिवहन समितीच्या मान्यतेच्या अधीनतेने, तसेच या अधिनियमान्वये लादण्यात आलेल्या इतर सर्व निर्बंधाच्या, मर्यादांच्या व शर्तींच्या अधीनतेने, या अधिनियमाचे प्रकरण सोळा-अ याच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असलेला संपूर्ण कार्यकारी अधिकार महाव्यवस्थापकामध्ये निहित असेल; शिवाय तो—

(अ) या अधिनियमान्वये त्याच्याकडे विनिर्देशपूर्वक सोपविलेली सर्व कर्तव्ये पार पाडील व प्रदान केलेले सर्व अधिकार वापरील ; तसेच तो [१][बृहन्मुंबई वीज पुरवठा आणि परिवहन समिती ] त्याला जी इतर कर्तव्ये करण्यास फर्मावील अशी [२][बृहन्मुंबई वीज पुरवठा आणि परिवहन उपक्रमासंबंधीची ] इतर कर्तव्ये बजावील ;

(ब) प्रकरण सोळा-अ खाली नेमलेल्या सर्व महानगरपालिका अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची कर्तव्ये विहित करील. तसेच, त्यांच्या कृत्यांवर, कामांवर पर्यवेक्षण व नियंत्रण ठेवील आणि कलम ४६० व्ही खाली त्या त्या वेळी अंमलात आसलेल्या विनियमांच्या अधीनतेने, अशा अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची सेवा, त्यांची वेतने, विशेषाधिकार व भत्ते यासंबंधीचे सर्व प्रश्न निकालात काढील;

(क) [२][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमांशी ] संबंध असलेल्या महानगरपालिकेच्या कोणत्याही मालमत्तेला ज्यायोगे अतिशय नुकसान पोहोचेल किंवा पोहोचण्याचा संभव असेल किंवा त्या उपक्रमाच्या कोणत्याही भागाच्या संबंधात किंवा त्यापासून मानवी जीवितास ज्यायोगे धोका पोहोचेल किंवा पोहोचण्याचा संभव असेल असा कोणताही आकस्मिक अपघात किंवा अकल्पित घटना घडेल किंवा घडण्याचा धोका असेल त्या प्रसंगी निकडीच्या परिस्थितीवरून त्यास समर्थनीय किंवा आवश्यक वाटेल अशी तातडीची उपाययोजना करील; असे केल्यावर तो आपण केलेली उपाययोजना त्याबाबतची कारणे आणि कलम १३० मध्ये व्याख्या केलेल्या संज्ञेच्या अर्थांतर्गत अर्थसंकल्पीय प्रदानात अंतर्भूत न होणारा जो कोणताही खर्च अशा उपाययोजनेमुळे झाला असेल किंवा होण्याचा संभव असेल तो खर्च, याविषयीचे प्रतिवेदन [१][बृहन्मुंबई वीज पुरवठा आणि परिवहन समितीकडे ] ताबडतोब पाठवील.]

[३][ **कार्यालयीन कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध**

नागरिकांचा जाहीरनामा.

**६४अ.** (१) आयुक्त, महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१० याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत नागरिकांची सनद, सर्वसाधारण जनतेला अशा सुविधा किंवा सेवा पुरविण्यासाठी कालमर्यादेसह, महानगरपालिका कार्यालयाने किंवा विभागाने दिलेल्या सुविधा किंवा सेवा यांची यादी तयार करून प्रसिद्ध करील. २०११ चा महा. २९.

(२) नागरिकांच्या सनदेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीमध्ये, संबंधित प्राधिकाऱ्यांकडून कोणताही अंतिम निर्णय घेण्यात आला नाही तर, आवश्यक ती कार्यवाही न केल्याबद्दल त्यांना जबाबदार धरले जाईल आणि संबंधित अधिनियम, नियम किंवा विनियम यांमध्ये उल्लेखिलेली कारवाई त्यांच्यावर करण्यात येईल.

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची ४(४) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला

[२] वरील अधिनियमाच्या कलम २, अनुसूची ४(३) अन्वये मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९, कलम २ अन्वये हे शीर्षक आणि कलमे ६४अ, ६४ब, ६४क व ६४ड समाविष्ट करण्यात आली.

**६४ब.** (१) आयुक्त, त्याच्या हाताखाली काम करणाऱ्या, त्याला दुय्यम असणाऱ्या अधिकाऱ्यांकडे अंतिम निर्णय घेण्यासाठी सोपविण्यात आलेल्या अधिकारांची यादी प्रसिद्ध करील. अधिकार सोपविणे.

(२) आयुक्त, महानगरपालिकेच्या कोणत्याही कार्यालयातील किंवा विभागातील बाबींवर अंतिम निर्णय घेण्यास सक्षम असलेल्या संबंधित सांविधिक समितीकडे किंवा प्राधिकाऱ्याकडे कोणतीही बाब सादर करण्यासाठी शक्यतो अधिकाऱ्यांचे चार किंवा त्यापेक्षा कमी स्तर निर्धारित करील.

(३) दुय्यम अधिकाऱ्यांकडे सोपविलेल्या अधिकारांची सूची आणि बाब सादर करण्यासाठी असलेले अधिकाऱ्यांचे स्तर, महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा (दुसरी सुधारणा) अधिनियम, २०१० याच्या प्रारंभाच्या दिनांकापासून एका वर्षाच्या आत तयार करण्यात येतील व प्रसिद्ध करण्यात येतील व पुढील प्रत्येक वर्षाच्या १ एप्रिल रोजी ते अद्ययावत करण्यात येतील.

२०११ चा महा. २९.

**६४क.** (१) प्रत्येक महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी, त्यास नेमून दिलेले किंवा त्याच्याशी संबंधित असलेले शासकीय कर्तव्य व शासकीय काम अत्यंत दक्षतेने आणि शक्य तितक्या शीघ्रतेने पार पाडण्यास बांधील असेल : शिस्तभंगाची कारवाई.

परंतु, साधारणपणे कोणतीही फाईल महानगरपालिकेच्या कोणत्याही विभागातील किंवा कार्यालयातील कोणत्याही, महानगरपालिका अधिकाऱ्याकडे किंवा कर्मचाऱ्याकडे सात कामाच्या दिवसांपेक्षा अधिक काळ प्रलंबित राहणार नाही :

परंतु आणखी असे की, तात्काळ आणि तातडीच्या स्वरूपाच्या फाईली, त्या प्रकरणाच्या निकडीनुसार शक्य तितक्या शीघ्रतेने आणि प्राधान्याने, तात्काळ फाईल शक्यतो एका दिवसात किंवा दुसऱ्या दिवशी सकाळी आणि तातडीच्या स्वरूपाची फाईल शक्यतो चार दिवसांत कोणत्याही महानगरपालिका अधिकाऱ्याकडून किंवा कर्मचाऱ्याकडून निकालात काढण्यात येईल :

परंतु तसेच, महानगरपालिकेतील दुसऱ्या कोणत्याही विभागाकडे विचारार्थ पाठवावयाची आवश्यकता नसलेल्या आणि कोणत्याही सांविधिक समितीकडे सादर करावयाची आवश्यकता नसलेल्या फाईलींच्या संबंधात, महानगरपालिकेचा संबंधित विभाग त्या प्रकरणावर पंचेचाळीस दिवसांच्या आत निर्णय घेईल आणि आवश्यक ती कार्यवाही करील आणि दुसऱ्या कोणत्याही विभागाकडे विचारार्थ पाठवावयाची आवश्यकता असलेल्या, मात्र कोणत्याही सांविधिक समितीकडे विचारार्थ पाठवावयाची आवश्यकता नसलेल्या फाईलींच्या संबंधात, तीन महिन्यांच्या आत निर्णय घेण्यात येईल आणि आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

(२) एखाद्या महानगरपालिका अधिकाऱ्यास आणि कर्मचाऱ्यास नेमून दिलेले किंवा त्याच्याशी संबंधित असलेले शासकीय कर्तव्य किंवा शासकीय काम पार पाडण्यास जाणूनबुजून किंवा हेतुपुरस्सर विलंब लावणे किंवा दुर्लक्ष करणे ही, अशा महानगरपालिका अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या कर्तव्यपालनातील कसूर ठरेल आणि महानगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी त्यांना लागू असलेल्या अन्य कोणत्याही संबद्ध शिस्तविषयक नियमांखाली, यथोचित शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र होईल.

(३) कोणत्याही महानगरपालिका अधिकाऱ्याकडून किंवा कर्मचाऱ्याकडून झालेली कर्तव्यपालनातील अशी कोणतीही कसूर, संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याच्या लक्षात आल्यावर किंवा त्याच्या लक्षात

आणून दिल्यावर, अशा महानगरपालिका अधिकाऱ्याकडून किंवा कर्मचाऱ्याकडून झालेल्या, अशा कर्तव्यपालनातील कसुरीबाबत त्याची खात्री पटल्यावर, तो, कसूर करणाऱ्या अशा महानगरपालिका अधिकाऱ्याविरुद्ध किंवा कर्मचाऱ्याविरुद्ध, अशा महानगरपालिका अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या वार्षिक गोपनीय अहवालात अशा कर्तव्यपालनातील कसुरी संबंधातील नोंद करण्यासह संबद्ध शिस्तविषयक नियमांखाली, यथोचित शिस्तभंगाची कारवाई करील.

विवक्षित परिस्थितीत कलम ६४क च्या तरतुदी लागू न होणे.

**६४ड.** कलम ६४क मधील कोणतीही गोष्ट पुढील बाबींना लागू होणार नाही,—

(एक) न्यायप्रविष्ट बाबी ;

(दोन) लोक आयुक्त किंवा उप-लोक आयुक्त आणि अन्य घटनात्मक संस्था, आयोग, इत्यादी यांच्याकडे निर्देशित केलेली प्रकरणे ;

(तीन) न्यायिकवत बाबी ;

(चार) केंद्र किंवा अन्य राज्य शासनांच्या संबंधातील प्रकरणे ;

(पाच) विधि विधानाशी संबंधित बाबी ; आणि

(सहा) मुख्य धोरणात्मक बाबीसंबंधीची प्रकरणे. ]

महानगरपालिकेस समित्यांकडून कामकाज, इत्यादींचे उतारे मागवता येतील.

[१][**६५.** महानगरपालिकेस, कोणत्याही वेळी, या अधिनियमाखाली स्थापन करण्यात आलेल्या कोणत्याही कामकाजाचा कोणताही उतारा आणि अशा कोणत्याही समितीला या अधिनियमाद्वारे किंवा तद्न्वये जो कोणताही विषय हाताळण्याचा अधिकार देण्यात आला असेल त्या विषयाच्या संबंधातील किंवा त्याच्याशी संबंधित असलेले कोणतेही विवरणपत्र, विवरण, हिशेब किंवा अहवाल मागविता येईल ; आणि समिती, अशा प्रत्येक मागणीचे अवाजवी विलंब न लावता अनुपालन करील.]

महानगरपालिका दस्तऐवज हजर करण्याविषयी व विवरणपत्रे, अहवाल, वगैरे सादर करण्याविषयी [२][आयुक्तास] फर्मावू शकेल.

**६६.** (१) महानगरपालिकेस, कोणत्याही वेळी, पुढील गोष्टी करण्याविषयी [२][आयुक्तास] फर्माविता येईल :—

(अ) [२][आयुक्त] म्हणून त्याच्या कब्जात किंवा त्याच्या नियंत्रणाखाली असलेले अथवा त्याच्या कार्यालयात किंवा त्यास अधीन असलेल्या कोणत्याही नगरपालिका अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या कार्यालयात नोंदलेले किंवा दप्तरदाखल केलेले कोणतेही अभिलेख, पत्रव्यवहार, कोणताही आराखडा किंवा इतर दस्तऐवज हजर करणे ;

(ब) या अधिनियमाच्या प्रशासनाचा किंवा [३][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाखेरीज] [४][बृहन्मुंबईतील] नगरपालिका शासनचा संबंध असलेल्या किंवा त्याच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही विषयासंबंधीचे कोणतेही विवरणपत्र, आराखडा, अंदाज, विवरण, हिशेब किंवा आकडेवारी हजर करणे ;

---

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २५ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १९(अ) अन्वये 'महापौर' या शब्दाऐवजी 'आयुक्त' हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारासंह दाखल करण्यात आला.

[३] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची ४(३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या अनुसूची ४(१) अन्वये " ग्रेटर बॉम्बे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(क) या अधिनियमाच्या प्रशासनाची किंवा [१][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाखेरीज] [२][बृहन्मुंबईतील] नगरपालिका शासनाचा संबंध असलेल्या किंवा त्याच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही विषयावर स्वतः अहवाल पाठविणे किंवा त्याला अधीन असलेल्या कोणत्याही विभागप्रमुखाकडून असा अहवाल मागवून तो त्यावरील आपल्या अभिप्रायासह सादर करणे ;

(२) [३][यात यापुढे तरतूद केली असेल ते खेरीज करून एरव्ही, आयुक्त अशा प्रत्येक मागणीचे] गैरवाजवी विलंब न लावता अनुपालन करील ; आणि आयुक्ताने अशा कोणत्याही मागणीच्या अनुरोधाने दिलेला कोणताही आदेश पाळणे हे प्रत्येक नगरपालिका अधिकाऱ्याचे व कर्मचाऱ्याचे अवश्यकर्तव्य असेल.

(३) परंतु उपरोक्त मागणी करण्यात आल्यावर, तिचे तात्काळ अनुपालन केल्याने महानगरपालिकेच्या किंवा जनतेच्या हितास बाध येईल असे आयुक्त घोषित करील तर, त्याने तसे घोषित केल्यानंतर महानगरपालिकेची दुसरी सामान्य सभा ज्या वेळी भरेल त्यापेक्षा उशिरा नसेल इतक्या अवधीपर्यंत असे अनुपालन लांबणीवर टाकता येईल व त्याने तसे करणे विधिसंमत असेल. जर अशा सभेत किंवा त्यानंतरच्या कोणत्याही सभेत, महानगरपालिकेने पुन्हा अशी मागणी केली व त्याही वेळेस [४][आयुक्तास] त्याबाबत अनुपालन करने इष्ट वाटले नाही तर तो तसे घोषित करील. त्यानंतर महानगरपालिकेने [५][एक सदस्य निवडून देणे हे विधिसंमत असेल. असा सदस्य महापौर व स्थायी समितीचा सभापती यांची मिळून अथवा महापौर हाच स्थायी समितीचा सभापतीही असेल तर, महापौर व स्थायी समितीने आपल्या सदस्यांमधून निवडून दिलेला एक सदस्य यांची मिळून एक समिती होईल.] यात यापुढे तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, अशी समिती तिला उघड करण्यात येतील असे दस्तऐवज व बाबी यांचे अस्तित्व व आशय गुप्त राखण्यास वचनबद्ध राहील ; आणि [४][आयुक्ताने] त्यास माहित असलेले, त्याच्या नियंत्रणाखाली असलेले किंवा त्यास उपलब्ध असलेले व अशा मागणीत समाविष्ट झालेले सर्व लेख व बाबी अशा समितीस माहिती करून देणे व उघड करणे हे त्याच्यावर बंधनकारक असेल. अशी समिती अशा रितीने आपल्यापुढे ठेवलेल्या माहितीची, लेखांची व बाबींची दखल घेतल्यानंतर, महानगरपालिकेला अशा सर्व बाबी किंवा त्यांचा कोणताही भाग व अनेक भाग असल्यास त्यातील कोणता भाग उघड केला पाहिजे किंवा उघड करता कामा नये किंवा ठराविक काळपर्यंत गुप्त राखला पाहिजे किंवा गुप्त राखता कामा नये हे ठरवील आणि मतभेद असल्यास, ते बहुमताने निर्धारित करील. समितीचा असा निर्णय निर्णायक असेल आणि तो महानगरपालिकेस तिच्या लगतनंतरच्या सामान्य सभेच्या वेळी कळविण्यात येईल. त्यावेळीही महानगरपालिका तसे करण्यास फर्माविल तेव्हा, समितीचा निर्णय अंमलात आणण्याकरिता आवश्यक असतील असे दस्तऐवज हजर करणे व कोणताही अहवाल किंवा निवेदन सादर करणे [४][आयुक्तावर] बंधनकारक असेल.

[६][(४) [४][आयुक्तास] अधीन असलेले विभाग प्रमुख म्हणजे शहर अभियंता, जलव्यवस्था अभियंता, कार्यकारी आरोग्य अधिकारी, निर्धारक व समाहारक, मुख्य लेखापाल आणि शिक्षण अधिकारी हे होत.]

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनूसुची ४(३) अन्वये मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, अनुसूची ४(१) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १९(ब) अन्वये "आयुक्त अशा प्रत्येक मागणीचे" या मजकुरा-ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १९(अ) अन्वये महापौर या शब्दाऐवजी आयुक्त हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या, कलम १९(क) अन्वये मूळ मजकुरोवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम ३४ अन्वये मूळ पोट कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[१][(५) [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा आणि परिवहन उपक्रमाशी] संबंधित असलेल्या बाबींना लागू करताना पोटकलम (१), (२) आणि (३) यांच्या तरतुदी, जणू काही त्यांत “[३][आयुक्त]” या शब्दांऐवजी “ महाव्यवस्थापक ” हे शब्द व “ स्थायी समिती ” या शब्दांऐवजी “ [४][बृहन्मुंबई वीज पुरवठा आणि परिवहन समिती] ” हे शब्द दाखल करण्यात आले असावेत त्याप्रमाणे परिणामक असतील.]

प्रश्न विचारण्याचा हक्क.

[५][**६६अ.** (१) कलम ३६ खाली याबाबत केलेल्या कोणत्याही विनियमांच्या अधीनतेने, पालिका सदस्य [६][आयुक्ताला] प्रश्न विचारू शकतील आणि [६][आयुक्त] या अधिनियमाच्या प्रशासनाचा किंवा [७][बृहन्मुंबईच्या] महानगरपालिका शासनाचा संबंध असलेल्या किंवा त्याच्याशी निगडित असलेल्या कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देईल :

परंतु,—

(अ) प्रश्न विनिर्देशित करणारी, पूर्ण सात दिवसांहून कमी नसेल इतक्या दिवसांची नोटीस महानगरपालिका सचिवास लेखी दिलेली असली पाहिजे ;

(ब) पुढील प्रकारचा कोणताही प्रश्न विचारण्यात येणार नाही, म्हणजे—

(एक) ज्यात अभिप्राय व्यक्त करण्याविषयी किंवा कायद्यासंबंधाने तात्त्विक प्रश्नांची उकल करण्याविषयी मागणी केलेली असेल अथवा आधारतत्त्वाच्या विधानाची उकल करण्याविषयी मागणी केलेली असेल असा कोणताही प्रश्न ; अथवा

(दोन) ज्याचा [८][भारताच्या क्षेत्राच्या] कोणत्याही भागातील कोणत्याही न्यायालयात किंवा कोणत्याही न्यायाधिकरणापुढे चालू असलेल्या कोणत्याही दाव्यात किंवा कार्यवाहीत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संबंध असेल किंवा त्याच्याशी निगडित असेल असा कोणताही प्रश्न ; अथवा

(तीन) महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या कार्यालयीन अधिकारपदाच्या नात्याने किंवा सार्वजनिक दृष्टीने त्याचे जे चारित्र्य किंवा वर्तणूक असेल ते खेरीज करून त्याच्या चारित्र्यासंबंधी किंवा वर्तणुकीसंबंधी कोणताही प्रश्न ; अथवा

(चार) कोणत्याही व्यक्तीची किंवा समाजाच्या कोणत्याही वर्गाची बदनामी करणारा असेल किंवा गर्भितार्थाने तसा होऊ शकत असेल किंवा कोणत्याही व्यक्तीच्या विरूद्ध खाजगी चारित्र्याबाबत आरोप करण्यात आला असेल किंवा गर्भितार्थाने तसा आरोप करण्यात येत असेल असा कोणताही प्रश्न ;

(पाच) कलम ३६ खाली महानगरपालिकेने या बाबतीत केलेल्या कोणत्याही विनियमाचे उल्लंघन करणारा कोणताही प्रश्न.

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ९ अन्वये हे पोटकलम जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, अनुसूची ४(३) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १९(अ) अन्वये “महापौर” या शब्दाऐवजी “आयुक्त” हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

[४] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, अनुसूची ४(४) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक २३, कलम ३ अन्वये नवीन कलम ६६(अ) समाविष्ट करण्यात आले.

[६] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २०(अ) अन्वये “महापौर किंवा महापौरासह परिषदेचा कोणताही सदस्य” या मजकुराऐवजी “आयुक्त” हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[७] सन १९९६ चा महाराष्ट्र आधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची ४(१) अन्वये “ ग्रेटर बॉम्बे ” या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) [१][महापौर], ज्या कोणत्याही प्रश्नामुळे त्याच्या मते पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन होत असेल असा कोणताही प्रश्न विचारण्यास मुभा देणार नाही.

(३) एखादा प्रश्न हा, पोट-नियम (१) अन्वये घातलेल्या निर्बंधांच्या कक्षेत आहे किंवा नाही याबाबत कोणतीही शंका उपस्थित झाल्यास, त्या मुद्यावर [२][महापौर] निर्णय देईल व त्याचा निर्णय अंतिम असेल.

(४) जर [३][आयुक्ताच्या] मते महानगरपालिकेच्या हितसंबंधास बाध येऊ न देता एखाद्या प्रश्नाचे उत्तर देणे शक्य नसेल, किंवा जी माहिती त्यास गोपनीयरीत्या कळविण्यात आली असेल ती त्या प्रश्नात विचारलेली असेल तर अशा कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देणे [३][आयुक्तास] बंधनकारक असणार नाही.]

[४][(५) या कलमाखाली कोणत्याही प्रश्नाचे उत्तर देण्याच्या प्रयोजनासाठी [५][आयुक्त] महाव्यवस्थापकास [६][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमासंबंधीची ] जी माहिती देण्यास फर्मावील ती माहिती तो गैरवाजवी विलंब न लावता त्यास पुरवील.]

तातडीच्या सार्वजनिक बाबींवरील चर्चा.

[७][**६६ब.** (१) कोणताही पालिका सदस्य महानगरपालिका सचिवास तातडीच्या सार्वजनिकदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या बाबीवर चर्चा उपस्थित करण्याची नोटीस देऊ शकेल व त्यामध्ये, उपस्थित करण्यात यावयाची बाब विनिर्दिष्ट करण्यात येईल.

(२) अशी किमान दोन अन्य निर्वाचित पालिका सदस्यांनी पुष्ट्यर्थ सह्या केलेली नोटीस अशा चर्चेची ज्या दिनांकास मागणी करण्यात आलेली असेल त्या दिनांकापूर्वी किमान बाहत्तर तास अगोदर सचिवांकडे पाठविण्यात येईल आणि सचिव ती नोटीस [८][महापौरासमोर किंवा त्याच्या अनुपस्थितीत उपमहापौरासमोर] ठेवील आणि ती त्यास योग्य वाटेल त्या रीतीने पालिका सदस्यांमध्ये प्रसृत करील.

(३) कोणताही औपचारिक ठराव मांडण्यात येणार नाही किंवा मतदान करण्यात येणार नाही.

[९][आयुक्ताकडून] निवेदन मागविणे.

**६६क.** (१) कोणताही पालिका सदस्य कोणत्याही दिवशी बैठक सुरू होण्यापूर्वी किमान एक तास [१०][आयुक्तास] नोटीस देऊन [९][आयुक्ताकडून] महानगरपालिकेच्या प्रशासनासंबंधातील तातडीच्या बाबींवर निवेदन केले जाण्याची मागणी करू शकेल.

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २०(ब) अन्वये 'महानगरपालिकेचा अध्यक्ष' या शब्दाऐवजी 'महापौर' हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २०(क) अन्वये 'महानगरपालिकेचा अध्यक्ष'या शब्दाऐवजी 'महापौर' हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २०(ड) अन्वये ' महापौराच्या किंवा महापौरासह परिषदेचा कोणत्याही सदस्याच्या या शब्दाऐवजी 'आयुक्ताच्या' आणि महापौरास किंवा महापौरांसह परिषदेच्या कोणत्याही सदस्यास या शब्दाऐवजी 'आयुक्तास' हा मजकुर दाखल करण्यात आला.

[४] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम १० अन्वये हे पोटकलम जादा दाखल करण्यात आले.

[५] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २०(ई) अन्वये ' महापौरासह परिषदेचा प्रभारी सदस्य ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ याच्या अनुसूची ४(३) अन्वये 'मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमासंबंधीची ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २८ अन्वये कलमे ६६-ब व ६६-क समाविष्ट करण्यात आली.

[८] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २१ अन्वये 'महानगरपालिकेच्या अध्यक्षासमोर किंवा त्याच्या अनुपस्थितीत उपाध्यक्षासमोर' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] वरील अधिनियमाच्या कलम २२(अ) अन्वये 'महापौर' हा मजकुर जेथे जेथे त्याच्या व्याकरणिक फेरफारासह आला आहे त्याऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

[१०] वरील अधिनियमाच्या कलम २२(ब) अन्वये 'महानगरपालिकेच्या अध्यक्षास किंवा त्याच्या अनुपस्थितीत उपाध्यक्षास' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

किंवा बजावता येतील.]



(२) महापौर [१][* * * *] एकतर त्याच दिवशी संक्षिप्त निवेदन करू शकेल किंवा त्यासाठी एखादा दिनांक निश्चित करून शकेल.

(३) एकाच बैठकीमध्ये अशा प्रकारच्या दोनपेक्षा अधिक बाबी उपस्थित करण्यात येणार नाहीत आणि दोनपेक्षा अधिक बाबी उपस्थित करण्यात आल्यास, [२][महापौराच्या] मते ज्या बाबी अतिशय तातडीच्या व महत्त्वाच्या असतील त्या बाबींना प्राधान्य देण्यात येईल.

(४) अशा निवेदनावर ते करण्यात येईल त्यावेळी, कोणतीही चर्चा करण्यात येणार नाही.]

अधिकारांचा वापर करणे हे आवश्यक खर्चांच्या बाबतीत महानगर-पालिकेच्या मंजुरीच्या अधीन असणे.

**६७.** कलम ११५, पोट-कलम (२) [३][किंवा कलम ४६०डड] यात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बाबी खेरीज करून एरव्ही, कोणताही महानगरपालिका प्राधिकारी, ज्यामध्ये खर्चाचा अंतर्भाव असेल असा या अधिनियमान्वये किंवा त्याखाली त्यास दिलेला कोणताही अधिकार किंवा त्याच्याकडे सोपविलेले कोणतेही कर्तव्य, पुढे नमूद केलेल्या परंतुकाच्या अधीनतेने वापरील किंवा पार पाडील :–

(अ) ज्या सरकारी वर्षात असा अधिकाराचा वापर करण्यात आला असेल किंवा असे कर्तव्य पार पाडण्यात आले असेल त्या वर्षात, असा खर्च करावयाचा असेल तेथवर, त्या खर्चासाठी कलम १३० मध्ये व्याख्या केलेल्या अर्थांतर्गत चालू अर्थसंकल्पीय प्रदानात तरतूद करण्यात येईल ; [४][* * * *

(ब) अशा अधिकाराचा वापर केल्यामुळे किंवा असे कर्तव्य पार पाडल्यामुळे उक्त सरकारी वर्ष संपल्यानंतर कोणत्याही कालावधीकरिता किंवा कोणत्याही वेळी खर्च करावा लागणार असेल किंवा खर्च करावा लागण्याचा संभव असेल तर, महानगरपालिकेची मंजुरी घेतल्याविना अशा खर्चाचे दायित्व पत्करण्यात येणार नाही.

[५][(क) महाव्यवस्थापकाने प्रकरण १६अ च्या प्रयोजनांसाठी कोणत्याही संविदेकरिता महानगरपालिकेची मंजुरी मागितली असल्यास महानगरपालिकेच्या कोणत्याही सभेच्या कार्यसूचीमध्ये त्या बाबीचा ज्या तारखेला प्रथम समावेश केला गेला असेल अशा तारखेपासून तीस दिवसांच्या आत महानगरपालिका असा प्रस्ताव विचारात घेईल व तो निकालात काढील.असे करण्यात कसूर झाली तर पूर्वोक्त तीस दिवसांच्या कालावधीच्या शेवटच्या दिवशी महानगरपालिकेने संविदेस मंजुरी दिली असल्याचे मानण्यात येईल. महाव्यवस्थापक तशा अर्थाचा अहवाल महानगरपालिकेकडे पाठवील.]

महानगरपालिका प्राधिकाऱ्याच्या अधिकारांचे प्रत्यायोजन.

[६][**६८.** या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये, महानगरपालिका [७][महापौर], आयुक्त किंवा महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रम यांस प्रदान केलेले, त्यांना नेमून दिलेले किंवा त्यामध्ये निहित असलेले कोणतेही अधिकार, कर्तव्ये किंवा कार्ये ही, संबंधित प्राधिकाऱ्याने, याबाबतीत वेळोवेळी काढण्यात आलेल्या सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे असे अधिकार, कर्तव्ये किंवा कार्ये ज्यास सोपविली आहेत अशा अधिकाऱ्यास वापरता येतील, पार पाडता येतील किंवा बजावता येतील.]

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २२(क) अन्वये 'किंवा प्रभारी सदस्य' हा मजकूर वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २२(ड) अन्वये 'अध्यक्षाच्या किंवा त्याच्या अनुपस्थितीत उपाध्यक्षाच्या' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम १० अन्वये " किंवा कलम ४६०डड " हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ६ (अ) अन्वये "आणि" हा शब्द वगळण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ६ (ब) अन्वये खंड (क) जादा दाखल करण्यात आला.

[६] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २९ अन्वये मूळ कलम ६८ च्या ऐवजी वरील कलम दाखल करण्यात आले.

[७] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २३ अन्वये मूळ मजकुराऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला.

**६८अ.** [१][ * * * *]

[२][**६८अअ.** (१) कलम ६८ किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही अन्य तरतुदी यांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास आयुक्ताशी विचारविनिमय केल्यानंतर, **शासकीय राजपत्रातील** आदेशाद्वारे, त्याच्या मते, अपर जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसलेले पद जो धारण करीत असेल किंवा, ज्याने ते धारण केले असेल अशा कोणत्याही शासकीय अधिकाऱ्यास नावाने किंवा अधिकारपदपरत्वे कलमे ३१४, ३५१ आणि ३५२अ अन्वये आयुक्ताला प्रदान केलेले, लादलेले किंवा त्याच्यामध्ये निहित असलेले अधिकार, कर्तव्ये व कार्ये यांचा वापर करण्याचा, पार पाडण्याचा व बजावण्याचा देखील अधिकार प्रदान करता येईल.

शासकीय अधिकाऱ्यांना आयुक्ताचे विवक्षित अधिकार, इत्यादी वापरण्याचे अधिकार प्रदान करता येतील.

(२) पोट-कलम (१) खाली अधिकार प्रदान करण्यात आलेला शासकीय अधिकारी लेखी आदेशाद्वारे असा निदेश देऊ शकेल की, राज्य शासनाने त्याला प्रदान केलेले, लादलेले किंवा त्याच्यामध्ये निहित केलेले अधिकार, कर्तव्ये आणि कार्ये, तो एक तर नावाने किंवा अधिकारपदपरत्वे प्राधिकृत करील अशा व जो उप-जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे नसलेले पद धारण करीत असेल किंवा ज्याने ते धारण केले असेल अशा त्यास अधीन असलेल्या अधिकाऱ्यास किंवा अधिकाऱ्यांना देखील अनुक्रमे वापरता येतील, पार पाडता येतील व बजावता येतील.

(३) कोणत्याही शासकीय अधिकाऱ्याला, पोट-कलम (१) खाली अधिकार प्रदान करण्यात आले असतील किंवा पोट-कलम (२) खाली, प्राधिकृत करण्यात आले असेल त्या बाबतीत, ३१४, ३५१, आणि ३५२अ या प्रत्येक कलमातील " आयुक्त " या शब्दात अशा कोणत्याही अधिकाऱ्याचा समावेश होतो असे मानले जाईल.]

**६८ब.** [३][* * * * * *]

## संविदा

**६९.** या अधिनियमाखाली किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी केलेल्या करारांच्या बाबतीत पुढील तरतुदी लागू होतील :—

महानगरपालिकेच्या वतीने करार करण्याचा आयुक्ताचा अधिकार.

(अ) अशी प्रत्येक संविदा आयुक्त महानगरपालिकेच्या वतीने करील ;

(ब) आयुक्तास दुसऱ्या एखाद्या महानगरपालिका प्राधिकाऱ्याच्या मान्यतेवाचून किंवा मंजुरीवाचून कोणत्याही प्रयोजनासाठी असलेली जी संविदा या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींअनुसार पार पाडता येणार नाही, अशी कोणतीही संविदा, पहिल्याप्रथम अशी मान्यता किंवा मंजुरी रीतसर देण्यात येईतोपर्यंत किंवा देण्यात आल्यावाचून त्याला करता येणार नाही ;

[४][(क) आयुक्तांकडून कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा तिच्यातील कोणताही हितसंबंध यांच्याशी संबंधित संविदेखेरीज, जीमध्ये [५][पन्नास लाख रुपयांहून अधिक परंतू पंच्याहत्तर लाख रुपयांहून अधिक नाही] अशा खर्चाचा अंतर्भाव असेल, अशी कोणतीही संविदा, महापौराने तिला मंजुरी दिल्याशिवाय करण्यात येणार नाही. [६][पंच्याहत्तर लाख रुपयांहून अधिक] खर्चाचा अंतर्भाव असलेल्या संविदांना स्थायी समितीच्या मंजुरीची आवश्यकता असेल :

---

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ३० अन्वये कलम ६८अ वगळण्यात आले.

[२] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७१, कलम २ अन्वये कलम ६८अअ समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ३१ अन्वये कलम ६८ब वगळण्यात आले.

[४] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ५ अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[५] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ९(क) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ९ (ख) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][परंतु, ज्यात पाच लाख रुपयांहून अधिक असेल आणि पंच्याहत्तर लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या खर्चाचा अंतर्भाव असेल अशी आयुक्ताने केलेली प्रत्येक संविदा, ती करण्यात आल्याच्या दिनांकापासून पंधरा दिवसांच्या आत त्याच्याकडून स्थायी समितीला कळविण्यात येईलः]

[२][परंतु, आणखी असे की] महापौराने मंजुरी दिलेल्या सर्व रकमांची एकूण बेरीज वर्षात रुपये [३][सात कोटी पन्नास लाखांहून] अधिक होणार नाही :

[४][परंतु तसेच, कलम ६४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी,] स्थायी समिती, आयुक्ताने तयार केलेल्या प्रस्तावांवर ते मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत विचार करील आणि ते निकालात काढील, स्थायी समितीने असे करण्यात कसूर केल्यास अशा संविदेस स्थायी समितीने पूर्वमंजुरी दिली असल्याचे मानण्यात येईल आणि आयुक्त तशा अर्थाचा अहवाल महानगरपालिकेस देईल.]

[५][**स्पष्टीकरण.—**या खंडाच्या प्रयोजनार्थ ते मिळाल्यापासून तीस दिवसांचा कालावधी, नगरपालिका सचिवाच्या कार्यालयात प्रस्ताव मिळाल्यानंतर, स्थायी समितीच्या लगतच घेण्यात आलेल्या सभेच्या दिनांकापासून मोजण्यात येईल मग अशा प्रस्तावाशी निगडीत बाब अशा सभेच्या कार्यसूचीवर घेतलेली असो किंवा नसो.]

[६][* * * * * *]

(ई) या अधिनियमाची अंमलबजावणी करताना आयुक्तास जी संविदा प्रसंगानुसार करावी लागेल अशा प्रत्येक संविदेस, या कलमाच्या पूर्ववर्ती तरतुदी [७][शक्य तेथवर लागू होतील] आणि या कलमाच्या ज्या तरतुदी मूळ संविदेस लागू असतील, त्या, अशा संविदेस जो कोणताही फेरफार करण्यात येईल त्या बाबतीत किंवा अशी संविदा पुरी करण्याच्या बाबतीतही लागू होतील.

संविदा निष्पादित करण्याची पद्धती.

**७०.** (१) आयुक्ताने महानगरपालिकेच्या वतीने करावयाची प्रत्येक संविदा ही, ती आयुक्ताने आपल्या स्वतःच्या वतीने केली असती तर ज्या रीतीने व ज्या स्वरूपात केल्याने ती त्याच्यावर बंधनकारक झाली असती, त्याच रीतीने व त्याच स्वरूपात करण्यात येईल ; आणि त्यात त्याच रीतीने व त्याच स्वरूपात तीमध्ये फेरफार करता येईल किंवा ती पुरी करता येईल :

परंतु,–

(अ) ज्या बाबतीत अशी कोणतीही संविदा आयुक्ताने केली असता तिच्यावर मुद्रा लावण्याची आवश्यकता असेल त्या बाबतीत अशा संविदेवर महानगरपालिकेची सामान्य मुद्रा लावण्यात येईल ; आणि

---

[१] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ९(ग) अन्वये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले

[२] वरील अधिनियमाच्या कलम ९(घ)(एक) अन्वये 'परंतु' या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ९(घ)(दोन) अन्वये 'रुपये एक कोटीहुन' या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ९(ङ)(एक) अन्वये 'परंतु आणखी असे की' या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ९(ङ)(दोन) अन्वये हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

[६] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम ४(ब) अन्वये खंड (ड) वगळण्यात आला.

[७] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम (१२) (ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ब) कोणतेही काम करण्याकरिता किंवा कोणतेही सामान किंवा माल पुरवण्याकरिता केलेल्या ज्या संविदेत [१][पन्नास हजार रुपयांपेक्षा] अधिक खर्चाचा अंतर्भाव असेल अशी प्रत्येक संविदा लेखी असेल आणि तिच्यावर [२][पोट-कलम (२) मध्ये विहित केलेल्या रीतीने] महानगर-पालिकेची सामान्य मुद्रा लावण्यात येईल व तिच्यात, यथास्थिति, करावयाचे काम किंवा पुरवावयाचे सामान किंवा माल यांचा तसेच अशा कामासाठी, सामानांसाठी किंवा मालासाठी द्यावयाच्या किमतीचा व अशी संविदा एखाद्या कामासाठी करण्यात आली असेल त्या बाबतीत ते काम किंवा त्याचे विनिर्दिष्ट भागांश जेवढ्या अवधीच्या किंवा अवधींच्या आत पूर्ण करण्यात येतील त्या एका किंवा अनेक अवधींचा विनिर्देश करण्यात येईल.

[३][(१अ) पोटकलम (१) यांचे परंतुक (ब) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने कोणतेही काम जर पूर्वीच करण्यात आले असेल तर किंवा त्याचे समाधान होईल अशा रीतीने जर ते सामान किंवा माल पुरवण्यात आला असेल तर, कोणतेही काम पार पाडण्याबाबतच्या किंवा माल पुरवण्याबाबतच्या संविदेच्या बाबतीत लेखी दस्तऐवज केला नाही तरी चालेल असे आयुक्तास, लेखी आदेशाद्वारे ठरवता येईल आणि ते विधिसंमत असेल.]

[४][(२) कोणतीही [५][स्थावर मालमत्ता किंवा तिच्यातील कोणताही हितसंबंध किंवा तिच्या बाबतीतील कोणताही हक्क संपादन करण्यासंबंधीच्या मोहोरबंद कराच्या लागणाऱ्या संविदेहून अन्य] प्रत्येक संविदेवर किंवा इतर संलेखावर [६][स्थायी समितीचे कोणतेही दोन सदस्य, नगरपालिका सचिव आणि आयुक्ताने प्राधिकृत केला असेल असा महानगरपालिका उप आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसलेला कोणताही अधिकारी यामधील कोणत्याही दोन व्यक्तींच्या] समक्ष महानगर पालिकेची सामान्य मुद्रा लावण्यात येईल. अशी मुद्रा महानगरपालिका सचिवाच्या अभिरक्षेत असेल ; [७][उक्त दोन व्यक्ती] ती संविदा किंवा तो संलेख [८][आपल्या] समक्ष मोहोरबंद करण्यात आला असल्याचे निदर्शक म्हणून सह्या करतील. [९][उक्त दोन व्यक्तींच्या] सह्या या अशा कोणत्याही संविदा किंवा संलेख करून दिल्याबद्दलच्या कोणत्याही साक्षीदारांच्या सह्यांहून भिन्न असतील :]

[१०][परंतु, कलम ६१, खंड (क्यू) च्या प्रयोजनाकरिता केलेल्या कोणत्याही संविदेच्या बाबतीत [११][* * * * * * *] शिक्षण समितीच्या दोन सदस्यांच्या समक्ष याप्रमाणे मुद्रा लावण्यात येईल. त्यावर असे सदस्य आपल्या सह्या करतील.]

---

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ३३ (अ) अन्वये "दहा हजार रुपयांपेक्षा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम २ (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९३६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ४ अन्वये पोट-कलम १(अ) समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम १३ अन्वये मूळ पोटकलमाऐवजी पोटकलम (२) दाखल करण्यात आले.

[५] सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम २ (२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम १० (क) अन्वये " स्थायी समितीच्या दोन सदस्यांच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम १० (ख) अन्वये " स्थायी समितीचे उक्त दोन सदस्य या मजकुराऐवजी " हा शब्द मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २५ (ब) अन्वये " त्याच्या " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[९] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम १० (ग) अन्वये, " उक्त सदस्यांच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१०] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २५ (ड) अन्वये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[११] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम १० (घ) अन्वये " स्थायी समितीच्या दोन सदस्यांऐवजी " हा मजकूर वगळण्यात आला.

कलम ७० मध्ये विहित केल्याप्रमाणे निष्पादित न केलेली संविदा महानगरपालिकेवर बंधनकारक असणार नाही.

**७१.** [१][निकटपूर्वीच्या कलमाचे पोटकलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या स्वरूपाची] असून [२][उक्त] कलमात तरतूद केल्याप्रमाणे निष्पादित न केलेली कोणतीही संविदा महानगरपालिकेवर बंधनकारक असणार नाही.

[५][तीन लाख रुपयांहून] अधिक खर्च येईल अशा संविदेसाठी निविदा मागवणे.

**७२.** (१) आयुक्त, यात पुढे अन्यथा जी तरतूद केलेली असेल ते खेरीज करून एरव्ही, ज्या कामासाठी किंवा जे सामान किंवा जो माल पुरविण्यासाठी [३][तीन लाख रुपयांहून] अधिक खर्च येईल असे कोणतेही काम करण्यासाठी किंवा असे कोणतेही सामान किंवा माल पुरविण्यासाठी कोणतीही संविदा निष्पादित करण्यापूर्वी किमान सात दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रांमध्ये जाहिरात देऊन नोटीस देईल व त्याद्वारे अशा संविदेसाठी निविदा मागवील:

[४][परंतु, तीन लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेच्या कोणत्याही संविदेच्या निविदेची सूचना, महानगरपालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावर दर्शविण्यात येईल.]

(२) अशा नोटीशीच्या अनुरोधाने सादर केलेली कोणतीही निविदा स्वीकारण्यास आयुक्त बांधलेला असणार नाही, मात्र त्यास कलम ६९ चा खंड (क) याच्या तरतुदींच्या अधीनतेने सर्व परिस्थितीचा विचार करता आलेल्या निविदांपैकी जी कोणतीही निविदा त्यास सर्वाधिक फायदेशीर असल्याचे दिसून येईल ती निविदा स्वीकारता येईल.

[६][(३) परंतु, स्थायी समितीस किंवा कलम ६१, खंड (क्यू) च्या प्रयोजनांकरिता करण्यात येणाऱ्या संविदेच्या बाबतीत शिक्षण समितीस, आपल्या कामकाजात कारणे नमूद करून त्या कारणांस्तव यात तरतूद केल्याप्रमाणे निविदा न मागवता किंवा त्याने निविदा मागवल्यानंतर त्याला मिळालेल्या कोणत्याही निविदा न स्वीकारता संविदा निष्पादित करण्यासाठी आयुक्तास प्राधिकृत करता येईल.]

बेरोजगार अभियंत्याबरोबर संविदा करण्याचा अधिकार.

[७][**७२अ.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, परंतु राज्य शासन सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे निर्धारित करील अशा अटी व शर्तीस अधीन राहून, आयुक्त, जीमध्ये पाच लाख रूपयांहून अधिक खर्चाचा अंतर्भाव नसेल असे बांधकाम करण्यासाठी बेरोजगार अभियंत्याबरोबर कोणतीही संविदा करील :

परंतु, राज्य शासनाने निर्धारित केलेल्या अटी व शर्तीमध्ये अर्हता, अनुभव व बेरोजगार अभियंत्याची नोंदणी करण्यासाठीची तरतूद या शर्तीचा देखील समावेश असेल :

परंतु आणखी असे की, अशा संविदांची अंमलबजावणी करण्यासाठी महानगरपालिका, राज्य शासनाने निर्धारित केलेल्या अटी व शर्ती यांच्याशी विसंगत नसतील अशा अटी व शर्ती देखील विनिर्दिष्ट करील.]

संविदा पुरी करण्यासाठी प्रतिभूती केव्हा घ्यावी.

**७३.** आयुक्त निकटपूर्वीच्या कलमाखाली निष्पादित करील अशा प्रत्येक संविदेचे रीतसर पालन केले जावे यासाठी आयुक्त पुरेशा प्रतिभूतीची मागणी करील आणि या अधिनियमाखाली तो करील अशा इतर कोणत्याही संविदेचे रीतसर पालन केले जाण्यासाठी तो विवेकाधिकारानुसार प्रतिभूतीची मागणी करील.

---

[१] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम १४ (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[२] वरील अधिनियमाच्या कलम १४ (दोन) अन्वये 'पूर्ववर्ती' या शब्दाऐवजी 'उक्त' हा शब्द दाखल करण्यात आला.
[३] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ११(१) (क) अन्वये "पन्नास हजार रुपयांहून" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[४] वरील अधिनियमाच्या कलम ११(१) (ख) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.
[५] वरील अधिनियमाच्या कलम ११ (दोन) अन्वये "रु. ५०,००० हून" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[६] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २६ अन्वये हे पोटकलम दाखल करण्यात आले.
[७] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ६ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[१][**७३.१अ.** कलमे ६९ ते ७३, दोन्ही धरून, यांतील कोणतीही बाब या अधिनियमाच्या प्रकरण सोळा-अ अन्वये केलेल्या संविदेच्या बाबतीत लागू होणार नाही.] प्रकरण १६अ खालील संविदांची व्यावृत्ती.

प्रकरण चार

## महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी

### [२][विशेष अभियंता, शहर अभियंता, जलव्यवस्था अभियंता, कार्यकारी आरोग्य अधिकारी, शिक्षण अधिकारी, महानगरपालिका सचिव, महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक व इतर अधिकारी]

१९४७ चा मुंबई ४. [३][**७३अ.** (१) महानगरपालिकेस, मुंबई शहर नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९४७, हा अधिनियम अंमलात आल्यानंतर, सोईस्करपणे शक्य तितक्या लवकर पाणीपुरवठा व गलिच्छ वस्त्यांचे उच्चाटन याबाबतच्या परियोजना धरून युद्धोत्तर पुनर्रचना व शहराचा सर्वसाधारण विकास यांबाबतच्या सर्व परियोजनांसंबंधीचे अधिकार वापरण्यासाठी आणि कर्तव्ये बजावण्यासाठी एका विशेष अभियंत्याची नेमणूक करता येईल. विशेष अभियंता म्हणून नेमणूक केलेली व्यक्ती [४][महानगरपालिका निर्धारित करील त्याप्रमाणे सात वर्षांहून अधिक नसेल] इतक्या कालावधीकरिता उक्त अधिकारपद धारण करील. विशेष अभियंता हा, आयुक्त वेळोवेळी निदेश देईल अशा या अधिनियमाखालील अधिकारांचा वापर करील आणि अशी कर्तव्ये व कार्ये पार पाडील. विशेष अभियंत्याची नेमणूक.

(२) विशेष अभियंत्याला महानगरपालिका वेळोवेळी निर्धारित करील असे मासिक वेतन व भत्ते मिळतील.

(३) विशेष अभियंता आपल्या अधिकारपदाची कर्तव्ये बजावण्यासाठी आपला सर्व वेळ व आपले लक्ष केंद्रीत करील.

(४) कलम ८०ब यांच्या तरतुदी विशेष अभियंत्याच्या नेमणुकीस लागू असणार नाहीत.

(५) विशेष अभियंत्याची नेमणूक ही, [५][राज्य] शासनाने कायम करण्याच्या अधीन असेल.

(६) विशेष अभियंत्याची नेमणूक चालू असताना—

(एक) कलम ७४ आणि कलम ७५ यांच्या तरतुदींचा शहर अभियंत्यांच्या नेमणुकीशी संबंध असेल तेथवर, त्यांचे प्रवर्तन निलंबित राहिल ; आणि

(दोन) या अधिनियमात (हे कलम आणि ७४ व ७५ या कलमांखेरीज) " शहर अभियंत्या " संबंधी केलेला कोणताही उल्लेख हा " विशेष अभियंत्या " संबंधीचा उल्लेख आहे असे मानण्यात येईल.]

**७४.** (१) महानगरपालिका, महानगरपालिका [६][शहर अभियंता], [७][* * *] महानगरपालिका कार्यकारी आरोग्य अधिकारी, [८][आणि महानगरपालिका जलव्यवस्था अभियंता] म्हणून योग्य अशा व्यक्तींची नेमणूक करील. [६][शहर अभियंता,] कार्यकारी आरोग्य अधिकारी व जलव्यवस्था अभियंता यांची नेमणूक.

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम १३ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ३९ अन्वये " विशेष अभियंता, शहर अभियंता, कार्यकारी आरोग्य अधिकारी आणि जलव्यवस्था अभियंता " या शीर्षकाऐवजी हे शीर्षक दाखल करण्यात आले.

[३] सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४, कलम ३ अन्वये कलम ७३अ समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०, कलम ३ अन्वये 'पाच वर्षांची मुदत' या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले. ही सुधारणा २१ मार्च १९५२ रोजी केल्याचे व अंमलात आल्याचे मानण्यात येईल [पहा : सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २० चे कलम २१(१)].

[५] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये 'प्रांतिक' या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[६] सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम ६ अन्वये 'कार्यकारी अभियंता' या मूळ शब्दांऐवजी 'शहर अभियंता' हे शब्द दाखल करण्यात आले.

[७] सन १९११ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम २(अ) अन्वये 'आणि' हा शब्द वगळण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम २ (अ) अन्वये हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

(२) उक्त अधिकाऱ्यांपैकी—

(अ) प्रत्येक अधिकारी नवीकरण करता येण्याजोग्या पाच वर्षांच्या अवधीकरिता नेमण्यात येईल :

[१][परंतु, जर अशा अधिकाऱ्यांपैकी कोणताही अधिकारी हा महानगरपालिका अधिकारी असेल आणि जर ती त्याच्या नेमणुकीच्या किंवा फेरनेमणुकीच्या तारखेपासून पाच वर्षांचा कालावधी संपण्याच्या अगोदरच्या तारखेस कलम ८१ खालील त्यास लागू असलेल्या विनियमांखाली सेवानिवृत्त होत असेल तर, त्याची पाच वर्षांकरिता किंवा त्यापेक्षा कमी कालावधीकरिता नेमणूक किंवा फेरनेमणूक करता येईल ;]

(ब) असा प्रत्येक अधिकारी आपल्या अधिकारपदाची कर्तव्ये करण्यासाठी आपला सर्व वेळ व आपले लक्ष केंद्रीत करील ;

[२][(क) अशा प्रत्येक अधिकाऱ्यास [३][महानगरपालिका राज्य शासनाच्या मान्यतेने वेळोवेळी निर्धारित करील असे मासिक वेतन मिळेल ; मात्र अशा कोणत्याही अधिकाऱ्याच्या वेतनात, त्याच्या अधिकारपदाच्या कालावधीत, त्यास अहितकारक होईल अशा रीतीने फेरफार केले जाणीर नाहीत ;]

[४][* * * * * *]

(ड) असा प्रत्येक अधिकारी गैरवर्तणुकीबद्दल किंवा अधिकारपदाची कर्तव्ये बजावण्यात हयगय केल्याबद्दल किंवा असमर्थ झाल्याबद्दल, महानगरपालिकेच्या सभेत उपस्थित असलेल्या दोन-तृतीयांशापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी केलेल्या मतदानावरून कोणत्याही वेळी अधिकारपदावरून काढून टाकला जाण्यास पात्र असेल :

(३) परंतु—

(ई) जी कोणतीही व्यक्ती कायदेशीररीत्या अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायी नसेल तिला कार्यकारी आरोग्य अधिकारी म्हणून नेमले जाणार नाही ;

[५][(ईई) कार्यकारी आरोग्य अधिकाऱ्यास ज्या नेमणुकीचा उद्देश शिक्षणाच्या सहाय्याने किंवा अन्यथा जनतेच्या आरोग्याचे प्रवर्धन करणे हा असेल आणि अशा नेमणुकीने महानगरपालिकेच्या मते कार्यकारी अधिकारी म्हणून असलेल्या त्याच्या कर्तव्यात व्यत्यय येणार नसेल अशी कोणतीही नेमणूक—मग ती मानसेवी असो किंवा इतर कोणत्याही प्रकारची असो—महानगरपालिका मंजूर करील अशा कालावधीकरिता स्वीकारता येईल ;]

(फ) महानगरपालिकेस विवेकाधिकाराने एखाद्या व्यक्तीस उक्त [६][कोणत्याही] अधिकार-पदावर पूर्ण पाच वर्षांच्या अवधीसाठी नेमण्यापूर्वी तिला परिवीक्षेवर फक्त मर्यादित कालावधीसाठी नेमता येईल ;

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम ६ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २८ अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला. इंग्रजी पृष्ठ ३६५ वरील तारांकित टीप पहा.

[३] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ५ अन्वये 'पुढील मर्यादांच्या अधीन' या मजकुराने सुरू होणाऱ्या व 'रुपये १,२०० पेक्षा कमी असता कामा नये' या मजकुराने संपणाऱ्या भागाऐवजी हा मजकूर १ एप्रिल १९६६ पासून दाखल करण्यात आला.

[४] सन १९४३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ अन्वये कलम ७४, पोटकलम (२), खंड (क) ला परंतुक जोडण्यात आले होते. परंतु तो अधिनियम व्यपगत झाल्याने ते परंतुक ३ एप्रिल १९४८ पासून अंमलात असण्याचे बंद झाल्यामुळे वगळण्यात आले.

[५] सन १९१६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम ३ (३) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[६] सन १९११ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम २ (क) अन्वये हा शब्द बदली दाखल करण्यात आला.

(ग) या कलमाखाली केलेली प्रत्येक नेमणूक ही [1][[2][राज्य] शासनाने] कायम करण्याच्या अधीन असेल.

[3][(४) शहर अभियंता व जलव्यवस्था अभियंता म्हणून नेमलेल्या कोणत्याही व्यक्ती संचालकाला दुय्यम असतील आणि संचालकाच्या नियंत्रणाच्या व पर्यवेक्षणाच्या अधीनतेने त्या आपली कर्तव्ये पार पाडतील व आपल्या अधिकारांचा वापर करतील.]

[4][शहर अभियंता] किंवा कार्यकारी आरोग्य अधिकारी किंवा जलव्यवस्था अभियंता यांच्या अधिकारपदाची रिकामी झालेली जागा ज्या अवधीच्या आत भरली पाहिजे तो अवधी.

**७५.** (१) [4][शहर अभियंता] किंवा कार्यकारी आरोग्य अधिकारी [5][किंवा जलव्यवस्था अभियंता] याच्या अधिकारपदाची एखादी जागा रिकामी झाल्यावर ती महानगरपालिकेने ज्या तारखेस ती जागा रिकामी झाली त्या तारखेपासून चार महिन्यांच्या आत नेमणूक करून किंवा याप्रमाणे केलेली नेमणूक [1][[2][राज्य] शासनाने] कायम केली नाही तर [1][[2][राज्य] शासनाचा] आदेश महानगरपालिकेस मिळाल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत नेमणूक करून भरण्यात येईल ;

(२) उपरोक्तप्रमाणे महानगरपालिकेने नेमणूक करण्यात कसूर केली तर [1][[2][राज्य] शासनास] रिकामी झालेली जागा भरण्यासाठी एखाद्या व्यक्तीची नेमणूक करता येईल, आणि अशी नेमणूक सर्व प्रयोजनांसाठी महानगरपालिकेने केलेली नेमणूक आहे असे मानले जाईल ;

(३) पोटकलम (१) किंवा (२) खाली नेमणूक करण्याची व्यवस्था होईपर्यंत, महानगरपालिकेस रिकामी झालेली जागा तात्पुरती भरण्यासाठी, एखाद्या व्यक्तीची नेमणूक करता येईल आणि असा निदेश देता येईल की, याप्रमाणे नेमलेल्या व्यक्तीस, [6][ज्या अधिकाराच्या जागी तिची नेमणूक झाली असेल त्या अधिकाऱ्याच्या बाबतीत, कलम ७४, पोटकलम (२), खंड (क) खाली अनुज्ञेय असलेल्या कमाल वेतनापेक्षा] अधिक नसेल इतके, महानगरपालिकेस योग्य वाटेल असे मासिक वेतन व भत्ते मिळतील. याप्रमाणे कार्यकारी आरोग्य अधिकारी म्हणून जिची अस्थायी नेमणूक झाली असेल अशी व्यक्ती ही कायदेशीररीत्या अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायी असण्याची आवश्यकता नाही.

कार्यकारी आरोग्य अधिकारी हा, सन १८६७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ खाली संमंत्रक अधिकारी असणे.

**७६.** या अधिनियमाखाली नेमलेल्या कार्यकारी आरोग्य अधिकारी हा १८६७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ (मुंबई शहराच्या अधिक चांगल्या स्वच्छता विनियमनाकरिता अधिनियम) याच्या प्रयोजनांकरिता आरोग्य संमंत्रक अधिकारी असेल.

---

[1] भारतीय विधि अनुकूलन आदेश परिषद आदेशाअन्वये 'गव्हर्नर इन कौन्सिल' या शब्दांऐवजी 'प्रांतिक सरकार' हे शब्द दाखल करण्यात आले.

[2] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये 'प्रांतिक' या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[3] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम १४ अन्वये पोटकलम (४) जादा दाखल करण्यात आले.

[4] सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम ६ अन्वये "कार्यकारी अभियंता" या शब्दांऐवजी "शहर अभियंता" हे शब्द दाखल करण्यात आले.

[5] सन १९११ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[6] सन १९०० चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम १ अन्वये मूळ शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[१][**शिक्षण अधिकारी**

शिक्षण अधिकाऱ्याची नेमणूक.

**७६अ.** महानगरपालिका वेळोवेळी, महानगरपालिका शिक्षण अधिकारी म्हणून एखाद्या योग्य व्यक्तीची नेमणूक करील ; आणि

(अ) असा महानगरपालिका शिक्षण अधिकारी हा आयुक्तास दुय्यम असेल आणि तो आयुक्ताच्या आदेशांच्या अधीनतेने, प्राथमिक [२][व माध्यमिक] शिक्षणाच्या संबंधात आपल्या अधिकारांपैकी जे अधिकार व जी कर्तव्ये त्याला वेळोवेळी आयुक्त नेमून देईल त्या अधिकारांचा वापर करील व ती कर्तव्ये पार पाडील ;

(ब) अशा महानगरपालिका शिक्षण अधिकाऱ्यास [३][महानगरपालिका शासनाच्या मान्यतेने वेळोवेळी निर्धारित करील असे मासिक वेतन मिळेल ; मात्र, अशा अधिकाऱ्याच्या वेतनात त्याच्या अधिकारपदाच्या कालावधीमध्ये, त्यास अहितकारक होईल अशा रीतीने फेरफार केले जाणार नाहीत;]

(क) महानगरपालिका शिक्षण अधिकारी हा कोणत्याही वेळी गैरवर्तणुकीबद्दल किंवा त्याच्या अधिकारपदाची कर्तव्ये पार पाडण्यात त्याने हयगय केल्याबद्दल किंवा तो असमर्थ झाल्याबद्दल महानगरपालिकेकडून कोणत्याही वेळी अधिकारपदावरून काढून टाकला जाण्यास पात्र ठरेल.]

[४][**सार्वजनिक वैद्यकीय सहाय्याच्या उपाययोजनेच्या संबंधात वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या नेमणुका**

महानगर पालिकेने चालवलेल्या रुग्णालयांचे प्रभारी अधिकारी म्हणून महानगर पालिकेने अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायींची नेमणूक करणे.

**७६ब.** महानगरपालिका, वेळोवेळी, कलम ६१, खंड (गग) खाली करावयाच्या वैद्यकीय सहाय्याच्या उपाययोजनेच्या संबंधात, तिने चालविलेल्या कोणत्याही रुग्णालयाचे प्रभारी अधिकारी म्हणून आवश्यक असतील इतके कायदेशीररीत्या अर्हताप्राप्त वैद्यकव्यवसायी नेमील व त्यांचे वेतन निर्धारित करील.]

**महानगरपालिका सचिव**

महानगरपालिका सचिवाची नेमणूक.

**७७.** (१) [५][महानगरपालिका] वेळोवेळी, महानगरपालिका सचिव म्हणून योग्य अशा व्यक्तीची नेमणूक करील ;

(२) महानगरपालिका सचिव हा महानगरपालिका, तसेच [६][स्थायी समिती आणि सुधार समिती] यांचा सचिव असेल ; आणि

---

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ४१ अन्वये हे शीर्षक व कलम ७६अ मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले.

[२] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १४ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ६ अन्वये मूळ "रुपये तेराशे पन्नासपेक्षा अधिक नसेल" या मजकुराने सुरू होणाऱ्या व "ते मासिक वेतन मिळेल" या मजकुराने संपणाऱ्या भागाऐवजी हा मजकूर १ एप्रिल १९६६ पासून दाखल करण्यात आला.

[४] सन १९०७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३, कलम १३ (१) अन्वये हे शीर्षक व कलम ७६ब समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९२२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम २४अ अन्वये "स्थायी समिती" या शब्दांऐवजी "महानगरपालिका" हा शब्द दाखल करण्यात आला.

[६] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २७(अ) अन्वये "महानगरपालिका लेखा समिती" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(अ) महानगरपालिका सचिव, या अधिनियमान्वये जी कर्तव्ये पार पाडण्याविषयी त्यास निदेश देण्यात येईल ती कर्तव्ये आणि महानगरपालिका, [१][स्थायी समिती आणि सुधार समिती] यांतील व यांच्या संबंधातील जी इतर कर्तव्ये पार पाडण्याविषयी, अनुक्रमे महानगरपालिका, [१][स्थायी समिती आणि सुधार समिती] त्यास फर्मावील ती कर्तव्ये पार पाडील.

(ब) महानगरपालिका सचिवाकडे—

(एक) महानगरपालिका व [२][कलम ३८ [३][किंवा कलम ३८ अ] याखाली] महानगरपालिकेने नेमलेली कोणतीही समिती ;

[४][(दोन) स्थायी समिती व तिची कोणतीही उपसमिती ;

(तीन) सुधार समिती व तिची कोणतीही उपसमिती ;

(चार) शिक्षण समिती व तिची कोणतीही उपसमिती;]

[५][(पाच) प्रभाग समित्या]

यांच्या कामकाजाशी संबंधित असलेली सर्व कागदपत्रे व दस्तऐवज यांचा ताबा असेल ;

(क) महानगरपालिका सचिव आपल्या अधिकारपदाची कर्तव्ये बजावण्यासाठी सर्व वेळ व लक्ष केंद्रित करील ;

[६][(ड) महानगरपालिका सचिवास [७][महानगरपालिका, राज्य शासनाच्या मान्यतेने वेळोवेळी निर्धारित करील असे मासिक वेतन मिळेल, मात्र अशा अधिकाऱ्याच्या वेतनात त्याच्या अधिकारपदाच्या अवधीमध्ये त्यास अहितकारक होईल असे फेरफार केले जाणार नाहीत];]

(ई) महानगरपालिका सचिव हा गैरवर्तणूक केल्याबद्दल किंवा आपल्या अधिकारपदाची कर्तव्ये बजावण्यात त्याने हयगय केल्याबद्दल किंवा तो असमर्थ झाल्याबद्दल महानगरपालिकेकडून [८]* * * कोणत्याही वेळी अधिकारपदावरून काढून टाकला जाण्यास पात्र असेल.

महानगरपालिका सचिवाच्या अधीन असलेल्या लिपिकांची व कर्मचाऱ्यांची नेमणूक.

**७८.** (१) [९][स्थायी समितीस महापौर आणि आयुक्त यांच्याशी विचारविनिमय करून] वेळोवेळी पुढील गोष्टी करता येतील :—

(अ) महानगरपालिका सचिवास निकट अधीन असणारे, तिला योग्य वाटतील इतके लिपिक व कर्मचारी नेमणे ;

(ब) अनुक्रमे उक्त लिपिकांना आणि कर्मचाऱ्यांना द्यावयाचे वेतन, फी व भत्ते यांचे स्वरूप व रक्कम निर्धारित करणे ;

(क) उक्त लिपिकांची व कर्मचाऱ्यांची कर्तव्ये विहित करण्याचा अधिकार विहित करणे किंवा महानगरपालिका सचिवास प्रत्यायोजित करणे.

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २७(ब) अन्वये महानगरपालिका लेखा समिती या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम १४ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २७(क)(एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २७(क)(दोन) अन्वये नवीन उपखंड समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ३८ अन्वये उपखंड (पाच) समाविष्ट करण्यात आला.

[६] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ कलम ४२ (२) अन्वये खंड (ड) बदली दाखल करण्यात आला.

[७] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ७ अन्वये मूळ 'रुपये तेराशे पन्नास पेक्षा अधिक नसेल' या मजकुराने सुरू होणाऱ्या व 'ते मासिक वेतन मिळेल' या मजकुराने संपणाऱ्या भागाऐवजी हा मजकूर १ एप्रिल १९६६ पासून दाखल करण्यात आला.

[८] सन १९२२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम २४ (ब) अन्वये निरसित मजकूर गाळण्यात आला.

[९] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २८(अ) अन्वये 'महानगरपालिका सचिवास अध्यक्ष आणि महापौर यांच्याशी विचारविनिमय करून' या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

उक्त लिपिक व कर्मचारी यांच्यावर नियंत्रण, वगैरे.

(२) महानगरपालिका सचिव, [१][स्थायी समितीच्या] आदेशांच्या अधीनतेने, उक्त लिपिक व कर्मचारी यांची कृत्ये व कार्यवाह्या यांवर पर्यवेक्षण करील व नियंत्रण ठेवील, [२][आणि स्थायी समिती] कलम ८१ खाली, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या विनियमांच्या अधीनतेने उक्त लिपिक व कर्मचारी यांच्या सेवेसंबंधीचे आणि त्यांचे वेतन, विशेषाधिकार आणि भत्ते यांसंबंधीचे सर्व प्रश्न निकालात काढील.

[३][**महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक**

महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाची नेमणूक.

**७८अ.** (१) [४][राज्य शासन, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०११ याच्या कलम २ च्या प्रारंभाचा दिनांक म्हणजेच दिनांक १० मार्च २०११ रोजी व तेव्हापासून, विहित करण्यात येतील अशा अटी व शर्तीवर, महाराष्ट्र वित्त व लेखा सेवेतील सहसंचालकाच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा योग्य अधिकाऱ्याची महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक म्हणून प्रतिनियुक्तीने नियुक्ती करील ; आणि— २०११ चा महा. १२.

[५][ (अ) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक, या अधिनियमान्वये जी कर्तव्ये पार पाडण्याविषयी त्यांस निदेश देण्यात आला असेल ती कर्तव्ये पार पाडील तसेच, महानगरपालिका निधी, [६][पाणी व मलप्रवाह निधी आणि पाणीपुरवठा व मलप्रवाह विल्हेवाट एकत्रित कर्ज निधी ] यांच्या लेखापरीक्षेसंबंधी महानगरपालिकेने किंवा [७][स्थायी समितीने] त्यास जी इतर कर्तव्ये पार पाडण्यास फर्माविले असेल ती कर्तव्ये आणि [८][ बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन निधीच्या] लेखापरीक्षेसंबंधी महानगरपालिका किंवा [९][ बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समितीने] त्यास जी इतर कर्तव्ये पार पाडण्यास फर्माविले असेल ती कर्तव्ये तो पार पाडील ;]

(ब) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक आपल्या अधिकारपदाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी आपला सर्व वेळ व आपले लक्ष केंद्रीत करील ;

(क) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास [१०][महानगरपालिका, राज्य शासनाच्या मान्यतेने वेळोवेळी निर्धारित करील असे मासिक वेतन मिळेल ; मात्र, अशा अधिकाऱ्यांच्या वेतनात त्याच्या अधिकारपदाच्या कालावधीमध्ये त्यास अहितकारक होईल अशा रीतीने फेरफार केले जाणार नाहीत ; ]

(ड) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास गैरवर्तणुकीबद्दल किंवा आपल्या अधिकारपदाची कर्तव्ये बजावण्यात त्याने हयगय केल्याबद्दल किंवा ती करण्यात तो असमर्थ झाल्याबद्दल कोणत्याही वेळी महानगरपालिकेच्या सभेस हजर असलेल्या सदस्यांपैकी दोन तृतीयांशापेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी केलेल्या मतदानावरून, अधिकारपदावरून काढून टाकता येईल :

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २८(ब)(एक) अन्वये ' महानगरपालिकेच्या ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २८(ब)(दोन) अन्वये ' आणि महानगरपालिकेचा अध्यक्ष ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ३ अन्वये हे शीर्षक व ही कलमे समाविष्ट करण्यात आली.

[४] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम २(क) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम १५ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[६] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २९(अ) अन्वये ' महानगरपालिका लेखा समितीने ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१)४(५)अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २९(ब) अन्वये ' महानगर लेखा समितीने ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१०] सन १९७० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ८ अन्वये मूळ 'रुपये दोन हजारांपेक्षा अधिक नसेल' या मजकुराने सुरू होणाऱ्या व 'ते मासिक वेतन मिळेल' या मजकुराने संपणाऱ्या भागाऐवजी हा मजकूर १ एप्रिल १९६६ पासून दाखल करण्यात आला.

२०११ चा महा. १२.

[१][ परंतु, या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २०११ याच्या कलम २ च्या प्रारंभाच्या दिनांकास म्हणजेच दिनांक १० मार्च २०११ रोजी असे पद धारण करीत असलेल्या महानगरपालिका मुख्य लेखा परीक्षकाच्या नियुक्ती व सेवेच्या अटी व शर्तींना बाधा पोहोचणार नाही.]

(२) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक हा आपले अधिकारपद धारण करण्याचे बंद झाल्यानंतर महानगरपालिकेच्या अखत्यारातील आणखी अधिकारपदे धारण करण्यास पात्र असणार नाही.

महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास अधीन असणारे सहायक लेखापरीक्षक, लिपिक व कर्मचारी यांची नेमणूक, वेतन, फी, भत्ते व कर्तव्ये.

**७८ब.** (१) [२][ स्थायी समितीस ] वेळोवेळी खालील गोष्टी करता येतील :—

(अ) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास निकट व अधीन असणारे तिला योग्य वाटतील इतके सहायक लेखापरीक्षक, लिपिक व कर्मचारी नेमणे ;

(ब) अनुक्रमे उक्त सहायक लेखापरीक्षक, लिपिक व कर्मचारी यांना द्यावयाचे वेतन, फी व भत्ते यांच्या रकमेचे स्वरूप व रक्कम निर्धारित करणे ;

(क) उक्त सहायक लेखापरीक्षक, लिपिक व कर्मचारी यांची कर्तव्ये विहित करणे किंवा ती विहित करण्याचे अधिकार महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाकडे प्रत्यायोजित करणे.

उक्त सहायक लेखापरीक्षक, लिपिक व कर्मचारी यांच्यावर नियंत्रण वगैरे.

(२) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक, [२][ स्थायी समितीच्या] आदेशाच्या अधिनतेने उक्त सहायक लेखापरीक्षक, लिपिक व कर्मचारी यांची कृत्ये व कार्यवाह्या यांवर पर्यवेक्षण करील व नियंत्रण ठेवील आणि [२][स्थायी समिती ] कलम ८१ खाली त्या त्या वेळी अंमलात असलेल्या विनियमांच्या अधीनतेने, उक्त सहायक लेखापरीक्षक, लिपिक व कर्मचारी यांच्या सेवेसंबंधीचे आणि त्यांचे वेतन, विशेषाधिकार आणि भत्ते यासंबंधीचे सर्व प्रश्न निकालात काढील.]

### [३][ **महानगरपालिका मुख्य लेखापाल**

[४][महानगरपालिका मुख्य लेखापाल (वित्त) याची] नेमणूक.

**७८क.** (१) महानगरपालिका वेळोवेळी महानगरपालिका मुख्य लेखापाल [४][(वित्त)] म्हणून योग्य अशा व्यक्तींची नेमणूक करील—

[५][ (अ) तो आयुक्तास वित्तीय बाबींवर सल्ला देणारा मुख्य महानगरपालिका वित्तीय अधिकारी असेल आणि तो महानगरपालिकेच्या वित्तविषयक बाबींच्या संबंधात महानगरपालिका [६][स्थायी समिती] किंवा आयुक्त त्यास फर्मावील अशी कर्तव्ये पार पाडील ;]

(ब) हा, लेखापाल आपल्या अधिकारपदाची कर्तव्ये पार पाडण्यासाठी आपला सर्व वेळ व आपले लक्ष केंद्रीत करील ;

(क) महानगरपालिका मुख्य लेखापालास, [७][महानगरपालिका राज्य शासनाच्या मान्यतेने वेळोवेळी निर्धारित करील असे मासिक वेतन मिळेल ; मात्र अशा अधिकाऱ्याच्या वेतनात त्याच्या अधिकारपदाच्या कालावधीमध्ये त्यास अहितकारक होईल अशा रीतीने फेरफार केले जाणार नाहीत ; ]

---

[१] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम २(ख) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३० अन्वये ' महापौरासह परिषद ' या शब्दप्रयोगाऐवजी हा शब्दप्रयोग त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

[३] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ४४ अन्वये हे शीर्षक व कलम ७८क समाविष्ट करण्यात आले.

[४] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ७ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला आणि समास टिपेत ' महानगरपालिका मुख्य लेखापालाची ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७०, कलम ५(अ) अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (अ)दाखल करण्यात आला.

[६] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३१ अन्वये ' महापौरासह परिषद ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९७० चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ९ अन्वये " रुपये सतराशे पन्नासपेक्षा अधिक नाही " या मजकुराने सुरू होणाऱ्या व " ते मासिक वेतन मिळेल " या मजकुराने संपणाऱ्या भागाऐवजी हा मजकूर १ एप्रिल १९६६ पासून दाखल करण्यात आला.

(ड) महानगरपालिका मुख्य लेखापाल हा, गैरवर्तणूक केल्याबद्दल किंवा आपल्या अधिकार-पदाची कर्तव्ये बजावण्यात त्याने हयगय केल्याबद्दल किंवा ती करण्यात तो असमर्थ झाल्याबद्दल महानगरपालिकेकडून कोणत्याही वेळी अधिकारपदावरून काढून टाकला जाण्यास पात्र असेल.

[१] * * * *

[३][महानगरपालिका अपर मुख्य लेखापाल (पाणीपुरवठा व मलनिःसारण) याची नेमणूक.]

[२][**७८ड.** (१) महानगरपालिका, वेळोवेळी [३][महानगरपालिका अपर मुख्य लेखापाल (पाणीपुरवठा व मलनिस्सारण)] म्हणून योग्य अशा व्यक्तीची नेमणूक करील,—

(अ) तो, पाणी व मलप्रवाह निधी आणि पाणीपुरवठा व मलप्रवाह विल्हेवाट एकत्रित कर्ज निधी यांचे लेखे ठेवील, आणि महानगरपालिका किंवा [४][ स्थायी समिती ] किंवा आयुक्त त्याला फर्मावील अशी उक्त लेख्यांसंबंधातील कर्तव्ये पार पाडील ;

(ब) महानगरपालिका अपर मुख्य लेखापाल हा, आपल्या अधिकारपदाची कर्तव्ये बजावण्यासाठी आपला सर्व वेळ व आपले लक्ष केंद्रीत करील ;

(क) महानगरपालिका अपर मुख्य लेखापालास, महानगरपालिका राज्य शासनाच्या मान्यतेने वेळोवेळी निर्धारित करील असे मासिक वेतन मिळेल ; मात्र, अशा अधिकाऱ्याच्या वेतनात त्याच्या अधिकारपदाच्या अवधीमध्ये त्यास अहितकारक होईल अशा रीतीने फेरफार केले जाणार नाहीत ;

(ड) महानगरपालिका अपर मुख्य लेखापाल हा, गैरवर्तणूक केल्याबद्दल किंवा आपल्या अधिकारपदाची कर्तव्ये पार पाडताना त्याने हयगय केल्याबद्दल किंवा ती करण्यास तो असमर्थ झाल्याबद्दल महानगरपालिकेकडून कोणत्याही वेळी अधिकारपदावरून काढून टाकला जाण्यास पात्र असेल.]

[६][महानगरपालिका मुख्य लेखापाल (कोषागार) याची] नेमणूक.

[५][ **७८ई.** महानगरपालिका, वेळोवेळी [६][ महानगरपालिका मुख्य लेखापाल (कोषागार)]म्हणून योग्य अशा व्यक्तीची नेमणूक करील—

(अ) तो महानगरपालिका कोषागाराचा मुख्य अधिकारी असेल आणि महानगरपालिका, [४][ स्थायी समिती ] किंवा आयुक्त त्यास फर्मावील अशी नगरपालिका लेख्यांशी संबंधीत कर्तव्ये पार पाडील आणि असे महानगरपालिका लेखे ठेवील ;

(ब) महानगरपालिका सह मुख्य लेखापाल हा, आपल्या अधिकारपदाची कर्तव्ये बजावण्यासाठी आपला सर्व वेळ व आपले लक्ष केंद्रीत करील ;

(क) महानगरपालिका सह मूल्य लेखापालास, महानगरपालिका राज्य शासनाच्या मान्यतेने वेळोवेळी निर्धारित करील असे मासिक वेतन मिळेल ; मात्र अशा अधिकाऱ्याच्या वेतनात त्याच्या अधिकारपदाच्या अवधीत त्यास अहितकारक होईल असे फेरफार केले जाणार नाहीत ;

(ड) महानगरपालिका सह मुख्य लेखापाल हा, गैरवर्तणूक केल्याबद्दल किंवा आपल्या अधिकारपदाची कर्तव्ये पार पाडताना हयगय केल्याबद्दल किंवा ती करण्यास तो असमर्थ झाल्याबद्दल, महानगरपालिकेकडून कोणत्याही वेळी अधिकारपदावरून काढून टाकला जाण्यास पात्र असेल.]

[७][प्रतिनियुक्तीद्वारे भरावयाची पदे अधिसूचित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार].

[७][**७८फ.** (१) या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाने या प्रयोजनार्थ विनिर्दिष्ट केलेल्या राज्य शासनाच्या संवर्गातून, एखाद्या योग्य अधिकाऱ्याची प्रतिनियुक्ती करून भरण्यासाठी महानगरपालिकेतील कोणतेही पद किंवा कोणत्याही पदांचा वर्ग **राजपत्रात** अधिसूचित करणे राज्य शासनासाठी विधीसंमत असेल :

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७०, कलम ५(ब) अन्वये पोट-कलम (२) वगळण्यात आले.

[२] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ४ अन्वये कलम ७८ड समाविष्ट करण्यात आले.

[३] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ८ अन्वये हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३२ अन्वये ‘ महापौरासह परिषद ’ या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७०, कलम ६ अन्वये कलम ७८ई समाविष्ट करण्यात आले.

[६] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ९ अन्वये ‘ महानगरपालिका सह मुख्य लेखापाल ’ या मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

[७] सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४०, कलम २ अन्वये कलम ७८ फ समाविष्ट करण्यात आले.

परंतु, अशी प्रत्येक अधिसूचना निर्गमित केल्यानंतर ती राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे मांडण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये पद किंवा पदांचा वर्ग विनिर्दिष्ट करण्याकरिता काढलेल्या प्रत्येक अधिसूचनेमध्ये राज्य शासनाच्या अधिकाऱ्यांच्या ज्या संवर्गातून पोट-कलम (१) अन्वये अधिसूचित केलेली पदे भरण्यात येतील त्या अधिकाऱ्यांच्या संवर्गाचे (यात यापुढे निर्देश " पुरक संवर्ग " असा केला आहे) वर्णन अंतर्भूत असेल.

(३) पोट-कलम (१) अन्वये अधिसूचना काढल्यानंतर त्यानुसार अधिसूचित करण्यात आलेल्या पदांच्या संख्येइतकी पदे पूरक संवर्गात निर्माण करून पूरक संवर्गातील पदांच्या संख्याबलात वाढ करण्यात येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये पुरक संवर्गात निर्माण केलेली वाढीव पदे, शक्यतोवर, महानगरपालिकेच्या एका किंवा अनेक योग्य अधिकाऱ्यांची राज्य शासन, नियमांद्वारे, विहित करील अशा रीतीने निवड करून, भरण्यात येतीलः

परंतु या कलमातील कोणत्याही गोष्टीचा पोट-कलम (१) अन्वये दिनांकास अधिसूचना काढण्यात येईल त्या दिनांकास, महानगरपालिकेतील ते अधिसूचित पद धारण करणाऱ्या पदधारकाच्या नियुक्तीवर आणि त्याच्या सेवेच्या अटी व शर्तीवर परिणाम होणार नाही].

## इतर अधिकारी व कर्मचारी

आयुक्ताने तयार करावयाची आणि स्थायी [२][किंवा शिक्षण समितीने] मंजूर करावयाची इतर अधिकारी आणि कर्मचारी यांची अनुसूची.

**७९.** (१) आयुक्त हा, [१] * * * * * [२][कलम ६१, खंड (क्यू) च्या प्रयोजनाकरिता नेमावयाचे अधिकारी व कर्मचारी यांहून अन्य] जे अधिकारी व कर्मचारी ठेवले पाहिजेत असे त्याचे मत असेल त्यांची पदनामे व श्रेणी तसेच त्यांच्यापैकी प्रत्येकाला जे वेतन, फी व भत्ते दिले पाहिजेत असे त्याने प्रस्तावित केले असेल त्यांची रक्कम व स्वरूप दर्शवणारी एक अनुसूची वेळोवेळी तयार करील व ती [३][स्थायी समितीला] सादर करील.

[४][(१अ) आयुक्त, कलम ६१, खंड (क्यू) च्या प्रयोजनांकरिता जे अधिकारी व कर्मचारी ठेवले पाहिजेत असे त्याचे मत असेल त्या नेमणूक करावयाच्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची पदनामे व श्रेणी तसेच प्रत्येकास जे वेतन, फी व भत्ते दिले पाहिजेत असे त्याने प्रस्तावित केले असेल त्यांची रक्कम व स्वरूप दर्शवणारी एक अनुसूची वेळोवेळी करील व ती [५][शिक्षण समितीला] सादर करील.

(२) [६][स्थायी समिती किंवा यथास्थिती शिक्षण समिती] अशी अनुसूची जशीच्या तशी किंवा त्यांना इष्ट वाटतील ते फेरफार करून मंजूर करील :

परंतु, ज्या अधिकारपदाची एकूण उपलब्धी दरमहा [७][रुपये पाचशेपेक्षा] जास्त असेल असे कोणतेही नवे अधिकारपद महानगरपालिकेच्या मंजुरीवाचून निर्माण करता येणार नाही :

---

[१] सन १८९५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १६, अन्वये निरसित केलेला मजकूर गाळण्यात आला.

[२] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ४५(१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३४(अ) अन्वये ' महापौरासह परिषदेला 'या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ४५(२) अन्वये पोट-कलम (१अ) समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३४(ब) अन्वये ' महापौरासह परिषदेला ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ३४(क) अन्वये ' महापौरासह परिषद ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९, कलम ६ अन्वये ' रुपये दोनशेपेक्षा ' या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[८] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ४५(३) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[९] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३४(क)(दोन) अन्वये ' महापौरासह परिषद, कलम ६१ खंड (क्यू) च्या प्रयोजनासाठी अनुसूची मंजुर करण्यापूर्वी ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१०] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम २ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[११] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम ७ अन्वये हे पोटकलम जादा दाखल करण्यात आले.

[८][ परंतु आणखी असे की, [९][ शिक्षण समिती, अनुसूची मंजूर करण्यापूर्वी, ] त्यासाठी राज्य शासनाची पूर्वमंजुरी मिळावी आणि राज्य शासन निदेश देईल असे फेरफार त्यात करील :]

[१०][ परंतु आणखी असे की, या पोटकलमाखाली दिलेली कोणतीही मंजुरी, अशा मंजुरीच्या तारखेपासून किंवा तीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा इतर तारखेपासून (ही तारीख भूतलक्षी असू शकेल) परिणामक होईल. मात्र अशी कोणतीही मंजुरी राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीवाचून भूतलक्षी तारखेपासून परिणामकारक होणार नाही किंवा कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या सेवेच्या शर्तीमध्ये त्याला अहितकारक ठरतील अशा प्रकारे फेरबदल करण्यासाठी ती भूतलक्षी प्रभावाने परिणामकारक होणार नाही.]

[११][ (३) महानगरपालिका किंवा आयुक्त यांना, कलम ८०अ खाली कोणतीही तात्पुरती नेमणूक करण्याचे जे अधिकार असतील त्यांना बाध येईल अशा रीतीने या कलमातील कोणत्याही गोष्टीचा अर्थ लावला जाणार नाही.]

स्थायी अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या सेवायोजनेवरील निर्बंध.

**८०.** कोणताही स्थायी अधिकारी किंवा कर्मचारी हा कलमे [१] [* * * *] [२][६०अ ], [३][७३अ ],७४, [४][७६अ आणि ७६ब ], ७७, [५][७८, ७८अ,], [६][७८ब, किंवा ७८ क] खाली नेमण्यात आला नसेल तर अथवा त्याचे अधिकारपद व वित्तलब्धी या निकटपूर्वीच्या कलमाखाली तयार केलेल्या व मंजूर केलेल्या व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अनुसूचीत समाविष्ट करण्यात आलेल्या नसतील तर, त्यास महानगरपालिका प्रशासनाच्या कोणत्याही विभागात नोकरीला ठेवले जाणार नाही.

[७] [* * * * * * *]

नेमणूक करण्याचा अधिकार कोणामध्ये निहित असेल.

†[८][**८०अ.** (१) ज्या महानगरपालिका अधिकाऱ्यांचे—मग असे अधिकारी अस्थायी असोत किंवा स्थायी असोत—[९][कलम ७९ खाली तयार केलेल्या व मंजुरी दिलेल्या, त्या त्या काळी अंमलात असलेल्या अनुसूचीत नमूद केलेल्या कार्यकारी अभियंत्याच्या पदाच्या समान दर्जाच्या किंवा त्यापेक्षा वरच्या दर्जाच्या पदावर नेमणूक करण्याचा अधिकार महापालिकेमध्ये निहित असेल :

---

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ४६(१) अन्वये ३९ हा आकडा वगळण्यात आला.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम १६ अन्वये " ६०अ " हा आकडा व अक्षर समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४, कलम ५ अन्वये " ७३अ " हा आकडा व अक्षर समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९०७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३, कलम १३(१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ४ अन्वये " किंवा ७८ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ४६(२) अन्वये " किंवा ७८ब " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ४३ अन्वये हे परंतुक वगळण्यात आले.

[८] सन १९२२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम २० अन्वये कलम ८०अ जादा दाखल करण्यात आले.

[९] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ६(अ) (एक) अन्वये " भत्ते वगळून किमान मासिक वेतन, एक हजार दोनशे रुपये किंवा अधिक असेल त्यांची नेमणूक करण्याचा " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

† सन १९४७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४, कलम ६ पुढीलप्रमाणे आहे :—

कलम ८०अ खाली नेमण्यात आलेल्या विशेष अभियंत्यांच्या कृतीचे विधीग्राह्यीकरण.

"**६.** दिनांक २६ सप्टेंबर १९४६ पासून ते मुंबई शहर नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९४७ ज्या तारखेला प्रवर्तनात आला त्या तारखेपर्यंतच्या कालावधीमध्ये, उक्त अधिनियमाच्या कलम ८०अ खाली नेमण्यात आलेल्या विशेष अभियंत्याने, शहर अभियंत्याने वापरलेले सर्व अधिकार व पार पाडलेली सर्व कर्तव्ये व कार्ये विधित , वापरले असल्याचे व पार पाडली असल्याचे मानण्यात येईल व ते तसे नेहमीकरिता मानण्यात येईल ; आणि उक्त विशेष अभियंत्याने केलेल्या कोणत्याही कृती, हा अधिनियम प्रवर्तनात आल्यानंतर, ज्या अधिकारांचा अभिप्रेत वापर करून व ज्या कर्तव्यांची अभिप्रेत बजावणी करून उक्त कृती केल्या होत्या त्यावेळी ते अधिकार व ती कर्तव्ये त्याच्यामध्ये निहित करण्यात आली नव्हती याच केवळ कारणामुळे विधिअग्राह्य मानण्यात येणार नाहीत किंवा त्यांच्याबद्दल हरकत घेण्यात येणार नाही, आणि उक्त विशेष अभियंत्याला अशा कृतींच्या संबंधातील उत्तरदायित्वातून आता याद्वारे हानिरक्षित करण्यात व मोकळे करण्यात येत आहे." १९४७ चा मुंबई ४.

[10][परंतु असे की, कर्ज उभारून करावयाच्या कामासाठी अशा पदांवर करावयाच्या तात्पुरत्या नेमणुका या सहा महिन्यांहून अधिक नसेल अशा कालावधीसाठी स्थायी समितीच्या किंवा कलम ६१, खंड (क्यू) च्या प्रयोजनाकरिता हाती घेतलेल्या कामांच्या बाबतीत शिक्षण समितीच्या पूर्वमान्यतेने आयुक्तास करता येतील ; आणि आयुक्त अशी प्रत्येक नेमणूक केल्यावर त्याविषयी महानगरपालिकेस ताबडतोब कळवील. उक्त सहा महिन्यांचा कालावधी संपल्यानंतर, अशा कोणत्याही नेमणुकीचे महानगरपालिकेच्या पूर्वमंजुरीवाचून नवीकरण करता येणार नाही.]

(२) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल ते खेरीज करून एरव्ही, महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी [1][—मग ते स्थायी असोत किंवा अस्थायी असोत] यांना नेमण्याचा अधिकार आयुक्तामध्ये निहित असेल :]

[2][परंतु, स्थायी नेमणुकांच्या बाबतीतील, असा अधिकार कलम ७९ खाली तयार केलेल्या व मंजूर केलेल्या व त्या वेळी अंमलात असलेल्या अनुसूचीच्या अधीन असेल :

परंतु आणखी असे की, आयुक्त अशा कोणत्याही अस्थायी पदांवरील नेमणुका सहा महिन्यांपेक्षा अधिक होणाऱ्या कोणत्याही कालावधीसाठी करणार नाही आणि [3][ अशा पदांवर ] [4][ कलम ७९ खाली तयार केलेल्या व मंजूर केलेल्या तसेच त्या त्या काळी अंमलात असलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या, नोंदणी सहायकाच्या पदापेक्षा वरच्या पदावर] केलेल्या कोणत्याही नेमणुकांचे [3][ आयुक्त [5][ स्थायी समितीच्या किंवा यथास्थिति, शिक्षण समितीच्या ] पूर्व मंजुरीशिवाय नवीकरण करणार नाही. ]]

[6][ **स्पष्टीकरण**.—या कलमाच्या, कलम ८० ब, पोट-कलम (१) च्या आणि कलम ४६० यू च्या प्रयोजनांसाठी, जर एखाद्या पदाच्या वेतनश्रेणीचे किमान वेतन हे दुसऱ्या एखाद्या पदाच्या वेतनश्रेणीच्या वेतनाएवढे असेल किंवा त्याहून अधिक असेल तर, त्या पदाचा दर्जा अशा दुसऱ्या पदाएवढा किंवा त्याहून अधिक असल्याचे मानण्यात येईल.]

नेमणूका करण्याची रीत.

[7][**८०ब.** [8][(१) या कलमाखाली केलेल्या नियमांनुसार आयोगाशी विचारविनिमय केल्यानंतर असेल त्याखेरीज एरव्ही,–

[9][(अ) ज्या पदांवर नेमणूक करण्याचा अधिकार महानगरपालिकेमध्ये किंवा [10][स्थायी समितीमध्ये] निहित असेल आणि जे पद, कलम ७९ खाली तयार केलेल्या आणि मंजूर केलेल्या तसेच त्या त्या काळी अंमलात असलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या कार्यकारी अभियंत्याच्या पदाच्या समान असेल किंवा त्यापेक्षा वरच्या दर्जाचे असेल ; किंवा ]

[11][(ब) ज्या पदांवर नेमणुका करण्याचा अधिकार बृहन्मुंबई वीज पुरवठा आणि परिवहन समितीमध्ये निहित असेल आणि जे, बृहन्मुंबई वीज पुरवठा आणि परिवहन समिती आणि महानगरपालिका यांनी कलम ४६०र खाली मंजूर केलेल्या अनुसूचीमध्ये नमूद केलेल्या सचिवाच्या पदाच्या समान असेल किंवा वरच्या दर्जाचे असेल ;]

अशा पदावर कोणत्याही व्यक्तीची नेमणूक करण्यात येणार नाही :]]

---

[1] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम ८ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या, कलम ८ अन्वये ही परंतुके जादा दाखल करण्यात आली.

[3] सन १९८३ चा अधिनियम क्रमांक ४३, कलम १० (२) अन्वये "दोनशे रुपयांहून अधिक मासिक वेतन असेल अशा प्रकारच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ६७ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३५(ब) अन्वये 'महापौरासह परिषदेच्या' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ६(क) अन्वये हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

[7] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ४८ अन्वये हे कलम बदली दाखल करण्यात आले.

[8] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ५(अ) अन्वये पोट-कलम (१) बदली दाखल करण्यात आले.

[9] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ७(अ) अन्वये खंड (अ) बदली दाखल करण्यात आला.

[10] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३६(अ)(एक) अन्वये 'महापौरासह परिषदेमध्ये' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[11] वरील अधिनियमाच्या कलम ३६(अ)(दोन) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[१][परंतु याबाबतीत आयुक्ताने विनिर्दिष्ट केलेली पदे असतील अशा [२][आणि कलम ७९ खाली तयार केलेल्या व मंजुरी दिलेल्या तसेच त्या त्या काळी अंमलात असलेल्या अनुसुचीमध्ये नमूद केलेल्या, कार्यकारी अभियंत्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जाचे असेल] अशा खंड (अ) खाली येणाऱ्या व आंतरराष्ट्रीय विकास अधिसंघाकडून अंशतः अर्थसहाय्य मिळणाऱ्या पाणीपुरवठा व मलप्रवाह प्रकल्प यांच्याशी संबद्ध असलेल्या पाणीपुरवठा व मलप्रवाह विभागातील पदांच्या बाबतीत आयोगाशी विचारविनिमय करणे आवश्यक असणार नाही.]

(२) सहा महिन्यांहून अधिक कालावधीची नसेल अशा कोणत्याही कार्यार्थ किंवा अस्थायी नेमणुकीच्या बाबतीत [३][किंवा राज्य शासन आयोगाशी विचारविनिमय करून अशा लिपिकवर्गीय पदावरील नेमणुका वेळोवेळी विनिर्दिष्ट करील त्या नेमणुका पदोन्नती देऊन भरावयाच्या असतील तेव्हा त्या नेमणुकींच्या बाबतीत] पोट-कलम (१) मधील कोणतीही तरतूद लागू होणार नाही.]

[४][ (२अ) तसेच पोट-कलम (१) च्या तरतुदी—

[५][* * * * *]

(ब) जो भारत प्रशासन सेवा, [६][भारत पोलीस सेवा किंवा भारत लेखापरीक्षा व लेखा सेवा ] यांतील सदस्य असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याच्या,—

अशा कोणत्याही पदावर स्वीयेतर सेवा शर्तीवर केलेल्या नेमणुकींच्या बाबतीतसुद्धा लागू होणार नाहीत. ]

(३) राज्य शासन, महानगरपालिका आणि आयोग यांच्याशी विचारविनिमय करून, पुढील गोष्टी विहित करण्यासाठी नियम करील—

(अ) पदांसंबंधी जाहिरात देणे, अर्ज मागविणे, त्यांची छाननी करणे आणि मुलाखतीसाठी उमेदवारांची निवड करणे यांबाबत आयोगाने अनुसरावयाची कार्यपद्धती ;

[७][(ब) आयोगाने उमेदवार निवडण्याच्या बाबतीत आणि महानगरपालिकेने किंवा, यथास्थिति, बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समितीने आयोगाशी विचारविनिमय करण्याच्या बाबतीत अनुसरावयाची कार्यपद्धती ;]

(क) महानगरपालिकेच्या [८][किंवा [९][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या]] अधिकाऱ्याला किंवा अधिकाऱ्यांना आयोगाला सल्ला देण्याकरिता मुलाखतीच्या वेळी हजर राहणे शक्य व्हावे यासाठी अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(ड) आयोग आणि नेमणूक करणारा प्राधिकारी यांच्यात मतभिन्नता उत्पन्न होईल अशा प्रसंगी अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(ई) आयोगाला, महानगरपालिकेने [८][किंवा, यथास्थिति [९][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाने]] विचारविनिमय आणि इतर आनुषंगिक गोष्टी यांसाठी द्यावयाची फी व इतर परिव्यय ;

---

[१] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ५ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ७(क) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४, कलम ३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६२, कलम २(१) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले. ही सुधारणा दिनांक १४ मे १९५४ रोजी करण्यात आल्याचे व त्या दिवसापासून परिणामक झाल्याचे मानण्यात येईल. [सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६२, कलम २ (२) पहा.]

[५] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ४५(ब) अन्वये खंड (अ) वगळण्यात आला.

[६] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम ३ अन्वये " किंवा भारत पोलीस सेवा " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[७] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३६(ब) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[८] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ५(ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[९] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(फ) आयोगाशी विचारविनिमय करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असेल किंवा आनुषंगिक असेल अशी कोणतीही इतर बाब.

[१][(४) (अ) पोट-कलम (१) खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या पदांच्या बाबतीत महानगरपालिका, आणि

(ब) त्या पोट-कलमाच्या खंड (ब) मध्ये निर्दिष्ट केलेल्या पदांच्या बाबतीत बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समिती,

राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने, अशा पदांवर नेमणूक होण्यासाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारांसाठी आवश्यक असलेल्या अर्हता विहित करणारे नियम करील :

परंतु, बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीने करावयाचे असे कोणतेही नियम, राज्य शासनाकडे सादर करण्यापूर्वी महानगरपालिकेने त्यांस पुष्टी दिलेली असली पाहिजे.]

(५) या कलमाखाली केलेले नियम **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येतील.

१९५० चा मुंबई ४८.

(६) [२][(अ)] अशा कोणत्याही पदावर नेमणूक केली जाण्यासाठी आवश्यक असलेल्या अर्हता विहित करणारे जे कोणतेही नियम, मुंबई महानगरपालिका व मुंबई शहर प्राथमिक शिक्षण (सुधारणा) अधिनियम, १९५०, हा अंमलात येण्याच्या निकटपूर्वी अंमलात होते ते, या कलमाखाली केलेल्या नियमान्वये अधिक्रांत करण्यात आले नसतील किंवा सुधारण्यात आले नसतील तर व तोपर्यंत, अंमलात असण्याचे चालू राहील व ते या कलमाखाली करण्यात आले आहेत असे मानण्यात येईल.

१९६४ चा महाराष्ट्र ११.

[२][(ब) मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९६४, हा अंमलात येण्याच्या निकटपूर्वी पोट-कलम (१), खंड (ब) मध्ये निर्दिष्ट करण्यात आलेल्या पदांवर नेमणूक होण्यासाठी आवश्यक असलेल्या अर्हता विहित करण्यासंबंधी जे कोणतेही नियम अंमलात होते ते नियम, या कलमाखाली केलेल्या नियमांद्वारे अधिक्रांत करण्यात किंवा सुधारण्यात आले नसतील तर व तोपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहतील व ते या कलमाखाली करण्यात आले आहेत असे मानण्यात येईल.]

(७) या कलमाखाली आयोगास दिलेली सर्व फी राज्य शासनाकडे जमा करण्यात येईल.

(८) ज्या कोणत्याही पदावरील नेमणुकीच्या बाबतीत आयोगाशी विचारविनिमय करण्यात आला असेल त्या नेमणुकीसंबंधीच्या कोणत्याही बाबतीत आयोगाने केलेला सर्व पत्रव्यवहार गोपनीय मानण्यात येईल आणि महानगरपालिका, [३][स्थायी समिती किंवा बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समिती] किंवा महानगरपालिकेची कोणतीही समिती यात त्यावर कोणत्याही प्रकारची चर्चा करण्याची परवानगी दिली जाणार नाही अथवा त्यासंबंधी कोणतीही गोष्ट लोकांच्या उघडकीस आणली जाणार नाही.]

### अनुपस्थितीची परवानगी, कार्यार्थ हंगामी नेमणुका, वगैरे

रजा मंजूर करणे, वगैरे संबंधात [४][स्थायी समितीने] विनिमय करणे.

**८१.** (१) महानगरपालिका संमत करील अशा कोणत्याही ठरावास अनुसरून [४][स्थायी समिती] पुढील गोष्टींसंबंधी वेळोवेळी विनियम करील —

(अ) ज्या महानगरपालिका अधिकाऱ्याकडून किंवा कर्मचाऱ्याकडून प्रतिभूती मागणे इष्ट आहे असे वाटेल, अशा कोणत्याही महानगरपालिका अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने द्यावयाच्या प्रतिभूतीची रक्कम व तिचे स्वरूप निश्चित करणे ;

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३६(क) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[२] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ५ (ड) अन्वये पोट-कलम (६) ला खंड (अ) असा नवीन क्रमांक देण्यात आला व खंड (ब) समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३६(ड) अन्वये 'महपौरासह परिषद' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या क्रमांक ३७ अन्वये 'महापौरासह परिषद' या मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

(ब) महानगरपालिका अधिकारी आणि कर्मचारी यांना रजा मंजूर करण्याबाबत विनियमन करणे ;

(क) उक्त अधिकारी आणि कर्मचारी रजेवर असतील तेव्हा त्यांना किंवा त्यांच्यापैकी काहींना भत्ते देण्याबाबत मंजुरी देणे ;

(ड) उक्त अधिकारी किंवा कर्मचारी यांच्यापैकी कोणीही रजेवर असताना त्यांच्या जागी काम करण्यासाठी नेमण्यात आलेल्या व्यक्तींना द्यावयाचे पारिश्रमिक निर्धारित करणे ;

[१][(डड) उक्त अधिकारी व कर्मचारी यांना प्रवासभत्ता किंवा वाहनभत्ता देण्यास मंजुरी देणे ;]

(ई) उक्त सर्व अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवावधीचे विनियमन करणे ;

(फ) उक्त अधिकारी व कर्मचारी यांना किंवा त्यांच्यापैकी कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास सेवानिवृत्त झाल्यावर किंवा त्या सेवेतून मुक्त केल्यावर, ज्या शर्तीखाली निवृत्ति-वेतने, उपदाने किंवा अनुकंपा भत्ते मिळतील, आणि [२][उत्तरजीवी विवाहसाथी किंवा मुले यांना अथवा उत्तरजीवी विवाहसाथी किंवा मुले नसल्यास उक्त अधिकारी किंवा कर्मचारी यांच्यापैकी कोणावरही अवलंबून असलेले आईबाप, भाऊ व बहिणी असल्यास त्यांना] ते अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या मृत्यूनंतर अनुकंपा भत्ता ज्या शर्तीखाली मिळेल त्या शर्ती ठरवणे आणि अशी निवृत्तीवेतने, उपदाने किंवा अनुकंपा भत्ते यांची रक्कम निर्धारित करणे ;

(ग) स्थायी समितीच्या मान्यतेने उक्त अधिकारी व कर्मचारी यांनी जो कोणताही भविष्य-निर्वाह निधी स्थापन केलेला असेल त्यासाठी [३][किंवा महानगरपालिका उक्त प्राधिकारी व कर्मचारी यांच्या लाभाकरिता जो कोणताही भविष्यनिर्वाह निधी स्थापन करील त्यासाठी] अंशदाने विवक्षित विहित दरांनी आणि विवक्षित शर्तींच्या अधीनतेने देण्यास मंजुरी देणे ;

[४][(ह) सर्वसाधारणतः उक्त अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवेसंबंधी इतर कोणत्याही शर्ती विहित करणे.]

असे विनियम महानगरपालिकेने आणि जर ते खंड (फ) खाली केलेले असतील तर [६][(राज्य)] शासनाने ते कायम करण्याच्या अधीन असणे.

(२) स्थायी समितीने या कलमाखाली केलेला कोणताही विनियम महानगरपालिकेने कायम केलेला असल्याखेरीज व कायम करीतोपर्यंत अंमलात येणार नाही, किंवा तो विधिग्राह्य असणार नाही. तसेच जर तो खंड (फ) खाली केलेला असेल तर, तो [५][[६][राज्य] शासनाने] कायम केलेला असल्याखेरीज व कायम करीतोपर्यंत अंमलात येणार नाही व विधिग्राह्य असणार नाही.

**८२.** [७][नेमणूक करण्याचा अधिकार कोणामध्ये निहित असेल.] १९२२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ यान्वये निरसित करण्यात आले.

---

[१] सन १९३६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ५(१) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम ९ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९२२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम २७ (१) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला आणि तो महानगरपालिका निश्चित करील अशा दिनांकापासून दाखल केल्याचे व परिणामक झाल्याचे मानण्यात येईल.

[४] सन १९३६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ५(२) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[५] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये "सरकार" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[६] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[७] सन १९२२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम २८ अन्वये निरसित करण्यात आलेले कलम ८२ गाळण्यात आले आणि हे निरसन महानगरपालिका निश्चित करील अशा तारखेपासून करण्यात आल्याचे व परिणामक झाल्याचे मानण्यात येईल.

**८३.** (१) प्रत्येक नगरपालिका अधिकाऱ्यास आणि कर्मचाऱ्यास ज्या प्राधिकाऱ्याने नेमले असेल तो प्राधिकारी त्याला विभागीय नियमांचा भंग केल्याबद्दल किंवा शिस्तभंग केल्याबद्दल किंवा निष्काळजीपणाबद्दल, अक्षमतेबद्दल, कर्तव्य बजावण्यात हयगय केल्याबद्दल किंवा इतर गैरवर्तणुकीबद्दल [१][पदावनत करू शकेल, काढून टाकू शकेल किंवा बडतर्फ करू शकेल ] :

[९][निलंबित करणे, पदावनत करणे, काढून टाकणे किंवा बडतर्फ करणे आणि इतर शास्ती लादणे याबाबतचा अधिकार कोणामध्ये निहित असेल.]

(२) परंतु,—

(अ) [२][ज्या पदाला [३][कलम ८० अ चे पोट-कलम (१) च्या] तरतुदी लागू असतील] [४][अशा पदावर नेमलेल्या] कोणत्याही अधिकाऱ्यास, [५][स्थायी समितीच्या पूर्व मान्यतेवाचून अथवा कलम ६१, खंड (क्यू) च्या प्रयोजनांकरिता नेमण्यात आलेल्या अधिकाऱ्याच्या बाबतीत शिक्षण समितीच्या] [६][पूर्व] मान्यतेवाचून बडतर्फ करणार नाही ;

[७][(ब) कलमे ५४अ, ५५, ५६अ, ७४, ७५, ७६अ, ७६ब, ७७, ७८अ, ७८क, ७८ड, किंवा ७८ई खाली महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, आयुक्त, निलंबित करू शकेल, आणि असे प्रत्येक निलंबन व त्याबाबतची कारणे ताबडतोब महानगरपालिकेला कळवण्यात येतील व असे निलंबन झाल्याच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या आत, महानगरपालिकेने त्यास पुष्टी दिली नाही, तर असे निलंबन संपुष्टात येईल ;]

[८][ (क) महानगरपालिकेने, कलमे ५४अ, ५५, ५६अ, ७४, ७५, ७६अ, ७६ब, ७७, ७८अ, ७८क, ७८ड किंवा ७८ई खाली असेल त्याहून अन्यथा नियुक्त केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने कोणत्याही विभागीय नियमांचा भंग केल्याबद्दल किंवा शिस्तभंग केल्याबद्दल किंवा निष्काळजीपणाबद्दल, अक्षमतेबद्दल, कर्तव्य बजावण्यात हयगय केल्याबद्दल किंवा इतर गैरवर्तणुकीबद्दल आयुक्त त्यास निलंबित करू शकेल किंवा [१०][ स्थायी समितीच्या पूर्वमान्यतेने किंवा कलम ६१ च्या खंड (क्यू) च्या प्रयोजनांकरिता नियुक्त करण्यात आलेल्या अधिकाऱ्याच्या बाबतीत, शिक्षण समितीच्या] पूर्वमान्यतेने, आयुक्त, त्यास पदावनत करू शकेल, काढून टाकू शकेल, किंवा बडतर्फ करू शकेल;]

---

[१] सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ५(अ) अन्वये ‘ दंड करू शकेल, पदावनत, निलंबित किंवा बडतर्फ करू शकेल ’ या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ८ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ४ अन्वये “ कलम ८० अ ” हा शब्द, आकडा व अक्षराऐवजी हा शब्द, कंस, आकडा व अक्षर समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम २ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३८(अ) अन्वये “ महापौरासह परिषदेच्या ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम ९ अन्वये “ पूर्व ” हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

[७] सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ५(ब) (एक) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम ५(ब) (दोन) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[९] वरील अधिनियमाच्या कलम ५(ड) अन्वये मूळ समास टिपेऐवजी ही समाज टीप दाखल करण्यात आली.

[१०] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३८(अ) अन्वये “ महापौरासह परिषदेच्या ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][ (ड) जो, महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास निकट दुय्यम असेल आणि ज्यास भत्ते वगळून अडीचशे रुपयांहून अधिक नसेल इतके मासिक वेतन मिळत असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने, विभागीय नियमांचा भंग केल्याबद्दल किंवा शिस्तभंग केल्याबद्दल किंवा निष्काळजीपणाबद्दल, अक्षमतेबद्दल, कर्तव्य बजावण्यात हयगय केल्याबद्दल किंवा इतर गैरवर्तणुकीबद्दल त्यास मुख्य लेखापरीक्षक [२][स्थायी समितीस] ज्या शर्ती विहित करणे योग्य वाटेल अशा कोणत्याही शर्ती आणि मर्यादा असल्यास त्यांच्या अधीनतेने आणि [२][स्थायी समितीकडे] अपील करण्याच्या हक्काच्या अधीनतेने, दंड करू शकेल किंवा पदावनत किंवा निलंबित करू शकेल.]

[३][ (३) महानगरपालिका आयुक्त, सबळ व पुरेशा कारणांसाठी कोणत्याही महानगरपालिका अधिकाऱ्यावर किंवा कर्मचाऱ्यावर पुढील शास्ती लादू शकेल :—

(एक) ठपका ठेवणे ;

(दोन) हयगय केल्यामुळे, गैरवर्तणुकीमुळे, आदेशांचा किंवा नियमांचा भंग केल्यामुळे त्याच्याकडून महानगरपालिकेचे जे कोणतेही आर्थिक नुकसान झाले असेल त्याची त्याच्या वेतनामधून संपूर्णतः किंवा अंशतः वसुली करणे ;

(तीन) द्रव्य दंड करणे ;

(चार) एखादी वेतनवाढ किंवा वेतनवाढी विनिर्दिष्ट मुदतीकरिता किंवा कायमच्या, रोखून धरणे ;

(पाच) पदोन्नती व दक्षता रोध अडवून धरणे ;]

अनुपस्थितीची परवानगी कोणी द्यावी.

**८४.** (१) आयुक्तामध्ये ज्या कोणत्याही महानगरपालिका अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास नेमण्याचे अधिकार निहित असतील अशा अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला, कलम ८१ खाली त्या त्या वेळी अंमलात असलेल्या विनियमांच्या अधीनतेने आणि महानगरपालिका सचिव [४][किंवा महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक] यांच्या निकट दुय्यम अधिकाऱ्याहून अन्य [५]* * * * * कोणत्याही महानगरपालिका अधिकाऱ्यास एक महिन्याहून अधिक नसेल इतक्या कालावधीपर्यंत आयुक्त अनुपस्थितीची परवानगी देऊ शकेल.

(२) स्थायी समिती पूर्वोक्त गोष्टींच्या अधीनतेने—

(अ) कलम ७८ खाली नेमलेल्या कोणत्याही लिपिकास किंवा कर्मचाऱ्यास ; [६][किंवा कलम ७८ब खाली नेमलेल्या कोणत्याही सहायक लेखापरीक्षकास, लिपिकास किंवा कर्मचाऱ्यास,] स्थायी समिती अनुपस्थितीची परवानगी देऊ शकेल :

[७][परंतु, भत्ते वगळून ज्या लिपिकाचे किंवा कर्मचाऱ्याचे मासिक वेतन दोनशे रुपयांहून अधिक नसेल अशा लिपिकास किंवा कर्मचाऱ्यास तीन महिन्यांहून अधिक नसेल इतक्या कालावधीची अनुपस्थितीची परवानगी—

(एक) असा लिपिक किंवा कर्मचारी हा कलम ७८अ खाली नेमलेला असेल तेव्हा महानगरपालिका सचिव; अथवा

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम १० अन्वये हा खंड जादा दाखल करण्यात आला.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३८(अ) अन्वये " महापौरासह परिषदेच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ५(क) अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[४] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ६(१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ५० अन्वये " व ज्याची नेमणूक करण्याचा अधिकार स्कूल्स कमिटीकडे देण्यात आला आहे असा अंमलदार अथवा नोकर याखेरीज " हा मजकूर वगळण्यात आला.

[६] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ६(२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम ११ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

(दोन) असा लिपिक किंवा कर्मचारी हा कलम ७८ब खाली नेमलेला असेल तेव्हा महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक—

देऊ शकेल ;

(ब) ज्यास नेमण्याचा अधिकार [१][आयुक्ताकडे निहित नसेल किंवा ज्यास कलम ६१, खंड (क्यू) च्या प्रयोजनांकरिता नोकरीस ठेवण्यात आले नसेल] अशा कोणत्याही इतर महानगरपालिका अधिकाऱ्यास एक महिन्यापेक्षा अधिक कालावधीची अनुपस्थितीची परवानगी देऊ शकेल ;

[२][ (३) जो कलम ६१, खंड (क्यू) च्या प्रयोजनांकरिता नोकरीस ठेवण्यात आलेला असेल आणि ज्यास नेमण्याचा अधिकार आयुक्तामध्ये निहित नसेल अशा कोणत्याही महानगरपालिका अधिकाऱ्यास पूर्वोक्त गोष्टीच्या अधीनतेने शिक्षण समिती एक महिन्याहून अधिक अशा कालावधीच्या अनुपस्थितीची परवानगी देऊ शकेल.]

प्रकरण १६अ खाली नेमलेल्या अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या बाबतीत व्यावृत्ती.

[३][**८४अ.** या अधिनियमाचे प्रकरण १६अ यांच्या तरतुदींखाली नेमलेल्या अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना कलमे ७९, ८०, ८०अ, [४][*], ८१, ८३ आणि ८४ यांतील कोणत्याही तरतुदी लागू होणार नाहीत.]

कार्यार्थ नेमणुका.

**८५.** (१) ज्या प्राधिकाऱ्याने एखाद्या अधिकाऱ्यास अनुपस्थितीची परवानगी दिली असेल त्या प्राधिकाऱ्यास आवश्यक वाटेल तेव्हा व उपरोक्त विनियमांच्या अधीनतेने रजेवर असलेल्या अशा अधिकाऱ्याच्या जागी काम करण्यासाठी एखाद्या व्यक्तीची नेमणूक करता येईल :

(२) परंतु,—

(अ) जेव्हा [५][शहर अभियंता] किंवा कार्यकारी आरोग्य अधिकारी [६][किंवा जलव्यवस्था अभियंता] यास एक महिन्यापेक्षा अधिक कालावधीसाठी अनुपस्थितीची परवानगी देण्यात आली असेल तेव्हा, त्याच्या जागी काम करण्यासाठी एखाद्या व्यक्तीची नेमणूक महानगरपालिका करील ;

(ब) [५][शहर अभियंता] किंवा कार्यकारी आरोग्य अधिकारी [७][किंवा जलव्यवस्था अभियंता म्हणून] काम करण्यासाठी एखाद्या व्यक्तीची करण्यात आलेली कोणतीही नेमणूक [८][[९][राज्य] शासनास] नामंजूर करता येईल; आणि अशा रीतीने नामंजूर झाल्याच्या वेळेपासून ती नेमणूक रद्दबातल होईल ;

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३९(अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३९(ब) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम १७ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ६ अन्वये " ८०ब " हा मजकूर वगळण्यात आला.

[५] सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम ६ अन्वये " कार्यकारी अभियंता " या शब्दांऐवजी " शहर अभियंता " हे शब्द दाखल करण्यात आले.

[६] सन १९११ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ४(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ४(ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[८] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " गव्हर्नर इन कौन्सिल " या शब्दांऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[९] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(क) कोणतीही व्यक्ती कायदेशीररीत्या अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायी असल्याखेरीज तिला कार्यकारी आरोग्य अधिकाऱ्याच्या जागी तीन महिन्यांहून अधिक कालावधीकरिता काम पाहण्यासाठी नेमता येणार नाही, मात्र उक्त अधिकाऱ्याच्या जागी तीन महिन्यांहून अधिक नसेल इतक्या कालावधीकरिता काम करण्यासाठी नेमावयाची व्यक्ती ही कायदेशीरीत्या अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायी असण्याची आवश्यकता नाही.

(३) या कलमाखाली कोणत्याही अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या जागी काम करण्यासाठी नेमलेली व्यक्ती, याप्रमाणे काम करताना ते अधिकारपद किंवा ती जागा कायम धारण करणारी व्यक्ती जी कर्तव्ये बजाविण्यास बांधलेली असेल किंवा तिला जे अधिकार वापरता येत असतील किंवा ज्या दायित्वांच्या, निर्बंधांच्या व शर्तींच्या अधीन ती असेल तीच कर्तव्ये बजावील व अशी व्यक्ती त्याच दायित्वांच्या, निर्बंधांच्या व शर्तींच्या अधीन असेल.

तात्पुरती नेमणूक.

[१][**८५अ.** पूर्वगामी तरतुदींत काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ८०ब, पोट-कलम (१) यात उल्लेख केलेल्या कोणत्याही पदांपैकी एखादे पद रिकामे झाले असेल तेव्हा, महानगरपालिकेस [२][किंवा, यथास्थिति,] [३][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीस] उक्त कलमाच्या [४] * * * तरतुदींप्रमाणे एखाद्या व्यक्तीची नेमणूक होईपर्यंत असे रिकामे पद भरण्यासाठी, त्या पदाच्या कमाल वेतनाहून अधिक नसेल अशा मासिक वेतनावर कोणत्याही व्यक्तीची नेमणूक करता येईल :

परंतु, या कलमाखाली करावयाची कोणतीही नेमणूक, पद रिकामे झाल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांहून अधिक अवधीपर्यंत असणार नाही किंवा पद रिकामे झाल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांचा अवधी संपल्यानंतर करण्यात येणार नाही.]

### महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांच्या निरर्हता

महानगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी यांचा महानगरपालिकेशी केलेल्या कोणत्याही [८][संविदेत] हितसंबंध नसणे.

**८६.** (१) महानगरपालिकेशी महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत कोणत्याही व्यक्तीचा स्वतःचा किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल तर [५] * * * * ती महानगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी असण्यास निरर्ह असेल.

(२) जो कोणताही महानगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी उपरोक्त कोणत्याही अशा संविदेत [६] * * * * स्वतः किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरीत्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध संपादन करील, तो महानगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी म्हणून असण्याचे बंद होईल व त्याचे अधिकारपद रिकामे होईल.

(३) महानगरपालिकेबरोबर, महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत [७] * * * * जो कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध धारण करण्यास कलम १६, खंड (ह) आणि (के) खाली पालिका सदस्यास परवानगी असेल व जो धारण केल्यामुळे असा पालिका सदस्य होण्यास तो निरर्ह ठरत नसेल अशा प्रकारच्या कोणत्याही हिश्श्याच्या किंवा हितसंबंधाच्या बाबतीत या कलमातील कोणतीही तरतूद लागू होणार नाही.

---

[१] सन १९३९ चा मुंबई अधिनियम क्रमांक १८, कलम ३ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ७ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४० अन्वये 'महापौरासह परिषदेस' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ५१ अन्वये "पोट-कलम (२) च्या" हा मजकूर वगळण्यात आला.

[५] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ५(अ) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ५(ब) अन्वये "किंवा नोकरीत" हा मजकूर वगळण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ५(क) अन्वये "किंवा तिच्या अथवा तिच्या वतीने असलेल्या कोणत्याही नोकरीत" हा मजकूर वगळण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम ५(ड) अन्वये "संविदा, इत्यादी" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[१][ प्रकरण चार-अ

## विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे

**८६अ.** (१) महानगरपालिका, आपले सर्व अभिलेख, अशा रीतीने व अशा नमुन्यात यथोचितरीत्या तालिकाबद्ध करील व त्याची निर्देशसूची तयार करील व प्रसिद्ध करील जेणेकरून, पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेली माहिती महानगरपालिकेने प्रकट करता येईल. विनिर्दिष्ट माहिती प्रकट करणे.

(२) माहिती प्रकट करण्याच्या रीतीमध्ये,—

(एक) वृत्तपत्रांमध्ये ;

(दोन) इंटरनेटवर ;

(तीन) महानगरपालिकेच्या मुख्यालयामधील तसेच प्रभाग कार्यालयामधील सूचना फलकांवर ;

(चार) विहित करण्यात येईल अशा इतर पद्धतीने, माहिती प्रसिद्ध करण्याचा अंतर्भाव असेल :

परंतु, ज्या भाषेत माहिती उपलब्ध असेल त्या भाषेतच, महानगरपालिका ती माहिती प्रकट करेल.

(३) महानगरपालिकेला पुढील माहिती प्रकट करणे आवश्यक असेल :—

(एक) महानगरपालिकेचा तपशील ;

(दोन) महानगरपालिकेची कार्ये पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी किंवा तिला सल्ला देण्यासाठी घटित करण्यात आलेली, कोणत्याही नावाने संबोधली जाणारी मंडळे, परिषदा, समित्या व इतर निकाय दर्शविणारे विवरणपत्र—मग त्या मंडळाच्या, परिषदांच्या, समित्यांच्या व इतर निकायांच्या बैठकी जनतेसाठी खुल्या असोत किंवा नसोत अथवा अशा बैठकींची कार्यवृत्ते जनतेला पाहण्यासाठी उपलब्ध असोत किंवा नसोत ;

(तीन) तिच्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची निर्देशिका ;

(चार) महानगरपालिकेच्या कोणत्याही कामाकरिता सवलती, परवानगी किंवा प्राधिकारपत्र देण्यासाठी अधिकार प्रदान करण्यात आलेल्या अधिकाऱ्यांचे तपशील ;

(पाच) प्रत्येक तिमाहीनंतर दोन महिन्यांच्या आत, त्या तिमाहीचा लेखापरिक्षित ताळेबंद, जमा व खर्च, आणि पैशाचा ओघ दर्शविणारे वित्तीय विवरणपत्र; आणि वित्तीय वर्ष संपल्यानंतर तीन महिन्यांच्या आत, संपूर्ण वित्तीय वर्षाचे लेखापरीक्षित वित्तीय विवरणपत्र ;

(सहा) महानगरपालिका पुरवित असलेल्या सर्व सेवा दर्शविणारे विवरणपत्र ;

(सात) सर्व योजनांचे तपशील, प्रस्तावित खर्च, पुरविण्यात आलेल्या प्रमुख सेवांसाठी किंवा पार पाडलेल्या कामांसाठी झालेला प्रत्यक्ष खर्च आणि संवितरित केलेल्या रकमांबाबतचा आहवाल ;

---

[१] सन २००७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम २ अन्वये हे प्रकरण व कलम ८६अ समाविष्ट करण्यात आले.

(आठ) महानगरपालिकेने पुरविलेल्या प्रमुख सेवांसाठीच्या किंवा पार पाडलेल्या कामांसाठीच्या अर्थसहाय्य कार्यक्रमांचा तपशील आणि अशा कार्यक्रमांसाठीचे लाभार्थी निश्चित करण्याची रीत व निकष ;

(नऊ) महानगरपालिका क्षेत्राच्या विकासाशी संबंधित बृहत योजनेचा, शहर विकास योजनेचा किंवा इतर कोणत्याही योजनेचा तपशील ;

(दहा) राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विनिर्दिष्ट करेल असे प्रमुख बांधकामांचे तपशील; तसेच बांधकामाचे मूल्य, पूर्ततेचा कालावधी आणि कराराचा तपशील यासंबंधी माहिती ;

(अकरा) महानगरपालिका निधीचा तपशील, म्हणजेच मागील वर्षामध्ये पुढील बाबींद्वारे मिळालेले उत्पन्न :—

(अ) कर, शुल्क, उपकर आणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे भाडे, लायसन व परवानगी यांतून मिळणारी फी ;

(ब) वसूल न केला गेलेला कर, शुल्क, उपकर आणि अधिभार, मालमत्तेतून मिळणारे भाडे, लायसन व परवानगी यांतून मिळणारी फी आणि वसुली न करण्यामागची कारणे ;

(क) राज्य शासनाने वसूल केलेल्या करांचा महानगरपालिकेकडे हस्तांतरित केलेला हिस्सा आणि महानगरपालिकेला मिळालेली अनुदाने ;

(ड) महानगरपालिकेला नेमून दिलेल्या किंवा तिच्याकडे सोपवलेल्या योजना, प्रकल्प व आराखडे यांच्या अंमलबजावणीसाठी राज्य शासनाने दिलेली अनुदाने, त्यांचे स्वरुप आणि विनियोगाची मर्यादा ;

(इ) जनतेकडून किंवा अशासकीय अभिकरणांकडून मिळालेल्या देणग्या किंवा अंशदाने यांमार्फत उभा केलेला पैसा ;

(बारा) प्रत्येक प्रभागाला नियतवाटप केलेली वार्षिक अर्थसंकल्पीय तरतूद;

(तेरा) विहित करण्यात येईल अशी इतर माहिती.]

महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांच्यावर खटला भरण्यास मंजुरी देणे.

[१][ **८६ब.** या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदीमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्यांवर किंवा कर्मचाऱ्यांवर खटला भरण्याची मागणी पोलिसांकडून किंवा अन्य कोणत्याही शासकीय अभिकरणाकडून करण्यात आली असेल तर त्यास मंजुरी देण्यास आयुक्त सक्षम असेल. आयुक्त अशा कोणत्याही कार्यवाहीच्या मंजुरीची माहिती महानगरपालिकेच्या पुढील सभेमध्ये महानगरपालिकेला कळवील.]

---

[१] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २९, कलम ३ अन्वये कलम ८६(ब) समाविष्ट करण्यात आले.

प्रकरण पाच

## महानगरपालिकेची मालमत्ता व दायित्वे

### मालमत्ता संपादन करणे

मालमत्ता संपादन करण्यासंबंधीचे महानगरपालिकेचे अधिकार.

**८७.** या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता महानगरपालिकेस, स्थावर व जंगम मालमत्ता किंवा तिच्यातील कोणताही हितसंबंध संपादन करण्याचा व धारण करण्याचा अधिकार असेल, मग अशी मालमत्ता [१][बृहन्मुंबईच्या] हद्दीत असो किंवा हद्दीबाहेर असो.

महानगरपालिकेची मालमत्ता महानगरपालिकेकडे हस्तांतरित करणे.

**८८.** याअन्वये निरसित करण्यात आलेल्या कोणत्याही अधिनियमाच्या अनुरोधाने किंवा त्यास अनुसरून किंवा त्याच्या प्रयोजनांकरिता महानगरपालिकेने धारण केलेली किंवा महानगरपालिकेसाठी विश्वस्त व्यवस्था म्हणून धारण केलेली किंवा महानगरपालिकेस [२][शासनाने] दिलेली सर्व स्थावर व इतर मालमत्ता ही, हा अधिनियम अंमलात आल्यावर तो अंमलात येईल त्या तारखेनंतर या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता पण त्यावरील सर्व भार व दायित्वे यांच्या अधीनतेने महानगरपालिकेमध्ये विश्वस्त व्यवस्था म्हणून निहित होईल.

विहार जलदाय व्यवस्था महानगरपालिकेमध्ये निहित होण्याच्या शर्ती.

१८७२ चा मुंबई ३. १८७८ चा मुंबई ४.

**८९.** (१) दिनांक १ जुलै १८६३ पासून सुरू होणाऱ्या नव्याण्णव वर्षांच्या ज्या अवधीकरिता मुंबई नगरपालिका अधिनियम, [३][१८७२] व [३][१८७८] यांचे कलम ६४ यास अनुसरून विहार तलाव व त्याच्याशी अनुलग्न असलेली मालमत्ता, ज्यांचा यात यापुढे " विहार जलदाय व्यवस्था " असा उल्लेख केला आहे, महानगरपालिकेमध्ये निहित करण्यात आली तो अवधी संपल्यानंतर [४][ [५][राज्य] शासन] असा निदेश देऊ शकेल की, उक्त विहार जलदाय व्यवस्था नव्याण्णव वर्षांपेक्षा अधिक नसेल असा जो अवधी इष्ट वाटेल अशा पुढील अवधीकरिता यात यापुढे तरतूद केलेल्या शर्तीवर व या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता महानगरपालिकेमध्ये निहित होईल आणि अशा बाबतीत ती उपरोक्तप्रमाणे महानगरपालिकेमध्ये निहित होईल :

(२) परंतु, नव्याण्णव वर्षांचा उक्त पहिला अवधी संपल्यानंतर किंवा उक्त विहार जलदाय व्यवस्था महानगरपालिकेमध्ये निहित व्हावी असा निदेश [४][ [५][राज्य] शासनाने] ज्या पुढील अवधीच्या बाबतीत दिला असेल तो अवधी संपल्यानंतर महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात आलेले सर्व हक्क व तिला दिलेला प्रत्येक अधिकार तात्काळ बंद होईल व समाप्त होईल आणि उक्त विहार जलदाय व्यवस्था [६][राज्य शासनाकडे] परत येईल व ती त्यामध्ये निहित होईल.

[७][ (३) पोट-कलमे (१) आणि (२) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन कोणत्याही वेळी **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, तीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेपासून विहार जलदाय व्यवस्था ही महानगरपालिका पवई तलावातून, आरे दुग्ध वसाहतीस आणि बोरीवली येथील

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१)४(१) अन्वये " ग्रेटर बॉम्बे " या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " सरकारने " या शब्दांऐवजी " बादशहाने " हा शब्द दाखल करण्यात आला व विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " बादशहाने " या शब्दाऐवजी " शासनाने " हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] या अधिनियमाच्या कलम २ अन्वये सन १८७२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ आणि सन १८७८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४ निरसित करण्यात आले.

[४] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " गव्हर्नर इन कौन्सिल " या शब्दांऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[५] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या ऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[६] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकुरांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[७] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१, कलम ६ अन्वये पोट-कलम (३) समाविष्ट करण्यात आले.

राष्ट्रीय उपवनाला, राज्य शासन वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा साधनापासून पाणीपुरवठा करील आणि पाणीपुरवठा करण्याचे चालू ठेवील, या शर्तीच्या अधीनतेने महानगरपालिकेमध्ये कायमची निहित होईल, असा निदेश देऊ शकेल. या दोन्ही बाबतीत पाणीपुरवठा हा महानगरपालिका, राज्य शासनाच्या संमतीने वेळोवेळी निर्धारित करील अशा परिमाणात आणि अशा दराने आणि अशा इतर शर्तींच्या अधीनतेने करण्यात येईल. पूर्वोक्त तारखेपासून त्याखाली त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली किंवा इतर कोणत्याही संविदेखाली विहार जलदाय व्यवस्थेच्या संबंधात राज्य शासनाने किंवा राज्य शासनाविरुद्ध बजावणीयोग्य असलेले सर्व हक्क व दायित्वे ही महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेविरुद्ध बजावणीयोग्य असतील.

अनुसूची पाच मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनी व इमारती [२][शासनामध्ये] निहित होणे.

[१][**८९अ.** मुंबई शहर पोलीस प्रभार अधिनियम, १९०७ याच्या प्रारंभाच्या तारखेस आणि त्या तारखेपासून अनुसूची पाच मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनी आणि इमारती यांमधील महानगरपालिकेची सर्व संपदा तसेच अशा जमिनी व इमारती व यांवरील तिचा सर्व अधिकार, हक्क व यांतील तिचा हितसंबंध, त्यांना लागू असलेली आणि महानगरपालिकेने निर्माण केलेली सर्व दायित्वे व भार यांपासून मुक्त अशा स्वरूपात [२][शासनामध्ये] निहित होतील : १९०७ चा मुंबई ३.

परंतु, उक्त अनुसूचीच्या बाबी क्रमांक २८ ते १३९ (दोन्ही धरून) यांत विनिर्दिष्ट केलेल्या ज्या कोणत्याही जमिनीवर उक्त अधिनियमाच्या प्रारंभाच्या वेळी कोणतीही काढून नेण्याजोगी लाकडी चौकी असेल त्या जमिनीच्या बाबतीत या कलमातील कोणतीही तरतूद लागू होणार नाही.

**८९ब.** [एस्प्लनेड मार्गावरील राणी व्हिक्टोरियाचा पुतळा व त्याचे ठिकाण विवक्षित शर्तींच्या अधीनतेने महानगरपालिकेमध्ये निहित होणे.] सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम २ (१) याद्वारे वगळण्यात आले.

[८][डॉ. भाऊ दाजी लाड संग्रहालय असे पुनर्नामकरण करण्यात आलेले] दि व्हिक्टोरिया अँड अलबर्ट संग्रहालय व त्याचे ठिकाण महानगरपालिकेमध्ये निहित होणे.

**८९क.** [३][(१)] मुंबई शहर पोलीस प्रभार अधिनियम, १९०७ याच्या प्रारंभाच्या तारखेस व त्या तारखेपासून, दि व्हिक्टोरिया अँड अलबर्ट संग्रहालय व त्याचे ठिकाण यांमधील [२][शासनाची] सर्व संपदा आणि असे संग्रहालय व अशी ठिकाणे यांवरील तिचा सर्व अधिकार, हक्क व यातील तिचा हितसंबंध हे, त्यांना लागू असलेली व [४][[५][शासनाने] निर्माण] केलेली सर्व दायित्वे व भार यांपासून मुक्त स्वरूपात महानगरपालिकेमध्ये निहित होतील आणि महानगरपालिकेस, प्रिन्स ऑफ वेल्स संग्रहालय ऑफ वेस्टर्न इंडिया हे खुले केल्याचे [६][[७][राज्य] शासनाकडून] ज्या तारखेस घोषित करण्यात येईल त्या तारखेस व त्या तारखेपासून उक्त संग्रहालय व उक्त ठिकाण यांचा कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी उपयोग करता येईल. १९०७ चा मुंबई ३.

---

[१] सन १९०७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३, कलम १४ अन्वये कलमे ८९अ ते ८९फ समाविष्ट करण्यात आली.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " हिज मॅजेस्टी " या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१, कलम ७(१) अन्वये कलम ८९क याला पोट-कलम (१) असा फेरक्रमांक देण्यात आला आणि पोट-कलम (२) समाविष्ट करण्यात आले.

[४] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " सरकारने निर्माण केलेली " या शब्दांऐवजी " बादशहाने निर्माण केलेली " हे शब्द दाखल करण्यात आले.

[५] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " बादशहाने " या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[६] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " सरकार " या शब्दांऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[७] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[८] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१, कलम ७(२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

१९७५ चा महा. ५१. [१][(२) मुंबई महानगरपालिका आणि मुंबई भाडे नियंत्रण, हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण (सुधारणा) अधिनियम, १९७५, याच्या प्रारंभाच्या तारखेस व त्या तारखेपासून उपरोक्त व्हिक्टोरिया ॲण्ड अलबर्ट संग्रहालयास, " डॉ. भाऊ दाजी लाड संग्रहालय " असे नवीन नाव देण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यातील किंवा कोणत्याही संविदेतील, संलेखातील, किंवा इतर दस्तऐवजातील व्हिक्टोरिया अँड अलबर्ट संग्रहालयासंबंधीच्या कोणत्याही संदर्भाचा अर्थ " डॉ. भाऊ दाजी लाड संग्रहालय " म्हणून लावण्यात येईल आणि तो " डॉ. भाऊ दाजी लाड संग्रहालय " यासंबंधीचा संदर्भ असल्याचे मानण्यात येईल.]

परळ येथील मध्यवर्ती लस आगार महानगरपालिकेमध्ये निहित होणे.

१९०७ चा मुंबई ३. **८९ड.** मुंबई शहर पोलीस प्रभार अधिनियम, १९०७ याच्या प्रारंभाच्या तारखेस व त्या तारखेपासून परळ येथील मध्यवर्ती लस आगाराच्या स्वरूपातील [२][शासनाची] सर्व संपदा व अशा आगारातील शासनाचा सर्व अधिकार, हक्क व हितसंबंध हे, त्यासंबंधी असलेली व [३][[२][शासनाने] निर्माण केलेली] सर्व दायित्वे, भार यांपासून मुक्त स्वरूपात महानगरपालिकेमध्ये निहित होतील.

प्राथमिक शिक्षणासाठी वापरण्यात येणाऱ्या शहरातील सर्व इमारती व त्यांची ठिकाणे महानगरपालिकेमध्ये निहित होणे.

१९०७ चा मुंबई ३. **८९ई.** मुंबई शहर पोलीस प्रभार अधिनियम, १९०७ याच्या प्रारंभाच्या तारखेस व त्या तारखेपासून प्राथमिक शिक्षणासाठी वापरण्यात येणाऱ्या आणि [२][शासनामध्ये] यापूर्वी निहित असलेल्या शहरातील सर्व इमारती व त्यांची ठिकाणे, त्यासंबंधी असलेली व [३][[४][शासनाने] निर्माण केलेली] सर्व दायित्वे व भार यांपासून मुक्त अशा स्वरूपात महानगरपालिकेमध्ये निहित होतील.

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१, कलम ७(१) अन्वये कलम ८९क याला पोटकलम (१) असा फेरक्रमांक देण्यात आला आणि पोटकलम (२) समाविष्ट करण्यात आले.

[२] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " हिज मॅजेस्टी " या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेशान्वये " सरकारने निर्माण केलेली " या शब्दांऐवजी " बादशहाने निर्माण केलेली " हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " बादशहाने " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

प्राथमिक शिक्षणाच्या प्रयोजनासाठी विवक्षित इमारतींच्या किंवा त्यांच्या ठिकाणांच्या संबंधात दिलेल्या अनुदानाचा उपयोग इतर प्रयोजनांसाठी केल्यास महानगरपालिकेने त्याची रक्कम [२][राज्य] शासनाला परत देणे.

**८९फ.** कलम ८९ई मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मुंबई शहर पोलीस प्रभार अधिनियम, १९०७ याच्या प्रारंभाच्या तारखेपूर्वी किंवा त्या तारखेनंतर, ज्या इमारतींच्या किंवा ठिकाणांच्या संबंधात [१][[२][राज्य] शासनाने] प्राथमिक शिक्षणाच्या प्रयोजनासाठी कोणतेही अनुदान दिलेले असेल अशा कोणत्याही इमारतीचा किंवा ठिकाणाचा उपयोग [१][[२][राज्य] शासनाच्या] मंजुरीवाचून इतर कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात आला तर, महानगरपालिका, लागोलाग, अशा अनुदानाची रक्कम [१][[२][राज्य] शासनाला] परत करील.

१९०७ चा मुंबई ३.

करार करून स्थावर मालमत्ता संपादन करणे.

**९०.** (१) कोणतीही स्थावर मालमत्ता आयुक्ताला संपादन करता येईल अशी या अधिनियमात जेव्हा जेव्हा तरतूद करण्यात आली असेल तेव्हा तेव्हा किंवा आयुक्ताने अशी मालमत्ता संपादन करणे, हे या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनाकरिता, आवश्यक किंवा इष्ट असेल तेव्हा तेव्हा आयुक्तास, अशी स्थावर मालमत्ता [३][पोटकलम (३) च्या तरतुदींच्या अधीनतेने] महानगरपालिकेच्या वतीने करार करून संपादन करता येईल.

(२) जेव्हा जेव्हा या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींखाली आयुक्तास कोणतीही स्थावर मालमत्ता संपादन करण्याचा संपूर्ण खर्च किंवा त्याचा कोणताही भागांश देण्याविषयी करार करण्यास प्राधिकृत केलेले असेल तेव्हा तेव्हा, तो, ती रक्कम पूर्वोक्तप्रमाणे [४][सुधारणा समिती] मान्य करील अशा अटींवर व अशा दरांनी किंवा किमतींनी अथवा अशा कमाल मर्यादेपेक्षा जास्त न होणाऱ्या दरांनी किंवा किमतींनी देण्याचा करार करील.

[५][(२अ) या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, महानगरपालिकेच्या वतीने आयुक्तास, प्रकरण बारा अ खाली केलेल्या कोणत्याही परियोजनेच्या प्रयोजनांसाठी महानगरपालिकेस आवश्यक असलेल्या कोणत्याही जमिनींच्या किंवा जमिनीतील कोणत्याही हितसंबंधाच्या मालकाशी किंवा याप्रमाणे आवश्यक असलेल्या जमिनींचा भाग बनलेल्या कोणत्याही सडकेवर जो कोणताही हक्क विधानमंडळाने केलेल्या अधिनियमावरून उत्पन्न झालेला असेल त्या मालकाशी, अशी जमीन किंवा अशा जमिनीतील कोणताही हितसंबंध खरेदी करण्याकरिता किंवा अशा कोणत्याही हक्काच्या मालकास, तो हक्क काढून घेतल्याबद्दल किंवा त्यात हस्तक्षेप केल्याबद्दल, भरपाई देण्याकरिता करार करता येईल व आयुक्ताने तसे करणे हे विधिसंमत असेल.]

---

[१] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये "सरकार" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम ६(अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४१(अ) अन्वये 'महापौरासह परिषद' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम १७(क) अन्वये नवीन पोटकलम (२अ) समाविष्ट करण्यात आले.

[१][(३) कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या किंवा तिच्यातील कोणत्याही हितसंबंधाच्या किंवा तिच्यातील कोणताही हक्क संपादन करण्यासाठी केलेली किंवा पोटकलमे (१) किंवा (२) किंवा (२अ) खाली कोणतीही भरपाई देण्यासाठी केलेली कोणतीही संविदा अशा मालमत्तेसाठी हितसंबंधासाठी किंवा हक्कासाठी द्यावयाची किंमत किंवा भरपाई पाच लाख रुपयांपेक्षा अधिक असेल त्याबाबतीत सुधार समितीने अशा संविदेस मान्यता दिली नसेल तर जी किंमत किंवा भरपाई याची रक्कम दोन कोटी रुपयांहून अधिक असेल त्या बाबतीत महानगरपालिकेने अशा संविदेस मान्यता दिली नसेल तर ती विधिग्राह्य असणार नाही.]

[२][(४) स्थावर मालमत्ता किंवा त्या मालमत्तेतील कोणताही हितसंबंध तिच्यावरील कोणताही हक्क संपादन करण्याची प्रत्येक संविदा किंवा इतर संलेख हा, आयुक्त निष्पादित करील आणि त्यावर [३][सुधार समितीच्या दोन सदस्यांसमक्ष लावलेली महानगरपालिकेची सामान्य मुद्रा असेल, तसेच त्यावर कलम ७० मध्ये विहित केलेल्या रीतीने उक्त दोन सदस्यांच्या सह्याही असतील].

(५) स्थावर मालमत्ता किंवा तिच्यातील कोणताही हितसंबंध किंवा तिच्यावरील कोणताही हक्क संपादन करण्यासंबंधी पोटकलम (४) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे केलेली नसेल अशी कोणतीही संविदा महानगरपालिकेवर बंधनकारक असणार नाही.

(६) स्थावर मालमत्ता किंवा तिच्यातील हितसंबंध किंवा तिच्यावरील कोणताही हक्क संपादन करण्यासंबंधीच्या मूळच्या संविदेस या कलमातील ज्या पूर्ववर्ती तरतुदी लागू होत असतील त्या तरतुदी अशा संविदेत केलेल्या कोणत्याही फेरफारास किंवा ती पुरी करण्यासदेखील लागू आहेत असे मानले जाईल.]

करार करून स्थावर मालमत्ता संपादन करणे शक्य नसेल तेव्हा अनुसरावयाची कार्यपद्धती.

**९१.** (१) जेव्हा जेव्हा आयुक्त निकटपूर्वीच्या कलमाखाली कोणतीही स्थावर मालमत्ता करार करून संपादन करण्यास असमर्थ असेल तेव्हा, [४][सुधार समितीची] मान्यता घेऊन आयुक्ताने अर्ज केल्यावर [५][व या अधिनियमाच्या इतर तरतुदींच्या अधीनतेने] [६][[७][राज्य] शासन] स्वविवेकानुसार जणू अशी मालमत्ता भूमी संपादन अधिनियम, १८७० [*] याच्या अर्थांतर्गत सार्वजनिक प्रयोजनांकरिता कार्यवाही असलेली जमीन असावी त्याप्रमाणे, ती महानगरपालिकेच्या वतीने संपादन करण्याकरिता आवश्यक करण्यात यावी असा आदेश देऊ शकेल.

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४१(ब) अन्वये मूळ पोटकलमाऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

[२] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम १७(ई) अन्वये नवीन पोटकलमे (४), (५) व (६) समाविष्ट करण्यात आली.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४१(क) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ४२ अन्वये 'महापौरासह परिषदेची' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १८(ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेशान्वये "सरकार" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[७] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[*] आता भूमी संपादन अधिनियम, १८८४ (१८८४ चा १) पहा.

(२) कोणतीही अशी मालमत्ता संपादन करताना दिलेल्या भरपाईची रक्कम व झालेले सर्व खर्च यांची रक्कम आयुक्ताने, या अधिनियमाच्या इतर सर्व तरतुदींच्या अधीनतेने ताबडतोब दिली पाहिजे आणि लागोलाग उक्त मालमत्ता महानगरपालिकेमध्ये निहित होईल.

मालमत्तेचे महानगर-पालिकेकडे हस्तांतरण.

[१][**९१अ.** (१) मुंबई शहर नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९३३, हा ज्या तारखेस प्रवर्तनात येईल त्या तारखेपासून, मुंबई शहर सुधारणा विश्वस्त व्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ याखाली रचना करण्यात आलेल्या मुंबई शहर सुधारणा विश्वस्त मंडळाची सर्व स्थावर व इतर मालमत्ता व इतर सर्व हितसंबंध व हक्क हे, कार्यालयात ठेवलेल्या आराखड्यात दर्शविलेल्या आणि अनुसूची " डब्ल्यू " व अनुसूची " एक्स " यांत विनिर्दिष्ट केलेल्या जमिनी व अनुसूची " य " मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या, पुनःप्रापण केलेल्या जमिनी यांमधील उक्त मंडळाची सर्व संपदा व त्यातील सर्व हक्क, स्वामित्व हक्क व हितसंबंध यांच्यासह त्यासंबंधीचे सर्व भार व दायित्वे यांच्या अधीनतेने व मुंबई शहर नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९३३, यात असलेल्या कोणत्याही निर्बंधाच्या व शर्तीच्या अधीनतेने, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी महानगरपालिकेने धारण करण्याकरिता म्हणून, महानगरपालिकेमध्ये, यथास्थिति, निहित होतील किंवा पुन्हा निहित होतील.

१९३३ चा मुंबई १३.
१९२५ चा मुंबई १६.
१९३३ चा मुंबई १३.

(२) (अ) भूखंड म्हणून उल्लेख केलेल्या व अनुसूची "डब्ल्यू" मध्ये भूखंड १(ब), १(क) आणि १(ड) म्हणून विनिर्दिष्ट केलेल्या जमिनींच्या बाबतीत महानगरपालिकेस पोट-कलम (८) अन्वये राखून ठेवलेल्या पुनर्ग्रहणाच्या अधिकारांच्या अधीनतेने, कोणत्याही वेळी, भूखंडापैकी सर्व भूखंडांचे किंवा त्यांच्या कोणत्याही भागाचे अगर भागांचे मनोरंजनाची स्थळे किंवा उपवने म्हणून लोकांनी निर्वेधपणे उपयोग करण्यासाठी रेखांकन करता येईल किंवा उक्त सर्व भूखंडांचा किंवा त्याच्या कोणत्याही भागाचा इमारती बांधण्याच्या कामी विनियोग करता येईल.

(ब) भूखंड (१) (जे) म्हणून अनुसूची " डब्ल्यू " मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीचा उपरोक्त गोष्टींच्या अधीनतेने, खुली जागा म्हणून कायम विनियोग करण्यात येईल. मात्र अशा विनियोगामुळे उक्त जमिनी, वेळोवेळी, एका वर्षाहून अधिक नसेल इतक्या अवधीकरिता किंवा [२][[३][राज्य] शासनाच्या] पूर्वमंजुरीने व [२][[३][राज्य] शासन] मान्य करील अशा शर्तींवर, तीस वर्षांहून अधिक नसेल इतक्या अवधीकरिता, शर्यंत मैदान म्हणून वापरण्यासाठी किंवा सार्वजनिक करमणुकीच्या किंवा मनोरंजनाच्या कोणत्याही प्रयोजनांसाठी वेळोवेळी पट्ट्याने देण्यास महानगरपालिकेस प्रतिबंध होणार नाही.

(क) अनुसूची "डब्ल्यू" मध्ये भूखंड १(अ), १(ग) ते १(आय) दोन्ही धरून व १(के) म्हणून विनिर्दिष्ट केलेल्या सर्व जमिनी व अनुसूची "य" मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनी, पोट-कलम (१) याच्या तरतुदींच्या अधीनतेने महानगरपालिकेमध्ये निहित होतील.

(३) भूखंड १ (ड-१) भाग १(ब) भूकर सर्वेक्षण क्रमांक ३/३८३, बॉडीगार्ड लाइन्स भूखंड, क्रमांक ३ कूपरेज भूखंड व भूखंड क्रमांक ४(ब) मरीन लाईन्स मैदान म्हणून अनुसूची "झ झ" मध्ये अनुक्रमे उल्लेख केलेल्या जमिनी [४][शासना] मध्ये पूर्णतः निहित होतील. परंतु भूखंड क्रमांक ३ कूपरेज, भूखंड क्रमांक ४(ब) मरीन लाईन्स मैदान हे कायम खुल्या जागा म्हणून ठेवण्यात येतील,

---

[१] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम १९ अन्वये नवीन कलमे ९१अ ते ९१क समाविष्ट करण्यात आली.

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाअन्वये " सरकार " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " हिज मॅजेस्टी " या ऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

परंतु, आणखी असे की, [१][[२][राज्य] शासनास] किंवा त्याच्या आगाऊ परवानगीने उपरोक्त भूखंड क्रमांक ३ व ४ (ब), किंवा त्याचा कोणताही भाग यांचा कोणत्याही तात्पुरत्या प्रयोजनासाठी कोणत्याही वेळी भोगवटा करता येईल.

(४) पोट-कलम (२) चा खंड (क) व पोट-कलम (३) यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीचा अपवाद वगळता अनुसूची " डब्ल्यू " मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीतील किंवा तीवरील महानगरपालिकेमध्ये निहित किंवा पुनर्निहित झालेली उक्त मंडळाची सर्व संपदा, हक्क, स्वामित्व हक्क व हितसंबंध हे, खुल्या जागा म्हणून विनियोजित केल्या असतील त्या जमिनी खेरीजकरून याप्रमाणे विनिर्दिष्ट केलेल्या सर्व जमिनी एकतर उक्त मंडळ किंवा महानगरपालिका बांधकाम भाडेपट्ट्याने देईतोपर्यंत या कलमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, त्याचप्रकारे निहित अथवा पुनर्निहित राहतील किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या बाबतीत असा भाग अशाच प्रकारे भाड्याने देण्यात येईपर्यंत त्याच प्रकारे निहित अथवा पुनर्निहित राहतील आणि त्यानंतर उपरोक्त जमिनीव्यतिरिक्त संपूर्ण जमिनीच्या बाबतीत, किंवा अशा कोणत्याही भागाच्या बाबतीत, संपूर्ण जमिनी किंवा असा कोणताही भाग ज्या तारखेस प्रथम भाडेपट्ट्याने दिला असेल त्या तारखेपासून नव्याण्णव वर्षांहून अधिक नसेल अशा, त्या संपूर्ण जमिनीसंबंधीच्या किंवा अशा कोणत्याही भागासंबंधीच्या अधिक वाढविलेल्या कालावधीपर्यंत त्याच प्रकारे निहित अथवा पुनर्निहित होतील.

(५) अनुसूची " एक्स " मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या सर्व जमिनी, पोट-कलम (१) च्या तरतुदींच्या अधीनतेने महानगरपालिकेमध्ये निहित होतील.

(६) महानगरपालिकेने अनुसूची " डब्ल्यू " मध्ये विर्निदिष्ट केलेल्या जमिनीच्या बाबतीत वेळोवेळी कोणतीही जमीन उक्त अनुसूचीतून [१][[२][राज्य] शासनाच्या] पूर्वमंजुरीने काढणे किंवा अनुसूचींवर जी जमीन आणण्याची महानगरपालिकेची इच्छा असेल अशा, महानगरपालिकेची मालमत्ता असलेल्या कोणत्याही मुक्त स्व-जमिनीच्या बदल्यात अनुसूची " एक्स " मधून कोणतीही जमीन काढणे ही गोष्ट विधिसंमत असेल. या पोट-कलमाखाली केलेल्या अदलाबदलीचा परिणाम, असा होईल की अनुसूचीतून काढून घेतलेली जमीन, अधिनियमान्वये निर्माण केलेल्या पुनर्ग्रहणाच्या किंवा पुनर्निहितीकरणाच्या शर्तींपासून मुक्त स्वरूपात आणि सर्व भारांपासून मुक्त स्वरूपात महानगरपालिकेकडे हस्तांतरित होईल व अनुसूचीवर आणलेली जमीन जणू ती यथास्थिति, अनुसूची " डब्ल्यू " किंवा " एक्स " यामध्ये मुळातच नोंदलेल्या मालमत्तेचा भाग असावा त्याप्रमाणे निहित होईल.

(७) [३][केंद्र किंवा [२][राज्य] शासनाकडून] महानगरपालिकेच्या कब्जात देण्यात येतील अशा, शहरातील इतर कोणत्याही जमिनी या [३][केंद्र किंवा [२][राज्य] शासनाकडून] महानगरपालिकेने हाती घेतल्यास जणू अशा जमिनी अनुसूची " डब्ल्यू " मध्ये समाविष्ट असल्याप्रमाणे त्याच रीतीने व त्याच शर्तींच्या अधीनतेने महानगरपालिकेमध्ये निहित व्हाव्यात या उद्देशाने महानगरपालिकेने कलम ८७ द्वारे प्रदान केलेल्या अधिकारांना बाध येऊ न देता व त्या अधिकारांच्या भरीला, अशा जमिनी हाती घेणे व धारण करणे विधिसंमत असेल आणि अशा प्रत्येक प्रकरणी जमिनीचा कब्जा महानगरपालिकेकडे देण्यात आल्यानंतर असे निहितीकरण परिणामक होईल.

(८) पोट-कलम (२), खंड (क) यात विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीहून अन्य जी कोणतीही जमीन आणि उक्त मंडळाने किंवा महानगरपालिकेने पट्ट्याने दिलेल्या किंवा पट्ट्याने देण्याचे कबूल केलेल्या जमिनीहून अन्य अशी अनुसूची " डब्ल्यू " मध्ये समाविष्ट केलेली जी कोणतीही जमीन एखाद्या सार्वजनिक प्रयोजनासाठी [३][केंद्र किंवा [२][राज्य] शासनास] आवश्यक असेल, ती महानगरपालिकेस सहा महिन्यांची नोटीस देऊन कोणत्याही वेळी [४][त्या शासनास] परत घेता येईल.

---

[१] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " सरकार " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये मूळ मजकुराऐवजी " केंद्र किंवा प्रांतिक सरकारकडून " हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील आदेशान्वये मूळ शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

(९) [1][ [2][राज्य] शासनास] [3]**[शासकीय राजपत्रातील]** अधिसूचनेअन्वये जमिनीची कोणतीही अदलाबदल केल्यामुळे, ती परत घेतल्यामुळे, संपादन केल्यामुळे किंवा इतर प्रकारे हस्तांतरित केल्यामुळे अनुसूची " डब्ल्यू " मध्ये आणि महानगरपालिकेच्या सहमतीने अनुसूची " एक्स " मध्ये जादा नोंदी दाखल करणे किंवा त्यात सुधारणा करणे जेथवर आवश्यक असेल तेथवर, अशा रीतीने त्यात जादा नोंदी दाखल करता येतील किंवा त्यात सुधारणा करता येईल. तसेच त्यास अनुसूची " एक्स " मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनींच्या बाबतीत तशाच सहमतीने उक्त अनुसूच्यांतील किंवा कार्यालयात ठेवलेल्या आराखड्यांतील चुका दुरुस्त करता येतील, आणि अशी अधिसूचना काढण्यात आल्यावर उक्त अनुसूच्या किंवा उक्त आराखडे हे अशा रीतीने जादा दाखल केलेल्या नोंदीस किंवा सुधारणा करण्यात आलेल्या नोंदीस अनुसरून किंवा करण्यात आलेल्या दुरुस्तीनंतर वाचण्यात येतील. अनुसूची " डब्ल्यू " किंवा अनुसूची " एक्स " यात कोणताही फेरफार करण्यात आला असेल त्या बाबतीत, अशा अधिसूचनेत, याप्रमाणे फेरफार करण्यात आलेली संपूर्ण अनुसूची किंवा अनुसूच्या समाविष्ट करण्यात येतील].

भूखंड क्रमांक ३, कूपरेज भूखंड किंवा त्याचा भाग पट्ट्याने देण्याचा अधिकार.

[4]**[९१अअ.** [5][(१)] कलम ९१अ, पोट-कलम (३) यात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास भूखंड क्रमांक ३ म्हणजे कूपरेज भूखंड किंवा त्याचा कोणताही भाग भारतीय नौसेनेतील सैनिकांसाठी क्लब हाऊस बांधण्याकरिता किंवा इतर कोणत्याही तशाच प्रयोजनाकरिता दिनांक १ मार्च १९४३ पासून सुरू होणाऱ्या साठ वर्षांहून अधिक अवधीचा नसेल अशा अवधीपर्यंत भाडेपट्ट्याने देता येईल व त्याने तसे करणे हे विधिसंमत असेल व ते विधिसंमत होते असे मानण्यात येईल आणि उक्त कलम ९१अ, पोट-कलम (३) यातील पहिल्या परंतुकाच्या तरतुदी या जोपर्यंत असा पट्टा कायद्यानुसार अंमलात असेल व तो समाप्त करण्यात आला नसेल किंवा प्रत्यर्पित करण्यात आलेला नसेल किंवा इतर रीतीने समाप्त करण्यात आलेला नसेल तोपर्यंत यथास्थिति उक्त भूखंड किंवा त्याचा कोणताही भाग यास लागू होणार नाहीत.]

[5][(२) कलम ९१अ, पोट-कलम (३) किंवा या कलमाचे पोट-कलम (१) किंवा महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ किंवा त्याखालील कोणत्याही विकास योजनेच्या तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी राज्य शासनाने व्यायामशाळा, अंतर्गृही खेळ, निवासगृहे, क्लब हाऊस, शयनशाळा, आहारगृह, ग्रंथालय, सभाकक्ष, प्रदर्शनकक्ष व तत्सम प्रयोजने यांच्या आनुषंगिक बांधकामासह फुटबॉल प्रेक्षागारांच्या बांधकामासाठी दिनांक ३१ डिसेंबर २००३ ही तारीख धरून त्या तारखेस किंवा राज्य शासन विनिर्दिष्ट करील अशा नंतरच्या तारखेस संपणाऱ्या अवधीसाठी कूपरेज भूखंडाचा भाग पट्ट्याने देणे विधिसंमत असेल व ते विधिसंमत असल्याचे मानण्यात येईल, तसेच असा पट्टा अंमलात असेतोपर्यंत व तो समाप्त झालेला नसेल किंवा तो प्रत्यर्पित करण्यात आलेला नसेल किंवा अन्य प्रकारे कायद्यानुसार समाप्त करण्यात आलेला नसेल तोपर्यंत उक्त कलम ९१अ च्या पोट-कलम (३) मधील पहिल्या परंतुकाच्या तरतुदींवरील प्रयोजनांसाठी पट्ट्याने दिलेल्या उक्त भूखंडाच्या भागास लागू होणार नाहीत.]

१९६६ चा महा. ३७.

---

[1] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " सरकार " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[2] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[3] वरील आदेशान्वये " मुंबई सरकार **राजपत्रातील** " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[4] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०, कलम ५ अन्वये कलम ९१अअ समाविष्ट करण्यात आले.

[5] सन १९७७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६२, कलम २ अन्वये कलम ९१अअ याला पोट-कलम (१) असा फेरक्रमांक देण्यात आला आणि पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात आले.

[1][**९१अअअ.** कलम ९१-अ, पोट-कलम (३) यात काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनाने भूखंड क्रमांक ४(ब) मरीनलाईन्स मैदान याचा ७,२०० चौरस मीटरपेक्षा अधिक नसेल इतके क्षेत्रफळ असलेला भाग, रुग्णालयाच्या बांधकामासाठी किंवा कोणत्याही तत्सम प्रयोजनासाठी ९९ वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा अवधीकरिता पट्ट्याने देणे विधिसंमत असेल आणि त्या पोट-कलमाच्या पहिल्या परंतुकाच्या तरतुदी असा पट्टा जोपर्यंत अंमलात असेल व तो समाप्त करण्यात आलेला नसेल किंवा प्रत्यार्पित करण्यात आलेला नसेल किंवा अन्यथा कायद्यानुसार सर्मपित करण्यात आलेला नसेल तोपर्यंत, त्या भूखंडाच्या उक्त भागास लागू होणार नाहीत.]

भूखंड क्रमांक ४(ब), मरीनलाईन्स मैदान याचा भाग विवक्षित प्रयोजनांसाठी पट्ट्याने देण्याचा अधिकार.

**९१ब.** [2][(१)] कलम ९१अ, पोट-कलम (४) यात नमूद केलेला आणखी कालावधी संपल्यावर, खुल्या जागा म्हणून विनियोग केलेल्या जमिनी आणि भूखंड १(अ) आणि १ (ई) ते १ (आय) दोन्ही धरून आणि १ (के) यांखेरीज अनुसूची "डब्ल्यू" मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीच्या कोणत्याही भागातील, उक्त कलमाखाली, जी मालमत्ता, महानगरपालिकेमध्ये निहित झालेली किंवा पुनर्निहित झालेली असेल ती, ताबडतोब तिच्याकडून काढून घेतली जाईल आणि अशा जमिनीचा असा भाग, [3][राज्य शासनामध्ये,] संपूर्णपणे निहित होईल किंवा पुनर्निहित होईल.

महानगरपालिकेने दिलेल्या पट्ट्यांचा अवधी संपल्यानंतर मालमत्ता [4][शासनामध्ये] निहित होणे.

[2][(२) कलम ९१अ च्या पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (४) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अनुसूची डब्ल्यू मध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही जमीन, तीस वर्षांपेक्षा अधिक होणार नाही इतक्या मुदतीकरिता, कलम ९१क मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांसाठी मुंबई महानगरपालिकेला नव्याने भाडेपट्ट्याने देणे राज्य शासनाकरिता कायदेशीर असेल आणि त्यानंतर, ती जमीन महानगरपालिकेकडे पुनर्निहित होईल. जमीन अशा प्रकारे पुनर्निहित झाल्यानंतर, पोट-कलम (१) च्या तरतुदी, जोपर्यंत असा भाडेपट्टा अंमलात असेल आणि निर्धारित केला नसेल किंवा प्रत्यार्पित करण्यात आला नसेल किंवा अन्यथा कायद्यानुसार समाप्त करण्यात आलेला नसेल तोपर्यंत, उक्त जमिनीस लागू होणार नाहीत.

(३) पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे जमीन महानगरपालिकेकडे पुनर्निहित झाल्यावर, महानगरपालिका तिला मिळणाऱ्या भाडेपट्ट्याच्या रकमेपैकी अर्ध्या रकमेइतकी रक्कम राज्य शासनास प्रदान करील.

(४) महानगरपालिकेस, प्रत्येक दहा वर्षांनंतर भाडेपट्ट्याच्या दरामध्ये सुधारणा करता येईल; परंतु, अशा दरांमध्ये सुधारणा करतेवेळी महानगरपालिका, शासनाची जमीन भाडेपट्ट्याने देण्याकरिता राज्य शासनाच्या महसूल व वन विभागाने ठरविलेल्या धोरणाचे पालन करण्यासाठी बांधील असेल.

(५) पोट-कलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे भाडेपट्ट्याचा कालावधी संपल्यानंतर ती जमीन सर्व भारांपासून मुक्त स्वरुपात, राज्य शासनामध्ये संपूर्णतः निहित किंवा पुनर्निहित होईल.

**९१क.** महानगरपालिकेस, कलम ९१अ याच्या तरतुदींच्या अधीनतेने, कलम ३५४ब, पोट-कलम (२) यात उल्लेख केलेल्या कोणत्याही परियोजनेच्या प्रयोजनांसह [5][प्रकरण १२अ खाली संपादन केलेल्या जमिनीचे उपयोजन ज्या प्रयोजनांसाठी करता येईल त्या प्रयोजनांपैकी] कोणत्याही प्रयोजनांसाठी अनुसूची "डब्ल्यू", "एक्स" व "वाय" यात विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीपैकी कोणत्याही जमिनीचे उपयोजन करता येईल.]

महानगरपालिकेमध्ये निहित झालेल्या विवक्षित जमिनींचा या अधिनियमाखालील कोणत्याही परियोजनांसाठी उपयोजन करण्याचा अधिकार.

---

[1] सन १९६९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २ अन्वये कलम ९१अअअ समाविष्ट करण्यात आले.

[2] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ४ अन्वये कलम ९१ब ला त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला आणि पोट-कलम (१) नंतर ही पोट-कलमे जादा दाखल करण्यात आली.

[3] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील आदेशान्वये "हिज मॅजेस्टी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम २ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

निरास केलेल्या नगरपालिकांची व स्थानिक प्राधिकरणांची मालमत्ता महानगर-पालिकेमध्ये निहित होणे.

[1][**९१ड.** नेमलेल्या तारखेच्या निकटपूर्वीच्या तारखेस जी स्थावर किंवा इतर मालमत्ता पुढील प्राधिकरणाने धारण केली होती किंवा त्याच्यामध्ये निहित होती ती मालमत्ता, तिच्यांवरील सर्व भार व दायित्वे यांच्या अधीनतेने, या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी विश्वस्तव्यवस्था म्हणून महानगरपालिकेमध्ये निहित होईल :—

(अ) ज्या नगरपालिकेचा किंवा इतर ज्या स्थानिक प्राधिकरणाचा, त्यांची ज्या क्षेत्रासाठी रचना करण्यात आली होती ते क्षेत्र [2][बृहन्मुंबईत] समाविष्ट केल्यामुळे, मुंबई नगरपालिकेच्या (हद्दी वाढविण्याबाबत) अधिनियम, १९५० याअन्वये किंवा तद्नुसार याखाली निरास करण्यात आला असेल ती कोणतीही नगरपालिका किंवा ते कोणतेही इतर स्थानिक प्राधिकरण ; किंवा

१९५० चा मुंबई ७.

(ब) अशी नगरपालिका किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्या संबंधीच्या कोणत्याही कायद्याखाली अशा नगरपालिकेचे किंवा अशा स्थानिक प्राधिकरणाचे अधिक्रमण करण्यात आल्यामुळे किंवा ते विसर्जित करण्यात आल्यामुळे राज्य शासन :

परंतु, मुंबई उपनगर जिल्ह्याच्या जिल्हा स्थानिक मंडळाने आणि मुंबई उपनगर जिल्ह्याच्या जिल्हा शाळा मंडळाने धारण केलेली किंवा त्यांच्यामध्ये निहित झालेली स्थावर मालमत्ता ती ज्या व्याप्तीपर्यंत [2][बृहन्मुंबईत] समाविष्ट झालेल्या क्षेत्रात असेल त्या व्याप्तीपर्यंत महानगरपालिकेमध्ये निहित होईल आणि उक्त मंडळानी याप्रमाणे धारण केलेली किंवा त्यांच्यामध्ये निहित झालेली इतर कोणतीही मालमत्ता राज्य शासन निर्धारित करील अशा व्याप्तीपर्यंत महानगरपालिकेमध्ये निहित होईल.

**स्पष्टीकरण.—** या कलमाच्या प्रयोजनांकरिता, स्थावर मालमत्ता व इतर मालमत्ता यांमध्ये त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींखाली कोणत्याही नगरपालिकेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीच्या किंवा त्याच्यामध्ये निहित झालेल्या प्राथमिक शाळांचा, त्यांच्या जमिनी, इमारती, रस्ते व साधनसामग्री यांसह, अंतर्भाव होईल.

वाढवलेल्या उपनगरांतील निरास केलेल्या नगरपालिका व स्थानिक प्राधिकरणे यांची मालमत्ता महानगर-पालिकेमध्ये निहित होणे.

[3][**९१डअ.** मुंबई नगरपालिका [हद्दी आणखी वाढविणे व अनुसूची बबअ (सुधारणा)] अधिनियम, १९५६ याच्या प्रारंभाच्या तारखेच्या निकटपूर्वीच्या दिवशी :— १९५६ चा मुंबई ५८.

(अ) ज्या नगरपालिकेचा किंवा इतर स्थानिक प्राधिकरणाचा, त्यांची ज्या क्षेत्राकरिता रचना करण्यात आली होती ते क्षेत्र [2][बृहन्मुंबईत] समाविष्ट केल्यामुळे, त्या अधिनियमान्वये किंवा त्याखाली निरास करण्यात आला असेल, त्या नगरपालिकेने किंवा स्थानिक प्राधिकरणाने धारण केलेली किंवा त्याच्यामध्ये निहित झालेली सर्व स्थावर व इतर मालमत्ता, अथवा

(ब) अशी नगरपालिका किंवा स्थानिक प्राधिकरण यासंबंधीच्या कोणत्याही कायद्याखाली अशा नगरपालिकेचा किंवा स्थानिक प्राधिकरणाचा निरास करण्यात किंवा विसर्जित करण्यात आल्यामुळे राज्य शासनाने धारण केलेली किंवा त्याच्यामध्ये निहित झालेली, सर्व स्थावर व इतर मालमत्ता, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता, मात्र त्यासंबंधीचे सर्व भार व दायित्वे यांच्या अधीनतेने महानगरपालिकेमध्ये विश्वस्तव्यवस्था म्हणून निहित होईल :

परंतु, त्या क्षेत्रातील कोणत्याही, जिल्हा स्थानिक मंडळाने किंवा जिल्हा शाळा मंडळाने धारण केलेली किंवा त्यांच्यामध्ये निहित झालेली स्थावर मालमत्ता ती [2][बृहन्मुंबईत] समाविष्ट केलेल्या क्षेत्रात ज्या व्याप्तीपर्यंत असेल त्या व्याप्तीपर्यंत महानगरपालिकेमध्ये निहित होईल आणि उक्त मंडळांनी याप्रमाणे धारण केलेली किंवा त्यांच्यामध्ये निहित झालेली इतर कोणतीही मालमत्ता राज्य शासन निर्धारित करील अशा व्याप्तीपर्यंत महानगरपालिकेमध्ये निहित होईल.

---

[1] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम १२ अन्वये कलमे ९१ड आणि ९१ई समाविष्ट करण्यात आली.

[2] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१)४(१) अन्वये " ग्रेटर बॉम्बे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम ५ अन्वये कलमे ९१डअ समाविष्ट करण्यात आले.

**स्पष्टीकरण.—** या कलमाच्या प्रयोजनांकरिता, स्थावर मालमत्ता व इतर मालमत्ता यांत त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या तरतुदींखाली कोणतीही नगरपालिका किंवा स्थानिक प्राधिकरण यांच्या मालकीच्या किंवा त्यांच्यामध्ये निहित झालेल्या प्राथमिक शाळांचा, त्यांच्या जमिनी, इमारती, रस्ते व साधनसामग्री यांसह, अंतर्भाव होईल.]

उपनगरांत [२][आणि वाढवलेल्या उपनगरांत] महानगर-पालिकेने किंवा महानगर-पालिकेविरूद्ध मालमत्तेबाबत केलेल्या हक्क मागण्यांचा निर्णय.

**९१ई.** (१) जेव्हा उपनगरात [१][किंवा वाढवलेल्या उपनगरात] असलेली कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा अशा मालमत्तेतील किंवा अशा मालमत्तेवरील कोणताही हक्क याबद्दल महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने हक्कमागणी केली असेल किंवा महानगरपालिकेविरुद्ध कोणत्याही व्यक्तीने हक्कमागणी केली असेल तेव्हा, मुंबई उपनगर जिल्हाधिकाऱ्यास औपचारिक चौकशीसंबंधी रीतसर नोटीस दिल्यानंतर व अशी औपचारिक चौकशी केल्यानंतर त्या हक्कमागणीच्या निर्णयासंबंधी आदेश देता येईल व त्याने तसे करणे विधिसंमत असेल.

(२) पोट-कलम (१) खाली जिल्हाधिकाऱ्याने दिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या महानगरपालिकेस किंवा कोणत्याही व्यक्तीस त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेला किंवा अशा कोणत्याही व्यक्तीला, ज्या तारखेस महानगरपालिकेस किंवा अशा व्यक्तीस अशा आदेशाची रीतसर नोटीस मिळाली असेल त्या तारखेपासून एक वर्षाच्या आत असा आदेश अपास्त करण्याकरिता किंवा त्याविरुद्ध अनुतोष मिळण्याकरिता सक्षम दिवाणी न्यायालयात दावा दाखल करता येईल.

अशा आदेशाची नोटीस ज्या तारखेस देण्यात आली असेल त्या तारखेपासून एक वर्ष संपल्यानंतर जर कोणताही दावा दाखल करण्यात आला तर दावा मुदतीत दाखल करण्यात आला नाही हा मुद्दा बचाव म्हणून मांडण्यात आलेला नसला तरीही तो खारीज करण्यात येईल.

१८७९ चा मुंबई ५.

(३) जिल्हाधिकाऱ्यास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशांन्वये या कलमाखाली त्यास प्रदान करण्यात आलेले अधिकार मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९* यात व्याख्या केल्याप्रमाणे असलेल्या सहायक किंवा उप-जिल्हाधिकाऱ्यांकडे किंवा भू-मापन अधिकाऱ्याकडे प्रत्यायोजित करता येतील.

(४) या कलमात उल्लेख केलेली औपचारिक चौकशी ही पूर्वोक्त महसूल संहितेच्या तरतुदींअनुसार करण्यात येईल.

(५) एखाद्या व्यक्तीस चौकशीसंबंधीची नोटीस, याबाबतीत राज्य शासनाने केलेल्या नियमांस अनुसरून देण्यात आली असेल तर तिला रीतसर नोटीस देण्यात आली आहे असे मानले जाईल].

निवडणुकींसाठी परिवास्तू, वाहने वगैरे यांचे अधिग्रहण.

[३][**९१फ.** [४][ (१) कोणत्याही निवडणुकीच्या संबंधात, राज्य निवडणूक आयोगाने विनंती केल्यावर, राज्य शासनास किंवा राज्य शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यास (यापुढे ज्याचा " अधिग्रहण प्राधिकारी " असा निर्देश करण्यात आला आहे) लेखी आदेशाद्वारे,—

(अ) मतदान केंद्र म्हणून किंवा मतदान घेण्यात आल्यानंतर मतपेट्या ठेवण्याची जागा म्हणून उपयोग करण्यासाठी आवश्यक असलेल्या किंवा आवश्यक भासण्याचा संभव असलेल्या कोणत्याही परिवास्तूचे,

---

[१] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम ६(१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाचे कलम ६(२) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५४, कलम ८ अन्वये कलमे ९१फ ते ९१ल समाविष्ट करण्यात आली.

[४] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ५२ अन्वये पोट-कलम (१) ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

*आता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र एकेचाळीस) पहा.

(ब) मतपेट्या कोणत्याही मतदान केंद्राकडे किंवा तेथून नेण्यासाठी किंवा अशी निवडणूक चालू असताना सुव्यवस्था राखण्याकरिता पोलीस बलातील व्यक्तींना नेण्या-आणण्यासाठी किंवा अशा निवडणुकीसंबंधी कोणतीही कर्तव्ये बजावण्याकरिता कोणत्याही अधिकाऱ्याला किंवा इतर व्यक्तीला नेण्या-आणण्यासाठी जे आवश्यक असेल किंवा ज्याची गरज भासण्याचा संभव असेल अशा कोणत्याही वाहनाचे, जलयानाचे किंवा जनावराचे ;

अधिग्रहण करता येईल आणि अशा अधिग्रहणाच्या संबंधात त्यास आवश्यक किंवा इष्ट वाटतील असे आणखी आदेश देता येतील :

परंतु, एखादा उमेदवार किंवा त्याचा अभिकर्ता अशा उमेदवाराच्या निवडणुकीशी संबंधित असलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी ज्याचा कायदेशीरपणे वापर करीत असेल अशा कोणत्याही वाहनाचे, जलयानाचे किंवा जनावराचे अशा निवडणुकीतील मतदान पूर्ण होईपर्यंत या पोट-कलमाखाली अधिग्रहण करण्यात येणार नाही.]

(२) अधिग्रहण प्राधिकारी, ज्या व्यक्तीला ज्या मालमत्तेची मालक असल्याचे किंवा कब्जेदार व्यक्ती असल्याचे मानील तिच्या नावे लेखी आदेश काढून अधिग्रहणाचे काम पार पाडण्यात येईल आणि ज्या व्यक्तीच्या नावे असा आदेश काढला असेल त्या व्यक्तीवर कलम ९१ (के) खाली राज्य शासनाने केलेल्या नियमांद्वारे विहित केलेल्या रीतीने तो बजावण्यात येईल.

(३) जेव्हा जेव्हा पोट-कलम (१) खाली कोणत्याही मालमत्तेचे अधिग्रहण करण्यात येईल तेव्हा तेव्हा अशा अधिग्रहणांचा कालावधी त्या पोटकलमात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही प्रयोजनांकरिता अशी मालमत्ता ज्या कालावधीसाठी हवी असेल त्या कालावधीपेक्षा अधिक असता कामा नये.

**स्पष्टीकरण**.—या कलमाच्या प्रयोजनाकरिता "परिवास्तू" म्हणजे कोणतीही जमीन, इमारत किंवा इमारतीचा भाग आणि तिच्यात झोपडी, छपरी किंवा इतर संरचना किंवा त्याचा कोणताही भाग याचाही समावेश होतो.

भरपाई देणे. **९१ग.** (१) जेव्हा जेव्हा कलम ९१फ यास अनुसरून अधिग्रहण प्राधिकारी कोणत्याही परिवास्तूचे अधिग्रहण करील तेव्हा तेव्हा महानगरपालिका, हितसंबंधित व्यक्तीस भरपाई देईल. अशा भरपाईची रक्कम, पुढील गोष्टी लक्षात घेऊन निर्धारित करण्यात येईल :—

(एक) अशा परिवास्तूच्या संबंधातील प्रदेय भाडे किंवा अशा रीतीने कोणतेही भाडे प्रदेय नसेल तर, त्या वसतिस्थानातील तत्सम परिवास्तूसाठी द्यावे लागणारे भाडे ;

(दोन) परिवास्तूचे अधिग्रहण केल्यामुळे हितसंबंधित व्यक्तीस आपले राहते निवासस्थान किंवा धंद्याची जागा बदलणे भाग पडले असेल तर, अशा रीतीने बदल केल्यामुळे त्याला करावा लागलेला वाजवी आनुषंगिक खर्च (कोणताही असल्यास) :

परंतु, याप्रमाणे निर्धारित केलेल्या भरपाईच्या रकमेने व्यथित झालेल्या कोणत्याही हितसंबंधित व्यक्तीने, ती बाब लवादाकडे निर्देशित करण्यासाठी कलम ९१-के खाली राज्य शासनाने केलेल्या नियमांन्वये विहित केलेल्या अवधीत अधिग्रहण प्राधिकाऱ्याकडे अर्ज केला असेल तर, द्यावयाची भरपाईची रक्कम ही, अधिग्रहण प्राधिकाऱ्याने याबाबत नेमलेला लवाद निर्धारित करील तेवढी असेल :

परंतु आणखी असे की, भरपाईची रक्कम मिळण्याच्या हक्कासंबंधाने किंवा तिच्या वाटणीविषयी कोणताही विवाद असल्यास, राज्य शासन किंवा अधिग्रहण प्राधिकारी तो विवाद याबाबत नेमलेल्या लवादाकडे निर्देशित करील आणि अशा विवादाची निर्णिती अशा लवादाच्या निर्णयानुसार करण्यात येईल.

**स्पष्टीकरण**.—या पोटकलमाच्या प्रयोजनासाठी " हितसंबंधित व्यक्ती " या संज्ञेचा अर्थ, कलम ९१फ खाली अधिग्रहण केलेली परिवास्तू अधिग्रहणाच्या निकटपूर्वी जिच्या प्रत्यक्ष कब्जात असेल ती व्यक्ती किंवा प्रत्यक्ष कब्जा असलेली अशी कोणतीही व्यक्ती नसेल तर अशा परिवास्तूचा मालक, असा आहे.

(२) जेव्हा जेव्हा अधिग्रहण प्राधिकाऱ्याने ९१फ यास अनुसरून कोणत्याही वाहनाचे, जलयानाचे किंवा जनावराचे अधिग्रहण केले असेल तेव्हा तेव्हा, महानगरपालिका अशा वाहनाच्या, जलयानाच्या किंवा जनावराच्या मालकास भरपाई देईल आणि अशा भरपाईची रक्कम, अधिग्रहण प्राधिकारी असे वाहन, जलयान किंवा जनावर भाड्याने देण्यासाठी त्या वसतिक्षेत्रात प्रचलित असलेली भाडी किंवा दर यांच्या आधारे निर्धारित करील :

परंतु, जर अशा वाहनाचा, जलयानाचा किंवा जनावराचा मालक, याप्रमाणे निर्धारित केलेल्या भरपाईच्या रकमेने व्यथित झाल्याने, त्याने उक्त बाब लवादाकडे निर्देशित करण्यासाठी राज्य शासनाने केलेल्या नियमांद्वारे विहित केलेल्या अवधीत अधिग्रहण प्राधिकाऱ्याकडे अर्ज केला असेल तर, द्यावयाची भरपाईची रक्कम ही, अधिग्रहण प्राधिकाऱ्याने याबाबत नेमलेला लवाद निर्धारित करील तेवढी असेल :

परंतु, आणखी असे की, अधिग्रहणाच्या निकटपूर्वी, असे वाहन किंवा जलयान भाडे-खरेदी कराराच्या सामर्थ्याने मालकाहून अन्य व्यक्तीच्या कब्जात असेल तर, अधिग्रहणाच्या संबंधात द्यावयाची एकूण भरपाईची रक्कम म्हणून या पोटकलमाखाली निर्धारित करण्यात आलेली रक्कम अशी व्यक्ती व मालक यांच्या दरम्यान ते संमत होतील अशा रीतीने विभागण्यात येईल आणि त्यांच्या दरम्यान अशी संमती घडून न आल्यास, अधिग्रहण प्राधिकाऱ्याने याबाबत नेमलेला लवाद जी रीत ठरवील त्या रीतीने ती विभागण्यात येईल.

माहिती मिळवण्याचा अधिकार.

**९१ह.** कलम ९१फ खाली कोणत्याही मालमत्तेचे अधिग्रहण करण्याच्या दृष्टीने, किंवा कलम ९१ग खाली द्यावयाची भरपाईची रक्कम निर्धारित करण्याच्या दृष्टीने, अधिग्रहण प्राधिकाऱ्यास, कोणत्याही व्यक्तीस आदेश देऊन अशा व्यक्तीने आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा प्राधिकाऱ्याला त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मालमत्तेसंबंधी, त्यास हवी असलेली माहिती पुरविली पाहिजे असे फर्माविता येईल.

अधिग्रहण केलेल्या परिवास्तूतून निष्कासन.

**९१आय.** (१) कलम ९१फ खाली दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करून जी व्यक्ती अधिग्रहण केलेली कोणतीही परिवास्तू कब्जात ठेवील तिला, विनासोपस्कार, अशा परिवास्तूतून निष्कासित करण्याचा अधिकार अधिग्रहण प्राधिकाऱ्याने याबाबत अधिकार प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास असेल.

(२) याप्रमाणे अधिकार प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, चार-चौघांपुढे उघडपणे न वावरणाऱ्या कोणत्याही स्त्रीस वाजवी इशारा दिल्यानंतर व निघून जाण्यास वाजवी सुविधा दिल्यानंतर कोणतेही कुलूप किंवा कडी काढून टाकता येईल किंवा तोडून टाकता येईल किंवा कोणत्याही इमारतीचे कोणतेही दार फोडून उघडता येईल किंवा अशा रीतीने निष्कासित करण्यासाठी आवश्यक अशी कोणतीही इतर कृती करता येईल.

परिवास्तू अधिग्रहणातून मुक्त करणे.

**९१जे.** (१) ९१फ खाली अधिग्रहण केलेली कोणतीही परिवास्तू अधिग्रहणातून मुक्त करावयाची असेल तेव्हा, त्या परिवास्तूचे अधिग्रहण करतेवेळी ज्या व्यक्तीकडून कब्जा घेण्यात आला असेल त्या व्यक्तीकडे आणि अशी कोणतीही व्यक्ती नसेल तर, अधिग्रहण प्राधिकाऱ्याने ज्या व्यक्तीला अशा परिवास्तूचा मालक मानले असेल त्या व्यक्तीकडे तिचा कब्जा सुपूर्द करण्यात येईल आणि कब्जाच्या अशा सुपूर्दगीमुळे अधिग्रहण प्राधिकारी अशा सुपूर्दगीच्या संबंधातील सर्व उत्तरदायित्वांतून प्रभारमुक्त होईल. मात्र याप्रमाणे ज्या व्यक्तीकडे परिवास्तूचा कब्जा सुपूर्द करण्यात आला असेल त्या व्यक्तीविरूद्ध रीतसर कायदेशीर इलाज करून जे कोणतेही हक्क बजावण्याचा इतर कोणत्याही व्यक्तीला हक्क असेल त्या हक्कास बाध येणार नाही.

(२) जेव्हा कलम ९१फ खाली अधिग्रहण केलेली कोणतीही परिवास्तू पोटकलम (१) खाली ज्या व्यक्तीच्या कब्जात द्यावयाची ती व्यक्ती सापडत नसेल किंवा सहजगत्या ठरविण्यात येण्यासारखी नसेल किंवा तिचा कोणताही अभिकर्ता नसेल किंवा तिच्या वतीने परिवास्तू ताब्यात घेण्याचा अधिकार दिलेली कोणतीही इतर व्यक्ती नसेल तेव्हा, अधिग्रहण प्राधिकारी नोटीस काढून त्याद्वारे अशी परिवास्तू अधिग्रहणातून मुक्त करण्यात आली आहे असे घोषित करील व अशी नोटीस अशा परिवास्तूच्या एखाद्या ठळक भागावर लावण्याची तजवीज करील, तसेच ती **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करील.

(३) जेव्हा पोट-कलम (२) मध्ये उल्लेख केलेली नोटीस **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येईल तेव्हा, असा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेली परिवास्तू अशा रीतीने नोटीस प्रसिद्ध केल्याच्या तारखेस व त्या तारखेपासून अधिग्रहणाखाली असण्याचे बंद होईल आणि तिचा कब्जा मिळण्याचा हक्क असलेल्या व्यक्तीकडे ती सुपूर्द करण्यात आली आहे असे मानले जाईल ; आणि उक्त तारखेनंतरच्या कोणत्याही कालावधीबद्दल अशा परिवास्तूच्या संबंधात कोणतीही भरपाई किंवा इतर हक्क मागणी याबाबत अधिग्रहण प्राधिकारी किंवा महानगरपालिका उत्तरदायी असणार नाही.

नियम करण्याचा अधिकार.

**९१के.** पुढील गोष्टी विहित करण्यासाठी राज्य शासनास नियम करता येतील :—

(१) कलम ९१फ, पोटकलम (२) खाली अधिग्रहण आदेश ज्या रीतीने बजावण्यात येईल ती रीत, आणि

(२) लवादाने भरपाईची रक्कम निर्धारित करावी म्हणून कलम ९१ग खाली ज्या अवधीत अर्ज करण्यात येईल तो अवधी.

अधिग्रहणासंबंधी दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन केल्याबद्दल शास्ती.

**९१ल.** जर कोणतीही व्यक्ती कलम ९१फ खाली दिलेल्या कोणत्याही आदेशाचे उल्लंघन करील तर, तिला अपराधसिद्धीनंतर एक वर्षापर्यंत वाढविता येईल इतक्या कैदेची शिक्षा होईल किंवा दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.]

**९२.** [१][[२] [बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] प्रयोजनांकरिता महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या मालमत्तेहून अन्य अशा] महानगरपालिकेच्या मालकीच्या मालमत्तेची विल्हेवाट करण्याच्या बाबतीत पुढील तरतुदी लागू होतील :— महानगरपालिका मालमत्तेची विल्हेवाट करण्यासंबंधी तरतुदी.

(अ) आयुक्तास, [३][याबाबत केलेल्या विनियमांच्या अधीन राहून], प्रत्येक बाबतीत [४][पाच लाख रुपयांपेक्षा] अधिक मूल्य नसलेली महानगरपालिकेच्या मालकीची जी कोणतीही जंगम मालमत्ता असेल तिची विक्री करून किंवा अन्य प्रकारे विल्हेवाट करता येईल अथवा महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता, एका वेळी बारा महिन्यांहून अधिक नसेल अशा कोणत्याही कालावधीसाठी पट्ट्याने देता येईल ; यात मासेमारीचा किंवा फळे गोळा करून ती नेण्याच्या कोणत्याही व तत्सम हक्काचा समावेश होतो :

[५][परंतु, जबर भाड्याच्या दराने जिचे वार्षिक भाडे [६][पन्नास हजार रुपयांहून] अधिक असेल अशी स्थावर मालमत्ता आयुक्ताने पट्ट्याने (मासिक भाडेदारीच्या कराराखेरीज) दिली असेल तर, ती पट्ट्याने देण्यात आल्यापासून पंधरा दिवसांच्या आत तो [७][सुधार समितीकडे] त्यासंबंधी प्रतिवेदन पाठवील ; ]

[८][ (ब) आयुक्तास,—

(एक) संबंधित समितीच्या मंजुरीने जिचे मूल्य ५ लाख रुपयांहून अधिक असेल अशा, महानगरपालिकेने धारण केलेल्या कोणत्याही जंगम मालमत्तेची विक्रीद्वारे किंवा अन्यप्रकारे विल्हेवाट लावता येईल ;

(दोन) [९][स्थायी समितीच्या] मंजुरीने जिचे मूल्य २ कोटी रुपयांहून अधिक असेल अशा, महानगरपालिकेने धारण केलेल्या जंगम मालमत्तेची विल्हेवाट लावता येईल ;

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम १८ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१)४(३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ५३ (अ) (एक) अन्वये 'स्वविवेकानुसार' या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ५३(अ) (दोन) अन्वये "एक लाख रुपयापेक्षा" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[५] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २०(अ) अन्वये मूळ परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल करण्यात आले.

[६] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ५३(अ) (तीन) (अ) अन्वये "पंधरा हजार रुपयांहून" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[७] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४३ अन्वये 'महापौरासह परिषदेकडे' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम १६ अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (ब) दाखल करण्यात आला.

[९] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४३(ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

(तीन) संबंधित समितीच्या मंजुरीने महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता (शाश्वत पट्ट्याहून अन्य) पट्ट्याने पूर्वोक्त अशा कोणत्याही हक्कासह देता येईल ; किंवा जिचे मूल्य पन्नास हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल किंवा जिचे वार्षिक भाडे तीन हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल अशी स्थावर मालमत्ता विकता येईल किंवा शाश्वत पट्ट्याने देता येईल ;]

(क) आयुक्तास, महानगरपालिकेच्या मंजुरीने, महानगरपालिकेच्या मालकीची [1][कोणतीही स्थावर मालमत्ता] पट्ट्याने देता येईल, विकता येईल किंवा अन्यथा अभिहस्तांतरित करता येईल ;

[2][(कक) महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कोणताही हक्क मोबदल्याच्या ज्या रकमेस विकता येईल, पट्ट्याने देता येईल किंवा अन्यथा हस्तांतरित करता येईल ती रक्कम, असे अधिमूल्य, भाडे किंवा इतर मोबदला यांच्या बाजार किमतीहून कमी असणार नाही;]

[3][(ड)[4][स्थायी समितीची] खंड (ब) खालील आणि खंड (क) खालील मंजुरी ही, सर्वसाधारणपणे प्रकरणांच्या कोणत्याही वर्गाच्या बाबतीत किंवा विशेषतः कोणत्याही विशिष्ट प्रकरणी देता येईल ;]

[5][(डड) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेच्या मंजुरीने, आणि राज्य शासनाच्या मान्यतेने, आयुक्तास, महानगरपालिकेचे अधिकारी आणि कर्मचारी यांनी अनन्यतः स्थापन केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थेला किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० याखाली नोंदणी करण्यात आलेल्या अनन्यतः वैद्यकीय आणि शैक्षणिक प्रयोजनांसाठीच असलेल्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेला [6][किंवा संस्था नोंदणी अधिनियम, १८६० खाली किंवा महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदणी करण्यात आलेल्या संस्थेला किंवा सार्वजनिक शौचकूप, मुताऱ्या व तत्सम सोयी पुरवण्यासाठी किंवा टाकाऊ व घाणेरडे पदार्थ किंवा कचरा यांवर प्रक्रिया करण्यासाठी संयंत्राचे बांधकाम करण्यासाठी मुंबई सार्वजनिक विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १९५० खाली नोंदणी करण्यात आलेल्या सार्वजनिक विश्वस्तव्यवस्थेला अथवा कंपनी अधिनियम, १९५६ खाली नोंदणी करण्यात आलेल्या कंपनीला ] [7][किंवा कोणत्याही व्यक्तीला] किंवा महानगरपालिकेच्या कोणत्याही विकास परियोजनेच्या अंमलबजावणीमुळे बेघर झालेल्या एखाद्या व्यक्तीला किंवा महानगरपालिकेच्या कोणत्याही विकास परियोजनेच्या अंमलबजावणीमुळे बेघर झालेल्या व्यक्तीसाठीच अनन्यतः स्थापन केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थेला, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता, पट्ट्याने देण्याबाबतचे अधिमूल्य, भाडे किंवा इतर मोबदला यांच्या बाजारमूल्यापेक्षा कमी असेल असा भाड्याने आणि कलम ४६१ खाली तयार करण्यात आलेल्या उपविधींद्वारे तरतूद करण्यात येईल अशा शर्तींच्या अधीनतेने पट्ट्याने देता येईल ; ]

१९५० चा मुंबई २९.
१८६० चा २१.
१९६१ चा महा. २४.
१९५० चा मुंबई २९.
१९५६ चा १.

---

[1] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९, कलम ८(३) अन्वये "कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २०(क) अन्वये नवीन उपखंड (कक) समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ५३(क) अन्वये खंड (ड) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[4] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४३(क) अन्वये "महापौरासह परिषदेची" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, कलम २ अन्वये खंड (डड) समाविष्ट करण्यात आला.

[6] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम ३ अन्वये हे शब्द व आकडे समाविष्ट करण्यात आले.

[7] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम २ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१][(डडड) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, आयुक्त, महानगरपालिकेच्या मंजुरीने, आणि राज्य शासनाच्या मान्यतेने "महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुर्नविकास) अधिनियम, १९७१" याच्या तरतुदींखाली झोपडपट्टी म्हणून घोषित केलेली महानगरपालिकेची जमीन [२][साठ वर्षांपेक्षा अधिक नसेल एवढ्या कालावधीसाठी] अशा जमिनींचा भोगवटा करणाऱ्या झोपडपट्टीत राहणाऱ्यांच्या सहकारी संस्थेला भाडेपट्ट्याने देऊ शकेल. अशा जमिनीचे भाडे अशा रीतीने जमीन पट्ट्याने देण्याबाबतचे अधिमूल्य, भाडे, किंवा इतर मोबदला याच्या बाजारमूल्यापेक्षा कमी असेल आणि ही जमीन, महानगरपालिका त्यांच्यावर लादील अशा शर्तींच्या अधीनतेने, भाडेपट्ट्याने देण्यात येईल.

१९७१ चा महा. २८.

या खंडाखाली राज्य शासन एकतर सर्वसाधारणपणे अशा जमिनींच्या प्रकरणांच्या कोणत्याही वर्गाकरिता किंवा खास करून अशा जमिनींच्या कोणत्याही विशिष्ट प्रकरणामध्ये, मान्यता देऊ शकेल :

परंतु, आयुक्त, त्याच रीतीने वेळोवेळी महानगरपालिका निश्चित करील त्या कालावधीसाठी आणि लादील अशा अटींच्या अधीनतेने, त्या पट्ट्याचे नवीकरण करू शकेल.]

(ई) या कलमाच्या पूर्वोक्त तरतुदी, या अधिनियमाखाली किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनाकरिता, महानगरपालिकेच्या मालकीच्या मालमत्तेची विल्हेवाट करण्यासंबंधीच्या प्रत्येक बाबीस यथाक्रम लागू होतील :

[३][परंतु, [४][ [५][राज्य] शासनाच्या] पूर्वमंजुरीने असेल ते खेरीज करून एरव्ही, या कलमातील कोणताही मजकूर [६][* * * * [७][डॉ. भाऊ दाजी लाड संग्रहालयास] [८][किंवा कलम ८९क मध्ये निर्दिष्ट केलेल्या त्याच्या ठिकाणास] लागू होणार नाही.]

[९][(डडडड) महानगरपालिकेने कोणत्याही मुदतीसाठी दिलेले महानगरपालिकेच्या मालकीच्या स्थावर मालमत्तेचे सर्व भाडेपट्टे हे, महानगरपालिकेने निष्पादित केलेल्या भाडेपट्टा विलेखामध्ये किंवा भाडेपट्टा करारामध्ये घालून दिलेल्या शर्तीबरोबरच, पुढील शर्तीच्या अधीन असतील :—

(एक) महानगरपालिकेच्या मालकीच्या आणि भाडेपट्ट्याने दिलेल्या मालमत्तांच्या संबंधातील पट्टेदारी हक्क हे, केवळ आयुक्ताच्या पूर्वपरवानगीने, महानगरपालिकेकडून वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दराने अनर्जित उत्पन्नापोटी असे अधिमूल्य आणि हस्तांतरण शुल्क किंवा आकार यांचे प्रदान केल्यावर आणखी अभिहस्तांकित किंवा हस्तांतरित करता येतील.

(दोन) उप-खंड (एक) च्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन केल्यास, अशा पट्टेदारी हक्कांचा पट्टेदार किंवा हस्तांतरक हा, महानगरपालिकेकडून वेळोवेळी विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दरांनी असे अधिमूल्य आणि हस्तांतरण शुल्क किंवा आकार यांबरोबरच शास्तीदेखील प्रदान करण्यास पात्र असेल.]

---

[१] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ३ अन्वये खंड (डडड) समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९९२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम ६ अन्वये 'तीस वर्षांपेक्षा अधिक नसेल एवढ्या कालावधीसाठी' या मजकुराऐवजी 'साठ वर्षांपेक्षा अधिक नसेल एवढ्या कालावधीसाठी' हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९०७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३, कलम १५ अन्वये कलम ९२ मध्ये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[४] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाअन्वये "सरकार" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[५] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[६] सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम २(१) अन्वये "हर मॅजेस्टी क्वीन व्हिक्टोरिया यांचा पुतळा किंवा" हा मजकूर वगळण्यात आला.

[७] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१, कलम ८ अन्वये "व्हिक्टोरिया ॲण्ड अल्बर्ट संग्रहालय" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन १९६८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम २(१) अन्वये "किंवा कलमे ८९ब आणि ८९क मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या त्यांच्या जागेत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २ अन्वये खंड (डडडड) २२ जून १९९३ पासून जादा दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

मालमत्तेस अनुलग्न असलेली आबंधने हस्तांतरितीवर बंधनकारक असणे.

[1][**९२अ.** (१) आयुक्ताने, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता तिची विक्री करून किंवा अदलाबदल करून हस्तांतरित केली असेल आणि या मालमत्तेचे विशिष्ट रीतीने उपयोजन केले पाहिजे किंवा उपभोग घेतला पाहिजे अथवा तिचा उपयोग किंवा उपभोग विशिष्ट रीतीने निर्बंधित करण्यात आला पाहिजे, अशी अट हस्तांतरण करताना घालण्यात आली असेल त्या बाबतीत ; अथवा

(२) कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या मालकाने अशा मालमत्तेचा विशिष्ट रीतीने उपयोग, उपभोग किंवा वापर करण्यासंबंधी महानगरपालिकेशी करार केला असेल त्या बाबतीत,

अशी अट, शर्त किंवा आबंधन हस्तांतरणाची किंवा कराराची विषयवस्तू असलेल्या मालमत्तेस अनुलग्न आहे, असे धरले जाईल आणि अशी अट, शर्त, किंवा आबंधन हस्तांतरितीच्या किंवा मालकाच्या संबंधात अथवा त्याच्या विद्यमाने किंवा त्याच्यामार्फत हक्क किंवा हितसंबंध ज्यास प्राप्त होत असेल, अशा सर्व व्यक्तीसंबंधात अंमलात आणण्यात येईल.

मग—

(अ) त्या त्या वेळी कोणताही कायदा अंमलात असला तरीही तसे करण्यात येईल, आणि

(ब) ज्या मालमत्तेच्या फायद्यासाठी अशी अट, शर्त किंवा आबंधन कबूल किंवा संमत करण्यात आले असेल, किंवा लादण्यात आले असेल ती कोणतीही स्थावर मालमत्ता महानगरपालिकेच्या कब्जात नसली किंवा तिच्यात महानगरपालिकेचा हितसंबंध नसला तरीही तसे करण्यात येईल.]

## दायित्वे

महानगरपालिकेने फेडावयाची ऋणे.

**९३.** हा अधिनियम अंमलात येईल त्या दिवशी, पुढीलपैकी ज्या रकमा, ताबडतोब फेडावयाच्या असतील त्या महानगरपालिकेने त्यावर देणे असलेल्या व्याजासह फेडल्या पाहिजेत, त्या रकमा अशा :—

(अ) [2][शासनास] देणे असलेल्या पुढील रकमा—

विहार जलदाय व्यवस्थेबाबत ऋण.

(एक) मुंबई नगरपालिका अधिनियम, १८७२[3] आणि १८७८[3] याचे कलम १४० यात [4][निर्दिष्ट केलेल्या] विहार जलदाय व्यवस्थेबाबत द्यावयाच्या ऋणाची शिल्लक रक्कम आणि त्यावर दरसाल दरशेकडा चार या दराने होणारे सरळ व्याज ; १८७२ चा मुंबई ३. १८७८ चा मुंबई ४.

एकत्रीकृत कर्ज.

(दोन) मुंबई नगरपालिका एकत्रित कर्ज अधिनियम, १८८०[3] याच्या कलम ३, खंड (३) यात व्याख्या केल्याप्रमाणे विविध कारणांसाठी दिलेल्या एकत्रीकृत कर्जाची बाकी व दरसाल दरशेकडा साडेचार या दराने होणारे त्यावरील व्याज ; १८८० चा मुंबई २.

---

[1] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम ३ अन्वये कलम ९२अ समाविष्ट करण्यात आले.

[2] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "बादशहा" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[3] या अधिनियमाच्या क्रमांक २ अन्वये सन १८७२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३, सन १८७८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४ आणि सन १८८० चा मुंबई अधिनियम क्रमांक २ निरसित करण्यात आले.

[4] सन १८९४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम २ अन्वये मूळ शब्दाऐवजी "निर्दिष्ट केलेल्या" हे शब्द दिनांक ३१ डिसेंबर, १८९२ पासून दाखल करण्यात आले.

(ब) नगरपालिकेचे रोखे धारण करणाऱ्या व्यक्तीस द्यावयाच्या पुढील रकमा—

१८६५ चा मुंबई २. (तीन) सन १८६७ आणि १८६८ मध्ये मुंबई नगरपालिका अधिनियम, १८६५[१], याच्या तरतुदींखाली उभारलेल्या घरपट्टीबाबतच्या कर्जाची आणि बाजारांबाबतच्या दोन कर्जांची रक्कम व दरसाल दरशेकडा सहा या दराने होणारे तिच्यावरील व्याज ; सन १८६७–१८६८ ची घरपट्टीबाबतची व बाजारांबाबतची कर्जे.

१८७१ चा २६. (चार) सार्वजनिक बांधकाम कर्ज अधिनियम, १८७१[२], याच्या तरतुदींखाली सन १८७८ मध्ये उभारलेल्या जलनिस्सारण कर्जाची रक्कम व दरसाल दरशेकडा पाच या दराने होणारे तिच्यावरील व्याज ; सन १८७८ चे नवीन जलनिस्सारण कर्ज.

१८७९ चा ११. (पाच) स्थानिक प्राधिकरणे कर्ज अधिनियम, १८७९[३], याच्या तरतुदींअनुसार संविदा करून घेतलेल्या सन १८८५, १८८६ व १८८८ च्या स्वच्छता कार्यविषयक कर्जाची रक्कम व दरसाल दरशेकडा पाच या दराने होणारे तिच्यावरील व्याज ; सन १८८५, १८८६ व १८८८ ची स्वच्छता कार्यविषयक कर्जे.

(सहा) हा अधिनियम अंमलात येण्याच्या निकटपूर्वी पूर्वोक्त अधिनियमाखाली घेतलेल्या तानसा जलदाय व्यवस्था कर्जाचा काही भागांश ; तानसा जलदाय व्यवस्था कर्ज.

(सात) हा अधिनियम अंमलात येण्यापूर्वी पूर्वोक्त अधिनियमाखाली घेतलेल्या सन १८८८ च्या जलनिस्सारण आणि जलदाय व्यवस्था कर्जाचा भागांश. सन १८८८ चे जलनिस्सारण व जलदाय व्यवस्था कर्ज.

## [४][ शासनाला ] रकमांची परतफेड

**९४.** विहार जलदाय व्यवस्था ऋणाची परतफेड होण्याची निश्चिती करण्यासाठी, आयुक्त, उक्त ऋणाची संपूर्ण रक्कम, तिच्यावरील व्याजासहित फेडण्यात येईपर्यंत प्रत्येक महिन्याच्या पहिल्या दिवशी [५][नऊ हजार चारशे अठ्ठ्याण्णव रुपये] इतकी रक्कम [६][ [४][शासनाला] ] देईल. मासिक हप्त्यांनी फेडावयाचे विहार जलदाय व्यवस्था ऋण.

**९५.** (१) एकत्रीकृत कर्जाची संपूर्ण रक्कम तिच्यावरील व्याजासह, १ जानेवारी, १८८१ पासून तीस वर्षांच्या आत फेडण्यात येईल. एकत्रीकृत कर्जाच्या परतफेडीचा कालावधी.

(२) उक्त कर्जाची परतफेड होण्याची निश्चिती अधिक चांगल्या रीतीने करण्यासाठी आयुक्त, दर सहा महिन्यांनी दर एक जानेवारी रोजी आणि दर एक जुलै रोजी, उक्त कर्जाची संपूर्ण रक्कम, तिच्यावरील व्याजासह फेडण्यात येईपर्यंत एक लाख अठ्ठ्याहत्तर हजार तीनशे सव्वीस रुपये दोन आणे, पाच पै इतकी रक्कम [६][ [४][शासनाला] ] देईल. परतफेडीची पद्धती.

---

[१] सन १८७२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ अन्वये सन १८६५ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ निरसित करण्यात आला.

[२] सन १८७१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २४ हा सन १८७९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११ याअन्वये निरसित करण्यात आला व नंतर तो देखील सन १९१४ चा अधिनियम क्रमांक ९ अन्वये निरसित करण्यात आला.

[३] आता स्थानिक प्राधिकरणे कर्ज अधिनियम, १९१४ (१९१४ चा ९) पहा.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "बादशहा" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] सन १८९४ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम ३ अन्वये मूळ शब्दाऐवजी हे शब्द दिनांक ३१ डिसेंबर, १८९२ पासून दाखल करण्यात आले.

[६] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "बादशहा" या शब्दांऐवजी "सरकार" हा शब्द दाखल करण्यात आला.

रकमा कोणास द्यावयाच्या.

**९६.** (१) निकटपूर्वीच्या दोहोंपैकी कोणत्याही कलमाखाली आयुक्ताने द्यावयाची प्रत्येक रक्कम ही, [१][[२][[३][राज्य] शासनाला] देय असलेल्या रकमा स्वीकारण्यासाठी त्या त्यावेळी, नेमण्यात आलेल्या अधिकाऱ्यास] देण्यात येईल किंवा बँक ऑफ बॉम्बेमध्ये] ती भरण्यात येईल.

रक्कम दिल्या-संबंधीची नोटीस प्रसिद्ध करणे.

(२) आयुक्त, अशी प्रत्येक रक्कम दिल्याची नोटीस, [४]**[शासकीय राजपत्रात]** तात्काळ प्रसिद्ध करील.

रकमा भरण्यात न आल्यास त्यासंबंधी [६][राज्य] शासनाच्या मुख्य सचिवाकडे प्रतिवेदन पाठवणे.

**९७.** जर आयुक्ताने उक्त रकमांपैकी कोणतीही रक्कम, विहित वेळी भरण्यात कसूर केली तर, महालेखापाल, ज्या दिवशी अशी रक्कम देणे आवश्यक होते त्या दिवसांनंतरच्या सात दिवसांच्या आत [५][[६][राज्य] शासनाच्या] मुख्य सचिवाकडे किंवा त्या नात्याने काम पाहणाऱ्या इतर अधिकाऱ्याकडे त्यासंबंधी प्रतिवेदन पाठवील.

महानगर-पालिकेस देणे असलेल्या रकमा अटकावून ठेवून थकबाकी वसूल करता येईल.

**९८.** (१) उक्त मुख्य सचिवाने किंवा त्या नात्याने काम पाहत असलेल्या इतर अधिकाऱ्याने, उक्त देय रकमांपैकी कोणतीही रक्कम थकित असेल त्या वेळी, महानगरपालिका प्राधिकारी किंवा महानगरपालिका अधिकारी नसेल अशा कोणत्याही [७][शासकीय अधिकाऱ्यास], जी रक्कम महानगरपालिकेस देणे असेल किंवा देणे होईल ती, त्या वेळी थकित असलेल्या कोणत्याही रकमेच्या किंवा रकमांच्या मर्यादेपर्यंत अटकावून ठेवण्याविषयी निदेश देणे विधिसंमत असेल आणि अशा अधिकाऱ्यांस ती त्यावेळी किंवा त्यानंतर आपल्या अभिरक्षेत किंवा नियंत्रणाधीन ठेवता येईल.

(२) असा अधिकारी, ज्या रकमा याप्रमाणे अटकावून ठेवण्याविषयी त्यास निदेश देण्यात आला असेल त्या रकमा अटकावून ठेवील आणि त्या महानगरपालिकेस जसजशा देय होतील तसतशा, [१][[५][[६][राज्य] शासनास] येणे असलेल्या रकमा स्वीकारण्यासाठी त्या त्या वेळी नेमण्यात आलेल्या अधिकाऱ्यास देईल किंवा बँक ऑफ बॉम्बेमध्ये] भरील.

(३) याप्रमाणे देण्यात आलेल्या रकमांचे उपयोजन, विहार जलदाय व्यवस्था ऋणाच्या किंवा एकत्रीकृत कर्जाच्या संबंधात त्या त्या वेळी देय असलेल्या रकमेची फेड करण्यासाठी, अशा रकमेवरील इतर सर्व बोजे व मागणी हक्क यांच्यापेक्षा त्यास प्रथम पसंती व अग्रक्रम देऊन करण्यात येईल.

---

[१] सन १८९४ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम ४ (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आला. बँक ऑफ बॉम्बेचा संदर्भ हा रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई यासंबंधीचा संदर्भ आहे असे समजून वाचावे.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "सरकार" या शब्दांऐवजी "बादशहा" हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "बादशहा" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये, "मुंबई सरकार राजपत्र" या शब्दांऐवजी "शासकीय राजपत्रात" हे शब्द दाखल करण्यात आले.

[५] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये, "सरकार" या शब्दांऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[६] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये, "प्रांतिक" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[७] वरील आदेशान्वये, "सर्व्हंट ऑफ दि क्राऊन" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

महानगरपालिका निधी, वगैरेवर जप्ती आणून थकबाकी वसूल करता येईल.

**९९.** (१) निकटपूर्वीच्या कलमात तरतूद केलेल्या रीतीने थकबाकीची रक्कम वसूल करणे शक्य नसेल तर, [1][[2][राज्य] शासनास] महानगरपालिका निधी किंवा महानगरपालिकेने वसूल करण्याजोगा कोणताही कर, यावर जप्ती आणता येईल.

(२) अशा जप्तीनंतर [1][[2][राज्य] शासनाने] नेमलेल्या अधिकाऱ्याहून अन्य कोणत्याही व्यक्तीला, जप्त केलेल्या निधीसंबंधात किंवा कराच्या संबंधात कोणताही व्यवहार करता येणार नाही ; मात्र अशा जप्ती झाली नसती तर, महानगरपालिकेस किंवा कोणत्याही महानगरपालिका प्राधिकाऱ्यास त्यासंबंधात ज्या कृती करता आल्या असत्या त्या सर्व कृती अधिकाऱ्यास करता येतील आणि अशा अधिकाऱ्यास, जप्तीपासून मिळालेल्या उत्पन्नाचे उपयोजन, थकबाकीची रक्कम फेडण्यासाठी तसेच जप्तीमुळे व त्यानंतरच्या कार्यवाह्यांमुळे झालेला खर्च भागविण्यासाठी करता येईल.

कायदेशीर रीत्या पूर्वी निर्माण झालेला भार जप्तीमुळे विफल होणार नाही.

(३) परंतु, जप्त झालेला निधी किंवा कर हा, कायद्यानुसार ज्या ऋणासाठी पूर्वी तारण म्हणून देण्यात आला होता, असे कोणतेही ऋण अशा जप्तीमुळे विफल होणार नाही किंवा त्यास बाध येणार नाही; मात्र जप्तीपासून मिळालेल्या उत्पन्नाच्या कोणत्याही भागाचे विहार जलदाय व्यवस्था ऋणासंबंधातील किंवा एकत्रीकृत कर्जासंबंधातील दायित्व चुकते करण्यासाठी उपयोजन करण्यापूर्वी, असे पूर्वीचे सर्व भार निधीच्या उत्पन्नातून चुकते करण्यात येतील.

विहार जलदाय व्यवस्था ऋणादाखल देणे असलेला कोणताही हप्ता भरण्यात कसूर झाल्यास ती जलदाय व्यवस्था [6][शासनाकडे] प्रत्यावर्तित होणे.

**१००.** विहार जलदाय व्यवस्था ऋणादाखल कलम ९४ ला अनुसरून द्यावयाचे कोणतेही मासिक प्रदान चुकते करण्यात आयुक्त कसूर करील तर आणि [1][[2][राज्य] शासनाच्या] सचिवांपैकी एका सचिवांची सही असलेली भरणा करण्यास फर्माविणारी लेखी नोटीस त्याच्यावर बजावण्यात आल्यानंतर व ती [3][महापौराकडे] पाठविण्यात आल्यानंतर, तसेच ती [4][**शासकीय राजपत्रात**] दोन महिन्यांपेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीपर्यंत प्रसिद्ध करण्यात आल्यानंतर देखील असा भरणा करण्यात आयुक्त कसूर करील तर, कलम ८८ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, उक्त विहार जलदाय व्यवस्था महानगरपालिकेमध्ये निहित असण्याचे बंद होईल आणि ती महानगरपालिकेमध्ये ज्या प्रयोजनासाठी पूर्वी निहित झालेली असेल त्या प्रयोजनांसाठी विश्वस्तव्यवस्था म्हणून [5][शासनामध्ये] ताबडतोब निहित होईल.

[6][शासनाचे] इतर अधिकार व उपाय यांस बाध न येणे.

**१०१.** उपरोक्त रकमा वसूल करण्यासाठी [6][शासनास] या अधिनियमाबाहेरील असे स्वतंत्रपणे जे अधिकार आहेत किंवा असतील अथवा जे उपाय करता येतात किंवा करता येतील ते अधिकार व ते उपाय यांना निकटपूर्वीच्या चार कलमांतील कोणत्याही तरतुदीमुळे बाध येणार नाही.

विहार जलदाय व्यवस्थेदाखल भरण्यात आलेल्या रकमांचे विनियोजन करण्याची रीत.

**१०२.** विहार जलदाय व्यवस्था ऋणादाखल कलम ९४ खाली आयुक्ताने भरलेली मासिक हप्त्यांची वार्षिक रक्कम आणि कोणत्याही पूर्ववर्ती कलमाखाली वसूल करण्यात आलेल्या सर्व रकमा यांचे विनियोजन पुढे दिल्याप्रमाणे करता येईल :—

प्रथमतः, उक्त ऋणादाखल दिनांक १ जुलै, १८६३ रोजी येणे असलेल्या सदतीस लाख तीस हजार त्रेपन्न रुपये इतक्या मुद्दलाच्या रकमेदाखल येणे असलेल्या व्याजाची रक्कम देण्यासाठी;

---

[1] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये, " सरकार " या शब्दांऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[2] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये, " प्रांतिक " या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[3] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ५४ अन्वये "महानगरपालिकेच्या अध्यक्षाकडे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये, " **मुंबई सरकार राजपत्र** " या शब्दांऐवजी " शासकीय राजपत्रात " हे शब्द दाखल करण्यात आले.

[5] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " हर मॅजेस्टी " या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[6] वरील आदेशाअन्वये " बादशहा " या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

द्वितीयतः, दिनांक १ जुलै, १८६३ पासून उक्त जलदाय व्यवस्थेच्या संबंधात [१][शासनाने] आगाऊ दिलेल्या सर्व रकमांवरील व्याजाची रक्कम देण्यासाठी;

तृतीयतः, पूर्वोक्तप्रमाणे त्यानंतर आगाऊ दिलेल्या सर्व रकमा देण्यासाठी; आणि

शेवटी, सदतीस लाख तीस हजार त्रेपन्न रुपये इतकी उक्त मुद्दलाची रक्कम फेडण्यासाठी.

एकत्रीकृत कर्जादाखल भरण्यात आलेल्या रकमांचे विनियोजन करण्याची पद्धती.

**१०३.** एकत्रीकृत कर्जादाखल कलम ९५ खाली आयुक्ताने भरलेली प्रत्येक रक्कम आणि कोणत्याही पूर्वगामी कलमाखाली वसूल करण्यात आलेल्या सर्व रकमा यांचे विनियोजन प्रथमतः, अशी रक्कम भरण्यात आल्याच्या किंवा वसूल करण्यात आल्याच्या वेळी येणे असलेल्या व्याजाची रक्कम देण्याच्या कामी आणि द्वितीयतः, मुद्दलाची रक्कम कमी करण्याच्या कामी करण्यात येईल.

## सन १८६७-६८ ची घरपट्टी कर्जे व बाजार कर्जे यांची परतफेड

घरपट्टी कर्जे व बाजार कर्जे यांसाठी कर्जनिवारण निधी ठेवणे.

**१०४.** (१) महानगरपालिकेने, [२]मुंबई नगरपालिका अधिनियम, १९६५ याची कलमे २५३ ते २५८ यांच्या तरतुदींखाली सन १८६७ व १८६८ मध्ये उभारण्यात आलेले घरपट्टी कर्ज व दोन बाजार कर्जे यांची परतफेड करीतोपर्यंत ज्या करांच्या प्रतिभूतीवर उक्त कर्जे उभारण्यात आली होती त्या करांमधून उक्त अधिनियमाचे कलम २५७ अन्वये विहित केलेला कर्जनिवारण निधी ठेवणे हे, महानगरपालिकेचे अवश्य कर्तव्य असेल.

१८६५ चा मुंबई २.

(२) परंतु, उक्त कर्जाची संपूर्ण फेड ज्यावेळी करावयाची असेल त्यापूर्वी कोणत्याही वेळी उक्त कर्जाच्या कोणत्याही भागांशाची महानगरपालिकेने फेड केली असेल त्या प्रसंगी, महानगरपालिका उक्त कर्जनिवारण निधीची रक्कम यथाप्रमाण कमी करण्यास सक्षम असेल.

## कर्जाबद्दल देय असलेल्या शिल्लक रकमांचा वार्षिक लेखा प्रसिद्ध करणे

कर्जाबद्दल देय असलेल्या शिल्लक रकमांचा लेखा आयुक्ताने दरवर्षी प्रसिद्ध करणे.

**१०५.** (१) आयुक्त, महानगरपालिकेकडून [३][शासनास] तसेच महानगरपालिकेचे रोखे धारण करणाऱ्या व्यक्तींना [४][तसेच मुंबई शहर सुधारणा विश्वस्त मंडळाने अनुक्रमे मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ आणि मुंबई सुधारणा विश्वस्तव्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ खाली किंवा तदनुसार काढलेले रोखे धारण करणाऱ्यांना] त्यावेळी फेडावयाचे राहिलेले कोणतेही ऋण किंवा कर्जे असल्यास त्या प्रत्येक ऋणादाखल किंवा कर्जादाखल निकटपूर्वीच्या ३१ [५][मार्च] रोजी देय असलेल्या शिल्लक रकमा दर्शविणारा लेखा, [६][**शासकीय राजपत्रात**] प्रत्येक वर्षाच्या [५][एप्रिल] महिन्यात प्रसिद्ध करील.

१८९८ चा मुंबई ४. १९२५ चा मुंबई १६.

(२) तसेच, आयुक्त उक्त लेखा छापण्याची तजवीज करील आणि त्याची छापील प्रत, प्रत्येक पालिका सदस्याच्या नेहमीच्या किंवा शेवटी माहीत असलेल्या स्थानिक निवासस्थानी पाठवील.

[१] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये "सरकार" या शब्दांऐवजी "बादशहा" हा शब्द दाखल करण्यात आला व विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "बादशहा" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १८६५ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ हा सन १८७२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ अन्वये निरसित करण्यात आला.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "बादशहा" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २१ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १० अन्वये "जानेवारी" व "डिसेंबर" या मूळ शब्दांऐवजी अनुक्रमे "एप्रिल" आणि "मार्च" हे शब्द दाखल करण्यात आले.

[६] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये, "**मुंबई सरकार राजपत्र**" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[1][प्रकरण पाच-अ

## महानगरपालिकेच्या परिवास्तुंतून व्यक्तींना निष्कासित करण्याचा अधिकार

**१०५अ.** या प्रकरणामध्ये— व्याख्या.

(अ) " आयुक्त " म्हणजे [2][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] प्रयोजनांसाठी महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या महानगरपालिकेच्या परिवास्तूंच्या संबंधात महाव्यवस्थापक ;

(ब) " महानगरपालिकेच्या परिवास्तू " म्हणजे महानगरपालिकेच्या मालकीची किंवा तिच्यामध्ये निहित असलेली किंवा तिने पट्ट्याने घेतलेली कोणतीही परिवास्तू ;

(क) " विनियम " म्हणजे आयुक्ताने कलम १०५ ह खाली केलेले विनियम ;

(ड) " महानगरपालिकेच्या कोणत्याही परिवास्तूच्या बाबतीत अनधिकृतपणे केलेला भोगवटा " म्हणजे, अशा रीतीने भोगवटा करण्याच्या प्राधिकारावाचून महानगरपालिकेच्या परिवास्तूचा कोणत्याही व्यक्तीने केलेला भोगवटा ; व त्यामध्ये, ज्या प्राधिकाराखाली परिवास्तूचा भोगवटा करण्याची परवानगी देण्यात आली असेल तो प्राधिकार संपल्यानंतर किंवा तो रीतसर समाप्त करण्यात आल्यानंतर कोणत्याही व्यक्तीने परिवास्तूचा भोगवटा करण्याचे चालू ठेवणे या गोष्टीचा समावेश होतो.

**१०५ब.** (१) जर पुढील बाबतीत आयुक्ताची अशी खात्री होईल की,— महानगरपालिकेच्या परिवास्तूंतून व्यक्तीला निष्कासित करण्याचा अधिकार.

(अ) महानगरपालिकेच्या कोणत्याही परिवास्तूंचा भोगवटा करण्याचा प्राधिकार असलेल्या व्यक्तीने मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९६०, अंमलात येण्यापूर्वी किंवा अंमलात आल्यानंतर— १९६१ चा महा. १४.

(एक) अशा परिवास्तूंच्या संबंधात तिच्याकडून विधितः येणे असलेले [3][भाडे, कर, फी किंवा नुकसानभरपाई] दोन महिन्यांपेक्षा अधिक कालावधीपर्यंत दिलेली नाही ; किंवा

(दोन) [4]* * * * * *

अशी संपूर्ण परिवास्तू किंवा तिचा कोणताही भाग पोट-भाड्याने दिलेला आहे ; किंवा

(तीन) परिवास्तूचे मूल्य बऱ्याच प्रमाणात कमी होण्याचा किंवा परिवास्तूच्या उपयुक्ततेस बऱ्याच प्रमाणात नुकसान पोहोचण्याचा ज्या कृत्यांमुळे संभव असेल अशी हानीकारक कृत्ये केलेली आहेत किंवा करीत आहे ; किंवा

(चार) ज्या स्पष्ट किंवा गर्भित अटींनुसार त्यास अशा परिवास्तूंचा भोगवटा करण्याचा प्राधिकार देण्यात आला असेल त्या अटींपैकी कोणत्याही अटीचे उल्लंघन करून अन्यथा कृती केलेली आहे ;

(ब) कोणतीही व्यक्ती महानगरपालिकेच्या कोणत्याही परिवास्तूचा अनधिकृतपणे भोगवटा करीत आहे ;

---

[1] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ४ अन्वये प्रकरण पाच-अ समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४(३) अन्वये " मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रम " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९८९ च महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १६ (एक) अन्वये " भाडे किंवा कर " या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम १६ (दोन) अन्वये " तिच्या भोगवट्याच्या अटींविरुद्ध किंवा शर्तीविरुद्ध " हा मजकूर वगळण्यात आला.

(क) कोणत्याही व्यक्तीच्या भोगवट्यात असलेल्या, महानगरपालिकेच्या कोणत्याही परिवास्तूची सार्वजनिक हिताच्या दृष्टीने महानगरपालिकेस गरज आहे—

तर त्या बाबतीत आयुक्तास त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असेल तरी, (डाकेने पाठवून किंवा तिची एक प्रत अशा परिवास्तूच्या बाहेरील दारावर व इतर कोणत्याही ठळक जागी चिकटवून किंवा विनियमान्वये तरतूद करण्यात येईल अशा इतर रीतीने बजावण्यात असलेल्या) नोटिशीअन्वये, असा आदेश देता येईल की, त्या व्यक्तीने वा त्याप्रमाणे जी व्यक्ती त्या परिवास्तूंचा किंवा त्यांच्या कोणत्याही भागांशाचा भोगवटा करीत असेल, अशा इतर कोणत्याही व्यक्तीने नोटीस बजावल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत उक्त परिवास्तू रिकामी केली पाहिजे.

(२) पोटकलम (१) खाली कोणत्याही व्यक्तीविरुद्ध आदेश देण्यापूर्वी, आयुक्त सर्व संबंधित व्यक्तींना, त्यांना परिवास्तूंतून निष्कासित करण्याबाबत आदेश का देण्यात येऊ नये याबद्दल कारण दाखविण्यास सांगणारी एक लेखी नोटीस, यात पुढे तरतूद केलेल्या रीतीने बजावील.

उक्त नोटिशीत,—

(अ) ज्या कारणांवरून निष्कासनाचा आदेश देण्याचे योजिले असेल ती कारणे विनिर्दिष्ट केलेली असतील, आणि

(ब) सर्व संबंधित व्यक्तींना, म्हणजे महानगरपलिकेच्या परिवास्तुंचा भोगवटा करीत आहेत किंवा करण्याची शक्यता असेल अशा किंवा उक्त परिवास्तूंमध्ये हितसंबंध असल्याचा दावा सांगत असतील अशा सर्व व्यक्तींना नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेस किंवा त्यापूर्वी, प्रस्तावित आदेशाविरुद्ध कारण दाखविण्यास फर्मावलेले असेल.

जर अशी व्यक्ती नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात आलेला कालावधी वाढविण्याबद्दल आयुक्ताकडे अर्ज करील तर आयुक्तास, नोटिशीत मागणी केलेली रक्कम देण्यासंबंधी आणि तिच्या वसुलीसंबंधी त्यास योग्य वाटेल अशा अटींवर, तशी मुदतवाढ मंजूर करता येईल.

कोणत्याही व्यक्तीने नोटिशीस अनुसरून केलेले कोणतेही लेखी निवेदन आणि सादर केलेले दस्तऐवज हे, उक्त प्रकरणाच्या अभिलेखात दाखल करण्यात येतील, आणि अशा व्यक्तीस अधिवक्त्यामार्फत, मुख्त्यारामार्फत किंवा वकिलामार्फत आयुक्तापुढे हजर राहण्याचा हक्क असेल.

या पोटकलमाखाली बजावण्यात येणारी नोटीस ही, पोटकलम (१) खाली नोटीस बजावण्यासाठी जी रीत ठरविण्यात आली असेल त्या रीतीने बजावण्यात येईल; आणि लागोलाग सर्व संबंधित व्यक्तींना नोटीस वाजवी रीतीने देण्यात आली, असे मानण्यात येईल.

(३) जर कोणतीही व्यक्ती पोटकलम (१) खाली दिलेल्या आदेशाचे पालन करण्याचे नाकारील किंवा त्यात कसूर करील तर आयुक्तास, त्या व्यक्तीस तसेच त्याला जी व्यक्ती अडथळा करील अशा इतर कोणत्याही व्यक्तीस परिवास्तूतून निष्कासित करता येईल आणि परिवास्तूचा कब्जा घेता येईल; आणि त्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक असेल अशा बलाचा वापर करता येईल.

(४) आयुक्तास, पोटकलम (३) खाली जिच्याकडून महानगरपालिकेच्या परिवास्तूचा कब्जा घेण्यात आला असेल त्या व्यक्तीस पूर्ण चौदा दिवसांची नोटीस दिल्यानंतर, आणि अशी नोटीस **शासकीय राजपत्रात** आणि त्या वसतिस्थानात प्रचलित असलेल्या किमान एका वृत्तपत्रात प्रसिद्ध केल्यानंतर अशा परिवास्तूवर राहिलेली कोणतीही मालमत्ता काढून टाकता येईल किंवा काढून टाकण्याची तजवीज करता येईल किंवा जाहीर लिलाव करून तिची विल्हेवाट करता येईल. अशी नोटीस पोटकलम (१) खाली नोटीस बजावण्यासाठी जी रीत ठरविण्यात आली असेल त्याच रीतीने बजावण्यात येईल.

(५) पोटकलम (४) खाली मालमत्तेची विक्री करण्यात आली असेल तर, विक्रीच्या उत्पन्नातून विक्री खर्च वजा करता शिल्लक राहिलेली रक्कम, ती रक्कम घेण्याचा ज्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना हक्क आहे असे आयुक्तास वाढत असेल त्या व्यक्तीस किंवा त्या व्यक्तींना देण्यात येईलः

परंतु, शिल्लक राहिलेली रक्कम ही कोणत्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना देण्यात यावी याबाबत किंवा रकमेची वाटणी कशी करावी याबाबत आयुक्त निर्णय घेऊ शकत नसेल, तर तो असा विवाद सक्षम अधिकारिता असणाऱ्या दिवाणी न्यायालयाकडे निर्देशित करील आणि न्यायालयाचा त्यावरील निर्णय अखेरचा असेल.

(६) पोटकलम (१), खंड (अ) चे उपखंड (एक) किंवा (चार) याखाली कोणतीही परिवास्तू रिकामी करण्याबद्दल जिला आदेश देण्यात आला असेल अशी व्यक्ती, नोटीस बजावण्यात आल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत, किंवा आयुक्त ज्या अधिक अवधीची परवानगी देईल त्या अवधीत, यथास्थिति, थकित भाड्याची किंवा कराची रक्कम आयुक्तास देईल किंवा आपण उल्लंघन केलेल्या अटी आयुक्तांचे समाधान होईल अशा रीतीने पूर्ण करील किंवा अन्यथा त्यांचे अनुपालन करील तर आयुक्त, पोट-कलम (२) खाली अशा व्यक्तीस निष्कासित करण्याऐवजी कोणत्याही अटी असतील तर त्या अटींवर (उपरोक्त उल्लंघनाबद्दल नुकसानभरपाई किंवा भरपाई म्हणून कोणतीही रक्कम प्रदान करण्यासहित) पोट-कलम (१) खाली दिलेला आपला आदेश रद्द करील आणि लागोलग अशी व्यक्ती, अशी नोटीस तिच्यावर बजावण्यात आल्याच्या लगतपूर्वी ज्या अटींवर तिने अशा परिवास्तू धारण केल्या असतील त्या अटींवर ती परिवास्तू धारण करण्याचे चालू ठेवील.

भाड्याची किंवा नुकसानभरपाईची रक्कम ही, मालमत्ता कराची थकबाकी म्हणून वसूल करण्याचा अधिकार.

**१०५क.** (१) आयुक्ताने याबाबतीत जे कोणतेही विनियम केले असतील त्यांच्या अधीनतेने, मात्र कलम १०५ब च्या तरतुदींस बाध येऊ न देता कोणत्याही व्यक्तीकडून महानगरपालिकेच्या कोणत्याही परिवास्तूच्या संबंधात भाडे येणे असेल त्याबाबतीत, आयुक्तास कलम १०५ब, पोट-कलम (१) खाली नोटीस बजावण्यासाठी जी रीत ठरविण्यात आली असेल त्या रीतीने बजावण्यात आलेल्या नोटिशीद्वारे तिच्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दहा दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या अवधीत अशा व्यक्तीस ते भाडे देण्याबाबत आदेश देता येईल.

(२) कोणत्याही महानगरपालिका परिवास्तू कोणत्याही व्यक्तीच्या अनधिकृत भोगवट्यात असतील तर आयुक्तांस, विनियमांअन्वये तरतूद करण्यात येईल अशा रीतीने आणि त्यात ठरवून दिलेली नुकसानभरपई निर्धारित करण्याबद्दलची तत्त्वे विचारात घेऊन परिवास्तूंचा वापर केल्याबद्दल किंवा त्या भोगवट्यात ठेवल्याबद्दल, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे, अशा नुकसानभरपाईची रक्कम निर्धारित करता येईल आणि पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या रीतीने नोटीस बजावून तिच्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मुदतीत नुकसानभरपाईची रक्कम देण्याबद्दल उक्त व्यक्तीस आदेश देता येईल.

(३) जर कोणतेही व्यक्ती-नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या मुदतीत पोट-कलम (१) खालील भाड्याची थकबाकी किंवा पोट-कलम (२) खालील नुकसान भरपाईची रक्कम देण्यास नकार देईल किंवा रक्कम देण्यात कसूर करील तर आयुक्तास, यथास्थिती, भाड्याची रक्कम किंवा नुकसानभरपाईची रक्कम, अशा व्यक्तीकडून येणे असलेला सर्वसाधारण कर किंवा मालमत्ता कर ज्या रीतीने वसूल करण्यात येतो त्याच रीतीने वसूल करता येईल.

(४) असा आदेश का देण्यात येऊ नये याबाबतचे कारण अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वाजवी कालावधीत दर्शवण्याबद्दलची लेखी नोटीस अशा व्यक्तीवर बजावण्यात येईतोपर्यंत आणि तिचे कोणतेही आक्षेप असल्यास ते आक्षेप आणि त्याच्या पुष्ट्यर्थ ती जो कोणताही पुरावा सादर करील तो पुरावा आयुक्त विचारात घेईतोपर्यंत पोट-कलम (२) खाली कोणताही आदेश देण्यात येणार नाही.

महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांच्या बाबतीत त्यांच्या वेतनात किंवा मजुरीत कपात करून भाडे वसूल करणे.

**१०५ड.** जी व्यक्ती महानगरपालिकेचा कर्मचारी असून जिस महानगरपालिकेची कोणतीही परिवास्तू देण्यात आली असेल अशा कोणत्याही व्यक्तीच्या बाबतीत, अशा परिवास्तूच्या संबंधात तिच्याकडून येणे असलेल्या भाड्याची रक्कम ही, महानगरपालिकेच्या विभागाच्या प्रमुखाकडे किंवा अशा व्यक्तीला ज्याच्या अधीन नोकरीला ठेवण्यात आले असेल त्या अधिकाऱ्याकडे आयुक्ताने या बाबतीत लेखी मागणी केल्यानंतर, अशा व्यक्तीस देणे असलेल्या वेतनातून किंवा मजुरीतून, कलम १०५ब च्या तरतुदींस बाध येऊ न देता, वजा केली जाण्यास पात्र असेल. असे मागणीपत्र मिळाल्यानंतर यथास्थिति, अशा विभागाचा प्रमुख किंवा असा अधिकारी मागणीपत्रात विनिर्दिष्ट केलेली रक्कम, अशा व्यक्तीस देय असलेल्या वेतनातून किंवा मजुरीतून वजा करील आणि याप्रमाणे वजा केलेली रक्कम तिच्याकडून येणे असलेल्या भाड्याची रक्कम म्हणून आयुक्ताला देईल.

आयुक्तास दिवाणी न्यायालयाचे अधिकार असणे.

**१०५ई.** पुढील गोष्टींच्या संबंधात दाव्याची संपरीक्षा करताना दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ खाली दिवाणी न्यायालयामध्ये जे अधिकार निहित असतील ते अधिकार या अधिनियमाखाली कोणतीही चौकशी करण्याच्या प्रयोजनासाठी आयुक्तास असतील :— १९०८ चा ५.

(अ) कोणत्याही व्यक्तीस समन्स काढून बोलावणे आणि तिला हजर राहण्याची सक्ती करणे व तिची शपथ देववून तपासणी करणे ;

(ब) दस्तऐवजांचा शोध घेण्यास व ते सादर करण्यास फर्मावणे ;

(क) कलम १०५ह खाली केलेल्या विनियमांन्वये विहित करण्यात येईल अशी इतर कोणतीही बाब.

अपिल.

**१०५फ.** (१) आयुक्ताने कोणत्याही महानगरपालिका परवास्तूच्या संबंधात कलम १०५ब किंवा १०५क खाली दिलेल्या प्रत्येक आदेशावर, जो मुंबई शहर दिवाणी न्यायालयाचा प्रमुख न्यायाधीश असेल अशा अपील अधिकाऱ्याकडे किंवा प्रमुख न्यायाधीश याबाबत पदनिर्देशित करील अशा दहा वर्षापेक्षा कमी नसेल इतका सेवाकाल पूर्ण झालेल्या, [१][बृहन्मुंबईतील] इतर न्यायिक अधिकाऱ्याकडे अपील करता येईल.

(२) पोट-कलम (१) खाली करावयाचे अपील पुढीलप्रमाणे दाखल करता येईल :—

(अ) कलम १०५ब खाली दिलेल्या आदेशावर करावयाच्या अपिलाच्या बाबतीत, त्या कलमाच्या पोट-कलम (१) खालील आदेशासंबंधीची नोटीस बजावण्यात आल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत ; आणि

(ब) कलम १०५क खाली दिलेल्या आदेशावर करावयाच्या अपिलाच्या बाबतीत, यथास्थिति, त्या कलमाच्या पोट-कलम (१) किंवा (२) खालील आदेशासंबंधीची नोटीस बजावण्यात आल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत :

परंतु, अपीलकार पुरेशा कारणांमुळे उक्त अवधीत अपील दाखल करू शकला नाही अशी अपिलीय अधिकाऱ्यांची खात्री झाल्यास, उक्त तीस दिवसांचा कालावधी संपल्यानंतरही, अपिलीय अधिकारी अपील विचारात घेऊ शकेल.

(३) आयुक्ताच्या आदेशावर अपील करण्यात आले असेल तर, अपिलीय अधिकाऱ्यास, त्यास योग्य वाटेल अशा कालावधीकरिता व अशा शर्तींवर त्या आदेशाची अंमलबजावणी स्थगित करता येईल.

(४) या कलमाखाली केलेले प्रत्येक अपील अपिलीय अधिकारी शक्य तितक्या लवकर निकालात काढील.

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची अन्वये "मुंबईतील" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**१०५ग.** या प्रकरणात अन्यथा स्पष्टपणे तरतूद असेल ते खेरीज करून एरव्ही, आयुक्ताने किंवा अपिलीय अधिकाऱ्याने या प्रकरणाखाली दिलेला प्रत्येक आदेश अंतिम असेल, आणि त्याच्या संबंधात कोणत्याही मूळ दाव्यात, अर्जात किंवा अंमलबजावणीच्या कार्यवाहीत कोणतीही हरकत घेण्यात येणार नाही. आदेशाची अंतिमता.

**१०५ह.** [१][आयुक्तास, स्थायी समितीच्या मान्यतेने, आणि महाव्यवस्थापकास, बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीच्या मान्यतेने], पुढील सर्व किंवा कोणत्याही बाबींसाठी विनियम करता येतील :– विनियम करण्याचा अधिकार.

(अ) कलम १०५ब आणि १०५क याखालील नोटिशींचे नमुने आणि त्या कलमांखाली ज्या ज्या रीतीने बजावण्यात येतील अशी इतर रीत विहित करणे ;

(ब) या प्रकरणाखाली चौकशी करणे ;

(क) कलम १०५ब खाली, महानगरपालिकेच्या कोणत्याही परिवास्तूचा कब्जा घेताना अनुसरावयाची कार्यपद्धती ;

(ड) कलम १०५क खालील नुकसानभरपाईची रक्कम ज्या रीतीने निर्धारित करण्यात येईल ती रीत आणि अशा नुकसानभरपाईची रक्कम निर्धारित करताना विचारात घ्यावयाची तत्त्वे ;

(ई) कलम १०५फ खाली ज्या रीतीने अपील करता येईल ती रीत आणि अशा अपिलांत अनुसरावयाची रीत ;

(फ) या प्रकरणाखाली विनियमांन्वये विहित करावयाची असेल किंवा विहित करता येईल अशी इतर कोणतीही बाब.]

प्रकरण सहा

## कर्ज काढण्याचे अधिकार

[२][**१०६.** महानगरपालिकेस, वेळोवेळी [३][केंद्र सरकारकडून किंवा [५][राज्य] शासनाकडून] किंवा [५][[४][राज्य] शासनाच्या] मंजुरीने कोणत्याही इतर व्यक्तींकडून पुढील प्रयोजनासाठी आवश्यक असलेली कोणतीही रक्कम कर्जाऊ किंवा पुन्हा कर्जाऊ घेता येईल व व्याजाने घेता येईल.— [३][केंद्र सरकारकडून किंवा [४][राज्य] शासनाकडून किंवा इतर व्यक्तींकडून कर्ज काढण्याचा अधिकार.

(अ) या अधिनियमाची अंमलबजावणी करताना तिने केलेला किंवा करावयाचा कोणताही परिव्यय किंवा खर्च अथवा तिने दिलेले किंवा द्यावयाचे कोणतेही आकार यांचा खर्च भागवण्यासाठी ;

(ब) या अधिनियमाखाली काढलेले कोणतेही कर्ज किंवा जे फेडण्याचे महानगरपालिकेवर दायित्व असेल असे कोणतेही इतर कर्ज किंवा ऋण फेडण्यासाठी ;

(क) कलम १२६ खाली तयार केलेले अर्थसंकल्पीय अंदाज " ब " यातील कोणतीही तूट भरून काढण्यासाठी ;

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४४ अन्वये " महापौरासह परिषदेस " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९२० चा अधिनियम क्रमांक ३८, कलम २ व अनुसूची १, भाग चार आणि सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम १७ अन्वये सुधारलेल्या कलम १०६ ऐवजी, सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २२ अन्वये हे नवीन कलम दाखल करण्यात आले.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " दि सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया इन कौन्सिल " या शब्दांऐवजी " केंद्र सरकारकडून किंवा प्रांतिक सरकारकडून " हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " गव्हर्नर इन कौन्सिल " या मूळ शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

(ड) कलम ३५४ डब्ल्यू याखालील कर्जे देणे यासह सर्वसाधारणपणे या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी :

[१]* * * * *

**महानगरपालिकेने निर्माण केलेल्या निधीच्या वापरावरील निर्बंध.**

[२][**१०६अ.** कलम १०६ मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेशिवाय, महानगरपालिकेने निर्माण केलेल्या कोणत्याही निधीतून महानगरपालिकेस कोणतेही अंतर्गत कर्ज घेता येणार नाही, तसेच, महानगरपालिकेस ज्या कारणांकरिता तो निधी निर्माण करण्यात आला आहे त्या कारणांखेरीज अन्य कोणत्याही कारणांसाठी अशा निधीचा वापर करता येणार नाही.

**[३][केंद्र सरकारकडून] किंवा [४][राज्य] शासनाकडन काढलेल्या कोणत्याही कर्जास लागू असणाऱ्या तरतुदी.**

**१०७.** जर महानगरपालिकेने या अधिनियमाखाली [३][केंद्र सरकारकडून किंवा [४][राज्य] शासनाकडून] कोणतेही नवीन कर्ज काढले असेल तर, कर्जाची परतफेड करण्याच्या आणि त्याबद्दल प्रतिभूती देण्याच्या बाबतीत आणि इतर प्रत्येक बाबतीत, अशा कर्जास, एकत्रित कर्जासंबंधी ज्या तरतुदी यात यापूर्वी नमूद केल्या असतील त्याच तरतुदी लागू होतील, मात्र अशा कोणत्याही नवीन कर्जाच्या बाबतीत व्याजाचा दर, परतफेडीचा कालावधी आणि हप्त्यांची संख्या व रक्कम या गोष्टी [३][केंद्र सरकारकडून किंवा यथास्थिति, [४][राज्य] शासनाकडून] निश्चित केल्या जातील.

[५]* * * * *

**कर किंवा स्थावर मालमत्ता गहाण ठेवणे.**

**१०८.** (१) महानगरपालिकेस, तिच्या मालकीच्या किंवा या अधिनियमाखाली तिने संपादन करण्याचे योजिलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या प्रतिभूतीवर किंवा या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता जो किंवा जे कर बसवण्याचा तिला प्राधिकार देण्यात आलेला आहे, अशा सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही कराच्या प्रतिभूतीवर किंवा [६][मुंबई वीजपुरवठा आणि परिवहन उपक्रमाच्या] प्रतिभूतीवर अथवा अशा सर्व किंवा कोणत्याही प्रतिभूतीवर पूर्वोक्तप्रमाणे असलेली कोणतीही रक्कम [३][केंद्र सरकार किंवा [४][राज्य] शासन] याहून अन्य कोणत्याही व्यक्तीकडून कर्जाऊ किंवा पुन्हा कर्जाऊ घेता येईल.

(२) आणि तिला, याप्रमाणे कर्जाऊ घेतलेल्या कोणत्याही रकमेची तिच्यावरील व्याजासहित परत फेड करण्याच्या प्रयोजनाकरिता, ज्या कोणत्याही व्यक्तीने किंवा व्यक्तीच्यावतीने अशी रक्कम कर्जाऊ दिलेली असेल त्या व्यक्तीकडे अशी कोणतीही स्थावर मालमत्ता किंवा कर [७][किंवा उक्त उपक्रम] गहाण ठेवता येईल.

**कर्ज काढण्याच्या अधिकारांचा वापर करण्यांसंबंधी तरतुदी.**

**१०९.** कर्ज काढण्यासंबंधी या अधिनियमान्वये प्रदान केलेल्या अधिकारांचा पुढील तरतुदींच्या अधीनतेने वापर करण्यात येईल :—

(अ) कायम स्वरूपाच्या कामाहून अन्य कोणतेही काम पार पाडण्याकरिता पैसे कर्जाऊ घेता येणार नाहीत. " कायम स्वरूपाचे काम " या संज्ञेत ज्या कोणत्याही कामाचा परिव्यय [८][ [४][राज्य] शासनाच्या] मते काही वर्षांच्या अवधीमध्ये विभागाला जाणे आवश्यक असेल, अशा कामाचा समावेश होतो.

---

[१] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये हे परंतुक वगळण्यात आले.

[२] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम १२ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " दि सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया इन कौन्सिल" या मजकुराऐवजी " केंद्र सरकार किंवा प्रांतिक सरकार कडून " हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] वरील आदेशान्वये " केंद्र सरकारकडून किंवा यथास्थिति, प्रांतिक सरकारकडून " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम १९ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[७] वरील अधिनियमाच्या कलम १९ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[८] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " सरकार " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

१९२५ चा मुंबई १६ [1][ (ब) मुंबई शहर सुधारणा विश्वस्तव्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५, याखाली रचना केलेल्या मुंबई शहर सुधारणा विश्वस्त मंडळाचे अधिकार, कर्तव्ये व मत्ता आणि दायित्वे महानगरपालिकेकडे हस्तांतरित केल्यामुळे उत्पन्न होणारी कोणतीही आबंधने [2][अथवा [3][ बृहन्मुंबई वीजपुरवठा आणि परिवहन उपक्रम] संपादन करणे, त्यात वाढ करणे, त्याचे प्रशासन करणे, त्याचे प्रचालन करणे किंवा ती सुस्थितीत राखणे यामुळे उद्‌भवणारी कोणतीही आबंधने पार पाडण्याच्या प्रयोजनांहून अन्य] [4][किंवा प्रकरणे नऊ आणि दहा यांमध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही तरतुदींमुळे उद्‌भवणारी कोणतीही आबंधने पार पाडण्याच्या प्रयोजनाहून अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी] कर्जाऊ घेतलेली संपूर्ण रक्कम ही, उक्त प्रयोजनांपैकी, कोणत्याही प्रयोजनासाठी काढलेल्या कर्जाच्या व ऋणांच्या सर्व अदत्त रकमा धरून, यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे [5][बृहन्मुंबईतील] मालमत्ता कर निर्धारित करण्याजोग्या परिवास्तूंच्या पट्टीयोग मूल्याच्या [6][तिप्पट] रकमेपेक्षा अधिक असणार नाही ; आणि

१९२५ चा मुंबई १६. १८९८ चा मुंबई ४. १९२५ चा मुंबई १६. (क) मुंबई शहर सुधारणा विश्वस्तव्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ याखाली रचना केलेल्या मुंबई शहर सुधारणा विश्वस्त मंडळाचें अधिकार, कर्तव्ये व मत्ता आणि दायित्वे महानगरपालिकेकडे हस्तांतरित केल्यामुळे उत्पन्न होणाऱ्या आबंधनांपैकी कोणतीही आबंधने पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी कर्जाऊ घेतलेली संपूर्ण रक्कम ही कोणत्याही वेळी, मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ व मुंबई शहर सुधारणा विश्वस्तव्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ याखाली मुंबई शहर सुधारणा विश्वस्त मंडळाने व महानगरपालिकेने पूर्वोक्त आबंधने पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी घेतलेल्या सर्व कर्जाच्या व ऋणांच्या अदत्त रकमा धरून यात यापुढे केल्याप्रमाणे [5][बृहन्मुंबईतील] मालमत्ता कर निर्धारित करण्याजोग्या, परिवास्तूंच्या पट्टीयोग्य मूल्याच्या दुप्पट रकमेपेक्षा अधिक असणार नाही ; आणि

(ड) कलम १२६ खाली तयार केलेल्या अर्थसंकल्पीय अंदाज व यातील कोणतीही तूट भरून काढण्याच्या प्रयोजनासाठी खंड (क) खाली कर्जाऊ घेतलेली रक्कम ही कोणत्याही वर्षी वीस लाख रुपयांपेक्षा अधिक असणार नाही ;] [2][आणि

(डड) [3][बृहन्मुंबई वीजपुरवठा आणि परिवहन उपक्रम] संपादन करणे, त्यात वाढ करणे, त्याचे प्रशासन करणे, त्याचे प्रचालन करणे किंवा तो सुस्थितीत राखणे यामुळे उद्‌भवणारी कोणतीही आबंधने पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी कर्जाऊ घेतलेली संपूर्ण रक्कम ही, कोणत्याही वेळी, उक्त प्रयोजनासाठी घेतलेल्या व फेडावयाचे राहिलेल्या सर्व कर्जाच्या व ऋणांच्या अदत्त रकमा धरून, यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे [5][बृहन्मुंबईतील] मालमत्ता कर निर्धारित करण्याजोग्या परिवास्तूंच्या पट्टीयोग्य मूल्याच्या [6][तिप्पट] रकमेपेक्षा अधिक असणार नाही ; आणि]

---

[1] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २३(अ) अन्वये मूळ खंड (ब) ऐवजी खंड (ब), (क) व (ड) दाखल करण्यात आले.

[2] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम २० अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची अन्वये " मुंबई वीजपुरवठा आणि परिवहन उपक्रम " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ७(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४ (१) अन्वये " ग्रेटर बॉम्बे " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[6] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १७(अ) अन्वये " दुप्पट " या शब्दाऐवजी " तिप्पट " हा शब्द दाखल करण्यात आला.

[१][(डडड) प्रकरणे नऊ आणि दहा यांमध्ये अंतर्भूत असलेल्या कोणत्याही तरतुदींमुळे उद्‌भवणारी कोणतीही आबंधने पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी कर्जाऊ घेतलेल्या संपूर्ण रकमा या कोणत्याही वेळी, उक्त प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी घेतलेल्या व फेडावयाचे राहिलेल्या सर्व कर्जांच्या व ऋणांच्या अदत्त रकमा धरून यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे [२][बृहन्मुंबईतील] मालमत्ता कर निर्धारित करण्याजोग्या परिवास्तूंच्या पट्टीयोग्य मूल्याच्या [३][तिप्पट] रकमेपेक्षा अधिक असणार नाही ; आणि]

[४][(ई) महानगरपालिकेस [५][[६][राज्य] शासनाच्या] मंजुरीने प्रत्येक बाबतीत साठ वर्षांहून अधिक नसेल असा जो अवधी महानगरपालिका निर्धारित करील त्या अवधीकरिता पैसे कर्जाऊ घेता येतील ;

[७][ (फ) महानगरपालिका अशा रीतीने कर्जाऊ घेतलेला पैसा, मंजूर केलेल्या कालावधीच्या आत मुद्दलाच्या किंवा मुद्दल व व्याज यांच्या वार्षिक समान हप्त्यांनी किंवा [५][ [६][राज्य] शासन] मान्य करील अशा इतर रीतीने फेडील ; अथवा अशा रीतीने कर्जाऊ घेतलेला पैसा, मंजूर झालेल्या कालावधीत किंवा [५][[६][राज्य] शासन] मान्य करील अशा इतर कोणत्याही कालावधीत, सर्व खर्च भागविल्यानंतर फेडण्यास चक्रवाढ व्याजाच्या संचयासह जेवढी रक्कम पुरेशी होईल तेवढी रक्कम महानगरपालिका कर्जनिवारण निधीदाखल प्रत्येक वर्षी निराळी काढून ठेवील व सरकारी रोख्यांच्या खरेदीत ती गुंतवील व चक्रवाढ व्याजाने तिचा संचय करील ;]

(ग) महानगरपालिकेस कोणत्याही वेळी या कलमाखाली निराळा काढून ठेवलेल्या संपूर्ण कर्जनिवारण निधीचे किंवा त्याच्या कोणत्याही भागाचे उपयोजन, ज्या पैशांची फेड करण्यासाठी तो स्थापन करण्यात आलेला असेल त्या पैशांची फेड करण्यामध्ये किंवा करण्याकडे करता येईलः परंतु, महानगरपालिकेने, अशा रीतीने उपयोजन करण्यात आलेल्या कर्जनिवारण निधीच्या किंवा त्याच्या भागाच्या बाबतीत जे व्याज मिळाले असते ते प्रत्येक वेळी अशा निधीत जमा केले पाहिजे आणि कर्जाऊ घेतलेल्या संपूर्ण पैशांची फेड होईपर्यंत अशा रीतीने जे व्याज मिळाले असते त्या व्याजाइतकी रक्कम संचित केली पाहिजे ;

---

[१] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ७(ब) अन्वये खंड (डडड) समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ५६ अन्वये "दुप्पट" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २३(ब) अन्वये कलम १०९ चे मूळ खंड (क) ते (ग) यांचे (ई) ते (आय) असे फेरअक्षरांकन करण्यात आले.

[५] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये "गव्हर्नर इन कौन्सिल" या शब्दांऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[६] विधि अनुकूलन आदेश १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[७] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २३(क) अन्वये मूळ खंड ऐवजी नवीन खंड (फ) दाखल करण्यात आला.

(ह) कर्जनिवारण निधीच्या मुद्दलाचा भागांश म्हणून निराळी काढून ठेवलेली जी कोणतीही रक्कम गुंतवावयाची असेल ती, प्रत्येक वर्षी, ज्या कर्जासाठी असा कर्जनिवारण निधी स्थापन करण्यात आला असेल त्या कर्जाच्या संबंधाने महानगरपालिकेने दुसऱ्या सहामाहीच्या व्याजाची रक्कम ज्या दिवशी द्यावयाची असेल त्या दिवसानंतरच्या पंधरा दिवसांच्या आत गुंतवण्यात येईल ; आणि कर्जनिवारण निधीसंबधीच्या अगोदरच गुंतवलेल्या रकमांवरील व्याजाबद्दल महानगरपालिकेस जी कोणतीही रक्कम मिळाली असेल ती पुन्हा गुंतवावयाची असल्यास अशी रक्कम आणि कर्जनिवारण निधीचे किंवा त्याच्या भागाचे उपयोजन खंड (ग) अन्वये प्राधिकृत केलेल्या कोणत्याही रीतीने करण्यात आले नसते तर, महानगरपालिकेस जे व्याज मिळाले असते त्या व्याजाइतकी खंड [१][(ग)] खाली उक्त निधीत भरावयाची कोणतीही रक्कम गुंतवावयाची असल्यास, अशी रक्कम ज्या दिवशी अशी व्याजाची रक्कम मिळाली असेल किंवा यथास्थिती, मिळाली असती, त्या दिवसापासून एक महिन्याच्या आत गुंतवण्यात येईल :

[२][परंतु, ज्या कर्जाच्या फेडीसाठी कर्जनिवारण निधी स्थापन करण्यात आला असेल ते कर्ज ज्या वर्षात फेडावयाचे असेल त्या वर्षात, अशा कर्जनिवारण निधीच्या मुद्दलाचा भागांश म्हणून निराळी काढून ठेवावयाची रक्कम आणि अशा कर्जनिवारण निधीचा भाग असलेल्या पैशांवरील व्याजाबद्दल मिळणारी रक्कम महानगरपालिकेस तिला योग्य वाटेल त्या रूपात ठेवून घेता येईल ;]

(आय) पूर्वी कर्ज फेडण्यासाठी पैसे कर्जाऊ घेतले असतील त्याबाबतीत याप्रमाणे कर्जाऊ घेतलेल्या पैशांची परतफेड करण्याचा अवधी हा, [३][ [४][राज्य] शासनाची] मंजुरी मिळालेली असल्याखेरीज, मूळ कर्ज ज्या कालावधीसाठी मंजूर करण्यात आले होते त्या कालावधीच्या व संपलेल्या भागांपेक्षा अधिक असणार नाही आणि तो कोणत्याही बाबतीत, मूळ कर्जाच्या तारखेपासून साठ वर्षांच्या कालावधीपेक्षा अधिक असणार नाही ] :

[५][परंतु, या खंडात अंतर्भूत असलेला कोणताही मजकूर प्रकरणे नऊ आणि दहा यांच्या संबंधात कोणत्याही भांडवली स्वरूपातील कामांच्या प्रयोजनार्थ कर्जाऊ घेतलेल्या कोणत्याही रकमेस लागू होणार नाही.]

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम १२ अन्वये “ (क) ” या ऐवजी “ (ग) ” हे अक्षर व कंस दाखल करण्यात आला.

[२] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २३ (ड) अन्वये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये “ सरकार ” या शब्दाऐवजी “ प्रांतिक सरकार ” हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये “ प्रांतिक ” या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ७(क) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

कर्जनिवारण निधी व अधिशेष रकमा महानगरपालिकेने काढलेल्या ऋणपत्रांत गुंतवणे.

[१][**१०९अ.** (१) जो कर्जनिवारण निधी सार्वजनिक रोख्यांमध्ये गुंतवण्याविषयी या अधिनियमान्वये महानगरपालिकेस निदेश देण्यात आला असेल किंवा अधिकार प्रदान करण्यात आले असतील अशा कोणत्याही कर्जनिवारण निधिच्या बाबतीत तसेच जो कोणताही अधिशेष पैसा तशाच रोख्यांमध्ये गुंतवण्याबाबत या अधिनियमान्वये महानगरपालिकेच्या वतीने आयुक्तास अधिकार प्रदान करण्यात आले असतील अशा कोणत्याही अधिशेष पैशांच्या बाबतीत, ज्या कर्जासाठी कलम १०६ खाली [२][[३][राज्य] शासनाची] [४]* * * * * * मंजुरी रीतसर मिळवण्यात आलेली असेल अशा कोणत्याही कर्जाबद्दल काढलेली किंवा काढावयाची किंवा मुंबई शहर सुधारणा विश्वस्त मंडळाने, मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८, कलम ५२ खाली किंवा मुंबई शहर सुधारणा विश्वस्त व्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५, कलम ६८ खाली काढलेली कोणतीही ऋणपत्रे अशा रीतीने रक्कम गुंतवण्याकरिता महानगरपालिस राखून ठेवता येतील, तसे निराळी काढून ठेवता येतील व महानगरपालिकेने तसे करणे हे विधिसंमत असेल. परंतु, अशी ऋणपत्रे याप्रमाणे राखून ठेवण्याचा व निराळी काढून ठेवण्याचा इरादा, कर्ज काढण्याची शर्त म्हणून अधिसूचित करण्यात आलेला असेल.

१८९८ चा मुंबई ४. १९२५ चा मुंबई १६.

(२) अशी कोणतीही ऋणपत्रे महानगरपालिकेच्या वतीने “ [५][बृहन्मुंबईच्या] महानगरपालिका आयुक्तास” व त्याच्या नावे काढल्याने ती ऋणपत्रे निष्प्रभावी किंवा रद्द होणार नाहीत ; मात्र याप्रमाणे काढलेले प्रत्येक ऋणपत्र हे सर्व बाबतीत जणू काही ते कोणत्याही इतर व्यक्तीस व तिच्या नावे पाठवलेले असावे त्याप्रमाणे विधिग्राह्य असेल.

(३) महानगरपालिकेने किंवा मुंबई शहर सुधारणा विश्वस्त मंडळाने काढलेले कोणतेही ऋणपत्र महानगरपालिकेने किंवा तिच्या वतीने आयुक्ताने खरेदी केल्यामुळे किंवा महानगरपालिकेकडे किंवा आयुक्ताकडे हस्तांतरित, अभिहस्तांकित किंवा पृष्ठांकित केल्यामुळे असे कोणतेही ऋणपत्र निष्प्रभावी होणार नाही किंवा रद्द होणार नाही ; मात्र, असे ऋणपत्र ते जणू काही इतर कोणत्याही व्यक्तीने धारण केलेले असावे किंवा तिच्याकडे हस्तांतरित, अभिहस्तांकित किंवा पृष्ठांकित केलेले असावे त्याप्रमाणे व त्याच मर्यादेपर्यंत विधिग्राह्य व परक्राम्य असेल.]

कर्जनिवारण निधींची वार्षिक तपासणी.

[६][**१०९अअ.** (१) या अधिनियमाखाली स्थापन केलेले सर्व कर्जनिवारण निधी हे त्यांची [७][मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा] याने वार्षिक तपासणी करण्याच्या अधीन असतील. तो अशा निधींत जमा असलेली रोकड व त्यातील रोख्यांचे मूल्य हे, जर रकमा नियमितपणे गुंतवल्या असत्या व सुरुवातीस अंदाज केल्याप्रमाणे त्यापासून व्याज मिळाले असते तर, अशा कर्जनिवारण निधीत जी रक्कम जमा झाली असती त्या रकमेइतकी प्रत्यक्षात असल्याची खातरजमा करून घेईल.

---

[१] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २४ अन्वये नवीन कलमे १०९अ, १०९ब आणि १०९क समाविष्ट करण्यात आली.

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये “ स्थानिक सरकार ” या शब्दांऐवजी “ प्रांतिक सरकार ” हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये “ प्रांतिक ” या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] वरील आदेशान्वये “ किंवा गव्हर्नर जनरल इन कौन्सिल ” हे शब्द वगळण्यात आले.

[५] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (१) अन्वये “ ग्रेटर बॉम्बे ” या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[६] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम १३ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[७] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ७ अन्वये “ महालेखापाल, मुंबई ” या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

(२) कर्जनिवारण निधीच्या खाती जी रक्कम जमा असावयास पाहिजे ती रक्कम, सर्व रकमा नियमितपणे गुंतवल्या आहेत व सुरुवातीस अंदाज केल्याप्रमाणे त्यापासून व्याज मिळत आहे असे गृहीत धरून, या अधिनियमाच्या तरतुदींखाली अशा निधीत पुढे भरणे आवश्यक असलेल्या सर्व रकमांच्या चालू मूल्याच्या आधारे हिशेब करून परिगणित करण्यात येईल.

(३) ज्यांचे मूल्यन हे नेहमी सममूल्याइतके केलेले असते अशा, या अधिनियमाखाली किंवा शहराच्या महानगरपालिकेच्या प्रशासनासंबंधी असलेल्या कोणत्याही पूर्वीच्या अधिनियमाखाली किंवा मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ खाली किंवा मुंबई शहर सुधारणा विश्वस्तव्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ खाली काढलेली ऋणपत्रे खेरीजकरून एरव्ही, या कलमाच्या प्रयोजनांकरिता कर्जनिवारण निधीतील रोख्यांचे मूल्य त्यांच्या चालू बाजार मूल्याच्या आधारे ठरवण्यात येईल. परंतु कर्जफेडीच्या वेळी अशा ऋणपत्रांची प्रत्यक्ष विक्री केल्यानंतर जो कोणताही तोटा होईल तो महानगरपालिका ताबडतोब भरून काढील.

१८९८ चा मुंबई ४.
१९२५ चा मुंबई १६.

(४) [1][ [2][राज्य] शासनाने] क्रमाक्रमाने पुनः समायोजन करण्यास विशेषरीत्या मंजुरी दिली नसेल तर, तुटीची रक्कम म्हणून जी रक्कम [3][मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा] प्रमाणित करील ती रक्कम महानगरपालिका कोणत्याही कर्जनिवारण निधीमध्ये ताबडतोब भरील.

(५) कोणत्याही कर्जनिवारण निधीच्या खाती जमा असलेली रोख रक्कम व रोख्याचे मूल्य हे, अशा निधीच्या खाती जी रक्कम जमा असावयास पाहिजे अशा रकमेपेक्षा अधिक असेल तर, [3][मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा] अशी अधिक असलेली रक्कम प्रमाणित करील व लागोलाग महानगरपालिकेस अशी अधिक रक्कम महानगरपालिका निधीत बदली करता येईल.

(६) पोटकलम (४) किंवा (५) खाली [3][मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी लेखा] याने दिलेल्या कोणत्याही प्रमाणपत्राच्या बिनचूकपणाबाबत कोणताही विवाद उद्‌भवल्यास, रक्कम यथास्थिति, भरल्यानंतर किंवा बदली केल्यानंतर, महानगरपालिकेस ती बाब [1][ [2][राज्य] शासनाकडे] निर्देशित करता येईल व राज्य शासनाने त्याबाबत दिलेला निर्णय अंतिम असेल.]

महानगरपालिकेस बँकांकडून रकमा आगाऊ घेता येतील व गहाणांचा व्यवहार करता येईल.

[4]**[१०९ब.** (१) कलम १०६, १०८ व १०९ यांत काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेस [1][[2][राज्य] शासनाच्या] पूर्वमंजुरीने मुंबई शहर सुधारणा विश्वस्तव्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ याखाली रचना केलेल्या विश्वस्तमंडळाचे अधिकार, कर्तव्ये आणि मत्ता व दायित्वे महानगरपालिकेकडे हस्तांतरित केल्यामुळे उत्पन्न होणारे कोणतेही दायित्व पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी आपल्या नावाने कोणत्याही एका किंवा अनेक बँकांमध्ये एक रोकड खाते उघडून व चालू ठेवून, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता जे कर बसविण्याचा तिला प्राधिकार असेल त्या सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही कराच्या प्रतिभूतीवर एकूण पधरा लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल इतकी रक्कम अशा बँकेकडून किंवा बँकांकडून घेता येईल.

१९२५ चा मुंबई १६.

---

[1] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " स्थानिक सरकार " या शब्दांऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[2] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[3] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ७ अन्वये " महालेखापाल, मुंबई " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[4] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २४ अन्वये नवीन कलमे १०९अ, १०९ब व १०९क समाविष्ट करण्यात आली.

(२) तसेच, महानगरपालिकेस, [1][[2][राज्य] शासनाच्या] पूर्वमंजुरीने व या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, अशा रीतीने घेतलेली किंवा अशा रोकड खात्यांमधून वेळोवेळी आगाऊ घेतलेली रक्कम व्याजासह फेडण्यासाठी, तिच्यामध्ये निहित झालेल्या किंवा पुन्हा निहित झालेल्या किंवा तिच्या मालकीच्या असलेल्या कोणत्याही जमिनी किंवा मालमत्ता प्रतिभूती म्हणून, गहाण ठेवता येतील.

सरकारी वचनपत्रांवर किंवा रोख्यांवर बँकांकडून कर्ज काढण्याचा महानगरपालिकेला अधिकार असणे.

**१०९क.** कलमे १०६ व १०९ यांत काहीही अंतर्भूत असले तरीही, महानगरपालिकेस, महानगरपालिका निधीच्या खाती जमा असलेला अत्यधिक पैसा कलम १२२ खाली ज्या बँकेकडे किंवा ज्या बँकांकडे जमा करता येत असेल त्या बँकेकडून किंवा बँकांकडून, महानगरपालिकेची रोकड शिल्लक त्या त्या वेळी ज्या सरकारी वचनपत्रांमध्ये किंवा रोख्यांमध्ये गुंतविण्यात आली असेल त्या कोणत्याही वचनपत्रांवर किंवा रोख्यांवर, कर्ज काढता येईल.]

रोख्याचा नमुना.

**११०.** (१) या प्रकरणाखाली [3][ कलम १०९ब खाली ठेवलेल्या गहाणाहून अन्य ] गहाण ठेवण्याचा प्राधिकार असलेले प्रत्येक गहाण हे, अनुसूची क मध्ये दिलेल्या नमुन्यानुसार किंवा महानगरपालिका, [4][ प्रांतिक सरकारच्या ] संमतीने वेळोवेळी ठरवील अशा इतर नमुन्यानुसार असलेल्या ऋणपत्रांअन्वये ठेवण्यात येईल.

(२) या अधिनियमाखाली काढलेले [5][ कलम ११०ड खाली काढलेल्या ऋणपत्राहून अन्य ] प्रत्येक ऋणपत्र हे पृष्ठांकन करून हस्तांतरित करण्याजोगे असेल. [6]* * *

* * * * * * * * *

(३) अशी कोणतीही ऋणपत्रे काढल्यामुळे पैसे मिळण्याचा व त्यासंबंधी दावा करण्याचा जो कोणताही हक्क प्राप्त होईल तो अशी ऋणपत्रे त्या त्या वेळी धारण करणाऱ्या व्यक्तींमध्ये निहित असेल व अशा ऋणपत्रांपैकी काही ऋणपत्रे इतर ऋणपत्रांपेक्षा आधीच्या तारखेची आहेत या कारणांमुळे त्यांबाबत अशा हक्कासंबंधाने अग्रक्रम मिळणार नाही.

रोख्यांची प्रतिलिपी देणे.

[7][ **११०अ.** (१) जेव्हा या अधिनियमाखाली किंवा शहराच्या महानगरपालिका शासनासंबंधीच्या पूर्वीच्या कोणत्याही अधिनियमाखाली [8][ किंवा मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ खाली किंवा मुंबई शहर सुधारणा विश्वस्तव्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५, या खाली काढलेले [9][ संपूर्ण ऋणपत्र किंवा त्याचा काही भाग हरवला आहे किंवा चोरीस गेला आहे किंवा नष्ट झाला आहे] असे अभिकथन करण्यात आले असेल आणि असे ऋणपत्र हरवले नसते, [10][चोरीस] गेले नसते

१८९८ चा मुंबई ४. १९२५ चा मुंबई १६.

---

[1] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " स्थानिक सरकार " या शब्दांऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[2] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[3] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम २५अ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " सरकार " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[5] वरील अधिनियमाच्या कलम २५ब अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[6] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम १४ अन्वये " आणि अशा तबदिल्या परिशिष्ट ड च्या नमुन्यात किंवा त्यासारख्या असतील " हा मजकूर वगळण्यात आला व तो नेहमीकरिता वगळण्यात आला असे मानण्यात आले आहे.

[7] सन १९१० चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम २, अनुक्रमांक १६ अन्वये कलमे ११०अ ते ११०क समाविष्ट करण्यात आले.

[8] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[9] सन १९३८ च मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम १२(अ) (एक) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[10] वरील अधिनियमाच्या कलम १२(क) (दोन) अन्वये हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

किंवा नष्ट झाले नसते तर त्याचा पैसा आपणास मिळाला असता असा दावा एखादी व्यक्ती सांगत असेल तेव्हा, तिने महानगरपालिका आयुक्ताकडे अर्ज केल्यानंतर आणि ते हरवल्याविषयी, [१][चोरीस] गेल्याविषयी किंवा नष्ट झाल्याविषयी तसेच तिचा दावा न्याय्य असल्याविषयी महानगरपालिका आयुक्ताची खात्री पटेल असा पुरावा हजर केल्यानंतर, तिला—

[२][(अ) जे ऋणपत्र हरवले आहे, चोरीस गेले आहे किंवा नष्ट झाले आहे असे अभिकथन करण्यात आले असेल त्याची रक्कम पोट-कलम (२) मध्ये निर्देश केलेली अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेनंतर सहा वर्षांपेक्षा अधिक कालावधीने प्रदेय असेल तर—

(एक) ऋणपत्राची प्रतिलिपी देण्यात येईपर्यंत त्याबद्दलचे व्याज देण्याविषयी, आणि

(दोन) अर्जदारास देय असलेल्या ऋणपत्राची प्रतिलिपी त्यास देण्याविषयी, अथवा

(ब) जे ऋणपत्र हरवले आहे, चोरीस गेले आहे किंवा नष्ट झाले आहे असे अभिकथन करण्यात आले असेल त्याची रक्कम पोट-कलम (२) मध्ये निर्देश केलेली अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेनंतर सहा वर्षांपेक्षा अधिक कालावधीने प्रदेय असेल तर—

(एक) ऋणपत्राची प्रतिलिपी न देता, त्याबद्दलचे व्याज देण्याविषयी, आणि

(दोन) ऋणपत्राची रक्कम ज्या तारखेस प्रदेय असेल त्या तारखेस किंवा त्या तारखेनंतर ऋणपत्रासंबंधी देय असलेली मुद्दलाची रक्कम अर्जदारास देण्याविषयी, आयुक्तांकडून आदेश मिळवता येईल.]

(२) ऋणपत्र हरवल्यासंबंधी, [३][ चोरीस गेल्यासंबंधी ] किंवा नष्ट झाल्यासंबंधी महानगरपालिका विहित करील अशी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात येऊन महानगरपालिका विहित करील असा कालावधी संपेपर्यंत तसेच हरवलेल्या, [४][ चोरीस गेलेल्या ] किंवा नष्ट झालेल्या ऋणपत्राखाली ज्यांना हक्क प्राप्त होतो अशा सर्व व्यक्तींच्या हक्कमागण्यांसंबंधी महानगरपालिका जी क्षतिपूर्ती सांगेल अशी क्षतिपूर्ती देण्याची हमी अर्जदार देईपर्यंत पोट-कलम (१) खाली कोणताही आदेश देण्यात येणार नाही.

[५][ (३) पोट-कलम (१) खाली ज्या ऋणपत्रांच्या बाबतीत आदेश देण्यात आला असेल त्यांची यादी **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येईल. ]

[६][ (४) जे कोणतेही संपूर्ण ऋणपत्र हरवले आहे, चोरीस गेले आहे किंवा नष्ट झाले आहे असे अभिकथन करण्यात आले असेल त्या ऋणपत्रासंबंधीच्या दायित्वातून महानगरपालिकेची कलम ११०अड च्या तरतुदींखाली मुक्तता होण्यापूर्वी कोणत्याही वेळी असे ऋणपत्र सापडले तर, त्याच्या बाबतीत या कलमाखाली दिलेला कोणताही आदेश रद्द करण्यात येईल. ]

---

[१] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम १२ (क) (दोन) अन्वये हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १२ (अ) (तीन) अन्वये मूळ खंडाऐवजी हे खंड दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १२ (ब) (एक) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १२ (ब) (दोन) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १२ (क) अन्वये हे मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या कलम १२ (ड) अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

ऋणपत्रांचे नवीकरण.

[1][ **११०अअ.** कलम ११०अब च्या तरतुदींच्या अधीनतेने, या अधिनियमाखाली किंवा शहराच्या महानगरपालिका शासनासंबंधीच्या पूर्वीच्या कोणत्याही अधिनियमाखाली किंवा मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ याखाली किंवा मुंबई शहर सुधारणा विश्वस्त व्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ याखाली काढलेल्या ऋणपत्रावर आपला हक्क आहे. असा दावा सांगणाऱ्या व्यक्तीस, आयुक्ताकडे अर्ज केल्यानंतर, आणि आपला दावा न्याय्य असल्याविषयी आयुक्ताची खात्री पटवून दिल्यानंतर आणि आयुक्त विहित करील अशा रीतीने, पोचपावती दिलेले ऋणपत्र तिने सुपूर्द केल्यानंतर आणि आयुक्त विहित करील अशी फी दिल्यानंतर, अर्जदार व्यक्तीस नवीकरण केलेले व तिला रक्कम प्रदेय असलेले ऋणपत्र मिळवता येईल.

१८९८ चा मुंबई ४. १९२५ चा मुंबई १६.

हक्कांविषयी विवाद असेल त्याबाबतीत ऋणपत्रांचे नवीकरण.

**११०अब.** (१) या अधिनियमाखाली किंवा शहराच्या महानगरपालिका शासनासंबंधीच्या पूर्वीच्या कोणत्याही अधिनियमाखाली किंवा मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ याखाली किंवा शहर सुधारणा विश्वस्त व्यवस्था सुधारणा अधिनियम, १९२५ याखाली काढलेल्या ज्या ऋणपत्राचे नवीकरण करण्याविषयी अर्ज करण्यात आला असेल त्या बाबतीत जर त्याच्या हक्काविषयी विविद असेल तर आयुक्त—

१८९८ चा मुंबई ४. १९२५ चा मुंबई १६.

(अ) विवादातील कोणत्याही पक्षकाराने त्याचा अशा ऋणपत्रावर हक्क आहे असा अंतिम निर्णय सक्षम अधिकारिता असलेल्या न्यायालयाकडून मिळवला असेल त्या बाबतीत अशा पक्षकाराच्या प्रीत्यर्थ नवीकरण केलेले ऋणपत्र देऊ शकेल ; अथवा

(ब) असा निर्णय मिळवण्यात येईपर्यंत, ऋणपत्राचे नवीकरण करण्याचे नाकारू शकेल ; अथवा

(क) यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे चौकशी केल्यानंतर व अशा चौकशीतून निष्पन्न झालेल्या गोष्टीचा विचार केल्यानंतर, लेखी आदेश देऊन त्याद्वारे, त्याच्या मते अशा पक्षकारांपैकी कोणत्या पक्षकाराचा अशा ऋणपत्रावर हक्क आहे हे घोषित करता येईल ; तसेच तो अशा घोषणेच्या तारखेपासून तीन महिने संपल्यानंतर, कलम ११०अअ च्या तरतुदींस अनुसरून अशा पक्षकाराच्या प्रीत्यर्थ नवीकरण केलेले ऋणपत्र देऊ शकेल ; मात्र कोणत्याही व्यक्तीने अशा ऋणपत्रावर आपला हक्क प्रस्थापित करण्याकरिता सक्षम अधिकारिता असलेल्या न्यायालयात कार्यवाही दाखल केली आहे अशी नोटीस अशा कालावधीत त्याला मिळाली असेल तर त्याने अशा ऋणपत्राचे नवीकरण करता कामा नये.

**स्पष्टीकरण.—** या पोट-कलमाच्या प्रयोजनांकरिता " अंतिम निर्णय " म्हणजे ज्यावर अपील करता येत नाही असा निर्णय किंवा ज्यावर अपील करता येते परंतु कायद्याने परवानगी दिलेल्या मुदतमर्यादेच्या आत ज्यावर अपील करण्यात आले नसेल असा निर्णय.

(२) पोट-कलम (१) मध्ये निर्देश केलेल्या चौकशीच्या प्रयोजनांकरिता आयुक्तांस, पक्षकार दाखल करतील असा सर्व साक्षीपुराव्याची किंवा त्यापैकी काही साक्षीपुराव्याची स्वतः नोंद करता येईल किंवा त्याची नोंद करण्याविषयी किंवा करून घेण्याविषयी, तो, जिल्हा दंडाधिकाऱ्यास विनंती करू शकेल. ज्या जिल्हा दंडाधिकाऱ्यास अशी विनंती करण्यात आली असेल त्यास अशा साक्षीपुराव्याची स्वतः नोंद करता येईल किंवा त्याच्या अधिन असलेल्या कोणत्याही दंडाधिकाऱ्यास त्याची नोंद करण्याविषयी निदेश देता येईल. असा जिल्हा दंडाधिकारी अशा साक्षीपुराव्याचे कागदपत्र आयुक्ताकडे अग्रेषित करील.

---

[1] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम १३ अन्वये कलमे ११०अअ ते ११० अई समाविष्ट करण्यात आली.

(३) आयुक्तास किंवा या कलमाखाली काम करणाऱ्या कोणत्याही दंडाधिकाऱ्यास तसे करणे योग्य वाटल्यास, शपथेवरील साक्षीपुरावा घेऊन त्यांची नोंद करता येईल.

नवीकरण करण्यात आलेल्या ऋणपत्रासंबंधीचे दायित्व.

**११०अक.** (१) जेव्हा कोणत्याही व्यक्तीच्या प्रीत्यर्थ कलम ११०अअ खाली नवीकरण केलेले ऋणपत्र देण्यात आले असेल तेव्हा, अशा रीतीने दिलेले ऋणपत्र हे, महानगरपालिका व अशी व्यक्ती व त्यानंतर तिच्यामार्फत हक्क मिळणाऱ्या सर्व व्यक्ती यांच्या दरम्यान झालेली एक नवीन संविदा असल्याचे मानले जाईल.

(२) ऋणपत्राचे अशा रीतीने नवीकरण केल्यामुळे, अशा नवीकरण केलेल्या ऋणपत्रासंबंधी कोणत्याही इतर व्यक्तीचे महानगरपालिकेविरूद्ध जे कोणतेही अधिकार असतील त्यास बाध येणार नाही.

विवक्षित प्रकरणी दायित्वातून मुक्तता.

**११०अड.** कलम ११०अ खाली ऋणपत्राची प्रतिलिपी देण्यात आली असेल किंवा ११०अअ अथवा कलम ११०अब खाली नवीकरण केलेले ऋणपत्र देण्यात आले असेल किंवा ज्याच्या बाबतीत ऋणपत्राची प्रतिलिपी न देता मुद्दलाची रक्कम देण्याविषयी कलम ११०अ खाली आदेश देण्यात आला असेल त्या ऋणपत्राच्या मुद्दलाची रक्कम, ज्या तारखेस ती देय होत असेल त्या तारखेस किंवा त्या तारखेनंतर देण्यात आली असेल तेव्हा, यथास्थिति, ज्या ऋणपत्राऐवज त्याची प्रतिलिपी याप्रमाणे देण्यात आली असेल किंवा याप्रमाणे नवीकरण केलेले ऋणपत्र देण्यात आले असेल अशा ऋणपत्रासंबंधीच्या किंवा ज्या ऋणपत्राच्या बाबतीत अशी रक्कम देण्यात आली असेल अशा ऋणपत्रासंबंधीच्या सर्व दायित्वातून महानगरपालिकेची पुढे दिलेल्या कालावधीनंतर मुक्तता होईल :—

(अ) ऋणपत्राची प्रतिलिपी देण्यात आली असेल त्या बाबतीत, कलम ११०अ, पोट-कलम (३) मध्ये निर्देशिलेली अधिसूचना प्रसिद्ध झाल्याची तारीख किंवा मूळ ऋणपत्रावर शेवटी व्याज दिल्याची तारीख, या दोहोंपैकी जी नंतरची तारीख असेल त्या तारखेपासून सहा वर्ष लोटल्यानंतर ;

(ब) नवीकरण करून दिलेल्या ऋणपत्राच्या बाबतीत, ते देण्यात आल्याच्या तारखेपासून सहा वर्ष लोटल्यानंतर ; आणि

(क) ऋणपत्राची प्रतिलिपी न देता, मुद्दलाची रक्कम देण्यात आली असेल त्याबाबतीत, कलम ११०अ, पोट-कलम (३) मध्ये निर्देशिलेली अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेपासून सहा वर्ष लोटल्यानंतर.

हानिरक्षण.

**११०अई.** कलम ११०अअ किंवा ११० अब मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, त्या दोहोंपैकी कोणत्याही कलमाखाली उत्पन्न होणाऱ्या कोणत्याही बाबतीत, आयुक्तास,—

(१) मूळ ऋणपत्राखाली हक्क मागणी करणाऱ्या सर्व व्यक्तीचे जे हक्क असतील त्याबद्दल महानगरपालिकेच्या व आयुक्ताच्या प्रीत्यर्थ, आयुक्तास योग्य वाटेल असे हानिरक्षण मिळाल्यावर नवीकरण केलेले ऋणपत्र देता येईल ; अथवा

(२) असे हानिरक्षण देण्यात आले नसेल तर, नवीकरण केलेले ऋणपत्र देण्याचे नाकारता येईल.]

रोख्यांचे पैसे संयुक्तरीत्या मिळणाऱ्या व्यक्तींपैकी हयात असणाऱ्या व्यक्तींचा हक्क.

**११०ब.** (१) भारतीय संविदा अधिनियम, १८७२ याचे कलम ४५, यात काहीही अंतर्भूत असले तरी जेव्हा या अधिनियमाखाली, किंवा शहराच्या महानगरपालिका शासनासंबंधीच्या पूर्वीच्या कोणत्याही अधिनियमाखाली, [1][किंवा मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ याखाली किंवा मुंबई शहर सुधारणा विश्वस्त व्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ याखाली,] काढलेल्या कोणत्याही ऋणपत्राचे पैसे, दोन किंवा अधिक व्यक्तींना संयुक्तपणे देय असतील आणि त्यांच्यापैकी कोणीही एक मरण पावली असेल तर, त्या ऋणपत्राचे पैसे त्या व्यक्तीच्या मागे हयात असलेल्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना देण्यात येतील.

१८७२ चा ९. १८९८ चा मुंबई ४. १९२५ चा मुंबई १६.

(२) मयत व्यक्तीच्या मागे हयात असलेल्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना व मयत व्यक्तीस संयुक्तपणे ज्यांचे पासे देण्याजोगे असतील अशा ऋणपत्राच्या बाबतीत, मयत व्यक्तीच्या मागे ह्यात असलेल्या व्यक्तिविरुद्ध किंवा व्यक्तींविरुद्ध मयत व्यक्तींच्या प्रतिनिधीचा जो कोणताही मागणी हक्क असेल त्यास या कलमातील कोणत्याही तरतुदीमुळे बाध येणार नाही.

(३) ऋणपत्राचे किंवा रोख्याचे पैसे जिला संयुक्तपणे देय असतील त्या व्यतीचा मृत्यू, हे कलम अंमलात येण्यापूर्वी अगर त्यानंतर घडला असेल अगर घडेल तरीही हे कलम लागू होईल.

एक किंवा दोन अथवा अधिक संयुक्त धारकांचा पावती देण्याचा अधिकार.

**११०क.** भारतीय संविदा अधिनियम, १८७२ यांचे कलम ४५ यात काहीही अंतर्भूत असले तरी या अधिनियमाखाली किंवा शहराच्या महानगरपालिका शासनासंबंधीचा कोणताही पूर्वीचा अधिनियम, [1][किंवा मुंबई शहर सुधारणा आधिनियम, १८९८ याखाली किंवा मुंबई शहर सुधारणा विश्वस्त व्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ याखाली ] काढण्यात आलेले ऋणपत्र दोन किंवा अधिक व्यक्ती संयुक्तरीत्या धारण करीत असतील तेव्हा त्यांच्यापैकी कोणत्याही एका व्यक्तीला, अशा ऋणपत्रासंबंधात देय असलेले कोणत्याही व्याज किंवा लाभांश याबद्दल, धारकांपैकी कोणत्याही धारकाने आयुक्ताला त्याउलट नोटीस दिली नसेल तर परिणामक्षम पावती देता येईल.]

१८७२ चा ९. १८९८ चा मुंबई ४. १९२५ चा मुंबई १६.

सन १८९८ चा मुंबई अधिनियम ४ व सन १९२५ चा मुंबई अधिनियम १६ याखाली काढलेली ऋणपत्रे.

[2][**११०ड.** (१) मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ किंवा मुंबई शहर सुधारणा विश्वस्त व्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ याखाली मुंबई सुधारणा विश्वस्त मंडळाने काढलेले कोणतेही ऋणपत्र धारण करणाऱ्या व्यक्तीस, अशा ऋणपत्राच्या बदल्यात, महानगरपालिका वेळोवेळी निर्धारित करील अशा अटींवर महानगरपालिका, [3][प्रांतिक सरकारच्या] पूर्वसंमतीने विहित करील अशा इतर कोणत्याही नमुन्याप्रमाणे असलेले ऋणपत्र मिळू शकेल.

१८९८ चा मुंबई ४. १९२५ चा मुंबई १६.

(२) मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ किंवा मुंबई सुधारणा विश्वस्त व्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ याखाली काढलेल्या किंवा पोट-कलम (१) खाली महानगरपालिकेने काढलेल्या प्रत्येक ऋणपत्राचे—

१८९८ चा मुंबई ४. १९२५ चा मुंबई १६.

(अ) जर ते अनुसूची अअ मध्ये दिलेल्या नमुन्याप्रमाणे असेल तर पृष्ठांकन करून, आणि

(ब) जर ते इतर कोणत्याही नमुन्याप्रमाणे असेल तर त्यात नमूद केलेल्या रीतीने, हस्तांतरण करता येईल.

---

[1] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम २७ अन्वये कलमे ११०ड ते ११०ह समाविष्ट करण्यात आली.

[3] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये "सरकार" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

१८९८ चा मुंबई ४. १९२५ चा मुंबई १६.

(३) या कलमाखाली किंवा मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ याखाली किंवा मुंबई शहर सुधारणा विश्वस्त व्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५, याखाली काढलेल्या ऋणपत्रांच्या प्रतिभूतीवर घेतलेल्या पैशाच्या संबंधात दावा करण्याचे हक्क, अशी ऋणपत्रे त्या त्या वेळी धारण करणाऱ्या त्या धारकांमध्ये निहित असतील आणि अशा ऋणपत्रांतील काही ऋणपत्रे इतर ऋणपत्रांपेक्षा आधीच्या तारखेची आहेत या कारणास्तव त्यास कोणतेही अधिमान मिळणार नाही.

पुंजरोखा प्रमाणपत्रे देणे.

१८९८ चा मुंबई ४. १९२५ चा मुंबई १६.

**११०डड.** (१) [१][स्थायी समितीस] स्वविवेकानुसार या अधिनियमाच्या तरतुदीखाली किंवा शहराच्या महानगरपालिका शासनासंबंधीच्या पूर्वीच्या कोणत्याही अधिनियमाच्या तरतुदीखाली किंवा मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ याखाली किंवा मुंबई शहर सुधारणा विश्वस्तव्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ याखाली काढलेली कोणतीही ऋणपत्रे किंवा रोखे, ते काढतेवेळी किंवा परिचलनात असताना कोणत्याही वेळी अशी कोणतीही ऋणपत्रे किंवा रोखे विकत घेणाऱ्या किंवा ती धारण करणाऱ्या व्यक्तीने अर्ज केला असता, तिच्या स्वाधीन करण्याजोगी असतील अशा किंवा तिने धारण केलेली असतील अशा ऋणपत्रांच्या किंवा रोख्यांच्या बदल्यात, पुंजरोखा प्रमाणपत्राच्या स्वरुपाचे एक प्रमाणपत्र त्यास देता येईल. असे प्रमाणपत्र हे, अशी ऋणपत्रे किंवा रोखे ज्या कर्जासंबंधी असतील त्या कर्जासंबंधी असेल, तसेच असे प्रमाणपत्र, महानगरपालिका [२][प्रांतिक सरकारच्या] पूर्वसंमतीने वेळोवेळी निर्धारित करील अशा नमुन्याप्रमाणे असेल आणि अशी ऋणपत्रे किंवा रोखे यांवरील व्याज किंवा लाभांश याबाबतच्या सर्व तरतुदी शक्य होईल तेथवर पुंजरोखा प्रमाणपत्रावरील व्याजाच्या बाबतीतसुद्धा लागू होतील.

१८९८ चा मुंबई ४. १९२५ चा मुंबई १६.

[३][(१अ) मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ किंवा मुंबई शहर सुधारणा विश्वस्त व्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ याखाली काढलेले ऋणपत्र नसेल अशा ऋणपत्राचे नवीकरण करून देताना या अधिनियमाखाली दिलेले ऋणपत्र नसेल अशा इतर ऋणपत्राच्या किंवा इतर कोणत्याही रोख्याच्या बदल्यात पोट-कलम (१) खाली दिलेल्या पुंजरोखा प्रमाणपत्रात नमूद केलेली मुद्दलाची रक्कम व तिच्यावरील देय व्याज यांच्या फेडी दाखल जणू काही तितक्याच रकमेचे ऋणपत्र या अधिनियमाची अनुसूची क मध्ये दिलेल्या नमुन्यानुसार काढण्यात आले आहे असे समजून या अधिनियमाखाली जे कर बसवता येतात त्या सर्व करांचा प्रमाणशीर भाग गहाण ठेवून त्याच रीतीने व त्याच मर्यादेपर्यंत प्रतिभूती देण्यात आली आहे असे मानण्यात येईल.]

(२) पुंजरोखा प्रमाणपत्र धारणा करणाऱ्या व्यक्तीने अर्ज केला असता [४][स्थायी समिती] ज्या कर्जासंबंधी असे प्रमाणपत्र असेल त्या कर्जाच्या ऋणपत्रांत किंवा रोख्यांमध्ये ते बदलून देईल.

[५][(३) महानगरपालिकेस पुढील गोष्टी विहित करण्यासाठी वेळोवेळी नियम करता येतील किंवा अशा नियमांत फेरफार करता येईल किंवा ते विखंडित करता येतील :—

(अ) ज्या रकमांकरिता पुंजरोखा प्रमाणपत्रे देता येतील त्या रकमा ;

(ब) पुंजरोखा प्रमाणपत्रे देण्यासंबंधी घ्यावयाची फी ;

(क) पुंजरोखा धारण करणाऱ्या व्यक्तींची नोंदवही ज्या नमुन्यानुसार ठेवण्यात येईल तो नमुना ;

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४५(अ) अन्वये " महापौरासह परिषदेस " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये "सरकार " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२, कलम ६ अन्वये पोट-कलम (१अ) समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४५(ब) अन्वये " महापौरासह परिषद " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम १४ अन्वये ही पोट-कलमे जादा दाखल करण्यात आली.

(ड) पुंजरोखा धारण करणाऱ्या व्यक्तीस ज्या पद्धतीने व्याज द्यावयाचे, त्याची नोंद करावयाची आणि पोच घ्यावयाची ती पद्धत ;

(ई) पुंजरोखा हस्तांतरित करताना ज्या हस्तांतरण नमुन्याचा उपयोग करावयाचा तो नमुना, नियमानुसार कोणते उपचार पाळावयाचे ते आणि हस्तांतरणावर बसवावयाची फी ;

(फ) पुंजरोखे प्रमाणपत्र प्रतिलिपी ज्या परिस्थितीत व ज्या रीतीने देता येतील ती परिस्थिती व रीत व अशी कोणतीही प्रमाणपत्रे देण्याच्या बाबतीत बसवावयाची फी व मागणी करावयाचे हानिरक्षण ;

(ग) या कलमाचे उद्देश पार पाडण्यासाठी सर्वसाधारणपणे करावयाची उपाययोजना.

(४) कोणताही नियम किंवा नियमातील कोणताही फेरफार किंवा नियमांचे विखंडन हे, त्यास शासनाची मंजुरी मिळेतोपर्यंत व अशी मंजुरी **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध होईतोपर्यंत परिणामक असणार नाही आणि कोणताही नियम करण्यासंबंधी किंवा नियमात फेरफार करण्यासंबंधी किंवा तो विखंडित करण्यासंबंधी, शासनाने जी मंजुरी द्यावयाची ती, उक्त **राजपत्रात** लागोपाठ तीन आठवड्यापर्यंत त्या गोष्टी प्रसिद्ध करण्यात येईतोपर्यंत देण्यात येणार नाही.]

सन १८९८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४ व सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १६ यांखाली विश्वस्त मंडळाने उभारलेली कर्जे वगैरे यांसंबधी तरतुदी.

**११०ई.** मुंबई शहर नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९३३ हा अधिनियम अंमलात येण्यापूर्वी, मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ किंवा मुंबई शहर सुधारणा विश्वस्त व्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५, याखाली किंवा तदनुसार मुंबई शहर सुधारणा विश्वस्त मंडळाने उभारलेली सर्व कर्जे, स्थापना केलेले सर्व कर्जनिवारण निधी, काढलेली सर्व ऋणपत्रे किंवा इतर रोखे व घेतलेली सर्व ऋणे यांच्या बाबतीत पुढील तरतुदी लागू होतील :— १८९८ चा मुंबई ४. १९२५ चा मुंबई १६.

(एक) अशी कर्जे उभारण्यात आली असतील तेव्हा त्यांची फेड कर्जनिवारण निधीतून करावी अशी तरतूद करण्यात आलेली असेल तर महानगरपालिका अशा कर्जाची फेड करण्यासाठी कर्जनिवारण निधी स्थापन करील ; आणि ती कर्जे उभारण्यात आली असतील त्या वेळी ठरविण्यात आल्या असतील अशा रकमा, निश्चित करण्यात आल्या असतील अशा तारखांना कर्जेनिवारण निधीत भरील ;

(दोन) अशी कोणतीही कर्जे उभारण्यात आली असतील तेव्हा, त्यांची फेड, मुद्दल व व्याज यांच्या समान हप्त्यांनी किंवा मुद्दलाच्या समान हप्त्यांनी करावी अशी तरतूद करण्यात आली असेल तर, महानगरपालिका ती कर्जे उभारण्यात आली असतील त्यावेळी निश्चित करण्यात आलेले हप्ते, त्यावेळी निश्चित करण्यात आलेल्या तारखांना ठरविण्यात आलेल्या रीतीने देईल ;

(तीन) कलम १०९, खंड (फ) च्या तरतुदी, शक्य असेल तेथवर, अशा कर्जांच्या बाबतीत लागू असतील आणि उक्त खंडात जणू (अ) "वार्षिक" या शब्दांऐवजी "वार्षिक किंवा प्रत्येक सहामाही" हे शब्द दाखल केले असावेत व (ब) "ब [1][प्रांतिक सरकार] मंजूर करील अशा इतर रीतीने" हे शब्द गाळण्यात आले असावेत याप्रमाणे त्याचा अन्वय लावण्यात येईल.

(चार) कलम १०९, खंड (ग) याच्या तरतुदी, शक्य असेल तेथवर, अशा कर्जनिवारण निधीच्या बाबतीत लागू होतील आणि उक्त खंडात जणू "या कलमाखाली" या शब्दाऐवजी "मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ किंवा मुंबई शहर सुधारणा विश्वस्त व्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ या खाली" हे शब्द दाखल करण्यात आले असावेत याप्रमाणे त्याचा अन्वय लावण्यात येईल ; १८९८ चा मुंबई ४. १९२५ चा मुंबई १६.

---

[1] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये "सरकार" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

(पाच) कलम १०९, खंड (ह) याच्या तरतुदी (परंतुक वगळून) शक्य तेथवर लागू होतील व उक्त खंडात जणू काही " प्रत्येक वर्षी " या शब्दानंतर " किंवा प्रत्येक सहामाहीत " हे शब्द दाखल करण्यात आले असावेत व जणू काही " दुसऱ्या सहामाहीच्या " हे शब्द गाळण्यात आले असावेत त्याप्रमाणे त्याचा अन्वय लावण्यात येईल ;

(सहा) कलम १०९अ च्या तरतुदी, शक्य असेल तेथवर, अशा कर्जनिवारण निधीच्या बाबतीत लागू होतील ;

(सात) कलम ११०फ च्या तरतुदी अशा कर्जाच्या बाबतीत लागू होतील ;

१८९८ चा मुंबई ४. १९२५ चा मुंबई १६.

(आठ) कलम १०६ च्या तरतुदी, शक्य असेल तेथवर लागू होतील आणि अशा उक्त कलमात जणू काही " या अधिनियमाखाली काढलेले " या शब्दांऐवजी " या अधिनियमाखाली किंवा मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ किंवा मुंबई शहर सुधारणा विश्वस्तव्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ याखाली मुंबई शहर सुधारणा विश्वस्त मंडळाने काढलेले किंवा घेतलेले कोणतेही ऋण " हे शब्द दाखल करण्यात आले असावेत, याप्रमाणे त्यांचा अन्वय लावण्यात येईल ;

(नऊ) अशा कर्जांची परतफेड करण्यासाठी स्थापन केलेल्या कर्जनिवारण निधीत मुंबई शहर नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९३३, प्रवर्तनात येईल त्यावेळी अस्तित्वात असलेल्या मुंबई शहर सुधारणा विश्वस्त मंडळाने धारण केलेले सर्व रोखे व रोकड ही महानगरपालिकेकडे हस्तांतरित होईल आणि महानगरपालिका, खंड (एक) खाली स्थापन केलेल्या कर्जनिवारण निधीचा भाग म्हणून ती धारण करील.

(दहा) उक्त मुंबई शहर सुधारणा विश्वस्त मंडळाने काढलेले कोणतेही कर्ज फेडण्याच्या प्रयोजनासाठी पैसा कर्जाऊ घेण्यात आला असेल तेव्हा, याप्रमाणे काढलेले कर्ज फेडण्याची वेळ, मूळ कर्ज ज्या कालावधीसाठी मंजूर करण्यात आले असेल त्या कालावधीच्या उरलेल्या भागांशाहून अधिक असणार नाही ; आणि

(अकरा) शंकानिरसनासाठी या अन्वये घोषित करण्यात येत आहे की,—

१८९८ चा मुंबई ४. १९२५ चा मुंबई १६.

(अ) मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ व मुंबई शहर सुधारणा विश्वस्तव्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५, याखाली मुंबई सुधारणा विश्वस्त मंडळाने काढलेली सर्व कर्जे, स्थापन केलेले सर्व कर्जनिवारण निधी व घेतलेली सर्व ऋणे ही, त्यांची परतफेड, त्यांच्या व्याजाचा दर, कालावधी, दायित्वे पार पाडण्यासंबंधी हमी याबाबतीत व इतर सर्व बाबतीत, अशी कर्जे किंवा ऋणे ज्यावेळी काढण्यात किंवा घेण्यात आली आणि असे निधी स्थापन करण्यात आले त्यावेळी ज्या अटी व शर्ती उक्त मंडळाने निश्चित केल्या असतील किंवा पूर्वोक्त अधिनियमांन्वये किंवा त्याखाली ज्यांसंबंधी तरतूद करण्यात आली असेल त्याच अटी व शर्ती यांच्या अधीन असतील.

(ब) मुंबई शहर नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९३३ हा ज्या तारखेस अंमलात येईल त्या तारखेपूर्वी, या अधिनियमाच्या किंवा मुंबई शहराच्या महानगरपालिका शासनासंबंधी कोणत्याही अधिनियमाच्या तरतुदींखाली महानगरपालिकेने उभारलेली सर्व कर्जे, स्थापन केलेले सर्व कर्जनिवारण निधी किंवा घेतलेली सर्व ऋणे ही, त्यांची परतफेड, व्याजाचा दर, त्यांचा कालावधी, दायित्वे पार पाडण्यासंबंधीची हमी या बाबतीत व इतर सर्व बाबतीत, अशी कर्जे किंवा ऋणे ज्यावेळी उभारण्यात किंवा घेण्यात आली असतील व असे निधी

ज्यावेळी स्थापन करण्यात आले असतील त्यावेळी ज्या अटी व शर्ती ठरविण्यात आल्या असतील किंवा वर नमूद केलेल्या तारखेपूर्वी पूर्वोक्त अधिनियमांच्या तरतुदींखाली किंवा त्याखाली ज्यासंबंधी तरतूद करण्यात आली असेल त्या अटी व शर्ती यांच्या अधीन असतील :

परंतु, मुंबई शहर नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९३३ यातील अशी कर्जे, निधी व ऋणे यासंबंधीच्या कोणत्याही स्पष्ट तरतुदीस वरील खंड (अ) व (ब) यांतील कोणत्याही गोष्टीमुळे बाध येणार नाही.

महानगरपालिकेने व्याज देण्यात कसूर केली तर किंवा कर्ज निवारण निधीत भरावयाचा पैसा गुंतवला नाही तर अनुसरावयाची कार्यपद्धती.

**११०फ.** (१) जर महानगरपालिका—

(अ) मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ किंवा मुंबई शहर सुधारणा विश्वस्तव्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ याखाली मुंबई शहराच्या सुधारणेसाठी असलेल्या विश्वस्त मंडळाने जे कोणतेही कर्ज घेतले असेल व ज्याची परतफेड करण्यावर ११० ई कलमाखाली महानगरपालिकेचे दायित्व असेल अशा कोणत्याही कर्जासंबंधाने देणे असलेले कोणतेही व्याज देण्यात कसूर करील तर ;

१८९८ चा मुंबई ४.
१९२५ चा मुंबई १६.

(ब) कलम ११० ई खाली जी रक्कम देणे किंवा निराळी काढून गुंतविणे आवश्यक असेल किंवा उक्त अधिनियमांच्या तरतुदींखाली जी रक्कम देणे किंवा निराळी काढून गुंतविणे उक्त मंडळास आवश्यक होते अशी कोणतीही रक्कम देण्यात किंवा निराळी काढून गुंतविण्यात कसूर करील तर ;

महाराष्ट्राचे महालेखापाल हे उक्त तरतुदींखाली किंवा उक्त अधिनियमांखाली जी रक्कम निराळी काढून ठेवण्यात व गुंतविण्यास पाहिजे होती ती रक्कम चुकती करतील किंवा निराळी काढून गुंतवतील ; आणि आयुक्त, याप्रमाणे दिलेल्या किंवा गुंतविलेल्या रकमेइतकी रक्कम उक्त महालेखापालास नगरपालिका निधीतून ताबडतोब देईल ; आणि ती रक्कम याप्रमाणे देण्यात न आल्यास [१][ प्रांतिक सरकारला ], उक्त रक्कम भरण्यास पुरेशी इतकी महानगरपालिकेची भाड्याची रक्कम व इतर प्राप्तीची रक्कम जप्त करता येईल आणि लागोलाग कलम ९९, पोट-कलमे (२) व (३) यांच्या तरतुदी, आवश्यक त्या सर्व फेरफारांनिशी लागू होतील असे मानले जाईल.

(२) महानगरपालिकेस, [१][ [२][ राज्य ] शासनाच्या ] पूर्वमंजुरीने पूर्वोक्तप्रमाणे आयुक्ताने दिलेली रक्कम महानगरपालिका निधीत परत भरण्यासाठी पुरेसा होईल असा कोणताही विशेष कर बसवता यईल. असा विशेष कर हा, या अधिनियमाखाली वेळीवेळी बसवता येतील अशा करांपैकी कोणत्याही करच्या भरीला असेल ;

[३][परंतु, [४][ संविधानाखाली ] [२][ राज्य ] विधानमंडळास [२][ राज्यात ] जो कोणताही कर बसविणे शक्य नाही असा कर बसवण्याचा प्राधिकार या पोटकलमातील कोणत्याही तरतुदीमुळे मिळणार नाही. ]

---

[१] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये "सरकार" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये मूळ परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल करण्यात आले.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट, १९३५" या शब्दांऐवजी व आकड्यांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

**११०ग.** कलम ११०फ अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे आयुक्ताने पैसा भरण्यात कसूर केल्यास [१][ [२][ राज्य ] शासनास ] महानगरपालिका निधीचा किंवा महानगरपालिकेस बसविता यईल अशा कोणत्याही कराचा किंवा कलम ११०फ, याचे पोट-कलम (२) खाली बसवता येईल अशा कोणत्याही विशेष कराचा जेवढा भाग असा पैसा भरून काढण्यासाठी पुरेसा होण्यासाठी अंदाजे ठरविता येईल तेथवर तो जप्त करता येईल, आणि लागोलाग कलम ९९, पोट-कलमे (२) व (३) यांतील तरतुदी सर्व फेरफारांनिशी लागू होतील असे मानले जाईल : आयुक्ताने कसूर केल्यास अनुसरावयाची कार्यपद्धती.

परंतु, कलम ११०फ च्या पोट-कलम (२) खाली बसविता येईल असा विशेष कर [१][ [२][ राज्य ] शासनाने ] जप्त करण्यापूर्वी उक्त कर बसवण्याविषयी [१][ [२][ राज्य ] शासन ] महानगरपालिकेस फर्मावू शकेल.

**११०ह.** कलम ११०फ, पोट-कलम (४) याखाली द्यावयाच्या व कलम ११०ग खाली वसूल केलेल्या सर्व रकमा महानगरपालिकेच्या मालमत्तेवरील भार म्हणून असतील.] विवक्षित रकमा या महानगरपालिकेच्या मालमत्तेवरील भार म्हणून असणे.

## प्रकरण सात

## महसूल व खर्च

### महानगरपालिका निधी

**१११.** [३][ कलमे [४][ [१] ११९अ, ११९ब ] १२०, १२०अ व ४६०झेड ] यांच्या तरतुदींच्या अधीनतेने हा अधिनियम किंवा त्या त्या वेळी अंमलात आलेली कोणतीही इतर अधिनियमिती, यांच्या ततुदींखाली किंवा कोणत्याही संविदेखाली महानगरपालिकेस किंवा महानगरपालिकेच्या वतीने मिळालेला सर्व पैसा ; महानगरपालिका निधीची रचना.

महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने मालमत्तेची विल्हेवाट केल्यावर मिळालेल्या सर्व रकमा ;

महानगरपालिकेच्या कोणत्याही मालमत्तेपासून उपार्जित होणाऱ्या भाड्याच्या सर्व रकमा ;

या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता कोणताही कर बसवून उभारलेला सर्व पैसा ;

या अधिनियमाखाली किंवा त्याखाली अंमलात असलेला कोणताही नियम, विनियम किंवा उपविधि याखाली देय असलेल्या व वसूल केलेल्या [५][ न्यायालयाने बसविलेल्या दंडाहून अन्य ] फीच्या व दंडाच्या रकमा ;

---

[१] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये "सरकार" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम २१ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ८ अन्वये हे आकडे व ही अक्षरे समाविष्ट करण्यात आली.

[५] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१][ मुंबई पोलीस वाहन अधिनियम, १९२०] याखाली पोलीस आयुक्ताने सार्वजनिक वाहनांसाठी दिलेल्या लायसनच्या [२][ सर्व फीमधून सर्व आवश्यक आकस्मिक खर्च वजा जाता तिची शिल्लक राहिलेली रक्कम ; ] १९२० चा मुंबई ७.

[३][ मुंबई शहर पोलीस अधिनियम, १९०२ याचे कलम २२, खंड (फ) परिच्छेद (दोन) याखाली सडकांवर आणि सार्वजनिक जागी संगीत वाजविण्यासाठी मंजूर केलेल्या लायसनच्या सर्व फीमधून सर्व आवश्यक आकस्मिक खर्च वजा जाता, तिची शिल्लक राहिलेली रक्कम ; ] १९०२ चा मुंबई ४.

[४] * * * * * * *

[५][ कोणत्याही शासनाकडून] किंवा खाजगी व्यक्तीकडून अनुदान किंवा दान किंवा अनामत म्हणून महानगरपालिकेस किंवा महानगरपालिकेच्या वतीने मिळालेला सर्व पैसा, आणि

[६][ कलम ३५४ डब्ल्यू, [७][ ३५४ डब्ल्यू अ किंवा ३५४ डब्ल्यू ब] याखाली दिलेल्या कर्जाची रक्कम धरून ] महानगरपालिकेच्या मालकीचा कोणताही पैसा गुंतवल्यामुळे किंवा अशा पैशासंबधी कोणताही व्यवहार केल्यामुळे मिळणाऱ्या व्याजाच्या व नफ्याच्या सर्व रकमा,

" महानगरपालिका निधी " म्हणून संबोधण्यात येणाऱ्या निधीच्या खाती जमा करण्यात येतील. आणि महानगरपालिका असा निधी या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता यात, असलेल्या तरतुदींच्या अधीनतेने विश्वस्त व्यवस्थेच्या स्वरूपात धारण करील :

[८] * * * * * * *

राज्य शासनाने करमणूक शुल्काच्या उत्पन्नामधून वार्षिक अनुदान देणे.

[९][ **१११अ.** राज्य शासनास, याबाबतीत रीतसर केलेल्या विनियोजनाद्वारे, दरवर्षी मुंबई करमणूक शुल्क अधिनियम, १९२३ खाली त्याने [१०][बृहन्मुंबईत] बसविलेल्या व गोळा केलेल्या करमणूक शुल्काचे उत्पन्न लक्षात घेऊन, ते वेळोवेळी निर्धारित करील एवढ्या रकमेचे अनुदान महानगरपालिकेस देता येईल. असे अनुदान राज्य शासन वेळोवेळी निर्धारित करील अशा रीतीने आणि अशा अटी व शर्ती यांच्या अधीनतेने देण्यात येईल. महानगरपालिकेस अशा अनुदानांच्या रूपाने मिळणारी सर्व रक्कम महानगरपालिका निधीमध्ये जमा करण्यात येईल. ] १९२३ चा मुंबई १.

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम १५ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९०७ चाा मुंबई अधिनियम क्रमांक ३, कलम १६(अ) अन्वये " फीच्या सर्व रकमा " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १६ (ब) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[४] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " हा अधिनियम किंवा या अधिनियमाखाली केलेला कोणताही विनियम किंवा उपविधी यांच्या तरतुदींविरुद्ध केलेल्या कोणत्याही गुन्ह्याच्या संबंधात कोणत्याही दंडाधिकाऱ्याने बसवलेल्या दंडाच्या रकमामधून कलम ५१३ अ च्या पोटकलम (३) मध्ये निर्दिष्ट केलेले सर्व खर्च वजा जाता शिल्लक राहिलेली रक्कम " हा मजकूर वगळण्यात आला.

[५] वरील आदेशान्वये " शासनाकडून " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[६] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २८ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] सन १९७४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम ४ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[८] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम २१ अन्वये हे परंतुक वगळण्यात आले.

[९] सन १९७५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६३, कलम ३ अन्वये कलम १११ अ समाविष्ट करण्यात आले.

[१०] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][ परंतु, राज्य शासन, राज्य शासनास किंवा कोणत्याही शासकीय महामंडळास, शासकीय कंपनीस किंवा महाराष्ट्र शासनाने रचना केलेल्या इतर कोणत्याही वैधानिक प्राधिकरणास येणे असलेली कोणतीही रक्कम,—

(अ) राज्य शासनाने दिलेल्या अनुदानांमधून, किंवा

(ब) सहायक अनुदान दर्शविणाऱ्या किंवा वित्त आयोगाच्या शिफारशींवरून राज्य शासनाने बसवलेले कर, शुल्क, पथकर आणि फी यांच्या निव्वळ उत्पन्नातील महानगरपालिकेचा हिस्सा दर्शविणाऱ्या कोणत्याही रकमेतून—

कापून घेण्यास सक्षण असेल :

परंतु, आणखी असे की, अशा प्रकारची वजात करण्यापूर्वी त्याबाबतचे महानगरपालिकेचे म्हणणे शासन विचारात घेईल.]

आयुक्ताने महानगरपालिका निधीसाठी प्रदाने स्वीकारणे व ती बँकेत ठेवणे.

**११२.** महानगरपालिका निधीच्या खाती प्रदान करावयाचा सर्व पैसा आयुक्त स्वीकारील व तो [२][ भारतीय स्टेट बँक अधिनियम, १९५५ खाली रचना करण्यात आलेल्या भारतीय स्टेट बँकेमध्ये किंवा बँक व्यवसायी कंपनी (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९७० याच्या पहिल्या अनुसूचीत किंवा बँक व्यवसायी कंपनी (उपक्रमांचे संपादन व हस्तांतरण) अधिनियम, १९८० याच्या पहिल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही तत्सम नवीन बँकेमध्ये ] [३][ बृहन्मुंबई ] च्या महानगरपालिका निधि खाते या नावाच्या खाती ताबडतोब भरील.

१९५५ चा ८३. १९७० चा ५, १९८० चा ४०.

[४] * * * * * * *

निधीतून पैसे कसे काढावे.

[५][ **११३.** (१) पुढे विनिर्दिष्ट केलेल्या रीतीनुसार दोन व्यक्तींनी धनादेशावर सह्या केलेल्या असल्याखेरीज एरव्ही, कलम ५२० च्या तरतुदींच्या अधीनतेने, पूर्वोक्त बँकेने महानगरपालिका निधीतून कोणतेही पैसे देता कामा नयेत,—

[६][ (अ) आयुक्त, अपर आयुक्त, संचालक किंवा उप आयुक्त [७][ किंवा या सर्वांच्या अनुपस्थितीमध्ये, [८][ स्थायी समितीने ] प्राधिकृत केला असेल असा महानगरपालिका अधिकारी यांनी ; आणि

(ब) महानगरपालिका मुख्य लेखापाल, महानगरपालिका अप्पर मुख्य लेखापाल, महानगरपालिका सहमुख्य लेखापाल किंवा उप लेखापाल यांनी :]

परंतु, [९][ एक लाख रुपयांपेक्षा ] अधिक नसेल अशा रकमेच्या कोणत्याही धनादेशावर मुख्य लेखापालाने किंवा उप लेखापालाने सही केलेली असेल तर त्याची रक्कम उक्त बँकेने निधिमधून देण्यास तो प्राधिकार पुरेसा होईल.

---

[१] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ३९, अन्वये ही परंतुके जमा दाखल करण्यात आली.

[२] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १८(अ) अन्वये " बँक ऑफ बॉम्बेमध्ये " या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१)४(१) अन्वये " ग्रेटर बॉम्बे " याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १८(ब) अन्वये परंतुक वगळण्यात आले.

[५] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९, कलम ९ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम ११३ दाखल करण्यात आले.

[६] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम १९(अ) अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (अ) व (ब) दाखल करण्यात आले.

[७] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, याच्या कलम ३(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात करण्यात आला.

[८] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, याच्या कलम ४६ अन्वये " महापौरासह परिषद " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, याच्या कलम ३(ब) अन्वये " दहा हजार रुपयांपेक्षा " या मजकुराऐवजी हा मजकुर दाखल करण्यात आला.

(२) शंभर रुपये (किंवा [१][ स्थायी समिती ] सर्वसाधारणपणे किंवा विशिष्ट वर्गाच्या रकमा देण्याकरिता वेळोवेळी निश्चित करील अशी अधिक रक्कम) यापेक्षा अधिक असेल अशी कोणतीही रक्कम महानगरपालिकेने द्यावयाची असेल तेव्हा ती रक्कम पूर्वोक्तप्रमाणे सही केलेल्या धनादेशाद्वारे देण्यात येईल—इतर कोणत्याही प्रकारे नव्हे.

(३) पोट-कलम (२) च्या कक्षेत न येणारी प्रदाने, आयुक्त रोख रकमेत देऊ शकेल किंवा प्रत्येकी पाच हजार रुपयांपेक्षा (किंवा [१][ स्थायी समिती ] वळोवेळी निश्चित करील अशा त्याहून अधिक रकमेपेक्षा) अधिक नसलेल्या रकमेच्या, पूर्वोक्तप्रमाणे सही केलेल्या व अशा प्रदानासाठी वेळोवेळी काढलेल्या धनादेशाद्वारे देऊ शकेल.]

सोईस्कर असेल तेव्हा महानगरपालिका निधीचा भागांश मुंबईबाहेरील बँकेत किंवा एजन्सीकडे ठेव म्हणून ठेवता येईल.

**११४.** निकटपूर्ववर्ती दोन कलमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, आयुक्तास, [१][स्थायी समितीच्या] वेळोवेळी घेतलेल्या [२][पूर्व] मान्यतेने, महानगरपालिका निधीचा कोणत्याही भागांश शहराबाहेरील कोणत्याही जागी असलेल्या व जिथे ठेव म्हणून पैसे ठेवणे महानगरपालिकेस इष्ट वाटत असेल अशा बँकेत किंवा इतर एजन्सीकडे वेळोवेळी पाठविता येईल आणि महानगरपालिका निधीच्या खाती भरावयाचा किंवा त्यातून द्यावयाचा जो कोणताही पैसा अशा कोणत्याही बँकेत किंवा एजन्सीकडे असलेल्या महानगरपालिकेच्या खाती आयुक्ताच्या मते अतिशय सोईस्करपणे भरता येईल किंवा त्यातून देता येईल, तो अशा रीतीने भरता येईल किंवा देता येईल.

अर्थसंकल्पीय अनुदानात अंतर्भूत होणाऱ्या रकमाच फक्त महानगरपालिका निधीतून खर्च करणे.

**११५.** (१) यात यापुढे जी तरतूद केली असेल ती खेरीज करून, एरव्ही, खर्च करावयाची कोणतीही रक्कम चालू अर्थसंकल्पीय अनुदानात समाविष्ट नसेल तर आणि अर्थसंकल्पीय अनुदानापैकी पुरेशी शिल्लक रक्कम त्यावेळी उपलब्ध नसेल तर, अशा अनुदानामध्ये कलम १३३ किंवा कलम १३४ याखाली कोणत्याही प्रकारे कपात करण्यात आलेली असली किंवा ती एका सदरातून काढून दुसऱ्या सदरात बदली करण्यात आली असली तरीही आयुक्ताने अशी रक्कम महानगरपालिका निधीतून देता कामा नये.

अपवाद.

(२) परंतु, या मनाईला पुढील बाबींचा अपवाद असेल :—

(अ) ज्या रकमा खर्च करण्यासाठी कलम १३२ खाली [३][स्थायी समितीने] मंजुरी दिली असेल त्या रकमा;

(ब) सार्वजनिक सेवेसाठी जी कामे निकडीने करणे आवश्यक असेल त्यासाठी कलम ११९ खाली तात्पुरत्या दिलेल्या रकमा;

(क) आयुक्तास या अधिनियमान्वये किंवा त्याखाली करांचे किंवा इतर रकमांचे जे परतावे देण्यास प्राधिकार दिलेला असेल ते परतावे;

(ड) कंत्राटदारांच्या किंवा इतर व्यक्तींच्या अनामत म्हणून ठेवलेल्या ज्या रकमांची परतफेड करावयाची असेल त्या रकमा, तसेच महानगरपालिका निधीत चुकीने जमा केलेल्या किंवा भरलेल्या ज्या रकमा परत करावयाच्या असतील त्या रकमा;

(ई) कलम २२२, पोटकलम (३), ३०९, पोटकलम (२), ३१५, पोटकलम, (२), ३३४, पोटकलम (२), ३९५, पोटकलम (२), ४२६, पोटकलम (२), ४२७, पोटकलम (४), ५०१, व ५१५, खंड (ब) यांअन्वये ज्या रकमा भरपाईदाखल देणे आयुक्तास भाग असेल किंवा देण्याचे अधिकार असतील त्या रकमा;

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४६ अन्वये "महापौरासह परिषदेच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम ९ अन्वये हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४८(अ) हा मजकूर दाखल करण्यात आला.

(फ) कलम ११८, खंड (फ) मध्ये नमूद केलेल्या परिस्थितींपैकी कोणत्याही परिस्थितीत द्यावयाच्या रकमा;

(ग) आयुक्ताने, कलम ४३४ अन्वये त्याला प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून खर्च केलेल्या रकमा;

(ह) आयुक्ताने कलम ६४, [१][पोटकलम (३), खंड (क) किंवा खंड (ड)] खाली केलेला परिव्यय :

[२][परंतु आणखी असे की, ज्या बाबतीत पैशाची निकडीने गरज भासेल त्या बाबतीत, आणि महानगरपालिकेकडे [३][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीने] अभिवेदन सादर केल्यानंतर महानगरपालिकेस, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने (अशी पूर्वमंजुरी रकमेची परतफेड आणि इतर गोष्टी यासंबंधात त्या शासनास योग्य वाटतील अशा अटींच्या व शर्तींच्या अधीनतेने देता येईल), महानगरपालिका निधीतून अशी निकड भागविण्यासाठी तात्पुरती आगाऊ रक्कम म्हणून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी रक्कम [४][बृहन्मुंबई वीजपुवठा आणि परिवहन निधीस] देण्यासाठी आयुक्तास प्राधिकृत करता येईल.]

(३) पोटकलम (१) मध्ये, "अर्थसंकल्पीय अनुदान" म्हणजे कलम १३० मध्ये व्याख्या केलेल्या त्या संज्ञेच्या अर्थांतर्गत अर्थसंकल्पीय अनुदान असा आहे आणि त्यात कलम १३३, [५][पोट-कलम (१)] खाली खातेबदल केल्यामुळे ज्या कोणत्याही रकमेने असे अर्थसंकल्पीय अनुदान वाढेल त्या रकमेचा समावेश होतो.

महानगरपालिका निधीवरील धनाकर्ष [७][महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांनी] तपासणे.

**११६.** ज्या रकमेकरिता धनादेश देण्यात आला असेल ती रक्कम पूर्वोक्तप्रमाणे अर्थसंकल्पीय अनुदानात समाविष्ट आहे किंवा ते निकट पूर्ववर्ती कलमाचे पोटकलम (२) यात नमूद केलेल्या अपवादभूत बाबींपैकी एका बाबीखाली येणारी आहे याविषयी स्थायी समितीच्या सदस्यांनी [६]* * * * स्वतःची प्रथम खात्री करून घेतल्यावाचून त्यांनी कलम ११३ खाली अशा धनादेशावर सही करता कामा नये.

अर्थसंकल्पीय अनुदानामध्ये समाविष्ट नसलेली रक्कम कलमे ११५,, खंड (ई), (फ), (ग) किंवा (ह) खाली खर्च करण्यात येईल तेव्हा अनुसरावयाची कार्यपद्धती.

**११७.** आयुक्ताने, कलम ११५ [८][पोटकलम (२)], खंड (ई), (फ), (ग) किंवा (ह) खाली कोणतीही रक्कम खर्च केली असेल तेव्हा तेव्हा तो, ज्या परिस्थितीत त्याने ती रक्कम खर्च केली असेल ती परिस्थिती [९][स्थायी समितीला] ताबडतोब कळवील. स्थायी समिती जादा खर्चाची रक्कम मंजूर करून घेण्यासाठी परिस्थितीअनुसार शल्य व इष्ट वाटेल अशी उपाययोजना कलम १३३, [८][पोट-कलम (२)] खाली करील अथवा कलम १३१ खाली किंवा कलम १३३, [५][पोट-कलम (१) खाली] अशी उपाययोजना करण्याची महानगरपालिकेस शिफारस करील.

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम २२ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम २ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४८(ब) अन्वये "महापौरासह परिषदेने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, याच्या कलम २ अनुसूची (१)४(५)अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम १५ अन्वये "खंड (ब)" या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२, कलम ८ अन्वये "आणि महानगरपालिका सचिवाने" हा मजकूर वगळण्यात आला.

[७] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ६१ अन्वये "स्थायी समितीच्या सदस्यांनी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम १६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[९] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४९ अन्वये "महापौरासह परिषदा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

ज्यासाठी महानगरपालिका निधीचा विनियोग करावयाचा ते प्रयोजन.

**११८.** महानगरपालिका निधीत वेळोवेळी जमा झालेल्या रकमांचे उपयोजन, कलमे ६१,६२ [१][६२ ड,] [२][६२ ई ] व ६३ यांमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांकरिता किंवा अन्यथा या अधिनियमांची अंमलबजावणी करण्याकरिता आवश्यक असतील अशा अथवा या अधिनियमाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीखाली ज्या देण्याबद्दल रीतसर निदेश देण्यात आला असेल किवा मंजुरी देण्यात आली असेल अशा, सर्व रकमा, आकार व परिव्यय देण्यासाठी करण्यात येईल. त्यात पुढील खर्चाचा समावेश होईल :—

(अ) या अधिनियमाखाली घेण्यात आलेल्या प्रत्येक प्रभाग-निवडणुकीचा [३]* * * खर्च ;

[४][(ब) [५][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] प्रयोजनाहून अन्य अशा या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनाकरिता [६][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन निधीतून] दिलेल्या रकमा, तसेच अशा कोणत्याही प्रयोजनांकरिता महाव्यवस्थापकाने पुरविलेल्या सर्व मालाबद्दल व पुरवलेल्या सर्व सेवांबद्दल [६][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन निधीतून] आकारलेला खर्च किंवा वाजवी आकार याच्या रकमांची परतफेड करण्याकरिता उक्त निधीमध्ये भरावयाच्या रकमा;]

(क) या अधिनियमाखाली नेमलेला आयुक्त [७][,संचालक] आणि कोणताही उप आयुक्त [८][आणि महानगरपालिकेच्या विनंतीवरून ज्याच्या सेवा [९][ [१०][राज्य] शासन]महानगरपालिकेच्या स्वाधीन ठेवील असा कोणताही अधिकारी] यांची वेतने, [११][पदग्रहण अवधि भत्ते ] आणि इतर भत्ते;

(ड) या अधिनियमाच्या तरतुदीखाली किंवा या अधिनियमाखाली तयार केलेली व त्या त्यावेळी अंमलात असलेली कोणतीही अनुसूची किंवा विनियम यांच्या तरतुदींखाली सर्व महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांना द्यावयाची वेतने व इतर भत्ते आणि [१२][भविष्यनिर्वाह निधीसाठी द्यावयाची सर्व अंशदाने, ] निवृत्तिवेतन, उपदाने व अनुकंपा भत्ते [१३][आणि नगरपालिका अधिकारी व सेवक यांच्या उपरोक्त भविष्यनिर्वाह निधीतील संचित रकमांवर, राज्य शासन, आपल्या स्वतःच्या कर्मचाऱ्यांच्या अशा संचित रकमांवर, वेळोवेळी व्याजाचा जो दर मंजूर करील त्या दराने व्याज];

[१४][(डड) महानगरपालिका प्रशासनातील कोणत्याही विभागातील कोणत्याही पदावर कोणतीही नेमणूक करण्याच्या संबंधात आयोगाशी विचारविनिमय केल्याबद्दल आयोगाला द्यावयाची फी व परिव्यय;]

---

[१] सन १९०७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३, कलम १७ अन्वये "६२-ड" हे आकडे व अक्षर समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ३ अन्वये "६२-ई" हे आकडे व अक्षर समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२, कलम ९ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[४] १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम २३ अन्वये खंड (ब) समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, याच्या कलम २ अनुसूची (१) ४ (३) अन्वये "मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या अनुसूची (१) ४ (५) अन्वये "मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम १६(अ) अन्वये हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

[८] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ८(ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[९] भारतीय विधि अनुकूलन आदेशान्वये "सरकार" या शब्दांऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[१०] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[११] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ८(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१२] सन १९२२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम ३० अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[१३] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[१४] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ५३ अन्वये खंड (डड) समाविष्ट करण्यात आला.

(ई) आयुक्ताने, या अधिनियमान्वये त्यास प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकारांचा वापर करताना किंवा त्याच्यावर सोपवलेले कोणतेही कर्तव्य बजाविताना केलेला सर्व खर्च व परिव्यय यात भरपाईबद्दल जी रक्कम देण्याबाबत त्यास फर्मावण्यात आले असेल किंवा जी रक्कम देण्याचा अधिकार त्यास प्रदान केलेला असेल त्या रकमेचाही समावेश होतो ;

[१][(ईई) कलम ३५४डब्ल्यू, [२][३५४डब्ल्यू अ, ३५४डब्ल्यू ब, किंवा ३५४डब्ल्यू बब] यांच्या तरतुदीस अनुसरून दिलेली, कर्जे;]

(फ) (एक) [३][कलम ११०फ, पोट-कलम(१)], [४][कलम ५१३अ, आणि], ५२०, पोट-कलम (१) खाली [५][[६][राज्य] शासनास]द्यावयाची प्रत्येक रक्कम ;

(दोन) दिवाणी किंवा फौजदारी न्यायालयाने महानगरपालिकेविरुद्ध किंवा आयुक्ताविरुद्ध, [७][संचालकांविरुद्ध] किंवा पदसिद्ध उप आयुक्ताविरुद्ध दिलेल्या हुकूमनाम्याखाली किंवा आदेशाखाली द्यावयाची प्रत्येक रक्कम ;

(तीन) कलम ५१७ खाली केलेल्या कोणत्याही दाव्याच्या किंवा कायदेविषयक कार्यवाहीच्या किंवा हक्कमागणीच्या तडजोडीअनुसार द्यावयाची प्रत्येक रक्कम.

महानगरपालिका निधी कोठे खर्च करावा.

[८][**११८अ.** महानगरपालिका निधीतून महानगरपालिकेने करावयाचा खर्च हा, या अधिनियमाअन्वये अन्यथा जी तरतूद केली असेल ती खेरीजकरून एरव्ही, फक्त [९][बृहन्मुंबईतच] करण्यात येईल. मात्र महानगरपालिकेच्या किमान [१०][निम्म्या सदस्यांनी], पाठिंबा दिलेल्या महानगारपालिकेच्या ठरावान्वये असा खर्च, या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनाकरिता शहराबाहेरही करता येईल.]

सार्वजनिक कार्यासाठी जी कामे निकडीने करणे आवश्यक असेल त्यासाठी महानगरपालिका निधीतून तात्पुरत्या रकमा देणे.

**११९.** (१) [५][[६][राज्य] शासनाच्या] सचिवाने लेखी मागणी केली असता, एखादे काम सार्वजनिक कार्यासाठी निकडीने करणे आवश्यक आहे असे सचिवाने प्रमाणपत्र दिले असेल तर, आयुक्तास ते कोणतेही काम कोणत्याही वेळी हाती घेता येईल, तसेच या प्रयोजनासाठी महानगरपालिकेच्या नेहमीच्या कारभारात व्यत्यय न येईल तेथवर महानगरपालिका निधीतून रकमा तात्पुरत्या देता येतील. याप्रमाणे पार पाडलेल्या सर्व कामाचा परिव्यय व ते पार पाडण्यासाठी कामावर लावलेल्या आस्थापनेसाठी झालेला परिव्यय [५][[६][राज्य] शासन] देईल व अशा परिव्ययाची रक्कम महानगरपालिका निधीत जमा करण्यात येईल.

---

[१] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २९ (एक) अन्वये नवीन खंड (ईई) समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९८२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३ अन्वये हे आकडे व ही अक्षरे व हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम २० (दोन) अन्वये हे शब्द, आकडे व अक्षर व कंस समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम ३ अन्वये हे शब्द, आकडे व अक्षर समाविष्ट करण्यात आले.

[५] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये "सरकार" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[६] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[७] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम १६ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[८] सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम ११ अन्वये नवीन कलम ११८अ समाविष्ट करण्यात आले.

[९] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २ अनुसूची (१) ४ (१) अन्वये "ग्रेटर बॉम्बे" या मूळ शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[१०] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम १३ अन्वये "चौपन्न" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

(२) पोट-कलम (१) खाली पाठवलेले कोणतेही लेखी मागणीपत्र मिळाल्यावर, आयुक्त, त्याची प्रत तदनुसार त्याने केलेल्या उपाययोजनेसंबंधीच्या प्रतिवृत्तासह महानगरपालिकेकडे ताबडतोब पाठवील.

[१] * * * * * *

[२] * * * * * *

### विशेष निधी.

पाणीपुरवठा व मलजल विल्हेवाट एकत्रित कर्ज निधीची स्थापना.

[३][**११९अ.** (१) महानगरपालिका, प्रकरणे नऊ आणि दहा यांच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनार्थ, " पाणीपुरवठा आणि मलजल विल्हेवाट एकत्रित कर्ज निधी " या नावाने संबोधण्यात येणारा एक वेगळा निधी, "ग" अर्थसंकल्पाच्या प्रयोजनार्थ स्थापन करील आणि तो अलग ठेवील.

(२) उक्त कर्ज निधीच्या खाती पुढील पैसा जमा करण्यात येईल :—

(अ) प्रकरणे नऊ आणि दहा यांच्या प्रयोजनार्थ या अधिनियमान्वये किंवा त्याखाली प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून कर्जाऊ घेण्यात आलेल्या कोणत्याही रकमा ;

(ब) महानगरपालिका, वेळोवेळी निर्धारित करील असा कलम १०९ च्या खंड फ मध्ये निर्दिष्ट केलेल्या कर्जनिवारण निधीचा भागांश ;

(३) याप्रमाणे स्थापन करण्यात आलेल्या निधीचे पुढील प्रयोजनासाठी उपयोजन करण्यात येईल :—

(अ) प्रकरण नऊ आणि दहा यांच्या प्रयोजनार्थ भांडवली स्वरूपाच्या कामांवरील खर्च ;

(ब) अशा भांडवली स्वरूपाच्या कामांसाठी उभारण्यात आलेल्या पूर्वीच्या कर्जाची परतफेड.

(४) निकटपूर्ववर्ती पोट कलमानुसार वापरण्यात न आलेला किंवा तात्काळ न वापरावयाचा उक्त निधीतील कोणताही पैसा आयुक्त [४][स्थायी समितीच्या] मंजुरीने त्यास योग्य आणि उचित वाटेल अशा रीतीने, महानगरपालिकेच्या वतीने गुंतवील.

पाणी व मलजल निधीची रचना.

**११९ब.** (१) महानगरपालिका 'पाणी आणि मलजल निधी' या नावाने संबोधण्यात येणारा निधी स्थापन करील आणि तो अलग ठेवील.

(२) कलम १४०, खंड (अ) किंवा (ब) खाली किंवा कलमे १६९ ते १७२ (दोन्ही धरून) याखाली महानगरपालिकेला किंवा तिच्या वतीने स्वीकारलेला सर्व पैसा किंवा प्रकरण नऊ आणि दहा यांच्या प्रयोजनार्थ मिळालेला इतर कोणताही पैसा हा पाणी आणि मलजल निधीच्या खाती जमा करण्यात येईल.

(३) उक्त निधीत जमा करावयाच्या सर्व रकमांचा आयुक्त स्वीकार करील आणि [५][स्थायी समिती] याबाबतीत वेळोवेळी मान्यता देईल अशा बँकेत किंवा बँकामध्ये, उक्त रकमा, 'पाणी आणि मलजल निधी खाते' या नावाच्या खाती, ताबडतोब भरील :

---

[१] सन १९०७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३, कलम १८ अन्वये "शाळा निधी व कलम १२० " हे शीर्षक निरसित करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १९ अन्वये निरसित करण्यात आलेला हा भाग गाळण्यात आला.

[३] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ९ अन्वये कलमे ११९अ व ११९ब समाविष्ट करण्यात आली.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५० अन्वये "महापौरासह परिषदेच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ५१ अन्वये "महापौरासह परिषद " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल-करण्यात आला.

परंतु, [1][स्थायी समितीने] दिलेल्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष निदेशांच्या अधीनतेने आयुक्तास प्रकरण नऊ व दहा यांच्या प्रयोजनार्थ आवश्यक असेल अशी रोख शिल्लक ठेवून घेता येईल.

(४) उक्त निधीत वेळोवेळी जमा करण्यात आलेल्या रकमांचे उपयोजन प्रकरण नऊ व दहा यांच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व रकमा, आकार आणि परिव्यय यांच्या प्रदानासाठीच केवळ करता येईल.

(५) निकटपूर्ववर्ती पोट-कलमात तरतूद केल्याप्रमाणे ज्या पैशाचे उपयोजन ताबडतोब किंवा नजिकच्या तारखेस करणे शक्य नसेल असा, उक्त निधीच्या खाती जमा असलेला अधिशेष पैसा आयुक्तास [1][स्थायी समितीने] मान्यता दिलेल्या बँकेत किंवा बँकांमध्ये वेळोवेळी, व्याजी ठेवता येईल किंवा सरकारी रोख्यांत गुंतवता येईल.

(६) अशा सर्व रकमा, आयुक्त, महानगरपालिकेच्या वतीने [1][स्थायी समितीच्या] मंजुरीने ठेव म्हणून ठेवील आणि गुंतवील आणि तशाच प्रकारच्या मंजुरीने, आयुक्तास, याप्रमाणे ठेवलेल्या कोणत्याही ठेवी कोणत्याही वेळी काढून घेता येतील किंवा कोणतेही रोखे विकता येतील, तसेच, त्यास, याप्रमाणे काढून घेतलेला पैसा, किंवा अशा रोख्यांची विक्री करून आलेला पैसा, वरीलप्रमाणे पुन्हा ठेव म्हणून ठेवता येईल किंवा पुन्हा गुंतविता येईल ; मात्र अशा प्रकारे कोणतीही रक्कम ठेवण्याविषयी किंवा गुंतविण्याविषयी किंवा काढून घेण्याविषयी किंवा विकण्याविषयी जो कोणताही आदेश द्यावयाचा तो लेखी असल्याखेरीज आणि त्यावर कलम ११३, पोट-कलम (१) मध्ये धनादेशावर सही करण्यासंबंधी विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने, दोन व्यक्तींनी सह्या केलेल्या असल्याखेरीज तो, कोणत्याही प्रकारे विधिग्राह्य असणार नाही.

(७) कोणतीही अशी रक्कम ठेव म्हणून ठेवल्यामुळे किंवा गुंतवल्यामुळे जो कोणताही तोटा होईल, त्याची रक्कम 'पाणी आणि मलजल निधी' या खाती खर्ची घालण्यात येईल.]

दंड निधीची रचना.

[2]**[१२०.** [3][कलम ८३] खाली गोळा केलेल्या दंडाच्या रकमा "दंड निधी" या नावाने संबोधण्यात येणाऱ्या एका वेगळ्या निधीत जमा करण्यात येतील आणि त्याचे उत्पन्न या अधिनियमाच्या प्रकरण १६अ यांच्या तरतुदींखाली नेमण्यात आलेले महानगरपालिका अधिकारी आणि कर्मचारी यांहून अन्य महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांच्या हितसंवर्धनासाठी आणि महानगरपालिकेच्या सेवेत असताना मरण पावतील अशा अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या विधवांना आणि अशा अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या, महानगरपालिका वेळोवेळी निर्धारित करील अशा इतर नातेवाईकांस अनुकंपा भत्ते देण्यासाठी खर्च करण्यात येईल.

कल्याण निधीची रचना.

**१२०अ.** कलम ४६०लल, पोटकलम (१) चा खंड (क) च्या तरतुदींखाली महानगरपालिका निधीकडे बदली करण्यात आलेल्या रकमा "कल्याण निधी" या नावाने संबोधण्यात येणाऱ्या एका विशेष निधीच्या खाती जमा करण्यात येतील व तो या अधिनियमाच्या प्रकरण सोळा-अ च्या तरतुदींखाली नेमलेले अधिकारी व कर्मचारी धरून महानगरपालिकेचे अधिकारी व कर्मचारी यांना व महानगरपालिका वेळोवेळी निर्धारित करील अशा त्यांच्या कुटुंबातील व्यक्तींना व अवलंबित व्यक्तींना महानगरपालिका निर्धारित करील असे लाभ व सुखसोयी पुरवण्यासाठी खर्च करण्यात येईल.]

---

[1] सन १९९९ चा अधिनियम क्रमांक २७, कलम ५१ अन्वये "महापौरासह परिषद" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम २४ अन्वये कलमे १२० व १२०अ जादा दाखल करण्यात आली.

[3] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ६५ अन्वये "कलम ८२" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

महानगरपालिकेच्या मंजुरीने विशेष निधी निर्माण करता येतील.

**१२१.** महानगरपालिकेच्या [१][पूर्व] मंजुरीने, महानगरपालिका निधीचा कोणताही [२] * * * * भागांश हा [२] * * * * वेळोवेळी महानगरपालिकेच्या लेख्यांतील एका वेगळ्या शीर्षाखाली जमा करता येईल. परंतु ज्या उद्दिष्टांसाठी याप्रमाणे विशेष निधी निर्माण करण्यात आला असेल त्या उद्दिष्टांशी ज्या रकमांचा स्पष्टपणे संबंध असेल अशा रकमाच फक्त अशा विशेष शीर्षाखाली जमाखाती व खर्चखाती टाकण्यात येतील.

## शिलकी रकमांची विल्हेवाट करणे

अधिशेष पैसा गुंतवणे.

[३][**१२२.** (१) महानगरपालिका निधीच्या जमाखाती असलेला जो अधिशेष पैसा या अधिनियमाच्या किंवा त्याखाली उभारलेल्या कोणत्याही खर्चाच्या प्रयोजनांसाठी ताबडतोब किंवा नजिकच्या तारखेस उपयोजित करणे शक्य नसेल, तो, वेळोवेळी [४][राष्ट्रीयीकृत बँकेमध्ये] व्याजाने [५][किंवा राज्य शासनाकडे किंवा राज्य शासनाने मान्यता दिलेल्या कोणत्याही सांविधिक महामंडळाकडे ठेव म्हणून] ठेवता येईल किंवा सरकारी रोख्यांमध्ये [६][किंवा केंद्र सरकार, राज्य शासन, शासनाचे उपक्रम, शासनाच्या वित्तीय संस्था किंवा युनिट ट्रस्ट ऑफ इंडिया यांच्या कर्जरोख्यांमध्ये किंवा ऋण पत्रांमध्ये] गुंतवता येईल.

(२) अशा प्रयोजनांकरिता तो अधिशेष पैसा त्यांचे उपयोजन करण्यासाठी तत्परतेने उपलब्ध होणे आवश्यक असेल तो सर्व अधिशेष पैसा आणि ज्या अधिशेष पैशाच्या बाबतीत पूर्वोक्त रीतीने तो ठेव म्हणून अनुकूल रीतीने ठेवणे किंवा गुंतंवणे शक्य नाही असे महानगरपालिका आयुक्ताचे, [७][स्थायी समितीची] सहमती घेतल्यानंतर मत झाले असेल असा सर्व अधिशेष पैसा, [७][स्थायी समिती] महानगरपालिकेच्या नियंत्रणाच्या अधीनतेने वेळोवेळी या प्रयोजनाकरिता निवड करील अशा मुंबई शहरातील बँकेत किंवा बँकांमध्ये व्याजाने ठेवता येईल.

(३) आयुक्त [७][स्थायी समितीच्या] मंजुरीने अशा सर्व ठेवी महानगरपालिकेच्या वतीने ठेव म्हणून ठेवील किंवा गुंतवील आणि आयुक्तास, तत्सम मंजुरीने, याप्रमाणे ठेव म्हणून ठेवलेली रक्कम कोणत्याही वेळी काढून घेता येईल किंवा कोणतेही रोखे विकता येतील. तसेच त्यास याप्रमाणे काढून घेतलेला पैसा पुन्हा ठेव म्हणून ठेवता येईल किंवा अशा रोख्यांची विक्री करून आलेला पैसा वरीलप्रमाणे पुन्हा गुंतवता येईल, मात्र, या कलमाखाली कोणतीही रक्कम ठेवण्याविषयी किंवा गुंतवण्याविषयी, काढून घेण्याविषयी, किंवा रोखे विकण्याविषयी जो कोणताही आदेश द्यावयाचा तो लेखी असल्याखेरीज आणि त्यावर [८][कलम ११३, पोट-कलम (१) मध्ये धनादेशावर सही करण्यासंबंधी विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने तीन व्यक्तींनी] सह्या केलेल्या असल्याखेरीज तो कोणत्याही प्रकारे विधिग्राह्य असणार नाही.

(४) कोणतीही अशी रक्कम ठेव म्हणून ठेवल्यामुळे किंवा गुंतवल्यामुळे कोणताही तोटा झाल्यास, त्याची रक्कम महानगरपालिका निधीच्या खाती खर्ची घालण्यात येईल.]

---

[१] सन १९३६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम ९ अन्वये "पूर्व" हा शब्द समाविष्ट करण्यात आला.
[२] सन १९०७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३, कलम १९ अन्वये निरसित करण्यात आलेला भागांश गाळण्यात आला.
[३] सन १९९४ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम ५ अन्वये मूळ कलम १२२ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.
[४] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ६६(अ) अन्वये "बँक ऑफ बॉम्बे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.
[५] सन १९८६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम २ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[६] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम १३ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.
[७] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५२ अन्वये "महापौरासह परिषद" या मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.
[८] सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२, कलम १० अन्वये "आयुक्त व स्थायी समितीचा एक सदस्य आणि नगरपालिका सचिव यांनी" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

## लेखे

**१२३.** [१][या अधिनियमाचे प्रकरण १६अ याच्या तरतुदींच्या अधीनतेने] महानगरपालिकेच्या जमाखर्चाचे लेखे [२][स्थायी समिती] वेळोवेळी विहित करील अशा रीतीने व अशा नमुन्यात ठेवण्यात येतील. [२][स्थायी समितीने] विहित केलेल्या नमुन्यांमध्ये लेखे ठेवणे.

[३][परंतु, [२][स्थायी समितीने] अन्यथा विहित केले असेल ते खेरीजकरून पाणी आणि मलजल निधी व पाणीपुरवठा आणि मलजल विल्हेवाट एकत्रित कर्ज निधी यांचे लेखे, उपार्जनाच्या तत्त्वावर ठेवण्यात येतील.]

१९२५ चा मुंबई १६. [४][**१२३अ.** (१) आयुक्त**,** मुंबई शहर सुधारणा विश्वस्तव्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ याखाली विश्वस्त मंडळाचे अधिकार, कर्तव्ये व मत्ता व दायित्वे महानगरपालिकेकडे हस्तांतरित करण्यात आल्यामुळे महानगरपालिकेमध्ये निहित झालेली किंवा निहित होणारी सर्व मालमत्ता आणि महानगरपालिकेमध्ये जमा होणाऱ्या व तिच्याकडून खर्च होणाऱ्या सर्व रकमा, [५][तसेच प्रकरण १२अ च्या कोणत्याही प्रयोजनांकरिता महानगरापालिकेने संपादन केलेली सर्व मालमत्ता व तिच्याकडे जमा होणाऱ्या तसेच तिच्याकडून खर्च होणाऱ्या सर्व रकमा] यांचे लेखे महानगरपालिकेच्या लेख्यांमध्ये अलगअलग शीर्षाखाली ठेवील. आयुक्ताने अलगअलग प्रपत्र लेखे ठेवणे.

(२) असे लेखे शक्य होईल तेथवर अनुसूची बब मध्ये दिलेल्या नियमांस अनुसरून [६][स्थायी समिती] वेळोवेळी विहीत करील अशा रीतीने व अशा नमुन्यांत ठेवण्यात येतील.

(३) आयुक्त, असे लेखे दर [७][* * * वर्षाला [८][**शासकीय राजपत्रात**] प्रसिद्ध करील.]

**१२३ ब.** [उपनगरांच्या बाबतीत अलग प्रपत्र लेखे ठेवणे ] हे कलम सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, क्रमांक ४ अन्वये वगळण्यात आले.

**१२३ बब.** [कलम २३१ब च्या तरतुदी योग्य त्या फेरफारांसह विस्तारित उपनगरांनाही लागू होणे] हे कलम सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम ४ अन्वये वगळण्यात आले.

[९][**१२३ क.** (१) आयुक्त, महानगरपालिका लेख्यांमध्ये एका अलग शीर्षाखाली, कलम ६१, खंड (क्यू) याच्या प्रयोजनांकरिता किंवा त्यांच्या संबंधात महानगरपालिकेच्या सर्व जमा व खर्च रकमेचा लेखा ठेवील. प्राथमिक शिक्षणाच्या संबंधातील लेखे.

(२) असे लेखे शक्य होईल तेथवर, अनुसूची बबअ यांतील नियमांस अनुसरून [१०][शिक्षण समिती,] वेळोवेळी विहित करील अशा रीतीने व अशा नमुन्यांत ठेवण्यात येतील.

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम २५ अन्वये हा भागांश समाविष्ट करण्यात आला.
[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५३ अन्वये "महापौरासह परिषद" या मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.
[३] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम १० अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.
[४] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ३० अन्वये नवीन कलम १२३अ समाविष्ट करण्यात आले.
[५] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम ६ अन्वये हे शब्द जादा दाखल करण्यात आले.
[६] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५४ अन्वये "महापौरासह परिषद" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[७] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम १७ अन्वये "अर्ध्या" हा शब्द गाळण्यात आला.
[८] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याअन्वये "मुंबई सरकार राजपत्र" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.
[९] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ५४ अन्वये कलम १२३क समाविष्ट करण्यात आले.
[१०] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५५ अन्वये "महापौरासह परिषद" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

वार्षिक प्रशासन अहवाल व लेखा विवरण तयार करणे.

**१२४.** (१) [1][[2][आयुक्त] प्रत्येक १ एप्रिलनंतर शक्य तितक्या लवकर परंतु [3][३१ जुलैपूर्वी मागील सरकारी वर्षातील महानगरपालिकेच्या [4][बृहन्मुंबईतील] [5][ [6][बृहन्मुंबई वीज पुरवठा आणि परिवहन उपक्रम] प्रशासनाहून अन्य] प्रशासनाचा तपशीलवार अहवाल तयार करील व त्याबरोबरच उक्त वर्षभरात महानगरपालिका निधीच्या खाती जमा झालेल्या व खर्ची घातलेल्या रकमा व उक्त वर्षाच्या अखेरीस निधीत जमा असलेली शिल्लक दर्शवणारे विवरण तयार करील.

[7][(२) आयुक्त त्याच्या उक्त अहवालात व विवरणात,—

(अ) त्याच्या अधीन असलेल्या प्रत्येक विभाग प्रमुखाकडून आलेला त्याच कालावधीचा अहवाल;

(ब) कर्जाच्या, त्यावेळी देय असलेल्या शिल्लक रकमांचा, कलम १०५ अन्वये शेवटी प्रसिद्ध झालेला हिशेब;

या गोष्टींचा अंतर्भाव करून तो मुद्रित करण्याची व्यवस्था करील.

(३) स्थायी समितीने उपरोक्त छापील अहवाल व विवरण यांची तपासणी व परीक्षण केल्यानंतर, निरनिराळ्या विभाग प्रमुखांच्या अहवालांना कोणतीही परिशिष्टे जोडलेली असल्यास त्यापैकी स्थायी समिती निदेश देईल अशी परिशिष्टाच्या छापील प्रती व स्थायी समितीच्या परीक्षणाची एकेक छापील प्रत संकलित पुस्तकास जोडण्यात येईल व संपूर्ण संकलित पुस्तकाची एकेक छापील प्रत स्थायी समितीच्या परीक्षणासह प्रत्येक पालिका सदस्याच्या नेहमीच्या वसतिस्थानी किंवा शहरातील माहीत असलेल्या त्याच्या शेवटच्या वसतिस्थानी पुढे येणाऱ्या जानेवारी महिन्यातील महानगरपालिकेच्या साधारण बैठकीच्या आठ दिवस अगोदर पाठवण्यात येईल, आणि त्यांच्या प्रती ज्या कोणत्याही व्यक्तीस हव्या असतील तिला, आयुक्त प्रत्येक प्रतीसाठी स्थायी समितीच्या पूर्वमंजुरीने जी वाजवी फी निर्धारित करील ती दिल्यावर देण्यात येतील.]

## वार्षिक अर्थसंकल्पीय अंदाज

[12][आयुक्ताने] दरवर्षी खर्च व प्राप्ती यांचे अंदाज तयार करणे.

[8][**१२५.** [9][आयुक्त] दरवर्षी [10][पाच फेब्रुवारी] रोजी किंवा त्यापूर्वी, [11][स्थायी समिती वेळोवेळी मान्य करील अशा नमुन्यात पुढील अंदाज तयार करून तो उक्त समितीपुढे] मांडील —

(१) (अ) निकट आगामी सरकारी वर्षात त्यांच्या मते महानगरपालिकेने जो खर्च केला पाहिजे, किंवा करावा त्या खर्चाचा अंदाज—या खर्चात पुढील खर्चाचा समावेश होणार नाही—

---

[1] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ७०(अ) अन्वये, मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५६ (अ) अन्वये "प्रभारी सदस्य" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन २००८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम २ अन्वये "३० नोव्हेंबरपूर्वी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४ (१) अन्वये "ग्रेटर बॉम्बे" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[5] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम २६ अन्वये, हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[6] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, अनुसूची (१) ४ (३) अन्वये " मुंबई वीज पुरवठा आणि परिवहन उपक्रम" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[7] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५६(ब) अन्वये, पोट-कलमे (२) व (३) याऐवजी ही पोट-कलमे दाखल करण्यात आली.

[8] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ३१ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम १२५ दाखल करण्यात आले.

[9] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५७(अ) अन्वये " प्रभारी सदस्य " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[10] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २१ अन्वये " एक मार्च " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[11] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५७(ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[12] वरील अधिनियमाच्या कलम ५७(क) अन्वये, "प्रभारी सदस्याने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1][ * * * * *

१९२५ चा मुंबई १६. (दोन) मुंबई शहर सुधारणा विश्वस्त व्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५, याखाली रचना करण्यात आलेल्या मुंबई शहर सुधारणा विश्वस्त मंडळाचे अधिकार, कर्तव्ये, मत्ता व दायित्वे महानगरपालिकेकडे हस्तांतरित केल्यामुळे उत्पन्न झालेली व महागनगरपालिकेवर लादलेली आबंधने पार पाडण्यासाठी [2][किंवा प्रकरण बारा-अ च्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी] करावयाचा खर्च; आणि

(तीन) [3][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमासाठी] करावयाचा खर्च ;

[4][(चार) कलम ६१, खंड (क्यू) च्या प्रयोजनांसाठी करावयाचा खर्च;]

[5][(पाच) प्रकरण नऊ व दहा यांच्या प्रयोजनांकरिता करावयाचा खर्च;]

(ब) [6][कलमे [7][१२३अ [8] * * आणि १२३क] याखाली ठेवलेल्या लेख्यांमध्ये] दर्शविलेल्या (शिल्लक रकमांहून अन्य) अशा निकट आगामी सरकारी वर्षाच्या प्रारंभी पुर्नविनियोजनासाठी किंवा खर्चासाठी उपलब्ध होऊ शकणाऱ्या कोणत्याही शिल्लक रकमा असल्यास त्यांचा अंदाज;

(क) कराधानापासून [9][आणि [3][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमापासून] मिळणाऱ्या, तसेच [10][ * * * * * * *]पोट-कलम (२) चा खंड (क) [11][आणि कलम १२६क चा खंड (ड) यामध्ये] [12][ आणि कलम १२६ई मध्ये] निर्दिष्ट केलेल्याहून अन्य अशा, महानगरपालिकेच्या जमा रकमा व प्राप्ती यांचा अंदाज;

[13][(कक) कलम ४६०केके आणि ४६० लल यांच्या तरतुदींखाली निकट आगामी सरकारी वर्षात महानगरपालिका निधीत हस्तांतरित करावयाच्या रकमांचा अंदाज;]

(ड) निकट आगामी सरकारी वर्षात, या अधिनियमाच्या तरतुदींखाली जे कर बसवणे त्याच्या मते आवश्यक किंवा इष्ट असेल अशा करांबाबतच्या प्रस्तावांचे विवरण.

[14] * * * * * * *

---

[1] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम ५(अ) (एक) अन्वये परिच्छेद (एक) वगळण्यात आला.

[2] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम ७(१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, अनुसूची (१) ४ (३) अन्वये "मुंबई वीजपुरवठा आणि परिवहन उपक्रम" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ५५(१) अन्वये उप खंड (चार) समाविष्ट करण्यात आला.

[5] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ११(अ) अन्वये परिच्छेद (पाच) समाविष्ट करण्यात आला.

[6] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम १५(१) (ब) अन्वये "१२३अ अन्वये ठेवलेला लेखा" याऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[7] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ५५(२) अन्वये "१२३अ आणि १२३ब " याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[8] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम (५) (अ) (दोन) अन्वये "१२३ब," "१२३बब" यांऐवजी हे आकडे, शब्द व अक्षरे समाविष्ट करण्यात आली.

[9] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम २७ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[10] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम ५(अ) (तीन) अन्वये "पोट-कलम (१अ) चा खंड (क)" हा भागांश वगळण्यात आला.

[11] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ५५(३) अन्वये हा भागांश समाविष्ट करण्यात आला.

[12] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ११(ब) अन्वये हा भागांश समाविष्ट करण्यात आला.

[13] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम २७ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[14] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम ५(ब) अन्वये खंड (१अ) वगळण्यात आला.

(२) (अ) मुंबई शहर सुधारणा विश्वस्तव्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ याखाली रचना केलेल्या मुंबई शहर सुधारणा विश्वस्त मंडळाचे अधिकार, कर्तव्ये, मत्ता व दायित्त्वे महानगरपालिकेकडे हस्तांतरित केल्यामुळे उत्पन्न झालेली व महानगरपालिकेवर लादलेली आबंधने पार पाडण्याकरिता [1][ किंवा प्रकरणे बारा अ च्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनांकरिता,] निकट आगामी सरकारी वर्षात महानगरपालिकेने त्याच्या मते जो खर्च केला पाहिजे किंवा करावा अशा खर्चाचा अंदाज; १९२५ चा मुंबई १६.

(ब) निकट आगामी सरकारी वर्षाच्या प्रारंभी पुनर्विनियोजनासाठी किंवा खर्चासाठी उपलब्ध असतील अशा कलम १२२अ खाली ठेवलेल्या लेख्यामधील कोणत्याही शिल्लक रकमा, असल्यास त्या सर्व शिल्लक रकमांचा अंदाज ;

(क) निकट आगामी सरकारी वर्षात पुढे सांगितल्याप्रमाणे महानगरपालिकेस मिळणाऱ्या जमा रकमा व प्राप्तीच्या रकमा यांचा अंदाज :—

(एक) मुंबई शहर नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९३३ हा अधिनियमित केल्यामुळे महानगरपालिकेमध्ये निहित झालेल्या [2][किंवा प्रकरण बारा अ च्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनांकरिता महानगरपालिकेने संपादन केलेल्या] स्थावर मालमत्तेची विक्री केल्यामुळे, ती पट्ट्याने दिल्यामुळे किंवा इतर रीतीने तिची व्यवस्था केल्यामुळे, महानगरपालिकेस मिळणाऱ्या जमा रकमांचा व प्राप्तीच्या रकमांचा अंदाज; आणि १९३३ चा मुंबई १३.

(दोन) पूर्वोक्त स्थावर मालमत्तेची प्रतिभूती देऊन महानगरपालिकेने दिलेल्या कर्जांवरील व्याज दिल्यामुळे व त्यांच्या संपूर्ण मुदलाची किंवा त्याच्या भागाची परतफेड केल्यामुळे महानगरपालिकेस मिळणाऱ्या जमा रकमांचा व प्राप्तीच्या रकमांचा अंदाज ;

(ड) त्या वेळी चालू असलेल्या वित्तीय वर्षासाठी सर्वसाधारण कराकरिता निश्चित केलेल्या दराच्या रकमेने त्यावेळी चालू असलेल्या वित्तीय वर्षात सर्वसाधारण कर या शीर्षाखाली, महानगरपालिकेच्या निव्वळ अंदाजलेल्या वसुलीच्या रकमेस (यात थकबाकीच्या रकमांचा व आगाऊ दिलेल्या रकमांचा समावेश होतो) भागून जी रक्कम येईल त्या रकमेच्या तिपटीच्या रकमेचा अंदाज:

[3] * * * *

[4][परंतु आणखी असे की, १९७४-७५ या वित्तीय वर्षापासून हा उपखंड जणू काही "तिपटीच्या" या शब्दाऐवजी "दुपटीच्या" हा शब्द दाखल केला असावा त्याप्रमाणे अंमलात येईल.]

[5][ (ई) उक्त विश्वस्त मंडळाचे अधिकार, कर्तव्ये, मत्ता व दायित्वे महानगरपालिकेकडे हस्तांतरित केल्यामुळे महानगरपालिकेवर लादलेल्या दायित्वाच्या बाबतीत किंवा प्रकरण बारा अ अन्वये महानगपालिकेस प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करण्याच्या व तिच्यावर लादण्यात आलेली कर्तव्ये पार पाडण्याच्या बाबतीत होणाऱ्या व्यवहारामुळे मिळणाऱ्या किंवा अशा व्यवहाराशी संबंध असलेल्या व या पोट-कलमाच्या इतर खंडांमध्ये निर्देश केलेल्या जमा रकमांहून व प्राप्तीच्या रकमांहून अन्य आणि राज्य शासनाने दिलेल्या अनुदानांचा समावेश करून महानगरपालिकेस मिळालेल्या इतर जमा रकमा व प्राप्तीच्या रकमा यांचा अंदाज.]

[1] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम ७(२) (अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.
[2] वरील अधिनियमाच्या कलम ७ (२) (ब) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.
[3] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ७१(क) अन्वये हे परंतुक वगळण्यात आले.
[4] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७०, कलम ७ (ब) अन्वये दिनांक १ एप्रिल १९७४ पासून हे परंतुक नेहमीसाठी जादा दाखल करण्यात आल्याचे मानण्यात आले.
[5] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम ७ (२) (क) अन्वये मूळ खंडाऐवजी उप-खंड (ई) दाखल करण्यात आला.

[१][ **१२५अ.** अर्थसंकल्पीय अंदाजातील खर्चाच्या बाजूचे प्रधान शीर्ष, गौण शीर्ष, दुय्यम शीर्ष व प्राथमिक गट असे वर्गीकरण करण्यात येईल— अर्थसंकल्पीय शीर्षांचे वर्गीकरण.

(अ) "प्रधान शीर्ष" म्हणजे, अर्थसंकल्पीय अंदाजात खर्चाचे ज्या वेगवेगळ्या सेवांच्या शीर्षाखाली वर्गीकरण करण्यात येते त्यानुसार लेख्यातील प्रमुख शीर्ष आणि त्याची दोन किंवा अधिक गौण शीर्षामध्ये विभागणी करता येईल ;

(ब) "गौण शीर्ष" म्हणजे, प्रधान शीर्षाखालोखाल निकट दुय्यम शीर्ष म्हणून असणारे लेखाशीर्ष याखाली प्रधान शीर्षाचे निरनिराळ्या शीर्षांत वर्गीकरण करण्यात येते आणि त्याची दोन किंवा अधिक दुय्यम शीर्षांत पोट-विभागणी करता येईल ;

(क) "दुय्यम शीर्ष" म्हणजे, गौण शीर्षाखालोखाल निकट दुय्यम शीर्ष म्हणून असणारे लेखाशीर्ष याखाली गौण शीर्षाचे निरनिराळ्या शीर्षात वर्गीकरण करण्यात येते व त्याची दोन किंवा अधिक प्राथमिक गटांमध्ये आणखी पोट-विभागणी करता येईल ;

(ड) "प्राथमिक गट" म्हणजे, अर्थसंकल्पीय अंदाजातील खर्चाच्या एकेक बाबी ज्या एका किंवा अनेक गटांत मांडता येतील, असे एक किंवा अनेक अंतिम गट.]

[२][ **१२६. (१)** [३][स्थायी समिती] प्रत्येक [४][पाच फेब्रुवारी] रोजी किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर] [५][आंयुक्ताने] तयार केलेल्या अंदाजाचा व प्रस्तावाचा विचार करील आणि [५][आयुक्ताकडून] जी कोणतीही आणखी तपशीलवार माहिती मागविणे तिला योग्य वाटेल ती मिळवून आणि या अधिनियमाच्या सर्व आवश्यक बाबी लक्षात घेऊन, त्यावरून तिला आवश्यक वाटतील असे फेरबदल करण्याच्या व जादा मजकूर दाखल करण्याच्या अधीनतेने पुढीलप्रमाणे [६][दोन अर्थसंकल्पीय अंदाज] तयार करील:— [९][स्थायी समितीने] अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणे.

[७][(अ) पुढील प्राप्ती व खर्च याहून अन्य प्राप्तीचे व खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज "अ":—

[८]* * * * * *

१९२५ चा मुंबई १६. (दोन) मुंबई शहर सुधारणा विश्वस्तव्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ याखाली रचना करण्यात आलेल्या मुंबई शहर सुधारणा विश्वस्त मंडळाचे अधिकार, कर्तव्ये, मत्ता व दायित्वे महानगरपालिकेकडे हस्तांतरित केल्यामुळे [१०][किंवा प्रकरण वीस अ याच्या इतर प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनाकरिता] पुढीलप्रमाणे मिळणारी प्राप्ती किंवा होणारा खर्च ; [११]* * *

---

[१] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम १८ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ३२ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम १२६ दाखल करण्यात आले.

[३] सन १९९९ चा अधिनियम क्रमांक २७, कलम ५८(अ) अन्वये "महापौरासह परिषद" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २२(अ) अन्वये "एक मार्च" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[५] सन १९९९ चा अधिनियम क्रमांक २७, कलम ५८(ब) अन्वये "प्रभारी सदस्य" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम ६(अ) (एक) अन्वये " चार अर्थसकंल्पीय अंदाज" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[७] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम १६(१) (ब) अन्वये मूळ खंडाऐवजी खंड (अ) दाखल करण्यात आला.

[८] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम ६(अ) (दोन) अन्वये उप खंड (एक) वगळण्यात आला.

[९] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५८(क) अन्वये दाखल करण्यात आले.

[१०] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम ८(१) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[११] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ५६(१) अन्वये "आणि" हा शब्द वगळण्यात आला.

(तीन) [१][मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] संबंधातील प्राप्ती व खर्च;

[२][(चार) कलम ६१ खंड (क्यू) याच्या प्रयोजनांसाठी किंवा त्या संबंधातील प्राप्ती व खर्च;]

[३][(पाच) प्रकरण नऊ व दहा यांच्या प्रयोजनांसाठी किंवा त्यासंबंधातील प्राप्ती व खर्च;]

(ब) उक्त अधिकार, कर्तव्ये, मत्ता व दायित्वे महानगरपालिकेकडे हस्तांतरित केल्यामुळे [४][किंवा प्रकरण बारा अ यांच्या इतर प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनाकरिता,] पुढील सरकारी वर्षात महानगरपालिकेस मिळणारी प्राप्ती व येणारा खर्च यांचे अर्थसंकल्पीय अंदाज "ब";

[५]* * * * * *

(२) अर्थसंकल्पीय अंदाज "अ" यात [६][स्थायी समिती] —

(अ) प्रकरण आठच्या तरतुदींच्या संदर्भात तिला योग्य वाटतील अशा दरांनी महानगरपालिका कर बसविण्यासंबंधी व [७][जकातीच्या] बाबतीत तिला योग्य वाटतील अशा वस्तूंवर अशी जकात बसविण्यासंबंधी प्रस्ताव करील.

(ब) महानगरपालिकेवर जे देणे देण्याचे दायित्व या अधिनियमान्वये असेल अशा सर्व रकमा, मुद्दल व व्याज यांचे हप्ते जसजसे देय होतील तसतसे ते भरण्याबद्दल तरतूद करील; त्यात पूर्वोक्तप्रमाणे पुढील रकमा व हप्ते यांचा समावेश होणार नाही :—

(एक) मुंबई शहर नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९३३ हा पारित झाला नसता तर १९३३
महानगरपालिकेवर ज्या रकमा व जे हप्ते देण्याचे दायित्व आले नसते अशा रकमा व हप्ते आणि चा मुंबई

(दोन) कलम ६१, खंड (एक) खाली लादण्यात आलेली कर्तव्ये पार पाडताना महानगारपालिकेवर १३.
ज्या रकमा व जे हप्ते देण्यास दायित्व असेल त्या रकमा व ते हप्ते [८][आणि ]

(तीन) [९][बृहन्मुंबई मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रम] संपादन करणे, त्याचा विस्तार करणे, त्याचे प्रशासन करणे, तो चालविणे व तो सुस्थितीत राखणे यांमुळे ज्या रकमा व जे हप्ते देण्याचे दायित्त्व महानगरपालिकेवर असेल त्या रकमा व ते हप्ते;]

[१०]* * * * *

[११][(पाच) शाळांच्या इमारती बांधण्यामुळे ज्या रकमा व जे हप्ते देण्याचे दायित्व महानगरपालिकेवर असेल त्या रकमा व ते हप्ते ;]

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ कलम २ अनुसूची (१) ४ (१) अन्वये "मुंबई वीज पुरवठा परिवहन उपक्रम" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ५६(१) अन्वये परिच्छेद (चार) समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम १२ अन्वये परिच्छेद (पाच) समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम ८(२) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम ६(अ) (तीन) अन्वये खंड (ब १) आणि (ब २) वगळण्यात आले.

[६] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५८(अ) अन्वये "महापौरासह परिषद" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ३ अन्वये "शहर शुल्क" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[८] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम २८ अन्वये हा भागांश जादा दाखल करण्यात आला.

[९] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, अनुसूची (१) ४ (३) अन्वये "मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रम" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१०] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम ६(ब)(एक) अन्वये उपखंड (चार) वगळण्यात आला.

[११] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ५६ (२) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

(क) कलम १२५, पोट-कलम (२), खंड (ड) खाली अंदाजित केलेल्या रकमेचे व तिला योग्य वाटेल त्याप्रमाणे सुधारित रकमेचे अर्थसंकल्पीय अंदाज " ब " साठी विनियोजन करण्याची परवानगी देईल;

[१]* * * * *

[२][(क २) कलम १२६क, खंड (क) खाली अंदाजित केलेल्या रकमेचा व तिला योग्य वाटेल त्याप्रमाणे सुधारित रकमेचा [३][आणि त्या कलमाच्या खंड (क १) खाली अंदाजित केलेल्या रकमेचा व तिला योग्य वाटेल त्याप्रमाणे सुधारित अशा जादा रकमेचा] अर्थसंकल्पीय अंदाज " ई " साठी विनियोजन करण्याची परवानगी देईल ;

(ड) एक लाखाहून कमी नसेल इतकी रक्कम अशा वर्षाच्या अखेरीस रोख शिल्लक म्हणून ठेवण्याची परवानगी देईल.

(३) अर्थसंकल्पीय अंदाज " ब " यात, [४][स्थायी समिती] तिला आवश्यक वाटल्यास, अशा अर्थसंकल्पीय अंदाजातील कोणतीही तूट भरून काढण्यासाठी कर्जे काढण्यासंबंधी प्रस्ताव करील :

परंतु, [४][स्थायी समिती] त्या प्रयोजनासाठी वीस लाख रुपयांहून अधिक रकमेचे कर्ज काढण्यासंबंधी कोणताही प्रस्ताव करणार नाही.

[५]* * * * * *

(४) [६][आयुक्त] [४][स्थायी समितीने] अंतिमरीत्या मंजूर केलेले अर्थसंकल्पीय अंदाज [७][छापण्याची किंवा त्यात दुरुस्ती करण्याची तजवीज करील आणि त्यांची छापील प्रत किंवा दुरुस्त केलेली प्रत [८][एक मार्चपेक्षा] उशिराची नसेल अशा तारखेस] प्रत्येक पालिका सदस्याच्या नेहमीच्या वसतिस्थानी किंवा शहरातील माहीत असलेल्या त्याच्या शेवटच्या वसतिस्थानी पाठवील.

[१२][महाव्यवस्थापकाने] प्रत्येक वर्षी [११][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाचा] खर्च व प्राप्ती यांचे अंदाज तयार करणे.

[९][ **१२६अ.** [१०][महाव्यवस्थापक दर दहा ऑक्टोबर रोजी किंवा त्या अगोदर मुंबई वीज पुरवठा व परिवहन समिती वेळोवेळी मान्य करील अशा नमुन्यात अहवाल तयार करील व तो समितीपुढे ठेवील] **:—**

(अ) त्याच्या मते महानगरपालिकेने निकट आगामी सरकारी वर्षात [११][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमासाठी] जो खर्च केला पाहिजे किंवा करावा त्या खर्चाचे कलम १२५अ यास अनुसरून वर्गीकरण केलेले अंदाज;

---

[१] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम ६(ब) (दोन) अन्वये खंड (क १) वगळण्यात आला.

[२] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ५६ (२) अन्वये खंड (क २) समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ३ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५८(अ) अन्वये "महापौरासह परिषद" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम ६(क) अन्वये पोट-कलम (३अ) आणि (३ब) वगळण्यात आले.

[६] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५८(ब) अन्वये "प्रभारी सदस्य" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७०, कलम ८(ब) अन्वये "छापण्याची" या शब्दाने सुरू होणारा आणि "छापील प्रत" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २२(ब) अन्वये "पंधरा मार्च पेक्षा" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[९] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम २९ अन्वये कलमे १२६अ आणि १२६ब समाविष्ट करण्यात आली.

[१०] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५९(अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[११] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, अनुसूची (१) ४ (३) अन्वये "मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रम" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५९(ब) अन्वये "प्रभारी सदस्याने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ब) निकट आगामी सरकारी वर्षाच्या प्रारंभी पुनर्विनियोजनासाठी किंवा खर्चासाठी उपलब्ध असतील अशा ज्या कोणत्याही शिलकी रकमा असतील त्यांचे अंदाज व पुढील वित्तीय वर्षात कलम ४६० केके व ४६० लल खाली नगरपालिका निधीत जमा करावयाच्या रकमांचे अंदाज; आणि

(क) निकट आगामी सरकारी वर्षात महानगरपालिकेस [१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमापासून] मिळणाऱ्या रकमांचे व प्राप्तीचे अंदाज.

[२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीने] अर्थसंकल्पीय अंदाज तयार करणे.

**१२६ब. (१)** [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समिती,] [३][महाव्यवस्थापकाने तयार केलेल्या अंदाजांवर दर दहा ऑक्टोबर रोजी किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर विचार करील आणि मुख्य व्यवस्थापकाकडून] जी कोणतीही आणखी तपशीलवार माहिती मागविणे तिला योग्य वाटेल ती मिळवल्यानंतर आणि या अधिनियमाच्या सर्व आवश्यक बाबी लक्षात घेतल्यानंतर, त्यावरून [१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] बाबतीत मिळणारी प्राप्ती व होणारा खर्च यांचे पुढील सरकारी वर्षाचे "अंदाज 'क' " या नावाचे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करील. उक्त समितीस अशा अर्थसंकल्पीय अंदाजात तिला योग्य वाटतील असे फेरफार करता येतील किंवा जादा बाबी दाखल करता येतील.

(२) अर्थसंकल्पीय अंदाज " क " यात अशी [४][समिती] —

[५][(एक अ) मोटार वाहन अधिनियम, १९३९, वीज (पुरवठा) अधिनियम, १९४८ याच्या आणि त्या त्यावेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमितीच्या तसेच त्याखाली महानगरपालिकेला दिलेल्या कोणत्याही लायसनच्या तरतुदींच्या अधीनतेने प्रस्तावित खर्च भागवण्यासाठी आणि या पोटकलमाच्या पुढे क्रमाने येणाऱ्या खंडाच्या तरतुदींचे अनुपालन करण्यासाठी [४][समितीच्या] मते ज्यामुळे पुरेशी प्राप्ती मिळेल अशा दरांनी [१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाने] तरतूद केलेल्या कोणत्याही परिवहनच्या साधनांद्वारे केलेल्या उतारुंच्या वाहतुकीबद्दलचे प्रवास-भाडे आणि केलेल्या मालाच्या ने-आणीबद्दलचा आकार तसेच उपरोक्ती उपक्रमाने पुरवलेल्या विद्युत ऊर्जेचा आकार बसविण्याबद्दलचा प्रस्ताव मांडील;]. १९३९ चा ४. १९४८ चा ५४.

(अ) [१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रम] संपादन करणे, त्याची वाढ करणे, त्याचे प्रशासन करणे, तो चालविणे व तो सुस्थितीत ठेवणे यांमुळे महानगरपालिकेवर या अधिनियमाखाली ज्यांचे दायित्व असेल अशा सर्व रकमा, मुद्दल व व्याज यांचे सर्व हप्ते जसजसे देणे होतील तसतसे ते भरण्याबद्दल तरतूद करील;

(ब) निकट आगामी सरकारी वर्षात कलमे ४६० केके व ४६० लल यांत तरतूद केल्याप्रमाणे महानगरपालिका निधीत त्या रकमा जमा करण्याची परवानगी देईल; आणि

(क) एक लाखाहून कमी नसेल इतकी रक्कम उक्त वर्षाच्या अखेरीस रोख शिल्लक म्हणून ठेवण्याची परवानगी देईल;

[६][(३) महाव्यवस्थापक, बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समितीने तयार केलेले अर्थसंकल्पीय अंदाज " क " हे दर एक डिसेंबर रोजी किंवा त्यापूर्वी स्थायी समितीपुढे ठेवील आणि स्थायी

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४ (३) अन्वये " मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रम " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९९ चा अधिनियम क्रमांक २७, कलम ६०(अ)(एक) अन्वये, " महापौरासह परिषद" या मजकुराऐजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाचे कलम ६०(अ)(दोन ) अन्वये, मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ६०(ब) अन्वये, "प्रभारी सदस्य" या मजकुराऐजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

[५] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ३ अन्वये खंड (एक अ) समाविष्ट करण्यात आला.

[६] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ६०(क) अन्वये पोटकलम (३) व (४) ही पोटकलमे समाविष्ट करण्यात आली.

समिती अशा अर्थसंकल्पीय अंदाजासंबंधी अहवाल तयार करून आपले काही अभिप्राय व शिफारशी असल्यास त्यांचा त्यांत समावेश करून ते, महानगरपालिकेकडे पाठवील.

(४) महानगरपालिका सचिव, अर्थसंकल्पीय अंदाज " क ", तसेच त्यावरील स्थायी समितीचा अहवाल छापण्याची तजवीज करील आणि ३१ डिसेंबरपेक्षा उशिरा नसेल अशा तारखेच्या आत त्यांची छापील प्रत प्रत्येक पालिका सदस्याच्या नेहमीच्या वसतिस्थानी किंवा शहरातील माहीत असलेल्या त्याच्या शेवटच्या वसतिस्थानी पाठवील."]

प्राथमिक शिक्षणाचा खर्च व जमा रकमा यांचे अंदाज.

[१][**१२६क.** [२][आयुक्त] प्रत्येक [३][पाच फेब्रुवारी] रोजी किंवा त्यापूर्वी, [४][शिक्षण समिती वेळोवेळी मंजूर करील अशा नमुन्यात पुढील अंदाज तयार करून ते उक्त समितीपुढे ] ठेवील —

(अ) त्याच्या मते महानगरपालिकेने पुढील सरकारी वर्षात कलम १६१, खंड (क्यू) याच्या प्रयोजनांसाठी जो खर्च केला पाहिजे किंवा करावा त्या खर्चाचा, कलम १२५अ यांस अनुसरून वर्गीकरण केलेला अंदाज;

(ब) पुढील सरकारी वर्षाच्या प्रारंभी कलम ६१, खंड (क्यू) च्या प्रयोजनार्थ खर्चाच्या पुनर्विनियोजनांसाठी उपलब्ध असलेल्या, कोणत्याही शिल्लक रकमा, असल्यास त्यांचा अंदाज;

(क) चालू वित्तीय वर्षासाठी सर्वसाधारण करांकरिता निश्चित केलेल्या दराच्या रकमेने, त्यावेळी चालू असलेल्या वित्तीय वर्षात " सर्वसाधारण कर " या शीर्षाखाली महानगरपालिकेच्या निव्वळ अंदाजित वसुली रकमांना (यात थकबाकीच्या रकमांचा आणि आगाऊ दिलेल्या रकमांचा समावेश होतो) भागून जी रक्कम येईल त्या रकमेच्या पाचपटीचा अंदाज;

[५][(क १) खंड (क) मध्ये निर्दिष्ट केलेल्या रकमेच्या भरीला कलम १२५ च्या खंड (१) मध्ये निर्देश केलेल्या तिच्या जमा रकमा व प्राप्ती यांतून ज्या कोणत्याही रकमेचा उपयोग त्यांच्या मते महानगरपालिकेने कलम ६१ चा खंड (क्यू) च्या प्रयोजनांसाठी केला पाहिजे अशा कोणत्याही रकमेचा अंदाज;]

(ड) [६][खंड (क) व (क १)] यामध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रयोजनांहून अन्य अशा कलम ६१, खंड (क्यू) च्या प्रयोजनांसाठी किंवा त्यांच्या संबंधात महानगरपालिकेस मिळावयाच्या जमा रकमांचे अंदाज;

[७][शिक्षण समितीने] अर्थसंकल्पीय अंदाज "ई" तयार करणे.

**१२६ड.** (१) [७][शिक्षण समिती] प्रत्येक [८][पाच फेब्रुवारी] रोजी किंवा त्यानंतर शक्य तितक्या लवकर [९][आयुक्ताने] तयार केलेल्या अंदाजांवर विचार करील आणि जी माहिती मागवणे त्यांना इष्ट वाटेल अशी आणखी तपशीलवार माहिती [१०][आयुक्ताकडून] मिळविल्यानंतर आणि या अधिनियमाच्या सर्व

---

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ५७ अन्वये कलमे १२६क आणि १२६ड समाविष्ट करण्यात आली.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ६१(अ) अन्वये प्रभारी सदस्य या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २३ अन्वये "एक मार्च " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ६१(ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ४(१) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ४(२) अन्वये, "पूर्ववर्ती खंड" या शब्दांऐवजी हे शब्द, कंस, अक्षरे व आकडा दाखल करण्यात आला.

[७] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ६२(अ)(एक) अन्वये "महापौरासह परिषद" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २४(अ) अन्वये "एक मार्च" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[९] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ६२(अ)(दोन) अन्वये "प्रभारी सदस्याने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१०] वरील अधिनियमाच्या कलम ६२(अ)(तीन) अन्वये, "प्रभारी सदस्यांकडून" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

आवश्यक बाबींचा विचार केल्यावर, त्यात योग्य वाटतील असे फेरफार करण्याच्या व जादा मजकूर घालण्याच्या अधीनतेने , कलम ६१, खंड (क्यू) च्या प्रयोजनांकरिता मिळावयाच्या प्राप्तीचे व करावयाच्या खर्चाचे अर्थसंकल्पीय अंदाज " ई " या नावाचे अर्थसंकल्पीय अंदाज तयार करील.

(२) अर्थसंकल्पीय अंदाज " ई " यात, [1][शिक्षण समिती],—

(अ) शाळांच्या इमारती बांधण्याच्या कामामुळे ज्याचे दायित्व या अधिनियमाखाली महानगरपालिकेवर असेल अशा सर्व रकमा, तसेच मुद्दल व व्याज यांचे सर्व हप्ते जसजसे देय होतील तसतसे ते भरण्याची तरतूद करील, आणि

(ब) वीस हजार रुपयांहून कमी नसेल इतकी रक्कम उक्त वर्षाच्या अखेरीस रोख शिल्लक म्हणून ठेवण्याची मुभा देईल.

[2][(३) शिक्षण समिती, तिने तयार केलेले अर्थसंकल्पीय अंदाज " ई " हे प्रत्येक एक मार्च रोजी किंवा त्यापूर्वी स्थायी समितीकडे अग्रेषित करील आणि स्थायी समिती अशा अर्थसंकल्पीय अंदाजासंबंधी अहवाल तयार करून, स्थायी समितीने जे कोणतेही अभिप्राय दिले असतील व ज्या कोणत्याही शिफारशी केल्या असतील त्यांचा त्यामध्ये समावेश करून ते महानगरपालिकेकडे पाठवील.]

(४) [3][महानगरपालिका सचिव अर्थसंकल्पीय अंदाज " ई " याची छापील किंवा दुरुस्ती केलेली प्रत स्थायी समितीच्या त्यावरील अहवालासह] प्रत्येक पालिका सदस्याच्या नेहमीच्या वसतिस्थानी किंवा शहरातील माहीत असलेल्या त्याच्या शेवटच्या वसतिस्थानी, कलम १२७ मध्ये नमूद केलेल्या, महानगरपालिकेच्या सभेच्या वेळेच्या आत पाठवील.

प्रकरण नऊ व दहा यांच्या प्रयोजनांसाठी खर्च व जमा रकमा यांचे अंदाज.

[4][**१२६ई.** [5][आयुक्त] प्रत्येक [6][पाच फेब्रुवारी] रोजी किंवा त्यापूर्वी, [7][स्थायी समिती वेळोवेळी मान्य करील अशा नमुन्यात पुढील अंदाज तयार करून ते स्थायी समितीपुढे] ठेवील,—

(अ) प्रकरण नऊ आणि दहा यांच्या प्रयोजनार्थ, पुढील सरकारी वर्षात त्यांच्या मते महानगरपालिकेने जो खर्च केला पाहिजे किंवा करावा अशा खर्चाचा कलम १२५अ यास अनुसरून वर्गीकरण केलेला अंदाज;

(ब) पुढील सरकारी वर्षाच्या प्रारंभी उक्त प्रयोजनार्थ पुर्नविनियोजनासाठी किंवा खर्चासाठी उपलब्ध होतील अशा कोणत्याही शिल्लक रकमा असल्यास त्या सर्वांचा अंदाज;

(क) प्रकरणे नऊ व दहा खालील सेवांमुळे पुढील सरकारी वर्षात महानगरपालिकेस मिळणाऱ्या रकमांचा आणि खर्चाचा अंदाज.]

---

[1] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ६२(ब) अन्वये "महापौरासह परिषदेने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ६२(क) अन्वये पोट-कलम (३) समाविष्ट करण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ६२(ड) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम १३ अन्वये कलमे १२६ई व १२६फ समाविष्ट करण्यात आली.

[5] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ६३(अ) अन्वये "प्रभारी सदस्य" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २५ अन्वये "एक मार्च" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[7] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ६३(ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**१२६फ.** **(१)** [१][स्थायी समिती,] [२][पाच फेब्रुवारी] रोजी किंवा त्यानंतर शक्य असेल तितक्या लवकर [३][आयुक्ताच्या] उक्त अंदाजावर विचारविनिमय करील. तिला [३][आयुक्ताकडून] मिळवणे योग्य वाटेल अशी आणखी कोणतीही माहिती मिळवून, आणि या अधिनियमाच्या सर्व आवश्यक बाबी लक्षात घेऊन, [१][स्थायी समिती] तिला योग्य वाटेल त्याप्रमाणे त्यात फेरबदल करण्याच्या व त्यात भर घालण्याच्या अधीनतेने प्रकरणे नऊ व दहा यांच्या प्रयोजनार्थ पुढील वर्षात मिळणाऱ्या प्राप्तीचा आणि खर्चाचा, " ग "अर्थसंकल्पीय अंदाज असे संबोधण्यात येईल असा अर्थसंकल्पीय अंदाज तयार करील.

[४][स्थायी समितीने] तयार करावयाचा " ग " अर्थसंकल्पीय अंदाज.

(२) [५][समिती] " ग " अर्थसंकल्पीय अंदाजात, प्रकरण नऊ व दहा यांच्या प्रयोजनार्थ ज्याचे दायित्व महानगरपालिकेवर असेल असा खर्च व इतर सर्व आबंधने भागवण्यासाठी [५][समितीच्या] मते ज्यायोगे पुरेसा महसूल प्राप्त होईल अशा दरांनी (पूर्वीचा पाणी कर आणि हलालखोर कर यांऐवजी) पाणी कर, पाणीलाभ कर, मलप्रणाल कर व मलप्रणाल लाभ कर बसविण्यासंबंधी प्रस्ताव करील.

(३) [६][महानगरपालिका सचिव] [७][स्थायी समितीने] अंतिमरित्या मान्यता दिलेला " ग " अर्थसंकल्पीय अंदाज [८][छापण्याची किंवा त्यात दुरुस्ती करण्याची तजवीज करील आणि [९][एक मार्चपेक्षा] उशिराची नसेल, अशा तारखेस त्याची छापील किंवा दुरुस्त केलेली प्रत] प्रत्येक पालिका सदस्याच्या नेहमीच्या वसतिस्थानी किंवा शहरातील माहीत असलेल्या त्याच्या शेवटच्या वसतिस्थानी पाठवील.]

[१०][**१२६ग.** (१) या प्रकरणामध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी [११][यथास्थिती, आयुक्त किंवा महाव्यवस्थापक, स्थायी समितीकडे किंवा बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समितीकडे] अर्थसंकल्पीय अंदाज सादर करताना त्यासोबत एक अहवाल जोडील; या अहवालामध्ये, पुढील सेवा अर्थसहाय्य देऊन पुरविण्यात येत आहेत काय आणि येत असल्यास अर्थसहाय्याची मर्यादा, ज्या साधनातून अर्थसहाय्य देण्यात आले ते साधन आणि स्थानिक लोकसमुदायाचे जे भाग किंवा वर्ग अशा अर्थसहाय्याचे लाभाधिकारी होते ते भाग किंवा वर्ग दर्शविण्यात येतील. सदर सेवा म्हणजे,–

अर्थसहाय्य देऊन पुरविलेल्या सेवांबाबत अहवाल.

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ६४(अ)(एक) अन्वये "महापौरासह परिषद" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २६(अ) अन्वये "एक मार्च" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ६४(अ)(दोन) अन्वये प्रभारी सदस्याच्या व प्रभारी सदस्याकडून या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ६४(ड) अन्वये "महापौरासह परिषदेने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ६४(ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ६४(क)(एक) अन्वये "प्रभारी सदस्य" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ६४(क)(दोन) अन्वये "महापौरांसह समितीने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७०, कलम १२ब अन्वये "छापण्याची" या शब्दांनी सुरू होणाऱ्या आणि "छापील प्रत" या शब्दांनी संपणाऱ्या भागांशाऐवजी हा भागांश दाखल करण्यात आला.

[९] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २६(ब) अन्वये "मार्च महिन्याच्या पंधरा तारखेपेक्षा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१०] सन १९९४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१, कलम ४० अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[११] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ६५(अ) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

(अ) पाणीपुरवठा व मलजलाची विल्हेवाट,

(ब) कचरा साफ करणे, त्याची वाहतूक करणे व विल्हेवाट लावणे,

(क) महापालिका परिवहन, आणि

(ड) सडकांवरील दिवाबत्तीची व्यवस्था.

**स्पष्टीकरण.—**एखाद्या सेवेचा, ती चालवणे व तिची देखभाल यांवरील खर्च आणि मत्तांच्या घसाऱ्यासाठी व ऋणखर्चासाठी असलेली पुरेशी तरतूद मिळून बनलेला एकूण खर्च हा, ती सेवा देण्याशी संबंध लावता येण्याजोग्या प्राप्तीपेक्षा अधिक असेल तर ती सेवा अर्थसहाय्य देऊन पुरवण्यात येत आहे असा तिचा अन्वयार्थ लावण्यात येईल.

[१][(२) स्थायी समिती किंवा यथास्थिति, बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समिती त्या अहवालाची तपासणी करील व तिच्या कोणत्याही शिफारशी, असल्यास, त्यांच्यासह तो अहवाल महानगरपालिकेपुढे ठेवील.]

महानगरपालिकेने अर्थसंकल्पीय अंदाजावर विचार करणे.

**१२७.** [२][(१) महानगरपालिकेच्या, [३][मार्च महिन्याच्या [४][दहा तारखेपेक्षा उशिराची ] ] नसेल अशा एखाद्या दिवशी बोलावल्या जाणाऱ्या सभेत [५][स्थायी समितीने तयार केलेले "अ", "ब", व "क" हे अर्थसंकल्पीय अंदाज तसेच शिक्षण समितीने तयार केलेले " ई " हे अर्थसंकल्पीय अंदाज व त्यासह स्थायी समितीचा त्यावरील अहवाल हे ] महानगरपालिकेपुढे मांडण्यात येतील आणि त्यावर विचारविनिमय करण्यास ती प्रारंभ करील.

[२][(२) महानगरपालिकेच्या, दहा जानेवारीपेक्षा उशिराची नसेल अशा एखाद्या तारखेस बोलावल्या जाणाऱ्या सभेत [६][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीने तयार केलेले "क" हे अर्थसंकल्पीय अंदाज आणि स्थायी समितीचा त्यावरील अहवाल] महानगरपालिकेपुढे मांडण्यात येईल आणि त्यावर विचारविनिमय करण्यास ती प्रारंभ करील. ]]

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ६५(ब) अन्वये पोट-कलम (२) दाखल करण्यात आले.

[२] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७०, कलम १३(१) अन्वये कलम १२७ ला पोट-कलम (१) असा फेरक्रमांक देण्यात आला व पोट-कलम (२) समाविष्ट करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १३(२) अन्वये "जानेवारी महिन्याच्या दहा तारखेपेक्षा" हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २७ अन्वये "वीस तारखेपेक्षा उशिराची" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ६६(अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ६६(ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1][**१२८.** (१) [2][स्थायी समितीचे] यासंबंधीचे प्रस्ताव विचारात घेतल्यानंतर महानगरपालिका दिनांक [3][वीस मार्च] रोजी किंवा त्यापूर्वी,— महानगरपालिकेच्या करांचे आणि [6][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] भाड्यांचे व आकारांचे दर निश्चित करणे.

(अ) प्रकरण आठमध्ये विहित करण्यात आलेल्या मर्यादांच्या व शर्तींच्या अधीनतेने ज्या दरांनी नगरपालिकेचे कर बसविण्यात येतील ते दर व ज्या वस्तूंवर जकात बसविण्यात येईल त्या वस्तू लगतनंतरच्या [4][सरकारी वर्षात निर्धारित करील :]

[5][परंतु, महानगरपालिकेस, इमारतीच्या किंवा जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या वापरकर्त्याच्या निरनिराळया प्रवर्गाकरिता मालमत्ता कराचे निरनिराळे दर निर्धारित करता येतील ; आणि]

(ब) कलम १२६ब, पोट-कलम (२) च्या खंड (एक-अ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिनियमितींपैकी कोणत्याही अधिनियमिती अन्वये किंवा त्याखाली किंवा कोणत्याही लायसन अन्वये किंवा त्याखाली विहित करण्यात आल्या असतील त्या मर्यादांच्या आणि शर्तींच्या अधीनतेने [6][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] संबंधात ज्या दरांनी प्रवासभाडे व आकार बसविण्यात येतील ते दर मान्य करील.

(२) कलमे १३४, १९६, ४६०ह आणि ४६० आय खाली असेल ते खेरीज करून एरव्ही, याप्रमाणे निश्चित करण्यात आलेले दर आणि याप्रमाणे निश्चित करण्यात आलेल्या वस्तू यांमध्ये ज्या वर्षासाठी उक्त दर किंवा वस्तू निश्चित करण्यात आल्या असतील त्या वर्षामध्ये त्यानंतर फेरफार केला जाणार नाही.]

[7][(३) पोट-कलमे (१) व (२) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेस, [8][सरकारी वर्ष २०१०-२०११, २०११-२०१२ व २०१२-१३ या दरम्यान कोणत्याही वेळी,] इमारतीच्या किंवा जमिनीच्या अथवा तिच्या भागाच्या वापरकर्त्यांच्या निरनिराळ्या प्रवर्गाकरिता, प्रत्येक उक्त [9][तीन वर्षांसाठी] स्वतंत्रपणे मालमत्ता करांचे दर निर्धारित करता येतील. मालमत्ता कराचे असे निर्धारित केलेले दर त्या [9][तीन वर्षांच्या १ एप्रिलपासून अंमलात येतील आणि तेव्हापासून ते अंमलात आले असल्याचे मानण्यात येईल आणि उक्त [9][तीन वर्षांसाठीचे] कर, अशा निर्धारित केलेल्या दराने बसविण्यायोग्य व देय असतील.]

[10][**१२९.** कलम १२८, पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असलेल्या बाबींच्या अधिनतेने, महानगरपालिकेस [11][अर्थसंकल्पीय अंदाज “ अ ” किंवा [12][अर्थसंकल्पीय अंदाज “ ब ” किंवा अर्थसंकल्पीय अंदाज “ ग ” किंवा त्यांपैकी सर्व कोणताही अंदाज स्थायी समितीकडे आणि अर्थसंकल्पीय अर्थसंकल्पीय अंदाज अंतिमरित्या अंगीकारणे.

---

[1] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ४ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम १२८ दाखल करण्यात आले.

[2] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ६७ अन्वये “ महापौरासह परिषदेचे ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २१ अन्वये “ पंचवीस मार्च ” या शब्दांऐवजी “ वीस मार्च ” हे शब्द दाखल करण्यात आले.

[4] सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २(१) (क) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम २(१) (ख) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[6] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[7] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २ अन्वये हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[8] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम २ (एक) अन्वये मूळ मजकुरऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[9] वरील अधिनियमाच्या कलम २ (दोन) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[10] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ३१ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[11] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम ८(अ) अन्वये “ अर्थसंकल्पीय अंदाज “ अ ” किंवा अंदाज “ ब ” किंवा अंदाज “ ड ” किंवा अर्थसंकल्पीय अंदाज “ फ ” किंवा उक्त अंदाजापैकी कोणताही किंवा सर्व अंदाज ” या शब्दांऐवजी हे शब्द व अक्षरे दाखल करण्यात आले.

[12] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ६८ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

शिफारशीवरून]



अंदाज " क " हे बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीकडे आणि अर्थसंकल्पीय अंदाज " ई " हे शिक्षण समितीकडे] अधिक विचारासाठी प्रतिनिर्देशित करता येतील अथवा तिला सादर करण्यात आलेले अर्थसंकल्पीय अंदाज किंवा कोणतेही सुधारलेले अर्थसंकल्पीय अंदाज जसेच्या तसे अगर तिला इष्ट वाटतील असे फेरफार त्यात करून अंगीकारता येतील.

परंतु, महानगरपालिकेने अंतिमरित्या अंगीकारलेल्या अर्थसंकल्पीय अंदाजात यथास्थिति, [१][कलम १२६ याचे] पोट-कलम (२), खंड (ब), (क) व (ड) यात विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक बाबींसाठी आणि कलम १२६ब, पोट-कलम (३) व [२][कलम १२६ड, पोट-कलम (२), खंड (अ) व (ब)] [३][आणि कलम १२६फ, पोट-कलम (२)] यात विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक बाबींसाठी पूर्णपणे तरतूद करण्यात आली पाहिजे.]

खर्च व प्राप्ती यांचे अंदाज अर्थसंकल्पीय अंदाज मानणे.

[४][**१२९अ.** या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, अर्थसंकल्पीय अंदाज ज्या सरकारी वर्षाशी संबंधित असतील त्या वर्षाच्या प्रारंभापूर्वी महानगरपालिकेने ते अर्थसंकल्पीय अंदाज, कोणत्याही कारणास्तव अंतिमरीत्या स्वीकृत केलेले नसतील तर, महानगरपालिका या अधिनियमाच्या तरतुदींनुसार ते अर्थसंकल्पीय अंदाज रीतसर स्वीकृत करेपर्यंत, कलम १२५ अन्वये आयुक्ताने तयार केलेले खर्च व प्राप्तीचे अंदाज [५][आणि कलम १२६अ अन्वये महाव्यवस्थापकाने तयार केलेले अंदाज] त्या वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज असल्याचे मानण्यात येईल.]

अर्थसंकल्पीय अनुदानाची व्याख्या.

[६][**१३०.** खर्चाच्या बाजूस प्रधान शीर्षाखाली नोंद केलेल्या व महानगरपालिकेने अंगीकार केलेल्या एकूण रकमेस " अर्थसंकल्पीय अनुदान " अशी संज्ञा देण्यात येईल.]

महानगरपालिकेस अर्थसंकल्पीय अनुदानाच्या रकमा वाढवता येतील व अतिरिक्त अनुदाने मंजूर करता येतील.

**१३१.** [६][(१) [७][महानगरपालिका निधीतून कलम ६१, खंड (क्यू) च्या प्रयोजनांहून अन्य प्रयोजनांकरिता करावयाच्या खर्चाच्या बाबतीत स्थायी समितीच्या शिफारशीवरून] आणि बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीतून करावयाच्या खर्चाच्या बाबतीत बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीच्या शिफारशीवरून, महानगरपालिकेस] वेळोवेळी सरकारी वर्षात, उक्त वर्षात उद्भवलेली कोणतीही विशेष किंवा अनपेक्षित गरज भागवण्यासाठी अर्थसंकल्पीय अनुदान वाढवता येईल किंवा अतिरिक्त अर्थसंकल्पीय अनुदान मंजूर करता येईल. मात्र असे करताना वर्षाच्या अखेरीस अंदाजलेली रोख शिल्लक महानगरपालिका निधी किंवा [८][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधी] यांपैकी कोणत्याही निधीच्या बाबतीत एक लाख रुपयांहून कमी होता कामा नये :

[९] * * * * * * *

---

[१] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम ८(ब) अन्वये " आणि पोट-कलम (३अ) चा खंड (अ) व (ब) या शब्दांनी सुरू होणाऱ्या " आणि " उक्त कलम १२६ " या शब्दांनी संपणाऱ्या भागांशाऐवजी हे शब्द व आकडे दाखल करण्यात आले.

[२] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ५९(२) अन्वये हा भागांश समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम १५(ब) अन्वये हा भागांश समाविष्ट करण्यात आला.

[४] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम १४ अन्वये ' कलम १२९अ ' समाविष्ट करण्यात आले.

[५] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम ३ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[६] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम १९ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[७] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ३२ अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[८] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ६९ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, अनुसूचीअन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1][ [2][परंतु], कलम ६१, खंड (क्यू) च्या प्रयोजनांकरिता महानगरपालिका निधीतून करावयाच्या खर्चाच्या बाबतीत, अर्थसंकल्पीय अंदाज " ई " यातील वर्षअखेर अंदाजलेली रोख शिल्लक वीस हजार रुपयांपेक्षा कमी करता येणार नाही.]

(२) याप्रमाणे वाढलेल्या किंवा जादा मंजूर केलेल्या अर्थसंकल्पीय अनुदानाच्या रकमा या, ज्या वर्षात त्या अशा रीतीने वाढवण्यात किंवा जादा मंजूर करण्यात आल्या असतील त्या वर्षासाठी महानगरपालिकेने स्वीकृत केलेल्या [३][अर्थसंकल्पीय अंदाजात] समाविष्ट करण्यात आल्या आहेत असे मानले जाईल.

खर्च न केलेल्या अर्थसंकल्पीय अनुदानासंबंधी नियम.

**१३२.** [४][अर्थसंकल्पीय अनुदानाची संपूर्ण रक्कम किंवा तिचा कोणताही भागांश] ज्या वर्षाकरिता असे अनुदान [३][अर्थसंकल्पीय अंदाजात] समाविष्ट करण्यात आले असेल त्या वर्षाच्या अखेरीस खर्च न होता तशीच राहिली असेल व ती [५][लगतपुढील दोन वर्षांपैकी कोणत्याही वर्षाच्या] [३][अर्थसंकल्पीय अंदाजात] दाखल केलेल्या [६][यथास्थिति] महानगरपालिका निधीच्या [७][किंवा [८][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीच्या]] प्रारंभिक शिलकेत जमेस नसेल तर, यथास्थिति [९][स्थायी समितीस किंवा शिक्षण समितीस किंवा बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीस, यथास्थिति] [५][असे अर्थसंकल्पीय अनुदान किंवा त्याची खर्च न झालेली रक्कम किंवा त्यापैकी काही रक्कम लगतपुढील दोन वर्षांच्या काळात] ज्यासाठी ते अनुदान मंजूर करण्यात आले ते प्रयोजन किंवा तो हेतू मूळ मंजुरीप्रमाणे पूर्ण करण्याकरिता, पण कोणत्याही इतर प्रयोजनांकरिता किंवा हेतूकरिता नव्हे, खर्च करण्यास मंजुरी देता येईल.

रकमेत कपाती किंवा तिचे हस्तांतरण.

[१०][**१३३.** अर्थसंकल्पीय अनुदानाच्या रकमांतील कपाती आणि त्यांचे हस्तांतरण हे पुढीलप्रमाणे करण्यात येईल :—

(अ) कलम १३१, पोटकलम (१) च्या तरतुदीच्या अधीनतेने, महानगरपालिकेला सरकारी वर्षात [११][स्थायी समितीने] केलेल्या शिफारशींवरून [१२][वीस लाख] रुपयांहून अधिक नसेल अशी कोणतीही रक्कम एका अर्थसंकल्पीय अनुदानात काढून ती दुसऱ्या अर्थसंकल्पीय अनुदानामध्ये हस्तांतरित करण्यास वेळोवेळी मंजुरी देता येईल.

(ब) [११][स्थायी समितीने] सरकारी वर्षात कोणत्याही वेळी—

(एक) अर्थसंकल्पीय अनुदानाच्या रकमेत कपात करता येईल ;

(दोन) पंधरा हजार रुपयांहून अधिक नसेल अशी कोणतीही रक्कम एका अर्थसंकल्पीय अनुदानातून दुसऱ्या अर्थसंकल्पीय अनुदानात बदली करण्यास मंजुरी देता येईल ;

[१३]* * * * * * *

---

१ सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम ९(अ) अन्वये पहिले परंतुक वगळण्यात आले.

२ सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ६०(२) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

३ सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ९(ब) अन्वये " परंतु आणखी असे की " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

४ सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ३३ अन्वये मूळ शब्दांऐवजी " अर्थसंकल्पीय अंदाज " हे शब्द दाखल करण्यात आले.

५ सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम १७ अन्वये मूळ शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

६ सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ३३ अन्वये हे शब्द दाखल करण्यात आले.

७ सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४(५) अन्वये " मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

८ सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ७० अन्वये " महापौरासह परिषद " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

९ सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ६१ अन्वये हे शब्द दाखल करण्यात आले.

१० सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९, कलम १० अन्वये कलम १३३ दाखल करण्यात आले.

११ सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ७१(अ) अन्वये " महापौरासह परिषद " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

१२ सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ८५(ब) अन्वये " पंधरा हजार " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

१३ वरील अधिनियमाच्या कलम ८५(क) अन्वये उप खंड (तीन) वगळण्यात आले.

[१][(क) आयुक्तास, सरकारी वर्षात कोणत्याही वेळी, एका अर्थसंकल्पीय अनुदानातील पाच हजार रुपयांहून अधिक नसेल अशा कोणत्याही रकमेचा त्याच अनुदानामध्ये करावयाच्या अंतर्गत हस्तांतरणास, जर याप्रमाणे रक्कम हस्तांतरित केल्यामुळे आवर्ती दायित्व निर्माण होत नसेल तर मंजुरी देता येईल :

परंतु, आयुक्त एक हजार रुपयांहून अधिक असलेल्या कोणत्याही रकमेचे या खंडाखाली केलेले प्रत्येक हस्तांतरण, स्थायी समितीस ताबडतोब कळवील ; आणि उक्त समिती त्या बाबतीत तिला योग्य वाटेल असा आदेश देऊ शकेल, आणि असा आदेश अंमलात आणणे आयुक्तांचे अवश्य कर्तव्य असेल.]

(ड) खंड (अ), (ब) किंवा (क) खाली कोणतेही हस्तांतरण करताना या अधिनियमाअन्वये आवश्यक असलेल्या सर्व गोष्टींकडे योग्य ते लक्ष देण्यात येईल.

(ई) खंड (ब) च्या उपखंड (१) मध्ये निर्दिष्ट करण्यात आल्याप्रमाणे कोणतीही कपातीची रक्कम [२][पाच लाख रुपयांहून] अधिक असेल तर, महानगरपालिका त्याबाबतीत तिला योग्य वाटेल असा आदेश देऊ शकेल ; आणि अशा आदेशाची अंमलबजावणी करणे हे [३][स्थायी समितीचे] व आयुक्ताचे अवश्य कर्तव्य असेल.

[४][(फ) कलम ६१ खंड (क्यू) च्या प्रयोजनांकरिता करावयाच्या खर्चाच्या बाबतीत, या कलमाच्या तरतुदी या जणू काही " स्थायी समिती " या शब्दांऐवजी " शिक्षण समिती " हे शब्द दाखल करण्यात आले असावेत त्याप्रमाणे लागू होतील.]

[५][(ग) बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीमधून करावयाच्या खर्चाच्या प्रयोजनाकरिता, या कलमांच्या तरतुदी या जणू, " स्थायी समिती " आणि " आयुक्त " या शब्दांऐवजी अनुक्रमे " बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समिती " आणि " महाव्यवस्थापक " हे शब्द दाखल करण्यात आलेले असावेत त्याप्रमाणे लागू होतील.]

आवश्यक असेल तेव्हा तेव्हा सरकारी वर्षात महानगरपालिकेने प्राप्ती व खर्च यांचे पुनःसमायोजन करणे.

[६][**१३४.** (१) कोणत्याही सरकारी वर्षात कोणत्याही वेळी [७][स्थायी समितीच्या किंवा बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीच्या अभिवेदनावरून महानगरपालिकेस असे दिसून येईल की, समुचित समितीने अर्थसंकल्पीय अनुदानाच्या रकमेत कोणतीही कपात केली असली तरी,] यथास्थिति महानगरपालिका निधीची किंवा [८][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीची] उक्त वर्षातील प्राप्ती ही उक्त वर्षाच्या अर्थसंकल्पीय अंदाजाने मंजूर केलेला व अशा रीतीने कमी केलेला खर्च भागवण्यास पुरेशी नाही ; तसेच ती महानगरपालिका निधी किंवा मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधी यापैकी कोणत्याही निधीच्या बाबतीत एक लाख रुपयांहून कमी नसेल इतकी रोख शिल्लक वर्षाच्या अखेरीस मागे ठेवण्यास पुरेशी नाही, तर, वर्षाच्या प्राप्तीचा खर्चाशी मेळ बसविण्याकरिता आवश्यक असेल अशी कोणतीही उपाययोजना करण्यासाठी ताबडतोब मंजुरी देणे हे महानगरपालिकेचे अवश्य कर्तव्य असेल.

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ७१(ब) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

[२] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ८५(ई) अन्वये " पाचशे रुपयांहून " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ७१(अ) अन्वये " महापौरासह परिषद " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ७१(क) अन्वये खंड(फ) समाविष्ट करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ७१(ड) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[६] सन १९४८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४८, कलम ३५ अन्वये मूळ कलमाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ७२ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(५) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१] *   *   *   *   *   *   *

(२) या प्रयोजनाकरिता महानगरपालिकेस, या अधिनियमाची तरतूद किंवा [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] संबंधातील आबंधन यांकडे यथायोग्यरित्या लक्ष घेऊन, शक्य असेल तेथवर या वर्षासाठी मंजूर केलेला खर्च कमी करता येईल अथवा यथास्थिती, पूरक कर बसवणे किंवा [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] संबंधात बसविलेली भाडी व आकार सुधारणे हे उपाय योजता येतील. [३][किंवा राज्य शासनाच्या पूर्व मंजुरीने आणि महानगरपालिकेस ज्या अटी व शर्ती (कोणत्याही असल्यास) लादणे योग्य वाटेल त्यांच्या अधीनतेने, कोणत्याही अर्थसंकल्पीय अंदाजामधून संपूर्ण अधिशेष रोख शिल्लक किंवा तिचा कोणताही भागांश, इतर कोणत्याही अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये अशा दुसऱ्या अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये जी कोणतीही तूट आली असेल किंवा येण्याच्या संभव असेल ती तूट भरून काढण्यासाठी अतिरिक्त अनुदान म्हणून, हस्तांतरित करता येईल ; मग अशी तूट अर्थसंकल्पीय अनुदानाच्या कक्षेत येत असो किंवा नसो.]

## लेख्यांचे परिनिरीक्षण व लेखापरीक्षा

महानगरपालिकेच्या मुख्य लेखापरीक्षकाने लेख्यांचे मासिक परिनिरीक्षण करणे व [८][स्थायी समितीने] लेख्यांचे परिनिरीक्षण करणे.

[४][**१३५.** [५][(१) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक महानगरपालिकेच्या लेख्यांची मासिक तपासणी व लेखापरीक्षा करील आणि त्यावरील अहवाल स्थायी समितीकडे पाठवील व ती समिती तिच्या सदस्यांपैकी दोनपेक्षा कमी नसतील इतक्या सदस्यांनी व महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाने सही केलेला, निकटपूर्वीच्या महिन्यातील जमेचा व खर्चाचा गोषवारा दर महिन्यास प्रसिद्ध करील. तसेच, स्थायी समितीस, वेळोवेळी व तिला योग्य वाटेल इतक्या कालावधीच्या संबंधात महानगरपालिकेच्या लेख्यांची स्वतंत्रपणे तपासणी व लेखापरीक्षा करता येईल.]

(२) या प्रयोजनाकरिता, [६][स्थायी समितीस] व महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास महानगरपालिकेचे सर्व लेखे व त्या संबंधातील सर्व अभिलेखे व पत्रव्यवहार पाहता येईल, आणि [६][स्थायी समिती] किंवा महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक हा जमा रकमा व खर्च यासंबंधी जो कोणताही खुलासा मागविल तो [७][आयुक्त] त्यांना ताबडतोब देईल.]

महानगरपालिका मुख्य लेखा परीक्षकाची कर्तव्ये व अधिकार.

[९][**१३६.** महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक, या अधिनियमाखाली त्याच्याकडे सोपवलेली इतर कोणतीही कर्तव्ये व त्यास प्रदान केलेले इतर कोणतेही अधिकार यांच्या भरीला, अनुसूची ईई मध्ये विनिर्दिष्ट केलेली कर्तव्ये बजावील, आणि त्यात विनिर्दिष्ट केलेल्या अधिकारांचा त्यास वापर करता येईल.

---

[१] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १, कलम १० अन्वये हे परंतुक वगळण्यात आले.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, अनुसूची (१) ४(३) अन्वये "मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रम" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ५ अन्वये मूळ मजकूराऐवजी हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[४] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ७ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम १३५ दाखल करण्यात आले.

[५] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ७३ (अ) अन्वये मूळ पोटकलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ७३(ब)(एक) अन्वये "महानगरपालिका लेखा समिती" या मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ७३(ब)(दोन) अन्वये "प्रभारी सदस्य" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम ७३(क) अन्वये "महानगरपालिका लेखा समिती" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ७ अन्वये मूळ कलमांऐवजी कलमे १३६ व १३७ दाखल करण्यात आली.

महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाचा अहवाल.

**१३७.** (१) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक—

(अ) महानगरपालिकेने केलेल्या खर्चाच्या बाबतीत किंवा तिला येणे असलेल्या रकमांच्या वसुलीच्या बाबतीत किंवा तिच्या लेख्यांच्या बाबतीत ज्या कोणत्याही महत्त्वाच्या अनुचितता किंवा नियमबाह्यता त्यास कोणत्याही वेळी आढळून येतील त्यासंबंधीचा अहवाल [१][स्थायी समितीस] पाठविल.

(ब) लेखापरीक्षेच्या प्रगतीबाबत उक्त [२][स्थायी समिती] वेळोवेळी जी माहिती मागविल ती तिला पुरवील.

(२) [३][स्थायी समिती] महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाने [३][स्थायी समितीस] जो अहवाल पाठविला असेल व जो महानगरपालिकेपुढे ठेवण्याविषयी त्याने [३][स्थायी समितीस] सांगितले असेल असा प्रत्येक अहवाल आणि या अधिनियमाखाली त्यास नेमून दिलेली कर्तव्ये पार पाडण्याच्या व त्याच्या अधिकारांचा वापर करण्याच्या संबंधातील कोणत्याही बाबींविषयी त्याच्या अभिप्रायाचे जे निवेदन त्याने तयार केले असेल व जे महानगरपालिकेपुढे ठेवण्याविषयी त्याने [३][स्थायी समितीस] सांगितले असेल असे प्रत्येक निवेदन महानगरपालिकेपुढे ठेवण्याची तजवीज करील. तसेच त्यासह अशा अहवालाच्या किंवा निवेदनाच्या बाबतीत तिने जे कोणते आदेश दिले असतील त्यासंबंधीचा अहवाल महानगरपालिकेपुढे ठेवण्याची तजवीज करील आणि महानगरपालिकेस पूर्वोक्त बाबीसंबंधी तिला आवश्यक वाटेल अशी उपाययोजना करता येईल.

(३) प्रत्येक सरकारी वर्ष सुरू झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर, महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक, मागील सरकारी वर्षाच्या संपूर्ण महानगरपालिका लेख्यांवरील आपला अहवाल [४][स्थायी समितीस] सादर करील.

(४) [५][आयुक्त] उक्त अहवाल छापण्याची तजवीज करील आणि कलम १२४, पोट-कलम (३) अन्वये पाठवणे आवश्यक असल्याप्रमाणे त्याची एक छापील प्रत व त्यासह प्रशासन अहवालाची व लेखा विवरणाची छापील प्रत प्रत्येक पालिका सदस्याकडे पाठवील.

[८][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीच्या] लेख्यांना कलमे १३५, १३६ व १३७ लागू करणे.

[६][**१३७अ.** कलमे १३५, १३६ व १३७ यांत जणू काही—

[७][(एक) "स्थायी समिती" हा मजकूर जेथे जेथे आला असेल तेथे त्याऐवजी "बृहन्मुंबई वीज-पुरवठा व परिवहन समिती" आणि "आयुक्त" हा मजकूर जेथे जेथे आला असेल तेथे त्याऐवजी "महाव्यवस्थापक" हा मजकूर दाखल करण्यात येईल; आणि]

(दोन) कलम १३७, पोट-कलम (४) यात जणूकाही "कलम १२४, पोट-कलम (३)" या मजकुराऐवजी "कलम ४६० नन, पोट-कलम (२)" हा मजकूर दाखल करण्यात आलेला असावा त्याप्रमाणे; उक्त कलमे [८][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन निधीच्या] लेख्यांच्या बाबतीत लागू होतील].

---

१ सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ७४(अ)(एक) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

२ वरील अधिनियमाच्या कलम ७४(अ)(दोन) अन्वये "महानगरपालिका लेखा समिती" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम ७४(ब) अन्वये "महानगरपालिका लेखा समिती" या मजकुराऐवजी "स्थायी समिती" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

४ वरील अधिनियमाच्या कलम ७४(क) अन्वये "महापौरासह परिषदेस आणि महानगरपालिका लेखा समितीस," या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५ वरील अधिनियमाच्या कलम ७४(ड) अन्वये "प्रभारी सदस्य" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६ सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ३६ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

७ सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ७५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

८ सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, अनुसूची (१) ४(५) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**१३८.** [1][(१) [2][राज्य शासनास] [3][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाचे] लेखे धरून महानगरपालिकेच्या लेख्यांची खास लेखापरीक्षा करण्याकरिता व त्यावर [2][राज्य] शासनाकडे अहवाल सादर करण्याकरिता कोणत्याही वेळी लेखापरीक्षक नेमता येईल, आणि कोणत्याही अशा लेखापरीक्षेचा [2][राज्य] शासन निर्धारित करील असा परिव्यय, यथास्थिति, महानगरपालिका निधीतून किंवा [3][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन निधीतून] देण्यात येईल.]

विशेष लेखापरीक्षा करण्याबाबत [2][राज्य] शासन निदेश देऊ शकेल.

(२) [4][महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास] जो कोणताही अधिकार वापरता येईल तो अधिकार याप्रमाणे नेमलेल्या लेखापरीक्षकास वापरता येईल.

## प्रकरण आठ

## महानगरपालिका कराधान

### महानगरपालिका करांची व्याख्या

**१३९.** या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता पुढील कर लादण्यात येतील :—

या अधिनियमाखाली लादावयाचे कर.

१. मालमत्ता कर;

२. [5][कुत्र्यांवरील] कर ;

[6][३. नाट्यगृह कर ;]

[7][* * *]; आणि

[8][(४) जकात;]

[9]* * * * * *

---

[1] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ३७ अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[2] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[3] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ८ अन्वये " महानगरपालिकेने नेमलेल्या लेखापरीक्षकास " याऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[5] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १० (अ) अन्वये " वाहने व जनावरे यांवरील " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[6] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४४, कलम ६३ अन्वये ही नोंद समाविष्ट करण्यात आली.

[7] सन १९२१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ४ अन्वये निरसित केलेला मजकूर गाळण्यात आला आणि हे निरसन १ एप्रिल १९२० पासून अंमलात येईल.

[8] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ६ अन्वये ही नोंद बदली दाखल करण्यात आली.

[9] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १० (ब) अन्वये परंतूक वगळण्यात आले.

## मालमत्ता कर

### [1][पट्टीयोग्य मूल्य किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्य यावर बसविण्याजोगे मालमत्ता कर]

मालमत्ता करात कोणत्या करांचा समावेश होतो.

[2][ **१३९अ.** (१) या अधिनियमान्वये बृहन्मुंबईतील इमारती व जमिनी यावर बसण्याजोग्या मालमत्ता करात, पाणी पट्टी, पाणी लाभ कर, मलनिस्सारण कर, मलनिस्सारण लाभ कर, सर्वसाधारण कर, शिक्षण उपकर, पथकर व सुधार आकार यांचा अंतर्भाव असेल.

(२) मालमत्ता कर बसविण्याच्या प्रयोजनासाठी, "इमारत" या शब्दप्रयोगामध्ये, सदनिका, गाळा, युनिट किंवा इमारतीचा कोणताही भाग यांचा अंतर्भाव होतो.

(३) सर्व किंवा कोणतेही मालमत्ता कर श्रेणीत प्रमाणावर लादता येतील.

(४) या अधिनियमात अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त, महानगरपालिका, कलम १४०अ अन्वये, इमारतींवर व जमिनींवर त्यांच्या भांडवली मूल्याच्या आधारे कोणतेही किंवा सर्व मालमत्ता कर बसविण्याच्या पद्धतीचा स्वीकार करेपर्यंत, अशा इमारतींच्या व जमिनींच्या पट्टीयोग्य मूल्यावर सर्व मालमत्ता कर बसविणे महानगरपालिकेने चालू ठेवणे हे कायदेशीर असेल.]

[7][पट्टीयोग्य मूल्य किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्य यावर बसविण्याजोगे मालमत्ता कर ते कोणत्या दरांनी बसवण्याजोगे असतील.]

**१४०.** [3][(१)] [4][बृहन्मुंबईतील इमारती व जमिनी यांवर पुढील मालमत्ता कर बसविण्याजोगे असतील.]

(अ) (एक) पाणीपुरवठा करण्यासाठी, मालमत्तांच्या पट्टीयोग्य मूल्याच्या [5][किंवा, यथास्थिति, त्यांच्या भांडवली मूल्याच्या] [6][स्थायी समितीस] आवश्यक वाटेल अशा शेकडा प्रमाणातील अतिरिक्त पाणी पट्टी ;

(दोन) ज्याला "पाणी लाभ कर" असे संबोधण्यात येईल अशा पाणीपुरवठ्याच्या सोयी करण्यासाठी आणि त्यामध्ये सुधारणा करण्यासाठी आणि अशा कामांचे परिरक्षण करण्यासाठी व ती चालविण्यासाठी भांडवली कामांवर झालेला किंवा करावयाचा संपूर्ण खर्च किंवा त्याचा काही भाग भागविण्यासाठी मालमत्तांच्या पट्टीयोग्य मूल्यांच्या [5][किंवा, यथास्थिति, त्यांच्या भांडवली मूल्याच्या] [6][स्थायी समितीस] आवश्यक वाटेल तितक्या शेकडा प्रमाणातील अतिरिक्त पाणी कर;

(ब) (एक) मानवी मल व इतर टाकाऊ पदार्थ गोळा करणे, काढून नेणे आणि त्यांची विल्हेवाट लावणे यांसाठी मालमत्तांचा पट्टीयोग्य, मूल्याच्या [5][किंवा, यथास्थिति, त्यांच्या भांडवली मूल्याच्या] [6][स्थायी समितीस] आवश्यक वाटेल तितक्या शेकडा प्रमाणातील मलनिस्सारण कर ;

(दोन) मानवी मल व इतर टाकाऊ पदार्थ गोळा करणे, काढून नेणे त्यांची विल्हेवाट लावणे यासंबंधीच्या सोयी करण्यासाठी आणि त्यात सुधारणा करण्यासाठी आणि अशा कामाचे परिरक्षण करण्यासाठी व ती चालविण्यासाठी भांडवली स्वरूपाच्या कामावर झालेला किंवा करावयाचा संपूर्ण खर्च किंवा त्याचा काही भाग भागविण्यासाठी मालमत्तांच्या पट्टीयोग्य, मूल्याच्या [5][किंवा, यथास्थिति, त्यांच्या भांडवली मूल्याच्या] [6][स्थायी समितीस] आवश्यक वाटेल तितक्या शेकडा प्रमाणातील अतिरिक्त मलनिस्सारण कर; याला "मलनिस्सारण लाभ कर" असे संबोधण्यात येईल;]

सर्वसाधारण कर.

(क) आणि कलम ६१, खंड (के) खाली प्रकरण १४ खाली उद्‌भवणारी महानगरपालिकेची कर्तव्ये बजावण्यासाठी आवश्यक असलेल्या खर्चासाठी तरतूद करण्याकरिता, त्यांच्या पट्टीयोग्य मूल्याच्या आठ टक्क्यांहून कमी नसेल आणि [8][पन्नास] टक्क्याहून अधिक नसेल [9][किंवा, यथास्थिति, त्यांच्या भांडवली मूल्याच्या ०.१ टक्क्यांहून कमी नसेल आणि १ टक्क्याहून अधिक नसेल] इतक्या प्रमाणातील सर्वसाधारण कर, व त्यासह त्यांच्या मूल्याच्या एक अष्टमांश टक्क्यांहून कमी नसेल आणि [11][पाच टक्क्यांहून अधिक नसेल] [10][किंवा, यथास्थिति, त्यांच्या भांडवली मूल्याच्या ०.१ टक्क्यांहून कमी नसेल आणि ०.२ टक्क्याहून अधिक नसेल] इतकी रक्कम ;

---

[1] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ३ अन्वये कलम १३९ अ समाविष्ट करण्यात आले.

[3] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम १६(१) अन्वये कलम १४० ला पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला आणि खंड (अ) आणि (ब) दाखल करण्यात आले.

[4] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४(२)(क) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ४(२)(ख) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[6] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ७६ अन्वये "महापौरासह परिषद" या मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[7] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४(१) अन्वये मूळ समासटीपेऐवजी ही समासटीप दाखल करण्यात आली.

[8] सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २(अ) अन्वये " सव्वीस " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[9] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४(२)(ग)(एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[10] वरील अधिनियमाच्या कलम ४(२)(ग)(दोन) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[11] सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम २(ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][(कअ) कलम १९५ई खाली बसवण्याजोगा शिक्षण उपकर ;] शिक्षण उपकर.
[२][(कब) कलम १९५ग खाली बसवण्याजोगा पथकर ;]
[३][(ड) प्रकरण बारा-अ खाली बसवण्याजोगा सुधार आकार.]
[४]* * * *

१९७३ चा महाराष्ट्र अध्यादेश ३.

[५][(२) मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, १९७३ याच्या प्रारंभानंतर, पाणी कर किंवा हलालखोर कर यासंबंधी या अधिनियमात किंवा कोणत्याही संलेखात आलेला कोणताही निर्देश हा, संदर्भानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे पाणीपट्टी किंवा पाणी लाभ कर किंवा हे दोन्ही किंवा मलनिस्सारण कर किंवा मलनिस्सारण लाभ कर किंवा हे दोन्ही यासंबंधीचा निर्देश आहे असा अन्वय लावण्यात येईल.]

[६]* * * *

भांडवली मुल्यांवर बसवावयाचे मालमत्ता कर आणि त्यांचा दर.

[७][**१४०अ.** [८][(१)] या अधिनियमाच्या कलम १४० मध्ये किंवा इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेस कलम १२८ च्या तरतुदींनुसार निर्धारित करता येईल अशा दरांनी अशा दिनांकास आणि त्या दिनांकापासून इमारतींच्या व जमिनींच्या भांडवली मूल्यांच्या आधारे **बृहन्मुंबईतील** इमारतींवर व जमिनींवर मालमत्ता कर बसविण्याची पद्धत स्वीकारण्याचा ठराव महानगरपालिकेला संमत करता येईल :

परंतु, ज्या दिनांकास भांडवली मूल्यावर असा मालमत्ता कर बसविण्यात आला असेल अशा दिनांकास व त्या दिनांकापासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी, असा कर,—

(एक) निवासी प्रयोजनांसाठी वापरण्यात येणाऱ्या इमारतींच्या बाबतीत, अशा दिनांकाच्या लगतपूर्वीच्या वर्षामध्ये त्यांच्या बाबतीत बसविण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या रकमेच्या दुप्पट रकमेपेक्षा अधिक असणार नाही, आणि

(दोन) अनिवासी प्रयोजनांसाठी वापरण्यात येणाऱ्या इमारतींच्या किंवा जमिनींच्या बाबतीत, अशा दिनांकाच्या लगतपूर्वीच्या वर्षामध्ये त्यांच्या बाबतीत बसविण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या रकमेच्या तिप्पट रकमेपेक्षा अधिक असणार नाही :

[९][परंतु, आणखी असे की, ज्या कोणत्याही निवासी किंवा अनिवासी इमारतीच्या किंवा तिच्या भागाच्या बाबतीतील मालमत्ता कर हा, संमती-नि-परवानगी आकार (लिव्ह ॲन्ड लायसन्स आकार) मग तो कोणत्याही नावाने संबोधला गेला असेल, विचारात घेऊन आलेल्या वार्षिक भाडे मूल्याच्या आधारे बसविला असेल अशा इमारती व तिच्या भागाच्या संबंधात, पहिल्या परंतुकाच्या प्रयोजनार्थ, अशा लगतपूर्वीच्या वर्षामध्ये बसविण्यायोग्य असलेला असा मालमत्ता कर हा, अशी इमारत किंवा तिच्या भागाचा स्वतः भोगवटा करीत असल्याप्रमाणे आणि तशी निर्धारण पुस्तकात नोंद घेतली असल्याप्रमाणे, निश्चित करणे आयुक्तास विधिसंमत असेल :]

परंतु, [१०][तसेच] कलम १५४ च्या पोट-कलम (१क) अन्वये सुधारीत केल्यानंतर निश्चित केलेल्या, कोणत्याही इमारतींच्या किंवा जमिनींच्या भांडवली मूल्याच्या आधारे बसवलेला मालमत्ता कर हा, काहीही झाले तरी, अशा सुधारणा केलेल्या वर्षाच्या लगतपूर्वीच्या वर्षामध्ये देय असलेल्या मालमत्ता कराच्या ४० टक्के इतक्या रकमेहून अधिक असणार नाही :

---

[१] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ५ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.
[२] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ९ अन्वये खंड, (कब) समाविष्ट करण्यात आला.
[३] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम ९, अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.
[४] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४ (२)(घ) अन्वये हे स्पष्टीकरण वगळण्यात आले.
[५] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम १६(२) अन्वये पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात आले.
[६] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४ (२)(ङ) अन्वये हे परंतुक वगळण्यात आले.
[७] वरील अधिनियमाच्या कलम ५ अन्वये कलम १४०अ समाविष्ट करण्यात आले.
[८] सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३ अन्वये कलम १४०अ ला त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला आणि पोट-कलमे (२) व (३) जादा दाखल करण्यात आली.
[९] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३(१)(अ) अन्वये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.
[१०] वरील अधिनियमाच्या कलम ३(१)(ब) अन्वये " आणखी असे की " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

परंतु, असेही की, कलम १४०अ अन्वये मालमत्ता कर बसविण्याकरिता आधारभूत म्हणून भांडवली मूल्याचा स्वीकार केल्याच्या वर्षापासून पाच वर्षांच्या कालावधीकरिता ४६.४५ चौ. मीटर (५०० चौ. फूट) किंवा त्याहून कमी चटई क्षेत्र असलेल्या निवासी इमारतींच्या किंवा निवासी गाळ्यांच्या बाबतीत बसविण्यायोग्य असलेली मालमत्ता कराची रक्कम ही अशाप्रकारे आधारभूत म्हणून भांडवली मूल्याचा स्वीकार केलेल्या वर्षाच्या लगतपूर्वीच्या वर्षामध्ये बसविलेल्या व देय असलेल्या मालमत्ता कराच्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही.

**स्पष्टीकरण.—**या कलमाच्या प्रयोजनाकरिता, महापालिका जेव्हा इमारतीच्या भांडवली मूल्याच्या आधारे मालमत्ता कर बसविण्यास सुरुवात करील त्यानंतर अशा करपात्र इमारतींचे मालमत्ता कर प्रत्येक पाच वर्षांच्या कालावधीनंतर सुधारित करण्यात येईल आणि अशा प्रत्येक वेळी बसविण्यात येणारा मालमत्ता कर हा, अशा सुधारणा करण्यात येणाऱ्या लगतपूर्वीच्या वर्षामध्ये देय असलेल्या मालमत्ता कराच्या ४० टक्केहून अधिक असणार नाही.]

[1][[2][(२) कलम १३९अ च्या पोट-कलम (४) मध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये किंवा महानगरपालिकेने भांडवली मूल्याच्या आधारे मालमत्ता कर बसविण्याच्या पद्धतीचा स्वीकार करण्यासाठी संमत केलेला ठराव, कोणताही असल्यास, त्यामध्ये, काहीही अंतर्भूत असले तरी, मात्र कलम १५४अ च्या तरतुदींना अधीन राहून, महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०१० याचे कलम ३ अंमलात येण्याच्या दिनांकास म्हणजेच दिनांक २६ ऑगस्ट २०१० रोजी भांडवली मूल्य निश्चित करण्याची प्रक्रिया चालू असलेल्या इमारती व जमिनी यांच्या संबंधात, परंतु त्यांचे भांडवल ते अशा रीतीने निश्चित होईपर्यंत, अशा इमारती व जमिनी यांच्या संबंधात बसविण्यायोग्य व देय असलेला मालमत्ता कर हा, मागील वर्षामध्ये, म्हणजेच १ एप्रिल २००९ रोजी सुरू होणाऱ्या वर्षाकरिता ३१ मार्च २०१० रोजी संपणाऱ्या वर्षाकरिता बसविण्यायोग्य व देय असलेल्या कराच्या रकमेइतका, तात्पुरता असेल ; आणि वर्ष [3][२०१०-२०११, २०११-२०१२ व २०१२-२०१३] या प्रत्येक वर्षासाठी असा तात्पुरता कर हा, अशा प्रत्येक वर्षासाठी स्वतंत्रपणे बजावण्यात येईल अशा तात्पुरत्या बिलानुसार बसविण्यायोग्य व देय असेल तथापि, असे असले तरी, संबंधित इमारतीच्या व जमिनीचे भांडवली मूल्य निश्चित झाल्यावर, मालमत्ता कराच्या निर्धारणाच्या भांडवली मूल्यावर आधारित एक अंतिम बिल त्यानंतर उपरोक्तप्रमाणे अशा प्रत्येक वर्षासाठी बजावण्यात येईल. अशा अंतिम निर्धारणानंतर, निर्धारितीने अधिक रक्कम भरली आहे असे आढळून आले तर, कलम १७९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, अशी अधिक रक्कम, अंतिम बिल बजावल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत, आणि कलम २१७ चे पोट-कलम (५) च्या पहिल्या परंतुकामध्ये तरतूद केल्याप्रमाणे अशा दिनांकापासून व्याजासह, परत करण्यात येईल किंवा निर्धारितीची संमती मिळवून, पुढील वर्षाच्या मालमत्ता कराच्या देय रकमेचा, कोणतीही असल्यास, प्रदान म्हणून ती रक्कम समायोजित करण्यात येईल ; आणि अंतिम निर्धारणानंतर कराची रक्कम ही निर्धारितीने यापूर्वीच भरलेल्या कराच्या रकमेपेक्षा अधिक असेल तर, यांतील फरकाची रक्कम निर्धारितीकडून वसूल करण्यात येईल.

[4][(२-अ) पोट-कलमे (१) किंवा (२) मध्ये किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, दिनांक १ एप्रिल २०१० रोजी किंवा त्यानंतर पहिल्यांदाच निर्धारण केले जाण्यास पात्र असलेल्या इमारती व जमिनी यांवरील कर हा, तात्पुरत्या स्वरूपात, जणू काही अशा इमारती व जमिनी या २००९-२०१० वर्षामध्ये निर्धारण केल्या जाण्यास पात्र आहेत असे समजून, बसविलेल्या कराइतका असेल ; आणि अशा इमारती व जमिनींचे भांडवली मूल्य निश्चित करण्यात आल्यानंतर, महानगरपालिकेला त्यांच्या भांडवली मूल्याच्या आधारे त्या ज्या वर्षासाठी निर्धारण केल्या जाण्यास पात्र आहेत त्या वर्षांच्या संबंधात एक अंतिम बील बजावता येईल आणि त्यानुसार अशा इमारतींच्या किंवा जमिनींच्या मालकाने अथवा भोगवटादाराने उपरोक्तप्रमाणे बजाविलेल्या बिलामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत असा कर भरणे, हे त्यांचे कर्तव्य असेल.]

[1] सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३ अन्वये ही पोट-कलमे दाखल करण्यात आली.

[2] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३(२) अन्वये पोट-कलम (२) दाखल करण्यात आले.

[3] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ३ (क) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ३ (ख) अन्वये पोट-कलम (२अ) समाविष्ट करण्यात आले.

(३) कलम १६३ किंवा २१७ किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी ; आणि पोट-कलम (२) च्या तरतुदींनुसार बजावण्यात आलेले मालमत्ता कराचे बील हे अंतिम बिल नसेल ही वस्तुस्थिती लक्षात घेता, अशा बिलावर कोणत्याही मंचासमोर हरकत घेता येणार नाही ; आणि या बिलाची विषयवस्तू असलेल्या ज्या मालमत्तेच्या संबंधात भांडवली मूल्य निश्चित करण्यात आलेले नाही अशा बिलाविरुद्ध किंवा महानगरपालिकेने निर्धारित केलेल्या मालमत्ता कराच्या दराने बसविण्यायोग्य आणि देय असलेल्या कराची रक्कम ही अद्याप अंतिमत: निश्चित करण्यात आलेली नाही या कारणावरून किंवा अन्य कोणत्याही कारणावरून, कोणतीही तक्रार किंवा अपील दाखल करता येणार नाही.]

कोणत्या परिवास्तूंवर [3][पाणीकर] बसवता येतील.

**१४१.** [1][(१)] कलम १६९ च्या तरतुदींच्या अधीनतेने, पुढील परिवास्तूंच्या बाबतीतच फक्त पाणी कर बसवण्यात येईल :—

(अ) ज्या परिवास्तूंना कोणत्याही महानगरपालिका जलदाय व्यवस्थेतून खाजगीरीत्या पाणीपुरवठा होत असेल किंवा ज्या परिवास्तूंचे कोणत्याही महानगरपालिका जलदाय व्यवस्थेशी संक्रमण नळांच्या सहाय्याने संयोजन केलेले असेल अशा परिवास्तू ; अथवा

(ब) [2][बृहन्मुंबईच्या] ज्या भागांशात आयुक्ताने अशा भागांशातील परिवास्तूंना वाजवी पाणीपुरवठा करण्यासाठी नगरपालिका जलदाय व्यवस्थेतून पुरेसे पाणी मिळू शकेल अशी जाहीर नोटीस दिली असेल, त्या भागांशात असलेल्या परिवास्तू.

[4][(२) कलम १६९ च्या तरतुदींच्या अधीनतेने, बृहन्मुंबईत स्थित असलेल्या सर्व परिवास्तूंच्या बाबतीत पाणी लाभ कर बसविण्यात येईल, मात्र भारत सरकारने तशी मान्यता दिलेल्या विदेशी राष्ट्राच्या महा वाणिज्यदूत, वाणिज्यदूत, उप वाणिज्यदूत, वाणिज्यिक अभिकर्ता, प्रति-वाणिज्यदूत अशा नावाने किंवा अन्य कोणत्याही नावाने संबोधण्यात येणाऱ्या कोणत्याही कॉन्स्यूल द कॅरिअर (Consul de carrier) याच्याकडे, अथवा अशा अधिकाऱ्यांच्या कर्मचारी वर्गाच्या (भारतीय नागरिक नसलेल्या) कोणत्याही सदस्यांकडे, निहित असलेल्या किंवा ते भोगवटा करीत असलेल्या इमारती व जमिनी किंवा त्यांचे भाग यांना, आणि नफ्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा उद्देश असलेल्या इमारती व जमिनी किंवा त्यांचे भाग यांना यातून वगळण्यात येईल.]

[6][मलनिस्सारण कर] कोणत्या परिवास्तूंवर बसवता येईल.

**१४२.** (१) [5][कलम १७० च्या तरतुदींच्या अधीनतेने मलनिस्सारण कर] फक्त पुढील परिवास्तूंच्या बाबतीतच बसविण्यात येईल :—

(अ) संडास, मुत्र्या व मलकुंडी यातून मलमुत्र व दूषित पदार्थ गोळा करणे, काढून नेणे व त्यांची विल्हेवाट लावणे ही कामे महानगरपालिका अभिकरणामार्फत केली जातील अशी जाहीर नोटीस आयुक्ताने [2][बृहन्मुंबईच्या] ज्या कोणत्याही भागांशात दिली असेल त्या भागांशात असलेली परिवास्तू ; अथवा

(ब) त्या कोठेही असल्या तरी तेथे-तेथे, नगरपालिका नालीशी मिळणाऱ्या एखाद्या नालीच्या सहाय्याने जोडलेला संडास, जलधौत संडास, मलकुंडी, मुत्री, स्नानाची जागा किंवा स्वयंपाकाची जागा असेल अशी परिवास्तू.

---

[1] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम १७(१) अन्वये कलम १४१ ला पोट-कलम (१) असा फेर क्रमांक देण्यात आला व पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात आले.

[2] सन १९९६ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(१) द्वारे " ग्रेटर बॉम्बे " या ऐवजी " बृहन्मुंबई " हा शब्द दाखल करण्यात आला.

[3] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम १७(२) अन्वये " पाणी कर " या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ४ अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम १ एप्रिल १९६७ पासून दाखल झाल्याचे मानण्यात आले.

[5] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम १८(अ) अन्वये " हलालखोर कर" या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] वरील अधिनियमाच्या कलम १८(ड) अन्वये "हलालखोर कर" या ऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

(२) परंतु, आयुक्ताच्या मते, उपरोक्तप्रमाणे असेल अशा कोणताही पदार्थ खंड (अ) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे [१][बृहन्मुंबईतील] ज्या कोणत्याही परिवास्तूंच्या भागांशात किंवा परिवास्तूवर साचत नसेल किंवा ठेवला जात नसेल अशा कोणत्याही परिवास्तूच्या संबंधात उक्त कर बसवण्यात येणार नाही.

(३) एखाद्या परिवास्तूसाठी स्वतंत्र जलधौत संडास, शौचकूप किंवा मुत्री असण्याची आवश्यकता नाही असा आयुक्ताने कलम २४८ च्या पोट-कलम (२) [२][किंवा (३)] खाली निदेश दिला असेल तरीसुद्धा, असा निदेश दिला नसता तर त्यांच्या संबंधात जो [३][मलनिस्सारण कर] बसवण्याजोगा असेल तो उक्त परिवास्तूंच्या संबंधात बसवण्यात येईल.

[४][(४) कलम १७० च्या तरतुदींच्या अधीनतेने, बृहन्मुंबईत स्थित असलेल्या सर्व परिवास्तुंच्या बाबतीत मलनिस्सारण लाभ कर बसवण्यात येईल, मात्र भारत सरकारने तशी मान्यता दिलेल्या विदेशी राष्ट्राच्या महा वाणिज्यदूत, वाणिज्यदूत, उप वाणिज्यदूत, वाणिज्यिक अभिकर्ता, प्रति-वाणिज्यदूत अशा नावाने किंवा अन्य कोणत्याही नावाने संबोधण्यात येणाऱ्या कोणत्याही कॉन्स्यूल द कॅरिअर (Consul de carrier) याच्याकडे, अथवा अशा अधिकाऱ्यांच्या कर्मचारी वर्गाच्या (भारतीय नागरिक नसलेल्या) कोणत्याही सदस्यांकडे, निहित असलेल्या किंवा ते भोगवटा करीत असलेल्या इमारती व जमिनी किंवा त्यांचे भाग यांना, आणि नफ्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा उद्देश असलेल्या इमारती व जमिनी किंवा त्यांचे भाग यांना यातून वगळण्यात येईल.]

सर्वसाधारण कर कोणत्या परिवास्तूंवर बसवता येईल.

**१४३.** (१) सर्वसाधारण कर, पुढील इमारती व जमिनी खेरीजकरून [५][बृहन्मुंबईतील] सर्व इमारतींवर व जमिनींवर बसवण्यात येईल :—

[६][(अ) सार्वजनिक पूजेअर्चेसाठीच किंवा धर्मादाय प्रयोजनांसाठी अनन्यतः भोगवट्यात असलेल्या इमारती व जमिनी किंवा त्यांचे भागांश ;

(ब) [७][ सार्वजनिक प्रयोजनांसाठीच अनन्यतः वापरण्यात येणाऱ्या व फायदा मिळवण्यासाठी वापरण्यात येत नसलेल्या किंवा वापरण्याचा इरादा नसलेल्या] ज्या इमारती व जमिनी [८][ शासनामध्ये] निहित आहेत अथवा ज्या इमारती व जमिनी महानगरपालिकेमध्ये निहित असून ज्यांच्या बाबतीत असा कर बसवला तर यात यापुढे दिलेल्या तरतुदींखाली तो प्रथमतः अनुक्रमे [९][शासनाकडून] किंवा महानगरपालिकेकडून वसूल करता येईल त्या इमारती व जमिनी ;

---

[१] सन १९९६ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(१) द्वारे " ग्रेटर बॉम्बे " या ऐवजी " बृहन्मुंबई " हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १९११ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ५ अन्वये "किंवा (३)" हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम १८(ब) अन्वये " हलालखोर कर" या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ५ अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम १ एप्रिल, १९६७ पासून दाखल झाल्याचे मानण्यात आले.

[५] सन १९११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(१) द्वारे " ग्रेटर बॉम्बे " या ऐवजी " बृहन्मुंबई " हा शब्द दाखल करण्यात आला.

[६] सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ६(१) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[७] सन १९९१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम १२ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[८] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ शब्दांऐवजी " शासन " हा शब्द त्याच्या व्याकरणिक रूपभेदासह दाखल करण्यात आला.

[९] वरील आदेशान्वये " बादशहा " या शब्दाऐवजी " शासन " हा शब्द त्याच्या व्याकरणिक रूपभेदासह दाखल करण्यात आला.

[१][ (क) भारत सरकारने तशी मान्यता दिलेल्या विदेशी राष्ट्राच्या महा वाणिज्यदूत, वाणिज्यदूत, उप वाणिज्यदूत, वाणिज्यिक अभिकर्ता, प्रति-वाणिज्यदूत अशा नावाने किंवा अन्य कोणत्याही नावाने संबोधण्यात येणाऱ्या कोणत्याही कॉन्स्यूल द कॅरिअर (Consul de Carrier) याच्याकडे, अथवा अशा अधिकाऱ्यांच्या कर्मचारी वर्गांच्या (भारतीय नागरिक नसलेल्या) कोणत्याही सदस्यांकडे, निहित असलेल्या किंवा ते भोगवटा करीत असलेल्या इमारती व जमिनी किंवा त्यांचे भाग यांना, आणि नफ्याच्या प्रयोजनाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा उद्देश असलेल्या इमारती व जमिनी किंवा त्यांचे भाग यांना यातून वगळण्यात येईल.]

(२) पुढील इमारती [२][ व जमिनी किंवा त्यांचे भागांश] हे खंड (अ) च्या अर्थांतर्गत [३]* * * * * * अनन्यतः सार्वजनिक पूजेअर्चेसाठी किंवा धर्मादाय प्रयोजनासाठी भोगवट्यात आहेत असे मानले जाणार नाही.

(क) ज्यात कोणताही उदीम किंवा धंदा चालवला जातो [४][त्या]; आणि

(ड) ज्यापासून भाडे घेतले जाते [४][त्या]; मग अशा भाड्याचे उपयोजन अनन्यतः धार्मिक किंवा धर्मादाय प्रयोजनासाठी करण्यात येत असो वा नसो.

[५][(३) जेव्हा कोणत्याही इमारतीचा किंवा जमिनीचा कोणताही भागांश अनन्यतः सार्वजनिक पूजेअर्चेसाठी किंवा धर्मादाय प्रयोजनासाठी भोगवट्यात आहे या कारणावरून त्यास सर्वसाधारण कराची माफी देण्यात आली असेल तेव्हा, असा भागांश नगरपालिका कराधानाच्या प्रयोजनाकरिता स्वतंत्र मालमत्ता आहे, असे मानले जाईल.]

यथास्थिति, केंद्र सरकारने [७]* * * किंवा [८][राज्य] शासनाने सर्वसाधारण कराऐवजी महानगरपालिकेस द्यावयाची रक्कम.

**१४४.** (१) [६][शासनामध्ये] निहित असलेल्या इमारतींना व जमिनींना कलम १४३, खंड (ब) अन्वये ज्या सर्वसाधारण कराची माफी देण्यात आली असेल अशा सर्वसाधारण कराच्या ऐवजी पोट-कलमे (२) आणि (३) यांत तरतूद केलेल्या रितीने विनिश्चित केलेली एक रक्कम, [१०][यथास्थिति, केंद्र सरकार, [७]* * * * किंवा [८][राज्य] शासन] महानगरपालिकेस प्रतिवर्षी देईल.

(२) [६][शासनामध्ये] निहित असलेल्या व किफायतशीररित्या भोगवट्यात असलेल्या [९][बृहन्मुंबईतील] ज्या इमारतींच्या व जमिनींच्या संबंधात उक्त माफीच्या अभावी [१०][यथास्थिति, केंद्र सरकारकडून [७]* * * * किंवा [८][राज्य] शासनाकडून] सर्वसाधारण कर वसूल केला असता त्या इमारतींचे व जमिनीचे पट्टीयोग्य मूल्य [८][राज्य] [११][शासन] महानगरपालिकेच्या सहमतीने याबाबतीत वेळोवेळी

[१] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ६ अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[२] सन १९९१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ६(२)(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ६(२) (ब) अन्वये निरसित केलेला मजकूर वगळण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ६(२)(क) अन्वये "अशा इमारती" या शब्दाऐवजी "त्या" हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ६(३) अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[६] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ शब्दांऐवजी " शासन " हा शब्द त्याच्या व्याकरणिक रुपभेदासह दाखल करण्यात आला.

[७] भारतीय (विद्यमान भारतीय विधी अनुकूलन) आदेश, १९४७ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[८] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[९] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१)४(१) अन्वये " ग्रेटर बॉम्बे " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[१०] भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेशान्वये, मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[११] भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेशान्वये, मूळ शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

नेमील अशी व्यक्ती निश्चित करील. उक्त व्यक्ती उक्त मूल्य हे मालमत्ता कर निर्धारण्याजोग्या मालमत्तेच्या मूल्यांकनासंबंधी यात नंतर असलेल्या तरतुदी सर्वसाधारणपणे लक्षात घेऊन त्यास योग्य व न्याय्य वाटेल अशा रकमेएवढे निश्चित करील. याप्रमाणे नेमलेल्या व्यक्तीने दिलेला निर्णय पाच .......... [1][शासनामध्ये] निहित असलेल्या [2][बृहन्मुंबईतील] इमारतींची व जमिनींची संख्या किंवा विस्तार यात महत्त्वाची वाढ किंवा घट झाली तर त्या वाढीच्या किंवा घटीच्या प्रमाणातच अशा रकमेत फरक होईल.

[3][(२अ) महानगरपालिकेने इमारतींच्या व जमिनींच्या भांडवली मूल्यावर मालमत्ता कर बसविण्याची पद्धत स्वीकारली असेल तर, शासनाकडे निहित असलेल्या व किफायतशीररित्या भोगवट्यात असलेल्या बृहन्मुंबईतील ज्या इमारतींच्या व जमिनींच्या संबंधात, उक्त माफी दिली गेली नसती तर, केंद्र सरकारकडून किंवा, यथास्थिति, राज्य शासनाकडून सर्वसाधारण कर बसविण्यात आला असता, त्याबाबतीत त्या इमारतींचे व जमिनींचे भांडवली मूल्य हे शासकीय अभिलेख्यामधील अशा जमिनींच्या किंवा इमारतींच्या पुस्तक मूल्याइतके असेल, आणि असे भांडवली मूल्य पाच वर्षांच्या मुदतीकरिताअंमलात राहिल; मात्र दरम्यान, शासनाकडे निहित असलेल्या बृहन्मुंबईतील इमारतींची व जमिनींची संख्या किंवा व्याप्ती यात मोठ्या प्रामाणात वाढ किंवा घट झाली तर त्या वाढीच्या किंवा घटीच्या प्रमाणातच अशा मूल्यात बदल होईल.]

(३) [4][यथास्थिति, केंद्र सरकारने [5]* * * किंवा [6][राज्य] शासनाने] महानगरपालिकेस प्रतिवर्षी द्यावयाची रक्कम ही [2][बृहन्मुंबईतील] इमारतींच्या व जमिनींच्या सामान्य मालकाकडून पोट-कलम (२) [7][किंवा, यथास्थिति, पोट-कलम (२अ)] खाली निश्चित केलेल्या तितक्याच रकमेच्या पट्टीयोग्य मूल्यावर [8][किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्यावर] सर्वसाधारण कराबद्दल जेवढी रक्कम प्रदेय झाली असती त्या रकमेच्या आठ दशांशाइतकी असेल.

मालमत्ता कर देण्याबाबत सवलत.

[9][**१४४अ.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्यामध्ये, महानगरपालिकेने किंवा राज्य शासनाने या कलमाच्या प्रयोजनासाठी नेमून दिलेली कोणतीही सामाजिकदृष्ट्या किंवा पारिस्थितिकीय लाभदायक योजना अंमलात आणण्यात येत आहे, अशा इमारतींच्या व जमिनींच्या संबंधात देय असलेल्या मालमत्ता कराच्या संबंधातील सवलत, महानगरपालिका निर्धारित करील अशा मालमत्ता कराच्या टक्केवारीच्या मर्यादेपर्यंत देता येईल.]

---

[1] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ शब्दांऐवजी " शासन " हा शब्द त्याच्या व्याकरणिक रुपभेदासह दाखल करण्यात आला.

[2] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१)४(१) अन्वये " ग्रेटर बॉम्बे " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[3] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ६(१) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[4] भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेशान्वये, " सेक्रेटरी ऑफ स्टेट फॉर इंडिया इन कौन्सिल " या ऐवजी " केंद्र सरकार किंवा बादशहाचा प्रतिनिधी किंवा यथास्थिति, प्रांतिक सरकार " हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] भारतीय (विद्यमान भारतीय विधी अनुकूलन) आदेश, १९४७ अन्वये " किंवा बादशहाचा प्रतिनिधी " हा मजकूर वगळण्यात आला.

[6] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[7] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ६(२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[8] वरील अधिनियमाच्या कलम ६(२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[9] वरील अधिनियमाच्या कलम ७ अन्वये हे कलम शब्द दाखल करण्यात आले.

[१][**स्पष्टीकरण.—**या कलमाच्या प्रयोजनार्थ, “ पारिस्थितिकीय लाभदायक योजना ” यात, पावसाचे पाणी साठविण्याची यंत्रणा, मिश्र खत, सौरऊर्जेचा वापर आणि इतर ऊर्जेची अपारंपारिक साधने, सांडपाण्याचे पुनर्चक्रण व पुनर्वापर किंवा पर्यावरणानुकूल आणि पारिस्थितिकीय लाभदायक इमारत बांधकामास चालना देणारी कोणतीही योजना किंवा महानगरपालिकेने किंवा राज्य शासनाने निश्चित केलेली यासारखी योजना यांचा समावेश होतो.]

[२][**१४४ब.** कलम १४० किंवा १४०अ मध्ये अथवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना (सुधारणा) अधिनियम, १९९५ याच्या प्रारंभाचा दिनांक किंवा निवासी प्रयोजनाकरिता वापरण्यात येणाऱ्या जागेचा प्रथमच भोगवटा केल्याचा दिनांक यांपैकी जो नंतरचा असेल त्या दिनांकापासून वीस वर्षांच्या कालावधीमध्ये, राज्य शासन **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी निश्चित करील अशा कमी केलेल्या दरांनी इमारतींवर मालमत्ता कर बसविण्यात येईल आणि निरनिराळ्या कालावधीसाठी व इमारतींच्या निरनिराळ्या वर्गांसाठी निरनिराळे कमी केलेले दर निश्चित करता येतील, मग अशा इमारती अशा प्रारंभापूर्वी किंवा प्रारंभानंतर बांधलेल्या असोत, अशा इमारती पुढीलप्रमाणे असतील :—

विवक्षित इमारतीच्या संबंधात कमी केलेल्या दराने मालमत्ता कर बसविण्यासाठी तात्पुरत्या तरतुदी.

१९९६ चा महा.५.

(अ) [३][महानगरपालिकेकडून, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून किंवा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाकडून] किंवा महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ अन्वये घोषित करण्यात आलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेखाली आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकांकरिता आणि कमी उत्पन्न गटासाठी कमी खर्चात घरे बांधण्याच्या योजनेखाली बांधण्यात आलेल्या इमारती, किंवा

१९७१ चा महा.२८.

(ब) बांधण्यात आलेल्या ज्या इमारतींमध्ये सार्वजनिक गृहनिर्माण (PH) किंवा दाट लोकवस्ती गृहनिर्माण (HDH), बेघरांसाठी गृहनिर्माण (HD) यांसाठी असलेल्या विकास योजनेमध्ये नियतवाटप केलेल्या, नेमून दिलेल्या किंवा राखून ठेवलेल्या भूखंडावर प्रकल्प बाधित व्यक्तींकरिता बांधण्यात आलेल्या गाळ्यांचा भाग आहे आणि ज्या भूखंडांचा महानगरपालिकेने किंवा सार्वजनिक प्राधिकरणाने किंवा मालकाने विकास किंवा पुनर्विकास केला असून ज्यांच्या बाबतीत, बेघरांसाठी गृहनिर्माण योजनेअन्वये किंवा सार्वजनिक गृहनिर्माण वा दाट लोकवस्ती गृहनिर्माण योजनेंअन्वये, मालकाने, प्रकल्प बाधित व्यक्तींसाठी नियतवाटप करण्याकरिता किंवा त्या भूखंडावरील विद्यमान भाडेकरुंचे पुनर्वसन करण्याकरिता किंवा अशा व्यक्ती किंवा भाडेकरू या दोघांचे पुनर्वसन करण्याकरिता आणि महानगरपालिकेने हाती घेतलेल्या प्रकल्पांमुळे बाधित झालेल्या व्यक्तींचे पुनर्वसन करण्याकरिता बांधिव क्षेत्रापैकी किमान पन्नास टक्के किंवा, यथास्थिति, दहा टक्के बांधिव क्षेत्र महानगरपालिकेकडे मोफत सुपूर्द करणे आवश्यक आहे अशा इमारती; किंवा

(क) आगीने नष्ट झालेली किंवा कोसळलेली अथवा पाडलेली आणि पुनर्बांधकाम केलेली इमारत; किंवा

(ड) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (MHADA) ; किंवा महानगरपालिका यांनी हाती घेतलेल्या नगर नवीकरण योजनेखाली बांधण्यात आलेल्या उपकरप्राप्त इमारती; किंवा

---

[१] सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ४ अन्वये स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

[२] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ८ अन्वये हे कलम दाखल करण्यात आले.

[३] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ७ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ई) जेथे झोपडपट्टीवासीयांचे पुनर्वसन करण्याकरिता असलेल्या गाळ्यांचा भाग (हिस्सा) आहे अशा, सार्वजनिक प्राधिकरणाच्या मालकीच्या जमिनींवर पुनर्वसन प्रकल्पान्वये बांधण्यात आलेल्या इमारती ; [१][किंवा]

[२][(फ) महानगरपालिका, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण किंवा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांनी संक्रमण निवासासाठी म्हणजेच संक्रमण शिबिरासाठी बांधकाम किंवा पुनर्बांधकाम केलेल्या इमारती; किंवा

(ग) महानगरपालिका, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण किंवा महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांनी भाडे तत्त्वावरील गृहनिर्माण योजनेअंतर्गत बांधकाम किंवा पुनर्बांधकाम केलेल्या इमारती :]

परंतु, यात नमूद केलेल्या कोणत्याही योजनेअन्वये बांधण्यात आलेली कोणतीही इमारत किंवा तिचा भाग यांचा वापर संबंधित प्रकल्प बाधित व्यक्ती किंवा झोपडपट्टीवासी यांच्या पुनर्वसनासाठी, निवासी प्रयोजनाकरिता करण्यात येत नसेल आणि अशी जी इमारत किंवा जो भाग विक्रीसाठी उपलब्ध असेल किंवा वाणिज्यिक प्रयोजनासाठी ज्याचा वापर करण्यात येत असेल अशा कोणत्याही इमारतीच्या किंवा तिच्या भागाच्या संबंधात, कराच्या अशा कमी केलेल्या दराची सवलत उपलब्ध असणार नाही.]

समाजातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या घटकांसाठी विवक्षित संस्थांनी बांधकाम केलेल्या इमारतीच्या किंवा गाळ्यांच्या संबंधात कमी दराने मालमत्ता कर बसविण्या-साठी तात्पुरती तरतूद.

[३][**१४४क.** कलम १४० मध्ये किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, २००५ याच्या प्रारंभाचा दिनांक किंवा जागेचा प्रथमच ताबा घेतल्याचा दिनांक, यांपैकी जो नंतरचा असेल त्या दिनांकापासून वीस वर्षांच्या कालावधीमध्ये, अशा प्रारंभापूर्वी किंवा त्यानंतर आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या घटकांसाठी, गाळे बांधण्याच्या प्रयोजनांसाठी, ज्या संस्थांना राज्य शासनाने नाममात्र दराने जमिनीचे वाटप केलेले आहे. त्या संस्थानी बांधलेल्या ३५० चौरस फुटांहून अधिक नसलेल्या फरसबंद क्षेत्राच्या (चटई क्षेत्राच्या) निवासी गाळ्यांच्या संबंधात, राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी निश्चित करील अशा कमी केलेल्या दरांनी मालमत्ता कर बसविण्यात येईल आणि निरनिराळ्या कालावधींसाठी आणि इमारतींच्या किंवा गाळ्यांच्या निरनिराळ्या वर्गांसाठी निरनिराळे दर निश्चित करता येतील.]

उपकर बसविण्यात आलेल्या इमारतींच्या संबंधात कमी केलेल्या दराने मालमत्ता कर बसविण्यासाठी तात्पुरती तरतूद.

[४][**१४४ड.** या अधिनियमाच्या कलम १४० मध्ये किंवा इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, [५][२३ नोव्हेंबर १९९५] किंवा यात यानंतर विनिर्दिष्ट केलेल्या गाळ्यांचा प्रथमच भोगवटा केल्याचा दिनांक यापैकी जो नंतरचा असेल त्या दिनांकापासून वीस वर्षांच्या कालावधीमध्ये,—

(अ) जी, बृहन्मुंबई विकास नियंत्रण विनियम, १९९१ यांच्या विनियम ३३(७) अन्वये तलपृष्ठ निर्देशांक (FSI benefit) याचा लाभ मिळण्यास हक्कदार आहे ; आणि

---

[१] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ७ (दोन) अन्वये "किंवा" हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ७ (तीन) अन्वये हे खंड समाविष्ट करण्यात आले.

[३] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १५, कलम २ अन्वये कलम १४४क समाविष्ट करण्यात आले.

[४] सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४४, कलम २ अन्वये कलम १४४ड समाविष्ट करण्यात आले.

[५] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ब) जी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ द्वारे नियमन करण्यात आलेली, उपकर पात्र इमारत आहे आणि जिथे,—

१९७७ चा महा. २८. (एक) विद्यमान भाडेकरुंनी स्थापन केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून ; किंवा

१९७७ चा महा. २८. (दोन) महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ याच्या कलम ८४ अन्वये प्रवर्ग 'अ' म्हणून वर्गीकृत केलेल्या इमारतींच्या (मालक-भोगवटादारासह) भोगवटादारांनी स्थापन केलेल्या सहकारी संस्थेकडून,—

पुनर्बांधकाम किंवा पुनर्विकास करण्यात आला आहे ; किंवा

(क) जी महानगरपालिकेच्या मालकीची असून १९४० पूर्वी पहिल्यांदा बांधण्यात आली होती व जिची तिच्या रहिवाशांनी स्थापन केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून पुनर्बांधणी किंवा पुनर्विकास करण्यात आला आहे,–

–अशा, मुंबई शहर बेटावरील एखाद्या इमारतीतील, ३५० चौरस फुटांहून अधिक फरसबंद क्षेत्र (चटई क्षेत्र) नसलेल्या निवासी गाळ्यांच्या बाबतीत, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी निश्चित करील अशा, कमी केलेल्या दरांनी मालमत्ता कर आकारण्यात येईल; तसेच वेगवेगळ्या कालावधींसाठी आणि वेगवेगळ्या गाळ्यांसाठी वेगवेगळे दर निश्चित करता येतील :

परंतु, जर विद्यमान भाडेकरुने किंवा भोगवटादाराने सहकारी गृहनिर्माण संस्थेचा सदस्य म्हणून पुनर्बांधकाम किंवा पुनर्विकास केलेल्या इमारतीतील गाळ्यांचा भोगवटा करण्याचे बंद केले असेल तर, अशा विद्यमान भाडेकरुंच्या किंवा भोगवटादारांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून पुनर्बांधकाम किंवा पुनर्विकास केलेल्या इमारतीतील निवासी गाळ्याच्या बाबतीत कमी दराने कोणताही कर आकारण्यात येणार नाही.]

[१][**१४४ई.** या अधिनियमाच्या कलम १४० मध्ये किंवा अन्य कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, विशेष विकास प्रकल्पांच्या मालकीच्या इमारतींच्या व जमिनींच्या बाबतीत, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी निश्चित करील अशा कमी केलेल्या दराने मालमत्ता कर आकारण्यात येईल ; आणि वेगवेगळ्या कालावधीकरिता व वेगवेगळ्या विशेष विकास प्रकल्पांकरिता वेगवेगळे दर निश्चित करता येतील. विशेष विकास प्रकल्पांच्या इमारतींच्या आणि जमिनींच्या बाबतीत कमी केलेल्या दराने मालमत्ता कर आकारणे.

**स्पष्टीकरण.—**या कलमाच्या प्रयोजनांसाठी, "विशेष विकास प्रकल्प" याचा अर्थ,—

१९६६ चा महा. ३७. (एक) शासनाने किंवा महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना, अधिनियम, १९६६ याच्या कलम २ च्या खंड (१९) च्या अर्थांतर्गत असलेला, नियोजन प्राधिकरणाने हाती घेतलेला विकास प्रकल्प ; किंवा

(दोन) एकत्रित प्रोत्साहन योजना, २००१ च्या अंतर्गत असलेला "मेगा प्रकल्प", आणि शासनाच्या मुख्य सचिवाच्या अध्यक्षतेखाली उच्चाधिकार समितीने मान्य केलेला व राज्य शासनाने, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, विशेष विकास प्रकल्प म्हणून घोषित केलेला प्रकल्प, असा आहे.]

---

[१] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम २ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

सन १८७९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याचे कलम ३६ याची सुधारणा.

**१४५.** मुंबई बंदर विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १८७९ चे कलम ३६ ऐवजी पुढील कलम दाखल करण्यात येईल ते असे :— १८७९ चा मुंबई ६.

**यथा उपरोल्लिखित**

**मालमत्ता कर देण्याचे दायित्व**

मालमत्ता कर देण्याची प्राथमिक जबाबदारी कोणावर असेल.

**१४६.** (१) ज्या परिवास्तूंवर मालमत्ता कर निर्धारित केला असेल त्या परिवास्तूंच्या प्रत्यक्ष भोगवटादाराने जर ती परिवास्तू प्रत्यक्ष [1][[2][शासनाकडून]] किंवा महानगरपालिकेकडून किंवा फाजिंदाराकडून घेऊन धारण केली असेल तर, उक्त कर प्रथमतः अशा भोगवटादाराकडून वसूल करण्याजोगा असेलः

[3][परंतु, शासनाच्या स्वतःच्या किंवा शासनामध्ये निहित असलेल्या व शासकीय कर्मचारी किंवा इतर कोणतीही व्यक्ती शासनाच्या वतीने राहण्याच्या प्रयोजनासाठी भोगवटा करीत असलेल्या कोणत्याही परिवास्तूच्या बाबतीत, येणे असलेले मालमत्ता कर हे, प्रथमतः शासनाकडून वसूल करण्याजोगे असतील, त्या परिवास्तूच्या भोगवटादाराकडून नव्हे.]

(२) अन्यथा उक्त कर पुढीलप्रमाणे प्रथमतः वसूल करण्याजोगे असतील :—

(अ) परिवास्तू भाड्याने देण्यात आली असेल तर तिच्या पट्टाकाराकडून ;

(ब) परिवास्तू पोट-भाड्याने देण्यात आली असेल तर, वरिष्ठ पट्टाकाराकडून ; [4]* * *

(क) परिवास्तू भाड्याने देण्यात आली नसेल तर, ती भाड्याने देण्याचा हक्क ज्या व्यक्तीमध्ये निहित असेल त्या व्यक्तीकडून ;

[5][(ड) जी मालक नाही अशा व्यक्तीने परिवास्तू धारण केली असेल किंवा ती तिचा भोगवटा करीत असेल आणि परिवास्तूच्या मालकाचा ठावठिकाणा निश्चित माहीत नसेल तर अशा धारकाकडून किंवा भोगवटादाराकडून ; आणि

(ई) विकासकाने किंवा मुखत्याराने अथवा कोणत्याही व्यक्तीने परिवास्तू धारण केली असेल किंवा तिचा विकास केला असेल मग-अशा व्यक्तीने कोणत्याही नात्याने ती परिवास्तू धारण केलेली असेल आणि त्यापैकी प्रत्येकाला त्या परिवास्तूची विक्री करण्याचा अधिकार असेल किंवा तिने तो संपादित केला असेल तर अशा धारकाकडून, विकासकाकडून, मुखत्याराकडून किंवा, यथास्थिति, त्या व्यक्तीकडून :

परंतु, असा धारक, विकासक, मुखत्यार किंवा व्यक्ती प्रत्यक्ष विक्री होईपर्यंतच असा कर वसूल केला जाण्यास पात्र असेल.]

[6][(३) मात्र जर जमीन एखाद्या भाडेकरूला एक वर्षाहून अधिक अवधीसाठी भाड्याने देण्यात आली असेल, व अशा भाडेकरूने किंवा अशा भाडेकरूकडून कोणत्याही प्रकारे हक्क प्राप्त होणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने त्या जमिनीवर इमारत बांधली असेल तर, उक्त जमिनीवर व तिच्यावर बांधलेल्या

---

[1] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये "बादशहा" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[2] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[3] सन १९५७ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम ५(१) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[4] सन २००९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११, कलम ९(१) अन्वये हा शब्द वगळण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ९ (२) अन्वये खंड (ड) व (ई) जादा दाखल करण्यात आले.

[6] सन १९५७ चा मुंबई अधिनियम क्रमांक २८, कलम ५(२) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

इमारतीवर निर्धारित करण्यात आलेले मालमत्ता कर हे, प्रथमतः उक्त भाडेकरूकडून किंवा अशा व्यक्तीकडून वसूल करण्याजोगे असतील, मग उक्त भाडेकरू किंवा अशी व्यक्ती त्या परिवास्तूचा भोगवटा करत असो वा नसो.]

मालमत्ता कर निर्धारित केलेली परिवास्तू भाड्याने किंवा पोट-भाड्याने देण्यात आली असेल तेव्हा मालमत्ता कर देण्याच्या जबाबदारीचे संविभाजन.

**१४७.** (१) मालमत्ता कर निर्धारित केलेल्या कोणत्याही परिवास्तू भाड्याने देण्यात आल्या असतील व त्यांचे पट्टीयोग्य मूल्य [1][किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्याच्या आधारे बसविण्यात आलेल्या मालमत्ता कराची रक्कम] पूर्ववती कलमाच्या तरतुदीं अन्वये उक्त कर ज्या व्यक्तीकडून वसूल करण्याजोगा असेल त्या व्यक्तीस त्या परिवास्तूच्या संबंधात देण्याजोग्या भाड्याच्या रकमेपेक्षा अधिक असेल तर, उक्त व्यक्तीस, तिच्याकडून वसूल करण्यात आलेल्या मालमत्ता कराची रक्कम आणि जर उक्त कराची रक्कम तिला देण्याजोग्या भाड्याच्या रकमेवरून परिगणना केली असती तर तिच्याकडून जी रक्कम वसूल करता आली असती ती रक्कम यांमधील तफावतीइतकी रक्कम आपल्या भाडेकरूकडून मिळण्याचा हक्क असेल.

(२) अशा परिवास्तू पोट-भाड्याने देण्यात आल्या असतील व त्यांचे पट्टीयोग्य मूल्य [1][किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्याच्या आधारे बसविण्यात आलेल्या मालमत्ता कराची रक्कम] हे, भाडेकरूस त्याच्या पोट-भाडेकरूने अशा परिवास्तूंच्या बाबतीत देण्याजोग्या भाड्याच्या रकमेपेक्षा किंवा पोट-भाडेकरूच्या विद्यमाने अशी परिवास्तू धारण करणाऱ्या व्यक्तींनी परिवास्तूच्याबाबतीत देण्याजोग्या भाड्याच्या रकमेपेक्षा अधिक असेल तर, अशा भाडेकरूकडून किंवा पोट-भाडेकरूकडून या कलमाखाली वसूल करण्यात आलेली कोणतीही रक्कम आणि उक्त परिवास्तूचे पट्टीयोग्य मूल्य [1][किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्याच्या आधारे बसविण्यात आलेल्या मालमत्ता कराची रक्कम] हे अशा भाडेकरूस किंवा पोट-भाडेकरूस मिळणारी भाड्याची रक्कम आणि तो जे भाडे देतो त्या भाड्याची रक्कम यांतील तफावतीइतकी असती, तर उक्त परिवास्तूच्या बाबतीत अशी मालमत्ता कराची जी रक्कम वसूल करण्याजोगी झाली असती ती रक्कम यांमधील तफावतीइतकी रक्कम यथास्थिति, उक्त भाडेकरूस त्याच्या पोट-भाडेकरूकडून मिळणाचा हक्क असेल किंवा उक्त पोट-भाडेकरूस त्याच्या विद्यमाने परिवास्तू धारण करणाऱ्या व्यक्तीकडून मिळण्याचा हक्क असेल.

(३) या कलमाखाली कोणतीही रक्कम मिळण्याचा हक्क असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, ज्या व्यक्तीकडून ती मिळण्याचा तिला हक्क असेल त्या व्यक्तीने तिला द्यावयाचे भाडे असल्याप्रमाणे, अशी रक्कम वसूल करण्याच्या बाबतीत, तेच हक्क असतील व तेच उपाय योजता येतील.

मालमत्ता कर देण्याचे प्रथमतः दायित्व असलेल्या व्यक्तीस, ती भाडे देणारी असल्यास, रक्कम जमा करण्याचा हक्क असणे.

**१४८.** जर कोणत्याही व्यक्तीवर कोणताही मालमत्ता कर देण्याचे प्रथमतः दायित्व असेल व ती असा कर निर्धारित केलेल्या परिवास्तूच्या संबंधात [2][[3][ शासन] ] किंवा महानगरपालिका याहून अन्य व्यक्तीस स्वतः भाडे देत असेल तर, अशा व्यक्तीस, तिने द्यावयाच्या भाड्याची रक्कम ही उक्त परिवस्तूंचे पट्टीयोग्य मूल्य [1][ किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्याच्या आधारे बसविण्यात आलेल्या मालमत्ता कराची रक्कम] म्हणून असल्यास, उक्त कराबद्दल वसूल करता येईल अशी रक्कम अशा अन्य व्यक्तीच्या खाती जमा करण्याचा हक्क असेल.

---

[1] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १०(१) व (२) आणि कलम ११अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] भारतीय विधी अनुकूलन परिषदआदेशान्वये, " बादशहा " या शब्दाऐवजी " सरकार " हा शब्द दाखल करण्यात आला.

[3] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

## मालमत्ता कर निर्धारणयोग्य परिवास्तूंच्या हस्तांतरणाची, वगैरे नोटीस

मालमत्ता कर देण्यास प्रथमतः दायी असलेल्या व्यक्तीच्या हक्काच्या सर्व हस्तांतरणासंबंधी आयुक्ताला नोटीस देणे.

**१४९.** (१) जेव्हा जेव्हा कोणत्याही परिवास्तूबद्दल मालमत्ता कर देण्याचे प्रथमतः दायित्व असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या अशा परिवास्तुसंबंधीच्या किंवा अशा परिवास्तूवरील हक्काचे हस्तांतरण होईल तेव्हा तेव्हा ज्या व्यक्तीच्या उक्त हक्काचे याप्रमाणे हस्तांतरण होईल, ती व्यक्ती आणि ज्या व्यक्तीकडे उक्त हक्कांचे हस्तांतरण करण्यात आले असेल ती व्यक्ती हस्तांतरण संलेख करून देण्यात आल्यानंतर, किंवा जर त्यांची नोंदणी करण्यात आली असेल तर त्याच्या नोंदणीनंतर किंवा जर कोणताही संलेख करून देण्यात आला नसेल तर हस्तांतरण करण्यात आल्यानंतर तीन महिन्यांच्या आत, आयुक्तास अशा हस्तांतरणासंबंधी लेखी नोटीस देईल.

(२) पूर्वोक्तप्रमाणे प्रथमतः दायित्व असलेली कोणतीही व्यक्ती मरण पावेल तर, वारसदार म्हणून किंवा अन्यथा ज्या व्यक्तीकडे स्वत्वाधिकाराचे हस्तांतरण होईल, ती व्यक्ती मयत व्यक्तीच्या मृत्यूपासून एक वर्षाच्या आत, आयुक्ताला, अशा हस्तांतरणाची नोटीस देईल.

नोटिशीचा नमुना.

**१५०.** (१) लगतपूर्ववर्ती कलमाखाली द्यावयाची नोटिस यथास्थिति, अनुसूची, " ई " किंवा अनुसूची " फ " मध्ये दिलेल्या नमुन्याप्रमाणे असेल [१][आणि ती सोबत, आयुक्त, स्थायी समितीच्या मान्यतेने वेळोवेळी विहित करील अशी फी जोडलेली असेल आणि त्या नोटिशीमध्ये उक्त नमुन्याप्रमाणे आवश्यक असलेला तपशील स्पष्टपणे व बिनचूक नमूद केलेला असेल.]

(२) अशी कोणतीही नोटीस मिळाल्यावर, आयुक्तास, त्यास तसे आवश्यक वाटेल तर हस्तांतरणाचा कोणताही संलेख असल्यास, तो किंवा भारतीय नोंदणी अधिनियम, १८७७* याच्या कलम ५७ खाली मिळवलेली त्याची एक प्रत, दाखल करण्याविषयी फर्माविता येईल. १८७७ चा ३.

[२][(३) हस्तांतरित करावयाच्या मालमत्तेच्या संबंधात देय असलेला मालमत्ता कर, अशी नोटीस देण्यापूर्वी पूर्णपणे भरण्यात आला नसेल तर, महानगरपालिका, मालमत्ता कर देण्यास प्रथमतः पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या हक्काच्या हस्तांतरणांची नोंद निर्धारण पुस्तकामध्ये घेणार नाही.]

हस्तांतरणाची कोणतीही नोटीस देण्यात न आल्यास मालमत्ता कर देण्याचे दायित्व चालू राहणे.

**१५१.** (१) एखाद्या परिवास्तूवर मालमत्ता कर देण्याचे प्रथमतः दायित्व असलेली जी कोणतीही व्यक्ती अशा परिवास्तूच्या संबंधातील किंवा तीवरील आपल्या हक्काचे हस्तांतरण, अशा हस्तांतरणाबाबत पूर्वोक्तप्रमाणे आयुक्ताला नोटीस न देता करील त्या प्रत्येक व्यक्तीवर, तिने अशा हयगयीमधून ओढवून घेतलेल्या इतर कोणत्याही दायित्वांच्या भरीला उक्त परिवास्तूच्या संबंधात वेळोवेळी देय होणारे सर्व इतर मालमत्ता कर देण्याचे दायित्व असण्याचे ती अशी नोटीस देईतोपर्यंत किंवा आयुक्ताच्या पुस्तकात त्या हस्तांतरणाची नोंद केलेली जाईतोपर्यंत चालू राहील.

(२) मात्र या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, उक्त मालमत्ता कर देण्याचे हस्तांतरितीचे दायित्व कमी होते किंवा त्या परिवास्तूच्या बाबतीत येणे असलेले कर वसूल करण्यासाठी उक्त परिवास्तूवरील कलम २१२ अन्वये आयुक्तास मिळालेल्या अग्रहक्कास बाध येतो, असे धरता येणार नाही.

नवीन इमारत, वगैरे उभारण्यासंबंधी आयुक्ताला नोटीस देणे.

**१५२.** (१) जेव्हा कोणतीही नवीन इमारत उभारण्यात येईल किंवा जेव्हा कोणतीही इमारत पुन्हा बांधण्यात येईल किंवा ती प्रवर्धित करण्यात येईल, [३][ किंवा तिचा भोगवटा करण्यात येईल अथवा पुन्हा भोगवटा करण्यात येईल किंवा त्या संपूर्ण इमारतीच्या किंवा तिच्या भागाच्या वापरकर्त्यामध्ये बदल करण्यात येईल तेव्हा;] त्या इमारतीवर निर्धारित करण्यात आलेले मालमत्ता कर देण्याचे प्रथमतः दायित्व असलेली व्यक्ती पंधरा दिवसांच्या आत, आयुक्ताला त्याबद्दल लेखी नोटीस देईल.

---

* आता भारतीय नोंदणी अधिनियम, १९०८ (१९०८ चा १६) पहा.

[१] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १२ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १२(२) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १३(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) उक्त पंधरा दिवसांचा कालावधी हा, नव्याने उभारण्यात आलेली किंवा पुन्हा बांधण्यात आलेली इमारत यथास्थिति, पुरी होणे किंवा तिचा भोगवटा करणे यांपैकी जी गोष्ट प्रथम घडेल ती घडल्याच्या तारखेपासून किंवा ती प्रवर्धित केल्याच्या [1][ किंवा पुन्हा भोगवटा केल्याच्या किंवा, यथास्थिति, त्या संपूर्ण इमारतीच्या किंवा तिच्या भागाच्या वापरकर्त्यामध्ये बदल झाल्याच्या तारखेपासून मोजण्यात येईल.]

[2][**१५२अ.** (१) जो कोणी,— अवैध इमारतीवर शास्ती बसविणे.

(अ) या अधिनियमान्वये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यान्वये परवानगी न घेता किंवा अशा परवानगीसोबत असलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करून आपल्या जमिनीवर ;

(ब) प्रादेशिक नियोजन व नगररचनेशी संबंधित कायद्यान्वये मान्यता न घेता तयार केलेल्या आपल्या मालकीच्या जागेवर;

(क) या अधिनियमाची कोणतीही तरतूद किंवा त्याखाली केलेले कोणतेही नियम किंवा उपविधी किंवा हा अधिनियम किंवा असा नियम किंवा उपविधी यांअन्वये वैधरीत्या दिलेला कोणताही निदेश किंवा केलेली मागणी यांचा भंग करून आपल्या जमिनीवर ; किंवा

(ड) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचे किंवा त्या त्या काळी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याचा आणि त्याखाली केलेले नियम किंवा उपविधी यांचा भंग करून महानगरपालिका अथवा केंद्र किंवा राज्य शासन, अथवा अशा कोणत्याही शासनाने स्थापन केलेले कोणतेही वैधानिक महामंडळ किंवा संघटना किंवा कंपनी यांच्या मालकीच्या किंवा त्यांनी भाडेपट्ट्याने दिलेल्या कोणत्याही जमिनीवर,

कोणत्याही इमारतीचे किंवा इमारतीच्या भागाचे अवैधरित्या बांधकाम करील किंवा पुनर्बांधकाम करील, तो, अशा अवैध बांधकामाच्या बाबतीत, त्याच्याविरुद्ध दाखल करता येईल अशा कोणत्याही कार्यवाहीस बाधा न आणता, ते बांधकाम जोपर्यंत अवैध बांधकाम म्हणून राहील तोपर्यंत दरवर्षी अशा इमारतीवर बसवण्यायोग्य असलेल्या मालमत्ता कराच्या दुपटीइतकी शास्ती भरण्यास पात्र असेल :

परंतु, असा कर व शास्ती बसविणे व ती गोळा करणे, यांचा, असे अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम, ते अस्तित्वात असेतोपर्यंतच्या कोणत्याही कालावधीसाठी ते अवैध बांधकाम किंवा पुनर्बांधकाम विनियमित झाले आहे असा अन्वयार्थ लावला जाणार नाही असा कालावधी कितीही असो.

(२) पोट-कलम (१) अन्वये देय असलेली शास्ती, ही जणू काही अशी शास्तीची रक्कम ही या अधिनियमाच्या अशा व्यक्तींकडून देय असलेली मालमत्ता कराची रक्कम असल्याप्रमाणे निर्धारित करण्यात व गोळा करण्यात येईल.]

**१५३.** (१) मालमत्ता करास पात्र असलेली कोणतीही इमारत किंवा तिचा कोणताही भागांश आयुक्ताच्या आदेशाने असेल त्या व्यतिरिक्त अन्यथा पाडून किंवा काढून टाकण्यात येईल तेव्हा, उक्त कर देण्याचे प्रथमतः दायित्व असलेली व्यक्ती आयुक्ताला त्याबाबत लेखी नोटीस देईल. इमारत पाडून टाकल्याची किंवा काढून टाकल्याची नोटीस आयुक्ताला देणे.

[1] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १३(२)अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] वरील अधिनियमाच्या कलम १४ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

(२) अशी नोटीस देण्यात येईतोपर्यंत, पूर्वोक्त व्यक्तीवर उक्त इमारत किंवा तिचा कोणताही भागांश पाडण्यात किंवा काढून टाकण्यात आला नसता तर अशा इमारतीच्या बाबतीत जो मालमत्ता कर देण्याचे दायित्व आले असते असा प्रत्येक मालमत्ता कर देण्याचे दायित्व तिच्यावर असण्याचे चालू राहील.

[१][(३) परंतु या कलमातील कोणतीही गोष्ट, एखादी इमारत किंवा एखाद्या इमारतीचा भागांश पडला असेल किंवा जळून गेला असेल त्या इमारतीच्या किंवा तिच्या भागांशाच्या बाबतीत लागू होणार नाही.]

**मालमत्ता कर निर्धारित करण्याजोग्या मालमत्तेचे मूल्यांकन**

पट्टीयोग्य मूल्य [२][किंवा भांडवली मूल्य] कसे निर्धारित करण्यात यावे.

**१५४.** (१) मालमत्ता कर निर्धारित करण्याजोग्या कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे पट्टीयोग्य मूल्य निश्चित करण्यासाठी, जे वार्षिक भाडे घेऊन अशी जमीन किंवा इमारत वर्षावर्षाला वाजवी रीतीने भाड्याने देता येईल अशी अपेक्षा असेल अशा वार्षिक भाड्याच्या रकमेतून उक्त वार्षिक भाड्याच्या शेकडा दहा टक्के इतकी रक्कम वजा करण्यात येईल आणि उक्त वजात ही दुरुस्तीबद्दल किंवा इतर कोणत्याही कारणाबद्दल दिलेली सूटमोकळ म्हणून असेल.

[३][(१अ) मालमत्ता कर आकारणीयोग्य असलेल्या कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे भांडवली मूल्य निश्चित करण्यासाठी, आयुक्त, मुंबई मुद्रांक अधिनियम, १९५८ च्या तरतुदींन्वये तयार केलेले मुंबई मुद्रांक (संपत्तीचे वास्तविक बाजार मूल्य ठरणे) नियम, १९९५ अन्वये, तयार केलेल्या व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या मुद्रांक शुल्क सिद्ध गणकामध्ये दर्शविलेले कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे मूल्य [४][आधारभूत मूल्य म्हणून] लक्षात घेईल अथवा जिचे भांडवली मूल्य निर्धारित करणे आवश्यक आहे अशी इमारत किंवा जमीन ज्या क्षेत्रातील असेल अशा कोणत्याही विशिष्ट क्षेत्रातील मालमत्तांचे मूल्य मुद्रांक शुल्क सिद्ध गणकामध्ये दाखविण्यात आले नसेल तर त्याबाबतीत आयुक्तास, [५][अशा इमारतींचे किंवा जमिनीचे बाजार मूल्य आधारभूत मूल्य म्हणून, विचारात घेऊन तिचे भांडवली मूल्य निश्चित करता येईल. आयुक्त उपरोक्तप्रमाणे, भांडवली मूल्य निश्चित करताना पुढील घटक देखील विचारात घेईल.]

१९५८ चा मुंबई.

(अ) जमिनीचे स्वरूप व प्रकार आणि इमारतीची संरचना,

(ब) जमिनीचे क्षेत्र किंवा इमारतीचे चटई क्षेत्र,

(क) वापरकर्ता प्रवर्ग म्हणजे (एक) निवासी, (दोन) वाणिज्यिक (दुकाने, किंवा तत्सम), (तीन) कार्यालये, (चार) हॉटेल (चार तारांकितपर्यंत), (पाच) हॉटेल (चार तारांकितपेक्षा अधिक), (सहा) बँका, (सात) उद्योग व कारखाने, (आठ) शालेय व महाविद्यालयीन इमारत किंवा शैक्षणिक प्रयोजनांसाठी वापरण्यात येणारी इमारत, (नऊ) मॉल, आणि (दहा) वरीलपैकी कोणत्याही प्रवर्गामध्ये समाविष्ट नसलेली अन्य कोणतीही इमारत किंवा जमीन,

(ड) इमारत किती वर्ष जुनी आहे, किंवा

(ई) पोट-कलम (१ब) अन्वये केलेल्या नियमांद्वारे विहित करण्यात येतील असे अन्य काही घटक.

---

[१] सन १९१८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ३ अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[२] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १५(१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १५(२) अन्वये पोट-कलमे (१अ), (१ब) व (१क) समाविष्ट करण्यात आली.

[४] सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५(१) (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ५(१) (ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

(१ब) आयुक्त, पोट-कलम (१अ) अन्वये भांडवली मूल्य निश्चित करण्याच्या प्रयोजनाकरिता स्थायी समितीच्या मान्यतेने, इमारतींच्या किंवा जमिनींच्या प्रवर्गाच्या तपशीलांच्या बाबतीत आणि [१][अशा विविध घटकांना व प्रवर्गांना नेमून द्यावयाच्या] बहुविध भारकांच्या बाबतीत (Weightage by multiplication), नियम तयार करील.

(१क) कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे पोट-कलम (१अ) अन्वये निश्चित केलेले भांडवली मूल्य दर पाच वर्षांनी सुधारित करता येईलः

परंतु, आयुक्तास, कारणे लेखी नमूद करून, उक्त पाच वर्षांच्या कालावधीत, कोणत्याही वेळी, कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनींचे भांडवली मूल्य सुधारित करता येईल आणि तद्नुसार, तो, कलम १६७ अन्वये, अशा इमारतींच्या किंवा जमिनींच्या संबंधात, निर्धारण पुस्तकात सुधारणा करील.]

(२) कोणत्याही इमारतीत किंवा जमिनीत किंवा इमारतीवर किंवा जमिनीवर असलेल्या कोणत्याही यंत्रसामग्रीच्या मूल्याचा, अशा इमारतीच्या किंवा जमिनीच्या पट्टीयोग्य मूल्यात [२][किंवा यथास्थिति, भांडवली मूल्यात] समावेश करता येणार नाही.

[३][ * * * *]

*विवक्षित प्रकरणांत भांडवली मूल्यांची तात्पुरती निश्चिती.*

[४][**१५४अ.** कलम १५४ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, २००९-२०१० या सरकारी वर्षाकरिता, कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे किंवा तिच्या भागाचे पट्टीयोग्य मूल्य हे, [५][सरकारी वर्ष २०१०-२०११, २०११-२०१२ व २०१२-१३ यासाठी] अशा इमारतींचे किंवा जमिनींचे २०१०-२०११ आणि २०११-२०१२ या सरकारी वर्षांच्या बाबतीत तात्पुरते भांडवली मूल्य असेल आणि असे तात्पुरते भांडवली मूल्य हे, त्यांचे अंतिम भांडवली मूल्य निश्चित होईपर्यंत ते या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये वैधरीतीने व कायदेशीरपणे निश्चित केलेले भांडवली मूल्य असल्याचे मानण्यात येईल ; आणि या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये ठेवलेल्या निर्धारण पुस्तकाच्या प्रयोजनार्थ, आयुक्ताने, पट्टीयोग्य मूल्य हे तात्पुरते भांडवली मूल्य आहे असे समजणे विधिसंमत असेल ; आणि कलम १४०अ च्या पोट-कलम (२) अन्वये, बजावण्यात आलेले मालमत्ता कराचे बिल हे या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये वैधरीतीने व कायदेशीरपणे बजावण्यात आले असल्याचे मानण्यात येईल :]

[६][परंतु ज्या इमारती व जमिनी या १ एप्रिल २०१० रोजी किंवा त्यानंतर पहिल्यांदाच निर्धारित केल्या जाण्यास पात्र असतील अशा इमारती व जमिनीच्या संबंधात या कलमान्वये अंतिम भांडवली मूल्य निश्चित होईपर्यंत, अशा इमारती व जमिनीचे भांडवली मूल्य हे. तात्पुरत्या स्वरूपात महानगरपालिकेने सरकारी वर्ष २००९-२०१० करिता विहित केलेल्या पट्टीयोग मूल्याच्या आधारे काढलेल्या करयोग्य मूल्याच्या रकमेइतके असेल.].

*आयुक्तास मालकाकडून किंवा भोगवटादाराकडून माहिती अथवा विवरणपत्रे मागवता येतील किंवा करनिर्धारणयोग्य परिवास्तूत प्रवेश करता येईल व तिचे निरीक्षण करता येईल.*

**१५५.** (१) कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे पट्टीयोग्य मूल्य [७][किंवा यथास्थिति, भांडवली मूल्य] व तिच्या संबंधात बसविण्याजोगा असलेला कोणताही मालमत्ता कर देण्याचे प्रथमतः दायित्व असणारी व्यक्ती निर्धारित करणे आयुक्ताला शक्य व्हावे म्हणून त्यास अशा इमारतींच्या किंवा जमिनीच्या किंवा तिच्या कोणत्याही भागांशाच्या मालकास किंवा भोगवटादारास आयुक्त याबाबतीत विहित करील अशा वाजवी कालावधीच्या आत पुढील बाबींसंबंधी माहिती किंवा अशा मालकाने किंवा भोगवटादाराने सही केलेले लेखी विवरणपत्र त्यास पुरविण्याविषयी फर्मावता येईल :—

---

१ सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ५(२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

२ सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १५(३) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

३ वरील अधिनियमाच्या कलम १५(४) अन्वये पोट-कलम (३) वगळण्यात आले.

४ सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४ अन्वये कलम १५४अ दाखल करण्यात आले.

५ सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ८ (एक) अन्वये मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६ वरील अधिनियमाच्या कलम ८ (दोन) अन्वये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

७ सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १६ (क) अन्वये हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारासह समाविष्ट करण्यात आला.

(अ) अशा इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकाने किंवा भोगवटादाराचे नाव व वसतिस्थान किंवा मालक व भोगवटादार या दोघांचीही नावे व वसतिस्थाने ; आणि

[१][(ब) अशा इमारतीच्या किंवा जमिनीच्या अथवा तिच्या कोणत्याही भागांच्या संबंधात, कलम १५४ च्या पोट-कलम (१अ) च्या खंड (अ) ते (ई) मध्ये नमूद केलेल्या सर्व किंवा कोणत्याही बाबीसंबंधातील तपशील.]

(२) ज्या मालकाकडे किंवा भोगवटादाराकडे अशी कोणतीही मागणी केली असेल असा प्रत्येक मालक किंवा भोगवटादार हा, तिचे अनुपालन करण्यास आणि आपल्या संपूर्ण माहितीप्रमाणे किंवा समजुतीप्रमाणे खरी माहिती देण्यास व खरे विवरणपत्र सादर करण्यास बांधलेला असेल.

(३) तसेच आयुक्तास पुर्वोक्त प्रयोजनासाठी अशा कोणत्याही इमारतीचे किंवा जमिनीचे निरीक्षण करता येईल.

### निर्धारण पुस्तक

निर्धारण पुस्तकात कोणत्या गोष्टी असाव्यात.

**१५६.** [२][आयुक्त, स्थायी समितीच्या मान्यतेने [३][निर्धारित करील] अशा नमुन्यात व अशा रीतीने एक पुस्तक ठेवील आणि अशा पुस्तकाला “ निर्धारण पुस्तक ” असे संबोधण्यात येईल आणि त्यात प्रत्येक सरकारी वर्षी पुढील गोष्टींची नोंद करील.]

(अ) [४][बृहन्मुंबईतील] सर्व इमारतींची व जमिनींची यादी ; तिच्यात आयुक्तास योग्य वाटेल अशा रीतीने एकतर नावावरून किंवा क्रमांकावरून प्रत्येक इमारत किंवा जमीन ही निरनिराळी दाखविण्यात येईल ;

(ब) या अधिनियमाच्या पूर्वगामी तरतुदींअनुसार अशा प्रत्येक इमारतीचे आणि जमिनीचे निर्धारित केलेले पट्टीयोग्य मूल्य [५][किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्य] ;

(क) अशा प्रत्येक इमारतीवर किंवा जमिनीवर बसविण्याजोगे कोणतेही मालमत्ता कर असल्यास, ते देण्याचे प्रथमतः दायित्व असलेल्या व्यक्तीचे नाव ;

[६][(ड) जर अशी कोणतीही इमारत किंवा जमीन तिच्यावर सर्वसाधारण कर निर्धारित केला जाण्यास पात्र नसेल तर किंवा तिला मालमत्ता कराच्या रकमेतून पूर्णपणे किंवा यथास्थिति, अंशतः सूट दिली असेल तर, अशा अपात्रतेचे किंवा, यथास्थिति, सूट देण्याचे कारण ;]

(ई) जेव्हा त्या वर्षाकरिता बसवावयाचे मालमत्ता कराचे दर महानगरपालिकेने रीतसर निश्चित केले असतील आणि जेव्हा निर्धारण पुस्तकाच्या कोणत्याही भागांशात नोंद केलेल्या पट्टीयोग्य मूल्याच्या [७][किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्याच्या] रकमेविरुद्ध करावयाच्या तक्रारी स्वीकारण्याकरिता यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे जाहीर नोटिशीद्वारे निश्चित केलेला कालावधी संपलेला असेल तेव्हा, आणि अशा कोणत्याही नोंदीविरुद्ध तक्रार करण्यात आली असेल अशा प्रत्येक बाबतीत,

---

[१] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १६ (ख) अन्वये खंड (ब) ऐवजी हे खंड दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १७ (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ७ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[५] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १७ (२) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम १७ (३) अन्वये खंड (३) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[७] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १७(४) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

यात यापुढे असलेल्या तरतुदींअनुसार जेव्हा अशी तक्रार निकालात काढण्यात आली असेल तेव्हा, प्रत्येक इमारतीवर किंवा जमिनीवर बसवण्याजोगे कोणतेही मालमत्ता कर असल्यास अशा प्रत्येक कराचे निर्धारण अशा जमिनीवर किंवा इमारतीवर ज्या रकमेने केले असेल व जिची करनिर्धारण पुस्तकाच्या अशा भागांशात नोंद केलेली असेल ती रक्कम ;

[1][(फ) जर कलम १६९ खाली, कोणत्याही इमारतीला किंवा जमिनीला पुरविलेल्या पाण्याबद्दल मोजणी करून आकार बसवलेला असेल किंवा बसवलेले पाणी कर किंवा मोजणी करून पाण्यावर बसवलेला आकार भरण्याबद्दल आपसाती केलेली असेल, किंवा जर कलम १७० खाली कोणत्याही इमारतीकरिता किंवा जमिनीकरिता मलनिस्सारण कराचा विशेष दर निश्चित केलेला असेल तर, अशा आकाराचा, आपसातीचा किंवा दराचा तपशील व रक्कम ;]

(ग) आयुक्ताला वेळोवेळी ज्याबद्दल निदेश देणे योग्य वाटेल असा कोणताही असल्यास, इतर तपशील.

प्रत्येक प्रभागासाठी स्वतंत्र आणि आवश्यकता भासल्यास भागशः कर-निर्धारण पुस्तक तयार करणे.

**१५७.** [2][प्रशासकीय प्रयोजनासाठी] त्या त्या वेळी [3][बृहन्मुंबईची] ज्या प्रभागात विभागणी केलेली असेल अशा प्रत्येक प्रभागाकरिता एक याप्रमाणे करनिर्धारण पुस्तकाची "प्रभाग करनिर्धारण पुस्तके" या नावाची अलग अलग पुस्तके तयार करता येतील ; आणि आयुक्तास योग्य वाटले तर तो निर्धारित करील अशा प्रयोजनांकरिता व अशी अनेक नावे देऊन, प्रत्येक प्रभाग करनिर्धारण पुस्तकाचे दोन किंवा अधिक भाग पाडता येतील.

(२) प्रभाग करनिर्धारण पुस्तके व त्याचे कोणतेही संबद्ध भाग असल्यास, या सर्वांचे मिळून करनिर्धारण पुस्तक तयार होईल.

दोन किंवा अधिक व्यक्तींना स्वतंत्रपणे भोगवटा करण्याकरिता भाड्याने दिलेल्या मालमत्तेची गणना कशी करावी.

**१५८.** (१) जेव्हा कोणतीही इमारत किंवा जमीन पृथकपणे धारण करणाऱ्या दोन किंवा अधिक व्यक्तींना भाड्याने दिलेली असेल तेव्हा, आयुक्तास अशा इमारतीवर किंवा जमिनीवर मालमत्ता कराचे निर्धारण करण्याकरिता एकतर ती सर्व मिळून एकच मालमत्ता असल्याप्रमाणे तिची गणना करता येईल किंवा अशा इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकाच्या लेखी संमतीने, तिच्यातील प्रत्येक निरनिराळ्या धारणजमिनीची किंवा अशा कोणत्याही दोन किंवा अधिक निरनिराळ्या धारणजमिनींची एकत्रपणे किंवा प्रत्येक मजल्याची किंवा सदनिकेची, स्वतंत्र मालमत्ता म्हणून गणना करता येईल.

[4][(२) * * * * *

(३) * * * * *]

---

[1] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम १९ अन्वये खंड (च) दाखल करण्यात आला.

[2] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १८ अन्वये "कलम २४ च्या तरतुदींखाली" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २,अनुसूची (१) ४(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[4] सन १९९८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम ९१ अन्वये पोट-कलमे (२) व (३) वगळण्यात आली.

मालमत्ता कराचे प्रथमतः दायित्व असलेल्या व्यक्तीचे नाव निश्चित करता येत नसेल तेव्हा त्यास कोणत्या रीतीने संबोधण्यात येईल.

**१५९.** (१) कोणत्याही परिवास्तूच्या संबंधात मालमत्ता कराचे प्रथमतः दायित्व असलेल्या व्यक्तीचे नाव निश्चित करता येत नसेल तेव्हा करनिर्धारण पुस्तकात आणि या अधिनियमाखाली उक्त व्यक्तीवर बजावणे आवश्यक असलेल्या कोणत्याही नोटिशीत, अधिक वर्णन न देता त्यास अशा परिवास्तूचा " धारक " म्हणून संबोधणे पुरेसे असेल.

भोगवटादारावर तो माहिती देईपर्यंत मालमत्ता कर भरण्याचे दायित्व असेल.

(२) अशा कोणत्याही प्रकरणी, अशा परिवास्तूचा भोगवटा करीत असलेली कोणतीही व्यक्ती उपरोक्तप्रमाणे प्रथमतः कोणावर दायित्व आहे हे निर्धारित करण्यासाठी आवश्यक असलेली अशी माहिती देण्याचे नाकारील तर, अशी माहिती मिळेतोपर्यंत अशा व्यक्तीवर, ती भोगवटा करीत असलेल्या परिवास्तूवर बसवण्याजोगा सर्व मालमत्ता कर देण्याचे दायित्व असेल.

कोणत्याही प्रभागातील मालमत्तेच्या मुल्यांकनाचे काम पूर्ण झाल्यावर जाहीर नोटीस देणे.

**१६०.** (१) कोणत्याही प्रभाग करनिर्धारण पुस्तकातील कलम १५६, खंड (अ), (ब), (क) आणि (ड) अन्वये आवश्यक असलेल्या नोंदी, व्यवहार्य असेल तेथवर पूर्ण करण्यात आल्या असतील तेव्हा आयुक्त त्याबाबत आणि ज्या जागी प्रभाग करनिर्धारण पुस्तक किंवा त्याची प्रत निरीक्षणासाठी मिळेल त्या जागेसंबंधी जाहीर नोटीस देईल.

(२) अशी जाहीर नोटीस [1][**शासकीय राजपत्रात**] व स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन, तसेच प्रभागभर ठळक जागी घोषणाफलक लावून [2][किंवा आयुक्तास योग्य वाटेल अशा इलेक्ट्रॉनिक माध्यमासह इतर कोणत्याही पद्धतीने] देण्यात येईल.

करनिर्धारण पुस्तक निरीक्षणासाठी खुले असणे.

**१६१.** (१) करनिर्धारण पुस्तकात नोंद केलेल्या कोणत्याही परिवास्तूचा मालक किंवा भोगवटादार आपण आहोत, असा रास्त दावा सांगणाऱ्या प्रत्येक व्यक्तीस किंवा अशा कोणत्याही मालकाच्या किंवा भोटवटादाराच्या अभिकर्त्यास उक्त पुस्तकाच्या निरीक्षणाची आणि उक्त परिवास्तूसंबंधी असलेल्या उक्त पुस्तकाच्या कोणत्याही भागातून उतारे घेण्याची परवानगी विनामूल्य देण्यात येईल.

(२) करनिर्धारण पुस्तकाचे निरीक्षण करण्याच्या किंवा त्यांच्या कोणत्याही भागांशातून विनामूल्य उतारे घेण्याचा पोट-कलम (१) खाली जिला हक्क नाही अशा कोणत्याही व्यक्तीस [3][स्थायी समितीच्या मान्यतेने आयुक्ताने] याबाबत वेळोवेळी विहित केलेली फी देण्यात आल्यावर तसे करण्याची परवानगी देण्यात येईल.

---

[1] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " **मुंबई सरकार राजपत्रात** " या ऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[2] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १९ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, याच्या कलम ७७ अन्वये " महापौरासह परिषदेच्या मान्यतेने प्रभारी सदस्याने " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**१६२.** (१) आयुक्त, कलम १६० मध्ये विहित करण्यात येईल अशा वेळी आणि अशा रीतीने एक जाहीर नोटीस प्रसिद्ध करून, अशी नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून [१][एकवीस दिवसांच्या] आतील नसेल अशा ज्या तारखेस किंवा ज्या तारखेपूर्वी प्रभागाच्या निर्धारण पुस्तकात नोंद केलेल्या कोणत्याही पट्टीयोग्य मूल्याविरुद्ध [२][किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्याविरुद्ध] तक्रारी त्याच्या कार्यालयात दाखल करून घेण्यात येतील ती तारीख जाहीर करील. मूल्यांकनाविरुद्ध दाखल करावयाच्या तक्रारी ज्या अवधीत दाखल करावयाच्या तो अवधी जाहीर करणे.

(२) जेव्हा कोणतीही परिवास्तू मालमत्ता कर देण्यास पात्र म्हणून प्रथमच निर्धारण पुस्तकात नोंदण्यात आली असेल, किंवा असे कर देण्यास पात्र असलेल्या कोणत्याही परिवास्तूचे [३][पट्टीयोग्य मूल्य किंवा यथास्थिति, भांडवली मूल्याच्या] वाढवण्यात आले असेल अशा प्रत्येक प्रकरणी, आयुक्त, पोटकलम (१) खाली जाहीर नोटीस काढल्यावर सोईस्करपणे शक्य असेल तितक्या लवकर, उक्त परिवास्तूच्या मालकास किंवा भोगवटादारास एक विशेष लेखी नोटीस देईल आणि अशा विशेष नोटिशीत अशा नोंदीचे स्वरूप निर्दिष्ट करण्यात येईल आणि अशी विशेष नोटीस बजावल्यापासून [४][एकवीस दिवसांच्या] आत कोणत्याही वेळी अशा नोंदीविरुद्ध कोणतीही तक्रार त्याच्या कार्यालयात स्वीकारण्यात येईल असे त्यास कळवण्यात येईल. विवक्षित प्रकरणी विशेष नोटिसा देण्यात येतील.

**१६३.** (१) निर्धारण पुस्तकात नमूद केलेल्या पट्टीयोग्य मूल्याच्या [५][किंवा यथास्थिति, भांडवली मूल्याच्या] रकमेविरुद्ध करावयाची प्रत्येक तक्रार लेखी अर्ज करून आयुक्तास सादर करण्यात येईल. असा अर्ज उपरोक्त जाहीर किंवा विशेष नोटिशीत याबाबत ठरवलेल्या दिवशी किंवा त्यापूर्वी किंवा ठरविलेल्या शेवटच्या दिवशी आयुक्ताच्या कार्यालयात सादर करण्यात येईल. मूल्यांकनाविरुद्ध दाखल करावयाच्या तक्रारीसाठी अवधी व त्यासाठी रीत.

(२) अशा प्रत्येक अर्जात, ज्या मुद्यांवर मूल्यांकनाविरुद्ध तक्रार करण्यात आली असेल ते मुद्दे थोडक्यात परंतु संपूर्णपणे मांडण्यात येतील.

**१६४.** आयुक्त याप्रमाणे सादर केलेल्या सर्व तक्रारींची या प्रयोजनासाठी ठेवावयाच्या पुस्तकात नोंदणी करण्याची तजवीज करील आणि प्रत्येक तक्रारदार व्यक्तीस ज्या दिवशी, ज्या वेळी आणि ज्या जागी तिच्या तक्रारीचा तपास केला जाईल तो दिवस, ती वेळ व ती जागा यासंबंधीची लेखी नोटीस देईल. तक्रार करणाऱ्या व्यक्तींना त्यांच्या तक्रारीचा तपास करण्यासाठी निश्चित केलेल्या दिवसाची नोटीस देणे.

**१६५.** (१) याप्रमाणे निश्चित केलेल्या वेळी आणि जागी, आयुक्त तक्रार करणारी व्यक्ती हजर असल्यास तिच्या समक्ष व ती हजर नसल्यास तिच्या गैरहजेरीत तक्रारीचा तपास करून ती निकालात काढील. तक्रारींची सुनावणी.

(२) वाजवी कारण असल्यास आयुक्तास वेळोवेळी तपासाचे काम स्थगित करता येईल.

(३) तक्रार निकालात काढल्यानंतर त्याबाबतचा निर्णय कलम १६४ खाली ठेवण्यात आलेल्या तक्रारीच्या पुस्तकात नमूद केला जाईल आणि कोणतीही आवश्यक सुधारणा अशा निर्णयानुसार, करनिर्धारण पुस्तकात करण्यात येईल.

---

[१] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २० (१) (क) अन्वये "पंधरा दिवसांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २०(१) (ख) अन्वये हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २० (२) (क) अन्वये, "पट्टीयोग्य मूल्य" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २० (२) (ख) अन्वये, "पंधरा दिवसांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २१ अन्वये हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह समाविष्ट करण्यात आला.

सर्व तक्रारी निकालात काढण्यात आल्यावर प्रभाग करनिर्धारण पुस्तकाचे अधिप्रमाणन करणे.

**१६६.** (१) अशा कोणत्याही तक्रारी असल्यास त्या सर्व निकालात काढण्यात आलेल्या असतील आणि कलम १५६ चा खंड (ई) अन्वये आवश्यक असणाऱ्या नोंदी प्रभाग करनिर्धारण पुस्तकात करण्यात आलेल्या असतील तेव्हा आयुक्त उक्त पुस्तक अधिप्रमाणित करील. तसेच तो, त्यामध्ये दर्शविण्यात येतील अशा कोणत्याही सुधारणा करण्यात आलेल्या असतील त्या बाबींव्यतिरिक्त उक्त पुस्तकात नोंद केलेल्या पट्टीयोग्य मूल्यांना [१][किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्यांना] कोणताही विधिग्राह्य आक्षेप घेण्यात आलेला नाही, असे आपल्या सहीनिशी प्रमाणित करील.

(२) लागोलाग उक्त प्रभाग करनिर्धारण पुस्तक लगतपुढील कलमातील तरतुदींखाली त्यात त्यानंतर करण्यात येतील अशा फेरबदलांच्या अधीनतेने, ज्या सरकारी वर्षासंबंधी ते पुस्तक असेल त्या सरकारी वर्षात, प्रभागांतील प्रत्येक इमारतीवर किंवा जमिनीवर बसवण्याजोग्या मालमत्ता कराच्या प्रत्येक रकमेचा निर्णायक पुरावा म्हणून स्वीकारण्यात येईल.

आयुक्तास सरकारी वर्षात करनिर्धारण पुस्तकात सुधारणा करता येतील.

**१६७.** (१) आयुक्तास कोणत्याही संबंधित व्यक्तीने अभिवेदन केल्यावरून किंवा इतर कोणत्याही माहितीवरून करनिर्धारण पुस्तक ज्या सरकारी वर्षाशी संबंधित असेल त्या वर्षात कोणत्याही वेळी, ज्या कोणत्याही व्यक्तीचे नाव अशा रीतीने दाखल करणे आवश्यक होते, तिचे नाव समाविष्ट करून किंवा पूर्वी वगळण्यात आलेल्या कोणत्याही परिवास्तू त्यात दाखल करून किंवा मालमत्ता कर देण्याचे दायित्व नसलेल्या कोणत्याही व्यक्तीचे नाव काढून टाकून किंवा कोणत्याही पट्टीयोग्य मूल्यात [२][किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्यांना] व त्यावर आधारलेल्या करनिर्धारणात वाढ करून अथवा घट करून कोणताही मालमत्ता कर देण्याच्या दायित्वातून कोणत्याही परिवास्तूला माफी देणारी कोणतीही नोंद दाखल करून किंवा रद्द करून, त्यात सुधारणा करता येईल.

(२) फेरबदल केलेल्या नोंदीअनुसार संबंधित व्यक्तीचे दायित्व किंवा तिला मिळणारी माफी निर्धारित करण्याच्या प्रयोजनाकरिता अशी प्रत्येक सुधारणा ही, सुधारणेचे समर्थन करणारी परिस्थिती अस्तित्वात असेल तेव्हा चालू सरकारी वर्षातील सर्वात अगोदरच्या दिवसापासून करण्यात आलेली आहे, असे मानण्यात येईल.

प्रत्येक सरकारी वर्षी नवीन करनिर्धारण पुस्तक तयार करण्याची आवश्यकता नसणे.

**१६८.** (१) प्रत्येक सरकारी वर्षी नवीन करनिर्धारण पुस्तक तयार करणे आवश्यक असणार नाही. पोटकलम (३) च्या तरतुदींच्या अधीनतेने, आयुक्तास निकटपूर्वीच्या वर्षाच्या पुस्तकातील नोंदी, त्यात त्यास योग्य वाटतील अशा सुधारणा करून प्रत्येक नवीन वर्षाच्या नोंदी म्हणून स्वीकारता येतील.

(२) परंतु, प्रत्येक वर्षी कलमे १६० व १६२ यांना अनुसरून जाहीर नोटीस देण्यात येईल आणि उक्त कलमाच्या तरतुदी व कलमे १६३ ते १६७ (दोन्ही धरून) यातील तरतुदी प्रत्येक वर्षी लागू असतील.

(३) दर [३][पाच वर्षांतून] किमान एकदा नवीन करनिर्धारण पुस्तक तयार करण्यात येईल.

### [४][**पाणी व मलनिस्सारण कर व आकार यासंबंधी विशेष तरतुदी**]

पाणी कर व आकार यांकरिता नियम.

**१६९.** (१) कलम १२८ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, [५][स्थायी समिती,] पाणीपुरवठा करण्याकरिता आणि पाणीपुरवठा करणे व कोणत्याही जोडण्या, खिळण्या बसवणे यांसाठी आणि प्रकरण दहाखाली महानगरपालिकेने दिलेल्या सेवांबद्दल आकारणी करण्याकरिता आवश्यक असतील असे नियम करील आणि अशा नियमांअन्वये,—

(एक) पाणीपुरवठा करण्यात आलेल्या कोणत्याही मालमत्तेच्या पट्टीयोग्य मूल्याच्या [६][किंवा यथास्थिति, भांडवली मूल्यांना] टक्केवारीने कलम १४० खाली बसवलेला पाणीकर व पाणी लाभकर यांद्वारे, करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठ्यावरील आकार ; अथवा

---

[१] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २२ अन्वये हा मजकुर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २३ अन्वये हा मजकुर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह समाविष्ट करण्यात आला.

[३] सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम २० अन्वये हे शीर्षक आणि कलमे १६९ ते १७२ दाखल करण्यात आली.

[४] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम २० अन्वये हे शीर्षक आणि कलमे १६९ ते १७२ दाखल करण्यात आली.

[५] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ७८ अन्वये "महानगरपालिका" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २४ अन्वये हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह समाविष्ट करण्यात आला.

(दोन) पुरवलेल्या पाण्याची मोजणी करून अथवा अंदाजित मोजणीवर आधारित असा, पाणी कराऐवजी पाणी आकार ; अथवा

(तीन) खंड (एक) व (दोन) खालील संयुक्त आकार ; अथवा

(चार) खंड (एक) व (दोन) खालील आकाराऐवजी आपसाती करून बसविलेला आकार निर्धारित करण्यात येईल.

(२) पोटकलम (१) च्या खंड (दोन) किंवा (चार) खाली पाणीपुरवठ्याकरिता जिच्यावर आकारणी करण्यात आली असेल अशा व्यक्तीवर, पाणीकर देण्याचे दायित्व असणार नाही, मात्र, तिच्याकडून देय असलेली व देय झाल्यानंतर देण्यात न आलेली अशी कोणतीही रक्कम, ती देय मालमत्ता कराची थकबाकी असल्याप्रमाणे आयुक्ताने वसूल करण्याजोगी असेल.

[१][(३) कलम १४६ मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी पाणी कर व आकार हे त्या परिवास्तूंचा प्रत्यक्ष भोगवटा करणाऱ्या व्यक्तीकडून किंवा व्यक्तींकडून वसुलीयोग्य असतील.]

**१७०.** (१) कलम १२८ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, [२][स्थायी समिती,] वेळोवेळी, मानवी मलमूत्र, विष्ठा व प्रदूषित पदार्थ, द्रव स्वरूपातील टाकाऊ पदार्थ व निःसृते आणि [३][स्थायी समिती] अशा नियमांत वेळोवेळी विनिर्दिष्ट करील असे कोणतेही इतर पदार्थ काढून नेण्यासाठी आणि कोणत्याही जोडण्या, खिळण्या बसवण्यासाठी व प्रकरण नऊखाली महानगरपालिका देईल अशा सेवांबद्दल आकारणी करण्यासाठी आवश्यक असतील असे नियम करील आणि अशा नियमांद्वारे पुढील गोष्टी निर्धारित करील— मलनिस्सारण कर व आकार यांकरिता नियम.

(एक) ज्या कोणत्याही मालमत्तांच्या संबंधात अशा सेवा पुरवण्यात आल्या असतील त्या मालमत्तेच्या पट्टीयोग्य मूल्याच्या [४][किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्यांना] टक्केवारीने, कलम १४० खाली बसवलेले मलनिस्सारण कर व मलनिस्सारण लाभ कर यांअन्वये अशा सेवा पुरविण्याबद्दल आकार ; अथवा

(दोन) परिवास्तूसाठी पुरवलेल्या पाण्याच्या परिमाणाची अथवा त्या परिवास्तूमधून वाहून जाणाऱ्या मलाच्या परिमाणाची मोजणी करून अथवा अंदाजित मोजणीवर आधारित, मलनिस्सारण कराऐवजी, मलनिस्सारण आकार ; अथवा

(तीन) खंड (एक) व (दोन) खालील संयुक्त आकार ; अथवा

(चार) खंड (एक) व (दोन) खालील आकारांऐवजी आपसाती करून बसविलेला आकार ;

(२) पोटकलम (१) च्या खंड (दोन) अथवा (चार) खाली मलनिस्सारण सेवांसाठी जिच्यावर आकारणी करण्यात आली असेल अशा व्यक्तीवर, मलनिस्सारण कर देण्याचे दायित्व असणार नाही, मात्र, तिच्याकडून देय असलेली व देय झाल्यानंतर देण्यात न आलेली अशी कोणतीही रक्कम, ती देय मालमत्ता कराची थकबाकी असल्याप्रमाणे आयुक्ताने वसूल करण्याजोगी असेल.

[५][ * * *]

२०११ चा महा. ११. [६][**१७२.** (१) महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपालिका आणि नगरपरिषद (सुधारणा) अधिनियम, २०११ द्वारे सुधारणा केलेल्या कलम १४०अ आणि कलम १५४अ च्या तरतुदी [७][२०१०-२०११, २०११-२०१२ आणि २०१२-२०१३ या वर्षाकरिता] पाणी कर व पाणी आकार आणि मलनिस्सारण कर व मलनिस्सारण आकार बसविण्याच्या प्रयोजनांसाठी योग्य त्या फेरफारांसह, लागू करण्यात येतील. पाणी कर व पाणी आकार आणि मलनिस्सारण कर व मलनिस्सारण आकार याचे नियम आणि त्याची सुधारणा.

[१] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम २९ अन्वये पोटकलम (३) जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ७९(अ) अन्वये "महानगरपालिका" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ७९ (ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ९५ अन्वये कलम १७१ वगळण्यात आले.

[६] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ५ अन्वये कलम १७२ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[७] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ९(क) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) स्थायी समितीस, कलमे १६९ व १७० अन्वये (दोन्हीसह) करण्यात आलेल्या किंवा करण्यात आले असल्याचे मानण्यात आलेल्या कोणत्याही नियमांमध्ये, वेळोवेळी भर घालता येईल, सुधारणा करता येईल किंवा ते विखंडित करता येतील. परंतु, या नियमांची कोणतीही सुधारणा ही, पोट-कलम (१) च्या तरतुदींना अधीन राहून या प्रयोजनांसाठी समितीने नियुक्त केलेल्या दिनांकास अंमलात येईल, तथापि, असा दिनांक हा, अशी सुधारणा करण्याचा स्थायी समितीने घेतलेला निर्णय त्या सरकारी वर्षात १ एप्रिल पूर्वीचा असणार नाही :

परंतु, [१][२०१०-२०११, २०११-२०१२ आणि २०१२-२०१३ या सरकारी वर्षाकरिता निश्चित केलेले नियम हे], प्रत्येक संबंधित सरकारी वर्षाच्या पहिल्या दिवशी अंमलात येतील.

[२][(३) ज्या इमारती व जमिनी १ एप्रिल २०१० रोजी किंवा त्यानंतर पहिल्यांदाच निर्धारणा केली जाण्यास पात्र असतील अशा इमारतींच्या किंवा जमिनींच्या बाबतीत पाणी कर व आकार आणि मलनिस्सारण कर व आकार हे जणू काही अशा इमारतींचे आणि जमिनींचे निर्धारण हे २००९-२०१०, या वर्षात करण्यात आले आहे असे समजून त्यांच्या पट्टीयोग्य मूल्यांच्या आधारे तात्पुरत्या स्वरुपात बसविण्यात येतील ; आणि अशा इमारतींचे व जमिनींचे भांडवली मूल्य निश्चित केल्यावर, महानगरपालिकेस, पट्टीयोग्य मूल्यांच्या आधारे ज्या वर्षाची तात्पुरती बिले बजावली असतील अशा वर्षांच्या संबंधातील अंतिम बील त्यांच्या भांडवली मूल्यांच्या आधारे बजावता येईल आणि त्यानुसार पूर्वोक्तप्रमाणे निर्गमित केलेल्या अंतिम बिलात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत असा कर भरणे हे अशा इमारतींच्या व जमिनींच्या मालकाचे आणि भोगवटदारांचे कर्तव्य असेल.]

कोणत्याही व्यक्तीने दिलेला पाणी कर, [५][पाणी आकार,] [६][मलनिस्सारण कर किंवा मलनिस्सारण आकार] हा तिने ज्या परिवास्तूत दाखल दिला असेल त्या परिवास्तूच्या भोगवटादाराकडून वसूल करता येईल.

**१७३.** (१) ज्या कोणत्याही व्यक्तीने एखाद्या परिवास्तूदाखल कोणतीही [३][पाणी कर किंवा पाणी आकाराची रक्कम अथवा], [४][कोणताही मलनिस्सारण कर किंवा मलनिस्सारण आकाराची रक्कम] आयुक्ताला दिली असेल तिला, तिने ज्या कालावधीबद्दल अशी रक्कम भरली असेल त्या कालावधीत जर उक्त परिवास्तू तिच्या प्रत्यक्ष भोगवट्यात नसेल तर, उक्त कालावधीत उक्त परिवास्तू जिच्या प्रत्यक्ष भोगवट्यात असेल अशी कोणतीही व्यक्ती असल्यास त्या व्यक्तीकडून ती रक्कम घेण्याचा हक्क असेल.

(२) पूर्वोक्त व्यक्तीकडून उक्त रक्कम वसूल करण्यासाठी, ज्या व्यक्तीने ती भरली असेल त्या व्यक्तीस, जणू अशी रक्कम ज्या व्यक्तीकडून ती घेण्याचा हक्क आहे त्या व्यक्तीने देणे असलेले भाडे असावे त्याप्रमाणे, ते वसूल करण्यासाठी जे हक्क असते व जे इलाज करता आले असते तेच हक्क असतील व तेच इलाज करता येतील.

परिवास्तूच्या मालकास गाळ्यांच्या भोगवटादारांकडून पाणी आकार वसूल करण्याचा हक्क असणे.

[७][**१७३ अ.** (१) ज्या परिवास्तूस मोजून पाणी पुरवण्यात येते त्या परिवास्तूत एकापेक्षा अधिक गाळे असतील आणि त्यास सामाईक मीटरमार्फत पाणी पुरवण्यात येत असेल आणि जर पुरवलेल्या पाण्याच्या संबंधातील पाणी आकार उक्त परिवास्तूचा मालक किंवा त्याच्यावतीने काम करणारी कोणतीही व्यक्ती आयुक्ताला देत असेल तर अशा मालकास गाळ्यांच्या भोगवटादारांकडून, उक्त गाळ्यांना सामाईक मीटरमार्फत ज्या कालावधीसाठी पाणी पुरवण्यात आले असेल त्या कालावधीत, भाड्याने दिलेल्या अशा गाळ्यांच्या भाड्यांच्या रकमेच्या प्रमाणात अशा पाण्याबद्दलच्या आकाराची रक्कम यथाप्रमाण वसूल करण्याचा हक्क असेल :

[१] वरील अधिनियमाच्या कलम ९(ख) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[२] वरील अधिनियमाच्या कलम ९(ग) अन्वये पोट-कलम (३) जादा दाखल करण्यात आले.
[३] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६२, कलम ४(१) अन्वये " पाणी कर किंवा " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.
[४] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१, कलम ९ (अ) अन्वये " कोणताही हलालखोर कर " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.
[५] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६२, कलम ४(२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[६] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१, कलम ९(ब) अन्वये " किंवा हलालखोर कर " या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[७] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६२, कलम ५ अन्वये कलमे १७३अ आणि १७३ब समाविष्ट करण्यात आली.

परंतु जर—

(अ) गाळ्यांपैकी कोणताही गाळा, मालकाच्या किंवा त्याच्यावतीने काम करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या भोगवट्यात असेल ; अथवा

(ब) भाडेदारीच्या शर्तीवरून, मालकाने गाळ्याच्या भोगवटादारासाठी पाणी आकार भरण्याचे कबूल केले असेल ;

तर, अशा गाळ्यांच्या संबंधात यथाप्रमाण द्यावयाची रक्कम इतर गाळ्यांच्या भोगवटादारांकडून वसूल केली जाणार नाही.

(२) जर, भाडेदारीच्या शर्तीखाली, कोणत्याही अशा गाळ्याबद्दल आकारलेल्या भाड्यात पाणी कराचा समावेश होत असेल आणि त्यानंतर त्या गाळ्यास सामाईक मीटरच्या सहाय्याने पाणी पुरवण्यात येत असेल आणि जर पाणी आकार मालक किंवा त्याच्यावतीने काम करणारी कोणतीही व्यक्ती भरीत असेल तर, अशा मालकास, अशा गाळ्याच्या भोगवटादाराकडून, तिने अशा गाळ्याच्या संबंधात पूर्वी देण्याजोगा पाणीकर व पोट-कलम (१) खाली देण्याजोगा यथाप्रमाण पाणी आकार यातील तफावतीची रक्कम फक्त ह्या कलमाखाली वसूल करण्याचा हक्क असेल.

मालकांनी दिलेल्या परंतु भोगवटादारांकडून वसूल न केलेल्या पाणी आकारामुळे कलम १५४ च्या प्रयोजनाकरिता असलेली वार्षिक भाड्याची रक्कम कमी होणार नाही.

**१७३ब.** जर कोणत्याही परिवास्तूच्या मालकाने अशा परिवास्तूला पुरवलेल्या पाण्याच्या संबंधात पाणी आकाराची रक्कम आयुक्ताला दिली असेल आणि अशा परिवास्तूचा प्रत्यक्ष भोगवटा करणाऱ्या व्यक्तीकडून कलम १७३अ खाली निर्धारित केलेली रक्कम वसूल करण्याचा हक्क असूनही जर त्याने ती कोणत्याही कारणास्तव पूर्णपणे किंवा अंशतः वसूल करण्याचे काम वगळले असेल किंवा त्याने तसे करण्यात कसूर केली असेल तर, अशी रक्कम वसूल करण्याचे वगळल्यामुळे किंवा त्यात कसूर केल्यामुळे, कलम १५४ च्या प्रयोजनाकरिता परिगणना केलेली उक्त परिवास्तूच्या वार्षिक भाड्याची रक्कम कमी होणार नाही.]

कलम १७३ब अंमलात न राहणे.

[1][**१७३ बअ.** कलम १४०अ अन्वये मालमत्ता कर बसविण्यासाठी, भांडवली मूल्याचा आधारभूत मूल्य म्हणून स्वीकार केल्याच्या दिनांकास व त्या दिनांकापासून, कलम १७३ ब च्या तरतुदी अंमलात असण्याचे बंद होईल.]

गाळ्यांच्या भोगवटादारांकडून मलनिस्सारण आकार वसूल करण्याचा परिवास्तूंच्या मालकास हक्क असणे.

[2][**१७३बब.** परिवास्तूंच्या मालकाकडून अथवा त्याच्यावतीने काम करणाऱ्या कोणाही व्यक्तीकडून परिवास्तूच्या बाबतीत मलनिस्सारण कराऐवजी मलनिस्सारण आकार वसूल करण्यात आला असेल तर, अशा मालकाला, अशा आकारांची रक्कम, अशा गाळ्यांपैकी प्रत्येक गाळा ज्या भाड्यावर देण्यात आला असेल तर, त्या भाड्याच्या प्रमाणात, गाळ्यांच्या भोगवटादारांकडून यथाप्रमाण वसूल करण्याचा हक्क असेल :

परंतु, जर—

(अ) गाळ्यांपैकी कोणतेही गाळे मालकाच्या अथवा त्याच्यावतीने काम करणाऱ्या कोणाही व्यक्तीच्या भोगवट्यात असतील, अथवा

(ब) भाडेदारीच्या अटींअन्वये, गाळ्याच्या भोगवटादारासाठी मलनिस्सारण आकार देण्याचे मालकाने कबूल केले असेल तर,

[1] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २७ अन्वये, हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९७३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम २१ अन्वये कलम १७३बब. समाविष्ट करण्यात आले.

अशा गाळ्यांच्या बाबतीत, यथाप्रमाण देय असलेली रक्कम, इतर गाळ्यांच्या भोगवटादाराकडून वसूल करण्यात येणार नाही.]

परिवास्तूचा भोगवटादार पाणी कर व पाणी आकार आयुक्तास देण्यास बांधलेला नसताना जर त्याने ते आयुक्तास दिले तर त्याला मालकाकडून त्यांची वसुली करण्याचा हक्क असणे.

[1][**१७३क.** जर भाडेदारीच्या अटींखाली, कोणत्याही परिवास्तूच्या भाड्यात, मोजून केलेल्या पाणीपुरवठ्याबद्दलच्या पाणी कराचा किंवा पाणी आकाराचा अंतर्भाव होत असेल आणि परिवास्तूंचा प्रत्यक्ष भोगवटा करणाऱ्या व्यक्तीने, त्या परिवास्तूंच्या मालकाच्यावतीने, आयुक्तास, परिवास्तूंच्या संबंधातील कोणताही पाणी कर किंवा पाणी आकार दिले असतील तर, याप्रमाणे दिलेली रक्कम मालकाकडून वसूल करण्याचा अशा व्यक्तीस हक्क असेल आणि मालकाला वेळोवेळी देय होणाऱ्या भाड्यातून ती रक्कम वळती करून घेता येईल.]

**जागा रिकाम्या राहिल्यामुळे मालमत्ता कराचा परतावा.**

[2][पाणी कराचा व मलनिस्सारण कराचा] परतावा केव्हा व किती प्रमाणात मिळेल.

**१७४.** जेव्हा कोणतीही इमारत किंवा जमीन किंवा कलम १५८ खाली आयुक्ताने स्वतंत्र मालमत्ता म्हणून समजलेला असा कोणत्याही परिवास्तूचा कोणताही भागांश लागोपाठच्या तीस दिवसांपेक्षा कमी नसेल अशा अवधीकरिता रिकामा राहिला असेल तेव्हा, आयुक्त यात यापुढे अंतर्भूत असलेल्या तरतुदींच्या अधीनतेने, जितके दिवस जागा रिकामी राहिली त्या दिवसांबद्दल दिलेल्या कोणत्याही पाणी कराच्या [3][व मलनिस्सारण कराच्या] रकमेचा परतावा देईल.

[4][* * * *]

जागा रिकामी असल्याची नोटीस आयुक्ताला दिलेली असल्याखेरीज परताव्याची हक्कमागणी करता येणार नाही.

**१७६.** (१) कर देण्याचे दायित्व असलेल्या व्यक्तीने किंवा तिच्या अभिकर्त्याने, जागा रिकामी असल्याची लेखी नोटीस आयुक्तास दिलेली असल्याखेरीज तिला उपरोक्तप्रमाणे आयुक्ताकडून कोणत्याही मालमत्ता कराचा कोणताही परतावा मिळवण्याकरिता हक्क मागणी करता येणार नाही.

(२) अशी नोटीस सुपूर्द केल्याच्या तारखेच्या पूर्वीच्या कोणत्याही कालावधीबद्दल आयुक्त परतावा देणार नाही.

(३) ज्या सहामाहीबद्दल कलम १९७ खाली मालमत्ता कर वसूल करण्याजोगा असेल त्या सहामाहीपासून लगतनंतरच्या सहामाहीपर्यंत एखादी जागा तशीच पुढे रिकामी राहील तेव्हा उक्त नंतरची सहामाही सुरू झाल्यापासून तीस दिवसांच्या आत याप्रमाणे जागा सतत रिकामी राहिल्याबद्दल पूर्वोक्तप्रमाणे आयुक्ताला नोटीस दिल्यावाचून, मालमत्तेवरील कराची कोणत्याही परताव्यासाठी कोणतीही हक्कमागणी करता येणार नाही.

पाणीपुरवठा थांबवण्याकरिता अर्ज करण्यात आलेला असल्याखेरीज पाणी कराचा परतावा अनुज्ञेय नसणे.

**१७७.** रिकाम्या परिवास्तूंचा पाणीपुरवठा बंद करण्यासाठी आयुक्तांकडे लेखी अर्ज केलेला असेल त्या वेळेपासून पुढील काळासाठी असेल ते खेरीज करून एरव्ही पाणीकराच्या परताव्याची हक्कमागणी करता येणार नाही.

---

[1] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१, कलम १० अन्वये कलम १७३क समाविष्ट करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम २२(ब) अन्वये "पाण्यावरील आणि हलालखोर कर" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम २२(अ) अन्वये "आणि हलालखोर कर" याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० याच्या कलम ९७ अन्वये कलम १७५ वगळण्यात आले.

[१][* * * *]

**१७९.** कोणत्याही मालमत्ता कराचा परतावा मिळण्याकरिता ज्या सहामाहीच्या संबंधात हक्कमागणी असेल ती सहामाही संपल्यानंतर तीस दिवसांच्या आत आयुक्ताकडे लेखी अर्ज केलेला नसेल तर आणि कराच्या ज्या रकमेचा परतावा मिळविण्यासाठी हक्कमागणी केलेली असेल त्या रकमेबद्दलचे [२][अर्जदारास कलम २०० खाली दिलेल्या बिलाची रक्कम चुकती केल्याची मूळ पावती किंवा त्यासंबंधीचा कोणताही पुरावा अर्जासोबत जोडला नसेल तर] अशी कोणतीही हक्कमागणी नामंजूर करणे, हे आयुक्ताच्या स्वविवेकाधीन असेल.

कराचा परतावा मिळण्याकरिता अर्ज केव्हा व कसे करावेत.

[३][* * * *]

[४][* * * *]

**१८३.** [५][दुरुस्तीस टाकलेल्या किंवा गाड्या तयार करण्याच्या जागेत असलेल्या वाहनांच्या बाबतीत कराची माफी असणे.] सन १९४२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ४ व सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ३ अन्वये निरसित करण्यात आले.

**१८४.** [५][वापरण्यास योग्य नसलेल्या आणि वापरात नसलेल्या जनावरांच्या बाबतीत कराची माफी असणे.] सन १९४२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ४ आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ३ या अन्वये निरसित करण्यात आले.

### [६][**कुत्र्यांवरील कर**]

[७][**१९१अ.** (१) [८][बृहन्मुंबईत] पाळण्यात आलेल्या प्रत्येक कुत्र्यावर दरसाल [९][शंभर रुपयांपेक्षा] अधिक नसेल इतका कर बसवण्यात येईल तथापि, कुत्र्याच्या मालकाने किंवा प्रभारी व्यक्तीने आपल्या मालकीच्या किंवा आपल्या प्रभाराखालील कुत्रा सहा महिन्यांपेक्षा कमी वयाचा आहे असे, आठ एप्रिल रोजी किंवा त्यापूर्वी, आयुक्ताकडे लेखी जाहीर केल्यास, सहा महिन्यांपेक्षा कमी वयाच्या कोणत्याही कुत्र्यावर असा कर बसवण्यात येणार नाही.

कुत्र्यांवरील कर.

(२) पोटकलम (१) खाली ज्यावर कर बसवण्याजोगा असेल अशा कुत्र्याची मालकी असणारी किंवा अशा कुत्र्याचा प्रभार असणारी प्रत्येक व्यक्ती अशा करास पात्र असेल.

(३) ज्यावर कर बसवण्याजोगा असेल अशा कुत्र्याची मालकी असणारी किंवा अशा कुत्र्याचा प्रभार असणारी प्रत्येक व्यक्ती, प्रत्येक सरकारी वर्षातील एप्रिल महिन्यात, आयुक्त विनिर्दिष्ट करील अशा नमुन्यात, तिने सही केलेले एक विवरण आयुक्तांकडे पाठवील.

---

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ९७ अन्वये कलम १७८ वगळण्यात आले.

[२] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २८ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ११ अन्वये कलम १८० याच्या पूर्वी येणारे शीर्षक वगळण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १२ अन्वये कलमे १८०, १८१, १८२, १८५, १८६, १८७, १८८, १८९, १९० आणि १९१ वगळण्यात आली.

[५] सन १९४२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ५ आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १३ अन्वये मूळ शीर्षकाऐवजी हे शीर्षक दाखल करण्यात आले.

[७] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१, कलम ११ अन्वये मूळ कलम १९१अ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[८] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ४ अन्वये “सात रुपयांपेक्षा” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(४) अशा कुत्र्याची मालकी असणारी किंवा अशा कुत्र्याचा प्रभार असणारी प्रत्येक व्यक्ती प्रत्येक सरकारी वर्षाच्या एप्रिल महिन्यात कर भरील :

परंतु, जेव्हा एखादी व्यक्ती दिनांक १ मे रोजी किंवा त्यानंतर अशा कुत्र्याचा मालक होईल किंवा अशा कुत्र्याचा प्रभार घेईल तेव्हा ती, कुत्र्याचा मालक होण्याच्या किंवा प्रभार घेण्याच्या तारखेपासून एका आठवड्यात, आयुक्ताकडे तसेच एक विवरण पाठवील व देय कर भरील.

(५) पूर्ण वर्षाच्या कराची रक्कम, ठोक रकमेत देय असेल आणि कोणताही कुत्रा ज्या कालावधीसाठी पाळण्यात आला असेल त्या कालावधीच्या प्रमाणात नसेल. मात्र, एकाच कुत्र्याच्या बाबतीत कोणत्याही सरकारी वर्षात एकापेक्षा अधिक वेळा कर देय होणार नाही.

(६) आयुक्त, या कलमाखाली कर भरण्याचे दायित्व असणाऱ्या व्यक्तींची नावे व पत्ते दर्शविणारी नोंदवही ठेवील.]

कुत्र्यांसाठी लायसन व क्रमांक तिकीट.

[1][[2][**१९१ब.** (१) जेव्हा कुत्र्याच्या मालकाने किंवा प्रभारी व्यक्तीने अशा कुत्र्यावर बसवण्याजोगा कर भरलेला असेल तेव्हा आयुक्त,—

(अ) ज्या सरकारी वर्षासाठी कर भरण्यात आला असेल त्या वर्षात, कुत्रा पाळण्यासाठी त्याला/तिला लायसन देईल, मात्र ते, आयुक्त लायसनमध्ये विहित करील अशा शर्तींच्या अधीन असेल ;

(ब) त्याला/तिला क्रमांक तिकीट पुरवील व त्याचा क्रमांक लायसनमध्ये विनिर्दिष्ट केला जाईल.

(२) याप्रमाणे लायसन देण्यात आलेल्या कोणत्याही कुत्र्याचा मालक किंवा कुत्र्याची प्रभारी व्यक्ती, सर्व वेळी, उक्त क्रमांकाचे तिकीट कुत्र्याच्या मानेवर लावलेल्या पट्ट्याला लावून ठेवण्याची किंवा अन्यथा त्याच्या गळ्यात लोंबते ठेवण्याची तजवीज करील.

(३) याप्रमाणे लावून ठेवलेले किंवा लोंबते ठेवलेले कोणत्याही क्रमांकाचे तिकीट नसणारा किंवा लायसनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करून पाळण्यात आलेला कोणताही कुत्रा—

(अ) ज्याच्या संबंधात कोणतेही लायसन देण्यात आलेले नाही असा कुत्रा असल्याचे गृहीत धरण्यात येईल ; आणि

(ब) पोलीस किंवा आयुक्ताने प्राधिकृत केलेला कोणताही अधिकारी सक्तीने ताब्यात घेऊ शकेल आणि कोणताही देय कर असल्यास, तो भरण्यात येईतोपर्यंत किंवा ज्या शर्तीच्या अधीनतेने लायसन देण्यात आले असेल त्या शर्तीचे अनुपालन करण्यात येई तोपर्यंत किंवा अनुपालन करण्याचे कबूल करण्यात येईतोपर्यंत अटकावून ठेवता येईल.]

कुत्र्यांच्या संबंधात नियंत्रण व इतर तरतुदी.

[3][**१९१बअ.** (१) कोणत्याही कुत्र्यांमुळे कोणत्याही इमारतीतील किंवा वसतिक्षेत्रातील रहिवाशांना उपद्रव होत आहे असे आढळून आल्यास किंवा तसे कळवण्यात आल्यास, आयुक्तास किंवा त्याने रीतसर प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, असे कुत्रे सक्तीने ताब्यात घेण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही परिवास्तूत प्रवेश करता येईल.

(२) अशा रीतीने सक्तीने ताब्यात घेतलेला कोणताही कुत्रा, महानगरपालिका श्वानगृहात ठेवण्यात येईल आणि कोणताही कुत्रा अशा रीतीने सक्तीने ताब्यात घेण्यात आल्याच्या तारखेपासून तीन दिवसांच्या आत, कोणत्याही व्यक्तीने अशा कुत्र्याचे आपण मालक किंवा प्रभारी व्यक्ती असल्याबद्दल आयुक्ताची खात्री करून दिली तर, आयुक्तास कोणताही देय कर असल्यास, आणि कुत्रा अशा रीतीने अटकावून

---

[1] सन १९४३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ३ आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम २ अन्वये कलमे १९१ब आणि १९१बअ समाविष्ट करण्यात आली.

[2] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१, कलम १२ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम १९१ब दाखल करण्यात आले.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १३ अन्वये कलम १९१बअ समाविष्ट करण्यात आले.

ठेवल्याच्या परिणामी आयुक्तास आलेला परिव्यय भरण्यात आल्यानंतर आणि त्यानंतर, लायसनच्या शर्तीनुसार कुत्रा ठेवण्यात येईल आणि इमारतीतील व वसतिक्षेत्रातील रहिवाशांना त्यापासून उपद्रव होणार नाही अशी हमी अशा व्यक्तीने दिल्यानंतर, तो कुत्रा अशा व्यक्तीकडे सुपूर्द करण्याबद्दल आदेश देता येईल :

परंतु, उक्त तीन दिवसांच्या आत, कोणत्याही व्यक्तीने आपण कुत्र्याचे मालक आहोत किंवा प्रभारी व्यक्ती आहोत याबद्दल आयुक्ताची खात्री करून देऊन कर व परिव्यय किंवा पूर्वोक्त हमी दिली नाही तर, आयुक्तास, कुत्र्याला ठार मारण्याची तजवीज करता येईल.

(३) एखादा मोकाट कुत्रा कोणत्याही व्यक्तीस चावला तर, जिला तो चावला असेल अशा व्यक्तीने तशी इच्छा व्यक्त केली तर आयुक्तास, आदेशाद्वारे, कुत्र्याच्या रोगोद्‌भवन काळात अशा कुत्र्याला महानगरपालिका श्वानगृहात अटकावून ठेवता येईल आणि कुत्रा अशा रीतीने अटकावून ठेवल्याबद्दल कोणत्याही व्यक्तीकडून कोणताही आकार घेतला जाणार नाही. जर लायसन दिलेला एखादा कुत्रा कोणत्याही व्यक्तीस चावला असेल आणि त्याला महानगरपालिका श्वानगृहात आणण्यात आले असेल तर, अशा कुत्र्याच्या मालकाची किंवा प्रभारी व्यक्तीची किंवा तो कुत्रा जिला चावला असेल अशा व्यक्तीची तशी इच्छा असेल तर, आयुक्त निर्धारित करील असा, दर दिवशी २ रुपयांपेक्षा अधिक नसेल असा अटकावणी आकार दिल्यावर, आयुक्तास, त्या कुत्र्याच्या रोगोद्‌भवन काळात अशा कुत्र्याला त्या श्वानगृहात अटकावून ठेवण्यासंबंधी आदेश देता येईल.

(४) पोटकलम (२) किंवा (३) खाली अटकावून ठेवलेल्या कोणत्याही कुत्र्याच्या तपासणीनंतर त्याला जलभी रोग झाला असल्याचे आढळून येईल तर, आयुक्त त्यास ताबडतोब ठार मारण्याचा आदेश देईल.

(५) या कलमाखाली ठार मारलेल्या कोणत्याही कुत्र्याच्या बाबतीत, कोणतीही नुकसानभरपाई देय असणार नाही.]

*[१][**१९१बब.** कलम १९१अ व १९१ब यांतील कोणतीही गोष्ट राज्य शासन याबाबत सर्वसाधारण किंवा विशेष आदेशान्वये विनिर्दिष्ट करील अशा राजनैतिक व वाणिज्यिक अधिकाऱ्यांनी बाळगलेल्या किंवा त्यांच्या ताब्यात असलेल्या कोणत्याही कुत्र्यांच्या बाबतीत लागू असणार नाही.] विवक्षित वाणिज्यिक अधिकाऱ्यांनी बाळगलेल्या कुत्र्यांच्या बाबतीत माफी.

---

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ६५ अन्वये कलम १९१बब समाविष्ट करण्यात आले.

* सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ८० पुढीलप्रमाणे आहे :—

"**८०.** (१) कलमे ६४, ६५ व ६७ यांन्वये केलेल्या सुधारणा १५ ऑगस्ट १९४७ रोजी केलेल्या व त्या तारखेपासून अंमलात आलेल्या आहेत असे मानण्यात येईल. कलमे ६४, ६५, ६७, ६८ व ७६ याअन्वये केलेल्या सुधारणांची अंमलबजावणी भूतलक्षी प्रभावाने असणे.

(२) कलमे ६८ व ७६ अन्वये केलेल्या सुधारणा १४ मार्च १९४४ रोजी केलेल्या व त्या तारखेपासून अंमलात आलेल्या आहेत असे मानण्यात येईल आणि या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी उक्त अधिनियमान्वये केलेला कोणताही आदेश किंवा केलेली कारवाई या अधिनियमान्वये सुधारल्याप्रमाणे उक्त अधिनियमान्वये केलेला आदेश आहे किंवा केलेली कारवाई आहे असे मानण्यात येईल आणि यथास्थिति, कोणत्याही अशा आदेशास किंवा कार्यवाहीस अनुसरून सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही खटला, दावा किंवा इतर कार्यवाही करता येणार नाही."

सद्भावपूर्वक वागणाऱ्या व्यक्तींना संरक्षण.

[१][**१९१क.** [२][कलम १९१ब किंवा १९१बअ] यांच्या तरतुदींच्या अनुरोधाने सद्भावपूर्वक केलेल्या कोणत्याही कृतीच्या संबंधात कोणत्याही व्यक्तीवर कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेविषयक कार्यवाही दाखल करता येणार नाही.

विवक्षित कलमे लागू नसणे.

[१][**१९१ड.** कलमे १८० ते १८२, १८५ ते १८८, १९०, १९१, १९८ व कलम २०० चे पोट-कलम (२) यातील दुसरे वाक्य यात अंतर्भूत असलेली कोणतीही गोष्ट कलम १९१अ खाली आकारण्याजोग्या कराच्या संबंधात लागू असणार नाही.]

[३][**नाट्यगृह कर**]

**चित्रपटगृहे, नाट्यगृहे, सर्कशी, आनंद बाजार आणि इतर प्रयोगांवर किंवा खेळांवर कर**

नाट्यगृह कर.

**१९१ई.** (१) यात यापुढे जी तरतूद केली असेल त्याखेरीज एरव्ही, राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेअन्वये याबाबत विनिर्दिष्ट करील अशा तारखेपासून चित्रपटगृहे, नाट्यगृहे, सर्कशी, आनंद बाजार व इतर प्रयोग किंवा खेळ यांवर या अधिनियमात नाट्यगृह कर म्हणून निर्देशिलेला कर बसवण्यात येईल व तो कर महानगरपालिकेस देण्यात येईल.

(२) नाट्यगृह कर हा, नाट्यगृह, चित्रपटगृह, सर्कस, आनंद बाजार किंवा करमणुकीच्या इतर जागा यांच्या संबंधात, त्या ठिकाणी किंवा त्यामध्ये आणि या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये किंवा त्याखाली विहित केलेल्या दराने पैसे घेऊन जेथे लोकांस प्रवेश देण्यात येतो अशा प्रत्येक प्रयोगाबद्दल किंवा खेळाबद्दल बसवण्यात येईल.

(३) [४][अनुसूची ग] यामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या दरांपेक्षा अधिक नसतील, असे कलम १२८ अनुसार जे दर महानगरपालिका वर्षावर्षाला ठरवील, अशा दरांपेक्षा अधिक दराने नाट्यगृह कर बसवता येणार नाही.

नाट्यगृह कर भरण्याचे दायित्व.

**१९१फ.** करमणूक कार्यक्रमाचा प्रत्येक स्वामी, व्यवस्थापक किंवा प्रभारी व्यक्ती यांवर नाट्यगृह कर देण्याचे दायित्व असेल आणि अशी व्यक्ती उक्त कर प्रत्येक खेळ सुरू होण्यापूर्वी भरील अथवा जर वेगवेगळे खेळ नसतील तर, कोणत्याही दिवशी करमणुकीच्या खेळास कोणत्याही व्यक्तीस प्रवेश देण्यापूर्वी भरील :

परंतु, आयुक्त, [५][***] तो ज्या अटी व शर्ती लादील अशा अटींच्या व शर्तींच्या अधीनतेने, खेळांच्या मालिकांच्या किंवा एका आठवड्याच्या किंवा एका महिन्याच्या कालावधीच्या संबंधात उक्त कर एका ठोक रकमेने भरण्याची परवानगी देऊ शकेल.

नाट्यगृह कर भरण्याचे दायित्व असलेल्या व्यक्तींची नोंदवही.

**१९१ग.** आयुक्त एक नोंदवही ठेवील आणि तीत वेळोवेळी पुढील गोष्टींची नोंद करण्यात येईल,—

(अ) नाट्यगृह कर भरण्याचे दायित्व असलेल्या व्यक्तींची यादी ;

(ब) अशा व्यक्तींच्या मालकीची किंवा त्यांच्या ताब्यात असलेली चित्रपटगृहे, नाट्यगृहे व करमणुकीच्या इतर जागा यांचा तपशील ;

(क) अशा प्रत्येक व्यक्तीने द्यावयाच्या कराची अंदाजे रक्कम व ती ज्या कालावधीच्या संबंधात देण्याजोगी असेल तो कालावधी.

---

[१] सन १९४३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ३ आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम २ अन्वये कलमे १९१क आणि १९१ड समाविष्ट करण्यात आली.

[२] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१, कलम १४ अन्वये "कलम १९१ब, पोट-कलमे (२), (३) व (५)" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ६६ अन्वये हे शीर्षक आणि कलमे १९१ई ते १९१के समाविष्ट करण्यात आली.

[४] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २९ अन्वये "अनुसूची ग-१" या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ८३ अन्वये "प्रभारी सदस्याच्या मंजुरीने" हा मजकूर वगळण्यात येईल.

**१९१ह.** करमणुकीच्या कार्यक्रमाच्या प्रत्येक स्वामीने, व्यवस्थापकाने किंवा प्रभारी व्यक्तीने आयुक्ताकडे, विवरणे सादर करणे हे त्याचे कर्तव्य असेल ; अशा विवरणांवर तो स्वतः सही करील व ती कलम १९१के खाली केलेल्या नियमाअन्वये विहित करण्यात येईल अशा कालांतराने व अशा नमुन्यात सादर करील व त्यामध्ये नाट्यगृह कर बसवण्याच्या प्रयोजनार्थ विहित करण्यात येईल अशी माहिती अंतर्भूत असेल. नाट्यगृह कर देण्याचे दायित्व असलेल्या व्यक्तींनी विवरणे पाठविणे.

**१९१आय.** नाट्यगृह कर ज्याच्या संबंधात देण्याजोगा असेल किंवा देण्याजोगा होईल अशा कोणत्याही प्रयोगासाठी किंवा खेळासाठी कोणतीही परिवास्तू किंवा जागा वापरण्यात येत आहे किंवा वापरली जाण्याच्या बेतात आहे असे आयुक्तास सकारण वाटत असेल तर आयुक्तास त्या परिवास्तूत किंवा त्या जागेत प्रवेश करता येईल व त्याचे निरीक्षण करता येईल. निरीक्षणाचा अधिकार.

**१९१जे.** (१) कोणत्याही व्यक्तीने नाट्यगृह कर भरण्यात कसूर केली असेल तर, आयुक्त शक्य तितक्या कमीत कमी वेळात, कसूरदारावर कलम १९१के खाली याबाबत करण्यात येतील अशा नियमांनी विहित करण्यात येईल अशा नमुन्यातील मागणी नोटीस बजावण्याची तजवीज करील. अशी नोटीस बजावण्यात आल्याबद्दल कोणतीही फी द्यावी लागणार नाही. मागणी नोटीस.

(२) पोट-कलम (१) खाली जिच्यावर नोटीस बजावण्यात आली असेल अशा व्यक्तीने तिच्यावर नोटीस बजावल्यापासून पंधरा दिवसांच्या आत देय रक्कम भरली नाही किंवा ती रक्कम न भरण्याबद्दल आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने पुरेसे कारण दाखवले नाही तर, आयुक्तास, उक्त रक्कम कसूरदाराची जंगम मालमत्ता अटकावून व तिची विक्री करून अथवा स्थावर मालमत्तेवर जप्ती आणून व तिची विक्री करून जणू काही अशी रक्कम त्या व्यक्तीकडून येणे असलेल्या मालमत्तेवरील कर असावा, त्याप्रमाणे वसूल करता येईल.

**१९१के.** [१][आयुक्तास स्थायी समितीच्या पूर्वमान्यतेने,] नाट्यगृह कराचा भरणा सुनिश्चित व्हावा यासाठी आणि सर्वसाधारणपणे उक्त करासंबंधीच्या ह्या अधिनियमाच्या तरतुदी अंमलात आणल्या जाव्या यासाठी आणि विशेषतः पुढील बाबींसाठी नियम करता येतील :— नाट्यगृह कराचे नियमन करणारे नियम.

(अ) महानगरपालिकेने निर्धारित केलेल्या नाट्यगृह कराचे दर प्रसिद्ध करणे ;

(ब) ज्यांच्या बाबतीत कर भरण्याची माफी देण्यात आली आहे अशा करमणुकी किंवा अशा करमणुकीचे वर्ग आणि ज्या मर्यादेपर्यंत अशा रीतीने माफी देण्यात आलेली आहे ती मर्यादा ;

(क) भरलेल्या कराची रक्कम केव्हा व कोणत्या मर्यादेपर्यंत परत करण्यात येईल ते ;

(ड) कलम १९१ह खाली कोणत्या नमुन्यानुसार व किती कालांतराने विवरण आयुक्ताकडे सादर करण्यात येईल ते ;

(ई) कलम १९१जे खाली द्यावयाच्या मागणी नोटिशीचा नमुना.

### [२][**जकात**]

**१९२.** (१) यात यापुढे तरतूद केली असेल त्या खेरीज, अनुसूची "ह" मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वस्तू कोणत्याही ठिकाणाहून [३][बृहन्मुंबईत] उपभोगासाठी, वापरासाठी किंवा विक्रीसाठी म्हणून आणण्यात आल्या असतील तेव्हा, उक्त अनुसूचीत उल्लेख केलेल्या उक्त वस्तूंच्या किंवा अशा वस्तूंपैकी महानगरपालिका कलम १२८ यास अनुसरून वर्षावर्षाला ठरवील त्या वस्तूंच्या संबंधात, उक्त अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या दरापेक्षा अधिक नाहीत अशा दरांनी कर बसविण्यात येईल. उक्त करास "जकात" असे संबोधण्यात येईल. जकात कोणत्या वस्तूंवर व कोणत्या दरांनी बसवण्याजोगी असेल.

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ८४ अन्वये "महानगरपालिकेस" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ७ अन्वये हे शीर्षक आणि कलम १९२ दाखल करण्यात आले.

[३] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) हा कर प्रथमतः बसवण्यात आल्यावर, कलम १२८ व या अधिनियमाच्या इतर संबंधित तरतुदींचे पालन करून जर हा कर, कोणत्याही वर्षीच्या १ एप्रिल रोजी अंमलात आणणे शक्य नसेल तर त्या बाबतीत, कलम १२८ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेला, मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९६४ पारित झाल्यानंतर आणि उक्त अधिनियम अंमलात आला नसला तरीही कोणत्याही वेळी उक्त प्रयोजनासाठी भरविण्यात आलेल्या विशेष सभेत याप्रमाणे ज्या वस्तूंवर कर बसवावयाचा असेल त्या वस्तू आणि ज्या दराने त्यावर कर बसवावयाचा असेल ते दर आणि ज्या तारखेपासून कर बसवावयाचा असेल ती तारीख (अशी तारीख ही, तो अधिनियम ज्या तारखेस अंमलात येईल त्या तारखेच्या आधीची असणार नाही) ठरविता येईल ; आणि लागोलाग, याप्रमाणे निर्धारित करण्यात येईल अशा वस्तुंवर त्या दराने व त्या तारखेपासून कर बसवण्यात येईल, आणि या अधिनियमाच्या सर्व संबद्ध तरतुदी या जणू काही कलम १२८ च्या व या अधिनियमाच्या इतर तरतुदीअन्वये विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीचे पालन करण्यात आले असावे त्याप्रमाणे, शक्य असेल तेथवर या कराच्या बाबतीत लागू होतील.

१९६४ चा ३२.

(३) ज्या वस्तूंवर कर बसवावयाचा असेल त्या वस्तू निर्धारित करताना, महानगरपालिकेस [१][अनुसूची "ह" मधील] कोणत्याही नोंदीत विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या सर्व किंवा कोणत्याही एका किंवा अधिक वस्तुंची निवड करता येईल, आणि ज्या दरांनी वस्तुंवर कराची आकारणी करावयाची असेल ते दर निर्धारित करताना, महानगरपालिकेस त्याच नोंदीतील निरनिराळ्या वस्तुंसाठी निरनिराळे दर निश्चित करता येतील.

(४) महानगरपालिकेने विनंती केल्यावर, राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेअन्वये [२][अनुसूची "ह" मध्ये घालता येईल, सुधारणा करता येईल किंवा तीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेली कोणतीही बाब वगळता येईल किंवा तीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दरांमध्ये बदल करता येईल] आणि लागोलाग, अनुसूचीत यानुसार सुधारणा झाली असल्याचे मानण्यात येईल.

[३][(५) या कलमात किंवा या अधिनियमाच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, कलम १४४ई अन्वये घोषित केलेल्या विशेष विकास प्रकल्पांच्या उपयोगाकरिता व वापराकरिता अनुसूची **"ह"** मध्ये नमूद केलेल्या वस्तूंचा बृहन्मुंबईमधील प्रवेशावरील जकात कर, राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, वेळोवेळी निश्चित करील अशा कमी केलेल्या दराने आकारण्यात येईल ; आणि वेगवेगळ्या कालावधींकरिता आणि वेगवेगळ्या विशेष विकास प्रकल्पांकरिता वेगवेगळे दर निश्चित करता येईल.]

---

[१] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ५(अ) अन्वये "उक्त अनुसूचीतील" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १०२(अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १९, कलम ३ अन्वये पोट-कलम (५) समाविष्ट करण्यात आले.

[1][(६) या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, अनुसूची ह-१ मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या वस्तू [2][बृहन्मुंबई]मध्ये, तेथील उपभोगासाठी, वापरासाठी किंवा विक्रीसाठी आणल्या असतील तेव्हा, उक्त वस्तुंवर जकात कर भरावा लागणार नाही.] [3][राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, अनुसूची "ह-१" मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या कोणत्याही बाबीत भर घालता येईल, तीत सुधारणा करता येतील किंवा ती वगळता येईल.]

[7][जकात] दराचा तक्ता विवक्षित जागी लावणे.

**१९३.** आयुक्त त्या त्या वेळी बसवण्याजोग्या असलेल्या [4][जकातीचे] तक्ते, त्यात, ती ज्या दराने व ज्या वस्तूंवर [5][बसविण्यायोग्य असेल] तो दर व त्या वस्तू विनिर्दिष्ट करून, ती इंग्रजी, गुजराती, मराठी व उर्दू भाषेत मुद्रित करून घेण्याची आणि ती ज्या जागी [6][उक्त जकात बसविण्यात आली असेल] अशा प्रत्येक जागी ठळक ठिकाणी लावण्याची तजवीज करील.

[9][शासनाच्या] मालकीच्या वस्तूंना [10][जकातीची] माफी.

**१९४.** (१) ज्या कोणत्याही वस्तूबद्दल ती आयात होण्याच्या वेळी [8][संबंधित शासनाने] त्याबाबत ज्याला अधिकार प्रदान केले असतील अशा अधिकाऱ्याने ती [9][[10][शासना] च्या] मालकीची आहे असे प्रमाणित केले असेल अशा वस्तूवर कोणतीही [11][जकात] बसवता येणार नाही.

आयात केल्यानंतर [9][शासनाची] मालमत्ता होणाऱ्या वस्तूंवरील [10][जकातीचा परतावा].

(२) ज्या कोणत्याही वस्तूवर [11][जकात] भरली असेल ती वस्तू [12][[13][राज्य] शासनाशी] केलेली विनिर्दिष्ट संविदा पूर्ण करण्यासाठी किंवा अन्यथा [14][[10][शासना]च्या] उपयोगासाठी आयात करण्यात येत आहे असे अधिकथन आयात करणाऱ्या व्यक्तीने सही करून ती वस्तू आयात केली असेल तर, अशा रीतीने आयात केलेली वस्तू [14][[10][शासना]ची] मालमत्ता झाली आहे अशा अर्थाचे, [15][संबंधित शासनाने] याबाबत ज्याला अधिकार प्रदान केले असतील अशा अधिकाऱ्याने सही केलेले प्रमाणपत्र वस्तू आयात केल्याच्या तारखेपासून सहा महिन्यांच्या आत कोणत्याहीवेळी सादर केल्यावर त्या वस्तूबद्दल [16][दिलेल्या कराच्या] पूर्ण रकमेचा परतावा देण्यात येईल.

---

[1] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२ याच्या कलम ५(क) अन्वये पोट-कलम (६) समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १०२ (ब) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[4] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ८(अ) अन्वये " नगरशुल्कांची " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ८(ब) अन्वये " बसविण्यात येत असतील " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[6] वरील अधिनियमाच्या कलम ८(क) अन्वये " उक्त शुल्के बसवण्यात आली असतील " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[7] वरील अधिनियमाच्या कलम ८(ड) अन्वये " नगर शुल्काच्या " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[8] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याअन्वये " शासनाने " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[9] वरील आदेशान्वये " बादशहाच्या " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[10] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " बादशहाच्या " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[11] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ९(अ) अन्वये उक्त कलमामध्ये व समासटिपेमध्ये " नगर शुल्क " या शब्दाऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरबदलासह दाखल करण्यात आला.

[12] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " सरकार " या ऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[13] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " याऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[14] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " सरकारची " या शब्दाऐवजी " बादशाहाची " हा शब्द दाखल करण्यात आला.

[15] वरील आदेशान्वये " सरकारने " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[16] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ९(ब) अन्वये दिलेल्या नगर शुल्काची या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

विवक्षित वाणिज्यिक अधिकाऱ्यांच्या मालकीच्या वस्तूंना [२][जकात] माफी.

*[१][**१९४-१अ.** राज्य शासन कोणत्याही विशेष किंवा सर्वसाधारण आदेशान्वये याबाबत विनिर्दिष्ट करील अशा, [२][मुंबई] येथे असणाऱ्या राजनैतिक किंवा वाणिज्यिक अधिकाऱ्यांनी किंवा त्यांच्या वतीने आयात केलेल्या कोणत्याही वस्तूंवर उक्त आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा मर्यादेपर्यंत आणि अशा शर्तींच्या अधीनतेने [२][जकात] बसवण्यापासून माफी देण्यात येईल.]

ताबडतोब निर्यात करण्यासाठी आयात केलेल्या वस्तुंच्या बाबतीत माफी.

[३][**१९४अ.** [४][आयुक्त, स्थायी समितीच्या मान्यतेने] या अधिनियमाशी विसंगत नसतील असे जे नियम, याबाबत वेळोवेळी करील अशा नियमांच्या अधीनतेने, [५][ताबडतोब निर्यात करण्याच्या प्रयोजनांसाठी] [६][बृहन्मुंबईत] आयात केलेली कोणतीही वस्तू, उक्त नियमांत निर्धारित करण्यात येईल अशा देखरेखीखाली आणि त्यासाठी निर्धारित करण्यात येईल अशी फी देऊन आयातीच्या ठिकाणाहून निर्यातीच्या ठिकाणी परस्पर नेण्यात आली असेल तर अशा वस्तुंच्या बाबतीत [२][जकातीची] माफी देण्यात येईल :

परंतु उपरोक्तप्रमाणे तयार केलेला कोणताही नियम [७][[८][राज्य] शासनाने] कायम केलेला असल्याखेरीज व तो कायम करण्यात येईतोपर्यंत, परिणामक असणार नाही.]

निर्यात केल्यावर [२][जकातीचा] परतावा.

**१९५.** (१) ज्यावर [९][जकात] देण्यात आली आहे अशी कोणतीही वस्तू [१०][बृहन्मुंबईतून] निर्यात करण्यात येईल, तेव्हा [११][पोटकलमे (२) व (३) यात समाविष्ट असलेल्या तरतुदींच्या अधीनतेने, पोट-कलम (१अ) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वसूल केलेल्या [१२][कराचा] परतावा देण्यात येईल.]

---

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, याच्या कलम ६७ अन्वये कलम १९४-१अ समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलमे १० व ११ अन्वये “ नगर शुल्क ” या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात झाला.

[४] सन १९११ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ८ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ८५ अन्वये “ महानगरपालिका ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ६(१) अन्वये “ शहरात ” या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[८] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याअन्वये “ सरकार ” या मजकुराऐवजी “ प्रांतिक सरकार ” हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये “ प्रांतिक ” या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[१०] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम १२(अ), (ब) आणि (ड) या अन्वये “ नगर शुल्क ” या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[११] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क३मांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(२) अन्वये “ ग्रेटर बॉम्बे ” या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[१२] वरील अधिनियमान्वये “ अशा रीतीने भरलेल्या ड्यूटीची पूर्ण रक्कम ” या शब्दाने सुरू होणाऱ्या व “ परत केली पाहिजे ” या शब्दाने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१३] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम १२(अ), (ब) आणि (ड) अन्वये “ शुल्काचा ” या ऐवजी हा शब्द त्यांच्या व्याकरणिक फेरबदलांसह दाखल करण्यात आला.

* सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ८० पुढीलप्रमाणे आहे :—

कलमे ६४, ६५, ६७, ६८ व ७६ याअन्वये केलेल्या सुधारणांची अंमलबजावणी भूतलक्षी प्रभावाने असणे.

“ **८०.** (१) कलमे ६४, ६५ व ६७ याअन्वये केलेल्या सुधारणा १५ ऑगस्ट १९४७ रोजी केलेल्या व त्या तारखेपासून अंमलात आलेल्या आहेत असे मानण्यात येईल.

(२) कलमे ६८ व ७६ अन्वये केलेल्या सुधारणा १४ मार्च १९४४ रोजी केलेल्या व त्या तारखेपासून अंमलात आलेल्या आहेत असे मानण्यात येईल आणि ह्या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी उक्त अधिनियमाखाली केलेला कोणताही आदेश किंवा केलेली कार्यवाही ही, त्या अधिनियमान्वये सुधारणा केल्याप्रमाणे उक्त अधिनियमाखाली केलेला आदेश आहे किंवा केलेली कार्यवाही आहे असे मानण्यात येईल आणि यथास्थिति, कोणत्याही अशा आदेशास किंवा कार्यवाहीस अनुसरून सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही खटला, दावा किंवा इतर कार्यवाही करण्यात येणार नाही.

[१][(१अ) पोट-कलम (१) खाली परतावा द्यावयाची [२][कराची] रक्कम ही, त्या वस्तूंवर बसवण्यात आलेल्या [३][जकातीच्या] [४][शेकडा ९० टक्के] असेल. बाकी राहिलेली [५][शेकडा १० टक्के] रक्कम ही वसूल करणे व परतावा देणे याबद्दल फी म्हणून नगरपालिका निधीत जमा करण्यात येईल.]

(२) असे परतावे [६][आयुक्त, स्थायी समितीच्या मान्यतेने,] याबाबत वेळोवेळी जे नियम करील त्या नियमांनुसार देण्यात येतील.

(३) परंतु,—

[७][(अ) [८][बृहन्मुंबईत] आयात केलेली आणि याप्रमाणे आयात केल्यापासून सहा महिन्यांच्या आत जी निर्यात करण्यात आली नसेल अशी कोणतीही वस्तू ही, याउलट शाबीत झालेले असल्याखेरीज, [८][बृहन्मुंबईत] उपभोगासाठी, वापरासाठी किंवा विक्रीसाठी आयात केलेली वस्तू असल्याचे मानण्यात येईल ;]

(ब) [८][बृहन्मुंबईत] आयात केल्यासंबंधीचा पुरावा नसलेल्या, [८][बृहन्मुंबईतून] निर्यात केलेल्या सर्व प्रकारच्या पिठाच्या बाबतीत, असे पीठ ज्या धान्यापासून तयार केले असेल अशा धान्यावर त्या त्या वेळी बसवण्याजोग्या [२][कराच्या] रकमेच्या शेकडा [९][७० ५/१६] टक्के इतका परतावा मिळण्यासाठी हक्कमागणी करता येईल.

(क) परतावा मिळण्यासाठी, निर्यातीच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत [१०][किंवा कोणत्याही विशेष प्रकरणी किंवा अशा प्रकरणाच्या वर्गाच्या बाबतीत आयुक्त परवानगी देईल अशा त्याहून अधिक कालावधीच्या आत] अर्ज केलेला असल्याखेरीज, असा परतावा दिला जाणार नाही.

(ड) [११][दहा रुपयांपेक्षा] कमी रकमेचा कोणताही परतावा देण्यात येणार नाही.

(ई) [१२][आयुक्ताने स्थायी समितीच्या मान्यतेने] या कलमाखाली केलेला कोणताही नियम [१३][[१४][राज्य] शासनाने] कायम केला असल्याखेरीज व करीतोपर्यंत परिणामक असणार नाही.

---

[१] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४, कलम ४(२) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम १२(अ), (ब) आणि (ड) अन्वये “ शुल्काचा ” या ऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरबदलांसह दाखल करण्यात आला.

[३] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम १२(अ), (ब) आणि (ड) यांअन्वये “ नगर शुल्क ” या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १०४अ(एक) अन्वये “ शेकडा ९३ $\frac{३}{४}$ टक्के ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १०४ (अ) (दोन) अन्वये “ शेकडा ६ $\frac{१}{४}$ टक्के ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ८६ अन्वये “ महानगरपालिका ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम १२(क) (एक) अन्वये हा खंड बदली दाखल करण्यात आला.

[८] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४, कलम ४(३) अन्वये “ पंच्याहत्तर ” याऐवजी हा आकडा दाखल करण्यात आला.

[१०] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ६८ अन्वये हा भागांश समाविष्ट करण्यात आला.

[११] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४, कलम ४(३) अन्वये “ पाच रुपयांपेक्षा ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ८६(ब) अन्वये “ महानगरपालिकेने ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याअन्वये “ सरकार ” या मजकुराऐवजी “ प्रांतिक सरकार ” हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये “ प्रांतिक ” या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

देणग्या, वगैरेंना जकातीची माफी.

[1][**१९५-१अ.** [2][स्थायी समितीच्या मान्यतेने, आयुक्त,] याबाबतीत वेळोवेळी तयार करील अशा नियमांच्या अधीनतेने, आयुक्तास सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे पुढील वस्तुंना माफी देता येईल :—

(एक) कोणत्याही आपत्ती निवारणासाठी देणगी म्हणून मोफत मिळालेल्या वस्तू ;

(दोन) कोणत्याही धर्मादाय परिसंस्थेने धर्मादाय प्रयोजनासाठी आयात केलेल्या वस्तू ;

(तीन) कोणत्याही प्रवाशाने स्वतःचे सामान म्हणून आणलेल्या आणि ज्याचे मूल्य एकशेपन्नास रुपयांपेक्षा अधिक नसेल, किंवा ज्याचे परिमाण [3][आयुक्त स्थायी समितीच्या मंजुरीने] निश्चित करील अशा मर्यादेपेक्षा अधिक नसेल अशा वस्तू ;

(चार) महानगरपालिका विनिर्दिष्ट करील अशा इतर परिस्थितीत व अशा शर्तींच्या व निर्बंधांच्या अधीनतेने, ज्यांची आयात करण्यात आली असेल अशा वस्तू.

जकातीसंबंधी सर्वसाधारण नियम.

**१९५-१ब.** या अधिनियमाखाली जकात बसवणे, तिचे निर्धारण करणे व ती गोळा करणे यासंबंधी [4][आयुक्त स्थायी समितीच्या मान्यतेने] नियम तयार करील ; आणि त्यास अशा नियमांअन्वये इतर गोष्टींबरोबरच पुढील गोष्टींसाठी तरतूद करता येईल :—

(अ) जकातपात्र वस्तूंची तपासणी ;

(ब) जकात देण्याजोगी असेल अशी वस्तू कोणत्याही वाहनात किंवा पुडक्यात आहे किंवा कसे याबद्दल खात्री करून घेण्यासाठी उक्त वाहनांचे किंवा पुडक्यांचे निरीक्षण करणे, त्यांचे वजन करणे किंवा त्यातील वस्तुंची तपासणी करणे ;

(क) जकात देण्याचे नाकारल्यास असा कर देण्यास पात्र असलेल्या वस्तुंचे अभिग्रहण करणे व त्यांचे अधिहरण करणे ;

(ड) कर चुकवेपणास आळा घालण्यासाठी उपाययोजना करणे ;

(ई) जकात बसवणे, तिचे निर्धारण करणे किंवा वसुली करणे यासाठी जी कोणतीही बाब विहित करावयाची किंवा विहित करता येईल अशी इतर कोणतीही बाब ;

या कलमाखाली [5][आयुक्ताने] तयार केलेला कोणताही नियम राज्य शासनाने तो कायम केल्याखेरीज आणि कायम करीतोपर्यंत परिणामक असणार नाही.]

**१९५अ.** [कच्च्या कापसावर नगर शुल्क बसवणे] सन १९३४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ याच्या कलम २ अन्वये निरसित करण्यात आले.

**१९५ब.** [ठोक महसुलाच्या चार-सप्तमांश इतकी रक्कम शासनाला देणे ; शुल्काची वाटणी] सन १९३४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, याच्या कलम २ अन्वये निरसित करण्यात आले.

[1] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम १३ अन्वये कलमे १९५-१अ आणि १९५-१ब समाविष्ट करण्यात आली.

[2] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ८७(अ) अन्वये "महानगरपालिका" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ८७(ब) अन्वये, "प्रभारी सदस्य महापौरासह परिषदेच्या मंजुरीने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ८८(अ) अन्वये "महानगरपालिका" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ८६(ब) अन्वये "महानगरपालिकेने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][**१९५क.** (१) [२][[३][राज्य] शासन,] [४][आता निरसित केलेल्या कलम १९५अ खाली कच्च्या कापसावर बसवलेल्या नगर शुल्कामधून महानगरपालिकेने राज्य शासनाला दिलेल्या आणि दिनांक १ ऑक्टोबर १९२० रोजी रचना केलेल्या मुंबई शहरांतील कामकरी वर्गासाठी गाळे पुरविण्यासाठी] नेमून दिलेल्या सर्व रकमा आणि असे गाळे पुरवण्यासाठी उभारलेली व त्यासाठी वापरलेली सर्व कर्जे आणि अशा कर्जाची परतफेड करण्यासाठी, स्थापन केलेला कोणताही कर्ज निवारण निधी यांचा स्वतंत्र लेखा ठेवील. तसेच, महानगरपालिकेस प्रत्येक वर्षाच्या लेख्याची प्रत पुरविल.

लेखा ठेवणे, लवाद घेण्यासंबंधी महानगरपालिकेने विकल्पाचा वापर करणे.

(२) महानगरपालिकेस, सहा महिन्यांची आगाऊ लेखी नोटीस दिल्यानंतर दिनांक १ एप्रिल १९३६ रोजी किंवा त्यानंतरच्या कोणत्याही वर्षी १ एप्रिल रोजी पूर्वोक्तप्रमाणे रचना केलेल्या मुंबई शहरात संपादन केलेल्या सर्व जमिनी व इमारती आणि उक्त शहरात बांधलेल्या सर्व इमारती यांवर [५][[६][शासनाला]] असणारा अधिकार, हक्क आणि [५][[६][शासनाला]] हितसंबंध, अशा रकमांच्या आणि कर्जाच्या सहाय्याने अशा जमिनी व इमारती व अशी कर्जे यांच्या संबंधाने [५][[६][शासनाच्या]] त्यावेळी अस्तित्वात असलेल्या आणि भावी दायित्वांच्या बाबतीत [५][[६][शासनाला]] क्षतिपूर्ती दिल्यानंतर [५][[६][शासनाकडून]] संपादन करण्याचा हक्क असेल.

(३) अशा कोणत्याही कर्जाच्या संबंधात कोणत्याही क्षतिपूर्तीची रक्कम निर्धारित करण्याच्या प्रयोजनाकरिता अशा कर्जाच्या फेडीसाठी स्थापन केलेला व त्यावेळी अस्तित्वात असलेला कोणताही कर्जनिवारण निधी विचारात घेतला पाहिजे. उद्देश असा की,—

(अ) अशा कर्जावरील सर्व व्याज, [२][[३][राज्य] शासनाकडून] जसजसे देय होईल तसतसे ते फेडण्यासाठी ; आणि

(ब) असा कोणताही कर्जनिवारण निधी हिशोबात धरून, अशा कर्जाच्या फेडीची मुदत संपेल त्यावेळी, [२][[३][राज्य] शासनावर,] जी रक्कम देण्याचे दायित्व असेल ती रक्कम भरून काढण्यासाठी ;

पुरेशी होईल इतकी रक्कम महानगरपालिकेने [२][[३][राज्य] शासनाला] वेळोवेळी द्यावी.

(४) असा अधिकार चालवावा किंवा कसे हे निर्धारित करणे महानगरपालिकेस शक्य व्हावे यासाठी [२][[३][राज्य] शासन] दिनांक १ एप्रिल १९३५ नंतर सर्व वाजवी वेळी महानगरपालिकेस द्यावयाच्या अशा स्वतंत्र लेख्याचे निरीक्षण करवून घेण्याची तजवीज करील.

(५) पोटकलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेली नोटीस दिल्यावर, अशा क्षतिपूर्तीची रक्कम व तिचे स्वरूप, यांसंबंधीचा प्रश्न, [७][महाराष्ट्राचे मुख्य न्यायाधीश] नामनिर्देशित करतील अशा एखाद्या व्यक्तीच्या एकमेव लवादाकडे देण्यात आला आहे असे धरले जाईल. या लवादास दोन न्यायसहायकांची मदत दिली जाईल आणि त्यापैकी एक [२][[३][राज्य] शासनाने] नामनिर्देशित करावयाचा असेल आणि दुसरा महानगरपालिकेने नामनिर्देशित करावयाचा असेल, आणि लवादाचे काम करणाऱ्या व्यक्तीचा निर्णय अंतिम असेल.

[१] सन १९२० चा मुंबई अधिनियम क्रमांक २०, कलम २ अन्वये कलम १९५क समाविष्ट करण्यात आले.

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " सरकार " याऐवजी " प्रांतिक सरकार " हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९३४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश या अन्वये " सरकार " याऐवजी " बादशहा " हा शब्द दाखल करण्यात आला.

[६] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " बादशहा " याऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरबदलांसह दाखल करण्यात आला.

[७] महाराष्ट्र विधि अनुकूलन (राज्य व समवर्ती विषय) आदेश, १९६० अन्वये " मुंबईचे मुख्य न्यायाधीश " याऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(६) महानगरपालिकेने अशी क्षतिपूर्ती दिल्यावर, अशा जमिनी व इमारती यांमधील [१][शासनाचा] हक्क, अधिकार आणि हितसंबंध महानगरपालिकेमध्ये निहित असेल.

[२]* * * * * * *

कर्जाची व्याख्या. [३][**१९५ड.** [४][कलम १९५क, पोटकलम (१)] यात उल्लेख केलेले [५]* * * * * * गाळे पुरविण्यासाठी उभारलेली व वापरलेली कर्जे (प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे) फेडण्यासाठी उभारलेली व वापरलेली कर्जे ही [५]* * * असे गाळे पुरविण्यासाठी [५]* * * * उभारलेली व वापरलेली कर्जे आहेत असे मानण्यात येईल.]

[६][**शिक्षण उपकर**

शिक्षण उपकर बसवणे. **१९५ई.** [७][(१) कलम ६१ चा खंड (क्यू) याच्या प्रयोजनासाठी, महानगरपालिकेला, [८][***] तिच्या क्षेत्राच्या आत असणाऱ्या इमारतींवर व जमिनींवर त्यांच्या पट्टीयोग्य मूल्याच्या, महानगरपालिका निर्धारित करील अशा [९][बारा टक्क्यांपेक्षा अधिक नसलेल्या] दराने [१०][किंवा, यथास्थिति, महानगरपालिका निर्धारित करील अशा त्यांच्या भांडवली मूल्याच्या टक्केवारीच्या दराने जादा कर (ज्याचा यापुढे "शिक्षण उपकर" असा उल्लेख केला आहे) बसविता येईल.]

परंतु,—

(अ) केंद्र सरकारमध्ये निहित असलेल्या सर्व इमारती व जमिनी ;

(ब) कलम १४३ खाली सर्वसाधारण कर माफ असलेल्या इतर सर्व इमारती व जमिनी ;

(क) महानगरपालिका निर्धारित करील अशा रकमेपेक्षा पट्टीयोग्य मूल्य [११][किंवा यथास्थिति भांडवली मूल्य] कमी असलेल्या सर्व इमारती व जमिनी ;

यांना शिक्षण उपकर माफ असेल.]

(२) [१२][महानगरपालिका, पोटकलम (१) खाली निर्धारित केलेली शिक्षण उपकराची रक्कम ही या अधिनियमाखाली बसवलेल्या सर्वसाधारण करात भर म्हणून वसूल करण्याविषयी महानगरपालिका आयुक्तास फर्मावू शकेल.] या पोटकलमाखाली सर्वसाधारण करात भर म्हणून बसवलेली प्रत्येक रक्कम, ती देण्यास पात्र असलेल्या प्रत्येक व्यक्तीकडून, ज्या रीतीने अशा व्यक्तीकडून सर्वसाधारण कराची येणे असलेली रक्कम वसूल करण्यात येत असेल त्याच रीतीने महानगरपालिका आयुक्त वसूल करील. कलमे १४७ व १४८ यांच्या तरतुदी या, शिक्षण उपकरास, या अधिनियमाखाली बसवलेल्या सर्वसाधारण कराचा तो भाग असल्याप्रमाणे लागू होतील.

(३) याप्रमाणे वसूल केलेली रक्कम, कलम १११ खाली स्थापन केलेल्या महानगरपालिका निधीत जमा केली जाईल.

---

[१] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " सरकार " या शब्दाऐवजी " बादशहा " हा शब्द दाखल करण्यात आला, व विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " बादशहा " या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९३४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम २ अन्वये पोटकलमे (७) व (८) निरसित करण्यात आली.

[३] सन १९२० चा मुंबई अधिनियम क्रमांक २०, कलम २ अन्वये कलम १९५ड समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९३४ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ४(२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ४(१) अन्वये " सुधारणांच्या अशा योजनांसाठी किंवा ", " अशा योजनांसाठी किंवा " आणि " यथास्थिति " हा मजकूर वगळण्यात आला.

[६] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ६९ अन्वये हे शीर्षक आणि कलमे १९५ई व १९५फ समाविष्ट करण्यात आली.

[७] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ६(१) अन्वये मूळ पोटकलमाऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

[८] सन १९९५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ३(अ) अन्वये " राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने " हा मजकूर वगळण्यात आला.

[९] वरील अधिनियमाच्या कलम ३(ब) अन्वये " पाच टक्क्यांपेक्षा अधिक नसलेल्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१०] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३०(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[११] वरील अधिनियमाच्या कलम ३०(२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१२] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ६(२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा भागांश दाखल करण्यात आला.

[१][**१९५फ.** (१) दिनांक १ एप्रिल १९५८ पासून आणि कलम १९५ई खाली, ज्या कालावधीसाठी शिक्षण उपकर बसवण्यात आला असेल त्या कालावधीच्या बाबतीत राज्य शासनामध्ये निहित असलेल्या इमारतींना व जमिनींना (ज्यांचा या कलमात यापुढे "माफी दिलेल्या इमारती व जमिनी" असा उल्लेख आहे) कलम १९५ई, पोटकलम (१) च्या परंतुकाच्या खंड (ब) च्या आधारे ज्या शिक्षण उपकराची माफी देण्यात आली असेल त्या शिक्षण उपकराच्या ऐवजी राज्य शासन पोटकलम (२) मध्ये तरतूद केलेल्या रीतीने ठरविलेली रक्कम महानगरपालिकेस दरवर्षी देईल. राज्य शासनाने शिक्षण उपकराऐवजी महानगरपालिकेस द्यावयाची रक्कम.

(२) राज्य शासनाने महानगरपालिकेस दरवर्षी द्यावयाची रक्कम ही, माफी दिलेल्या इमारतींच्या व जमिनींच्या संबंधात कलम १४४, पोटकलम (२) [२][किंवा पोट-कलम (२अ)] खाली जी रक्कम निश्चित करण्यात आली असेल त्या रकमेच्या पट्टीयोग्य मूल्यावर [३][किंवा यथास्थिति भांडवली मूल्यावर] शिक्षण उपकर म्हणून, बृहन्मुंबईतील इमारतींच्या किंवा जमिनींच्या सर्वसामान्य मालकाने जी रक्कम देण्याजोगी असेल किंवा देण्याजोगी झाली असती त्या रकमेच्या आठदशांश रकमेइतकी असेल.]

### [४][सडक कर

**१९५ग.** (१) महानगरपालिकेला, कलम ६१ च्या खंड (म) च्या प्रयोजनांसाठी तिच्या क्षेत्राच्या आत असणाऱ्या इमारतींवर व जमिनींवर त्यांच्या पट्टीयोग्य मूल्याच्या, [५][स्थायी समिती] वेळोवेळी निर्धारित करील अशा पंधरा टक्क्यांपेक्षा अधिक नसलेल्या दराने [६][किंवा यथास्थिति, त्यांच्या भांडवली मूल्याच्या टक्केवारीच्या दराने] जादा कर (ज्याचा यापुढे "सडक कर" असा उल्लेख केला आहे) बसविता येईल :— सडक कर.

परंतु,—

(अ) केंद्र सरकारमध्ये निहित असलेल्या सर्व इमारती व जमिनी ;

(ब) कलम १४३ खाली सर्वसाधारण कर माफ असलेल्या इतर सर्व इमारती व जमिनी ;

(क) महानगरपालिका निर्धारित करील अशा रकमेपेक्षा पट्टीयोग्य मूल्य [३][किंवा यथास्थिति, भांडवली मूल्य] कमी असलेल्या सर्व इमारती व जमिनी ;

यांना सडक कर माफ असेल.

(२) महानगरपालिका, पोटकलम (१) खाली निर्धारित केलेली सडक कराची रक्कम ही या अधिनियमाखाली बसवलेल्या सर्वसाधारण करात भर म्हणून वसूल करण्याविषयी महानगरपालिका आयुक्तास फर्मावू शकेल. या पोटकलमाखाली सर्वसाधारण करात भर म्हणून बसवलेली प्रत्येक रक्कम, ती देण्यास पात्र असलेल्या प्रत्येक व्यक्तीकडून, ज्या रीतीने अशा व्यक्तींकडून सर्वसाधारण कराची येणे असलेली रक्कम वसूल करण्यात येत असेल त्याच रीतीने महानगरपालिका आयुक्त वसूल करील. कलमे १४७ व १४८ यांच्या तरतुदी या, सडक करास, या अधिनियमाखाली बसवलेल्या सर्वसाधारण कराचा तो भाग असल्याप्रमाणे लागू होतील.]

### पूरक कर आकारणी

**१९६.** महानगरपालिका, कलम १३४ खाली कोणत्याही शासकीय वर्षात, पूरक कर बसवण्याचे निर्धारित करील तेव्हा तेव्हा, अशा वर्षाच्या न संपलेल्या भागाकरिता या अधिनियमाखाली लादण्याजोगा कोणताही कर ज्या दरांनी बसवण्यात येत असेल त्या दरात वाढ करून किंवा ज्या वस्तूंवर [७][जकात बसवण्यात येत असेल] त्या वस्तूंच्या संख्येत भर घालून महानगरपालिका तसे पूरक कर बसवील ; मात्र अशी प्रत्येक वाढ किंवा भर ज्या मर्यादांच्या अधीनतेने व शर्तीवर असा कोणताही कर बसविता येत असेल त्या मर्यादांच्या अधीनतेने व शर्तीवर करण्यात येईल. या अधिनियमाखाली लादण्याजोग्या कोणत्याही करात पूरक कर लादून वाढ करता येईल.

[१] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम ४ अन्वये कलम १९५फ समाविष्ट करण्यात आले.

[२] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३१(२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या, कलम ३३(१) व ३२(२) अन्वये हा मजकूर त्याच्या व्याकरणिक पेरफारांसह समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम १० अन्वये हे शीर्षक व कलम १९५-ग समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ८९ अन्वये " महापौरासह परिषद " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३२(१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम १४ अन्वये " नगर शुल्क बसवण्यात येत असेल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## कर गोळा करणे

मालमत्ता कर दर सहा महिन्यांनी आगाऊ देय असणे.

**१९७.** [१][कलम २०० खाली दिलेल्या बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे] मालमत्ता करांपैकी प्रत्येक कर हा, प्रत्येक वर्षात १ एप्रिल रोजी व १ ऑक्टोबर रोजी याप्रमाणे सहामाही हप्त्यांनी आगाऊ देय असेल.

[२][* * * *],

मागणी देय [३][जकात.]

**१९९.** [३][* * * * * ] [४][जकात] मागणी देय असेल.

विवक्षित करांसाठी बिले [७][बजावणे.]

**२००.** (१) कोणताही मालमत्ता कर [५][* * * *] किंवा अशा कोणत्याही कराचा [६][कोणताही] हप्ता येणे होईल तेव्हा आयुक्त शक्य तितक्या कमीत कमी वेळात उक्त कर देण्यास पात्र असलेल्या व्यक्तीवर येणे असलेल्या रकमेबद्दल बिल [७][बजावण्याची] तजवीज करील.

(२) अशा प्रत्येक बिलात ज्या कालावधीबद्दल असा कर आकारण्यात आला असेल व ज्या परिवास्तूंच्या [८][कुत्र्यांच्या] संबंधात तो आकारण्यात आला असेल त्या कालावधीचा आणि परिवास्तूंचा, वाहनांचा किंवा जनावरांचा विनिर्देश करण्यात येईल, तसेच त्यात अशा कराविरुद्ध करावयाचे अपील यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे ज्या कालावधीच्या आत करता येईल त्या कालावधी संबंधी नोटीस देण्यात येईल [९][* * * *]

[१०][**२००अ.** या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, मालमत्ता कर देण्याकरिता मुख्यतः पात्र असणारी कोणतीही व्यक्ती, असा कर, त्या प्रयोजनाकरिता बिलात विनिर्दिष्ट केलेल्या दिनांकापूर्वी भरत असेल किंवा असा कर, संपूर्ण वर्षाकरिता आगाऊ भरत असेल तर, तिला महानगरपालिका, सर्वसाधारण आदेशाद्वारे निर्धारित करील अशा दराने मालमत्ता कर भरण्यातून सूट देण्यात येईल आणि मालमत्तेच्या वापरकर्त्यांच्या वेहवेगळ्या वर्गांकरिता अशी सूट देण्याचे वेगवेगळे दर विनिर्दिष्ट करता येतील.]

करांच्या अनेक मागण्यांबद्दल एक बिल केव्हा [१२][बजावता येईल.]

**२०१.** (१) एकाच मालमत्तेवर देय असलेल्या [११][* * * *] मालमत्ता करांपैकी सर्व किंवा कोणत्याही कराबद्दल कोणत्याही एका व्यक्तीकडून प्रत्येक सहामाहीसाठी येणे असलेल्या सर्व रकमा अशा व्यक्तीवर एका बिलातच आकारण्यात येतील आणि त्या एका ठोक रकमेत वसूल करता येतील :

परंतु, यात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीमुळे, कलम १६७ खाली उक्त मालमत्तेबद्दल अशा व्यक्तींवर जो वाढीव कर आकारण्यात येईल तो देण्याच्या तिच्या दायित्वास बाध येणार नाही.

(२) जर कोणत्याही एखाद्या व्यक्तीवर एकापेक्षा अधिक मालमत्तांवरील उक्त सर्व किंवा कोणतेही कर भरण्याचे दायित्व असेल, तर, आयुक्तास, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे एका किंवा अनेक बिलात, अशा व्यक्तीने अशा मालमत्तेसंबंधी भरावयाच्या अनेक रकमा अशा व्यक्तींवर आकारता येतील :

परंतु, जर अशा व्यक्तीने, आयुक्तास लेखी नोटीस देऊन ती अन्वये वेगवेगळी बिले मिळावी म्हणून विनंती केली तर, त्याची उक्त नोटीस मिळाल्यानंतर, ज्या उक्त करांच्या बाबतीत अशा व्यक्तीवर दायित्व असेल त्या सर्व करांच्या संबंधात आयुक्त अशी विनंती मान्य करील :

[१३][परंतु तरीसुद्धा, पूर्ववर्ती परंतुकात काहीही अंतर्भूत असले तरी, कलम १५८ खाली जी इमारत किंवा जमीन एका स्वतंत्र मालमत्तेपेक्षा अधिक मालमत्ता म्हणून समजण्यात आलेली असेल अशा कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनीच्या संबंधात एकापेक्षा अधिक बिले मिळण्यास कोणतीही व्यक्ती पात्र असणार नाही.]

---

[१] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १७ अन्वये कलम १९८ वगळण्यात आले.

[३] सन १९२१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ६ अन्वये निरसित केलेला हा मजकूर गाळण्यात आला आणि हे निरसन १ एप्रिल १९२० पासून परिणामक असेल.

[४] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम १५ अन्वये "नगर शुल्क" या ऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १६(अ) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम १६(ब) अन्वये "कोणताही" हा शब्द वगळण्यात आला.

[७] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९० याच्या कलम ७ (१)(ब) अन्वये "सादर करावयाची" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम ७(२) अन्वये "सादर करणे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १६(ब)(एक) अन्वये "वाहनांच्या किंवा जनावरांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] वरील अधिनियमाच्या कलम १६(ब)(दोन) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[१०] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम ३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[११] सन २००९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११, कलम ३३ अन्वये "तीन" हा शब्द वगळण्यात आला.

[१२] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०, कलम ८ अन्वये "सादर करता येईल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१३] सन १९११ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ९ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[१][**२०२.** उपरोक्तप्रमाणे दिलेले असेल अशा बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे पहिल्या सहामाही कराची रक्कम, बिल दिल्याच्या दिनांकापासून तीन महिन्यांच्या आत भरावयाची असेल आणि बिलामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे दुसऱ्या सहामाही कराची रक्कम, प्रत्येक वर्षाच्या ३१ डिसेंबरपूर्वी भरावयाची असेल ; आणि जर, कराची रक्कम भरण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने उपरोक्तप्रमाणे आवश्यक असल्याप्रमाणे कराची रक्कम भरली नाही तर, अशी अदत्त कराची रक्कम किंवा त्या रकमेचा भाग यांव्यतिरिक्त, त्याने ज्या दिनांकापर्यंत असा कर भरावयाचा होता, त्या शेवटच्या दिनांकानंतर प्रत्येक महिन्यासाठी किंवा त्याच्या भागासाठी अशा कराच्या दोन टक्के इतकी रक्कम, शास्ती म्हणून भरण्यास तो जबाबदार असेल आणि बिलाची पूर्ण रक्कम देईपर्यंत अशी शास्ती भरण्यास तो जबाबदार असण्याचे चालू राहील : बिलाच्या न दिलेल्या रकमेवर मागणी नोटीस.

२००६ चा महा. ११. परंतु मुंबई महानगरपालिका (तिसरी सुधारणा) अधिनियम, २००६ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी, या अधिनियमान्वये ज्यासाठी बिल देण्यात आले आहे, असा कोणताही मालमत्ता कर पूर्णपणे किंवा अंशतः अदत्त राहिला असेल आणि कलम २००७अ अन्वये त्यावर कोणतीही शास्ती बसवलेली नसेल, त्याबाबतीत, ज्या व्यक्तीने असा कर भरलेला नाही ती व्यक्ती, ज्या दिनांकास व ज्या दिनांकापासून शास्ती बसविली जाऊ शकत होती परंतु ती बसविण्यात आलेली नाही, अशा दिनांकास व दिनांकापासून, या कलमाअन्वये तरतूद केल्याप्रमाणे, शास्ती भरण्यास जबाबदार असेल.]

**२०३.** [२][(१)] [३][जो कर भरण्यासाठी जिला बिल देण्यात आले आहे आणि जिच्यावर या अधिनियमाच्या तरतुदींन्वये आवश्यक असल्याप्रमाणे शास्ती किंवा व्याज अथवा दोन्हींसह कर भरण्याचे दायित्व आहे अशा व्यक्तीने असा कर व त्यासोबत अशी शास्ती किंवा व्याज किंवा दोन्ही भरली नाही] आणि यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे उक्त कराविरुद्ध जर कोणतेही अपील करण्यात आले नाही तर, अशी रक्कम, ती वसूल करावयाच्या सर्व परिव्ययासहित, आयुक्ताने काढावयाच्या अनुसूची " जे " मधील नमुन्यातील किंवा त्यासारख्या नमुन्यातील अधिपत्राखाली, कसूरदाराचा माल व चीजवस्तू अटकावून ठेवून व विकून [४][अथवा कसूरदाराची स्थावर मालमत्ता जप्त करून व विकून] किंवा कसूरदार ही मालमत्तेवरील कर ज्या परिवास्तूच्या संबंधात येणे असेल त्या परिवास्तूचा भोगवटा करणारी व्यक्ती असेल, तर उक्त परिवास्तूत आढळेल असा कोणताही माल व कोणतीही चीजवस्तू अटकावून ठेवून व विकून [५][* * * *] [६][* * * *] [५][* * * *] वसूल करता येईल. [८][अटकावणी व जप्ती.]

[७][(२) ज्या व्यक्तीवर, तिला देण्यात आलेल्या बिलानुसार कर भरण्याचे दायित्व असेल अशा व्यक्तीने, या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, कर भरला असेल परंतु कराच्या न भरलेल्या रकमेवर देय असेल त्याप्रमाणे, शास्तीची किंवा व्याजाची अथवा दोन्ही रकमा संपूर्णपणे किंवा अंशतः भरल्या नाहीत तर, अशा अदत्त रकमेबद्दल, जणू अशी रक्कम कराबद्दल देय असल्याप्रमाणे व त्याच रितीने, आयुक्त अनुसूची "जे" च्या नमुन्यात, अधिपात्र योग्य त्या फेरफारांसह काढू शकेल.]

[९][(३) स्थावर मालमत्ता जप्त करण्यासाठी व तिची विक्री करण्यासाठी अधिपत्र काढण्यात आले असेल तेव्हा, अशी जप्ती आदेशान्वये करण्यात येईल व अशा आदेशान्वये उक्त मालमत्ता हस्तांतरित

[१] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३५ अन्वये हे कलम दाखल करण्यात आले.

[२] सन १९१८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ४ अन्वये "कलम २०३" यास "कलम २०३, पोटकलम (१)" असा क्रमांक देण्यात आला.

[३] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३६(१)(क) अन्वये मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४, कलम ६(१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १७ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[६] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३६(१)(ख) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या, कलम ३६(२) अन्वये हे पोट कलम दाखल करण्यात आले.

[८] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४, कलम ६(३) अन्वये "जप्ती" या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४, कलम ६(२) अन्वये पोटकलमे (३) ते (५) समाविष्ट करण्यात आली.

करण्यास किंवा उक्त मालमत्तेवर भार निर्माण करण्यास कसूरदाराला मनाई केलेली असेल व अशा हस्तांतरणापासून किंवा भारापासून कोणताही लाभ मिळवण्यास सर्व व्यक्तींना प्रतिबंध केलेला असेल, तसेच [१][कराची, तसेच शास्तीची किंवा व्याजाची अथवा दोन्हींची व वसुलीच्या सर्व व्ययासह एकत्र भरावयाची असलेले देणे रक्कम, कोणतेही असल्यास ] [२][२१ दिवसांच्या आत ] महानगरपालिका कार्यालयात न भरल्यास अशी मालमत्ता विकण्यात येईल असे घोषित केलेल असेल.

[३](४) असा आदेश, मालमत्तेच्या कोणत्याही ठळक भागी व महानगरपालिका कार्यालयाच्या कोणत्याही ठळक भागी लावून, तसेच उक्त मालमत्ता ही राज्य शासनाला महसूल देणारी जमीन असेल तेव्हा, जिल्हाधिकाऱ्याच्या कार्यालयात लावून उद्‌घोषित केला जाईल.

(५) आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून जप्त मालमत्तेचे केलेले कोणतेही हस्तांतरण किंवा निर्माण केलेला कोणताही भार किंवा तिच्यात निर्माण केलेला कोणताही हितसंबंध हा महानगरपालिकेच्या जप्तीखाली बजावण्याजोग्या सर्व हक्कमागण्यांच्या संबंधात शून्यवत असेल.]

कसूरदाराचा माल आढळेल तेथे अटकावून ठेवता येईल.

**२०४.** जो कर वसूल करण्याबद्दल उपरोक्तप्रमाणे अधिपत्र काढण्यात आले असेल असा कोणताही कर भरण्यास दायी असलेल्या कोणत्याही व्यक्तीचा माल व चीजवस्तू [४][* * * *] जेथे आढळतील तेथे ती अटकावून ठेवता येतील.

अटकावून ठेवलेल्या वस्तूंची वस्तुसूची करणे व त्यांची विक्री करण्याची नोटीस देणे.

**२०५.** कलम २०३ खाली अटकावणीचे अधिपत्र बजावण्याचा प्रभार असलेला अधिकारी, अशा अधिपत्राखाली त्याने अभिग्रहण केलेल्या मालाची व चीजवस्तूची, [५][* * * *] एक वस्तुसूची ताबडतोब तयार करील आणि अभिग्रहण करतेवेळी तो माल व चीजवस्तू [५][* * * *] जिच्या कब्जात असतील त्या व्यक्तीस अनुसूची "के" मधील नमुन्यात [६][किंवा तत्सम इतर नमुन्यात] उक्त माल व चीजवस्तू, [७][* * * *] नोटिशीत नमूद केल्याप्रमाणे विकण्यात येतील अशा आशयाची लेखी नोटीस देईल.

विक्री.

[८][**२०६.** (१) अभिग्रहण केलेली मालमत्ता त्वरित व नैसर्गिकपणे नासून जाण्यासारखी असेल किंवा ती ताब्यात ठेवण्याच्या खर्चासकट वसूल करावयाची रक्कम ही, तिच्या किंमतीपेक्षा अधिक होण्याचा संभव असेल, तेव्हा आयुक्त मालमत्ता अटकावून ठेवण्यात आली त्यावेळी ती जिच्या कब्जात होती त्या व्यक्तीस, ती मालमत्ता ताबडतोब विकण्यात येईल अशा अर्थाची नोटीस लगेच देईल, आणि देय रक्कम व वसुलीचा सर्व परिव्यय ताबडतोब भरण्यात न आल्यास, त्याप्रमाणे मालमत्ता विकील.

(२) अटकावून ठेवलेली किंवा जप्त केलेली मालमत्ता पोटकलम (१) खाली लगेच विकण्यात न आल्यास किंवा स्थावर मालमत्तेच्या बाबतीत तिचा पुरेसा भागांश, सोईस्करपणे वेगळा करता येत असेल तर तो भागांश आयुक्ताने अधिपत्र निलंबित केले नाही तर, किंवा कसूरदाराने देय रक्कम व वसुलीचा सर्व परिव्यय भरला नाही तर, यथास्थिति, कलम २०३, पोटकलम (३) मध्ये किंवा कलम २०५ खाली बजावण्यात आलेल्या नोटिशीत निर्दिष्ट केलेला कालावधी संपल्यानंतर आयुक्ताच्या आदेशान्वये ती मालमत्ता किंवा तिचा पुरेसा भागांश लिलावाने [९][किंवा मोहोरबंद बोली मागवून लिलावाने ] विकता येईल; आणि आयुक्त विक्री करून आलेली रक्कम किंवा तिचा जरूर तेवढा भाग हा, येणे असलेली रक्कम व वसुलीचा परिव्यय भागविण्याच्या कामी लावील.

---

[१] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३६ (३)(क) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.
[२] वरील अधिनियमाच्या कलम ३६ (३)(ख) अन्वये "१५ दिवसांच्या आत" या मजकुराऐवजी हा दाखल करण्यात आला.
[३] वरील अधिनियमाच्या कलम ३६(४) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.
[४] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम १८ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.
[५] वरील अधिनियमाच्या कलम १९ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.
[६] सन १९४२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८ आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[७] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३७ अन्वये आणि "वाहने किंवा जनावरे" हा मजकूर वगळण्यात आला.
[८] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४, कलम ७ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.
[९] सन २००९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११, कलम ३८ अन्वये हा मजकुर समाविष्ट करण्यात आला.

(३) काही अधिशेष असल्यास तो, ताबडतोब महानगरपालिका निधीच्या खाती जमा करण्यात येईल. मात्र जर विक्रीच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत आयुक्ताकडे लेखी अर्ज करून त्याची मागणी करण्यात आली तर, ती मालमत्ता अभिग्रहण करण्यात किंवा ती जप्त करण्यात आली त्यावेळी ती जिच्या ताब्यात होती त्या व्यक्तीस परत करण्यात येईल आणि वर पूर्वोक्तप्रमाणे एक वर्षाच्या आत मागणी न केलेली कोणतीही शिल्लक रक्कम महानगरपालिकेची मालमत्ता होईल.

(४) कसूरदाराने, देय रक्कम व वसुलीचा सर्व परिव्यय विक्री केली जाण्याअगोदर भरला असेल तर, अभिग्रहण केलेली मालमत्ता त्यास परत करण्यात येईल आणि स्थावर मालमत्तेची कोणतीही जप्ती करण्यात आली असेल तर ती काढून घेण्यात आली आहे असे मानण्यात येईल.

(५) या कलमाखाली करावयाची स्थावर मालमत्तेची विक्री, [१][स्थायी समितीच्या मान्यतेने आयुक्ताने यासंबंधी केलेल्या] विनियमांत घालून दिलेल्या रीतीने करण्यात येईल.

(६) उपरोक्त रीतीने स्थावर मालमत्तेची विक्री केल्यानंतर आयुक्त, खरेदीदार म्हणून जाहीर करण्यात आलेल्या व्यक्तीस तिचा कब्जा देईल आणि तिला उक्त मालमत्तेच्या संबंधात, प्रमाणपत्रात जिचा उल्लेख आहे अशी मालमत्ता तिने खरेदी केली आहे अशा अर्थाचे प्रमाणपत्र देईल.

(७) विक्रीकरिता काढलेल्या कोणत्याही स्थावर मालमत्तेच्या बाबतीत, महानगरपालिकेच्या वतीने आयुक्ताने बोली बोलणे हे विधिसंमत असेल ; परंतु [२][सुधारणा समितीची] सर्वसाधारण किंवा कोणत्याही विवक्षित मालमत्तेबाबत आगाऊ मान्यता मिळवलेली असली पाहिजे.

(८) पोटकलम (७) च्या अधीनतेने, महानगरपालिकेच्या सेवेतील कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास अशा कोणत्याही विक्रीच्या वेळी प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणतीही मालमत्ता खरेदी करता येणार नाही.

(९) आयुक्तास, त्याने पोटकलम (६) च्या अनुरोधाने केलेल्या कोणत्याही कार्यवाहीत अडथळा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकरवी स्थावर मालमत्तेतून बाहेर घालवण्याचा निदेश देता येईल. तसेच उक्त मालमत्तेत प्रवेश मिळवण्यासाठी वाजवी रीतीने आवश्यक असेल तेवढ्या बलाचा उपयोग करता येईल.]

अधिपत्रे, अटकाव व जप्ती यांबद्दल आणि अभिग्रहण केलेली जनावरे पोसण्याबद्दल फी.

[३][**२०७.** (१) या अधिनियमाखाली काढलेल्या प्रत्येक अधिपत्राबद्दल आणि केलेल्या अटकावाबद्दल किंवा जप्तीबद्दल [४][स्थायी समिती] वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा दरांनी फी आकारण्यात येईल.

(२) या अधिनियमाखाली अभिग्रहण केलेले कोणतेही जनावर पोसण्याबद्दल, [४][स्थायी समिती] वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा दराने फी आकारण्यात येईल.

(३) अटकावून ठेवलेल्या मालमत्तेचे प्रभारी म्हणून चपराशांची योजना करण्यात आली असेल तेव्हा नेमलेल्या प्रत्येक चपराशासाठी पोटकलम (१) किंवा (२) खाली आकारावयाच्या फीच्या भरीला दर दिवसाला [५][पन्नास रुपये] इतकी फी आकारण्यात येईल.

(४) या कलमाखाली आकारलेल्या सर्व फीचा समावेश वसुलीच्या खर्चामध्ये करण्यात येईल.]

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ९०(अ) अन्वये "महापौरासह परिषदेने केलेल्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरीलअधिनियमाच्या कलम ९०(ब) अन्वये "महापौरासह परिषदेची" या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ८ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम २०७ दाखल करण्यात आले.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ९१ अन्वये "महापौरासह परिषद" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १०९ (ब) अन्वये "दहा रुपये" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**२०७ अ.** [1][शास्ती] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३९ द्वारे वगळण्यात आले.

वसुलीच्या परिव्ययासाठी असलेल्या फी मध्ये [4][व शास्तीमध्ये सूट देता येईल.]

**२०८.** [2][आयुक्तास स्वविवेकानुसार,] [3][कलम २०२ अन्वये द्यावयाची कोणतीही शास्ती किंवा कलम २०७ अन्वये आकारता येण्याजोगी कोणतीही फी किंवा मुंबई महानगरपालिका (तिसरी सुधारणा) अधिनियम, २००६ च्या प्रारंभापूर्वी अस्तित्वात असलेल्या कलम २०७अ अन्वये द्यावयाची शास्ती] याच्या संपूर्ण रकमेची किंवा त्यापैकी काही भागाची सूट देता येईल.

[5][* * * *]

[7][भोगवटादारांना मालमत्ता कर देण्याबद्दल केव्हा दायी धरता येईल.]

**२०९.** (१) कोणत्याही मालमत्ता कराबद्दल देणे असलेली रक्कम, ती देण्याचे प्रथमतः दायित्व असलेल्या व्यक्तीवर त्याबद्दलचे बिल रीतसर [6][बजावण्यात आल्यानंतर] द्यावयाची राहिली आणि अशी व्यक्ती ज्या परिवास्तूसंबंधी कर देणे असेल त्या परिवास्तूचा त्यावेळी भोगवटा करीत नसेल तर, आयुक्तास [7][अशा रकमेचे बिल अशा परिवास्तूच्या भोगवटादारावर बजावता येईल]; किंवा अशा परिवास्तूचे भोगवटादार दोन किंवा त्याहून अधिक असतील तर त्यांपैकी प्रत्येकावर अशा परिवास्तूबदद्ल दोघांनी किंवा सर्वांनी दिलेल्या भाड्याच्या एकूण रकमेबरोबर अशा भोगवटादाराने दिलेल्या भाड्याचे जे प्रमाण बसत असेल त्याच प्रमाणात देणे असलेल्या एकूण देय रकमेबरोबर जितका भागांश बसत असेल त्या भागांशाचे [8][बिल बजावता येईल.]

[9][(१अ) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कलम १४०अ अन्वये मालमत्ता कर बसविण्याकरिता, भांडवली मूल्य आधार—मूल्य म्हणून स्वीकृत केल्याच्या दिनांकास किंवा दिनांकापासून, परंतु या अधिनियमाच्या इतर तरतुदींस अधीन राहून, आयुक्तास, उक्त परिवास्तूच्या अशा भोगवाटादारावर मालमत्ता कराच्या रकमेकरिता बिल बजावता येईल किंवा अशा परिवास्तूचे दोन किंवा अधिक भोगवटदार असतील तर, त्यापैकी प्रत्येकावर भांडवली मूल्यावर आधारित कराच्या संपूर्ण रकमेसाठी देय असलेल्या रकमेच्या भागाकरिता, उक्त परिवास्तूच्या संबंधात भांडवली मूल्यावर आधारित कराच्या एकूण रकमेशी, एक किंवा अनेक भोगवाटादारांच्या परिवास्तूच्या अशा भागासाठी असलेल्या भांडवली मूल्याच्या, त्याच प्रमाणात देय असलेल्या रकमेकरिता बिल बजावता येईल.]

(२) असा भोगवटा करणारी व्यक्ती किंवा अशा भोगवटादार व्यक्तींपैकी कोणतीही व्यक्ती असे कोणतेही बिल [10][बजावल्यापासून] [11][ तीस दिवसांच्या आत] त्यात मागणी केलेली रक्कम देण्यात कसूर करील तर, अशी रक्कम तिच्याकडून पूर्ववर्ती तरतुदींनुसार वसूल करता येईल.

[1] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३९ अन्वये हे कलम वगळण्यात आले.

[2] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ९२ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४, कलम १०(२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[5] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २० अन्वये कलम २०८अ वगळण्यात आले.

[6] सन १९५२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २०, कलम ११(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[7] वरील अधिनियमान्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[8] वरील अधिनियमान्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[9] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४१(१) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[10] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०, कलम ११(२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[11] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४१ (२) अन्वये " पंधरा दिवसांच्या आत " मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) मालमत्ता कराची जी कोणतीही थकबाकी [१][ * * * * *] ज्या परिवास्तूवर कर निर्धारित केला असेल ती परिवास्तू ज्या कालावधीत भोगवटादाराच्या भोगवट्यात नसेल त्या कालावधीबद्दल येणे असेल, तर ती या कलमाखाली भोगवटादाराकडून वसूल केली जाणार नाही.

(४) कोणतीही रक्कम या कलमाखाली भोगवटादाराने दिली असेल किंवा त्याच्याकडून वसूल करण्यात आली असेल तर, त्यास, ती रक्कम देण्याचे प्रथमतः दायित्व असलेल्या व्यक्तीकडील खाती ती जमा करण्याचा हक्क असेल.

१९६१ चा महाराष्ट्र २४.

सहकारी गृहनिर्माण संस्थेकडून येणे असलेल्या मालमत्ता करासाठी भाडेकरू सदस्यावर दायित्व आहे असे केव्हा धरता येईल.

[२][**२०९अ.** (१) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० मध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, त्या अधिनियमाखाली नोंदणी केलेल्या सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या मालकीच्या कोणत्याही मालमत्तेच्या बाबतीत संस्थेकडून मालमत्ता कर म्हणून येणे असलेली कोणतीही रक्कम, त्या रकमेच्या प्रदानाचे, प्रथमतः दायित्व असलेल्या संस्थेकडे त्याकरिता रीतसर बिल बजावण्यात आल्यानंतर, अदत्त राहिल्यास, आयुक्तास, त्या संस्थेच्या प्रत्येक भाडेकरू सदस्यावर, त्याच्या गाळ्याच्या संबंधात कलम १५४ खाली ज्या भाड्याच्या रकमेचा अंदाज करण्यात आला असेल त्या रकमेचे, [३][ किंवा, यथास्थिति, निश्चित केलेला भांडवली मूल्यावर आधारित कराच्या रकमेचे] संपूर्ण मालमत्तेवर अंदाजलेल्या एकूण भाड्याच्या रकमेशी [४][ किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्यावर आधारित कराच्या रकमेशी], जे प्रमाण असेल त्याच प्रमाणानुसार संपूर्ण देय रकमेबरोबर जितका भागांश बसत असेल त्या भागांशाचे बिल बजावता येईल.

(२) भाडेकरू सदस्याने, असे बिल बजावण्यात आल्यापासून [५][ तीस दिवसांच्या आत], त्यात मागणी केलेली रक्कम देण्यात कसूर केल्यास, ती रक्कम जणू काही त्याच्याकडून देय असलेला मालमत्ता कर असावा त्याप्रमाणे वसूल करण्यात येईल.

(३) या कलमाखाली, एखाद्या भाडेकरू सदस्याने कोणतीही रक्कम दिली किंवा त्याच्याकडून ती वसूल करण्यात आली तर ती रक्कम भरण्याचे प्रथमतः दायित्व असणाऱ्या संस्थेकडील खाती ती जमा केली जाण्याचा त्यास हक्क असेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ, भाडेकरू सहभागीदारी सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या बाबतीत, "भाडेकरू सदस्य" या शब्दप्रयोगाचा अर्थ, त्या संस्थेच्या मालकीच्या इमारतीत, उक्त संस्थेने ज्याला गाळा नेमून दिला आहे असा सदस्य.]

मालमत्ता करासाठी मालमत्तेच्या संयुक्त मालकांवर स्वतंत्रपणे दायित्व आहे असे केव्हा मानता येईल.

[६][**२०९ब.** (१) या अधिनियमामध्ये किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, दोन किंवा अधिक व्यक्तींच्या संयुक्तपणे मालकीच्या कोणत्याही मालमत्तेच्या बाबतीत त्यांच्याकडून मालमत्ता कर म्हणून येणे असलेली कोणतीही रक्कम, त्या रकमेच्या प्रदानाचे, प्रथमतः संयुक्तपणे दायित्व असलेल्या मालकावर, संयुक्तपणे रीतसर बिल बजावण्यात आल्यानंतर, अदत्त राहिल्यास, आयुक्तास, त्या संयुक्त मालकांपैकी प्रत्येकावर अशा मालमत्तेच्या संदर्भात, देय असलेल्या कराच्या, त्याच्या भागाच्या प्रदानासाठी बिल बजावता येईल. प्रत्येक संयुक्त मालकाकडून देय असलेल्या कराची रक्कम, त्याच्या मालकीच्या मालमत्तेच्या त्या भागाच्या पट्टीयोग्य मूल्याच्या [७][ किंवा यथास्थिति, भांडवली मूल्याच्या] संदर्भात काढण्यात येईल.

(२) कोणत्याही संयुक्त मालकाने, असे बिल बजावण्यात आल्यापासून [८][ तीस दिवसांच्या आत,] त्यात मागणी केलेली रक्कम देण्यात कसूर केल्यास, ती रक्कम जणू काही त्याच्याकडून देय असलेला मालमत्ता कर असावा त्याप्रमाणे वसूल करण्यात येईल.

---

[१] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४१ (३) अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.
[२] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६३, कलम ४ अन्वये कलम २०९अ समाविष्ट करण्यात आले.
[३] सन २००९ चा महाराष्ट्र क्रमांक ११, कलम ४२ (१) (क) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[४] वरील अधिनियम क्रमांक ४२ (१) (ख), अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[५] वरील अधिनियम क्रमांक ४२ (२) अन्वये " पंधरा दिवसांच्या आत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[६] सन १९८८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १११ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.
[७] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४३(१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[८] वरील अधिनियमाच्या कलम ४३ (२) अन्वये " पंधरा दिवसांच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) या कलमाखाली, एखाद्या मालकाने कोणतीही रक्कम दिली किंवा त्याच्यापासून ती वसूल करण्यात आली तर ती रक्कम भरण्याचे प्रथमतः दायित्व असणाऱ्या संयुक्त मालकाच्या खाती ती जमा केली जाण्याचा त्यास हक्क असेल.]

[४][बृहन्मुंबई] सोडून जाण्याच्या बेतात असलेल्या व्यक्तीविरुद्ध संक्षिप्तरीत्या कार्यवाही चालवणे.

**२१०.** (१) ज्या कोणत्याही व्यक्तीकडून, कोणताही मालमत्ता कर [१][****] [२][किंवा नाट्यगृहावरील कर] [३]* * * याबद्दल कोणतीही रक्कम जिच्याकडून येणे असेल ती व्यक्ती ताबडतोब [४][बृहन्मुंबई] सोडून जाण्याच्या बेतात आहे असे कोणत्याही वेळी आयुक्तास सकारण वाटल्यास, त्यास अशा व्यक्तीकडून [३]* * * अशा येणे असलेल्या रकमेचा भरणा तिने ताबडतोब करावा असा तिला निदेश देता येईल व त्या रकमेबद्दल तिच्यावर बिल [५][बजावण्याची] तजवीज करता येईल.

(०२) असे बिल [६][बजावल्यानंतर] अशा व्यक्तीने तिच्याकडून [३]* * * येणे असलेली रक्कम ताबडतोब भरली नाही तर, अशी रक्कम यात यापूर्वी विहित केलेल्या रीतीने अटकावणी किंवा विक्री करून वसूल करता येईल. [७][* * *] आणि आयुक्ताने अटकावून ठेवण्यासाठी व विक्रीसाठी काढावयाचे अधिपत्र विनाविलंब बजावण्यात आले पाहिजे.

आवश्यक असेल तर थकबाकी वसूल करण्यासाठी कसूरदाराविरुद्ध दावा लावता येईल.

**२११.** यात यापूर्वी तरतूद केल्याप्रमाणे अटकावणी किंवा विक्री करून कसूरदाराविरुद्ध कार्यवाही चालवण्याऐवजी, किंवा कसूरदाराविरुद्ध कार्यवाही चालवून ती अयशस्वी झाल्यानंतर किंवा त्यात अंशतः यश मिळाल्यानंतर, मालमत्ता कराबद्दल [८][***] अशा कसूरदाराकडून, यथास्थिति, येणे असलेली कोणतीही रक्कम किंवा येणे असलेल्या कोणत्याही रकमेची राहिलेली बाकी सक्षम अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करून तिच्याकडून वसूल करता येईल.

ज्या परिवास्तूंवर मालमत्ता कर निर्धारित केले असतील त्या परिवास्तूंवर त्यांचा प्रथम भार असणे.

**२१२.** कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनीच्या बाबतीत या अधिनियमाखाली देणे असलेला मालमत्ता कर हा, अशा इमारतीबद्दल किंवा जमिनीबद्दल [१०][[११][राज्य]शासनास] जो कोणताही जमीन महसूल देणे असेल तो प्रथम देण्याच्या शर्तीच्या अधीनतेने, त्यानंतर प्रत्यक्ष [१२][शासनाकडून] घेऊन [१३][ धारण केलेल्या कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनीच्या बाबतीत, ] असा कर देण्याचे दायित्वअसलेल्या व्यक्तीचा अशा इमारतीत किंवा जमिनीत जो कोणताही हितसंबंध असेल त्यावर आणि अशा इमारतीत किंवा जमिनीवर अशा व्यक्तीच्या मालकीचा जो कोणताही माल व जी कोणतीही चीजवस्तू आढळेल तीवर प्रथम भार असेल; आणि इतर कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनीच्या बाबतीत अशा इमारतीवर किंवा जमिनीवर आणि असा कर देण्याचे दायित्त्व असलेल्या व्यक्तीच्या मालकीचा अशा इमारतीत किंवा जमिनीवर जो कोणताही माल व जी कोणतीही चीजवस्तू आढळेल तिच्यावर प्रथम भार असेल.

---

[१] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २१ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[२] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३०, कलम ४ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९४२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम १६ आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ३ अन्वये वगळण्यात आलेला हा मजकूर गाळण्यात आला.

[४] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची अन्वये "ग्रेटर बॉम्बे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०, कलम १२(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम १२(२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४४ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[८] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २२ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[१०] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याअन्वये "सरकार" याऐवजी "प्रांतिक सरकार" हा मजूकर दाखल करण्यात आला.

[११] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[१२] वरील आदेशान्वये "बादशहा" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[१३] सन १९४२ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम २ आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम २ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१][**२१३.** (१) [२][याबाबतीत नेमलेल्या महानगरपालिका अधिकाऱ्यांना आणि कर्मचाऱ्यांना आयुक्तांच्या आदेशानुसार जकात वसूल करता येईल.]

जकात कशी वसूल करता येईल.

(२) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असेल तरी, महानगरपालिकेची मान्यता घेऊन [३][स्थायी समितीने] एका वेळेस एका वर्षापेक्षा अधिक असणार नाही अशा कोणत्याही कालावधीकरिता, जकात वसुलीचे काम जाहीर लिलावाद्वारे भाडेपट्ट्याने किंवा जकातीची वसुली करण्याकरिता अभिकर्त्याची नियुक्ती करणे, कायदेशीर असेल.

(३) [४][आयुक्त, स्थायी समितीच्या मान्यतेने] वेळोवेळी निदेश देईल अशा ठिकाणी जकात वसूल करण्यात येईल आणि तिचा परतावा देण्यात येईल व अशा रीतीने तिची व्यवस्था करण्यात येईल व तिच्यावर नियंत्रण ठेवण्यात येईल.]

**२१४.** (सन १९२१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७ यान्वये निरसित करण्यात आले.)

**२१५.** (नगर शुल्क वसूल करण्यासाठी व त्याच्या रकमांचा परतावा देण्यासाठी प्राधिकृत केलेल्या व्यक्तींचे अधिकार) हे कलम सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२ याच्या कलम १७ अन्वये वगळण्यात आले.

**२१६.** आयुक्तास, स्थायी समितीच्या मान्यतेने, कोणत्याही कराबद्दल किंवा कोणताही कर वसूल करण्यासाठी झालेल्या परिव्ययाबद्दल येणे असलेली जी कोणतीही रक्कम त्याच्या मते वसूल होण्याजोगी नसेल ती, वेळोवेळी निर्लेखित करता येईल.

वसूल न होण्याजोग्या कराच्या रकमा निर्लेखित करणे.

[५][**२१६अ.** या अधिनियमान्वये कराची रक्कम किंवा अन्य कोणत्याही देय रकमा भरण्यास पात्र असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, महानगरपालिकेने तिच्या अधिकार क्षेत्रात प्रसृत होणाऱ्या दोन अग्रगण्य वर्तमानपत्रांमध्ये जाहीर नोटीस देऊन त्याबाबतीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही बँकेत किंवा कोणत्याही अभिकरणांकडे त्या रकमेचा भरणा करण्याच्या सुविधेचा उपयोग करून घेता येईल ; आणि स्वतःला अशा सुविधेचा उपयोग करून घेणारी व्यक्ती, आयुक्त निर्धारित करील त्याप्रमाणे, अशा बँकेकडे किंवा, यथास्थिति, अभिकरणाकडे त्या संबंधातील अशी फी भरण्यास पात्र असेल.]

मालमत्ता कराची रक्कम भरण्याच्या सुविधेसाठी विशेष तरतूद.

[६][**२१६ब.** या अधिनियमाच्या कलम २१६ किंवा इतर कोणत्याही तरतुदीमध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी महानगरपालिकेस, जी व्यक्ती किंवा व्यकितींचा वर्ग महानगरपालिकेने निश्चित केलेल्या वेळापत्रकानुसार, मालमत्ता कराच्या थकबाकीची रक्कम प्रदान करील. अशा, मालमत्ता कर प्रदान करण्यास प्रथमतः पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गाला, राज्य शासन मान्य करील अशी सूट देता येईल.]

कराची थकबाकी प्रदान करण्यातून सूट देण्याचा महानगरपालिकेचा अधिकार.

---

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ११२ अन्वये मूळ कलम २१३ ऐवजी नवीन कलम २१३ दाखल करण्यात आले.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ९३(अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ९३(ब) अन्वये " महापौरासह परिषद " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ९३(क) अन्वये " महापौरासह परिषदेने " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ७, कलम ४५ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ४ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

करनिर्धारण झाले नसेल अशा प्रकरणांमध्ये आकारणी करण्याचा अधिकार.

[1][**२१६ क.** या अधिनियमात किंवा त्याखाली करण्यात आलेल्या नियमात एतद्‌विरूद्ध काहीही अंतर्भूत असले तरी, या प्रकरणाअन्वये बसविण्यायोग्य असलेले कोणतेही कर किंवा फी यांचा भरणा करण्यास पात्र असलेल्या कोणत्याही व्यक्तीचे कोणत्याही कारणास्तव, जर कोणत्याही वर्षातील करनिर्धारण केले गेले नसते तर, आयुक्तास, ज्या दिनांकास ती व्यक्ती, आकारणी करण्यास पात्र झाली असेल त्या दिनांकापासून सहा वर्षांच्या आत, कोणत्याही वेळी, अशा व्यक्तीवर कराची आणि देय फीची आकारणी करणारी नोटीस बजावता येईल; आणि अशी नोटीस बजावल्याच्या दिनांकापासून १५ दिवसाच्या आत तीद्वारे त्यावरील प्रदानाची मागणी करता येईल आणि या अधिनियमाच्या आणि त्याखाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदी, शक्य असेल तेथवर, ज्या वर्षात कराचा किंवा फीचा संबंध येतो त्या वर्षात अशी  आकारणी करण्यात आली होती असे समजून, लागू करण्यात येतील.]

## मूल्यांकने व कर यांविरुद्ध अपिले.

अपिले केव्हा व कोणाकडे करता येतील.

[2][**२१७.** (१) यात यापुढे अंतर्भूत असलेल्या तरतुदींच्या अधीनतेने, या अधिनियमाखाली निश्चित केलेल्या किंवा आकारलेल्या कोणत्याही पट्टीयोग्य मूल्याविरुद्ध किंवा कराविरुद्ध [3][किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्यांविरूद्ध] केलेल्या अपिलांची लघुवाद न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश सुनावणी व निर्णय करतील.]

(२) परंतु,—

(अ) असे कोणतेही अपील तक्रारीचे कारण उद्‌भवल्यानंतर [4][एकवीस दिवसांच्या आत] केलेले नसेल;

(ब) पट्टीयोग्य मूल्याविरुद्ध केलेल्या [5][किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्यांविरूद्ध] अपिलाच्या बाबतीत, आयुक्ताकडे कलम १६३ खाली अगोदरच तक्रार करण्यात येऊन ती तक्रार निकालात काढलेली नसेल;

(क) सरकारी वर्षात कलम १६७ निर्धारण पुस्तकात केलेल्या कोणत्याही सुधारणेच्या विरुद्ध केलेल्या अपीलाच्या बाबतीत व्यथित व्यक्तीने, तिला अशा सुधारणेची नोटीस प्रथम मिळाली असेल त्या दिवसानंतर [6][एकवीस दिवसांच्या आत] तक्रार केली नसेल किंवा केलेली असून तिची तक्रार निकालात काढलेली नसेल;

(ड) कराविरुद्ध केलेल्या अपीलाच्या बाबतीत किंवा पट्टीयोग्य मूल्याविरुद्ध [7][किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्याविरूद्ध] केलेल्या अपीलाच्या बाबतीत [8][अपील दाखल केल्याच्या तारखेपर्यंतची अपीलकाराकडे हक्कमागणी केलेली विवादग्रस्त कराची रक्कम, किंवा विवादग्रस्त पट्टीयोग्य मूल्याच्या [7][किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्याच्या]आधारे आकारणीयोग्य कराची रक्कम अपीलकाराने आयुक्ताकडे जमा केली नसेल] [9][आणि अशा अपिलासोबत, ज्या कराच्या संबंधात ते अपील असेल त्या कराच्या संपूर्ण रकमेची पावती जोडण्यात आली असेल];

---

[1] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ६ अन्वये कलम २१६क समाविष्ट करण्यात आले.

[2] लघुवाद  न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाने, कलम २१७ खालील अपीलाच्या सुनावणीपूर्वी किंवा सुनावणीनंतर उच्च न्यायालयाकडे केलेल्या निर्देशासाठी (सन १९८८ चा अधिनियम क्रमांक १२, कलम २ पहा.)

[3] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४६(१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम ४६(२) (क) अन्वये " पंधरा दिवसांच्या आत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ४६ (२) (ख) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[6] वरील अधिनियमाच्या कलम ४६ (२) (ग) अन्वये " पंधरा दिवसांच्या आत " या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[7] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४६(२) (घ)(एक) अन्वये हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह समाविष्ट करण्यात आला.

[8] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६३, कलम ५(अ) (दोन) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[9] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४६(२) (घ) (दोन) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

तर उक्त मुख्य न्यायाधीश असे कोणतेही अपील [1][दाखल करून घेणार नाही.]

[2][(२अ) अपील पोट-कलम (२) च्या खंड (अ) ते (ड) च्या तरतुदींना अनुसरून दाखल करण्यात आले नसेल तर ते, तडकाफडकी फेटाळले जाण्यास पात्र असेल.]

१९७५ चा महाराष्ट्र ६३. [3][(३) मुख्य न्यायाधीशाने दाखल करून घेतलेल्या, परंतु, महाराष्ट्र नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९७५ याच्या प्रारंभाच्या तारखेपूर्वी त्याने सुनावणी न केलेल्या कोणत्याही अपीलांच्या बाबतीत, अपील दाखल केल्याच्या तारखेपर्यंतची, यथास्थिति, अपीलकाराकडून हक्कमागणी केलेली विवादग्रस्त कराची रक्कम किंवा विवादग्रस्त पट्टीयोग्य मूल्याच्या आधारे आकारणीयोग्य कराची रक्कम, आयुक्ताने, याबाबतीत स्थानिक वृत्तपत्रात प्रसिद्ध केलेल्या सर्वसाधारण नोटिशीच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, अपीलकाराने आयुक्ताकडे जमा केल्याखेरीज, मुख्य न्यायाधीश अशा अपीलाची सुनावणी करून त्यावर निर्णय देणार नाही. आयुक्त, एक समयावच्छेदेकरून अशा प्रत्येक अपीलकारावर, या अधिनियमाची कलमे ४८४ व ४८५ आणि इतर संबद्ध तरतुदी यांखाली अपीलकाराने त्याच्याकडे जमा करावयाच्या रकमेची सूचना देणारी नोटीस बजावील.

(४) शक्य असेल तेथवर, आयुक्त, पोट-कलम (३) खाली विहित केलेला तीस दिवसांचा कालावधी संपल्यापासून पंधरा दिवसांच्या आत, ज्या अपीलकारांनी आवश्यक ती रक्कम विहित कालावधीत त्यांच्याकडे जमा केलेली असेल त्यांची नावे आणि इतर तपशील आणि ज्या अपीलकारांनी अशी रक्कम अशा कालावधीत त्याच्याकडे जमा केलेली नसेल त्यांची नावे व इतर तपशील, मुख्य न्यायाधीशास, कळवील. अशी माहिती मिळाल्यानंतर, मुख्य न्यायाधीश संक्षिप्त चौकशी करून ज्याने विहित कालावधीत आयुक्ताकडे आवश्यक ती रक्कम जमा केलेली नसेल अशा कोणत्याही अपीलकाराचे अपील खारीज करील.

[4][(५) या अधिनियमाखाली निश्चित केलेल्या किंवा आकारलेल्या कोणत्याही पट्टीयोग्य मूल्याविरुद्ध किंवा मालमत्ता कराविरुद्ध असणाऱ्या पूर्वोक्त अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी मुख्य न्यायाधीशाने दाखल करून घेतलेल्या किंवा उक्त दिनांकानंतर तो दाखल करून घेईल अशा, कोणत्याही अपीलाच्या बाबतीत, मुख्य न्यायाधीश हा, अपील दाखल केल्यापासून वेळोवेळी दिलेल्या प्रत्येक देयकाद्वारे मागणी केलेल्या मालमत्ता करापैकी कोणतेही मूळ पट्टीयोग्य मूल्य असल्यास, ते अधिक मालमत्तेच्या पट्टीयोग्य मूल्याच्या वाढीव भागावर अपीलकाराने दावा केलेल्या मालमत्ता कराच्या ८० टक्के रक्कम, अधिनियमाद्वारे विहित मुदतीत आयुक्ताकडे भरल्याशिवाय अपिलाची सुनावणी व निर्णय करणार नाही. अपिलावर निर्णय देण्यापूर्वी अपीलकाराने कोणत्याही वेळी रक्कम भरण्यात कसूर केल्यास तशी माहिती आयुक्ताने दिल्यानंतर मुख्य न्यायाधीश अपील तात्काळ फेटाळून लावील:

परंतु, अपिलाचा निर्णय महापालिकेच्या बाजूने झाल्यास, ज्या दिनांकास मालमत्ता कराची रक्कम देय होते त्या दिनांकापासून उर्वरित मालमत्ता करावर द.सा.द.शे. ६.२५ एवढ्या दराने व्याज देय होईल:

परंतु, आणखी असे की, अपीलकाराच्या बाजूने अपिलाचा निर्णय झाल्यास आणि अपीलकाराने महापालिकेकडे भरलेली मालमत्ता कराची रक्कम, देय मालमत्ता करापेक्षा अधिक असेल तर, आयुक्त, महापालिकेकडे रक्कम भरल्याच्या दिनांकापासून द.सा.द.शे. रु. ६.२५ एवढ्या दराने व्याजासह मालमत्ता कराची जादा रक्कम त्यानंतर देय करापोटी वळती करील.]]

**२१८.** निकटपूर्वीच्या कलमाच्या प्रयोजनाकरिता तक्रारीचे कारण पुढील वेळी उद्‌भवले आहे असे मानण्यात येईल. तक्रारीचे कारण उद्‌भवल्याचे केव्हा मानावे.

---

[1] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६३, कलम ५(अ) (एक) अन्वये " अशा अपीलाची सुनावणी करणार नाहीत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४६(३) अन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात येईल.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ५(ब) अन्वये पोट-कलमे (३), (४) आणि (५) समाविष्ट करण्यात आली.

[4] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ११३ अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले आणि ते महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९७५ च्या प्रारंभाच्या दिनांकापासून दाखल करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल.

(अ) पट्टीयोग्य मूल्याविरुद्ध [1][किंवा यथास्थिति, भांडवली मूल्याविरूद्ध] केलेल्या अपिलाच्या बाबतीत, अशा मूल्याविरुद्ध कलम १६३ खाली आयुक्ताकडे केलेली तक्रार निकालात काढण्यात आली असेल त्या दिवशी ;

(ब) सरकारी वर्षात, कलम १६७ खाली निर्धारण पुस्तकात केलेल्या कोणत्याही सुधारणेविरुद्ध केलेल्या अपीलाच्या बाबतीत, व्यथित व्यक्तीने, अशा सुधारणेविरुद्ध आयुक्ताकडे केलेली तक्रार निकालात काढण्यात आली असेल त्या दिवशी ;

(क) कराविरुद्ध केलेल्या अपिलाच्या बाबतीत असा कर भरण्याची मागणी करण्यात आली असेल किंवा अशा करासंबंधातील बिल [2][बजावण्यात] आले असेल त्या दिवशी.

लवाद. [3][**२१८अ.** कलम २१७ खाली केलेल्या कोणत्याही अपिलाच्या बाबतीत, सर्व हितसंबंधित पक्षकार ज्या कोणत्याही बाबीसंबंधी त्यांच्यात मतभेद असेल ते प्रकरण लवादांकडे निर्देशित करण्यास संमत होतील तेव्हा अशा पक्षकारांना अशा अपिलावर निर्णय दिला जाण्यापूर्वी अशी बाब लवादाकडे निर्देशित करण्याविषयी आदेश मिळण्यासाठी लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाकडे लेखी अर्ज करता येईल आणि असा अर्ज करण्यात आल्यावर, दाव्यातील लवादासंबंधी लागू होणाऱ्या [4][लवाद आणि समेट अधिनियम, १९९६] याच्या तरतुदी या, जेथवर लागू करण्यात येतील तेथवर, अशा अर्जास लागू होतील, आणि त्यानंतरची कार्यवाही ही जणू उक्त न्यायाधीश हा त्या अधिनियमाच्या अर्थांतर्गत न्यायालय असावे आणि असा अर्ज हा दाव्यात केलेला अर्ज असावा त्याप्रमाणे चालविली जाईल.] १९९६ चा २६.

तज्ज्ञ मूल्य-निर्धारकाची नेमणूक. [3][**२१८ब.** (१) कलम २१७ खाली पट्टीयोग्य मूल्याविरुद्ध केलेल्या अपिलातील कोणताही पक्षकार अपिलाच्या सुनावणीपूर्वी किंवा अपिलाची सुनावणी चालू असताना कोणत्याही वेळी पण मूल्यासंबंधी पुरावा दाखल करण्यापूर्वी, ज्या परिवास्तूच्या मूल्यांकनासंबंधी अपील केले असेल त्या कोणत्याही परिवास्तूचे मूल्यांकन केले जावे असा निदेश देण्याविषयी लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाकडे अर्ज करील तर, मुख्य न्यायाधीशास स्वविवेकानुसार मूल्यांकन करण्यासाठी सक्षम व्यक्तीची नेमणूक करता येईल आणि याप्रमाणे नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीस, ज्या परिवास्तूच्या संबंधात निदेश देण्यात आला असेल त्या परिवास्तूत प्रवेश करता येईल, तिचे सर्वेक्षण करता येईल आणि तिचे मूल्यांकन करता येईलः

परंतु, असा अर्ज आयुक्ताने केलेला असेल ते खेरीजकरून एरव्ही या पोट-कलमाखाली मूल्यांकनाचा परिव्यय देण्यासाठी मुख्य न्यायाधीशास योग्य वाटेल अशी प्रतिभूती अर्जदाराने दिल्याखेरीज असा कोणताही निदेश दिला जाणार नाही.

(२) पोट-कलम (१) खाली मूल्यांकनासाठी झालेला परिव्यय हा अपिलाचा परिव्यय असेल; मात्र, अर्जदाराने तो सुरुवातीला भरला पाहिजे.

(३) मुख्य न्यायाधीशास, पोट-कलम (१) खाली मूल्यांकन करण्यासाठी जिची नेमणूक केली आहे अशा व्यक्तीस साक्षीदार म्हणून बोलावता येईल आणि अपिलातील कोणत्याही पक्षकाराने अर्ज केल्यावर, त्याने अशा व्यक्तीस बोलावले पाहिजे; अशा व्यक्तीस याप्रमाणे बोलावण्यात आले असेल तेव्हा अपिलातील कोणत्याही पक्षकारास अशा व्यक्तीची उलट तपासणी करता येईल.]

कलम २१८ब अंमलात न रहाणे. [5][**२१८बअ.** कलम १४०अ अन्वये मालमत्ता कर बसविण्यासाठी कर बसविण्यासाठी आधारभूत म्हणून भांडवली मूल्याचा स्वीकार केल्याच्या दिनांकास व तेव्हापासून, कलम २१८ब च्या तरतूदी अंमलात असण्याचे बंद होईल.]

---

[1] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४७ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०, कलम १४ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम २३ अन्वये कलमे २१८अ व २१८ब समाविष्ट करण्यात आली.

[4] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम ११४ अन्वये 'लवाद अधिनियम, १९४०' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४८ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[१][**२१८क.** (१) कलम २१७ खाली केलेल्या अपिलाच्या सुनावणीपूर्वी किंवा अशी सुनावणी झाल्यावर, कोणताही कायदेविषयक प्रश्न किंवा कायद्याचे बळ असलेल्या परिपाठासंबंधाने किंवा एखाद्या दस्तऐवजाचा अन्वय लावण्यासंबंधाने कोणताही प्रश्न उपस्थित होईल तर, लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशास, प्रकरणाच्या वस्तुस्थितीचे व अशा रीतीने उपस्थित होणाऱ्या प्रश्नाचे विवरण तयार करता येईल आणि उक्त विवरण उक्त प्रश्नावरील आपल्या अभिप्रायासह उच्च न्यायालयाकडे निर्णयासाठी निर्देशित करता येईल आणि अपिलातील कोणत्याही पक्षकाराने अर्ज केला असता, मुख्य न्यायाधीशाने वर सांगितल्याप्रमाणे विवरण तयार केले पाहिजे व ते उच्च न्यायालयाकडे निर्णयासाठी निर्देशित केले पाहिजे. उच्च न्यायालयाकडे निर्देश करणे.

(२) पोट-कलम (१) खाली विवरण उच्च न्यायालयाकडे निर्देशित केलेले असेल तेव्हा दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, अनुसूची एक मधील आदेश ४६ यांतील नियम २ ते ५ (दोन्ही धरून) यांच्या तरतुदी जेथवर लागू करता येतील तेथवर, अनुक्रमे उक्त मुख्य न्यायाधीशाच्या आणि उच्च न्यायालयाच्या बाबतीत लागू होतील.]

१९०८ चा ५.

[१][**२१८ड.** (१) पुढील निर्णयावरून उच्च न्यायालयाकडे अपील करता येईल :— अपिले.

(अ) कलम २१७ खाली केलेल्या कोणत्याही अपिलात, लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाने दिलेल्या ज्या निर्णयाअन्वये [३][पट्टीयोग्य मूल्य किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्य] निश्चित करण्यात आले असेल असा कोणताही निर्णय ; आणि

(ब) उक्त कलमाखाली केलेल्या अपिलात उक्त मुख्य न्यायाधीशाने एखाद्या कायदेविषयक प्रश्नासंबंधी किंवा कायद्याचे बळ असलेल्या परिपाठाच्या प्रश्नासंबंधी किंवा दस्तऐवजांचा अन्वय लावण्याच्या प्रश्नासंबंधी दिलेला इतर कोणताही निर्णय.

१९०८ चा ५.

(२) दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या तरतुदी, मूळ हुकूमनाम्यावरून केलेल्या अपिलांच्या संबंधात जेथवर लागू करता येतील तेथवर त्या पोट-कलम (१) खाली केलेल्या अपिलास लागू होतील आणि अर्ज करण्यात आल्यावर अशा अपिलात उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशाची अंमलबजावणी अशा मुख्य न्यायाधीशास, जणू ते त्याने स्वतः दिलेले हुकूमनामे असावेत त्याप्रमाणे करता येईलः

परंतु, असे कोणतेही अपील मुख्य न्यायाधीशाने दिलेल्या निर्णयाच्या तारखेपासून एक महिन्याच्या आत दाखल केलेले नसल्यास, उच्च न्यायालय अशा अपिलाची सुनावणी करणार नाही.]

[१][**२१८ई.** लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशापुढे चालू असलेल्या कलम २१७ खालील अपिलातील सर्व कार्यवाह्यांचा परिव्यय व त्यासह कलम २१८अ खालील लवादाचा परिव्यय आणि कलम २१८ब खालील मूल्यांकनाचा परिव्यय हा लघुवाद न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश निदेश देईल असे पक्षकार व उक्त न्यायाधीश निदेश देईल त्या प्रमाणात देतील आणि आवश्यक असेल तर, खर्चाची रक्कम, जणू ती लघुवाद न्यायालयाच्या हुकूमनाम्याखाली येणे असलेली रक्कम असावी त्याप्रमाणे वसूल करण्याजोगी असेल.] अपिलातील कार्यवाहीचा परिव्यय.

**२१९.** (१) यात यापूर्वी तरतूद केल्याप्रमाणे ज्याच्या विरुद्ध कोणतीही तक्रार करण्यात आलेली नसेल असे या अधिनियमाखाली निश्चित केलेले प्रत्येक पट्टीयोग्य मूल्य [३][किंवा, यथास्थिति, भांडवली मूल्य] आणि

या अधिनियमाखाली कोणत्याही कराबद्दल कोणत्याही व्यक्तीकडे मागणी केलेल्या रकमेविरुद्ध यात यापूर्वी तरतूद केल्याप्रमाणे कोणतेही अपील करण्यात आले नसेल तर हक्कमागणी केलेली प्रत्येक रक्कम, आणि

ज्याविरुद्ध अपील केले नसेल असे मूल्य व कर हे आणि अपिलावर दिलेले निर्णय हे अंतिम असणे.

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम २३ अन्वये कलमे २१८क, २१८ड आणि २१८ई समाविष्ट करण्यात आली.

[२] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ४९ अन्वये "दोन हजार रुपयांपेक्षा अधिक पट्टीयोग्य मूल्य" या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ४९ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

असे कोणतेही मूल्य किंवा असा कोणताही कर याविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपिलात उपरोक्त मुख्य न्यायाधीशाने दिलेल्या निर्णयावर [१][कलम २१८ड खाली कोणतेही अपील करण्यात आले नसेल,] तर, उक्त मुख्य न्यायाधीशाने दिलेला निर्णय, अंतिम असेल.

(२) आयुक्त असे कोणतेही मूल्य किंवा असा कोणताही कर यांविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपिलावर उक्त मुख्य न्यायाधीशाने दिलेल्या प्रत्येक निर्णयाची अंमलबजावणी करील.

नगरपालिका मालमत्ता कर मंडळाने केलेल्या मूल्यांकनास किंवा पुनरीक्षणास अधीन राहून मूल्यनिर्धारण करणे.

[२][**२१९अ.** (१) कलमे २१७, २१८, २१८अ, २१८ब, २१८बअ, २१८क, २१८ड, २१८ई आणि २१९ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, प्रत्येक पट्टीयोग्य मूल्य किंवा, यथास्थिती, भांडवली मूल्य महाराष्ट्र नगरपालिका मंडळ अधिनियम, २०११ याच्या कलम ३ अन्वये स्थापन केलेल्या महाराष्ट्र नगरपालिका मालमत्ता कर मंडळाने (यात यापुढे ज्याचा निर्देश "नगरपालिका मालमत्ता कर मंडळ" असा करण्यात आला आहे) केलेल्या मूल्यांकनाच्या किंवा पुनरीक्षणाच्या अधीन असेल. २०११ चा महा. १४.

(२) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, पट्टीयोग्य मूल्य किंवा, यथास्थिती, भांडवली मूल्य यांची निश्चिती किंवा या अधिनियमान्वये निश्चित केलेला किंवा आकारलेला कर या विरूद्ध करावयाचे अपील, ज्यावेळी अशा पट्टीयोग्य मुल्याची किंवा भांडवली मुल्याची किंवा या अधिनियमान्वये निश्चित केलेल्या अथवा आकारलेल्या कराची विषयवस्तू ही नगरपालिका मालमत्ता कर मंडळाच्या विचाराधीन असेल, त्यावेळी लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तीकडे करता येणार नाही; आणि जर असे कोणतेही अपील कलम २१८क अन्वये यापूर्वीच दाखल करण्यात आले असेल अथवा संदर्भाधीन असेल तर ते मंडळाने कार्यवाही सुरू केल्यानंतर नगरपालिका मालमत्ता कर मंडळाकडे हस्तांतरित केल्याचे मानण्यात येईल आणि त्यानुसार त्यावर कार्यवाही करण्यात येईल.]

विवक्षित तरतुदींचा परिणाम अधिभावी असणे.

[३][[४][**२१९अब.** प्रकरण आठ मध्ये किंवा या अधिनियमाच्या अन्य कोणत्याही तरतूदींमध्ये किंवा कोणत्याही न्यायालयाच्या न्यायनिर्णय, हुकूमनामा किंवा आदेश यांमध्ये त्यांच्याशी विसंगत काहीही अंतर्भूत असेल तरी महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा (तिसरी सुधारणा) अधिनियम, २०१० [४][महाराष्ट्र महानगरपालिका आणि नगरपरिषदा (सुधारणा) अधिनियम, २०११ किंवा, यथास्थिति, मुंबई महानगरपालिका आणि महाराष्ट्र (नागरी क्षेत्रे) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम, २०१२] याद्वारे सुधारणा करण्यात आलेली कलमे १२८, १४०अ, १५४अ, १५६ व १६८ ही अधिभावी राहतील.]

२०१० चा महा. २७.
२०११ चा महा. ११.
२०१२ चा महा. ६.

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम २४ अन्वये हा भागांश समाविष्ट करण्यात आला.

[२] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, अनुसूची परिच्छेद एक अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[३] सन २०१० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ९ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[४] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम १० अन्वये कलम २१९अ याला कलम २१९अब असा नवीन क्रमांक देण्यात आला आणि पुढे या कलमातील मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

प्रकरण नऊ

## नाल्या व जलनिस्सारणाची बांधकामे

### महानगरपालिका नाल्या

**२२०.** महानगरपालिकेमध्ये [१][निहित असलेल्या किंवा] तिच्या मालकीच्या सर्व नाल्या-ज्यांचा या अधिनियमात "महानगरपालिका नाल्या" म्हणून निर्देश केलेला आहे,—आयुक्ताच्या नियंत्रणाखाली असतील. महानगरपालिका नाल्या आयुक्ताच्या नियंत्रणाखाली असणे.

[२][**२२०अ.** (१) ज्यातून पावसाचे पाणी किंवा कोणत्याही प्रकारचा निस्सार वाहून नेला जातो असा यापूर्वी [३][शासनाच्या] मालकीचा असलेला कोणताही नैसर्गिक जलप्रवाह हा, आयुक्ताने [४][स्थायी समितीच्या] मान्यतेने [५][[६][राज्य] शासनाकडे] अर्ज केला असता महानगरपालिकेमध्ये विहित होईल : परंतु— जलप्रवाह निहित असणे.

(अ) याप्रमाणे ज्याच्याकरिता अर्ज केलेला असेल असा एखादा विशिष्ट जलप्रवाह हा याप्रमाणे निहित असावा किंवा कसे हे निर्धारित करणे, प्रत्येक बाबतीत, [४][[५][राज्य] शासनाच्या] विवेकाधिकाराच्या अधीन असेल, आणि

(ब) याप्रमाणे ज्याच्याकरिता अर्ज केलेला असेल असा जलप्रवाह महानगरपालिकेकडे सुपूर्द करण्यात येईल असे घोषित करणारा [४][[५][राज्य] शासनाचा] शासन निर्णय, तो करण्यात आल्याच्या तारखेपासून असा जलप्रवाह महानगरपालिकेमध्ये निहित होण्यासाठी प्रवर्तनात येईल.]

---

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम १० अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ११ अन्वये कलम २२०अ जादा दाखल करण्यात आले.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "हिज मॅजेस्टी" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ९४ अन्वये 'महापौरासह परिषदेच्या' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश यान्वये "सरकार" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकार" असा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

आयुक्ताने नाल्या बांधणे व त्या दुरुस्त स्थितीत ठेवणे.

**२२१.** [१][(१)] आयुक्त महानगरपालिकेच्या सर्व नाल्या सुस्थितीत व दुरूस्त ठेवील आणि महानगरपालिकेने त्यास याबाबतीत प्राधिकृत केले असता [२][बृहन्मुंबईतील] सांडपाण्याचा चांगल्या रीतीने निचरा होण्यासाठी वेळोवेळी आवश्यक असतील अशा नवीन नाल्या बांधील.

[३][(२) तसेच आयुक्त, ज्या कोणत्याही सडकेत महानगरपालिकेची नाली असेल त्या सडकेच्या बाबतीत कोणत्याही परिवास्तूच्या नालीचा जो भागांश महानगरपालिकेच्या नालीशी जोडावयाचा असेल व तो अशा सडकेच्या कोणत्याही भागाखालून नेणे आवश्यक असेल तो महानगरपालिका निधीतून खर्च करून बांधील आणि अशा रीतीने सडकेखालून नेलेला व नगरपालिकेच्या नालीशी जोडलेला भाग महानगरपालिकेमध्ये निहित होईल व आयुक्त, तो महानगरपालिकेची नाली म्हणून सुस्थितीत राखील व दुरूस्त स्थितीत ठेवील.]

नाल्या बांधण्याचे अधिकार.

**२२२.** (१) आयुक्तास कोणतीही महानगरपालिका नाली, कोणतीही सडक किंवा सडक म्हणून आखलेली किंवा उद्देशिलेली कोणतीही जागा यामधून किंवा त्या जागेला पार करून किंवा त्यांच्याखालून किंवा सडकेखाली असलेल्या कोणत्याही तळघराखालून किंवा चापछदाखालून नेता येईल. तसेच त्यास अशी नाली, मालकास किंवा भोगवटादारास वाजवी लेखी नोटीस देऊन, [२][बृहन्मुंबईतील] किंवा मलजल बाहेर काढण्यासाठी किंवा ते विभागण्यासाठी [२][बृहन्मुंबई बाहेरील] कोणत्याही जमिनीत किंवा जमिनीमधून किंवा जमिनीखालून नेता येईल.

(२) आयुक्तास, ज्या कोणत्याही जमिनीत महानगरपालिकेची कोणतीही नाली आधीच कायदेशीररीत्या बांधण्यात आली असेल अशा जमिनीवर प्रवेश करता येईल आणि तिच्यात असलेल्या नालीच्या जागी कोणतीही नवीन नाली बांधता येईल किंवा याप्रमाणे बांधलेली कोणतीही महानगरपालिका नाली दुरूस्त करता येईल किंवा तीत फेरफार करता येईल.

(३) या कलमाखाली कोणत्याही अधिकाराचा वापर करताना शक्य तितके कमी नुकसान होईल अशा रीतीने तो वापरण्यात येईल आणि असा अधिकार वापरल्यामुळे जिला नुकसान पोहोचेल अशा कोणत्याही व्यक्तीस आयुक्त भरपाई देईल.

परवानगीवाचून नाल्यांवर इमारती वगैरे न उभारणे.

**२२३.** (१) आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून, कोणत्याही महानगरपालिका नालीवर कोणतीही इमारत, भिंत किंवा इतर संरचना नव्याने उभारता येणार नाही आणि कोणतीही सडक किंवा रूळमार्ग बांधता येणार नाहीत.

(२) जर याप्रमाणे कोणतीही इमारत, भिंत किंवा इतर संरचना उभारण्यात आली किंवा कोणतीही सडक किंवा रूळमार्ग बांधण्यात आले तर आयुक्तास [४][स्थायी समितीच्या] मान्यतेने त्यास योग्य वाटेल अशा रीतीने, ती काढून टाकता येईल किंवा त्यासंबंधाने अन्य उपाययोजना करता येईल आणि त्याबद्दल झालेला खर्च उत्क्रमण करणारी व्यक्ती देईल.

नाल्यांमध्ये फेरफार करणे व त्यांचे कार्य थांबविणे.

**२२४.** (१) आयुक्तास कोणतीही महानगरपालिका नाली प्रवर्धित करता येईल, तिच्यावर कमान बांधता येईल किंवा अन्यथा तीत सुधारणा करता येईल. तसेच त्याच्या मते निरुपयोगी किंवा अनावश्यक झालेल्या कोणत्याही नालीचे कार्य थांबवता येईल किंवा ते बंद करता किंवा नष्ट करता येईल.

(२) परंतु, अशा प्रकारचे कोणत्याही नालीचे कार्य थांबवण्याचे, ती बंद करण्याचे किंवा ती नष्ट करण्याचे काम, कोणत्याही व्यक्तीस शक्य तितका कमी उपद्रव किंवा तिची शक्य तितकी कमी गैरसोय होईल अशा रीतीने करण्यात येईल आणि या कलमाखाली केलेल्या कोणत्याही कामामुळे

---

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम १२(१) अन्वये, कलम २२१ या कलमाला कलम २२१ पोट-कलम (१) असा फेरक्रमांक देण्यात आला.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४(१) अन्वये "ग्रेटर बॉम्बे" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम १२(२) अन्वये पोट-कलम (२) समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ९५ अन्वये "महापौरासह परिषदेच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

कोणतीही व्यक्ती कोणत्याही नालीचा विधिसंमत उपयोग करण्यापासून वंचित होत असेल तर, तिच्या उपयोगासाठी आयुक्त शक्य होईल तितक्या लवकर, ज्या नालीचे कार्य थांबवण्यात आले असेल, ती बंद करण्यात आली असेल किंवा नष्ट करण्यात आली असेल त्या नालीइतक्याच उपयुक्त अशा कोणत्याही इतर नालीची तरतूद करील.

**२२५.** (१) महानगरपालिका नाल्या, जेणेकरून त्यापासून शक्य तितका कमी उपद्रव होईल अशा रीतीने बांधण्यात, सुस्थितीत ठेवण्यात आणि राखण्यात येतील आणि त्या वेळोवेळी योग्य रीतीने पाणझोताने धुतल्या जातील, साफ केल्या जातील, रिकाम्या केल्या जातील. नाल्या साफ करणे.

(२) अशा नाल्या पाणझोताने धुण्यासाठी, साफ करण्यासाठी व रिकाम्या करण्यासाठी, आयुक्तास महानगरपालिकेने त्यास याबाबत प्राधिकृत केले असता, वेळोवेळी आवश्यक वाटतील असे जलाशय, सरकद्वारे, इंजिने व इतर बांधकामे करता किंवा उभारता येतील.

[१][**२२६.** (१) मलजल किंवा पर्जन्यनिस्सार वाहून नेण्याच्या प्रयोजनासाठी आयुक्ताला कोणत्याही जमिनीच्या खाली—मग अशा जमिनींवर बांधकाम केलेले असो किंवा ती रिकामी असो— बोगदा किंवा बोगदे खोदता येतील किंवा बांधून काढता येतील आणि तो किंवा ते सुस्थितीत ठेवता येतील आणि असा बोगदा किंवा बोगदे खोदण्यासाठी व त्यांचे बांधकाम करण्यासाठी आणि तो किंवा ते सुस्थितीत ठेवण्यासाठी आणि इतर संबद्ध बांधकामे करण्यासाठी त्याला आवश्यक वाटतील अशी संबद्ध बांधकामे आणि अशी इतर कामे करता येतील. कोणत्याही जमिनीच्या खाली बोगदे खणण्याचे, बांधण्याचे व ते सुस्थितीत ठेवण्याचे आणि मलजल किंवा पर्जन्यनिस्सार वाहून नेण्याच्या संबंधातील कामे हाती घेण्याचे आयुक्ताचे अधिकार.

(२) आयुक्त, पोट-कलम (१) खाली असे कोणत्याही बोगद्याचे खोदकाम आणि बांधकाम करण्यापूर्वी किंवा इतर कोणतेही संबद्ध बांधकाम हाती घेण्यापूर्वी, अशा बोगद्याचे खोदकाम करण्याचा, बांधकाम करण्याचा आणि तो सुस्थितीत ठेवण्याचा आणि इतर संबद्ध बांधकामे करण्याचा व ती सुस्थितीत ठेवण्याचा आपला उद्देश सूचित करणारी एक नोटीस, स्थानिक वृत्तपत्रात इंग्रजी, मराठी, हिंदी, गुजराथी आणि उर्दू या भाषांतून प्रसिद्ध करण्याची तजवीज करील. अशा नोटिशीत, बोगद्याची मार्गरेखा आणि खोली आणि लांबी व परीघ आणि ज्या इमारतींखाली असा बोगदा बांधण्याचे आणि तो सुस्थितीत ठेवण्याचे योजिले असेल ती इमारत आणि हाती घेण्याचे व सुस्थितीत ठेवण्याचे योजिले असेल अशी इतर संबद्ध बांधकामे, नमूद करण्यात येतील. तसेच, अशा नोटिशीत, ज्या तारखेला किंवा तारखेनंतर बोगद्याचे खोदकाम आणि बांधकाम करण्याचे किंवा असे संबद्ध बांधकाम करण्याचे योजिले असेल ती तारीख—जी, अशी नोटीस प्रसिद्ध करण्यात आल्याच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आधीची नसेल—स्थानिक वृत्तपत्रात विनिर्दिष्ट करण्यात येईल :

परंतु, अशी नोटीस वृत्तपत्रांत प्रसिद्ध केली जात असताना त्याचबरोबर आयुक्त, कलमे ४८४ आणि ४८५ यांमध्ये तरतूद करण्यात आलेल्या रीतीने नोटीस बजावून ज्या जमिनीखाली अशा बोगद्याचे खोदकाम व बांधकाम करावयाचे असेल किंवा असे संबद्ध बांधकाम करावयाचे असेल त्या जमिनीच्या मालकास, किंवा आयुक्ताच्या मते जिचे तीत हितसंबंध असतील अशा इतर कोणत्याही व्यक्तीस, स्थानिक वृत्तपत्रात नोटीस प्रसिद्ध करण्यात आल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, असा बोगदा का बांधण्यात येऊ नये आणि असे संबद्ध बांधकाम का करण्यात येऊ नये याबाबतचे कारण दर्शवण्यास फर्मावील. अशा जमिनीच्या मालकाने अथवा तीत हितसंबंध असलेल्या अशा कोणत्याही इतर व्यक्तीने कोणतेही कारण दिलेले असल्यास ते विचारात घेतल्यानंतर आणि संबंधित व्यक्तींना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी देण्यात आल्यानंतर, आयुक्तास, त्यास योग्य वाटतील असे आदेश काढता येतील.

(३) पोटकलम (२) खाली आयुक्ताने काढलेल्या कोणत्याही आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीला असा आदेश मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत उक्त बाब लघुवाद

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, अन्वये, निरसित करण्यात आलेली कलमे २२६ आणि २२६अ ही, सन १९८७ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम ७ अन्वये समाविष्ट करण्यात आली.

न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाकडे, निर्देशित करता येईल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल व कोणत्याही न्यायालयातील कोणत्याही दाव्यात किंवा इतर कायदेविषयक कार्यवाहीत त्याबाबत आक्षेप घेता येणार नाही :

परंतु, मुख्य न्यायाधीश या पोट-कलमात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत त्याच्याकडे करण्यात आला नसेल असा कोणताही निर्देश दाखल करून घेणार नाही व असा कोणताही निर्देश तो संक्षिप्तरीत्या खारीज करील.

(४) पोट-कलम (३) खालील विनिर्दिष्ट कालावधीत, मुख्य न्यायाधीशाकडे निर्देश करण्यात आला असेल आणि संबंधित पक्षकाराने त्या संबंधातील नोटीस आयुक्तावर बजावली असेल त्या बाबतीत, मुख्य न्यायाधीशाने असा निर्देश संक्षिप्तरीत्या खारीज केला असेल किंवा अशा निर्देशाच्या बाबतीत निर्णय देऊन अशा बोगद्याचे खोदकाम व बांधकाम करण्यास व असे संबद्ध बांधकाम करण्यास परवानगी दिली असेल ते खेरीज करून एरव्ही, आयुक्तास उक्त बोगद्याचे खोदकाम व बांधकाम सुरू करता येणार नाही अथवा कोणतेही संबद्ध बांधकाम करता येणार नाही.

लगतपूर्वीच्या कलमाखाली बोगदा, इत्यादी बांधण्याच्या अधिकारांमुळे झालेल्या कोणत्याही हानीबद्दल रक्कम देण्याबाबत तरतूद.

**२२६अ.** (१) लगतपूर्वीच्या कलमाअन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करताना फारसे नुकसान होणार नाही अशी दक्षता घेण्यात येईल आणि आयुक्ताने, शासनामध्ये किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणामध्ये निहित असलेल्या किंवा त्यांच्या मालकीच्या असलेल्या मालमत्तेहून अन्य कोणत्याही मालमत्तेच्या बाबतीत, त्या अधिकारांचा वापर केला असेल तेव्हा, आयुक्त, संबंधित व्यक्तींना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर उक्त अधिकारांचा वापर केल्याने त्या व्यक्तींना सोसाव्या लागलेल्या कोणत्याही हानीबद्दल त्यांना देय असलेली रक्कम आदेशाद्वारे निर्धारित करील.

(२) पोट-कलम (१) खाली आयुक्ताने दिलेल्या कोणत्याही आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस असा आदेश मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत उक्त बाब लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाकडे निर्देशित करता येईल आणि त्याचा निर्णय अंतिम असेल व कोणत्याही न्यायालयातील कोणत्याही दाव्यात किंवा इतर कायदेविषयक कार्यवाहीत त्याबाबत आक्षेप घेता येणार नाही :

परंतु, मुख्य न्यायाधीश या पोट-कलमात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत त्याच्याकडे करण्यात आला नसेल असा कोणताही निर्देश दाखल करून घेणार नाही व असा कोणताही निर्देश, तो संक्षिप्तरीत्या खारीज करील.

(३) पोट-कलमे (१) व (२) यातील कोणत्याही मजकुरामुळे लगतपूर्वीच्या कलमाखालील मुख्य न्यायाधीशाच्या निर्णयानुसार आयुक्ताने हाती घेतलेले बोगद्याचे खोदकाम, बांधकाम अथवा ते सुस्थितीत ठेवण्याचे काम किंवा इतर कोणतेही संबद्ध बांधकाम चालू ठेवण्यास त्याला प्रतिरोध अथवा प्रतिबंध होणार नाही.]

### खाजगी सडकांमधील नाल्या व परिवास्तूंतील जलनिस्सारण

खाजगी सडकांमधील नाल्या महानगरपालिकेच्या नाल्यांशी जोडण्याचे अधिकार.

**२२७.** खाजगी सडकेच्या मालकास अशा सडकेतील नाली पुढील शर्तींच्या अधीनतेने, महानगरपालिका नालींशी जोडण्याचा हक्क असेल; त्या शर्ती अशा :—

(अ) अशी नाली बांधण्यास सुरुवात करण्यापूर्वी सडकेचा मालक आयुक्तास त्या सडकेचा एक आराखडा सादर करील. त्या आराखड्यावर लायसनदार सर्वेक्षकाची, तो त्याने तयार केला आहे किंवा त्याच्या देखरेखीखाली तयार केला गेला आहे आणि असा आराखडा आयुक्त फर्माविल त्याप्रमाणे, सोईस्कर प्रमाण घेऊन काढण्यात आला आहे याचे निदर्शक म्हणून सही

असेल व त्यात प्रस्तावित नालीचे स्थान, मार्ग आणि परिमाणे ही त्यांचे एक किंवा अनेक भाग आणि त्यांच्याशी संबंधित असलेला इतर जो तपशील आयुक्तास आवश्यक वाटेल व असा जो तपशील देण्यास आयुक्त फर्मावील तो तपशील या गोष्टी दर्शवण्यात येतील. नालीचे असे कोणतेही काम आयुक्ताची लेखी मान्यता घेतल्यावाचून किंवा त्याच्या निदेशाविरुद्ध सुरू करण्यात येणार नाही ;

(ब) जशा खाजगी सडकेमधील नाली ही, सडकेच्या मालकाच्या खर्चाने, आयुक्त सर्व बाबतीत [१][स्थायी समितीच्या] मान्यतेने निदेश देईल अशा आकाराची, सामानाची आणि वर्णनाची बांधण्यात येईल आणि ती महानगरपालिकेच्या नालीशी आयुक्त निदेश देईल त्या रीतीने व अशा संक्रमण पद्धतीनुसार जोडण्यात येईल.

(क) आयुक्तास, त्यास योग्य वाटेल तर, महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या कोणत्याही सार्वजनिक सडकेत किंवा जागेत अथवा सडकेखाली किंवा जागेखाली असलेल्या नालीचा भाग आणि तो महानगरपालिका नाल्यांशी जोडण्यासाठी आवश्यक असलेल्या बांधकामाचा भाग बांधता येईल आणि अशा बाबतीत, आयुक्तास आलेला खर्च खाजगी सडकेचा मालक देईल.

परिवास्तूंच्या मालकांचा व भोगवटादारांचा आपल्या नाल्या महानगरपालिका नाल्यांमध्ये सोडण्याचा अधिकार.

**२२८.** कोणत्याही परिवास्तूच्या मालकास किंवा भोगवटादारास आपल्या नाल्या महानगरपालिकेच्या नालीत [२][किंवा निस्सार काढून टाकण्यासाठी कायदेशीरपणे अलग राखून ठेवलेल्या इतर जागेत] सोडण्याचा हक्क असेल; परंतु, प्रथम त्याला आयुक्ताची लेखी परवानगी घ्यावी लागेल आणि त्यास [३][महानगरपालिकेच्या नाल्यांशी किंवा पूर्वोक्त इतर जागांशी] ज्या पद्धतीने ज्या अधीक्षणाखाली नाल्या जोडाव्या लागतील ती पद्धत व ते अधीक्षण यासंबंधी आयुक्त विहित करील अशा शर्ती पाळाव्या लागतील.

कलम २२७ किंवा २२८ यानुसार असेल ते खेरीज करून एरव्ही महानगरपालिका नालीशी इतर नाल्या जोडता कामा नयेत.

**२२९.** कोणतीही व्यक्ती, यथास्थिति, कलम २२७ किंवा २२८ यांच्या तरतुदींचे अनुपालन न करता, स्वतःच्या किंवा कोणत्याही इतर व्यक्तींच्या मालकीची नाली महानगरपालिकेच्या कोणत्याही नालीशी [२][किंवा निस्सार काढून टाकण्यासाठी कायदेशीरपणे अलग राखून ठेवलेल्या इतर जागेशी] जोडणार नाही किंवा जोडण्याची तजवीज करणार नाही; आणि आयुक्तास [४]* * * *, या कलमांचे उल्लंघन करून जोडलेली कोणतीही अशी नाली बंद करणे, पाडून टाकणे, त्यात फेरफार करणे किंवा ती नव्याने बांधणे या गोष्टी करता येतील आणि असे करण्याच्या कामी आयुक्तास झालेला खर्च, ज्या सडकेच्या फायद्यासाठी नाली जोडण्यात आली होती त्या सडकेचा मालक किंवा परिवास्तूचा मालक किंवा भोगवटादार किंवा उत्क्रमण करणारी व्यक्ती देईल.

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ९६ अन्वये, "प्रभारी सदस्याच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम १४(१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १५ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३० अन्वये "स्थायी समितीच्या मंजुरीने" हा मजकूर वगळण्यात आला.

परवानगीवाचून कोणत्याही नालीवर इमारती, वगैरे न उभारणे.

[१]**[२२९अ.** (१) आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून कोणत्याही नालीवर कोणतीही इमारत, भिंत किंवा इतर बांधकाम नव्याने उभारण्यात येणार नाही.

(२) जर कोणतीही इमारत, भिंत किंवा इतर बांधकाम याप्रमाणे उभारण्यात आले, तर आयुक्तास उत्क्रमण करणाऱ्या व्यक्तीस, आपल्या इराद्याबाबत दहा दिवसांची नोटीस दिल्यानंतर [२] * * * * * * * * ते काढून टाकता येईल किंवा अन्यथा त्यासंबंधी त्यास योग्य वाटेल अशी कार्यवाही करता येईल आणि त्याबद्दल झालेला खर्च उत्क्रमण करणारी व्यक्ती देईल.]

परिवास्तूच्या मालकांचा व भोगवटादारांचा इतर व्यक्तींच्या मालकीच्या जमिनीमधून नाली नेण्याचा हक्क.

**२३०.** (१) कोणत्याही परिवास्तूचा मालक किंवा भोगवटादार आपली नाली महानगरपालिका नालीत [३][किंवा निस्सार काढून टाकण्यासाठी कायदेशीरपणे अलग राखून ठेवलेल्या इतर जागेत] आयुक्ताच्या मते ज्या एकमेव किंवा सर्वात सोईस्कर मार्गाने नेऊन सोडू शकेल तो मार्ग म्हणजे उक्त मालकाहून किंवा भोगवटादाराहून अन्य एखाद्या व्यक्तीच्या मालकीच्या कोणत्याही जमिनीतून, जमिनीमधून किंवा जमिनीखालून ती नाली नेणे हा असेल तर, आयुक्तास, [४][स्थायी समितीच्या] मान्यतेने, जमिनीच्या मालकास त्यांचा जो कोणताही आक्षेप असेल तो मांडण्यास वाजवी संधी दिल्यानंतर, कोणताही आक्षेप घेण्यात आला नसेल किंवा घेण्यात आलेला कोणताही आक्षेप त्यास विधिअग्राह्य किंवा अपुरा वाटेल तर, लेखी आदेशाअन्वये उक्त मालकास किंवा भोगवटादारास आपली नाली त्यास परवानगी देणे योग्य वाटेल अशा रीतीने उक्त जमिनीत, जमिनीमधून किंवा जमिनीखालून नेण्याचा प्राधिकार देता येईल.

(२) आयुक्ताची सही असलेल्या अशा प्रत्येक आदेशान्वये, ज्या व्यक्तीच्या प्रीत्यर्थ तो दिला असेल त्या व्यक्तीस किंवा या प्रयोजनासाठी तिने कामावर ठेवलेल्या कोणत्याही अभिकर्त्यास किंवा व्यक्तीस, उक्त जमिनीवर प्रवेश करण्याचा आपला उद्देश आहे अशी वाजवी लेखी नोटीस जमिनीच्या मालकास दिल्यानंतर अशा जमिनीवर मदतनीस व कामगार घेऊन सूर्योदय व सूर्यास्त यांच्या दरम्यान कोणत्याही वेळी प्रवेश करण्याचा आणि आवश्यक ते काम पार पाडण्याचा पूर्ण प्राधिकार असेल.

(३) या अधिनियमाच्या इतर सर्व तरतुदींच्या अधीनतेने, कोणत्याही परिवास्तूच्या मालकास किंवा भोगवटादारास किंवा त्याने या प्रयोजनासाठी कामावर ठेवलेल्या कोणत्याही अभिकर्त्यास किंवा व्यक्तीस ज्या कोणत्याही जमिनीत त्याच्या उक्त परिवास्तूतील निचरा काढून टाकण्यासाठी आधीच कायदेशीररीत्या नाली बांधलेली असेल त्या जमिनीच्या मालकास उक्त जमिनीवर प्रवेश करण्याचा आपला उद्देश आहे अशी वाजवी लेखी नोटीस दिल्यानंतर अशा जमिनीवर मदतनीस व कामगार घेऊन सूर्योदय व सूर्यास्त यांच्या दरम्यान कोणत्याही वेळी प्रवेश करता येईल आणि तीत विद्यमान असलेल्या नालीच्या जागी नवीन नाली बांधणे किंवा अशा रीतीने बांधलेली कोणतीही नाली दुरुस्त करणे किंवा त्यात फेरफार करणे या गोष्टी करता येतील.

(४) ह्या कलमाखाली कोणतेही काम पार पाडताना, फारसे नुकसान होणार नाही अशी खबरदारी घ्यावी लागेल आणि [५][ज्या परिवास्तूच्या फायद्यासाठी] असे काम करण्यात येईल त्या परिवास्तूचा मालक किंवा भोगवटादार—

(अ) असे काम शक्य तितक्या कमीत कमी वेळात पार पाडण्याची तजवीज करील ;

---

[१] सन १९९८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ५ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३१ अन्वये "स्थायी समितीची मंजुरी मिळवण्याकरिता अर्ज करता येईल आणि तिची मंजुरी घेऊन" हा मजकूर वगळण्यात आला.

[३] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम १४ (१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ९७(अ) अन्वये "प्रभारी सदस्य" या शब्दप्रयोगाऐवजी "स्थायी समिती" हा शब्दप्रयोग त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[५] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम १६ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ब) उक्त काम पार पाडण्यासाठी जी जमीन किंवा कोणत्याही इमारतीचा किंवा इतर बांधकामाचा जो कोणताही भागांश उघडला, फोडला किंवा काढून टाकला असेल, तो शक्य तितक्या कमीत कमी वेळात आपल्या स्वतःच्या खर्चाने भरून काढील, पूर्ववत करील व नीट करून देईल ;

(क) उक्त काम पार पाडल्यामुळे ज्या कोणत्याही व्यक्तीचे नुकसान होईल तिला भरपाई देईल.

(५) ज्या कोणत्याही जमिनीवर कोणतेही बांधकाम केलेले नसताना या कलमाखाली तीत, तीमधून किंवा तीखालून कोणतीही नाली नेण्यात आली असेल अशा जमिनीच्या मालकास जर पुढे कोणत्याही वेळी अशा जमिनीवर इमारत बांधण्याची इच्छा झाली तर आयुक्त, [१][स्थायी समितीच्या] मान्यतेने ज्या परिवास्तूच्या फायद्यासाठी अशी नाली बांधण्यात आली त्या परिवास्तूच्या मालकास किंवा भोगवटादारास लेखी नोटीस देऊन, [२][उक्त समिती] मान्य करील अशा रीतीने ती बंद करण्यास, काढून टाकण्यास किंवा वळवण्यास तसेच अशा जमिनीत, जमिनीमधून किंवा जमिनीखालून जणू काही ती नेण्यात आलेली नसावी त्याप्रमाणे अशी जमीन भरून काढण्यास, पूर्ववत करण्यास व नीट करून देण्यास फर्मावील :

परंतु, प्रस्तावित इमारत बांधता यावी म्हणून किंवा तिचा सुरक्षितपणे उपभोग घेता यावा म्हणून अशी नाली बंद करणे, काढून टाकणे किंवा वळवणे आवश्यक किंवा इष्ट आहे असे [१][स्थायी समितीचे] मत नसेल तर अशी मागणी करण्यात येणार नाही.

[३][**२३०अ.** कलम २३०, पोट-कलम (१) खाली ज्या व्यक्तीच्या प्रीत्यर्थ आदेश देण्यात आला असेल अशा कोणत्याही व्यक्तीस अशा आदेशात विहित करण्यात येतील अशा अटींवर आपल्या जमिनीत, जमिनीमधून किंवा जमिनीखालून नाली नेण्याची परवानगी देणे अशा जमिनीच्या प्रत्येक मालकावर बंधनकारक असेल.]

जमीनीच्या मालकाने आपल्या जमिनीमधून नाली नेण्याची इतरांना परवानगी देणे.

**२३१.** आयुक्ताच्या मते एखाद्या परिवास्तूला पाणी चांगल्या रीतीने काढून टाकण्याची पुरेशी सोय नसेल आणि उक्त परिवास्तूच्या एखाद्या भागापासून शंभर फुटांहून अधिक नसेल अशा अंतरावर महानगरपालिका नाली किंवा पाणी काढून टाकण्यासाठी कायदेशीरपणे अलग राखून ठेवलेली एखादी इतर जागा असेल त्याबाबतीत आयुक्त लेखी नोटिशीअन्वये अशा परिवास्तूच्या मालकास किंवा भोगवटादारास पुढील गोष्टी करण्यास फर्मावू शकेल :—

महानगरपालिका नालीपासून शंभर फुटांच्या आतील, नाली नसलेल्या परिवास्तूत जलनिस्सारणाची व्यवस्था करण्यास आयुक्त भाग पाडू शकेल.

(अ) आयुक्तास आवश्यक वाटेल असे साहित्य वापरून, त्यास आवश्यक वाटेल अशा आकाराचे, वर्णनाचे अशा सपाटीवर असलेले [४][व अशा रचनेअनुसार] व असा उतार व शेवटचे तोंड असलेली नाली बांधणे व ती आयुक्तास योग्य वाटेल अशा महानगरपालिकेच्या नालीत किंवा पूर्वोक्त जागेत नेऊन सोडणे :

[५][परंतु, महानगरपालिकेच्या नियमाप्रमाणे जेव्हा कोणत्याही परिवास्तूत नालीची व्यवस्था आधीच करण्यात आली असेल व त्या परिवास्तूत नवीन नाल्या बांधावयाच्या असतील तेव्हा, [६][स्थायी समितीच्या] पूर्वमंजुरीवाचून अशा रीतीने फर्मावण्यात येणार नाही ;]

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ९७(अ) अन्वये "प्रभारी सदस्य" या शब्दप्रयोगाऐवजी "स्थायी समिती" हा शब्दप्रयोग त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ९७(ब) अन्वये "उक्त प्रभारी सदस्य" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १८९८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ६ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम १७(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १७(ब) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[६] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३८ अन्वये "प्रभारी सदस्याच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ब) उक्त परिवास्तूतील सांडपाणी जमा करण्यासाठी व ते उक्त परिवास्तूतून काढून टाकण्यासाठी आणि अशी नाली व तिला जोडलेली प्रत्येक वस्तू चांगल्या रीतीने पाण्याने धुऊन काढण्यासाठी आयुक्तास आवश्यक वाटतील अशी सर्व साधने व खिळण्या यांची तरतूद करणे व ती बसवणे ;

(क) आरोग्यास अपायकारक असेल अशी कोणतीही अस्तित्वात असलेली नाली किंवा जलनिस्सारणासाठी उपयोगात आणलेले किंवा उपयोगात आणण्याचा इरादा असलेले इतर साधन व वस्तू काढून टाकणे.

महानगरपालिकेच्या नालीपासून शंभर फुटांच्या आत नसेल अशा जलनिस्सारण-विरहित परिवास्तूत जलनिस्सारणाची व्यवस्था करण्यास आयुक्त भाग पाडू शकेल.

**२३२.** (१) आयुक्ताच्या मते कोणत्याही परिवास्तूंना जलनिस्सारणाची चांगल्या रीतीने पुरेशी सोय नसेल व उक्त परिवास्तूच्या एखाद्या भागापासून शंभर फुटांच्या आत कोणतीही महानगरपालिका नाली किंवा पूर्वोक्तप्रमाणे असलेली कोणतीही जागा नसेल त्याबाबतीत, आयुक्तास, लेखी नोटिशीद्वारे, उक्त परिवास्तूंच्या मालकास किंवा भोगवटादारास पुढील गोष्टी करण्याविषयी फर्मावता येईल :—

[१][(अ) अशा नोटिशीत विहित केलेल्या परंतु उक्त परिवास्तूच्या एखाद्या भागापासून शंभर फुटांपेक्षा अधिक अंतरावर नसलेल्या जागी नाली बांधणे ; अथवा

(ब) आयुक्तास आवश्यक वाटेल असे साहित्य वापरून, त्यास आवश्यक वाटेल अशा आकाराची व वर्णनाची व अशा जागी, अशा पातळीवर व अशा उतरणीची बंद मलकुंडी बांधणे, तसेच अशा मलकुंडीत पाणी नेऊन सोडणारी एक किंवा अनेक नाल्या बांधणे.]

[२][(२) पोट-कलम (१) खाली कोणतीही नाली बांधण्यासाठी दिलेल्या कोणत्याही आदेशात कलम २३१, खंड (अ), (ब) किंवा (क) यात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही तपशिलाचा समावेश करता येईल.]

परिवास्तूतील निस्साराचा एकत्रितरीत्या निचरा करण्याचा आयुक्ताचा अधिकार.

[३][**२३२अ.** (१) अगोदरपासून अस्तित्वात असलेली किंवा बांधण्यात येणार असेल अशी महानगरपालिकेची नाली किंवा पाणी काढून टाकण्यासाठी कायदेशीररीत्या अलग राखून ठेवलेली इतर जागा यापासून ज्यांचा कोणताही भाग शंभर फुटांच्या आत असेल अशा परिवास्तूंच्या कोणत्याही समुहातील किंवा गटातील निस्सार प्रत्येक जागेतून वेगवेगळा काढून टाकण्यापेक्षा एकत्रितरीत्या त्याचा निचरा करणे हे अधिक काटकसरीचे किंवा फायद्याचे होईल असे आयुक्ताचे मत झाले तर, आयुक्तास, [४][स्थायी समितीच्या] मान्यतेने, या कारणासाठी अत्यंत सोईस्कर वाटेल अशा पद्धतीने त्या परिवास्तूंच्या समूहातील किंवा गटातील निस्साराचा निचरा करण्याची तजवीज करता येईल आणि असे करताना आयुक्तास आलेला खर्च, [४][स्थायी समितीस] योग्य वाटेल अशा प्रमाणात अशा परिवास्तूंचे मालक देतील.

(२) या कलमाखाली कोणतेही काम सुरू करण्यापूर्वी, पंधरा दिवसांपेक्षा कमी नसेल इतक्या अवधीत, आयुक्त ज्या परिवास्तूतून निस्साराचा निचरा करण्याची व्यवस्था करण्यात येणार असेल त्या सर्व परिवास्तूंच्या मालकांस पुढील बाबींविषयी लेखी नोटीस देईल :—

(अ) योजलेल्या कामाचे स्वरूप,

(ब) अशा कामाचा अंदाजे खर्च, आणि

(क) प्रत्येक मालकाने असा खर्च ज्या प्रमाणात द्यावयाचा ते प्रमाण.

---

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम १८ (अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १८ (ब) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी पोट-कलम (२) दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १९ अन्वये कलम २३२अ समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ९९ अन्वये " प्रभारी सदस्यांस " या शब्दप्रयोगाऐवजी " स्थायी समितीस " हा शब्दप्रयोग दाखल करण्यात आला.

(३) पोट-कलम (१) खाली ज्या समूहातील किंवा गटातील परिवास्तूंच्या निस्साराचा निचरा होत असेल अशा समूहातील किंवा गटातील अनेक परिवास्तूंचे त्या त्या वेळी असलेले मालक हे, केवळ अशा परिवास्तूंच्या खास उपयोगासाठी व लाभासाठी बांधलेल्या, उभारलेल्या किंवा बसवलेल्या किंवा वापरात चालू ठेवलेल्या प्रत्येक नालीचे संयुक्त मालक असतील; आणि आयुक्तास पोट-कलम (१) खाली आलेला खर्च अशा परिवास्तूंच्या मालकांनी ज्या प्रमाणात दिला पाहिजे असे निर्धारित करण्यात येईल त्या प्रमाणात, अशी प्रत्येक नाली चांगल्या दुरुस्त स्थितीत व कार्यक्षम स्थितीत ठेवण्यासाठी आलेला खर्च सोसण्यास ते जबाबदार असतील, मात्र, अशी प्रत्येक नाली महानगरपालिका निधीतून खर्च करून, वेळोवेळी पाणझोताने धुऊन काढण्याची, साफ करण्याची व ती रिकामी करण्याची व्यवस्था आयुक्त करील.]

आयुक्तास विद्यमान खाजगी नाल्या बंद करता येतील किंवा त्यांचा वापर मर्यादित करता येईल.

**२३३.** (१) जेव्हा कोणत्याही परिवास्तूतील नाली महानगरपालिका नालीशी [1][किंवा निस्सार काढून टाकण्यासाठी कायदेशीररीत्या अलग राखून ठेवलेल्या इतर जागेशी] जोडलेली असेल व अशी नाली उक्त परिवास्तूतून चांगल्या रीतीने निस्सारण करण्यास पुरेशी असून अन्यथा कोणत्याही प्रकारे आक्षेप घेण्याजोगी नसेल, परंतु, ती [2][बृहन्मुंबईच्या] [1][किंवा [2][बृहन्मुंबईच्या] ज्या भागात ती असेल त्या भागाच्या] जलनिस्सारणाच्या सर्वसाधारण व्यवस्थेशी जुळती नाही असे आयुक्ताचे मत होईल तर त्यास [3][स्थायी समितीच्या] मान्यतेने—

(अ) पोट-कलम (२) च्या तरतुदीच्या अधीनतेने, अशी नाली बंद करता येईल, तिचे कार्य थांबवता येईल किंवा नष्ट करता येईल व त्या प्रयोजनासाठी जे कोणतेही काम करणे आवश्यक असेल ते करण्याची तजवीज करता येईल ;

[4][(ब) अशी नाली, तो याबाबत विहित करील अशा तारखेपासून घाण पाण्यासाठी व मलजलासाठी फक्त वापरण्यात आली पाहिजे असा किंवा फक्त पावसाच्या पाण्यासाठी वापरण्यात आली पाहिजे असा किंवा भू-पृष्ठाखालील प्रदूषित न झालेल्या पाण्यासाठी फक्त वापरण्यात आली पाहिजे असा किंवा पावसाचे पाणी व भू-पृष्ठाखालील प्रदूषित न झालेले पाणी या दोहोंसाठीच फक्त वापरण्यात आली पाहिजे असा निदेश देता येईल, आणि आयुक्त अशा परिवास्तूच्या मालकास किंवा भोगवटादारास लेखी नोटीस देऊन, पावसाच्या पाण्यासाठी किंवा भू-पृष्ठाखालील प्रदूषित न झालेल्या पाण्यासाठी किंवा पावसाचे पाणी व भू-पृष्ठाखालील प्रदूषित न झालेले पाणी या दोहोंसाठी किंवा घाण पाणी व मलजल यांसाठी संपूर्णतः वेगळी नाली बांधण्याविषयी फर्मावू शकेल.]

(२) एखाद्या परिवास्तूच्या जलनिस्सारणासाठी आणि आयुक्तास योग्य वाटेल अशा कोणत्याही महानगरपालिका नालीशी [5][किंवा पूर्वोक्त इतर जागेशी जाऊन मिळणाऱ्या दुसऱ्या एखाद्या उपरोक्त नालीची] तरतूद केलेली असल्यावाचून, आयुक्ताला खंड (अ) खाली कोणतीही नाली बंद करता येणार नाही, तिचे कार्य थांबवता येणार नाही किंवा ती नष्ट करता येणार नाही; आणि आयुक्त ज्या कोणत्याही नालीची अशा रीतीने तरतूद केली असेल ती बांधण्यासाठी आलेला खर्च व खंड (अ) खाली त्याने जे कोणतेही काम करवून घेतले असेल त्याचा खर्च देईल.

---

[1] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम १४(१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४(१) अन्वये " ग्रेटर बॉम्बे " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[3] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १०० अन्वये " प्रभारी सदस्याच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५ कलम २०(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला

[5] वरील अधिनियमाच्या कलम १४(२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(३) खंड (ब) खाली, आयुक्ताने केलेल्या फर्मावणीत कलम २३१, खंड (अ) किंवा खंड (ब) यात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही तपशिलाचा समावेश करता येईल.

केवळ मालमत्तेच्या वापरासाठी नाल्या निहित होणे व त्यांची देखभाल करणे.

[१][**२३३अ.** कलम २२१, पोट-कलम (२) याच्या तरतुदींच्या अधीनतेने, कोणत्याही परिवास्तूच्या [२][किंवा परिवास्तूंच्या समूहाच्या] केवळ वापरासाठी व लाभासाठी बांधलेली, [३][बसवलेली,] उभारलेली किंवा घातलेली प्रत्येक नाली—मग ती महानगरपालिकेच्या खर्चाने असो किंवा नसो—

(अ) कलम २४२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, दिनांक ३० सप्टेंबर १९०५ रोजी व तेव्हापासून अशा परिवास्तूच्या [४][किंवा अशा परिवास्तूंच्या समूहाच्या] मालकामध्ये निहित होईल; आणि

[५][(ब) त्याचे काम अधिक परिणामकारकरीत्या चालावे म्हणून आयुक्तास आवश्यक वाटतील अशी आणखी सर्व उपयंत्रे व खिळण्या यांची तरतूद त्यात करण्यात येईल. तसेच ते अशा परिवास्तूंच्या किंवा परिवास्तूंच्या समूहाचा मालक चांगल्या दुरुस्त स्थितीत ठेवील व कार्यक्षम स्थितीत राखील आणि महानगरपालिका निधीतून खर्च करून ते वेळोवेळी पाणझोताने धुऊन काढण्याची, साफ करण्याची व ते रिकामे करण्याची व्यवस्था आयुक्त करील.]

नाल्यांशिवाय नवीन इमारत न बांधणे.

**२३४.** (१) कोणतीही इमारत बांधणे किंवा पुन्हा बांधणे किंवा नव्याने बांधलेली किंवा पुन्हा बांधलेली कोणतीही इमारत भोगवट्यात आणणे हे,—

(अ) अशा इमारतीतून योग्य प्रकारे जलनिस्सारण होण्यासाठी आयुक्तास आवश्यक वाटेल अशा आकाराची, त्यास आवश्यक वाटेल असे साहित्य वापरून, अशा वर्णनाची तसेच अशा पातळीवर व असा उतार असलेली नाली बांधलेली असल्याखेरीज व बांधण्यात येईतोपर्यंत;

(ब) अशी इमारत व तदंगभूत परिवास्तू यांच्यासाठी व त्यामध्ये अशा इमारतीतील व परिवास्तूतील निस्सार जमा करण्यासाठी व तो उक्त इमारतीतून व परिवास्तूतून काढून नेण्यासाठी आणि उक्त इमारतीची नाली व तिला जोडलेल्या सर्व खिळण्या चांगल्या रीतीने पाणझोताने धुऊन काढण्यासाठी आयुक्तास आवश्यक वाटतील अशी सर्व उपयंत्रे व खिळण्या यांची तरतूद करण्यात व ती बसवण्यात आल्याखेरीज व त्यांची तरतूद करण्यात येईतोपर्यंत व ती बसवण्यात येईतोपर्यंत, विधिसंमत नसेल.

(२) पूर्वोक्तप्रमाणे बांधावयाची नाली ही, [६][अशी इमारत ज्या परिवास्तूत असेल त्या परिवास्तूपासून] शंभर फुटांहून अधिक अंतर नसलेल्या महानगरपालिका नालीत किंवा निस्साराचा निचरा होण्यासाठी कायदेशीररीत्या अलग राखून ठेवलेल्या इतर जागेत नेऊन सोडण्यात येईल, परंतु अशी कोणतीही नाली किंवा जागा अशा अंतराच्या आत नसेल तर, अशी नाली आयुक्त निदेश देईल अशा मलकुंडीत नेऊन सोडण्यात येईल.

मलमूत्रादी पदार्थ मलकुंडीत न सोडणे.

**२३५.** कोणतीही व्यक्ती आयुक्ताच्या परवानगीने असेल ते खेरीज करून एरव्ही, कलम २३२ किंवा कलम २३४ खाली तयार केलेल्या किंवा वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही मलकुंडीत किंवा अशा कोणत्याही मलकुंडीशी जोडलेल्या कोणत्याही नालीत कोणतेही मलमूत्रादी पदार्थ सोडणार किंवा सोडावयास लावणार किंवा सोडू देणार नाही.

---

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम २१ अन्वये कलम २३३अ समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९१८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ७(ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ७(अ) अन्वये "बसवलेली" हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ७(क) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९१८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ७(ड) अन्वये मूळ खंड (ब) ऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[६] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम २२ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**२३६.** महानगरपालिका नालीशी [१][किंवा निस्साराच्या निचऱ्यासाठी कायदेशीररीत्या अलग राखून ठेवलेल्या इतर जागेशी] जोडलेल्या नालीच्या प्रत्येक मालकास कलम २२८ खाली विहित करण्यात येतील अशा अटींवर, त्याचा वापर इतरांस करू देणे किंवा इतर व्यक्तींना त्यांचे संयुक्तरीत्या मालक होऊ देणे बंधनकारक असेल.

नाल्यांच्या मालकांवर त्यांचा इतरांस वापर करू देण्याचे किंवा त्यांची संयुक्त मालकी होऊ देण्याचे आबंधन.

**२३७.** ज्या कोणत्याही व्यक्तीची, तिच्या परिवास्तूतील पाणी, जी नाली तिच्या मालकीची नसेल अशा नालीमधून महानगरपालिकेच्या नालीत नेऊन सोडण्याची इच्छा असेल तिला, अशा नालीच्या मालकाबरोबर तिचा वापर करू देण्यासाठी खाजगी व्यवस्था करता येईल किंवा अशा नालीचा वापर करण्याचा प्राधिकार मिळवण्यासाठी किंवा तिचे आपण संयुक्त मालक असल्याचे घोषित केले जावे यासाठी आयुक्ताकडे अर्ज करता येईल.

मालकाहून अन्य व्यक्तीस नालीचा वापर करण्याचा किंवा तिची संयुक्त मालकी मिळवण्याचा अधिकार कसा मिळवता येईल.

**२३८.** (१) [२][कोणत्याही परिवास्तूचा मालक किंवा भोगवटादार आपली नाली महानगरपालिका नालीत किंवा निस्साराच्या निचऱ्यासाठी कायदेशीररीत्या अलग राखून ठेवलेल्या इतर जागेत ज्या एकमेव किंवा सर्वांत सोयीस्कर मार्गाने नेऊन सोडू शकेल तो मार्ग म्हणजे, उक्त मालक किंवा भोगवटादार याहून अन्य व्यक्तीच्या मालकीच्या असलेल्या व महानगरपालिका नालीशी किंवा पूर्वोक्त इतर जागेशी जोडलेल्या नालीतून नेणे हा होय, असे अशा मिळालेल्या अर्जावरून किंवा अन्यथा आयुक्ताचे मत झाले तर,] त्यास, अशा नालीच्या मालकास त्याचा जो कोणताही आक्षेप असेल तो सांगण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, कोणताही आक्षेप घेण्यात आला नसेल किंवा घेण्यात आलेला कोणताही आक्षेप त्यास विधिअग्राह्य व अपुरा वाटेल तर [३][स्थायी समितीच्या] मान्यतेने लेखी आदेश देऊन त्या अन्वये त्यास न्याय्य वाटतील अशा शर्तीवर [४][उक्त मालकास किंवा भोगवटादारास] अशी नाली वापरण्याचा प्राधिकार देता येईल किंवा त्याचा संयुक्त मालक म्हणून घोषित करता येईल. अशा शर्ती, उक्त मालकास किंवा भोगवटादारास भाडे किंवा भरपाई देणे, [३][उक्त परिवास्तूतील] नाली महानगरपालिका नालीशी [५][जोडलेल्या नालीशी] जोडणे आणि संयुक्त मालकीची नाली सुस्थितीत राखणे, त्याची दुरुस्ती करणे, पाणझोताने धुऊन काढणे, साफ करणे व रिकामी करणे किंवा अन्य गोष्टी करणे याबाबतच्या त्या पक्षांच्या आपापल्या जबाबदाऱ्या यासंबंधी असतील.

आयुक्त नालीच्या मालकाहून अन्य व्यक्तीस त्या नालीचा उपयोग करण्याचा प्राधिकार देऊ शकेल किंवा ती व्यक्ती त्या नालीचा संयुक्त मालक असल्याचे घोषित करू शकेल.

---

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम १४(१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २३(अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १०१ अन्वये " प्रभारी सदस्याच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, २३(ब) (एक) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २३(ब) (दोन) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) आयुक्ताची सही असलेल्या अशा प्रत्येक आदेशान्वये, ज्या व्यक्तीच्या प्रीत्यर्थ तो दिला असेल त्या व्यक्तीस किंवा या प्रयोजनासाठी तिने कामावर लावलेल्या कोणत्याही अभिकर्त्यास किंवा व्यक्तीस, नालीच्या मालकास उक्त आदेशात विनिर्दिष्ट केलेली भरपाईची किंवा भाड्याची रक्कम दिल्यानंतर किंवा देऊ केल्यानंतर व अन्यथा उक्त आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या शर्ती शक्य तेथवर पुऱ्या केल्यानंतर ती नाली असलेल्या जमिनीवर प्रवेश करण्याचा आपला इरादा आहे अशी वाजवी लेखी नोटीस त्या नालीच्या मालकास दिल्यानंतर, उक्त नाली असलेल्या जमिनीवर मदतनीस व कामगार घेऊन व सूर्योदय व सूर्यास्त यांच्या दरम्यान कोणत्याही वेळी प्रवेश करण्याचा आणि या अधिनियमाच्या सर्व तरतुदींच्या अधीनतेने, पुढील कामे करण्यासाठी आवश्यक वाटतील अशा गोष्टी करण्याचा पूर्ण प्राधिकार मिळेल—

(अ) अशा दोन्ही नाल्या जोडणे; अथवा

(ब) जोडणीकाम पुन्हा नव्याने करणे, दुरुस्त करणे किंवा त्यात फेरफार करणे; अथवा

(क) जिच्या प्रीत्यर्थ आयुक्ताने आदेश दिला असेल त्या व्यक्तीची, अशी संयुक्त मालकीची नाली किंवा तिचा कोणताही भाग सुस्थितीत राखणे, तो दुरुस्त करणे, पाणझोताने धुऊन काढणे, साफ करणे, किंवा रिकामा करणे यासंबंधी जी कोणतीही जबाबदारी असेल ती पार पाडणे.

(३) पोट-कलम (२) खाली कोणतेही काम पार पाडण्याच्या बाबतीत, ज्या व्यक्तीच्या प्रीत्यर्थ आयुक्ताने आदेश दिला असेल ती व्यक्ती कलम २३०, पोटकलम (४) मध्ये जे निर्बंध व जी दायित्वे विनिर्दिष्ट करण्यात आली आहेत त्याच निर्बंधांस व दायित्वांस अधीन असेल.

मलजलाच्या व पावसाच्या पाण्याच्या नाल्या वेगवेगळ्या असणे.

**२३९.** कोणत्याही परिवास्तूतील प्रभावी जलनिस्सारणासाठी आयुक्त उपाययोजना करील किंवा त्यास अशी उपाययोजना करता येईल अशी या प्रकरणात जेव्हा जेव्हा तरतूद करण्यात आली असेल तेव्हा तेव्हा, घाण पाणी, मलमूत्र व प्रदूषित पाणी यांसाठी एक नाली असावी आणि पावसाचे पाणी व भूपृष्ठाखालील अप्रदूषित पाणी या दोहोंसाठी एक पूर्णतः स्वतंत्र अशी दुसरी नाली असावी आणि प्रत्येक नाली महानगरपालिकेच्या वेगवेगळ्या नालीत [१][किंवा निस्सारांचा निचरा करण्यासाठी कायदेशीररीत्या अलग राखून ठेवलेल्या इतर जागांत] किंवा इतर सोईस्कर जागांत सोडण्यात यावी असे आयुक्त फर्मावू शकेल.

नाल्या इमारतीच्या खालून गेलेल्या नसाव्यात.

**२४०.** आयुक्ताच्या लेखी परवानगीने असेल ते खेरीज करून एरव्ही आणि [२][स्थायी समिती] याबाबत सर्वसाधारणपणे किंवा विशेषतः विहित करील अशा शर्तींशी सुसंगत असेल ते खेरीज करून एरव्ही, कोणतीही नाली एखाद्या इमारतीच्या कोणत्याही भागाच्या खालून जाईल अशा रीतीने बांधण्यात येणार नाही.

मलकुंड्यांचे स्थान.

[३][**२४१.** कोणत्याही व्यक्तीला—

(अ) कोणत्याही इमारतीच्या कोणत्याही भागाखाली किंवा कोणतेही सरोवर, तलाव, जलाशय, ओढा, झरा किंवा विहीर यांपासून वीस फुटांच्या आत, किंवा

(ब) आयुक्ताने ज्याच्या बाबतीत लेखी मान्यता दिली नसेल अशा कोणत्याही ठिकाणावर किंवा कोणत्याही स्थानी,

मलकुंडी बांधता येणार नाही.]

---

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम १४(१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १०२ अन्वये " प्रभारी सदस्य " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम २४ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम २४१ दाखल करण्यात आले.

**२४२.** हा अधिनियम पारित होण्यापूर्वी किंवा पारित झाल्यानंतर महानगरपालिकेच्या मालकीच्या नसलेल्या परिवास्तूंवर महानगरपालिका निधीतून खर्च करून जी कोणतीही नाली, वायुवीजन हवानळ व नळ आणि जलनिस्सारणाच्या बांधकामास जोडलेली सर्व उपयंत्रे व खिळण्या ही बांधलेली किंवा उभारलेली किंवा घातलेली असतील आणि [१][जी सर्वस्वी उक्त परिवास्तूंच्या वापरासाठी व लाभासाठी नसतील ती सर्व,] महानगरपालिकेने अन्यथा तसे निर्धारित केले नसल्यास, किंवा ती कोणत्याही वेळी अन्यथा निर्धारित करणार नसल्यास, तिच्यामध्ये निहित होतील आणि ती नेहमी निहित होती असे मानण्यात येईल.

महानगरपालिकेची मालकी नसलेल्या परिवास्तूंवर महानगरपालिका निधीतून खर्च करून बांधलेल्या नाल्या इत्यादी यांवर महानगरपालिकेचा हक्क.

**२४३.** (१) प्रत्येक नालीस व मलकुंडीस—मग ती महानगरपालिकेच्या मालकीची असो किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या मालकीची असो—योग्य पंजर व आच्छादने आणि वायुवीजनाची योग्य ती साधने बसवली पाहिजेत.

सर्व नाल्या व मलकुंड्या योग्य रीतीने झाकणे व त्यात वायुवीजनाची व्यवस्था करणे.

(२) आयुक्तास, लेखी नोटिशीअन्वये, महानगरपालिकेच्या मालकीच्या नसलेल्या कोणत्याही नालीच्या किंवा मलकुंडीच्या मालकास, अशी नाली किंवा अशी मलकुंडी महानगरपालिकेच्या मालकीची असती तर, त्यास जो पंजर व आच्छादन व वायुवीजनाची जी साधने बसवली गेली असती तो पंजर व आच्छादन व वायुवीजनाची ती साधने नालीस किंवा मलकुंडीस बसवण्यास फर्मावता येईल.

**२४४.** (१) महानगरपालिकेच्या मालकीच्या किंवा कोणत्याही इतर व्यक्तीच्या मालकीच्या कोणत्याही नालीत किंवा मलकुंडीत वायुवीजन होण्यासाठी आयुक्तास आवश्यक वाटेल असा कोणताही हवानळ किंवा नळ कोणत्याही परिवास्तूवर उभारता येईल किंवा कोणत्याही इमारतीच्या बाहेरील भागास किंवा कोणत्याही झाडास जोडता येईल. [२][तसेच त्यास असा हवानळ किंवा नळ कोणत्याही इमारतीच्या कोणत्याही प्रक्षेपामधून नेण्यासाठी असा प्रक्षेप (कोणत्याही छपराच्या पागोळ्या धरून) छेदता येईल; आणि ज्या नालीत किंवा मलकुंडीत वायुवीजन ठेवण्याचा इरादा असेल अशा नालीला किंवा मलकुंडीला हवानळ किंवा नळ जोडण्यासाठी आयुक्ताच्या मते आवश्यक असलेली उपयंत्रे त्यास कोणत्याही जमिनीत, जमिनीमधून किंवा जमिनीखालून बसवता येतील]:

नाल्या, वगैरे यात वायुवीजन होण्यासाठी नळ जोडणे.

(२) परंतु, अशा रीतीने उभारलेला किंवा जोडलेला कोणताही हवानळ किंवा नळ हा—

(अ) त्यापासून [३][चाळीस] फुटांच्या आत असलेल्या कोणत्याही साण्यापेक्षा (स्कायलाईटपेक्षा) किंवा खिडकीपेक्षा निदान [४][पंधरा] फूट उंच नेलेला असेल;

(ब) जर तो छपराच्या पागोळ्यांना आधार देणाऱ्या भिंतीवर बसवण्यात आलेला असेल तर तो अशा पागोळ्यापेक्षा निदान पाच फूट उंच नेलेला असेल;

---

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम २५ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २६(अ) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २६(ब) अन्वये "वीस" या शब्दाऐवजी "चाळीस" हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २६(ब) अन्वये "दहा" या शब्दाऐवजी "पंधरा" हा शब्द दाखल करण्यात आला.

(क) जवळपास राहणाऱ्या व्यक्तींना फारसा उपद्रव किंवा गैरसोय होणार नाही अशा रीतीने उभारलेला किंवा लावलेला असेल;

(ड) तो ज्या परिवास्तूवर, इमारतीवर किंवा झाडावर उभारलेला असेल किंवा बसवला असेल त्या परिवास्तूच्या, इमारतीच्या किंवा झाडाच्या मालकांची जर कोणत्याही वेळी, आपल्या मालमत्तेत जो कोणताही बदल, असा हवानळ किंवा नळ हलविल्याशिवाय करणे शक्य नाही किंवा गैरवाजवी गैरसोयीशिवाय करणे शक्य नाही असा बदल करण्याची इच्छा असेल तर आयुक्त तो हवानळ किंवा नळ इतर दुसऱ्या जागी हलवील.

(३) जर आयुक्त खंड (ड) खाली हवानळ किंवा नळ काढावयाचे नाकारील तर तो ज्या परिवास्तूवर, इमारतीवर किंवा झाडावर उभारलेला असेल त्या परिवास्तूच्या, इमारतीच्या किंवा झाडाच्या मालकास, लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाकडे अर्ज करता येईल; आणि उक्त मुख्य न्यायाधीशास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, असा हवानळ किंवा नळ हलवण्याविषयी आयुक्तास निदेश देता येईल आणि आयुक्ताने असा आदेश पाळणे अवश्य कर्तव्य असेल.

[१][(४) जेव्हा पोट-कलम (१) खाली छेदलेल्या, उघडलेल्या किंवा अन्य रीतीने व्यवस्था केलेल्या कोणत्याही इमारतीचा किंवा जमिनीचा मालक हा, वायुवीजन व्यवस्था करण्याचा इरादा असेल, अशा नालीचा किंवा मलकुंडीचा मालक नसेल तेव्हा, आयुक्त, महानगरपालिका निधीतून खर्च करून, व्यवहार्य असेल तेथवर अशी इमारत पूर्ववत करील व दुरुस्त करील आणि अशी जमीन बुजवील व नीट करून देईल.]

**मलजलाची विल्हेवाट**

नाल्या नेऊन सोडण्यासाठी व मलजलाची विल्हेवाट लावण्यासाठी जागा नेमून देणे.

**२४५.** आयुक्तास महानगरपालिकेच्या सर्व किंवा कोणत्याही नाल्या समुद्रात किंवा [२][बृहन्मुंबईतील] किंवा [२][बृहन्मुंबईबाहेरील] इतर जागेत नेऊन सोडण्याची तजवीज करता येईल. तसेच त्यास, [२][बृहन्मुंबईतील] किंवा [२][बृहन्मुंबईबाहेरील] कोणत्याही जागेत व त्या प्रयोजनाकरिता, त्यास योग्य वाटेल अशा कोणत्याही रीतीने मलजलाची विल्हेवाट लावण्याची तजवीज करता येईलः

परंतु–

(अ) आयुक्त, महानगरपालिकेच्या मंजुरीवाचून ज्या कोणत्याही जागेत महानगरपालिकेची नाली अद्यापपर्यंत नेऊन सोडण्यात आलेली नसेल अशा जागेत महानगरपालिकेची कोणतीही नाली सोडण्याची व्यवस्था करणार नाही किंवा ज्या कोणत्याही जागेत किंवा ज्या कोणत्याही रीतीने मलजलाची विल्हेवाट अद्यापपर्यंत लावण्यात आलेली नसेल अशा जागेत किंवा अशा रीतीने मलजलाची विल्हेवाट लावण्याची व्यवस्था करणार नाही;

(ब) या कलमाखाली प्रदान करण्यात आलेले कोणतेही अधिकार शक्य तितका कमीत कमी उपद्रव होईल अशा रीतीने वापरण्यात येतील;

(क) कोणतीही महानगरपालिका, नाली ज्या कोणत्याही जागेत नेऊन सोडण्यास व कोणत्याही मलजलाची विल्हेवाट ज्या कोणत्याही जागेत किंवा ज्या कोणत्याही रीतीने लावण्यास परवानगी न देणे [३][[४][राज्य] शासनास] योग्य वाटेल त्या जागेत अशी नाली नेऊन सोडणार नाही.

---

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम २६ (क) अन्वये कलम २४४ चे पोट-कलम (४) जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४(१) अन्वये " ग्रेटर बॉम्बे " या शब्दाऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश यान्वये " सरकार " याऐवजी " प्रांतिक सरकार " हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

**२४६.** (१) मलजल जमा करणे, ते साठवणे, जंतुविरहित करणे, विभागून देणे किंवा इतर रीतीने त्याची विल्हेवाट लावणे यासाठी आयुक्तास, महानगरपालिका याबाबत त्यास प्राधिकृत करील तेव्हा,— मलजलाची विल्हेवाट लावण्यासाठी साधनांची तरतूद करणे.

(अ) [१][बृहन्मुंबईत] किंवा [१][बृहन्मुंबईबाहेर] कोणतेही बांधकाम करता येईल;

(ब) [१][बृहन्मुंबईत] किंवा [१][बृहन्मुंबईबाहेर] कोणतीही जमीन, इमारत, इंजिन, साहित्य किंवा उपकरण संच खरेदी करता येतील किंवा पट्ट्याने घेता येतील;

(क) [२][[१][बृहन्मुंबईत] किंवा [१][बृहन्मुंबईबाहेर] ] मलजल काढून नेण्यासाठी किंवा त्याची विल्हेवाट लावण्यासाठी वीस वर्षाहून अधिक नसेल अशा कोणत्याही कालावधीकरिता कोणत्याही व्यक्तीबरोबर कोणतीही संव्यवस्था करता येईल;

(२) परंतु, या कलमान्वये प्रदान करण्यात आलेला कोणताही अधिकार शक्यतो कमीत कमी उपद्रव होईल अशा रीतीने वापरण्यात येईल.

## जलधौत संडास, संडास, मुत्र्या, वगैरे

[३][**२४६अ.** (१) आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून आणि त्या त्या वेळी अंमलात असलेला कोणताही उपविधी यांच्याशी विसंगत नसतील अशा ज्या अटी आयुक्त विहित करील त्या पाळल्यावाचून कोणत्याही परिवास्तूसाठी जलधौत संडास किंवा संडास बांधणे हे विधिसंमत नसेल. जलधौत संडास व संडास बांधणे.

(२) अशा कोणत्याही अटी विहित करताना, आयुक्तास, प्रत्येक प्रकरणी पुढील गोष्टी निर्धारित करता येतील :—

(अ) परिवास्तूत जलधौत संडासाची व्यवस्था करण्यात यावी किंवा संडासाची व्यवस्था करण्यात यावी अथवा अंशतः जलधौत संडासाची व अंशतः संडासाची व्यवस्था करण्यात यावी किंवा कसे; आणि

(ब) प्रत्येक जलधौत संडास किंवा संडास कोणत्या ठिकाणी किंवा जागी असावा ते.

(३) जर कोणत्याही परिवास्तूवर कोणताही जलधौत संडास किंवा संडास पोटकलम (१) चे उल्लंघन करून बांधण्यात आला असेल तर, आयुक्तास, अशा परिवास्तूच्या मालकास किंवा भोगवटादारास दहा दिवसांपेक्षा कमी नसतील इतक्या दिवसांची नोटीस दिल्यानंतर असा जलधौत संडास किंवा संडास बंद करता येईल, [४] * * * त्यात फेरफार करता येतील किंवा तो पाडून टाकता येईल ; आणि असे करताना, आयुक्तास आलेला खर्च असा मालक किंवा भोगवटादार किंवा उत्क्रमण करणारी व्यक्ती देईल.]

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४(१) अन्वये " ग्रेटर बॉम्बे " या शब्दाऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[२] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम २७ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २८ अन्वये कलमे २४७ व २४८ यांऐवजी कलमे २४६अ, २४७ व २४८ दाखल करण्यात आली.

[४] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३२ अन्वये " व स्थायी समितीच्या पूर्वमंजुरीने " हा मजकूर वगळण्यात आला.

नव्याने बांधण्यात येणाऱ्या किंवा पुन्हा बांधण्यात येणाऱ्या इमारतींत जलधौत संडासांची व इतर व्यवस्था.

[१][**२४७.** (१) ज्या इमारतीत लोकांनी रहावे असा उद्देश असेल किंवा ज्या इमारतीत मजूर किंवा कामगार कामावर लावावयाचे असतील अशा कोणत्याही इमारतीत आयुक्त विहित करील अशा जलधौत संडासांची किंवा संडासांची व्यवस्था व अशी मुत्र्यांची व्यवस्था व स्नानासाठी किंवा कपडे धुण्यासाठी व घरगुती भांडी धुण्यासाठी व्यवस्था केल्याविना ती नव्याने बांधणे, किंवा पुन्हा बांधणे हे विधिसंमत असणार नाही.

(२) अशी कोणतीही व्यवस्था विहित करताना, आयुक्तास, प्रत्येक प्रकरणी पुढील गोष्टी निर्धारित करता येतील :—

(अ) अशा इमारतीत जलधौत संडासांची व्यवस्था करण्यात यावी किंवा संडासांची व्यवस्था करण्यात यावी अथवा अंशतः जलधौत संडासांची व अंशतः संडासांची व्यवस्था करण्यात यावी किंवा कसे ;

(ब) प्रत्येक जलधौत संडास, संडास, मुत्री किंवा स्नानाची अगर धुण्याची जागा कोणत्या ठिकाणी किंवा जागी असावी ते आणि त्यांची संख्या.]

जेव्हा अशी व्यवस्था नसेल किंवा असलेली व्यवस्था अपुरी किंवा आक्षेपार्ह असेल त्याबाबत.

[१][**२४८.** (१) जर कोणत्याही परिवास्तूत जलधौत संडास किंवा संडास किंवा मुत्री किंवा स्नानाची अगर धुण्याची जागा यांची सोय नसेल किंवा जर, आयुक्ताच्या मते कोणत्याही परिवास्तूत राहणाऱ्या किंवा तीत कामावर ठेवलेल्या व्यक्तींना वापरण्यासाठी असलेले विद्यमान जलधौत संडास किंवा संडास किंवा मुत्री किंवा स्नानाची अगर धुण्याची जागा यांची केलेली सोय अपुरी असेल किंवा कार्यक्षम नसेल किंवा कोणत्याही स्वच्छतेच्या संबंधीच्या कारणावरून आक्षेपार्ह असेल तर आयुक्तास, [२][* * * * * * *] लेखी नोटीस देऊन तिच्या अन्वये अशा परिवास्तूच्या मालकास पुढील गोष्टी करण्याविषयी फर्मावता येईल :—

(अ) आयुक्त विहित करील असे किंवा असे जादा जलधौत संडास, संडास, मुत्री किंवा स्नानाची अगर धुण्याची जागा वगैरे यांची तरतूद करणे ;

(ब) विद्यमान जलधौत संडास, संडास, मुत्री, स्नानाची अगर धुण्याची जागा यांत तो विहित करील असे संरचनात्मक किंवा इतर फेरफार करणे ; अथवा

(क) कोणत्याही संडासाऐवजी जलधौत संडासाची सोय करणे.

(२) परंतु, जर कोणत्याही परिवास्तूतील जलधौत संडास, संडास, मुत्री किंवा स्नानाची अगर धुण्याची जागा—

(अ) अशा परिवास्तूत आणि इतर कोणत्याही एका किंवा अधिक परिवास्तूंत राहणाऱ्या किंवा तिच्यात कामावर ठेवलेल्या व्यक्तींकडून सामाईक रीतीने वापरण्यात आलेली असेल किंवा अधिक परिवास्तूंत राहणाऱ्या किंवा तीत कामावर लावलेल्या व्यक्तींकडून सामाईक रीतीने वापरण्यात येत असेल तर, अथवा

(ब) आयुक्तांच्या मते त्यांचा अशा रीतीने वापर केला जाण्याचा संभव असेल तर, आयुक्तास, अशा सर्व परिवास्तूंत राहणाऱ्या किंवा तीत कामावर ठेवलेल्या व्यक्तींना त्यांचा वापर करण्याकरिता परवानगी देण्याच्या दृष्टीने अशी व्यवस्था पुरेशी आहे असे त्यांचे मत असल्यास अशा इतर परिवास्तूंपैकी प्रत्येक परिवास्तूत किंवा परिवास्तूकरिता स्वतंत्र जलधौत संडास, संडास, मुत्री किंवा स्नानासाठी अगर धुण्यासाठी जागा यांची वेगळी व्यवस्था करण्याची आवश्यकता नाही, असा लेखी निदेश देता येईल.

---

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम २८ अन्वये कलमे २४६-अ, २४७ आणि २४८ दाखल करण्यात आली.

[२] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३३ अन्वये " स्थायी समितीच्या पूर्वमंजुरीने " हा मजकूर वगळण्यात आला.

(३) परंतु आणखी असे की, आयुक्त, कोणत्याही परिवास्तूत राहणाऱ्या किंवा तीत कामावर ठेवलेल्या सर्व व्यक्तींना उपलब्ध असलेली, महानगरपालिकेने केलेली शौचकूपांची व्यवस्था पुरेशी आहे, असे त्याचे मत असेल तर अशा परिवास्तूत जलधौत संडास, संडास किंवा मुत्री यांची वेगळी व्यवस्था करण्याची आवश्यकता नाही, असा निदेश देऊ शकेल.

(४) पोट-कलम (१) खाली केलेल्या कोणत्याही फर्मावणीत, कलम २४७, पोट-कलम (२) यात विनिर्दिष्ट केलेला कोणताही तपशील समाविष्ट करता येईल.]

कारखाने, वगैरे यांकरिता संडासाची तरतूद करण्यास फर्माविण्याचा अधिकार.

**२४९.** कोणतीही परिवास्तू ही बाजार, रेल्वे स्थानक, गोदी, धक्का किंवा सार्वजनिक राबत्याची इतर जागा म्हणून किंवा ज्या जागेत वीसपेक्षा अधिक व्यक्ती कोणताही माल तयार करण्याच्या कामी किंवा उदिमात अगर धंद्यात कामावर ठेवलेले आहेत किंवा कामगार अगर मजूर म्हणून कामावर ठेवलेले आहेत अशी जागा म्हणून वापरण्यात येत आहे किंवा वापरण्याचा इरादा आहे असे आयुक्तास आढळून येईल तेव्हा, त्यास लेखी नोटिशीअन्वये, उक्त परिवास्तूच्या मालकास किंवा तिच्या भोगवटादारास स्त्रियांसाठी आणि पुरुषांसाठी वेगवेगळे असे पुरेसे जलधौत संडास किंवा शौचकूप किंवा संडास व मुत्र्या बांधण्याविषयी फर्मावता येईल.

अनारोग्यकारी संडासांबाबत आयुक्ताचा अधिकार.

[१][**२४९अ.** कोणताही संडास एखाद्या इमारतीपासून पुरेशा प्रमाणात अलग ठेवण्यात आला नसल्यामुळे अशा इमारतीत राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या आरोग्यास अशा संडासापासून अपाय होण्याचा संभव आहे असे आयुक्ताचे मत असेल तेव्हा त्यास, [२][* * * * *] ज्या परिवास्तूत किंवा परिवास्तूवर असा संडास असेल त्या परिवास्तूच्या मालकास किंवा भोगवटादारास लेखी नोटीस देऊन तिच्याअन्वये, एकतर—

(अ) असा संडास, तो कोणत्याही व्यक्तीस वापरण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने बंद करण्यास आणि त्याऐवजी आयुक्त विहित करील अशा जलधौत संडासाची किंवा संडासाची सोय किंवा मुत्रीची सोय करण्यास, अथवा

(ब) उक्त संडास व उक्त इमारतीचा कोणताही भागांश यांच्या दरम्यान, तीन फुटांपेक्षा अधिक रुंद नसलेली व वरच्या बाजूने उघडी असलेली व उक्त परिवास्तूच्या हद्दीतच संपूर्णपणे असलेली, आयुक्त विहित करील अशी खुली जागा ठेवण्यास,

फर्मावता येईल.]

संडासांबाबत तरतुदी.

**२५०.** (१) ज्या कोणत्याही परिवास्तूवर संडास असेल अशा परिवास्तूचा मालक किंवा भोगवटादार—

(अ) असा संडास व मानवी वसतिस्थानासाठी वापरण्यात येणारी किंवा वापरण्याचा इरादा असलेली कोणतीही इमारत किंवा जागा किंवा जेथे कोणतीही व्यक्ती माल तयार करण्याच्या कामी, उदिमात किंवा धंद्यात कामावर ठेवता येत असेल किंवा तिला कामावर ठेवण्याचा इरादा अधिक असेल अशी कोणतीही इमारत किंवा जागा यांच्या दरम्यान निदान तीन फूट रुंद व वरच्या बाजूने उघडी असलेली अशी खुली जागा ठेवील ;

(ब) असा संडास, जवळपास राहणाऱ्या किंवा तेथून जाणाऱ्या-येणाऱ्या व्यक्तींच्या दृष्टीस पडू नये म्हणून पुरेसे छप्पर व भिंत किंवा कुंपण करून बंद करून घेईल ;

(क) यात यापुढे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराखाली अशा संडासाचा कोणताही चालू दरवाजा, कळीचा दरवाजा चालू ठेवण्यास आयुक्ताने त्यास परवानगी दिली असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही आणि त्यास ज्या कालावधीसाठी परवानगी दिली असेल त्या कालावधीव्यतिरिक्त इतर कालावधीत, तो बंद करील आणि अशा संडासास, सडकेवर उघडेल असा कोणताही दरवाजा किंवा कळीचा दरवाजा ठेवणार नाही.

---

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम २९ अन्वये कलम २४९अ समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३४ अन्वये " स्थायी समितीची आगाऊ संमती घेऊन " हा मजकूर वगळण्यात आला.

(२) परंतु, आयुक्तास, सडकेवर उघडत असलेल्या संडासाच्या कोणत्याही दरवाजामुळे किंवा कळीच्या दरवाजामुळे उपद्रव निर्माण होत नसेल तर, त्यास योग्य वाटेल अशा कालावधीपर्यंत असा दरवाजा किंवा कळीचा दरवाजा चालू ठेवण्यास परवानगी देता येईल.

(३) परंतु आणखी असे की, हा अधिनियम अंमलात येईल त्यावेळी—

(ड) उक्त खंडास अनुसरून, नवीन संडास बांधण्याकरिता मालकाच्या किंवा भोगवटादाराच्या परिवास्तूवर एखादी जागा उपलब्ध नसेल तर; आणि

(ई) कायमच्या इमारतीच्या अस्तित्वात असलेल्या संडासाहून अन्य कोणताही भागांश पाडून न टाकता अस्तित्वात असलेला संडास काढून टाकता येत असेल तर आणि पूर्वोक्तप्रमाणे नवीन संडास बांधता येत नसेल तर,

अस्तित्वात असलेल्या कोणत्याही संडासास खंड (अ) लागू असल्याचे मानण्यात येणार नाही.

जलधौत संडासांबाबत तरतुदी.

**२५१.** ज्या कोणत्याही परिवास्तूवर जलधौत संडास असेल त्या परिवास्तूचा मालक किंवा भोगवटादार—

(अ) असा जलधौत संडास, मानवी वसतिस्थान म्हणून वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा इरादा असलेल्या किंवा एखाद्या इमारतीच्या ज्या भागात किंवा ठिकाणी कोणत्याही मालाच्या निर्मितीमध्ये, उदिमामध्ये, किंवा धंद्यात कोणतीही व्यक्ती कामावर ठेवण्यात येईल किंवा ठेवण्याचा इरादा असेल अशा इमारतींच्या कोणत्याही भागापासून किंवा जागेपासून आयुक्ताला पुरेशी वाटतील अशा साधनांनी अलग करून घेईल.

(ब) असा जलधौत संडास अशा स्थानी बांधील की, जेणेकरून त्याच्या बाजूंपैकी निदान एक बाजू ही तरी बाहेरची भिंत असेल ;

(क) अशा जलधौत संडासाची बैठक बाहेरच्या भिंतीसमोर करून घेईल ;

(ड) अशा जलधौत संडासाच्या भिंतीपैकी एका भिंतीत, थेट उघड्या हवेत उघडेल अशी खिडकी किंवा इतर छिद्रक करून किंवा एखादा हवानळ बसवून किंवा इतर योग्य रीतीने किंवा योग्य उपयंत्रे वापरून, अशा जलधौत संडासामध्ये आयुक्तास पर्याप्त वाटतील अशी वायुवीजनाची साधने बसवील ;

(ई) अशा जलधौत संडासास पाणी पुरविणारी टाकी व पाणझोत उपकरणसंच व मैलापात्र किंवा इतर मलग्राही साधने ही आयुक्तास आवश्यक वाटेल अशा सामानाची, आकाराची व वर्णनाची बसवून घेईल ; परंतु नेहमी असे की, ज्या टाकीपासून एखाद्या जलधौत संडासास पाणी पुरवण्यात येत असेल ती टाकी, इतर कोणत्याही प्रयोजनाकरिता पाणी पुरवण्यासाठी वापरता येणार नाही किंवा जी कोणतीही इतर टाकी अशा इतर प्रयोजनासाठी पाणीपुरवठा करण्याकरिता वापरण्यात येत असेल त्या टाकीशी ती जोडता येणार नाही.

संडास व जलधौत संडास यांचे स्थान.

[१][**२५१अ.** कोणतीही व्यक्ती एखादा संडास किंवा जलधौत संडास—

(अ) एखाद्या इमारतीतील संडास किंवा जलधौत संडास किंवा स्नानाची जागा ही स्नानगृह किंवा गच्ची याहून अन्य कोणत्याही खोलीवर किंवा भागावर किंवा याच्याखाली थेट येईल अशाप्रकारे ;

(ब) ज्या कोणत्याही विहिरीचे किंवा कोणत्याही झऱ्याचे, तलावाचे किंवा ओढ्याचे पाणी माणसांना पिण्यासाठी किंवा घरगुती प्रयोजनासाठी वापरण्यात येत असेल किंवा वापरण्यात येण्याचा संभव असेल (मग ते नैसर्गिक अवस्थेत किंवा त्यावर प्रक्रिया करून वापरण्यात येत असो), त्यापासून वीस फूट अंतराच्या आत येईल किंवा जेणेकरून कोणत्याही विहिरीचे, झऱ्याचे, तलावाचे किंवा ओढ्याचे पाणी प्रदूषित होईल अशा स्थानी व अशा रितीने बांधणार नाही.]

---

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३० अन्वये कलम २५१-अ समाविष्ट करण्यात आले.

[१][२५१ब. कोणत्याही परिवास्तूच्या कोणत्याही भागात त्यातील निस्सार गोळा करण्याकरिता व तो तेथून वाहून नेण्याकरिता आयुक्ताच्या मते, आवश्यक असतील अशा सर्व उपकरणसंचांची व खिळण्यांची तरतूद केली नसेल तर अशा कोणत्याही परिवास्तूचा कोणताही भाग स्नानाची जागा म्हणून, किंवा कपडे अगर घरगुती भांडी धुण्याची जागा म्हणून कोणत्याही व्यक्तीला वापरता येणार नाही किंवा वापरण्याची परवानगी देता येणार नाही.]

स्नानाकरिता किंवा कपडे अगर घरगुती भांडी धुण्याकरिता जागांचा उपयोग करणे.

**२५२.** आयुक्त, लोकांच्या सोयीसाठी जलधौत संडास, शौचकूप, संडास व मुत्र्या व तत्सम इतर सोयी यांची योग्य व सोईस्कर जागी व महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या ठिकाणी तरतूद करील व त्या सुस्थितीत ठेवील.

लोकांसाठी आवश्यक सोयी.

[२][**२५२अ.** राज्य शासनाने किंवा, राज्य शासनाच्या अनुदेशान्वये, राज्य शासनाच्या कोणत्याही अभिकरणाने, घन कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी किंवा त्याची विल्हेवाट लावण्यासाठी किंवा मलजलावर किंवा सांडपाण्यावर संस्करण किंवा पुनश्चक्रण करण्यासाठी किंवा मोठ्या प्रमाणावर पाणीपुरवठा करण्यासाठी किंवा पिण्याच्या प्रयोजनार्थ पाण्याचे संस्करण करण्यासाठी एखादी सामाईक सुविधा निर्माण केली असेल तर, राज्य शासनाने तसे निदेश दिल्यास, **राजपत्रातील** आदेशाद्वारे राज्य शासन विनिर्दिष्ट करील अशा अटी व शर्तींनुसार त्या सुविधेमध्ये सहभागी होणे हे महानगरपालिकेसाठी अनिवार्य असेल :

सामाईक सुविधेमध्ये सहभागी होणे महानगरपालिकेस बंधनकारक असणे.

परंतु, राज्य शासन, या कलमान्वये कोणताही निदेश देण्यापूर्वी, पंधरा दिवसांच्या आत याबाबत निवेदन, कोणतेही असल्यास, सादर करण्याची महानगरपालिकेला संधी देईल. महानगरपालिकेने पंधरा दिवसांच्या आत निवेदन सादर न केल्यास, किंवा सादर केलेले निवेदन विचारात घेतल्यावर असे निदेश देणे आवश्यक आहे, असे राज्य शासनाचे मत झाल्यास, राज्य शासनास तसे निदेश देता येतील.]

## निरीक्षण

**२५३.** ज्या महानगरपालिकेच्या मालकीच्या नसतील किंवा महानगरपालिकेच्या मालकीच्या नसलेल्या परिवास्तूंवर अशा परिवास्तूंच्या मालकांच्या किंवा भोगवटादारांच्या वापरासाठी किंवा लाभासाठी महानगरपालिका निधीतून खर्च करून ज्या बांधण्यात, उभारण्यात किंवा रचना करण्यात आल्या असतील अशा सर्व नाल्या, हवानळ आणि नळ, मलकुंड्या, घरांच्या बोळकांड्या, जलधौत संडास, संडास, शौचकूप व मुत्र्या [३][आणि स्नानाच्या व धुण्याच्या जागा] आयुक्ताने त्यांचे निरीक्षण व तपासणी करावी यासाठी खुल्या ठेवण्यात येतील.

महानगरपालिकेच्या मालकीच्या नसलेल्या नाल्या, वगैरे निरीक्षणाच्या व तपासणीच्या अधीन असणे.

**२५४.** अशा निरीक्षणाच्या व तपासणीच्या प्रयोजनार्थ, आयुक्तास, त्यास योग्य वाटेल अशी जमीन किंवा कोणत्याही नालीचा कोणताही भागांश किंवा इमारतीच्या बाहेरील कोणतेही इतर बांधकाम किंवा [४][स्थायी समितीच्या] मान्यतेने इमारतींचा कोणताही भागांश खोदण्याची, फोडण्याची किंवा काढून नेण्याची तजवीज करता येईल :

असे निरीक्षण व तपासणी करण्यासाठी जमीन वगैरे खोदण्याचा अधिकार.

परंतु असे कोणतेही निरीक्षण व तपासणी ही शक्य तितके कमी नुकसान होईल अशा रीतीने करण्यात येईल.

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३१ अन्वये कलम २५१ब समाविष्ट करण्यात आले.

[२] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम २ अन्वये " कलम २५२अ " समाविष्ट करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३२(१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १०३ अन्वये " प्रभारी सदस्याच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

निरीक्षणाचा व तपासणीचा खर्च आयुक्ताने केव्हा द्यावा.

**२५५.** पूर्वोक्तप्रमाणे कोणतेही असे निरीक्षण व तपासणी केल्यानंतर, ज्याची तपासणी केली आहे ती नाली, हवानळ किंवा नळ, मलकुंडी, घराची बोळकांडी, जलधौत संडास, संडास, शौचकूप किंवा मुत्री [1][किंवा स्नानाची अगर धुण्याची जागा] व्यवस्थित व चांगल्या स्थितीत आहे व ती बांधण्याच्या किंवा सुस्थितीत राखण्याच्या बाबतीत या प्रकरणाच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करण्यात आलेले नाही व त्यावर कोणतेही अतिक्रमण करण्यात आलेले नाही असे आढळून येईल तर, आयुक्त अशा निरीक्षणासाठी व तपासणीसाठी जी कोणतीही जमीन खोदली असेल ती बुजवून देईल किंवा कोणत्याही इमारतींचा, नालीचा किंवा इतर बांधकामाचा जो कोणताही भाग फोडला असेल किंवा काढून नेला असेल तो पूर्ववत करील व दुरुस्त करील.

निरीक्षणाचा व तपासणीचा खर्च मालकाने केव्हा द्यावा.

**२५६.** मात्र याप्रमाणे ज्याची तपासणी करण्यात आली आहे अशी कोणतीही नाली, हवानळ किंवा नळ, मलकुंडी, घराची बोळकांडी, जलधौत संडास, संडास, शौचकूप किंवा मुत्री [2][किंवा स्नानाची अगर धुण्याची जागा] व्यवस्थित किंवा चांगल्या स्थितीत नाही असे आढळून येईल तर किंवा ती दुरुस्त केली असेल, तीत बदल केला असेल, फेरफार केला असेल किंवा तीवर अतिक्रमण केले असेल तर अथवा ती आयुक्ताच्या आदेशान्वये किंवा त्याखाली बांधण्यात आली असेल ते खेरीज करून एरव्ही या प्रकरणाच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करून बांधण्यात आली असेल तर,

अशा निरीक्षणाचा व तपासणीचा खर्च परिवास्तूचा मालक देईल आणि अशा निरीक्षणासाठी व तपासणीसाठी जी कोणतीही जमीन खोदली असेल ती उक्त मालक स्वतःच्या खर्चाने बुजवील किंवा कोणत्याही इमारतीचा, नालीचा किंवा इतर बांधकामाचा जो कोणताही भाग फोडला असेल किंवा काढून नेला असेल तो भाग स्वतःच्या खर्चाने पूर्ववत करील व नीट करील.

दुरुस्ती, वगैरे करण्यास फर्मावण्याचा आयुक्ताचा अधिकार.

[3][**२५७.** (१) जेव्हा पूर्वोक्तप्रमाणे अशा निरीक्षणाचा व तपासणीचा निष्कर्ष हा, कलम २५६ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे असेल तेव्हा, आयुक्तास,—

(अ) ज्या परिवास्तूत नाली, हवानळ, किंवा नळ, मलकुंडी, घराची बोळकांडी, जलधौत संडास, संडास, शौचकूप, मुत्री किंवा स्नानाची अगर धुण्याची जागा असेल किंवा ज्या परिवास्तूच्या लाभासाठी ती बांधली असेल, उभारली असेल किंवा तिची रचना केली असेल त्या परिवास्तूच्या मालकास किंवा त्या त्या परिवास्तूंच्या विविध मालकांस लेखी नोटीस देऊन—

(एक) ते बंद करण्यास किंवा काढून टाकण्यास किंवा त्याच्यावरील कोणतेही अतिक्रमण काढून टाकण्यास किंवा [4][कलम २५८, खंड (क) च्या परंतुकाच्या अधीनतेने, त्याच्यावरील कोणताही प्रक्षेप काढून टाकण्यास, अथवा]

(दोन) त्याचे नवीकरण करण्यास, ते दुरुस्त करण्यास, आच्छादण्यास, पुन्हा आच्छादण्यास, त्यावर पंजर बसवण्यास, त्यात वायुवीजन होऊ देण्यास, त्यात फरसबंदी करण्यास व त्याला डांबर लावण्यास किंवा त्यासंबंधी इतर जी कोणतीही व्यवस्था करण्याविषयी निदेश देणे त्यास योग्य वाटेल ती इतर व्यवस्था करण्यास आणि अशा निरीक्षणासाठी व तपासणीसाठी खोदलेली जमीन बुजवण्यास व फोडलेली किंवा काढून नेलेली इमारत किंवा गोष्ट पूर्ववत करण्यास व दुरुस्त करण्यास फर्मावता येईल, आणि

(ब) या प्रकरणाच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करून ज्या कोणत्याही नालीतून घाणपाणी किंवा मलजल कोणत्याही परिवास्तूमधून, परिवास्तूतून, परिवास्तूत किंवा परिवास्तूवर नेले जात असेल ती नाली नोटीस न देता बंद करता येईल, भरून काढता येईल किंवा पाडून टाकता येईल; आणि असे करताना, आयुक्तास आलेला खर्च असा मालक देईल किंवा असे मालक देतील.

---

[1] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३२(२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३२ (२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम ३३ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम २५७ दाखल करण्यात आले.

[4] सन १९१८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ८ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

(२) जी कोणतीही नाली सर्वस्वी एखाद्या मालमत्तेच्या उपयोगासाठी व लाभासाठी किंवा दोन किंवा अधिक मालमत्तांच्या अनन्य उपयोगासाठी व लाभासाठी बांधण्यात किंवा उभारण्यात किंवा बसवण्यात किंवा चालू ठेवण्यात आली असेल त्या नालीसंबंधी पोट-कलम (१), खंड (अ) खाली जी कोणतीही फर्मावणी करण्यात आली असेल ती, अशा नालीचा जो कोणताही भाग मालमत्तेच्या किंवा मालमत्तांच्या पलीकडे वाढवण्यात आला असेल तो भाग जर सर्वस्वी अशा मालमत्तेच्या किंवा मालमत्तांच्या उपयोगासाठी पलीकडे वाढवण्यात आलेला असेल तर व सर्वस्वी अशा मालमत्तेच्या किंवा मालमत्तांच्या उपयोगासाठी व लाभासाठी बांधण्यात, उभारण्यात, बसविण्यात किंवा चालू ठेवण्यात आला असेल त्या प्रमाणात त्या भागासही लागू होईल.]

विवक्षित प्रकरणी कामांचे निरीक्षण करण्याचा व ती पार पाडण्याचा परिव्यय.

[१][**२५७अ.** जी कोणतीही नाली दोन किंवा अधिक परिवास्तूंच्या अनन्य उपयोगासाठी व लाभासाठी बांधण्यात, उभारण्यात किंवा बसवण्यात आली असेल किंवा चालू ठेवण्यात आली असेल, आणि—

(अ) जी कलम २३२अ, पोट-कलम (१) खाली बांधण्यात आली नसेल; अथवा

(ब) पक्षकारांच्या आपापल्या जबाबदाऱ्यासंबंधीच्या शर्ती कलम २३८, पोट-कलम (१) खाली जिच्या बाबतीत घोषित करण्यात आल्या असतील अशी नाली नसेल ;

अशा नालीच्या बाबतीत, कलम २५३ खाली आयुक्ताने केलेल्या निरीक्षणाचा व तपासणीचा कोणताही खर्च व कलम २५७ खाली आवश्यक असलेले कोणतेही काम पार पाडण्यासाठी झालेला खर्च, मग असे काम कलम २६० खाली पार पाडण्यात आलेले असो वा नसो, अशा परिवास्तूंचे मालक, [२][आयुक्त जे प्रमाण निर्धारित करील त्या प्रमाणात देतील.]

## सर्वसाधारण तरतुदी

या प्रकरणांच्या तरतुदींचे उल्लंघन करून किंवा मंजुरीवाचून कामे करण्यास मनाई.

**२५८.** [३][(१)] कोणतीही व्यक्ती—

(अ) या प्रकरणाच्या कोणत्याही तरतुदी किंवा या प्रकरणाखाली काढलेली कोणतीही नोटीस किंवा दिलेला कोणताही निदेश यांचे उल्लंघन करून, किंवा आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून कोणतीही नाली, हवानळ किंवा नळ, मलकुंडी, जलधौत संडास, संडास, शौचकूप किंवा मुत्री [४][किंवा स्नानाची अगर धुण्याची जागा] किंवा तिच्याशी जोडलेला कोणताही पंजर, आच्छादन किंवा इतर खिळणी किंवा साधन जसे किंवा ज्या जागी बसवले असेल त्यात कोणत्याही रीतीने फेरफार करणार नाही किंवा ते बांधणार नाही, उभारणार नाही, ठेवणार नाही, त्याचे नवीकरण करणार नाही, ते नव्याने बांधणार नाही किंवा काढून टाकणार नाही किंवा त्यात अडथळा निर्माण करणार नाही, ते बंद करणार नाही, ते नष्ट करणार नाही किंवा त्यात बदल करणार नाही ;

(ब) जी कोणतीही नाली, हवानळ किंवा नळ, मलकुंडी, जलधौत संडास, संडास, शौचकूप किंवा मुत्री [४][किंवा स्नानाची अगर धुण्याची जागा] किंवा जी कोणतीही खिळणी किंवा साधन या प्रकरणाच्या कोणत्याही तरतुदीखाली काढून टाकण्यात आले असेल, पाडून टाकण्यात आले असेल किंवा बंद करण्यात आले असेल किंवा तसे करण्याविषयी आदेश देण्यात आला असेल त्याचे आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून नवीकरण करणार नाही, ते पुन्हा बांधणार नाही किंवा सुरू करणार नाही.

---

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३४ अन्वये कलम २५७अ समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३५ अन्वये "(एक) अशा खर्चाची" या मजकुराने सुरू होणाऱ्या व उपखंड (दोन) मधील "त्या प्रमाणात देतील" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३६ अन्वये कलम २५८ याला त्या कलमाचे पोट-कलम (१) असा फेरक्रमांक देण्यात आला.

[४] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३२ (२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(क) आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून, कोणतीही नाली, मलकुंडी, घराची बोळकांडी, जलधौत संडास, संडास, शौचकूप किंवा मुत्री [१][किंवा स्नानाची अगर धुण्याची जागा] यावर कोणताही [२][प्रक्षेप बांधणार नाही किंवा] त्यावर अतिक्रमण करणार नाही किंवा त्याचे कोणत्याही प्रकारे नुकसान करणार, करविणार किंवा करू देणार नाही :

[३][परंतु, जी कोणतीही खिडकी, शेजारच्या घराच्या भिंतीसमोर किंवा खिडकीसमोर नसेल त्या खिडकीवरील दोन फुटांपेक्षा अधिक रुंदी नसलेल्या कोणत्याही वेदर-शेडला या खंडातील कोणतीही गोष्ट लागू होणार नाही ;]

(ड) कोणत्याही नालीत, विटा, दगड, माती, राख किंवा जे विशिष्ट प्रमाणात टाकल्यामुळे अशा नालीस अडथळा होण्याचा संभव असेल असा कोणताही पदार्थ किंवा वस्तू तिथे टाकणार, टाकविणार नाही किंवा सोडणार, सोडविणार किंवा सोडू देणार किंवा ठेवणार, ठेवविणार किंवा ठेवू देणार नाही ;

(ई) विशिष्ट प्रयोजनासाठी तरतूद केलेल्या कोणत्याही नालीतून जी कोणतीही वस्तू किंवा द्रवपदार्थ वाहून नेला जावा यासाठी तरतूद करण्यात आलेली नाही अशी वस्तू किंवा असा द्रवपदार्थ अशा नालीत सोडणार, सोडविणार किंवा सोडू देणार नाही ;

(फ) कोणताही कारखाना, भटारखाना, आसवनी, कर्मशाळा किंवा लहान कारखाना यातून किंवा जेथे वाफ, पाणी किंवा यंत्रशक्ती यांचा वापर होत असेल अशा कोणत्याही इमारतीतून किंवा जागेतून कोणतेही गरम पाणी, धूर, वाफ किंवा ज्यामुळे नालीचे नुकसान होईल असा किंवा नालीत वाहून नेण्यात येणाऱ्या मलजलाची विक्री करून किंवा इतर रीतीने विल्हेवाट लावण्याच्या कामी ज्यामुळे प्रतिकूल परिणाम होईल असा किंवा ज्याच्या तापमानामुळे किंवा इतर गुणधर्मामुळे उपद्रव निर्माण होण्याचा संभव असेल असा कोणताही द्रवपदार्थ कोणत्याही नालीत वाहवणार किंवा वाहू देणार नाही.

[४][(२) जो कोणी पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करील, त्याला, अपराधसिद्धीनंतर–

(एक) पहिल्या अपराधाबद्दल, तीनशे रुपयांपर्यंत वाढवता येईल एवढ्या द्रव्यदंडाची; आणि

(दोन) दुसऱ्या व त्यानंतरच्या प्रत्येक अपराधाबद्दल एक हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल एवढ्या दंडाची किंवा सहा महिन्यांपर्यंत वाढवता येईल एवढ्या कैदेची शिक्षा किंवा दोन्ही शिक्षा देण्यात येतील.]

आयुक्तास या प्रकरणाखाली कोणत्याही व्यक्तीस सामान केव्हा पुरविता येईल व तिच्यावतीने काम केव्हा करता येईल.

**२५९.** या प्रकरणाच्या कोणत्याही तरतुदींखाली ज्या व्यक्तीस कोणतेही सामान किंवा खिळण्या पुरवण्यास किंवा कोणतेही काम करण्यास फर्मावले असेल अशा कोणत्याही व्यक्तीने लेखी विनंती केली असता, आयुक्तास, अशा व्यक्तीच्या वतीने, आवश्यक ते सामान किंवा खिळण्या पुरवता येतील किंवा आवश्यक ते काम करण्याची तजवीज करता येईल. मात्र, उक्त व्यक्तीने उक्त सामान, खिळण्या आणि काम यांच्या खर्चासाठी आयुक्ताच्या मते पुरेशी होईल एवढी रक्कम अनामत म्हणून सर्वप्रथम दिलेली असल्याखेरीज आयुक्त कलम ४९३ किंवा ४९५ याच्या तरतुदी ज्या प्रकरणी लागू होणार नाहीत अशा कोणत्याही प्रकरणी उपरोक्त गोष्टी करणार नाही.

---

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३२(२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९१८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ९(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ९(ब) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[४] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३६ अन्वये पोटकलम (२) जादा दाखल करण्यात आले.

(२) [1][* * * * *]

[2][**२५९अ.** (१) कोणतीही व्यक्ती, या प्रकरणामध्ये वर्णन केलेले कोणतेही काम लायसनदार नळकारागिराव्यतिरिक्त इतर व्यक्तीस करू देणार नाही : लायसनदार नळकारागिराने काम करणे; नाली म्हणून उपयोग करण्यास परवानगी देणे.

[3][परंतु, जर आयुक्ताच्या मते हे काम नगण्य असेल तर, त्यास लायसनदार नळकारागिराव्यतिरिक्त इतर व्यक्तीने असे काम करण्यासंबंधी लेखी परवानगी देता येईल.]

(२) असे कोणतेही काम करण्याकरिता लायसनदार नळकारागिरास जी व्यक्ती कामावर ठेवील अशी प्रत्येक व्यक्ती, तसे करणे आवश्यक असल्यास, अशा नळकारागिराचे नाव आयुक्तास कळवील.

(३) अशी प्रत्येक व्यक्ती असे कोणतेही काम पुरे झाल्यापासून एक महिन्याच्या आत आणि ते काम किंवा त्याचा कोणताही भागांश बुजवण्यास किंवा झाकण्यास परवानगी देण्यापूर्वी, असे काम पूर्ण झाल्याची लेखी नोटीस आयुक्ताकडे त्याच्या कार्यालयात सुपूर्द करील किंवा पाठवील किंवा सूपुर्द करण्याची किंवा पाठवण्याची व्यवस्था करील आणि ज्या लायसनदार नळकारागिराने ते काम केलेले असेल त्या लायसनदार नळकारागिराने सही केलेले व अनुसूचीच्या नमुन्यात असलेले प्रमाणपत्र ती व्यक्ती अशा नोटिशीस जोडील, आणि अशा नळकारागिरास, त्याने काम पूर्ण केल्यावर व त्यास कामावर ठेवणाऱ्या व्यक्तीने मागणी केल्यावर ताबडतोब अशा प्रमाणपत्रावर सही करणे व असे प्रमाणपत्र अशा व्यक्तीला देणे या अन्वये आवश्यक करण्यात येत आहे आणि ती व्यक्ती अशा कामांचे निरीक्षण करण्याकरिता आयुक्तास आवश्यक त्या सर्व सुविधा देईल :

परंतु—

(अ) काम पूर्ण झाल्याची नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत असे निरीक्षण करण्यात येईल ; आणि

(ब) आयुक्तास, असे निरीक्षण केल्यापासून सात दिवसांच्या आत, जिच्याकडून काम पूर्ण झाल्याची नोटीस मिळाली असेल अशा व्यक्तीला संबोधून लेखी पत्र लिहून व ते अशा नोटिशीत नमूद केलेल्या तिच्या पत्त्यावर पाठवून, किंवा अशा पत्त्याच्या अभावी, ज्या जागेत असे काम करण्यात आले असेल त्या जागेतील ठळक ठिकाणी चिकटवून त्याअन्वये—

(एक) असे काम बुजवण्यास किंवा झाकण्यास परवानगी देता येईल;

(दोन) असे काम बुजवण्यापूर्वी किंवा झाकण्यापूर्वी, ज्या कोणत्याही विशिष्ट बाबतीत ते काम आयुक्ताने पूर्वी दिलेल्या फर्मावणीअनुसार नसेल किंवा त्यामुळे या अधिनियमाच्या किंवा या अधिनियमाखाली केलेल्या उपविधीच्या काही तरतुदींचे उल्लंघन होत असेल अशा कोणत्याही विशिष्ट बाबतीत ते काम आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने सुधारले पाहिजे असे फर्मावता येईल.

(४) कोणतीही व्यक्ती, असे कोणतेही काम नाली म्हणून किंवा नालीचा भाग म्हणून वापरण्यासाठी—

(अ) पोट-कलम (३) चे परंतुक (ब) यात निर्दिष्ट केलेली परवानगी मिळेपर्यंत, अथवा

(ब) काम पूर्ण झाल्याची नोटीस मिळाल्यानंतर चौदा दिवसांपर्यंत आयुक्तास पूर्वोक्तप्रमाणे असे काम बुजवण्याची किंवा झाकण्याची परवानगी त्याने नाकारली असल्याचे कळवण्यात कसूर केली असेल तोपर्यंत ; परवानगी देणार नाही.]

---

[1] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३५ अन्वये पोट-कलम (२) निरसित करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ३६ अन्वये कलम २५९अ समाविष्ट करण्यात आले.

[3] सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२, कलम ११ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

या प्रकरणाखाली करावयाची विवक्षित कामे संबंधित व्यक्तींनी करण्याचा पर्याय न ठेवता ती आयुक्तास करता येतील.

**२६०.** (१) आयुक्तास, त्यास योग्य वाटल्यास, [1][या प्रकरणात] वर्णन केलेले कोणतेही काम, ते अन्यथा ज्या कोणत्याही व्यक्तीस करावे लागले असते तिला सर्वप्रथम ते करण्याचा पर्याय न देता आपल्या स्वतःच्या आदेशानुसार महानगरपालिकेमार्फत किंवा इतर अभिकर्त्यांमार्फत करवून घेता येईल.

अशा बाबतीतील खर्च कोणी द्यावा.

(२) याप्रमाणे केलेल्या कोणत्याही कामाचा खर्च, असे काम महानगरपालिका निधीतून खर्च करून करण्यात यावे अशी महानगरपालिकेने सर्वसाधारण किंवा विशेष आदेश देऊन किंवा ठराव संमत करून मंजुरी दिली नसल्यास, पूर्वोक्त व्यक्ती देईल आणि अशी मंजुरी देण्यास महानगरपालिकेस याअन्वये अधिकार प्रदान करण्यात येत आहे.

## प्रकरण दहा

## **पाणीपुरवठा**

### **महानगरपालिका जलदायव्यवस्था बांधणे व त्यांचे परिरक्षण करणे**

व्याख्या.

[2][**२६०अ.** विषयात किंवा संदर्भात प्रतिकूल असे काहीही नसेल तर, या प्रकरणात—

(अ) "संक्रमण नळ" म्हणजे, महानगरपालिकेच्या मुख्य नळापासून महानगरपालिकेच्या थोप तोटीपर्यंत जाणारा नळ आणि या संज्ञेत महानगरपालिका थोप तोटीचा समावेश आहे;

(ब) "उपभोक्ता" म्हणजे, जी व्यक्ती महानगरपालिका जलदायव्यवस्थेपासून मिळणारे पाणी वापरत असेल किंवा ते जिला पुरवण्यात येत असेल किंवा जिच्या अर्जावरून असे पाणी पुरवण्यात येत असेल अशी कोणतीही व्यक्ती आणि त्यात, महानगरपालिका जलदायव्यवस्थेपासून पुरवण्यात आलेल्या पाण्याबद्दल पाणी कर किंवा कोणतीही रक्कम देण्यास या अधिनियमाच्या तरतुदीखाली महानगरपालिकेला दायी असलेल्या कोणत्याही व्यक्तीचा समावेश आहे;

(क) "उपभोक्त्याचा नळ" म्हणजे, कोणत्याही महानगरपालिका जलदायव्यवस्थेपासून पाण्याच्या पुरवठ्याच्या संबंधात वापरलेला आणि महानगरपालिकेची मालमत्ता नसेल असा नळ;

(ड) "वितरण नळ" म्हणजे, महानगरपालिकेच्या मुख्य नळाच्या पाण्याच्या दाबाच्या अधीन नसलेला कोणताही नळ;

(ई) "खिळणी" या संज्ञेत नळ, युग्मन, विस्फार, शाखा, वळण, थोप, मायणी (फेरुल), थोप तोटी, सांडवणी तोटी, स्कंद तोटी, स्तंभ तोटी, गोलक तोटी, कंदुक तोटी, बाष्पक पंप, मीटर, नळखांब आणि महानगरपालिकेने पुरवलेले पाणी वाहून नेण्याच्या किंवा साठवण्याच्या प्रयोजनासाठी वापरलेला कोणताही इतर उपकरण संच अथवा वस्तू यांचा समावेश आहे;

(फ) "महानगरपालिका थोप तोटी" म्हणजे, महानगरपालिकेच्या मुख्य नळापासून होणाऱ्या पाण्याच्या पुरवठ्यावर नियंत्रण ठेवणारी थोप तोटी;

---

[1] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३७ अन्वये मूळ शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[2] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम २१ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

(ग) "पुरवठा नळ" म्हणजे, महानगरपालिका थोपतोटीपासून, कोणतीही साठवण टाकी असल्यास तिच्या गोलक तोटीपर्यंत जाणारा नळ व महानगरपालिकेच्या मुख्य नळाच्या पाण्याच्या दाबाच्या अधीन असलेला कोणताही नळ.]

**२६१.** [१][बृहन्मुंबईला] सार्वजनिक वा खाजगी प्रयोजनासाठी योग्य आणि पुरेसा पाणीपुरवठा करण्याच्या प्रयोजनासाठी आयुक्तास, महानगरपालिकेने याबाबत त्यास प्राधिकृत केले असेल तेव्हा पुढील गोष्टी करता येतील :— शहराला पाणीपुरवठा करण्याबाबत सर्वसाधारण अधिकार.

(अ) [१][बृहन्मुंबईत] किंवा [१][बृहन्मुंबईबाहेर] जलदायव्यवस्था बांधणे व तिचे परिरक्षण करणे आणि आवश्यक अशी कोणतीही इतर कृत्ये करणे;

[२][(अअ) महानगरपालिका जलदायव्यवस्थेचा भाग म्हणून, कोणत्याही जमिनीखाली—मग अशी जमीन कोणाहीमध्ये निहित असो—पाणी वाहून नेण्यासाठी बोगदे बांधणे व त्यांचे परिरक्षण करणे व इतर संबद्ध बांधकामे हाती घेणे;]

(ब) [१][बृहन्मुंबईत] किंवा [१][बृहन्मुंबईबाहेर] कोणतीही जलदायव्यवस्था किंवा कोणतेही पाणी किंवा पाणी साठवण्याचा किंवा ते घेण्याचा किंवा नेण्याचा हक्क खरेदी करणे किंवा पट्ट्याने घेणे;

(क) पाणीपुरवठा करण्यासाठी कोणत्याही व्यक्तीबरोबर संव्यवस्था करणे.

**२६२.** आयुक्त, महानगरपालिकेच्या मालकीच्या सर्व जलदायव्यवस्थांचे परिरक्षण करील,— या सर्व जलदायव्यवस्थांचा, या अधिनियमात "महानगरपालिका जलदायव्यवस्था" म्हणून उल्लेख केला आहे—आणि त्या चांगल्या, दुरुस्त आणि कार्यक्षम स्थितीत ठेवील आणि उक्त जलदायव्यवस्थेमध्ये सुधारणा करण्याकरिता उक्त जलदायव्यवस्थांमध्ये जे फेरफार व जो विस्तार करणे आवश्यक व इष्ट असेल असे सर्व फेरफार व विस्तार वेळोवेळी करण्याची व्यवस्था करील. आयुक्ताने महानगरपालिका जलदाय-व्यवस्थेचे व्यवस्थापन करणे व ती दुरुस्त स्थितीत ठेवणे.

**२६३.** (१) आयुक्तास व [३][[४][राज्य] शासनाने] याबाबत कलम २६४ खाली नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीस, कोणत्याही महानगरपालिका जलदायव्यवस्थांतील, त्यांवरील किंवा त्यांच्यासंबंधीच्या कोणत्याही कामाचे निरीक्षण करण्याच्या किंवा दुरुस्ती करण्याच्या किंवा ते पार पाडण्याच्या प्रयोजनासाठी सर्व वाजवी वेळी— महानगरपालिका जलदाय-व्यवस्थांमध्ये प्रवेश करण्याचे अधिकार.

(अ) अशा जलदायव्यवस्थेस लागून असलेल्या किंवा तिच्या जवळपास असलेल्या शहरातील, किंवा शहराबाहेरील कोणत्याही जमिनीवर प्रवेश करता येईल व तिच्यातून जाता येईल—मग अशी जमीन कोणामध्येही निहित झालेली असो;

(ब) अशा कोणत्याही जमिनीमध्ये व तिच्यामधून आवश्यक ते सर्व सामान, हत्यारे व साधने नेता येतील;

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४(१) अन्वये " ग्रेटर बॉम्बे " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम ८ अन्वये खंड (अअ) समाविष्ट करण्यात आला.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये "सरकार" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[१][(क) अशा ज्या कोणत्याही जमिनीखाली पाणी वाहून नेण्यासाठी कोणताही बोगदा खणण्यात, बांधण्यात किंवा ठेवण्यात आला असेल तीत किंवा अशा जमिनीला किंवा बोगद्याला लागून असलेल्या किंवा त्याच्या जवळपास असलेल्या जमिनीत—मग ती खुली असो किंवा तिच्यावर बांधकाम झालेले असो—प्रवेश करता येईल किंवा तिच्यातून जाता येईल आणि आवश्यक त्या साधनांसह अशा बोगद्यांचे निरीक्षण करता येईल व अशा प्रयोजनांस्तव त्यास आवश्यक वाटतील अशी इतर कामे करता येतील.]

(२) या कलमान्वये प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाराचा वापर करताना फारसे नुकसान होऊ दिले जाणार नाही; आणि उक्त अधिकारांपैकी कोणत्याही अधिकाराचा वापर करताना जे कोणतेही नुकसान होईल त्याबद्दल आयुक्त किंवा [२][[३][राज्य] शासनाने] कलम २६४ खाली नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीने असे नुकसान केले असेल तर, त्याबद्दल [२][[३][राज्य] शासन] भरपाई देईल.

[३][राज्य] शासनाने नेमलेल्या व्यक्तींनी महानगरपालिका जलदायव्यवस्थेचे निरीक्षण करणे.

**२६४.** [२][[३][राज्य] शासनाने] याबाबत नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीस सर्व वाजवी वेळी कोणत्याही महानगरपालिका जलदायव्यवस्थेत प्रवेश करण्याची व तिचे निरीक्षण करण्याची मोकळीक असेल.

पाण्याचे मुख्य नळ नेणे, बोगदे बांधणे, इत्यादीसंबंधीचे अधिकार.

[४][**२६५.** [५][बृहन्मुंबईमध्ये], नालीची व जलनिस्सारणाची बांधकामे, तसेच कोणत्याही जमिनीखाली बोगद्यांची आणि इतर संबंधित कामे पार पाडण्यासाठी, त्यांचे बांधकाम, परिरक्षण, नवीकरण, दुरुस्ती करण्याकरिता, यात याआधी प्रकरण नऊमध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदींअनुसार आयुक्तास जे अधिकार असतील व तो ज्या निर्बंधाच्या अधीन असेल तेच अधिकार त्याला [५][बृहन्मुंबईत] किंवा [५][बृहन्मुंबईबाहेर] पाण्याचे मुख्य नळ, नळ व जलवाहिन्या नेण्याकरिता, त्यांचे नवीकरण व दुरुस्ती करण्यासाठी व कोणत्याही जमिनीखाली बोगदे बांधण्यासाठी व त्यांची देखभाल करण्यासाठी किंवा इतर संबंधित कामे हाती घेण्यासाठी असतील व त्यासाठी तो त्याच निर्बंधाच्या अधीन असेल :

परंतु, आयुक्त, बोगद्याचे खोदकाम करणे, तो नेणे, त्यांचे बांधकाम करणे, त्यांचे परिरक्षण करणे व दुरुस्ती करणे किंवा कोणतीही इतर संबंधित कामे करणे, या संबंधात या कलमाखाली असलेल्या अधिकारांचा वापर राज्य शासनाच्या पूर्व मान्यतेने करील.]

अग्निशामक नळखांबांची तरतूद करणे.

**२६६.** आयुक्त, आगीच्या प्रसंगी पाणीपुरवठा करण्याकरिता अग्निशामक नळखांब व सर्व आवश्यक कामे, यंत्रसामग्री व सहाय्य यांची तरतूद करण्याची व तिचे परिरक्षण करण्याची तजवीज करील; आणि असे अग्निशामक नळखांब कोठे आहेत ते दर्शवण्यासाठी इमारतींवर व भिंतींवर किंवा सडकेमध्ये इतर कोणत्याही ठळक रीतीने अशा नळखांबाजवळ शब्द किंवा खुणा रंगवून

---

[१] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम ९ अन्वये खंड (क) समाविष्ट करण्यात आला.

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये "सरकार" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम १० अन्वये मूळ कलमाऐवजी कलम २६५ दाखल करण्यात आले.

[५] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

किंवा करवून घेईल, आणि, [१][बृहन्मुंबईत] ज्या जागी महानगरपालिकेचा आगीचा बंब ठेवला असेल त्या प्रत्येक जागी अग्निशामक नळाची किल्ली ठेवण्याची तजवीज करील व पूर्वोक्त प्रयोजनासाठी त्यास इष्ट वाटतील अशा इतर गोष्टीही करील.

पाणीपुरवठ्याच्या साधनास हानिकारक ठरतील अशा इमारती बांधण्यास व अशा इतर कृती करण्यास मनाई.

**२६७.** (१) महानगरपालिकेची मंजुरी असेल ते खेरीज करून एरव्ही, आणि विहार जलदायव्यवस्थेच्या बाबतीत [२][[३][राज्य] शासनाची] मंजुरी असेल ते खेरीज करून एरव्ही किंवा कलम २६२ यांच्या प्रयोजनाकरिता, आयुक्ताच्या प्राधिकाराखाली असेल ते खेरीज करून एरव्ही कोणतीही व्यक्ती—

(अ) ज्यामधून कोणत्याही महानगरपालिका जलदायव्यवस्थेस पाणीपुरवठा केला जात असेल अशा कोणत्याही सरोवराच्या किंवा जलाशयाच्या जलविभाजकाच्या हद्दीमध्ये कोणत्याही प्रयोजनाकरिता कोणतीही इमारत उभारणार नाही;

(ब) उक्त हद्दीमध्ये आधीच अस्तित्वात असलेली कोणतीही इमारत वाढवणार नाही, तीत फेरफार करणार नाही किंवा तिचा उपयोग त्यापूर्वी ज्या प्रयोजनासाठी करण्यात येत होता त्या प्रयोजनापेक्षा निराळ्या अशा प्रयोजनासाठी करणार नाही;

(क) ज्यायोगे असे कोणतेही सरोवर किंवा जलाशय किंवा त्याचा कोणताही भागांश दूषित होईल किंवा अशा कोणत्याही सरोवरातील, तलावातील किंवा जलाशयातील पाणी दूषित होईल किंवा कमी आरोग्यप्रद होईल, अशा कोणत्याही रीतीने उक्त हद्दीमध्ये वस्तुनिर्मिती करण्याची, उदिमाची किंवा शेतीची कोणतीही क्रिया करणार नाही किंवा कोणतेही कृत्य करणार नाही.

(२) या कलमाच्या प्रयोजनाकरिता विहार तलावाच्या पाणलोटाच्या हद्दी या राज्यपालांच्या आणि महानगरपालिकेच्या सदस्यांच्या सह्यांद्वारे अधिप्रमाणित केलेल्या व मुंबई सरकारच्या सचिवांच्या कार्यालयात ठेवलेल्या नकाशा "ब" यात सीमांकित केलेल्या हद्दी आहेत, असे मानण्यात येईल.

महानगरपालिकेच्या पाण्याच्या प्रमुख नळावर परवानगीवाचून इमारती, वगैरे न उभारणे.

**२६८.** (१) आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून, महानगरपालिकेच्या कोणत्याही पाण्याच्या प्रमुख नळावर कोणतीही इमारत, भिंत किंवा कोणत्याही प्रकारचे बांधकाम नव्याने उभारता येणार नाही किंवा कोणतीही सडक किंवा रूळमार्ग बांधण्यात येणार नाही.

(२) कोणतीही इमारत, भिंत किंवा बांधकाम याप्रमाणे उभारले असेल किंवा कोणतीही सडक किंवा रूळमार्ग याप्रमाणे बांधला असेल तर, आयुक्तास [४][स्थायी समितीच्या] मान्यतेने, तो काढून टाकण्याची किंवा त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे अन्यथा कार्यवाही करण्याची तजवीज करता येईल आणि त्यामुळे झालेला खर्च, उत्क्रमण करणारी व्यक्ती देईल.

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(१) अन्वये "ग्रेटर बॉम्बे" या शब्दाऐवजी हा शब्द त्याच्या व्याकरणिक रुपभेदासह दाखल करण्यात आला.

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये "सरकार" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १०४ अन्वये "महापौरासह परिषदेच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## निःशुल्क सार्वजनिक पाणीपुरवठा

पिण्याच्या पाण्याची सार्वजनिक कारंजी वगैरे महानगर-पालिकेमध्ये निहित असणे.

**२६९.** (१) शहरातील रहिवाशांना निःशुल्क वापरण्यासाठी पाणीपुरवठा करण्याकरिता असलेली पिण्याच्या पाण्याची सर्व विद्यमान सार्वजनिक कारंजी, तलाव, जलाशय, हौद, पंप, विहिरी, वाहिन्या आणि बांधकामे ही महानगरपालिकेमध्ये निहित असतील व ती आयुक्ताच्या नियंत्रणाखाली असतील.

(२) आयुक्ताला उक्त बांधकामे सुस्थितीत ठेवता येतील व त्यात पाण्याची तरतूद करता येईल, आणि [१][महानगरपालिकेने] याबाबत प्राधिकृत केले असेल तेव्हा, त्यास, शहरातील रहिवाशांना निःशुल्क वापरण्यासाठी पाणीपुरवठा करण्याकरिता अशी कोणतीही इतर बांधकामे बांधता येतील;

(३) परंतु, कोणत्याही रहिवाशाला अशा कोणत्याही जलदायव्यवस्थेतून केवळ [२][व्यक्तिगत किंवा घरगुती वापराकरिताच पाणी नेता येईल; ते त्याला धंद्याच्या किंवा विक्रीच्या प्रयोजनाकरिता नेता येणार नाही], तसेच ते त्याला आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून, पिंपातून, गाडीतून, पखालीतून किंवा मसाकीतून नेता येणार नाही.

(४) आयुक्तास, उक्त कामांपैकी कोणतेही बांधकाम तात्पुरते बंद करता येईल, तसेच त्यास [३][महानगरपालिकेच्या] मंजुरीने उक्त बांधकाम पूर्णतः किंवा अंशतः कायमचे बंद करता येईल.

(५) आयुक्ताने कोणतेही बांधकाम पूर्णतः किंवा अंशतः कायमचे बंद केले तर, त्याचे ठिकाण किंवा याप्रमाणे बंद करण्यात आलेल्या त्याच्या भागांशाचे ठिकाण व त्यांचे साहित्य [४][महानगरपालिकेची] मालमत्ता असल्याप्रमाणे निकालात काढता येईल; परंतु, पूर्णतः किंवा अंशतः कायमचे बंद करण्यात आलेले कोणतेही असे काम एखाद्या खाजगी व्यक्तीने लोकांस दिलेली देणगी असेल तर, उक्त ठिकाण व साहित्य किंवा त्यांची विक्री करून आलेली रक्कम यांचे उपयोजन, तिचे मूल्य अगदीच नगण्य नसेल तर किंवा [४][महानगरपालिकेस] पुरेशा कारणावरून, अन्यथा निदेश देणे योग्य वाटत नसेल तर, अशा व्यक्तींच्या नावाने सार्वजनिक उपयोगाच्या एखाद्या स्थानिक कार्यासाठी किंवा कार्याकडे करण्यात येईल किंवा तिचे उपयोजन [४][महानगरपालिका] व अशा व्यक्तीचे वारस किंवा इतर कोणतेही प्रतिनिधी असल्यास, त्यांनी मान्य केलेल्या अशा कोणत्याही स्थानिक कार्यासाठी किंवा कार्याकडे करण्यात येईल.

पिण्याच्या पाण्याची सार्वजनिक कारंजी, वगैरे विशिष्ट प्रयोजनासाठी अलग राखून ठेवता येतील.

**२७०.** (१) आयुक्तास, पाणीपुरवठ्याच्या कामांपैकी प्रत्येक काम व त्यातील पाणी त्यास योग्य वाटेल अशा प्रयोजनासाठीच फक्त लोकांनी वापरण्याकरिता नेमून देता येईल व अलग राखून ठेवता येईल. आणि तो, असे प्रत्येक काम ज्या प्रयोजनासाठी याप्रमाणे नेमून देण्यात आले असेल व अलग राखून ठेवण्यात आले असेल ते प्रयोजन अशा कामावरील किंवा त्याजवळील एखाद्या ठळक जागी नोटीस लावून दर्शवण्याची तजवीज करील.

(२) कोणतीही व्यक्ती असे कोणतेही काम ज्या प्रयोजनासाठी याप्रमाणे नेमून देण्यात आले असेल किंवा अलग राखून ठेवण्यात आले असेल त्या प्रयोजनाहून अन्य कोणत्याही प्रयोजनासाठी अशा कामाचा किंवा त्यातील कोणत्याही पाण्याचा उपयोग करणार नाही.

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १०५(अ) अन्वये "महापौरासह परिषदेने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम २२ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १०५(ब) अन्वये "महापौरासह परिषदेच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १०५(क) अन्वये "महापौरासह परिषद" या शब्दप्रयोगाऐवजी हा शब्दप्रयोग त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

## खाजगी पाणीपुरवठा

१९५३ चा मुंबई ६४. [१][**२७०अ.** मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९५३, अंमलात आल्याच्या तारखेनंतर बांधलेल्या किंवा पुन्हा बांधलेल्या कोणत्याही परिवास्तूच्या किंवा तिच्या भागाच्या बाबतीत परिवास्तूचा भोगवटा करण्याचा किंवा ती वापरण्याचा इरादा असलेल्या व्यक्तींसाठी शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यासंबंधी त्या परिवास्तूत किंवा तिच्यापासून वाजवी अंतरावर तरतूद केलेली आहे अशा आशयाचे प्रमाणपत्र आयुक्ताकडून मिळेतोपर्यंत किंवा [२][बृहन्मुंबईच्या] ज्या कोणत्याही भागांशात कलम १४१ खाली आयुक्ताने जाहीर नोटीस दिली असेल त्या भागात ती परिवास्तू असेल तेव्हा, त्या परिवास्तूस महानगरपालिका जलदायव्यवस्थेतून शुद्ध पाण्याचा पुरवठा करण्यासंबंधी तरतूद केलेली आहे अशा आशयाचे प्रमाणपत्र आयुक्ताकडून मिळेतोपर्यंत कोणतीही व्यक्ती अशा परिवास्तूचा किंवा तिच्या भागाचा भोगवटा करणार नाही किंवा भोगवटा करण्याची परवानगी देणार नाही किंवा ती परिवास्तू किंवा तिचा भाग वापरणार नाही किंवा वापरण्याची परवानगी देणार नाही.] पुरेसा पाणीपुरवठा असल्यासंबंधी आयुक्ताने प्रमाणपत्र दिलेले असल्याखेरीज परिवास्तूचा भोगवटा न करणे.

**२७१.** (१) [३][महानगरपालिका जलदायव्यवस्थेतून] कोणत्याही परिवास्तूस खाजगी रीतीने पाणीपुरवठा करण्याच्या बाबतीत अशा परिवास्तूच्या मालकास किंवा उक्त परिवास्तूवरील मालमत्ता कर भरण्याचे प्रथमतः दायित्व असलेल्या व्यक्तीस लेखी अर्ज केल्यावरून असेल ते खेरीजकरून एरव्ही किंवा तिने लेखी अनुमतीने केले असेल ते खेरीज करून एरव्ही [३][पुरवठा नळ] [३][अशा जलदायव्यवस्थेशी जोडता येणार नाहीत:] खाजगी पाणीपुरवठा करण्याकरिता अर्ज कोणाकडून मिळावा.

[४][परंतु, कोणत्याही परिवास्तूंच्या बाबतीत, मालक किंवा मालमत्ता कर देण्याचे प्रथमतः दायित्व असलेली व्यक्ती, वाजवी कालावधीत, असा अर्ज करण्यात किंवा आपली अनुमती देण्यात कसूर करील किंवा तसे करण्याचे नाकारील त्याबाबतीत, अशा परिवास्तूंच्या भोगवटादाराने आयुक्तास केलेल्या लेखी अर्जावरून, आवश्यक ती चौकशी केल्यानंतर व पुरवठा करणारे नळ जोडण्यासंबंधातील परिव्यय देण्यात आल्यावर व आयुक्तास लादणे योग्य वाटेल अशा (पाण्यासंबंधीचे कर व आकार देण्यासंबंधातील शर्ती धरून) इतर शर्तींच्या अधीनतेने अशा परिवास्तूंना असा पाणीपुरवठा करणारे नळ अशा जलदायव्यवस्थेशी जोडता येतील.]

[५][(२) मात्र, [२][बृहन्मुंबईच्या] ज्या भागांशात कलम १४१, खंड (ब) खाली आयुक्ताने जाहीर नोटीस दिलेली असेल अशा कोणत्याही भागांशातील कोणत्याही परिवास्तूचा नेहमी भोगवटा करणाऱ्या किंवा उक्त परिवास्तूत कामावर ठेवलेल्या व्यक्तीच्या गरजा भागवण्यास पुरेसा होईल असा स्वच्छ पाण्याचा पुरवठा अशा परिवास्तूला करण्यात येत नाही असे आयुक्तास दिसून आले तर, आयुक्त उक्त परिवास्तूच्या मालकास किंवा त्यावरील मालमत्ता कर भरण्याचे प्रथमतः दायित्व असलेल्या व्यक्तीस लेखी नोटीस देऊन महानगरपालिका जलदायव्यवस्थेतून पूर्वोक्तप्रमाणे पुरवण्यात येणारे पाणी पुरेशा प्रमाणात मिळवण्यास आणि पुरवठा करणारे नळ व वाटप करणारे नळ, हौद व खिळण्या यांची तरतूद करण्यास आणि त्या प्रयोजनासाठी आयुक्तांच्या मते आवश्यक असतील अशी सर्व कामे करण्यास फर्मावील.] विवक्षित बाबतीत खाजगी रीतीने पुरवण्यात येणारे पाणी मिळवण्यास आयुक्त, मालकांना फर्मावू शकेल.

---

[१] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४, कलम ११ अन्वये कलम २७०अ समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(१) अन्वये "ग्रेटर बॉम्बे" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम २३(अ) अन्वये हे शब्द बदली दाखल करण्यात आले.

[४] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१, कलम १५ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[५] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम २३(ब) अन्वये मूळ पोटकलमाऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

महानगरपालिका जलदाय-व्यवस्थेशी संयोजन करणे व त्याचे नवीकरण करणे.

[1][**२७२.** (१) कोणत्याही महानगरपालिका जलदायव्यवस्थेशी संयोजन करण्याचे किंवा त्याच्या नवीकरणाचे कोणतेही काम—

(अ) आयुक्ताने त्याबाबत अधिकार प्रदान केलेला महानगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी सोडून इतर कोणत्याही व्यक्तीस करता येणार नाही; आणि

(ब) पोट-कलम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेले प्रमाणपत्र देण्यात येईतोपर्यंत करता येणार नाही.

[2][(२) जेव्हा महानगरपालिका जलदायव्यवस्थेशी नवीन संयोजन करण्याचे काम करण्यात येईल किंवा विद्यमान संयोजनाचे नवीकरण करण्याची आवश्यकता असेल अशा प्रत्येक बाबतीत आवश्यक असतील असे सर्व संक्रमण नळ व [3][त्यावरील] खिळण्या आयुक्ताकडून पुरवण्यात येतील, आणि असे संक्रमण नळ व खिळण्या बसवण्याचे व लावण्याचे काम, आयुक्ताच्या आदेशाखाली महानगरपालिका अभिकरण पार पाडील, आणि अशा सर्व सामानाचा व कामाचा परिव्यय महानगरपालिका निधीतून देण्यात येईल.]

(३) [4][असा प्रत्येक संक्रमण नळ व त्यावरील खिळण्या] महानगरपालिकेमध्ये [4][निहित होतील] आणि त्या महानगरपालिका जलदायव्यवस्था असल्याप्रमाणे महानगरपालिका निधीतून करावयाच्या खर्चाने सुस्थितीत राखण्यात येतील.

[5][(४) महानगरपालिकेचे नसलेले सर्व पुरवठा नळ व वितरणनळ, हौद आणि खिळण्या आयुक्ताने त्याबाबत नेमलेल्या महानगरपालिका अधिकाऱ्याच्या पर्यवेक्षणाखाली व त्याचे समाधान होईल अशा रीतीने बसवण्यात येतील व जोडण्यात येतील आणि असा अधिकारी, असे पुरवठा आणि वितरण नळ, हौद आणि सर्व आवश्यक खिळण्या समाधानकारक रीतीने बसवण्यात व जोडण्यात आल्यावर व सांडपाण्याचा निचरा होण्यासाठी योग्य व पुरेशी व्यवस्था करण्यात आल्यावर कोणताही आकार न घेता आपल्या सहीचे प्रमाणपत्र देईल.]

[5][(५) या कलमाचे उल्लंघन करून, कोणताही पुरवठा नळ किंवा वितरण नळ, हौद किंवा अशा खिळण्या बसवल्या असतील, जोडल्या असतील किंवा त्यात वाढ किंवा फेरफार केला असेल किंवा कोणतेही संयोजन करण्यात आले असेल तर आयुक्ताला [6][स्थायी समितीच्या] पूर्वमान्यतेने, असा पुरवठा नळ किंवा वितरण नळ, हौद, खिळण्या किंवा संयोजन किंवा ज्यामुळे वाढ किंवा फेरफार करण्यात आला आहे ती कामे काढून टाकता येतील व असा नळ, हौद, खिळण्या, अथवा संयोजन व्यवस्थित करता येईल; आणि पुरवठा किंवा असा वितरण नळ, हौद किंवा खिळणी ज्या परिवास्तूत किंवा परिवास्तूला पुरवठा होण्यासाठी बसवण्यात किंवा जोडण्यात आली असेल किंवा त्यात वाढ किंवा फेरफार करण्यात आला असेल किंवा असे संयोजन करण्यात आले असेल त्या परिवास्तूचा मालक व भोगवटादार यांवर, ती व्यवस्थित करण्यासाठी आयुक्ताला आलेला खर्च देण्याचे संयुक्तपणे व पृथकपणे दायित्व असेल.]

---

[1] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३८ अन्वये कलमे २७२ व २७३ यांऐवजी कलमे २७२, २७३ आणि २७३अ दाखल करण्यात आली.

[2] सन १९१८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम १० अन्वये मूळ पोट-कलम (२) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[3] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम २४(अ) अन्वये मूळ शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[4] वरील अधिनियमाच्या कलम २४ (ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] वरील अधिनियमाच्या कलमे २४ (क) आणि (ड) अन्वये मूळ पोटकलमांऐवजी ही पोटकलमे दाखल करण्यात आली.

[6] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १०० अन्वये "प्रभारी सदस्याच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][**२७३.** आयुक्तास, उपभोक्त्याशी करार करून, महानगरपालिकेच्या वतीने उपभोक्त्याचे सर्व किंवा कोणतेही नळ व खिळण्या ताब्यात घेता येतील :

आयुक्तास खाजगी संयोजने ताब्यात घेता येतील.

परंतु, असे कोणतेही नळ किंवा खिळण्या या महानगरपालिकेमध्ये निहित नसलेले केवळ संक्रमण नळ किंवा खिळण्या असतील तर, आयुक्तास, त्यास योग्य वाटल्यास, असा करार न करता ती ताब्यात घेता येतील.

आयुक्त, या कलमाखाली ज्या नळांचा आणि खिळण्यांचा ताबा घेईल असे उपभोक्त्याचे कोणतेही नळ व खिळण्या या त्यानंतर महानगरपालिकेमध्ये निहित होतील आणि त्या महानगरपालिका जलदायव्यवस्था असल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या खर्चाने सुस्थितीत राखण्यात येतील.]

[२][**२७३अ.** आयुक्तास, कोणत्याही महानगरपालिका जलदायव्यवस्थेशी असलेल्या विद्यमान संयोजनाची जागा किंवा उपभोक्त्याच्या कोणत्याही नळाची किंवा त्याच्या खिळण्याची जागा बदलणे इष्ट वाटल्यास, संयोजनांच्या किंवा नळाच्या किंवा खिळणीच्या मालकास आपला तसे करण्याचा इरादा असल्याची चार दिवसांपेक्षा कमी नसतील इतक्या दिवसांची आगाऊ नोटीस दिल्यानंतर, त्यास योग्य वाटेल अशा इतर जागी उक्त संयोजन किंवा उपभोक्त्याचा नळ किंवा खिळणी हलवण्याचा तो निदेश देईल व अशा जागी पुन्हा बसवण्याची किंवा जोडण्याची किंवा त्याच्याऐवजी दुसरे नळ किंवा खिळण्या बसवण्याची व जोडण्याची त्यास तजवीज करता येईल; आणि अशा प्रत्येक प्रकरणी असे सर्व काम महानगरपालिका निधीतून करावयाच्या खर्चाने पार पाडण्यात येईल आणि असे नवीन संयोजन, नळ व खिळण्या त्यानंतर महानगरपालिकेमध्ये निहित होतील आणि महानगरपालिका जलदायव्यवस्था असल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या निधीतून करावयाच्या खर्चाने ती सुस्थितीत राखण्यात येतील.]

संयोजनांची जागा बदलण्याचा आयुक्ताचा अधिकार.

**२७४.** [३][(१) आयुक्तास, जेव्हा जेव्हा त्यास आवश्यक वाटेल तेव्हा तेव्हा, कोणत्याही महानगरपालिका जलदायव्यवस्थेपासून, खाजगी पाणीपुरवठा मिळत असलेल्या कोणत्याही परिवास्तूच्या मालकास लेखी नोटीस देऊन अशा परिवास्तूत, त्यास योग्य वाटेल अशा आकाराचे, सामानाचे, प्रतीचे व वर्णनाचे हौद व खिळण्या उक्त नोटिशीत विहित करण्यात येईल अशा वाजवी कालावधीत व त्यास योग्य वाटेल अशा जागी त्यांच्याजवळ, जाण्याच्या सुरक्षित व सोप्या साधनांसह बसवण्यास फर्मावता येईल.]

जलदाय-व्यवस्थेशी करावयाच्या संयोजनासाठी वापरावयाचे हौद व इतर खिळण्या, वगैरे यासंबंधी तरतुदी.

[४][(१अ) त्याचप्रमाणे आयुक्त, एखाद्या विद्यमान हौदाकडे सहज पोहोचता येईल असे साधन नसल्याचे कलम २७८ खाली तपासणी केल्यानंतर आढळून येईल तेव्हा अशा कोणत्याही हौदाकडे जाण्यासाठी त्यास योग्य वाटेल अशा तऱ्हेची सुरक्षित व सुलभ अशी साधने पुरवण्याविषयी कोणत्याही परिवास्तूच्या मालकास त्याच रीतीने फर्मावू शकेल.]

(२) त्याचप्रमाणे आयुक्त, कोणत्याही महानगरपालिका जलदायव्यवस्थेशी संयोजन करण्याच्या किंवा त्यातून पाणी वाहून नेण्याच्या [५][प्रयोजनाकरिता] वापरावयाचे [६][नळ किंवा खिळण्या] यांचा आकार, सामान, दर्जा, वर्णन व स्थान ही वेळोवेळी विहित करील आणि कोणत्याही व्यक्तीला असे कोणतेही संयोजन किंवा पाणी वाहून नेण्याची अशी व्यवस्था ही, याप्रमाणे विहित करण्यात आली असेल त्याहून अन्य रीतीने करता येणार नाही.

---

[१] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम २५ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २६ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २७ (अ) अन्वये मूळ पोटकलमाऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २७ (ब) अन्वये हे पोटकलम समाविष्ट करण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २७ (क) (दोन) अन्वये "प्रयोजनाकरिता" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम २७ (क) (एक) अन्वये मूळ शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[१][(३) त्याचप्रमाणे आयुक्त, कलम २७८ खाली केलेल्या तपासणीत जे परिणामकारक रीतीने दुरुस्त करता येणार नाहीत इतपत सदोष असल्याचे आढळून आले असतील असे कोणतेही [२][नळ, हौद व खिळण्या] पुनःस्थापित करण्याच्या प्रयोजनाकरिता वापरावयाचे [२][नळ, हौद व खिळण्या] यांचा आकार, सामान, दर्जा व वर्णन विहित करील.]

हौद कुलुपबंद ठेवण्याची तरतूद.

[३][**२७४अ.** (१) आयुक्त, ज्या परिवास्तूत हौदाची सोय करण्यात आली असेल किंवा जिच्या बाबतीत हौदाची सोय करण्याबद्दल आयुक्ताने फर्माविले असेल अशा कोणत्याही परिवास्तूच्या मालकास लेखी नोटिशी अन्वये, आयुक्त अशा नोटिशीत विहित करील अशा नमुन्याच्या, धातूच्या व अशा प्रतीच्या कुलुप-किल्लीची तरतूद उक्त हौदासाठी करण्यास फर्मावू शकेल. त्याचप्रमाणे त्यास कलम २७८ खाली केलेल्या तपासणीत असे कुलूप किंवा किल्ली सदोष आढळून आल्यास ती बदलण्यास फर्माविता येईल.

(२) याप्रमाणे जिच्या बाबतीत कुलूपाची तरतूद केलेली आहे असा प्रत्येक हौद कायम कुलूपबंद ठेवण्यात येईल आणि नंतर त्याची किल्ली आयुक्ताकडे सुपूर्द करण्यात येईल.]

परिवास्तूच्या मालकाने किंवा भोगवटादाराने संक्रमण नळ, वगैरे चांगल्या स्थितीत ठेवणे.

**२७५.** [४][(१)] कोणत्याही महानगरपालिका जलदाय व्यवस्थेमधून खाजगी पाणीपुरवठा करण्यात येत असलेल्या कोणत्याही परिवास्तूच्या मालकाने किंवा भोगवटादाराने उक्त जलदाय व्यवस्थेमधून अशा परिवास्तूकडे पाणी वाहून नेण्यासाठी [५][असलेला प्रत्येक पुरवठा नळ व वितरण नळ] आाणि महानगरपालिका मीटर नसेल असे पाणी मोजण्याचे प्रत्येक मीटर व [५][प्रत्येक हौद आणि अशा कोणत्याही नळातील किंवा नळाला जोडलेली खिळणी] संपूर्णपणे स्वच्छ ठेवणे आणि पाणी वाया जाऊ नये म्हणून परिणामकारक रीतीने प्रतिबंध करण्यासाठी, चांगल्या स्थितीत ठेवणे व राखणे हे त्यांचे कर्तव्य असेल.

[६][(२) जेव्हा कोणत्याही परिवास्तूच्या भोगवटादारावर कलम २७८, पोट-कलम (२) खाली नोटीस बजावली गेलेली असेल तेव्हा त्यास, जिला आपले भाडे देण्यास तो जबाबदार असेल त्या व्यक्तीला [७][(तीन)] दिवसांची लेखी नोटीस देऊन, स्वतःच दुरुस्त्या करवून घेता येतील आणि अशा प्रसंगी त्यास, कलम २७८, पोट-कलम (२) खाली बजावलेल्या नोटिशीचे अनुपालन करताना त्याला आलेला प्रत्यक्ष खर्च अशा व्यक्तीला त्यांच्याकडून देय असलेल्या [५][किंवा देय होईल] अशा कोणत्याही भाड्यातून वजा करण्याचा हक्क असेल :

परंतु, दिनांक १ एप्रिल १९१८ पूर्वी करून देण्यात आलेल्या भाडेपट्ट्यातील पक्षकारांच्या दायित्वांना या कलमातील कोणत्याही तरतुदींमुळे बाध येणार नाही.]

---

[१] सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम ११ (ब) अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम २७(ड) अन्वये मूळ शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २८ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९१८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम १२ अन्वये कलम २७५ ला कलम २७५ चे पोट-कलम (१) असा क्रमांक देण्यात आला.

[५] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम २९(अ) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९१८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम १२ अन्वये हे पोट-कलम जादा दाखल करण्यात आले.

[७] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम २९(ब) अन्वये मूळ शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

**२७६.** (१) जेव्हा मोजणी करून पाणी पुरवण्यात येत असेल तेव्हा आयुक्तास, एकतर मीटरची तरतूद करून त्याबद्दल ग्राहकांवर याबाबत स्थायी समिती वेळोवेळी विहित करील असे भाडे आकारता येईल किंवा आयुक्त या प्रयोजनाकरिता मान्य करील अशा आकाराचे, सामानाचे व वर्णनाचे असे ग्राहकांचे स्वतः मीटर बसवण्याची ग्राहकास परवानगी देईल :

मोजणी करून पाणी पुरवण्यात येत असेल तेव्हा मीटरची तरतूद करणे.

[१][परंतु , जर असा ग्राहक हा कोणत्याही परिवास्तूचा भोगवटादार असेल तर आयुक्त विहित करील अशा शर्तींचे त्याने अनुपालन केलेले असल्याखेरीज त्याच्यासाठी कोणत्याही मीटरची तरतूद केली जाणार नाही किंवा त्याला आपले स्वतःचे मीटर बसवण्याची परवानगी दिली जाणार नाही.]

(२) आयुक्त कोणत्याही व्यक्तीला भाड्याने दिलेले सर्व मीटर व पाणी मोजण्याची इतर उपकरणे, पाणीपुरवठ्याची अचूक नोंद होण्यासाठी सर्व वेळी योग्य स्थितीत ठेवील आणि असे करण्यात त्याने कसूर केल्यास, अशा व्यक्तीवर, अशी कसूर करण्याचे चालू राहील त्या अवधीत, त्याबद्दल भाडे भरण्याचे दायित्व असणार नाही.

**२७७.** मोजणी करून पाणी पुरवण्यात येत असेल तेव्हा, मीटरवर किंवा पाणी मोजण्याच्या इतर उपकरणांवर झालेली नोंद ही वापरलेल्या पाण्याच्या परिमाणासंबंधी प्रथमदर्शनी पुरावा असेल.

मीटरची नोंदणी हा पुरावा असणे.

## निरीक्षण

**२७८.** (१) आयुक्तास, महानगरपालिका खाजगी पाणीपुरवठा करीत असलेल्या कोणत्याही परिवास्तूंचे पुढील प्रयोजनांकरिता निरीक्षण करता येईलः—

आयुक्त, वगैरे यांना मीटर, संक्रमण नळ, वगैरे यांची तपासणी करण्यासाठी परिवास्तूंचे निरीक्षण करता येईल.

(अ) पाणी मोजण्याचे कोणतेही मीटर काढून टाकणे, त्याची चाचणी घेणे, त्याची तपासणी करणे व पुनःस्थापन करणे; अथवा

[२][(ब) कोणताही पुरवठा नळ किंवा वितरण नळ, हौद, कुलूप किंवा खिळणी यांची तपासणी करणे; अथवा]

(क) पाणी वाया जात आहे किंवा त्याचा गैरवापर करण्यात येत आहे किंवा कसे हे पाहणे.

[३][(२) आयुक्त, लेखी नोटिशीद्वारे, परिवास्तूच्या मालकास किंवा भोगवटादारास जे त्यास भाड्याने दिलेले महानगरपालिका मीटर नसेल अशा कोणत्याही मीटरमध्ये किंवा पुरवठा नळात किंवा वितरण नळात, हौदात, कुलपात किंवा खिळणीत जो कोणताही दोष आढळून येईल तो काढून टाकण्यास किंवा ती साफ करण्यास फर्मावू शकेल.]

## खाजगी पाणीपुरवठा तोडून टाकणे

**२७९.** (१) आयुक्तास, [४]* * * * खालीलपैकी कोणत्याही बाबतीत कोणतीही महानगरपालिका जलदायव्यवस्था आणि जिला महानगरपालिका खाजगी पाणीपुरवठा करीत असेल अशी कोणतीही परिवास्तू यांच्यामधील संयोजन तोडून टाकता येईल किंवा अशा परिवास्तूंचे पाणी बंद करता येईल :—

खाजगी पाणीपुरवठा तोडून टाकण्याचा किंवा पाणी बंद करण्याचा अधिकार.

(अ) पाणी कराचा कोणताही हप्ता किंवा पाण्याबद्दल [५][किंवा मीटरच्या भाड्याबद्दल] [६][किंवा कलम २७२, २७६ किंवा २८७अ यांच्या तरतुदीखाली किंवा त्यांच्या सामर्थ्याने केलेल्या कोणत्याही कामाच्या खर्चाबद्दल] येणे असलेल्या कोणत्याही रकमेचा कोणताही हप्ता,

---

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६२, कलम ६ अन्वये हे परंतुक समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३० (अ) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ३०(ब) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[४] सन १९१३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम २ अन्वये " स्थायी समितीच्या मंजुरीने " हा मजकूर निरसित करण्यात आला.

[५] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३१(एक) (अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[६] सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम १३(अ) (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

अशा कराबद्दल किंवा रकमेबद्दल [१][बिलाच्या दिनांकानंतर साठ दिवसांच्या आत] [२][देण्यात] कसूर करण्यात आली तर त्याबाबतीत ;

[३][(ब) जर परिवास्तूचा मालक, कलम २७४, पोट-कलम (१) किंवा (१अ) खाली किंवा कलम २७४अ खाली दिलेल्या कोणत्याही नोटिशीमध्ये याबाबत विहित केलेल्या कालावधीच्या आत, कोणताही हौद, खिळणी, कुलूप किंवा किल्ली किंवा हौदाकडे जाण्याची कोणतीही साधने यांची तरतूद करण्यासंबंधी आयुक्ताने त्यास केलेल्या कोणत्याही फर्मावणीचे अनुपालन करण्यास कसूर करील तर त्याबाबतीत ;

(क) जर परिवास्तूचा मालक किंवा तिचा भोगवटादार हा, कलम २७८, पोट-कलम (२) खाली दिलेल्या केणत्याही नोटिशीमध्ये याबाबत विहित केलेल्या कालावधीत, अशा नोटिशीच्या अटींचे अनुपालन करण्यास कसूर करील किंवा कलम २७४, पोट-कलम (३) खाली विहित केलेल्या प्रकारच्या वस्तू वापरण्यात कसूर करील तर त्याबाबतीत ;]

(ड) जर परिवास्तूचा मालक किंवा तिचा भोगवटादार, पुढील गोष्टी करण्यापासून परावृत्त राहण्याविषयी ज्याअन्वये फर्माविण्यात आले असेल अशी लेखी नोटीस आयुक्ताकडून मिळाल्यानंतर,—

(एक) या अधिनियमाखाली केलेल्या कोणत्याही उपविधीचे किंवा कलम १६९, पोट-कलम (२) खाली विहित केलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करून पाणी वापरण्याचे किंवा वापरण्यास परवानगी देण्याचे चालू ठेवील त्याबाबतीत ;

(दोन) जेव्हा मोजणी न करता पाण्याबद्दल आकार देण्यात येत असेल तेव्हा, ज्या परिवास्तूसंबंधाने पाणीकर देण्यात येतो अशा परिवास्तूत न राहणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस अशा मालकाच्या किंवा भोगवटादारांच्या परिवास्तूतून महानगरपालिका जलव्यवस्थेपासून मिळणारे पाणी नेऊ देईल त्याबाबतीत ;

[४][(ई) परिवास्तूचा मालक किंवा भोगवटादार हा, अशा परिवास्तूतील कोणतेही मीटर, नळ, हौद किंवा खिळणी किंवा त्याचे कुलूप यांची बुद्धिपुरस्सर किंवा हयगयीने हानी किंवा नुकसान करील त्याबाबतीत ;]

[५][(फ) परिवास्तूचा मालक किंवा भोगवटादार, कलम २८७ब, पोट-कलम (२) खाली लायसनदार नळकारागिराचे नाव सुचवण्याबद्दल आयुक्ताने त्यास दिलेल्या कोणत्याही फर्माविणीचे अनुपालन करण्यास कसूर करील त्याबाबतीत ;]

[६][परंतु,—

[७][(एक) [८][खंड] (अ) खाली येणाऱ्या कोणत्याही प्रकरणी, पाणीकरासंबंधी किंवा रकमेसंबंधी मागणी नोटिशीची एक प्रत पंधरा दिवसांपेक्षा कमी नसलेल्या अवधीपूर्वी त्या

---

[१] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ५१ अन्वये "मागणीची नोटीस रीतसर बजावण्यात आल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३०, कलम १५ अन्वये मूळ शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३१ (१) (ब) अन्वये मूळ खंडांऐवजी हे खंड दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३१ (क) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[५] सन १९१८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम १३ (ब) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[६] सन १९१३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम (२) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[७] सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम १३ (ब) (क) अन्वये नवीन परंतुक (एक) समाविष्ट करण्यात आले.

[८] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३७ (अ) अन्वये 'उपखंड' या शब्दाऐवजी 'खंड' हा शब्द दाखल करण्यात आला.

परिवास्तूच्या ठळक भागी लावण्यात आलेली असल्याखेरीज आयुक्ताला कारवाई करता येणार नाही,]

[1][(दोन) [2][खंड] (अ), (ब), [3][(ड) आणि (फ)] यांखाली येणाऱ्या प्रकरणी, आयुक्त, [4][स्थायी समितीच्या] मंजुरीवाचून कोणतीही कारवाई करणार नाही ;]

[1][(तीन) [2][खंड] (क) आणि (ई) यांखाली येणाऱ्या प्रकरणी, परिवास्तूच्या मालकास किंवा तिच्या भोगवटादारास चोवीस तासांपेक्षा कमी नसेल इतक्या अवधीची लेखी नोटीस दिल्याखेरीज कोणतीही कारवाई केली जाणार नाही;]

[5][(चार) [2][खंड] (ब) खाली येणाऱ्या कोणत्याही प्रकरणी, आयुक्त यथास्थिति, कलम २७४, पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (१अ) खाली किंवा कलमे २७४अ खाली द्यावयाच्या नोटिशीची एक प्रत पंधरा दिवसांपेक्षा कमी नसेल अशा अवधीपूर्वी त्या परिवास्तूच्या ठळक भागी लावण्यात आलेली असल्याखेरीज कार्यवाही करणार नाही :]

[6][परंतु, खंड (अ), (ब), (ड) आणि (फ) खाली येणाऱ्या कोणत्याही प्रकरणांमध्ये, आयुक्त, स्थायी समितीच्या मंजुरीने पाणीपुरवठा तोडील किंवा पाणी बंद करील आणि जर यांपैकी कोणत्याही खंडाखालील कोणत्याही प्रकरणाची पुनरावृत्ती होत असेल तर आयुक्त, स्थायी समितीच्या मंजुरीशिवाय कार्यवाही करील.]

(२) अशा कोणत्याही प्रकरणी पूर्वोक्तप्रमाणे संयोजन तोडण्याचा किंवा पाणी बंद करण्याचा खर्च परिवास्तूचा मालक किंवा भोगवटादार देईल.

पाण्याच्या वापरासंबंधीच्या शर्तींचे उल्लंघन न करणे.

**२८०.** मोजणी करून किंवा नियतकालाने ठराविक रक्कम दिल्यानंतर ज्या व्यक्तीस पाणी पुरवण्यात आले असेल अशी कोणतीही व्यक्ती, अशा पाण्याचा वापर करण्यासंबंधी कलम १६९, पोट-कलम (२) खाली विहित केलेल्या कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करणार नाही किंवा कोणत्याही अशा शर्तीचे उल्लंघन करू देणार नाही.

इतर व्यक्तींच्या मालकीच्या जमिनीतून खाजगी मुख्य नळ नेण्याचे आयुक्ताचे अधिकार.

[7][**२८०अ.** खाजगी पाण्याचे मुख्य नळ, नळ व वाहिन्या नेण्याच्या बाबतीत, त्यांचे नवीकरण करण्याच्या बाबतीत व ती दुरुस्त करण्याच्या बाबतीत आयुक्तास खाजगी नाल्या नेण्याच्या बाबतीत, त्यांचे नवीकरण करण्याच्या बाबतीत व त्या दुरुस्त करण्याच्या बाबतीत त्याला यांत यापूर्वी अंतर्भूत असलेल्या तरतुदींनुसार जे अधिकार असतील आणि तो ज्या निर्बंधाच्या अधीन असेल तेच अधिकार असतील आणि तो त्याच निर्बंधांच्या अधीन असेल.]

[1] सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम १३(क) अन्वये मूळ परंतुक (एक) आणि (दोन) यांना अनुक्रमे परंतुक (दोन) आणि (तीन) असे फेरक्रमांक देण्यात आले.

[2] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३७(अ) अन्वये “उपखंड” याऐवजी “खंड” हा शब्द दाखल करण्यात आला.

[3] सन १९१८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम १३ (ई) अन्वये “आणि (ड)” या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[4] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १०७ अन्वये “प्रभारी सदस्यांच्या” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[5] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३(एक) (ड) अन्वये हा परिच्छेद जादा दाखल करण्यात आला.

[6] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३७(ब) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[7] सन १९१८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम १४ अन्वये २८०अ हे कलम समाविष्ट करण्यात आले.

पाण्याचे नळ टाकण्यासंबंधीतील खर्चाची वसुली.

[१][**२८०ब.** कलम २८०अ मध्ये निर्दिष्ट केलेले पाण्याचे खाजगी प्रमुख नळ, नळ आणि वाहिन्या नेण्यासाठीचा, त्यांचे नवीकरण करण्याचा व त्या दुरुस्त करण्याचा खर्च या अधिनियमाच्या तरतुदींअनुसार मालकांकडून किंवा भोगवटादारांकडून वसूल करण्यात येईल.]

जेथे पाणी प्रदूषित होईल तेथे पाण्याचे नळ, वगैरे न बसवणे.

**२८१.** [२][(१)] कोणतेही पाण्याचे नळ, एखाद्या नालीत किंवा खुल्या जलमार्गाच्या पृष्ठभागावर किंवा घरांच्या बोळकांडीत किंवा मलकुंडीपासून वीस फुटांच्या आत किंवा जेथे अशा नळाची खराबी होण्याचा संभव असेल किंवा त्यातील पाणी प्रदूषित होण्याचा संभव असेल अशा कोणत्याही जागी बसवता येणार नाहीत आणि कोणतीही विहीर किंवा तलाव व आयुक्ताची संमती असेल त्याखेरीज कोणतीही टाकी ही, [३][संडास, जलधौत संडास किंवा] मलकुंडी यापासून वीस फुटांच्या आत बांधता येणार नाही.

[३][(२) जो कोणी पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन करील, त्याला अपराधसिद्धीनंतर, एक महिन्यापर्यंत वाढवता येईल एवढ्या अवधीच्या कैदेची किंवा पाचशे रुपयांपेक्षा कमी नसेल आणि पाच हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल, एवढ्या दंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील.]

लबाडीने व अनधिकृतपणे पाण्याचा वापर करण्यास मनाई.

**२८२.** (१) कोणत्याही व्यक्तीला, महानगरपालिकेकडून तिला जे पाणी पुरवण्यात आले असेल त्याची लबाडीने विल्हेवाट लावता येणार नाही.

(२) महानगरपालिकेने जिला खाजगीरीत्या पाणी पुरवले असेल अशा कोणत्याही व्यक्तीला, पुरवलेल्या पाण्याबद्दल मोजणी करून आकार घेण्यात येत असेल ते सोडून एरव्ही, ज्या परिवास्तूच्या संबंधात पाणीकर भरण्यात येत असेल अशा परिवास्तूत राहत नसलेल्या कोणत्याही व्यक्तीला ज्या परिवास्तूंस पाणी पुरवण्यात आले असेल त्या परिवास्तूमधून पाणी नेण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

(३) कोणतीही व्यक्ती ज्या परिवास्तूंच्या संबंधात पाणीकर भरण्यात येत असेल त्या परिवास्तूत राहत नसेल तर, तिला महानगरपालिकेने खाजगीरीत्या पाणीपुरवठा केलेल्या कोणत्याही परिवास्तूंमधून पाणी नेता येणार नाही ; मात्र ज्या कोणत्याही बाबतीत अशा रीतीने पुरवलेल्या पाण्याबद्दल मोजणी करून आकार घेण्यात येत असेल त्याबाबतीत, ज्या व्यक्तीला अशारीतीने पाणीपुरवठा करण्यात आला असेल त्या व्यक्तीच्या परवानगीने तिने तसे केले तर ती गोष्ट वेगळी.

मीटरांच्या बाबतीत लबाडी करण्यास मनाई.

**२८३.** (१) कोणत्याही व्यक्तीला लबाडी करून—

(अ) कोणत्याही मीटरच्या दर्शकांकामध्ये फेरफार करता येणार नाही किंवा पुरवण्यात आलेल्या पाण्याच्या परिमाणाची कोणत्याही मीटरमध्ये योग्य रीतीने नोंद होण्यास प्रतिबंध करता येणार नाही ;

(ब) पाणी मोजण्याच्या प्रयोजनाकरिता बसवलेल्या मीटरमध्ये पाण्याची नोंद होण्यापूर्वी पाणी काढून घेता येणार नाही किंवा वापरता येणार नाही.

---

[१] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ३८ अन्वये कलम २८०ब समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३९ अन्वये कलम २८१ याला त्या कलमाचे पोट-कलम (१) असा फेरक्रमांक देण्यात आला व पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात आले.

[३] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३९ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

(२) असा कोणताही फेरफार करणे, प्रतिबंध करणे, पाणी काढून घेणे किंवा वापरणे ज्यामुळे साध्य होऊ शकेल अशी कृत्रिम साधने उपभोक्त्याच्या ताब्यात असणे हे, ग्राहकाने त्या गोष्टी लबाडी करून केल्या असल्याचा पुरावा असेल.

[१][(३) जो कोणी पोट-कलम (१) च्या तरतुदीचे उल्लंघन करील, त्याला, अपराधसिद्धीनंतर, एक महिन्यापर्यंत वाढवता येईल एवढ्या अवधीच्या कैदेची किंवा पाचशे रुपयांपेक्षा कमी नसेल आणि पाच हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल, एवढ्या दंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील.]

**सर्वसाधारण तरतुदी**

**२८४.** [२][(१)] कोणतीही व्यक्ती जाणूनबुजून किंवा हयगयीने,— जलदाय व्यवस्थांच्या बाबतीत जाणूनबुजून किंवा हयगयीने कृती करण्यास मनाई.

(अ) महानगरपालिकेच्या मालकीच्या कोणत्याही मीटरची किंवा अशा कोणत्याही मीटरच्या खिळण्यांपैकी कोणत्याही खिळणीची नुकसानी करणार किंवा करू देणार नाही ;

(ब) कोणत्याही महानगरपालिका जलदाय व्यवस्थेसंबंधी कोणतेही कुलूप, तोटी, झडप, नळ, काम, [३][इंजिन, हौद किंवा खिळणी] फोडणार नाही, त्याचे नुकसान करणार नाही किंवा ते उघडणार नाही ;

(क) पाण्याचा अपव्यय होईल अशारीतीने कोणत्याही जलदाय व्यवस्थेमधून पाणी खेचून नेणार नाही किंवा ते काढून टाकणार नाही ;

(ड) कोणत्याही महानगरपालिका जलदायव्यवस्थेंमधील किंवा जलदायव्यवस्थेमधून मिळणाऱ्या पाण्याचा अपव्यय होईल अशाप्रकारे कोणतीही कृती करणार नाही [४][किंवा करू देणार नाही] ;

(ई) कोणताही पाण्याचा मुख्य नळ किंवा वाहिनी यास अडथळा करता येणार नाही, तिची दिशा बदलणार नाही किंवा कोणत्याही रीतीने तिचे नुकसान करणार किंवा तीत फेरफार करणार नाही ;

[५][(फ) आयुक्ताच्या परवानगीने असेल ते सोडून एरव्ही, कलम २७४ अ खाली पुरविण्यात आलेले कोणतेही कुलुप उघडणार, फोडणार, त्याचे नुकसान करणार किंवा त्यात अनधिकृत फिरवाफिरव करणार नाही ;]

[६][(ग) महानगरपालिकेने विनिर्दिष्ट प्रयोजनासाठी रीतसर पुरवलेल्या पाण्याचा गैरवापर करणार नाही किंवा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी— मग ते विनिर्दिष्ट केलेले असो वा नसो— त्याचा वापर करणार नाही.]

[७][(२) जो कोणी पोट-कलम (१) च्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील त्याला अपराध सिद्धीनंतर,—

(अ) पहिल्या अपराधाबद्दल, एक महिन्यापर्यंत वाढवता येईल एवढ्या अवधीच्या कैदेची किंवा शंभर रुपयांपेक्षा कमी नसेल आणि एक हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल एवढ्या दंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील ;

---

[१] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ४० अन्वये पोट-कलम (३) जादा दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४१ अन्वये कलम २८४ याला त्या कलमाचे पोट-कलम (१) असा फेरक्रमांक देण्यात आला.

[३] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३२(अ) अन्वये "किंवा इंजिन" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] सन १९१८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम १५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३२(ब) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[६] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ४१(अ) अन्वये खंड (ग) जादा दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ४१(ब) अन्वये पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात आले.

(ब) दुसऱ्या व त्यानंतरच्या प्रत्येक अपराधाबद्दल, सहा महिन्यापर्यंत वाढवता येईल एवढ्या अवधीच्या कैदेची किंवा दोनशे रुपयांपेक्षा कमी नसेल आणि दोन हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल एवढ्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.]

कलम २८३ किंवा २८४ विरुद्ध अपराधी व्यक्तींना भरपाई देणे.

**२८५.** कलम २८३ किंवा कलम २८४ चे कोणतेही उल्लंघन झाल्यामुळे महानगरपालिकेला जे कोणतेही नुकसान पोहोचेल त्याबद्दल, अपराधी व्यक्ती भरपाई देईल.

या प्रकरणाच्या विवक्षित तरतुदींखालील अपराधांबद्दल कोणत्या व्यक्ती उत्तरदायी असतील.

[1][**२८६.** ज्या परिवास्तूस महानगरपालिकेने खाजगी पाणीपुरवठा केलेला असेल अशा कोणत्याही परिवास्तूत या प्रकरणाच्या एखाद्या तरतुदीविरुद्ध किंवा पाणीपुरवठ्यासंबंधी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या, या अधिनियमाखाली केलेल्या एखाद्या उपविधीविरुद्ध अपराध घडलेला आहे असे दाखवून देण्यात आल्यास, उक्त परिवास्तूचा मालक, पाणीकर भरण्यास प्रथमतः जबाबदार असलेली व्यक्ती व उक्त परिवास्तूचा भोगवटादार हे संयुक्तपणे व पृथकपणे त्याबद्दल उत्तरदायी असतील.]

या प्रकरणाखाली आयुक्तास कोणत्याही व्यक्तीच्या वतीने सामान केव्हा पुरवता येईल किंवा काम केव्हा करता येईल.

[2][**२८७.** या प्रकरणाच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदींखाली कोणतेही सामान, खिळण्या, हौद किंवा कुलूप व किल्ली पुरवण्याबाबत किंवा कोणतेही काम करण्याबाबत, जिला फर्माविण्यात आले असेल अशा कोणत्याही व्यक्तीने लेखी विनंती केली असता, आयुक्तास, अशा व्यक्तीच्या वतीने, यथास्थिति, आवश्यक ते सामान, खिळण्या, हौद किंवा कुलूप व किल्ली ही पुरवण्याची किंवा आवश्यक ते काम करण्याची तजवीज करता येईल ; परंतु ज्या बाबतीत कलम ४९३ किंवा ४९५ याच्या तरतुदी लागू होणार नाहीत अशा कोणत्याही बाबतीत, उक्त सामान, खिळण्या, हौद, कुलूप व किल्ली किंवा काम यांचा खर्च भागवण्यास आयुक्तांच्या मते पुरेशी होईल इतकी रक्कम प्रथम उक्त व्यक्तीने अनामत ठेवल्याशिवाय आयुक्त तशी व्यवस्था करणार नाही.]

या प्रकरणाखालील कामे संबंधित व्यक्तींना करण्याची मुभा न देता आयुक्तास ती पार पाडता येतील.

[3][**२८७अ.** (१) आयुक्तास, जर त्यास योग्य वाटेल तर, ज्या व्यक्तीस या प्रकरणात वर्णन केलेले कोणतेही काम अन्यथा करावे लागले असते [4][किंवा कोणत्याही टाकीस कुलूप-किल्ली लावण्याची तजवीज करावी लागली असती] तिला, ते काम करण्याची [4][किंवा कुलूप-किल्लीची तशी तजवीज करण्याची] पहिल्याने मुभा न देता आपल्या स्वतःच्या आदेशाखाली महानगरपालिकेकडून किंवा इतर अभिकरणाकडून ते काम करून घेता येईल [4][किंवा कुलूप-किल्लीची तजवीज करता येईल.]

---

[1] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३३ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[2] वरील अधिनियमाच्या कलम ३४ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[3] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५ कलम ४१ अन्वये कलम २८७अ समाविष्ट करण्यात आले.

[4] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(२) याप्रमाणे केलेल्या कोणत्याही कामाचा [१][किंवा अशा कुलूप-किल्लीची तजवीज करण्याचा] खर्च, ते काम [१][किंवा कुलूप-किल्लीची अशी तजवीज] ही महानगरपालिका निधीतून खर्च करून करण्याबद्दल महानगरपालिकेने सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाच्या किंवा ठरावाच्या अन्वये मंजुरी दिली असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही पूर्वोक्त व्यक्ती देईल, अशी मंजुरी देण्यास महानगरपालिकेस या अन्वये अधिकार प्रदान केलेले आहेत.]

[२][**२८७ब.** (१) या प्रकरणामध्ये वर्णन केलेले कोणतेही काम [३][(कुलूप-किल्ली तयार करण्याहून अन्य)] लायसनदार नळ कारागिराहून अन्य कोणत्याही व्यक्तीला करता येणार नाही आणि कोणतीही व्यक्ती लायसनदार नळकारागिराहून अन्य कोणत्याही व्यक्तीस असे काम करण्याची परवानगी देणार नाही. प्रकरण दहा खालील कामे लायसनदार नळ कारागिराने करणे.

(२) असे कोणतेही काम करण्यासाठी लायसनदार नळकारागिरास कामावर ठेवील अशी प्रत्येक व्यक्ती, तसे फर्माविण्यात येईल त्यावेळी अशा नळकारागिरांचे नाव आयुक्तास कळवील.

[४][(३) जेव्हा कोणतीही व्यक्ती पोट-कलम (१) चे उल्लंघन करून, महानगरपालिका जलदाय-व्यवस्थेमधून कोणत्याही परिवास्तूत पाण्याचा खाजगी पुरवठा करण्यासाठी आवश्यक असेल असा कोणताही नळ, हौद किंवा खिळणी टाकण्याची किंवा बसवण्याची तजवीज करील किंवा इतर कोणतेही काम करण्याची तजवीज करील किंवा त्या गोष्टी करण्यास परवानगी देईल तेव्हा ती अशी उल्लंघनासाठी विहित केलेल्या ज्या शास्तीस पात्र असेल त्याच्या भरीला, असा नळ, हौद, खिळणी किंवा काम यात कोणताही दोष असल्यास, तो आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने काढून टाकण्यात येईतोपर्यंत, स्वतंत्र किंवा उप संयोजन मिळण्याचा तिला हक्क असणार नाही].

**२८८.** पैसे भरण्याबाबत व पाणीपुरवठा करण्याचा कालावधी व शर्ती याबाबत महानगर-पालिका सर्वसाधारणपणे किंवा विशेषतः मान्य करील अशा अटींवर, आयुक्तास [५][बृहन्मुंबई-बाहेरील] कोणत्याही स्थानिक प्राधिकरणास किंवा व्यक्तीस महानगरपालिका जलदायव्यवस्थेतून पाणीपुरवठा करता येईल. [५][बृहन्मुंबईबाहेर] पाणीपुरवठा करण्याचा अधिकार.

## प्रकरण अकरा

## सडकांचे विनियम

### सार्वजनिक सडका बांधणे, त्यांची देखभाल व सुधारणा

**२८९.** (१) [६][बृहन्मुंबईतील] ज्या सडका सार्वजनिक सडका असतील किंवा ज्या कोणत्याही वेळी सार्वजनिक सडका होतील. त्या सर्व सडका व त्यांची फरसबंदी, दगड व इतर सामान ही [७][महानगरपालिकेमध्ये] निहित होतील व आयुक्ताच्या नियंत्रणाखाली राहतील. सार्वजनिक सडका महानगरपालिकेमध्ये निहित असणे.

---

[१] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९१८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम १७ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३६(१) अन्वये कंसातील मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३६(२) अन्वये मूळ पोट-कलमा ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[५] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम-२, याच्या अनुसूची (१) ४(१) अन्वये " ग्रेटर बॉम्बे " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या अनुसूचीद्वारे " ग्रेटर बॉम्बेतील " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[७] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १०८ अन्वये, " महापौरासह परिषदेमध्ये " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[१][परंतु, जी कोणतीही सार्वजनिक सडक, मुंबई नगरपालिका (हद्दी वाढविण्याबाबत) अधिनियम, १९५० हा अंमलात आल्याच्या तारखेच्या निकटपूर्वीच्या दिवशी [२][किंवा मुंबई नगरपालिका [हद्दी आणखी वाढविणे व अनुसूची बबअ (सुधारणा)] अधिनियम, १९५६], हा अंमलात आल्याच्या तारखेच्या निकटपूर्वीच्या दिवशी शासनामध्ये निहित असेल ती राज्य शासनाने तसा निदेश दिला नसेल तर, या पोट-कलमाच्या सामर्थ्याने [३][महानगरपालिकेमध्ये] निहित होणार नाही.]

१९५० चा मुंबई ७.
१९५६ चा मुंबई ८.

सार्वजनिक सडकांबाबत आयुक्तांचे अधिकार.

(२) आयुक्त, प्रसंगानुसार आवश्यक असेल त्याप्रमाणे, अशा सर्व सार्वजनिक सडका वेळोवेळी समतल करण्याची, त्यावर खडी घालण्याची किंवा फरसबंदी करण्याची, त्यात पाट काढण्याची, त्यात फेरफार करण्याची व त्या दुरूस्त करण्याची तजवीज करील ; तसेच तो अशी कोणतीही सडक वेळोवेळी रुंद करील, वाढवील किंवा अन्यथा तिची सुधारणा करील किंवा तिची भूमी उंच करण्याची किंवा खोल करण्याची किंवा तीत फेरफार करण्याची तजवीज करील आणि त्यास, पादचाऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी अशा सडकेवर कुंपण घालता येईल व खांब बसवता येईल व तो सुस्थितीत राखता येईल :

परंतु, ज्याचा एकूण परिव्यय [४][दहा लाख रुपयांपेक्षा] अधिक होईल असे, सार्वजनिक सडक रूंद करण्याचे, वाढवण्याचे किंवा इतर रीतीने सुधारण्याचे कोणतेही काम हाती घेण्याचा प्राधिकार महानगरपालिकेने दिल्याखेरीज किंवा महानगरपालिका देईतोपर्यंत आयुक्ताला ते हाती घेता येणार नाही.

(३) आयुक्तास, महानगरपालिकेच्या मंजुरीने, संपूर्ण सार्वजनिक सडक किंवा तिचा कोणताही भाग कायमचा बंद करता येईल :

परंतु ज्या सभेत मंजुरी देण्याविषयी निर्णय घेण्यात येईल त्या सभेच्या किमान एक महिना अगोदर अशी सडक किंवा तिचा भाग बंद करण्याचे योजिले आहे, असे जिच्याअन्वये रहिवाशांना कळवण्यात येईल अशी आयुक्तांच्या सहीची एक नोटीस अशा सडकेत किंवा तिच्या भागात लावण्यात आल्यावाचून किंवा अशा सभेच्या दिवसापूर्वी कोणत्याही वेळी उक्त प्रस्तावासंबंधी महानगरपालिकेत, कोणतेही लेखी आक्षेप मिळेतोपर्यंत व त्यांचा विचार केला जाईतोपर्यंत महानगरपालिका अशी मंजुरी देणार नाही.

बंद केलेल्या सडकेच्या ठिकाणाच्या जमिनीची विल्हेवाट.

**२९०.** जेव्हा जेव्हा कोणतीही सार्वजनिक सडक किंवा तिचा कोणताही भाग कलम २८९ खाली कायमचा बंद करण्यात येईल तेव्हा तेव्हा, अशा सडकेच्या ठिकाणाची किंवा बंद केलेल्या तिच्या कोणत्याही भागांशाची महानगरपालिकेमध्ये विहित असलेल्या जमिनीप्रमाणे विल्हेवाट करता येईल.

नवीन सार्वजनिक सडका तयार करण्याचा अधिकार.

**२९१.** आयुक्तास, याबाबत महानगरपालिका त्यास प्राधिकृत करील तेव्हा, कोणत्याही वेळी पुढील गोष्टी करता येतील :—

(अ) नवीन सार्वजनिक सडक आखणे व तयार करणे ;

(ब) कोणत्याही व्यक्तीच्या जमिनीतून सर्वस्वी अशा व्यक्तीच्या खर्चाने किंवा अंशतः अशा व्यक्तीच्या व अंशतः महानगरपालिकेच्या खर्चाने, सार्वजनिक उपयोगाकरिता सडक तयार करण्यासाठी आणि अशी सडक पूर्ण झाल्यावर ती सार्वजनिक सडक होईल असा करार अशा व्यक्तीबरोबर करणे ;

---

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २१ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम १४ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १२९(८) अन्वये "महापौरासह परिषदेमध्ये" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १२९अ अन्वये "तीन लाख रुपयांपेक्षा" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

१८९८ चा मुंबई ४. १९२५ चा मुंबई १६. [1][(क) मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ किंवा मुंबई शहर सुधारणा विश्वस्तव्यस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ यांच्या तरतुदींअनुसार रीतसर पार पाडलेल्या सुधारणा परियोजनेखाली केलेली कोणतीही सडक सार्वजनिक सडक म्हणून घोषित करणे.]

सन १८७९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ याची कलमे ३७ व ३८ यांच्या तरतुदींची व्यावृती.

**२९२.** कलम २८९, पोट-कलमे (१) व (३) किंवा निकटपूर्वीची दोन कलमे यांतील कोणत्याही तरतुदींमुळे मुंबई बंदर विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १८७९, कलमे ३७ व ३८ यांच्या तरतुदींस बाध येतो असे मानण्यात येणार नाही. (१८७९ चा मुंबई ६.)

**२९३.** [सार्वजनिक सडकांवर ट्राममार्ग किंवा लोहमार्ग तयार करण्याकरिता लागणाऱ्या परवानगीसाठी महानगरपालिकेची मंजुरी आवश्यक आणि ती प्रांतिक सरकारने कायम करणे आवश्यक] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ३९ अन्वये हे कलम निरसित करण्यात आले.

नवीन सार्वजनिक सडकांची किमान रुंदी.

**२९४.** कलम २९१ खाली तयार केलेल्या कोणत्याही नवीन सार्वजनिक सडकांची रुंदी ही, अशी सडक वाहनांच्या रहदारीकरिता तयार केलेली असल्यास, चाळीस फुटांपेक्षा कमी असणार नाही; आणि अशी सडक पादचाऱ्यांच्या रहदारीकरिता तयार केलेली असल्यास वीस फुटांपेक्षा कमी असणार नाही, आणि कोणत्याही पायऱ्या आणि कलम ३१० खाली आयुक्ताची लेखी परवानगी घेतली असेल तेवढे सोडून एरव्ही, कोणतेही इतर प्रक्षेपण अशा कोणत्याही सडकेवर येणार नाही.

लोहमार्गाच्या वरून किंवा त्याच्या खालून सार्वजनिक पूल, वगैरे बांधण्याचा किंवा अंगीकृत करण्याचा अधिकार.

**२९५.** आयुक्तास, याबाबत महानगरपालिका त्याला प्राधिकृत करील तेव्हा—

(अ) कोणताही विद्यमान किंवा योजलेला पूल, पारसेतू किंवा कमान किंवा त्याकडे जाण्याचे मार्ग अंगीकृत करण्यासाठी व सुस्थितीत राखण्यासाठी कोणत्याही व्यक्तीबरोबर करार करता येईल आणि त्यास तदनुसार असा पूल, पारसेतू किंवा कमान व त्याकडे जाण्याचे मार्ग सार्वजनिक सडकांचे भाग म्हणून किंवा महानगरपालिकेमध्ये निहित असलेली मालमत्ता म्हणून अंगीकृत करता येईल व सुस्थितीत राखता येईल; अथवा

(ब) असा कोणताही पूल, पारसेतू किंवा कमान बांधण्याकरिता किंवा त्यात फेरफार करण्याकरिता किंवा त्याच्या पायासाठी किंवा त्यास आधार देण्यासाठी किंवा त्याकडे जाण्याचे मार्ग तयार करण्यासाठी आवश्यक असलेली लगतची जमीन सर्वस्वी अशा व्यक्तीच्या खर्चाने किंवा अंशतः अशा व्यक्तीच्या व अंशतः महानगरपालिकेच्या खर्चाने करण्यासाठी किंवा संपादन करण्यासाठी करार करता येईल.

---

[1] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ३४ अन्वये खंड (क) समाविष्ट करण्यात आला.

सार्वजनिक सडका सुधारण्यासाठी परिवास्तू संपादन करण्याचा अधिकार.

**२९६.** (१) आयुक्तास, कलमे ९०, ९१ व ९२ यांच्या तरतुदींच्या अधीनतेने, पुढील गोष्टी करता येतील:—

(अ) कोणतीही सार्वजनिक सडक सुरू करण्याच्या, रुंद करण्याच्या, वाढवण्याच्या किंवा अन्यथा तिची सुधारणा करण्याच्या प्रयोजनासाठी किंवा कोणतीही नवीन सार्वजनिक सडक तयार करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असलेली कोणतीही जमीन व अशा जमिनीवर कोणत्याही इमारती असल्यास त्या इमारती संपादन करणे;

(ब) अशी जमीन व तिच्यावर असलेल्या कोणत्याही इमारतींच्या भरीला, अशा सडकेच्या नियत रेषेबाहेरील किंवा योजलेल्या नियत रेषेबाहेरील महानगरपालिकेस संपादन करणे इष्ट वाटेल अशी सर्व जमीन व तिच्यावर ज्या कोणत्याही इमारती असतील त्या इमारती संपादन करणे;

(क) खंड (ब) खाली खरेदी केलेली कोणतीही जमीन किंवा इमारत पट्ट्याने देणे, विकणे किंवा तिची अन्यथा विल्हेवाट करणे.

(२) खंड (क) खाली जमिनीच्या किंवा इमारतीच्या कोणत्याही अभिहस्तांतरणपत्रात विद्यमान इमारत काढून टाकणे, उभारण्यात यावयाच्या नवीन इमारतीचे वर्णन, अशी नवीन इमारत ज्या कालावधीत पूर्ण करण्यात येईल तो कालावधी व अशा इतर गोष्टी यांसंबंधीच्या आयुक्तास योग्य वाटतील अशा शर्ती समाविष्ट करण्यात येतील.

## सार्वजनिक सडकांच्या नियत रेषेचे परिरक्षण करणे

सडकेची नियत रेषा विहित करणे.

[१][**२९७.** (१) आयुक्तास—

(अ) कोणत्याही सार्वजनिक सडकेच्या प्रत्येक बाजूची रेषा विहित करता येईल :

[२][परंतु, उपनगरातील कोणत्याही सार्वजनिक सडकेच्या बाबतीत, मुंबई नगरपालिका (हद्दी वाढविण्यासंबंधी) अधिनियम, १९५० हा अंमलात येण्याच्या तारखेच्या निकटपूर्वीच्या दिवशी उपनगराच्या कोणत्याही भागात अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली प्रवर्तनात असलेली सार्वजनिक सडकेची नियत रेषा [३][आणि वाढवलेल्या उपनगरातील कोणत्याही सार्वजनिक सडकेच्या बाबतीत, मुंबई नगरपालिका [हद्दी आणखी वाढविणे व अनुसूची बबअ (सुधारणा)] अधिनियम, १९५६ हा अंमलात येण्याच्या तारखेच्या निकटपूर्वीच्या दिवशी वाढवलेल्या उपनगराच्या कोणत्याही भागात अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याखाली प्रवर्तनात असलेली सार्वजनिक सडकेची नियत रेषा], आयुक्ताने या खंडाखाली विहित केलेली रेषा आहे, असे मानण्यात येईल.]

१९५० चा मुंबई ७. १९५६ चा मुंबई ५८.

(ब) वेळोवेळी, मात्र प्रत्येक प्रकरणी महानगरपालिकेकडून त्यासंबंधात आयुक्ताला प्राधिकार मिळालेला असला पाहिजे या शर्तीच्या अधीनतेने, अशा विहित केलेल्या कोणत्याही रेषेच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या ऐवजी नवीन रेषा विहित करता येईल—

मात्र, (एक) प्राधिकार देण्यासंबंधीचा निर्णय महानगरपालिकेच्या ज्या सभेत घेण्यात येईल त्या सभेच्या किमान एक महिना अगोदर आयुक्ताने अशा प्रस्तावासंबंधी जाहीर नोटीस स्थानिक वृत्रपत्रात त्याचप्रमाणे [४]**[शासकीय राजपत्रात]** जाहिरात प्रसिद्ध करून दिलेली नसेल

---

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ४२ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम २९७ दाखल करण्यात आले.

[२] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम २२ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[३] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम १५ अन्वये हे शब्द, कंस व आकडे समाविष्ट करण्यात आले.

[४] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये **"मुंबई सरकार राजपत्र"** याऐवजी **"शासकीय राजपत्र"** हे शब्द दाखल करण्यात आले.

व तसेच ज्या सडकेसाठी किंवा सडकेच्या ज्या भागासाठी अशी नवीन रेषा विहित करण्याचे योजले असेल त्या सडकेत, किंवा त्या भागात आयुक्ताच्या सहीची त्यासंबंधीची विशेष नोटीस लावलेली नसेल तर; आणि

(दोन) उक्त प्रस्तावासंबंधी अशा सभेच्या दिवसापूर्वी किमान पूर्ण तीन दिवस आधी महानगरपालिकेच्या सचिवांच्या कार्यालयात आलेल्या लेखी आक्षेपांचा महानगरपालिका विचार करीतोपर्यंत, असा प्राधिकार देता येणार नाही.

(२) त्या त्या वेळी विहित केलेल्या रेषेस "सडकेची नियत रेषा" असे संबोधण्यात येईल.

(३) कोणत्याही व्यक्तीला आयुक्ताच्या लेखी परवानगीने असेल ते खेरीजकरून एरव्ही, सडकेच्या नियत रेषेच्या आत कोणत्याही इमारतीचा कोणताही भागांश बांधता येणार नाही, आणि आयुक्त अशी परवानगी देईल त्या प्रत्येक बाबतीत त्याला त्याच वेळी [१][स्थायी समितीस] त्याबाबतची आपली कारणे लेखी कळवावी लागतील.

इमारती सडकेच्या नियत रेषेपर्यंत मागे हटवणे.

**२९८.** (१) सार्वजनिक सडकेस भिडलेल्या इमारतीचा कोणताही भाग अशा सडकेच्या नियत रेषेच्या आत असेल तर, आयुक्तास, जेव्हा जेव्हा—

(अ) अशी इमारत पुन्हा बांधण्याचे किंवा अशा इमारतीचा जमिनीच्या पातळीच्या वरील अर्ध्यापेक्षा अधिक भाग—असा अर्धा भाग घन फुटांमध्ये मोजला पाहिजे— पाडण्याचे योजिले असेल; अथवा

(ब) अशा इमारतीचा जो कोणताही भागांश सडकेच्या नियत रेषेच्या आत असेल तो काढून टाकण्याचे, पुन्हा बांधण्याचे किंवा त्यात कोणतीही वाढ करण्याचे योजिले असेल; तेव्हा तेव्हा अशी इमारत पुन्हा बांधणे, तीत फेरफार करणे किंवा तिची दुरुस्ती करणे यासंबंधी कलम ३४५ किंवा ३४६ खाली तो जो कोणताही आदेश देईल त्याद्वारे अशी इमारत सडकेच्या नियत रेषेपर्यंत मागे हटवण्यास फर्मावता येईल.

(२) सार्वजनिक सडकेच्या नियत रेषेच्या आतील कोणतीही इमारत किंवा तिचा कोणताही भाग पडेल, जळेल किंवा कलम ३५१ किंवा ३५४ याच्या तरतुदींखाली किंवा अन्यथा पाडण्यात येईल तेव्हा, आयुक्तास, सडकेच्या नियत रेषेच्या आत जमिनीचा जो भाग उक्त इमारतीने तत्पूर्वी व्यापला असेल तो महानगरपालिकेच्या वतीने ताबडतोब कब्जात घेता येईल व आवश्यक तर तो मोकळा करून घेता येईल.

(३) या कलमाखाली संपादन केलेली जमीन तेथून पुढे सार्वजनिक सडकेचा भाग म्हणून मानण्यात येईल व ती महानगरपालिकेमध्ये सार्वजनिक सडकेचा भाग म्हणून निहित होईल.

सडकेच्या नियत रेषेच्या आत असलेली खुली जमीन किंवा चबुतरा इत्यादींनी व्यापलेली जमीन संपादन करणे.

**२९९.** (१) महानगरपालिकेमध्ये निहित नसलेली कोणतीही जमीन—मग ती खुली असो किंवा कुंपण घातलेली असो—कोणत्याही सार्वजनिक सडकेच्या नियत रेषेच्या आत येत असेल आणि ती एखाद्या इमारतीने व्याप्त नसेल किंवा सार्वजनिक सडकेस भिडलेल्या इमारतीच्या बाहेरील चबुतरा, व्हरांडा, पायरी किंवा इतर कोणतीही संरचना किंवा अशा चबुतऱ्याचा, व्हरांड्याच्या पायरीचा किंवा इतर बांधणीचा भागांश अशा सडकेच्या नियत रेषेच्या आत येत असेल तर, आयुक्तास तसे करण्याचा आपला इरादा असल्याची किमान पूर्ण सात दिवसांची लेखी नोटीस अशा जमिनीच्या किंवा इमारतीच्या मालकास दिल्यानंतर उक्त जमीन, तिच्याभोवती कोणतीही भिंत, कुडण किंवा कुंपण असल्यास, त्यासह किंवा सडकेच्या नियत रेषेच्या आत आलेल्या पूर्वोक्तप्रमाणे असलेला उक्त चबुतरा, व्हरांडा, पायरी किंवा इतर संरचना किंवा उपरोक्तप्रमाणे असलेला उक्त चबुतऱ्याचा, व्हरांड्याचा, पायरीचा किंवा इतर बांधणीचा असा भागांश महानगरपालिकेच्या वतीने ताबडतोब कब्जात घेता येईल आणि आवश्यक असल्यास तो मोकळा करून घेता येईल आणि अशा रीतीने संपादन केलेली जमीन त्यानंतर अशा सार्वजनिक सडकेचा भाग म्हणून मानण्यात येईल.

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १०९ अन्वये "महापौरासह परिषदेस" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

L-12—H 4167 (Page 294-310)



(२) परंतु, अशी जमीन किंवा इमारत [1][[2][शासनामध्ये] ] निहित असेल तेव्हा, संबंधित शासनाच्या पूर्वमंजुरीवाचून, पूर्वोक्तप्रमाणे कब्जा घेता येणार नाही आणि जेव्हा अशी जमीन किंवा इमारत ही, रॉयल चार्टरअन्वये किंवा [3][युनायटेड किंगडमच्या] संसदेच्या अधिनियमान्वये किंवा [4][एखाद्या भारतीय कायद्यान्वये] रचना केलेल्या कोणत्याही महानगरपालिकेमध्ये निहित असेल तेव्हा [5][[6][राज्य]शासनाच्या] पूर्वमंजुरीवाचून पूर्वोक्तप्रमाणे कब्जा घेता येणार नाही.

इमारती सडकेच्या नियत रेषेपर्यंत पुढे आणणे.

**३००.** (१) सार्वजनिक सडकेस भिडलेली कोणतीही इमारत अशा सडकेच्या नियत रेषेच्या मागे असेल तर, आयुक्तास, जेव्हा जेव्हा,—

(अ) अशी इमारत पुन्हा बांधण्याचे योजिले असेल, अथवा

(ब) उक्त सडकेस भिडलेली इमारत किंवा तिचा भागांश जमिनीच्या पातळीपासून अशा इमारतीच्या किंवा तिच्या भागांशाच्या अर्ध्यापेक्षा अधिक भागापर्यंत—असा अर्धा भाग घन फुटात मोजला पाहिजे—पाडून टाकणे किंवा पुन्हा उभारणे ज्यायोगे आवश्यक होईल अशा कोणत्याही रीतीने तिच्यात फेरफार किंवा दुरूस्ती करण्याचे योजिले असेल,

तेव्हा तेव्हा, अशी इमारत पुन्हा बांधणे, तीत फेरफार करणे व ती दुरूस्त करणे यासंबंधी तो कलम ३४५ किंवा ३४६ खाली जो कोणताही आदेश देईल त्याअन्वये अशी इमारत सडकेच्या नियत रेषेच्या पुढे आणण्याची परवानगी देता येईल किंवा स्थायी समितीच्या मान्यतेने तसे करण्यास फर्माविता येईल.

(२) या कलमाच्या प्रयोजनाकरिता, सार्वजनिक सडकेपासून कोणतीही परिवास्तू अलग करणारी भिंत ही इमारत आहे असे मानण्यात येईल आणि आयुक्त मान्यता देईल असे साहित्य वापरून बांधलेली व अशा आकाराची भिंत उक्त रेषेवर उभारण्यात आली असेल तर, इमारत सडकेच्या नियत रेषेपर्यंत पुढे आणण्यासंबंधी ज्या आदेशान्वये परवानगी देण्यात आली असेल किंवा फर्माविण्यात आले असेल त्याचे पुरेसे अनुपालन झाले आहे असे मानण्यात येईल.

मागील तीन कलमांखालील प्रकरणांत भरपाई देणे.

**३०१.** [7][ (१) कलम २९८ किंवा २९९ खाली सार्वजनिक सडकेसाठी संपादन केलेल्या कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकास, त्याची इमारत किंवा जमीन अशा रीतीने संपादन केल्याच्या परिणामी त्याला जी कोणतीही हानी सोसावी लागेल त्याबद्दल व आयुक्ताने उक्त कलमांपैकी कोणत्याही कलमाखाली दिलेल्या आदेशाच्या परिणामी अशा मालकास जो कोणताही खर्च करावा लागेल त्याबद्दल आयुक्त भरपाई देईल ; परंतु, याप्रमाणे संपादन केलेली इमारत किंवा जमीन ज्या मालमत्तेचा भाग असेल त्या मालमत्तेपैकी शिल्लक राहिलेल्या भागाच्या किंमतीत इमारत सडकेच्या नियत रेषेपर्यंत मागे हटविल्यामुळे कोणतीही वाढ किंवा घट होण्याची शक्यता असेल ती अशा भरपाईची रक्कम निर्धारित करताना विचारात घेण्यात येईल व जमेस धरण्यात येईल.]

(२) लगतपूर्ववर्ती कलमाखाली इमारत पुढे आणण्याविषयी आयुक्ताने दिलेल्या कोणत्याही आदेशाचे परिणामी, अशा इमारतीच्या मालकाची जी कोणतीही हानी किंवा नुकसान होईल त्याबद्दलची भरपाई आयुक्त त्यास देईल.

---

[1] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशन्वये "हर मॅजेस्टी किंवा" या शब्दांऐवजी "बादशहा" हा शब्द दाखल करण्यात आला.

[2] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "बादशहा" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[3] वरील आदेशान्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[4] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये "गव्हर्नर जनरल ऑफ इंडिया इन कौन्सिल" "किंवा गव्हर्नर इन कौन्सिल" या मजकुराऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[5] वरील आदेशाअन्वये "सरकार" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[6] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला

[7] सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम १९ अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

(३) इमारत पुढे आणण्याविषयी लगतपूर्ववर्ती कलमाखाली ज्या कोणत्याही व्यक्तीला फर्माविले असेल किंवा परवानगी दिली असेल तिच्या परिवास्तूत समाविष्ट होणारी जादा जमीन महानगरपालिकेच्या मालकीची असेल तर, इमारत पुढे आणण्यासंबंधी आयुक्ताने दिलेला आदेश किंवा परवानगी ही, उक्त जमिनीसंबंधी अशा मालकास करून दिलेले पुरेसे अभिहस्तांतरणपत्र असेल ; आणि [१][अशा जादा जमिनीबद्दल उक्त मालकाने महानगरपालिकेस द्यावयाची किंमत आणि] अभिहस्तांतरणपत्राच्या इतर अटी व शर्ती अशा आदेशात किंवा परवानगीत मांडण्यात येतील.

(४) आयुक्ताने इमारत पुढे आणण्यास फर्माविले असेल तेव्हा, [२][महानगरपालिकेस देण्यासाठी निश्चित केलेली किंमत किंवा] अभिहस्तांतरणपत्राच्या कोणत्याही इतर अटी किंवा शर्ती याबाबत इमारतीच्या मालकाचे समाधान झाले नसेल तर, आयुक्ताला, उक्त मालकाचा अर्ज आला असता, उक्त अटी व शर्ती त्यास कळविण्यात आल्यानंतर पंधरा दिवसांच्या आत कोणत्याही वेळी, लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाकडे ती बाब निर्णयार्थ निर्देशित करावी लागेल. लघुवाद न्यायालयाच्या मुख्या न्यायाधीशाने यासंबंधी दिलेला निर्णय निर्णायक असेल.

## खाजगी सडकांसंबंधी तरतुदी

इमारती व खाजगी सडका यांसाठी जमिनींचे रेखांकन करण्याच्या इराद्याची नोटीस आयुक्तास देणे.

[३][ **३०२.** (१) (अ) कोणतीही जमीन खरेदीदाराने किंवा पट्टेदाराने तिच्यावर इमारती उभारण्यासंबंधी करावयाची प्रसंविधा किंवा करार यांच्या अधीनतेने, विकण्याचा किंवा पट्ट्याने देण्याचा, अथवा

(ब) जमिनीची इमारती भूखंडांमध्ये विभागणी करण्याचा, अथवा

(क) कोणत्याही जमिनीचा इमारतीच्या प्रयोजनांसाठी उपयोग करण्याचा किंवा उपयोग करण्याची परवानगी देण्याचा, अथवा

(ड) खाजगी सडक तयार करण्याचा किंवा अशा सडकेबाबत रेखांकन करण्याचा—मग अशा सडकेवरून किंवा सडकेवर जाण्यायेण्याचा हक्क लोकांस देण्याचा इरादा असो किंवा नसो—जिचा इरादा असेल ती प्रत्येक व्यक्ती त्याबाबत आयुक्तास लेखी नोटीस देईल, तसेच ती अशा नोटिशीबरोबर, आराखडे व छेदनदेखावे सादर करील व त्यात अशा इमारतीच्या जमिनीचे स्थान व हद्दी व खाजगी सडकेचे (कोणतेही असल्यास) ठिकाण तसेच अशा इमारतीच्या जमिनीच्या हद्दी किंवा अशा सडकेचे ठिकाण अशा व्यक्तीच्या ज्या इतर जमिनीचा भाग असेल, ती सर्व इतर जमीन व अशा इमारतीच्या जमिनीची योजलेली सुधारणा, आखणी व भूखंड पाडणे, तसेच अशा खाजगी सडकेची योजलेली पातळी, दिशा व रुंदी आणि जलनिस्सारणाची साधने, आणि अशा जमिनीवर उभारण्याचे योजलेल्या एका किंवा अनेक इमारतींची उंची, जलनिस्सारणाची साधने, त्यात केलेली वायुवीजनाची सोय आणि कोणतीही इमारत उभारल्यानंतर, त्यावेळी आधीच अस्तित्वात असलेल्या किंवा पूर्वोक्तप्रमाणे किंवा त्यावेळी करावयाचे योजिलेल्या सडकेस भिडलेली असेल तर, अशा इमारतीतून किंवा इमारतीकडे जाण्यायेण्याचे मार्ग दर्शवण्यात येतील.

(२) या कलमातील किंवा कलमे ३०२अ, ३०२ब, ३०३ किंवा ३०४ यांतील कोणत्याही तरतुदीमुळे प्रकरण बारा अन्वये आवश्यक असलेल्या कोणत्याही बाबींना बाध येते किंवा त्यावाचून भागवता येते असे मानता कामा नये].

---

[१] सन १९२१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ९(अ) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ९(ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९२० चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३ अन्वये कलमे ३०२, ३०३ आणि ३०४ याच्याऐवजी कलमे ३०२, ३०२अ, ३०२ब, ३०३ आणि ३०४ दाखल करण्यात आली.

L-12—H 4167 (Page 294-310)



आयुक्तास आणखी तपशील मागवता येईल.

[१][ **३०२अ.** कलम ३०२ खाली दिलेल्या कोणत्याही नोटिशीत, आयुक्तास अशा प्रकरणाची समाधानकारक कार्यवाही करणे शक्य व्हावे यासाठी त्यास आवश्यक असलेली सर्व माहिती पुरविण्यात आली नसेल तर, आयुक्तास, उक्त नोटीस मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत, कोणत्याही वेळी, ज्या व्यक्तीने उक्त नोटीस दिली असेल त्या व्यक्तीस लेखी नोटीस देऊन पुढील सर्व किंवा त्यांपैकी कोणत्याही दस्तऐवजांसह आवश्यक ती माहिती पुरवण्यास फर्मावता येईल. ते दस्तऐवज असे :—

(अ) प्रस्तावित खाजगी सडकेचे बिनचूक आराखडे व छेदनदेखावे त्यांच्या दोन प्रती, हे आराखडे व छेदनदेखावे प्रत्येक वीस फुटांस एक इंच यापेक्षा कमी नसेल अशा आडव्या रेषेच्या मापाने आणि प्रत्येक दहा फुटांस दीड इंचाहून कमी नसेल अशा उभ्या रेषेच्या मापाने तयार करण्यात येतील व त्यात पुढील गोष्टी दर्शवण्यात येतील; जमिनीजवळील एखादी ज्ञात व ठराविक मापाची पातळी गृहीत धरून त्यापेक्षा अधिक असलेली जमिनीच्या सध्याच्या पृष्ठभागाची पातळी, नियोजित नवीन सडकेची पातळी व तिचा बाक ज्या प्रमाणात असेल ते प्रमाण, अशी सडक ज्या सडकांशी जोडावयाची असेल त्या सडकांची पातळी व बाक आणि सडकेचा जो भाग वाहनासाठी व पादचाऱ्यांसाठी अनुक्रमे तयार करावयाचा असेल त्या भागाच्या रुंदीचे प्रमाण ;

(ब) उक्त सडक व तिचे पदपथ बांधण्यासाठी वापरण्यात यावयाच्या सामानाचे तपशीलवार वर्णन असलेले तपशीलपत्रक ;

(क) अशा सडकेच्या आणि उभारावयाचे योजलेल्या इमारतीच्या जलनिस्सारणाच्या नियोजित रेषा दर्षविणारा आराखडा व प्रत्येक नालीचा योजलेला आकार, खोली व उतार आणि नालीमध्ये वायुवीजनासाठी योजलेल्या व्यवस्थेचा तपशील ;

(ड) अशा व्यक्तीच्या इतर जमिनीमध्ये किंवा आयुक्ताच्या निर्णितीस मान्यता मिळण्यासाठी [२][स्थायी समितीकडे] अर्ज करण्यापूर्वी अशा इतर जमिनीचा जेवढा भाग आयुक्तास आवश्यक वाटेल तेवढ्या भागामध्ये सडका आखण्यासाठी, भूखंड पाडण्यासाठी व खुल्या जागा ठेवण्यासाठी आराखडे व छेदनदेखावे यांसहित तयार केलेली परियोजना.]

लायसनदार भूमापकाने आराखडे तयार करण्याबाबत आयुक्त फर्मावू शकेल.

[१][ **३०२ब.** ज्या आराखड्यावर, छेदनदेखाव्यावर किंवा वर्णनावर लायसनदार भूमापकाने, ते आपण स्वतः किंवा आपल्या देखरेखीखाली तयार केले होते असे दर्शविणारी खूण म्हणून सही केलेली नसेल असा कोणताही आराखडा, छेदनदेखावा किंवा वर्णन कलम ३०२ किंवा ३०२अ याच्या प्रयोजनाकरिता पुरेसे म्हणून स्वीकारण्याचे आयुक्तास नाकारता येईल.]

जमिनीचे, खाजगी सडकांचे व इमारतींचे रेखांकन आयुक्ताने निर्धारित करणे.

[१][ **३०३.** (१) इमारतीसाठी असलेल्या जमिनीचे रेखांकन प्रत्येक खाजगी सडकेची पातळी, दिशा, रुंदी व जलनिस्सारणाची साधने, आणि अशा जमिनीवर किंवा अशा सडकेच्या दोन्ही बाजूस उभारावयाच्या सर्व इमारतींची उंची, जलनिस्सारणाची साधने, त्यातील वायुवीजनाच्या सोयी, त्यांच्याकडे जाण्यायेण्याचे मार्ग या सर्व गोष्टी, आयुक्त [३][ स्थायी समितीच्या] मान्यतेने निश्चित व निर्धारित करील ; अशा जमिनीच्या किंवा आसपासच्या कोणत्याही जमिनीच्या रेखांकनासंबंधी व उपयोगासंबंधी स्वास्थ्यकारक गोष्टी, सुखसोयी व सोयी करणे हे सर्वसाधारण उद्दिष्ट समोर ठेवून केल्या पाहिजेत.

(२) परंतु, कलम ३०२ खाली दिलेली कोणतीही नोटीस किंवा कलम ३०२अ खाली मागवलेले कोणतेही आराखडे, छेदनदेखावे, वर्णन, परियोजना किंवा आणखी माहिती आयुक्तास मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत, अशा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या पूर्वोक्त गोष्टींपैकी कोणत्याही गोष्टी संबंधाने आयुक्ताने आपली अमान्यता नोटीस देणाऱ्या व्यक्तीला कळवली नाही तर, उक्त व्यक्तीच्या प्रस्तावास आयुक्ताने मान्यता दिली आहे, असे मानण्यात येईल.]

---

[१] सन १९२० चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३ अन्वये कलमे ३०२, ३०३ आणि ३०४ या ऐवजी कलमे ३०२, ३०२अ, ३०२ब, ३०३ आणि ३०४ दाखल करण्यात आली.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ११० अन्वये "महापौरासह परिषदेकडे" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १११ अन्वये "प्रभारी सदस्याच्या" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

L-12—H 4167 (Page 294-310)



[१][ **३०४.** (१) कोणत्याही व्यक्तीस आपल्या इराद्याची कलम ३०२ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे आगाऊ लेखी नोटीस दिल्यावाचून, तसेच अशी नोटीस दिल्याच्या तारखेपासून साठ दिवसांचा अवधी संपेपर्यंत किंवा कलम ३०३, पोट-कलम (१) खाली निश्चित व निर्धारित केले असतील अशा निदेशांस (कोणतेही असल्यास) अनुसरून असेल त्याहून अन्यथा, कोणतीही जमीन, इमारत बांधण्यासाठी विकता येणार नाही, पट्ट्याने देता येणार नाही, तिचा उपयोग करता येणार नाही किंवा उपयोग करण्याची परवानगी देता येणार नाही किंवा कोणत्याही जमिनीची इमारतीच्या भूखंडामध्ये विभागणी करता येणार नाही किंवा कोणतीही खाजगी सडक तयार करता किंवा त्याबाबत रेखांकन करता येणार नाही किंवा तयार करण्यास किंवा रेखांकन करण्यास सुरुवात करता येणार नाही.

नोटिशीचा अवधी संपेपर्यंत किंवा आयुक्ताने दिलेल्या निदेशानुसार असेल त्याहून अन्यथा जमिनीचे इमारतीसाठी विनियोजन न करणे व खाजगी सडकांचे रेखांकन न करणे.

(२) या कलमाचे उल्लंघन करून कोणतीही कृती करण्यात आली असेल किंवा अशी कृती करण्यास परवानगी देण्यात आली असेल तर, आयुक्तास, लेखी नोटीस देऊन, असे कृत्य करणाऱ्या व्यक्तीला किंवा तसे करण्यास परवानगी देणाऱ्या व्यक्तीला अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेस किंवा त्यापूर्वी त्यांने त्याबाबत सही केलेल्या व आयुक्ताच्या नावे लिहिलेल्या लेखी निवेदनाद्वारे, या कलमाचे उल्लंघन करून रेखांकनाचे, भूखंड पाडण्याचे, सडकेचे किंवा इमारतीचे जे काम केले असेल त्यात आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने फेरफार का करण्यात येऊ नये याबद्दल किंवा तसे करणे त्याच्या मते अव्यवहार्य असेल तर, अशी सडक किंवा इमारत पाडून किंवा काढून टाकण्यात का येऊ नये किंवा असे अनधिकृत काम करण्यापूर्वी जमीन पूर्ववत का करण्यात येऊ नये, याबद्दल कारण दर्शविण्याविषयी फर्मावता येईल अथवा उक्त व्यक्तीस अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिवशी, वेळी व जागी जातीने किंवा तिने याबाबत रीतसर प्राधिकृत केलेल्या अभिकर्त्यामार्फत हजर राहण्याविषयी व वर सांगितल्याप्रमाणे कारण दर्शवण्याविषयी फर्मावता येईल.

(३) अशा सडकेत किंवा इमारतीत अशा रीतीने फेरफार का करण्यात येऊ नये किंवा ती पाडून किंवा काढून टाकण्यात का येऊ नये किंवा अशी जमीन अशा रीतीने पूर्ववत का करण्यात येऊ नये याविषयी आयुक्ताचे समाधान होईल असे कारण अशी व्यक्ती दाखवू शकली नाही तर, आयुक्तास, याप्रमाणे फेरफार करण्याचे, पाडून टाकण्याचे, काढून टाकण्याचे किंवा पूर्ववत करण्याचे काम पार पाडण्याची तजवीज करता येईल आणि अशा कामाचा खर्च उक्त व्यक्ती देईल.]

**३०५.** जर कोणतीही खाजगी सडक आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने समतल केलेली नसेल, तीत खडी घातलेली नसेल किंवा तिला फरसबंदी केलेली नसेल, तीत मलप्रणाल किंवा नाली बांधलेली नसेल किंवा वाहिका काढलेली नसेल आणि दिवाबत्तीची सोय केलेली नसेल तर, आयुक्तास, [२][स्थायी समितीच्या] मंजुरीने, लेखी नोटीस देऊन उक्त सडकेसमोरील किंवा तिला लागून असलेल्या किंवा भिडलेल्या अनेक परिवास्तूंच्या मालकांस, तो निदेश देईल अशा रीतीने समतल करण्याविषयी, तीत खडी घालण्याविषयी, तिला फरसबंदी करण्यास, तीत नाली बांधण्यास आणि दिवाबत्तीची सोय करण्यास फर्माविता येईल.

खाजगी सडका समतल करणे व त्यांचे जलनिस्सारण.

---

[१] सन १९२० चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३ अन्वये कलमे ३०२, ३०३ आणि ३०४ या ऐवजी कलमे ३०२, ३०२-अ, ३०२-ब, ३०३ आणि ३०४ दाखल करण्यात आली.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ११२ अन्वये "प्रभारी सदस्याला" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

L-12—H 4167 (Page 294-310)



खाजगी सडकात मलप्रणाल, वगैरे बांधल्यावर त्या सार्वजनिक सडका म्हणून घोषित करण्याचा अधिकार.

**३०६.** (१) जेव्हा कोणतीही खाजगी सडक आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने समतल केलेली असेल, तीत खडी घालण्यात आलेली असेल किंवा तित फरसबंदी करण्यात आलेली असेल, तीत मलप्रणाल, नाली किंवा वाहिका बांधण्यात आलेली असेल व ती चांगल्या रीतीने दुरूस्त करण्यात आली असेल तेव्हा, आयुक्तास, अशा सडकेत दिवे, दिव्यांचे खांब व दिवाबत्तीची सोय करण्यासाठी आवश्यक असलेली इतर उपकरणे यांची त्यांचे समाधान होईल अशा रीतीने तरतूद करण्यात आली असेल तर [१][आणि अशा सडकेत समाविष्ट झालेल्या जमिनीबद्दल [२][ [३][राज्य] शासनास] द्यावयाचा सर्व जमीन महसूल दिलेला असेल तर,] अशा सडकेच्या कोणत्याही भागात लेखी नोटीस लावून ती सार्वजनिक सडक आहे असे घोषित करता येईल आणि अशा सडकेच्या मालकाने किंवा मालकांपैकी कोणीही विनंती केली असता तो तसे घोषित करील त्यानंतर अशी सडक सार्वजनिक सडक होईल.

(२) परंतु अशी नोटीस लावल्यानंतर एक महिन्याच्या आत अशा सडकेच्या किंवा तिचा जो मोठा भाग असेल त्याच्या मालकाने आयुक्तास लेखी नोटीस देऊन आक्षेप घेतला तर, अशी कोणतीही सडक सार्वजनिक सडक होणार नाही.

(३) या कलमातील कोणत्याही तरतुदीमुळे, मुंबई बंदर विश्वस्तव्यवस्था अधिनियम, १८७९ याची कलमे ३७ व ३८ यांच्या तरतुदींना बाध येते, असे मानले जाणार नाही. १८७९ चा मुंबई ६.

एखादी सडक अंशतः सार्वजनिक व अंशतः खाजगी असेल तेव्हा, कलमे ३०५ व ३०६ यांची प्रयोज्यता.

**३०७.** कोणत्याही सडकेचा फक्त काही भागांश कलम ३, खंड (क्ष) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे सार्वजनिक सडक असेल तर, अशा सडकेचा बाकी राहिलेला भागांश कलमे ३०५ व ३०६ यांच्या सर्व प्रयोजनांकरिता खाजगी सडक आहे, असे मानले जाईल.

## प्रक्षेप व अडथळे

सडका, इत्यादींवरील प्रक्षेपास मनाई.

**३०८.** (१) कोणत्याही व्यक्तीला, जी संरचना किंवा खिळणी—

(अ) कोणत्याही सडकेवर पुढे येईल किंवा बाहेर जाईल किंवा प्रक्षिप्त होईल किंवा तिच्यावर कोणत्याही प्रकारे अतिक्रमण करील किंवा सडकेवरून लोकांस सुरक्षितपणे किंवा सोयीस्करपणे जाण्यायेण्यास अडथळा करील, किंवा ;

(ब) कोणत्याही सडकेतील कोणत्याही नालीचा किंवा खुल्या वाहिकेचा उपयोग करण्यात किंवा ती योग्य रितीने चालू राहण्यात कोणत्याही प्रकारे अडथळा येईल किंवा त्याच्या सफाईबाबत निरीक्षण करण्यास कोणत्याही प्रकारे व्यत्यय येईल अशा रीतीने अशा नालीमधून किंवा वाहिकेमधून बाहेर जाईल किंवा प्रक्षिप्त होईल किंवा अतिक्रमण करील ;

अशी कोणतीही संरचना किंवा खिळणी कोणत्याही परिवास्तूच्या सम्मुख किंवा तिच्यासमोर उभारता, करता किंवा ठेवता येणार नाही.

---

[१] सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम १२ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाअन्वये "सरकार" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] विधी अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(२) आयुक्तास, लेखी नोटिशीद्वारे, कोणत्याही परिवास्तूंच्या मालकास किंवा भोगवटादारास या कलमाचे [१][किंवा [२]मुंबई नगरपालिका अधिनियम, १८७२ याचे कलम १९६ याचे] [३][किंवा मुंबई नगरपालिका (हद्दी वाढविण्यासंबंधी) अधिनियम, १९५० हा अंमलात येण्याच्या तारखेच्या निकटपूर्वीच्या दिवशी अंमलात असलेल्या कायद्याच्या तरतुदींचे] [४][किंवा मुंबई नगरपालिका [हद्दी आणखी वाढविणे आणि अनुसूची बबअ (सुधारणा)] अधिनियम, १९५६ हा अंमलात येण्याच्या तारखेच्या निकटपूर्वीच्या दिवशी अंमलात असलेल्या कोणत्याही कायद्याच्या कोणत्याही तरतुदींचे] उल्लंघन करून उक्त परिवास्तुच्या सम्मुख किंवा तिच्यासमोर उभारलेली, केलेली किंवा ठेवलेली कोणतीही संरचना किंवा खिळणी काढून टाकण्यास किंवा त्यास निदेश देणे योग्य वाटेल अशा रीतीने त्यात फेरफार करण्यास फर्मावता येईल.

प्रक्षेप काढून टाकण्यास फर्मावण्याचा अधिकार.

१८७२ चा मुंबई ३. १९५० चा मुंबई ७. १९५६ चा मुंबई ५८.

(३) उक्त परिवास्तूच्या भोगवटादाराने अशा नोटिशीस अनुसरून कोणतीही संरचना किंवा खिळणी काढून टाकली किंवा त्यात फेरफार केला तर, अशी संरचना किंवा खिळणी त्याने स्वतः उभारलेली, केलेली किंवा ठेवलेली नसल्यास, त्यास उक्त नोटिशीचे अनुपालन करण्यासाठी आलेला सर्व वाजवी खर्च अशा परिवास्तूच्या मालकाच्या खाती दाखवून वसूल करण्याचा हक्क असेल.

**३०९.** [५][(१) जर कलम ३०८ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे असलेली अशी कोणतीही संरचना किंवा खिळणी—

उपनगरांतील [६][व वाढवलेल्या उपनगरांतील] संरचना, वगैरे काढून टाकण्यास किंवा तीत फेरफार करण्यास फर्मावण्याचा अधिकार.

१९५० चा मुंबई ७. १९५६ चा मुंबई ५८.

(अ) मुंबई नगरपालिका (हद्दी वाढविण्यासंबंधी) अधिनियम, १९५० हा अंमलात येण्याच्या तारखेच्या निकटपूर्वी उपनगरातील जी क्षेत्रे [७][अथवा मुंबई नगरपालिका [हद्दी आणखी वाढविणे आणि अनुसूची बबअ (सुधारणा)] अधिनियम, १९५६, हा अंमलात येण्याच्या तारखेच्या निकटपूर्वी वाढवलेल्या उपनगरांतील जी क्षेत्रे] नगरपालिका जिल्हा किंवा नगरपालिका बरो म्हणून स्थित होती त्या क्षेत्रात असलेल्या परिवास्तूंच्या बाबतीत १९०१ च्या एप्रिल महिन्याच्या पहिल्या तारखेपूर्वी ;

(ब) खंड (अ) मध्ये निर्देशिलेल्या क्षेत्रांहून अन्य अशी उपनगरांतील [८][किंवा यथास्थिति, वाढवलेल्या उपनगरांतील कोणत्याही क्षेत्रात स्थित असलेल्या परिवास्तूंच्या बाबतीत, उक्त अधिनियम] अंमलात येण्याच्या तारखेपूर्वी, आणि

---

[१] सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४, कलम ६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[२] वरील अधिनियमाच्या कलम २ अन्वये सन १८७२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ निरसित करण्यात आला.
[३] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम २३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[४] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम १६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[५] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम २४ अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम (१) दाखल करण्यात आले.
[६] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम १७(२) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.
[७] वरील अधिनियमाच्या कलम १७ (१) (एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[८] वरील अधिनियमाच्या कलम १७(१) (दोन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

L-12—H 4167 (Page 294-310)



(क) शहरात स्थित असलेल्या परिवास्तूंच्या बाबतीत, मुंबई नगरपालिका अधिनियम, १८७२ हा अंमलात आल्याच्या तारखेपूर्वी, १८७२ चा मुंबई ३.

कोणत्याही वेळी कोणत्याही परिवास्तूच्या सम्मुख किंवा कोणत्याही परिवास्तूसमोर उभारण्यात, बांधण्यात किंवा ठेवण्यात आली असेल तर आयुक्त, पूर्वोक्तप्रमाणे उक्त परिवास्तूच्या मालकास किंवा तिच्या भोगवटादारास नोटीस देऊ शकेल.]

(२) परंतु, जर अशा कोणत्याही बाबतीत अशी संरचना किंवा खिळणी कायदेशीरपणे उभारण्यात, बांधण्यात किंवा ठेवण्यात आली असेल तर, ती काढून टाकल्यामुळे, किंवा तीत फेरफार केल्यामुळे ज्या व्यक्तीस हानी किंवा नुकसान सोसावे लागेल अशा प्रत्येक व्यक्तीस आयुक्त भरपाई देईल.

विवक्षित बाबतीत सडकेच्या वर असणाऱ्या प्रक्षेपांस परवानगी देता येईल.

**३१०.** (१) आयुक्तास, कोणत्याही सडकेस भिडलेल्या कोणत्याही इमारतीच्या मालकास किंवा भोगवटादारास, [१][प्रत्येक बाबतीत त्यास योग्य वाटेल] अशा अटींवर—

(अ) अशा सडकेवर किंवा तिच्या कोणत्याही भागांशावर कमानावली उभारण्यास, अथवा

(ब) कोणत्याही वरच्या मजल्यावरून कोणत्याही सडकेच्यावर किंवा तिच्या भागांशाच्यावर प्रक्षिप्त होणारा व्हरांडा, सज्जा, सायबान, वेदरफ्रेम किंवा अशी इतर संरचना अगर वस्तू उभारण्यास लेखी परवानगी देता येईल.

(२) मात्र, ज्या सार्वजनिक सडकेवर कमानावली बांधण्यास महानगरपालिकेने पूर्वी मंजुरी दिलेली नसेल अशा कोणत्याही सार्वजनिक सडकेवर कमानावली बांधण्यास आयुक्त परवानगी देणार नाही.

(३) या कलमाखाली दिलेल्या परवानगीच्या अटींखाली व तदनुसार जी कोणतीही कमानावली, व्हरांडा, सज्जा, सायबान, वेदरफ्रेम किंवा इतर संरचना अगर वस्तू उभारण्यात किंवा रचना करण्यात आली असेल तिला कलम ३०८ च्या तरतुदी लागू होतात, असे मानले जाणार नाही.

तळमजल्याचे दरवाजे, वगैरे सडकेवर बाहेरच्या बाजूस न उघडणे.

**३११.** कोणत्याही परिवास्तूच्या तळमजल्याचा कोणताही दरवाजा, फाटक, अडसर किंवा खिडकी सडकेवर किंवा सडकेच्या सुधारणेसाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही जमिनीवर बाहेरच्या बाजूने अशा रीतीने उघडत असेल की, त्यामुळे आयुक्ताच्या मते लोकांस अशा सडकेवरून सुरक्षितपणे किंवा सोईस्करपणे जाण्या येण्यास अडथळा होईल तर असा दरवाजा, फाटक, अडसर किंवा खिडकी बाहेरच्या बाजूने उघडणार नाही अशा रीतीने तिच्यात फेरफार करण्यात यावा, याबद्दल आयुक्तास अशा परिवास्तूच्या मालकास कोणत्याही वेळी लेखी नोटीस देऊन फर्मावता येईल.

ज्यामुळे सडकेत अडथळा होईल अशा संरचनेस किंवा खिळण्यास मनाई.

**३१२.** (१) कलम ३१० किंवा ३१७ खाली आयुक्ताची परवानगी घेतली असेल ते खेरीज करून एरव्ही, कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही सडकेत किंवा सडकेवर किंवा कोणत्याही सडकेतील कोणत्याही खुल्या वाहिकेवर, नालीवर, विहिरीवर किंवा टाकीवर किंवा त्यांच्यावरून अशा सडकेच्या वाहिकेच्या, नालीच्या, विहिरीच्या किंवा टाकीच्या कोणत्याही भागांशाला अडथळा होईल किंवा त्यावर अतिक्रमण होईल अशा किंवा प्रक्षिप्त होईल किंवा तो व्यापला जाईल अशा रीतीने कोणतीही भिंत, कुंपण, कठडा, खांब, पायरी, मंडप किंवा इतर संरचना किंवा खिळणी उभारता किंवा घालता येणार नाही.

(२) कलम ३२२, खंड (क) ज्यास लागू होतो अशा कोणत्याही उभारणीस किंवा वस्तूस, त्या कलमातील कोणतीही तरतूद लागू होते असे मानले जाणार नाही.

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ११३ अन्वये "प्रभारी सदस्याकडून मंजूर करण्यात येईल" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

सडकेवर वस्तू ठेवणे, वगैरे यास मनाई.

**३१३.** (१) आयुक्ताच्या लेखी परवानगीने असेल ते खेरीजकरून एरव्ही, कोणतीही व्यक्ती—

(अ) कोणत्याही सडकेवर किंवा कोणत्याही सडकेतील कोणत्याही खुल्या वाहिकेवर, नालीवर, किंवा विहिरीवर [१][किंवा कोणत्याही सार्वजनिक जागेत,] त्यावर अडथळा किंवा अतिक्रमण होईल अशा रीतीने कोणतेही विक्री केंद्र, खुर्ची, बाक, पेटी, शिडी, गासडी किंवा इतर वस्तू मांडणार अगर ठेवणार नाही ;

(ब) कोणत्याही सडकेवर किंवा कोणत्याही सडकेतील कोणत्याही खुल्या वाहिकेवर, नालीवर, विहिरीवर किंवा टाकीवर अशा सडकेच्या पृष्ठभागापासून बारा फुटांपेक्षा कमी नसेल अशा उंचीवर कोणतीही फळी किंवा निधानी कोणत्याही इमारतीच्या जोत्यांच्या रेषेबाहेर प्रक्षेपित करणार नाही ;

(क) सडकेला भिडलेल्या इमारतीच्या कोणत्याही भिंतीला किंवा भागांशाला उपरोक्त उंचीपेक्षा कमी उंचीवर काहीही जोडणार नाही किंवा त्यापासून लोंबते सोडणार नाही.

(२) खंड (अ) मधील कोणतीही बाब इमारती सामानास लागू होणार नाही.

सार्वजनिक जागी विक्री करण्यासाठी लायसन.

[२][**३१३अ.** या बाबतीत आयुक्ताने दिलेल्या लायसनखाली किंवा अशा लायसनच्या अटींस व तरतुदींस अनुसरून असेल ते खेरीजकरून एरव्ही, कोणतीही व्यक्ती कोणताही पदार्थ,—मग तो माणसाने सेवन करण्यासाठी असो किंवा नसो—कोणत्याही सार्वजनिक जागेत किंवा कोणत्याही सार्वजनिक सडकेवर फेरीने विकणार नाही किंवा विक्रीकरिता ठेवणार नाही.]

सार्वजनिक जागी किंवा सडकेत फायदा मिळविण्याच्या प्रयोजनाकरिता हस्तव्यवसायातील कौशल्याचा वापर करण्यासाठी किंवा कामे करण्यासाठी लायसन.

[३][**३१३ब.** या बाबतीत आयुक्ताने दिलेल्या लायसनखाली किंवा अशा लायसनच्या अटी किंवा तरतुदी यांस अनुसरून असेल ते खेरीजकरून एरव्ही, कोणत्याही व्यक्तीला फायदा मिळविण्याच्या प्रयोजनासाठी, कोणत्याही सार्वजनिक जागेत किंवा सार्वजनिक सडकेत कोणत्याही हस्तव्यवसायातील आपल्या कौशल्याचा वापर करता येणार नाही किंवा जनतेच्या सोयीसाठी कामे करता येणार नाहीत.]

---

[१] सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम १३ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम १९अ अन्वये कलम ३१३अ समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३७ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

L-12—H 4167 (Page 294-310)



[३][कलम ३१२ किंवा ३१३अ यांचे उल्लंघन करून उभारलेली, ठेवलेली किंवा फेरीने विकण्यात येणारी कोणतीही गोष्ट नोटीस न देता काढून टाकण्याचा अधिकार.]

**३१४.** आयुक्त, नोटीस न देता,—

(अ) [१][मुंबई नगरपालिका (हद्दी वाढविण्याबाबत) अधिनियम, १९५० हा अंमलात आल्याच्या तारखेनंतर शहरात किंवा उपनगरांत [२][किंवा मुंबई नगरपालिका [हद्दी आणखी वाढवणे व अनुसूची बबअ (सुधारणा)] अधिनियम, १९५६; हा अंमलात आल्याच्या तारखेनंतर वाढवलेल्या उपनगरांत] कलम ३१२, पोट-कलम (१) अंमलात आल्यानंतर, त्या कलमाच्या तरतुदीविरूद्ध कोणत्याही सडकेत किंवा सडकेवर, किंवा कोणत्याही खुल्या वाहिकेवर, नालीवर, विहिरीवर, टाकींवर किंवा त्यावरून उभारण्यात किंवा करण्यात येईल अशी कोणतीही भिंत, कुंपण, कठडा, खांब, पायरी, मंडप किंवा इतर संरचना किंवा खिळणी ; (१९५० चा मुंबई ७. १९५६ चा मुंबई ५८.)

(ब) कलम ३१३, पोट-कलम (१) याचे उल्लघंन करून कोणत्याही जागेत, तिच्यावर, तिच्यापासून किंवा त्या जागी मांडलेले, ठेवलेले, प्रक्षेपित केलेले, जोडलेले किंवा लोंबते सोडलेले कोणतेही विक्री केंद्र, खुर्ची, बाक, पेटी, शिडी, गासडी, फळी किंवा निधानी अथवा कोणतीही इतर वस्तू ;

[४][(क) कलम ३१३अ याच्या तरतुदींचे उल्लंघन करून, कोणत्याही सार्वजनिक जागी किंवा कोणत्याही सार्वजनिक सडकेवर फेरीने विकण्यात येणारा किंवा विक्रीसाठी मांडलेला कोणताही पदार्थ व असा पदार्थ ज्यात किंवा ज्यावर विक्रीकरिता ठेवला असेल असे कोणतेही वाहन, बारदान, पेटी, फळी, निधानी किंवा कोणतीही इतर गोष्ट;]

[५][(ड) कोणत्याही व्यक्तीने, कोणत्याही सार्वजनिक जमिनीचा अनधिकृतरित्या भोगवटा केला असेल किंवा तिने दोषपूर्ण रीतीने जमिनीचा ताबा मिळविला असेल, अशा जमिनीवर अशा व्यक्तीने अनधिकृतपणे ठेवलेल्या, प्रक्षेपित केलेल्या किंवा जमा केलेल्या सर्व वस्तू व साहित्य यांचबरोबर त्या व्यक्तीस अशा जमिनीवरून काढून टाकण्याची तजवीज करता येईल :

परंतु, आयुक्त, अशाप्रकारे काढून टाकण्याची अंमलबजावणी करतेवेळी, अशा व्यक्तीस तिच्या व्यक्तिगत चीजवस्तू, स्वयंपाकाची भांडीकुंडी, कुटुंबियांचे अंथरूण-पांघरूण, इत्यादींसारख्या आणि घरगुती वापराच्या वस्तू घेऊन जाण्यास अनुमती देईल.]

कलम ३१२ अंमलात येण्यापूर्वी उभारलेली किंवा बसवलेली कोणतीही संरचना किंवा खिळणी काढून टाकण्यास फर्मावण्याचा अधिकार.

**३१५.** (१) कोणत्याही परिवास्तूच्या लगत किंवा समोर किंवा तिच्या संबंधात कोणतीही भिंत, कुंपण, कठडा, खांब, पायरी, मंडप किंवा इतर संरचना किंवा खिळणी [६][मुंबई नगरपालिका (हद्दी वाढविण्याबाबत) अधिनियम, १९५० हा अंमलात येण्याच्या तारखेपूर्वी शहरात किंवा उपनगरात] [७][किंवा यथास्थिति, मुंबई नगरपालिका [हद्दी आणखी वाढवणे व अनुसूची बबअ (सुधारणा)] अधिनियम, १९५६ हा अंमलात येण्याच्या तारखेपूर्वी वाढवलेल्या उपनगरात] कलम ३१२ अंमलात येण्यापूर्वी उभारण्यात किंवा बसवण्यात आले असेल व उक्त कलम अंमलात आल्यानंतर तसे उभारणे किंवा बांधणे विधिसंमत होत नसेल तर, आयुक्तास, परिवास्तूच्या मालकास किंवा भोगवटादारास लेखी नोटीस देऊन उक्त भिंत, कुंपण, कठडा, खांब, पायरी, मंडप किंवा इतर संरचना किंवा वस्तू काढून टाकण्यास फर्मावता येईल. (१९५० चा मुंबई ७.)

(२) मात्र, जर अशा कोणत्याही बाबतीत अशी संरचना किंवा खिळणी विधितः उभारण्यात किंवा बसवण्यात आली असेल तर, ती काढून टाकल्यामुळे किंवा त्यात फेरफार केल्यामुळे ज्या व्यक्तीची हानी किंवा नुकसान होईल अशा प्रत्येक व्यक्तीस आयुक्त भरपाई देईल.

---

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम २५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम १८ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २६, कलम २(२) अन्वये मूळ समास टीपेऐवजी ही समास टीप दाखल करण्यात आली.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २(१) अन्वये खंड (क) समाविष्ट करण्यात आला.

[५] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २३ अन्वये खंड (ड) जादा दाखल करण्यात आला.

[६] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम २६ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम १९ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

**३१६.** (१) कोणत्याही व्यक्तीला कोणत्याही सार्वजनिक सडकेत कोणतेही जनावर बांधता येणार नाही किंवा आपल्या कुटुंबातील किंवा घरातील कोणत्याही व्यक्तीकरवी ते बांधण्याची तजवीज करता येणार नाही किंवा बांधण्याची परवानगी देता येणार नाही.

सार्वजनिक सडकेत जनावरे बांधण्यास मनाई.

(२) आयुक्तास किंवा कोणत्याही महानगरपालिका अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास पूर्वोक्त-प्रमाणे बांधलेले कोणतेही जनावर तेथून हलवता येईल व ते पोलीस अधिकाऱ्याच्या हवाली करता येईल किंवा पोलीस अधिकाऱ्यास असे जनावर तेथून हलवता येईल व मोकाट सुटलेल्या जनावरांची ज्याप्रमाणे व्यवस्था लावण्यात येते त्याचप्रमाणे पोलीस अधिकारी अशा जनावराची व्यवस्था लावील.

## उत्सवाच्या दिवसात सडकांवर मंडप, वगैरे तात्पुरते उभारणे

**३१७.** पोलीस आयुक्ताच्या सहमतीने आयुक्तास कोणत्याही सडकेवर समारंभाच्या व उत्सवाच्या प्रसंगी मंडप व कोणतीही अशी इतर संरचना तात्पुरती उभारण्यासाठी लेखी परवानगी देता येईल.

आयुक्त, उत्सवाच्या दिवसात सडकांवर मंडप, वगैरे उभारण्यास परवानगी देऊ शकेल.

## सडकांमध्ये किंवा सडकांजवळ कामे पार पाडण्याशी संबंधित तरतुदी

**३१८.** जेव्हा जेव्हा कोणत्याही सडकेची जमीन किंवा फरसबंदी महानगरपालिकेच्या वतीने कोणतेही काम करण्यासाठी आयुक्ताच्या किंवा कोणत्याही महानगरपालिका अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या आदेशान्वये किंवा त्याखाली खोदण्यात किंवा उखडण्यात आली असेल तेव्हा तेव्हा, ज्या कामासाठी ती खोदण्यात किंवा उखडण्यात आली असेल ते काम पूर्ण करण्यात येईल आणि अशी जमीन किंवा फरसबंदी शक्य तितक्या त्वरेने भरण्यात येईल, पूर्ववत करण्यात येईल व सर्वतोपरीने नीट करण्यात येईल ; आणि काम पूर्ण झाल्यावर खणून काढलेली कोणतीही माती व सामान शिल्लक राहिले असल्यास ते आणि अशा कामामुळे झालेला सर्व कचरा विनाविलंब काढून टाकण्यात येईल.

महानगरपालिकेच्या कोणत्याही कामासाठी सडक उखडली असेल तेव्हा ती विनाविलंब पूर्ववत करणे.

**३१९.** (१) पूर्वोक्तप्रमाणे कोणतेही असे काम किंवा कोणत्याही सडकेमध्ये विधितः करता येईल असे कोणतेही काम चालू असेल तेव्हा, आयुक्त, उक्त सडक वाहतुकीसाठी किंवा त्यास योग्य वाटेल अशा प्रकारच्या वाहतुकीसाठी पूर्णतः किंवा अंशतः बंद करण्यात यावी असे निदेश देऊ शकेल ; आणि त्याने ज्या मर्यादेपर्यंत वाहतूक बंद करण्याचा निदेश दिला असेल त्या मर्यादेपर्यंत वाहतुकीस मनाई करण्यासंबंधीचा आदेश ठळक जागी लावण्यात येईल व अशा सडकेत वाहतूक बंद करण्यासाठी किंवा नियंत्रित करण्यासाठी त्यास योग्य वाटतील असे दांडे, साखळ्या किंवा खांब अशा सडकेच्या आडवे किंवा अशा सडकेमध्ये बसवण्यात येतील.

ज्या सडकेत काम चालू असेल ती सडक आयुक्त बंद करू शकेल.

(२) कोणतीही व्यक्ती, आयुक्ताच्या परवानगीवाचून किंवा इतर विधिसंमत प्राधिकारावाचून, अशा रीतीने बसविलेला कोणताही दांडा, साखळी किंवा खांब काढून टाकणार नाही किंवा वाहतुकीस मनाई करण्यासाठी याप्रमाणे लावलेला असेल अशा कोणत्याही आदेशाचा भंग करणार नाही.

L-12—H 4167 (Page 294-310)



कोणत्याही सडकेत महानगरपालिकेचे काम चालू असताना वाहतूक, वगैरेकरिता आयुक्ताने तरतूद करणे.

**३२०.** कोणत्याही सडकेत महानगरपालिकेच्या वतीने कोणतेही काम चालू असताना, आयुक्त, वाजवी रीतीने व्यवहार्य असेल तेथवर, वाहतूक चालू राहण्यासाठी किंवा तिचा मार्ग वळवण्यासाठी, अशा सडकेमधून ज्या जागांकडे जाता येते त्या सर्व जागांकडे जाण्यायेण्यासाठी आणि उक्त काम चालू केल्यामुळे ज्या कोणत्याही जलनिस्सारणाच्या, पाणी पुरवठ्याच्या किंवा दिवाबत्तीच्या साधनांच्या बाबतीत अडथळा येईल त्या बाबतीत अशा गोष्टींसाठी पुरेशी तरतूद करील आणि त्याने असे काम चालू केल्यामुळे ज्या कोणत्याही व्यक्तीस विशेष नुकसान सोसावे लागत असेल तिला भरपाई देईल.

कोणत्याही सडकेत महानगरपालिकेचे काम चालू असताना सार्वजनिक सुरक्षिततेसाठी घ्यावयाची सावधगिरी.

**३२१.** (१) महानगरपालिकेच्या वतीने कोणत्याही सडकेत काम चालू असताना, आयुक्त–

(अ) अपघात होऊ नये म्हणून लगतच्या इमारतींना टेकू लावून व त्यांचे संरक्षण करून योग्य ती सावधगिरी घेईल ;

(ब) ज्या कोणत्याही जागी जमीन किंवा फरसबंदी खोदण्यात किंवा उखडण्यात आली असेल त्या जागेला कुंपण घालील व तिची राखण करील ;

(क) अशा कोणत्याही जागेजवळ किंवा कलम ३१९ खाली जे कोणतेही दांडे, साखळ्या किंवा खांब घातले असतील त्यांच्याजवळ अशी जागा खोदलेली किंवा उखडलेली राहील तोपर्यंत किंवा तसे दांडे, साखळ्या किंवा खांब ठेवलेले असतील तोपर्यंत, जाणाऱ्यायेणाऱ्या लोकांना इशारा मिळण्यास पुरेसे असे दिवे उभारून प्रत्येक रात्री लावून ठेवील.

(२) कोणतीही व्यक्ती, आयुक्ताची लेखी परवानगी घेतल्यावाचून किंवा इतर कायदेशीर प्राधिकारावाचून या कलमाच्या कोणत्याही प्रयोजनांकरिता लावलेले किंवा उभारलेले कोणतेही लाकडी टेकू किंवा कुंपण काढणार नाही किंवा कोणताही दिवा मालवणार नाही.

परवानगीवाचून सडक न खोदणे किंवा न उखडणे, तसेच तिच्यावर इमारती सामान न ठेवणे.

**३२२.** (१) आयुक्त किंवा महानगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी यांहून अन्य कोणत्याही व्यक्तीला आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून किंवा इतर कायदेशीर प्राधिकारावाचून,—

(अ) कोणत्याही सडकेचा भाग असणारी भूमी किंवा फरसबंदी किंवा कोणतीही भिंत, कुंपण, खांब, साखळी किंवा इतर सामान किंवा वस्तू यांची हलवाहलव करता, खोदता, उखडता किंवा त्यात कोणताही फेरफार हाती घेता येणार नाही किंवा कोणत्याही प्रकारची हानी पोहोचवता येणार नाही; अथवा

(ब) कोणत्याही सडकेत त्यास कोणतेही इमारती सामान ठेवता येणार नाही; अथवा

(क) कोणत्याही सडकेत, कोणत्याही बांधकामासाठी कोणतीही परांची बांधता येणार नाही किंवा कोणतीही तात्पुरती उभारणी करता येणार नाही किंवा कमावलेला चुना तयार करण्यासाठी किंवा विटा, चुना, कचरा किंवा इतर सामान ठेवण्यासाठी अशा सडकेत कोणतेही खांब, दांडे, कठडे, फळ्या किंवा इतर वस्तू परिवेष्टन म्हणून उभारता येणार नाहीत.

(२) खंड (ब) किंवा खंड (क) खाली कोणतीही परवानगी आयुक्ताच्या स्वेच्छानिर्णयानुसार रद्द करता येण्याजोगी असेल. मात्र त्याने असे करण्यापूर्वी किमान चोवीस तासांची लेखी नोटीस, ज्या व्यक्तीस अशी परवानगी दिली असेल, त्या व्यक्तीस दिली पाहिजे.

[१][(३) ज्या बाबतीत इमारतीसाठी लागणारे सामान कोणत्याही सडकेवर ठेवण्याकरिता पोट-कलम (१), खंड (ब) खाली परवानगी मिळण्याकरिता अर्ज करण्यात आला असेल आणि अर्ज केल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत अर्जदारास कोणतेही उत्तर पाठवण्यात आले नसेल ते सोडून एरव्ही, आयुक्तास, ते कोणतेही इमारती सामान किंवा कोणतीही परांची किंवा कोणतेही

[१] सन १९१३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम ३ अन्वये पोट-कलम (३) समाविष्ट करण्यात आले.

तात्पुरते बांधकाम किंवा जागा परिवेष्टित करण्यासाठी जे कोणतेही खांब, दांडे, कठडे, फळ्या किंवा इतर वस्तू पोट-कलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या परवानगीवाचून किंवा प्राधिकारावाचून कोणत्याही सडकेत ठेवण्यात किंवा उभारण्यात आल्या असतील किंवा ज्या अशी परवानगी घेऊन किंवा प्राधिकार मिळवून ठेवण्यात किंवा उभारण्यात आल्या असून पोट-कलम (२) खाली दिलेल्या नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत काढून टाकण्यात आल्या नसतील, त्या सर्व गोष्टी नोटीस न देता काढून टाकण्याची तजवीज करता येईल.]

कलम ३२२ खाली ज्या व्यक्तींना परवानगी देण्यात आली असेल, त्या व्यक्तींनी सार्वजनिक सुरक्षिततेसाठी घ्यावयाची सावधगिरी.

**३२३.** ज्या व्यक्तीस कलम ३२२ खाली कोणतीही परवानगी देण्यात आली असेल, ती प्रत्येक व्यक्ती स्वखर्चाने ज्या कोणत्याही जागी भूमी किंवा फरसबंदी खोदण्यात किंवा उखडण्यात आली असेल किंवा ज्या कोणत्याही जागी कोणतेही इमारती सामान ठेवण्यात आले असेल किंवा कोणतीही परांची, बांधकाम किंवा इतर वस्तू बसवण्यात आली असेल त्या प्रत्येक जागेस योग्य रीतीने कुंपण घालण्याची व तिची राखण करण्याची तजवीज करील, आणि अपघात टाळण्यासाठी तसे करणे आवश्यक असेल अशा सर्व बाबतीत अशा जागी रात्रीच्या वेळी चांगल्या प्रकारे दिवाबत्तीची सोय करील.

कलम ३२२ खाली परवानगी देण्यात आलेल्या व्यक्तींनी सडका, वगैरे पूर्ववत करणे.

**३२४.** (१) ज्या व्यक्तीस कलम ३२२ खाली कोणत्याही सडकेची भूमी किंवा फरसबंदी खोदण्याची किंवा उखडण्याची परवानगी देण्यात आली असेल किंवा जी व्यक्ती इतर कायदेशीर प्राधिकाराखाली कोणत्याही सडकेची भूमी किंवा फरसबंदी खोदील किंवा उखडील, ती प्रत्येक व्यक्ती, ज्या कामासाठी ती खोदण्यात किंवा उखडण्यात आली असेल ते काम शक्य तितक्या त्वरेने पूर्ण करील आणि आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने अशी जमीन विनाविलंब बुजवील व याप्रमाणे खोदलेली किंवा उखडलेली सडक किंवा फरसबंदी पूर्ववत करील व नीट करील.

(२) जर उक्त व्यक्ती पूर्वोक्तप्रमाणे अशी सडक किंवा फरसबंदी पूर्ववत करण्यात व नीट करण्यात कसूर करील तर, आयुक्तास, अशी सडक किंवा फरसबंदी पूर्ववत करता येईल, आणि असे काम करण्यासाठी आयुक्तास आलेला खर्च उक्त व्यक्ती देईल.

कलम ३२२ खाली परवानगी दिलेल्या व्यक्तींनी त्यांच्या कामांमुळे रस्त्यांत व्यत्यय येत असेल तेव्हा वाहतूक, इत्यादी करीता करावयाच्या तरतुदी.

**३२५.** आयुक्त, ज्या व्यक्तीस कलम ३२२ खाली कोणत्याही सडकेची भूमी किंवा फरसबंदी खोदण्याची किंवा उखडण्याची परवानगी देण्यात आली असेल किंवा जी व्यक्ती कोणतेही काम पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ कोणत्याही इतर कायदेशीर प्राधिकाराखाली कोणत्याही सडकेची भूमी किंवा फरसबंदी खोदील किंवा उखडील, अशा कोणत्याही व्यक्तीस वाहतूक चालू राहण्यासाठी किंवा तिचा मार्ग वळवण्यासाठी, अशा सडकेमधून ज्या जागांकडे जाता येते, त्या जागांकडे जाण्यासाठी आणि उक्त काम पार पाडण्यामुळे ज्या कोणत्याही जलनिस्सारणाच्या, पाणीपुरवठ्याच्या किंवा दिवाबत्तीच्या साधनांच्या बाबतीत व्यत्यय येईल त्या बाबतीत, समाधानकारकपणे तरतूद करण्याविषयी लेखी नोटीस देऊन फर्मावू शकेल.

L-12—H 4167 (Page 294-310)



सडकेला भिडून असलेल्या कोणत्याही इमारतीवर काम चालू असताना आड पडदे लावणे.

**३२६.** (१) जी व्यक्ती कोणतीही इमारत किंवा भिंत बांधण्याचे, पाडण्याचे किंवा पुन्हा बांधण्याचे किंवा कोणत्याही इमारतीच्या किंवा भिंतीच्या कोणत्याही भागात फेरफार करण्याचे किंवा ती दुरुस्त करण्याचे ठरवील, तिला ज्या कोणत्याही बाबतीत कोणत्याही लगतच्या सडकेतील पायवाटेस त्यामुळे अडथळा होईल किंवा ती कमी सोईची होईल त्या बाबतीत, प्रथम एक योग्य व पुरेशी फळी किंवा कुंपण घालण्याची तजवीज केल्याशिवाय असे काम सुरू करता येणार नाही. त्याशिवाय ती व्यक्ती, पुरेशी जागा असल्यास व आयुक्ताच्या मते तसे करणे इष्ट असल्यास, अशा फळीच्या किंवा कुंपणाच्या बाहेर पादचाऱ्यांकरिता पायवाट म्हणून उपयोग होण्याकरिता एक सोईस्कर पदपथ व कठडा बांधील.

(२) कोणतीही फळी किंवा कुंपण आयुक्ताची आगाऊ लेखी परवानगी घेतल्यावाचून याप्रमाणे घालता येणार नाही आणि अशी परवानगी घेऊन घातलेले कुंपण किंवा प्रत्येक फळी, पूर्वोक्तप्रमाणे बांधलेला पदपथ व कठडा ही लोकांच्या सुरक्षिततेसाठी व सोईसाठी आवश्यक असेल त्या काळात ते काम करणारी व्यक्ती कायम ठेवील व आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने चांगल्या स्थितीत ठेवील व अपघात टाळण्यासाठी तसे करणे आवश्यक असेल अशा सर्व बाबतीत, उक्त व्यक्ती रात्रीच्या वेळी अशा कुंपणाच्या किंवा फळीच्या जागी चांगल्या प्रकारे दिवाबत्तीची तजवीज करील.

(३) आयुक्त, उपरोक्त व्यक्तीस लेखी नोटीस देऊन, अशा रीतीने घातलेली कोणतीही फळी किंवा कुंपण काढून टाकण्याविषयी फर्मावू शकेल.

### [१][वाहने उभी करून ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागा किंवा ठिकाणे यांसाठी करावयाची तरतूद

वाहने उभी करून ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागा किंवा ठिकाणे यांसाठी करावयाची तरतूद व त्यासंबंधातील फी किंवा शुल्क.

**३२६अ.** (१) आयुक्तास, पोलीस आयुक्त, मुंबई यांच्याशी विचारविनिमय केल्यानंतर वेळोवेळी, त्याला योग्य वाटतील अशा सार्वजनिक रस्त्याच्या किंवा सार्वजनिक ठिकाणाच्या कोणत्याही भागामध्ये वाहने उभी करून ठेवण्याच्या किंवा थांबविण्याच्या जागा किंवा ठिकाणे राखून ठेवता येतील.

(२) आयुक्तास, महानगरपालिकेच्या संमतीने, त्याला योग्य वाटतील अशा अटी व शर्ती यांना अधीन राहून, कोणत्याही व्यक्तीकडून, तिने वाहन उभे करून ठेवण्यासाठी किंवा थांबविण्यासाठी अशा जागेच्या किंवा ठिकाणाच्या केलेल्या वापराकरिता प्रत्येक दिवसासाठी किंवा त्याच्या भागासाठी त्याला योग्य वाटेल अशी फी किंवा शुल्क आकारता येईल :

परंतु, आयुक्ताने निश्चित केलेल्या व महानगरपालिकेने मान्यता दिलेल्या, दिनांक १५ ऑक्टोबर, १९८८ ला सुरू होणाऱ्या व मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९९० याच्या प्रारंभाच्या लगतपूर्वीच्या दिनांकाला समाप्त होणाऱ्या मुदतीतील वाहने उभी करून ठेवण्याच्या जागा व शुल्क भरून वाहने उभी करून ठेवण्याच्या योजनेखाली वाहने उभी करून ठेवण्याकरिता असलेली फी किंवा शुल्क यांचे दर हे, कलमान्वये निश्चित केलेल्या, वाहने उभी करून ठेवण्याच्या जागा व फी किंवा शुल्काचे दर असल्याचे मानण्यात येईल व या कलमान्वये त्यामध्ये फेरबदल किंवा सुधारणा करण्यात येईतोपर्यंत ते अंमलात असण्याचे चालू राहील.]

१९९० चा महा. ३४.

---

[१] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ४ अन्वये हे शीर्षक व कलम समाविष्ट करण्यात आले व ते १५ ऑक्टोबर, १९९८ पासून समाविष्ट केले असल्याचे मानण्यात येईल.

[१][**३२६ब.** (१) आयुक्त, वेळोवेळी, पोलीस आयुक्ताशी विचारविनिमय करून, क्षेत्र अनुज्ञापन, परिवेश (कॉर्डन) दरनिश्चिती, पूरक अनुज्ञापन, सर्व वाहनांच्या प्रवेशासाठी सडकेवरील आणि सडकेच्या बाजूस वाहने उभी करून ठेवणे, इत्यादींसाठी (शुल्क) आकारणे यांसारख्या मार्ग दरनिश्चिती पद्धतींसह कोणत्याही "वाहतुकीच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या उपाययोजना" सुरू करण्यासाठी असलेले क्षेत्र म्हणून अधिसूचित करण्यासाठी कोणतेही क्षेत्र विनिर्दिष्ट करू शकेल.

वाहतुकीच्या दृष्टीने आवश्यक असलेल्या उपाययोजना सुरू करण्याचा आयुक्ताचा अधिकार.

**स्पष्टीकरण.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनार्थ,—

(एक) "परिवेश (कॉर्डन) दरनिश्चिती" म्हणजे, नामनिर्दिष्ट क्षेत्रांमधील प्रवेशांच्या सर्व ठिकाणी मार्ग पार करून जाणाऱ्या वाहनांकडून देय असलेले आकार ;

(दोन) "पूरक अनुज्ञापन" म्हणजे, विनिर्दिष्ट वेळेत वाहनांचा वापर करण्याकरिता शहराच्या विवक्षित क्षेत्रांमध्ये आकारण्यात येणारी लायसन फी.

(२) आयुक्त, महानगरपालिकेकडून निर्धारित करण्यात येतील अशा अटी व शर्तींना अधीन राहून, कोणत्याही व्यक्तींकडून किंवा संघटनेकडून, किंवा यथास्थिति, संस्थेकडून दर दिवसासाठी किंवा त्याच्या भागासाठी अशा क्षेत्रांच्या वापराकरिता अशी फी किंवा आकार आकारू शकेल.]

## सडकांना नावे देणे, इत्यादी

**३२७.** (१) [२][आयुक्तास] वेळोवेळी,—

सडकांना नाव देणे व [३][परिवास्तूंना] क्रमांक देणे.

(अ) महानगरपालिकेच्या मंजुरीने, कोणतीही सडक ज्या नावाने ओळखली जावी, ते नाव निर्धारित करता येईल ;

(ब) प्रत्येक सडकेच्या प्रत्येक टोकाजवळच्या कोपऱ्यावर किंवा प्रवेशस्थानी किंवा त्याजवळ असलेल्या कोणत्याही घराच्या ठळक भागावर अशा सडकेचे याप्रमाणे निर्धारित केलेले नाव लावण्याची तजवीज करता येईल किंवा रंगाने काढून घेता येईल.

[४][(क) महानगरपालिकेच्या मंजुरीने [५][कोणतीही परिवास्तू किंवा तिचा भाग ज्यावरून ओळखला जाईल तो क्रमांक] किंवा पोट-क्रमांक निर्धारित करता येईल ;]

[६][(ड) लेखी नोटिशीअन्वये, कोणत्याही परिवास्तूच्या किंवा तिच्या भागाच्या मालकास, एकतर अशा परिवास्तूवर किंवा तिच्या भागावर अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा जागी व अशा रीतीने क्रमांक किंवा पोट-क्रमांक धातूच्या बनवलेल्या पाटीच्या सहाय्याने लावण्यास किंवा आयुक्ताच्या आदेशाखाली असे काम पार पाडण्यात यावे, [७][असे] लेखी कळविण्यास तो त्यास फर्मावू शकेल.]

---

[१] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २४ अन्वये कलम ३२६ ब दाखल करण्यात आले.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ११४(अ) अन्वये "महापौरासह परिषदेस" या शब्दाऐवजी "आयुक्तास" हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २(१)(क) अन्वये "घर" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९११ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम १०(१) अन्वये मूळ खंड (क) ऐवजी खंड (क) आणि (ड) दाखल करण्यात आले.

[५] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २(१) (अ) (एक)अन्वये "ज्या नंबरावरून कोणतीही जागा ओळखता येईल तो नंबर" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम २(१) (अ) (दोन) अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[७] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १३५ (अ) (दोन)अन्वये "अशी त्यांची इच्छा असल्याबद्दल" या मजकुराऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

L-12—H 4167 (Page 294-310)



(२) कोणत्याही व्यक्तीला, आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून किंवा इतर कायदेशीर प्राधिकारावाचून, असे कोणतेही नाव, क्रमांक किंवा पोट-क्रमांक नष्ट करता येणार नाही, तो काढून टाकता येणार नाही, विरूपित करता येणार नाही किंवा [१][कोणत्याही तऱ्हेने त्याची नुकसानी किंवा त्यात फेरफार करता येणार नाही अथवा असा क्रमांक किंवा पोट-क्रमांक धारण करणारी कोणतीही धातूची पाटी नादुरुस्त स्थितीत किंवा अन्यथा वाचता येणार नाही अशा स्थितीत पडून राहू दिली जाणार नाही, किंवा आयुक्ताच्या आदेशाखाली लावले असेल किंवा रंगाने काढविण्यात आले असेल, त्याऐवजी कोणतेही निराळे नाव किंवा कोणताही क्रमांक किंवा पोट-क्रमांक लावता किंवा रंगाने काढवून घेता येणार नाही.]

[२][(३) [३][पोटकलम (१), खंड (ड) यास अनुसरून, आयुक्ताच्या आदेशाखाली कोणत्याही परिवास्तूवर किंवा तिच्या भागावर एखादा क्रमांक किंवा पोट-क्रमांक लावण्यात आला असेल त्या बाबतीत, अशा कामाचा खर्च, यथास्थिति, अशा परिवास्तूचा किंवा तिच्या भागाचा मालक देईल :]

परंतु, अशा कामाकरिता घ्यावयाच्या आकाराचा कमाल दर हा, आयुक्त [४][महानगरपालिकेच्या] पूर्वमंजुरीने निश्चित करील.]

[५][**स्पष्टीकरण**.—या कलमातील "परिवास्तू" या संज्ञेत, ज्या जमिनीवर बांधकाम करण्यात आलेले नसेल अशा जमिनीचा समावेश होणार नाही.]

### [६][आकाशचिन्हे व जाहिराती

आकाश चिन्हांबाबत विनियम.

**३२८.** (१) कोणत्याही व्यक्तीला, आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून कोणतेही आकाशचिन्ह—मग ते आता अस्तित्वात असो वा नसो—उभारता, लावता किंवा ठेवता येणार नाही. [७][आकाश चिन्हावर चलचित्रपट किंवा रंगभूमीवरील नाटक किंवा दुसरा एखादा रंगभूमीवरील प्रयोग त्यातील एखादे दृश्य असलेले भित्तिचित्र असेल अशा बाबतीत, आयुक्ताने अशा भित्तिचित्राची पूर्वछाननी केलेली असल्याखेरीज व असे भित्तीचित्र उभारल्यामुळे किंवा लावल्यामुळे सभ्यतेचा किंवा नीतिमत्तेचा भंग होण्याची शक्यता नाही, याबद्दल त्याची खात्री झालेली असल्याखेरीज, अशी परवानगी देण्यात येणार नाही. या कलमाखाली द्यावयाची कोणतीही परवानगी] किंवा नवीकरण, प्रत्येक वेळी ती दिल्याच्या किंवा तिचे नवीकरण केल्याच्या तारखेपासून दोन वर्षांपेक्षा अधिक कालावधीकरिता देता येणार नाही :

[८][* * * * * *]

---

[१] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २(१) (ब) अन्वये "अशा कोणत्याही नावाचा किंवा नंबराचा" या शब्दांनी सुरू होणाऱ्या व "देता किंवा रंगविता कामा नये" या शब्दांनी संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९११ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम १०(२) अन्वये हे पोटकलम जादा दाखल करण्यात आले.

[३] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २२, कलम २(१) (क) अन्वये "जेव्हा कोणत्याही जागेत पोट-कलम (१), खंड (ड) अनुसार" या मजकुराने सुरू होणाऱ्या व "जागेच्या मालकाने देण्याजोगा असेल" या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ११४ (ब) अन्वये "प्रभारी सदस्याच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २(१)(ड) अन्वये हे स्पष्टीकरण जादा दाखल करण्यात आले.

[६] सन १९२१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम १० अन्वये मूळ शीर्षक व कलम ३२८ याऐवजी हे शीर्षक व नवीन कलमे ३२८ व ३२८अ दाखल करण्यात आली.

[७] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ९ अन्वये "अशी लेखी परवानगी देण्यात येणार नाही" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[८] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ११५(अ) अन्वये परंतुक वगळण्यात आले.

L-12—H 4167 (Page 294-310)



[१][परंतु,] आयुक्ताने या कलमाखाली दिलेली लेखी परवानगी किंवा तिचे केलेले नवीकरण पुढीलपैकी कोणत्याही बाबतीत निरर्थक होईल :—

(अ) महानगरपालिका [२][शहर अभियंत्याच्या] निदेशाखाली आकाशचिन्ह सुरक्षित करण्यासाठी त्यात जी कोणतीही वाढ करावयाची असेल, तिच्या भरीला त्यात कोणतीही इतर वाढ करण्यात येईल तर ;

(ब) अशा आकाशचिन्हात किंवा त्याच्या कोणत्याही भागात कोणताही बदल करण्यात येईल तर ;

(क) असे आकाशचिन्ह किंवा त्याचा कोणताही भाग अपघातामुळे, जीर्ण झाल्यामुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे पडेल तर ;

(ड) असे आकाशचिन्ह ज्या इमारतीवर किंवा संरचनेवर उभारण्यात, लावण्यात किंवा ठेवण्यात आले असेल, त्या इमारतीत किंवा संरचनेत कोणतीही वाढ किंवा फेरफार करण्यात येईल व अशा वाढीमुळे किंवा फेरफारामुळे असे आकाशचिन्ह किंवा त्याचा कोणताही भाग हलवावा लागत असेल तर ;

(ई) असे आकाशचिन्ह ज्या इमारतीवर किंवा संरचनेवर उभारण्यात, लावण्यात किंवा ठेवण्यात आले असेल, ती इमारत किंवा संरचना बिनभोगवट्याची होईल तर किंवा पाडून टाकण्यात किंवा नष्ट करण्यात येईल तर.

१९५० चा मुंबई ७. १९५६ चा मुंबई ५.

(२) कोणतेही आकाशचिन्ह [३][मुंबई नगरपालिका (हद्दी वाढविण्याबाबत) अधिनियम, १९५० हा अंमलात आल्यानंतर शहरात किंवा उपनगरात] [४][किंवा मुंबई नगरपालिका [हद्दी आणखी वाढविणे व अनुसूची बबअ (सुधारणा)] अधिनियम, १९५६ हा अंमलात आल्यानंतर वाढवलेल्या उपनगरात हे कलम अंमलात आल्यानंतर] कोणत्याही जमिनीवर, इमारतीवर किंवा संरचनेवर उभारण्यात, लावण्यात किंवा ठेवण्यात येईल तेव्हा, यात यापूर्वी तरतूद केल्याप्रमाणे परवानगी देण्यात आली असेल त्या खेरीज अशा जमिनीच्या, इमारतीच्या किंवा संरचनेच्या मालकाने किंवा भोगवटादाराने असे आकाशचिन्ह या कलमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून—असे उल्लंघन आपल्या नोकरीत किंवा नियंत्रणाखाली नसलेल्या व्यक्तीने केले होते किंवा असे उल्लंघन त्याकडे त्याचा कानाडोळा न होता झालेले होते असे सिद्ध केलेले नसेल तर—उभारले, लावले किंवा ठेवले आहे, असे मानण्यात येईल.

(३) जर कोणतेही आकाशचिन्ह या कलमाच्या तरतुदींविरुद्ध उभारण्यात, लावण्यात किंवा ठेवण्यात आले असेल तर किंवा ते उभारण्यासाठी, लावण्यासाठी किंवा ठेवण्यासाठी ज्या कोणत्याही कालावधीपर्यंत परवानगी देण्यात आली असेल ती परवानगी समाप्त झाल्यानंतर किंवा ती निरर्थक झाल्यानंतर आयुक्तास, लेखी नोटीस देऊन, ज्या जमिनीवर, इमारतीवर किंवा संरचनेवर असे आकाशचिन्ह उभारण्यात, लावण्यात किंवा ठेवण्यात आले असेल, त्या जमिनीच्या, इमारतीच्या किंवा संरचनेच्या मालकास किंवा भोगवटादारास ते खाली उतरवून, काढून टाकण्याविषयी फर्मावता येईल.

या कलमात, "आकाशचिन्ह" या शब्दप्रयोगाचा अर्थ, कोणतीही जमीन, इमारत किंवा संरचना यांवर संपूर्णपणे किंवा अंशतः कोणताही खांब, स्तंभ, प्रमाणभूत चौकट किंवा इतर आधार यांचा आधार दिलेला किंवा यांस जोडलेला जाहिरातीच्या, घोषणेच्या किंवा निदेशनाच्या स्वरूपातील कोणताही शब्द, अक्षर, प्रतिमान, चिन्ह, साधन किंवा प्रतिकृती असा असून, असे जे आकाशचिन्ह किंवा ज्याचा कोणताही भाग रस्त्यातील कोणत्याही ठिकाणापासून आकाशात दिसू शकतो ते

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ११५(ब) अन्वये "परंतु आणखी असे की" या मजकुराऐवजी "परंतु" हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम ६ अन्वये "कार्यकारी अभियंत्याच्या" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम २७ अन्वये "हे कलम अधिनियमित केल्यावर" या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम २० अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

L-12—H 4167 (Page 294-310)



आकाशचिन्ह, असा आहे व त्यामध्ये असा संपूर्ण खांब, स्तंभ, प्रमाणभूत चौकट किंवा इतर आधार याचा किंवा त्याच्या प्रत्येक भागाचा समावेश होतो. "आकाशचिन्ह" या शब्दप्रयोगात कोणतीही जमीन, इमारत किंवा संरचना यावर किंवा कोणत्याही सडकेवर कोणतीही जाहिरात, घोषणा किंवा निदेशन याच्या प्रयोजनासाठी संपूर्णपणे किंवा अंशतः उपयोगात आणलेला कोणताही वायूगोल, हवाई छत्री किंवा तत्सम इतर साधन यांचाही समावेश होतो. परंतु, त्यात पुढील गोष्टींचा समावेश होणार नाही—

(अ) कोणताही ध्वजदंड, स्तंभ, वायुध्वज किंवा वातकुक्कुट, हा कोणतीही जाहिरात, घोषणा किंवा निदेशन यांच्या प्रयोजनासाठी संपूर्णपणे किंवा अंशतः योजण्यात किंवा वापरण्यात आला नसेल तर, असा ध्वजदंड, स्तंभ, वायुध्वज किंवा वातकुक्कुट ;

(ब) कोणत्याही इमारतीच्या भिंतीच्या टोकावर किंवा प्राकारावर किंवा कोणत्याही भिंतीच्या कंगोऱ्यावर किंवा रोधकस्तरावर किंवा छपराच्या कडेवर मजबूत बसवलेले कोणतेही चिन्ह किंवा कोणताही फलक, चौकट किंवा इतर यंत्रक :

परंतु असा फलक, चौकट किंवा इतर यंत्रक एकाच सलग पातळीचे असतील व ते खुले काम असणार नाही. तसेच ते ज्यावर, ज्यास किंवा ज्याच्या बाजूवर बसवलेले किंवा टेकलेले असेल त्या भिंतीच्या, प्रकाराच्या किंवा कडेच्या कोणत्याही भागाच्यावर तीन फुटांहून अधिक उंच असणार नाही ;

(क) एखाद्या रेल्वे कंपनीच्या धंद्याशीच केवळ संबंधित असलेला व कोणतीही रेल्वे, रेल्वे स्थानक, रेल्वे आवार, फलाट किंवा रेल्वे कंपनीच्या मालकीचा स्थानकाकडे जाणारा पोचमार्ग यांवर किंवा याच्यावर कोणत्याही रस्त्यावर किंवा सार्वजनिक जागेवर पडणार नाही, अशा रीतीने सर्वस्वी रोवलेला, पूर्वोक्तप्रमाणे असलेला कोणताही शब्द, अक्षर, प्रतिमान, चिन्ह, साधन किंवा प्रतिकृती ;

(ड) विकावयाच्या किंवा भाड्याने द्यावयाच्या जमिनीसंबंधी किंवा इमारतीसंबंधी, अशा जमिनीवर किंवा इमारतीवर लावलेली कोणतीही नोटीस.]

जाहिरातीचे विनियमन व नियंत्रण.

[१][**३२८अ.** (१) कोणत्याही व्यक्तीला, आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून कोणत्याही जमिनीवर, इमारतीवर, भिंतीवर, फलकावर अथवा संरचनेवर कोणतीही जाहिरात—मग ती आता अस्तित्वात असो वा नसो—उभारता, प्रदर्शित करता, लावता किंवा ठेवता येणार नाही. [२][जाहिरातीमध्ये चलचित्रपट किंवा रंगभूमीवरील नाटक किंवा दुसरा एखादा रंगभूमीवरील प्रयोग यातील एखादे दृष्य दाखवलेले असेल अशा बाबतीत, आयुक्ताने अशा जाहिरातीची पूर्वछाननी केलेली असल्याखेरीज व अशी जाहिरात लावल्यामुळे किंवा प्रदर्शित केल्यामुळे सभ्यतेचा किंवा नीतिमत्तेचा भंग होण्याची शक्यता नाही, याबद्दल त्याची खात्री झालेली असल्याखेरीज, अशी परवानगी देण्यात येणार नाही :]

[३][परंतु, या पोट-कलमान्वये आयुक्ताला असलेला अधिकार हा, याबाबतीत तयार करण्यात आलेल्या विनियमांच्या अधीन असेल :]

परंतु नेहमी असे की, जी कोणतीही जाहिरात रोषणाईच्या स्वरूपातील जाहिरात नसेल किंवा आकाशचिन्ह नसेल व पुढील प्रकारची असेल, अशा जाहिरातीच्या बाबतीत [४][या कलमाखाली कोणतीही परवानगी] आवश्यक असणार नाही :—

(अ) कोणत्याही इमारतीच्या खिडकीच्या आत प्रदर्शित केलेली असेल, अशी जाहिरात ;

(ब) अशी जाहिरात जिच्यावर प्रदर्शित करण्यात आली असेल, अशा जमिनीच्या किंवा इमारतीच्या आत चालवलेल्या उदिमासंबंधी किंवा धंद्यासंबंधी असेल किंवा अशा जमिनीच्या किंवा इमारतीच्या कोणत्याही विक्रीसंबंधी असेल किंवा ती भाड्याने देण्यासंबंधी असेल किंवा

---

[१] सन १९२१ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम १० अन्वये मूळ शीर्षक व कलम ३२८ यांऐवजी हे शीर्षक व कलमे ३२८ आणि ३२८अ ही दाखल करण्यात आली.

[२] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम १०(अ) अन्वये हे शब्द बदली दाखल करण्यात आले.

[३] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १३७ अन्वये हे परंतुक दाखल करण्यात आले.

[४] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम १०(ब) अन्वये, "अशी परवानगी" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

तिच्यातील सामानसुमानाच्या विक्रीसंबंधी असेल किंवा तीवर किंवा तिच्या आत होणाऱ्या कोणत्याही विक्रीसंबंधी, करमणुकीच्या कार्यक्रमांसंबंधी किंवा सभेसंबंधी असेल [१][किंवा जिच्यावर अशी जाहिरात प्रदर्शित करण्यात आली असेल, अशा कोणत्याही ट्रॅमगाडीच्या, बसच्या किंवा इतर वाहनाच्या मालकाने चालवलेला उदीम किंवा धंदा यासंबंधी असेल अशी जाहिरात];

(क) कोणत्याही रेल्वे कंपनीच्या धंद्यासंबंधी असेल अशी जाहिरात ;

(ड) कोणत्याही रेल्वे स्थानकाच्या आत प्रदर्शित केलेली किंवा रेल्वे कंपनीच्या कोणत्याही भिंतीवर किंवा इतर मालमत्तेवर—अशा भिंतीचा किंवा मालमत्तेचा जो कोणताही भागांश कोणत्याही सडकेसमोर येत असेल त्याच्या पृष्ठभागाव्यतिरिक्त—प्रदर्शित केलेली जाहिरात :

[२][परंतु आणखी असे की,—

१९५० चा मुंबई ७. (एक) मुंबई नगरपालिका (हद्दी वाढविण्याबाबत) अधिनियम, १९५० हा अंमलात आल्यानंतर, उपनगरांतील ज्या ठिकाणावर १ जानेवारी, १९५० रोजी जाहिराती लावलेल्या होत्या, त्या ठिकाणावरील जाहिरातींच्या बाबतीत ;

(दोन) मुंबई नगरपालिका [हद्दी आणखी वाढविणे व अनुसूची बबअ (सुधारणा)] अधिनियम, १९५६ हा अंमलात आल्यानंतर वाढवलेल्या उपनगरांतील ज्या ठिकाणावर १ जानेवारी, १९५६ रोजी जाहिरात, लावलेल्या होत्या, त्या ठिकाणावरील जाहिरातींच्या बाबतीत ;

तीन वर्षे कालावधीपर्यंत अशा परवानगीची आवश्यकता असणार नाही.]

१९५० चा मुंबई ७. १९५६ चा मुंबई ५७. (२) हे कलम अधिनियमात दाखल करण्यात आल्यापासून [३][किंवा यथास्थिति, मुंबई नगरपालिका (हद्दी वाढविण्याबाबत) अधिनियम, १९५० हा अंमलात आल्यापासून [४][किंवा मुंबई नगरपालिका [हद्दी आणखी वाढविणे व अनुसूची बबअ (सुधारणा)] अधिनियम, १९५६ हा अंमलात आल्यापासून] तीन महिन्यानंतर कोणत्याही जमिनीवर, इमारतीवर, भिंतीवर, फलकावर किंवा संरचनेवर कोणतीही जाहिरात उभारण्यात, प्रदर्शित करण्यात, लावण्यात किंवा ठेवण्यात येईल, त्याबाबतीत यात यापूर्वी तरतूद केल्याप्रमाणे परवानगी देण्यात आली असेल किंवा परवानगीची माफी देण्यात आली असेल त्याच्याव्यतिरिक्त इतर प्रसंगी अशा जमिनीचा, इमारतीचा, भिंतीचा, फलकाचा किंवा संरचनेचा मालक किंवा भोगवटादार हा, जिने अशी जाहिरात या कलमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून–असे उल्लंघन आपल्या नोकरीत किंवा नियंत्रणाखाली नसलेल्या व्यक्तीने केले होते किंवा असे उल्लंघन त्याकडे त्याचा कानाडोळा न होता घडलेले होते, असे सिद्ध करील तर ती बाब वेगळी–उभारली, प्रदर्शित केली, लावली किंवा ठेवली आहे, अशी व्यक्ती असल्याचे मानण्यात येईल.

(३) जर कोणतीही जाहिरात उभारण्यासाठी, प्रदर्शित करण्यासाठी, लावण्यासाठी किंवा ठेवण्यासाठी ज्या कोणत्याही कालावधीपर्यंत लेखी परवानगी देण्यात आली असेल, तो कालावधी संपल्यानंतर किंवा अशी परवानगी निरर्थक झाल्यानंतर, अशी कोणतीही जाहिरात या कलमाच्या तरतुदींच्या विरुद्ध उभारण्यात, प्रदर्शित करण्यात, लावण्यात किंवा ठेवण्यात आली असेल, तर आयुक्त लेखी नोटीस देऊन, ज्या जमिनीवर, इमारतीवर, भिंतीवर, फलकावर किंवा संरचनेवर अशी जाहिरात उभारण्यात, प्रदर्शित करण्यात, लावण्यात किंवा ठेवण्यात आली असेल, त्या जमिनीच्या, इमारतीच्या, भिंतीच्या, फलकाच्या किंवा संरचनेच्या मालकास किंवा भोगवटादारास ती खाली उतरवून काढून टाकण्याविषयी फर्मावू शकेल.

---

[१] सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम १५(अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम २१(१) अन्वये हे परंतुक बदली दाखल करण्यात आले.

[३] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम २८(ब) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम २१(२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(४) [१][(अ)] या कलमातील " संरचना " या संज्ञेत [२][ट्रॅमगाडी आणि जाहिरात बस म्हणून किंवा जाहिरातीचे माध्यम म्हणून मुख्यत्वेकरून उपयोगात आणलेली बस आणि कोणतेही इतर वाहन आणि कोणताही चल फलक] यांचा समावेश होतो ; [३][आणि

(ब) या कलमातील " रोषणाई केलेली जाहिरात " या संज्ञेत, जर असे प्रदर्शन—

(एक) फक्त वस्तूचे नाव किंवा तिच्या उत्पादकाचे नाव किंवा या दोहोंची नावे दर्शवणारी लेबले लावलेल्या मालाचे असेल, आणि

(दोन) आयुक्ताच्या मते रात्री माल व लेबले दिसण्यासाठी आवश्यक असेल तेवढ्या प्रकाशापेक्षा जास्त प्रकाशाच्या सहाय्याने केले नसेल तर,

अशा रीताने रोषणाई करून माल प्रदर्शित करण्याचा समावेश होणार नाही.]]

## धोक्याच्या जागा

धोक्याच्या जागा दुरुस्त करण्यासाठी किंवा त्यांस कुंपण घालण्यासाठी आयुक्ताने कार्यवाही करणे.

**३२९.** (१) जर आयुक्ताच्या मते, कोणतीही जागा ही पुरेशा दुरुस्तीच्या, संरक्षणाच्या किंवा कुंपणाच्या अभावी किंवा त्यावर करण्यात येत असलेल्या कोणत्याही कामामुळे, सडकेवरून जाण्याऱ्यायेणाऱ्या प्रवाशांना किंवा उक्त जागेचा मालक किंवा भोगवटादार यांहून अन्य अशा, तेथे किंवा तिच्या जवळपास कायदेशीर प्रवेश असलेल्या व्यक्तीस, धोक्याची असेल तर, आयुक्त, लेखी नोटीस देऊन, अशा जागेच्या मालकास किंवा भोगवटादारास उक्त जागा दुरुस्त करण्यास, संरक्षित करण्यास किंवा तिला कुंपण घालण्यास किंवा तिच्यापासून असलेला धोका टाळण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशी उपाययोजना करण्यास फर्मावू शकेल.

(२) अशी कोणतीही नोटीस देण्यापूर्वी किंवा अशा कोणत्याही नोटिशीचा कालावधी संपण्यापूर्वी, उक्त जागेपासून असलेला धोका टाळण्यासाठी आयुक्तास योग्य वाटेल अशी तात्पुरती उपाययोजना करता येईल. अशी तात्पुरती उपाययोजना करण्यासाठी आयुक्तास आलेला कोणताही खर्च जिच्यासंबंधी उक्त नोटीस दिली असेल, त्या जागेचा मालक किंवा भोगवटादार देईल.

## सडकांवर दिवाबत्तीची व्यवस्था करणे

सार्वजनिक सडकांवर दिवाबत्तीची व्यवस्था करणे.

**३३०.** आयुक्त—

(अ) सार्वजनिक सडकांवर आणि महानगरपालिकेच्या बाजारांत व महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या सर्व इमारतींत सोईस्कर रीतीने दिवाबत्तीची व्यवस्था करण्याची उपाययोजना करील ; आणि

(ब) उक्त प्रयोजनाकरिता आवश्यक असतील, तितके दिवे, दिव्यांचे खांब व इतर साधने प्राप्त करून घेईल, उभारील व सुस्थितीत राखील ; आणि

(क) असे दिवे, तेल, गॅस, वीज किंवा महानगरपालिका वेळोवेळी निर्धारित करील असे इतर साधन, यांनी लावण्याची तजवीज करील ; आणि

(ड) असे दिवे लावण्याकरिता, कोणत्याही स्थावर मालमत्तेखाली, तिच्यावर, तिच्या बाजूला किंवा तिच्या आडव्या विजेच्या तारा घालील व तिचे परिरक्षण करील. तसेच ते दिवे किंवा विजेच्या तारा नेण्याकरिता, टांगत्या ठेवण्याकरिता किंवा त्यास आधार देण्याकरिता अशा मालमत्तेच्या आत किंवा वर खांब, स्तंभ, दंड, मेढ्या, तीर, ब्रॅकेट व इतर साधने, त्या संबंधातील भरपाईबाबतच्या कोणत्याही हक्कमागणीस उत्तरदायी न राहता, बसवील व त्यांचे परिरक्षण करील :

---

[१] सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम २(१) अन्वये "(अ)" हा कंस आणि हे अक्षर समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम १५(ब) अन्वये "चाके लावलेले कोणतेही हलविता येणारे फलक" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम २(२) अन्वये हा मजकुर जादा दाखल करण्यात आला.

परंतु, अशा तारा, खांब, स्तंभ, दंड, मेढ्या, तीर, ब्रॅकेट व इतर साधने यांपासून कोणत्याही व्यक्तीस शक्यतो फारशी गैरसोय किंवा उपद्रव होणार नाही अशा रीताने उभी करण्यात येतील.

दिवे काढून नेणे, इत्यादींस मनाई.

**३३१.** कोणतीही व्यक्ती कायदेशीर प्राधिकारावाचून,—

(अ) कोणत्याही सार्वजनिक सडकेवर किंवा महानगरपालिकेच्या कोणत्याही बाजारात किंवा महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या इमारतीत लावलेला कोणताही दिवा, दिव्याचा खांब किंवा कंदील ;

(ब) असा कोणताही दिवा लावण्यासाठी असलेली कोणतीही विजेची तार ;

(क) अशी कोणतीही विजेची तार किंवा दिवा नेण्याकरिता, टांगता ठेवण्याकरिता किंवा त्यास आधार देण्याकरिता असलेला कोणताही खांब, स्तंभ, दंड, मेढ्या, तीर, ब्रॅकेट व इतर साधने ;

ही काढून नेणार नाही, हेतुपुरस्सर फोडणार नाही, खाली फेकणार नाही किंवा त्यांची नुकसानी करणार नाही आणि कोणतीही व्यक्ती असा कोणताही दिवा हेतुपुरस्सर मालवणार नाही किंवा त्यास जोडलेल्या कोणत्याही वस्तूची नुकसानी करणार नाही.

अभावितपणे दिवा फोडणाऱ्या व्यक्तीने मोडतोड दुरुस्त करणे.

**३३२.** जर कोणतीही व्यक्ती निष्काळजीपणामुळे किंवा अभावितपणे कोणत्याही सार्वजनिक सडकेवर किंवा महानगरपालिकेच्या बाजारात किंवा महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या इमारतीत लावलेला दिवा फोडील तर, ती, तिच्या हातून अशा रीतीने झालेली मोडतोड दुरुस्त करण्यासाठी झालेला खर्च देईल.

गॅसचे नळ बसवण्याची रीत.

**३३३.** (१) नालित किंवा उघड्या वाहिकेच्या पृष्ठभागावर किंवा घराच्या बोळकांडीत कोणत्याही गॅसचा नळ बसवण्यात येणार नाही.

(२) गॅसचे नळ हे, सडकेची रुंदी लक्षात घेऊन, पाण्याच्या नळापासून शक्य तितक्या लांब अंतरावर बसवण्यात येतील. सडकेच्या रुंदीप्रमाणे शक्य असेल तेथे उक्त अंतर हे चार फुटांहून कमी असणार नाही.

(३) एखादा गॅसचा नळ पाण्याच्या नळास आडवा टाकणे आवश्यक असेल तेव्हा, गॅसचा नळ हा, शक्य असेल तर, पाण्याच्या नळाच्या वर बसवण्यात येईल. याप्रमाणे बसवलेला गॅसचा नळ कमीतकमी नऊ फूट लांब असेल आणि तो, जागेनुसार जास्तीत जास्त शक्य तेथवर, पाण्याच्या नळाशी काटकोन होईल अशा रीतीने बसवण्यात येईल, तसेच गॅसच्या नळातील कोणताही जोड कोणत्याही पाण्याच्या नळापासून चार फुटांहून अधिक जवळ येणार नाही, अशा रीतीने बसवण्यात येईल. पाण्याचा नळ व त्यास आडवा जाणारा गॅसचा नळ यांच्यामध्ये शक्य तितके अधिक अंतर ठेवलेले असेल आणि गॅसच्या संपूर्ण नळास चांगल्या चिकण मातीचा किंवा उत्तम टिकाऊ अशा इतर योग्य पदार्थाचा पुरेसा थर दिलेला असेल आणि तो गॅसच्या नळासभोवती खंदकात चांगल्या रीतीने बसवलेला असेल व ठासून भरलेला असेल.

(४) जर कोणताही गॅसचा नळ हा या कलमाच्या तरतुदींचे कोणत्याही रीतीने उल्लंघन करून बसवला असेल तर, आयुक्तास, अशा नळाच्या बाबतीत त्यास आवश्यक वाटेल असा फेरफार करता येईल आणि त्याचा खर्च ज्या व्यक्तीच्या आदेशानुसार किंवा व्यवस्थापनाखाली हा नळ बसवला असेल, ती व्यक्ती देईल.

आयुक्तास गॅसचे नळ, वगैरेंची जागा बदलता येईल.

**३३४.** (१) आयुक्तास या अधिनियमाच्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनाकरिता, त्यास आवश्यक वाटेल तेव्हा तेव्हा, लेखी नोटीस देऊन, कोणत्याही सडकेत बसवलेला कोणताही गॅसचा नळ किंवा गॅसचे कोणतेही इतर काम त्याच्या मालकास, तो वर उचलण्यास, खालून नेण्यास किंवा अन्यथा अशा नळाची किंवा कामाची जागा बदलण्यास फर्मावता येईल.

(२) पोटकलम (१) खाली करावा लागणारा प्रत्येक फेरफार महानगरपालिका निधीच्या खर्चाने केला जाईल, आणि असा फेरफार केल्यामुळे मालकास जे कोणतेही नुकसान सोसावे लागले असेल त्याबद्दल त्यास आयुक्त भरपाई देईल.

(३) परंतु, या अधिनियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व गोष्टी लक्षात घेऊन कोणताही नळ किंवा कोणतेही काम यांमधून व्यवहार्य असेल तितपत मोकळेपणाने व सोईस्करपणे गॅस जाण्यास प्रतिबंध होईल, अशा प्रकारे असा कोणताही फेरफार करण्यात येणार नाही.

महानगरपालिकेच्या गॅसच्या नळांवर परवानगीवाचून इमारती, वगैरे न उभारणे.

**३३५.** (१) आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून, महानगरपालिकेच्या मालकीच्या कोणत्याही गॅसच्या नळावर कोणतीही इमारत, भिंत किंवा इतर संरचना नव्याने उभारता येणार नाही आणि कोणतीही सडक किंवा रेल्वे बांधता येणार नाही.

(२) जर कोणतीही इमारत, भिंत किंवा इतर संरचना याप्रमाणे उभारली किंवा कोणतीही सडक किंवा रेल्वे याप्रमाणे बांधली, तर आयुक्तास, स्थायी समितीच्या मान्यतेने, ती काढून टाकण्याची तजवीज करता येईल किंवा त्यास योग्य वाटेल अशा इतर रीतीने त्याबाबत कार्यवाही करता येईल आणि त्यामुळे झालेला खर्च हा उत्क्रमण करणारी व्यक्ती देईल.

## सडकांवर पाणी शिंपणे

पाणी शिंपण्यासाठी उपाययोजना.

**३३६.** आयुक्तास,—

(अ) त्यास योग्य वाटेल अशा वेळी, अशा ऋतूंत व अशा रीतीने सार्वजनिक सडकांवर पाणी शिंपण्यासाठी उपाययोजना करता येईल ;

(ब) उक्त प्रयोजनार्थ त्यास योग्य वाटतील अशा पाण्याच्या गाड्या, जनावरे व उपसाधने प्राप्त करून घेता येतील व ती सुस्थितीत राखता येतील.

प्रकरण बारा.

## इमारतीसंबधी विनियम

## इमारती उभारण्यासंबंधी नोटिसा

इमारत उभारण्याच्या इराद्याची आयुक्तस नोटीस देणे.

**३३७.** (१) इमारत उभारण्याचा जिचा इरादा असेल अशी प्रत्येक व्यक्ती या प्रयोजनासाठी कलम ३४४ खाली मिळवलेल्या नमुन्यामध्ये आयुक्तास आपल्या उक्त इराद्याची नोटीस देईल आणि अशा नोटिशीत, उभारावयाचा इरादा असलेल्या इमारतीचे स्थान, इमारतीचे वर्णन, ती ज्या प्रयोजनासाठी वापरण्याचा इरादा असेल ते प्रयोजन, [१]*** तिची मिती [२][व ती इमारत उभारण्याच्या कामावर पर्यवेक्षण करण्यासाठी ज्या व्यक्तीस नेमण्याचा अशा व्यक्तीचा इरादा असेल, त्या व्यक्तीचे नाव] या गोष्टी विनिर्दिष्ट करील.

[३][(२) या प्रकरणात " इमारत उभारणे " म्हणजे,—

(अ) एखादी इमारत नव्याने उभारणे, अथवा

[४][(ब) (एक) विद्यमान इमारत पूर्णपणे पाडून कोणतीही इमारत पुन्हा उभारणे, अथवा

(दोन) विद्यमान तळमजल्याच्या बांधकामावरचे छप्पर काढून टाकून आणि एक किंवा अधिक मजले वर वाढवून कोणतीही इमारत पुन्हा उभारणे, अथवा]

---

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम ४४ अन्वये "आणि" हा शब्द निरसित करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम४४ अन्वये हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

[३] सन १९१६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम ४ अन्वये मूळ पोट-कलम (२) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[४] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १३८ (१) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

[१][(क) * * * * * *]

(ड) मुळात फक्त एकच राहते घर म्हणून बांधलेल्या एखाद्या इमारतीचे एकापेक्षा अधिक राहत्या घरांत रूपांतर करणे ;

आणि अशा रीतीने उभारलेल्या, पुन्हा उभारलेल्या किंवा रूपांतर केलेल्या राहत्या घरास या प्रकरणात " नवीन इमारत " असे म्हटले आहे.]

आयुक्त, आराखडे व इतर दस्तऐवज पुरवण्यास फर्मावू शकेल.

**३३८.** [२][(१)] कलम ३३७ खाली कोणतीही नोटीस मिळाल्यानंतर तीस दिवसांच्या आत कोणत्याही वेळी, आयुक्तास, या कलमात यापूर्वी प्रथम उल्लेख केलेली नोटीस देणाऱ्या व्यक्तीस पुढील सर्व किंवा कोणतेही दस्तऐवज आपणास पुरवण्याबाबत, लेखी नोटिशीद्वारे फर्मावता येईल, ते दस्तऐवज येणेप्रमाणे :—

[३][(अ) जी इमारत उभारण्याचा इरादा असेल, त्या इमारतीच्या प्रत्येक मजल्याचे बिनचूक आराखडे व छेदनदेखावे दर आठ फुटांस एक इंच यापेक्षा कमी नसेल असे प्रमाण धरून काढण्यात येतील. आणि त्यांत, अशी इमारत व तिची उपांगे यांची स्थिती, रूप, विस्तार, अशा इमारतीचे निरनिराळे भाग व तिची उपांगे, यांत वायुवीजनाची साधने व त्याकडे जाण्याचे मार्ग [४][आणि त्यांचा जो भाग किंवा जे भाग मानवी निवासासाठी वापरण्याचा इरादा असेल व जो भाग किंवा जे भाग त्यासाठी वापरण्याचा इरादा नसेल, असा विवक्षित भाग किंवा असे विवक्षित भाग] दर्शविण्यात येतील आणि जी इमारत दोन किंवा अधिक कुटुंबासाठी राहते घर म्हणून वापरण्याचा किंवा सार्वजनिक राबत्याचे स्थान म्हणून ज्यात वीसपेक्षा अधिक लोक कामावर ठेवण्यात येतील, असा कोणताही उदीम किंवा धंदा चालविण्यासाठी वापरण्याचा इरादा असेल, अशा इमारतीच्या बाबतीत आत जाण्याचे व बाहेर येण्याचे मार्ग दर्शविण्यात येतील. तसेच असे आराखडे व छेदनदेखावे यांत, पायाची खोली व स्वरूप, तसेच अशा इमारतींच्या सर्व भिंती, खांब, स्तंभ, तुळ्या व कडीपाट आणि अशा इमारतींच्या भिंती, जिने, जमिनी व छपरे यांत वापरावयाच्या सर्व लोखंडी तुळ्या व स्थिरांतर दंड यांचा प्रस्तावित विस्तार दर्शविण्यात येईल;]

[५][(ब) पार पाडण्याचे योजलेल्या कामाच्या प्रत्येक वर्णनाचे आणि वापरावयाच्या सामानाचे तपशीलपत्रक, अशा तपशीलपत्रकात, उभारण्याचा इरादा असलेल्या इमारतीच्या जलनिःस्सारणाच्या प्रस्तावित व्यवस्थेचे आणि वापरावयाच्या स्वच्छताविषयक उपकरणांचे व तसेच पाणीपुरवठ्याच्या साधनांचे वर्णन करण्यात येईल आणि आयुक्ताने फर्मावल्यास, त्याच्यासोबत अशा इमारतीचा कोणताही भाग पुरेसा मजबूत आहे, हे दर्शविणारे तपशिलवार अंदाजही जोडण्यात येतील ;]

(क) अशा इमारतीचा खंड नकाशा, असा खंड नकाशा हा, [६][अशी इमारत ज्या वसतिक्षेत्रात असेल किंवा होणार असेल त्या वसतिक्षेत्रात त्या त्या वेळी अंमलात असलेला सर्वांत मोठा महसूल सर्वेक्षण नकाशा जे प्रमाण धरून] काढलेला असेल, तेच प्रमाण धरून काढण्यात

---

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १३८(२) अन्वये खंड (क) वगळण्यात आला.

[२] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ४५(१) अन्वये कलम ३३८ ला कलम ३३८ (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ४५(२) अन्वये मूळ खंड (अ) ऐवजी हा खंड (अ) दाखल करण्यात आला.

[४] सन १९१६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम ५(१) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ४५(२) अन्वये मूळ खंड (ब) ऐवजी हा खंड (ब) दाखल करण्यात आला.

[६] सन १९१६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम ५(२) अन्वये "प्रत्येक चाळीस फुटांना एक इंचाहून कमी नाही इतके प्रमाण धरून" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

येईल. आणि त्यात अशा इमारतीच्या लगतशेजारी कोणतीही मालमत्ता असल्यास, तिची स्थिती आणि तिची उपांगे अशा इमारतीच्या पुढील बाजूस, कोणतीही सडक असल्यास, तिची आणि मागील बाजूस कोणतीही सडक असल्यास, तिची रुंदी व पातळी आणि अशा इमारतीचा पाया व सर्वात खालच्या मजल्याची जमीन यांची पातळी, तसेच अशा इमारतीच्या कोणत्याही अंगणाची किंवा पटांगणाची पातळी [१][आणि अशा इमारतीकडे जाण्याचे मार्ग] या गोष्टी दर्शवण्यात येतील ;

(ड) अशा इमारतीच्या जलनिःस्सारणाची नियोजित मार्गरेखा व प्रत्येक नालीचा नियोजित आकार, खोली व उतार आणि नाल्यांत वायुवीजनाची जी व्यवस्था करावयाचे योजिले असेल त्या व्यवस्थेचा तपशील दर्शवणारा आराखडा.

[२][(२) उक्त अवधीत कोणत्याही वेळी, आयुक्तास, नियोजित पायाचा कोणताही किंवा कोणतेही भागांश किंवा विद्यमान इमारतीच्या पायाचा किंवा भिंतीचा कोणताही किंवा कोणतेही भागांश निरीक्षणाकरिता उघडण्याविषयी उक्त व्यक्तीस लेखी नोटिशीद्वारे फर्मावता येईल.]

निकटपूर्ववर्ती कलमांखाली सादर केलेले आराखडे, वगैरे लायसनदार सर्वेक्षकाकडून तयार करवून घेण्याविषयी आयुक्त फर्मावू शकेल.

**३३९.** ज्या आराखड्यावर, छेदनदेखाव्यावर किंवा वर्णनावर लायसनदार सर्वेक्षकाने, ते आपण स्वतः किंवा आपल्या पर्यवेक्षणाखाली तयार केले होते, असे दर्शवणारी खूण म्हणून सही केलेली नसेल, असा कोणताही आराखडा, छेदनदेखावा किंवा वर्णन निकटपूर्ववर्ती कलमाच्या प्रयोजनाकरिता पुरेसे म्हणून स्वीकारण्याचे आयुक्तास नाकारता येईल.

अधिक माहिती देण्यास आणि ज्या व्यक्तीने नोटीस दिली असेल तिला हजर राहण्यास फर्मावता येईल.

**३४०.** कलम ३३७ खाली दिलेली नोटीस व कलम ३३८ खाली सादर केलेले कोणतेही दस्तऐवज, यांमध्ये, जर आयुक्ताला त्या प्रकरणात समाधानकारक रीतीने कार्यवाही करणे शक्य व्हावे यासाठी जी माहिती त्यास आवश्यक वाटेल, अशी सर्व माहिती नसेल तर, आयुक्तास उक्त दस्तऐवज मिळाल्यानंतर तीस दिवसांच्या आत कोणत्याही वेळी, लेखी नोटिशीद्वारे, त्यास आवश्यक वाटेल अशी आणखी सविस्तर माहिती आणि तपशील सादर करण्यास फर्मावता येईल.

कलम ३३८ किंवा ३४० खालील फर्मावणीचे अनुपालन न केल्याचा परिणाम.

**३४१.** कलम ३३८ किंवा कलम ३४० खाली कोणत्याही फर्मावणीचे पालन करण्यात आले नाही, तर कलम ३३७ खाली दिलेली नोटीस देण्यात आलेली नाही, असे मानण्यात येईल.

---

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ४५(३) अन्वये हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४५(४) अन्वये हे पोट-कलम (२) समाविष्ट करण्यात आले.

## इमारत उभारणे यात जमा न होणारी कामे पार पाडण्यासंबंधीच्या नोटिसा

**३४२.** (अ) एखाद्या इमारतीत वाढ करण्याचा, [१][ अथवा विद्यमान वापरात बदल करण्याचा ] [३][ इमारतीत वाढ करणे किंवा तिच्या वापरात बदल करणे ], वगैरे संबधीच्या इराद्यांची आयुक्तास नोटीस देणे.

[२][(ब) राहण्यास योग्य बनवणाऱ्या दुरुस्त्या वगळता, अशा इमारतीत, त्या इमारतीचा कोणताही भाग काढून टाकण्याचा, त्यामध्ये फेरफार करण्याचा किंवा तो पुन्हा उभारण्याचा अंतर्भाव होणारा कोणताही फेरफार, दुरुस्ती करण्याचा इरादा असल्यास :

परंतु, इमारतीच्या जोत्याची किंवा पायाची किंवा मजल्याची पातळी खाली आणण्याची परवानगी देण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण**.—या कलमामध्ये " राहण्यास योग्य बनवणाऱ्या दुरुस्त्या ", याचा अर्थ, केवळ,—

(एक) संरक्षणात्मक भागांना किंवा भिंतींना रेती सिमेंटचे कोरडे मिश्रण लावणे ;

(दोन) गिलावा देणे, रंग लावणे, दरजा भरणे ;

(तीन) जमिनीच्या फरशा बदलणे ;

(चार) संडास, स्नानाच्या किंवा धुण्याच्या जागा याची दुरुस्ती ;

(पाच) निचरा नळ, तोट्या, गटारांची तोंडे आणि इतर जोडण्याची दुरुस्ती किंवा त्यांच्या जागी नवीन निचरा नळ इत्यादी बसविणे ;

(सहा) सांडपाणी जोडसामान, नळकाम किंवा जोडण्या यांची दुरुस्ती किंवा त्यांच्या जागी नवीन जोडसामान इत्यादी बसवणे ; आणि

(सात) छपराच्या जागी त्याच सामग्रीचे नवीन छप्पर घालणे :

परंतु, त्यामध्ये पुढील गोष्टींचा अंतर्भाव होणार नाही,—

(अ) संरचनेच्या विद्यमान उभ्या व आडव्या परिमाणांमध्ये बदल करणे ;

(ब) कोणताही संरचनेचा भाग किंवा भार पेलणाऱ्या भिंती यांच्या जागी नवीन भाग इत्यादी बांधणे किंवा ते काढून टाकणे ;

(क) जोते, पाया किंवा मजले यांची पातळी खाली आणणे ;

(ड) पोट-मजला किंवा माळा बांधणे किंवा त्याचा विस्तार करणे ; आणि

(ई) वेगवेगळ्या साहित्याने छप्पर सपाट करणे किंवा त्याची दुरुस्ती करणे.]

[४] [ (क) * * * * ]

[५] [(कक) एखाद्या इमारतीत —

(१) ज्यात अशा इमारतीतील कोणत्याही खोलीच्या दोन किंवा अधिक स्वतंत्र खोल्या बनवण्यासाठी त्या खोल्यांची विभागणी करण्याचा,

(२) ज्यात अशा इमारतीतील जाण्या येण्याच्या मार्गाच्या किंवा जागेच्या एक किंवा अधिक खोल्या बनवण्याचा अंतर्भाव होत असेल, असा कोणताही फेरफार करण्याचा, अथवा ]

(ड) एखाद्या सडकेलगत असलेली जी कोणतीही इमारत अशा सडकेच्या नियत रेषेच्या आत असेल, त्या इमारतीचा कोणताही भागांश काढून टाकण्याचा किंवा पुन्हा बांधण्याचा ;

---

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १३९(अ) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १३९(ब) अन्वये हा खंड दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १३९ (ड) अन्वये समासटिपेमधील, " इमारतीत वाढ करणे " या ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १३९(क) अन्वये हा खंड वगळण्यात आला.

[५] सन १९१६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम ५ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

ज्या कोणत्याही व्यक्तीचा इरादा असेल, ती या प्रयोजनासाठी कलम ३४४ खाली मिळवलेल्या नमुन्यानुसार आयुक्तास, आपल्या उक्त इराद्याची नोटीस देईल आणि अशा नोटिशीत ज्या इमारतीत असे काम पार पाडावयाचे असेल त्या इमारतीची जागा [१]*** जे काम करावयाचे योजिले असेल त्या कामाचे स्वरूप व त्याची व्याप्ती, [२][ अशा कामाचा जो भाग किंवा जे भाग मानवी निवासासाठी वापरण्याचा इरादा असेल असा कोणताही विवक्षित भाग किंवा असे कोणतेही विवक्षित भाग ] [३][ आणि ते काम पूर्ण करण्याच्या कामावर पर्यवेक्षण करण्यासाठी ज्या व्यक्तीस नेमण्याचा इरादा असेल त्या व्यक्तीचे नाव,] या गोष्टी विनिर्दिष्ट करण्यात येतील.

आराखडे व जादा माहिती मागवता येईल.

**३४३.** (१) निकटपूर्ववर्ती कलमाखाली दिलेल्या कोणत्याही नोटिशी अन्वये, या प्रकरणी समाधानकारकपणे कार्यवाही करणे शक्य व्हावे म्हणून आयुक्ताला आवश्यक वाटेल अशी सर्व माहिती पुरवण्यात आली नसेल तर, आयुक्त, उक्त नोटीस मिळाल्यानंतर तीस दिवसांच्या आत कोणत्याही वेळी, या कलमात यापूर्वी प्रथम उल्लेख केलेली नोटीस ज्या व्यक्तीने दिलेली असेल, त्या व्यक्तीस [४][ उक्त इमारतीचे व ] नियोजित नवीन कामाचे किंवा अशा नियोजित नवीन कामाच्या कोणत्याही विनिर्दिष्ट भागाचे आराखडे व छेदनदेखावे पुरवण्याविषयी लेखी नोटिशीअन्वये फर्मावू शकेल. [५][ आणि कलमे ३३८, ३३९, ३४० व ३४१ यांच्या तरतुदी, नियोजित नवीन कामास आयुक्ताच्या मते जेथवर लागू करता येतील तेथवर लागू होतील.]

[६][(२) तसेच आयुक्तास, उक्त कालावधीत कोणत्याही वेळी, लेखी नोटिशीअन्वये उक्त व्यक्तीस विद्यमान इमारतीच्या पायांचा किंवा भिंतींचा कोणताही भागांश किंवा कोणतेही भागांश निरीक्षणासाठी उघडण्यास फर्मावता येईल].

## नोटिशीचे नमुने

नोटिशींचे छापील नमुने लोकांना पुरवणे.

**३४४.** (१) आयुक्त, कलम ३३७ किंवा ३४२ याच्या प्रयोजनांकरिता असलेले नोटिशींचे छापील नमुने, त्यांची आवश्यकता ज्यास असेल अशा कोणत्याही व्यक्तीस , प्रत्येक नमुन्यासाठी आयुक्त, [७][ स्थायी समितीच्या ] मान्यतेने याबाबतीत वेळोवेळी विहित करील, [८][ *** ] इतकी फी देण्यात आल्यानंतर, पुरवण्याची तजवीज करील.

---

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ४६ अन्वये निरसित करण्यात आलेला " आणि " हा शब्द वगळण्यात आला.

[२] सन १९१६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम ६(३) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ४६ अन्वये हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ४७(१) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या वरील कलमाअन्वये मूळ शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ४७(२) अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी हे पोट-कलम (२) दाखल करण्यात आले.

[७] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ११६ अन्वये, " प्रभारी सदस्याच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १४०(अ) अन्वये " अशी पन्नास पैशांपेक्षा अधिक नसेल " हा मजकूर वगळण्यात आला.

(२) अशा प्रत्येक नोटिशीच्या मागील बाजूवर किंवा अशा नोटिशीसोबत जादा आकार न घेता पुरवलेल्या स्वतंत्र कागदावर कलमे ३३७, ३३८, ३३९, ३४०, ३४१, ३४२, ३४३, [१][३४४अ] ३४५, ३४६, ३४७, ३४८, [२][३४९, ३४९अ, ३४९ब] [३][३४९क, ३४९ड] आणि कलम ४६१, याच्या खंड (क), (ड) व (ई) खाली केलेले व त्या त्या वेळी अंमलात असलेले सर्व उपविधी छापण्यात येतील.

**कामाचा प्रारंभ**

[४][**३४४अ.** (१) एखादी इमारत उभारण्याचा किंवा कलम ३४२ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे असलेले कोणतेही बांधकाम करण्याचा जिचा इरादा असेल अशी प्रत्येक व्यक्ती, अशी इमारत उभारण्याच्या किंवा असे बांधकाम पार पाडण्याच्या कामावर पर्यवेक्षण करण्यासाठी, आयुक्ताचे समाधान होईल अशा प्रकारे सक्षम असलेली एखादी व्यक्ती कामावर ठेवील.

इमारतींचे व बांधकामांचे पर्यवेक्षण.

(२) याप्रमाणे कामावर ठेवावयाची व्यक्ती ही लायसनदार सर्वेक्षक असली पाहिजे, असे आयुक्त प्रत्येक बाबतीत फर्मावू शकेल; आणि आयुक्त, यथास्थिति, कलम ३३७ किंवा ३४२ खाली इराद्याविषयीची नोटीस मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत—

(अ) तीमध्ये जिचे नाव असेल अशा व्यक्तीस इमारत किंवा बांधकाम यांवर पर्यवेक्षण करण्यास मान्यता देईल; अथवा

(ब) अशा रीतीने जिचे नाव असेल ती व्यक्ती जर,—

(एक) लायसनदार सर्वेक्षक नसेल, आणि

(दोन) ती, आयुक्ताच्या मते, अशी इमारत किंवा बांधकाम यांवर पर्यवेक्षण करण्यास पात्र व योग्य नसेल, तर, उक्त नोटिशीत सुधारणा करण्यासाठी परत पाठवील.

(३) पोट-कलम (२) खाली सुधारणा करण्यासाठी परत पाठविलेली, इराद्या विषयीची नोटीस, यथोचित सुधारणा करून पुन्हा सादर करण्यात येईतोपर्यंत, ती देण्यात आली नाही, असे मानण्यात येईल.

(४) याप्रमाणे कामावर ठेवलेली व्यक्ती, अशी इमारत किंवा बांधकाम पूर्ण होण्यापूर्वी मरण पावेल किंवा अशा रीतीने कामावर असण्याचे बंद होईल, त्या बाबतीत,—

(अ) एखाद्या लायसनदार सर्वेक्षकाचे नाव ताबडतोब आयुक्तास कळवून त्यास, अथवा

(ब) आयुक्ताने मान्यता दिलेल्या इतर व्यक्तीस कामावर ठेवण्यात येईतोपर्यंत,—

अशी इमारत उभारण्याचे किंवा असे बांधकाम पूर्ण करण्याचे त्यापुढील काम ताबडतोब निलंबित करील.]

**३४५.** कलम ३३७ किंवा ३४२ खालील कोणतीही नोटीस किंवा, यथास्थिति, कलम ३३८, ३४० किंवा ३४३ खाली मागवलेला आराखडा, छेदनदेखावा, वर्णन किंवा आणखी माहिती, कोणतीही असल्यास, ती मिळाल्यानंतर तीस दिवसांच्या आत, आयुक्ताने उक्त नोटीस ज्या व्यक्तीने दिली असेल, त्या व्यक्तीस, जी इमारत उक्त व्यक्तीने उभारण्याचे योजिले असेल, त्या इमारतीबद्दलची किंवा जे बांधकाम पार पाडण्याचे तिने योजिले असेल त्या बांधकामाबद्दलची आपली नामंजुरी लेखी कळवली नाही तर ;

इमारत किंवा बांधकाम पुढे केव्हा सुरू करता येईल.

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ४८(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४८(ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९११ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ११ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९०५चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ४९ अन्वये कलम ३४४अ समाविष्ट करण्यात आले.

किंवा उक्त कालावधीत आयुक्ताने उक्त इमारतीबद्दलची किंवा बांधकामाबद्दलची आपली मान्यता उक्त व्यक्तीस लेखी कळवली तर,

उक्त व्यक्तीस आयुक्ताला नोटीस सुपूर्द केल्याच्या तारखेपासून एक वर्षाच्या आत कोणत्याही वेळी, नोटिशीत किंवा उपरोक्त कोणत्याही दस्तऐवजांमध्ये वर्णन केल्याप्रमाणे आपल्या इराद्यानुसार, परंतु, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे किंवा या अधिनियमाखाली केलेल्या व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही उपविधीच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन होणार नाही, अशा रीतीने ती इमारत किंवा ते बांधकाम सुरू करता येईल.

जी इमारत किंवा जे बांधकाम आयुक्ताने नामंजूर केले असेल अशी इमारत किंवा बांधकाम अटींच्या अधीनतेने सुरू करता येईल.

**३४६.** (१) जिच्या संबंधात पूर्वोक्तप्रमाणे नोटीस देण्यात आली असेल, अशी कोणतीही इमारत किंवा बांधकाम किंवा तिचा कोणताही भागांश अथवा तपशील यामुळे या अधिनियमाच्या एखाद्या तरतुदीचे किंवा या अधिनियमाखाली केलेल्या व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या एखाद्या उपविधीच्या तरतुदीचे उल्लंघन होईल किंवा ती इमारत किंवा ते बांधकाम असुरक्षित होईल, या कारणामुळे आयुक्त अमान्य करील तर त्यास, यथास्थिति, कलम ३३८, ३४० किंवा ३४३ खाली मागवलेली नोटीस किंवा आराखडा, छेदनदेखावा, वर्णन किंवा अधिक माहिती, काही असल्यास, ती मिळाल्यापासून तीस दिवसांच्या आत कोणत्याही वेळी लेखी नोटीस देऊन, तिच्या अन्वये, या कलमात यापूर्वी नमूद केलेली नोटीस जिने प्रथम दिलेली असेल, त्या व्यक्तीस, त्याची उक्त अमान्यता व तिची कारणे कळवता येतील आणि विहित केलेल्या ज्या अटींच्या अधीनतेने ती इमारत किंवा ते बांधकाम त्याने मान्य केल्याचे मानण्यात येईल, त्या अटी कळवता येतील.

(२) ज्या व्यक्तीने कोणतीही अशी इमारत बांधण्याबद्दल किंवा अशा बांधकामाबद्दल नोटीस दिली असेल त्या व्यक्तीस, त्यासाठी पूर्वोक्तप्रमाणे विहित केलेल्या अटींच्या अधीनतेने, परंतु, अन्यथा नव्हे, या बाबतीत लेखी नोटीस पोट-कलम (१) खाली तिला मिळाल्याच्या तारखेपासून, एक वर्षाच्या आत कोणत्याही वेळी, परंतु, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचे किंवा या अधिनियमाखाली केलेल्या व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही उपविधीच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन न होईल अशा रीतीने, काम सुरू करता येईल.

कामास केव्हा प्रारंभ करता येईल.

**३४७.** (१) कोणतीही व्यक्ती पुढील गोष्टी करीपर्यंत कोणतीही इमारत उभारण्यास किंवा कलम ३४२ मध्ये वर्णन केलेले कोणतेही असे बांधकाम पार पाडण्यास प्रारंभ करणार नाही—

(अ) अशी इमारत उभारण्याचा किंवा असे बांधकाम पार पाडण्याचा आपला इरादा असल्याबद्दल यात यापूर्वी आवश्यक म्हणून ठरवल्याप्रमाणे ती नोटीस देईतोपर्यंत आणि कलम ३४५ किंवा ३४६ मध्ये याबाबत विहित केलेल्या कालावधीत आयुक्त अशा इमारतीबद्दल किंवा बांधकामाबद्दल आपली मान्यता कळवीपर्यंत किंवा त्याबद्दल आपली मान्यता नाकारल्याचे कळविण्यात कसूर करीपर्यंत ;

[१][ (अअ) काम सुरू करण्याच्या नियोजित तारखेची नोटीस महानगरपालिका [२][ शहर अभियंत्यास ] देईपर्यंत ; अशा रीतीने अधिसूचित केलेल्या तारखेपासून सात पूर्ण दिवसांच्या आत कामास प्रारंभ झाला नसेल, त्या बाबतीत नोटीस देण्यात आली नाही, असे मानले जाईल ; ]

(ब) ते काम सुरू करण्यासाठी अनुक्रमे कलमे ३४५ व ३४६ यांमध्ये विहित केलेला एक वर्षाचा कालावधी संपल्यानंतर.

---

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ५० अन्वये खंड (अअ) समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम ६ अन्वये "कार्यकारी अभियंता" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

(२) कलम ३४५ किंवा ३४६ खाली कोणतीही इमारत उभारण्याचा किंवा बांधकाम करण्यास प्रारंभ करण्याचा हक्क जिला असेल अशी व्यक्ती, जर त्या बांधकामास प्रारंभ करण्यास अनुक्रमे उक्त कलमांमध्ये विहित केलेल्या एका वर्षाच्या कालावधीत कसूर करील, तर तिला नंतर कोणत्याही वेळी, अशी इमारत उभारण्याच्या किंवा असे बांधकाम पार पाडण्याच्या आपल्या इराद्याची नवीन नोटीस देता येईल ; आणि लागोलाग यात यापूर्वी अंतर्भूत असलेल्या तरतुदी, अशी नवीन नोटीस जणू अशा व्यक्तीच्या इरद्याबद्दल दिलेली पहिली नोटीस असावी, त्याप्रमाणे लागू होईल.

[१][ **३४७अ.** कोणतीही व्यक्ती आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून,— आयुक्ताच्या परवानगीवाचून इतर प्रयोजनांसाठी इमारतीचे रूपांतर न करणे.

(अ) इमारतीचा जो कोणताही भाग मानवी निवासाची जागा म्हणून वापरण्यासाठी मुळात बांधलेला नसेल किंवा त्या प्रयोजनार्थ वापरण्याचा प्राधिकार नसेल, तो भाग त्या प्रयोजनासाठी वापरणार नाही किंवा वापरण्याची परवानगी देणार नाही, अथवा

(ब) ज्या कोणत्याही इमारतीची, तिच्यात राहणाऱ्या लोकांसाठी वेगवेगळ्या अनेक खोल्या बनवण्याच्या इराद्याने बांधलेली चाळ किंवा इमारत म्हणून वापरण्यासाठी रचना करण्यात आलेली नसेल किंवा तिचा तसा उपयोग करण्याचा प्राधिकार नसेल, त्या इमारतीचे तशा चाळीत किंवा इमारतीत रूपांतर करणार नाही किंवा त्या कारणांसाठी ती वापरणार नाही किंवा वापरण्याची परवानगी देणार नाही. ]

[२][ **३४७ब.** कोणतीही व्यक्ती आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून किंवा अशा परवानगीच्या अटींअनुसार असेल त्याहून अन्यथा, मानवी निवासासाठी मुळात बांधलेली किंवा त्यासाठी वापरण्याचा प्राधिकार असलेली कोणतीही इमारत अथवा इमारतीचा कोणताही भाग हा, गोदाम, वखार, कर्मशाळा, काम करण्याची जागा, कारखाना, तबेला किंवा मोटारघर म्हणून वापरणार नाही किंवा वापरण्याची परवानगी देणार नाही.] मानवी निवासाकरिता असलेल्या इमारतीचा गोदाम, वगैरे म्हणून उपयोग न करणे.

[२][**३४७क.** कोणतीही व्यक्ती आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून किंवा अशा परवानगीच्या अटींअनुसार असेल त्याहून अन्यथा, मानवी निवासासाठी म्हणून मुळात बांधलेल्या किंवा त्यासाठी वापरण्याचा प्राधिकार असलेल्या कोणत्याही विद्यमान इमारतीत, ते गोदाम, वखार, कर्मशाळा, काम करण्याची जागा, कारखाना, तबेला किंवा मोटारघर म्हणून वापरण्याच्या किंवा वापरण्यास लावण्याच्या प्रयोजनासाठी कोणताही फेरफार करणार अगर करविणार नाही. ] मानवी निवासासाठी असलेल्या इमारतीत आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून कोणतेही फेरफार न करणे.

## संरचना, सामान, वगैरेसंबंधी तरतुदी

**३४८.** (१) ज्या इमारती [३]* * * * नव्याने उभारावयाच्या असतील त्या इमारतींविषयी पुढील तरतुदी अंमलात असतील :— नव्याने उभारावयाच्या इमारतींविषयी तरतुदी.

(अ) नवीन सडक, आयुक्ताची खात्री होईल अशा रीतीने समतलन केलेली, खडी घालून पक्की केलेली किंवा फरसबंदी केलेली असल्याखेरीज व त्यात मलप्रणालांची आणि नाल्यांची तरतूद केलेली असल्याखेरीज व तसे करीतोपर्यंत, अशा नवीन सडकेच्या दोन्ही बाजूस अशी कोणतीही इमारत उभारण्यास आयुक्त मान्यता नाकारू शकेल.

---

[१] सन १९१६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम ७ अन्वये कलम ३४७अ समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम २५ अन्वये कलमे ३४७ब आणि ३४७क समाविष्ट करण्यात आली.

[३] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५ अन्वये निरसित करण्यात आलेले शब्द गाळण्यात आले.

(ब) [१][ बृहन्मुंबईच्या ] ज्या कोणत्याही भागात, भविष्यकाळात आवश्यक असण्याचा संभव असलेल्या सडकांची जागा आणि दिशा अद्याप आखण्यात किंवा निर्धारित करण्यात आली नसेल, अशा कोणत्याही भागात अशी कोणतीही इमारत ज्या जागी ती उभारण्याचे योजिले असेल ती जागा आयुक्ताच्या मते, तिच्या जवळपास पूर्वीच असलेल्या कोणत्याही इमारतींच्या जागा लक्षात घेता, आजूबाजूच्या सर्व इमारतींच्या भोगवटादारांना जलनिस्सारण, पाणीपुरवठा व वायुवीजन यांच्या प्रयोजनाकरिता सोयीस्कर असे एक किंवा अनेक नवीन रस्ते भविष्यकाळी बांधण्यास अडथळा होणार नाही, अशी नसेल तर, आयुक्त, [२][ स्थायी समितीची ] संमती घेऊन, परवानगी देण्याचे नाकारील :

परंतु, जिच्या इमारतीच्या बाबतीत याप्रमाणे परवानगी नाकारण्यात आली असेल, अशा कोणत्याही व्यक्तीस, आयुक्तास लेखी नोटीस देऊन, नियोजित इमारतीच्या आसपास भविष्यकाळात बांधावयाच्या सडकांची जागा व दिशा ताबडतोब आखण्यासंबंधी व निर्धारित करण्यासंबंधी मागणी करता येईल ; आणि जर अशी मागणी केल्यापासून सहा महिन्यांच्या आत तिचे अनुपालन करण्यात आले नाही तर, तिच्या इमारतीस लागू असणाऱ्या या अधिनियमाच्या इतर सर्व तरतुदींच्या अधीनतेने इमारत उभारण्याच्या कामास सुरुवात करता येईल.

(क) जे कोणतेही ठिकाण मलमूत्र पदार्थ किंवा जनावरांची मढी किंवा इतर गदळ किंवा घृणास्पद पदार्थ यांनी भरलेले आहे किंवा ते साठवण्याची जागा म्हणून वापरण्यात येत आहे अशा ठिकाणी, आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने असे पदार्थ योग्य प्रकारे काढून टाकण्यात येईतोपर्यंत, अशा कोणत्याही इमारतीचा पाया बांधता येणार नाही.

(ड) राहते घर म्हणून वापरावयाचा इरादा असलेली अशी प्रत्येक इमारत, सर्वात जवळच्या सडकेच्या मध्यभागापासून किमान दोन फूट उंच असलेल्या जोत्यासह बांधण्यात येईल आणि आयुक्त त्याबाबत निश्चित करील, अशा प्रमाण पातळीपेक्षा कमी पातळीवर बांधण्यात येणार नाही.

[३]* *(ई) या अधिनियमाखाली केलेल्या व त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही उपविधीअन्वये वायुवीजनाची जी साधने आवश्यक असतील त्या कोणत्याही साधनांच्या भरीला राहते घर म्हणून वापरावयाचा इरादा असलेली अशी प्रत्येक इमारत, अशा इमारतीतील प्रत्येक खोलीची किमान एक संपूर्ण बाजू तरी बाहेरची भिंत असेल किंवा आतील मोकळ्या जागेला लागून असेल अशा रीतीने बांधण्यात यईल. अशी बाहेरची भिंत, पंधरा फुटांपेक्षा कमी रुंद नसलेल्या रस्त्याला संमुख असेल ते खेरीजकरून एरव्ही, अशी भिंत व मालकाच्या परिवास्तूच्या हद्दीची रेषा यांमध्ये, अशा भिंतीच्या संपूर्ण लांबीस लागून असलेली किमान दोन फूट रुंदीची मोकळी जागा सोडलेली असली पाहिजे अथवा लोकांनी राहण्याकरिता स्वतंत्र खोल्यांची रांग तयार होईल, अशा रीतीने तसेच जी चाळ किंवा इमारत बांधावयाची असेल त्या चाळीच्या किंवा इमारतीच्या बाबतीत किमान पाच फूट रुंदीची मोकळी जागा सोडलेली

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, अनुसूची (१)४(१)अन्वये "ग्रेटर बॉम्बे" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ११७ अन्वये "प्रभारी सदस्याच्या" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ५१(ब) अन्वये मूळ खंड (ई) वगळण्यात आला व नंतरच्या खंडांना त्यानुसार फेरक्रमांक देण्यात आले.

असेल. अशी आतील मोकळी जागा, तिला भिडलेल्या सर्व खोल्यांच्या जमिनीच्या एकूण क्षेत्रफळाच्या एक-दशांशापेक्षा कमी नसतील आणि अशी मोकळी जागा कोणत्याही दिशेस सहा फुटांपेक्षा कमी क्षेत्राची असणार नाही आणि या खंडाअन्वये सोडणे आवश्यक असलेल्या बाहेरच्या किंवा आतल्या प्रत्येक मोकळ्या जागेवर कोणतेही बांधकाम न उभारता, ती तशीच मोकळी ठेवण्यात येईल आणि ती आकाशाच्या बाजूस उघडी ठेवण्यात येईल, तसेच तिच्या प्रत्येक टोकापासून तिच्याकडे जाता येईल अशा स्थितीत ती असेल व ठेवण्यात येईल.

(फ) अशा कोणत्याही इमारतीच्या छपराखाली असलेली खोली सोडून, त्या इमारतीत राहण्यासाठी बांधावयाचा इरादा असेलल्या प्रत्येक खोलीचा प्रत्येक भाग जमिनीपासून छतापर्यंत किमान [१][ दहा ] फूट उंचीचा असेल.

(ग) अशा कोणत्याही इमारतीच्या छपरांखालील प्रत्येक खोलीची जमिनीपासून छतापर्यंतची सरासरी उंची किमान [२][ आठ ] फूट असेल आणि [३][ किमान उंची चार फुटांपेक्षा कमी असणार नाही. ]

(ह) अशा प्रत्येक खोलीच्या पृष्ठभागाचे क्षेत्रफळ [४][ शंभर ] चौरस फुटांपेक्षा कमी असणार नाही.

(आय) या अधिनियमाखाली केलेल्या व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही उपविधीअन्वये आवश्यक असतील अशा वायुवीजनाच्या कोणत्याही साधनांच्या भरीला, अशा प्रत्येक खोलीला, प्रत्यक्ष बाहेरील हवेत उघडतील अशी दारे आणि खिडक्या यांच्या सहाय्याने वायुवीजनाची सोय करण्यात येईल आणि अशी दारे व खिडक्या यांचे एकूण क्षेत्रफळ, उक्त खोलीची जी बाजू मोकळ्या जागेस दर्शनी असेल, त्या बाजूच्या पृष्ठभागाच्या क्षेत्रफळाच्या एक-चतुर्थांशापेक्षा कमी असणार नाही.

(के) झोपड्या किंवा छपऱ्या, अथवा अशा झोपड्यांची किंवा छपऱ्यांची रांग किंवा गट-मग ती राहती घरे म्हणून वापरण्यात येणार असोत किंवा तबेला म्हणून वापरण्यात येणार असोत किंवा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात येणार असोत—पुढील रीतीने बांधण्यास फर्माविणे आयुक्तास योग्य वाटेल, तर ती अशी बांधण्यात येतील,—

(एक) ती नियत रेषेत असतील आणि वायुवीजनासाठी, झाडलोट करण्याचे काम सुकर होण्यासाठी, आयुक्तास योग्य वाटेल अशा रुंदीचा जाण्या-येण्याचा मोकळा मार्ग किंवा रस्ता प्रत्येक दोन रांगांच्यासमोर किंवा त्यांच्या दरम्यान सोडण्यात येईल, आणि

(दोन) तीत, आयुक्तास आवश्यक वाटतील असे आणि आवश्यक वाटतील इतके संडास, शौचकूप किवा मुत्र्या व जलनिस्सारणाची साधने असतील, आणि

(तीन) ती, आयुक्ताने आवश्यक ठरवलेल्या जलनिस्सारणाच्या साधनांसाठी पुरेशी होईल, अशा पातळीवर बांधण्यात येतील.

---

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ५१(क) अन्वये " आठ " या शब्दाऐवजी " दहा " हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ५१(ड) (एक) अन्वये " सात " या शब्दाऐवजी " आठ " हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ५१(ड) (दोन) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ५१(ई) अन्वये " ऐंशी " या शब्दाऐवजी " शंभर " हा शब्द दाखल करण्यात आला.

(२) मुंबई बंदर विश्वस्त यांच्या मालमत्तेच्या हद्दीतील कोणताही रस्ता, योग्य रीतीने समतल केलेला, खडी घातलेला किंवा फरसबंदी केलेला, त्यात मलप्रणाल व नाल्या बांधलेल्या आहेत किंवा नाहीत, याविषयी उक्त विश्वस्त व आयुक्त यांच्यामध्ये उद्‌भवणाऱ्या कोणत्याही विवादाचा मुंबई बंदर विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १८७९ याच्या कलम ३८ खाली निर्णय देणाऱ्याच्या [१][ केंद्र सरकारच्या ] अधिकाराला खंड (अ) मधील कोणत्याही गोष्टींमुळे बाध येतो, असे मानले जाणार नाही. १८७९ चा मुंबई ६.

इमारतींची छपरे व बाहेरील भिंती ज्वालाग्राही वस्तूंच्या असणार नाहीत.

**३४९.** (१) [२]मुंबई नगरपालिका अधिनियम, १८७२ हा अंमलात आल्यापासून बांधलेली किंवा नवीकरण केलेली कोणतीही बाहेरील भिंत किंवा कोणतेही छपराचे आच्छादन हे, आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून लाकूड, कापड, कॅनव्हास, गवत, पान, चटया यांचे किंवा इतर कोणत्याही ज्वालाग्राही वस्तूंचे बनवण्यात येणार नाही. १८७२ चा मुंबई ३.

(२) उक्त अधिनियम अंमलात आल्यापासून कोणतीही बाहेरील भिंत किंवा छपराचे आच्छादन हे, अशा कोणत्याही वस्तू वापरून बनवले असेल किंवा बनवण्यात आले असेल, तर आयुक्त, अशी भिंत किंवा छप्पर ज्या इमारतीचे असेल त्या इमारतीच्या मालकास किंवा भोगवटादारास लेखी नोटीस देऊन, अशी भिंत किंवा आच्छादन काढून टाकण्यास त्यास फर्मावू शकेल.

[३][ (३) उपनगरांतील [४][ किंवा, यथास्थिति, वाढवलेल्या उपनगरांतील ] इमारतींच्या संबंधात या कलमांच्या तरतुदी, या जणू पोटकलमे (१) व (२) यांत, मुंबई नगरपालिका अधिनियम, १८७२ यांच्या संबंधाने केलेल्या उल्लेखाऐवजी मुंबई नगरपालिका (हद्दी वाढविण्याबाबत) अधिनियम, १९५० याचा [५][ किंवा, यथास्थिति, मुंबई नगरपालिका [हद्दी आणखी वाढवणे व अनुसूची बबअ (सुधारणा) ] अधिनियम, १९५६ ] याचा उल्लेख करण्यात आलेला असावा, त्याप्रमाणे लागू होतील : १८७२ चा मुंबई ३. १९५० चा मुंबई ७. १९५६ चा मुंबई ५८.

परंतु, पोटकलम (२) मधील कोणत्याही गोष्टींमुळे कोणतीही बाहेरील भिंत किंवा आच्छादन जर ते, मुंबई नगरपालिका (हद्दी वाढवण्याबाबत) अधिनियम, १९५०, अंमलात येण्याच्या निकटपूर्वी उपनगरात [६][ किंवा, यथास्थिति, मुंबई नगरपालिका [ हद्दी आणखी वाढवणे व अनुसूची बबअ (सुधारणा) ] अधिनियम, १९५६ ] अंमलात येण्याच्या निकटपूर्वी वाढवलेल्या उपनगरात अंमलात असलेल्या ] कोणत्याही कायद्याचे उल्लंघन करून बांधण्यात आले असेल किंवा त्याचे नवीकरण करण्यात आले असेल किंवा कायम करण्यात आले असेल, तर ते काढून टाकण्यास फर्मावण्याबाबत, आयुक्तास प्रतिबंध होणार नाही.] १९५० चा मुंबई ७. १९५६ चा मुंबई ५८.

---

[१] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाअन्वये " सरकार " या शब्दाऐवजी " केंद्र सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] या अधिनियमाच्या कलम २ अन्वये सन १८७२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ निरसित करण्यात आला.

[३] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम २९ अन्वये पोट-कलम (३) आणि परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[४] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम २२(एक) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २२(दोन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम २२(तीन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१][ **३४९अ.** (१) आयुक्ताच्या लेखी परवानगीखेरीज असेल तेवढे सोडून एरव्ही, कोणतीही इमारत, अशा इमारतीसमोरील रस्त्याच्या मध्य भागाच्या सपाटीपासून— इमारतीची कमाल उंची.

(अ) उतरणीच्या छपराच्या बाबतीत, छपरास असलेल्या बंधतुलेपर्यंत ; आणि

(ब) सपाट छपराच्या बाबतीत, छपराच्या पृष्ठभागापर्यंत,

मोजलेल्या सत्तर फूटांपेक्षा अधिक उंच उभारण्यात येणार नाही किंवा उंचावण्यात येणार नाही.

(२) उतरणीच्या छपराच्या बाबतीत, त्या उंचीच्या वरचे छप्पर ४५ अंशांपेक्षा जास्त नसेल, असा कोन करून राहील.

(३) सपाट छपराच्या बाबतीत पोटकलम (१) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कमाल उंचीच्या वर तीन फूटांपेक्षा जास्त नसेल, अशा उंचीचा कठडा रचता येईल. ]

[१][ **३४९ब.** कलम ३४९अ अन्वये विहित केलेल्या कमाल मर्यादेच्या अधीनतेने, एखादी इमारत ज्या उंचीपर्यंत उभारता किंवा उंचावता येईल, त्या उंचीचे विनियमन, अशी इमारत ज्या सडकेस लागून असेल, अशा सडकेच्या रुंदीच्या आधारे पुढील नियमांस अनुसरून करण्यात यईल :— सडकांच्या रुंदीस अनुलक्षून इमारतींची उंची.

(१) सडकेची रुंदी सव्वीस फुटांपेक्षा अधिक नसेल तर, अशी इमारत ही सडकेच्या रुंदीच्या दीड पटीपेक्षा अधिक उंच उभारता किंवा उंचावता कामा नये ;

(२) सडकेची रुंदी सव्वीस फुटांपेक्षा अधिक असेल, परंतु चाळीस फुटांपेक्षा अधिक नसेल तर, अशी इमारत चाळीस फुटांपेक्षा अधिक उंच उभारता किंवा उंचावता येणार नाही ; आणि

(३) सडकेची रुंदी चाळीस फुटांपेक्षा अधिक असेल तर, अशी इमारत अशा सडकेच्या रुंदीपेक्षा अधिक उंच उभारण्यात किंवा उंचावण्यात येणार नाही ;

(४) अशी इमारत एकापेक्षा अधिक सडकांना भिडलेली असेल तेव्हा, अशा इमारतीच्या उंचीचे विनियमन, तिचा जो भाग अशा सडकांपैकी अधिक रुंद असलेल्या सडकेला भिडलेला असेल त्या भागाच्या बाबतीत, अशा अधिक रुंद सडकेला अनुसरून करण्यात येईल व तसेच, अशा इमारतीचा जो भाग अशा सडकांपैकी कमी रुंद असलेल्या सडकेला भिडलेला असेल, त्या भागाच्या बाबतीत, अधिक रुंद असलेल्या सडकेपासून ऐंशी फुटांपर्यंत हे विनियमन करण्यात येईल :

परंतु, उक्त इमारतीचा दर्शनी भाग, यथास्थिति, पोटकलम (१), पोटकलम (२) किंवा पोटकलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या उंचीपेक्षा अधिक नसेल, इतक्या कोणत्याही उंचीवर सडकेपासून मागे हटवण्यात आलेला असेल तर, अशी इमारत अशा रीतीने विनिर्दिष्ट केलेल्या उंचीपेक्षा अधिक उंच उभारता किंवा उंचावता येईल ; पण त्या इमारतीचा कोणताही भागांश, ज्या रेषेपासून इमारत मागे हटवण्यात आलेली असेल, त्या रेषेपासून मागे हटवलेल्या भागांशाच्या दिशेने आडव्या रेषेशी ४५ अंशांचा कोन करून काढलेल्या काल्पनिक सरळ रेषांपैकी कोणत्याही सरळ रेषेस छेदून जाणार नाही.] इमारत मागे हटवण्यासंबंधी तरतूद.

[२][ **३४९क.** या अधिनियमाच्या प्रारंभानंतर, ज्या इमारतीच्या बाहेरच्या भिंती लाकडी सांगाड्यावर बांधलेल्या असतील, अशी कोणतीही इमारत, अशा इमारतीत एक तळमजला व एक वरचा मजला यांपेक्षा अधिक होईल, अशा रीतीने उभारण्यात किंवा पुन्हा उभारण्यात येणार नाही : ढाचेदार इमारती.

---

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ५२ अन्वये कलमे ३४९-अ आणि ३४९-ब समाविष्ट करण्यात आली.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ५२ अन्वये कलम ३४९क समाविष्ट करण्यात आले.

परंतु, अशी इमारत संपूर्णपणे मजबूत सामानाची व मजबूत बांधणी असलेली इमारत होईल किंवा तशी आहे आणि तीवर आणखी एक किंवा अधिक मजले सुरक्षितपणे राहू शकतील, अशी आयुक्ताची खात्री होईल तर, त्यास, विशेष आदेशान्वये, दोनपेक्षा अधिक मजल्यांची इमारत बांधण्यास किंवा आणखी एक किंवा अधिक मजले बांधण्यास परवानगी देता येईल.]

निर्गम मार्गांच्या पुरेशा साधनांची तजवीज करणे.

[१][ **३४९ड.** जेव्हा आयुक्ताच्या मते, कोणत्याही इमारतीमधील निर्गम मार्ग, आग लागली असता सुरक्षितपणे बाहेर पडण्यास अपुरे असतील त्या बाबतीत त्यास, [२][ स्थायी समितीच्या ] मान्यतेने, लेखी नोटीस देऊन, इमारतीच्या मालकास किंवा तिच्या भोगवटादारास, कोणताही विद्यमान जिना, तो विहित करील अशा रीतीने बदलण्यास किंवा पुन्हा बांधण्यास फर्मावता येईल किंवा तो विहित करील, अशा अधिक जिन्यांची किंवा निकडीच्या प्रसंगी वापरावयाच्या जिन्यांची तरतूद करण्यास फर्मावता येईल.]

उपनगरांत [४][ व वाढवलेल्या उपनगरांत ] इमारती उभारणे किंवा पुन्हा उभारणे, इमारतींची कमाल उंची वगैरे, यासंबंधीच्या विशेष शर्ती.

[३][**३४९ई.** (१) कलमे ३४८ ते ३४९ड (दोन्ही धरून) यांत काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेस उपविधिअन्वये उपनगरात [५][ किंवा वाढवलेल्या उपनगरात ] किंवा त्याच्या कोणत्याही भागात इमारती उभारणे किंवा पुन्हा उभारणे, इमारतींची कमाल उंची, इमारतींची छपरे व बाहेरच्या भिंती, इमारती मागे हटवणे आणि इमारतींसंबंधीच्या इतर बाबी यांच्या संबंधात विशेष शर्ती विहित करता येतील.

(२) असे उपविधी करण्यात येईतोपर्यंत किंवा मुंबई नगरपालिका (हद्दी वाढविण्याबाबत) अधिनियम, १९५० [६][ किंवा, यथास्थिति, मुंबई नगरपालिका [ हद्दी आणखी वाढविणे व अनुसूची बबअ (सुधारणा) ] अधिनियम, १९५६ अंमलात आल्याच्या तारखेपासून ] दोन वर्षे संपेपर्यंत, [६][ यांपैकी जे अनुक्रमे अगोदरचे असेल तोपर्यंत, ] मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९* अन्वये किंवा त्याखालील नियमाअन्वये किंवा मुंबई नगरपालिका (हद्दी वाढवण्याबाबत अधिनियम, १९५० यांच्या तरतुदीअन्वये [७][ किंवा मुंबई नगरपालिका [ हद्दी आणखी वाढवणे व अनुसूची बबअ (सुधारणा) ] अधिनियम, १९५६ याच्या तरतुदीअन्वये ] रद्द केलेल्या कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने केलेल्या उपविधींअन्वये किंवा नियमांअन्वये तरतूद केलेल्या शर्ती, यथास्थिति, उपनगरांत [८][ किंवा वाढवलेल्या उपनगरांत ] किंवा त्याच्या कोणत्याही भागात इमारती उभारणे किंवा पुन्हा उभारणे, इमारतींची कमाल उंची, इमारतींची छपरे व बाहेरच्या भिंती, इमारती मागे हटवणे आणि इमारतीसंबंधीच्या इतर बाबी यांना लागू असण्याचे चालू राहील :

१९५० चा मुंबई ७.
१९५६ चा मुंबई ५८.
१८७९ चा मुंबई ५.
१९५६ चा मुंबई ५८.

---

[१] सन १९११ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम १२ अन्वये कलम ३४९ड समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ११८ अन्वये "प्रभारी सदस्याच्या" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ३० अन्वये कलम ३४९ई समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम २३(३) अन्वये हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २३(१) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[६] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम २३(२)(एक) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम २३(२)(दोन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम २३(२)(तीन) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

* आता सन १९६६ ची महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१) पहा.

परंतु, उपनगरांतील [१][ किंवा वाढवलेल्या उपनगरांतील ] कोणत्याही जमिनीच्या बाबतीत, मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९* यांच्या किंवा त्याअन्वये केलेल्या नियमांच्या तरतुदी किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने केलेल्या उपविधींच्या किंवा नियमांच्या तरतुदी अंमलात नसतील तर, आयुक्तास किंवा त्याने याबाबत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास, पूर्वोक्त उपविधी करण्यात येईतोपर्यंत त्यास योग्य वाटतील अशा शर्ती लादता येतील.]

१८७९ चा मुंबई ५.

**निरीक्षण**

इमारतींची उभारणी किंवा त्यांत फेरफार वगैरे चालू असता त्यांचे निरीक्षण करणे.

**३५०.** आयुक्तास, निरीक्षण करण्याच्या आपल्या इराद्याची आगाऊ नोटीस न देता, कोणत्याही वेळी एखादी इमारत उभारण्याचे काम चालू असता किंवा कलम ३४२ मध्ये वर्णन केलेले असे कोणतेही काम चालू असता त्यांचे निरीक्षण करता येईल.

कलम ३४७ च्या विरुद्ध सुरू केलेल्या इमारती किंवा बांधकामे यांच्या बाबतीत करावयाची कार्यवाही.

**३५१.** [१][(१) आयुक्त, या कलमाच्या आणि कलमे ३५२, ३५२अ व ३५४अ यांच्या प्रयोजनांकरिता, **राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, पदनिर्देशित अधिकारी म्हणून, महानगरपालिकेच्या एखाद्या अधिकाऱ्यास पदनिर्देशित करील. पदनिर्देशित अधिकाऱ्याची अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा स्थानिक क्षेत्रावर अधिकारिता असेल आणि वेगवेगळ्या स्थानिक क्षेत्रांकरिता वेगवेगळे अधिकारी पदनिर्देशित करता येतील.]

[२][(१अ) जर एखादी इमारत उभारणे किंवा कलम ३४२ मध्ये वर्णन केलेले असे कोणतेही बांधकाम पार पाडणे हे, [३][कलम ३४२ किंवा कलम ३४७] च्या तरतुदींविरुद्ध सुरू करण्यात आले तर, [४][पदनिर्देशित अधिकारी,] कलम ३५४ खाली अशा इमारतीच्या किंवा बांधकामाच्या बाबतीत कार्यवाही करणे त्यास आवश्यक वाटत नसेल तर,—

(अ) लेखी नोटिशीअन्वये, जी व्यक्ती अशी इमारत उभारत असेल किंवा असे बांधकाम पार पाडीत असेल किंवा जिने अशी इमारत उभारली असेल किंवा बांधकाम पार पाडले असेल त्या व्यक्तीस [५][किंवा जी अशा इमारतीचा किंवा बांधकामाचा त्यावेळी मालक असेल अशा व्यक्तीस] [६][अशी नोटीस बजावण्यात आल्याच्या दिनांकापासून सात दिवसांच्या आत] त्याने किंवा याबाबतीत त्याने रीतसर प्राधिकृत केलेल्या अभिकर्त्याने सही केलेल्या व [४][पदनिर्देशित अधिकाऱ्याला] संबोधून लिहिलेल्या निवेदनाअन्वये अशी इमारत किंवा बांधकाम का काढून टाकण्यात येऊ नये, त्यात फेरफार का करण्यात येऊ नये किंवा ते का पाडून टाकण्यात येऊ नये याविषयी पुरेसे कारण दाखवण्यास फर्मावील ; अथवा

(ब) उक्त व्यक्तीस अशा नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा दिवशी व अशा वेळी व जागी जातीने किंवा त्याबाबतीत तिने रीतसर प्राधिकृत केलेल्या अभिकर्त्यामार्फत हजर राहण्यास व अशी इमारत किंवा बांधकाम का काढून टाकण्यात येऊ नये, त्यात का फेरफार करण्यात येऊ नये किंवा ते का पाडून टाकण्यात येऊ नये याबद्दल पुरेसे कारण दाखवण्यास फर्मावील. [७][[४][पदनिर्देशित अधिकाऱ्याने] इमारत किंवा बांधकाम काढून टाकल्यास किंवा पाडून टाकल्यास, तो अशा इमारतीचा किंवा बांधकामाचा ढिगारा त्याचबरोबर बांधकामाच्या जागी अशा व्यक्तीच्या मालकीची, कोणतीही असल्यास, इतर बांधकाम सामग्री विहित रीतीने जप्त

---

[१] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ३(१) अन्वये मूळ पोट-कलम (१) ला (१अ) असा नवीन क्रमांक दिला व त्यापूर्वी पोट-कलम (१) नव्याने समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९५६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५८, कलम २३ (२) (तीन) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १४३(अ) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ३(२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[५] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४, कलम १४ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १४३ (ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २५ अन्वये हा भाग दाखल करण्यात आला.

करील व त्याची विल्हेवाट लावील आणि अशा विक्रीपासून किंवा विल्हेवाटीपासून प्राप्त होणाऱ्या रकमेतून असे ढिगारे व सामग्री काढून टाकण्यासाठी व विक्री करण्यासाठी आलेला खर्च वजा करून प्राप्त रकमेतील शिल्लक रक्कम [१][पदनिर्देशित अधिकारी] संबंधित व्यक्तीस परत करील ;]

[२][ **स्पष्टीकरण.—**या पोट-कलमामधील " पुरेसे कारण दाखविण्यास " याचा अर्थ, अधिनियमाचे कलम ३३७ किंवा ३४२ किंवा ३४७ यांच्या तरतुदींना अनुसरून उक्त नोटिशीमध्ये उल्लेखिलेले काम पार पाडलेले असल्याचे सिद्ध करण्यास, असा आहे.]

(२) जर अशी इमारत किंवा बांधकाम का काढून टाकण्यात येऊ नये, त्यात का फेरफार करण्यात येऊ नये किंवा ते का पाडून टाकण्यात येऊ नये याबद्दल [३][पदनिर्देशित अधिकाऱ्याचे] समाधान होईल अशा रीतीने पुरेसे कारण दाखवण्यास अशी व्यक्ती कसूर करील तर, [३][पदनिर्देशित अधिकाऱ्यास] [४]* * * ती इमारत किंवा ते बांधकाम काढून टाकता येईल, त्यात फेरफार करता येतील किंवा ते पाडता येईल आणि त्याचा खर्च उक्त व्यक्ती देईल.

[५][(३) कोणतेही न्यायालय, राज्य शासनाच्या किंवा महानगरपालिकेच्या किंवा कोणत्याही अन्य स्थानिक प्राधिकरणाच्या मालकीच्या कोणत्याही जमिनीतून किंवा मालमत्तेतून कोणत्याही सार्वजनिक प्रकल्पासाठी किंवा नागरी सुविधांसाठी आवश्यक असलेल्या कोणत्याही जमिनीतून निष्कासित करण्याच्या, ती पाडून टाकण्याच्या किंवा काढून टाकण्याच्या नोटिशीसह कोणत्याही जाहीर नोटिशीच्या कार्यवाहीला, आयुक्तास, त्याची बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्याशिवाय स्थगिती देणार नाही.]

कलम ३४७ च्या विरुद्ध सुरू करण्यात आलेल्या इमारती किंवा बांधकामे निरीक्षणासाठी खोदता येतील किंवा खुली ठेवता येतील.

**३५२.** (१) जर, निकटपूर्ववर्ती कलमात निर्दिष्ट केलेली अशी कोणतीही इमारत उभारण्यात किंवा असे कोणतेही बांधकाम करण्यात या अधिनियमाच्या किंवा या अधिनियमाखाली केलेल्या व त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही उपविधीच्या कोणत्याही तरतुदीच्या विरुद्ध काहीही काम करण्यात आले आहे किंवा अशा कोणत्याही तरतुदींअन्वये किंवा उपविधीअन्वये करणे आवश्यक असेल असे कोणतेही काम करण्यात आले नाही असा संशय घेण्यास वाजवी कारण असेल ;

आणि जर अशा इमारतीच्या किंवा बांधकामाच्या निरीक्षणानंतर, ती इमारत किंवा ते बांधकाम पूर्ण झालेले असल्याने किंवा ते फारच प्रगत अवस्थेत असल्याने अशा कोणत्याही गोष्टीची खातरजमा करून घेणे शक्य होणार नाही असे आढळून आले असेल तर ;

[६][पदनिर्देशित अधिकाऱ्यास,] [७][ स्थायी समितीच्या मान्यतेने, ] लेखी नोटिशीअन्वये, ज्या व्यक्तीने अशी इमारत उभारली असेल किंवा असे बांधकाम केले असेल किंवा जी अशी इमारत उभारीत असेल किंवा असे बांधकाम करीत असेल त्या व्यक्तीस, अशा कोणत्याही गोष्टीसंबंधी खातरजमा करून घेण्यास त्या इमारतीच्या किंवा बांधकामाच्या जेवढ्या भागामुळे प्रतिबंध होत असेल तेवढा भाग, अशा गोष्टीची खातरजमा करून घेणे शक्य होईल इतक्या मर्यादेपर्यंत खोदण्याची, खुला करण्याची किंवा पाडून टाकण्याची तजवीज करण्यास फर्मावता येईल.

---

[१] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ३(२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १४३ (क) अन्वये हे स्पष्टीकरण समाविष्ट करण्यात आले.

[३] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ३(३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३७, कलम २ अन्वये " स्थायी समितीच्या मान्यतेने " हा मजकूर वगळण्यात आला.

[५] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २५ अन्वये आणि पोट-कलम (३) जादा दाखल करण्यात आले.

[६] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रम्रांक २, कलम ४(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ११९ अन्वये " प्रभारी सदस्याच्या " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

(२) त्यानंतर जर असे आढळून आले की, अशी इमारत उभारण्यात किंवा असे बांधकाम पार पाडण्यात या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीच्या किंवा या अधिनियमाखाली केलेल्या व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही उपविधीच्याविरुद्ध असे काहीही करण्यात आलेले नाही आणि अशा कोणत्याही तरतुदींअन्वये किंवा उपविधीअन्वये करणे आवश्यक असलेली कोणतीही गोष्ट वगळण्यात आलेली नाही तर, [१][पदनिर्देशित अधिकारी] ती इमारत किंवा बांधकाम खोदल्यामुळे किंवा खुले केल्यामुळे किंवा पाडल्यामुळे झालेले नुकसान किंवा हानी याबद्दल पूर्वोक्त व्यक्तीस नुकसानभरपाई देईल.

बांधकाम पाडून टाकण्यासाठी [७][पदनिर्देशित अधिकाऱ्याला] संक्षिप्तरित्या चौकशी करण्याचा अधिकार तात्पुरता प्रदान करणे.

[२][**३५२अ.** (१) जर कलम ३४७ च्या तरतुदीविरुद्ध असेल अशा रीतीने, कोणत्याही इमारतीची उभारणी करण्यात येईल किंवा कलम ३४२ मध्ये ज्याचे वर्णन करण्यात आले आहे असे कोणतेही बांधकाम करण्यात येईल आणि जर ताबडतोब उपाययोजना करण्यात आली पाहिजे असे [३][पदनिर्देशित अधिकाऱ्याचे] मत होईल तर, कलम ३५१ व कलम ३५२ च्या तरतुदी, हे कलम ३५२ च्या पोट-कलम (१) मधील, " स्थायी समितीच्या मान्यतेने, " हा मजकूर वगळण्यात येईल, या फेरफारांसह लागू होतील.

(२) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ३५१ किंवा कलम ३५२ खाली [४][पदनिर्देशित अधिकाऱ्याने] द्यावयाची नोटीस ही २४ तासांपेक्षा कमी अवधीची असणार नाही आणि ती ज्या इमारतीसंबंधी असेल त्या इमारतीच्या कोणत्याही ठळक भागावर लावण्यात आली असेल आणि अशा इमारतीवर किंवा तिच्याजवळ दवंडी पिटवून, उद्घोषणा करून प्रसिद्ध करण्यात आली असेल तर ती रीतसर बजावण्यात आली असल्याचे मानण्यात येईल आणि अशा रीतीने ती लावण्यात आणि प्रसिद्ध करण्यात आल्यावर सर्व संबंधित व्यक्तींना तीत नमूद केलेल्या गोष्टी रीतसर माहीत झाल्या आहेत असे मानण्यात येईल.

(३) [५][पदनिर्देशित अधिकाऱ्याने,] यात यापूर्वी निर्दिष्ट केलेल्या तरतुदींचा अवलंब केला असेल त्या बाबतीत, राज्य शासनास, किंवा राज्य शासनाने या बाबतीत प्राधिकृत केलेल्या शासन सचिवास, अशा कृतीच्या कायदेशीरपणाबद्दल किंवा औचित्याबद्दल स्वतःची किंवा त्याची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनासाठी स्वतः होऊन किंवा त्याच्याकडे अर्ज करण्यात आल्यावरून, पंधरा दिवसांच्या आत ज्या प्रकरणात [५][पदनिर्देशित अधिकाऱ्याने,] अशी कारवाई केली असेल अशा कोणत्याही प्रकरणाचा अभिलेख तपासणीसाठी मागवता येईल आणि संबंधित व्यक्तीला आपली बाजू मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, यथास्थिति शासन किंवा सचिव आपणास योग्य वाटेल असा त्यावर आदेश देऊ शकेल, तसेच भरपाईचा कोणताही आदेश देऊ शकेल आणि अशा कारवाईमुळे ज्या कोणत्याही व्यक्तीचे गैरवाजवी नुकसान किंवा हानी झाली असेल त्या व्यक्तीस महानगरपालिका अशी नुकसानभरपाई देईल.

[६]* * * * *

---

[१] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ४(२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९७९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, याच्या कलम २ अन्वये कलम ३५२अ समाविष्ट करण्यात आले. हे कलम ५ मे १९७९ पासून सहा वर्षांच्या कालावधीसाठी अंमलात राहील व नंतर ते समाप्त होईल. मूळ दोन वर्षांचा कालावधी सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम २ अन्वये सहा वर्षांपर्यंत वाढवण्यात आला.

[३] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ५(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ५(२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ५(३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ५(४) अन्वये पोट-कलम (४) वगळण्यात आले.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ५(५) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

इमारती व बांधकामे यांच्याशी संबंधित असणाऱ्या तरतुदींची अंमलबजावणी.

**३५३.** आयुक्तास, इमारत उभारण्याचे काम चालू असता किंवा पूर्वोक्तप्रमाणे असे कोणतेही बांधकाम चालू असता कोणत्याही वेळी किंवा ते पूर्ण झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत कोणत्याही वेळी, लेखी नोटिशीअन्वये, अशी इमारत उभारण्याने व बांधकाम करण्याने ज्या कोणत्याही गोष्टीच्या बाबतीत या अधिनियमाच्या किंवा या अधिनियमाच्या व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही उपविधीच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन होत असेल ती कोणतीही गोष्ट विनिर्दिष्ट करता येईल ; तसेच त्यास, अशी इमारत उभारणाऱ्या किंवा असे बांधकाम करणाऱ्या व्यक्तीस किंवा जिने अशी इमारत किंवा बांधकाम उभारले असेल अगर केले असेल त्या व्यक्तीस किंवा अशी इमारत अथवा बांधकाम जिने उभारले असेल किंवा केले असेल ती व्यक्ती नोटिशीच्या वेळी त्या इमारतीचा किंवा बांधकामाचा मालक नसेल तर अशा इमारतीचा किंवा बांधकामाचा जो मालक असेल त्यास, अशा कोणत्याही तरतुदीच्या किंवा उपविधीच्या विरुद्ध केलेले कोणतेही काम सुधारण्याची किंवा अशा कोणत्याही तरतुदीअन्वये किंवा उपविधीअन्वये करणे आवश्यक असेल परंतु जी वर्जिली असेल, अशी कोणतीही गोष्ट करण्याची व्यवस्था करण्यास फर्माविता येईल.

समाप्ति प्रमाणपत्रे, भोगवटा करण्यास किंवा वापरण्यास परवानगी.

[१][**३५३अ.** (१) एखादी इमारत उभारण्यासाठी किंवा कलम ३४२ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे असलेले बांधकाम करण्यासाठी जी व्यक्ती लायसनदार सर्वेक्षकास किंवा आयुक्ताने मान्य केलेल्या व्यक्तीस कामावर ठेवील अशी प्रत्येक व्यक्ती, अशी इमारत उभारण्याचे काम पूर्ण झाल्यानंतर किंवा असे बांधकाम पार पडल्यानंतर एक महिन्याच्या आत असे काम पूर्ण करण्यात आल्याची लेखी नोटीस, अनुसूची "ट" मध्ये दिलेल्या नमुन्याप्रमाणे व कलम ३४४अ खाली कामावर ठेवलेल्या व्यक्तीने सही केलेले प्रमाणपत्र जोडून आयुक्ताकडे त्याच्या कार्यालयात सुपूर्द करील किंवा पाठवील अथवा सुपूर्द करण्याची अथवा पाठवण्याची तजवीज करील आणि अशा इमारतीचे किंवा बांधकामाचे निरीक्षण करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व सुविधा आयुक्ताला देईल. कामावर ठेवलेल्या उक्त व्यक्तीस, बांधकाम पूर्ण झाल्यावर लगेच आणि तिला कामावर ठेवणाऱ्या व्यक्तीने मागणी केल्यावर अशा प्रमाणपत्रावर सही करण्यास व ते त्या व्यक्तीस देण्यास या अन्वये फर्मावण्यात येत आहे:

परंतु,—

(अ) काम पूर्ण करण्यात आल्याची नोटीस मिळाल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत असे निरीक्षण सुरू करण्यात येईल; आणि

(ब) आयुक्तास, असे निरीक्षण सुरू करण्यात आल्याच्या तारखेपासून सात दिवसांच्या आत, काम पूर्ण करण्यात आल्याची नोटीस ज्या व्यक्तीकडून मिळाली असेल तिला लेखी सूचना पाठवून व अशा नोटिशीत नमूद केलेल्या पत्त्यावर ते तिच्या स्वाधीन करून किंवा पत्ता नोटिशीत नमूद केला नसल्यास, अशी नोटीस ज्या इमारतीसंबंधी असेल त्या इमारतीच्या एखाद्या ठळक जागी चिकटवून त्याअन्वये—

(एक) अशा इमारतीचा भोगवटा करण्यास किंवा अशा कामाशी संबंध असलेली इमारत किंवा तिचा भाग वापरण्यास परवानगी देता येईल, अथवा

(दोन) या अधिनियमाच्या किंवा कोणत्याही उपविधींच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन होईल अशा रीतीने अशी इमारत उभारण्यात आली असेल किंवा असे बांधकाम पार पाडण्यात आले असेल त्या बाबतीत अशी परवानगी नाकारता येईल.

---

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ५३ अन्वये कलम ३५३अ समाविष्ट करण्यात आले.

(२) कोणत्याही व्यक्तीला—

(अ) पोट-कलम (१) चे परंतुक (ब) मध्ये निर्दिष्ट केलेली परवानगी मिळेपर्यंत, अथवा

(ब) आयुक्ताने, काम पूर्ण केल्याची नोटीस मिळाल्यानंतर एकवीस दिवसांच्या अवधीत उक्त परवानगी त्याने नाकारल्याचे पूर्वोक्तप्रमाणे कळवले नसेल तोपर्यंत,

अशा कोणत्याही इमारतीचा भोगवटा करता येणार नाही किंवा भोगवटा करण्यास परवानगी देता येणार नाही किंवा कोणत्याही अशा कामाशी संबंध असलेली इमारत वापरता येणार नाही किंवा वापरण्याची परवानगी देता येणार नाही.]

[१][**३५३ब.** (१) ज्या इमारतींच्या संबंधात,— बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र.

(एक) महानगरपालिकेने समाप्ती प्रमाणपत्र दिल्याच्या दिनांकापासून ; किंवा

(दोन) कलम ३५३अ अन्वये इमारतीच्या भोगवटा करण्यास परवानगी दिल्याच्या दिनांकापासून ; किंवा

(तीन) तिच्या बांधकाम क्षेत्राच्या किमान ५० टक्के इतक्या क्षेत्राचा प्रत्यक्ष भोगवटा केल्याच्या दिनांकापासून,

यांपैकी जो आधीचा असेल त्या दिनांकापासून तीस वर्षाचा कालावधी समाप्त झाला असेल, अशा इमारतीचा मालक किंवा भोगवटादार, इमारत मानवी वस्तीसाठी योग्य आहे, असे प्रमाणित करण्याच्या प्रयोजनांसाठी (यापुढे अशा प्रमाणपत्राचा निर्देश "बांधकाम प्रमाणपत्र" असा करण्यात आला आहे) महानगरपालिकेकडे नोंदणी केलेल्या बांधकाम अभियंत्यांकडून अशा इमारतीची तपासणी करवून घेईल. अशा बांधकाम अभियंत्यांने दिलेले बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र आयुक्ताकडे सादर करण्यात येईल.

(२) बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेला तीस वर्षांचा कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून आणि त्यांनंतर प्रत्येक दहा वर्षांचा कालावधी किंवा त्या इमारतीची स्थिती आणि मालकाने किंवा भोगवटदाराने केलेल्या दोषनिवारक दुरूस्त्या लक्षात घेऊन आयुक्त निर्धारित करील असा कमी कालावधी समाप्त झाल्याच्या दिनांकापासून एका वर्षाच्या आत सादर करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, आयुक्तास, कारणे लेखी नमूद केल्यानंतर, कोणत्याही वेळी, कोणत्याही इमारतीची बांधकाम अभियंत्याकडून तपासणी करवून घेण्याचे आणि निदेश दिल्याच्या दिनांकापासून आयुक्ताने निदेशात नमूद केलेल्या तीस दिवसांपेक्षा जास्त नसेल अशा कालावधीच्या आत, पोट-कलम (१) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे बांधकाम सुस्थिती प्रमाणपत्र आयुक्ताला सादर करण्याचे निदेश इमारतीच्या मालकाला किंवा भोगवटादाराला देता येतील.

(४) बांधकाम अभियंता, जर इमारतीचे बांधकाम सुस्थितीत असल्याचे निश्चित करण्यासाठी कोणत्याही दोषनिवारक दुरुस्त्यांच्या शिफारशी करील तर, आयुक्ताचे समाधान होईपर्यंत इमारतीच्या मालकाकडून किंवा भोगवटादाराकडून अशा दोषनिवारक दुरुस्त्या करण्यात येतील.

(५) बांधकाम अभियंत्याच्या अहवालाच्या दिनांकापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत जो मालक किंवा, यथास्थिति, भोगवटादार, बांधकाम सुस्थितीत असल्याचे निश्चित करण्यासाठी दोषनिवारक दुरुस्त्या करण्यात कसूर करील अशा कोणत्याही मालकास किंवा यथास्थिति, भोगवटादारास कलम ४७१ मध्ये तरतूद केलेल्या दंडाची शिक्षा करण्यात येईल.

[१] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम २ अन्वये कलम ३५३ब समाविष्ट करण्यात आले.

(६) पोट-कलम (५) मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असेल तरी, आयुक्तास, मालकाला किंवा भोगवटादाराला लेखी नोटीस दिल्यानंतर, नोटीशीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत इमारतीची बांधकामविषयक सुस्थिती प्राप्त करण्यासाठी, दोषनिवारक दुरुस्त्या करण्यास त्याला फर्माविता येईल. जर मालक किंवा भोगवटादार उक्त कालावधीच्या आत, अशा दोषनिवारक दुरुस्त्या करण्यात कसूर करील तर, आयुक्तास, त्या दोषनिवारक दुरुस्त्या करता येतील आणि अशा दुरुस्त्यांवर आयुक्ताने केलेला खर्च, त्याची मागणी केल्यानंतर तीस दिवसांच्या आत भरणा न केल्यास, मालमत्ता कराच्या थकबाकीप्रमाणे मालकाकडून किंवा भोगवटादाराकडून वसूल करण्यात येईल.

(७) पोट-कलम (६) अन्वये खर्चाच्या ज्या रकमेची मागणी करण्यात आली असेल त्या रकमेविषयी कोणताही विवाद असेल तर, मुख्य न्यायधीश, लघुवाद न्यायालय यांच्याकडे अपील करता येईल, परंतु,—

(एक) अशा मागणीची नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत ते अपील दाखल करण्यात आले नसेल तर ;

(दोन) मागणी करण्यात आलेली रक्कम महानगरपालिकेकडे जमा करून अशाप्रकारे रक्कम जमा करण्यात आल्याबाबतच्या पावतीची सत्यप्रत अपिलासोबत जोडण्यात आली नसेल तर, उक्त मुख्य न्यायाधीश असे कोणतेही अपील विचारार्थ स्वीकारणार नाही.

(८) जर अपिलावर अपीलकर्त्याच्या बाजूने निर्णय देण्यात आला असेल आणि महानगरपालिकेकडे जमा करण्यात आलेली खर्चाची रक्कम ही, अपीलकर्त्याने द्यावयाच्या रकमेपेक्षा अधिक असेल तर, आयुक्त, ती जादा रक्कम अपीलकर्त्याने ती अशाप्रकारे जमा केल्याच्या दिनांकापासून दर साल दर शेकडा ६.२५ टक्के व्याजासह अशा इमारतीच्याबाबतीत मालकाने त्यानंतर द्यावयाचा मालमत्ता कर म्हणून समायोजित करील.]

## धोकादायक संरचना

मोडकळीस आलेल्या किंवा पडण्याचा संभव असलेल्या संरचना, वगैरे काढून टाकणे.

**३५४.** (१) कोणतीही संरचना (या संज्ञेत कोणतीही इमारत, भिंत किंवा इतर संरचना आणि कोणत्याही इमारतीस, भिंतीस किंवा इतर संरचनेस जोडलेली, त्यापासून प्रक्षेपित होणारी किंवा त्यावर असलेली कोणतीही संरचना याचा समावेश होतो) मोडकळीस आलेली आहे किंवा पडण्याचा संभव आहे किंवा अशा संरचनेच्या किंवा तिच्या शेजारच्या कोणत्याही इतर संरचनेच्या किंवा जागेच्या भोगवटादारांना किंवा तीत जाणाऱ्या येणाऱ्या अथवा जवळून जाणाऱ्या कोणत्याही व्यक्तींना त्यापासून कोणत्याही रीतीने धोका आहे, असे आयुक्तास कोणत्याही वेळी वाटेल तर, तो अशा संरचनेच्या मालकास किंवा तिच्या भोगवटादारास लेखी नोटीस देऊन [१][कलम ३४२च्या तरतुदींना अधीन राहून] अशी संरचना किंवा अशी वास्तू पाडण्यास, मजबूत करण्यास किंवा दुरुस्त करण्यास आणि त्यापासून होणाऱ्या धोक्यास कारणीभूत होणाऱ्या सर्व गोष्टीस प्रतिबंध करण्यास फर्मावू शकेल.

(२) तसेच, आयुक्तास, त्यास योग्य वाटेल तर, उक्त नोटिशीअन्वये, उक्त मालकास किंवा भोगवटादारास ताबडतोब किंवा उक्त संरचना पाडण्यास, मजबूत करण्यास किंवा दुरुस्त करण्यास सुरूवात करण्यापूर्वी, रस्त्याने जाणाऱ्या येणाऱ्या किंवा इतर व्यक्तींच्या संरक्षणासाठी योग्य व पुरेसा आडपडदा किंवा कुंपण तयार करण्यास आणि त्याबरोबर सोईस्कर असा ओटा व कठडा करण्यासाठी पुरेसा वाव असेल तर आणि आयुक्ताला तसे करणे इष्ट वाटेल तर, अशा आडपडद्याच्या किंवा कुंपणाच्या बाहेरून येणाऱ्या जाणाऱ्या लोकांकरिता पायरस्ता म्हणून उपयोग करण्यासाठी असा ओटा व कठडा तयार करण्यास फर्मावता येईल.

---

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १४६ अन्वये "कलम ३४२ च्या तरतुदींना अधीन राहून" हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

### [१][अवैधरीत्या पार पाडलेली बांधकामे]

[२][**३५४अ.** (१) कोणत्याही परिवास्तूध्ये कोणतीही इमारत उभारण्याचे किंवा कलम ३४२ मध्ये वर्णन केलेले कोणतेही काम अवैधरीत्या सूरू केलेले आहे किंवा अवैधरीत्या पार पाडण्यात येत आहे अशी [३][पदनिर्देशित अधिकाऱ्याची] खात्री होईल तर तो, लेखी नोटिशीद्वारे, इमारत उभारण्याचे असे काम किंवा इतर बांधकाम करणाऱ्या किंवा पार पाडणाऱ्या व्यक्तीस ते, नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत [४][ताबडतोब] थांबवण्याविषयी फर्मावू शकेल.

अवैधरीत्या सुरू करण्यात आलेल्या किंवा पार पाडण्यात आलेल्या इमारतीची उभारणी किंवा इतर बांधकाम थांबवण्याचा [६][पदनिर्देशित अधिकाऱ्याचा]अधिकार.

[५][(२) पोट-कलम (१) मध्ये निर्देशिलेली नोटीस बजावण्यात आल्यापासून चोवीस तासांच्या आत, इमारत उभारण्याचे असे काम किंवा इतर बांधकाम [६][पदनिर्देशित अधिकाऱ्याने] फर्माविल्याप्रमाणे थांबविण्यात आले नाही, किंवा सक्षम प्राधिकरणाने अशी इमारत उभारण्यासाठी किंवा काम पार पाडण्यासाठी दिलेली परवानगी सादर करण्यात आली नाही तर, [६][पदनिर्देशित अधिकाऱ्याला,] आणखी नोटीस न पाठविता ती इमारत किंवा काम काढून टाकता येईल किंवा पाडता येईल आणि त्याचा खर्च उक्त व्यक्ती किंवा त्या इमारतीचा किंवा बांधकामाचा मालक भरील. अशा उभारणीचे किंवा इतर काम करवून घेणाऱ्या किंवा करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस, ज्या जागी इमारत उभारण्यात येत असेल किंवा काम पार पाडण्यात येत असेल त्या जागेमधून कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यामार्फत हलवण्यात येईल असा निर्देशही आयुक्त देऊ शकेल.]

[५][(३) पोट-कलम (२) अन्वये, [७][पदनिर्देशित अधिकाऱ्याला] करता येईल त्या कार्यवाहीबरोबरच त्याला, आणखी नोटीस न पाठविता, इमारतीची उभारणी करण्याच्या किंवा असे काम पार पाडण्याच्या प्रक्रियेमध्ये वापरलेली कोणतेही सामान, यंत्रसामुग्री, साधनसामुग्री, साधने किंवा वस्तू हलवण्याची व्यवस्था करता येईल.

(४) [८][पदनिर्देशित अधिकाऱ्याने] पोट-कलमे (२) आणि (३) याअन्वये केलेला खर्च मागितल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत तो खर्च भरण्यात आला नाही तर, अशी न भरलेली रक्कम संपत्तीकराची थकबाकी समजली जाईल आणि या अधिनियमान्वये संपत्तीकराच्या थकबाकीच्या वसुलीसाठी विहित केलेली कार्यपद्धती योग्य ते बदल करून, अशा न भरलेल्या रकमेच्या वसुलीस लागू होईल.]

### [१०][विशिष्ट वसतिक्षेत्रांत विवक्षित इमारतवर्गांचे विनियमन

**३५४अअ.** (१) तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत दाखल करण्यात येईल अशा कोणत्याही विधिग्राह्य आक्षेपाच्या अधीनतेने, आयुक्तास पुढीलप्रमाणे घोषित करण्याच्या आपल्या इराद्याची जाहीर नोटीस देता येईलः—

विशिष्ट सडका किंवा वसतिक्षेत्रे यांमध्ये विवक्षित इमारतवर्गांच्या भविष्यकाळात होणाऱ्या बांधकामाचे विनियमन करण्याचा अधिकार.

(अ) अशा नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही सडकांमध्ये किंवा सडकांच्या भागांशांमध्ये, त्यानंतर उभारण्यात किंवा पुन्हा उभारण्यात आलेल्या सर्व इमारतींच्या किंवा कोणत्याही वर्गातील इमारतींच्या दर्शनी भागाची उंची व बांधणी ही, त्यांच्या वास्तुशास्त्रीय वैशिष्ट्याच्या बाबतीत महानगरपालिकेच्या मते त्या वसतिक्षेत्रासाठी योग्य असतील अशी असली पाहिजे.

---

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ५४ अन्वये हे शीर्षक समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४, कलम १५ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[३] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ६(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १४७(अ) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १४७ (ब) व (क) अन्वये मूळ पोटकलमाऐवजी पोटकलम (२) आणि पोटकलम (३) व (४) नव्याने दाखल करण्यात आले.

[६] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ६(२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ६(३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम ६(४) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] वरील अधिनियमाच्या कलम ६(५) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१०] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ७०, अन्वये हे शीर्षक आणि कलम ३५४अअ समाविष्ट करण्यात आले.

(ब) नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही वसतिक्षेत्रांत फक्त अलग अलग इमारती किंवा अंशतः अलग इमारती किंवा दोन्ही प्रकारच्या इमारती बांधण्याची परवानगी देण्यात येईल आणि अशा प्रत्येक इमारतीस लागून असलेली जमीन ही अशा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रफळाहून कमी असणार नाही.

(क) विशिष्ट वसतिक्षेत्रातील इमारतीच्या भूखंडाचे किमान आकारमान हे, विनिर्दिष्ट क्षेत्रफळाइतके असेल;

(ड) नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही वसतिक्षेत्रात, प्रत्येक एकर जमिनीवर विनिर्दिष्ट केलेल्या संख्येपेक्षा अधिक इमारती बांधता येणार नाहीत;

(ई) अशा नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही सडकांत, सडकांच्या भागांशांत दुकाने, वखारी, कारखाने, झोपड्या किंवा विशिष्ट उपयोगासाठी योजलेल्या इमारती, आयुक्ताच्या खास परवानगीवाचून बांधता येणार नाहीत. अशी परवानगी, याबाबत [१][ स्थायी समितीने ] तयार केलेल्या सर्वसाधारण विनियमांनुसार देण्यात येईल व बांधण्याचे काम केवळ अशा प्रकारच्या परवानगीच्या अटींच्या अधीन राहील.

(२) [२][ स्थायी समिती ], अशी नोटीस प्रसिद्ध करण्यात आल्याच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या कालावधीच्या आत आलेले सर्व आक्षेप विचारात येईल आणि त्यानंतर अशी नोटिस, आलेल्या आक्षेपाचे निवेदन व तिचा त्यावरील अभिप्राय यांसह महानगरपालिकेला सादर करील.

(३) उक्त तीन महिन्यांच्या कालावधीनंतर आलेले कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

(४) महानगरपालिका, पोट-कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेले सर्व कागदपत्र मिळाल्यापासून दोन महिन्यांच्या कालावधीच्या आत ते सर्व कागदपत्र त्यावरील आपल्या अभिप्रायासह राज्य शासनाला सादर करील.

(५) राज्य शासनास, अशा घोषणेसंबंधी त्यास योग्य वाटतील असे आदेश देता येतील :

परंतु, अशी घोषणा, पोट-कलम (१) खाली दिलेल्या नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात न आलेल्या कोणत्याही सडकेस, सडकेच्या भागांशास किंवा वसतिक्षेत्रास लागू करण्यात येणार नाही.

(६) राज्य शासनाने कायम केलेली किंवा फेरफार केलेली घोषणा **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करण्यात येईल आणि ती अशा रीतीने प्रसिद्ध करण्यात आल्याच्या तारखेपासून परिणामक होईल.

(७) कोणतीही व्यक्ती अशा कोणत्याही घोषणेचे उल्लंघन करून कोणतीही इमारत उभारणार किंवा पुन्हा उभारणार नाही.

(८) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणतीही सडक किंवा एखाद्या सडकेचा भाग किंवा वसतिक्षेत्र यांच्या संबधात पोट-कलम (१) खाली जाहीर नोटीस देण्यात आल्यानंतर, कोणतीही व्यक्ती आयुक्ताच्या पूर्वपरवानगीवाचून, अशा सडकेस, किंवा सडकेच्या अशा भागास भिडून किंवा अशा वसतिक्षेत्राच्या हद्दीच्या आत इमारत उभारणार किंवा पुन्हा उभारणार नाही.]

इमारतीचा दर्शनी भाग सुस्थितीत ठेवणे व तसा राखणे ही मालक किंवा भोगवटादार यांची जबाबदारी असणे.

[३]["**३५४अब** (१) इमारतीचा दर्शनी भाग सुस्थितीत ठेवण्यात व तसा राखण्यात आला आहे आणि तो नादुरुस्त स्थितीत नाही, अथवा ज्यामुळे इमारतीचे वा तिच्या भागाचे दर्शनी स्वरूप खराब होते अशा प्रकारचे तडे, डाग, गचाळपणे बंदिस्त केलेल्या जागा, लटकत्या तारा वा केबल किंवा अपायकारक वस्तू ठेवणे यांमुळे तो खराब झालेला नाही, याची खातरजमा करणे ही प्रत्येक इमारत मालकाची किंवा भोगवटादाराची जबाबदारी असेल :

परंतु, या कलमातील कोणतीही गोष्ट, महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ याच्या कलम ४ च्या पोट-कलम (१) अन्वये झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित १९७१ चा महा. २८.

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १२१(अ) अन्वये ' महानगरपालिकेने ' या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १२१(ब) अन्वये ' महापौरासह परिषद ' या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम २ अन्वये ३५४अब व ३५४अक ही कलमे समाविष्ट करण्यात आली, कलम ३५४ अब हे अजून अंमलात आलेले नाही.

करण्यात आलेल्या क्षेत्रांना तसेच ज्या इमारतींच्या बाबत सक्षम प्राधिकरणाने पुनर्विकास आराखडा मंजूर केला आहे किंवा तो सक्षम प्राधिकरणाच्या विचाराधीन आहे, अशा इमारतींना लागू असणार नाही.

(२) आयुक्तांने अशा इमारतीची किंवा तिच्या भागाची तपासणी केल्यावर अशा कोणत्याही इमारतीचा किंवा तिच्या भागाचा दर्शनी हिस्सा सुस्थितीत ठेवण्यात व तसा राखण्यात आलेला नाही आणि पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही कारणांमुळे तो खराब झालेला आहे असे आयुक्तांचे मत बनले तर, लेखी नोटिशीद्वारे त्या इमारतीच्या मालकाला किंवा भोगवटादाराला, त्या इमारतीचा दर्शनी भाग सुस्थितीत ठेवण्यासाठी व तसा राखण्यासाठी त्या नोटिशीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल असे आवश्यक काम पार पाडण्यास फर्मावता येईल ; आणि तो मालक किंवा, यथास्थिती, भोगवटादार त्या नोटिशीचे पालन करील.

(३) इमारतीचा मालक किंवा भोगवटादार, पोट-कलम (२) अन्वये आयुक्ताने दिलेल्या नोटिशीमध्ये नमूद केलेले काम, नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, किंवा पार पाडावयाच्या कामाचे स्वरूप व व्याप्ती विचारात घेऊन आयुक्त विनिर्दिष्ट करील अशा वाढीव कालावधीच्या आत, पार पाडील.

(४) मालकाने किंवा, यथास्थिति, भोगवटादाराने पोट-कलम (२) खालील नोटिशीचे पालन करण्यात कसूर केली तर, आयुक्त नोटिशीमध्ये नमूद केलेले काम पार पाडण्याची व्यवस्था करील आणि मालक किंवा, यथास्थिति, भोगवटादार, आयुक्ताने त्याबाबतीत केलेला खर्च, मागणी नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत देण्यास जबाबदार असेल आणि अशा मालकाने किंवा भोगवटादाराने खर्च देण्यात कसूर केली तर अशा खर्चाची संपूर्ण रक्कम वसूल होईपर्यंत आयुक्ताने खर्च केलेल्या रकमेवर प्रत्येक महिन्याकरिता किंवा त्याच्या भागाकरिता दोन टक्के या दराने व्याज आकारण्यात येईल.

(५) या कलमामध्ये अन्यथा तरतूद केली असेल त्याव्यतिरिक्त अशा खर्चीच रक्कम, कोणतेही व्याज असल्यास त्यासह, मालमत्ता कर म्हणून देय असल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल.

(६) पोट-कलम (४) अन्वये खर्चाच्या ज्या रकमेची मागणी करण्यात आली असेल त्या रकमेविषयी कोणताही विवाद असेल तर, मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय यांच्याकडे अपील करता येईल, परंतु,—

(एक) अशा मागणीची नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत ते अपील दाखल करण्यात आले नसेल तर ;

(दोन) मागणी करण्यात आलेली रक्कम महानगरपालिककडे जमा करून अशाप्रकारे रक्कम जमा करण्यात आल्याबाबतच्या पावतीची सत्य प्रत अपिलासोबत जोडण्यात आली नसेल तर,

मुख्य न्यायाधीश असे कोणतेही अपील विचारार्थ स्वीकारणार नाही.

(७) जर अपिलावर अपीलकर्त्याच्या बाजूने निर्णय देण्यात आला असेल आणि महानगरपालिकेकडे जमा करण्यात आलेली खर्चाची रक्कम ही, अपीलकर्त्याने द्यावयाच्या रकमेपेक्षा अधिक असेल तर, आयुक्त, ती जादा रक्कम अपीलकर्त्याने अशाप्रकारे जमा केल्याच्या दिनांकापासून दर साल ६.२५ टक्के व्याजासह अशा इमारतीच्याबाबतीत मालकाने त्यानंतर द्यावयाचा मालमत्ता कर म्हणून समायोजित करील.

शहरी सौंदर्याचा सुरेख मिलाफ साधण्याबाबत घोषणा करण्याचा आयुक्तांचा अधिकार.

**३५४अक.** (१) आयुक्तास, राज्य शासनाची मान्यता मिळविल्यानंतर, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे आणि दोनपेक्षा कमी नसतील तिक्या स्थानिक वृत्तपत्रांमधील जाहिरातीद्वारे, अशी घोषणा करता येईल की, एखाद्या विशिष्ट शहरी भागाचे वास्तुशास्त्रीय स्वरूप जपण्याबरोबरच तेथे सौंदर्याचा सुरेख मिलाफ साधण्यासाठी तसेच त्याच्या स्वरूपात सौंदर्यात्मक सुधारणा करून ते अधिक सुशोभित करण्यासाठी, अशा घोषणेच्या प्रसिद्धीच्या दिनांकास अस्तित्वात असलेल्या किंवा त्यानंतर बांधून पूर्ण करण्याचे प्रस्तावित केलेल्या आणि अशा घोषणेमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या महानगरपालिका क्षेत्रामधील कोणत्याही वसतिक्षेत्रातील अथवा त्याच्या भागातील कोणत्याही

सडकेवर स्थित असलेल्या कोणत्याही इमारतीचे वा इमारतींचे दर्शनी स्वरूप, त्यावर कोणत्याही जोडण्या असल्यास आणि त्यांच्या सीमेच्या भिंती, कोणत्याही असल्यास, त्यासह, अशा घोषणेमध्ये नमूद करण्यात येईल अशा रीतीने आणि अशा कालावधीत ठेवण्यात व राखण्यात येईल.

(२) पोट-कलम (१) खालील घोषणेची अधिसूचना प्रसिद्ध करण्यापूर्वी, आयुक्त, अशी घोषणा करण्याचा त्याचा उद्देश स्पष्ट करणारी आणि उक्त प्रस्तावावर कोमताही आक्षेप घेणाऱ्या अथवा त्यावर कोणतीही सूचना करण्यास इच्छुक असलेल्या सर्व व्यक्तींनी त्याबाबतची कारणे देऊन, अशी सूचना **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत, आयुक्ताकडे लेखी सादर करण्यासाठी त्यांच्याकडून आक्षेप व सूचना मागवणारी नोटीस, **शासकीय राजपत्रात** जाहिरातीद्वारे आणि दोन पेक्षा कमी नसतील इतक्या स्थानिक वृत्तपत्रांमध्ये जाहिरातीद्वारे, देण्याची व्यवस्था करील. एक महिन्याचा उक्त कालावधी समाप्त झाल्यानंतर, आयुक्त, एक महिन्याच्या आत, त्या आक्षेपांवर व सूचनांवर विचार करील.

(३) मालक, पोट-कलम (१) अन्वये करण्यात आलेल्या घोषणेनुसार आवश्यकतांचे, त्या संदर्भात विनिर्दिष्ट केलेल्या वेळेत, पालन करण्यास कसूर करीत असेल तर, आयुक्तास, घोषणेनुसार पूर्ण करावयाचे काम पार पाडण्यासाठी उपाययोजना करता येतील अथवा तशी व्यवस्था करता येईल ; आणि याबाबतीत महानगरपालिकेने केलेला खर्च, जणू काही उक्त मालकाकडून येणे असलेली त्या इमारतीच्या मालमत्ता कराची थकबाकी असल्याप्रमाणे वसूल करण्यात येईल आणि अशा खर्चाची उक्त मालकाकडे मागणी केल्यावर तो अशा मालकावर देय असेल.

(४) पोट-कलम (३) अन्वये ज्या खर्चाच्या रकमेची मागणी करण्यात आली असेल त्या रकमेबाबत कोणताही विवाद असेल तर, मालकाला, मुख्य न्यायाधीश, लघुवाद न्यायालय यांच्याकडे अपील दाखल करता येईल, परंतु,–

(एक) अशा मागणीची नोटीस मिळाल्याच्या दिनांकापासून एकवीस दिवसांच्या आत ते अपील दाखल करण्यात आले नसेल तर ;

(दोन) ज्या रकमेची मागणी करण्यात आली असेल ती रक्कम महानगरपालिकेकडे जमा करण्यात आली असेल आणि अशा प्रकारे रक्कम जमा करण्यात आल्याचे दर्शविणाऱ्या पावतीची सत्य अपिलासोबत जोडण्यात आली नसेल तर,

मुख्य न्यायाधीश असे कोणतेही अपील विचारार्थ स्वीकारणार नाही.

(५) जर अपिलावर अपीलकर्त्याच्या बाजुने निर्णय देण्यात आला असेल आणि महानगरपालिकडे जमा करण्यात आलेली खर्चाची रक्कम ही, अपीलकर्त्याने द्यावयाच्या रकमेपेक्षा अधिक असेल तर, आयुक्त, ती जादा रक्कम अपीलकर्त्याने अशाप्रकारे जमा केल्याच्या दिनांकापासून दर साल ६.२५ टक्के व्याजासह अशा इमारतीच्याबाबतीत मालकाने त्यानंतर द्यावयाचा मालमत्ता कर म्हणून समायोजित करील.]

झोपडपट्टी पुनर्वसन योजना कार्यान्वित करण्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाला अधिकार प्रदान करणे.

[१][ **३५४अअअ.** या अधिनियमांच्या इतर कोणत्याही तरतुदींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासन **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे असा निदेश देऊ शकेल की, बांधकामविषयक विनियमांशी आणि त्यांच्याशी आनुषंगिक किंवा त्यांच्या परिणामरूप अशा बाबींशी संबंधित असलेले आयुक्ताचे या प्रकरणाखालील अधिकार आणि महानगरपालिकेचे आणि महानगरपालिकेच्या समित्यांचे या अधिनियमाखालील कोणतेही अधिकार असल्यास ते अधिकार महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम, १९७१ अन्वये नियुक्त केलेले झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण त्या अधिनियमाखाली जाहीर केलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रासाठी वापरील.] १९७१ चा महा. २८.

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५, कलम ३ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

## [1][ प्रकरण बारा–अ

### शहर सुधारणा

मंडळाचे हक्क, वगैरे महानगरपालिकेकडे हस्तांतरित करणे.

१९३३ चा मुंबई १३. **३५४ब.** (१) मुंबई शहर नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९३३, हा प्रवर्तनात आल्याच्या तारखेपासून मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ किंवा मुंबई शहर सुधारणा विश्वस्तव्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ यांच्या तरतुदींस अनुसरून उक्त तारखेपूर्वी रीतसर मंजूर केलेली किंवा पार पाडलेली कोणतीही सुधारणा परियोजना, सडकांसंबंधी परियोजना लांबणीवर टाकलेल्या सडकांसंबंधी परियोजना, निर्धन लोकांच्या राहण्याच्या जागासंबंधीची परियोजना, जमीन पुन:प्रापण परियोजना किंवा पोलिसांच्या राहण्याच्या जागांसंबंधीची परियोजना याबाबतीत मुंबई शहर सुधारणा विश्वस्तव्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ याखाली रचना केलेल्या मुंबई शहर सुधारणा विश्वस्त व्यवस्था मंडळाची असलेली सर्व मालमत्ता हितसंबंध, अधिकार व दायित्वे ही, हे प्रकरण व कलमे ९१अ, ९१ब, ९१क यांच्या तरतुदींअन्वये जेथवर मर्यादित करण्यात येतील किंवा त्यात फेरफार करण्यात येतील तेवढे सोडून एरव्ही महानगरपालिकेमध्ये निहित होतील.

(१९२५ चा मुंबई १६.; १८९८ चा मुंबई ४.; १९२५ चा मुंबई १६.)

१९३३ चा मुंबई ३. (२) मुंबई शहर नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९३३ हा प्रवर्तनात येण्याच्या तारखेपूर्वी मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ किंवा मुंबई शहर सुधारणा विश्वस्तव्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ यांच्या तरतुदींस अनुसरून रीतसर मंजूर करण्यात आलेली व त्या तारखेस पार न पाडता राहिलेली कोणतीही सुधारणा परियोजना, सडक परियोजना, लांबणीवर टाकलेल्या सडकांसंबंधीची परियोजना, निर्धन लोकांच्या राहण्याच्या जागांसंबंधीची परियोजना, जमीन पुनःप्रापण परियोजना किंवा पोलिसांच्या राहण्याच्या जागेसंबंधीची परियोजना, ती समाप्त होईपर्यंत, यथोचितरीत्या तत्परतेने पार पाडणे, हे महानगरपालिकेचे कर्तव्य असेल.

(१८९८ चा मुंबई ४.; १९२५ चा मुंबई १६.)

### सुधारणा परियोजना

आयुक्ताने प्रारूप सुधारणा परियोजना तयार करणे.

**३५४क.** (१) [2][ जर आयुक्तास असे दिसून येईल की,—

(ए) [3][ बृहन्मुंबई ] च्या कोणत्याही भागामधील विवक्षित हद्दींमध्ये ]—

(अ) मानवी निवासासाठी उपयोगात आणलेल्या किंवा उपयोगात आणण्याचा इरादा असलेल्या किंवा उपयोगात आणल्या जाण्याचा संभव आहे अशा कोणत्याही इमारती मानवी निवासासाठी अयोग्य आहेत, अथवा

(ब) अशा हद्दीमधील सडका आणि इमारती किंवा इमारतींचे गट यांचा अरुंदपणा, निकटता आणि त्यांची गैरमांडणी किंवा दु:स्थिती ही किंवा उजेड, हवा, वायुवीजन किंवा योग्य त्या सोयी यांचा अभाव किंवा स्वच्छताविषयक कोणतेही इतर दोष किंवा अशी एक किंवा अधिक कारणे ही, अशा हद्दीमधील इमारतींच्या किंवा शेजारच्या इमारतींच्या रहिवाशांच्या आरोग्यास घातक किंवा अपायकारक आहेत ; आणि अशा इमारतीच्या

---

[1] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ३५ अन्वये हे नवीन प्रकरण बारा-अ समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९३६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम (१) अन्वये “ जर आयुक्तास असे दिसून येईल की, शहराच्या कोणत्याही भागाच्या विवक्षित हद्दींच्या आत ” या मजुकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१)४(१) द्वारे “ ग्रेटर बॉम्बे ” या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

संबंधातील अनिष्ट गोष्टी आणि अशा क्षेत्रातील स्वच्छताविषयक दोष हे, अशा क्षेत्रातील सडकांच्या आणि इमारतींच्या किंवा अशा काही सडकांच्या किंवा इमारतींच्या फेरमांडणीसंबंधीच्या आणि फेरबांधणीसंबंधीच्या सुधारणा परियोजनेहून अन्यथा परिणामकारक रीतीने निवारता येणार नाहीत, अथवा

(क) समाजातील निर्धन वर्गाच्या लोकांना [१]* * * * राहण्यासाठी इमारतींची बांधणी करण्यासाठी तरतूद करणे आवश्यक आहे, [३][ अथवा

(बी) [२][ बृहन्मुंबई ] चा विस्तार करण्याकरिता इमारतींसाठी नवीन ठिकाणांची तरतूद करण्याच्या प्रयोजनाकरिता, [२][ बृहन्मुंबई ] च्या कोणत्याही भागाच्या वायुवीजनाच्या सदोष व्यवस्थेची सुधारणा करण्याच्या प्रयोजनाकरिता, किंवा [२][ बृहन्मुंबई ] तील निरनिराळ्या भागात दळणवळणाची नवीन साधने व रहदारीसाठी नव्या सोयी निर्माण करण्याच्या किंवा विद्यमान साधनांत व सोयींत वाढ करण्याच्या प्रयोजनाकरिता [२][ बृहन्मुंबई ] च्या कोणत्याही भागात नवीन सडका तयार करणे किंवा विद्यमान सडकांत फेरफार करणे इष्ट आहे, ]

तर आयुक्तास—

(एक) महानगरपालिकेच्या पूर्वमान्यतेने—अशी मान्यता आपले उत्पन्न पुरेसे असल्याबद्दल महानगरपालिकेची खात्री झालेली असल्याखेरीज देण्यात येणार नाही—एक अधिसूचना तयार करता येईल, अशा अधिसूचनेत आयुक्ताने सुधारणा परियोजना तयार करण्याचे योजिले आहे ही गोष्ट नमूद करण्यात येईल व तसेच निर्णय ज्या क्षेत्रासंबंधी असेल ते क्षेत्र आणि ज्या जागी उक्त क्षेत्राचा नकाशा सर्व वाजवी वेळी पाहता येईल ती जागा नमूद करण्यात येईल.

(दोन) उक्त अधिसूचनेची एक प्रत, लागोपाठ तीन आठवड्यांत [४][ **शासकीय राजपत्रात** ] व [२][ बृहन्मुंबई ] त प्रसृत होणाऱ्या कोणत्याही एका किंवा अधिक इंग्रजी किंवा दोन किंवा अधिक देशी भाषांतील वृत्तपत्रांत प्रसिद्ध करता येईल ; आणि

(तीन) प्रारूप सुधारणा परियोजना तयार करण्याचे काम सुरू करता येईल आणि अशी परियोजना ही [५][ सुधार समितीच्या ] मान्यतेसाठी सादर करता येईल.

(२) एखादी सुधारणा परियोजना तयार करताना एका सुधारणा परियोजनेमध्ये एकाहून अधिक क्षेत्रे समाविष्ट करता येतील.

(३) महानगरपालिकेच्या पूर्वमान्यतेने आयुक्तास, सुधारणा परियोजना तयार करण्याच्या प्रयोजनासाठी, परियोजनेमध्ये समाविष्ट असलेल्या क्षेत्रांच्या हद्दींच्या आतील किंवा अशा हद्दींच्या बाहेरील क्षेत्रांचे सर्वेक्षण करण्याची तजवीज करता येईल.

---

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम १० अन्वये "आणि कामगार वर्गाच्या लोकांना" हा मजकूर वगळण्यात आला.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१)४(१) अन्वये "ग्रेटर बॉम्बे" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९३६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ६(२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये "मुंबई शासन राजपत्रात" या मजकुराऐवजी "शासकीय राजपत्रात" हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १२२ अन्वये "महापौरासह परिषदेच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

१९७७ चा महा. २८.

ज्या क्षेत्रांसाठी गृहनिर्माण परियोजना मंजूर झाली असेल त्या क्षेत्रांकरिता सुधारणा परियोजना नसणे.

[1][ **३५४कक.** या प्रकरणात काहीही अंतर्भूत असले तरी, ज्या कोणत्याही क्षेत्रासाठी [2][ महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम, १९७६ ] याच्या तरतुदींअन्वये गृहनिर्माण परियोजना मंजूर करण्यात आली असेल अशा क्षेत्रासाठी कोणतीही सुधारणा परियोजना तयार करण्यात येणार नाही. ]

आयुक्ताने सादर केलेल्या प्रारूप परियोजनेचा [3][सुधार समितीने] विचार करणे व तिला मान्यता देणे.

**३५४ड.** आयुक्ताने प्रारूप सुधारणा परियोजना सादर केल्यानंतर [3][ सुधार समिती ] अशी परियोजना विचारात घेईल आणि तिला योग्य वाटेल असा तिच्यात फेरफार करून किंवा फेरफार न करता ती मान्यता देऊ शकेल.

प्रारूप सुधारणा परियोजनेमध्ये तरतूद करावयाचा तपशील.

**३५४ई.** (१) ज्या सुधारणा परियोजनेत कलम ३५४क मध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिसूचनेत समाविष्ट केलेल्या क्षेत्राचा कोणताही भाग वगळण्यात येईल किंवा कोणत्याही शेजारच्या जमिनीचा समावेश करण्यात येईल त्या सुधारणा परियोजनेत जर आयुक्तांच्या मते असा अंतर्भाव करणे किंवा अपवर्जन करणे इष्ट असेल तर,—

(एक) परियोजनेत समाविष्ट असलेल्या क्षेत्राच्या हद्दींमध्ये पुढील गोष्टींची तरतूद केली जाईल :—

(अ) आयुक्ताच्या मते जी कोणतीही जमीन अशा परियोजनेच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक असेल किंवा अशा परियोजनेच्या अंमलबजावणीमुळे जिच्यावर परिणाम होईल अशी कोणतीही जमीन संपादन करणे ;

(ब) इमारती बांधणे व पुन्हा बांधणे आणि सडक तयार करणे आणि त्यांमध्ये फेरफार करणे यांसह आवश्यक असतील अशा सर्व किंवा कोणत्याही जमिनीची पुन्हा आखणी करणे ;

(क) याप्रमाणे तयार केलेल्या किंवा फेरफार केलेल्या सडकांतील जलनिस्सारणाचे व मलनिस्सारणाचे कार्य कार्यक्षम रीतीने होण्यासाठी आवश्यक असतील अशा वादळीवाह नाल्या, आणि

(ड) यांप्रमाणे तयार केलेल्या किंवा फेरफार केलेल्या सडकांवर दिवाबत्ती करणे.

(दोन) पूर्वोक्त हद्दींच्या आत पुढील गोष्टींची तरतूद करता येईल :—

(अ) त्या वसतिक्षेत्रातील जलनिस्सारण अधिक चांगल्या रीतीने व्हावे यासाठी जमिनीची सपाटी उंच करणे इष्ट आहे असे आयुक्तास वाटत असेल, तर त्या जमिनीची सपाटी उंच करणे ;

---

[1] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६९, कलम ७५, अनुसूची अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १५० अन्वये ‘ मुंबई गृहनिर्माण मंडळ अधिनियम, १९४८ ’ या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १२३ अन्वये ‘ महापौरांसह परिषदेने ’ व ‘ महापौरासह परिषद ’ या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ब) परियोजनेत समाविष्ट असलेल्या क्षेत्रात किंवा कोणत्याही लगतच्या क्षेत्रात अधिक चांगल्या रीतीने वायुवीजन व्हावे यासाठी खुल्या जागा तयार करणे ;

(क) आवश्यक स्वच्छता व्यवस्थांची पूर्णतः किंवा अंशतः तरतूद करणे ; आणि

(तीन) पूर्वोक्त हद्दीच्या आत किंवा हद्दींबाहेर निर्धन वर्गाच्या लोकांची [१]* * * *, परियोजनेची अंमलबजावणी करण्यामुळे विस्थापित होणाऱ्या अशा वर्गांतील सर्व किंवा त्यांपैकी काही व्यक्ती यांच्यांसह, राहण्याची सोय करण्यासाठी इमारती बांधण्याची तरतूद करता येईल. अशा राहण्याच्या जागेत दुकानांचा समावेश असल्याचे मानण्यात येईल.

(२) सुधारणा परियोजनेतून कलम ३५४क मध्ये निर्दिष्ट केलेल्या अधिसूचनेत समाविष्ट केलेल्या क्षेत्रातील कोणताही भाग वगळता येईल किंवा कोणतीही शेजारची जमीन समाविष्ट करता येईल. परंतु, परियोजना रीतसर पार पाडण्यासाठी अशा रीतीने तो भाग वगळणे किंवा समाविष्ट करणे आवश्यक आहे असे आयुक्ताचे मत असले पाहिजे. तसेच तो भाग अशा रीतीने समाविष्ट करण्यांसंबंधी कलम ३५४क (१) आणि (दोन) मध्ये विहित केलेल्या रीतीने आगाऊ नोटीस दिलेली असली पाहिजे.

[२][ (३) सुधारणा परियोजनेत समाविष्ट असलेल्या क्षेत्राच्या हद्दीतील जी कोणतीही जमीन अशी परियोजना पार पाडण्यासाठी आवश्यक असेल त्या जमिनीच्या मूल्यात अशी परियोजना पार पाडल्यामुळे आयुक्ताच्या मते वाढ होईल तर, परियोजनेत अशी जमीन संपादन करण्याची तरतूद करण्याऐवजी तिच्या मूल्यात होणाऱ्या वाढीच्या संबंधी सुधारणा आकार बसवण्याची तरतूद करता येईल. सुधारणा आकार हा यात यापुढे तरतूद केलेल्या रकमेइतका असेल आणि तो यात यापुढे तरतूद केलेल्या वेळी व त्या रीतीने वसूल करण्यात येईल. ]

परियोजना तयार करताना कोणत्या गोष्टीकडे लक्ष पुरवण्यात येईल.

**३५४फ.** कोणत्याही क्षेत्रासाठी एखादी सुधारणा परियोजना तयार करताना [३][ बृहन्मुंबई ] तील आसपासचे भाग व संपूर्ण [३][ बृहन्मुंबई ] यांची स्थिती व स्वरूप, यांकडे आणि [३][ बृहन्मुंबई ] तील आसपासच्या इतर भागांसाठी सुधारणा परियोजना आवश्यक असण्याच्या संभाव्यतेकडे लक्ष पुरवण्यात येईल.

परियोजना पूर्ण झाल्यावर अनुसरावयाची कार्यपद्धती.

**३५४ग.** (१) [४][ सुधार समितीने ] अशी सुधारणा परियोजना मान्य केल्यानंतर, आयुक्त ताबडतोब एक अधिसूचना तयार करील आणि अशा अधिसूचनेमध्ये अशी परियोजना तयार करण्यात आली आहे ही गोष्ट व त्यामध्ये अंतर्भूत केलेल्या क्षेत्राच्या हद्दी नमूद करील आणि परियोजनेचा तपशील, तिचा नकाशा [५][ आणि जी जमीन संपादन करण्याचे योजिले असेल किंवा जिच्या संबंधात सुधार आकार बसवण्याचे योजिले असेल त्या जमिनीसंबंधीचे विवरण ] ही ज्या जागी सर्व वाजवी वेळी पाहण्यास मिळतील त्या जागेचा नामनिर्देश करील, तसेच तो—

(अ) अशा अधिसूचनेची एक प्रत व असा तपशील, नकाशा आणि विवरण महानगरपालिकेकडे पाठवील ;

---

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम ११ अन्वये " आणि कामगार वर्गाच्या लोकांची " हा मजकूर वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ११(२) अन्वये पोटकलम (३) समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१)४(१) अन्वये " ग्रेटर बॉम्बे " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १२४ अन्वये " महापौरासह परिषदेने " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम १२(१) अन्वये " जमीन संपादन करण्याचे योजिले असेल " या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ब) कलम ३५४क खाली अधिसूचना प्रसिद्ध करण्यासाठी विहित केलेल्या रीतीने ही अधिसूचना प्रसिद्ध करील.

[१][ (२) अशी अधिसूचना प्रथमतः ज्या दिवशी प्रसिद्ध करण्यात आली असेल त्या दिवसाच्या लगतनंतरच्या तीस दिवसांमध्ये जी कोणतीही जमीन किंवा इमारत किंवा एखाद्या इमारतीचा भाग संपादन करण्याचे योजिले असेल किंवा जिच्या संबंधात सुधार आकार बसवण्याचे योजिले असेल त्या जमिनीवर, इमारतीवर किंवा इमारतीच्या भागावर या अधिनियमाखाली बसवण्याजोगे मालमत्ता कर देण्याचे प्रथमतः दायित्व असलेली म्हणून ज्या व्यक्तीचे नाव निर्धारण पुस्तकात आढळून येईल त्या प्रत्येक व्यक्तीवर आयुक्त एक नोटीस बजावील.

(३) अशा नोटिशीत—

(अ) आयुक्ताने महानगरपालिकेच्या वतीने सुधारणा परियोजनेच्या प्रयोजनासाठी किंवा त्यासंबंधात अशी जमीन किंवा इमारत किंवा इमारतीचा भाग संपादन करण्याचे योजिले आहे किंवा त्याबाबत एक सुधार आकार बसवण्याचे योजिले आहे असे नमूद करण्यात येईल, आणि

(ब) याप्रमाणे ज्या व्यक्तीला नोटीस बजावण्यात आली असेल ती व्यक्ती जर याप्रमाणे संपादन करण्यास किंवा यथास्थिति, सुधार आकार बसवण्यात आक्षेप घेईल तर, तिला नोटीस बजावल्याच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत आपली कारणे लेखी नमूद करण्याविषयी फर्मावण्यात येईल. ]

इमारत बांधण्याची कामे चालू असतील तेव्हा अधिसूचना काढल्यावर संपादन करण्याची मागणी करण्याचा मालकाचा अधिकार.

**३५४ह.** (१) संपादन करण्याचे योजिलेली जमीन कलम ३५४ग खाली काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेनुसार तयार केलेल्या ज्या विवरणात विनिर्दिष्ट करण्यात आली असेल अशा कोणत्याही विवरणामध्ये जर कोणतीही जमीन समाविष्ट केलेली असेल आणि अशा जमिनीचा मालक जिल्हाधिकाऱ्याची खात्री होईल अशा रीतीने असे सिद्ध करील की, उक्त अधिसूचनेच्या तारखेस अशा जमिनीवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर इमारती बांधण्याची कामे चालू होती आणि पहिल्या मजल्याच्या सपाटीपर्यंत इमारतीचे बांधकाम पूर्ण झाले होते तर, जिल्हाधिकारी आयुक्तास अशी जमीन संपादन करण्यास सांगेल.

(२) अशी नोटीस मिळाल्यावर, आयुक्त ती गोष्ट ताबडतोब [२][ सुधार समितीस कळवील आणि उक्त समिती ] त्यानंतर नोटिशीत नमूद केलेली जमीन संपादन करणे तिच्या मते इष्ट आहे किंवा कसे अथवा संपादन करण्याचा प्रस्ताव मागे घ्यावा किंवा कसे याचा निर्णय घेईल आणि आपला निर्णय दोन महिन्यांच्या आत महानगरपालिकेला कळवील आणि असा निर्णय कळवल्यापासून एक महिन्याच्या आत महानगरपालिका त्याबाबतीतील आपला निर्णय आयुक्ताला कळवील आणि लागोलाग आयुक्त ताबडतोब अशा निर्णयास अनुसरून एक तर अशी जमीन संपादन करण्याचे काम सुरू करील किंवा संपादन करण्याचा प्रस्ताव मागे घेतला आहे अशी लेखी नोटीस मालकास देईल.

---

[१] सन १९५४ मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम १२(२) अन्वये पोटकलम (२) ऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १२५ अन्वये "महापौरासह परिषदेस कळवील आणि महापौरासह परिषद" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) जर महानगरपालिकेने अशी जमीन संपादन करण्याचे ठरवले तर आयुक्त अशा निर्णयाची नोटीस जिल्हाधिकारी आणि मालक यांना देईल आणि प्रस्तुत जमिनीच्या बाबतीत जणू काही भूमिसंपादन अधिनियम, १८९४ च्या कलम ६ खाली घोषणा करण्यात आलेली असावी त्याप्रमाणे जिल्हाधिकारी काम सुरू करील. १८९४ चा १.

(४) जर महानगरपालिकेने पोटकलम (२) खाली कोणतीही जमीन संपादन करण्याचा प्रस्ताव मागे घेतला तर प्रस्ताव मागे घेण्याची लेखी नोटीस मालकास दिल्याच्या तारखेपासून दोन वर्षांचा काळ समाप्त होईपर्यंत कलम ३५४ग खाली काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेनुसार तयार केलेल्या कोणत्याही विवरणात संपादन करण्याचे योजिलेली जमीन समाविष्ट करण्यात येणार नाही.

[१][ (५) या कलमात काहीही अंतर्भूत केलेले असले तरी जर महानगरपालिकेने पोट-कलम (२) खाली कोणतीही जमीन संपादन करण्याचा प्रस्ताव मागे घेतला तर, अशी जमीन जिच्यासंबधात सुधार आकार बसवण्याचे योजिले असेल अशा जमिनीसंबंधाने कलम ३५४ग खाली काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेनुसार तयार केलेल्या विवरणात समाविष्ट करण्यात आलेली आहे असे मानण्यात येईल :

परंतु, कलम ३५४ग, पोटकलमे (२) व (३) यांच्या तरतुदी या, उक्त पोटकलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेला तीस दिवसांचा कालावधी, जमीन संपादन करण्याचा प्रस्ताव मागे घेण्यात आल्याची नोटीस मालकास दिल्याच्या तारखेपासून मोजण्यात येईल, या फेरफारासह अशा जमिनीच्या बाबतीत लागू होतील. ]

अधिसूचनेच्या तारखेपासून दोन वर्षे लोटल्यानंतर महानगरपालिकेने संपादन करण्याची किंवा प्रस्ताव मागे घेण्याची मागणी करण्याचा मालकाचा अधिकार.

**३५४आय.** (१) कलम ३५४ ग खाली काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेनुसार तयार केलेल्या ज्या विवरणात संपादन करण्याचे योजिलेली जमीन दर्शवण्यात आलेली असेल अशा कोणत्याही विवरणात समाविष्ट केलेल्या कोणत्याही जमिनीच्या मालकास, कलम ३५४ म खाली घोषणा प्रसिद्ध करण्यापूर्वी कोणत्याही वेळी व अशा घोषणेच्या तारखेपासून एक वर्ष लोटल्यानंतर अशा जमिनीचा तपशील निर्दिष्ट करणारी एक लेखी नोटीस आयुक्तास देऊन महानगरपालिकेच्या वतीने अशी जमीन संपादन करण्याविषयी आयुक्तास विनंती करता येईल.

(२) अशी नोटीस मिळाल्यावर आयुक्त ताबडतोब ती गोष्ट [२][सुधार समितीस कळवील आणि उक्त समिती नोटिशीत नमूद केलेली जमीन संपादन करणे इष्ट आहे किंवा कसे ते ठरवील आणि आपला ठराव दोन महिन्यांच्या आत महानगरपालिकेला कळवील, आणि असा ठराव केल्यानंतर दोन महिन्यांच्या आत महानगरपालिका त्याबाबतीतील आपला निर्णय समितीस व आयुक्तास कळवील] आणि लागोलाग आयुक्त, अशा निर्णयास अनुसरून एकतर अशी जमीन संपादन करण्याचे ठरवील अथवा जमीन संपादन करण्याचा प्रस्ताव आपण मागे घेतला असल्याबद्दल मालकास नोटीस देईल.

(३) जर महानगरपालिकेने जमीन संपादन करण्याचे ठरवले तर महानगरपालिका अशा निर्णयाची नोटीस जिल्हाधिकाऱ्याला व मालकाला देण्याचा आयुक्ताला अनुदेश देईल आणि जिल्हाधिकारी जणू काही प्रस्तुत जमिनीच्या बाबतीत भूमिसंपादन अधिनियम, १८९४ च्या कलम ६ खाली घोषणा करण्यात आलेली असावी त्याप्रमाणे काम सुरू करील. १८९४ चा १.

---

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम १३ अन्वये पोटकलम (५) समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १२६ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(४) महानगरपालिका, पोट कलम (२) खाली कोणतीही जमीन संपादन करण्याचा प्रस्ताव मागे घेईल तर अशी जमीन ही, प्रस्ताव मागे घेतल्याची लेखी नोटीस मालकास दिल्याच्या तारखेनंतर दोन वर्षे लोटेतोपर्यंत, कलम ३५४ ग खाली काढलेल्या कोणत्याही अधिसूचनेनुसार तयार केलेल्या कोणत्याही विवरणात, संपादन करण्याचे योजिलेली जमीन समाविष्ट करण्यात येणार नाही.

[१][(५) या कलमात काहीही अंतर्भूत केलेले असले तरी महानगरपालिकेने पोट कलम (२) खाली कोणतीही जमीन संपादन करण्याचा प्रस्ताव मागे घेतला तर अशी जमीन, सुधार आकार बसवण्याचे योजिलेल्या जमिनीसंबंधी कलम ३५४ ग खाली काढलेल्या अधिसूचनेनुसार तयार केलेल्या कोणत्याही विवरणात समाविष्ट करण्यात आलेली आहे असे मानण्यात येईल :

परंतु, कलम ३५४ ग, पोटकलम (२) व (३) यांच्या तरतुदी, उक्त पोट कलम (२) मध्ये निर्दिष्ट केलेला तीस दिवसांचा कालावधी अशी जमीन संपादन करण्याचा प्रस्ताव मागे घेण्यात आल्याची नोटीस मालकास दिल्याच्या तारखेपासून मोजण्यात येईल या फेरफारांसह अशा जमिनीच्या बाबतीत लागू होतील.]

नोटिसा प्रसिद्ध केल्यानंतर व बजावल्यानंतर ती परियोजना [ सुधार समितीने ] मान्यतेसाठी महानगरपालिकेकडे पाठवणे.

**३५४ज.** (१) परियोजनेच्या नोटिसा प्रसिद्ध करण्याच्या बाबतीतील पूर्वगामी तरतुदीचे अनुपालन केल्यानंतर, आयुक्त कलम ३५४ ग खाली आलेला कोणताही [२][आक्षेप किंवा अभिवेदन] हे, परियोजना सुधारण्याच्या संबंधात जी कोणतीही सुचना करण्याची त्याची इच्छा असेल त्या सूचनेसह [३][सुधार समितीस] सादर करील.

(२) [३][सुधार समिती] कोणताही असा [४][आक्षेप किंवा अभिवेदन] किंवा सूचना विचारात घेतल्यानंतर आणि तिला योग्य वाटतील असे फेरफार परियोजनेत दाखल केल्यानंतर अशी परियोजना कोणतेही अभिवेदन, उत्तर किंवा सुचना यांसह महानगरपालिकेस तिच्या मान्यतेसाठी सादर करील.

महानगरपालिकेने सुधारणा परियोजना विचारात घेणे व ती मान्य करणे किंवा अमान्य करणे.

**३५४के.** महानगरपालिका, [५][सुधार समितीकडून] परियोजना मिळाल्यानंतर, कलम ३५४ ग किंवा ३५४ ज याखाली मिळालेला कोणताही [६][आक्षेप, अभिवेदन] किंवा करण्यात आलेली कोणतीही सूचना यासह अशी परियोजना विचारात घेण्याच्या कामास सुरुवात करील आणि परियोजना फेरफारासह किंवा फेरफारावाचून मान्य केल्यानंतर किंवा परियोजना मान्य करण्याचे नाकारल्यानंतर तशा अर्थाचा ठराव करील.

---

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनिय क्रमांक ३४, कलम १४ अन्वये पोटकलम (५) जादा दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १५(१) अन्वये " निवेदन किंवा उत्तर " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १२७ अन्वये " महापौरासह परिषद " या शब्दप्रयोगाऐवजी हा शब्दप्रयोग त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १५(२) अन्वये " निवेदन, उत्तर " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[५] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १२८ अन्वये " महापौरासह परिषदेकडून " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम १६ अन्वये " निवेदन, उत्तर " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

परियोजनस मंजुरी मिळण्यासाठी आयुक्ताने [२][ राज्य ] शासनाकडे अर्ज करणे.

**३५४ल.** (१) महानगरपालिकेने परियोजनेस मान्यता दिल्यानंतर आयुक्त ताबडतोब महानगरपालिकेच्या वतीने, परियोजनेस मंजुरी मिळण्यासाठी [१][[२][राज्य] शासनाकडे] अर्ज करील.

(२) जर महानगरपालिकेने परियोजनेस मान्यता दिली नाही, तर ती तशा अर्थाचा निर्णय संमत करील. लागोलाग आयुक्त, उक्त सुधारणा परियोजना तयार करण्याच्या कामास सुरूवात न करण्याविषयी महानगरपालिकेने निर्णय घेतला आहे अशी वस्तुस्थिती नमूद करणारी एक अधिसूचना ताबडतोब तयार करील आणि उक्त अधिसूचना कलम ३५४ क मध्ये विहित केलेल्या रीतीने प्रसिद्ध करील. लागोलाग कलमे ३५४क आणि ३५४ग खाली प्रसिद्ध केलेल्या योजने-संबंधीच्या अधिसूचना रद्द झाल्या आहेत असे मानले जाईल.

(३) पोट-कलम (१) खालील मंजुरीसाठी [२][[३][राज्य] शासनाकडे] करावयाच्या अर्जासोबत पुढील कागदपत्रे असतील :—

[४][(अ) कलम ३५४ ड खाली सुधार समितीने संमत केलेल्या ठरावाची प्रत] ;

(ब) कलम ३५४ क खाली महानगरपालिकेने संमत केलेल्या निर्णयाची एक प्रत ;

(क) परियोजनेत केलेल्या कोणत्याही फेरफारांची कारणे देऊन त्यांसह परियोजनेचे पूर्ण तपशिलासह वर्णन ;

(ड) संपूर्ण आराखडे व परियोजना अंमलात आणण्यासाठी येणाऱ्या खर्चाचे अंदाज ;

(ई) [५][जी जमीन संपादन करण्याचे योजिले असेल किंवा जिच्या बाबतीत सुधार आकार बसवण्याचे योजिले असेल अशी] जमीन विनिर्दिष्ट करणारे विवरण ;

(फ) कलम ३५४ ग, पोट कलम (२) मध्ये नमूद केलेल्या नोटिशींच्या उत्तरादाखल [६][जमीन संपादन करण्याच्या बाबतीत किंवा सुधार आकार बसवण्याच्या बाबतीत ज्या कोणत्याही व्यक्तींनी आक्षेप घेतला असेल त्यांच्या नावांची यादी व अशा व्यक्तींनी अशा आक्षेपाबद्दल कोणतीही कारणे दिली असल्यास ती कारणे ;]

(ग) कलम ३५४ ग खाली जमिनीसंबंधी काढण्यात आलेली अधिसूचना प्रसिद्ध झाल्याच्या तारखेस खंड (ई) खालील विवरणात विनिर्दिष्ट केलेल्या सर्व जमिनीचे आणि परियोजना अंमलात आणताना तयार करण्यात येणाऱ्या किंवा फेरफार करण्यात येणाऱ्या कोणत्याही सडकेच्या कोणत्याही बाजूपासून ८० फुटांच्या आत पूर्णतः अथवा अंशतः असलेल्या इतर कोणत्याही जमिनीचे आयुक्ताच्या निर्धारण पुस्तकात नोंद केलेले करयोग्य मूल्य दर्शवणारी अनुसूची.

---

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम १६ अन्वये " निवेदन, उत्तर " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " शासन " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १२९ अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[५] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम १७(१) अन्वये " संपादन करण्याचे योजिलेली " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम १७(२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**३५४म.** (१) (अ) [१][[२][ राज्य ] शासनाची ] मंजुरी मिळाल्यावर, आयुक्त अशी मंजुरी मिळाल्याचे निवेदन व परियोजनेच्या प्रयोजनांसाठी महानगरपालिकेने संपादन करण्याचे योजिलेली जमीन सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे हे नमूद करणारी व शासनाच्या सचिवाची सही असलेली घोषणा [१][[२][ राज्य ] शासनाकडे ] अधिसूचित केली जाण्यासाठी अग्रेषित करील.

मंजुरी मिळाल्यानंतर संपादन करावयाच्या जमिनीचा तपशील देणारी घोषणा प्रसिद्ध करणे व अशी घोषणा प्रसिद्ध झाल्यावर आयुक्ताला परियोजना अंमलात आणण्यास प्राधिकृत करणे.

(ब) ही घोषणा [३][ **शासकीय राजपत्रात** ] प्रसिद्ध करण्यात येईल आणि त्यात संपादन करण्याचे योजिलेली जमीन ज्या हद्दींच्या आत असेल त्या हद्दी, ज्या प्रयोजनाकरिता ती जमीन आवश्यक असेल ते प्रयोजन, तिचे अंदाजे क्षेत्र आणि जेथे जमिनीच्या आराखड्याचे निरीक्षण करता येईल ती जागा या गोष्टी नमूद करण्यात येतील.

(क) उक्त घोषणा ही, जमीन सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक आहे याविषयी निर्णायक पुरावा असेल आणि आयुक्त उक्त घोषणेच्या प्रसिद्धीनंतर, परियोजना अंमलात आणण्याच्या कामास सुरुवात करील.

(२) (अ) परियोजनेच्या कोणत्याही भागात सुधारणा करणे शक्य आहे असे यथास्थिति आयुक्तास, [४][ सुधार समितीस ] किंवा महानगरपालिकेस कोणत्याही वेळी दिसून आले तर, महानगरपालिकेस अशी सुधारणा करण्याच्या प्रयोजनासाठी परियोजनेत फेरफार करता येईल आणि लागोलाग आयुक्त या पोट-कलमातील पुढील दोन खंडामधील तरतुदींच्या अधीनतेने असे फेरफार केलेली परियोजना अंमलात आणण्याच्या कामास सुरुवात करील.

(ब) जर फेरफार केलेली परियोजना अंमलात आणण्यासाठी अंदाजलेला निव्वळ परिव्यय हा, मंजूर केलेली परियोजना अंमलात आणण्यासाठी अंदाजलेल्या निव्वळ खर्चाच्या रकमेपेक्षा शेकडा दहा टक्क्यांनी अधिक असेल तर, आयुक्त फेरफार केलेली परियोजना अंमलात आणण्याच्या कामास महानगरपालिकेच्या व [१][[२][ राज्य ] शासनाच्या ] पूर्वमंजुरीवाचून सुरुवात करणार नाही.

(क) जर अशा रीतीने फेरफार केलेल्या परियोजनेमध्ये कलम ३५४ल, पोट-कलम (३) खालील परियोजनेला जोडलेल्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीहून अन्य कोणतीही जमीन, कराराखेरीज अन्यथा संपादन करणे अंतर्भूत असेल तर, कलमे ३५४ग व ३५४ल आणि पोट-कलम (१) यांच्या तरतुदी जणू काही फेरफार केलेला असा भाग ही ती परियोजनाच असावी याप्रमाणे फेरफार केलेल्या अशा परियोजनेच्या भागाच्या बाबतीत लागू होतील.

**३५४न.** पूर्वोक्त घोषणेच्या तारखेपासून तीन वर्षांच्या आत, जर महानगरपालिका मुंबई शहर नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९३३ हा प्रवर्तनात आल्यानंतर अधिसूचित करण्यात आलेल्या कोणत्याही परियोजनेच्या प्रयोजनांकरिता संपादन करण्याचे योजिलेली जमीन किंवा असा जमिनीचा कोणताही भाग संपादन करण्यात कसूर करील तर, घोषणेमध्ये समाविष्ट केलेल्या कोणत्याही जमिनीच्या मालकास अशा जमिनीचा तपशील देणारी लेखी नोटीस देऊन तिच्याद्वारे महानगरपालिकेला अशी जमीन संपादन करण्यास किंवा ती संपादन करण्याचे प्रस्ताव मागे घेण्यास सांगता येईल. त्यानंतर ३५४आय, पोट-कलमे (२) ते (४) मध्ये विहित केलेली कार्यपद्धती अनुसरण्यात येईल.

१९३३ चा मुंबई १३.

महानगरपालिका जमीन संपादन करण्यात कसूर करील तर मालकास ती जमीन संपादन करण्याबाबत किंवा प्रस्ताव मागे घेण्याबाबत [५][ समितीला ] सांगता येईल.

[१] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये “ सरकार ” या शब्दाऐवजी “ प्रांतिक सरकार ” हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये “ प्रांतिक ” या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाअन्वये “ मुंबई सरकार राजपत्र ” या शब्दांऐवजी “ **शासकीय राजपत्र** ” हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १३० अन्वये “ महापौरासह परिषदेस ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १३१ अन्वये “ महानगरपालिकेला ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## पोलीस निवासव्यवस्थेसंबंधीच्या परियोजना

महानगरपालिकेचा पोलीस निवासव्यवस्थेसंबंधीची परियोजना तयार करण्याचा अधिकार.

**३५४ओ.** [1][बृहन्मुंबईच्या] कोणत्याही पोलीस निवासव्यवस्थेकरिता [1][ बृहन्मुंबईतील ] कोणत्याही भागात जागेची सोय करणे आवश्यक आहे असे अभिवेदन [2][[3][ राज्य ] शासन ] महानगरपालिकेस करील, तेव्हा महानगरपालिका असे अभिवेदन विचारात घेईल आणि आपली साधनसंपत्ती पुरेशी असल्याची व तसे करणे अन्यथा इष्ट असल्याची तिची खात्री झाली तर, अशा निवासव्यवस्थेची तरतूद करणारी परियोजना तयार करण्यात यावी अशा अर्थाचा निर्णय ती संमत करील आणि पोलीस निवासव्यवस्थेसंबंधीची परियोजना तयार करण्याचे काम ताबडतोब सुरू करण्याविषयी आयुक्तास निदेश देईल.

(२) पोलीस निवासव्यवस्थेसंबंधीच्या परियोजनेत अशा कोणत्याही किंवा सर्व वर्गांतील पोलिसांकरिता राहण्याची घरे, पोलीस ठाणी व आनुषंगिक इमारती बांधण्याकरिता व ही परियोजना अंमलात आणण्यासाठी आवश्यक असलेली कोणतीही जमीन संपादन करण्याकरिता, तिची सपाटी वाढवण्याकरिता व ती समतल करण्याकरिता तरतूद करता येईल.

परियोजना पूर्ण झाल्यावर अनुसरावयाची कार्यपद्धती.

**३५४प.** पोलिसांच्या निवासव्यवस्थेसंबंधीची परियोजना पूर्ण झाल्यावर कलमे ३५४ग ते ३५४म यांच्या तरतुदी, जणू काही ही परियोजना सुधारणा परियोजनाच असावी, त्याप्रमाणे अशा परियोजनेच्या बाबतीत सर्व आवश्यक फेरफारांसह लागू होतील.

जमीन महानगरपालिकेमध्ये निहित असणे.

**३५४क्यू.** (१) जेव्हा अशी परियोजना [2][[3][ राज्य ] शासनाने ] मंजूर केलेली असेल तेव्हा अनुसूची डब्ल्यूमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीच्या बाबतीत [2][[3][ राज्य ] शासन ] ती जमीन परत घेईल आणि उक्त जमीन लागोलाग महानगरपालिकेमध्ये निहित होईल.

(२) आयुक्त, नंतर, पोलीस निवासव्यवस्थेसंबंधीची परियोजना अंमलात आणण्यास सुरुवात करील.

(३) या कलमाखाली बांधण्यात आलेली कोणतीही इमारत, ती पूर्ण झाल्याच्या तारखेपासून साठ वर्षांच्या अवधीकरिता पोलीस निवासव्यवस्थेच्या प्रयोजनासाठी ठिकाणासहित [2][[3][ राज्य ] शासन ] धारण करील आणि [2][[3][ राज्य ] शासन ] उक्त कालावधीत दरवर्षी भाड्याच्या रूपाने पुढील रकमांच्या बेरजेइतकी रक्कम महानगरपालिकेस देईल.—

(अ) परियोजनेवर महानगरपालिकेने खर्च केलेल्या सर्व पैशांवर महानगरपालिकेने द्यावयाचे वार्षिक व्याज ; आणि

(ब) कर्जनिवारण निधीचे आकार हे जेणेकरून उक्त कालावधीच्या अखेरीस कर्जनिवारण निधीची एकूण रक्कम ही या परियोजनेवर खर्च केलेल्या एकूण रकमेइतकी होईल अशा रीतीने हिशेब करून काढण्यात येतील. अशा एकूण रकमेत पुढील रकमांचा समावेश होईल :—

(एक) उक्त कालावधीच्या प्रारंभाच्या तारखेपर्यंत व्याज व कर्जनिवारण निधी आकार यांवर खर्च केलेला सर्व पैसा ;

(दोन) परियोजनेत अंतर्भूत केलेली जमीन, अनुसूची डब्ल्यूमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या जमिनीचा भाग नसेल तर व तेथवर अशा जमिनीचा परिव्यय ;

---

[1] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ (१)४(१) अन्वये "ग्रेटर बॉम्बे" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[2] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाअन्वये "सरकार" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[3] विधि अनुकूलन परिषद आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(तीन) उक्त कालावधीच्या सुरुवातीच्या तारखेपर्यंतचा प्रारंभिक खर्च आणि व्यवस्थापन व पर्यवेक्षण यांसंबंधीची रक्कम ;

(४) या कलमाच्या प्रयोजनांकरिता अशा जमिनीची किंमत—

(अ) या परियोजनेसाठी जमीन संपादन केली असेल तर, व तेथवर, तिच्या संपादनाचा प्रत्यक्ष परिव्यय आहे, आणि

(ब) इतर सर्व बाबतीत, परियोजना घोषित करण्यात आल्याच्या तारखेस असलेले जमिनीचे बाजार मूल्य आहे,

असे मानण्यात येईल.

(५) [१][[२][ राज्य ] शासन ] पोट-कलम (३) खाली धारण केलेली इमारत योग्य त्या दुरुस्त स्थितीत ठेवील.

(६) साठ वर्षांचा कालावधी संपल्यानंतर इमारत व तिचे ठिकाण म्हणून असलेली जमीन पूर्णतः [३][ शासनामध्ये ] निहित होईल.

१८९८ चा मुंबई ४. १९२५ चा मुंबई १६.

(७) [४][ मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ किंवा मुंबई शहर सुधारणा विश्वस्तव्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ यांच्या तरतुदीस अनुसरून [१][[२][ राज्य ] शासनाने ] यापूर्वी मंजूर केलेल्या पोलीस निवासव्यवस्थेसंबंधीच्या सर्व परियोजनांना, जणू काही अशा परियोजना या अधिनियमाच्या तरतुदींखाली मंजूर करण्यात आल्या असाव्यात त्याप्रमाणे लागू होतील.

## [५][ **निपटारा क्षेत्रे**

एखादे क्षेत्र निपटारा क्षेत्र म्हणून घोषित करण्याचा अधिकार.

**३५४र.** (१) जर आयुक्तास [६][बृहन्मुंबईच्या] कोणत्याही भागातील कोणत्याही क्षेत्राच्या बाबतीत असे आढळून येईल की,—

(अ) त्या क्षेत्रातील निवासी इमारती दुरुस्तीच्या अभावी किंवा स्वच्छताविषयक दोषांमुळे मानवी निवासासाठी अयोग्य आहेत किंवा त्याच्या गैरमांडणीमुळे किंवा सडकांचा अरुंदपणा किंवा गैरमांडणी यांमुळे त्या इमारती त्या क्षेत्रातील रहिवाशांच्या आरोग्यास घातक किंवा अपायकारक आहेत आणि त्या क्षेत्रात इतर कोणत्याही इमारती असल्यास त्या तशाच कारणामुळे उक्त रहिवाशांच्या आरोग्यास घातक किंवा अपायकारक आहेत ; आणि

(ब) सुधारणा परियोजना तयार न करता, त्या क्षेत्रातील सर्व इमारती पाडून टाकून त्या क्षेत्रातील परिस्थिती परिणामकारकपणे सुधारणे आवश्यक आहे ;

---

[१] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये "सरकार" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] विधि अनुकूलन परिषद आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमान्वये "हिज मॅजेस्टी" या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ हा, मुंबई शहर सुधारणा विश्वस्तव्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ याअन्वये निरसित करण्यात आला व हाही अधिनियम आता सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३ अन्वये निरसित करण्यात आला. परिशिष्ट पहा.

[५] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम १८ अन्वये हे शिर्षक त्या खालील कलमे ही, कलमे ३५४ आर व ३५५ एस यांऐवजी दाखल करण्यात आली.

[६] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१)४(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

तर आयुक्तास, ते क्षेत्र त्यातून मानवी निवासासाठी अयोग्य नसेल किंवा आरोग्यास घातक किंवा अपायकारक नसेल अशी कोणतीही इमारत त्यातून वगळली जाईल अशा रीतीने आराखडा तयार करून निश्चित करण्याची तजवीज करता येईल आणि [१][ * * * * ] निपटारा क्षेत्राची प्रारूप परियोजना मान्यतेसाठी महानगरपालिकेस सादर करता येईल. निपटारा क्षेत्राबाबत आयुक्ताने परियोजनेचा मसुदा सादर केल्यावर महानगरपालिका अशी परियोजना विचारात घेईल आणि तिला योग्य वाटेल असा फेरफार त्यात करून किंवा फेरफार न करता ती मंजूर करील. त्यानंतर महानगरपालिका, याप्रमाणे सीमांकित केलेले व महानगरपालिकेने मान्य केलेले क्षेत्र हे निपटारा क्षेत्र म्हणजेच या अधिनियमांतील यानंतरच्या तरतुदींस अनुसरून ज्यातील सर्व इमारती पाडून टाकावयाच्या आहेत असे क्षेत्र आहे असे घोषित करणारा ठराव संमत करील. या क्षेत्राचा उल्लेख यात यापुढे निपटारा क्षेत्र असा करण्यात येईल व या परियोजनेचा उल्लेख निपटारा क्षेत्राबाबतची परियोजना असा करण्यात येईल.

(२) कोणतेही क्षेत्र निपटारा क्षेत्र म्हणून घोषित करण्यापूर्वी, महानगरपालिकेने स्वतःजवळ पुरेशी साधनसंपत्ती असल्याबद्दल आणि अशा क्षेत्रातील ज्या व्यक्ती बेघर होण्याचा संभव असेल त्या व्यक्तीच्या संख्येविषयी खातरजमा करून घेणे आणि त्यानंतर बेघर व्यक्तींना शक्य तितका कमी त्रास होईल अशा रीतीने आपला कार्यक्रम आखून किंवा इतर रीतीने व्यवहार्य असतील असे उपाय योजणे हे महानगरपालिकेचे अवश्य कर्तव्य असेल.

(३) या कलमाखाली महानगरपालिकेने संमत केलेल्या निर्णयाची एक प्रत आयुक्त महानरपालिकेच्या वतीने ताबडतोब राज्य शासनाकडे पाठवील.

(४) महानगरपालिकेने कोणतेही क्षेत्र निपटारा क्षेत्र म्हणून घोषित केल्यावर लगेच या अधिनियमात यापुढे असलेल्या समुचित तरतुदींनुसार पुढीलपैकी एका किंवा इतर रीतीने किंवा अंशतः त्यांपैकी एका रीतीने व अंशतः त्यापैकी इतर रीतीने, म्हणजे—

(अ) त्या क्षेत्रातील इमारती पाडून टाकण्याचा आदेश देऊन ; अथवा

(ब) महानगरपालिकेच्या वतीने उक्त क्षेत्रात समविष्ट असलेली जमीन संपादन करून आणि अन्यथा त्यावरील इमारती पाडून टाकण्याचे काम हाती घेऊन किंवा तशी व्यवस्था करून ;

उक्त क्षेत्रात निपटाराविषयक कामास सुरुवात करील.

निपटारा आदेश. **३५४रअ.** (१) जेव्हा कोणत्याही निपटारा क्षेत्राच्या संबंधात आयुक्त निपटारा क्षेत्रातील कोणत्याही इमारती पाडून टाकण्याचा आदेश देण्याचे निर्धारित करील तेव्हा, तो [२][ * * * * * ] महानगरपालिकेच्या मान्यतेने, त्या इमारतीपैकी प्रत्येक इमारत पाडून टाकण्याचे आदिष्ट करणारा आदेश (या अधिनियमात " निपटारा आदेश " म्हणून निर्देशिलेला ) राज्य शासनाने कायम करावा, यासाठी त्यास सादर करील.

(२) निपटारा आदेश ज्या क्षेत्रात तो लागू असेल त्या क्षेत्राचे वर्णन, नकाशा संदर्भानिशी करील ; आणि ज्या तारखेस तो प्रवर्तनात येईल त्या तारखेनिशी उक्त क्षेत्रातील इमारती पाडून टाकण्याच्या प्रयोजनासाठी ज्या कालावधीच्या आत त्या इमारती रिकाम्या करून देण्याविषयी आयुक्ताने फर्मावले असेल तो कालावधी निश्चित करील—हा कालावधी त्या तारखेपासून अठ्ठावीस दिवसांपेक्षा कमी दिवसांचा असणार नाही आणि त्या प्रयोजनासाठी त्यास निरनिराळ्या इमारतींच्या बाबतीत निरनिराळे कालावधी निश्चित करता येतील.

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १३२ अन्वये " महापौरासह परिषदेची मान्यता मिळाल्यानंतर " हा मजकूर वगळण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १३३(अ) अन्वये " महापौरासह परिषदेच्या आणि " हा मजकूर वगळण्यात आला.

(३) निपटारा क्षेत्रात असलेली जी कोणतीही घरे किंवा इतर इमारती या, इतर इमारतीच्या तुलनेत त्यांची गैरबांधणी असल्यामुळे किंवा सडकांचा अरुंदपणा अथवा गैरबांधणी या कारणामुळे त्या क्षेत्रातील रहिवाशांच्या आरोग्यास घातक किंवा अपायकारक आहेत याच केवळ कारणासाठी उक्त क्षेत्रात समाविष्ट करण्यात आल्या असतील ती घरे किंवा त्या इमारती निपटारा आदेशातून वगळण्यात येतील :

परंतु, जी इमारत राहते घर म्हणून किंवा अंशतः त्या प्रयोजनासाठी अथवा अंशतः इतर प्रयोजनासाठी बांधण्यात किंवा अनुकूलन करून घेण्यात आली असेल त्या इमारतीचा, कोणताही भाग (इतर प्रयोजनासाठी वापरण्यात आलेला भाग वगळून) नादुरुस्त झाल्यामुळे किंवा स्वच्छताविषयक दोषांमुळे मानवी निवासासाठी अयोग्य असेल तर, हे पोट-कलम अशा इमारतीच्या बाबतीत लागू होणार नाही.

(४) राज्य शासनाला आदेश सादर करण्यापूर्वी, आयुक्त पुढील गोष्टी करील—

(अ) असा निपटारा आदेश काढल्याचे नमूद केलेली नोटीस **शासकीय राजपत्रात** व [१][बृहन्मुंबईत] प्रसृत होणाऱ्या तीन किंवा अधिक वृतपत्रांत एकाच वेळी प्रसिद्ध करील व त्यात समाविष्ट असलेल्या क्षेत्राचे वर्णन आणि या आदेशाची व त्यात उल्लेख केलेल्या आराखड्याची प्रत सर्व वाजवी वेळी ज्या जागी पाहता येईल ती जागा यांचा नामनिर्देश करील ; आणि

(ब) निपटारा आदेशाचा ज्या क्षेत्राशी संबंध असेल त्या क्षेत्रात समाविष्ट असलेल्या कोणत्याही इमारतीवर, या अधिनियमाखाली बसवण्यात यावयाचा मालमत्ता कर भरण्याचे प्रथमतः दायित्व असलेली व्यक्ती म्हणून ज्या व्यक्तिचे नाव आयुक्ताच्या निर्धारण पुस्तकात असेल त्या प्रत्येक व्यक्तीवर आणि—अशा व्यक्तीबाबत खातरजमा करून घेणे व्यवहार्य असेल तेथवर—आणि अशी मालमत्ता ज्याच्याकडे गहाण असेल अशा प्रत्येक गहाणधारकावर नोटीस बजावील, व अशा नोटिशीत निपटारा आदेशाचा परिणाम व तो कायम करण्यासाठी लवकरच राज्य शासनास सादर करण्यात येणार आहे असे नमूद करणारी आणि त्या संबंधातील आक्षेप आयुक्ताकडे ज्या वेळेच्या आत व ज्या रीतीने सादर करता येतील ती वेळ व ती रीत विनिर्दिष्ट करील.

(५) निपटारा आदेशासंबंधी नोटीस प्रसिद्ध करणे व बजावणे यासंबंधीच्या पूर्वगामी तरतुदीचे अनुपालन केल्यावर, आयुक्त पोट-कलम (४) खाली मिळालेले कोणतेही आक्षेप आणि त्यास त्याबाबतीत कोणत्याही सूचना करावयाच्या असतील त्या सूचना [२][ सुधार समितीस ] सादर करील.

(६) [२][ सुधार समितीस ] असे कोणतेही आक्षेप व सूचना यांचा विचार केल्यानंतर त्या आदेशाबाबत तिला योग्य वाटतील असे फेरबदल करता येतील आणि त्यानंतर आयुक्त, [२][ सुधार समितीने ] [३][ **** ] मान्य केलेला आदेश कायम केला जाण्यासाठी तो प्रथमतः महानगरपालिकेस व नंतर राज्य शासनास सादर करील.

(७) या अधिनियमाची अनुसूची गग यातील तरतुदी निपटारा आदेशाची विधिग्राह्यता व तो प्रवर्तनात येण्याची तारीख याबाबतीत लागू होतील.

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१)४(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १३३(ब) अन्वये "महापौरासह परिषदेस" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १३३ (क) अन्वये "महापौरासह परिषद" या मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारासंह दाखल करण्यात आला.

[४] १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १६१क (दोन) अन्वये 'फेरबदलांसह किंवा फेरबदलांविना' हा मजकूर वगळण्यात आला.

(८) निपटारा आदेश प्रवर्तनात आल्यावर, असा आदेश लागू असलेल्या कोणत्याही इमारतीचा मालक किंवा इमारतीचे मालक अशा आदेशानुसार ती इमारत ज्या तारखेस रिकामी करणे आवश्यक असेल त्या तारखेपासून सहा आठवड्यांचा अवधी संपण्यापूर्वी किंवा त्या तारखेपर्यंत ती रिकामी करण्यात आली नसेल तर ज्या तारखेस ती रिकामी करण्यात येईल त्या तारखेपासून सहा आठवड्यांचा अवधी संपण्यापूर्वी किंवा या दोन्हींपैकी कोणत्याही बाबतीत, त्या परिस्थितीत आयुक्तास वाजवी वाटेल त्याहून अधिक असलेला अवधी संपण्यापूर्वी ती इमारत पाडून टाकील आणि जर ती इमारत तो अवधी संपण्यापूर्वी पाडून टाकण्यात आली नाही तर आयुक्त ती इमारत पाडून टाकण्याची आणि तिचे सामान विकण्याची उपाययोजना करील.

(९) पूर्वगामी पोट-कलमाखाली आयुक्ताला काही खर्च करावा लागला असेल तर आयुक्त, झालेल्या खर्चाच्या रकमेतून सामान विकून मिळालेली रक्कम वजा जाता जी रक्कम शिल्लक राहील ती रक्कम इमारतीचा मालक किंवा इमारतींचे मालक देतील आणि असा खर्च भागवल्यानंतर आयुक्ताच्या हाती जी कोणतीही अधिशेष रक्कम राहील ती तो इमारतीच्या मालकास देईल आणि एकापेक्षा अधिक मालक असतील तर ती रक्कम मालक संमत करतील त्याप्रमाणे देईल. अशा मालकांमध्ये संमती घडून न आल्यास आयुक्त अधिशेष रक्कम लघुवाद न्यायालयात जमा करील आणि उक्त न्यायालयाचे मुख्य न्यायाधीश अशी रक्कम अशा मालकास कोणत्या प्रमाणात दिली पाहिजे ते ठरवतील, मुख्य न्यायाधीशाचा निर्णय अंतिम असेल.

(१०) निपटारा आदेश प्रवर्तनात येईल तेव्हा हा आदेश लागू असलेली कोणतीही जमीन, [१][ महानगरपालिका, सर्वसाधारणपणे किंवा विशेषतः लादील अशा निर्बंधाच्या व शर्तीच्या अधीनतेने असेल ] तेवढे सोडून एरव्ही इमारतीच्या प्रयोजनांसाठी वापरता येणार नाही किंवा अन्यथा तिचा विकास करता येणार नाही.

(११) निपटारा आदेश लागू असलेल्या क्षेत्रात समाविष्ट असलेल्या इमारतीसंबंधी या अधिनियमात ज्या तरतुदी आहेत त्यांत इमारतीसंबंधीच्या उल्लेखात मानवी नियमासाठी उपयोगात आणलेली व त्या तरतुदींखाली उपाययोजना करण्याच्या निकटपूर्वीच्या दोन वर्षांच्या कालावधीत एकाच कुंपणाच्या आत असलेली झोपडी, तंबू किंवा इतर तात्पुरत्या किंवा हलवता येण्याजोग्या स्वरूपाची निवाऱ्याची जागा यासंबंधीच्या उल्लेखाचा समावेश होईल आणि पोट-कलम (१०) मधील विकासासंबंधीच्या उल्लेखांत जमिनीवर एखादी झोपडी, तंबू किंवा इतर तात्पुरत्या किंवा हलविता येण्याजोग्या स्वरूपाची निवाऱ्याची जागा उभारणे किंवा ठेवणे यासंबंधीच्या उल्लेखाचा समावेश होईल.

निपटारा क्षेत्राने वेढलेली किंवा त्याला लागून असलेली जमीन संपादन करणे.

**३५४रब.** जेव्हा, महानगरपालिकेने निपटारा क्षेत्र म्हणून घोषित केलेल्या कोणत्याही क्षेत्राच्या बाबतीत त्या क्षेत्रात समाविष्ट असलेली कोणतीही जमीन संपादन करण्याचे आयुक्त निर्धारित करील तेव्हा, त्यास, निपटारा क्षेत्राने वेढलेली जी कोणतीही जमीन, निपटारा क्षेत्र सोईस्कर आकाराचे व मितीचे होण्यासाठी संपादन करणे वाजवी रीतीने आवश्यक असेल ती जमीन व निपटारा क्षेत्राचा समाधानकारक रीतीने विकास किंवा वापर करता येण्यासाठी अशा क्षेत्रास लागून असलेली जी कोणतीही जमीन वाजवी रीतीने संपादन करणे आवश्यक असेल ती जमीन देखील संपादन करता येईल.

---

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १६१ (ड) अन्वये मूळ मजकुरा ऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**३५४रक.** या कलमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, आयुक्तास महागनरपालिकेच्या मालकीची जी कोणतीही जमीन महानगरपालिकेच्या मालकीची नसती तर त्याने निपटारा क्षेत्रात समाविष्ट केली असती ती जमीन निपटारा क्षेत्रात समाविष्ट करता येईल; आणि जेव्हा महानगरपालिकेची कोणतीही जमीन निपटारा क्षेत्रात समाविष्ट करण्यात आली असेल किंवा महानगरपालिकेच्या मालकीची असलेली व निपटारा क्षेत्राने वेढलेली किंवा त्यास लागून असलेली जमीन, ती पूर्वी महानगरपालिकेच्या मालकीची नसती तर शेवटच्या पूर्वगामी कलमाखाली आयुक्ताने संपादन केली असती, अशा प्रकारची असेल तेव्हा अशा जमिनीच्या सबंधात या अधिनियाच्या तरतुदी, अशी जमीन, यथास्थिती, निपटारा क्षेत्रात समाविष्ट असलेली किंवा निपटारा क्षेत्राने वेढलेली किंवा त्यास लागून असलेली जमीन म्हणून आयुक्ताने संपादन केली असावी त्याप्रमाणे लागू होतील.

निपटारा क्षेत्रात किंवा त्याने वेढलेल्या किंवा त्यास लागून असलेल्या महानगरपालिकेच्या मालकीच्या मालमत्तेच्या संबंधातील तरतुदी.

**३५४रड.** (१) जेव्हा आयुक्ताने निपटारा क्षेत्रात समाविष्ट असलेली किंवा तिने वेढलेली किंवा त्यास लागून असलेली जमीन संपादन करण्याचे निर्धारित केले असेल तेव्हा, कलम ९० खाली आवश्यक ती मंजुरी मिळवल्यानंतर करारान्वये ती जमीन त्यास संपादन करता येईल अथवा जमीन सक्तीने संपादन करण्याबाबतचा आदेश राज्य शासनाला सादर केल्यानंतर व या अधिनियमाची अनुसूची हह हिच्या तरतुदीं अनुसार राज्य शासनाने तो कायम केल्यानंतर, त्या आदेशान्वये [१][ सुधार समितीच्या ] मंजुरीने ती जमीन संपादन करण्याविषयी त्यास प्राधिकृत करण्यात येईल.

निपटारा क्षेत्रातील जमीन संपादन करणे.

(२) निपटारा क्षेत्रात समाविष्ट केलेली जमीन सक्तीने संपादन करण्याचा प्राधिकार ज्या अन्वये देण्यात आला असेल तो आदेश, आयुक्त, [२][ * * * * ] महानगरपालिकेच्या मान्यतेने, एखादे क्षेत्र हे निपटारा क्षेत्र म्हणून जाहीर करण्यासंबंधी महानगरपालिकेने केलेल्या निर्णयाच्या तारखेनंतर सहा महिन्यांच्या आत किंवा राज्य शासन विशिष्ट बाबतीतील परिस्थितीत परवानगी देईल अशा त्याहून अधिक कालावधीच्या आत शासनास सादर करील आणि निपटारा क्षेत्राभोवतालची किंवा त्यास लागून असलेली जमीन सक्तीने संपादन करण्याचा प्राधिकार ज्याअन्वये देण्यात येईल तो आदेश आयुक्त, [२][ * * * * * ] महानगरपालिकेच्या मान्यतेने, महानगरपालिकेने केलेल्या उक्त निर्णयाच्या तारखेनंतर बारा महिन्यांच्या आत किंवा राज्य शासन विशिष्ट बाबतीतील परिस्थितीत परवानगी देईल अशा त्याहून अधिक कालावधीच्या आत राज्य शासनास सादर करील.

(३) या अधिनियमाची अनुसूची गग यातील तरतुदी, या कलमाखाली जमीन सक्तीने संपादन करण्याबात जो आदेश दिला असेल त्याची विधिग्राह्यता व तो प्रवर्तनात येण्याची तारीख याबाबतीत लागू होतील.

(४) केंद्र सरकारमध्ये किंवा मुंबई बंदराच्या विश्वस्तांमध्ये निहित असलेली कोणतीही जमीन किंवा इमारत केंद्र सरकारच्या पूर्वमंजुरीवाचून संपादन करण्यास किंवा राज्य शासनामध्ये निहित असलेली कोणतीही जमीन किंवा इमारत किंवा कोणताही ट्राममार्ग, गॅस, वीज किंवा पाणी यासंबंधीचा किंवा इतर सार्वजनिक उपक्रम बांधण्यास, चालवण्यास किंवा चालू ठेवण्यास कायद्याने जिला प्राधिकृत करण्यात आले असेल त्या कोणत्याही महामंडळाच्या मालकीची असलेली कोणतीही जमीन किंवा इमारत राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीवाचून सक्तीने संपादन करण्यास या कलमांतील कोणत्याही तरतुदींमुळे प्राधिकार मिळणार नाही.

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १३४ (अ) अन्वये " महापौरासह परिषदेच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १३४(ब) अन्वये " महापौरासह परिषदेच्या " हा मजकूर वगळण्यात आला.

निपटारा क्षेत्राचा विनियोग.

**३५४रई.** निपटारा क्षेत्रात समाविष्ट असलेली किंवा त्याने वेढलेली किंवा त्यास लागून असलेली कोणतीही जमीन संपादन केल्यावर, आयुक्त, शक्य तितक्या लवकर, तीवरील प्रत्येक इमारत आवश्यक असल्यास कलम ४८८अ अन्वये तरतूद केलेल्या रीतीने रिकामी करून घेण्याची तजवीज करील आणि त्या जमिनीच्या बाबतीत पुढील रीतीपैकी कोणत्याही एका किंवा इतर रीतीने अथवा अंशतः एका किंवा अंशतः अन्य रीतीने कार्यवाही करील—

(अ) तो त्या जमिनीवरील प्रत्येक इमारत, ती ज्या तारखेस रिकामी करण्यात येईल त्या तारखेपासून सहा आठवड्यांचा कालावधी संपण्यापूर्वी किंवा परिस्थितीनुसार त्यास वाजवी वाटेल असा त्यापेक्षा अधिक कालावधी संपण्यापूर्वी पाडून टाकील, आणि त्यानंतर त्यास कलम ९२ खाली आवश्यक त्या प्राधिकाऱ्याच्या मंजुरीने त्या जमिनीची, त्यास योग्य वाटतील असे कोणतेही निर्बंध व शर्ती असल्यास त्यांच्या अधीनतेने विक्री करता येईल किंवा ती पट्ट्याने देता येईल अथवा महानगरपालिकेच्या मंजुरीच्या अधीनतेने ज्या प्रयोजनाकरिता महानगरपालिकेस जमीन संपादन करता येईल अशा कोणत्याही प्रयोजनाकरिता त्या जमिनीचा त्यास विनियोग करता येईल ; अथवा

(ब) तो, शक्य तितक्या लवकर, कलम ९२ खाली आवश्यक त्या प्राधिकाऱ्याची मंजुरी घेऊन ती जमीन, तिच्यावरील इमारती ताबडतोब पाडून टाकण्याच्या शर्तीच्या अधीनतेने आणि त्यास योग्य वाटतील असे कोणतेही निर्बंध व इतर शर्ती असल्यास त्यांच्या अधीनतेने, विकील किंवा पट्ट्याने देईल :

परंतु, आयुक्तास, सार्वजनिक सडकेस भिडलेल्या जमिनीहून अन्य कोणतीही जमीन विकण्याऐवजी जेव्हा अन्य जमिनींच्या मालकाची अशी जमीन (महानगरपालिकेस संपादन करण्याचा अधिकार असेल अशी ) अन्य जमिनींच्या मोबदल्यात घेण्याची इच्छा असेल तेव्हा, [१][ सुधार समितीच्या ] मंजुरीने अशा जमिनीची त्या अन्य जमिनीबरोबर देवाणघेवाण करता येईल. अशी देवाणघेवाण समान होण्यासाठी एकतर पैसे देऊन किंवा घेऊन अथवा पैसे न देता किंवा न घेता, करता येईल आणि अशा कोणत्याही देवाणघेवाणीच्या संबंधात, महानगरपालिकेने देवाणघेवाण करून दिलेल्या जमिनीच्या बाबतीत या कलमाच्या पूर्वगामी तरतुदींच्या सामर्थ्याने, विकण्यात आलेल्या जमिनीच्या संबंधात त्यापरत्वे ज्या तरतुदी परिणामक्षम असतील तशाच प्रकारच्या तरतुदी पूर्वोक्त कोणत्याही देवाणघेवाणीच्या बाबतीत, त्याप्रमाणे परिणामक होतील. अशी देवाणघेवाण करून आयुक्ताने संपादन केलेली कोणतीही जमीन ही निपटरा क्षेत्रात असेल तर तिला अशा क्षेत्रातील इतर जमिनीस जे निर्बंध लागू असतील तेच निर्बंध लागू होतील.

निपटारा क्षेत्रातील जमीन संपादन करणे आवश्यक नसल्याचे आढळून येईल तेव्हा व्यवस्था करणे.

**३५४रफ.** जेव्हा आयुक्ताने, एखाद्या निपटारा क्षेत्रातील जमीन सक्तीने संपादन करण्याचा आदेश राज्य शासनाला सादर केला असेल, आणि जमिनीच्या मालकाने किंवा मालकांनी या कलमाखाली प्राधिकारपत्र मिळण्यासाठी राज्य शासनाकडे अर्ज केला असेल आणि अशा अर्जावरून राज्य शासनाची व आयुक्ताची अशा जमिनीचा मालक किंवा अशा जमिनीचे मालक, अशी जमीन गहाण घेणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या सहमतीने तिच्यावरील इमारती पाडून टाकण्यास सहमत आहेत याविषयी व जमीन संपादन केल्याशिवाय या विभागाची योग्य रीतीने निपटारा करण्याची व्यवस्था आयुक्त करू शकेल याविषयी खात्री होईल तेव्हा, राज्य शासनास—

(अ) ज्या बाबतीत उक्त आदेश कायम करण्यात आला नसेल त्याबाबतीत इमारतींच्या संबंधात निपटारा आदेश तो आगाऊ प्रसिद्ध न करता किंवा तो न बजावता ताबडतोब सादर करण्यासाठी आयुक्तास प्राधिकृत करता येईल, आणि त्याने तसे केल्यावर सक्तीने जमीन संपादन करण्यासंबंधीच्या आदेशातून ही जमीन वगळून अशा आदेशात फेरबदल करता येईल व निपटारा आदेश कायम करता येईल ; अथवा

---

[१] सन १९९९ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १३५ अन्वये “ महापौरासह परिषदेच्या ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ब) सक्तीने जमीन संपादन करण्यासंबंधी आदेश कायम करण्यात आला असेल पण ही जमीन महानगरपालिकेमध्ये निहित झालेली नसेल त्याबाबतीत इमारती तशाच रीतीने पाडून टाकण्यासाठी आवश्यक असे करार, आवश्यक त्या सर्व पक्षकारांनी केले आहेत किंवा ते असे करार करतील अशी त्याची खात्री झाल्यावर, जमीन संपादन करण्यासंबंधीचे काम चालवण्याचे बंद करण्यासाठी आयुक्तास प्राधिकृत करता येईल, आणि उक्त जमीन ही, जणू काही आयुक्ताने तिच्या बाबतीत निकटपूर्वीच्या कलमाच्या तरतुदींस अनुसरून व्यवस्था केलेली असावी त्याप्रमाणे तशाच निर्बंधांस व शर्तीस अधीन असेल.

ज्या जमिनाचा पुनर्विकास करण्यात मालकांनी कसूर केली असेल अशी निपटारा जमीन संपादन करण्याचा अधिकार.

**३५४रग.** (१) निपटारा आदेशास अनुसरून इमारती पाडून जमीन मोकळी करण्यात आली असेल तर महानगरपालिकेस, ज्या तारखेस निपटारा आदेश प्रवर्तनात आला असेल त्या तारखेपासून अठरा महिने संपल्यानंतर कोणत्याही वेळी, ठरावान्वये, जी जमीन असा ठराव संमत केल्याच्या तारखेस इमारतीच्या प्रयोजनाकरिता वापरण्यात आलेली नसेल किंवा जी अशा रीतीने वापरण्याच्या बाबतीत काम चालू नसेल किंवा आयुक्ताने मान्य केलेल्या आराखड्यानुसार व कलम ३५४रअ, पोट-कलम (१०) खाली घातलेले कोणतेही निर्बंध किंवा शर्ती यांस अनुसरून, अन्यथा तिच्या मालकाने विकास केला नसेल किंवा जिच्या बाबतीत विकास करण्याचे काम चालू नसेल अशा जमिनीचा भाग संपादन करण्याचे अशा ठरावान्वये निर्धारित करता येईल.

(२) जेव्हा महानगरपालिकेने या कलमाखाली जमीन संपादन करण्याचे निर्धारित केले असेल तेव्हा, आयुक्तास कलम ९० खाली आवश्यक ती मंजुरी मिळाल्यावर करार करून ती जमीन संपादन करता येईल, अथवा सुधारणा समितीच्या मंजुरीने अशी जमीन सक्तीने संपादन करण्याबाबत दिलेल्या व राज्य शासनाला सादर केलेल्या व या अधिनियमाची अनुसूची हह च्या तरतुदींअनुसार राज्य शासनाने कायम केलेल्या आदेशान्वये संपादन करण्यासाठी त्यास प्राधिकृत करता येईल.

(३) या कलमाच्या प्रयोजनासाठी सक्तीने संपादन करण्याबाबत प्राधिकृत करणारा आदेश, अशी जमीन संपादन करण्याचा निर्णय घेतल्याच्या तारखेनंतर तीन महिन्यांच्या आत आयुक्त राज्य शासनास सादर करील.

(४) या अधिनियमाची अनुसूची गग च्या तरतुदी, सक्तीने संपादन करण्याबाबतच्या या कलमाखाली दिलेल्या आदेशाची विधिग्राह्यता व तो प्रवर्तनात येण्याची तारीख यांच्या बाबतीत लागू होतील.

(५) आयुक्त, सुधारणा समितीच्या मान्यतेने, या कलमाखाली संपादन केलेल्या कोणत्याही जमिनीची, कलम ३५४रई याच्या तरतुदींअनुसार तिची विक्री करून, ती पट्ट्याने देऊन किंवा तिचे विनियोजन करून व्यवस्था लावील.

परिवास्तू पाडून टाकण्यात आल्या असतील तेव्हा पट्टा संपवण्याचा न्यायालयाचा अधिकार.

**३५४रह.** (१) जिच्या संबंधात निपटारा आदेश प्रवर्तनात आला आहे अशी कोणतीही परिवास्तू एखाद्या पट्ट्याचा विषय असेल तेव्हा, एकतर पट्ट्याने देणाऱ्यास किंवा पट्टेदारास या कलमाखाली दिलेल्या आदेशासाठी लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाकडे अर्ज करता येईल.

(२) पूर्वोक्तप्रमाणे, असा कोणताही अर्ज आल्यानंतर, मुख्य न्यायाधीशास, पोट-पट्टेदार असलेल्या कोणत्याही व्यक्तीस आपली बाजू मांडण्याची संधी दिल्यानंतर, त्यास योग्य वाटेल तर कोणत्याही बाबतीत पट्ट्याखालील पक्षकाराचे हक्क, आबंधने व दायित्वे आणि त्याबाबतीतील इतर सर्व गोष्टी यांकडे लक्ष पुरवून बिनशर्त किंवा त्यास घालणे न्याय्य व योग्य वाटेल अशा अटींच्या व शर्तींच्या अधीनतेने (यात कार्यवाहीतील कोणत्याही पक्षाने त्यातील दुसऱ्या कोणत्याही पक्षास भरपाईच्या, नुकसानभरपाईच्या रूपाने किंवा अन्यथा पैसा देण्यासंबंधीच्या शर्तींचा अंतर्भाव होतो) पट्टा संपवण्याबाबत किंवा त्यात फेरफार करण्याबाबत आदेश देता येईल.

(३) या कलमात " पट्टा " या संज्ञेत अवर पट्टा आणि भाडेदारी किंवा पट्ट्यासाठी, अवर पट्ट्यासाठी किंवा भाडेदारीसाठी केलेला कोणताही करार यांचा समावेश होतो. आणि " पट्ट्याने देणारा ", " पट्टेवार " व " पोट-पट्टेदार " या संज्ञांचा अर्थ त्यानुसार लावण्यात येईल, आणि पट्ट्याने देणारा, पट्टेवार किंवा पोट-पट्टेदार यांच्या वतीने हक्क संपादन करणाऱ्या व्यक्तीचाही समावेश होतो.

## पुनर्विकास क्षेत्रे

एखादे क्षेत्र पुनर्विकास क्षेत्र असल्याचे घोषित करण्याचा अधिकार.

**३५४रआय.** (१) जर [1][बृहन्मुंबईच्या] कोणत्याही भागातील कोणत्याही क्षेत्राच्या संबंधात पुढील परिस्थिती अस्तित्वात असल्याचे आयुक्तास दिसून येईल, म्हणजे—

(अ) निर्धन वर्गासाठी पन्नास किंवा त्याहून अधिक घरे या क्षेत्रात आहेत ;

(ब) या क्षेत्रातील निर्धन वर्गाच्या घरांपैकी निदान एकतृतीयांश घरे अतिशय दाटीवाटीने बांधलेली किंवा मानवी निवासासाठी अयोग्य अशी आहेत आणि दाटी कमी करण्यासाठी वाजवी खर्चात ती सुयोग्य करणे किंवा व्यवस्थित करणे शक्य नाही ;

(क) निर्धन वर्गासाठी राहण्याच्या घरांची सोय करण्याच्या दृष्टीने या संपूर्ण क्षेत्राचा पुनर्विकास करणे इष्ट आहे ;

तर आयुक्त, एका आराखड्यावर तो विभाग निश्चित करण्याची तजवीज करील आणि [2][प्रारूप पुनर्विकास परियोजना महानगरपालिकेच्या मान्यतेसाठी] सादर करील. अशी प्रारूप पुनर्विकास परियोजना सादर केल्यानंतर महानगरपालिका अशी परियोजना विचारात घेईल व तिला योग्य वाटेल त्याप्रमाणे फेरफार करून किंवा फेरफार न करता ती मान्य करील. त्यानंतर महानगरपालिका याप्रमाणे निश्चित केलेले व तिने मान्य केलेले क्षेत्र पुनर्विकास क्षेत्र म्हणून घोषित करणारा एक ठराव संमत करील.

(२) पूर्वगामी पोट-कलमाखाली महानगरपालिकेने ठराव संमत केल्यानंतर शक्य तितक्या लवकर आयुक्त, महानगरपालिकेच्या वतीने या ठरावाची व आराखड्याची एक प्रत राज्य शासनाला पाठवील व हा ठराव संमत करण्यात आला आहे, असे नमूद करणारी, या ठरावाची व आराखड्याची प्रत सर्व वाजवी वेळी जेथे निरीक्षणासाठी मिळू शकेल त्या जागेची नामनिर्देश करणारी एक नोटीस **शासकीय राजपत्रात** आणि [1][बृहन्मुंबईमध्ये] प्रसृत होणाऱ्या तीन किंवा अधिक वृत्तपत्रांत एकाच वेळी प्रसिद्ध करील.

(३) कोणतेही क्षेत्र पुनर्विकास क्षेत्र म्हणून घोषित करण्यापूर्वी, महानगरपालिकेने आपल्याजवळ पुरेशी साधनसंपत्ती असल्याविषयी स्वतःची खात्री करणे व अशा क्षेत्रात बेघर होण्याचा संभव असेलेल्या व्यक्तींची संख्या निश्चित करणे व त्यानंतर व्यवहार्य अशा उपाययोजना करणे–मग अशी उपाययोजना ही त्यांचा कार्यक्रम आखण्याबाबत असो किंवा बेघर झालेल्या व्यक्तीचे शक्य तितके कमी हाल होतील याविषयी व्यवस्था करण्यासाठी आखलेल्या कार्यक्रमांच्या स्वरूपाची असो किंवा अन्यथा असो–हे महानगरपालिकेचे कर्तव्य असेल.

पुनर्विकास विषयक आराखडा.

**३५४रज.** (१) निकटपूर्वगामी कलमाखाली महानगरपालिकेने ठराव संमत केल्यानंतर सहा महिन्यांच्या आत किंवा राज्य शासन परवानगी देईल अशा वाढीव कालावधीत आयुक्त [3][महानगरपालिकेच्या मान्यतेने,] पुनर्विकासविषयक आराखडा तयार करून यात ज्या रीतीने निश्चित केलेल्या क्षेत्राची आखणी करण्याचा व त्यांतील जमिनीचा विद्यमान प्रयोजनांसाठी किंवा ज्यासाठी त्यावर पुनर्विकास घडवून आणणे आवश्यक असेल अशा प्रयोजनांसाठी किंवा विशेषतः निर्धन वर्गांच्या लोकांसाठी राहण्याच्या घरांच्या सोईची तरतूद करण्याकरिता, सडकांकरिता व खुल्या जागांकरिता उपयोगात आणावयाचे योजिले असेल ती रीत दर्शवील व ती राज्य शासनाला सादर करील.

---

[1] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४(१) अन्वये 'ग्रेटर बॉम्बे' या मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १३७ अन्वये 'प्रारूप पुनर्विकास परियोजना महानगरपालिकेच्या मान्यतेसाठी महापौरासह परिषदेस' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] वरील अधिनियमाच्या कलम १३८ (अ) अन्वये 'महापौरासह परिषदेच्या आणि महानगरपालिकेच्या मान्यतेने' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) आराखडा तयार करताना या अधिनियमाखाली कोणत्याही सुधारणा परियोजनेच्या किंवा
१९६६ चा महा. ३७. नियोजित सुधारणा परियोजनेच्या किंवा [१][महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६] खाली निश्चित केलेल्या क्षेत्रासंबंधी किंवा त्याच्याजवळ असलेल्या जमिनीसंबंधी तयार केलेल्या कोणत्याही परियोजनेच्या तरतुदींकडे लक्ष देण्यात येईल.

(३) राज्य शासनाला आराखडा सादर करण्यापूर्वी, आयुक्त—

(अ) आराखडा तयार करण्यात आला आहे व तो लवकरच राज्य शासनाला सादर करण्यात येणार आहे असे नमूद करणारी, तसेच ज्या जागी सर्व वाजवी वेळी आराखडा निरीक्षणासाठी मिळू शकेल त्या जागेचा नामनिर्देश असलेली आणि ज्या अवधीच्या आत व ज्या रीतीने आक्षेप दाखल करता येतील तो अवधी व ती रीत विनिर्दिष्ट करणारी एक नोटीस **शासकीय राजपत्रात** व [४][बृहन्मुंबईत] प्रसृत होणाऱ्या तीन किंवा अधिक वृत्तपत्रांत एकाच वेळी प्रसिद्ध करील; आणि

(ब) तशाच अर्थाची एक नोटीस निश्चित केलेल्या क्षेत्रातील जमिनीच्या (एक महिना किंवा एक महिन्याहून कमी असलेल्या कोणत्याही कालावधीच्या भाडेकऱ्यांसहित) प्रत्येक मालकावर, पट्टेदारावर व भोगवटादारावर, आणि निश्चित केलेल्या क्षेत्रात रेल्वे चालवणाऱ्या प्रत्येक रेल्वे प्रशासनावर, आणि निश्चित केलेल्या क्षेत्रात कोणताही ट्राममार्ग, गॅस, वीज, पाणी यासंबंधीचा किंवा इतर सार्वजनिक उपक्रम बांधण्यास, चालवण्यास व चालू ठेवण्यास कायद्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही महामंडळावर बजावील.

(४) प्रस्तावित पुनर्विकासविषयक आराखड्याबाबत नोटिसा प्रसिद्ध करणे व त्या बजावणे यासंबंधीच्या पूर्वगामी तरतुदींचे अनुपालन करण्यात आल्यानंतर आयुक्त, पोट-कलम (३) खाली मिळालेले कोणतेही आक्षेप व त्याबाबतीतील ज्या कोणत्याही सूचना करण्याची त्यांची इच्छा असेल त्या सूचना [२][सुधारणा समितीस] सादर करील.

(५) [२][सुधारणा समितीस,] अशा कोणत्याही आक्षेपांचा व सूचनांचा विचार केल्यानंतर, पुनर्विकासविषयक आराखड्याच्या सबंधात, तिला योग्य वाटेल असा फेरबदल करता येईल आणि त्यानंतर आयुक्त, [३][सुधारणा समितीने] फेरबदल केलेला आराखडा मान्यतेसाठी प्रथम महानगरपालिकेस व नंतर राज्य शासनास सादर करील.

(६) राज्य शासनाच्या मान्यतेची नोटीस मिळाल्यावर आयुक्त पुनर्विकासविषयक आराखडा मान्य झाला आहे असे नमूद करणारी आणि ज्या जागी त्याची एक प्रत सर्व वाजवी वेळी निरीक्षणासाठी मिळू शकेल त्या जागेचा नामनिर्देश असलेली नोटीस **शासकीय राजपत्रात** व [४][बृहन्मुंबईत] प्रसृत होणाऱ्या तीन किंवा अधिक वृत्तपत्रांत एकाच वेळी प्रसिद्ध करील आणि अशीच नोटीस पुनर्विकासविषयक आराखडा मान्यतेसाठी राज्य शासनाला सादर करण्याचा आपला इरादा आहे या विषयीची नोटीस ज्या ज्या व्यक्तींवर बजावली असेल त्या प्रत्येक व्यक्तीवर बजावील.

---

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १६६ (ब) अन्वये ‘ मुंबई शहर रचना अधिनियम, १९१५ ’ या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १३८ (ब) अन्वये ‘ महापौरासह परिषदेस ’ या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १३८ (क) अन्वये ‘ महापौरासह परिषद ’ या शब्दप्रयोगांऐवजी हा शब्दप्रयोग त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[४] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१)४(१) अन्वये “ ग्रेटर बॉम्बे ” या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(७) पुनर्विकासविषयक आराखडा मान्य झाल्यानंतर, पुनर्विकास क्षेत्रातील (म्हणजे निश्चित केलेले क्षेत्र किंवा मान्य झालेल्या आराखड्यात त्याचा जेवढा भाग समाविष्ट असेल तेवढ्या भागातील) कोणत्याही जमिनीचा पुनर्विकास करणे किंवा आराखड्यात सूचित केलेल्या व्यतिरिक्त अन्यथा तिचा उपयोग करणे आवश्यक आहे अशी महानगरपालिकेची खात्री होईल तेव्हा, आयुक्त, महानगरपालिकेच्या वतीने त्या जमिनीसंबंधी एक नवीन आराखडा तयार करून तो राज्य शासनाला सादर करील आणि आराखडा प्रसिद्ध करणे, नोटिसा बजावणे आणि राज्य शासनाने मान्यता देणे यासंबंधीच्या कलमातील तरतुदी, नवीन आराखड्याच्या संबंधात पुनर्विकासविषयक आराखडा व निश्चित केलेले क्षेत्र यांच्या उल्लेखाऐवजी नवीन आराखडा व त्यात समाविष्ट असलेली जमीन यांचे उल्लेख दाखल केल्याप्रमाणे अंमलात येतील.

(८) या अधिनियमाची अनुसूची गग च्या तरतुदी, पुनर्विकासविषयक आराखडा किंवा नवीन आराखडा यांची विधिग्राह्यता व त्यांना मिळालेली राज्य शासनाची मान्यता प्रवर्तनात येण्याची तारीख यासंबंधात लागू होतील.

(९) या अधिनियमातील तद्नंतरच्या तरतुदीतील पुनर्विकासविषयक किंवा पुनर्विकासविषयक आराखड्यानुसार करावयाच्या उपयोगासंबंधीच्या संदर्भाचा अर्थ या कलमाखाली मान्यता मिळालेल्या पुनर्विकासविषयक आराखड्यानुसार किंवा या कलमाखाली मान्यता मिळालेल्या नवीन आराखड्यात समाविष्ट केलेल्या जमिनीच्या बाबतीत नवीन आराखड्यानुसार करावयाच्या पुनर्विकासासंबंधी किंवा उपयोगासंबंधी संदर्भ असावा त्याप्रमाणे लावण्यात येईल.

पुनर्विकासाच्या प्रयोजनांसाठी जमीन संपादन करणे.

**३५४रके.** (१) राज्य शासनाची पुनर्विकासविषयक आराखड्यास मिळालेली मान्यता प्रवर्तनात आल्यानंतर आयुक्तास करार करून, कलम ९० खाली आवश्यक ती मंजुरी मिळवल्यानंतर—

(अ) पुनर्विकास क्षेत्रातील जमीन ; आणि

(ब) त्या क्षेत्रात ज्या परिवास्तू आवश्यक असतील किंवा त्या संपादन करण्याचे योजले असेल किंवा ज्या परिवास्तूबाबत त्या सक्तीने संपादन करण्याबाबत आदेश सादर करण्यात आले असतील त्या जागांच्या भोगवटादार व्यक्तींकरिता राहण्याच्या घरांची तरतूद करण्याच्या प्रयोजनासाठी आवश्यक असेल अशी त्या क्षेत्राबाहेरील कोणतीही जमीन संपादन करता येईल किंवा त्यास [१][सुधार समितीच्या] मंजुरीने आदेश तयार करून व तो राज्य शासनास सादर केल्यानंतर व ह्या अधिनियमाची अनुसूची हह हीस अनुसरून राज्य शासनाने तो कायम केल्यानंतर सक्तीने संपादन करता येईल.

(२) जेव्हा आयुक्त त्याच्या मते मानवी वसतिस्थानासाठी अयोग्य असलेल्या आणि वाजवी खर्चाने तशा योग्य होणे शक्य नसलेल्या इमारतीचा जिच्यामध्ये अंतर्भाव होतो अशी जमीन या कलमाखाली सक्तीने संपादन करण्याबाबतचा आदेश राज्य शासनाला सादर करील तेव्हा, याप्रमाणे सादर केलेला आदेश ती इमारत तशा स्थितीत आहे असे दर्शवण्याच्या प्रयोजनासाठी विहित केलेल्या नमुन्यात असेल आणि जर राज्य शासनाच्या मते ही इमारत योग्य रीतीने तशी असल्याचे दर्शवण्यात आले असेल, तरी कायम केलेल्या आदेशानुसार त्याच स्थितीत असलेली इमारत संपादन करण्यास आयुक्तास प्राधिकृत करता येईल.

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १३८ (ब) अन्वये ‘ महापौरासह परिषदेच्या ’ या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(३) या अधिनियमाची अनुसूची गग च्या तरतुदी, या कलमाखाली केलेल्या सक्तीच्या संपादनाबाबतच्या आदेशाची विधिग्राह्यता व तो प्रवर्तनात येण्याची तारीख यासंबंधात परिणामक होतील.

(४) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे, केंद्र सरकारमध्ये किंवा मुंबई बंदराच्या विश्वस्तांमध्ये निहित असलेली कोणतीही जमीन किंवा इमारत केंद्र सरकारच्या पूर्वमंजुरीवाचून सक्तीने संपादन करण्याचा प्राधिकार मिळणार नाही ; किंवा राज्य शासनामध्ये निहित असलेली किंवा कोणताही ट्राममार्ग, गॅस, वीज, पाणी यासंबंधीचा किंवा इतर सार्वजनिक उपक्रम बांधण्यास, चालवण्यास किंवा चालू ठेवण्यास कायद्याने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही महामंडळाच्या मालकीची असलेली कोणतीही जमीन किंवा इमारत राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीवाचून सक्तीने संपादन करण्याचा प्राधिकार मिळणार नाही.

(५) या कलमाखाली आयुक्ताने निर्धन वर्गांकरिता घरांची तरतूद करण्यासाठी संपादन केलेली जमीन ही त्याने कलम ३५४ रन खाली संपादन केलेली आहे असे मानण्यात येईल.

(६) निर्धन वर्गासाठी घरांची तरतूद करण्याच्या प्रयोजनांहून अन्य प्रयोजनासाठी या कलमाखाली संपादन केलेली जमीन कलम ९२ खाली आवश्यक त्या प्राधिकरणाच्या मंजुरीने कोणत्याही व्यक्तीस विकता येईल किंवा पट्ट्याने देता येईल किंवा जर अशी जमीन कोणत्याही सार्वजनिक सडकेस भिडलेली नसेल, तर त्या जमिनीऐवजी, तशीच मंजुरी घेऊन, जी जमीन संपादन करण्याचा आयुक्तास अधिकार असेल अशी इतर जमीन, समानतेने अदलाबदल होण्यासाठी पैसे देऊन किंवा न देता किंवा पैसे घेऊन किंवा न घेता, पुनर्विकास क्षेत्रातील जमिनीच्या बाबतीत तिचा पुनर्विकास करण्यात आला पाहिजे किंवा पुनर्विकासविषयक आराखड्यानुसार उपयोग करण्यात आला पाहिजे या शर्तीवर, आयुक्तास स्वीकारता येईल.

(७) जेव्हा पुनर्विकासविषयक आराखड्यास राज्य शासनाने दिलेली मान्यता प्रवर्तनात आली असेल आणि या आराखड्यात महानगरपालिकेची कोणतीही जमीन समाविष्ट असेल तेव्हा या अधिनियमाच्या तरतुदी जणू काही ती जमीन या कलमाखाली आयुक्ताने संपादन केलेली पुनर्विकास क्षेत्रातील जमीन असावी त्याप्रमाणे लागू होतील.

(८) जेव्हा पुनर्विकासविषयक आराखड्यास राज्य शासनाने दिलेली मान्यता प्रवर्तनात आली असेल तेव्हा कोणतीही व्यक्ती आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून, हा आराखडा ज्या पुनर्विकास क्षेत्रासंबंधी असेल त्या पुनर्विकास क्षेत्रात कोणतीही इमारत किंवा इमारतीचा कोणताही भागांश बांधणार किंवा पुन्हा बांधणार नाही. आयुक्तास अशी परवानगी देताना, बांधकाम किंवा पुनर्बांधकाम हे त्याच्या मते पुनर्विकासविषयक आराखड्यानुसार चालवले जावे यासाठी महानगरपालिकेने सर्वसाधारणपणे किंवा विशेषतः मान्य केलेल्या शर्ती लादता येतील.

### निपटाऱ्यासाठी किंवा पुनर्विकासासाठी खरेदी केलेल्या जमिनीबाबत सर्वसाधारण तरतुदी

कलमे ३५४रड, ३५४रग व ३५४ रके यांखाली संपादन केलेल्या जमिनीवरील मार्ग, सुविधाधिकार वगैरे नष्ट करणे.

**३५४रल.** (१) आयुक्तास राज्य शासनाच्या मान्यतेने आदेश देऊन कलमे ३५४रड, ३५४रग किंवा ३५४रके यांखाली करार करून संपादन केलेल्या जमिनीवरील कोणताही सार्वजनिक हक्क नष्ट करता येईल ; परंतु, या पोट-कलमाखाली आयुक्ताने जो आदेश देण्याचे योजिले असेल, तो आदेश, आक्षेप मागवणाऱ्या नोटिशीसह **शासकीय राजपत्रात** व [१][बृहन्मुंबईत] प्रसृत होणाऱ्या तीन किंवा अधिक वृत्तपत्रांत एकाच वेळी प्रसिद्ध करण्यात येईल, आणि जर तो प्रसिद्ध झाल्यापासून सहा आठवड्यांचा अवधी संपण्यापूर्वी राज्य शासनाकडे त्याबाबत कोणताही आक्षेप घेण्यात आला तर अशा सर्व आक्षेपांचा विचार करीतोपर्यंत राज्य शासन तो आदेश मान्य करणार नाही.

(२) जेव्हा आयुक्त, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कलमाखाली जाण्यायेण्याचा सार्वजनिक हक्क असलेल्या जमिनी संपादन करण्याचे योजील तेव्हा, जमीन संपादन करण्याआधी,

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसुची (१)४(१)अन्वये मुळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

त्या जमिनीवरील इमारती ज्या तारखेस रिकाम्या करण्यात येतील त्या तारखेपासून किंवा आदेशात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा तारखेनंतर असा कालावधी संपेल त्या तारखेपासून किंवा राज्य शासन आदेश मान्य करताना विनिर्दिष्ट करील त्या तारखेनंतर उक्त हक्क नष्ट करण्यासंबंधी आयुक्ताने आदेश देणे हे व तो राज्य शासनाने मान्य करणे हे, या कलमाखाली विधिसंमत असेल.

(३) आयुक्ताने महानगरापालिकेच्या वतीने, पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कलमांखालील करारान्वये संपादन केलेल्या जमिनीच्या खरेदीचे काम पूर्ण झाल्यावर, त्या जमिनीवरील जाण्या-येण्याचे सर्व खाजगी हक्क व तिच्याखालील किंवा तिच्यावरील सर्व खाजगी हक्क आणि त्या जमिनीतील किंवा तिच्या संबंधीचे इतर सर्व हक्क किंवा सुविधाधिकार नष्ट करण्यात येतील आणि असे कोणतेही हक्क किंवा सुविधाधिकार नष्ट केल्याने जिला नुकसान सोसावे लागले असेल अशा कोणत्याही व्यक्तीस, असे हक्क किंवा सुविधाधिकार हे, ज्या जमिनीसंबंधात असतील ती जमीन जणू काही सक्तीने संपादन करण्याबाबतच्या आदेशाखाली संपादन केलेली असावी व तिच्या बाबतीत या अधिनियमाच्या अनुसूची हह च्या खंड २(अ) खाली आवश्यक असलेली नोटीस, खरेदी पूर्ण झाल्याच्या तारखेस प्रसिद्ध करण्यात आलेली असावी त्याप्रमाणे अशा हक्कात किंवा सुविधाधिकारात हितसंबंधित असलेल्या व्यक्तीला भरपाईची जी रक्कम देण्यात आली असती ती रक्कम महानगरपालिकेकडून मिळण्याचा हक्क प्राप्त होईल :

परंतु, शासनामध्ये किंवा मुंबई बंदराच्या विश्वस्तांमध्ये निहित असलेल्या कोणत्याही हक्कास किंवा कोणताही ट्राममार्ग, गॅस, वीज, पाणी यांसंबंधीचा किंवा इतर सार्वजनिक उपक्रम बांधण्यात, चालवण्यास किंवा चालू ठेवण्यास कायद्यान्वये प्राधिकृत केलेल्या कोणत्याही महामंडळाच्या कोणत्याही हक्कास हे पोट-कलम लागू असणार नाही आणि आयुक्त व प्रस्तुत हक्क जिच्यामध्ये निहित असेल किंवा जिच्या मालकीची असेल ती व्यक्ती यांच्यामध्ये जो करार होईल त्याच्या अधीनतेने इतर बाबींच्या संबंधात ते कलम परिणामकारक होईल.

### निर्धन वर्गासाठी निवासव्यवस्थेची तरतूद

निवास व्यवस्थेची तरतूद करण्याची पद्धती.

**३५४रम.** (१) [१][आयुक्ताच्या] अभिवेदनाचा किंवा महानगरपालिकेच्या कब्जात असलेल्या इतर माहिताचा विचार केल्यानंतर [२][बृहन्मुंबईच्या] च्या कोणत्याही भागातील कोणत्याही क्षेत्रात निर्धन वर्गातील लोकांसाठी निवासव्यवस्थेची तरतूद करणे इष्ट आहे आणि सुधारणा परियोजना न करता अशी तरतूद सोईस्करपणे करता येण्यासारखी आहे, अशी महानगरपालिकेची खात्री झाली तर, ती ते क्षेत्र नकाशात सीमांकित करण्याची तजवीज करील आणि आयुक्तास प्राधिकृत करणारा ठराव संमत करील आणि त्यानंतर आयुक्तास—

(अ) महानगरपालिकेच्या मालकीच्या किंवा महानगरपालिकेने त्या प्रयोजनाकरिता संपादन केलेल्या कोणत्याही जमिनीवर इमारती उभारून किंवा इतर कोणत्याही रीतीने ;

(ब) महानगरपालिकेच्या मालकीच्या कोणत्याही इमारतीचे निर्धन वर्गातील लोकांसाठी राहत्या घरात रूपांतर करून ;

(क) महानगरपालिकेने संपादन केलेल्या किंवा त्या मालमत्तेत संपदा किंवा हितसंबंध असलेल्या कोणत्याही इमारतीमध्ये फेरफार करून, वाढ करून, त्या दुरूस्त करून किंवा त्यात सुधारणा करून ;

अशा निवासव्यवस्थेची तरतूद करावयाचा अधिकार प्रदान करण्यात येईल.

---

[१] सन १९९९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २७, कलम १४० द्वारे “ प्रभारी सदस्याच्या ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसुची (१)४(१)अन्वये मुळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) [१][आयुक्तास, महानगरपालिकेच्या मान्यतेच्या अधीन राहून] याप्रमाणे उभारलेल्या, रूपांतर केलेल्या किंवा संपादन केलेल्या कोणत्याही घरात फेरफार करता येईल, वाढ करता येईल, ते दुरुस्त करता येईल किंवा त्यात सुधारणा करता येईल.

निवास-व्यवस्थेसाठी जमीन संपादन करण्याचा आयुक्ताचा अधिकार.

**३५४रन.** आयुक्तास पूर्वगामी कलमाच्या प्रयोजनांसाठी महानगरपालिकेच्या वतीने—

(अ) निर्धन वर्गातील लोकांसाठी इमारती उभारण्यासाठी जागा म्हणून कोणतीही जमीन, तिच्यावरील कोणत्याही इमारतीसह संपादन करता येईल ;

(ब) पुढील प्रयोजनांकरिता जमीन संपादन करता येईल—

(एक) महानगरपालिकेहून अन्य व्यक्तींनी निर्धन वर्गातील लोकांसाठी इमारती उभारण्याच्या उद्देशाने जमीन पट्ट्याने देणे किंवा विकणे ;

(दोन) निर्धन वर्गामधील लोकांसाठी किंवा त्यांच्या सोईसाठी इमारती, बागा, कारखाने, कर्मशाळा, पूजाअर्चेच्या जागा, करमणुकीच्या जागा किंवा इतर कामे किंवा इमारती यांची तरतूद करणे, त्यांची देखभाल करणे व त्यात सुधारणा करणे हे धरून, आयुक्ताच्या मते इमारतीची जागा म्हणून असलेल्या जमिनीच्या विकासास आवश्यक किंवा इष्ट किंवा आनुषंगिक असतील अशा प्रयोजनासाठी उपयोग करण्याच्या दृष्टीने संपादन केलेल्या जमिनीचा कोणताही भाग पट्ट्याने देणे किंवा त्याची विक्री करणे.

निवास-व्यवस्थेसाठी जमीन संपादन करण्याची पद्धती.

**३५४रओ.** (१) पूर्वगामी कलमाच्या प्रयोजनांसाठी असलेली जमीन कलम ९० खालील आवश्यक ती मंजुरी मिळवल्यावर, करार करून, आयुक्तास संपादन करता येईल किंवा त्यास [२][सुधार समितीच्या] मंजुरीने त्या प्रयोजनांसाठी, राज्य शासनाला सादर केलेल्या आणि राज्य शासनाने या अधिनियमाची अनुसूची " हह " च्या तरतुदींस अनुसरून कायम केलेल्या सक्तीच्या संपादनाच्या आदेशावरून जमीन संपादन करण्याचा प्राधिकार देता येईल.

(२) आयुक्तास, राज्य शासनाच्या संमतीने व राज्य शासनाने लादलेल्या कोणत्याही शर्तींच्या अधीनतेने पूर्वगामी कलमाच्या प्रयोजनांसाठी, जमीन—मग त्या जमिनीची त्या प्रयोजनांसाठी ताबडतोब आवश्यकता नसली तरी—संपादन करता येईल :

परंतु, सक्तीच्या संपादनाबाबतचा आदेश राज्य शासनाने ज्या तारखेस कायम केला असेल त्या तारखेपासून दहा वर्षांच्या आत तिची आवश्यकता असण्याचा संभव आहे असे राज्य शासनाला वाटत नसेल तर, त्या प्रयोजनांसाठी कोणतीही जमीन संपादन करण्याचा प्राधिकार आयुक्तास दिला जाणार नाही.

(३) या अधिनियमाची अनुसूची " गग " च्या तरतुदी, या कलमाखाली दिलेल्या सक्तीच्या संपादनाबाबतच्या आदेशाची विधिग्राह्यता व तो प्रवर्तनात येण्याची तारीख याच्या संबंधात लागू होतील.

(४) या अधिनियमातील कोणत्याही मजकुरामुळे, कलम ३५४रम याच्या प्रयोजनांकरिता शासनाची किंवा मुंबई बंदराच्या विश्वस्तांची किंवा कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाची किंवा कायद्याने प्राधिकृत करण्यात आलेल्या महानगरपालिकेची मालमत्ता असलेली किंवा कोणताही ट्राममार्ग, गॅस, वीज, पाणी यासंबंधीचा किंवा इतर सार्वजनिक उपक्रम बांधण्यास, चालवण्यास किंवा चालू ठेवण्यास प्राधिकृत करण्यात आलेल्या कोणत्याही महामंडळाची मालमत्ता असलेली व अशा महामंडळाच्या प्रयोजनांकरिता संपादन करण्यात आलेली किंवा सक्तीने संपादन करण्याबाबतच्या आदेशाच्या तारखेस कोणत्याही उद्यानाचा, बागेचा किंवा करमणुकीच्या जागेचा भाग असलेली कोणतीही जमीन सक्तीने संपादन करण्याचा प्राधिकार मिळणार नाही.

---

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १६८(ब) अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १४१ अन्वये " महापौरासह परिषदेच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

निवास-व्यवस्थेसाठी संपादन केलेल्या किंवा विनियोग केलेल्या जमिनीची व्यवस्था लावण्याचा अधिकार.

**३५४रप.** (१) जेव्हा आयुक्ताने कलम ३५४रन, याच्या प्रयोजनांकरिता कोणतीही जमीन संपादन केली असेल किंवा तिचा विनियोग केला असेल तेव्हा, या अधिनियमाखालील त्याच्या इतर अधिकारांपैकी कोणत्याही अधिकाराला बाध येऊ न देता, त्यास—

(अ) त्या जमिनीवर सार्वजनिक सडका किंवा रस्ते व खुल्या जागा यांची आखणी करता येईल व बांधता येतील ;

(ब) [१][सुधार समितीच्या] मान्यतेने, ती जमीन किंवा तिचा भाग त्या प्रयोजनासाठी कोणत्याही व्यक्तीस, त्या व्यक्तीने, आयुक्ताने मान्य केलेल्या आराखड्यानुसार आयुक्त निश्चित करील इतक्या इमारती निर्धन वर्गासाठी तीवर उभारल्या पाहिजेत व त्यांची देखभाल केली पाहिजे ; आणि आवश्यक असेल तेव्हा या जमिनीवर सार्वजनिक सडका किंवा रस्ते व खुल्या जागा यांची आखणी केली पाहिजे व बांधकाम केले पाहिजे अथवा निर्धन वर्गातील व्यक्तींसाठी किंवा त्यांच्या सोईसाठी घरे व बागा, करमणुकीच्या जागा किंवा इतर कामे किंवा इमारती यांची तरतूद, देखभाल व सुधारणा यांसहित आयुक्ताने मान्य केलेल्या आराखड्यानुसार या जमिनीच्या विकासासाठी आयुक्ताच्या मते आवश्यक किंवा इष्ट किंवा विकासास आनुषंगिक अशा प्रयोजनांसाठी या जमिनीचा उपयोग केला पाहिजे या शर्तीवर विकता येईल किंवा पट्ट्याने देता येईल ;

(क) [१][सुधार समितीच्या] मान्यतेने, ती जमीन किंवा तिचा भाग विकता येईल किंवा जर अशी जमीन कोणत्याही सार्वजनिक सडकेस भिडलेली नसेल तर, या जमिनीच्या किंवा तिच्या भागाच्या ऐवजी त्या प्रयोजनांसाठी अधिक चांगल्या रीतीने जुळती करून घेतलेल्या जमिनींची समानतेने अदलाबदल होण्यासाठी कोणताही पैसा देऊन किंवा न देता किंवा घेऊन किंवा न घेता, अशी अदलाबदल करता येईल ;

(ड) [१][सुधार समितीच्या] मान्यतेने, त्या जमिनीवरील कोणत्याही इमारती किंवा त्या जमिनीवर त्याने उभारलेल्या कोणत्याही इमारती निर्धन वर्गातील लोकांसाठी राहण्याची घरे म्हणून त्या इमारती सुस्थितीत राखण्यासंबंधी किंवा अन्यथा इमारतींच्या उपयोगासंबंधी त्यास योग्य वाटतील अशा प्रसंविदांच्या व शर्तींच्या अधीनतेने विकता येतील किंवा पट्ट्याने देता येतील आणि अशा विक्रीनंतर, त्यास योग्य वाटेल तर हप्त्यांनी व [१][ सुधार समिती ] याबाबत वेळोवेळी विहित करील अशा दराने येणे असलेल्या बाकी रकमेवरील व्याजासह किंमत दिली जाण्यास किंवा ती परिवास्तू गहाण ठेवून मिळालेल्या किमतीपैकी काही रक्कम दिली जाण्यास संमत होता येईल ;

(२) जेव्हा आयुक्त, निर्धन वर्गातील लोकांस राहण्यासाठी योग्य बनवता येईल अशी कोणतीही इमारत किंवा अशा इमारतीतील संपदा किंवा हितसंबंध संपादन करील तेव्हा एकतर तो स्वतः कोणतीही आवश्यक ती कामे पार पाडून किंवा एखाद्या व्यक्तीस, त्या इमारतीत फेरबदल, विस्तार, दुरुस्ती किंवा सुधारणा केली पाहिजे या शर्तीवर, ती इमारत पट्ट्याने देऊन किंवा विकून, इमारतीत फेरबदल, विस्तार, दुरुस्ती किंवा सुधारणा करण्याच्या कामास ताबडतोब लागेल.

निवास-व्यवस्थेची तरतूद करण्यासंबंधीचा पूरक अधिकार.

**३५४रक्यू.** निर्धन वर्गातील लोकांसाठी निवासव्यवस्थेची तरतूद करण्याकरिता [२][आयुक्ताला असलेल्या अधिकारांमध्ये ] अशा कोणत्याही निवासव्यवस्थेची तरतूद करण्याच्या संबंधात, दुकान म्हणून उपयोग करण्यासाठी जुळती करून घेतलेली कोणतीही इमारत, कोणत्याही करमणुकीच्या जागा किंवा ज्यांच्या निवासव्यवस्थेची तरतूद करण्यात आली असेल त्या व्यक्तींना आवश्यक असलेल्या गोष्टींच्या बाबतीत आयुक्ताच्या मते हितकारक ठरेल अशा इतर इमारतीची किंवा जमिनीची तरतूद करण्याच्या व ती सुस्थितीत राखण्याच्या आणि इष्ट असल्यास, इतर कोणत्याही व्यक्तीसह संयुक्तपणे तसे करण्याच्या अधिकाराचा समावेश होईल.

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १४२ अन्वये "महानगरपालिका" या शब्दप्रयोगाऐवजी हा शब्दप्रयोग त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १४३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## जमीन संपादन करणे.

१८९४ चा १. **३५४स.** भूमि संपादन अधिनियम, १८९४ (ज्यास यात व यापुढे येणाऱ्या कलमांत " भूमि संपादन अधिनियम " असे निर्दिष्ट केले आहे) हा अनुसूची कक मध्ये सांगितलेल्या व्याप्तीपर्यंत या प्रकरणाखालील कराराहून अन्यथा जमीन संपादन करण्याच्या बाबींचे विनियमन करील व अशा बाबींस लागू होईल, आणि त्या प्रयोजनासाठी तो या प्रकरणाच्या तरतुदींच्या व तसेच पुढील तरतुदींच्या अधीनतेने, जणू काही तो यात अधिनियमित करण्यात आलेला असावा, त्याप्रमाणे या प्रकरणाचा भाग आहे असे मानले जाईल :— कराराहून अन्यथा जमीन संपादन करण्याच्या बाबतीत भूमि संपादन अधिनियम कोठवर लागू होईल.

(१) भूमि संपादन अधिनियमाच्या कोणत्याही कलमाचा केलेला निर्देश हा या प्रकरणाच्या तरतुदींअन्वये फेरबदल करण्यात आलेल्या अशा कलमासंबंधीचा निर्देश आहे असे मानले जाईल ; आणि भूमि संपादन अधिनियम यात वापरलेल्या ' जमीन ' या संज्ञेचा अर्थ या अधिनियमाचे कलम ३, खंड (र) मध्ये जो अर्थ दिला आहे तोच आहे असे मानले जाईल, आणि भूमि संपादन अधिनियम, कलम ३, खंड (ब) यात या प्रकरणाच्या प्रयोजनांकरिता, ' सर्व व्यक्तींचा समावेश होतो ' या शब्दांच्या पूर्वी ' शासन धरून ' हे शब्द व कंस दाखल करण्यात आले आहेत आणि ' जमिनीसंबंधीच्या सुविधाधिकारात त्याचा हितसंबंध असेल तर ' या शब्दांच्या नंतर ' किंवा जमिनीचा भाग म्हणून असलेल्या कोणत्याही सडकेवर विधानमंडळाच्या अधिनियमान्वये निर्माण झालेल्या कोणत्याही हक्काचा तो मालक असेल तर ' हे शब्द दाखल करण्यात आले असावेत, त्याप्रमाणे उक्त खंड वाचण्यात येईल.

(२) भूमि संपादन अधिनियम याचे कलम ४, पोट-कलम (२) आणि या प्रकरणाच्या तरतुदी यांचा अन्वय लावताना, उक्त पोट-कलमाच्या तरतुदी ह्या, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता कलम ३५४क चे पोट-कलम (१), कलम ३५४ओ, ३५४र, ३५४रआय किंवा यथास्थिति, कलम ३५४रम याखाली ठराव संमत करण्यात आल्यानंतर ताबडतोब लागू होतील आणि ' राज्य शासन ' या संज्ञेत आयुक्त या संज्ञेचा अंतर्भाव होतो असे मानण्यात येईल आणि ' असे वसतिक्षेत्र ' या संज्ञेचा अर्थ अशा कोणत्याही ठरावात स्थानिकरीत्या निर्दिष्ट केलेले वसतिक्षेत्र असल्याचे मानण्यात येईल.

(३) या प्रकरणाचा भाग असल्याचे मानण्यात आलेल्या भूमि संपादन अधिनियमाच्या कलमांचा आणि या प्रकरणाच्या तरतुदींचा अन्वय लावताना कलम ३५४ग चे पोट-कलम (१) किंवा ३५४प खाली प्रसिद्ध केलेली अधिसूचना किंवा या अधिनियमाची अनुसूची हह हिचा खंड (२) (अ) याखाली दिलेल्या सक्तीच्या संपादनाबाबतच्या आदेशासंबंधी प्रसिद्ध केलेली नोटीस ही भूमि संपादन अधिनियम, कलम ४, पोट-कलम (१) खाली काढलेली अधिसूचना आहे, असे मानले जाईल आणि कलम ३५४म किंवा ३५४प याखाली किंवा अनुसूची गग, खंड (१) खाली कायम केलेल्या सक्तीने संपादन करण्याविषयी आदेशाच्या नोटिशीच्या प्रसिद्धीची घोषणा प्रसिद्ध केल्याची तारीख ही भूमि संपादन अधिनियम, कलम ६ खाली घोषणा प्रसिद्ध केल्याची तारीख आहे असे मानले जाईल :

परंतु, जेव्हा कलम ३५४ह किंवा ३५४आय, पोट-कलम (३) खाली जमीन संपादन करण्यात आली असेल तेव्हा, कलम ३५४ग च्या पोट-कलम (१) खाली अधिसूचना प्रसिद्ध केल्याची तारीख ही भूमि संपादन अधिनियम, कलम ६ खाली घोषणा प्रसिद्ध केल्याची तारीख आहे, असे मानले जाईल :

परंतु आणखी असे की, भूमि संपादन अधिनियम, कलम २३, पोट-कलम (२) याच्या तरतुदी, कलम ३५४ड खाली मान्यता दिलेल्या कोणत्याही सुधारणा परियोजनेचा भाग असलेल्या जमिनीहून अन्य जमीन जेव्हा या अधिनियमान्वये, पोलिसांच्या निवासव्यवस्थेची सोय करण्याविषयीच्या परियोजनेच्या प्रयोजनाकरिता विनिर्देशपूर्वक संपादन केली असेल तेव्हा लागू होतील ; आणि १ ऑक्टोबर १९३३ नंतर (मुंबई शहर नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९३३ अंमलात आल्याची तारीख) व जमीन संपादन करण्याविषयी अधिसूचित केले असेल अशा सर्व बाबतीत संपादनाच्या सक्तीच्या स्वरूपाच्या दृष्टीने अनुसूची डड मध्ये दिलेल्या प्रमाणात अतिरिक्त भरपाई दिली जाईल. १९३३ चा मुंबई १३.

(४) ज्या कोणत्याही जमिनीबाबत आयुक्तास या प्रकरणाखाली प्राधिकार देण्यात आलेले असतील, ती जमीन ताब्यात घेताना, भूमि संपादन अधिनियम, कलम १७, पोट-कलम (१) याच्या तरतुदी, जणू काही ती जमीन सार्वजनिक प्रयोजनाकरिता निकडीने आवश्यक असलेली पडीत किंवा लागवडीस योग्य जमीन असावी त्याप्रमाणे लागू होतील ; मात्र ही बाब जिल्हाधिकारी ज्या तारखेस जमिनीचा कब्जा घेईल त्या तारखेपासून देण्यात आलेल्या भरपाईवर सहा टक्क्यांपेक्षा अधिक नसेल इतक्या व्याजाच्या स्वरूपात महानगरपालिकेने अतिरिक्त भरपाई देण्याच्या अधीन असेल.

(५) भूमि संपादन अधिनियम, कलम ५०, पोट-कलम (२) चा आणि या प्रकरणाच्या तरतुदींचा अन्वय लावताना आयुक्त हा " संबंधित स्थानिक प्राधिकरण किंवा कंपनी " आहे असे मानले जाईल.

(६) भूमि संपादन अधिनियमाच्या कलम ४९, पोट-कलम (१) मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, इमारतीच्या ज्या कोणत्याही भागाचे संपादन करण्याचे योजिले असेल तो भाग जिल्हाधिकाऱ्याच्या मते इतर भागापासून त्याचे कोणतेही विशेष नुकसान होऊ न देता अलग ठेवता येईल तेव्हा अशा इमारतीच्या मालकास त्या संपूर्ण जमिनीचे संपादन करण्याचा आग्रह धरता येणार नाही :

परंतु, अशा इमारतीच्या मालकाने मागणी केली असता, जिल्हाधिकारी असा भाग इतर भागापासून त्यांचे विशेष नुकसान होऊ न देता अलग करता येईल किंवा कसे हे निर्धारित करण्यासाठी हा प्रश्न न्यायालयाकडे निर्णयासाठी निर्देशित करील आणि न्यायालय अशा निर्देशाचा निर्णय, जणू तो उक्त पोट-कलमाखाली न्यायालयाकडे पाठविलेला निर्देश असावा, त्याप्रमाणे समजून देईल :

परंतु आणखी असे की, जर जिल्हाधिकाऱ्यांच्या मते, किंवा न्यायालयाकडे निर्देशित करण्यात आल्यास त्या बाबतीत, ज्या भागांचे संपादन करण्याचे योजिले आहे त्याचे विशेष नुकसान होऊ न देता तो इतर भागापासून अलग करता येत नसेल तर, राज्य शासनास आयुक्ताच्या विनंतीवरून, उर्वरित भागांचे संपादन करण्याचा आदेश देता येईल आणि अशा बाबतीत नवीन घोषणा करण्याची आवश्यकता असणार नाही ; पण जिल्हाधिकारी राज्य शासनाच्या आदेशाची प्रत संबंधित व्यक्तीला किंवा व्यक्तींना विलंब न लावता पुरवील आणि त्यानंतर उर्वरित भागांचे संपादन करण्यासाठी, जणू अशा संपादनाची तरतूद सुधारणा परियोजनेत किंवा यथास्थिति, सक्तीच्या संपादनाच्या आदेशान्वये आरंभीच करण्यात आलेली असावी त्याप्रमाणे व त्याच अधिकारांचा वापर करून आदेश प्राप्त करील.

(७) कलम ३५४सअ लागू असेल अशा कोणत्याही जमीन संपादनांच्या बाबतीत भूमि संपादन अधिनियमाचे कलम ५४ लागू असणार नाही.

विवक्षित प्रकरणांत विशेष न्यायाधिकरणाने निर्णय करणे

**३५४सअ.** (१) या प्रकरणाच्या तरतुदींखाली तयार केलेल्या व कायम केलेल्या सक्तीने संपादन करण्याच्या आदेशाखाली जमीन संपादन करण्याच्या प्रयोजनांकरिता भूमि संपादन अधिनियमाखाली न्यायालयाची कामे, अनुसूची दोनमध्ये दिल्याप्रमाणे रचना केलेले व अधिकार असलेले न्यायाधिकरण पार पाडील आणि उक्त अधिनियम व या प्रकरणाच्या तरतुदी याचा अन्वय लावताना हे न्यायाधिकरण म्हणजे न्यायालय असल्याचे मानण्यात येईल आणि न्यायाधिकरणाचा अध्यक्ष हा न्यायाधीश असल्याचे मानण्यात येईल.

(२) न्यायाधिकरणाने दिलेला निवाडा हा न्यायालयाने भूमि संपादन अधिनियमाखाली दिलेला निवाडा असल्याचे मानण्यात येईल आणि तो अंतिम असेल :

परंतु, कोणत्याही प्रकरणाच्या बाबतीत असे प्रकरण अपील करण्यास योग्य आहे असे प्रमाणपत्र अध्यक्ष देईल तर, न्यायाधिकरणाने दिलेला निवाडा किंवा त्या निवाड्याचा कोणताही भाग यावर उच्च न्यायालयाकडे अपील करता येईल.

(३) न्यायाधिकरणाचा प्रत्येक निवाडा, आणि पैसे देण्याविषयी न्यायाधिकरणाने दिलेला प्रत्येक आदेश हा, मुंबई शहर दिवाणी न्यायालय, जणू काही तो अशा न्यायालयाने दिलेला हुकूमनामा असावा, त्याप्रमाणे अंमलात आणील.]

**३५४ट.** या अधिनियमाखाली संपादन केलेल्या कोणत्याही जमिनीबद्दल किंवा इमारतीबद्दल द्यावयाची भरपाईची रक्कम निर्धारित करताना खाली दिलेल्या आणखी तरतुदी लागू होतील :— भरपाईसंबंधी विशेष तरतुदी.

(१) हितसंबंधित व्यक्तींच्या मालकीच्या कोणत्याही इतर जमिनीचे संपादन केल्यामुळे किंवा इमारतीचे संपादन केल्यामुळे, तीत फेरफार केल्यामुळे, किंवा ती पाडून टाकल्यामुळे अशा जमिनीच्या किंवा इमारतीच्या मूल्यात जी कोणतीही वाढ होण्याचा संभव असेल ती न्यायालय विचारात घेईल;

(२) जमिनीच्या किंवा इमारतीच्या संबंधाने कलम ३५४ग चे पोट-कलम (१) किंवा कलम ३५४प खाली अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या तारखेनंतर अशा जमिनीत किंवा इमारतीत कोणतीही वाढ किंवा सुधारणा केली असेल तेव्हा, अशी वाढ किंवा सुधारणा ही (इमारत योग्य स्थितीत ठेवण्यास तिची आवश्यकता असेल त्याखेरीज एरव्ही), जमिनीबद्दल किंवा इमारतीबद्दल द्यावयाच्या भरपाईच्या रकमेत वाढ होईल अशा रीतीने समाविष्ट केली जाणार नाही. तसेच उक्त तारखेनंतर संपादन केलेल्या हितसंबंधाच्या बाबतीत त्याच्या किंमतीचा कोणताही वेगळा अंदाज जमिनीबद्दल किंवा इमारतीबद्दल द्यावयाच्या भरपाईच्या रकमेत वाढ होईल अशा रीतीने केला जाणार नाही;

(३) कलम ३५४ग चे पोट-कलम (१) किंवा ३५४प खाली जमिनीच्या किंवा इमारतीच्या संबंधाने अधिसूचना प्रसिद्ध केल्याच्या तारखेस अशा जमिनीचे किंवा इमारतीचे बाजारमूल्य ठरवताना न्यायालय, मालमत्तेचे स्वरूप आणि तिची स्थिती आणि कोणतीही इमारत असल्यास, तिच्या विद्यमान स्थितीनुसार ती किती काळ टिकू शकेल ते आणि ती कितपत दुरुस्त स्थितीत आहे ते, या गोष्टी आणि या कलमाचे खंड (४), (५) व (६) यांच्या तरतुदी विचारात घेईल;

(४) जमिनीचा किंवा इमारतीचा बेकायदेशीर प्रयोजनाकरिता, वापर करण्यात येत असल्यामुळे किंवा तेथे राहत असलेल्या व्यक्तींच्या आरोग्यास धोकादायक किंवा अपायकारक होईल इतकी अतिगर्दी झालेली असल्यामुळे अशा जमिनीचे किंवा इमारतीचे भाडे वाढवण्यात आले आहे असे न्यायालयाचे मत झाले असेल तर, अशा जमिनीचा किंवा इमारतीचा वापर केवळ कायदेशीर प्रयोजनाकरिता करण्यात आला असता किंवा अतिगर्दीचा धोका न पत्करता जितक्या व्यक्ती तेथे योग्य रीतीने सामावू शकल्या असत्या तितक्याच व्यक्तींनी तिचा भोगवटा केला असता तर जे भाडे मिळू शकले असते त्यापेक्षा अधिक आहे असे मानले जाणार नाही;

**स्पष्टीकरण.—** या पोट-कलमाच्या प्रयोजनाकरिता " अतिगर्दी " या संज्ञेचा अर्थ, कलम ३७९अ पोट-कलम (४) व (५) मध्ये तिचा जो अर्थ दिला आहे तोच अर्थ असेल;

(५) जर न्यायालयाच्या मते इमारत स्वच्छतेच्या दृष्टीने सदोष स्थितीत असेल तर किंवा ती योग्यप्रकारे दुरुस्त ठेवण्यात आलेली नसेल तर, भरपाईची रक्कम ही इमारत स्वच्छतेच्या दृष्टीने योग्य स्थितीत आणल्यानंतर किंवा योग्य रीतीने ती दुरुस्त केल्यानंतर मालमत्तेच्या अंदाजित मूल्याहून अशा रीतीने केलेल्या कामाचा अंदाजित खर्च वजा करता जी रक्कम येईल त्याहून अधिक असणार नाही;

(६) मानवी वसतीसाठी वापरण्यात येत असलेली किंवा वापरण्याचा इरादा असलेली किंवा वापरली जाण्याचा संभव असलेली इमारत वाजवी रीतीने विचार करता मानवी वसतीस उपयुक्त नाही असे न्यायालयाचे मत असेल तर, त्या इमारतीच्या भरपाईची रक्कम ही, सामग्रीच्या मूल्यातून इमारत पाडून टाकण्यासाठी झालेला खर्च वजा करता जी रक्कम राहील, त्यापेक्षा अधिक असणार नाही;

[१][(७) न्यायालयास, संपादन करण्याचे योजिलेल्या इमारतीचा कोणताही भाग अलग ठेवण्याच्या बाबतीत त्या भागाच्या मूल्याच्या भरीला आणखी भरपाई देता येईल;

(८) निपटारा क्षेत्रात समाविष्ट असलेली जमीन म्हणून संपादन केलेल्या जमिनीवरील कोणत्याही इमारती धरून त्या जमिनीबद्दल द्यावयाची भरपाईची रक्कम ही, त्या जमिनीचे इमारत पाडून निपटारा केलेले व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इमारती बांधण्याविषयी उपविधीच्या आवश्यक गोष्टीस अनुसरून विकासासाठी उपलब्ध असलेले ठिकाण म्हणून मूल्यांकनाच्या वेळी जे मूल्य असेल त्या मूल्याइतकी असेल :

परंतु एखादी इमारत राहण्याची जागा म्हणून किंवा त्या प्रयोजनासाठी, किंवा अंशतः त्या प्रयोजनासाठी व अंशतः इतर प्रयोजनासाठी बांधलेली किंवा जुळती करून घेतलेली इमारत असेल आणि तिचा असा भाग (इतर प्रयोजनांसाठी वापरण्यात आला नसेल असा), नादुरुस्ती किंवा स्वच्छताविषयक दोष यामुळे मानवी वसतीस अयोग्य असेल ते खेरीज करून, जी इमारत, तिची इतर इमारतींच्या मानाने सदोष रचना असल्यामुळे किंवा रस्त्याचा अरुंदपणा किंवा अयोग्य आखणी यामुळे ती इमारत त्या क्षेत्रात राहाणाऱ्या लोकांच्या आरोग्यास घातक किंवा अपायकारक आहे याच केवळ कारणावरून निपटारा क्षेत्रात योग्य रीतीने समाविष्ट करण्यात आली असेल त्या इमारतीच्या जागेच्या बाबतीत हे पोट-कलम परिणामक असणार नाही;

(९) जी इमारत मानवी वसतीस अयोग्य म्हणून व वाजवी खर्चात अशा रीतीने योग्य बनवणे शक्य नसलेली म्हणून कलम ३५४रके, पोट-कलम (२) खाली संपादन करण्यासाठी आयुक्तास प्राधिकृत करण्यात आले असेल, त्या इमारतीसाठी द्यावयाच्या भरपाईच्या रकमेची आकारणी जणू ती इमारत निपटारा क्षेत्रात समाविष्ट असलेली अशी संपादन केलेली जमीन असावी त्याप्रमाणे, तशाच रीतीने करण्यात येईल.]

जिल्हाधिकाऱ्याने निवाडा दिल्यानंतर कब्जा घेणे व ती जमीन महानगरपालिकेकडे हस्तांतरित करणे.

**३५४यू.** या अधिनियमान्वये लागू करण्यात आल्याप्रमाणे, भूमी संपादन अधिनियम, कलम ११ खाली जिल्हाधिकाऱ्याने निवाडा दिला असेल तेव्हा त्यास अशा जमिनीचा कब्जा घेता येईल आणि त्यानंतर अशी जमीन सर्व भारांपासून मुक्त होऊन [२][शासना] मध्ये सर्वस्वी निहित होईल. जिल्हाधिकारी, संपादनाचा परिव्यय देण्यात आल्यावर, जमिनीचा ताबा आयुक्तास देईल आणि त्यानंतर अशी जमीन, ती संपादन केल्यामुळे आणखी जो कोणताही परीव्यय होईल तो महानगरपालिकेच्या वतीने देण्याबद्दलच्या आयुक्ताच्या दायित्वाच्या अधीनतेने महानगरपालिकेमध्ये निहित होईल.

### [३][सुधार आकार बसवणे

निपटारा क्षेत्रांत व पुनर्विकास क्षेत्रात सुधार आकार बसवण्यासाठी शर्ती.

**३५४यूअ.** (१) जेव्हा [४][आयुक्ताच्या मते] अनुक्रमे कलमे ३५४रई किंवा ३५४रज आणि ३५४रके यांखाली तरतूद केल्याप्रमाणे एखाद्या क्षेत्रात निपटारा केल्यामुळे किंवा त्याच्या पुनर्विकासामुळे कोणत्याही जमिनीच्या मूल्यात वाढ होईल, तेव्हा अशा निपटाऱ्यामुळे किंवा पुनर्विकासामुळे जमिनीच्या मूल्यात होणाऱ्या वाढीच्या संबंधात सुधार आकार बसवण्याजोगा असेल [४][असे आयुक्तास घोषित करता येईल.]

---

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम १९ अन्वये खंड (७), (८) व (९) समाविष्ट करण्यात आले.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " हिज मॅजेस्टी " या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम २० अन्वये हे शीर्षक आणि कलमे ३५४यूअ, ३५४यूब, आणि ३५४यूक समाविष्ट करण्यात आली.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १४४(अ) अन्वये " महापौरासह परिषदेच्या मते " या मजकुराऐवजी " आयुक्ताच्या मते " तसेच "असे महापौरासह परिषदेने ठरविल्याप्रमाणे आयुक्तास घोषित करता येईल " या मजकुराऐवजी " असे आयुक्तास घोषित करता येईल" हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) पोट-कलम (१) खाली सुधार आकार बसवण्याजोगा असेल असे घोषित करण्यापूर्वी, आयुक्त, प्रस्तावित सुधार आकार बसवल्यामुळे जिच्यावर परिणाम होईल अशा कोणत्याही जमिनीच्या किंवा इमारतीच्या किंवा इमारतीच्या भागाच्या संबंधाने या अधिनियमाखाली वसूल करण्याजोगे मालमत्तेवरील कर भरण्याचे प्रथमतः दायित्व असलेली व्यक्ती म्हणून ज्या व्यक्तीचे नाव आयुक्ताच्या निर्धारण पुस्तकात असेल त्या प्रत्येक व्यक्तीवर त्या जमिनीच्या बाबतीत सुधार आकार बसवण्याची घोषणा करण्याचा आपला इरादा असल्याचे आणि ज्या अवधीच्या आत आणि ज्या रीतीने त्यासंबंधीचे आक्षेप आयुक्ताकडे सादर करता येतील तो अवधी व ती विनिर्दिष्ट केलेली एक नोटीस बजावील.

(३) आयुक्त, पोट-कलम (२) खाली आलेले कोणतेही आक्षेप आणि त्या बाबतीत ज्या कोणत्याही सूचना करणे, त्यास इष्ट वाटत असेल त्या सूचना [१][सुधार समितीस] सादर करील.

(४) [१][सुधार समिती] असे कोणतेही आक्षेप व सूचना विचारात घेतल्यानंतर, नियोजित सुधार आकाराच्या बाबतीत [२][तिला योग्य वाटतील असे] फेरबदल करील आणि आयुक्त त्यानंतर, सुधार आकार फेरबदलासहित किंवा फेरबदलावाचून बसविण्यात येईल असे घोषित करील.

**३५४यूब.** कलम ३५४-ई, पोटकलम (३) ला अनुसरून सुधार आकार बसवण्याबाबत सुधारणा परियोजनेत तरतूद केलेली असेल किंवा कलम ३५४ यूअ, पोट-कलम (४) खाली सुधार आकार बसविण्याजोगा असल्याचे आयुक्ताने घोषित केले असेल तेव्हा असा सुधार आकार हा जमिनीच्या मूल्यामधील वाढीच्या एक द्वितीयांश रकमेइतका असेल; आणि तो सुधारणा परियोजनेच्या बाबतीत परियोजनेच्या अंमलबजावणीचे काम पूर्ण झाल्यावर असणारे जमिनीचे मूल्य हे कलम ३५४ग खाली काढलेली अधिसूचना प्रसिद्ध करण्याच्या वेळी असलेल्या जमिनीच्या मूल्यापेक्षा जेवढ्या रकमेने अधिक असेल त्या रकमेवर आणि निपटारा अथवा पुनर्विकास क्षेत्राच्या बाबतीत निपटाऱ्याचे अथवा पुनर्विकासाचे काम पूर्ण झाल्यावर असणारे जमिनीचे मूल्य हे, एखादे क्षेत्र निपटारा क्षेत्र किंवा पुनर्विकास क्षेत्र असल्याचे घोषित करणाऱ्या महानगरपालिकेच्या कलम ३५४र किंवा ३५४र आय खालील ठरावाच्या तारखेस असलेल्या जमिनीच्या मूल्यापेक्षा जेवढ्या रकमेने अधिक असेल तेवढ्या रकमेवर परिगणित करण्यात येईल.

आकाराची परिगणना करण्याची पद्धत.

**३५४यूक.** (१) सुधार आकाराची रक्कम निश्चित करणे शक्य होण्याइतकी सुधारणा परियोजनेच्या किंवा निपटारा परियोजनेच्या किंवा पुनर्विकास परियोजनेच्या कामात प्रगती झाली आहे असे आयुक्तास आढळून येईल तेव्हा तो, त्या अर्थाचे प्रतिवृत्त [१][सुधार समितीकडे] पाठवील आणि [१][सुधार समितीस,] प्रतिवृत्ताचा विचार केल्यानंतर, सुधार आकाराची रक्कम निश्चित करण्याच्या प्रयोजनासाठी ज्या तारखेस सुधारणा परियोजना पूर्ण झाली आहे असे मानले जाईल ती तारीख ठरावान्वये घोषित करता येईल.

आकार निर्धारित करण्याची कार्यपद्धती.

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १४४(क) (१) अन्वये "प्रभारी सदस्य" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १४४(क) (२) अन्वये "त्याला योग्य वाटतील असे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) प्रत्येक बाबतीत बसवण्याजोगा सुधार आकार हा, महानगरपालिकेच्या विनंतीवरून याबाबत राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेअन्वये नेमील अशा अधिकाऱ्याकडून, पोट-कलम (३) मध्ये विहित केलेली कार्यपद्धती अनुसरण्यात आल्यानंतर, ३५४यूब अनुसार निश्चित करण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) खाली तारीख निश्चित करण्यात आल्यावर आणि पोट-कलम (२) खाली अधिकाऱ्याची नेमणूक झाल्यावर, आयुक्त अशा अधिकाऱ्यांशी विचारविनिमय करून, संबंधित मालमत्तेच्या बाबतीत ज्या व्यक्तीवर कलम ३५४ग, पोट-कलम (२) किंवा कलम ३५४यूअ, पोट-कलम (२), खाली नोटीस बजावण्यात आली असेल त्या प्रत्येक व्यक्तीवर एक नोटीस बजावील, अशा नोटिशीत पुढील गोष्टी नमूद करण्यात येतील :—

(अ) पूर्वोक्तप्रमाणे पोट-कलम (१) खाली [१][सुधार समितीने] घोषित केलेली तारीख ;

(ब) असा अधिकारी सुधार आकाराचे निर्धारण ज्यावेळी (ही वेळ नोटीस बजावल्यानंतर एकवीस दिवसांहून आधीची नसेल) व ज्या जागी विचारात येईल ती वेळ व ती जागा; आणि ज्या व्यक्तीवर अशी नोटीस बजावण्यात आली असेल त्या प्रत्येक व्यक्तीस, असा अधिकारी ती बाब विचारात घेईल तेव्हा जातीने किंवा रीतसर प्राधिकृत केलेल्या अभिकर्त्यामार्फत आपली बाजू मांडण्याचा हक्क असेल.

(४) जेव्हा कोणत्याही मालमत्तेच्या बाबतीत बसवण्याजोगी सुधार आकाराची रक्कम अशा अधिकाऱ्याने निर्धारित केली असेल तेव्हा आयुक्त संबंधित व्यक्तीवर एक नोटीस बजावून तीत याप्रमाणे निर्धारित केलेली रक्कम नमूद करील.

(५) पोट-कलम (४) खाली नोटीस बजावण्याच्या तारखेपासून आणि पोट-कलम (६) मध्ये यात यापुढे तरतूद केल्याप्रमाणे न्यायाधिकरणाकडे निर्देशित केलेल्या कोणत्याही प्रकरणावरील निर्णयाच्या अधीनतेने, पूर्वोक्तप्रमाणे सुधार आकाराची रक्कम व त्यावर कोणतेही व्याज देणे असल्यास त्याची रक्कम, ज्या मालमत्तेच्या संबंधात ती बसवण्यात आली असेल त्या मालमत्तेवर भार म्हणून असेल आणि ती कलम ४९४ खाली सुधारणा खर्च म्हणून घोषित केलेला खर्च ज्या रीतीने वसूल करता येतो त्याच रीतीने वसूल करता येईल.

(६) उक्त अधिकाऱ्याने, निर्धारित केलेल्या सुधार आकारामुळे जर कोणत्याही व्यक्तीचे किंवा आयुक्ताचे समाधान झाले नसेल, तर तिला/त्याला, पोट-कलम (४) खाली नोटीस बजावण्याच्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत कोणत्याही वेळी ते प्रकरण कलम ३५४सअ खाली नेमलेल्या न्यायाधिकरणाकडे निर्देशित करता येईल, आणि न्यायाधिकरणाचा निर्णय अंतिम असेल.

(७) जर पोट-कलम (६) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत सुधार आकार निर्धारित करण्यासाठी न्यायाधिकरणाकडे निर्देशित करण्यात आला नाही, तर राज्य शासनाने याबाबत नेमलेल्या अधिकाऱ्याने सुधार आकाराची रक्कम निर्धारित करण्यासाठी दिलेला निर्णय अंतिम असेल.]

---

[१] सन १९९९ चा अधिनियम क्रमांक २७, कलम १४५(ब) अन्वये “महापौरासह परिषदेने” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**३५४व्ही.** [विवक्षित जमीन परत मिळाल्यानंतर महानगरपालिकेस द्यावयाची भरपाई.] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम २१ अन्वये वगळण्यात आले.

### [१][इमारती बांधण्यासाठी कर्जे]

**३५४डब्ल्यू.** (१) या अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या उपविधींच्या तरतुदींच्या अधीनतेने आयुक्तास, [२][सुधार समितीच्या] पूर्वमंजुरीने, मुंबई शहर सुधारणा विश्वस्तव्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ याखाली रचना केलेल्या मुंबई शहर सुधारणा विश्वस्त मंडळाच्या मालमत्तेचे हस्तांतरण करण्यात आल्याच्या परिणामी महानगरपालिकेमध्ये निहित झालेल्या जमिनीवर इमारती उभारण्याची ज्यांची इच्छा असेल अशा व्यक्तींना कर्जे देता येतील. इमारतीच्या प्रयोजनांसाठी कर्जे देण्याचा अधिकार.

१९२५ चा मुंबई १६.

(२) अशा कोणत्याही जमिनीवर इमारत बांधण्याची इच्छा असलेल्या कोणत्याही व्यक्तीस याप्रमाणे बांधण्यात यावयाच्या इमारतीच्या प्रतिभूतीवर गहाणाच्या स्वरूपात कर्ज मिळण्यासाठी उपविधींअनुसार विहित करण्यात येईल अशा नमुन्यामध्ये आयुक्ताकडे अर्ज करता येईल, आणि आयुक्तास, त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर पोटकलमे (१) व (३) आणि कलम ४६१ खाली केलेल्या उपविधीत नमूद केलेल्या शर्तींच्या अधीनतेने अशी कर्जे देता येतील.

(३) असे प्रत्येक कर्ज इतर शर्तींबरोबर खालील शर्तींच्या अधीन राहील :—

(१) ज्या इमारतीच्या बाबतीत कर्ज दिले असेल ती सर्वस्वी किंवा मुख्यत्वेकरून निवासाच्या प्रयोजनासाठी वापरण्यात आली पाहिजे ;

(२) कोणत्याही एकेका प्रकरणी कर्जाची एकूण रक्कम एकूण वीस हजार रुपयांहून अधिक असता कामा नये ;

(३) कर्जफेडीचा कालावधी इमारतीचा प्रथम भोगवटा केल्याच्या तारखेपासून वीस वर्षांपेक्षा अधिक असता कामा नये ;

(४) कर्जफेडीचा कालावधी काहीही असला तरी, कर्जाची रक्कम इमारतीच्या (यात या इमारतीस जोडलेल्या उपघरांचा व इतर काही बांधकामे असल्यास त्यांचा समावेश होतो) खर्चाच्या रकमेच्या ६० टक्क्यांपेक्षा अधिक असता कामा नये ;

(५) ज्या कोणत्याही व्यक्तीला कर्ज देण्यात आले असेल ती व्यक्ती इमारतीचे, (तीत या इमारतीस जोडलेल्या उपघरांचा व काही इतर कामे असल्यास त्यांचा समावेश होतो) ती ज्या ठिकाणावर असेल त्या ठिकाणासह, महानगरपालिकेच्या प्रीत्यर्थ उपविधींत विहित करण्यात येतील अशा प्रसंविदा व शर्ती ज्यात दाखल केलेल्या असतील असे गहाणखत करील.

---

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम २२ अन्वये हे शीर्षक समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १४६ अन्वये "प्रभारी सदस्याच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

निवासी व्यवस्थांत वाढ करण्याच्या प्रयोजनांसाठी कर्ज देण्याचा आयुक्ताचा अधिकार.

[१][**३५४डब्ल्यूअ.** (१) या अधिनियमाच्या व त्याखाली केलेल्या कोणत्याही उपविधींच्या तरतुदींच्या अधीनतेने, आयुक्तास [२][सुधार समितीच्या] पूर्वमंजुरीने—

(अ) निर्धन लोकांना उपयोग व्हावा या इराद्याने इमारती बांधणाऱ्या किंवा त्यात फेरफार करणाऱ्या किंवा त्या बांधण्याचे किंवा त्यात फेरफार करण्याचे काम हाती घेणाऱ्या व्यक्तींना ;

(ब) अशा इमारतींची दुरुस्ती करणाऱ्या, किंवा दुरुस्तीची कामे हाती घेणाऱ्या व्यक्तींना ; कर्जे देता येतील :

परंतु, अशा इमारतींच्या दुरुस्तीचा खर्च किंवा अर्जदाराची वित्तीय परिस्थिती विचारात घेता, अशी मदत देणे योग्य आहे, असे आयुक्तास वाटले पाहिजे.

(२) अशा कर्जाच्या रूपाने मदत हवी असलेल्या पोट-कलम (१) मध्ये उल्लेख केलेल्या व्यक्तींना अशा रीतीने बांधण्याच्या, फेरफार करावयाच्या किंवा दुरुस्त करावयाच्या, इमारतीच्या प्रतिभूतीवर गहाणाच्या स्वरूपात कर्जे मिळण्यासाठी, उपविधीअनुसार विहित करण्यात येईल अशा नमुन्यामध्ये आयुक्ताकडे अर्ज करता येतील, आणि आयुक्तास, त्यावर आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर आणि पोट-कलम (३) मध्ये नमूद केलेल्या शर्तींच्या आणि कलम ४६१ खाली केलेल्या उपविधींच्या अधीनतेने अशी कर्जे देता येतील.

(३) असे प्रत्येक कर्ज इतर शर्तींबरोबर खालील शर्तींच्या अधीन असेल :—

(अ) ज्या इमारतीच्या बाबतीत कर्ज द्यावयाचे ती इमारत बांधण्याचे, तीत फेरफार करण्याचे, किंवा तिच्या दुरुस्तीचे काम पूर्ण झाल्यानंतर ती सर्व बाबतीत मानवी वसतीस योग्य अशी झाली पाहिजे आणि ती सर्वस्वी किंवा मुख्यत्वेकरून राहण्याच्या प्रयोजनासाठी वापरण्यात आली पाहिजे ;

(ब) कर्जाची रक्कम व तिच्यावरील व्याज, यावरील प्रतिभूती म्हणून इमारत (तिच्यामध्ये त्या इमारतीस जोडलेल्या उपघरांचा व इतर बांधकामे असल्यास त्यांचा समावेश होतो), ती ज्या ठिकाणावर असेल त्या ठिकाणासह, महानगरपालिकेच्या प्रीत्यर्थ गहाण ठेवण्यात येईल व अशा प्रतिभूतीसाठी उपविधीअनुसार विहित करण्यात येतील अशा प्रसंविदा व शर्ती दाखल करण्यात येतील ;

(क) कर्जफेडीचा कालावधी हा इमारत बांधण्याचे, तिच्यात फेरफार करण्याचे किंवा ती दुरुस्त करण्याचे काम पूर्ण झाल्याच्या तारखेपासून तीस वर्षांपेक्षा अधिक असता कामा नये ;

(ड) कर्जफेडीचा कालावधी काहीही असला तरी कर्जाची रक्कम इमारतीच्या खर्चाच्या रकमेच्या साठ टक्क्यांपेक्षा अधिक असता कामा नये, आणि ती कोणत्याही बाबतीत ३०,००० रुपयांपेक्षा अधिक असता कामा नये ;

(ई) गहाण ठेवावयाचा इरादा असलेल्या मालमत्तेत पट्ट्याच्या स्वरूपाचा हितसंबंध असेल तेव्हा पट्ट्याचा शिल्लक राहिलेला कालावधी हा, पट्टा देण्याच्या तारखेपासून चाळीस वर्षांपेक्षा कमी नसेल त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत असे कोणतेही कर्ज देता कामा नये.

---

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम २३ अन्वये कलमे ३५४डब्ल्यूअ, ३५४डब्ल्यूब आणि ३५४ डब्ल्यूक समाविष्ट करण्यात आली.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १४७ अन्वये " प्रभारी सदस्याच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

गृहनिर्माण अधिसंघांचे प्रवर्धन करण्याचा व त्यांना सहाय्य करण्याचा आयुक्ताचा अधिकार.

**३५४डब्ल्यूब.** (१) आयुक्तास कलम ३५४रम याच्या प्रयोजनाकरिता [1][सुधार समितीच्या] पूर्वमान्यतेने, यापुढे केलेल्या व्याख्येनुसार असलेला गृहनिर्माण अधिसंघ स्थापन करण्यास चालना देता येईल किंवा त्याचा विस्तार करता येईल किंवा या अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने त्याला सहाय्य करता येईल.

(२) जेव्हा निर्धन वर्गांकरिता घरे उभारण्याची एखाद्या गृहनिर्माण अधिसंघाची इच्छा असेल तेव्हा, आयुक्तास, या प्रयोजनाकरिता, [1][सुधार समितीच्या] पूर्वमान्यतेने, अधिसंघाला जमीन विकण्याचा किंवा ती पट्ट्याने देण्याच्या दृष्टीने जमीन संपादन करता येईल आणि आयुक्ताने जमीन संपादन करण्याबाबत असलेल्या कलम ३५४रओ याच्या तरतुदी त्यानुसार लागू होतील.

(३) आयुक्तास, एखाद्या गृहनिर्माण अधिसंघास सहाय्य करण्याकरिता, [1][सुधार समितीच्या] पूर्वमान्यतेने, व्याजाचा दर आणि कर्जाची परतफेड यासंबंधीच्या किंवा इतर अटींच्या आणि शर्तींच्या अधीनतेने आणि [1][सुधार समितीस] योग्य वाटेल अशा प्रतिभूतीवर त्या अधिसंघास अनुदाने किंवा कर्जे देता येतील.

(४) या कलमाच्या प्रयोजनांकरिता, "गृहनिर्माण अधिसंघ" म्हणजे, निर्धन वर्गासाठी घरे बांधण्याच्या किंवा ती सुधारण्याच्या किंवा व्यवस्थापन करण्याच्या किंवा घरे बांधण्याच्या, ती सुधारण्याच्या किंवा त्याबाबत सवलती देण्याच्या किंवा उत्तेजन देण्याच्या प्रयोजनासाठी स्थापन करण्यात आलेली किंवा जिच्या उद्देशामध्ये किंवा अधिकारांमध्ये निर्धन वर्गाच्या लोकांसाठी घरे बांधणे किंवा ती सुधारणे किंवा त्याबाबत व्यवस्थापन करणे, त्याबाबत सवलती देणे किंवा उत्तेजन देणे या उद्देशाचा किंवा अधिकारांचा समावेश होतो, अशी सहकारी गृहनिर्माण संस्था धरून एखादी संस्था विश्वस्त निकाय किंवा कंपनी असा आहे व ती नफ्यासाठी धंदा न करणारी संस्था, किंवा विश्वस्त निकाय किंवा कंपनी असेल.

महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांना घरांसाठी कर्ज देण्याचा आयुक्ताचा अधिकार.

[2][**३५४-डब्ल्यूबब.** कलम ४६१ खाली तयार करण्यात आलेल्या उपविधींमध्ये नमूद करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने, आयुक्ताला, [3][सुधार समितीच्या] पूर्वमान्यतेने, (उपविधीअन्वये असे कर्ज मिळण्यास पात्र असेल अशा) महानगरपालिकेच्या एखाद्या अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला बृहन्मुंबईत उपविधीअन्वये असे घर बांधण्यासाठी किंवा ते खरेदी करण्यासाठी किंवा बृहन्मुंबईत किंवा उपविधीमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा लगतच्या क्षेत्रात, सहकारी गृहनिर्माण संस्थेमध्ये मालकी तत्त्वावर सदनिका किंवा महाराष्ट्र वेश्म मालकी अधिनियम, १९७० खाली वेश्म खरेदीसाठी कर्ज मंजूर करता येईल.]

१९७१ चा महाराष्ट्र १५.

## अनुसूची डब्ल्यू, य आणि झ यांत समाविष्ट केलेल्या जमिनींसंबंधी तरतुदी

विवक्षित जमीन परत मिळाल्यानंतर महानगरपालिकेस द्यावयाची भरपाई.

**३५४डब्ल्यूक.** जेव्हा या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये अनुसूची डब्ल्यूमध्ये विनिर्दिष्ट केलेली कोणतीही जमीन राज्य शासनाने परत घेतली असेल किंवा अनुसूची य मध्ये विनिर्दिष्ट केलेली व महानगरपालिकेमध्ये निहित असलेली कोणतीही जमीन राज्य शासनाने ताब्यात घेतली असेल तेव्हा जमिनी परत घेण्याच्या तारखेस असलेली व जिल्हाधिकाऱ्याने किंवा अपिलात उच्च न्यायालयाने निर्धारित केलेली, जमिनीच्या बाजार मूल्याइतकी रक्कम राज्य शासन महानगरपालिकेस देईल.]

---

[1] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १४८ अन्वये "महापौरासह परिषद" या शब्दप्रयोगाऐवजी हा शब्दप्रयोग त्याच्या व्याकरणिक फेरफारासह दाखल करण्यात आला.

[2] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, कलम ३ अन्वये कलम ३५४ डब्ल्यूबब समाविष्ट करण्यात आले.

[3] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम ३ अन्वये कलम १४९ अन्वये "प्रभारी सदस्यांच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][राज्य] शासनाने द्यावयाची रक्कम.

**३५४क्ष.** [१][[२][राज्य] शासन], मुंबई शहर नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९३३ हा अंमलात येण्याच्या तारखेपासून आणि ९ नोव्हेंबर, १९९७ पर्यंत, अनुसूची झ मध्ये विनिर्दिष्ट किंवा निर्दिष्ट केलेल्या जमिनींपासून [१][[२][राज्य] शासनास] मिळालेल्या भाड्याच्या व नफ्याच्या सर्व रकमा महानगरपालिकेस देईल. १९३३ चा मुंबई १३.

## प्रकरण तेरा

## सर्वेक्षकांना व नळकारागिरांना लायसन देणे

सर्वेक्षकांना व नळकारागिरांना लायसने देणे.

**३५५.** (१) आयुक्तास, [३][याबाबत विनियमांच्या अधीनतेने] त्यास योग्य वाटेल अशा कोणत्याही व्यक्तीस या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता सर्वेक्षक किंवा नळकारागीर म्हणून काम करण्यासाठी लायसन देता येईल. असे प्रत्येक लायसन एक वर्षाच्या नवीकरणयोग्य कालावधीकरिता असेल.

(२) सर्वेक्षक म्हणून काम करण्यासाठी लायसन मागणारा कोणताही अर्जदार हा स्थापत्य अभियांत्रिकीचा लायसनधारक किंवा स्थापत्य अभियांत्रिकीच्या लायसनधारक या अर्हतेशी तुल्य अशी व्यावसायिक अर्हतेची एखादी चाचणी परीक्षा उत्तीर्ण झालेली व्यक्ती असल्यास, आयुक्ताला त्याचा अर्ज [४][स्थायी समितीच्या] मान्यतेने, आणि अक्षमता किंवा गैरवर्तन किंवा इतर महत्त्वाच्या कारणामुळे असे लायसन धारण करण्यास अर्जदार अयोग्य आहे या मुद्यावर तो नाकारण्यात आला असेल त्याव्यतिरिक्त इतर बाबतीत, नाकारता येणार नाही.

(३) या कलमाखाली लायसनकरिता केलेला कोणताही अर्ज आयुक्त नाकारील तर, आयुक्त अर्जदारांच्या विनंतीनुसार, कोणताही आकार न घेता, अशी परवानगी नाकारण्याची कारणे आपल्या सहीनिशी अशा अर्जदारास लेखी कळवील.

लायसनदार सर्वेक्षक व नळकारागीर यांच्या मार्गदर्शनासाठी विनियम विहित करता येतील.

**३५६.** [५][महानगरपालिकेस] अनुक्रमे लायसनदार सर्वेक्षक व नळकारागीर यांच्या मार्गदर्शनासाठी वेळोवेळी विनियम विहित करता येतील आणि याप्रमाणे विहित करण्यात आलेल्या व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या सर्व विनियमांची एक प्रत अनुक्रमे सर्वेक्षक किंवा नळकारागीर यांना दिलेल्या प्रत्येक लायसनच्या मागील बाजूस लिहिण्यात येईल.

लायसनदार नळकारागिरांची फी व आकार [६][स्थायी समितीने] विहित करणे.

**३५७.** [६][स्थायी समितीस] या अधिनियमाखाली किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही प्रयोजनासाठी लायसनदार नळकारागिरांनी केलेल्या कोणत्याही कामाबद्दल त्यांना द्यावयाची फी किंवा आकार वेळोवेळी विहित करता येतील ; आणि कोणत्याही नळकारागिराला अशा कोणत्याही कामासाठी विहित करण्यात आलेली फी किंवा आकार यापेक्षा अधिक फी किंवा आकार मागता किंवा स्वीकारता येणार नाही.

लायसनदार नळकारागिरांवर योग्य रीतीने काम पार पाडण्याचे बंधन असणे.

**३५८.** कोणत्याही नळकारागिराला या अधिनियमाखालील कोणतेही काम निष्काळजीपणाने किंवा त्यात हयगय करून पार पाडता येणार नाही किंवा अशा कामासाठी कोणत्याही वाईट सामानाचा, उपकरणाचा किंवा खिळण्यांचा वापर करता येणार नाही.

---

१ भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " सरकार " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

२ विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

३ सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १७८ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

४ सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १५० अन्वये " प्रभारी सदस्याच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

५ सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १७९ अन्वये " आयुक्तास स्थायी समितीच्या मान्यतेने " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

६ सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १५१ अन्वये " महापौरासह परिषद " या शब्दप्रयोगाऐवजी त्याच्या व्याकरणिक फेरफारासह हा मजकूर दाखल करण्यात आला.

प्रकरण चौदा

## महानगरपालिका अग्निशामक पथक

**३५९.** (१) आग विझवण्याचे व आग लागल्यास जीवित व मालमत्ता यांचे संरक्षण करण्याचे कर्तव्य महानगरपालिकेने पार पाडण्याच्या दृष्टीने आयुक्त, त्याने कलम ७९ खाली महानगरपालिका अधिकारी, व कर्मचारी यांची वेळोवेळी जी अनुसूची तयार केली असेल तीत अग्निशामक कर्मचारी व त्यांच्यावर देखरेख ठेवण्यास पुरेसे अधिकारी, यांच्या ' महानगरपालिका अग्निशामक पथक ' या नावाने ओळखण्यात येणाऱ्या एका पथकाची तरतूद करील, तसेच तो अशा पथकास आपली कर्तव्ये कार्यक्षमरीतीने पार पाडता येण्यासाठी आवश्यक असे सर्व आगीचे बंब, आगीपासून बचाव करण्याची साधने, पाण्याचा मारा करण्यासाठी नळ्या, सरंजाम, हत्यारे, उपकरणे आणि परस्पर दळणवळणाची साधने पुरवील. अग्निशामक कर्मचारी व आवश्यक ते आगीचे बंब वगैरे ठेवणे.

(२) एखाद्या व्यक्तीची, ती जे कोणतेही इतर अधिकारपद धारण करीत असेल किंवा नोकरी करीत असेल त्याच्या भरीला अग्निशामक पथकाचा सदस्य म्हणून नेमणूक करता येईल.

**३६०.** आयुक्त वेळोवेळी पुढील गोष्टींसाठी विनियम करील :— अग्निशामक पथकासाठी विनियम करण्याचा अधिकार.

(अ) अग्निशामक पथकातील व्यक्तीचे प्रशिक्षण, शिस्त व चांगली वर्तणूक ;

(ब) आग लागल्याची कोणतीही सूचना मिळाली असता त्यांनी आगीचे बंब, आगीपासून बचाव करण्याची साधने व सर्व आवश्यक साधने यांसह, त्वरेने हजर राहणे ;

(क) उक्त अग्निशामक पथक सर्वसाधारणतः उचित कार्यक्षम स्थितीत ठेवणे.

**३६१.** [१][(१)] आग लागली असता अग्निशामक पथकाच्या प्रभारी मुख्य किंवा इतर अधिकाऱ्यास, आयुक्त याबाबत वेळोवेळी देईल अशा आदेशांच्या अधीनतेने हजर असलेले सर्व महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी आणि त्याच्या हाताखाली स्वेच्छेने काम करण्यास तयार होतील अशा कोणत्याही इतर व्यक्ती यांना आपल्या अधिपत्याखाली घेता येईल, तसेच त्यास पुढील गोष्टी करता येतील :— अग्निशामक पथकाच्या मुख्य अधिकाऱ्याने आगीच्या जागी वापरावयाचे अधिकार.

(अ) अग्निशामक पथकाच्या कामात आपल्या अस्तित्वाने ज्या व्यक्ती अडथळा आणीत असतील अशा कोणत्याही व्यक्तींना घालवून देणे, किंवा त्यांच्या अधिपत्याखाली कोणताही अग्निशामक सेवक किंवा इतर अधिकारी, किंवा व्यक्ती यास अशा व्यक्तींना घालवून लावण्याचे आदेश देणे ;

(ब) अशी आग विझवण्याच्या प्रयोजनाकरिता, शक्य तितके कमी नुकसान होईल अशा रीतीने कोणत्याही परिवास्तूमध्ये किंवा परिवास्तूमधून घुसणे किंवा ताबा घेणे किंवा ती पाडून टाकणे यासंबंधीचा अधिकार एकतर स्वतः किंवा आपल्या अधिपत्याखालील व्यक्तीकरवी चालविणे यासह, जीवित व मालमत्ता यांचे संरक्षण करण्यासाठी इष्ट वाटतील असे कोणतेही उपाय सर्वसाधारणपणे योजणे ;

(क) ज्या भागात आग लागली असेल त्या भागात पाण्याचा अधिक पुरवठा व्हावा व त्या विभागातील पाण्याचा दाब वाढावा म्हणून कोणत्याही भागातील मुख्य नळातील व इतर नळातील पाणी बंद करविणे आणि अशी आग विझविण्याच्या प्रयोजनाकरिता उपलब्ध असलेल्या कोणत्याही विहिरीचे किंवा तलावाचे पाणी वापरणे.

[१][(२) पोट-कलम (१), खंड (ब) अन्वये दिलेल्या अधिकारामध्ये मुंबई बंदराच्या गोदी विभागातील कोणत्याही जलयानात प्रवेश करण्याच्या अधिकाराचा समावेश होईल.]

---

[१] सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ९ अन्वये आणि सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम (२) अन्वये कलम ३६१ ला त्या कलमाचे पोट-कलम (१) असा फेरक्रमांक देण्यात आला व पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात आले.

पोलीस व महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांनी अग्निशामक पथकास सहाय्य करणे.

**३६२.** अग्निशामक पथकास, त्यांची कर्तव्ये पार पाडण्याच्या कामी सहाय्य करणे हे सर्व पोलीस अधिकारी व सर्व महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांचे कर्तव्य असेल. तसेच ज्या कोणत्याही सडकेत किंवा सडकेजवळ आग लागली असेल अशी सडक त्यांना बंद करता येईल आणि आपल्या उपस्थितीमुळे अग्निशामक पथकाच्या कार्यात ज्या व्यक्ती अडथळा आणतील त्यांना घालवता येईल.

अग्निशामक पथकाकडून झालेले नुकसान हे आगीमुळे झालेले नुकसान आहे असे मानणे.

**३६३.** अग्निशामक पथकाकडून आपली कर्तव्ये योग्य रीतीने बजावीत असताना झालेले कोणतेही नुकसान किंवा अग्निशामक पथकास सहाय्य करणाऱ्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्याकडून किंवा महानगरपालिका अधिकाऱ्याकडून किंवा कर्मचाऱ्याकडून झालेले कोणतेही नुकसान हे आगविषयक कोणत्याही विमापत्राच्या अर्थानुसार आगीमुळे झालेले नुकसान आहे, असे मानले जाईल.

आगीसंबंधी प्रतिवृत्त सादर करणे.

**३६४.** शहरात लागलेल्या प्रत्येक आगीचे प्रतिवृत्त अग्निशामक पथकाचा प्रभारी असलेला मुख्य किंवा इतर अधिकारी आग लागल्यानंतरच्या पुढील दिवसापेक्षा अधिक उशीर न करता आयुक्तास सादर करील व आयुक्त, जी कोणतीही आणखी चौकशी करणे त्यास आवश्यक वाटेल ती करील; तसेच तो शहरात लागलेल्या सर्व आगीचे एक साप्ताहिक विवरणपत्र [१][स्थायी समितीस] सादर करील.

प्रकरण पंधरा

## स्वच्छताविषयक तरतुदी

### मेहतरकाम व साफसफाई.

रस्ते स्वच्छ करणे व कचरा काढून नेणे यांसाठी आयुक्ताने तरतूद करणे.

**३६५.** सर्व सडका व परिवास्तू यांची झाडलोट करण्याचे व त्या स्वच्छ करण्याचे काम कार्यक्षमरीतीने होण्याच्या प्रयोजनाकरिता आयुक्त पुढील गोष्टींबाबत उपाययोजना करील :—

(अ) [२][बृहन्मुंबई] तील सर्व सडकांचे पृष्ठभाग दररोज स्वच्छ करणे, त्यावरील केरकचरा काढून टाकणे ;

(ब) सर्व कुंडांतील व आगारांतील आणि कलम ३६७ किंवा ३६८ यात विनिर्दिष्ट केलेल्या पदार्थांपैकी कोणतेही पदार्थ तात्पुरते ठेवण्यासाठी उक्त कलमान्वये त्याने तरतूद केलेल्या किंवा नेमलेल्या सर्व जागांत साचलेला कचरा काढून नेणे.

केरकचरा वगैरे महानगरपालिकेची मालमत्ता असणे.

**३६६.** निकटपूर्वीचे कलम व कलम ३६९ यांना अनुसरून महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी व कंत्राटदारांनी गोळा केलेले सर्व पदार्थ [३][आणि कलम ३६७ खाली कोणत्याही सार्वजनिक कुंडात, आगारात किंवा जागेत ठेवलेली जनावरांची मढी] ही महानगरपालिकेची मालमत्ता असेल.

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १५२ अन्वये " महापौरासह परिषदेस " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४ (१) अन्वये "ग्रेटर बॉम्बे" या मजकुराऐवजी "बृहन्मुंबई" हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

**३६७.** [१][* * * * पुढील गोष्टी तात्पुरत्या ठेवण्यासाठी किंवा त्यांची अंतिमरीत्या विल्हेवाट लावण्यासाठी आयुक्त, सोईस्कर जागी सार्वजनिक कुंड, आगारे व जागा यांची तरतूद करील किंवा त्या नेमून देईल :— केरकचरा वगैरे टाकण्यासाठी कुंड, आगारे व जागा यांची तरतूद करणे व ती नेमून देणे.

(अ) धूळ, राख, कचरा व केर ;

[२][(ब) व्यवसायविशिष्ट कचरा ;]

[३][(क)] जनावरांची मढी आणि मलमूत्र व प्रदूषित पदार्थ ;

[१]* * परंतु,—

[४][(एक)] महानगरपालिकेच्या मंजुरीवाचून उक्त पदार्थाची, ज्या कोणत्याही जागेत किंवा ज्या कोणत्याही रीतीने आतापर्यंत विल्हेवाट लावण्यात आलेली नसेल अशा जागेत किंवा अशा रीतीने त्याची अंतिमरीत्या विल्हेवाट लावणार नाही अथवा जी कोणतीही जागा किंवा रीत नामंजूर करणे [५][[६][राज्य] शासनास] योग्य वाटेल अशा जागेत किंवा अशा रीतीने त्याची अंतिमरीत्या विल्हेवाट लावणार नाही.

[४][(दोन)] या कलमान्वये प्रदान करण्यात आलेला कोणताही अधिकार हा, शक्य तितका कमी उपद्रव होईल अशा रीतीने वापरला जाईल.

[७][**३६८.** (१) सर्व परिवास्तूंच्या मालकांनी व भोगवटादारांनी आपापल्या परिवास्तूंतील सर्व धूळ, राख, कचरा, केर व व्यवसायविशिष्ट कचरा गोळा करण्याची तजवीज करणे आणि तो आयुक्त नोटिशीअन्वये वेळोवेळी विहित करील अशा वेळी तात्पुरता टाकण्याकरिता किंवा त्याची अंतिम विल्हेवाट लावण्याकरिता निकटपूर्वीच्या कलमाखाली तरतूद करण्यात आलेल्या किंवा नेमून देण्यात आलेल्या सार्वजनिक कुंडात किंवा आगारात किंवा इतर जागेत टाकणे हे त्यांचे अवश्यकर्तव्य असेल. मालकांचे व भोगवटादारांचे, धूळ वगैरे गोळा करणे व ती टाकणे यांसंबंधीचे कर्तव्य.

(२) [८][***] आयुक्तास, जर योग्य वाटेल तर, लेखी नोटिशीअन्वये कोणत्याही परिवास्तूच्या भोगवटादारास व तिच्या मालकास किंवा त्यांच्यापैकी कोणासही दररोज किंवा इतर प्रकारे मुदतीमुदतीने, उक्त परिवास्तूतील सर्व धूळ, राख, केरकचरा किंवा—पण व्यवसायविशिष्ट कचरा नव्हे—गोळा करविण्यास आणि उक्त परिवास्तूचा भाग असलेली जी कोणतीही जागा आयुक्त याबाबत नेमील त्या जागेत तात्पुरता टाकण्याची तजवीज करण्यास फर्मावता येईल आणि वस्तू गोळा करणे व टाकणे हे उक्त भोगवटादाराचे व मालकाचे किंवा त्यापैकी कोणाही एकाचे अवश्यकर्तव्य असेल.

(३) सर्व परिवास्तूंच्या मालकांनी, अशा परिवास्तूतील धूळ, राख, केरकचरा व व्यवसायविशिष्ट कचरा कुंडात गोळा करण्यासाठी, आयुक्ताने विहित करावयाच्या आकाराच्या कुंडांची तरतूद करणे हे त्यांचे अवश्यकर्तव्य असेल. असे कुंड सर्व वेळी चांगल्या प्रकारे दुरुस्त स्थितीत ठेवण्यात येतील आणि ते, आयुक्त, लेखी नोटिशीअन्वये वेळोवेळी विनिर्दिष्ट करील अशा संख्येत तो विनिर्दिष्ट करील अशा जागी व अशा स्थितीत ठेवण्यात येतील.

---

[१] सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम २० (१) अन्वये (१) व (२) हे आकडे वगळण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २०(२) अन्वये हा नवीन खंड (ब) समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २०(३) अन्वये जुना खंड (ब) ला (क) असा फेरक्रमांक देण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २०(४) अन्वये जुने खंड (क) व (ड) यांना (एक) आणि (दोन) असे फेरक्रमांक देण्यात आले.

[५] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याअन्वये " शासन " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] विधि अनुकूलन आदेश, १९५० याअन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[७] सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम २१ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम ३६८ दाखल करण्यात आले.

[८] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १८२ (१) अन्वये " परंतु " हा शब्द वगळण्यात आला.

(४) या कलमाची पोट-कलमे (१) व (२) याअन्वये आवश्यक असलेल्या गोष्टी करण्याकरिता व त्यांचे अनुपालन करण्याकरिता कर्मचारी कामावर ठेवण्यास आयुक्त लेखी नोटिशीअन्वये फर्मावील तेव्हा तसे करणे हेदेखील सर्व परिवास्तूंच्या मालकांचे व भोगवटादारांचे किंवा त्यापैकी प्रत्येकाचे अवश्यकर्तव्य असेल.]

[१][(५) या कलमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, उदिमाच्या प्रत्येक परिवास्तूतून दररोज किंवा ठराविक कालांतराने गोळा करण्यात येणारा व्यवसायविशिष्ट कचरा आयुक्ताने या संबंधात नेमून दिलेल्या कोणत्याही जागेवर तात्पुरता टाकण्याची परवानगी आयुक्तांकडे मागणे अशा परिवास्तूंच्या प्रत्येक मालकावर किंवा भोगवटादारावर बंधनकारक असेल.

आयुक्त अशी परवानगी देईल त्यावेळी पोट-कलम (२) अन्वये नेमून देण्यात आलेल्या जागेवर व्यवसायविशिष्ट कचरा टाकण्यासाठी आयुक्त वेळोवेळी निश्चित करील असे आकार आणि उक्त व्यवसायविशिष्ट कचऱ्याची अखेरची विल्हेवाट लावण्यासाठी कलम ३६७ अन्वये तरतूद केलेल्या अथवा नेमून दिलेल्या ठिकाणापर्यंत असा व्यवसायविशिष्ट कचरा वाहून नेण्यासाठी व तेथे टाकण्यासाठी आयुक्त वेळोवेळी निश्चित करील असे आकारदेखील, भरल्यानंतर अर्जदाराला त्याप्रमाणे व्यावसायविशिष्ट कचरा टाकण्याची मुभा देण्यात येईल :

परंतु, कोणत्याही उदिमाच्या परिवास्तूचा मालक किंवा भोगवटादार, आयुक्ताने या कलमाच्या पोट-कलम (२) अन्वये नेमून दिलेल्या जागा किंवा यथास्थिति, आयुक्ताने कलम ३६७ अन्वये तरतूद केलेल्या अथवा नेमून दिलेल्या जागा यांव्यतिरिक्त इतर कोणत्याही जागी व्यवसायविशिष्ट कचरा टाकणार नाही.]

मलमूत्र व प्रदूषित पदार्थ गोळा करणे, वगैरे साठी आयुक्तास तरतूद करता येईल.

**३६९.** [२][बृहन्मुंबई] च्या विवक्षित भागांशात संडास,मुत्र्या व मलकुंड्या यांतील सर्व मलमूत्र व प्रदूषित पदार्थ महानगरपालिका अभिकरणाने गोळा करण्यासाठी, ते काढून नेण्यासाठी व त्यांची विल्हेवाट लावण्यासाठी तरतूद करण्याविषयीच्या आपल्या इराद्याची कलम १४२, खंड (अ) खाली आयुक्ताने, जाहीर नोटीस दिली असेल तेव्हा असे पदार्थ [२][बृहन्मुंबई] च्या उक्त भागांशात असलेल्या सर्व परिवास्तूंतून दररोज गोळा करण्यासाठी, काढून नेण्यासाठी व त्यांची विल्हेवाट लावण्यासाठी आयुक्तास उपाययोजना करता येईल व त्याने तसे करणे विधिसंमत असेल.

मलमूत्र व प्रदूषित पदार्थ गोळा करणे व काढून नेणे याबाबत भोगवटादाराने केव्हा तरतूद करावयाची.

**३७०.** शहराच्या ज्या कोणत्याही भागांशासाठी आयुक्ताने कलम १४२, खंड (अ) खाली जाहीर नोटीस दिलेली नसेल त्या भागांशात असलेल्या आणि ज्यामधील जलधौत संडास किंवा संडास महानगरपालिका नालीशी जोडलेला नसेल त्या परिवास्तूच्या भोगवटादाराने, त्याच्या परिवास्तूवर जमा होणारे सर्व मलमूत्र व प्रदूषित पदार्थ गोळा करविणे आणि कलम ३६७, खंड (ब) खाली या प्रयोजनासाठी तरतूद करण्यात आलेल्या सर्वांत जवळच्या कुंडात किंवा आगारात आयुक्त, जाहीर नोटिशीअन्वये वेळोवेळी विहित करील अशा वेळी, अशा वाहनातून किंवा पात्रातून, अशा मार्गाने व अशी खबरदारी घेऊन वाहून नेण्याची व्यवस्था करणे, हे त्याचे अवश्यकर्तव्य असेल.

आयुक्ताच्या परवानगीवाचून विवक्षित बाबतीत हलालखोरांची कर्तव्ये खाजगी व्यक्तींना पार पाडता येणार नाहीत.

**३७१.** [२][बृहन्मुंबई] च्या कोणत्याही भागांशात आयुक्ताने कलम १४२, खंड (अ) खाली जाहीर नोटीस दिलेली असेल अशा भागांशात आणि ज्या कोणत्याही परिवास्तूत त्या जेथे जेथे असतील तेथे तेथे महानगरपालिका नालीशी जोडलेला जलधौत संडास किंवा शौचकूप असेल, त्या भागांशात, आयुक्ताने किंवा त्याच्या वतीने जिला कामावर ठेवलेले नाही अशा कोणत्याही व्यक्तीने आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून, हलालखोरांच्या कर्तव्यांपैकी कोणतेही कर्तव्य करणे, हे विधिसंमत असणार नाही.

---

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १८२(२) अन्वये पोट-कलम (५) ऐवजी हे पोट-कलम दाखल करण्यात आले.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४ (१) अन्वये "ग्रेटर बॉम्बे" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

**३७२.** कोणतीही व्यक्ती,— 

कचरा, वगैरे काढून टाकण्यास आबद्ध असताना तसे करण्यात कसूर करण्यास मनाई.

(अ) जी व्यक्ती धूळ, राख, कचरा [१][केर आणि व्यवसायविशिष्ट कचरा] किंवा मलमूत्र अथवा प्रदूषित पदार्थ काढून नेण्याची व्यवस्था करण्यास कलम ३६८ किंवा कलम ३७० खाली आबद्ध असेल अशी व्यक्ती, ते पदार्थ आपल्या परिवास्तूवर, चोवीस तासांपेक्षा अधिक वेळ साचू देणार नाही किंवा त्या प्रयोजनासाठी तरतूद केलेल्या किंवा नेमलेल्या कचरा साठवण्याच्या आगारात, कुंडात किंवा जागेत, त्या वस्तू काढून नेण्याची व्यवस्था करण्यात हयगय करणार नाही ;

आदेशांविरुद्ध किंवा योग्य सावधगिरी न घेता कचरा वगैरे काढून नेणे.

(ब) कलम ३६८ खाली त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही जाहीर किंवा लेखी नोटिशीत फर्मावण्यात आलेल्या गोष्टींचे पालन करून नव्हे तर अन्यथा कोणतीही धूळ, राख, कचरा, [१][केर किंवा व्यवसायविशिष्ट कचरा] किंवा कोणतेही मलमूत्र किंवा कोणतेही प्रदूषित पदार्थ काढून नेणार नाही किंवा कोणतेही मलमूत्र किंवा प्रदूषित पदार्थ वाहून नेण्यासाठी, ज्या वाहनातील किंवा पात्रातील आतील पदार्थांचा भागांश सांडण्यास किंवा त्यापासून दुर्गंधी पसरण्यास प्रतिबंध करण्यासाठी योग्य असे आच्छादन नसेल असे कोणतेही वाहन किंवा पात्र वापरणार नाही ;

कचरा, वगैरे काढून नेताना जो कचरा पडेल तो काढून टाकण्यात कसूर करणे.

(क) कोणतीही धूळ, राख, कचरा, [१][केर किंवा व्यवसायविशिष्ट कचरा] किंवा कोणतेही मलमूत्र किंवा प्रदूषित पदार्थ काढून नेत असताना ज्या कोणत्याही सडकेवर असे मलमूत्र किंवा प्रदूषित पदार्थ वगैरेचा कोणताही भागांश पडेल तो ताबडतोब पूर्णपणे झाडण्यात व साफ करण्यात आणि तो केरकचरा पूर्णपणे काढून नेण्यास कसूर करणार नाही ;

आवश्यकता नसताना गदळीच्या गाड्या, वगैरे सडकांवर सोडणे.

(ड) मलमूत्र किंवा प्रदूषित पदार्थ काढून नेण्यासाठी कोणत्याही सडकेत कोणतेही वाहन किंवा पात्र ठेवणार किंवा उभे करणार नाही किंवा वाजवी रीतीने आवश्यक असेल त्यापेक्षा अधिक वेळ कोणत्याही सडकेत राहू देणार नाही ;

कचरा, वगैरे टाकण्यासाठी किंवा तो ठेवण्यासाठी नेमून न दिलेल्या जागी तो टाकणे किंवा फेकणे.

(ई) कोणत्याही सडकेवर किंवा या प्रयोजनाकरिता कलम ३६७ किंवा ३६८ खाली तरतूद करण्यात न आलेल्या किंवा नेमण्यात न आलेल्या कोणत्याही जागेत कोणतीही धूळ, राख, कचरा, [१][केर किंवा व्यवसायविशिष्ट कचरा] किंवा कोणतेही मलमूत्र किंवा प्रदूषित पदार्थ टाकणार किंवा ठेवणार नाही ;

---

[१] सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम २२ अन्वये 'आणि केर' या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

कोणत्याही परिवास्तूतून गदळ वाहू देणे किंवा झिरपू देणे आणि उपद्रव होईल अशा रीतीने कोणतीही वस्तू त्या परिवास्तूवर ठेवणे.

(फ) जी व्यक्ती, कोणत्याही इमारतीची किंवा जमिनीची मालक किंवा भोगवटादार असेल अशी व्यक्ती, त्या इमारतीतून किंवा जमिनीतून कोणतीही गदळ वाहू, झिरपू किंवा टाकू देणार नाही किंवा कोणत्याही व्यक्तीस उपद्रव होईल अशा रीतीने कोणतीही वस्तू त्यात किंवा त्यावर ठेवणार किंवा ठेवू देणार नाही किंवा त्याच्या परिवास्तूतील गदळ किंवा केर टाकण्यासाठी असलेले संडासातील कुंड किंवा इतर कुंड किंवा इतर जागा ही घृणास्पद किंवा आरोग्यास अपायकारक होईल अशा स्थितीत हयगयीने ठेवणार नाही ;

[1][(ग) कोणत्याही मेलेल्या जनावराचे कातडे किंवा मढे या प्रयोजनांसाठी कलम ३६७ खाली तरतूद केलेली नसेल किंवा नेमून दिलेली नसेल अशा जागी कोणतीही व्यक्ती ठेवणार किंवा अन्य प्रकारे टाकणार नाही.]

कलम ३७२, खंड (ई) खालील अपराध कोणी केला हे गृहीत धरण्याबाबत.

**३७३.** निकटपूर्ववर्ती कलमाचा खंड (ई) याचे उल्लंघन करून कोणत्याही इमारतीतून किंवा जमिनीतून कोणत्याही सडकेवर किंवा जागेवर, धूळ, राख, कचरा [2][ केर किंवा व्यवसायविशिष्ट कचरा ] किंवा कोणतेही मलमूत्र किंवा प्रदूषित पदार्थ टाकण्यात किंवा ठेवण्यात आलेला आहे किंवा आलेले आहेत असे जर कोणत्याही बाबतीत दाखवण्यात येईल तर, त्याउलट सिद्ध करण्यात येईतोपर्यंत, उक्त इमारतीच्या किंवा जमिनीच्या भोगवटादाराने उक्त अपराध केलेला आहे असे गृहीत धरण्यात येईल.

## परिवास्तूंचे निरीक्षण व स्वच्छताविषयक विनियमन

स्वच्छताविषयक प्रयोजनांसाठी परिवास्तूंचे निरीक्षण करण्याचा अधिकार.

**३७४.** आयुक्तास कोणत्याही इमारतीची किंवा इतर परिवास्तूंची स्वच्छताविषयक परिस्थिती अजमावण्याच्या प्रयोजनासाठी तिचे निरीक्षण करता येईल.

कोणतीही इमारत स्वच्छ करण्यास व तिला चुना लावण्यास फर्मावता येईल.

**३७५.** जर स्वच्छतेच्या प्रयोजनासाठी तसे करणे आयुक्ताला आवश्यक वाटत असेल तर, त्यास, याप्रमाणे निरीक्षण केलेल्या इमारतीच्या मालकास किंवा तिच्या भोगवटादारास लेखी नोटीस देऊन, अशा इमारतीला किंवा तिच्या काही भागांशाला एक तर बाहेरून किंवा आतून अथवा दोहोंकडून चुना लावण्याची तजवीज करण्यास किंवा इतर रीतीने स्वच्छ करण्याची तजवीज करण्यास फर्माविता येईल.

---

[1] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ६ अन्वये खंड (ग) जादा दाखल करण्यात आला.
[2] सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम २३ अन्वये 'किंवा केर' या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][**३७५अ.** आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून कोणत्याही परिवास्तूत किंवा परिवास्तूवर कोणतेही कौले, दगड, फळ्या, इमारती सामान किंवा इमारती सामानाचे अवशेष हे, घुशी किंवा इतर जीवजंतूचे आश्रयस्थान होईल किंवा अन्यथा त्यांचे पैदासस्थान होईल किंवा उक्त जागेच्या भोगवटादारांना किंवा जवळ राहणाऱ्या व्यक्तींना धोका किंवा उपद्रव पोहोचेल अशा परिमाणात किंवा प्रमाणात किंवा अशा रीतीने साठविलेले किंवा जमवून ठेवलेले आहेत असे आयुक्तास आढळून येईल तर, तो लेखी नोटिशीअन्वये, अशा परिवास्तूच्या मालकास ती याप्रमाणे साठविलेल्या किंवा गोळा केलेल्या सामानाच्या किंवा अवशेषाच्या मालकास ती काढून नेण्यास किंवा त्याची विल्हेवाट लावण्यास किंवा असा उपद्रव नाहीसा करण्यासाठी किंवा त्याचा पुनरुद्‌भव होऊ नये म्हणून आयुक्ताच्या मते त्या सामानाची जी व्यवस्था करणे आवश्यक व इष्ट असेल ती करण्यास फर्मावू शकेल.] कोणत्याही परिवास्तूतून इमारती सामान काढून नेण्यास फर्माविता येईल.

**३७६.** जर कोणतीही परिवास्तू ही, ती सोडून दिल्यामुळे किंवा भोगवट्यात नसल्यामुळे बेबंद लोकांच्या राबत्याची जागा होईल किंवा आयुक्ताच्या मते उपद्रवकारक होईल तर, आयुक्त, त्यास आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, अशा परिवास्तूचा मालक माहीत असेल आणि [२][बृहन्मुंबई] त राहत असेल तर, त्यास किंवा जी कोणतीही व्यक्ती मालक असल्याचा दावा सांगणारी म्हणून माहीत असेल किंवा समजण्यात येत असेल व ती जर [२][बृहन्मुंबई] त राहत असेल तर, अशा व्यक्तीस, लेखी नोटीस देऊ शकेल व उक्त नोटिशीची एक प्रत उक्त जागेच्या ठळक भागी लावील व तिच्याद्वारे, त्या जागेत मालमत्तेचा कोणताही हक्क किंवा हितसंबंध असलेल्या सर्व व्यक्तींना, उक्त परिवास्तू पूर्वोक्त लोकांनी वापरण्यास किंवा ती उपद्रवकारक राहण्यास प्रतिबंध करण्याकरिता आयुक्ताच्या मते, आवश्यक असेल अशी तिच्यासंबंधी व्यवस्था करण्यास फर्माविता येईल. सोडून दिलेल्या किंवा भोगवट्यात नसलेल्या परिवास्तू.

**३७७.** (१) कोणत्याही परिवास्तूत, निरुपयोगी व अपायकारक दाट तण माजलेले आहे किंवा ती अन्यथा अपायकारक किंवा घाणेरड्या स्थितीत आहेत किंवा तिला कुंपण घातलेले नसल्यामुळे लोक नैसर्गिक क्रिया करण्याकरिता तिचा उपयोग करीत आहेत किंवा तिच्यामुळे जवळच्या रहिवाशांना इतर रीतीने उपद्रव होत आहे असे आयुक्तास आढळून आले, तर त्यास लेखी नोटिशीअन्वये अशा परिवास्तूच्या मालकास किंवा भोगवटादारास ती जागा साफ करण्यास, स्वच्छ करण्यास किंवा तिला कुंपण घालण्यास फर्माविता येईल किंवा [३][ स्थायी समितीच्या ] मंजुरीने, त्यास आवश्यक वाटेल अशी त्यासंबंधात इतर व्यवस्था करण्यास भोगवटादाराला फर्माविता येईल. दुर्लक्षित परिवास्तू.

[४][(१अ) कोणत्याही खाजगी सडकेत निरुपयोगी व अपायकारक दाट तण माजलेले आहे किंवा ती अन्यथा अपायकारक किंवा घाणेरड्या स्थितीत आहे असे आयुक्तास आढळून आले तर, त्यास, लेखी नोटिशीअन्वये, उक्त सडकेसमोर किंवा तिला लागून किंवा तिला भिडलेल्या परिवास्तूंच्या मालकास ती साफ करण्यास किंवा स्वच्छ करण्यास फर्माविता किंवा [५][स्थायी समितीच्या ] मंजुरीने त्यास आवश्यक वाटेल अशी त्यासंबंधी इतर व्यवस्था करण्यास फर्माविता येईलः दुर्लक्षित खाजगी सडका.

परंतु, यातील कोणत्याही तरतुदींमुळे कलम ३६५ च्या तरतुदींस बाध येणार नाही : ]

(२) परंतु, वर सांगितल्याप्रमाणे अशा परिवास्तूची [६][किंवा अशा सडकेची ] अपायकारक किंवा घाणेरडी स्थिती किंवा त्यापासून होणारा उपद्रव हा महानगरपालिका नाल्या किंवा त्यांच्याशी जोडलेली उपसाधने यांमधून घाण वाहत असल्यामुळे किंवा त्यात कोणताही दोष असल्यामुळे होत असेल तर, तेथवर अशी परिवास्तू [६][ किंवा अशी सडक ] साफ करणे हे आयुक्ताचे अवश्य कर्तव्य असेल.

---

[१] सन १९१६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम ८ अन्वये कलम ३७५अ समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४(१) अन्वये "ग्रेटर बॉम्बे" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १५३(अ) अन्वये " प्रभारी सदस्याच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९१६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम ९(अ) अन्वये पोट-कलम (१अ) जादा दाखल करण्यात आले.

[५] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १५३(ब) अन्वये " प्रभारी सदस्याच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९१६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम ९(ब) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

सदोष छपरापासून होणारा उपद्रव.

[1][ **३७७अ.** (१) जर आयुक्ताला असे आढळून येईल की, कोणतीही इमारत किंवा इमारतीचा कोणताही भाग हा, तिच्या छपरातून किंवा तिच्या छपराच्या कोणत्याही भागातून पावसाचे पाणी गळत असल्यामुळे उपद्रव होत आहे किंवा उपद्रव होण्याचा संभव आहे अशा स्थितीत आहे, तर आयुक्तास लेखी नोटिशीअन्वये, अशा इमारतीच्या मालकास, नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा अवधीत तिच्यात विनिर्दिष्ट करण्यात येतील अशा उपाययोजना व अशी कामे करून उपद्रवाचा उपशम करण्यास किंवा तो पुन्हा होऊ न देण्याचा बंदोबस्त करण्यास फर्मावता येईल.

(२) असा उपद्रव पुन्हा होईल असे जर त्यानंतर कोणत्याही वेळी आयुक्ताचे मत होईल तर, त्यास, इमारतीच्या मालकाने पोट-कलम (१) खाली मूळचा उपद्रव बंद केलेला असला तरीही, उक्त मालकास आणखी नोटीस देऊन पुन्हा होण्याचा संभव असलेला उपद्रव नोटिशीत विनिर्दिष्ट केलेल्या अवधीत व विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने नाहीसा करण्यास त्यास फर्मावता येईल.

(३) ज्याच्या कृत्यामुळे किंवा कसुरीमुळे किंवा ज्याने खपवून घेतल्यामुळे असा उपद्रव उद्‌भवलेला असेल किंवा चालू राहिला असेल अशा इमारतीचा मालक माहीत नसेल किंवा सापडत नसेल तर आयुक्तास, असा उपद्रव नाहीसा करण्यासाठी किंवा तो पुन्हा होऊ न देण्यासाठी त्याच्या मते आवश्यक असतील असे उपाय योजण्याचा किंवा असे काम किंवा अशा गोष्टी करवून घेता येतील.]

[2][ (४) इमारतीचा मालक पोट-कलम (१) किंवा पोट-कलम (२) खालील, उपद्रवाचा उपशम करण्यास किंवा तो पुन्हा होण्याचा किंवा पुन्हा होण्याच्या शक्यतेचा बंदोबस्त करण्यास त्याला फर्मावणाऱ्या कोणत्याही नोटिशीचे अनुपालन करण्यात कसूर करील त्या बाबतीत, हितसंबंधित भोगवटादारास किंवा भोगवटादारांना कलम ४९९ मधील तरतुदींचा अवलंब करण्याऐवजी, आवश्यक ते काम पार पाडण्यासाठी या कलमाखाली आयुक्ताची मान्यता मिळवता येईल. या प्रयोजनाकरिता, भोगवटादार, बांधकामाचे आराखडे व अंदाज यांसह, आयुक्ताकडे अर्ज सादर करतील आणि कामाची छाननी व पर्यवेक्षण यांबाबत फी म्हणून, अंदाजित परिव्ययाच्या पाच टक्क्यांइतकी रक्कम महानगरपालिकेस देतील आणि अशी रक्कम ही, मान्यता देण्यात आली नाही तरच परत करण्यात येईल. असा अर्ज आणि अशी फी मिळाल्यानंतर, आयुक्तास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर, त्याला योग्य वाटतील अशा शर्तींवर, मान्यता देता येईल. भोगवटादारांना त्यानंतर काम पार पाडण्याचा हक्क असेल. काम पूर्ण झाल्यानंतर, भोगवटादार काम पार पाडण्यासाठी त्यांना आलेला वाजवी खर्च प्रमाणित करून घेण्यासाठी, त्यांनी ठेवलेल्या प्रमाणकांसह आयुक्ताकडे हिशेब सादर करतील. पार पाडलेले काम व सादर केलेले हिशेब तपासल्यानंतर, आयुक्त, त्या कामाकरिता भोगवटादारांना आलेल्या वाजवी खर्चाची रक्कम व तिचे संविभाजन विनिर्दिष्ट करणारे प्रमाणपत्र भोगवटादारांना देईल. अशा रकमेमध्ये, कामाची छाननी आणि त्यावरील पर्यवेक्षण यासाठी महानगरपालिकेस दिलेली फी, अंतर्भूत असेल. आयुक्त, आपल्या प्रमाणपत्राची एक प्रत मालकाकडे पाठवील. त्यानंतर, भोगवटादारास याप्रमाणे प्रमाणित केलेली रक्कम, मालकाकडून वसूल करण्याचा हक्क असेल आणि त्यांच्याकडून वेळोवेळी मालकास देय होईल अशा भाड्याच्या रकमेमधून उक्त रक्कम वजा करता येईल :

परंतु, असे काम भोगवटादारांनी संयुक्तपणे पार पाडलेले असेल त्या बाबतीत, प्रत्येक भोगवटादाराने वसूल किंवा वजा करावयाची रक्कम ही, त्याच्या परिवास्तूच्या संबंधात देय असेल अशा भाड्याच्या रकमेचे, अशा रीतीने प्रमाणित केलेल्या रकमेशी जे प्रमाण असेल त्याच प्रमाणात असेल.

---

[1] सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम २४ अन्वये कलम ३७७अ हे जादा दाखल करण्यात आले.

[2] सन १९७१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३५, कलम २ अन्वये पोट-कलमे (४) व (५) जादा दाखल करण्यात आली.

(५) पोट-कलम (४) खाली आयुक्ताने दिलेल्या कोणत्याही प्रमाणपत्रात विनिर्दिष्ट केलेली रक्कम इमारतीतील सर्व भोगवटादारांनी तीन महिन्यांच्या कालावधीसाठी देय असेल अशा भाड्याच्या रकमेपेक्षा अधिक होणार नाही त्याबाबतीत, याप्रमाणे प्रमाणित करण्यात आलेली रक्कम आणि तिचे संविभाजन हे, सर्व प्रयोजनांसाठी अंतिम असेल आणि ते मालकास व भोगवटादारांवर बंधनकारक असेल. इतर कोणत्याही बाबतीत विवाद निर्माण झाल्यास, उक्त रक्कम किंवा तिचे संविभाजन हे, कलम ५०४ च्या तरतुदींअनुसार निर्धारित करण्यात येईल.]

मानवी निवासास अयोग्य अशा इमारती किंवा इमारतीतील खोल्या.

[1][ **३७८.** (१) जर, कोणत्याही कारणावरून, आयुक्ताला असे आढळून येईल की, राहण्यासाठी योजिलेली किंवा उपयोगात आणलेली कोणतीही इमारत किंवा एखाद्या इमारतीतील कोणतीही खोली मानवी वसतीस अयोग्य आहे, तर आयुक्त, अशा इमारतीच्या मालकास किंवा तिच्या भोगवटादारास असे कारण सांगून व यथास्थिति, अशा इमारतीचा किंवा खोलीचा राहण्याची जागा म्हणून पुढे उपयोग करण्यास मनाई करण्याचा आपला इरादा दर्शवून एक लेखी नोटीस देईल आणि नोटिशीद्वारे, पूर्वोक्त मालकास किंवा भोगवटादारास अशी नोटीस मिळाल्यानंतर तीस दिवसांच्या आत कोणताही आक्षेप लेखी सादर करण्यास सांगेल आणि जर पूर्वोक्त कालावधीत अशा मालकाने किंवा भोगवटादाराने कोणताही आक्षेप घेतला नाही किंवा पूर्वोक्त कालावधीत जर अशा मालकाने किंवा भोगवटादाराने कोणताही आक्षेप घेतला असेल व तो विधिअग्राह्य किंवा अपुरा असल्याचे आयुक्तास वाटत असेल तर, त्यास, [2][स्थायी समितीच्या] पूर्वमान्यतेने लेखी आदेशान्वये अशा इमारतीचा किंवा खोलीचा, राहण्याची जागा म्हणून पुढे उपयोग करण्यास मनाई करता येईल :

परंतु, अशी मान्यता देण्यात येईल त्यापूर्वी पूर्वोक्त मालकास किंवा भोगवटादारास [2][स्थायी समितीपुढे] जातीने किंवा अभिकर्त्यामार्फत हजर राहण्याचा आणि अशी मंजुरी का देण्यात येऊ नये याबद्दल कारण दाखवण्याचा हक्क असेल.

(२) जेव्हा पूर्वोक्तप्रमाणे कोणतीही मनाई करण्यात आली असेल तेव्हा, आयुक्त, यथास्थिति, अशा इमारतीच्या किंवा खोलीच्या दारावर किंवा कोणत्याही ठळक भागी अशा मनाईची नोटीस लावील व मा. व. अ. (मानवी वस्तीस अयोग्य) ही अक्षरे रंगाने लिहिण्याची व्यवस्था करील आणि आयुक्त, यथास्थिति, जशी इमारत किंवा खोली मानवी वसतीस योग्य करण्यात आली आहे असे लेखी प्रमाणपत्र देईतोपर्यंत अशा इमारतीचा किंवा खोलीचा कोणताही मालक किंवा भोगवटादार ती मानवी वसतीस उपयोगात आणणार नाही किंवा दुसऱ्या कोणास तिचा मानवी वसतीसाठी उपयोग करून देणार नाही.

[3][(३) आयुक्ताने इमारतीचा किंवा खोलीचा, राहण्याची जागा म्हणून पुढे उपयोग करण्यास मनाई केली असेल तेव्हा, अशा इमारतीचा/चे किंवा खोलीचा/चे मालक उपद्रव टाळण्यासाठी आवश्यक असेल तेथवर, इमारत किंवा खोली किंवा खोल्या स्वच्छ व राहण्यास योग्य अशा ठेवतील.]]

अस्वच्छ इमारतींची दुरुस्ती करावयास फर्मावण्याचा अधिकार.

[4][**३७८अ.** (१) जर आयुक्ताला असे आढळून येईल की, राहण्याची जागा म्हणून योजिलेली किंवा उपयोगात आणलेली कोणतीही इमारत कोणत्याही प्रकारे मानवी वसतीस अयोग्य आहे आणि कलम ३७८ड खाली केलेल्या विनियमांना धरून नाही तर, आयुक्तास लेखी नोटिशीअन्वये इमारतीच्या मालकास नोटिशीत विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा वाजवी अवधीत (एकवीस दिवसांपेक्षा कमी नसेल अशा) ती इमारत मानवी वसतीस ज्यायोगे योग्य होईल अशी कामे करण्यास किंवा असे फेरफार करण्यास फर्मावता येईल.

---

[1] सन १९१६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम ६ अन्वये कलम ३७८ बदली दाखल करण्यात आले.

[2] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १५४ अन्वये " प्रभारी सदस्य " या शब्दप्रयोगाऐवजी हा शब्दप्रयोग त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[3] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम २४ अन्वये पोट-कलम (३) समाविष्ट करण्यात आले.

[4] वरील अधिनियमाच्या कलम २५ अन्वये कलमे ३७८अ ते ३७८आय समाविष्ट करण्यात आलीत.

(२) या कलमाखाली इमारतीच्या मालकावर नोटीस बजावण्याच्या भरीला आयुक्तास अशा इमारतीत जमिनीचा मालक म्हणून, गहाणदार म्हणून, पट्टेदार म्हणून किंवा अन्यथा हितसंबंध असलेल्या दुसऱ्या कोणत्याही व्यक्तीस नोटिशीची प्रत देऊन तिच्यावर ती बजावता येईल.

अस्वच्छ इमारती पाडण्याचा आदेश देण्याचा अधिकार.

**३७८ब.** (१) जर आयुक्ताला असे आढळून येईल की, राहण्याची जागा म्हणून योजिलेली किंवा उपयोगात आणलेली कोणतीही इमारत मानवी वसतीत अयोग्य आहे आणि वाजवी खर्चाने अशा तऱ्हेने राहण्यास योग्य करता येण्यासारखी नाही तर, आयुक्त, इमारतीच्या भोगवटादारावर व तिच्या मालकावर किंवा मालकांवर तसेच अशा व्यक्तींची खात्री करून घेणे वाजवीरीत्या शक्य असेल तेथवर तिच्या प्रत्येक गहाणदारावर, इमारतीची स्थिती तसेच कामे पार पाडणे किंवा त्या इमारतींचा पुढे उपयोग करणे यासंबंधी जी योजना तो सादर करू इच्छित असेल त्या योजनेवर [१][स्थायी समिती] ज्यावेळी (ही वेळ नोटीस बजावल्यापासून एकवीस दिवसांहून कमी नाही अशी एखादी वेळ असेल) व ज्या जागी विचार करील त्या जागेची व वेळेची नोटीस देईल आणि ज्या व्यक्तीवर अशी नोटीस बजावली असेल अशा प्रत्येक व्यक्तीस, जेव्हा ती बाब याप्रमाणे विचारात घेतली जाईल त्यावेळी एकतर जातीने किंवा अभिकर्त्यामार्फत आपली बाजू मांडण्याचा हक्क असेल.

(२) ज्या व्यक्तीवर मागील पोट-कलमाखाली नोटीस बजावण्यात आली असेल तिचा जर कामे पार पाडण्यासंबंधी योजना सादर करण्याचा इरादा असेल तर, ती, तिच्यावर नोटीस बजावण्यात आल्याच्या तारखेपासून एकवीस दिवसांच्या आत, अशी योजना सादर करण्याच्या आपल्या इराद्याची लेखी नोटीस आयुक्ताला देईल आणि आयुक्त परवानगी देईल अशा वाजवी कालावधीत, जी कामे पार पाडण्याबाबत तिने योजना सादर केली असेल त्या कामांची एक यादी आयुक्ताला सादर करील.

(३) आयुक्तास [१][स्थायी समितीच्या] पूर्वमान्यतेने कोणत्याही मालकाकडून किंवा गहाणदाराकडून असे लेखी अभिवचन घेता येईल की, ती इमारत मानवी वसतीस योग्य करण्यासाठी आयुक्ताच्या मते जी कामे करणे आवश्यक असतील ती विनिर्दिष्ट कालावधीत तो पार पाडील किंवा ती इमारत मानवी वसतीस योग्य अशी करण्यात आली आहे अशी खात्री करून घेतल्यावर आयुक्त, [१][स्थायी समितीच्या] पूर्वमान्यतेने असे अभिवचन रद्द करीपर्यंत, ती इमारत मानवी वसतीसाठी म्हणून वापरण्यात येणार नाही.

(४) जर लगतपूर्वीच्या पोट-कलमामध्ये नमूद केल्याप्रमाणे असे कोणतेही अभिवचन आयुक्ताने स्वीकारले नाही तर, किंवा आयुक्ताने जर अभिवचन स्वीकारले असेल अशा बाबतीत, ज्या कोणत्याही कामासंबंधी अभिवचन दिले असेल ते काम विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत पार पाडण्यात आले नाही तर, किंवा अभिवचनाच्या अटींचे उल्लंघन करून कोणत्याही वेळी त्या इमारतींचा उपयोग करण्यात आला असेल तर, आयुक्त [१][स्थायी समितीच्या] पूर्वमान्यतेने इमारत पाडून टाकण्याचा आदेश देईल आणि अशा आदेशान्वये असे फर्मावील की, ती इमारत आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत—हा कालावधी आदेश ज्या तारखेपासून प्रवर्तनात येईल त्या तारखेपासून अठ्ठावीस दिवसांपेक्षा कमी असता कामा नये— रिकामी करण्यात येईल आणि तो कालावधी संपल्यानंतर सहा आठवड्यांच्या आत किंवा तो कालावधी संपण्यापूर्वी इमारत रिकामी करण्यात आली नसेल तर, ज्या तारखेस ती रिकामी करण्यात येईल त्या तारखेपासून सहा आठवड्यांच्या आत किंवा कोणत्याही बाबतीत, आयुक्ताला परिस्थितीनुसार विनिर्दिष्ट करणे योग्य वाटेल अशा अधिकतर कालावधीच्या आत, ती इमारत पाडून टाकण्यात येईल. या कलमाच्या पोट-कलम (१) खाली आयुक्ताने काढलेली नोटीस ज्या व्यक्तीवर त्या पोट-कलमाखाली बजावणे भाग असेल त्या प्रत्येक व्यक्तीवर असा आदेश त्यांची प्रत देऊन बजावण्यात येईल.

(५) या कलमाच्या प्रयोजनाकरिता इमारत वाजवी खर्चात मानवी वसतीस योग्य करता येईल किंवा कसे, हे निर्धारित करताना ती याप्रमाणे योग्य करण्याकरिता आवश्यक त्या कामाचा अंदाजे परिव्यय आणि कामे पूर्ण झाल्यानंतर त्या इमारतीचे अंदाजे जे मूल्य होईल ते मूल्य या गोष्टी विचारात घेण्यात येतील.

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १५५ अन्वये " महापौरासह परिषद " या शब्द प्रयोगाऐवजी हा शब्दप्रयोग त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

**३७८क.** (१) कलम ३७८ब खाली दिलेला इमारत पाडून टाकण्याचा आदेश प्रवर्तनात आल्यानंतर, ज्या इमारतीस तो लागू होत असेल त्या इमारतीचा/चे मालक आदेशान्वये याबाबत मर्यादा घालून दिलेल्या मुदतीत इमारत पाडून टाकील, आणि जर इमारत त्या मुदतीत पाडून टाकण्यात आली नाही तर, आयुक्त आवश्यक असल्यास, कलम ४८८अ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने इमारत रिकामी करण्यास फर्मावील व ती पाडून टाकण्याची आणि तिचे सामान विकण्याची उपाययोजना करील. इमारत पाडून टाकण्याचा आदेश देण्यात आला असेल तेव्हा अनुसरावयाची कार्यपद्धती.

(२) मागील पोट-कलमाखाली आयुक्ताला आलेला कोणताही खर्च सामान विकून आलेली रक्कम जमेस धरून, इमारतीचा/चे मालक देईल/देतील, आणि असा खर्च देण्यात आल्यानंतर आयुक्ताजवळ राहिलेली कोणतीही अधिशेष रक्कम, आयुक्त इमारतीच्या मालकास देईल किंवा एकापेक्षा अधिक मालक असतील तर ती मालक सहमत होतील त्यानुसार देण्यात येईल. अशी सहमती घडून न आल्यास ती अधिशेष रक्कम लघुवाद न्यायालयात जमा करील आणि उक्त न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश अशा मालकांमध्ये ती रक्कम ज्या प्रमाणात वाटून द्यायची ते प्रमाण ठरवील. मुख्य न्यायाधीशाचा निर्णय अंतिम असेल.

**३७८ड.** या अधिनियमाच्या प्रयोजनाकरिता, महानगरपालिकेस, वेळोवेळी मानवी वसतीस इमारत योग्य असेल तर, अशा योग्यतेचे प्रमाण ठरविण्याकरिता या अधिनियमाशी विसंगत नसतील असे विनियम करता येतील; परंतु, जेव्हा कलम ३७८अ, पोट-कलम (१) खाली दिलेल्या नोटिशीस अनुसरून कोणतीही इमारत, आयुक्ताचे समाधान होईल अशा रीतीने तिच्यात कामे व फेरफार करून मानवी वसतीस ती योग्य करण्यात आली असेल तेव्हा, अशी कामे व फेरफार पूर्ण झाल्याच्या तारखेपासून दहा वर्षांच्या कालावधीमध्ये अशा इमारतीच्या संरचनेला लागू होणाऱ्या अशा तारखेनंतर केलेल्या कोणत्याही विनियमांस अनुसरून अशी इमारत नाही याच केवळ कारणावरून ती मानवी वसतीस अयोग्य आहे, असे मानले जाणार नाही. इमारतीची योग्यता निर्धारित करण्याकरिता विनियम.

**३७८ई.** (१) आयुक्तास जी कोणतीही इमारत अडथळा आणणारी आहे असे दिसून येईल त्या इमारतीच्या मालकावर किंवा मालकांवर ती इमारत किंवा तिचा कोणताही भाग पाडून टाकण्याचा आदेश देण्याचा प्रश्न [१][स्थायी समिती] ज्या जागी व ज्या वेळी विचारात घेईल (वेळ नोटीस बजावल्यानंतर एकवीस दिवसांहून कमी नाही अशी असेल) ती वेळ व ती जागा यासंबंधी नोटीस बजावता येईल; अशा बाबींचा याप्रमाणे विचार करण्यात येईल तेव्हा, मालकास किंवा मालकांना जातीने किंवा अभिकर्त्यामार्फत आपली बाजू मांडण्याचा हक्क असेल. अडथळा आणणारी इमारत पाडून टाकण्याचा आदेश देण्याचा अधिकार.

(२) याप्रमाणे बाब विचारात घेतल्यानंतर इमारत अडथळा आणणारी आहे आणि ती इमारत किंवा तिचा कोणताही भाग पाडून टाकला पाहिजे, असे [१][स्थायी समिती] ठरवील तर, आयुक्तास, अशी इमारत किंवा तिचा असा भाग पाडून टाकण्यात यावा असे फर्मावणारा आदेश काढता येईल आणि ती इमारत किंवा तिचा जो भाग इमारत पाडून टाकण्याच्या प्रयोजनांसाठी रिकामा करणे आवश्यक असेल तो भाग, आदेश ज्या तारखेस प्रवर्तनात येईल त्या तारखेपासून दोन महिन्यांच्या आत रिकामा करावा लागेल. आयुक्ताने असा आदेश दिल्यास तो इमारतीच्या मालकावर किंवा मालकांवर त्याची प्रत देऊन बजावण्यात येईल.

(३) या कलमात " अडथळा आणणारी इमारत " म्हणजे, जी इमारत मानवी वसतीस अयोग्य नसली तरी अशा रीतीने उभी असेल की, इतर कोणत्याही इमारतीशी तिचे सान्निध्य किंवा संपर्क असल्यामुळे—

(अ) अशा इतर इमारतींचे वायुवीजन बंद होत असेल किंवा त्यास अडथळा येत असेल किंवा त्या मानवी वसतीस अयोग्य किंवा आरोग्यास धोकादायक किंवा अपायकारक होत असतील किंवा होण्यास मदत होत असेल, अथवा

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १५६ अन्वये " महापौरासह परिषद " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ब) अशा इतर इमारतींच्या बाबतीत आरोग्यास अपायकारक असलेला असा उपद्रव किंवा तक्रार करण्यात आलेल्या इतर अनिष्ट गोष्टी दूर करण्यासाठी योग्य उपाययोजना करण्यास प्रतिबंध होत असेल,

अशी इमारत.

अडथळा आणणारी इमारत पाडून टाकण्याच्या आदेशाचा परिणाम.

**३७८फ.** (१) ज्या कोणत्याही इमारतीच्या संबंधात कलम ३७८ई खाली आदेश काढण्यात आला असेल ती इमारत ज्या कालावधीमध्ये रिकामी करणे आवश्यक असेल तो कालावधी संपण्यापूर्वी ज्या कोणत्याही मालकाची किंवा मालकांची अथवा इतर व्यक्तीची किंवा व्यक्तींची त्या इमारतीतील किंवा तिच्या भागातील संपदा किंवा हितसंबंध असे असतील की ते महानगरपालिकेने संपादन केले असता, आदेशामध्ये तरतूद केलेली इमारतपाडणी अंमलात आणणे आयुक्तास शक्य होणार असेल तर, त्या मालकाने किंवा मालकांनी तो किंवा ते हितसंबंध पोट-कलम (६) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे निर्धारण करावयाच्या भरपाई इतक्या किंमतीस महानगरपालिकेला विकत देऊ करण्याचा आयुक्ताकडे प्रस्ताव केला तर, आयुक्त, कलम ९० खाली आवश्यक ती मंजुरी मिळवल्यावर प्रस्ताव स्वीकारील आणि कब्जा घेतल्यानंतर शक्य तितक्या लवकर, इमारत पाडण्याचे काम करील.

(२) पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेली किंमत देण्यात आल्यावर उक्त इमारत व तिचे ठिकाण ही तिच्यातील संपादित हितसंबंधाच्या व्याप्तीपर्यंत महानगरपालिकेमध्ये निहित होईल.

(३) जर पोट-कलम (१) मध्ये नमूद केल्याप्रमाणे विक्रीचा कोणताही प्रस्ताव उक्त कालावधी संपण्यापूर्वी करण्यात आला नाही तर, त्या कालावधीच्या शेवटच्या दिवसापासून सहा आठवड्यांचा अवधी संपण्यापूर्वी किंवा इमारत अथवा तिचा जो भाग रिकामा करणे आवश्यक असेल तो भाग त्या दिवसापर्यंत रिकामा करण्यात आला नाही तर, ज्या दिवशी तो रिकामा करण्यात येईल त्या दिवसापासून सहा आठवड्यांचा अवधी संपण्यापूर्वी किंवा यांपैकी कोणत्याही बाबतीत आयुक्तास परिस्थिती अनुसार योग्य वाटेल असा अधिक अवधी संपण्यापूर्वी आदेशान्वये तरतूद केल्याप्रमाणे इमारतीच्या मालकाचा किंवा मालक ती पाडून टाकण्याचे काम पार पाडील किंवा पाडतील आणि जर अशा रीतीने इमारत पाडून टाकण्याचे काम पार पाडण्यात आले नाही तर, आयुक्त आवश्यक असल्यास, कलम ४८८अ मध्ये तरतूद केलेल्या रीतीने ती इमारत रिकामी करण्यास भाग पाडील आणि इमारत पाडून टाकण्याचे काम पार पाडण्यासाठी व त्यापासून मिळालेल्या सामानांची विक्री करण्यासाठी उपाययोजना करील.

(४) जेव्हा कोणतीही अडथळा आणणारी इमारत किंवा तिचा कोणताही भाग पोट-कलम (३) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मालकाने किंवा मालकांनी किंवा आयुक्ताने पाडून टाकला असेल तेव्हा, आयुक्तास महानगरपालिकेच्या वतीने अशा इमारतीने किंवा तिच्या भागाने व्यापलेली व त्यास जोडून असलेली जमीन ताबडतोब कब्जात घेता येईल आणि तो, पोट-कलम (६) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे भरपाई देईल.

(५) कलम ३७८क, पोट-कलम (२) च्या तरतुदी या, आयुक्ताला पोट-कलम (३) खाली आलेल्या कोणत्याही खर्चाच्या बाबतीत तसेच आयुक्ताच्या हाती असलेल्या कोणत्याही अधिशेष रकमेच्या बाबतीत, कलम ३७८ब खाली इमारत पाडून टाकण्याविषयी दिलेल्या आदेशानुसार इमारत पाडून टाकण्यात येईल तेव्हा कोणताही खर्च किंवा अधिशेष रक्कम यांच्या बाबतीत ज्याप्रमाणे ते लागू होतात त्याप्रमाणे लागू होतील.

(६) इमारत व तिचे ठिकाण यासाठी, पोट-कलम (१) खाली कोणतीही विक्री करण्यात आल्यावर आयुक्ताने पोट-कलम (४) खाली द्यावयाची भरपाई यांची रक्कम ही, कलम ३७८ई, पोट-कलम (२) खाली इमारत पाडून टाकण्याविषयी दिलेल्या आदेशाच्या तारखेस जमिनीचे व पाडून टाकलेल्या इमारतीचे जे बाजारमूल्य असेल त्या मूल्याइतकी असेल.

**३७८ग.** (१) जेव्हा अडथळा आणणारी इमारत किंवा तिचा कोणताही भाग यासंबंधाने कलम ३७८ई खाली इमारत पाडणीच्या संबंधात आदेश देण्यात आला असेल तेव्हा, आयुक्तास, ज्या मालमत्तांमधील अशी अडथळा आणणारी इमारत किंवा तिचा भाग पाडून टाकण्याचे योजिले असेल त्या मालमत्ता [१][स्थायी समितीकडे] विनिर्दिष्ट व जाहीर करता येतील, आणि तो अशा विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रत्येक इमारतीच्या मालकावर किंवा मालकांवर अशा अर्थाची नोटीस बजावील.

अडथळा आणणारी इमारत संपादन केल्याबद्दल दिलेली भरपाई विवक्षित बाबतीत सुधारणा खर्च म्हणून वसूल करता येईल.

(२) कलम १५५ अन्वये आयुक्तास जे अधिकार देण्यात आले आहेत तेच अधिकार त्यास या कलमाखाली करावयाच्या चौकशीच्या प्रयोजनांकरिता असतील, आणि या पोट-कलमाखाली निवेदन करण्यास किंवा ते सादर करण्यात फर्माविण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती ही, भारतीय दंड संहिता, कलमे १७५ व १७६ याच्या अर्थानुसार तसे करण्यास कायद्याने बांधलेली आहे असे मानण्यात येईल.

१८६० चा ४५.

(३) आयुक्तास, मालमत्तेच्या किंमतीत वाढ झाल्याच्या बाबतीत, अशा प्रत्येक मालमत्तेसाठी या कलमाखाली विभागून दिलेली रक्कम ही अशा मालमत्तेच्या लाभासाठी झालेला सुधारणा खर्च आहे असे घोषित करता येईल आणि त्यानंतर ती रक्कम अशा मालमत्तांवरील भार म्हणून असेल व ती कलम ४९४ खाली सुधारणा खर्च म्हणून घोषित केलेला खर्च ज्या रीतीने वसूल करता येतो त्याच रीतीने वसूल करता येईल.

**३७८ह.** (१) कलम ३७८ब किंवा ३७८ई खाली दिलेल्या इमारतपाडणीच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस आदेश बजावल्याच्या तारखेनंतर एकवीस दिवसांच्या आत लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाकडे (ज्याचा उल्लेख या कलमात यापुढे " मुख्य न्यायाधीश " असा केला आहे) अपील करता येईल, आणि अपिलाचा अंतिम निर्णय करण्यात येण्यापूर्वी ज्या आदेशाविरुद्ध असे अपील करण्यात आले असेल त्या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी आयुक्ताला कोणतीही कार्यवाही करता येणार नाही :

इमारत पाडणीच्या आदेशाविरुद्ध अपील.

परंतु, ज्या परिवास्तूच्या संबंधाने आदेश देण्यात आला असेल त्या परिवास्तूचा भोगवटा, ज्याचा शिल्लक राहिलेला अवधी तीन वर्षांपेक्षा अधिक नसेल अशा पट्ट्याखाली किंवा कराराखाली एखादी व्यक्ती करीत असेल तर, त्या व्यक्तीने विनंती केली असता कोणतेही अपील दाखल करून घेतले जाणार नाही.

(२) या कलमाखाली अपील करण्यात आल्यावर मुख्य न्यायाधीशास, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे इमारत पाडणीचा आदेश कायम करण्याचा किंवा तो रद्दबातल करण्याचा किंवा त्यात फेरफार करण्याचा आदेश देता येईल ; तसेच, त्यास, योग्य वाटेल तर, अपीलकर्त्याकडून आयुक्ताने स्वीकारले असते असे कोणतेही अभिवचन स्वीकारता येईल व अशा रीतीने स्वीकारलेले कोणतेही अभिवचन हे, जणू ते कलम ३७८ब खाली आयुक्ताला दिलेले व त्याने स्वीकारले असावे त्याप्रमाणे अंमलात येईल :

परंतु, मुख्य न्यायाधीश, कलम ३७८ब, पोट-कलम (१) यात विनिर्दिष्ट केलेली नोटीस ज्या अपीलकर्त्यांवर बजावण्यात आली असेल त्याने त्या कलमाचे पोट-कलम (२) अन्वये आवश्यक असलेल्या बाबींचे अनुपालन केले नसेल तर, कोणतीही कामे पार पाडण्यासंबंधीचे अभिवचन स्वीकारणार नाही.

(३) इमारतपाडणीसंबंधीच्या ज्या आदेशाविरुद्ध अपील केले असेल तो आदेश पूर्णतः किंवा अंशतः ज्या परिवास्तूच्या संबंधात दिलेला असेल त्या परिवास्तूचे या अधिनियमाच्या तरतुदींअनुसार आयुक्ताच्या निर्धारण पुस्तकात दाखल केलेले करयोग्य मूल्य ३,००० रुपयांहून अधिक असेल तेव्हा, या कलमान्वये मुख्य न्यायाधीशाने दिलेल्या निर्णयावर उच्च न्यायालयाकडे अपील करता येईल.

१९०८ चा ५.

(४) मूळ हुकूमनाम्यासंबंधी असलेल्या दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या तरतुदी या, पोट-कलम (३) खाली केलेल्या अपिलास त्या जेथवर लागू करता येतील तेथवर, अशा अपिलास लागू होतील आणि मुख्य न्यायाधीशाकडे अर्ज केल्यानंतर केलेल्या अशा अपिलांवर उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशांची अंमलबजावणी, जणू ते उच्च न्यायालयाने स्वतः दिलेले हुकूमनामे असावेत त्याप्रमाणे करता येईल.

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १५७ अन्वये " महापौरासह परिषदेकडे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(५) मुख्य न्यायाधीशाने या कलमाखाली दिलेल्या निर्णयावर, पोट-कलम (३) खाली अपील करता येत नसेल तर, असा निर्णय अंतिम असेल.

(६) [१][मुदत अधिनियम, १९६३] यास जोडलेली अनुसूची पहिली, विभाग दुसरा याच्या प्रयोजनांकरिता पोट-कलम (३) खाली उच्च न्यायालयाकडे केलेले अपील हे, दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ खाली जिल्हा न्यायाधीशाकडे केलेले अपील आहे असे मानण्यात येईल. १९६३ चा ३६. १९०८ चा ५.

(७) ज्या कोणत्याही आदेशाविरुद्ध या कलमाखाली अपील करता येत असेल त्याविरुद्ध कोणतेही अपील करण्यात आले नसेल तर, असा आदेश पोट-कलम (१) मध्ये नमूद केलेल्या एकवीस दिवसांचा कालावधी संपल्यावर अंमलात येईल आणि असा आदेश हा, अपिलात उपस्थित करता आला असता अशा कोणत्याही बाबींच्या संबंधात अंतिम व निर्णायक असेल ; तसेच ज्याच्याविरुद्ध अपील करण्यात आले असेल असा कोणताही आदेश, मुख्य न्यायाधीशाने किंवा उच्च न्यायालयाने तो कायम केला असेल तर व तेथवर, अपिलाच्या अंतिम निर्णयाच्या तारखेपासून अंमलात येईल.

(८) अपील काढून घेतल्यास ती बाब या कलमाच्या प्रयोजनांकरिता अपिलावरील अंतिम निर्णय असल्याचे मानण्यात येईल आणि ती ज्या आदेशावर अपील करण्यात आले असेल तो आदेश कायम करण्यासंबंधीच्या निर्णयाप्रमाणे अंमलात येईल ; तसेच पूर्वोक्त बाबींच्या अधीनतेने, अपिलाचा अंतिम निर्णय, उच्च न्यायालयाचा निर्णय ज्या तारखेस देण्यात आला असेल त्या तारखेस करण्यात आला असे मानण्यात येईल अथवा उक्त निर्णय हा, उच्च न्यायालयाकडे कोणतेही अपील करण्यात आले नसेल त्या बाबतीत, असे अपील ज्या कालावधीत करता आले असते तो कालावधी संपल्यावर किंवा उच्च न्यायालयाकडे कोणतेही अपील करता येत नसेल त्या बाबतीत, मुख्य न्यायाधीशाने ज्या तारखेस निर्णय दिला असेल त्या तारखेस करण्यात आला आहे असे मानण्यात येईल.

ज्यांच्या मागील बाजू एकमेकांस लागून असतील अशा इमारतींस मनाई.

**३७८आय.** या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, निर्धन लोकांसाठी राहण्याची जागा म्हणून ज्यांचा उपयोग करण्याचा इरादा असेल अशा कोणत्याही इमारती त्यांच्या मागील बाजू एकमेकांस लागून असतील अशा रीतीने बांधणे विधिसंमत असणार नाही आणि अशी कोणतीही इमारत, या अधिनियमाच्या प्रयोजनांकरिता मानवी वसतीस अयोग्य आहे असे मानण्यात येईल :

परंतु, एखाद्या इमारतीत अनेक गाळे असतील आणि अशा गाळ्यांच्या मागील बाजू एकमेकीस लागून असतील तेव्हा, अशा प्रत्येक गाळ्यातील राहण्यास योग्य अशा खोल्यांमध्ये परिणामकारक रीतीने वायुवीजन होईल अशा रीतीने असे गाळे बांधण्यात आले आहेत व त्यांची रचना करण्यात आली आहे असे आयुक्ताचे मत असेल तर, अशी इमारत बांधण्यास किंवा तिचा उपयोग करण्यास या कलमातील कोणत्याही तरतुदीमुळे प्रतिबंध होणार नाही.]

निवासस्थान विवरण मागवण्याचा आयुक्ताचा अधिकार.

[२][**३७९.** (१) आयुक्ताकडून लेखी नोटीस मिळाल्यानंतर सात दिवसांच्या कालावधीत, इमारतीचा मालक अशा इमारतीच्या किंवा तिच्या कोणत्याही भागाच्या बाबतीत पुढील तपशील असलेले आपल्या सहीचे प्रमाणपत्र देईल :—

(अ) इमारतीमधील खोल्यांची एकूण संख्या ;

(ब) प्रत्येक खोलीची लांबी, रुंदी व उंची ; आणि

(क) त्याने उक्त इमारत किंवा स्वतंत्र गाळा म्हणून भोगवटा करण्यात येत असलेल्या त्या इमारतीचा प्रत्येक भाग ज्या व्यक्तीस भाड्याने दिला असेल त्या व्यक्तीचे नाव.

(२) इमारतीचा भोगवटादार किंवा इमारतीच्या कोणत्याही भागाचा स्वतंत्र गाळा म्हणून भोगवटा करणारा भोगवटादार पूर्वोक्तप्रमाणे नोटीस मिळाल्यानंतर, आणि वर दिलेल्या कालावधीत, तो भोगवटा करीत असलेल्या पूर्वोक्त इमारतीच्या किंवा अशा इमारतीच्या भागांच्या संबंधात पुढील तपशील असलेले आपल्या सहीचे प्रमाणपत्र देईल :—

(अ) इमारतीत किंवा तिच्या कोणत्याही भागात राहणाऱ्या व्यक्तींची एकूण संख्या ;

---

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १८८ अन्वये " भारतीय मुदत अधिनियम, १९०८ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ५५ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम ३७९ दाखल करण्यात आले.

(ब) दिवसा आणि रात्री प्रत्येक खोलीचा कशा रीतीने उपयोग केला जातो ती रीत ; आणि

(क) झोपण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या प्रत्येक खोलीच्या भोगवटादारांची संख्या, स्त्री/पुरुष असा निर्देश व त्यांचे वय.]

[1][**३७९अ.** (१) मानवी वसतीसाठी वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही इमारतीत किंवा तिच्यातील कोणत्याही खोलीत किंवा खोल्यांत अतिगर्दी झाली आहे असे कलम ३७९ खाली सादर केलेल्या कोणत्याही प्रमाणपत्रावरून किंवा अन्यथा आयुक्तास दिसून येईल तेव्हा, त्यास अशा अतिगर्दीस प्रतिबंध करण्यासाठी [2][राज्य शासनाने विशेषरीत्या अधिकार प्रदान केलेल्या [3][महानगर दंडाधिकाऱ्याकडे]] अर्ज करता येईल ; आणि उक्त इलाखा शहर दंडाधिकाऱ्यास, त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर प्रत्येक खोलीमध्ये जितक्या व्यक्तींची राहण्याची सोय करावयाची ती कमाल संख्या विहित करता येईल ; तसेच त्यास लेखी आदेशान्वये इमारतीच्या मालकास उक्त आदेशात विहित करावयाच्या दहा दिवसांहून अधिक नसेल अशा वाजवी अवधीत उक्त इमारतीत किंवा खोलीत किंवा खोल्यांत राहणारे निवासी भाडेकरू किंवा इतर सहवासी यांची संख्या अशा रीतीने विहित करण्यात आलेल्या कमाल मर्यादेस अनुसरून आणि आयुक्ताचे समाधान होईल त्याप्रमाणे कमी करून त्यातील अतिगर्दी कमी करण्याविषयी फर्माविता येईल किंवा त्यास न्याय्य व योग्य वाटेल असा इतर आदेश देता येईल.

*अतिगर्दी असलेल्या राहण्याच्या जागा.*

(२) उक्त इमारतीच्या मालकाने ती पोटभाड्याने दिली असेल त्या बाबतीत, अशा इमारतीत किंवा खोलीत किंवा खोल्यांत राहणारा निवासी, भाडेकरू किंवा प्रत्यक्ष सहवासी यांचा घरमालक हा, या कलमाच्या प्रयोजनांकरिता उक्त इमारतीचा मालक आहे असे मानण्यात येईल.

(३) पोट-कलम (१) खालील कोणत्याही आदेशानुसार मालकाने उक्त इमारत रिकामी करण्यास फर्मावल्यावर, उक्त इमारतीमधील प्रत्येक भाडेकरू, निवासी किंवा इतर सहवासी उक्त इमारत रिकामी करील.

(४) केवळ निवास म्हणून वापरण्यात येणाऱ्या खोलीतील प्रौढ सहवासींची संख्या ही जेव्हा अशी असेल की, प्रत्येक प्रौढ सहवासींसाठी उपलब्ध असलेली जागा पंचवीस चौरस फूट पृष्ठभागापेक्षा कमी असेल आणि दहा वर्षांपेक्षा कमी वयाच्या प्रत्येक व्यक्तीसाठी उपलब्ध असलेली जागा साडेबारा चौरस फूट पृष्ठभागापेक्षा कमी असेल किंवा दहा वर्षांपेक्षा कमी वयाची दोन मुले म्हणजे एक प्रौढ व्यक्ती असे गृहीत धरून प्रत्येक प्रौढ सहवासीसाठी उपलब्ध असलेली हवेची पोकळी दोनशे पन्नास घन फुटांपेक्षा कमी असेल तेव्हा, या कलमाच्या अर्थानुसार अशा खोलीत अतिगर्दी झालेली आहे असे मानण्यात येईल.

(५) केवळ निवास म्हणून वापरण्यात न येणाऱ्या खोलीतील प्रौढ सहवासींची संख्या ही जेव्हा अशी असेल की, प्रत्येक प्रौढ सहवासीसाठी उपलब्ध असलेली जागा तीस चौरस फूट पृष्ठभागापेक्षा कमी असेल, आणि दहा वर्षांखालील प्रत्येक व्यक्तींसाठी उपलब्ध असलेली जागा पंधरा चौरस फूट पृष्ठभागापेक्षा कमी असेल तेव्हा किंवा दहा वर्षांपेक्षा कमी वयाची दोन मुले म्हणजे एक प्रौढ व्यक्ती असे गृहीत धरून, प्रत्येक प्रौढ सहवासीसाठी उपलब्ध असलेली हवेची पोकळी तीनशे घन फुटांपेक्षा कमी असेल तेव्हा, या कलमाच्या अर्थानुसार अशा खोलीत अतिगर्दी झालेली आहे असे मानण्यात येईल.]

---

[1] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ५५ अन्वये कलम ३७९-अ समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम २,अनुसूची— भाग ३ अन्वये " इलाखा शहर दंडाधिकारी " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[3] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ४३ अन्वये " इलाखा शहर दंडाधिकाऱ्याकडे " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

अस्वच्छ झोपड्या व छपऱ्या.

**३८०.** निवास म्हणून किंवा तबेला म्हणून वापरण्यात येणारी किंवा इतर कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात येणारी कोणतीही झोपडी किंवा छपरी जोत्याशिवाय बांधलेली असल्यामुळे किंवा अपुऱ्या उंचीच्या जोत्यावर बांधलेली असल्यामुळे किंवा जलनिस्सारणाच्या योग्य त्या साधनांवाचून बांधलेली असल्यामुळे, किंवा त्यात झाडलोट करता येणे शक्य नसल्यामुळे किंवा ज्या रीतीने त्यांची इतर झोपड्या व छपऱ्या यांच्या बरोबर दाटी झाली असेल त्या रीतीमुळे त्यातील निवासींना किंवा आस-पासच्या रहिवाशांना रोगाचा धोका निर्माण होण्याचा संभव आहे किंवा सार्वजनिक आरोग्यास किंवा सुरक्षिततेस कोणत्याही कारणामुळे धोका पोहोचण्याचा संभव आहे असे आयुक्ताचे मत असेल तर,

त्यास लेखी नोटिशीअन्वये, अशा झोपडीच्या किंवा छपरीच्या मालकास किंवा त्याच्या भोगवटा-दारास किंवा झोपडी किंवा छपरी जेथे उभी असेल त्या जमिनीच्या मालकास, अशी झोपडी किंवा छपरी काढून टाकण्याचा, त्यात फेरफार करण्यासाठी किंवा त्यात सुधारणा करण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल असा आदेश मिळविण्याविषयी फर्मावता येईल ; आयुक्त अशी नोटीस अशा झोपडीच्या किंवा छपरीच्या कोणत्याही ठळक भागावर लावील.

उपद्रवकारक असतील अशी डबकी, वगैरे बुजवणे.

[1][**३८१.** [2][(१) (एक) या कलमाच्या प्रयोजनांकरिता, उपद्रव यामध्ये पुढील गोष्टींचा अंतर्भाव होईल :—

(अ) कोणतेही डबके, खंदक, तलाव, विहीर, तळे, दगड खाणीचा खड्डा, नाली, जलप्रवाह किंवा कोणतेही साचलेले पाणी ; अथवा

(ब) इमारतीच्या आतील किंवा बाहेरील कोणताही पाण्याचा हौद किंवा पाणी साठविण्यासाठी असलेले इतर पात्र किंवा पावसाळ्यात पावसाचे पाणी जमा होऊ शकेल अशी कोणतीही वस्तू ; अथवा

(क) ज्यावर पाणी साचते किंवा साचण्याचा संभव असेल अशी कोणतीही जमीन ; अथवा

(ड) आयुक्ताच्या मते जी डासांच्या पैदाशीचे स्थान असेल किंवा होण्याचा संभव असेल किंवा कोणत्याही इतर रीतीने कलम ३, खंड (३) मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे उपद्रवकारक असेल अशी भोगवट्यात असलेली किंवा भोगवट्यात नसलेली किंवा बांधण्यात, पुन्हा बांधण्यात किंवा पाडण्यात येत असलेली कोणतीही परिवास्तू किंवा कोणत्याही परिवास्तूचा कोणताही भाग.

(दोन) आयुक्तास, जिच्या कृत्यामुळे किंवा कसुरीमुळे किंवा जिने दुर्लक्ष केल्यामुळे उपद्रव उद्‌भवेल, किंवा तो होत असेल किंवा तो चालू राहील किंवा तो उद्‌भवण्याचा संभव असेल त्या व्यक्तीस आणि ज्यावर किंवा ज्यामध्ये असा उपद्रव उद्‌भवेल किंवा तो होत असेल किंवा तो चालू राहील किंवा तो उद्‌भवण्याचा संभव असेल अशी जमीन, इमारत किंवा परिवास्तू यांच्या मालकास, पट्टेदारास किंवा तिच्या भोगवटादारास किंवा अशी व्यक्ती, मालक, पट्टेदार व भोगवटादार यांपैकी कोणाही एकास किंवा अधिक व्यक्तींना लेखी नोटीस देऊन, आयुक्तास, अशा नोटिशीत विहित करील अशा कालावधीत व अशा रीतीने अशी उपाययोजना करून व असे काम पार पाडून उपद्रव नाहिसा करण्यास, तो बंद करण्यास किंवा त्याचा उपशम करण्यास फर्मावता येईल.

(तीन) तसेच आयुक्तास, अशा व्यक्तीस मालकावर, पट्टेदारावर व भोगवटादारावर किंवा त्यांच्यापैकी कोणाही एकावर किंवा अधिक व्यक्तींवर खंड (दोन) खाली कोणतीही नोटीस बजावून किंवा इतर नोटीस बजावून, त्यांना किंवा त्यांच्यापैकी कोणाही एकास किंवा अधिक व्यक्तींना उपद्रव पुन्हा उद्‌भवू नये म्हणून आवश्यक असतील अशा सर्व उपाययोजना करण्यास फर्मावता येईल आणि त्यास इष्ट वाटल्यास त्या प्रयोजनासाठी पार पाडावयाचे कोणतेही काम किंवा करावयाच्या कोणत्याही उपाययोजना विनिर्दिष्ट करता येतील आणि असा उपद्रव कमी करण्यात किंवा नाहिसा करण्यात आलेला असला तरीही तो पुन्हा उद्‌भवण्याचा संभव आहे असे जर त्यास वाटेल तर, अशी कोणतीही आणखी नोटीस देता येईल :

[1] सन १९१३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम ४ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[2] सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम १४ अन्वये मूळ पोट-कलम (१) याऐवजी नवीन पोट-कलम (१) दाखल करण्यात आले.

परंतु, कोणतीही अशी नोटीस बजावल्याच्या तारखेपासून चार महिन्यांच्या आत कोणत्याही वेळी, जिच्यावर अशी नोटीस बजावण्यात आली अशा व्यक्तीने किंवा व्यक्तींनी अशा नोटिशीत दिलेल्या आवश्यक गोष्टींचे अनुपालन करण्यात कसूर केल्यामुळे उपद्रव पुन्हा उद्‌भवेल तर, अशी व्यक्ती किंवा अशा व्यक्ती त्यांना आणखी कोणतीही नोटीस न दिली जाता, या कलमाखालील अपराधासाठी या अधिनियमात तरतूद केलेल्या शिक्षांना पात्र असतील.

(चार) कोणतीही परिवास्तू किंवा कोणत्याही परिवास्तूचा कोणताही भाग बांधण्याच्या, पुन्हा बांधण्याच्या किंवा पाडून टाकण्याच्या संबंधात जेव्हा उपद्रव उद्‌भवेल, तो होत असेल किंवा तो उद्‌भवण्याचा किंवा पुन्हा उद्‌भवण्याचा संभव असेल तेव्हा, खंड (२) मध्ये उल्लेख केलेल्या एका किंवा अधिक व्यक्तींवर नोटीस बजावण्याबरोबरच आयुक्तास, अशी कोणतीही नोटीस बजावता येईल, म्हणजे कोणत्याही वास्तुशास्त्रज्ञावर, कंत्राटदारावर किंवा परिवास्तू अथवा तिचा भाग बांधण्याचे, पुन्हा बांधण्याचे किंवा पाडावयाचे असे काम करण्यासाठी नेमलेल्या इतर व्यक्तीवर आणि अशा कंत्राटदाराने कामावर ठेवलेल्या दुय्यम कंत्राटदारावर किंवा इतर व्यक्तीवरही किंवा असा कंत्राटदार, व्यक्ती व दुय्यम कंत्राटदार यांपैकी कोणत्याही एका किंवा अधिक व्यक्तींवर नोटीस बजावता येईल.]

(२) [१][पोट-कलम (१) खाली केलेल्या फर्मावणीअनुसार ज्या कोणत्याही व्यक्तीला] एखादी विहीर बुजवण्यास किंवा आच्छादन घालण्यास किंवा तिच्यामधील पाणी काढून टाकण्यास फर्माविले असेल अशी कोणतीही व्यक्ती जर, तसे करण्यासाठी विहित अवधीत अशा फर्मावणीविरूद्ध लेखी आक्षेप आयुक्ताला सादर करील तर, आयुक्त असा आक्षेप [२][स्थायी समितीस] कळवील आणि त्या बाबतीत आणखी चौकशी करील, आणि तो अशा फर्मावणीप्रमाणे वागण्यात कसूर केल्याबद्दल, [३][स्थायी समितीची] मान्यता असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, कलम ५१७ खाली कोणताही खटला भरणार नाही ; परंतु, आयुक्ताला अशा फर्मावणीअनुसार करणे भाग असलेले काम पार पाडणे निकडीचे वाटले तर, त्यास कलम ४८९ अनुसार कार्यवाही करता यईल आणि उक्त विहीर कायमची बुजवण्यात यावी, आच्छादित करण्यात यावी किंवा इतर व्यवस्था करण्यात यावी किंवा कसे या प्रश्नाचा [२][स्थायी समिती] निर्णय देईतोपर्यंत त्यास डासांचा शिरकाव होण्यास प्रतिबंध करण्यासाठी अशा विहिरीवर मजबूत आच्छादन घालण्याची व्यवस्था करता येईल आणि अशा प्रत्येक बाबतीत वर सांगितल्याप्रमाणे केलेल्या कोणत्याही कामाचा खर्च अशी [४][व्यक्ती] देईल किंवा आयुक्त महानगरपालिका निधीमधून देईल किंवा तो दोघांमध्ये विभागून घेतला जाईल किंवा कसे आणि अशा रीतीने विभागून घ्यावयाचा असेल तेव्हा त्याची कोणत्या प्रमाणात विभागणी करण्यात येईल ते आयुक्त, [३][स्थायी समितीच्या] मंजुरीने निर्धारित करील.]

[५][**३८१अ.** (१) आयुक्ताची आगाऊ लेखी परवानगी घेतल्यावाचून कोणतीही नवीन विहीर, तलाव, तळे, हौद किंवा कारंजे खोदता किंवा बांधण्यात येणार नाही. नवीन विहीर वगैरेस परवानगी.

(२) जर असे कोणतेही काम अशा परवानगीवाचून सुरू करण्यात येईल किंवा पूर्ण करण्यात येईल तर, आयुक्त—

(अ) लेखी नोटीस देऊन तिच्या अन्वये मालकास किंवा जिने असे काम केले असेल त्या इतर व्यक्तीस आयुक्त विहित करील अशा रीतीने असे काम बुजवण्यास किंवा पाडून टाकण्यास फर्मावू शकेल ; अथवा

---

[१] सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम १४(ब) (एक) अन्वये मूळ शब्दाऐवजी हे शब्द, आकडे व कंस दाखल करण्यात आले.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १५८(अ) अन्वये ' प्रभारी सदस्यास ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १५८(ब) अन्वये ' महापौरांसह परिषदेच्या ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १५८(ब) (दोन) अन्वये " मालकाने " या मूळ शब्दाऐवजी " व्यक्तीने " हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] सन १९१३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम ५ अन्वये कलम ३८१अ समाविष्ट करण्यात आले.

(ब) असे काम तसेच राहू देण्याविषयी लेखी परवानगी देऊ शकेल, मात्र अशा परवानगीमुळे अशा मालकास पोट-कलम (१) च्या तरतुदींचे उल्लंघन केल्याबद्दल त्याच्याविरूद्ध कार्यवाही चालवली जाण्याच्या बाबतीत माफी असणार नाही.]

कोणत्याही जमिनीवरील साचलेल्या पाण्यात डासांची पैदास होऊ न देणे.

[1][**३८१ब.** कोणतीही व्यक्ती तिच्या मालकीच्या किंवा कब्जात असलेल्या कोणत्याही जमिनीवर,—

(अ) ज्यामध्ये डासांची पैदास होते किंवा पैदास होण्याचा संभव असेल अशा साचलेल्या किंवा वाहत्या पाण्याचा कोणताही साठा राहू देणार नाही किंवा बाळगणार नाही, किंवा

(ब) अशा जमिनीवर, ज्यामध्ये डासांची पैदास होते किंवा पैदास होण्याचा संभव असेल अशा पाण्याच्या कोणत्याही साठ्याला कारणीभूत होणार नाही, साठा करण्यास परवानगी देणार नाही किंवा साठा केल्यास तो खपवून घेणार नाही.

मात्र असा साठा हा, जेणेकरून अशा पैदाशीला प्रतिबंध होईल अशा प्रकारे राखण्यात आला असेल तर ती बाब वेगळी.

**स्पष्टीकरण एक.**—गुरांसाठी वापरण्यात येणारी व वारंवार वापरात असणारी द्रोणी तद्‌विरूद्ध सिद्ध करण्यात येईतोपर्यंत, ज्यामध्ये डासांची पैदास होते किंवा पैदास होण्याचा संभव आहे असा पाण्याचा साठा असल्याचे मानण्यात येणार नाही.

**स्पष्टीकरण दोन.**—कोणत्याही साठलेल्या किंवा वाहत्या पाण्यात डासांच्या अंड्यांचे स्वाभाविक अस्तित्व जाणवेल तर अशा पाण्यात डासांची पैदास असल्याचा तो पुरावा असेल.]

धोकादायक असे दगडखाणकाम बंद करता येईल.

**३८२.** जर आयुक्ताच्या मते कोणतेही दगडखाणकाम किंवा कोणत्याही जागेतून दगड, माती किंवा इतर पदार्थ काढून नेण्याचे काम हे आसपास राहणाऱ्या किंवा तेथे जाण्याचा कायदेशीर हक्क असलेल्या व्यक्तीस धोक्याचे असेल किंवा त्यापासून उपद्रव होत असेल किंवा उपद्रव होण्याचा संभव असेल तर, आयुक्त, [2]* * * * * लेखी नोटिशीअन्वये, उक्त दगडखाण जागेच्या मालकास त्या दगडखाणीचे काम किंवा अशा जागेतून दगड, माती किंवा इतर पदार्थ काढून नेण्याचे काम बंद करण्यास किंवा अशा दगडखाणीपासून किंवा जागेपासून होणारा किंवा होण्याचा संभव असलेला धोका न होऊ देण्यासाठी किंवा उपद्रव नाहीसा करण्यासाठी त्या खाणीसंबंधाने किंवा जागेसंबंधाने त्यास आवश्यक वाटेल अशी व्यवस्था करण्यास फर्मावू शकेल.

झाडे, झुडपे व कुंपणे काढून टाकणे व छाटणे.

**३८३.** (१) जर आयुक्ताच्या मते,—

(अ) कोणतेही कुंपण, कोणत्याही वेळी अपुरे कापलेले किंवा छाटलेले असेल किंवा त्यावर निवडुंग किंवा इतर अपायकारक तण माजलेले असेल, अथवा

(ब) सार्वजनिक सुरक्षिततेस धोका पोहोचेल अशा रीतीने कोणतेही झाड किंवा झुडूप पडले असेल किंवा पडण्याचा संभव असेल किंवा कोणत्याही सडकेवर त्यावरून जाणाऱ्या येणाऱ्या लोकांना गैरसोईचे किंवा धोक्याचे होईल अशा रीतीने लोंबकळत असेल किंवा अडथळा आणीत असेल ;

तर आयुक्त, लेखी नोटिशीअन्वये ज्या जमिनीवर असे कुंपण, झाड किंवा झुडूप असेल किंवा वाढलेले असेल त्या जमिनीच्या मालकास किंवा भोगवटादारास,—

(क) असे कुंपण चार फुटापेक्षा अधिक उंच राहणार नाही किंवा तीन फुटांपेक्षा अधिक रुंद राहणार नाही अशा रीतीने छाटण्यास व त्यावरील कोणतेही निवडुंग किंवा इतर अपायकारक तण काढून टाकण्यास, अथवा

---

[1] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१, कलम १६ अन्वये कलम ३८१ब समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ४४ अन्वये " स्थायी समितीच्या मंजुरीने " हे शब्द वगळण्यात आले.

(ड) यथास्थिति, असे झाड किंवा झुडूप काढून टाकण्यास, त्याच्या फांद्या तोडण्यास किंवा छाटण्यास, फर्मावू शकेल.

(२) खंड (ब) खाली येणाऱ्या कोणत्याही बाबतीत सार्वजनिक सुरक्षिततेसाठी तसे करणे आयुक्तास आवश्यक वाटेल तर, त्यास, उक्त मालकास किंवा भोगवटादारावर पूर्वोक्तप्रमाणे आगाऊ नोटीस न देता, कोणतेही झाड किंवा झुडुप काढून टाकण्याची, फांद्या तोडण्याची किंवा छाटण्याची तजवीज करता येईल आणि त्याचा खर्च मालक किंवा भोगवटादार देईल.

**जनावरे पाळणे व त्यांचा नाश करणे आणि मढ्यांची विल्हेवाट लावणे.**

जनावरे पाळण्यास मनाई.

**३८४.** (१) कोणतीही व्यक्ती,—

(अ) आयुक्ताच्या लेखी परवानगीखेरीज किंवा अशा परवानगीच्या अटींअनुसार असेल त्याहून अन्यथा [१][बृहन्मुंबईच्या] कोणत्याही भागामध्ये कोणतेही डुक्कर पाळणार नाही ;

(ब) ज्यापासून कोणत्याही व्यक्तीस उपद्रव होईल किंवा धोका पोहोचेल अशा रीतीने आपल्या परिवास्तूत कोणतेही जनावर पाळणार नाही ;

(क) मलमूत्र, शेण, तबेल्यातील कचरा किंवा इतर घाण कोणत्याही जनावरास खाऊ घालणार किंवा खाऊ घालू देणार नाही किंवा कोणत्याही जनावराला असे पदार्थ खाऊ देणार नाही.

(२) कोणतेही डुक्कर भटकताना आढळल्यास त्याचा ताबडतोब नाश करील आणि त्याच्या मढ्याची विल्हेवाट, आयुक्त निदेश देईल अशा रीतीने लावील आणि अशा रीतीने मारून टाकलेल्या कोणत्याही डुकराबद्दल नुकसानभरपाई मिळण्यासाठी कोणतीही हक्कमागणी करणार नाही.

राहत्या घरांमध्ये जनावरे बांधण्यास किंवा धान्य साठवून ठेवण्यास मनाई करता येईल.

[२][**३८४अ.** जेव्हा एखादी इमारत किंवा तिचा कोणताही भागांश मानवी वसतीसाठी वापरण्यात येत असेल किंवा वापरण्याचा इरादा असेल आणि अशा इमारतीचा कोणताही भागांश खाली दिलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी म्हणजे—

(अ) कोणताही घोडा, गाय, म्हैस, बैल, बकरा किंवा गाढव ठेवण्यासाठी, अथवा

(ब) धान्य, बी-बियाणे किंवा किराणा माल यांच्या घाऊक व्यापारासंबंधातील गोदाम किंवा कोठार म्हणून वापरण्यात येत असेल,

तेव्हा, आयुक्तास स्वच्छतेच्या प्रयोजनासाठी तसे करणे आवश्यक वाटले तर लेखी नोटीस देऊन तिच्या अन्वये अशा इमारतीच्या मालकास किंवा तिच्या भोगवटादारास कोणत्याही प्रयोजनासाठी अशा इमारतीचा वापर करण्याचे बंद करण्यास फर्मावता येईल ; परंतु आयुक्तास, त्यास विहित करणे योग्य वाटतील अशा शर्तीवर असा वापर करण्यास परवानगी देता येईल.]

जनावरांची मढी हलवणे.

[३][**३८५**. (१) [१][बृहन्मुंबईत] सर्व जनावरांची मढी हलवण्याची तरतूद करणे हे, आयुक्तांचे कर्तव्य असेल.

(२) ज्या जागेत किंवा जागेवर कोणतेही जनावर मरण पावेल किंवा ज्या जागेत किंवा जागेवर कोणत्याही जनावराचे मढे आढळून येईल त्या जागेचा भोगवटादार आणि कोणत्याही सडकेवर किंवा कोणत्याही खुल्या जागी मेलेल्या कोणत्याही जनावराचा ताबा असणारी व्यक्ती, असे जनावर मेल्यानंतर तीन तासांच्या आत किंवा ते रात्री मरण पावले असल्यास सूर्योदयानंतर तीन तासांच्या आत, ते

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४(१) अन्वये "ग्रेटर बॉम्बे" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] सन १९१६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम १० अन्वये कलम ३८४अ समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९२० चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ४ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

मेल्याची खबर [1][बृहन्मुंबईच्या] ज्या विभागात असे जनावर मरण पावले असेल किंवा मढे आढळले असेल त्या विभागातील महानगरपालिका आरोग्य विभागाच्या कार्यालयात देईल. [2][आणि याबाबत आयुक्ताने प्राधिकृत केलेले असल्याशिवाय बृहन्मुंबईच्या कोणत्याही जागेत किंवा जागेवर कोणत्याही जनावराचे मढे हलवणार नाही किंवा हलवण्यास परवानगी देणार नाही.]

(३) महानगरपालिका अभिकरणाने याप्रमाणे हलवलेल्या जनावरांच्या प्रत्येक मढ्यासाठी; आयुक्त निश्चित करील अशा रकमेइतकी फी, जनावराचा मालक किंवा मालक माहीत नसल्यास ज्या परिवास्तूत किंवा परिवास्तूवर उक्त जनावर मेले असेल त्या जागेचा भोगवटादार किंवा उक्त जनावर मेले त्यावेळी त्याचा ताबा ज्या व्यक्तीकडे असेल ती व्यक्ती देईल.]

### सार्वजनिक स्नानाच्या जागा, धुण्याच्या जागा वगैरेचे विनियमन.

आयुक्ताने सार्वजनिक स्नानाच्या जागा, वगैरे निश्चित करणे.

**३८६.** आयुक्तास वेळोवेळी, महानगरपालिकेमध्ये निहित असलेले समुद्र किनाऱ्याचे भागांश किंवा इतर योग्य जागा स्नान करण्यासाठी, जनावरे धुण्यासाठी किंवा कपडे वाळवण्यासाठी लोकांनी वापरण्याकरिता अलग राखून ठेवता येईल आणि त्यास वेळोवेळी जाहीर नोटिशीअन्वये महानगर-पालिकेमध्ये निहित नसलेल्या समुद्रकिनाऱ्याचा कोणताही भागांश किंवा जागा उक्त प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी लोकांनी वापरण्यास मनाई करता येईल.

सार्वजनिक स्नानाच्या जागा, वगैरे यांच्या वापरासंबंधात विनियमन करणे.

**३८७.** (१) आयुक्तास जाहीर नोटिशीअन्वये पुढील गोष्टींचा लोकांनी वापर करण्यासंबंधाने विनियमन करता येईल.—

(अ) निकटपूर्वीच्या कलमाखाली कोणत्याही प्रयोजनासाठी अलग राखून ठेवलेल्या व महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या समुद्रकिनाऱ्याचा कोणताही भागांश किंवा इतर जागा ;

(ब) निकटपूर्वीच्या कलमात नमूद केलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी त्याच्या मूक संमतीने वापरण्यात येणारा व महानगरपालिकेमध्ये निहित नसलेला समुद्रकिनाऱ्याचा कोणताही भागांश किंवा इतर जागा ;

(क) कलम २७० खाली कोणत्याही विशिष्ट प्रयोजनासाठी नेमून दिलेले व अलग राखून ठेवलेले कोणतेही काम व त्यातील पाणी.

(२) पूर्वोक्ताप्रमाणे स्नानासाठी अलग राखून ठेवलेल्या, नेमून दिलेल्या किंवा वापरण्यात येणाऱ्या समुद्रकिनाऱ्याच्या कोणत्याही भागांशाच्या किंवा कोणत्याही जागेच्या किंवा कोणत्याही कामाच्या बाबतीत, आयुक्तास अशा नोटिशीत स्त्रियांसाठी आणि पुरुषांसाठी स्नानाच्या जागा व वेळा विहित करता येतील.

आदेश किंवा विनियम यांविरूद्ध स्नान करणे, वगैरेंस मनाई.

**३८८.** कलम २७०, ३८६ किंवा ३८७ खाली दिलेल्या कोणत्याही आदेशावरून किंवा केलेल्या कोणत्याही विनियमावरून परवानगी देण्यात आली ते खेरीज करून एरव्ही कोणतीही व्यक्ती—

(अ) महानगरपालिकेमध्ये निहित असलेले कोणतेही सरोवर, तलाव, जलाशय, कारंजे, हौद, नलिका, उभा नळ, ओढा किंवा विहीर किंवा समुद्रकिनाऱ्याचा कोणताही भाग किंवा इतर जागा यामध्ये किंवा त्याच्या जवळ स्नान करणार नाही ;

(ब) अशी कोणतीही जागा किंवा काम यामध्ये किंवा त्याच्याजवळ कोणतेही जनावर, कपडे किंवा इतर वस्तू धुणार नाही किंवा धुण्याची तजवीज करणार नाही ;

(क) अशी कोणतीही जागा किंवा बांधकाम यामधील पाण्यात कोणतेही जनावर किंवा इतर वस्तू फेकणार नाही, ठेवणार नाही किंवा त्यात प्रवेश करू देणार नाही ;

---

[1] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४(१) अन्वये “ ग्रेटर बॉम्बे ” या या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[2] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम ७ अन्वये हा भागांश जादा दाखल करण्यात आला.

(ड) ज्यायोगे कोणत्याही अशा जागेतील किंवा कामातील पाणी कोणत्याही प्रमाणात घाण किंवा दूषित होईल अशा रीतीने, अशी जागा किंवा काम यात किंवा यावर कोणतीही वस्तू वाहण्यास लावणार नाही किंवा वाहू देणार नाही किंवा आणण्यास लावणार किंवा आणू देणार नाही किंवा अशा रीतीने कोणतेही कृत्य करणार नाही.

(ई) अशा कोणत्याही जागी किंवा जागेवर कपडे वाळवणार नाही ;
तसेच कोणतीही व्यक्ती—

(फ) कलम ३८६ खाली आयुक्ताने दिलेल्या कोणत्याही मनाई आदेशाचे उल्लंघन करून, महानगरपालिकेमध्ये निहित नसलेल्या समुद्रकिनाऱ्याच्या कोणत्याही भागांशाचा किंवा कोणत्याही जागेचा उक्त कलमात नमूद केलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी उपयोग करणार नाही ;

(ग) समुद्रकिनाऱ्याच्या कोणत्याही अशा भागांशाचा किंवा जागेचा कोणत्याही अशा प्रयोजनांकरिता उपयोग करण्यासाठी आयुक्ताने कलम ३८७ खाली केलेल्या कोणत्याही विनियमाचे उल्लंघन करणार नाही.

प्राणिज किंवा इतर पदार्थ वगैरे पाण्यात बुडवून पाणी दूषित करण्यास मनाई.

**३८९.** कोणतीही व्यक्ती—

(अ) कोणताही तलाव, जलाशय, ओढा, विहीर किंवा खंदक यात, ज्यामुळे त्याचे पाणी घृणास्पद किंवा आरोग्यास अपायकारक होण्याचा संभव असेल असा कोणताही प्राणिज, वनस्पतीजन्य किंवा खनिज पदार्थ बुडणार नाही ;

(ब) कोणताही सांसर्गिक किंवा किळसवाणा रोग झालेला असताना कोणतेही सरोवर, तलाव, जलाशय, कारंजे, हौद, नलिका, उभा नळ, ओढा किंवा विहीर यावर, यात किंवा या जवळ किंवा समुद्रकिनाऱ्याच्या कोणत्याही भागावर स्नान करणार नाही.

## कारखाने, उदीम, वगैरेचे विनियमन

आयुक्ताच्या परवानगीवाचून कारखाना, वगैरे नव्याने स्थापन न करणे.

**३९०.** (१) कोणतीही व्यक्ती, ज्यात वाफ, पाणी, [१][वीज] किंवा इतर यांत्रिक शक्ती यांचा उपयोग करण्याचे योजिले असेल असा कोणताही कारखाना, कर्मशाळा किंवा कामाची जागा कोणत्याही परिवास्तूत आयुक्ताच्या आगाऊ लेखी परवानगीवाचून नव्याने स्थापन करणार नाही. [२][तसेच अशा परवानगीवाचून कोणतीही व्यक्ती असा कोणताही कारखाना, कर्मशाळा किंवा कामाची जागा यात काम करणार नाही किंवा त्यात काम करण्याची मुभा देणार नाही.]

(२) आयुक्ताचे असे मत होईल की, अशा कारखान्याची, कर्मशाळेची किंवा कामाच्या जागेची स्थापना नियोजित जागी केल्यास त्या जागेच्या आसपास दाट लोकवस्ती असल्याच्या कारणांवरून ती आक्षेपार्ह होईल किंवा आसपास राहणाऱ्या लोकांना उपद्रवकारक होईल तर, अशी परवानगी देण्याचे आयुक्तास नाकारता येईल.

[३][(३) कारखाना, कर्मशाळा किंवा कामाची जागा स्थापन करण्यासाठी पोट-कलम (१) खाली दिलेली कोणतीही लेखी परवानगी जर आयुक्ताने कलम ४७९, पोट-कलम (३) खाली आपल्या अधिकारांचा वापर करून रद्द केली तर कोणतीही व्यक्ती आयुक्ताकडून अशा लेखी परवानगीचे नवीकरण करण्यात येईतोपर्यंत किंवा नवीन लेखी परवानगी देण्यात येईतोपर्यंत अशा कारखान्याचे, कर्मशाळेचे किंवा कामाच्या जागेचे कामकाज किंवा वापर चालू ठेवणार किंवा सुरू करणार नाही.]

---

[१] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ४५ अन्वये हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९१६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम ११ (अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ११(ब) अन्वये पोट-कलम (३) जादा दाखल करण्यात आले.

उदिमात किंवा वस्तुनिर्मितीत वापरण्यात येणाऱ्या भट्ट्यांमधील धूर त्यातच नाश पावेल अशी व्यवस्था करणे.

**३९१.** (१) कोणतीही व्यक्ती—

(अ) भट्टीतून निघणारा धूर शक्य तेथवर तिच्यातच नाश पावेल अशी व्यवस्था जिच्यात नाही अशी, उदिमाच्या किंवा वस्तुनिर्मितीच्या प्रयोजनांसाठी ठेवलेली कोणतीही भट्टी वापरणार नाही किंवा वापरण्याची परवानगी देणार नाही ; अथवा

(ब) अशी कोणतीही भट्टी तिच्यातून निघणाऱ्या धुराचा शक्य तेथवर तिच्यातच नाश पावणार नाही अशा रीतीने हयगयीने वापरणार नाही किंवा वापरण्याची परवानगी देणार नाही.

(२) या कलमातील कोणतीही गोष्ट कोणत्याही रुळमार्गावरील, रहदारीच्या प्रयोजनासाठी किंवा सडकांच्या दुरूस्तीसाठी वापरण्यात येणाऱ्या लोकोमोटिव्ह इंजिनास लागू होते, असे मानले जाणार नाही.

कारखाने, वगैरेंच्या संबंधाने विनियमन.

**३९२.** (१) जेव्हा जेव्हा आयुक्तास असे आढळून येईल की, कोणताही कारखाना, [१]* * * * कर्मशाळा किंवा कामाची जागा, किंवा वाफेची, पाण्याची अगर इतर यांत्रिक शक्ती जिच्यात वापरण्यात येते अशी कोणतीही इमारत किंवा जागा स्वच्छ राखण्यात आलेली नाही किंवा काम चालू असताना त्यात निर्माण होणारा व उपद्रवकारक असलेला कोणताही वायू, बाष्प, धूळ किंवा इतर अशुद्ध द्रव्य यापासून शक्यतोवर अपाय होणार नाही अशा रीतीने त्यात वायुवीजन होण्याची व्यवस्था केलेली नाही,

किंवा काम चालू असताना त्यात इतकी अतिगर्दी झालेली आहे की, त्यामुळे तेथे कामावर ठेवलेल्या व्यक्तींच्या आरोग्यास धोका आहे किंवा अपाय आहे,

अथवा त्या जागेतील कोणतेही इंजिन, मिल-गिअरिंग, उच्चलनयंत्र किंवा इतर यंत्रसामग्री ही अशा तऱ्हेने बसवली आहे किंवा तिच्या भोवती असलेले कुडण अशा प्रकारचे आहे की, ज्यामुळे जीवितास किंवा शरीराच्या एखाद्या गात्रास धोका पोहोचतो ;

तेव्हा तेव्हा आयुक्तास लेखी नोटिशीअन्वये अशा कारखान्याच्या [१]* * * * कर्मशाळेच्या, कामाच्या जागेच्या किंवा इतर इमारतीच्या किंवा जागेच्या मालकास, ती स्वच्छ ठेवण्यासाठी व राखण्यासाठी किंवा तिच्यात वायुवीजन व्यवस्था करण्यासाठी किंवा तिच्यात अतिगर्दी होऊ न देण्यासाठी किंवा तेथील कोणतेही इंजिन, मिल-गिअरिंग, उच्चलनयंत्र, कुडण किंवा इतर यंत्रसामग्री यांपासून जीवितास किंवा शरीराच्या कोणत्याही गात्रास धोका पोहोचू न देण्यासाठी त्या जागेसंबंधी, त्यास योग्य वाटेल अशी व्यवस्था करण्यास फर्माविता येईल.

(२) या कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे [२]मुंबई बाष्पक निरीक्षण अधिनियम, १८८७ च्या कोणत्याही तरतुदीस बाध येते असे मानले जाणार नाही. आणि कोणतेही इंजिन, मिल-गिअरिंग, उच्चलनयंत्र, किंवा इतर यंत्रसामग्री बसविण्यासंबंधीच्या किंवा त्याभोवती कुडण करण्यासंबंधीच्या या कलमातील कोणत्याही तरतुदी [३]भारतीय कारखाना अधिनियम, १८८१ च्या तरतुदी ज्या कारखान्यास लागू असतील त्या कारखान्यास लागू असणार नाहीत.

१८८७ चा मुंबई ३. १८८१ चा मुंबई १५.

---

[१] सन १९११ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम १४ अन्वये "भटारखाना" हा शब्द निरसित करण्यात आला.

[२] सन १८८७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ हा, सन १८९१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ अन्वये निरसित करण्यात आला. सन १८९१ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ हा, सन १९१७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५ अन्वये निरसित करण्यात आला आणि सन १९१७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५ हा, सन १९२३ चा केंद्रीय अधिनियम क्रमांक ५ अन्वये निरसित करण्यात आला.

[३] सन १८८१ चा अधिनियम क्रमांक १५ हा सन १९११ चा अधिनियम क्रमांक १२ (भारतीय कारखाना, अधिनियम, १९११) अन्वये निरसित करण्यात आला आणि सन १९११ चा अधिनियम क्रमांक १२ (भारतीय कारखाना अधिनियम, १९११) हा सन १९३४ चा केंद्रीय अधिनियम क्रमांक २५ अन्वये निरसित करण्यात आला.

**३९३.** (१) कोणतीही व्यक्ती आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून कोणत्याही कारखान्यात किंवा इतर कोणत्याही जागेत, कामावर लावलेल्या कामगारांना किंवा व्यक्तींना बोलावण्याच्या किंवा कामावरून सोडण्याच्या प्रयोजनासाठी वाफेने वाजवली जाणारी कोणतीही शिट्टी किंवा तुतारी वापरणार किंवा बसवणार नाही.

आयुक्ताच्या परवानगीवाचून वाफेची शिट्टी किंवा वाफेची तुतारी वापरण्यास मनाई.

(२) आयुक्तास, पूर्वोक्तप्रमाणे असे कोणतेही साधन वापरण्यासाठी त्याने दिलेली अशी कोणतीही परवानगी, अशा साधनाचा वापर करीत असलेल्या व्यक्तीस एक महिन्याची नोटीस देऊन कोणत्याही वेळी मागे घेता येईल.

(३) परंतु, कलम ४७९, पोटकलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कारणासाठी अशी कोणतीही परवानगी आयुक्त निलंबित किंवा रद्द करील तर, पोटकलम (२) मधील कोणत्याही तरतुदीमुळे आयुक्ताने एक महिन्याची नोटीस देणे आवश्यक होते, असे मानले जाणार नाही.

[१][**३९४.** (१) आयुक्ताने दिलेल्या लायसनच्या अटी व शर्ती याअन्वये आणि त्यांस अनुसरून असेल ते खेरीजकरून एरव्ही, कोणतीही व्यक्ती—

लायसनवाचून विवक्षित माल [२][किंवा जनावरे] न ठेवणे आणि विवक्षित उदीम, प्रक्रिया व काम चालू न ठेवणे आणि धोका किंवा उपद्रव होऊ नये म्हणून अभिग्रहण व नष्ट वगैरे केल्या जाण्यास पात्र असलेल्या विवक्षित वस्तू.

(अ) कोणत्याही परिवास्तूत किंवा परिवास्तूवर,

(एक) अनुसूची " म ", भाग एक मध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही पदार्थ ; अथवा

(दोन) अनुसूची " म ", भाग दोन मध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही पदार्थ उक्त अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या ज्या कमाल प्रमाणात (किंवा जेव्हा असा पदार्थ त्या अनुसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या इतर कोणत्याही पदार्थाबरोबर किंवा पदार्थांबरोबर ठेवण्यात आला असेल तर आयुक्त अधिसूचित करील अशा अन्य कमाल प्रमाणात) कोणत्याही एका वेळी एकाच परिवास्तूत किंवा परिवास्तूवर लायसनवाचून ठेवता येईल, त्या प्रमाणापेक्षा अधिक प्रमाणात ठेवणार नाही किंवा ठेवलेले खपवून घेणार नाही किंवा ठेवण्यास मुभा देणार नाही ;

(ब) अनुसूची " म ", भाग तीन यात विनिर्दिष्ट केलेला कोणताही पदार्थ विक्रीकरिता किंवा घरगुती वापराहून अन्य वापराकरिता कोणत्याही परिवास्तूत किंवा परिवास्तूवर ठेवणार नाही किंवा ठेवलेला खपवून घेणार नाही किंवा ठेवण्यास मुभा देणार नाही ;

(क) कोणत्याही परिवास्तूत किंवा परिवास्तूवर घोडे, गुरे-ढोरे किंवा इतर चतुष्पाद जनावरे विक्रीकरिता किंवा भाड्याने देण्याकरिता किंवा ज्यासाठी कोणताही आकार किंवा पारिश्रमिक घेण्यात येईल अशा कोणत्याही प्रयोजनांसाठी किंवा त्यांच्यापासून मिळणाऱ्या कोणत्याही उत्पन्नाच्या विक्रीसाठी ठेवणार नाही, ठेवलेले खपवून घेणार नाही, किंवा ठेवण्यास मुभा देणार नाही ;

(ड) आयुक्ताच्या मते, जो कोणताही पदार्थ [३][किंवा जनावर] जीवितास, आरोग्यास किंवा मालमत्तेस अपायकारक असेल किंवा तो ज्या स्वरूपात किंवा ज्या रीतीने किंवा ज्या परिस्थितीत ठेवण्याचे योजिले असेल, ठेवण्यात आला असेल किंवा उपयोगात आणला किंवा उपयोगात आणलेला खपवून घेतला असेल किंवा ठेवण्यास किंवा उपयोगात आणण्यास मुभा दिली असेल त्या स्वरूपात किंवा त्या रीतीने किंवा त्या परिस्थितीत ठेवल्यामुळे त्यापासून उपद्रव होण्याचा संभव असेल असा कोणताही पदार्थ किंवा जनावर कोणत्याही परिवास्तूत किंवा परिवास्तूवर ठेवणार नाही किंवा त्याचा उपयोग करणार नाही किंवा केलेला खपवून घेणार नाही किंवा तो ठेवण्यास किंवा उपयोगात आणण्यास मुभा देणार नाही ;

---

[१] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम २ अन्वये मूळ कलम ३९४ याऐवजी कलमे ३९४ व ३९४अ दाखल करण्यात आली.

[२] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ११(ई) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ११(अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

(ई) कोणत्याही परिवास्तूत किंवा परिवास्तूवर,—

(एक) अनुसूची " म ", भाग चार यात विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या उदिमांपैकी कोणत्याही उदीम किंवा अशा कोणत्याही उदिमाशी संबंधित असलेली कोणतीही प्रक्रिया किंवा काम चालवणार नाही किंवा चालवण्यास मुभा देणार नाही किंवा चालवलेली खपवून घेणार नाही ;

(दोन) आयुक्ताच्या मते जो कोणताही उदीम, प्रक्रिया किंवा काम जीवितास, आरोग्यास किंवा मालमत्तेस अपायकारक असेल किंवा ज्या स्वरूपात, किंवा ज्या रीतीने किंवा ज्या परिस्थितीत ते चालवण्याचे योजले असेल किंवा चालवण्यात येत असेल त्या स्वरूपात किंवा रीतीने किंवा त्या परिस्थितीत त्यापासून उपद्रव होण्याचा संभव असेल, असा कोणताही उदीम, प्रक्रिया किंवा काम चालवणार नाही किंवा चालवण्यास मुभा देणार नाही किंवा चालवलेले खपवून घेणार नाही.

(फ) घोड्याच्या नालबंदाचा उदीम किंवा काम [१][बृहन्मुंबईत] चालवणार नाही किंवा त्याकरिता कोणतीही परिवास्तू वापरणार नाही किंवा वापरण्यास मुभा देणार नाही.

(२) राज्य शासनाला, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेअन्वये अनुसूची " म " मध्ये कोणतीही बाब जादा दाखल करता येईल, त्यातील कोणत्याही बाबीत सुधारणा करता येईल, किंवा त्यातील कोणतीही बाब वगळता येईल, आणि लागोलाग, उक्त अनुसूची तदनुसार सुधारण्यात आली आहे असे मानले जाईल. मात्र, अशी सुधारणा करण्यापूर्वी केलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टीस त्यामुळे बाध येणार नाही.

(३) (अ) जर आयुक्ताच्या मते कोणताही पदार्थ [२][किंवा जनावर] ठेवणे किंवा कोणताही उदीम, प्रक्रिया किंवा काम चालवणे हे, पोटकलम (१) चा खंड (ड) किंवा यथास्थिति, खंड (ई) चा परिच्छेद (दोन) याच्या अर्थानुसार धोक्याचे असेल किंवा त्यामुळे उपद्रव होण्याचा संभव असेल तर, आयुक्ताने सही केलेली अशा अर्थाची लेखी नोटीस एखाद्या व्यक्तीवर बजावण्यात आल्यानंतर किंवा ती नोटीस ज्या परिवास्तूसंबंधी असेल त्या परिवास्तूवर लावल्यानंतर असा पदार्थ किंवा जनावर ठेवणे किंवा असा उदीम, प्रक्रिया किंवा काम चालवणे हे धोकादायक आहे किंवा यामुळे उपद्रव होण्याचा संभव आहे हे अशा व्यक्तीस माहीत आहे, असे मानण्यात येईल.

(ब) जर एखादी व्यक्ती, असा पदार्थ [२][किंवा जनावर] ठेवण्याच्या किंवा असा उदीम, प्रक्रिया किंवा काम चालवण्याच्या बाबतीत सहाय्यभूत होईल असे कोणतेही कृत्य करत असेल अथवा ती प्रकर्ता म्हणून किंवा अभिकर्ता, लिपिक, मालक, नोकर, कामगार किंवा कारागीर, पहारेकरी म्हणून किंवा अन्यथा त्यामध्ये कोणत्याही प्रकारे काम करीत असेल किंवा त्याच्याशी तिचा संबंध असेल तर, अशी व्यक्ती, पोटकलम (१), खंड (ड) याच्या अर्थानुसार किंवा यथास्थिति, खंड (ई), परिच्छेद (दोन) च्या अर्थानुसार असा पदार्थ किंवा जनावर ठेवीत आहे किंवा ठेवलेले खपवून घेत आहे किंवा ठेवण्यास मुभा देत आहे किंवा असा उदीम, प्रक्रिया किंवा कामे चालवीत आहे किंवा चालवण्यास मुभा देत आहे, असे मानण्यात येईल.

(४) कोणत्याही परिवास्तूत किंवा परिवास्तूवर कोणताही पदार्थ [२][किंवा जनावर] ठेवणे किंवा कोणताही उदीम, प्रक्रिया किंवा काम चालवणे हे पोटकलम (१), खंड (ड) किंवा खंड (ई) याचा परिच्छेद (दोन) याच्या अर्थानुसार धोक्याचे आहे किंवा त्यामुळे उपद्रव होण्याचा संभव आहे असे आयुक्तास वाटेल तर, त्यास, असा पदार्थ [किंवा जनावर] ठेवणाऱ्या, ठेवलेले खपवून घेणाऱ्या किंवा ठेवण्याची मुभा देणाऱ्या व्यक्तीस लेखी नोटिशीअन्वये, असा धोका किंवा उपद्रव होऊ नये म्हणून अशा नोटिशीत आयुक्त विनिर्दिष्ट करील असे उपाय योजण्यास (त्यात अशी परिवास्तू कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्याचे बंद करणे या गोष्टीचा समावेश होतो) फर्माविता येईल आणि असे उपाय विनिर्दिष्ट केलेल्या अवधीत योजण्यात आले नाहीत तर, आयुक्तास असा पदार्थ [३][किंवा जनावर]

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ११(ब) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ११(क) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

किंवा अशा उदिमाच्या प्रक्रियेच्या किंवा कामाच्या संबंधात वापरण्यात आलेल्या कोणत्याही यंत्रसामग्रीचे किंवा साधनांचे अभिग्रहण करता येईल व ती घेऊन जाता येतील किंवा सीलबंद करता येतील. याप्रमाणे अभिग्रहण केलेला व नेण्यात आलेला किंवा सीलबंद केलेला कोणताही पदार्थ [१][किंवा जनावर] किंवा यंत्रसामग्री किंवा साधन, त्याचे अभिग्रहण करण्यात आल्याच्या तारखेपासून एक महिन्याच्या कालावधीत आयुक्त त्या बाबतीत निश्चित करील अशी रक्कम दिल्यावर आणि अशा पदार्थाचा [१][किंवा जनावराचा], यंत्रसामग्रीचा किंवा साधनाचा पुढे वापर करण्याबाबत किंवा तिची विल्हेवाट करण्याबाबत निर्धारित करण्यात येतील अशा शर्तींच्या अधीनतेने विमोचित करता येईल :

परंतु, जर याप्रमाणे अभिग्रहण करण्यात व नेण्यात आलेला किंवा सीलबंद करण्यात आलेला कोणताही पदार्थ [१][किंवा जनावर] स्फोटक स्वरूपाचा किंवा धोकादायक असेल तर, आयुक्तास लेखी आदेशाअन्वये तो ताबडतोब नष्ट करण्याची किंवा त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे त्याची अन्यथा विल्हेवाट लावण्याची तजवीज करता येईल :

परंतु आणखी असे की, जर याप्रमाणे अभिग्रहण करण्यात आलेला व नेण्यात आलेला किंवा सीलबंद करण्यात आलेला कोणताही पदार्थ [१][किंवा जनावर] किंवा यंत्रसामग्री किंवा साधन, त्यावर मालकाने किंवा ज्या व्यक्तीच्या कब्जात ती आढळून आली असेल अशा व्यक्तीने दावा सांगितला नाही व ती विमोचित केली नाही तर आयुक्तास, लेखी आदेशाअन्वये तो पदार्थ [१][किंवा जनावर] नाशिवंत असेल तर ताबडतोब आणि कोणत्याही इतर बाबतीत एक महिन्याचा उपरोक्त अवधी संपल्यानंतर तो लिलावाअन्वये विकण्याची किंवा त्यास योग्य वाटेल अशा इतर प्रकारे त्याची विल्हेवाट लावण्याची तजवीज करता येईल.

विक्री करून मिळालेले किंवा इतर रीतीने विल्हेवाट केली असल्यास त्यापासून मिळालेले (कोणतेही असल्यास) उत्पन्न, हे, त्यामधून अशी विक्री करण्याचा किंवा विल्हेवाट लावण्याचा परिव्यय वजा केल्यानंतर, विकण्यात किंवा विल्हेवाट लावण्यात आलेला पदार्थ [१][किंवा जनावर] किंवा यंत्रसामग्री किंवा साधन यांच्या मालकास किंवा ते ज्या व्यक्तींच्या कब्जात आढळून आले असेल त्या व्यक्तीस देण्यात येईल.

(५) (अ) आयुक्तास विनिर्दिष्ट करणे योग्य वाटेल असे निर्बंध किंवा योग्य वाटतील अशा शर्ती (कोणत्याही असल्यास) यांच्या अधीनतेने, पोटकलम (१) यात उल्लेखलेले कोणतेही लायसन देणे, किंवा

(ब) सार्वजनिक सुरक्षिततेच्या प्रयोजनासाठी, असे कोणतेही लायसन रोखून ठेवणे, हे आयुक्ताच्या स्वेच्छानिर्णयाधीन असेल :

परंतु, आयुक्त असे कोणतेही लायसन रोखून ठेवताना, ते अशा रीतीने रोखून ठेवण्याबाबतची आपली कारणे लेखी नमूद करील व लायसन अशा रीतीने रोखून ठेवण्याबाबतची कारणे ज्यात नमूद केली असतील असा आपला आदेश संबंधित व्यक्तीला पुरवील :

परंतु आणखी असे की, या पोटकलमाखाली आयुक्ताने दिलेल्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, अशा आदेशाच्या तारखेपासून साठ दिवसांच्या आत, लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाकडे अपील करता येईल आणि अशा न्यायाधीशाचा निर्णय अंतिम असेल.

(६) आयुक्ताने पोटकलम (५) खाली जिला लायसन दिले असेल अशी प्रत्येक व्यक्ती—

(अ) असे लायसन ज्या परिवास्तूसंबंधी असेल अशी कोणतीही परिवास्तू असल्यास तिच्यामध्ये किंवा तिच्यावर ते लायसन ठेवील ;

---

[१] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ११(क) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

(ब) अशा परिवास्तूबाहेर ठळक जागी एक फलक लावून त्यावर त्या परिवास्तूत किंवा परिवास्तूवर ठेवलेल्या पदार्थाचे [1][किंवा जनावराचे] किंवा चालवण्यात येणाऱ्या उदिमाचे किंवा प्रक्रियेचे किंवा कामाचे स्वरूप, त्यासंबंधी कोणतेही महानगरपालिका लायसन असल्यास त्याचा क्रमांक आणि परिवास्तूच्या मालकाचे किंवा भोगवटादाराचे किंवा ती ताब्यात असलेल्या व्यक्तीचे नाव व स्थानिक पत्ता दर्शवील ;

(क) लायसन घेण्याजोग्या प्रत्येक पदार्थाच्या वेष्टणावर किंवा बारदानावर त्याचे नाव, आतील माल व त्याचे धोकादायक स्वरूप दर्शवणारी योग्य खूणचिठ्ठी लावील.

(७) आयुक्तास वेळोवेळी [2][स्थायी समितीच्या] मान्यतेने, कापूस, लोकर, रेशीम, किंवा ताग यांचे सूत कातणाऱ्या किंवा विणणाऱ्या कोणत्याही गिरणीस किंवा इतर कोणत्याही मोठ्या गिरणीस किंवा कारखान्यास या कलमाच्या प्रवर्तनातून विशेष माफी देता येईल.

विवक्षित परिवास्तूंमध्ये किंवा क्षेत्रांमध्ये धोकादायक स्वरूपाच्या विवक्षित वस्तू ठेवण्यास मनाई करण्याचा अधिकार.

**३९४अ.** निकटपूर्वीच्या कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही क्षेत्रातील लोकवस्तीची दाटी व इतर संबंधित गोष्टी विचारात घेता राज्य शासनाचे असे मत झाले असेल की, अनुसूची " म " च्या भाग एक मध्ये नमूद करण्यात आलेली कोणतीही वस्तू इतकी धोकादायक स्वरूपाची आहे की, अशी वस्तू ठेवण्यास मनाई करण्याबाबत अधिसूचना काढणे हे सार्वजनिक सुरक्षिततेच्या दृष्टीने इष्ट होईल तर, त्याबाबतीत राज्य शासनास, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेअन्वये अशा अधिसूचनेत विनिर्दिष्ट करण्यात येतील, अशा कोणत्याही परिवास्तूंमध्ये किंवा परिवास्तूंच्या वर्गास किंवा कोणत्याही एका किंवा अनेक क्षेत्रात अनुसूची " म " च्या भाग एकमध्ये नमूद करण्यात आलेली कोणतीही वस्तू (कायम किंवा विवक्षित कालावधीसाठी) ठेवण्यास किंवा ठेवलेली खपवून घेण्यास किंवा ती वस्तू ठेवण्याची मुभा देण्यास पूर्णपणे किंवा काही शर्तींच्या अधीनतेने वेळोवेळी मनाई करता येईल.]

रासायनिक द्रव्ये वगैरेंच्या योगे पाणी दूषित करण्यास मनाई.

**३९५.** (१) अनुसूची " म " मध्ये विनिर्दिष्ट केलेला कोणताही उदीम करणारी किंवा माल तयार करणारी कोणतीही व्यक्ती—

(अ) महानगरपालिकेच्या मालकीच्या कोणत्याही सरोवरात, तलावात, जलाशयात, हौदात, विहिरीत, नलिकेत, किंवा पाण्यासाठी असलेल्या कोणत्याही वाहिनीत किंवा इतर जागेत किंवा त्याला जोडलेल्या नळात पूर्वोक्तप्रमाणे कोणत्याही अशा उदिमात किंवा माल तयार करण्याच्या क्रियेत निर्माण झालेला कोणताही धुण्याचा पदार्थ किंवा इतर पदार्थ बुद्धिपुरस्सर आणविणार नाही किंवा आणलेला खपवून घेणार नाही किंवा वाहविणार नाही अगर वाहिलेला खपवून घेणार नाही.

(ब) ज्यामुळे कोणत्याही अशा सरोवरातील, तलावातील, जलाशयातील, हौदातील, विहिरीतील, वाहिनीतील, किंवा पाण्यासाठी असलेल्या इतर जागेतील पाणी घाण होईल किंवा दूषित होईल अशा पूर्वोक्तप्रमाणे कोणत्याही व्यापारासंबंधीचे किंवा माल तयार करण्यासंबंधीचे कोणतेही कृत्य बुद्धिपुरस्सर करणार नाही.

(२) आयुक्तास पूर्वोक्तप्रमाणे माल तयार करण्याची कोणतीही कृती किंवा उदीम यांच्याशी संबंध असलेल्या कोणत्याही कामाचे किंवा नळाचे किंवा प्रणालाचे व्यवस्थापन पाहणाऱ्या किंवा त्यावर नियंत्रण असणाऱ्या मालकास किंवा व्यक्तीस चोवीस तासांपेक्षा कमी नसेल इतक्या अवधीची आगाऊ लेखी नोटीस दिल्यानंतर उक्त कामे, नळ, किंवा प्रणाल उघडता किंवा तपासता येतील ;

आणि, अशी तपासणी केल्यावर, उक्त काम, नळ किंवा प्रणाल यांमध्ये असलेल्या किंवा त्यामधून येणाऱ्या कोणत्याही पदार्थामुळे पोट-कलम (१) चे उल्लंघन झाले आहे, असे जर आढळून येईल तर, अशा रीतीने उक्त काम किंवा नळ किंवा प्रणाल उघडण्याचा आणि तपासणीचा खर्च तसेच असे

[1] सन १९७६ महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम ११ (ड) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १५९ अन्वये "महापौरासह परिषदेच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

उल्लंघन होण्यास जी गोष्ट कारणीभूत झाली असेल त्या गोष्टीस आळा घालण्याकरिता आयुक्त स्वेच्छानिर्णयानुसार जी कोणतीही उपाययोजना करण्यास फर्मावील त्या उपाययोजनेचा खर्च अशा कामाचा, नळाचा किंवा प्रणालांचा मालक किंवा त्यांचे व्यवस्थापन करणारी किंवा त्यावर नियंत्रण ठेवणारी व्यक्ती किंवा जिच्या हयगयीमुळे किंवा चुकीमुळे, उक्त पोटकलमांचे उल्लंघन झाले असेल ती व्यक्ती भरील ;

मात्र, जर उक्त पोट-कलमाचे उल्लंघन झालेले नाही असे आढळून येईल तर, उक्त खर्च आणि अशा रीतीने काम किंवा नळ उघडल्यामुळे आणि तपासल्यामुळे झालेल्या कोणत्याही नुकसानीबद्दल आयुक्त भरपाई देईल.

ज्या परिवास्तूत लायसनयोग्य असलेल्या वस्तू ठेवण्यात आल्या असतील किंवा ज्या ठिकाणी उदीम, प्रक्रिया किंवा काम चालविण्यात येत असेल किंवा जेथे मनाई केलेल्या वस्तू ठेवण्यात आलेल्या असतील अशा परिवास्तूंचे निरीक्षण वगैरे करण्याचा अधिकार.

[1][**३९६.** (१) या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही विनिमयाचे किंवा उपविधीचे किंवा काढलेल्या अधिसूचनेचे किंवा या अधिनियमान्वये देण्यात आलेल्या लायसनमधील कोणत्याही शर्तीचे उल्लंघन करण्यात आले आहे किंवा कसे अथवा असे उल्लंघन करण्यात येत आहे किंवा कसे तसेच, कोणत्याही परिवास्तूवर उपद्रव होत आहे किंवा होण्याचा संभव आहे किंवा कसे, याविषयी स्वतःची खात्री करून घेण्यासाठी आयुक्तास, कलम ३९४, किंवा कलम ३९४अ मध्ये नमूद केलेल्या प्रयोजनांकरिता वापरण्यात येत असलेल्या किंवा वापरण्याचा संभव असलेल्या कोणत्याही परिवास्तूत किंवा परिवास्तूवर, आणि ज्या परिवास्तूवर कोणत्याही उदिमाच्या किंवा कोणतीही प्रक्रिया किंवा कोणतेही काम करण्याच्या प्रयोजनार्थ भट्टीचा उपयोग करण्यात येत असेल अशा कोणत्याही परिवास्तूत किंवा परिवास्तूवर आणि / किंवा कोणत्याही भटारखान्यात दिवसा किंवा रात्री कोणत्याही वेळी आणि कोणत्याही प्रकारे नोटीस न देता प्रवेश करता येईल आणि अशा जागेचे निरीक्षण किंवा तपासणी करता येईल आणि कोणतेही पात्र फोडून उघडता येईल आणि त्यातून नमुने घेता येतील किंवा कोणतीही वस्तू ठेवणाऱ्या किंवा ठेवलेली खपवून घेणाऱ्या किंवा ठेवण्याची मुभा देणाऱ्या किंवा कोणताही उदीम चालवणाऱ्या किंवा कोणतीही प्रक्रिया किंवा कोणतेही काम करणाऱ्या किंवा असा उदीम चालवण्यास किंवा अशी प्रक्रिया किंवा काम करण्यास परावनगी देणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस अशा रीतीने ठेवण्यात आलेल्या वस्तूंचे किंवा असा उदीम किंवा अशी प्रक्रिया किंवा असे काम करून, उत्पादन करण्यात आलेल्या वस्तूचे नमुने देण्यास फर्मावता येईल.

(२) जी कोणतीही वस्तू ठेवण्यासाठी कलम ३९४ खाली लायसनची आवश्यकता असेल किंवा कलम ३९४अ खाली मनाई करण्यात आलेली असेल अशी कोणतीही वस्तू किंवा जो कोणताही उदीम चालवण्यासाठी किंवा जी कोणतीही प्रक्रिया किंवा जे कोणतेही काम करण्यासाठी कलम ३९४ खाली लायसन मिळविण्याची आवश्यकता असेल, असा कोणताही उदीम, प्रक्रिया किंवा काम ज्या परिवास्तूत ठेवण्यात, चालवण्यात, किंवा करण्यात येत असेल किंवा तसा संभव असेल अशी कोणतीही परिवास्तू, प्रकर्ता, अभिकर्ता, कारकून, मालक, नोकर, कामगार, कारागीर, पहारेकरी, म्हणून किंवा अन्यथा ती जिच्या ताब्यात असेल अशी प्रत्येक व्यक्ती त्यास आयुक्ताने तोंडी किंवा लेखी फर्माविले असता, आयुक्ताच्या निरीक्षणासाठी किंवा पोट-कलम (१) अन्वये आयुक्ताला दिलेल्या इतर अधिकारांची त्यास अंमलबजावणी करता यावी म्हणून खुली करून देईल.

(३) पोट-कलम (१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांपैकी कोणत्याही अधिकाराचा वापर करताना किंवा अशा अधिकारांची कार्यक्षम रीतीने अंमलबजावणी करण्यासाठी वाजवीरीत्या आवश्यक असलेल्या बळाचा वापर करताना, सद्भावपूर्वक व अपरिहार्यपणे झालेल्या कोणत्याही नुकसानीबद्दल भरपाई मिळण्यासाठी कोणत्याही व्यक्तींविरूद्ध कोणतीही हक्कमागणी करता येणार नाही :

परंतु, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीविरुद्ध किंवा त्याखाली करण्यात आलेल्या काही विनियमाविरुद्ध किंवा उपविधीविरुद्ध किंवा काढलेल्या अधिसूचनेविरुद्ध अपराध करण्यात येत आहे असे सकारण वाटत असल्याखेरीज उपरोक्त प्रयोजनासाठी बळाचा वापर करण्यात येणार नाही.]

परिटांनी कपडे धुण्याच्या बाबतीत, विनियमन करणे.

**३९७.** (१) आयुक्तास, जाहीर नोटिशी अन्वये परिटांनी कपडे धुण्यासाठी आयुक्त ज्या जागा नेमून देतील त्या सोडून इतर जागी त्यांना आपली आजीविका चालवण्यासाठी कपडे धुण्याच्या बाबतीत मनाई करता येईल.

[1] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ३ अन्वये मूळ कलामऐवजी कलम ३९६ दाखल करण्यात आले.

आणि, जेव्हा अशी मनाई करण्यात आली असेल तेव्हा परीट म्हणून जिची आजीविका चालते अशी कोणतीही व्यक्ती खुद्द स्वत:साठी किंवा अशा जागेच्या मालकासाठी किंवा तिच्या भोगवटादारासाठी अशा जागी कपडे धुण्यात येत असतील तर तेवढे सोडून एरव्ही या प्रयोजनासाठी आयुक्ताने नेमून न दिलेल्या कोणत्याही जागी कपडे धुणार नाही.

परिटांसाठी आयुक्ताने धुण्याच्या जागांची तरतूद करणे.

(२) आयुक्त, परिटांनी आपली आजीविका चालवण्यासाठी योग्य जागांची तरतूद करील आणि अशा कोणत्याही जागांचा उपयोग करण्यासाठी आयुक्त, तो [१][स्थायी समितीच्या] मंजुरीने वळोवेळी निर्धारित करील, अशी फी देण्यास फर्मावील.

### बाजार व कत्तलखाने यांची देखभाल व त्यांचे विनियमन

महानगरपालिका बाजार व कत्तलखाने कशास मानावे.

**३९८.** [२][(१)] महानगरपालिकेच्या मालकीचे किंवा महानगरपालिकेने चालवलेले सर्व बाजार व कत्तलखाने यांना " महानगरपालिका बाजार " किंवा " महानगरपालिका कत्तलखाने " असे संबोधण्यात येईल. इतर सर्व बाजार आणि कत्तलखाने " खाजगी " असल्याचे मानले जाईल.

[३][(२) तसेच महानगरपालिकेला, अनुसूची "जज" मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कृषी उत्पन्नाची खरेदी व विक्री करण्यासाठी किंवा त्याचा व्यापार करण्यासाठी बाजार स्थापन करता येईल. महानगरपालिकेस, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने, अनुसूची "जज" मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कृषी उत्पन्नाच्या कोणत्याही बाबींत **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेअन्वये जादा बाबी दाखल करता येतील, त्यात सुधारणा करता येतील किंवा त्या रद्द करता येतील]

नवीन महानगरपालिका बाजार व कत्तलखाने यांची तरतूद.

**३९९.** (१) आयुक्तास, याबाबतीत महानगरपालिका प्राधिकृत करील तेव्हा, नवीन महानगरपालिका बाजार किंवा नवीन महानगरपालिका कत्तलखाना स्थापन करण्याच्या किंवा कोणताही विद्यमान महानगरपालिका बाजार किंवा कत्तलखाना यांची वाढ किंवा सुधारणा करण्याच्या प्रयोजनासाठी कोणतीही इमारत बांधता येईल किंवा कोणतीही इमारत किंवा जमीन खरेदी करता येईल किंवा पट्ट्याने घेता येईल, आणि वेळोवेळी त्यास योग्य वाटतील असे महानगरपालिका बाजार व कत्तलखाने, आणि त्यास योग्य वाटतील अशी विक्रीकेंद्रे, दुकाने, उभ्या छपऱ्या, कोंडवाडे आणि इतर इमारती किंवा अशा महानगरपालिका बाजारांत किंवा कत्तलखान्यात व्यापार किंवा धंदा करणाऱ्या किंवा तेथे कामानिमित्त येणाऱ्या लोकांच्या उपयोगासाठी त्यास योग्य वाटतील अशा सोईच्या जागा बांधता येतील आणि त्या सुस्थितीत राखता येतील ; तसेच अशा महानगरपालिका बाजारात त्यास योग्य वाटतील अशा इमारती, जागा, यंत्रे, वजने आणि तेथे विकलेला माल तोलण्यासाठी आणि मापण्यासाठी तराजू व मापे यांची तरतूद करता येईल आणि ती सुस्थितीत राखता येतील.

(२) महानगरापालिका कत्तलखाने [४][बृहन्मुंबई] त किंवा [५][६][राज्य] शासनाच्या] मंजुरीने [४][बृहन्मुंबई] बाहेर ठेवता येतील.

महानगरपालिका बाजार व कत्तलखाने बंद करता येतील.

**४००.** आयुक्तास, महानगरपालिकेच्या [५][६][राज्य] शासनाच्या] मंजुरीने कोणत्याही वेळी, कोणताही महानगरपालिका बाजार किंवा कत्तलखाना बंद करता येईल, आणि अशा रीतीने बंद केलेल्या कोणत्याही महानगरपालिका बाजाराने किंवा कत्तलखान्याने व्यापलेल्या जागेची विल्हेवाट, ती महानगरपालिकेची मालमत्ता असल्याप्रमाणे करता येईल.

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १६० अन्वये " प्रभारी सदस्यांच्या " या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५४, कलम ९ अन्वये कलम ३९८ ला त्या कलमाचे पोटकलम (१) असा फेरक्रमांक देण्यात आला.

[३] वरील अधिनियमाअन्वये हे पोट कलम जादा दाखल करण्यात आले.

[४] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४(१) अन्वये " ग्रेटर बॉम्बे " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[५] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " शासन " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[६] विधि अनुकूलन आदेश, १९५० याअन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

**४०१.** (१) कोणतीही व्यक्ती, आयुक्ताने दिलेल्या लायसन वाचून, कोणतेही जनावर किंवा वस्तू, कोणत्याही महानगरपालिका बाजारात विकणार नाही किंवा विक्रीसाठी ठेवणार नाही.

आयुक्ताने दिलेल्या लायसन वाचून महानगरपालिका बाजारात विक्री करण्यास मनाई.

(२) आयुक्त किंवा कोणताही महानगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी यांना या कलमाचे उल्लंघन करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस विनासोपस्कार घालवून लावता येईल.

**४०२.** (१) [१][बृहन्मुंबई] मध्ये किंवा [१][बृहन्मुंबई] च्या कोणत्याही विनिर्दिष्ट केलेल्या भागांशामध्ये नवीन खाजगी बाजार स्थापन करण्यास परवानगी द्यावी किंवा कसे, हे महानगरपालिका वेळोवेळी ठरवील.

नवीन खाजगी बाजार उघडणे.

(२) कोणतीही व्यक्ती मानवी आहारासाठी असलेली जनावरे किंवा मानवी आहाराचे इतर कोणतेही पदार्थ विक्रीसाठी किंवा विक्रीस मांडून ठेवण्यासाठी आयुक्तांची मंजुरी असेल ते खेरीज करून एरव्ही नवीन खाजगी बाजार स्थापन करणार नाही. आयुक्त, अशी मंजुरी देताना पोट-कलम (१) खाली त्या त्या वेळी अंमलात असलेल्या महानगरपालिकेच्या निर्णयाचा आपल्या मार्गदर्शनासाठी उपयोग करील. [२][या पोट-कलमाच्या प्रयोजनाकरिता, ज्या जागेत एखादा खाजगी बाजार स्थापन करण्यात आला असेल अशा जागेच्या मालकाने, किंवा अशा भोगवटादाराने असा बाजार स्थापन केला आहे असे मानण्यात येईल.]

(३) जेव्हा एखादा नवीन खाजगी बाजार स्थापन करण्यास याप्रमाणे मंजुरी देण्यात आली असेल तेव्हा आयुक्त, अशा मंजुरीची नोटीस इंग्रजी, मराठी, गुजराती, [३][हिंदी] व उर्दू या भाषांत असा बाजार भरविण्यात येईल अशा इमारतीवरील किंवा इमारतीजवळील किंवा अशा जागेवरील किंवा अशा जागेजवळील एखाद्या ठळक भागावर लावण्यास भाग पाडील.

**४०३.** (१) कोणतीही व्यक्ती याबाबतीत आयुक्ताने दिलेल्या लायसन वाचून किंवा त्याने दिलेल्या लायसनच्या अटींत अनुसरून असेल त्याच्याव्यतिरिक्त अन्यथा—

[४][लायसन वाचून खाजगी बाजार उघडे न ठेवणे आणि कोणतीही जागा कत्तलखाना म्हणून न वापरणे किंवा वापरण्याची परवानगी न देणे.]

(अ) खाजगी बाजार उघडे ठेवणार नाही, [५][किंवा उघडे ठेवण्यास परवानगी] देणार नाही ;

(ब) [१][बृहन्मुंबई] तील कोणतीही जागा, कत्तलखाना म्हणून वापरणार नाही किंवा मानवी आहारासाठी योजिलेल्या कोणत्याही जनावरांची कत्तल करण्यासाठी ती वापरणार नाही [५][किंवा वापरण्यास परवानगी देणार नाही] ;

(क) [१][बृहन्मुंबई] बाहेरील कोणतीही जागा कत्तलखाना म्हणून किंवा अन्यथा [१][बृहन्मुंबई] मध्ये खप करावयाच्या मानवी आहारासाठी योजिलेल्या कोणत्याही जनावरांची कत्तल करण्यासाठी वापरणार नाही [५][किंवा वापरण्यास परवानगी देणार नाही].

(२) परंतु—

(ड) एखाद्या खाजगी बाजाराच्या मालकाने या अधिनियमाच्या एखाद्या तरतुदीचे पालन करण्यात किंवा कलम ४०६ खाली तयार केलेल्या व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही विनियमाचे किंवा या अधिनियमाखाली तयार केलेल्या व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही उपविधीचे अनुपालन करण्यात कसूर केली आहे या कारणाव्यतिरिक्त इतर कोणत्याही कारणास्तव, आयुक्त, असा बाजार उघडा ठेवण्यासाठी लायसन देण्याचे नाकारणार नाही, किंवा दिलेले लायसन रद्द किंवा निलंबित करणार नाही, आणि तो कोणतेही असे लायसन [७][स्थायी समितीच्या] मान्यतेखेरीज रद्द करणार नाही किंवा निलंबित करणार नाही.

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४(१) अन्वये " ग्रेटर बॉम्बे " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ३९ अन्वये हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ४६ अन्वये हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०, कलम १६ अन्वये मूळ समास टीपेऐवजी ही समासटीप दाखल करण्यात आली.

[५] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ४० अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[६] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०, कलम १६(१) अन्वये " शहर " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[७] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १६१ अन्वये " महापौरांसह परिषदेच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][(डड) खाजगी बाजारातील कोणतेही विक्री केंद्र, दुकान, उभी छपरी, कोंडवाडा किंवा इतर जागा हिचा भोगवटा किंवा वापर करण्याबद्दल कोणत्याही व्यक्तीकडून बाजाराच्या मालकास किंवा त्याच्या अभिकर्त्यास मिळालेले कोणतेही भाडे, फी किंवा दिलेली इतर रक्कम याबद्दल लेखी पावती त्यांच्या लायसनच्या शर्तीनुसार देण्यात मालक कसूर करील तर, आयुक्तास [२][स्थायी समितीच्या] पूर्वमान्यतेने असे कोणतेही लायसन रद्द करता येईल किंवा निलंबित करता येईल ;]

(ई) कोणत्याही उत्सवाच्या प्रसंगी, किंवा समारंभाच्या वेळी, किंवा खास परिस्थितीमध्ये, आयुक्ताला योग्य वाटेल अशा कोणत्याही जागेत एखाद्या जनावराची कत्तल करण्यासाठी लेखी परवानगी देण्यास या कलमातील कोणत्याही तरतुदीमुळे आयुक्ताला प्रतिबंध होतो असे मानले जाणार नाही.

[३][(फ) व्यापारी किंवा खाजगी बाजाराचा मालक किंवा यथास्थिति, कत्तलखान्याचा मालक त्याच्या जागेची स्वच्छता ठेवण्याकरिता योग्य ती उपाययोजना करत नसेल किंवा बाजारातील केरकचरा तसेच मृत जनावराची कलेवरे यांची विल्हेवाट योग्य रीतीने लावत नसेल तर आयुक्त साठ दिवसांपेक्षा जास्त नसेल एवढ्या कालावधीसाठी त्या व्यापाऱ्याचे, खाजगी बाजाराच्या किंवा कत्तलखानाच्या मालकाचे लायसन निलंबित करू शकेल.]

[४][(२अ) पोट-कलम (१), खंड (ब) किंवा (क) च्या तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या एखाद्या व्यक्तीच्या कब्जात मानवी आहारासाठी असलेले कोणतेही जनावर किंवा मांस आढळले तर आयुक्तास किंवा महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास किंवा कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास, त्याचे अभिग्रहण करता येईल आणि आयुक्त निदेश देईल त्याप्रमाणे असे जनावर किंवा मांस विकता येईल किंवा त्याची अन्यथा विल्हेवाट लावता येईल. अशी विक्री करून जे कोणतेही उत्पन्न येईल ते महानगरपालिकेच्या मालकीचे होईल.

(२ब) मानवी आहारासाठी, जनावरांची कत्तल करण्यासाठी जी जागा नेहमी वापरली जात असेल त्या जागेचा मालक किंवा भोगवटादाराने अशी जागा आपल्या नकळत याप्रमाणे वापरण्यात आली असे सिद्ध केलेले नसेल तर या कलमाच्या प्रयोजनांकरिता, त्याने अशी जागा जनावरांची कत्तल करण्यासाठी वापरली किंवा वापरण्यास परवानगी दिली, असे मानण्यात येईल.]

(३) जेव्हा खाजगी बाजार उघडा ठेवण्यासाठी कोणतेही लायसन देण्याचे आयुक्त नाकारील, ते रद्द करील किंवा निलंबित करील तेव्हा, तो तसे केल्याची नोटीस इंग्रजी, मराठी, गुजराथी, [५][हिंदी] व उर्दू या भाषांमध्ये जेथे असा बाजार भरवण्यात आला असेल त्या इमारतीवरील किंवा त्या जागेवरील किंवा तिच्याजवळील एखाद्या ठळक भागावर लावण्याची तजवीज करील.

अनधिकृत खाजगी बाजारात विक्री करण्यास मनाई.

**४०४.** कोणत्याही खाजगी बाजार आयुक्ताच्या मंजुरीवाचून स्थापन करण्यात आला आहे, किंवा तो उघडा ठेवण्यासाठी लागणारे लायसन आयुक्ताने नाकारल्यानंतर, रद्द केल्यानंतर, किंवा निलंबित केल्यानंतर, तो बाजार उघडा ठेवण्यात आला आहे हे माहीत असणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला कोणतेही जनावर किंवा खाद्य पदार्थ, त्या बाजारात विकत किंवा विक्रीसाठी ठेवता येणार नाही.

खाजगी बाजाराच्या इमारतीत व कत्तलखान्यांत योग्यरीत्या फरसबंदी करण्यास व नाल्या बांधण्यास फर्मावण्याबाबत तरतूद.

**४०५.** आयुक्तास, लेखी नोटीशीअन्वये कोणत्याही खाजगी बाजाराच्या किंवा कत्तलखान्याच्या मालकास, मक्तेदारास किंवा भोगवटादारास पुढील गोष्टी करण्याची तजवीज करण्यास फर्माविता येईल—

(अ) बाजाराच्या इमारतीच्या, बाजाराच्या जागेच्या किंवा कत्तलखान्याच्या संपूर्ण जमिनीत किंवा तिच्या कोणत्याही भागांशात घडीव दगडांनी किंवा इतर योग्य सामग्रीने फरसबंदी करणे ;

(ब) बाजाराची इमारत, बाजाराची जागा किंवा कत्तलखाना यामध्ये किंवा यांमधून, आयुक्ताला आवश्यक वाटेल अशा सामग्रीच्या आकाराच्या व वर्णनाच्या, अशा पातळीवर व असे उत्सर्जी मार्ग असणाऱ्या नाल्या बांधणे.

---

[१] सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२, कलम १२ अन्वये खंड (डड) समाविष्ट करण्यात आला.
[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १६१ अन्वये ' महापौरांसह परिषदेच्या ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[३] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १९२ (ब) अन्वये हा खंड जादा दाखल करण्यात आला.
[४] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४, कलम १६ अन्वये पोट-कलमे (२अ) व (२ब) समाविष्ट करण्यात आली.
[५] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ४७ अन्वये हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

**४०६.** [१][महानगरपालिकेस] [२][आयुक्तास वेळोवेळी स्थायी समितीच्या मान्यतेने] पुढील गोष्टींसंबंधात, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीशी किंवा या अधिनियमाखाली केलेल्या व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही उपविधीशी विसंगत नसतील असे विनियम करता येतील— बाजार व कत्तलखाने यांच्याकरिता विनियम तयार करणे.

(अ) कोणत्याही बाजार-इमारतीत, बाजार-जागी किंवा कत्तलखान्यात किंवा त्याकडे जाण्याच्या पोचमार्गात उपद्रव किंवा अडथळा होऊ न देणे ;

(ब) ज्या दिवशी व ज्यावेळी व ज्या वेळांमध्ये कोणताही बाजार भरवण्यात किंवा उघडा ठेवण्यात येईल किंवा कोणताही कत्तलखाना उपयोगासाठी उघडा ठेवण्यात येईल ते दिवस व त्या वेळा निश्चित करणे ;

(क) प्रत्येक बाजार-इमारत, बाजार-जागा आणि कत्तलखाना स्वच्छ व योग्य स्थितीत ठेवणे आणि त्यातून गदळ व कचरा काढून टाकणे ;

(ड) कोणतीही बाजार-इमारत, बाजार-जागा किंवा कत्तलखाना यांत वायुवीजनाची योग्य सोय करणे आणि पुरेशा पाणीपुरवठ्याची तरतूद करणे ;

(ई) बाजाराच्या इमारतींत व बाजार-जागांत लोकांना दुकानांच्या मधून सोईस्करपणे जाता येईल अशी पुरेशा रुंदीच्या मार्गांची तरतूद करणे ;

[३][(फ) कोणत्याही बाजार-इमारतीत किंवा बाजार-जागेत अनुसूची "जज" मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कृषी उत्पन्नाच्या खरेदीचे व विक्रीचे व व्यापारासंबंधीच्या शर्तीचे विनियमन करणे.]

**४०७.** आयुक्तास— महानगरपालिका बाजार व कत्तलखाने यांवर विक्री केंद्र आकार, भाडे व फी बसवणे.

(अ) महानगरपालिका बाजारातील किंवा कत्तलखान्यातील कोणतेही विक्री केंद्र, दुकान, उभी छपरी, किंवा कोंडवाडा यांचा भोगवटा किंवा वापर करण्याबद्दल आणि महानगरपालिका बाजारात विक्रीसाठी माल मांडण्याच्या हक्काबद्दल आणि अशा कोणत्याही बाजारात विकलेला माल तोलण्याबद्दल व मापण्याबद्दल आणि कोणत्याही महानगरपालिका कत्तलखान्यात जनावरांची कत्तल करण्याच्या हक्काबद्दल या बाबतीत आयुक्ताने [४][स्थायी समितीच्या] मान्यतेने वेळोवेळी निश्चित केलेले विक्री केंद्र आकार, भाडे आणि फी आकारता येईल ; अथवा

(ब) [४][स्थायी समितीच्या] मान्यतेने, पूर्वोक्तप्रमाणे बसवण्याजोगा विक्री केंद्र आकार, भाडे व फी किंवा तिचा कोणताही भागांश एकावेळी एका वर्षापेक्षा अधिक नसेल अशा कोणत्याही कालावधीपर्यंत मक्त्याने देता येईल ; अथवा

(क) महानगरपालिका बाजारातील किंवा कत्तलखान्यातील कोणतेही विक्रीकेंद्र, दुकान, उभी छपरी, किंवा कोंडवाडा यांचा भोगवटा किंवा वापरण्याचा विशेषाधिकारान्वये त्याला योग्य वाटेल अशा अवधीसाठी आणि अशा शर्तीवर जाहीर लिलावात काढता येईल किंवा [४][स्थायी समितीच्या] मान्यतेने, त्या विशेषाधिकारान्वये खाजगीरीत्या विक्री करून विल्हेवाट करता येईल.

---

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १९३ अन्वये " आयुक्तास वेळोवेळी स्थायी समितीच्या मान्यतेने " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १६२ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५४, कलम १० अन्वये हा खंड जादा दाखल करण्यात आला.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १६३ अन्वये ' महापौरांसह परिषदेच्या ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

कोणत्याही महानगर-पालिका कत्तलखान्यातून, बाजारातून किंवा परिवास्तूतून जिवंत गुरे, मेंढ्या, बकरे किंवा डुकरे काढून नेणे.

[१][**४०७अ.** (१) कोणत्याही व्यक्तीला आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून आणि [२][महानगरपालिकेने विहित केली असेल] अशी फी दिल्यावाचून कोणत्याही महानगरपालिका कत्तलखान्यातून, किंवा अशा कत्तलखान्यासाठी किंवा त्याच्या वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा इरादा असलेल्या कोणत्याही महानगरपालिका बाजारातून किंवा परिवास्तूतून कोणतीही जिवंत गुरे, मेंढ्या, बकरे किंवा डुकरे काढून नेता येणार नाही :

परंतु, जे कोणतेही जनावर अशा कत्तलखान्यात, बाजारात किंवा परिवास्तूत विकण्यात आलेले नसेल आणि जे अशा कत्तलखान्यात, बाजारात किंवा परिवास्तूत, याबाबत [३][महानगरपालिकेने] दिलेल्या आदेशान्वये विहित केलेल्या कालावधीपेक्षा अधिक कालावधीपर्यंत अशा कत्तलखान्यात, बाजारात किंवा परिवास्तूत नसेल किंवा जे या अधिनियमाखाली केलेल्या कोणत्याही उपविधीस अनुसरून, अशा कत्तलखान्यात, बाजारात किंवा परिवास्तूत कत्तलीस अयोग्य म्हणून नाकारण्यात आले असेल असे कोणतेही जनावर काढून नेण्यासाठी अशा परवानगीची आवश्यकता असणार नाही.

(२) पांजरपोळात नेलेल्या कोणत्याही जनावराच्या संबंधात पोट-कलम (१) खालील परवानगीसाठी दिलेली कोणतीही फी, याबाबत [४][महानगरपालिकेने] दिलेल्या आदेशाच्या अधीनतेने, पांजरपोळ प्राधिकाऱ्याकडून त्यांनी असे जनावर आपल्या ताब्यात घेतले आहे अशा अर्थाचे प्रमाणपत्र सादर केल्यानंतर, परत करण्यात येईल.]

विनियम आणि विक्री केंद्र आकार, भाडे यांचा तक्ता बाजारात आणि कत्तलखान्यात प्रदर्शित करणे.

**४०८.** (१) विनियमांची आणि कोणत्याही बाजारात किंवा कत्तलखान्यात [५][कलम ४०६, ४०७ व ४०७अ] खाली कोणतेही विक्रीकेंद्र आकार, भाडे व फी अंमलात असल्यास त्याच्या तक्त्याची इंग्रजी, मराठी, गुजराती, [६][हिंदी] व उर्दू या भाषेतील छापील प्रत बाजार-इमारतीत बाजार-जागेत किंवा कत्तलखान्यात ठळक जागी लावण्यात येईल.

(२) याप्रमाणे लावलेली कोणत्याही विनियमाची किंवा तक्त्याची कोणतीही प्रत कोणतीही व्यक्ती प्राधिकारावाचून नष्ट करणार, खाली ओढणार किंवा खराब करणार किंवा विरूपित करणार नाही.

उपविधीचे किंवा विनियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींना निर्यापित करण्याचा अधिकार.

**४०९.** आयुक्तास, कोणत्याही महानगरपालिका बाजारात किंवा कत्तलखान्यात या अधिनियमाखाली केलेले उपविधी किंवा कलम ४०६ खाली केलेले विनियम यांपैकी त्या त्या वेळी अंमलात असलेला कोणताही उपविधी किंवा विनियम याचे उल्लंघन केल्याबद्दल ज्या कोणत्याही व्यक्तीस किंवा ज्या कोणत्याही व्यक्तीच्या नोकरांस सिद्धापराध ठरविण्यात आले असेल त्यास अशा कोणत्याही महानगरपालिका बाजारातून किंवा कत्तलखान्यातून निर्यापित करता येईल. तसेच त्यास अशा व्यक्तीस, तिने स्वतः किंवा आपल्या नोकरांकरवी अशा बाजारात किंवा कत्तलखान्यात कोणताही

---

[१] सन १९३६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ७ अन्वये नवीन कलम ४०७अ समाविष्ट करण्यात आले.

सन १९३६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम १० पुढीलप्रमाणे आहे :—

"मुंबई शहर नगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९३६ (१९३६ चा मुंबई १२) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही आयुक्ताने उक्त अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी, कोणत्याही नगरपालिका कत्तलखान्यातून किंवा कत्तलखान्याकरिता किंवा त्यासंबंधात वापरण्यात येणाऱ्या किंवा वापरण्याचा इरादा असणाऱ्या कोणत्याही नगरपालिका बाजारातून अथवा परिवास्तूतून कोणतीही गुरेढोरे, मेंढ्या, बकरे किंवा डुकरे काढून नेण्यासाठी आपली लेखी परवानगी घेण्यास फर्माविणे आणि अशी परवानगी देण्याबद्दल फी आकारणे व निश्चित करणे हे नेहमीकरिता विधिसंमत असल्याचे मानले जाईल (पहा १९३६ चा मुंबई १२, कलम १०)."

[२] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम १९५(अ) (एक) अन्वये 'आयुक्ताने विहित केले असेल ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १९५(अ)(दोन) अन्वये " आयुक्ताने " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १९५(ब) अन्वये " आयुक्ताने " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९३६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ८ अन्वये "शेवटची दोन पूर्ववर्ती कलमे" या शब्दाऐवजी "कलमे ४०६, ४०७ व ४०७अ" हे शब्द, आकडे, अक्षर दाखल करण्यात आले.

[६] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ४८ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

व्यापार किंवा धंदा इतःपर चालविण्यास किंवा त्यातील कोणतेही विक्रीकेंद्र, दुकान, स्टँडिंग छपरी, कोंडवाडा किंवा इतर जागा हिचा भोगवटा करण्यास प्रतिबंध करता येईल आणि असे कोणतेही दुकान, स्टँडिंग छपरी, कोंडवाडा किंवा इतर जागा यांच्या बाबतीत अशा व्यक्तीचा जो कोणताही पट्टा किंवा वहिवाट असेल तो पट्टा किंवा वहिवाट संपविता येईल.

**बाजाराबाहेर खाद्य पदार्थांची विक्री करणे [१][किंवा ते पुरवणे]**

**४१०.** (१) यात यापुढे तरतूद केली असेल त्याखेरीज एरव्ही कोणतीही व्यक्ती आयुक्ताकडून लायसन घेतल्यावाचून महानगरपालिका किंवा खाजगी बाजाराखेरीज कोणत्याही जागी मानवी अन्नासाठी योजिलेले कोणतेही चतुष्पाद जनावर किंवा कोणतेही मांस किंवा मासे [२][विकणार किंवा पुरविणार नाही किंवा विक्रीकरिता पुरवण्यासाठी मांडणार नाही].

बाजाराखेरीज इतरत्र जनावरे. वगैरे विकण्यास [३][किंवा पुरवण्यास] मनाई.

(२) परंतु, पोट-कलम (१) मधील कोणतीही गोष्ट, जे ताजे मासे समुद्रात पकडल्यानंतर परस्पर जलयानातून समुद्र किनाऱ्यावर आणण्यात आले असतील त्या जलयानावर विकलेल्या व विक्रीसाठी मांडलेल्या ताज्या माशांच्या बाबतीत लागू होणार नाही.

**खाटीक, वगैरेंना लायसन देणे**

**४११.** कोणतीही व्यक्ती याबाबतीत आयुक्ताने दिलेल्या लायसनवाचून किंवा दिलेल्या लायसनच्या अटीस अनुसरून असेल त्याहून अन्यथा,—

खाटीक व जनावरांचे मांस [६][विकणाऱ्या किंवा पुरवणाऱ्या] व्यक्तींना लायसन देणे.

(अ) [४][बृहन्मुबंईतील] किंवा कोणत्याही महानगरपालिका कत्तलखान्यात खाटकाचा धंदा चालवणार नाही ;

(ब) [४][बृहन्मुबंईतील] कोणतीही जागा, मानवी अन्नासाठी योजिलेल्या कोणत्याही जनावरांच्या मांसाची [५][विक्री किंवा पुरवठा करण्यासाठी] किंवा [४][बृहन्मुबंईच्या] बाहेरील कोणतीही जागा अशा मांसाची [४][बृहन्मुबंईतील] खपासाठी [५][विक्री किंवा पुरवठा करण्यासाठी] वापरणार नाही.

[७][**४१२.** (१) कोणतीही व्यक्ती आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून, मानवी अन्नासाठी असलेली कोणतीही गुरे,मेंढ्या, बकरे किंवा डुकरे [४][बृहन्मुबंईत] आणणार नाही किंवा या अधिनियमाखाली चालविण्यात येत नसलेल्या किंवा लायसन न दिलेल्या कोणत्याही कत्तलखान्यात किंवा जागी कत्तल केलेल्या कोणत्याही अशा जनावरांचे मांस शहरात अणणार नाही.

परवानगी-वाचून [८][बृहन्मुबंईत] गुरे, वगैरेची आयात करण्यास मनाई.

(१अ) कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास, पोट-कलम (१) चे उल्लंघन करून कोणतेही जनावर किंवा मांस [४][बृहन्मुबंईत] आणणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस अधिपत्रावाचून अटक करता येईल.

---

[१] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४, कलम १७ (२) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १७(१) अन्वये मूळ शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १७(३) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(१) अन्वये " ग्रेटर बॉम्बे " या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आले.

[५] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४, कलम १८ (१) अन्वये मूळ शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[६] वरील अधिनियमाच्या कलम १८ (२) अन्वये मूळ शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[७] सन १९११ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम १६ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[८] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची अन्वये " ग्रेटर बॉम्बे " या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) या कलमाचे उल्लंघन करून [१][बृहन्मुंबईत] आणलेले कोणतेही जनावर, आयुक्तास किंवा कोणत्याही महानगरपालिका अधिकाऱ्यास किंवा कोणत्याही कर्मचाऱ्यास सक्तीने ताब्यात घेता येईल आणि आयुक्तास किंवा महानगरपालिका अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास किंवा कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास किंवा रेल्वेच्या परिवास्तूत किंवा रेल्वेच्या परिवास्तूवर रेल्वेच्या कोणत्याही कर्मचाऱ्यास या कलमाचे उल्लंघन करून [१][बृहन्मुबंईत] आणलेले कोणतेही मांस, सक्तीने ताब्यात घेता येईल आणि अशा रीतीने सक्तीने ताब्यात घेतलेले कोणतेही जनावर किंवा मांस विकता येईल किंवा आयुक्त निदेश देईल त्यानुसार त्याची अन्यथा विल्हेवाट लावता येईल. त्यापासून कोणतेही उत्पन्न मिळाल्यास, ते महानगरपालिकेच्या मालकीचे होईल.

(३) या कलमातील कोणतीही गोष्ट, खारवलेल्या किंवा परिरक्षित केलेल्या मांसाच्या बाबतीत लागू होणार नाही.]

दूध, वगैरेंचा व्यापार करण्यासाठी लायसन आवश्यक असणे.

[२][**४१२अ.** कोणतीही व्यक्ती, याबाबतची आयुक्ताने दिलेल्या लायसनवाचून किंवा त्याच्या अटींस अनुसरून असेल त्याहून अन्यथा—

(अ) [१][बृहन्मुबंईत] दूध, [३][लोणी [४][तूप] किंवा इतर दुग्धजन्य पदार्थ] यांचा व्यापार करणे किंवा ते आयात करणे किंवा त्यांची विक्री करणे किंवा ते फेरीने विकणे यासंबंधीचा व्यापार किंवा धंदा करणार नाही.]

(ब) [४][बृहन्मुबंई] तील कोणतीही जागा दूध [३][लोणी [४][तूप] किंवा इतर दुग्धजन्य पदार्थ] विकण्यासाठी वापरणार नाही.

### विक्री वगैरेच्या जागेचे निरीक्षण

या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करून ज्या कोणत्याही जागेत जनावरांची कत्तल करण्यात येत असल्याचा किंवा मांसाची विक्री करण्यात येत असल्याचा संशय असेल, अशा जागेत आयुक्तास प्रवेश करता येईल.

**४१३.** (१) जर, या अधिनियमाच्या तरतुदींखाली रीतसर प्राधिकृत न केलेल्या कोणत्याही जागेत किंवा कोणत्याही रीतीने मानवी अन्नासाठी असलेल्या कोणत्याही जनावरांची कत्तल करण्यात येत आहे किंवा कोणत्याही अशा जनावराच्या मांसाची विक्री करण्यात येत आहे, किंवा ते विक्रीसाठी मांडण्यात येत आहे असे आयुक्तास सकारण वाटेल तर त्यास, नोटीस न देता या अधिनियमाच्या किंवा या अधिनियमाखाली केलेल्या व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही उपविधीच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन होत आहे किंवा कसे याविषयी स्वतःची खात्री करून घेण्याच्या प्रयोजनासाठी कोणत्याही वेळी दिवसा अगर रात्री अशा कोणत्याही जागेत प्रवेश करता येईल.

(२) अशा कोणत्याही प्रवेशामुळे किंवा असा प्रवेश करण्यासाठी आवश्यक अशा कोणत्याही बळाचा उपयोग केल्यामुळे अपरिहार्यपणे झालेल्या कोणत्याही नुकसानीबद्दल, कोणत्याही व्यक्तीविरुद्ध भरपाई मिळण्यासाठी कोणतीही हक्कमागणी करता येणार नाही.

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(१) अन्वये " ग्रेटर बॉम्बे " या मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९२३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम ७ अन्वये कलम ४१२ अ समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९१६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम ८ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२, कलम १३ अन्वये " तूप " हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

मानवी आहारासाठी विक्रीस मांडण्यात आलेल्या पदार्थांचे निरीक्षण करण्याकरिता आयुक्ताने तरतूद करणे.

**४१४.** विक्रीसाठी मांडलेली किंवा फेरीवर नेलेली, किंवा विक्रीच्या प्रयोजनाकरिता किंवा विक्रीचा माल तयार करण्याकरिता कोणत्याही जागी ठेवलेली किंवा आणलेली मानवी आहारासाठी किंवा औषधासाठी योजिलेली जनावरे, मढी, मांस, कुक्कुट, शिकार, सागुती, मासे, फळे, भाजीपाला, धान्य, पाव, पीठ, दूध, तूप, लोणी आणि कोणतेही इतर पदार्थ, यांचे सातत्याने आणि दक्षतेने निरीक्षण करण्यासाठी तरतूद करणे हे आयुक्ताचे कर्तव्य असेल, आणि ते विक्रीसाठी मांडण्यात आले नव्हते किंवा फेरीवर नेले नव्हते, किंवा कोणत्याही अशा प्रयोजनांसाठी ठेवण्यात किंवा आणण्यात आले नव्हते किंवा मानवी आहारासाठी अथवा औषधासाठी योजण्यात आले नव्हते हे सिद्ध करण्याची जबाबदारी दोषारोप करण्यात आलेल्या पक्षावर असेल.

अहितकारक पदार्थ, वगैरेंचे अभिग्रहण करणे.

**४१५.** (१) आयुक्तास, पूर्वोक्तप्रमाणे कोणतेही असे जनावर किंवा पदार्थ आणि असे पदार्थ तयार करण्यासाठी, निर्माण करण्यासाठी किंवा ठेवण्यासाठी वापरलेले कोणतेही पात्र किंवा भांडे याचे सर्व वाजवी वेळी निरीक्षण व तपासणी करता येईल.

(२) असे कोणतेही जनावर किंवा पदार्थ हा, यथास्थिति रोगट किंवा सडलेला किंवा अहितकारक किंवा मानवी आहारासाठी अथवा औषधासाठी अयोग्य आहे असे किंवा तो जसा आहे म्हणून दर्शविण्यात आले असेल तसा तो नाही असे, किंवा असे कोणतेही पात्र किंवा भांडे हे, त्यामध्ये तयार करावयाचा, निर्माण करावयाचा किंवा ठेवावयाचा कोणताही पदार्थ ज्यायोगे अहितकारक किंवा यथास्थिति मानवी आहारासाठी अथवा औषधासाठी अयोग्य होईल अशा प्रकारचा किंवा अशा स्थितीत आहे असे आयुक्तास आढळून येईल तर त्यास, असे जनावर, पदार्थ, पात्र किंवा भांडे यांचे यानंतर तरतूद करण्यात आलेल्या रीतीने त्याची व्यवस्था लावण्याकरिता अभिग्रहण करता येईल किंवा ते घेऊन जाता येईल [१][आणि त्यास असे कोणतेही जनावर किंवा पदार्थ जिच्या ताब्यात असेल अशा कोणत्याही व्यक्तीला अटक करता येईल आणि तिला सर्वात जवळच्या पोलीस ठाण्यात नेता येईल].

[२]* * * * * *

कलम ४१५ खाली अभिग्रहण केलेल्या नाशिवंत पदार्थांची विल्हेवाट लावणे.

**४१६.** निकटपूर्वीच्या कलमाखाली जर कोणतीही सागुती, मासे, भाजीपाला किंवा इतर नाशिवंत स्वरूपाचा पदार्थ यांचे अभिग्रहण करण्यात येईल आणि जर तो आयुक्ताच्या मते, यथास्थिति, रोगट, सडलेला, अहितकारक किंवा मानवी आहारासाठी अथवा औषधासाठी अयोग्य असेल तर, आयुक्त, तो पुन्हा विक्रीसाठी मांडता येणार नाही, किंवा मानवी आहारासाठी अथवा औषधासाठी वापरता येणार नाही, अशा रीतीने तो ताबडतोब नष्ट करण्याची तजवीज करील आणि त्याचा खर्च, असा पदार्थ अभिग्रहण करण्यात आला त्यावेळी तो ज्या व्यक्तीच्या कब्जात असेल ती व्यक्ती देईल.

---

[१] सन १९१३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम ८अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १८९९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २ अन्वये कलम ४१५ नंतर जादा दाखल केलेले स्पष्टीकरण हे सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम १५ अन्वये निरसित करण्यात आले.

कलम ४१५ खाली अभिग्रहण केलेली जनावरे व नाशिवंत नसलेले पदार्थ यांची विल्हेवाट लावणे.

**४१७.** (१) कलम ४१५ खाली अभिग्रहण केलेले कोणतेही जनावर व नाशिवंत नसलेला कोणताही पदार्थ व कोणतेही पात्र किंवा भांडे ही इलाखा शहर दंडाधिकाऱ्यापुढे ताबडतोब नेण्यात येईल.

(२) असे कोणतेही जनावर किंवा पदार्थ यथास्थिति, रोगट, सडलेला किंवा अहितकारक आहे किंवा तो मानवी आहारासाठी अथवा औषधासाठी अयोग्य आहे किंवा ते जनावर अगर पदार्थ जसा आहे म्हणून दर्शविण्यात आला असेल तसा नाही किंवा असे पात्र अथवा भांडे पूर्वोक्त प्रकारचे आहे किंवा पूर्वोक्त स्थितीत आहे असे अशा दंडाधिकाऱ्यास आढळून आले तर आणि जर [१][असे जनावर], पूर्वोक्त स्थितीत आहे असे अशा दंडाधिकाऱ्यास आढळून आले तर; [१][अशा दंडाधिकाऱ्यास, असे जनावर, पदार्थ, पात्र किंवा भांडे हे त्याचे अभिग्रहण करण्यात आले त्यावेळी ज्या व्यक्तीच्या कब्जात होते त्या व्यक्तीच्या खर्चाने, असे जनावर किंवा पदार्थ पुन्हा किंवा पुनः विक्रीसाठी काढण्यास किंवा फेरीने विकण्यास किंवा त्यांचा मानवी आहारासाठी किंवा औषधासाठी उपयोग करण्यास प्रतिबंध होईल अशा रीतीने किंवा अशा पात्राचा किंवा भांड्याचा पूर्वोक्तप्रमाणे कोणताही असा पदार्थ किंवा असा पदार्थ असलेले अन्न तयार करण्याकरिता किंवा तो बनविण्याकरिता किंवा ठेवण्याकरिता उपयोग करण्यास प्रतिबंध होईल, अशा रीतीने नष्ट करता येईल [१][आणि] जर असे जनावर, पदार्थ, पात्र किंवा भांडे हे रोगट, बिघडलेले, अहितकारक, किंवा मानवी आहारास व औषधासाठी अयोग्य असेल तर ते नष्ट करण्याची तो [१][तजवीज] करील.

**४१७अ.** [कोणताही पदार्थ, तो तसा नसताना तो तसा आहे असे दर्शविण्याबद्दल शास्ती.] सन १९२८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम १५ अन्वये निरसित.

रोगट, सडलेला किंवा अहितकारक किंवा मानवी आहारास अयोग्य असा खाद्यपदार्थ जवळ बाळगल्याबद्दल शास्ती.

[२][**४१७ब.** कलम ४१७ खाली उपाययोजना केल्यावर कोणताही खाद्यपदार्थ, रोगट, सडलेला किंवा अहितकारक आहे किंवा तो मानवी आहारास अयोग्य आहे असे दंडाधिकाऱ्यास आढळून आले असेल अशा प्रत्येक बाबतीत त्याच्या मालकास किंवा केवळ निक्षेपी किंवा वाहक असेल अशा ज्या इतर कोणत्याही व्यक्तीच्या कब्जात तो सापडला असेल त्या व्यक्तीस, अशा कोणत्याही प्रकरणी भारतीय दंड संहिता, कलम २७३ च्या तरतुदी लागू होत नसतील तर [३][पाचशे] रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल.] १८६० चा ४५.

समन्स काढण्यासंबंधातील अर्ज वाजवी अवधीत करण्यात न आल्यास तो नाकारणे.

**४१७क.** कलम [४] * * * ४१७ ब खाली भरावयाच्या सर्व खटल्यांच्या बाबतीत ज्या कोणत्याही व्यक्तीवर अशा कलमाविरुद्ध अपराध केल्याबद्दल आरोप करण्यात आला असेल तिला हजर राहाण्यासाठी समन्स काढण्याविषयी करावयाचा अर्ज, जो अपराध केल्याबद्दल अशा व्यक्तीवर आरोप करण्यात आला असेल तो ज्या तारखेस घडला असे अभिकथन करण्यात आले असेल त्या तारखेपासून वाजवी अवधीच्या आत करण्यात आला नाही तर, दंडाधिकारी असे समन्स काढण्याचे नाकारील.]

---

[१] सन १८९९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ६(१) (अ) अन्वये मूळ शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ६(१) (ब) अन्वये कलमे ४१७ब व ४१७क समाविष्ट करण्यात आली.

[३] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम २६ या अन्वये "एक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम २०, अनुसूची "ब" अन्वये "४१७ अ किंवा" हा मजकूर निरसित करण्यात आला.

## वजने व मापे

**४१८.** [१][वजने आणि मापे यांच्या स्थानिक प्रमाणासंबंधी तरतूद करणे.] सन १९३२ चा मुंबई अधिनियम क्रमांक १५ अन्वये निरसित.

**४१९.** [१][वजने आणि मापे पडताळून पहाणे व त्यावर शिक्के मारणे.] सन १९३२ चा मुंबई अधिनियम क्रमांक १५ अन्वये निरसित.

**४२०.** [१][ज्याच्या प्रमाणासंबंधी तरतूद करण्यात आली असेल ती वजने आणि मापे स्वीकारणे; शास्ती.] सन १९३२ चा मुंबई अधिनियम क्रमांक १५ अन्वये निरसित.

## घातक रोगांचा फैलाव होण्यास प्रतिबंध करणे

घातक रोग [३][किंवा कारण माहीत नसेल असा सतत येणारा ताप] अस्तित्वात असल्याची माहिती देणे.

**४२१.** सार्वजनिक रुग्णालयाखेरीज कोणत्याही खाजगी किंवा सार्वजनिक असलेल्या राहत्या घरात कोणताही घातक रोग [२][किंवा ज्यांचे कारण माहीत नसेल असा चार दिवसांपेक्षा जास्त] अवधीचा सतत येणारा ताप यावर औषधोपचार करणाऱ्या किंवा त्याच्या अस्तित्वाची माहिती ज्यास मिळेल असा प्रत्येक वैद्यक व्यवसायी त्यासंबंधीची माहिती, व्यवहार्य असेल तेथवर शक्य तितक्या कमीत कमी वेळात आरोग्य अधिकाऱ्यास देईल. कार्यकारी आरोग्य अधिकारी, आयुक्ताच्या संमतीने, वेळोवेळी आवश्यक ठरवील अशा नमुन्यानुसार उक्त माहिती कळवील व तो ठरवील असा तपशील त्या माहितीत देईल.

घातक रोगाच्या फैलावास प्रतिबंध करण्यासाठी कोणत्याही जागेचे कोणत्याही वेळी निरीक्षण करता येईल.

**४२२.** आयुक्तास, कोणत्याही वेळी दिवसा किंवा रात्री, नोटीस न देता किंवा परिस्थितीनुसार त्यास योग्य वाटेल अशी आपल्या इराद्याची नोटीस देऊन ज्या कोणत्याही जागी कोणताही घातक रोग अस्तित्वात असल्याचे ऐकिवात असेल किंवा तसा संशय असेल अशा कोणत्याही जागेचे निरीक्षण करता येईल. तसेच उक्त रोगाचा फैलाव अशा जागेपलीकडे पसरू न देण्यासाठी त्यास योग्य वाटतील असे उपाय योजता येतील.

ज्यामुळे घातक रोग होण्याचा संभव असेल असे पाणी पिण्याकरिता वापरण्यास मनाई.

**४२३.** (१) कोणत्याही विहिरीतील, तलावातील किंवा इतर जागेतील पाणी पिण्यासाठी वापरल्यास त्यामुळे धोका पोहोचण्याचा किंवा कोणत्याही घातक रोगाचा फैलाव होण्याचा संभव आहे असे आयुक्तास आढळून येईल तर त्यास, जाहीर नोटिशीअन्वये, असे पाणी पिण्याच्या प्रयोजनासाठी नेण्यास किंवा वापरण्यास मनाई करता येईल.

(२) ज्या पाण्याच्या बाबतीत अशी कोणतीही जाहीर नोटीस काढण्यात आली असेल ते पाणी कोणतीही व्यक्ती पिण्याच्या प्रयोजनासाठी नेणार नाही किंवा वापरणार नाही.

---

[१] कलमे ४१८, ४१९ व ४२० ही मुंबई वजने व मापे अधिनियम, १९३२ (सन १९३२ चा मुंबई १५) दुसरी अनुसूची, भाग दोन अन्वये निरसित करण्यात आली. ही कलमे मुंबई शहरात दिनांक १ ऑगस्ट १९४५ रोजी अंमलात आली. पहा शासकीय अधिसूचना, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक ९५१८, दिनांक ३० एप्रिल १९३५.

[२] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०, कलम १७(१) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १७(२) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

रुग्णांना रुग्णालयात नेण्याबाबत आयुक्त आदेश देऊ शकेल.

**४२४.** (१) आयुक्तास, किंवा याबाबतीत, त्याने अधिकार प्रदान केलेल्या कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास, कार्यकारी आरोग्य अधिकाऱ्यांने किंवा कोणत्याही यथोचित अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीने सही केलेल्या प्रमाणपत्रावरून ज्या व्यक्तीस घातक रोग झालेला असेल आणि अशा कार्यकारी आरोग्य अधिकाऱ्याच्या किंवा इतर वैद्यक व्यवसायीच्या मते, राहण्याची योग्य जागा किंवा सोय नसेल, किंवा जी एकापेक्षा अधिक कुटुंबे भोगवटा करीत असलेल्या एखाद्या इमारतीत असेल, अशा कोणत्याही व्यक्तीस कोणत्याही रुग्णालयात किंवा जेथे उक्त झालेले रुग्ण वैद्यकीय उपचारासाठी दाखल करून घेतले जात असतील त्या जागी नेण्याबाबत निदेश देता येईल किंवा नेण्याची तजवीज करता येईल.

(२) पोट-कलम (१) खाली जिच्या बाबतीत आदेश देण्यात आलेला असेल अशा व्यक्तीचा ताबा ज्या कोणत्याही व्यक्तीकडे असेल ती अशा आदेशाचे पालन करील.

इमारती इ. रोगजंतुरहित करणे.

**४२५.** (१) रोगजंतुदुषित राहण्याचा संभव असलेली एखादी इमारत किंवा इमारतीचा एखादा भाग किंवा त्यात असलेली कोणतीही वस्तू ही स्वच्छ केल्यास किंवा रोगजंतुरहित केल्यास, कोणत्याही घातक रोगाच्या फैलावात प्रतिबंध होईल किंवा आळा बसेल असे आयुक्ताचे मत असेल तर, अशा इमारतींच्या मालकास किंवा तिच्या भोगवटादारास अशी इमारत किंवा तिचा भाग किंवा त्यातील वस्तू ही स्वच्छ किंवा रोगजंतुरहित करण्यास लेखी नोटिशीन्वये आयुक्त फर्मावू शकेल आणि आयुक्त त्याला आवश्यक वाटेल तर, उक्त नोटिशीत विहित करण्यात येईल अशा मुदतीसाठी उक्त इमारत रिकामी करण्यास फर्मावू शकेल.

(२) परंतु, जर आयुक्ताच्या मते, मालक किंवा भोगवटादार हे गरिबीमुळे किंवा इतर कारणांमुळे अशा फर्मावणीचे पालन परिणामकारक रीतीने करण्यास असमर्थ असेल तर, आयुक्तास रोगजंतुदूषित राहण्याचा संभंव असलेली उक्त इमारत किंवा इमारतीचा भाग किंवा त्यातील वस्तू स्वच्छ किंवा रोगजंतुरहित करण्याची तजवीज करता येईल, आणि तसे करण्याचा परिव्यय भागविता येईल.

आवश्यक तेव्हा झोपड्या व छपऱ्या नष्ट करणे.

**४२६.** (१) कोणत्याही घातक रोगाचा फैलाव होण्यास प्रतिबंध करण्यासाठी कोणतीही झोपडी किंवा छपरी नष्ट करणे, हे आयुक्ताच्या मते आवश्यक असेल तर, प्रकरणातील परिस्थितीनुसार त्यास योग्य वाटेल अशी आपल्या इराद्याविषयी आगाऊ नोटीस अशा झोपडीच्या किंवा छपरीच्या मालकास किंवा भोगवटादारास दिल्यानंतर अशी झोपडी किंवा छपरी किंवा त्याचे सर्व साहित्य नष्ट करण्यासाठी त्यास उपाय योजता येतील.

(२) आयुक्तास, त्यास योग्य वाटेल अशा कोणत्याही बाबतीत, अशी कोणतीही झोपडी किंवा छपरी नष्ट केल्यामुळे ज्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असेल अशा कोणत्याही व्यक्तीस भरपाई देता येईल ; परंतु आयुक्ताने याप्रमाणे परवानगी दिली असेल तेवढे खेरीज करून एरव्ही या कलमान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर केल्यामुळे झालेल्या कोणत्याही हानीबद्दल किंवा नुकसानीबद्दल भरपाई मिळण्यासाठी कोणताही दावा करता येणार नाही.

आडगिऱ्हाइकी कपडे व बिस्तरा यांची आयुक्ताला माहिती न देता व त्यांचे निरीक्षण करवून न घेता [2][बृहन्मुंबई] त न आणणे.

[1][**४२६अ.** (१) जी कोणतीही व्यक्ती वापरलेले किंवा आडगिऱ्हाईकी कपडे किंवा बिस्तरा यापैकी जी कोणतीही वस्तू तिच्या प्रवासी सामानाचा भाग नसेल ती, समुद्र मार्गाने [2][बृहन्मुंबई] त आणील किंवा आणण्याची तजबीज करील, अशी प्रत्येक व्यक्ती अशी वस्तू [2][बृहन्मुंबई] त आणल्यापासून चोवीस तासांच्या आत, उक्त वस्तूचे स्वरूप व स्थिती आणि जेथून ती वस्तू आणली ती जागा या संबंधीचा संपूर्ण तपशील असलेली लेखी नोटीस आयुक्तास देईल आणि ती वस्तू अशा वस्तूच्या निरीक्षणासाठी पोट-कलम (५) खाली विहित केलेल्या जागी नेईल, अशी कोणतीही जागा विहित केलेली नसेल तर, उक्त वस्तूचे निरीक्षण जेथे करता येईल ती जागाही नोटिशीत नमूद करील.

---

[1] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम २७ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४ (१) द्वारे मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

(२) आयुक्त, उक्त वस्तूची तपासणी करील आणि त्याच्या मते ती रोगजंतुरहित नसेल तर, तो निर्धारित करील अशा कालावधीत, अशा रीतीने व अशा व्यक्तींनी ती योग्य त्या रीतीने रोगजंतुरहित केली पाहिजे, असे फर्मावू शकेल.

(३) उक्त वस्तू रोगजंतुरहित आहे किंवा ती पुरेशी रोगजंतुरहित करण्यात आली आहे अशी आयुक्ताची खात्री झाली तर तो तशा आशयाचे प्रमाणपत्र देईल.

(४) कोणतीही व्यक्ती, उक्त वस्तूच्या संबंधात पोट-कलम (३) खाली प्रमाणपत्र देण्यात येईतोपर्यंत आयुक्ताच्या किंवा सीमाशुल्क अधिकाऱ्यांच्या निदेशानुसार असेल त्याखेरीज अन्यथा त्या वस्तूची देवघेव करणार नाही किंवा ती हलवणार नाही किंवा तिची विल्हेवाट लावणार नाही.

(५) आयुक्तास, सीमाशुल्क समाहारक व मुंबई बंदराचे विश्वस्त यांच्याशी सल्लामसलत करून पोट-कलम (१) मध्ये वर्णन केलेल्या स्वरूपाच्या कोणत्याही वस्तूचे निरीक्षण जेथे करता येईल अशी एक जागा किंवा अनेक जागा वेळोवेळी विहित करता येतील किंवा नेमता येतील.

(६) आयुक्तास, वेळोवेळी, स्थायी समितीच्या मान्यतेने, पोट-कलम (१) खाली वर्णन केलेल्या स्वरूपाच्या कोणत्याही वस्तूचे निरीक्षण करण्यासाठी व पोट-कलम (३) खाली प्रमाणपत्र देण्यासाठी तसेच, कोणतीही वस्तू महानगरपालिकेच्या अभिकरणाने रोगजंतुरहित केली असेल त्या बाबतीत, ती रोगजंतुरहित करण्यासाठी द्यावयाची फी ठरवता येईल.

(७) या कलमाच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करणारी व्यक्ती ही, एखादी कंपनी किंवा इतर निगम निकाय, किंवा व्यक्तिसंघ (मग तो कायद्याने संस्थापित असो किंवा नसो) असेल तेव्हा, अपराध घडला त्यावेळेस जी व्यक्ती तिचा संचालक, व्यवस्थापक, सचिव, अभिकर्ता, किंवा तिच्या व्यवस्थापनाशी संबंध असलेला इतर अधिकारी किंवा व्यक्ती असेल अशी प्रत्येक व्यक्ती, ही असा अपराध आपल्या न कळत किंवा संमतीवाचून घडला असे सिद्ध न करील तर, अशा अपराधासाठी तरतूद केलेल्या शिक्षेस पात्र होईल.

(८) [१][बृहन्मुंबईच्या] हद्दीबाहेरील व त्या हद्दीच्या पलीकडील जागी निर्यात करण्यासाठी व विल्हेवाट लावण्यासाठी गोदीतून थेट [१][बृहन्मुंबईतील] रेल्वे स्थानकावर नेण्यात येणाऱ्या गासडीतील वापरलेले किंवा आडगिऱ्हाइकी कपडे किंवा बिस्तरा यांपैकी कोणत्याही वस्तूला या कलमातील कोणतीही तरतूद लागू होणार नाही.

१८७८ चा ८. **स्पष्टीकरण.**——या कलमाच्या प्रयोजनांकरिता, प्रवासी सामान याचा अर्थ समुद्र सीमाशुल्क अधिनियम, १८७८ च्या कलम २४ खाली प्रत्यक्ष वापरात असलेले त्याचे सामान म्हणून निर्धारित करण्यात येईल ते सामान, असे समजावा.

रोगजंतुदूषित वस्तू धुण्यासाठी सुद्धा रोगजंतुरहित करण्यासाठी जागेची तरतूद करता येईल.

**४२७.** (१) आयुक्तास, रोगजंतुदूषित झाले असतील असे सर्व कपडे किंवा बिस्तरा किंवा इतर वस्तू रोगजंतुरहित करण्यासाठी, आवश्यक ती सर्व साधने आणि शुश्रूषेची व्यवस्था यांसह एखाद्या जागेची तरतूद करता येईल आणि त्यास स्वविवेकानुसार, वस्तू रोगजंतुरहित करण्यासाठी अशा जागेत आणविता येतील आणि याबाबतीत [२][स्थायी समितीच्या] मान्यतेने तो वेळोवेळी निश्चित करील अशी फी मिळाल्यानंतर किंवा ज्या कोणत्याही बाबतीत त्यास योग्य वाटेल तेव्हा कोणताही आकार न घेता त्या वस्तू रोगजंतुरहित करता येतील.

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९९९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २७, कलम १६४ अन्वये " प्रभारी सदस्याच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) आयुक्तास वेळोवेळी जाहीर नोटिशीअन्वये कोणत्याही घातक रोगजंतुंनी दूषित झालेले कोणतेही कपडे, बिस्तरा किंवा इतर वस्तू ज्या जागेत धुता येतील ती जागा नेमून देता येईल ; आणि कोणतीही व्यक्ती कोणत्याही अशा वस्तू आधी त्या रोगजंतुरहित केलेल्या नसतील तर, याप्रमाणे नेमून न देण्यात आलेल्या कोणत्याही जागी धुणार नाही.

रोगजंतुदूषित वस्तू नष्ट करता येतील.

(३) आयुक्त, रोगजंतुदूषित असण्याचा संभव असलेला बिस्तरा, कपडे किंवा इतर वस्तू रोगजंतुरहित करण्याचा किंवा नष्ट करण्याचा निदेश देऊ शकेल.

(४) आयुक्त, स्वविवेकानुसार पोट-कलम (३) खाली नष्ट केलेल्या कोणत्याही वस्तूबद्दल भरपाई देऊ शकेल.

घातक रोग झालेल्या व्यक्तींनी सार्वजनिक वाहनात तसे आगाऊ कळवल्यावाचून प्रवेश न करणे.

**४२८.** (१) घातक रोग झालेली कोणतीही व्यक्ती एखाद्या सार्वजनिक वाहनात, अशा वाहनाच्या मालकास, वाहन चालकास किंवा ते वाहन ज्या व्यक्तीच्या ताब्यात असेल त्या व्यक्तीस, आपल्याला असा रोग झाला आहे असे आगाऊ कळवल्यावाचून प्रवेश करणार नाही.

(२) सार्वजनिक वाहनांसंबधी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, सार्वजनिक वाहनाचा मालक, चालक, किंवा ते ज्या व्यक्तीच्या ताब्यात असेल ती व्यक्ती ही, पूर्वोक्तप्रमाणे घातक रोग झालेल्या व्यक्तीस अशा वाहनातून नेण्यास बांधलेली असणार नाही; मात्र असे वाहन रोगजंतुरहित करण्याच्या बाबतीत त्याचे जे कोणतेही नुकसान होईल आणि जो कोणताही खर्च करावा लागेल त्याबद्दल पुरेशी भरपाई त्यास प्रथम देण्यात किंवा देऊ करण्यात आली तर वरील तरतूद लागू होणार नाही.

रुग्णांना नेण्यासाठी वाहनांची तरतूद.

**४२९.** आयुक्तास, महानगरपालिकेच्या मंजुरीने, कोणताही घातक रोग झालेल्या व्यक्तींना विनामूल्य वाहून नेण्यासाठी योग्य त्या वाहनांची तरतूद करता येईल आणि ती सुस्थितीत ठेवता येतील आणि जेव्हा अशा वाहनांची तरतूद करण्यात आली असेल तेव्हा अशा कोणत्याही व्यक्तीस इतर कोणत्याही सार्वजनिक वाहनातून नेणे हे विधिसंमत असणार नाही.

घातक रोग झालेल्या व्यक्तींना सार्वजनिक वाहनातून नेण्यासंबंधी तरतुदी.

**४३०.** (१) घातक रोग झालेली कोणतीही व्यक्ती—

(अ) अशा रोगाचा फैलाव होणार नाही याविषयी योग्य ती खबरदारी घेतल्यावाचून सार्वजनिक वाहनातून स्वतःला नेण्यास लावणार नाही किंवा नेलेले खपवून घेणार नाही.

(ब) निकटपूर्वीच्या कलमाच्या तरतुदींविरुद्ध, सार्वजनिक वाहनातून स्वतःला नेण्यास लावणार नाही किंवा नेलेले खपवून घेणार नाही.

(२) कोणतीही व्यक्ती, पोट-कलम (१) चे उल्लंघन करून सार्वजनिक वाहनातून स्वतःला नेण्यास लावील किंवा नेलेले खपवून घेईल अशा पूर्वोक्तप्रमाणे रोग झालेल्या कोणत्याही व्यक्तीबरोबर जाणार नाही, किंवा तिला आपल्या ताब्यात घेणार नाही.

(३) सार्वजनिक वाहनाचा कोणताही मालक, चालक किंवा ते ताब्यात असलेली कोणतीही व्यक्ती पूर्वोक्तप्रमाणे रोग झालेल्या कोणत्याही व्यक्तीस उक्त पोट-कलमाचे उल्लंघन करून जाणून-बुजून अशा वाहनातून नेणार नाही किंवा नेण्याची परवानगी देणार नाही.

घातक रोग झालेल्या व्यक्तीस ज्या सार्वजनिक वाहनातून नेले असेल ते वाहन रोगजंतुरहित करणे.

**४३१.** पूर्वोक्तप्रमाणे रोग झालेल्या कोणत्याही व्यक्तीस ज्या वाहनातून नेले असेल अशा सार्वजनिक वाहनाचा मालक, चालक किंवा ते ज्या व्यक्तीच्या ताब्यात असेल ती व्यक्ती ते ताबडतोब रोगजंतुरहित करण्याची तरतूद करील.

**४३२.** (१) कोणतीही व्यक्ती, जी वस्तू कोणत्याही घातक रोगामुळे रोगजंतुदूषित झाली आहे असे तिला माहीत असेल किंवा सकारण माहीत असेल ती कोणतीही वस्तू, आधी रोगजंतुरहित केल्यावाचून देणार नाही किंवा उसनी देणार नाही, विकणार नाही किंवा पाठवणार नाही किंवा इतर रीतीने तिची विल्हेवाट करणार नाही.

रोगजंतुदूषित वस्तू आधी रोगजंतुरहित केल्यावाचून न पाठवणे वगैरे.

(२) अशी कोणतीही वस्तू रोगजंतुरहित करून घेण्याच्या प्रयोजनासाठी योग्य खबरदारी घेऊन पाठवणाऱ्या व्यक्तीस या कलमातील कोणतीही तरतूद लागू होणार नाही.

**४३३.** (१) कोणतीही व्यक्ती, जिच्यामध्ये घातक रोग झालेली एखादी व्यक्ती होती असे तिला माहीत असेल किंवा सकारण माहीत असेल ती कोणतीही इमारत किंवा इमारतीचा कोणताही भाग आणि ज्यात संसर्गदोष राहील अशा त्यातील सर्व वस्तू कार्यकारी आरोग्य अधिकाऱ्यांचे किंवा यथोचित अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीचे समाधान होईल अशा रीतीने रोगजंतुरहित केल्यावाचून व तसे केल्याबद्दल अशा अधिकाऱ्यांच्या किंवा वैद्यक व्यवसायीच्या सहीचे प्रमाणपत्र मिळाल्यावाचून भाड्याने देणार नाही.

रोगजंतुदूषित इमारत प्रथम रोगजंतुरहित केल्यावाचून भाड्याने न देणे.

(२) या कलमाच्या प्रयोजनाकरिता, हॉटेल किंवा पांथगृह चालवणाऱ्या व्यक्तीने, अशा हॉटेलात किंवा पांथगृहात ज्या कोणत्याही व्यक्तीस जागा दिली असेल तिला आपल्या इमारतीचा भाग भाड्याने दिला असल्याचे मानण्यात येईल.

## स्वच्छताविषयक विशेष उपाययोजना

**४३४.** (१) [1][बृहन्मुंबईत] कोणत्याही वेळी कोणत्याही घातक रोगाचा प्रादुर्भाव झाला असेल किंवा प्रादुर्भाव होण्याची भीती निर्माण झाली असेल त्या प्रसंगी किंवा कोणताही सांसर्गिक रोग उद्‌भवला असेल किंवा त्याच [1][बृहन्मुंबईतील] गुरांमध्ये–या संज्ञेत मेंढ्या व बकऱ्या धरून–प्रादुर्भाव होण्याचा संभव असेल त्याप्रसंगी, आयुक्तास, या अधिनियमाच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कायद्याच्या सर्वसाधारण तरतुदी त्या प्रयोजनासाठी अपुऱ्या आहेत असे त्यास वाटेल तर [2][[3][राज्य] शासनाच्या] मंजुरीने आणि अशा रोगाचा प्रादुर्भाव होण्यास किंवा त्याचा फैलाव होण्यास प्रतिबंध करण्यासाठी त्यास आवश्यक वाटतील त्याप्रमाणे—

कोणत्याही घातक रोगाचा प्रादुर्भाव झाल्यास, आयुक्तास विशेष उपाययोजना करता येईल.

(अ) विशेष उपाययोजना करता येईल ; आणि

(ब) जाहीर नोटिशीअन्वये जनतेने किंवा कोणत्याही व्यक्तीने किंवा कोणत्याही व्यक्तिवर्गाने पाळावयाचे तात्पुरते विनियम विहित करता येतील.

(२) आयुक्त, त्याने पोट-कलम (१) खाली जी कोणतीही उपाययोजना केली असेल आणि जे कोणतेही विनियम विहित केले असतील ते महानगरपालिकेस ताबडतोब कळवील.

## प्रेतांची विल्हेवाट लावणे

**४३५.** नोंदणीचे काम आयुक्ताने ज्यांच्याकडे सोपवले असेल तो नगरपालिका अधिकारी एक नोंदवही ठेवील व प्रेते पुरण्यासाठी, जाळण्यासाठी किंवा त्यांची अन्यथा विल्हेवाट लावण्यासाठी वापरण्यात येत असलेल्या कोणत्याही जागेचा प्रत्येक मालक किंवा ती जिच्या नियंत्रणाखाली असेल ती

प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी असलेल्या जागांची नोंदणी करणे.

---

[1] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[2] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " सरकार " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[3] विधि अनुकूलन परिषद आदेश, १९५० या अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

प्रत्येक व्यक्ती, त्या जागेची त्या नोंदवहीत नोंदणी करण्याची तजबीज करील, तसेच उक्त जागेचा आराखडा नोंदणीच्या वेळी महानगरपालिका कार्यालयात ठेवील. अशा आराखड्यात त्या जागेची व्याप्ती व चतु:सीमा या गोष्टी दर्शविण्यात येतील ; तसेच अशा आराखड्यावर, लायसन दिलेल्या सर्वेक्षकाने तो त्याच्याकडून किंवा त्याच्या देखरेखीखाली तयार करण्यात आला असल्याचे निदर्शक म्हणून सही केलेली असेल.

प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी नवीन जागांची तरतूद करणे.

**४३६.** प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी असलेल्या विद्यमान जागा अपुऱ्या आहेत असे कोणत्याही वेळी आढळून येईल तर, किंवा जर कलम ४३८ च्या तरतुदींखाली कोणतीही अशी जागा बंद करण्यात आली असेल तर, आयुक्त महानगरपालिकेच्या मंजुरीने [१][बृहन्मुंबईत] किंवा त्याबाहेर उक्त प्रयोजनासाठी इतर योग्य आणि सोईस्कर जागांची तरतूद करील आणि कलम ४३५ खाली ठेवलेल्या नोंदवहीत त्यांची नोंदणी करण्याची तजवीज करील आणि याप्रमाणे तरतूद केलेल्या प्रत्येक जागेची नोंदणी करण्याच्या वेळी तिची व्याप्ती व तिच्या चतु:सीमा दर्शविणारा व महानगरपालिका [२][शहर अभियंत्याची] सही असलेला एक आराखडा महानगरपालिकेच्या कार्यालयात ठेवील.

आयुक्ताच्या परवानगीवाचून प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी नव्या जागा उघडता येणार नाहीत.

**४३७.** प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी जी जागा पूर्वी कधीच विधितः उपयोगात आणलेली नसेल व जी अशी जागा म्हणून नोंदलेली नसेल अशी कोणतीही जागा कोणत्याही व्यक्तीकडून आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून उक्त प्रयोजनांसाठी उघडण्यात येणार नाही. आयुक्तास, महानगरपालिकेच्या मान्यतेने, अशी परवानगी देता येईल किंवा रोखून ठेवता येईल.

[४][[३][राज्य] शासन] प्रेताची विल्हेवाट लावण्यासाठी असलेली कोणतीही जागा बंद करण्याचा निदेश देऊ शकेल.

**४३८.** (१) जर सक्षम व्यक्तीने पुरविलेल्या माहितीवरून व जातीने निरीक्षण केल्यानंतर आयुक्ताचे कोणत्याही वेळी असे मत होईल की—

(अ) सार्वजनिक पूजेअर्चेची कोणतीही जागा, तिच्या भिंतीच्या आतील किंवा त्याखाली किंवा तिला लागून असलेल्या चर्चच्या आवारातील किंवा दफनभूमीतील प्रेतकक्षक अथवा थडगी यांच्या स्थितीमुळे ती आरोग्यास अपायकारक आहे किंवा होण्याचा संभव आहे ; अथवा

(ब) प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी उपयोगात आणली जाणारी इतर कोणतीही जागा आरोग्यास अपायकारक होईल किंवा अपायकारक होण्याचा संभव आहे, अशा स्थितीत आहे ; तर त्यास आपले उक्त मत, त्याबद्दल त्याची जी कारणे असतील त्यासह महानगरपालिकेला सादर करता येईल, आणि महानगरपालिका त्यावरील आपल्या मतासह ते [४][[३][राज्य] शासनाकडे] विचारासाठी अग्रेषित करील.

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम ६ अन्वये " कार्यकारी अभियंता " या शब्दाऐवजी " शहर अभियंता " हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० याअन्वये " प्रांतिक " या शब्दाऐंवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " सरकार " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

(२) असे अभिप्राय मिळाल्यावर [१][[२][राज्य] शासनास], [३][त्यास] आणखी कोणतीही चौकशी करविणे योग्य वाटत असेल तर ती करविल्यानंतर [४]**[शासकीय राजपत्रात]** व स्थानिक वृत्तपत्रांत प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेअन्वये सार्वजनिक पूजेअर्चेची अशी जागा किंवा प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी असलेली इतर जागा, त्यापुढे प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी वापरण्यात येऊ नये असा निदेश देता येईल. याप्रमाणे दिलेल्या प्रत्येक आदेशाची नोंद कलम ४३५ खाली ठेवलेल्या नोंदवहीत करण्यात येईल.

(३) [१][[२][राज्य] शासनाच्या ] कोणत्याही अशा आदेशाच्या तारखेपासून दोन महिन्यांचा अवधी संपल्यानंतर, ज्या जागेच्या संबधात असा आदेश दिला असेल, अशी जागा प्रेतांची विल्हेवाट लावण्याकरिता बंद करण्यात येईल.

(४) उक्त अधिसूचनेची एक प्रत मराठी, गुजराथी, [५][ हिंदी ] व उर्दू या भाषांत केलेल्या तिच्या भाषांतरासहित ज्या जागेच्या संबंधात असा आदेश असेल त्या जागेवरील किंवा अशा जागेजवळील एखाद्या ठळक भागावर ती जागा सार्वजनिक पूजेअर्चेची जागा नसेल तर लावण्यात येईल.

[२][राज्य] शासन प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी बंद करण्यात आलेल्या जागा पुन्हा उघडण्यासाठी मंजुरी देऊ शकेल.

**४३९.** (१) जातीने निरीक्षण केल्यानंतर आयुक्ताचे कोणत्याही वेळी असे मत होईल की, प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी पूर्वी उपयोगात आणली जाणारी व निकटपूर्वीच्या कलमाच्या तरतुदींखाली किंवा इतर कोणत्याही कायद्याखाली किंवा प्राधिकाराखाली बंद करण्यात आलेली कोणतीही जागा, काही काळ लोटल्यामुळे त्यापुढे आरोग्यास अपायकारक राहिलेली नसेल आणि ती जागा अपाय होण्याचा धोका न राहता उक्त प्रयोजनांसाठी पुन्हा उपयोगात आणता येत असेल तर, आयुक्तास, आपले उक्त मत, त्याबद्दलची आपली कारणे देऊन महानगरपालिकेस सादर करता येईल आणि महानगरपालिका आपल्या मतासहित ते [१][[२][राज्य] शासनाकडे] विचारासाठी अग्रेषित करील.

(२) असे मत मिळाल्यानंतर [१][[२][राज्य] शासनास], [३][त्यास] अशी आणखी कोणतीही चौकशी करविणे योग्य वाटत असेल तर ती करविल्यानंतर पूर्वोक्तप्रमाणे प्रसिद्ध केलेल्या अधिसूचनेअन्वये, अशी जागा प्रेताची विल्हेवाट लावण्यासाठी पुन्हा उघडण्यात यावी असा निदेश देता येईल. याप्रमाणे दिलेल्या प्रत्येक आदेशाची नोंद कलम ४३५ खाली ठेवलेल्या नोंदवहीत करण्यात येईल.

---

[१] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " सरकार " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी " राज्य " हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " तो " या शब्दाऐंवजी " ते " हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] वरील आदेशान्वये " मुंबई शासन राजपत्र " या शब्दाऐवजी " शासकीय राजपत्र " हे शब्द दाखल करण्यात आले.

[५] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ४९ अन्वये " हिंदी " हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

आयुक्ताच्या परवानगीवाचून पूजेअर्चेच्या जागी प्रेते न पुरणे किंवा ती उकरून न काढणे.

**४४०.** (१) कोणतीही व्यक्ती, आयुक्ताच्या पोट-कलम (२) खालील लेखी परवानगीवाचून—

(अ) पूजेअर्चेच्या कोणत्याही जागेच्या कोणत्याही भिंतीमध्ये, किंवा तिच्यातील कोणत्याही जाण्यायेण्याचा मार्ग, द्वारमंडप, ढेलज, चबुतरा किंवा व्हरांडा, यांखाली कोणतेही प्रेतकक्षक किंवा कबर किंवा पुरण्याची जागा करणार नाही ;

(ब) कलम ४३८ खाली प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी बंद केलेल्या कोणत्याही जागेत कोणतेही प्रेत पुरणार नाही किंवा कोणत्याही प्रेताची अन्यथा विल्हेवाट लावणार नाही ;

(क) कलम ४३५ खाली ठेवलेल्या नोंदवहीत जी जागा नोंदलेली नसेल अशा कोणत्याही जागी कोणतीही कबर किंवा प्रेतकक्षक बांधणार, खणणार नाही किंवा बांधण्याची अगर खणण्याची तजवीज करणार नाही किंवा कोणत्याही प्रेताची कोणत्याही रीतीने विल्हेवाट लावणार किंवा लावू देणार नाही किंवा विल्हेवाट लावण्याची परवानगी देणार नाही ;

(ड) [१][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३] च्या कलम १७६ च्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींखाली परवानगी असेल ते खेरीज करून एरव्ही प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी असलेल्या कोणत्याही जागेमधून कोणतेही प्रेत उकरून काढणार नाही. १९७४ चा २.

(२) आयुक्त खास बाबतीत, उपरोक्त प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी [२][[३][राज्य] शासन] याबाबतीत वेळोवेळी देईल अशा सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाच्या अधीनतेने परवानगी देऊ शकेल.

(३) या कलमाविरुद्ध केलेला अपराध हा, [४][फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३] ची कलमे १४९, १५० व १५१ यांच्या अर्थांतर्गत दखली अपराध असल्याचे मानण्यात येईल. १९७४ चा २.

प्रेताची विल्हेवाट लावण्यासंबंधात मनाई केलेली कृत्ये.

**४४१.** कोणतीही व्यक्ती—

(अ) एखादे प्रेत मृत्यूनंतर उपद्रव निर्माण होईल एवढ्या वेळेपर्यंत कोणत्याही परिवास्तूवर जाळल्याशिवाय, पुरल्याशिवाय किंवा अन्यथा त्याची कायदेशीररीत्या विल्हेवाट लावल्याशिवाय, ठेवणार नाही ;

(ब) प्रेत किंवा प्रेताचा भाग, जो व्यवस्थित रीतीने आच्छादलेला असल्याशिवाय किंवा आच्छादलेला न ठेवता किंवा सार्वजनिक आरोग्यास रोगाच्या संक्रमणाचा धोका होण्यास किंवा सार्वजनिक आरोग्यास अपाय होण्यास प्रतिबंध करण्यासाठी, आयुक्तास जाहीर नोटिशीअन्वये, वेळोवेळी जी खबरदारी घेण्यास भाग पाडणे योग्य वाटेल ती न घेता, कोणत्याही सडकेवरून नेणार नाही ;

(क) इतर कोणताही मार्गक्रम उपलब्ध नसेल ते खेरीज करून एरव्ही, ज्या कोणत्याही सडकेवरून प्रेते नेण्यास आयुक्ताने याबाबत काढलेल्या जाहीर नोटिशीअन्वये मनाई केली असेल अशा सडकेवरून एखादे प्रेत किंवा प्रेताचा भाग नेणार नाही ;

---

[१] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ५०(अ) अन्वये " फौजदारी प्रक्रिया संहिता, १८८२ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश याअन्वये " सरकार " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० याअन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी " राज्य " हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ५०(ब) अन्वये " फौजदारी प्रक्रिया संहिता, १८८२ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ड) जे प्रेत विच्छेदनासाठी ठेवलेले असेल किंवा विच्छेदनाच्या प्रयोजनांसाठी वापरण्यात येत असेल ते प्रेत किंवा प्रेताचा भाग बंद पेटीत किंवा वाहनात घातल्याशिवाय अन्यथा हलवणार नाही ;

(ई) प्रेत किंवा प्रेताचा भाग नेत असताना, निकडीची आवश्यकता असल्याखेरीज ते कोणत्याही सडकेवर किंवा सडकेजवळ ठेवणार किंवा सोडून जाणार नाही ;

(फ) कोणतेही प्रेत किंवा प्रेताचा भाग हा, शवपेटिकेच्या पृष्ठभागापासून किंवा शवपेटिका वापरण्यात आली नसेल तर प्रेताच्या किंवा प्रेताच्या भागाच्या पृष्ठभागापासून जमिनीच्या पृष्ठभागापर्यंत सहा फुटांपेक्षा कमी खोली राहील अशा रीतीने कबरीत किंवा प्रेतकक्षकात किंवा अन्यथा पुरणार नाही किंवा पुरण्याची तजवीज करणार नाही ;

(ग) कोणत्याही दफनभूमीत कोणतीही कबर किंवा प्रेतकक्षक इतर कोणत्याही कबरीपासून किंवा प्रेतकक्षकापासून दोन फुटांपेक्षा कमी अंतरावर बांधणार किंवा खणणार नाही किंवा बांधण्याची किंवा खणण्याची तजवीज करणार नाही ;

(ह) कोणत्याही दफनभूमीत या प्रयोजनांसाठी आयुक्ताच्या आदेशान्वये किंवा त्याखाली चिन्हांकित न केलेल्या कोणत्याही रेषेमध्ये एखादी कबर किंवा प्रेतकक्षक बांधणार किंवा खणणार नाही अथवा बांधण्याची किंवा खणण्याची तजवीज करणार नाही ;

(आय) ज्यात पूर्वीच प्रेत पुरलेले असेल अशी कबर किंवा प्रेतकक्षक हे, दुसरे प्रेत किंवा प्रेताचा कोणताही भाग पुरण्याकरिता आयुक्ताच्या लेखी परवानगीवाचून पुन्हा उखडणार नाही ;

(ज) कोणतेही प्रेत किंवा प्रेताचा भाग दहनभूमीत आणल्यानंतर किंवा आणविल्यानंतर अशा भूमीत ते आणल्यापासून सहा तासांच्या आत प्रेत जाळण्यात किंवा जाळण्याची तजवीज करण्यात कसूर करणार नाही.

(के) कोणतेही प्रेत किंवा प्रेताचा कोणताही भाग जाळताना किंवा जाळण्याची तजवीज करताना, असे प्रेत किंवा त्याचा कोणताही भाग त्याची पूर्णपणे राख झाल्यावाचून राहू देणार नाही, किंवा असे प्रेत किंवा प्रेताचा भाग वाहून नेण्याकरिता किंवा जाळण्याकरिता वापरलेले कोणतेही कापड किंवा इतर वस्तू नेऊ देणार नाही किंवा ती पूर्णपणे भस्मसात झाल्यावाचून जाळण्याच्या जागी किंवा अशा जागेजवळ राहू देणार नाही.

[१][ प्रकरण पंधरा-अ

## कोंडवाडे आणि गुरांच्या अतिक्रमणास प्रतिबंध

१९७४ चा महा. १८. १९५१ चा मुंबई २२. **४४१अ.** मुंबई महानगरपालिका आणि मुंबई पोलीस (सुधारणा) अधिनियम, १९७४ याच्या प्रारंभाच्या तारखेस मुंबई पोलीस अधिनियम, १९५१ (यात यापुढे ज्याचा " उक्त अधिनियम " असा निर्देश करण्यात आला आहे) यातील कलमे ९० ते ९४ (दोन्ही धरून) यांच्या तरतुदी [२][बृहन्मुंबईस] लागू असण्याचे बंद होईल : मुंबई पोलीस अधिनियमाची कलमे ९० ते ९४ [२][बृहन्मुंबईस] लागू असल्याचे बंद होणे.

परंतु,—

(अ) या कलमातील कोणत्याही मजकुरामुळे कोणत्याही व्यक्तीने उक्त अधिनियमाखाली आपणावर ओढवून घेतलेली कोणतीही शास्ती किंवा शिक्षा यांच्या संबधातील दायित्वावर कोंडवाडा फी अथवा केलेला खर्च देण्यासंबंधातील कोणत्याही व्यक्तीच्या दायित्वावर परिणाम होणार नाही.

[१] सन १९७४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १८, कलम ३ अन्वये प्रकरण पंधरा-अ समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २५, कलम २ अनुसूची (१) ४ (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर समविष्ट करण्यात आला.

(ब) जनावरांचा कोणताही कोंडवाडा किंवा कोंडवाडा फी आणि आकारावयाचा खर्च यासंबंधात केलेली कोणतीही नेमणूक किंवा काढलेली अधिसूचना किंवा आदेश हा, या अधिनियमाच्या तरतुदींशी तो विसंगत नसेल तेथवर, या अधिनियमाखाली करण्यात किंवा काढण्यात आला असल्याचे मानण्यात येईल आणि ही नेमणूक, अधिसूचना किंवा आदेश त्यात या अधिनियमाखाली रीतसर फेरफार करण्यात येईतोपर्यंत, तो निरसित करण्यात येईतोपर्यंत किंवा त्यात सुधारणा करण्यात येईतोपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहील.

(क) उक्त अधिनियमाखाली स्थापन करण्यात आलेला कोणताही कोंडवाडा हा, राज्य शासनास लादणे योग्य वाटेल अशा शर्तींच्या अधीनतेने महानगरपालिकेमध्ये निहित होईल आणि महानगरपालिका या अधिनियमाच्या तरतुदीअनुसार तो सुस्थितीत ठेवील व त्याचे व्यवस्थापन करील.

कोंडवाडा स्थापन करण्याचा व कोंडवाडापालाची नेमणूक करण्याचा अधिकार.

**४४१ब.** (१) आयुक्तास, वेळोवेळी, सार्वजनिक कोंडावाड्यासाठी योग्य वाटतील अशा जागा नेमून देता येतील आणि अशा कोंडवाड्याचे कोंडवाडापाल म्हणून योग्य व्यक्तींची नेमणूक करता येईल.

(२) याप्रमाणे नेमलेला प्रत्येक कोंडवाडापाल हा आपली कर्तव्ये पार पाडताना आयुक्ताच्या निदेशास व नियंत्रणास अधीन असेल.

गुरे कोंडवाड्यात घालणे.

**४४१क.** जी कोणतीही गुरे कोणत्याही सडकेतून भटकताना किंवा कोणत्याही खाजगी अथवा सार्वजनिक मालमत्तेवर अतिक्रमण करताना आढळतील त्या गुरांचे अभिग्रहण करून त्यांना कोणत्याही सार्वजनिक कोंडवाड्यात घालण्याकरिता कोंडवाड्याकडे नेणे हे प्रत्येक पोलीस अधिकाऱ्याचे आणि आयुक्ताने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही महानगरपालिका अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल आणि इतर कोणत्याही व्यक्तीने तसे करणे हे विधिसंमत असेल.

मागणी केलेली गुरे सुपूर्द करणे.

**४४१ड.** ४४१ग च्या तरतुदींच्या अधीनतेने, निकटपूर्ववर्ती कलमाखाली कोंडवाड्यात घातलेल्या गुरांच्या मालकाने किंवा त्याच्या अभिकर्त्याने हजर होऊन त्या गुरांवर दावा सांगितल्यास कोंडवाडापाल अशा गुरांच्या संबंधात कलम ४४१ फ खाली आकारता येईल अशी कोंडवाडा फी आणि खर्च देण्यात आल्यावर ती त्याच्याकडे सुपूर्द करील.

मागणी न केलेल्या गुरांची विक्री.

**४४१ई.** (१) एखाद्या गुरास कोंडवाड्यात घातल्यानंतर दहा दिवसांच्या आत, त्या गुराचा मालक म्हणून कोणत्याही व्यक्तीने लगतनंतरच्या कलमाखाली आकारण्याजोगी अशी कोंडवाडा फी आणि खर्च दिला नाही तर अशा गुराची ताबडतोब लिलावाने विक्री करण्यात येईल आणि विक्रीच्या उत्पन्नातून पूर्वोक्त फी व खर्च वजा करून अत्याधिक राहिलेली रक्कम, जी कोणतीही व्यक्ती, विक्रीनंतर पंधरा दिवसांच्या आत, याबाबतीत आयुक्त प्राधिकृत करील अशा अधिकाऱ्याची खात्री होईल अशा रितीने आपण त्या गुराचे मालक होतो हे सिद्ध करील त्या व्यक्तीस देण्यात येईल आणि इतर कोणत्याही बाबतीत, ती रक्कम महानगरपालिका निधीचा भाग बनेल.

(२) कोणताही पोलीस अधिकारी किंवा कोंडवाडापाल किंवा इतर महानगरपालिका अधिकारी पोट-कलम (१) खालील विक्रीच्या वेळी कोणतीही गुरे प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षपणे विकत घेणार नाही.

कोंडवाडा फीचे दर व खर्च निश्चित करणे.

**४४१फ.** (१) आकारावयाची कोंडवाडा फी ही, महानगरपालिका प्रत्येक प्रकारच्या गुरासाठी वेळोवेळी विहित करील त्याप्रमाणे असेल.

(२) आकारावयाचा खर्च हा, दिवसाच्या ज्या कोणत्याही भागामध्ये गुराला कोंडवाड्यात ठेवले असेल त्या प्रत्येक दिवसाबद्दल आयुक्त अशा जनावराच्या बाबतीत वेळोवेळी निश्चित करील त्या दरानुसार असेल.

**४४१ग.** (१) जी कोणतीही व्यक्ती तिच्या मालकीच्या किंवा तिच्या ताब्यात असणाऱ्या गुरांना [१][बृहन्मुंबईच्या] कोणत्याही भागात कोणत्याही सडकेतून भटकू देईल किंवा कोणत्याही खाजगी किंवा सार्वजनिक मालमत्तेवर अतिक्रमण करू देईल तिला— गुरांना सडकेतून भटकू देणे किंवा खाजगी अथवा सार्वजनिक मालमत्तेवर अतिक्रमण करू देणे याबद्दल शास्ती.

(अ) पहिल्या अपराधाबद्दल एक महिन्यापर्यंत वाढवता येईल इतकी कैदेची शिक्षा किंवा तीनशे रुपयांपर्यंत वाढवता येईल इतकी दंडाची शिक्षा किंवा या दोन्ही शिक्षा होतील :

परंतु, न्यायालयाच्या न्यायनिर्णयात उल्लेख करावयाच्या एतद्‌विरुद्ध विशेष आणि पुरेशी कारणे नसतील तेव्हा, कैदेची शिक्षा पंधरा दिवसांपेक्षा कमी असणार नाही आणि दंडाची शिक्षा एकशे पन्नास रुपयांपेक्षा कमी असणार नाही ; आणि

(ब) दुसऱ्या किंवा नंतरच्या अपराधाबद्दल सहा महिन्यांपर्यंत वाढवता येईल इतकी कैदेची शिक्षा किंवा पाचशे रुपयांपर्यंत वाढवता येईल इतकी दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतीलः

परंतु, न्यायालयाच्या न्यायनिर्णयात उल्लेख करावयाची एतद्‌विरुद्ध विशेष आणि पुरेशी कारणे नसतील तेव्हा, कैदेची शिक्षा तीन महिन्यांपेक्षा कमी असणार नाही आणि दंडाची शिक्षा दोनशे पन्नास रुपयांपेक्षा कमी असणार नाही.

(२) पोट-कलम (१) खाली संपरीक्षा करणाऱ्या दंडाधिकाऱ्यास—

(अ) आरोपीच्या नियंत्रणाखाली असणाऱ्या गुरांनी अतिक्रमण केल्यामुळे, जिच्या मालमत्तेचे किंवा जमिनीवरील पिकांचे कोणतेही नुकसान झाले असल्याचे सिद्ध झाले असेल अशा कोणत्याही व्यक्तीला दंडाधिकाऱ्यास वाजवी वाटेल त्याप्रमाणे, दोनशे पन्नास रुपयांपेक्षा अधिक होणार नाही इतकी भरपाई आरोपीने द्यावी, असा आदेश देता येईल ;

(ब) तसेच तो, ज्या गुरांच्या बाबतीत अपराध घडला असेल ती गुरे, आयुक्त विहित करील अशा रीतीने व अशा विभेदक चिन्हांनी डागण्यात यावीत असा आदेश देईल ;

(क) तसेच तो, ज्या गुरांच्या बाबतीत अपराध घडला असेल त्या गुरांवर, वर तरतूद केल्याप्रमाणे विभेदक चिन्हाने अगोदरच डागले असेल तर (मग त्या गुरांचा मालक तीच व्यक्ती असो वा नसो) ती गुरे राज्य शासनाकडे जमा करण्यात यावीत असा आदेशही देईल.

(३) पोट-कलम (२) खाली देण्यात आलेली कोणतीही भरपाई ही, जणू काही या कलमाखाली दंडाधिकाऱ्यांने लादलेला दंड असावा त्याप्रमाणे वसूल करण्यात येईल.

(४) या कलमाखालील अपराध दखली असेल.]

## प्रकरण सोळा

## **जीवनविषयक आकडेवारी**

### **जन्म व मृत्यू नोंदणी**

**४४२.** जन्म व मृत्यू नोंदणी करण्याच्या प्रयोजनार्थ, आयुक्त वेळोवेळी, [१][बृहन्मुंबईची] त्यास योग्य वाटेल अशा आणि योग्य वाटेल इतक्या जिल्ह्यांत व पोटजिल्ह्यांत विभागणी करील ; आणि अशा प्रत्येक जिल्ह्यासाठी एक महानगरपालिका अधिकारी हा, जन्म व मृत्यू निबंधक म्हणून असेल. निबंधकाची नेमणूक.

**४४३.** (१) प्रत्येक निबंधक, तो ज्या जिल्ह्याचा निबंधक असेल त्या जिल्ह्यात राहील आणि त्याचे नाव—" जिल्हा जन्म व मृत्यू निबंधक " अशा मजकुरासहित त्याच्या घराच्या बाहेरच्या दारावर किंवा दाराजवळ एखाद्या ठळक जागी लावण्याची तजवीज करील. निबंधकांनी संबंधित जिल्ह्यात राहणे.

(२) प्रत्येक निबंधकाचे [१][बृहन्मुंबईतील] नाव व राहण्याची जागा दर्शवणारी एक यादी महानगरपालिका कार्यालयात ठेवण्यात येईल आणि सर्व वाजवी वेळी, ती कोणताही आकार न देता लोकांच्या पाहणीसाठी खुली ठेवण्यात येईल.

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

नोंदणी पुस्तके पुरवणे.

**४४४.** आयुक्त निबंधकांसाठी अनुक्रमे अनुसूची न आणि ओ यांत विनिर्दिष्ट केलेल्या तपशिलांची नोंद करण्याकरिता पुरेशा संख्येत जन्मनोंदणी पुस्तके व मृत्युनोंदणी पुस्तके यांची तरतूद करील व ती त्यांना पुरवील ; आणि उक्त प्रत्येक पुस्तकातील पृष्ठांना प्रारंभापासून शेवटपर्यंत एकापुढील एक क्रमांक देण्यात येतील.

निबंधकाने सर्व जन्म आणि मृत्युसंबंधीची माहिती स्वतः माहीत करून घेणे.

**४४५.** (१) प्रत्येक निबंधकाने, त्याच्या जिल्ह्यात घडून येईल अशा प्रत्येक जन्म आणि मृत्यूसंबंधी आणि उक्त अनुसूच्यांतील नमुन्यास अनुसरून ज्यांची नोंदणी करणे आवश्यक असेल अशा त्या बाबतीतील तपशिलासंबंधी स्वतः काळजीपूर्वक माहिती करून घेणे हे त्याचे कर्तव्य असेल, आणि त्याने असा जन्म आणि मृत्यू यांची नोंदणी महानगरपालिका अधिकारी म्हणून, त्यास जे पारिश्रमिक मिळत असेल त्याहून अन्य कोणताही आकार न घेता किंवा कोणतीही फी किंवा बक्षीस न मागता किंवा न घेता अशा प्रत्येक जन्मानंतर किंवा मृत्यूनंतर सोईस्करपणे लवकरच, त्या प्रयोजनासाठी आयुक्त पुरवील त्या पुस्तकात करील.

(२) निबंधकांव्यतिरिक्त इतर महानगरपालिका अधिकारीसुद्धा नेमता येतील आणि त्यांच्याकडे, प्रत्येक जन्म किंवा मृत्यू किंवा ते अधिकारी ज्या जिल्ह्यासाठी नेमण्यात आलेले असतील अशा त्या त्या जिल्ह्यातील प्रत्येक जन्म आणि प्रत्येक मृत्यू व ज्यांची नोंदणी करणे आवश्यक असेल असा त्यासंबंधीचा तपशील यांची माहिती करून घेण्याचे आणि अशी माहिती उक्त जिल्ह्याच्या निबंधकाला किंवा आयुक्त निदेश देईल अशा इतर व्यक्तीला सादर करण्याचे काम सोपवता येईल.

जन्मासंबंधीची माहिती सात दिवसांच्या आत देणे.

**४४६.** (१) [१][बृहन्मुंबईमध्ये] जन्मलेल्या प्रत्येक मुलाच्या आई-वडिलांनी किंवा आई-वडील कसूर करतील तर, ज्या परिवास्तूत मूल जन्मले असेल त्या परिवास्तूच्या भोगवटादाराने त्याच्या माहितीअनुसार आणि जन्माच्या वेळी उपस्थित असलेल्या प्रत्येक व्यक्तीने आणि तसेच मुलाचा ताबा जिच्याकडे असेल अशा व्यक्तीने आपल्या संपूर्ण माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे, निबंधकाला किंवा कलम ४४५ खाली नेमलेल्या इतर महानगरपालिका अधिकाऱ्यास, अशा जन्मासंबंधी ज्यांची नोंदणी करणे आवश्यक असेल अशा तपशिलाची माहिती अशा जन्मानंतर सात दिवसांच्या आत देणे हे तिचे कर्तव्ये असेल.

अनौरस मुलाच्या वडिलासंबंधाने व्यावृत्ती.

(२) परंतु, अनौरस मुलाच्या बाबतीत, कोणत्याही व्यक्तीस, अशा मुलाचे वडील म्हणून, अशा मुलाच्या जन्मासंबंधी या अधिनियमाखाली माहिती देण्यास भाग पाडले जाणार नाही आणि निबंधक,अशा मुलाची आई आणि अशा मुलाचे वडील असल्याचे कबूल करणारी व्यक्ती यांनी संयुक्त विनंती केलेली असल्याखेरीज, आणि अशा बाबतीत अशा व्यक्तीने मुलाच्या आईसह नोंदणी पुस्तकात सही केल्याखेरीज कोणत्याही व्यक्तीचे नाव अशा मुलाचे वडील म्हणून नोंदणी पुस्तकात दाखल करणार नाही.

नवजात मूल आढळल्यास त्यासंबंधी माहिती देणे.

**४४७.** कोणतेही नवजात मूल उघड्यावर आढळल्यास, असे मूल जिला आढळले असेल अशा कोणत्याही व्यक्तीने आणि जिच्या ताब्यात असे मूल देण्यात येईल अशा कोणत्याही व्यक्तीने, तिच्या संपूर्ण माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे अशा मुलाच्या जन्मासंबंधीच्या ज्या तपशिलाची नोंद करणे आवश्यक असेल अशा तपशिलासंबंधी उक्त व्यक्तीस असेल अशी माहिती, असे मूल आढळल्यानंतर सात दिवसांच्या आत, निबंधकास किंवा पूर्वोक्तप्रमाणे इतर महानगरपालिका अधिकाऱ्यास देणे हे तिचे कर्तव्य असेल.

मृतांची विल्हेवाट लावण्याच्या जागी मृत्यूसंबंधी माहिती मिळवण्यासाठी अधिकारी नेमणे.

**४४८.** (१) कलम ४३५ खाली ठेवण्यात आलेल्या नोंदणी पुस्तकात नोंदणी केलेल्या मृतांची विल्हेवाट लावण्याकरिता असलेल्या प्रत्येक जागेकरिता एक महानगरपालिका अधिकारी नेमण्यात येईल आणि अशा जागी, जिच्या प्रेताची विल्हेवाट लावण्यात आली असेल, त्या प्रत्येक व्यक्तीच्या मृत्युसंबंधीच्या ज्या तपशीलाची नोंद करणे आवश्यक असेल अशा तपशिलासंबंधी माहिती मिळवणे हे त्याचे कर्तव्य असेल.

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) याप्रमाणे नेमण्यात आलेल्या नगरपालिका अधिकाऱ्यास मृतांची विल्हेवाट लावण्याच्या ज्या कोणत्याही जागेसाठी त्याची याप्रमाणे नेमणूक करण्यात आली असेल, त्या जागी सतत हजर राहण्यास लावणे आयुक्तास योग्य वाटत नसेल तर, अशा जागेच्या प्रवेशाद्वाराच्या ठळक भागांवर उक्त जागेसाठी याप्रमाणे नेमण्यात आलेल्या अधिकाऱ्याचे नाव व तो ज्या जागेवर सापडेल ती जागा विनिर्दिष्ट करणारी एक नोटीस लावण्यात येईल.

मृतांची विल्हेवाट लावण्याच्या जागी मृत्यूसंबंधीची माहिती देणे.

**४४९.** (१) शहरात मृत्यू पावलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या मृत्युसमयी उपस्थित असलेल्या किंवा मृत व्यक्तीच्या शेवटच्या आजारात तिची शुश्रूषा करणाऱ्या निकटच्या नातेवाईकांनी आणि असे नातेवाईक अनुपस्थित असल्यास, मृत्युसमयी उपस्थित असलेल्या प्रत्येक व्यक्तीने, आणि ज्या परिवास्तूत उक्त व्यक्ती मरण पावली त्या परिवास्तूच्या भोगवटादाराने त्याच्या माहितीअनुसार, आणि या कलमात यापूर्वी उल्लेख केलेल्या व्यक्ती नसल्यास, अशा परिवास्तूतील प्रत्येक रहिवाशाने आणि मृताच्या प्रेताची विल्हेवाट लावण्याची तजवीज करण्याचे काम हाती घेणाऱ्याने किंवा इतर व्यक्तीने आपल्या संपूर्ण माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे, अशा मृत्यूच्या ज्या तपशिलाची नोंद करणे आवश्यक असेल त्या तपशिलाची माहिती निकटपूर्वीच्या कलमान्वये नेमलेल्या अधिकाऱ्यास देणे हे तिचे कर्तव्य असेल.

(२) उक्त माहिती, मृताच्या प्रेताची विल्हेवाट लावण्याच्या वेळी किंवा त्या सुमारास देण्यात येईल आणि ती माहिती देणाऱ्या व्यक्तीस लिहिता येत असेल तर ती लेखी आणि अन्यथा तोंडी देण्यात येईल. माहिती देणारी व्यक्ती उपरोक्त अधिकाऱ्यास आपले नाव, पदनाम व राहण्याची जागा यांची माहिती देईल आणि तिच्या संपूर्ण माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे ती माहिती बिनचूक असल्याचे तिच्या सहीनिशी अथवा निशाणीनिशी अनुप्रमाणित करील.

मृत व्यक्तीस ज्याने औषधोपचार केला त्या वैद्यक व्यवसायीने त्या व्यक्तीच्या मृत्यूच्या कारणाबाबत प्रमाणपत्र देणे.

**४५०.** (१) ज्या व्यक्तीच्या शेवटच्या आजारात, यथोचित अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीने औषधोपचार केलेला असेल अशा व्यक्तीच्या बाबतीत तो व्यवसायी अनुसूची फ मधील नमुन्यामध्ये किंवा आयुक्त या बाबतीत वेळोवेळी विहित करील अशा इतर नमुन्यामध्ये, अशा व्यक्तीच्या मृत्युच्या कारणाचे आपल्या सहीचे प्रमाणपत्र आयुक्ताकडे पाठवील आणि अशा प्रमाणपत्रात दिलेले मृत्यूचे कारण असे प्रमाणपत्र देणाऱ्या वैद्यक व्यवसायीच्या नावासह नोंदणीपुस्तकात दाखल करण्यात येईल.

(२) आयुक्त, उक्त प्रमाणपत्राच्या छापील नमुन्यांची तरतूद करील आणि [१][बृहन्मुंबईत] राहणाऱ्या कोणत्याही यथोचित अर्हताप्राप्त वैद्यक व्यवसायीने अर्ज केल्यावर, त्यास असे नमुने, विनामूल्य पुरवील.

मृत्यू नोंदणी पुस्तके व मृत्यूसंख्या विवरणे, वगैरे तयार करणे.

**४५१.** (१) कलम ४४८ खाली नेमलेला प्रत्येक अधिकारी, मृत्यूसंबंधी जी माहिती मिळाली असेल ती, एका नोंदणी पुस्तकात अनुसूची ओ मध्ये विनिर्दिष्ट केलेला तपशील देऊन नमूद करील, आणि ती माहिती, आयुक्त विहित करील अशा मध्यंतराने जिल्ह्याच्या निबंधकामार्फत महानगरपालिका कार्यालयात पाठवील.

(२) कलम ४५० खाली आयुक्तास पुरवण्यात आलेली उक्त नोंदणीपत्रके व प्रमाणपत्रे यांवरून आयुक्त मृत्यू नोंदणीपुस्तके तयार करण्याची तजवीज करील आणि स्वच्छताविषयक किंवा इतर प्रयोजनांकरिता त्यास उपयुक्त वाटतील अशी कोष्टकवार विवरणे व सारणी विवरणे तयार करण्याची व प्रसिद्ध करण्याची तजवीज करील.

जन्म किंवा मृत्यू नोंदणी पुस्तकातील प्रमादांची दुरुस्ती करणे.

**४५२.** (१) जन्म नोंदणी पुस्तकात किंवा मृत्यू नोंदणी पुस्तकात कोणत्याही वेळी कोणताही लेखनप्रमाद आढळून येईल तर आयुक्ताने त्या बाबतीत प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस तो सुधारता येईल.

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) अशा कोणत्याही नोंदणी पुस्तकातील वस्तुस्थितीसंबंधीचा किंवा मजकुरासंबंधीचा कोणताही प्रमाद हा, असा प्रमाद दुरुस्त करावयास लावणाऱ्या व्यक्तीने, ज्या जन्मासंबंधाने किंवा मृत्यूसंबंधाने प्रमाद झालेला असेल त्या जन्मासंबंधाने किंवा मृत्यूसंबंधाने माहिती देण्यास या अधिनियमान्वये फर्मावण्यात आलेल्या दोन व्यक्तींनी किंवा अशा व्यक्ती नसल्यास, त्या प्रकरणाची माहिती असणाऱ्या दोन विश्वसनीय व्यक्तींनी दंडाधिकाऱ्यासमोर केलेले आणि आपल्या समक्ष करण्यात आले आहे असे दंडाधिकाऱ्याने प्रमाणित केलेले, प्रमादाचे स्वरूप आणि प्रकरणाची खरी वस्तुस्थिती मांडणारे शपथेवरील अधिकथन आयुक्तापुढे सादर केल्यानंतर, उपरोक्तप्रमाणे प्राधिकृत केलेल्या कोणत्याही व्यक्तीस, नोंदणी पुस्तकातील मूळ नोंदीत कोणताही फेरफार न करता समासात नोंद करून प्रमाद दुरुस्त करता येईल.

(३) उपरोक्तप्रमाणे असेल ते खेरीज करून एरव्ही, अशा कोणत्याही नोंदणी पुस्तकात कोणताही फेरफार करण्यात येणार नाही.

मुलाचे नाव किंवा नावात केलेला फेरफार यांची नोंदणी करणे.

**४५३.** (१) कोणत्याही मुलाच्या जन्माची नोंद करण्यात आली असेल आणि ज्या कोणत्याही नावाने त्याची नोंदणी करण्यात आली असेल त्या नावात फेरफार करण्यात आला असेल किंवा नावाविना त्याची नोंदणी करण्यात आली असेल तर, त्याचे नाव ठेवण्यात येईल तेव्हा, त्याचे आई-वडील किंवा पालक किंवा अशा नावात बदल करवून घेणारी व्यक्ती किंवा असे नाव ठेवणारी कोणतीही व्यक्ती, जन्म नोंदणी झाल्यापासून पुढील बारा महिन्यांच्या आत, यात यानंतर नमूद केल्याप्रमाणे निबंधकाकडे प्रमाणपत्र सुपूर्द करील ; आणि उक्त प्रमाणपत्र मिळाल्यानंतर निबंधक, मूळ नोंदीत कोणतीही खाडाखोड न करता मुलाचे ठेवलेले म्हणून जे नाव प्रमाणपत्रात नमूद केलेले असेल ते नोंदणी पुस्तकात ताबडतोब दाखल करील.

(२) हे प्रमाणपत्र अनुसूची क्यू मध्ये दिलेल्या नमुन्यात किंवा परिस्थितीप्रमाणे शक्य तो त्यासारखे असेल, आणि ख्रिस्ती मुलाच्या बाबतीत, ज्या बाप्तिस्माच्या विधीनंतर नाव ठेवण्यात किंवा बदलण्यात आले असेल तो बाप्तिस्म्याचा विधी करणारा ख्रिस्ती पुरोहित किंवा व्यक्ती प्रमाणपत्रावर सही करील किंवा मुलाचा बाप्तिस्मा विधी झाला नसेल किंवा मूल ख्रिस्ती नसेल तर, मुलाचे वडील, आई किंवा पालक किंवा मुलाचे नाव ठेवणारी व्यक्ती किंवा त्यात फेरफार करवून घेणारी इतर व्यक्ती, प्रमाणपत्रावर सही करील.

(३) बाप्तिस्म्याचा विधी जो करील असा प्रत्येक ख्रिस्ती पुरोहित किंवा व्यक्ती, या कलमाअन्वये आवश्यक असलेले प्रमाणपत्र, मागणी केल्यानंतर एक रुपयाहून अधिक नसेल इतकी फी देण्यात आल्यावर देईल.

## जनगणना करणे

रहिवाशांची प्रगणना करणे.

**४५४.** आयुक्त, वेळोवेळी निदेश देईल अशा वेळी व अशा रीतीने महानगरपालिका व [१][केंद्र सरकार] यांच्या मंजुरीने, प्रगणनेच्या वेळी ज्या व्यक्ती [२][बृहन्मुंबईत] असतील अशा व्यक्तींची प्रगणना करण्यात येईल :

परंतु नेहमी, अशा प्रगणनेच्या कामास सुरुवात करण्याच्या संपूर्ण एक महिना अगोदर, अशी प्रगणना करण्याचा इरादा असल्याची नोटीस, ती ज्या तारखेस किंवा तारखेच्या आत किंवा तारखांस, किंवा

---

[१] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश या अन्वये "सरकार" या शब्दाऐवजी "केंद्र सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

तारखांच्या आत करावयाची असेल ती तारीख किंवा त्या तारखा तिच्यामध्ये विनिर्दिष्ट करून [१][**शासकीय राजपत्रात**] आणि स्थानिक वृत्तपत्रातील जाहिराती अन्वये देण्यात येईल.

**४५५.** आयुक्त अशा प्रगणनेच्या कामाचे अधीक्षण करील आणि अशा प्रगणनेच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक वाटतील असे प्रगणक किंवा इतर दुय्यम अधिकारी नेमील तसेच पूर्वोक्तप्रमाणे त्यास आवश्यक वाटेल अशी व्यवस्था करील.

आयुक्ताने प्रगणनेच्या कामाचे अधीक्षण करणे.

**४५६.** निकटपूर्वीच्या कलमाखाली नेमण्यात आलेला प्रत्येक प्रगणक किंवा इतर दुय्यम अधिकारी त्यांच्या सूचनांनुरूप त्याच्या जिल्ह्यातील प्रत्येक इमारतीत किंवा राहण्याच्या जागेत पूर्ण केलेली विवरणपत्रे गोळा करण्याकरिता किंवा जनगणनेकरिता नेमून दिलेल्या वेळेच्या कमीतकमी चार दिवस अगोदर कोरी अनुसूची व विवरणपत्र ठेवील. अशी अनुसूची व विवरणपत्रे [२][ केंद्र सरकार ] मान्य करील अशा नमुन्यांप्रमाणे असतील व ते मंजूर करील असा तपशील त्यात असेल व उक्त इमारतीचा किंवा राहण्याच्या जागेचा मालक, भाडेकरू किंवा तिचा मुख्य भोगवटादार ती रीतसर भरून त्यावर सही करील.

कोऱ्या अनुसूच्या व विवरणपत्रे वाटणे.

**४५७.** (१) ज्या व्यक्तीच्या इमारतीत किंवा राहण्याच्या जागेत अशी कोणतीही कोरी अनुसूची किंवा विवरणपत्र ठेवण्यात आले असेल अशी प्रत्येक व्यक्ती, ती अनुसूची किंवा ते विवरणपत्र बिनचूकपणे भरील आणि त्यावर सही करील आणि पूर्वोक्त प्रगणकाने किंवा इतर दुय्यम अधिकाऱ्याने परत करण्यास सांगितल्यावर ते त्यास परत करील ;

कोऱ्या अनुसूच्या व विवरणपत्रे भरण्याचे आबंधन.

किंवा, जर अशा व्यक्तीस लिहिता येत नसेल तर ती व्यक्ती, अशी अनुसूची किंवा विवरणपत्र बिनचूकपणे भरण्यासाठी आवश्यक असलेली माहिती देण्यास प्रगणक तिला सांगेल तेव्हा अशी माहिती प्रगणकास पुरवील.

(२) जर कोणतीही व्यक्ती पोट-कलम (१) च्या कोणत्याही तरतुदीचे अनुपालन करण्यात कसूर करील तर तिला, ती त्याचे अनुपालन करीपर्यंत किंवा आवश्यक ती माहिती अन्यथा मिळेपर्यंत, अभिरक्षेत अटकावून ठेवता येईल.

(३) जिला लिहिता येत नाही अशा व्यक्तीने पूर्वोक्तप्रमाणे कोणतीही अशी अनुसूची किंवा विवरणपत्र तिने पुरवलेल्या माहितीवरून भरण्यास प्रगणकास सांगितले तर ते अशा रीतीने भरणे हे प्रगणकाचे कर्तव्य असेल.

**४५८.** जर अशा अनुसूच्या किंवा अशी विवरणपत्रे गोळा करण्याच्या कामावर नेमलेल्या कोणत्याही प्रगणकास किंवा इतर दुय्यम अधिकाऱ्यास कोणतीही अनुसूची किंवा कोणतीही विवरणपत्रे सदोष आहेत किंवा ती कोणत्याही बाबतीत अयोग्यरित्या भरली आहेत असे आढळून येईल तर, त्यास त्या अनुसूच्या किंवा ती विवरणपत्रे ती ज्या इमारतीशी किंवा निवासस्थानाशी संबंधित असतील त्या इमारतीच्या किंवा निवासस्थानाच्या भोगवटादारास परत देता येतील आणि त्याच्याबरोबर ती अठ्ठेचाळीस तासांच्या आत रीतसर भरण्याविषयी किंवा सुधारण्याविषयी फर्मावणारी नोटीस देता येईल.

विवरणपत्रे सदोष आहेत असे आढळून आल्यास भोगवटादाराने त्यात सुधारणा करणे.

[१] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाअन्वये " मुंबई सरकार **राजपत्र** " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " सरकार " या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

L-12 (H 4167) (Page No. 422-432) (Side No. 474-484)



सैनिकी अधिकारी, नौदल अधिकारी व पोलीस अधिकारी आणि इतर विवक्षित व्यक्ती यांनी, आवश्यक असल्यास, प्रगणक म्हणून काम करणे.

**४५९.** (१) कोणताही सैनिक किंवा नौदल अधिकारी, किंवा मुंबई शहर पोलिसांतील कोणताही अधिकारी, किंवा व्यापारी जलयानाचा प्रभारी असलेला कोणताही अधिपती किंवा व्यक्ती, किंवा जलयानाचा किंवा बोटीचा नाखुदा किंवा तांडेल, किंवा वेड्यांचे उपचारगृह, रुग्णालय किंवा तुरुंग किंवा कोणताही सार्वजनिक किंवा खाजगी धर्मादाय किंवा शैक्षणिक परिसंस्था यांचा प्रभार असलेली कोणतीही व्यक्ती किंवा पथिकाश्रम किंवा निवासगृह चालवणारी कोणतीही व्यक्ती, अशा प्रगणनेकरिता नेमण्यात यावयाच्या दिवसांच्या निकटपूर्वीच्या रात्री त्यांच्या अधिपत्याखाली असलेल्या किंवा ताब्यात असलेल्या व्यक्तीची किंवा त्याच्या कब्जात, ताब्यात किंवा नियंत्रणाखाली असलेल्या इमारतीत राहणाऱ्या व्यक्तीची प्रगणना करण्याच्या प्रयोजनाकरिता प्रगणक म्हणून काम करण्यास फर्माविण्यात आल्यास, ती तसे करील.

(२) प्रगणक म्हणून काम करण्यास याप्रमाणे फर्मावण्यात आलेल्या प्रत्येक व्यक्तीस, आयुक्त त्याबाबत काढील असे सर्व लेखी अनुदेश मिळतील व ती व्यक्ती त्यांचे अनुपालन करील.

गृहहीन व्यक्तींबाबत विवरणे.

**४६०.** सर्व गृहहीन व्यक्तींच्या बाबतीत आणि ज्या व्यक्ती अशी प्रगणना करण्याकरिता नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वीच्या रात्री कामावर गेल्या असतील किंवा इतर कोणत्याही कारणामुळे प्रगणना करण्यात यावयाच्या कोणत्याही इमारतीत राहत नसतील अशा सर्व व्यक्तींच्या बाबतीत, आयुक्त त्यास त्या प्रयोजनाकरिता आवश्यक असलेल्या तपशिलाची विवरणे त्यासाठी सर्वात अधिक योग्य वाटतील अशा आणि [१][केंद्र सरकार] मंजूर करील अशा मार्गांनी, मिळवील.

[२][प्रकरण सोळा—अ

## [३][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रम]

## उपक्रमाचे कार्यचालन आणि बांधकाम करणे व ती सुस्थितीत राखणे

महाव्यवस्थापकाने उपक्रमाचे व्यवस्थापन करणे.

**४६०अ.** (१) महाव्यवस्थापक, [४][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीच्या] आणि महानगरपालिकेच्या अधीक्षणाच्या अधीनतेने [३][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाचे] व्यवस्थापन करील आणि तो, ते उपक्रम काटकसरीने आणि कार्यक्षम रीतीने सुस्थितीत राखणे, त्यांचे कार्यचालन करणे, त्याचे प्रशासन व त्यांचा विकास करणे, यांसाठी आवश्यक अशी सर्व कामे करील.

(२) पूर्वगामी तरतुदींचे सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता, महाव्यवस्थापकास [५][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीच्या] मंजुरीने आणि या अधिनियमान्वये [६][***] लादलेल्या निर्बंधाच्या किंवा शर्तींच्या अधीनतेने शहरात किंवा शहराबाहेर पुढील गोष्टी करता येतील :—

(अ) मोटार वाहन अधिनियम, १९३९* च्या तरतुदीस किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमितीच्या तरतुदींच्या आणि त्याखाली महानगरपालिकेच्या प्रीत्यर्थ दिलेल्या कोणत्याही लायसनच्या, परवान्याच्या किंवा मंजुरीच्या, शर्तींच्या अधीनतेने, लोकांची वाहतूक करण्यासाठी, ट्राम, बिनरूळाच्या ट्राम व यांत्रिक शक्तीने चालणारी परिवहन साधने धरून, परिवहन उपक्रम बांधणे किंवा संपादन करणे ; १९३९ चा ४.

---

[१] भारतीय विधि अनुकूल परिषद आदेशान्वये "सरकार" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ४० अन्वये कलमे ४६०अ ते ४६०पप अंतर्भूत असलेले प्रकरण समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४(४) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १६५(अ) अन्वये 'महापौरासह परिषदेच्या' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १६५(ब)(एक) अन्वये 'प्रभारी सदस्याच्या' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम १६५(ब)(दोन) अन्वये 'आणि महापौरासह परिषदेने' हा मजकूर वगळण्यात आला.

* आता मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) पहा.

L-12 (H 4167) (Page No. 422-432) (Side No. 474-484)



(ब) भारतीय वीज अधिनियम, १९१० च्या तरतुदींस किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमितीच्या तरतुदींच्या आणि त्याखाली महानगरपालिकेच्या प्रीत्यर्थ दिलेल्या कोणत्याही लायसनच्या किंवा मंजुरीच्या, शर्तीच्या अधीनतेने, वीज शक्ती निर्माण करण्यासाठी किंवा तिचा पुरवठा करण्यासाठी आणि वीज वहन करण्यासाठी उपक्रम बांधणे किंवा संपादन करणे आणि कोणत्याही व्यक्तीशी महानगरपालिकेस किंवा महानगरपालिकेने वीज शक्तीचा पुरवठा करण्याबाबत कोणताही करार करणे ;

(क) [१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समिती] चालविण्यासाठी किंवा तीत वाढ करण्यासाठी आवश्यक किंवा इष्ट अशा प्रत्येक प्रकारच्या इमारती बांधणे व बांधकामे करणे ;

(ड) कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता किंवा हक्क विकत घेणे किंवा पट्ट्याने घेणे किंवा भाड्याने घेणे किंवा अन्यथा संपादन करणे ;

१९१० चा ९. (ई) भारतीय वीज अधिनियम, १९१० खाली किंवा वीज शक्ती निर्माण करण्यासंबंधी किंवा तिचा पुरवठा करण्यासंबंधी त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमितीखाली लायसनदाराला ज्या कोणत्याही अधिकारांचा वापर करण्याचा महानगरपालिकेला त्या त्या वेळी प्राधिकार देण्यात आला असेल त्या कोणत्याही अधिकारांचा आणि अशा अधिनियमिती अन्वये किंवा त्याखाली महानगरपालिकेच्या प्रीत्यर्थ दिलेल्या कोणत्याही लायसनखाली महानगरपालिकेला वापरता येथील अशा इतर कोणत्याही अधिकारांचा वापर करणे ; आणि

१९३९ चा ४. (फ) मोटार वाहन अधिनियम, १९३९* खाली विराम वाहनाचा परवाना धारण करणाऱ्या लायसनदाराच्या ज्या कोणत्याही अधिकाराचा वापर करण्याचा महानगरपालिकेला त्या त्या वेळी प्राधिकार देण्यात आला असेल त्या कोणत्याही अधिकारांचा आणि लोकांच्या वाहतुकीसाठी यांत्रिक शक्तीने चालणाऱ्या परिवहन साधनांच्या तरतुदींसंबंधी उक्त अधिनियमाखाली महानगरपालिकेला वापरता येतील अशा कोणत्याही इतर अधिकारांचा वापर करणे ;

[२][(३) महाव्यवस्थापकाच्या कोणत्याही प्रस्तावास बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समितीच्या किंवा महानगरपालिकेच्या मंजुरीची किंवा मान्यतेची आवश्यकता असेल त्याबाबतीत, बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समिती किंवा, यथास्थिति, महानगरपालिका, समितीच्या सचिवाला किंवा, यथास्थिति, महानगपरपालिका सचिवाला तो प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समितीच्या किंवा, यथास्थिति, महानगरपालिकेच्या लगतच घेण्यात आलेल्या सभेच्या दिनांकापासून उक्त समितीच्या बाबतीत पंचेचाळीस दिवसांच्या आत आणि महानगरपालिकेच्या बाबतीत नव्वद दिवसांच्या आत असा कोणताही विचारात घेईल किंवा तो निकालात काढील मग अशा प्रस्तावाशी संबंधित बाब अशा सभेच्या कार्यसूचीवर घेतलेली असो किंवा नसो, तसे न केल्यास, अशा प्रस्तावाला बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समितीने किंवा, यथास्थिति, महानगरपालिकेने मंजुरी किंवा मान्यता दिलेली आहे असे मानण्यात येईल, आणि महाव्यवस्थापकांकडून तशा आशयाचा अहवाल शासनाला पाठविण्यात येईल आणि त्यानंतर शासनाच्या निर्देशानुसार पुढील कार्यवाही करणे हे महाव्यवस्थापकासाठी विधिसंमत असेल :

परंतु, अशी कोणतीही मानीव मंजुरी किंवा मान्यता, ही या अधिनियमाच्या किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्याच्या तरतुदींशी सुसंगत असलेल्या प्रस्तावाच्या व्याप्तीपुरतीच मर्यादित असेल.]

**४६०ब.** (१) महाव्यवस्थापकास वापरता येतील अशा इतर कोणत्याही अधिकारास बाध येऊ न देता, महाव्यवस्थापकास [३][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमावरील] किंवा त्याच्या संबंधातील कोणत्याही कामाचे निरीक्षण किंवा दुरुस्ती करण्याच्या किंवा असे काम पार पाडण्याच्या प्रयोजनार्थ.— कामांच्या ठिकाणी प्रवेश करण्याचा अधिकार.

(अ) शहरातील किंवा शहराबाहेरील कोणत्याही जमिनीवर प्रवेश करता येईल आणि तिच्यामधून जाता येईल ; मग अशी जमीन कोणामध्येही निहित असो ;

(ब) आवश्यक असलेले सर्व साहित्य, हत्यारे व उपकरणे अशा कोणत्याही जमिनीवर आणि जमिनीमधून नेता येतील.

(२) पोट-कलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करताना त्या परिस्थितीत फारसे नुकसान होऊ नये याविषयी खबरदारी घेण्यात येईल, आणि याप्रमाणे झालेल्या कोणत्याही नुकसानीबद्दल महाव्यवस्थापक भरपाई देईल.

---

* आता मोटार वाहन अधिनियम, १९८८ (१९८८ चा ५९) पहा.

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १६५(ब)(तीन)(अ) अन्वये 'विभागीय स्थायी समितीची' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम ४ अन्वये पोट-कलम (३) जादा दाखल करण्यात आले.

[३] सन १९९६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

कामे पार पाडणे व ती दुरुस्त करणे त्यांचे नवीकरण करणे यांसंबधी अधिकार.

**४६०क.** (१) [१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाशी] संबंधित असलेली कामे, (भारतीय वीज अधिनियम, १९१० च्या तरतुदी ज्यास लागू असतील अशा कामांहुन अन्य) पार पाडण्याच्या, त्यांचे नवीकरण करण्याच्या आणि ती दुरुस्त करण्याच्या प्रयोजनार्थ, महाव्यवस्थापकास, शहरात किंवा शहराबाहेर, नाल्या नेण्यासाठी, शहरातील नाल्यांचे नवीकरण करण्यासाठी व त्या दुरुस्त करण्यासाठी या अधिनियमाच्या तरतुदींखाली आयुक्तास ज्या अधिकाराचा वापर करता येतो त्याच अधिकारांचा वापर अशा अधिकारांचा वापर करण्याच्या बाबतीत या अधिनियमान्वये जे निर्बंध असतील त्या निर्बंधाच्या अधीनतेने करता येईल : १९१० चा ९.

परंतु, ट्राममार्ग तयार करताना महाव्यवस्थापक, जी जमीन सडकेचा भाग बनली असेल त्या जमिनीहून अन्य, महानगरपालिकेमध्ये निहित नसलेल्या, जमिनीवर किंवा जमिनीवरून मालकांच्या संमतीवाचून रूळ टाकणार नाही.

(२) महाव्यवस्थापकाने हाती घेतलेल्या कामात, कोणतीही सडक खोदणे किंवा खणणे यांचा अंतर्भाव असेल तेव्हा, असे काम आयुक्ताशी किंवा तो याबाबत पदनिर्देशित करील अशा अधिकाऱ्याशी विचारविनिमय करून सुरू करण्यात व चालवण्यात येईल.

[२][* * * * *]

मुंबई गॅस कंपनी, मर्यादित हिचा सडका घेण्यासंबंधीचा अधिकार अबाधित राहणे.

**४६०फ.** या प्रकरणातील कोणत्याही तरतुदींमुळे, गॅस कंपनी अधिनियम, १८६३ च्या तरतुदींखालील मुंबई गॅस कंपनी, मर्यादित हिला [३][मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाचा] ट्राममार्ग टाकलेली कोणतीही सडक ज्या प्रयोजनासाठी कायदेशीररित्या घेण्याचा अधिकार असेल त्या प्रयोजनार्थ अशी सडक घेण्याच्या तिच्या अधिकारास बाध येणार नाही : १८६३ चा मुंबई ५.

परंतु,—

(एक) असे करताना उपक्रमाचे परिस्थितीअनुसार आवश्यक तेवढे शक्य तितके कमी नुकसान किंवा गैरसोय होईल अशी खबरदारी घेतली जाईल ;

(दोन) ट्राममार्गावरील वाहतुकीस ज्यायोगे अडथळा होईल असे कोणतेही काम सुरू करण्यापूर्वी, निकडीचे प्रसंग सोडून एरव्ही, कामास सुरुवात होईल ती वेळ जिच्यामध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी अठरापेक्षा कमी नाही इतक्या तासांची नोटीस महाव्यवस्थापकास देण्यात येईल ; आणि

(तीन) मुंबई गॅस कंपनी, मर्यादित ही, असे काम केल्यामुळे ट्राममार्गास पोहोचलेल्या हानीबद्दल किंवा त्यामुळे रहदारी बंद राहिल्याबद्दल किंवा पूर्वोक्तप्रमाणे तिच्यामध्ये निहित केलेले अधिकार वाजवी रीतीने तिने चालवल्याबद्दल कोणतीही भरपाई देण्यास उत्तरदायी असणार नाही.

उपक्रमाच्या कामास ज्यामुळे अडथळा होईल अशा इमारती व इतर कृत्ये यांवर निर्बंध.

**४६०ग.** (१) महाव्यवस्थापकाची लेखी परवानगी असेल ते खेरीज करून एरव्ही, [३][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] प्रयोजनांसाठी बांधलेल्या किंवा सुस्थितीत राखलेल्या कोणत्याही कामावर किंवा अशा कामास अडथळा होईल अशा रीतीने कोणतीही इमारत, भिंत किंवा इतर संरचना नव्याने उभारण्यात येणार नाही आणि कोणतीही सडक किंवा लहान रेल्वे बांधण्यात येणार नाही.

(२) महाव्यवस्थापकास, [४][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीच्या] मान्यतेने पोटकलम (१) चे उल्लंघन करून उभारण्यात आलेली कोणतीही इमारत, भिंत अथवा इतर संरचना किंवा बांधण्यात आलेली कोणतीही सडक किंवा रेल्वे काढून टाकण्याची अथवा अन्यथा त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे त्यांची व्यवस्था लावण्याची तजवीज करता येईल आणि त्यासाठी झालेला खर्च त्याबद्दल जबाबदार असलेली व्यक्ती देईल.

---

[१] सन १९९६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(३) अन्वये 'बॉम्बे' या मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम २०० अन्वये कलमे ४६०ड आणि ४६०ई वगळण्यात आले.

[३] सन १९९६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १६६ द्वारे, 'प्रभारी सदस्याच्या' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## भाडे व आकार निश्चित करणे

वाहतूक सेवांबद्दल भाडे व आकार बसवणे [१][आणि योग्य भाडे आणि जादा आकार देण्यात कसूर केल्याबद्दल शास्ती.]

**४६०ह.** (१) [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाने] तरतूद केलेल्या कोणत्याही वाहतुकीच्या साधनाने उतारू वाहून नेण्याबद्दल किंवा मालाच्या वाहतुकीबद्दल त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमितीच्या तरतुदींच्या आणि त्याखाली महानगरपालिकेला दिलेल्या कोणत्याही लायसनच्या अधीनतेने, महानगरपालिकेच्या मान्यतेने, [३][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समिती] वेळोवेळी निश्चित करील अशा दरांनी भाडी व आकार बसवता येतील :

[४][परंतु, केंद्र सरकारकडून किंवा राज्य शासनाकडून देण्यात आलेली ओळखपत्रे धारण करणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांकडून किंवा [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाकडून] देण्यात आलेले ओळखपत्र-नि-पास धारण करणाऱ्या स्वातंत्र्य सैनिकांकडून कोणतेही भाडे किंवा आकार वसुलीयोग्य असणार नाही.]

(२) या कलमाखाली त्या त्या वेळी बसवण्यात आलेली सर्व भाडी व आकार यांची इंग्रजी, मराठी, हिंदी व गुजराती या भाषांत तयार केलेली छापील यादी ही, लोकांची ने-आण करण्यासाठी [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रम] वापरील, अशा प्रत्येक वाहनाच्या आतील बाजूस एखाद्या ठळक जागी लावण्यात येईल.

(३) या कलमाखाली बसवण्यात आलेली भाडी व आकार हे [५][महाव्यवस्थापकाच्या] भाड्यांच्या यादीत जोडण्यात यावयाच्या नोटिशीअन्वये नेमण्यात येईल अशा व्यक्तीने अशा परिवहन सेवेच्या विहित केलेल्या मार्गक्रमावरील किंवा त्याजवळील जागी आणि समिती विहित करील अशा रीतीने व असा विनियमांखाली भरण्यात येईल.

[६][(४) (अ) [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] कोणत्याही वाहनातून प्रवास करणारा किंवा प्रवास केलेला एखादा उतारू उपक्रमाने निश्चित केलेल्या दराने त्यांच्या प्रवासाचे भाडे देण्याचे टाळील किंवा टाळण्याचा प्रयत्न करील, किंवा

(ब) विवक्षित अंतराचे भाडे दिल्यानंतर त्याच वाहनातून त्या अंतराच्या पुढे जाईल आणि त्या जादा अंतराचे भाडे देणार नाही किंवा असे भाडे देण्याचे टाळील किंवा टाळण्याचा प्रयत्न करील,

तर तो उतारू उपक्रमाच्या महाव्यवस्थापकाने प्राधिकृत केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने मागणी केली असता, [७][देय असलेल्या भाड्याच्या रकमेच्या दहा पट] जादा आकार किंवा [८][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीच्या] मान्येतेने महाव्यवस्थापक याबाबतीत निर्धारित करील अशी कमी रक्कम देण्यास दायी असेल. हा जादा आकार देण्याचे दायित्व, उतारूने प्रवास केलेल्या अंतराचे सर्वसाधारण एकेरी भाडे देण्याच्या त्याच्या दायित्वाच्या भरीला असेल. त्याने जेथून प्रवासास सुरुवात केली असेल त्या थांब्यासंबंधाने कोणतीही शंका असल्यास, अशा भाड्याचा हिशेब वाहन प्रारंभी जेथून सुटले असेल त्या थांब्यापासून करण्यात येईल. कोणत्याही उतारूने जादा अंतरापर्यंत प्रवास केला असेल अशा बाबतीत, जादा आकार देण्याचे दायित्व हे, भरलेले कोणतेही भाडे आणि प्रवासाच्या जादा अंतराबद्दल देय असलेले भाडे यांमधील फरकाइतकी रक्कम देण्याच्या उतारूच्या दायित्वाच्या भरीला असेल.

---

[१] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम १२ (ब) अन्वये हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९९६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(३) अन्वये, मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १६७(अ) द्वारे " महापौरासह परिषद " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ६ द्वारे, हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[५] सन १९९८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम २०२ द्वारे " बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम १२ (अ) अन्वये मूळ पोटकलमांऐवजी पोटकलमे (४), (५), (६), व (७) दाखल करण्यात आली.

[७] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४, कलम २ अन्वये " दहा रुपये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १६७(ब) द्वारे "प्रभारी सदस्याच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(५) पोट-कलम (४) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, भाड्यासह जादा आकार किंवा यथास्थिति, जादा भाडे देण्याचे दायित्व असलेला उतारू, त्याने देय असलेली रक्कम भरण्यास तयार असेल पण, तेथल्या तेथे ती रक्कम भरणे त्याला शक्य नसेल तर, त्यास पोट-कलम (४) खाली प्राधिकृत केलेल्या उपक्रमाच्या अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास उपक्रमाने ठरवून दिलेल्या नमुन्यात आपले खरे नाव व पत्ता देता येईल आणि अशा नमुन्यात विनिर्दिष्ट केलेल्या उपक्रमाच्या अधिकाऱ्याकडे पंधरा दिवसांच्या आत अशी रक्कम मनीऑर्डरने किंवा रोख भरण्याचे अभिवचन देता येईल. त्यानुसार उतारूस ज्या दिवशी अशी रक्कम भरण्यास फर्माविण्यात आले असेल त्या तारखेपासून पंधरा दिवसांच्या आत अशी रक्कम किंवा तिचा कोणताही भागांश भरण्यात त्याने कसूर केली तर अपराधसिद्धीनंतर, त्यास, एक महिन्यापर्यंत वाढवता येईल इतक्या कारावासाची किंवा दोनशे रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(६) पोट-कलम (४) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे, भाड्यासह जादा आकार किंवा यथास्थिति, जादा भाडे देण्याचे दायित्व असलेल्या उतारूने, देय रक्कम किंवा तिचा कोणताही भागांश, पोट-कलम (४) खाली प्राधिकृत केलेल्या, उपक्रमाच्या, कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने मागणी केल्यावर देण्यास नकार दिल्यास, त्यास अपराधसिद्धीनंतर, एक महिन्यापर्यंत वाढवता येईल इतक्या कैदेची किंवा दोनशे रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील.

(७) उपक्रमाच्या कोणत्याही प्राधिकृत अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने किंवा त्यांच्यापैकी कोणीही आपल्या सहाय्यासाठी बोलावलेल्या सर्व व्यक्तींनी, जो उतारू पोट-कलम (४) चे उल्लंघन करील किंवा करण्याचा प्रयत्न करील व मागणी केल्यानंतर आपले खरे नाव व पत्ता देण्याचे नाकारील किंवा त्याने दिलेले नाव किंवा पत्ता बरोबर नाही असे मानण्यास ज्याच्या बाबतीत कारण असेल, अशा कोणत्याही उतारूला अटक करणे आणि निकटतम पोलीस ठाण्याच्या प्रभारी अधिकाऱ्याच्या हवाली करणे विधिसंमत असेल. असा पोलीस अधिकारी, त्या व्यक्तीस शक्य तितक्या कमीत कमी वेळात महानगर दंडाधिकाऱ्यापुढे नेण्यासाठी आवश्यक असेल असे कायदेशीर उपाय योजील.

विजेबद्दल आकार वसूल करणे.

**४६०आय.** [१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाने] वीज शक्तीचा पुरवठा करण्याबद्दल, त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अधिनियमितीच्या तरतुदींच्या आणि त्याखाली महानगरपालिकेला दिलेल्या कोणत्याही लायसनच्या तरतुदींच्या अधीनतेने, महानगरपालिकेच्या मान्यतेने [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समिती] वेळोवेळी निश्चित करील अशा दरांनी आकार वसूल केले जातील.

[३]* * *

## उपक्रमांच्या प्रयोजनांसाठी केलेल्या संविदा

संविदा करणे.

**४६०के.** [४][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमांच्या] प्रयोजनांसाठी करार (स्थावर मालमत्ता किंवा अशा मालमत्तेतील कोणताही हितसंबंध किंवा तिच्यावरील कोणताही हक्क संपादन करण्यासंबंधीचे व त्याची विल्हेवाट करण्यासंबंधीचे करार धरून) करण्याच्या बाबतीत पुढील तरतुदी अंमलात येतील :—

(अ) अशी प्रत्येक संविदा महानगरपालिकेच्या वतीने महाव्यवस्थापक करील.

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(३) अन्वये, मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १६७(ब) द्वारे "प्रभारी सदस्याच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २०४, द्वारे कलम ४६०ज वगळण्यात आले.

[४] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ब) या प्रकरणाच्या कोणत्याही तरतुदीनुसार जर कोणतेही प्रयोजन दुसऱ्या एखाद्या महानगरपालिका प्राधिकरणाच्या मान्यतेवाचून किंवा मंजुरीवाचून महाव्यवस्थापकास पार पाडता येत नसेल तर, अशी मान्यता किंवा मंजुरी प्रथम रीतसर देण्यात येईतोपर्यंत किंवा देण्यात आल्यावाचून महाव्यवस्थापक अशा प्रयोजनासाठी कोणतीही संविदा करणार नाही ;

[१][(क) ज्यामध्ये दहा [२][पन्नास लाख रुपयांपेक्षा] अधिक खर्चाचा अंतर्भाव होणार असेल अशी कोणतीही संविदा महाव्यवस्थापकाला बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समितीची पूर्वमान्यता मिळाल्यावाचून करता येणार नाही :

परंतु, महाव्यवस्थापकाने अशा कोणत्याही संविदेस समितीची पूर्वमान्यता मागितली असेल त्याबाबतीत समिती तिच्या कोणत्याही बैठकीच्या कार्यसूचीवर प्रथम ज्या दिनांकास तो प्रस्ताव घेण्यात आला असेल त्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, त्यावर विचार करील आणि तो निकालात काढील व तसे करण्यात कसूर झाल्यास पूर्वोक्त तीस दिवसांच्या कालावधीच्या शेवटच्या दिवशी समितीने त्या संविदेला पूर्वमान्यता दिली आहे असे मानण्यात येईल. तशा अर्थाचे एक प्रतिवेदन महाव्यवस्थापक समितीकडे पाठवील.

(ड) [३][पाच लाख रुपयांहून ] अधिक असणारा खर्च जिच्यात अंतर्भूत असेल अशा महाव्यवस्थापकाने केलेल्या प्रत्येक संविदेविषयी, महाव्यवस्थापक ती केल्यानंतर पंधरा दिवसाच्या आत बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीस कळवील;]

(ई) या अधिनियमाची अंमलबजावणी करताना महाव्यवस्थापकास, जी संविदा करावी लागेल अशा प्रत्येक संविदेला, या कलमाच्या पूर्वगामी तरतुदी शक्य तेथवर लागू होतील ; आणि या कलमाच्या ज्या तरतुदी मूळ संविदेला लागू होतात त्या तरतुदी अशा संविदेत कोणताही बदल करण्याच्या बाबतीतही किंवा अशी संविदा पुरी करण्याच्या बाबतीतही लागू होतात, असे मानण्यात येईल.

संविदा निष्पादित करण्याची रीत.

**४६०ल.** (१)[४][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] प्रयोजनांसाठी, महानगरपालिकेच्या वतीने, महाव्यवस्थापकाने करावयाची प्रत्येक संविदा ही, ती त्याच्या स्वतःच्या वतीने केली असती तर ज्या रीतीने व ज्या नमुन्यानुसार केल्याने ती त्याच्यावर बंधनकारक झाली असती त्याच रीतीने व त्याच नमुन्यानुसार करण्यात येईल आणि तिच्यात त्याच रीतीने व त्याच नमुन्यानुसार बदल करता येईल किंवा ती पुरी करता येईल :

परंतु, [५][दहा लाख रुपयांपेक्षा] अधिक खर्च ज्यात अंतर्भूत असेल असे कोणतेही काम पार पाडण्यासाठी किंवा असे कोणतेही सामान किंवा माल पुरवण्यासाठी केलेली किंवा महानगरपालिकेच्या [६][पंचवीस हजार रुपयांपेक्षा] अधिक किंमतीची असेल अशा मालमत्तेची विल्हेवाट करण्यासाठी केलेली प्रत्येक संविदा लेखी असेल आणि त्यावर महाव्यवस्थापकाने सही केलेली असेल आणि [७][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीच्या दोन सदस्यांनी] [८][किंवा महाव्यव्यस्थापकाने ज्यांना अधिकार सोपविलेले असतील अशा बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या दोन अधिकाऱ्यांनी] प्रतिस्वाक्षऱ्या केलेल्या असतील.

(२) पोट-कलम (१) च्या तरतुदींअनुसार निष्पादन न केलेली कोणतीही संविदा महानगरपालिकेस बंधनकारक असणार नाही.

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १६९ द्वारे खंड (क) आणि (ड) दाखल करण्यात आले.
[२] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम ५(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[३] वरील अधिनियमाच्या कलम ५(२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[४] सन १९९६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(३) द्वारे "मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[५] सन १९९८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम २०६(अ) अन्वये "एक लाख रुपयांपेक्षा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[६] वरील अधिनियमाच्या कलम २०६(ब) अन्वये "पाच हजार रुपयांपेक्षा" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[७] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १७० अन्वये "प्रभारी सदस्याने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[८] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम ६ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

L-12 (H 4167) (Page No. 422-432) (Side No. 474-484)



रुपये [१][पन्नास हजार] पेक्षा अधिक खर्च होईल अशा संविदांसाठी निविदा मागवणे.

**४६०म.** (१) यात यापुढे अन्यथा जी तरतूद केलेली असेल ती खेरीज करून, एरव्ही महाव्यवस्थापक, ज्यामध्ये [२][तीन लाख रुपयांपेक्षा] अधिक खर्च अंतर्भूत असेल असे कोणतेही काम पार पाडण्यासाठी किंवा असे कोणतेही सामान किंवा माल पुरवण्यासाठी कोणतीही संविदा करण्यापूर्वी निदान सात दिवस अगोदर स्थानिक वृत्तपत्रात जाहिरातीअन्वये नोटीस देऊन अशा संविदेसाठी निविदा मागवील :

[३][परंतु, तीन लाख रुपयांपेक्षा अधिक नसेल इतक्या रकमेच्या कोणत्याही संविदेच्या निविदेची सूचना, बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या अधिकृत संकेतस्थळावर दर्शविण्यात येईल.]

(२) महाव्यवस्थापक, अशा नोटिशीनुसार सादर केलेली कोणतीही निविदा स्वीकारण्यास बांधलेला नसेल. मात्र, त्यास सर्व परिस्थितीचा विचार करून याप्रमाणे सादर करण्यात आलेल्या निविदांपैकी जी कोणतीही निविदा त्यास अत्यंत फायदेशीर असल्याचे दिसून येईल ती निविदा कलम ४६०-के चा खंड (क) च्या तरतुदींच्या अधीनतेने स्वीकारता येईल :

परंतु, [४][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समिती] यात तरतूद केल्याप्रमाणे निविदा न मागविता किंवा ती मागविल्यानंतर महाव्यवस्थापकाकडे येईल अशी कोणतीही निविदा न स्वीकारता संविदा करण्यास, त्याबद्दलची कारणे समितीच्या कामकाजाच्या अभिलेखात नमूद करून त्या कारणांस्तव महाव्यवस्थापकास प्राधिकृत करू शकेल.

संविदा पुरी केली जाण्यासाठी प्रतिभूती.

**४६०न.** महाव्यवस्थापक, कलम ४६०म खाली तो करील अशी प्रत्येक संविदा रीतसर पुरी केली जाण्यासाठी पुरेशी प्रतिभूती देण्यास फर्मावील ; तसेच [५][तो स्वेच्छानिर्णयानुसार] या अधिनियमाखाली तो करील अशी अन्य कोणतीही संविदा रीतसर पुरी करण्यासाठी प्रतिभूती देण्यास फर्मावू शकेल.

**मालमत्तेचे संपादन व विल्हेवाट**

स्थावर मालमत्ता संविदेअन्वये संपादन करणे.

**४६०ओ.** (१) [६][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] प्रयोजनांसाठी महाव्यवस्थापकाने कोणतीही स्थावर मालमत्ता संपादन करणे हे जेव्हा आवश्यक अगर इष्ट असेल तेव्हा, [७][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समिती] एकतर सर्वसाधारणपणे कोणत्याही वर्गातील प्रकरणासाठी किंवा खास रीतीने कोणत्याही विवक्षित प्रकरणात मान्यता देईल अशा अटीवर करार करून व अशा दरांनी किंवा किंमतीस किंवा अशा कमाल मर्यादेपेक्षा अधिक नसणाऱ्या दरांनी किंवा किंमतीस, महाव्यवस्थापकास, महानगरपालिकेच्या वतीने अशी मालमत्ता संपादन करता येईल.

(२) कोणतीही स्थावर मालमत्ता संपादन करण्यासाठी करावयाची कोणतीही संविदा ही, अशा मालमत्तेसाठी द्यावयाची किंमत पाच हजार रुपयांपेक्षा अधिक असेल तर, अशा संविदेस [८][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीने मान्यता दिल्यावाचून व ती मिळेतोपर्यंत आणि ती किंमत दहा हजार रुपयांपेक्षा अधिक असेल तर, महानगरपालिकेची] मान्यता मिळाल्यावाचून व ती मिळेतोपर्यंत अशी कोणतीही संविदा विधिग्राह्य असणार नाही.

---

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २०७क अन्वये " ३००० " या संख्येऐवजी ही संख्या दाखल करण्यात आली.

[२] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम ७(१) अन्वये "तीन लाख रुपयांपेक्षा " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ७(२) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १७१ द्वारे " प्रभारी सदस्य " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १७२ द्वारे " प्रभारी सदस्याच्या मान्यतेने " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४(३) अन्वये " मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १७३(अ) अन्वये " महापौरासह परिषद " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम १७३(ब) अन्वये " प्रभारी सदस्याने " या मजकुराने सुरू होणाऱ्या व " महापौरासह परिषदेची " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

स्थावर मालमत्ता करार करून संपादन करता येत नसेल तेव्हा अनुसरावयाची कार्यपद्धती.

**४६०प.** (१) महाव्यवस्थापकास, कलम ४६०ओ खाली कोणतीही स्थावर मालमत्ता करार करून संपादन करणे अशक्य असेल तेव्हा, [१][राज्य] शासनास, स्वेच्छा निर्णयानुसार महाव्यवस्थापकाने, [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीच्या] मान्यतेने केलेल्या अर्जावरून आणि या अधिनियमाच्या इतर तरतुदींच्या अधीनतेचे जणू काही अशी मालमत्ता भूमि संपादन अधिनियम, १८९४ च्या अर्थांतर्गत सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यक असलेली जमीन असावी त्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या वतीने ती संपादन करण्याकरिता कारवाई करण्यासंबंधी आदेश देता येईल. (१८९४ चा १.)

(२) अशी कोणतीही मालमत्ता संपादन करताना ठरवून दिलेली भरपाईची रक्कम व त्याबाबत आलेला इतर सर्व खर्च हे, या अधिनियमाच्या इतर तरतुदींच्या अधीनतेने, महाव्यवस्थापक ताबडतोब देईल आणि लागोलाग उक्त मालमत्ता [३][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] प्रयोजनासाठी महानगरपालिकेमध्ये निहित होईल.

महानगरपालिका मालमत्तेची विल्हेवाट करण्यासंबंधीच्या तरतुदी.

**४६०क्यू.** [३][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] प्रयोजनांसाठी महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या मालमत्तेची विल्हेवाट करण्याच्या बाबतीत पुढील तरतुदी लागू होतील :—

(अ) महाव्यवस्थापकास, महानगरपालिकेच्या मालकीच्या, जिचे मूल्य, प्रत्येक बाबतीत [४][दहा हजार रुपयांपेक्षा] अधिक नसेल अशा कोणत्याही जंगम मालमत्तेची विल्हेवाट, तिची विक्री करून, ती भाड्याने देऊन, भाडेखरेदीने देऊन किंवा अन्यथा करता येईल ;

(ब) महाव्यवस्थापकास, [५][* * * *] महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता ही, एकाचवेळी बारा महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा कोणत्याही कालावधीसाठी पट्ट्याने देता येईल :

[३][परंतु, महाव्यवस्थापकास, त्याने वार्षिक [६][पंचाहत्तर हजार रुपयांहून] अधिक भाड्याने दिलेला (मासिक भाडेदारीच्या कराराव्यतिरिक्त) प्रत्येक भाडेपट्ट्याबाबत तो करार केल्यापासून पंधरा दिवसांच्या आत [७][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीला] कळवील ;]

(क) [८][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीच्या] मंजुरीने महाव्यवस्थापकास, जिचे मूल्य [९][एक लाख रुपयांपेक्षा] अधिक असणार नाही अशा महानगरपालिकेच्या मालकीच्या कोणत्याही जंगम मालमत्तेची विक्री करून किंवा अन्यथा विल्हेवाट करता येईल, आणि महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर मालमत्ता एका वर्षापेक्षा अधिक अशा [१०][कोणत्याही सलग कालावधीसाठी] पट्ट्याने देता येईल किंवा महानगरपालिकेच्या मालकीच्या ज्या कोणत्याही स्थावर मालमत्तेचे मूल्य [११][पाच लाख रुपयांहून] अधिक नसेल किंवा ज्या स्थावर मालमत्तेचे वार्षिक भाडे [१२][पन्नास हजार रुपयांहून] अधिक नसेल अशी मालमत्ता विकता येईल किंवा निरंतर पट्ट्याने देता येईल ;

[१] सन १९५० चा विधि अनुकूलन आदेश याअन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १७४ अन्वये " महापौरासह परिषदेच्या " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, खंड २११ (ब) अन्वये मूळ परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल करण्यात आले.

[४] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम ८(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १७५(अ) अन्वये " प्रभारी सदस्याच्या मान्यतेने " हा मजकूर वगळण्यात आला.

[६] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम ८(२) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १७५(ब) अन्वये " प्रभारी सदस्यास " या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम १७५(क) आणि १७६ अन्वये " प्रभारी सदस्य ", " महापौरासह परिषद " या मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[९] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २११ (क) आणि (ब) अन्वये " दहा हजार रुपयांपेक्षा " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला..

[१०] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम ८(३) दोन अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[११] वरील अधिनियमाच्या कलम ८(३) (एक) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१२] वरील अधिनियमाच्या कलम ८(३) (तीन) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ड) महानगरपालिकेच्या मंजुरीने महाव्यवस्थापकास, महानगरपालिकेच्या मालकीची कोणतीही स्थावर किंवा जंगम मालमत्ता पट्ट्याने देता येईल किंवा विकता येईल किंवा अन्यथा हस्तांतरित करता येईल.

### अधिकारी व कर्मचारी

महाव्यवस्थापकाने तयार करावयाची आणि [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीने] मंजूर करावयाची स्थायी अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची अनुसूची.

**४६०र.** (१) महाव्यवस्थापक [१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] प्रयोजनांसाठी त्याच्या मते, जे अधिकारी व कर्मचारी नोकरीवर कायम ठेवले पाहिजेत त्या अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची पदनामे व श्रेणी आणि त्या प्रत्येकास जे वेतन, फी व भत्ते देण्याचे त्याने योजिले असेल त्यांची रक्कम व स्वरूप दर्शवणारी एक अनुसूची वेळोवेळी तयार करील आणि ती [३][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीसमोर] ठेवील.

(२) [३][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समिती] अशा अनुसूचीस, ती ज्या स्वरूपात असेल तशा स्वरूपात किंवा तिला इष्ट वाटतील अशा फेरबदलांच्या अधीनतेने मंजुरी देईल :

परंतु,—

(अ) ज्या पदांची एकूण वित्तलब्धी [४][दहा हजार रुपयांहून] अधिक असेल असे कोणतेही नवीन स्थायी पद, महानगरपालिकेच्या मंजुरीवाचून, निर्माण करता येणार नाही.

(ब) महनगरपालिकेस, ठरावाद्वारे, असा निदेश देता येईल की, अधिकाऱ्यांच्या किंवा कर्मचाऱ्यांच्या कोणत्याही विनिर्दिष्ट वर्गासाठी किंवा श्रेणीसाठी असलेले वेतनमान महानगरपालिकेच्या मान्यतेवाचून बदलता कामा नये आणि असा ठराव अंमलात असेल तोपर्यंत [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीने] अशा वेतनमानांमध्ये अशा मान्यतेवाचून कोणतेही बदल करण्यास प्राधिकार देता कामा नये.

स्थायी अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या नेमणुकीवर निर्बंध.

**४६०स.** कोणत्याही स्थायी अधिकाऱ्याचे किंवा कर्मचाऱ्याचे पद व वित्तलब्धी कलम ४६०र खाली तयार केलेल्या आणि मंजूर केलेल्या अनुसूचीमध्ये समाविष्ट करण्यात आलेली असल्याखेरीज, त्यास [१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमांच्या] कोणत्याही विभागात घेता येणार नाही.

अस्थायी पद निर्माण करणे.

**४६०ट.** (१) महाव्यवस्थापकास, भत्ते वगळून [५][दहा हजार रुपयांहून] अधिक नसेल अशा मासिक वेतनाची अस्थायी स्वरूपाची पदे सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीसाठी निर्माण करता येतील आणि [३][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीच्या] पूर्वमंजुरीवाचून अशी कोणतीही पदे अशा कालावधीनंतर चालू ठेवता येणार नाहीत.

(२) [३][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीस] भत्ते वगळून [६][दहा हजार रुपयांहून] अधिक अशा मासिक वेतनाची सहा महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीसाठी असलेली अस्थायी पदे निर्माण करता येतील आणि [३][समिती] तिने निर्माण केलेल्या अशा प्रत्येक पदाविषयी ताबडतोब महानगरपालिकेस कळवील आणि अशी कोणतीही पदे, महानगरपालिकेच्या पूर्वमंजुरीवाचून सहा महिन्यांपेक्षा अधिक कालावधीसाठी चालू ठेवता येणार नाहीत.

---

[१] सन १९९६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या अनुसूची (१) ४(४)अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १७५, १७६ व १७७ अन्वये "प्रभारी सदस्य", "महापौरासह परिषद"या मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[४] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १७, कलम ९ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १०(१)अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम १०(२)अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

L-12 (H 4167) (Page No. 422-432) (Side No. 474-484)



**४६०यू.** कलमे [१][८०ब,] ४६०र आणि ४६०-ट यांच्या तरतुदींच्या अधीनतेने, [२][बृहन्मुंबई वीज-पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] प्रयोजनांसाठी महानगरपालिका अधिकारी आणि कर्मचारी यांची नेमणूक करण्याचा अधिकार हा, जर [३][ते पद कलम ४६०र खाली [४][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीने] आणि महानगरपालिकेने मंजूर केलेल्या अनुसूचित दाखल केलेल्या सचिवांच्या पदाच्या समान किंवा त्याहून वरिष्ठ असेल तर,] [४][मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीमध्ये] निहित होईल आणि इतर सर्व बाबतीत असा अधिकार [५][महाव्यवस्थापकामध्ये] निहित होईल.

नेमणूक करण्याचा अधिकार कोणामध्ये निहित असेल.

**४६०व्ही.** (१) [४][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समिती] या प्रकरणाखाली नेमणूक केलेले महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांना लागू करता येतील असे पुढील बाबींसंबंधी विनियम वेळोवेळी करील :—

[४][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीने] सेवा विनियम तयार करणे.

(अ) ज्या कोणत्याही महानगरपालिका अधिकाऱ्याकडून किंवा कर्मचाऱ्याकडून प्रतिभूती घेणे इष्ट आहे असे वाटेल त्या अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने द्यावयाच्या प्रतिभूतीची रक्कम व तिचे स्वरूप निश्चित करणे ;

(ब) महानगरपालिका अधिकाऱ्यांना व कर्मचाऱ्यांना रजा मंजूर करण्यासंबंधी विनियमन करणे ;

(क) उक्त अधिकाऱ्यांस अणि कर्मचाऱ्यांस किंवा त्यांच्यापैकी काहींना, ते रजेवर असताना भत्ते देण्यास अधिकृत मंजुरी देणे ;

(ड) उक्त अधिकारी व कर्मचारी यांपैकी कोणतेही अधिकारी व कर्मचारी रजेवर असताना त्यांच्या गैरहजेरीत त्यांच्याऐवजी काम करण्यासाठी नेमलेल्या व्यक्तींना द्यावयाचे पारिश्रमिक निर्धारित करणे ;

(ई) उक्त अधिकाऱ्यांस व कर्मचाऱ्यांस प्रवास भत्ता किंवा वाहन भत्ता देण्यास अधिकृत मंजुरी देणे ;

(फ) उक्त सर्व अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या सेवेचा कालावधी विनियमित करणे ;

(ग) उक्त अधिकारी व कर्मचारी किंवा त्यांपैकी कोणीही निवृत्त झाल्यानंतर किंवा त्यांना सेवेतून मुक्त करण्यात आल्यानंतर, त्यांना ज्या शर्तीखाली निवृत्तिवेतने, उपदाने किंवा अनुकंपा भत्ते मिळतील त्या शर्ती आणि ज्या शर्तीखाली उक्त अधिकाऱ्यांच्या किंवा कर्मचाऱ्यांच्या मृत्यूनंतर त्यांच्यावर अवलंबून असलेल्या त्यांच्या विधवांना किंवा विहित करण्यात येतील अशा इतर नातेवाईकांना अनुकंपा भत्ते मिळतील, त्या शर्ती व अशी निवृत्तिवेतने, उपदाने किंवा अनुकंपा भत्ते यांच्या रकमा निर्धारित करणे ;

(ह) जो कोणताही निवृत्तिवेतन निधी किंवा भविष्यनिर्वाह निधी उक्त अधिकाऱ्यांना किंवा कर्मचाऱ्यांना [६][समितीच्या] मान्यतेने स्थापन करता येईल त्या निधीसाठी किंवा उक्त अधिकाऱ्यांच्या किंवा कर्मचाऱ्यांच्या लाभार्थ समितीने स्थापन केला असेल असा कोणताही भविष्यनिर्वाह निधी असल्यास, त्या निधीसाठी विहित केलेल्या विवक्षित दरांनी व विहित केलेल्या विवक्षित शर्तींच्या अधीनतेने अंशदान देण्यास अधिकृत मंजुरी देणे ;

(आय) सर्वसाधारणपणे, उक्त अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या सेवेच्या इतर कोणत्याही शर्ती विहित करणे.

(२) [४][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीने] या कलमाखाली केलेला कोणताही विनियम महानगरपालिकेने कायम केल्यावाचून व तो कायम करण्यात येईतोपर्यंत अंमलात येणार नाही किंवा विधिग्राह्य असणार नाही.

---

[१] सन १९६४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११, कलम ९ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ११ अन्वये " इतर सर्व भत्ते वगळून किमान मासिक वेतन पाचशे रुपयांहून कमी असेल तर " या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १७८ अन्वये " महापौरासह परिषदेने " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " प्रभारी सदस्याकडे " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

[५] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ५ (ब) अन्वये " आणि मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीमध्ये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १७९ (अ)(दोन) अन्वये, " महापौरासह परिषद " या मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

L-12 (H 4167) (Page No. 422-432) (Side No. 474-484)



(३) पोट-कलम (१), खंड (ह) च्या प्रयोजनाकरिता, महानगरपालिकेने कोणताही उपक्रम संपादन करण्यापूर्वी स्थापन केलेला कोणताही निधी हा, उक्त उपक्रम [१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाचा] भाग झाल्यावर [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीने] उक्त निधी चालू राहण्यासाठी व्यवस्था केली असेल तर, उक्त खंडात नमूद केल्याप्रमाणे स्थापन करण्यात आला आहे, असे मानण्यात येईल.

निलंबित करण्याचा, शिक्षा करण्याचा व बडतर्फ करण्याचा अधिकार कोणामध्ये निहित असेल.

**४६०डब्ल्यू.** ज्या प्राधिकाऱ्याने अशा अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची नेमणूक केली असेल तो प्राधिकारी या प्रकरणाच्या तरतुदींखाली नेमलेल्या प्रत्येक महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी यांस, विभागीय नियमांचा कोणताही भंग किंवा शिस्तभंग केल्याबद्दल किंवा निष्काळजीपणाबद्दल, अयोग्यतेबद्दल, कर्तव्याकडे दुर्लक्ष केल्याबद्दल किंवा इतर गैरवर्तनाबद्दल त्याला दंड करू शकेल, खालच्या दर्जावर आणू शकेल, निलंबित करू शकेल किंवा बडतर्फ करू शकेल.

अनुपस्थितीची परवानगी.

**४६०एक्स.** (१) कलम ४६०व्ही खाली केलेल्या कोणत्याही विनियमांच्या तरतुदींच्या अधीनतेने, महाव्यवस्थापकास, जे अधिकारी—कर्मचारी नेमण्याचा अधिकार त्याच्यामध्ये निहित केला असेल अशा कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास अनुपस्थितीची परवानगी देता येईल आणि या प्रकरणाच्या तरतुदींखाली नेमलेल्या इतर कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास तीन महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीसाठी अनुपस्थितीची परवानगी देता येईल.

[३][(२) बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीस, तिने नेमलेल्या कोणत्याही अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास तीन महिन्यांपेक्षा अधिक असेल अशा कालावधीसाठी अनुपस्थितीची परवानगी देता येईल.]

हंगामी नेमणुका.

**४६०य.** या प्रकरणाच्या तरतुदींखाली नेमलेल्या एखाद्या अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास ज्या प्राधिकाऱ्याने अनुपस्थितीची परवानगी दिली असेल त्यास, आवश्यक वाटेल तेव्हा पूर्वोक्त विनियमांच्या अधीनतेने, रजेवर अनुपस्थित असलेल्या अशा अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या जागी काम करण्यासाठी एखाद्या व्यक्तीची नेमणूक करता येईल.

## महसूल व खर्च

## [१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधी ]

[१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीची] रचना.

**४६०झ.** कलम ४६०हह यामध्ये जी तरतूद केली असेल ती खेरीज करून एरव्ही, [१][मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] कामाच्या बाबतीत महानगरपालिकेकडून किंवा तिच्या वतीने मिळालेला सर्व पैसा निधीमध्ये जमा करण्यात येईल ; उक्त निधीला [१][बृहन्मुंबई शहर वीजपुरवठा व परिवहन निधी ] असे संबोधण्यात येईल आणि यात अंतर्भूत तरतुदींच्या अधिनतेने, हा निधी, महानगरपालिका उक्त उपक्रमाच्या प्रयोजनांसाठी विश्वस्त म्हणून धारण करील.

[१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीच्या] खाती जमा करावयाच्या सर्व रकमा महाव्यवस्थापकाने स्वीकारणे व त्या बँकेत जमा करणे.

**४६०अअ.** [१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीच्या] खाती जमा करावयाचा सर्व पैसा, महाव्यवस्थापक स्वीकारील आणि तो ताबडतोब [४][भारतीय स्टेट बँकेत] किंवा महानगरपालिका वेळोवेळी याबाबतीत मान्यता देईल अशा शहरांतून इतर बँकांत [१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधी खाते] या नावाच्या खात्यात भरण्यात येईल :

परंतु, महाव्यवस्थापकास, [५][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीने] दिलेल्या कोणत्याही सर्वसाधारण किंवा विशेष निदेशांच्या अधीनतेने [१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या]कामांसाठी आवश्यक असतील अशा शिलकी रकमा रोकड स्वरूपात ठेवून घेता येतील.

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, अनुसूची (१) ४(५) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७ याच्या कलम १७९ अन्वये " महापौरासह परिषद " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १८० अन्वये, पोट-कलम (२) ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[४] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २१७ (अ) अन्वये " भारतीय इंपिरिअल बँकेत " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १८१ अन्वये " महापौरासह परिषदेने " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][**४६०बब.** (१) यात यापुढे जी तरतूद करण्यात आली असेल त्या तरतुदींच्या अधीनतेने उपरोक्त बँक, खाली विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने दोन व्यक्तींनी सही केलेल्या धनादेशान्वये असेल त्या व्यतिरिक्त एरव्ही, [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीतून] कोणत्याही रकमा देणार नाही :—

[२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीतून] रकमा कशा काढाव्यात.

(अ) आयुक्ताने किंवा महाव्यवस्थापकाने किंवा उप महाव्यवस्थापकाने किंवा त्यांच्या गैरहजेरीत [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीने] मंजूर केलेल्या अधिकाऱ्यांच्या यादीत नाव असलेल्या ज्या महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यास धनादेशावर सही करण्याचा प्राधिकार देण्यात आला असेल अशा महानगरपालिकेच्या अधिकाऱ्याने, आणि

(ब) उक्त यादीत ज्याचे नाव असेल अशा महानगरपालिका अधिकाऱ्याने :

परंतु, दोन हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल अशा रकमेच्या कोणत्याही धनादेशावर जर आयुक्ताने किंवा महाव्यवस्थापकाने किंवा उप महाव्यवस्थापकाने किंवा उक्त यादीत ज्यांची नावे समाविष्ट असतील अशा कोणत्याही दोन अधिकाऱ्यांनी सही केलेली असेल तर, असा धनादेश हा, उक्त बँकेने त्याची रक्कम देण्याबद्दल असलेले पुरेसे प्राधिकारपत्र असेल.

(२) [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीतून] महानगरपालिकेने द्यावयाची शंभर रुपयापेक्षा (किंवा [३][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समिती,] सर्वसाधारणपणे किंवा विनिर्दिष्ट वर्गाच्या रकमा देण्याकरिता वेळोवेळी निश्चित करील अशा त्याहून अधिक रकमेपेक्षा) अधिक नसेल अशी कोणतीही रक्कम, उपरोक्त रीतीने सही केलेल्या धनादेशाअन्वयेच देण्यात येईल व ती इतर कोणत्याही रीतीने देण्यात येणार नाही.]

(३) पोट-कलम (२) च्या कक्षेत न घेणाऱ्या देय रकमा, महाव्यवस्थापक रोकड स्वरूपात देऊ शकेल, तसेच त्यास अशा देय रकमा भागविण्यासाठी म्हणून प्रत्येकी पाच हजार रुपयांपेक्षा (किंवा [३][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समिती,] वेळोवेळी निश्चित करील अशा अधिक रकमेपेक्षा) अधिक नसेल अशा रकमेचे उपरोक्त रीतीने सही केलेले धनादेश वेळोवेळी काढता येतील.]

सोयीचे असेल तेव्हा, [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीचा] भाग मुंबईबाहेरील बँकेत किंवा अभिकरणाकडे ठेवणे.

**४६०कक.** कलमे ४६० अअ आणि ४६० बब मध्ये काहीही अंतर्भूत केलेले असले तरी, महाव्यवस्थापकास [३][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीच्या] पूर्वसंमतीने, वेळोवेळी शहराच्या बाहेरील कोणत्याही जागी असलेल्या एखाद्या बँकेत किंवा इतर अभिकरणाकडे, [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीचा] कोणताही भाग पाठवता येईल व तेथे जमा करता येईल आणि [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीच्या] खाती जमा करावयाच्या किंवा त्या खात्यातून द्यावयाचा पैसा, महानगरपालिकेच्या मते, कोणत्याही अशा बँकेकडे किंवा अभिकरणाकडे असलेल्या निधीच्या खाती सर्वात सोईस्करपणे जमा करता येणे शक्य असेल किंवा त्यातून देता येणे शक्य असेल तर अशा रीतीने जमा करता येईल किंवा देता येईल.

फक्त अर्थसंकल्पीय अनुदानात समाविष्ट असलेल्या रकमाच [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीतून ] खर्च करणे.

**४६०डड.** (१) यात यापुढे जी तरतूद करण्यात आली असेल ते खेरीज करून एरव्ही, [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीतून] जी कोणतीही रक्कम खर्च करण्यात यावयाची असेल ती चालू वर्षाच्या अर्थसंकल्पीय अनुदानात समाविष्ट करण्यात आलेली नसेल तर आणि अशा अर्थसंकल्पीय अनुदानात पुरेशी शिल्लक उपलब्ध असल्याखेरीज महाव्यवस्थापक अशी कोणतीही रक्कम देऊ शकणार नाही मग अशा रकमेच्या बाबतीत कलमे १३३ किंवा १३४ खाली कोणतीही कपात केलेली असो किंवा ती हस्तांतरित झालेली असो :

परंतु, खालील बाबींचा या मनाईस अपवाद करण्यात येईल :—

(अ) [३][बृहन्मुबई वीजपुरवठा व परिवहन समितीने] कलम १३२ खाली ज्या रकमा खर्च करण्यास मंजुरी दिली असेल अशा रकमा ;

---

[१] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३९, कलम १२ खाली मूळ कलमाऐवजी कलम ४६०बब दाखल करण्यात आले.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(५) मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १८२ (ब) व (क), १८३, १८४ (अ) अन्वये " महापौर परिषदेने " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(ब) कंत्राटदार ग्राहक यांच्या किंवा इतर व्यक्तींच्या मालकीच्या ठेव म्हणून धारण केलेल्या पैशांची आणि [१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीमध्ये] चुकीने जमा केलेल्या अगर जमा खाती नोंदलेल्या रकमांची परतफेड ;

(क) महाव्यवस्थापकास ज्या रकमा या अधिनियमाच्या किंवा दुसऱ्या कोणत्याही अधिनियमितीच्या तरतुदीखाली भरपाई म्हणून देणे भाग असेल किंवा देण्याचा अधिकार असेल त्या रकमा ;

(ड) कलम ४६० गग च्या खंड (फ) मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही परिस्थितीत देय असलेल्या रकमा ;

(ई) महाव्यवस्थापकाने कलम ६४ खाली केलेला परिव्यय ;

(फ) कलम ११५ च्या तरतुदींखाली आयुक्ताने [१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] प्रयोजनार्थ महानगरपालिका निधीतून दिलेल्या कोणत्याही रकमेबद्दल महानगरपालिका निधीमध्ये भरणा करण्यासाठी आवश्यक असलेली कोणतीही रक्कम :

[२][परंतु आणखी असे की, ज्या बाबतीत निधीसाठी निकडीची गरज भासेल त्या बाबतीत आणि महानगरपालिकेकडे [३][स्थायी समितीने] अभिवेदन सादर केल्यावर, महानगरपालिका, राज्य शासनाच्या पूर्वमंजुरीने (अशी मंजुरी रकमेची परतफेड व इतर गोष्टी या संबंधात उक्त शासनास योग्य वाटतील अशा अटींच्या व शर्तींच्या अधीनतेने देता येईल) [१][बृहन्मुबई वीजपुरवठा व परिवहन निधीतून] अशी निकड भागविण्यासाठी तात्पुरती आगाऊ रक्कम म्हणून विनिर्दिष्ट करण्यात येईल अशी रक्कम महानगरपालिका निधीस देण्यासाठी महाव्यवस्थापकास प्राधिकृत करू शकेल.]

(२) पोट-कलम (१) मध्ये " अर्थसंकल्पीय अनुदान " म्हणजे, कलम १३० मध्ये व्याख्या केल्याप्रमाणे त्या संज्ञेच्या अर्थानुसार असलेली अनुदानाची रक्कम, आणि तिच्यामध्ये, कलम १३३ पोट-कलम (१) खाली एखादी रक्कम हस्तांतरित केल्यामुळे अर्थसंकल्पीय अनुदानातील अशा रकमेत कोणत्याही वेळी जेवढी वाढ होईल, तेवढ्या रकमेचा समावेश होतो.

[१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीच्या] खात्यावर काढलेल्या धनाकर्षांची तपासणी [४][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमांच्या अधिकाऱ्यांनी] करणे.

**४६०ईई.** [४][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाचे अधिकारी] कलम ४६०बब खाली कोणताही धनादेश तो ज्या रकमेचा असेल ती रक्कम एक तर वर सांगितल्याप्रमाणे अर्थसंकल्पीय अनुदानातील रकमेमध्ये समाविष्ट असलेली रक्कम आहे किंवा कलम ४६०डड, पोट-कलम (१) च्या परंतुकात विनिर्दिष्ट केलेल्या अपवादात्मक बाबींपैकी एखादी बाब आहे, याबाबत स्वतःची खात्री करून घेतल्यावाचून सही करणार नाहीत.

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, अनुसूची (१) ४(३) व (५) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ३ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १८४(ब) अन्वये "महापौरासह परिषद" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २२१ अन्वये "बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीचे सदस्य" आणि त्या कलमाच्या समासटीपेमधील "बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीचे सदस्यांनी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

अर्थसंकल्पीय अनुदानात समाविष्ट नसलेली रक्कम कलम ४६०डड. पोट-कलम (१) च्या परंतुकाखालील खंड (क) किंवा (ड) खाली खर्च करण्यात आली असेल तेव्हाची कार्यपद्धती.

**४६०फफ.** जेव्हा महाव्यवस्थापकाने कलम ४६०डड, पोट-कलम (१) च्या परंतुकातील खंड (क) किंवा (ड) खाली कोणतीही रक्कम खर्च केली असेल तेव्हा तो ताबडतोब ती परिस्थिती [१][बृहन्मुबई वीजपुरवठा व परिवहन समितीस] कळवील. उक्त समिती जादा खर्चाची रक्कम भरून काढण्यासाठी त्या परिस्थितीत शक्य व इष्ट वाटेल अशी कार्यवाही कलम १३३, पोट-कलम (२) खाली करील किंवा अशी कारवाई करण्यासाठी महानगरपालिका शिफारस करील.

ज्या प्रयोजनासाठी [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीचे] उपयोजन करावयाचे ती प्रयोजने.

**४६०गग.** [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीमध्ये] वेळोवेळी जमा करण्यात आलेल्या रकमांचे उपयोजन [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रम] संपादन करण्याच्या, ठेवण्याच्या चालवण्याच्या व त्यामध्ये सुधारणा करण्याच्या प्रयोजनांसाठी आणि या प्रकरणाच्या तरतुदी अंमलात आणण्याच्या प्रयोजनांसाठी ज्या आवश्यक असतील किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींद्वारे किंवा त्याखाली ज्या देण्याबाबत रीतसर निदेश देण्यात किंवा मंजुरी देण्यात आली असेल अशा सर्व रकमा, आकार व परिव्यय देण्यासाठी करण्यात येईल. त्यात पुढील गोष्टींचा समावेश असेल :—

(अ) [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] प्रयोजनांसाठी महानगरपालिका निधीतून घेतलेल्या कोणत्याही रकमेचा त्या निधीत परत भरणा करणे—यात आयुक्ताने महानगरपालिका निधीच्या खर्चाने, अशा कोणत्याही प्रयोजनांसाठी पुरवण्यात आलेल्या सर्व गोष्टी व देण्यात आलेल्या सर्व सेवासंबंधीचा खर्च किंवा त्यासंबंधीचे वाजवी आकार यांचा समावेश होतो ;

(ब) [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] जमिनी, इमारती व इतर स्थावर व जंगम मालमत्ता महानगरपालिकेमध्ये निहित नसत्या तर त्यांच्या संबंधात पट्ट्या, कर, फी किंवा इतर प्रकार याबद्दलची जी रक्कम उक्त जमिनी आणि इमारती आणि इतर मालमत्ता यांच्या बाबतीत या अधिनियमाखाली देणे झाली असती, त्या रकमेएवढी रक्कम महानगरपालिका निधीमध्ये देणे ;

[३][(क) [४][ * * * *] महाव्यवस्थापकास वेतन व इतर भत्ते देणे;]

(ड) या प्रकरणाच्या तरतुदींखाली नेमलेल्या सर्व महानगरपालिका अधिकाऱ्यांस व कर्मचाऱ्यांस वेतन आणि भत्ते देणे आणि या प्रकरणाच्या किंवा या प्रकरणाखाली तयार केलेल्या व त्या त्यावेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अनुसूचीच्या किंवा विनियमांच्या तरतुदींखाली भविष्यनिर्वाह निधीसाठी द्यावयाची सर्व अंशदाने, निवृत्तिवेतने, उपदाने आणि अनुकंपा भत्ते देणे;

(ई) या अधिनियमाच्या किंवा दुसऱ्या कोणत्याही अधिनियमितीच्या तरतुदींखाली [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] प्रयोजनासाठी किंवा [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] संबंधात त्यास प्रदान केलेला कोणताही अधिकार वापरताना किंवा त्यांच्याकडे सोपवलेले कोणतेही कर्तव्य पार पाडताना महाव्यवस्थापकाला आलेला सर्व खर्च व परिव्यय देणे; यांत भरपाईच्या रूपाने जो पैसा त्याने देणे आवश्यक असेल किंवा देण्याचा त्यास अधिकार असेल त्या पैशांचा अंतर्भाव होतो ;

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १८५ अन्वये " महापौरासह परिषदेचा " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४(३) व (५) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २२३ अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १८६ अन्वये " आणि प्रभारी सदस्य " हा हे शब्द वगळण्यात आले.

(फ) या प्रकरणाच्या तरतुदींखाली फेरविक्री करावयाच्या किंवा भाड्याने किंवा भाडेखरेदीने द्यावयाच्या मालाच्या व साधनसामग्रीच्या खरेदीबद्दल पैसे देणे ;

(ग) [१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रम] संपादन करणे, तो सुस्थितीत ठेवणे किंवा चालवणे यांपासून उद्‌भवलेल्या कोणत्याही कार्यवाहीत महानगरपालिकेविरूद्ध किंवा पदसिद्ध आयुक्तांच्या अथवा महाव्यवस्थापकाच्याविरूद्ध दिवाणी किंवा फौजदारी न्यायालयाने दिलेल्या हुकुमनाम्याखाली किंवा आदेशाखाली किंवा परिवहन उपक्रम अशा रीतीने संपादन करणे, सुस्थितीत ठेवणे किंवा चालविणे यांपासून उद्‌भवणाऱ्या कोणत्याही दाव्यासंबंधाने किंवा इतर कायदेशीर कार्यवाहीसंबंधाने किंवा मागणीसंबंधाने कलम ५१७ खाली करण्यात आलेल्या तडजोडीपोटी देणे असलेली प्रत्येक रक्कम देणे;

(ह) जी रक्कम कलम ४६०केके किंवा ४६०लल च्या तरतुदींअन्वये महानगरपालिका निधीमध्ये हस्तांतरित करावयाची असेल, अशी प्रत्येक रक्कम.

## विशेष निधी

[२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन कर्मचारीवर्ग हितकारी निधी] स्थापन करणे.

**४६०हह.** कलम ४६०डब्ल्यू खाली वसूल करण्यात आलेले दंड, उतारूंकडून मिळालेल्या देणग्या आणि [१][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] वाहनांत मिळालेल्या व हक्क सांगण्यात आलेल्या, हरवलेल्या, वस्तूंची विक्री करून आलेल्या रकमा; "[२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन कर्मचारीवर्ग हितकारी निधी]" या नावाने संबोधण्यात येणाऱ्या एका स्वतंत्र निधीच्या खाती जमा करण्यात येतील आणि अशा निधीचे उत्पन्न या प्रकरणाखाली नेमण्यात आलेल्या अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या हितसंवर्धनासाठी व महानगरपालिकेच्या सेवेत असताना मरण पावतील अशा अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या विधवांना आणि [३][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समिती] वेळोवेळी निर्धारित करील अशा त्या अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या इतर नातेवाईकांना अनुकंपा भत्ते देण्यासाठी खर्च करण्यात येईल.

इतर विशेष निधी.

**४६०आयआय.** महानगरपालिकेच्या पूर्वमान्यतेने [१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीचा] कोणताही भागांश कलम ४६०मम खाली ठेवलेल्या लेख्यांत एका स्वतंत्र शीर्षाखाली वेळोवेळी जमा करावा, असा निदेश [४][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समिती] देता येईल. परंतु ज्या प्रयोजनासाठी याप्रमाणे विशेष निधी निर्माण करण्यात आला असेल त्या प्रयोजनांशी स्पष्टपणे संबंध असलेल्या रकमाच अशा विशेष शीर्षाखाली जमा करण्यात व खर्ची घालण्यात येतील.

## शिल्लक रकमांची विल्हेवाट करणे

अधिशेष रकमांची गुंतवणूक.

**४६०जज.** (१) या अधिनियमाच्या प्रयोजनांसाठी किंवा [१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] प्रयोजनांसाठी उभारलेल्या कोणत्याही कर्जासाठी [१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीच्या] खाती जमा असलेल्या ज्या अधिशेष रकमांचे उपयोजन ताबडतोब किंवा लवकर करता येणे शक्य नसेल त्या रकमा, वेळोवेळी [५][भारतीय स्टेट बँकेत] किंवा कलम ४६०अअ खाली महानगरपालिका मान्य करील अशा इतर बँकेत व्याजाने ठेवण्यात येतील किंवा सरकारी रोख्यांत गुंतवण्यात येतील.

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४(३) व (५) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २ अनुसूची (१) ४(६) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९९ चा मुंबई अधिनियम क्रमांक २७, कलम १८७ (अ) (एक) अन्वये "प्रभारी सदस्य" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १८८ व १८९ (अ) (दोन) अन्वये "महापौरासह परिषद" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २२६(अ) अन्वये "भारतीय इंपिरीअर बँकेत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) अशा प्रयोजनांकरिता उपयोजित करण्यासाठी ज्या अधिशेष रकमा त्वरित उपलब्ध ठेवणे आवश्यक असेल अशा सर्व अधिशेष रकमा आणि ज्या अधिशेष बाबतीत पूर्वोक्तप्रमाणे त्या किफायतशीर रीतीने ठेव म्हणून ठेवणे किंवा गुंतवणे शक्य नाही असे महाव्यवस्थापकाचे मत झाले असेल आणि [१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रम समितीची] तिला सहमती असेल त्या सर्व अधिशेष रकमा, [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समिती,] महानगरपालिकेच्या नियंत्रणाच्या अधीनतेने, त्या प्रयोजनांकरिता वेळोवेळी निवड करील अशा, शहरातील कोणत्याही बँकेत किंवा बँकांमध्ये व्याजाने ठेवता येतील.

(३) महाव्यवस्थापक, अशा सर्व ठेवी व गुंतवणुका महानगरपालिकेच्या वतीने, [३][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीच्या] संमतीने घेऊन ठेवील व गुंतवणूक करील आणि तशाच मंजुरीने महाव्यवस्थापकांना, कोणत्याही वेळी, याप्रकारे ठेवलेली कोणतीही रक्कम काढून घेता येईल किंवा कोणत्याही रोख्यांची विल्हेवाट करता येईल किंवा याप्रमाणे काढलेल्या किंवा अशा रोख्यांची विल्हेवाट करून मिळालेला पैसा पुन्हा ठेवता येईल किंवा पुन्हा गुंतवणूक करता येईल, मात्र, कोणतीही रक्कम ठेवण्याविषयी किंवा गुंतवणूक करण्याविषयी, काढण्याविषयी किंवा तिची विल्हेवाट करण्याविषयी या कलमाखाली दिलेला कोणताही आदेश, लेखी असल्याखेरीज आणि धनादेशांवर सही करण्याकरिता कलम ४६०बब, पोट-कलम (१) यात विनिर्दिष्ट केलेल्या रीतीने तीन व्यक्तींनी त्यावर सही केलेली असल्याखेरीज तो कोणत्याही प्रकारे विधिग्राह्य असणार नाही.

(४) अशा कोणत्याही ठेवी ठेवल्यामुळे किंवा गुंतवणूक केल्यामुळे जो कोणताही तोटा होईल, तो [४][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीच्या] खर्चखाती टाकण्यात येईल.

### अधिशेष रकमेतून प्रदाने करणे

**४६०केके.** (१) प्रत्येक सरकारी वर्षाच्या अखेरीस, प्राप्तीमधून खर्च वजा जाता [४][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीच्या] महसूल खाती असलेल्या शिलकेतून, उक्त निधीच्या महसूलातून देय असलेले सर्व आकार, परिव्यय आणि खर्च भागवल्यानंतर किंवा त्यासाठी तरतूद केल्यानंतर आणि उक्त निधीच्या खाती किमान एक लाख रुपये शिल्लक जमाखाती ठेवण्यासाठी तरतूद केल्यानंतर पोट-कलम (२) मध्ये तरतूद केलेली रक्कम महानगरपालिका निधीच्या जमाखाती बदली करण्यात येईल :

महानगरपालिका निधीला द्यावयाची निश्चित वार्षिक रक्कम.

परंतु, उपरिनिर्दिष्ट गोष्टींसाठी तरतूद करण्यात आल्यानंतर, उक्त महसुलाच्याखाती जमा असलेली शिल्लक, पोटकलम (२) मध्ये तरतूद केलेल्या रकमेपेक्षा कमी असेल तर, अशी सर्व शिल्लक रक्कम, महानगरपालिका निधीत हस्तांतरित करण्यात येईल आणि कोणतीही तूट ही, कलम ४६०लल खाली ठेवलेल्या महसुली राखीव निधीतून रक्कम काढून महानगरपालिका निधीच्या खाती जमा करून भरून काढण्यात येईल आणि आणखी तूट राहिल्यास ही तूट लगतपुढील किंवा कोणत्याही त्यानंतरच्या वर्षी उपरिनिर्दिष्ट सर्व गोष्टींसाठी आणि पोटकलम (२) मध्ये तरतूद केलेल्या त्या वर्षाच्या बाबतीतील रकमेसाठी काही तरतूद केल्यानंतर महसूल खात्यामध्ये शिल्लक राहिलेल्या रकमेतून महानगरपालिका निधीच्या खात्यात रक्कम जमा करून भरून काढण्यात येईल.

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १८९ (अ)(एक) अन्वये "प्रभारी सदस्यांची" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १८९(अ)(दोन) अन्वये "महापौरासह परिषद" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम १८९(ब) अन्वये "प्रभारी सदस्याच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(५) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) पोटकलम (१) खाली महानगरपालिका निधीकडे हस्तांतरित करावयाची रक्कम पुढीलप्रमाणे असेल.—

(अ) दिनांक ३१ मार्च १९४८ रोजी संपणाऱ्या सरकारी वर्षाच्या बाबतीत, पाच लाख रुपये;

[१][(ब) दिनांक ३१ मार्च १९४९ रोजी आणि दिनांक ३१ मार्च १९५० रोजी संपणाऱ्या सरकारी वर्षापैकी प्रत्येक वर्षाच्या बाबतीत, दहा लाख रुपये;

(क) दिनांक ३१ मार्च १९५१ रोजी संपणाऱ्या सरकारी वर्षाच्या बाबतीत, पंचवीस लाख रुपये;

(ड) दिनांक ३१ मार्च १९५५ रोजी संपणाऱ्या वर्षापर्यंत, पुढील प्रत्येक सरकारी वर्षाच्या बाबतीत क्रमशः वाढत जाणाऱ्या प्रमाणात, पूर्वीच्या सरकारी वर्षी जी रक्कम दिली असेल त्या रकमेच्या भरीला आणखी तीन लाख रुपये;

(इ) दिनांक ३१ मार्च १९५६ रोजी संपणाऱ्या सरकारी वर्षाच्या आणि त्यापुढील प्रत्येक सरकारी वर्षाच्या बाबतीत, चाळीस लाख रुपये.]

(३) पोटकलम (१) खाली हस्तांतरित करावयाची रक्कम ही, ज्या अधिशेष रकमेतून ती जमा करावयाची असेल, अशी अधिशेष रक्कम ज्या वर्षी जमा होते, त्या वर्षाच्या समाप्तीच्या लगतनंतर येणाऱ्या, जून महिन्याच्या तीस तारखेपेक्षा उशिरा नाही अशा बेताने [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीतील] रकमेवर काढलेल्या धनादेशाच्या रूपाने, [३][भारतीय स्टेट बँकेत] उक्त निधीच्या खाती भरण्यात येईल.

महसुलाच्या अधिशेष रकमेची विल्हेवाट करणे.

**४६०लल.** (१) कलम ४६०केके मध्ये उल्लेख केलेल्या गोष्टींसाठी रक्कम राखून ठेवल्यानंतर जर उत्पन्नातून खर्च वजा जाता [४][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीच्या] महसुलाच्या खाती कोणतीही अधिशेष रक्कम राहत असेल, तर त्या शिल्लक रकमेची खालीलप्रमाणे विल्हेवाट करता येईल :—

(अ) त्या अधिशेष रकमेच्या तीस टक्के इतकी रक्कम, कलम ४६०मम खाली ठेवलेल्या लेख्यांत एका स्वतंत्र शीर्षाखाली "महसुली राखीव निधी" या नावाच्या विशेष निधीमध्ये जमा करण्यात येईल आणि याप्रमाणे जमा केल्यानंतर उत्पन्नाच्या अशा राखीव निधीतून अधिशेष रक्कम जर, पन्नास लाख रुपयापेक्षा अधिक होईल, तर त्या बाबतीत ही अधिशेष रक्कम पन्नास लाख रुपये होण्यास आवश्यक असेल फक्त तेवढीच रक्कम, कोणतीही असल्यास, अशा प्रकारे जमा करण्यात येईल आणि अधिशेष रकमेची बाकी, तिच्या तीस टक्क्यांपर्यंत खंड (ब), (क) आणि (ड) खाली जमा केलेल्या किंवा खातेबद्दल केलेल्या रकमांमध्ये सारख्या हिश्श्यांनी मिळवण्यात येईल;

(ब) अधिशेष रकमेच्या तीस टक्के इतकी रक्कम आणि खंड (अ) खाली उपलब्ध असेल अशी अधिक रक्कम ही, कलम ४६०मम खाली ठेवलेल्या लेख्यांत स्वतंत्र शीर्षाखाली "[५][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन सुधारणा निधी]" नावाच्या एका विशेष निधीमध्ये जमा करण्यात येईल;

---

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ७१, अन्वये खंड (ब) व (क) यांऐवजी खंड (ब) ते (ई) दाखल करण्यात आले.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१)४(५) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २२७ अन्वये "भारतीय इंपिरीअल बँकेत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१)४(५) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या अनुसूची (१) ४(८) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(क) अधिशेष रकमेच्या पंचवीस टक्के इतकी रक्कम आणि खंड (अ) खाली उपलब्ध असेल अशी अधिक रक्कम ही, कलम १२०अ मध्ये उल्लेखिलेल्या हितकारी निधीच्या खाती जमा करण्याकरिता महानगरपालिका निधीकडे बदली करण्यात येईल; आणि

(ड) अधिशेष रकमेच्या पंधरा टक्के इतकी रक्कम व खंड (अ) खाली उपलब्ध असेल अशी अधिक जादा रक्कम ही, महानगरपालिका निधीत हस्तांतरण करण्यात येईल.

(२) महसुली राखीव निधीचे पुढील प्रयोजनांसाठी उपयोजन केले जाईल :—

(एक) कलम ४६०केके खाली कोणत्याही वर्षी महानगरपालिका निधीकडे हस्तांतरित करावयाच्या रकमेतील कोणतीही तूट भरून काढण्याच्या किंवा कमी करण्याच्या कामी; आणि

(दोन) [१][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीतून] द्यावयाचे कोणतेही आकार भागवण्यासाठी उक्त निधीतून मिळण्यासारखी असलेली अधिशेष रक्कम जेथवर या प्रयोजनार्थ कमी पडत असेल तेथवर ते आकार भागवण्यासाठी.

(३) [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाने] जनतेसाठी तरतूद केलेल्या सेवा, सुखसोयी व सवलती यामध्ये सुधारणा करण्याकरिता [३][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन सुधारणा निधीचे] उपयोजन करण्यात येईल.

(४) पोट-कलम (१) चे खंड (क) आणि (ड) खाली महानगरपालिका निधीत हस्तांतरित करावयाच्या रकमा, ज्या सरकारी वर्षी त्या हस्तांतरित करावयाच्या असतील, त्या वर्षाच्या समाप्तीच्या लगतनंतर येणाऱ्या ३० जूनपेक्षा उशिरा नसेल अशा बेताने, परिवहन निधीतील रकमेवर दिलेल्या धनादेशाच्या रूपाने, स्टेट [६][भारतीय स्टेट बँकेत] महानगरपालिका निधीच्या खाती भरण्यात येतील.

### लेखे

[४][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाचे] लेखे.

**४६०मम.** (१) [४][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमामुळे] महानगरपालिकेच्या प्राप्त झालेल्या जमा रकमा व तिने केलेला खर्च यांचे लेखे आणि उक्त उपक्रमाच्या प्रयोजनांसाठी महानगरपालिकेमध्ये निहित झालेल्या किंवा निहित होणाऱ्या मालमत्तांचा लेखा [५][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समिती] वेळोवेळी विहित करील अशा रीतीने आणि अशा नमुन्यात ठेवण्यात येईल.

(२) महाव्यवस्थापक असे लेखे **शासकीय राजपत्रात** दरवर्षी प्रसिद्ध करील.

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(५) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या अनुसूची (१) ४(३)अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या अनुसूची (१) ४(८)अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या अनुसूची (१) ४(३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १९० अन्वये "महापौरासह परिषद" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९९८ च्या महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १० कलम २२६ (अ) अन्वये "भारतीय इंपीरीअल बँकेत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

वार्षिक प्रशासन अहवाल व लेखा विवरण तयार करणे.

**४६०नन.** (१) [१][महाव्यवस्थापक] १ एप्रिल नंतर शक्य तितक्या लवकर, मागील सरकारी वर्षातील [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाचा] सविस्तर प्रशासन अहवाल आणि उक्त वर्षात [३][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीमध्ये] जमा केलेल्या खर्चासाठी काढलेल्या अनुक्रमे जमा रकमा व संवितरित रकमा व उक्त वर्षाच्या अखेरीस निधीच्या खाती असलेली अधिशेष रक्कम, [४][त्याचप्रमाणे कर्जापैकी वसूल व्हावयाच्या बाकी रकमांचा हिशेब दर्शवणारे लेखा विवरण तयार करून घेईल आणि ते मुंबई वीजपुरवठा परिवहन समितीस सादर करील.]

(२) [५][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीने] अहवाल व विवरण यांची तपासणी व पुर्नविलोकन केल्यानंतर, अहवालाची एक प्रत [६][समितीच्या] पुर्नविलोकनाच्या प्रतीसह, प्रत्येक पालिका सदस्याचा नेहमीच्या किंवा शेवटी माहीत असलेल्या पत्त्यावर लगतनंतरच्या ऑक्टोबर महिन्यातील महानगरपालिकेच्या सामान्य सभेपूर्वी निदान आठ दिवस अगोदर पाठवण्यात येईल, आणि ज्या कोणत्याही व्यक्तीला अशा प्रती हव्या असतील तिला त्या प्रती, महाव्यवस्थापक, [५][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीच्या] आगाऊ संमतीने, प्रत्येक प्रतीसाठी निर्धारित करील अशी वाजवी फी दिल्यानंतर, देण्यात येतील.

## संकीर्ण

सडकांवरील रहदारीचे विनियमन करण्याचा पोलिसांचा अधिकार.

**४६०ओओ.** ज्या सडकेवर उभे किंवा आडवे ट्राममार्ग असतील, अशा कोणत्याही सडकेवरून होणाऱ्या किंवा ओलांडून होणाऱ्या कोणत्याही रहदारीचे विनियमन करण्यासाठी, कोणत्याही पोलीस अधिकाऱ्यास जे अधिकार असतील ते अधिकार, या प्रकरणातील कोणत्याही गोष्टीमुळे मर्यादित होणार नाहीत, आणि उक्त पोलीस अधिकाऱ्यास ट्राममार्गाव्यतिरिक्त इतर ठिकाणी जो अधिकार वापरता येतो, तोच अधिकार ट्राममार्गावर वापरता येईल, तसेच त्यास इतर व्यक्तीच्या रहदारीच्या संबंधात जो अधिकार वापरता येत असेल, तोच अधिकार [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] रहदारीच्या संबंधात वापरता येईल.

ज्या सडकांवर ट्राममार्ग टाकण्यात आले असतील त्यांचा वापर करण्याचा लोकांचा हक्क.

**४६०पप.** [२][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] वाहनांव्यतिरिक्त विस्फारित चाके किंवा खाच असलेल्या रूळांवरून जाण्यास योग्य चाके असलेल्या कोणत्याही वाहनांना, ट्राममार्गावरून जाण्याचा हक्क असणार नाही, परंतु, या तरतुदीच्या अधीनतेने, ज्या सडकेवर किंवा तिच्यावर आडवे ट्राममार्ग टाकण्यात आले असतील अशा कोणत्याही सडकेच्या प्रत्येक किंवा कोणत्याही भागावरून किंवा जो ओलांडून ट्राममार्गावरून किंवा ट्राममार्गाच्या बाहेरून विस्फारित चाके ज्यांना नाहीत किंवा खाच असलेल्या रूळावरून जाण्यास योग्य अशी चाके ज्यांना नाहीत, अशी वाहने घेऊन जाण्यास लोकांना जो हक्क आहे, तो या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे काढून घेण्यात किंवा कमी करण्यात येणार नाही.]

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १९१ अन्वये "प्रभारी सदस्य" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २, अनुसूची (१) ४(५) अन्वये मूळ मजकुरांऐवजी हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १९१(अ) (दोन) अन्वये "त्याचप्रमाणे" या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि "सादर करील" या मजकुराने समाप्त होणाऱ्या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम १९१ (ब) (एक) अन्वये "महापौरासह परिषदेने" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम १९१ (ब) (दोन) अन्वये "महापौर परिषदेच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## प्रकरण सतरा

### उपविधी

[1][[2][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाहून] अन्य प्रयोजनांकरिता उपविधी]

**४६१.** महानगरपालिकेस, पुढील बाबींसंबंधी, या अधिनियमाशी विसंगत असणार नाहीत, असे उपविधी वेळोवेळी करता येतील :—

(अ) या अधिनियमात ज्या तपशिलाची विशेष तरतूद करण्यात आली नाही, अशा कोणत्याही तपशिलाच्या बाबतीत नाली, हवा नळ, किंवा नळ मलकुंडी, जलधौत संडास, संडास, शौचकूप, मुत्र्या, जलनिस्सारणाची प्रत्येक वर्णनाची कामे-मग ती महानगरपालिकेची असोत वा दुसऱ्या व्यक्तीची असोत,—महानगरपालिकेच्या जलदायव्यवस्था, खाजगी संक्रमण नळ आणि इतर सार्वजनिक सडका बांधणे, सुस्थितीत ठेवणे व त्यांवर नियंत्रण ठेवणे या गोष्टींचे विनियमन करणे ;

(ब) पाण्याचा पुरवठा व वापर यांसंबंधी असलेल्या सर्व गोष्टी आणि बाबी यांचे विनियमन करणे ;

(क) मजबुती येण्याकरिता, आगीच्या प्रतिबंधाकरिता [3][व आगीच्या प्रसंगी रहिवाशांच्या सुरक्षिततेसाठी] व आरोग्याच्या प्रयोजनांकरिता, भिंती, पाया, छपरे व धुरांडी यांची बांधणी, [4][जिने, छन्नमार्ग व मार्ग यांची रुंदी व स्थिती व संख्या], [5]* * * * * इमारतीचे [6][मजले व जिने यांच्यासाठी आणि गर्भी, तुळ्या, मेंढी व स्तंभ यांच्यासाठी वापरावयाचे सामान, त्यांचे क्षेत्रफळ व त्यांची बळकटी] यांबाबत विनियमन करणे;

[7][(कक) इमारत बांधणीची कामे चालू असतील, तेथे काम करण्याचे व सर्वसाधारण जनतेचे संरक्षण करण्यासाठी परांची बांधणे ;]

(ड) हवा मोकळेपणाने खेळती राहण्यासाठी इमारतीच्या भोवती, आत किंवा बाहेर पुरेशा खुल्या जागेची तरतूद करणे व ती राखणे आणि इमारतीत पुरेशा वायुवीजनासाठी इतर साधनांची तरतूद करणे व ती राखणे ;

[8][(डड) इमारतींत योग्य पोचमार्गांची तरतूद करणे व ते सुस्थितीत राखणे ;]

(ई) घरांमधील बोळकांड्यांची तरतूद करणे व त्या सुस्थितीत राखणे ;

[9][(ईई) घन कचरा गोळा करणे, काढून नेणे व त्याची विल्हेवाट लावणे ;]

(फ) कलम ३९४ मध्ये उल्लेख केलेल्या प्रयोजनांपैकी कोणत्याही प्रयोजनासाठी उपयोगात आणलेल्या सर्व परिवास्तू आणि तेथे चालविण्यात येणारे सर्व उदीम व वस्तूनिर्मिती यांवर नियंत्रण ठेवणे [10][आणि अशा कोणत्याही परिवास्तूंचे बांधकाम, त्यांची परिमाणे, वायुवीजन, प्रकाशयोजना, साफसफाई, जलनिस्सारण व पाणीपुरवठा या गोष्टी विहित करणे आणि त्यांचे विनियमन करणे ;]

(ग) दुभत्या जनावरांचे निरीक्षण करणे आणि दुग्धालयांचे व दुग्धालयाचा किंवा दुधाची विक्री करण्याचा व्यवसाय करणाऱ्या व्यक्तीच्या कब्जात असलेल्या गोठ्यांचे बांधकाम, त्यांची परिमाणे व वायुवीजन, प्रकाशयोजना, साफसफाई, जलनिस्सारण व पाणीपुरवठा या गोष्टी विहित करणे व त्यांचे विनियमन करणे ;

---

[1] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ४१ अन्वये मूळ समास टीपेऐवजी ही समास टीप दाखल करण्यात आली.

[2] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर त्यांच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

[3] सन १९११ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम १७(१) (ब) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[4] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम २८ अन्वये मूळ शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[6] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ५६ (१) (ब) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[5] वरील अधिनियमाच्या कलम ५६(१) (अ) अन्वये "नवीन" हा शब्द निरसित करण्यात आला.

[7] वरील अधिनियमाच्या कलम ५६(२) अन्वये खंड (कक) समाविष्ट करण्यात आला.

[8] वरील अधिनियमाच्या कलम ५६(३) अन्वये खंड (डड) समाविष्ट करण्यात आला.

[9] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २३१ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[10] सन १९१६ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम १२ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

(ह) अशा व्यक्तींनी दूध ठेवण्याकरिता वापरलेल्या, दुग्ध भांडारांच्या, दुधाच्या दुकानांच्या व दुधाच्या भांड्यांच्या स्वच्छतेसंबंधी तरतूद करणे ;

(ज) दुभत्या जनावरांस कोणताही सांसर्गिक रोग झाला असेल तेव्हा नोटीस देण्यास फर्मावणे आणि दुभत्या जनावरांचे संसर्गापासून संरक्षण करण्यासाठी व दूध दूषित न व्हावे म्हणून घ्यावयाची खबरदारी विहित करणे ;

(के) बाजार व कत्तलखाने यांचे व मानवी खाद्य उद्देशित असलेले पदार्थ ज्यात ठेवण्यात येत असतील किंवा विकण्यात येत असतील अशा दुकानांचे कार्यक्षमरीत्या निरीक्षण करविणे ;

(ल) शहरात किंवा शहराबाहेरील महानगरपालिका कत्तलखान्यात धंदा चालवणाऱ्या कसायांवर नियंत्रण व देखरेख ठेवणे ;

(म) कोणतीही महानगरपालिका बाजाराची इमारत, जागा किंवा कत्तलखाना किंवा त्याचा कोणताही भाग यांचे विनियमन करणे ;

[१][(मम) महानगरपालिकेच्या व खाजगी बाजारात अनुसूची जज मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कृषि उत्पन्नाची खरेदी व विक्री यांचे व त्यांचा व्यापार करण्यासंबंधीच्या शर्तीचे विनियमन करणे व उत्पन्नासाठी बाजार स्थापन करणे ;]

(न) बाजार व कत्तलखाने येथील स्वच्छताकारी स्थितीवर नियंत्रण ठेवणे व तिचे विनियमन करणे आणि त्यात जनावरांना निर्दयतेने वागवण्यास प्रतिबंध करणे ;

[२][(नन) मासळी विकणाऱ्यांनी सार्वजनिक सडकांवरूण मासळी नेणे, अगर ती हलवणे यांवर नियंत्रण ठेवणे व त्यांचे विनियमन करणे ;]

[३][(ओ) [४] * * * * * * * *

(दोन) चालू किंमत प्रसिद्ध करणे ;]

[५][(ओओ) कलम १८१ खाली कराधानातून माफी दिलेल्या हातगाड्यांहून अन्य किंवा [६][ सन १८६३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६ खाली] ज्यांच्या बाबतीत लायसने देण्यात आली असतील अशा हातगाड्यांहून अन्य हातगाड्यांना लायसने देणे आणि ज्यांना रीतसर लायसने देण्यात आलेली नसतील, अशा कोणत्याही हातगाड्यांचे अभिग्रहण करणे व त्या अटकावून ठेवणे ;]

(प) समाजातील निरनिराळ्या वर्गाच्या लोकांच्या धार्मिक रिवाजांकडे योग्य लक्ष पुरवून प्रेतांची विल्हेवाट लावण्यासंबंधी व प्रेताच्या विल्हेवाटीसाठी असणाऱ्या सर्व जागा चांगल्या स्थितीत व लोकांच्या आरोग्यास धोका न पोहोचेल अशा स्थितीत ठेवण्यासंबंधी विनियमन करणे ;

(क्यू) जन्म व मृत्यू यांच्या संपूर्ण व अचूक नोंदणीचे काम सुकर करणे व अशी नोंदणी होण्याची व्यवस्था करणे ;

(र) विवाहांची नोंदणी करणे ;

(स) आवश्यक असेल त्यावेळी, जनगणना करण्याचे काम सुकर करणे आणि अचूक विवरणे मिळविणे;

---

[१] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५४, कलम ११ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम २८ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९२१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४, कलम ३ अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला.

[४] मुंबई वजने व मापे अधिनियम, १९३२ (सन १९३२ चा मुंबई १५) या अन्वये उपखंड (एक) हा निरसित करण्यात आला. उक्त अधिनियम दि. १ ऑगस्ट १९३५ रोजी मुंबई शहरात अंमलात आला. पहा, शासकीय अधिसूचना, सामान्य विभाग, क्रमांक ९५१८, दिनांक ३० एप्रिल १९३५.

[५] सन १९११ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम १७(२) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[६] आता सन १९२० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७ पहा.

[१][(ट) स्थायी समिती, सुधार समिती व शिक्षण समिती यांचे अधिकार व कर्तव्ये उपसमित्यांकडे सोपविण्यासंबंधी विनियमन करणे ;]

[२][(यू) कलम ३९ खाली नेमलेल्या प्राथमिक शिक्षण संमंत्रक समितीची रचना करणे ;]

(व्ही) कलम ४० किंवा ४१ खाली महानगरपालिका नेमील अशा कोणत्याही समितीची रचना, तिचे अधिकार व कर्तव्ये निर्धारित करणे ;

[३][(व्हीव्ही) महानगरपालिकांमध्ये निहित असलेली किंवा तिच्या नियंत्रणाखाली असलेली, सार्वजनिक उद्याने, बागा व खुल्या जागा यांचे नुकसान किंवा गैरवापर यांपासून संरक्षण करणे, त्यांची व्यवस्था आणि ज्या रीतीने त्या लोकांस वापरता येतील ती रीत यासंबंधी नियमन करणे व लोकांनी त्यात योग्य वर्तन ठेवण्यासंबंधी तरतूद करणे ;]

[४][(डब्ल्यू) महानगरपालिका प्राथमिक शाळांचे प्रशासन चालविणे व त्यांचे व्यवस्थापन करणे आणि प्राथमिक शिक्षणाकरिता शाळांना मान्यता देणे व त्यांना सहाय्य करणे ;]

[५][(डब्ल्यूडब्ल्यू) कलम ९२ च्या खंड (डड) खाली महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या आणि कर्मचाऱ्यांच्या सहकारी गृहनिर्माण संस्थेस किंवा धर्मादाय प्रयोजनासाठी असणाऱ्या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेस ज्या शर्थींच्या अधीनतेने स्थावर मालमत्ता सवलतीच्या भाड्याने पट्ट्यावर देता येईल, त्या शर्ती ;]

[६][(एक्स) [७][मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ किंवा मुंबई शहर सुधारणा विश्वस्त व्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५] याखाली रीतसर मंजूर केलेल्या कोणत्याही परियोजनेखाली निर्धन लोकांसाठी किंवा कामकरी वर्गासाठी बांधलेल्या घरांची व्यवस्था पाहणे, त्यांचा उपयोग करणे आणि त्याबाबत नियमन करणे ;]

(य) ज्या शर्तीवर कर्ज देता येईल, त्या शर्ती आणि [८][कलम ३४९ डब्ल्यू किंवा ३५४ डब्ल्यू अ खालील खर्चाकरिता] करावयाचा अर्जाचा नमुना ;] [९] * * * * *

[१०][(यय) गृहनिर्माण कर्जासाठी जे पात्र असतील असे महानगरपालिका अधिकारी व कर्मचारी आणि कलम ३५४ डब्ल्यू बब खाली अशा कर्जासाठी करावयाच्या अर्जाचा नमुना, त्या कलमाच्या प्रयोजनासाठी लगतचे क्षेत्र आणि असे कर्ज ज्या शर्तीवर देता येईल त्या शर्ती ;]

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १९२ (अ) अन्वये खंड (ट) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १९२(ब) अन्वये खंड (यू) ऐवजी पुढील खंड दाखल करण्यात आले.

[३] सन १९२२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम ३२ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ७२(३) अन्वये मूळ खंडाऐवजी (डब्ल्यू) दाखल करण्यात आला.

[५] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, कलम ४(अ) अन्वये खंड (डब्ल्यूडब्ल्यू) समाविष्ट करण्यात आला.

[६] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ३६(ब) अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

[७] मुंबई शहर सुधारणा अधिनियम, १८९८ हा, मुंबई शहर सुधारणा विश्वस्त व्यवस्था हस्तांतरण अधिनियम, १९२५ अन्वये निरसित करण्यात आला व तोही सन १९३३ चा मुंबई अधिनियम १३, अन्वये निरसित करण्यात आला.

[८] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम २६ अन्वये " कलम ३५४ डब्ल्यू या खाली कर्ज मिळण्यासाठी " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५०, कलम ४(ब) अन्वये " आणि " हा शब्द वगळण्यात आला.

[१०] वरील अधिनियमाच्या कलम ४(क) अन्वये खंड (यय) समाविष्ट करण्यात आला.

[1][(ययअ) " साधनसामग्री यंत्रणे " ची मांडणी व परिरक्षा यांच्यासह वाहतूक यंत्रणा आणि वाहतूक मागणी उपाययोजना यांच्याशी संबंधित सर्व बाबींचे विनियमन.

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनासाठी " साधनसामग्री यंत्रणा " याचा अर्थ, वाहतुकीचे संकेत आणि माहिती संचार जाळे नियंत्रक केंद्रीय संनियंत्रण सामग्री यांसारखी संबद्ध साधनसामग्री आणि वाहतुकीचे नियंत्रण व अंमलबजावणी यासाठी आवश्यक असलेली इतर सर्व सामग्री ;].

[2][(झ) या अधिनियमाच्या तरतुदी व उद्देश सर्वसाधारणपणे पार पाडणे :]

[3][परंतु, उपनगरात, [4][किंवा वाढवलेल्या उपनगरात] किंवा त्यांच्या कोणत्याही भागात, महानगरपालिकेस या कलमाच्या खंड (अ), (ब), (क) आणि (ई) यांखाली आणि कलम ३४९-ई याखाली येणाऱ्या बाबींच्या संबंधात उपविधींअन्वये तिला योग्य वाटेल अशा विशेष शर्ती घालण्याचा अधिकार असेल.]

[6]बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] प्रयोजनांकरिता उपविधी.

[5][**४६१अ.** (१) महानगरपालिकेस, वेळोवेळी [6][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रम] चालविण्यासंबंधीच्या बाबींचे विनियमन करण्याकरिता, या अधिनियमाच्या किंवा उपक्रमास लागू असलेल्या इतर कोणत्याही अधिनियमितीच्या तरतुदींशी किंवा त्याखाली काढलेल्या कोणत्याही नियमांच्या उपविधींच्या, विनियमांच्या, परवान्याच्या किंवा लायसन्सच्या तरतुदींशी विसंगत नसतील असे उपविधी करता येतील.

(२) विशेषकरून आणि पूर्वगामी अधिकाराच्या सर्वसाधारणतेस बाध येऊ न देता अशा उपविधीत पुढील बाबींची तरतूद करता येईल :—

(अ) [6][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] ट्राममार्गावरून प्रवास करताना पाळावयाच्या वेगाचे प्रमाण ;

(ब) उक्त ट्राममार्गावरून जाणाऱ्या गाड्या जेवढे अंतर राखून एकामागून जाण्याची परवानगी देण्यात येईल ते अंतर ;

(क) उक्त ट्राममार्गावरून जाणाऱ्या गाड्या थांबवणे ;

(ड) माल वाहून नेणाऱ्या गाड्या ट्राममार्गावरून ज्या वेळात जातील, त्या वेळा ;

(ई) लोकांची ने-आण करण्याकरिता वापरण्यात येणाऱ्या [6][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] कोणत्याही वाहनात अगर वाहनांवर किंवा उपक्रमाच्या कोणत्याही परिवास्तूत अगर परिवास्तूच्या संबंधात कोणताही उपद्रव करण्यास प्रतिबंध करणे ;

(फ) उतारूंना वाहून नेण्याकरिता वापरण्यात येणाऱ्या [6][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] वाहनातून अगर वाहनांवरून प्रवास करण्याबाबत सामान्यतः विनियमन करणे; आणि

(ग) [6][बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या] संबंधात नेमलेल्या महानगरपालिका अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी शांतवृत्तीने व सौजन्याने आणि सडकांना उपयोग करणाऱ्या व्यक्तींना किंवा वाहनांना धोका पोहचू नये म्हणून विशेष दक्षतेने वागणे ;

---

[1] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २६ अन्वये खंड (यय) नंतर पुढील खंड समाविष्ट करण्यात आला.

[2] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ३६(क) अन्वये खंड (डब्ल्यू) ला "(झ)" असा नवीन क्रमांक देण्यात आला.

[3] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ६(१) अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[4] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम २४ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[5] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ४२ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[6] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(३) अन्वये "बॉम्बे वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या " या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात आला.

(३) महानगरपालिकेने संपादन केलेल्या कोणत्याही परिवहन उपक्रमाच्या बाबतीत, अशा रीतीने संपादन करण्याच्या निकटपूर्वी अंमलात असलेले अशा उपक्रमासंबंधीचे सर्व उपविधी व विनियम पोट-कलम (१) खाली करण्यात आले आहेत असे मानण्यात येईल आणि महानगरपालिका त्यात फेरफार करील तोपर्यंत, ते निरसित करण्यात येईल तोपर्यंत किंवा त्यात सुधारणा करण्यात येईल तोपर्यंत ते अंमलात असण्याचे चालू राहील.]

उपविधीचा भंग केल्याबद्दल शिक्षा करता येईल.

**४६२.** [१][कलम ४६१ किंवा ४६१अ] खाली उपविधी करताना, महानगरपालिकेस अशी तरतूद करता येईल की, उपविधीचा भंग केल्याबद्दल [२][दोन हजार रुपयांपर्यंत] वाढवता येईल, इतकी दंडाची शिक्षा होईल आणि भंग चालू राहिल्याच्या बाबतीत पहिल्यांदा भंग केल्याबद्दल त्यास सिद्धपराध ठरवण्यात आल्यानंतर किंवा भंग करण्याचे थांबविण्याविषयी लेखी नोटीस आयुक्ताकडून मिळाल्यावर, ज्या ज्या दिवशी असा भंग चालू राहील, त्या प्रत्येक दिवसाबद्दल [३][शंभर रुपयांपर्यंत] वाढवता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल.

यथास्थिति, केंद्र सरकारने किंवा [५][राज्य] शासनाने उपविधी कायम करणे.

**४६३.** [४][कलम ४६१ किंवा खंड (स) खाली केलेल्या उपविधीच्या बाबतीत, तो केंद्र सरकारने आणि इतर कोणत्याही उपविधीच्या बाबतीत, तो [५][राज्य] शासनाने] कायम केल्यावाचून व कायम करण्यात येईतोपर्यंत, [६]* * * * *

कोणताही उपविधी कोणत्याही प्रकारे विधीग्राह्य असणार नाही.

आयुक्ताने प्रारूप उपविधी महानगर-पालिकेपुढे तिच्या विचारार्थ ठेवणे.

**४६४.** [७][आयुक्ताने वेळोवेळी त्यास जो कोणताही उपविधी व या अधिनियमाचे कोणतेही प्रयोजन पुरःसृत करण्यासाठी आवश्यक किंवा इष्ट असेल,] त्याचे प्रारूप, महानगरपालिकेपुढे, तिच्या विचारार्थ ठेवणे हे त्याचे कर्तव्य असेल.

प्रस्तावित उपविधींवर घेतलेले आक्षेप महानगरपालिकेने ऐकून घेणे.

**४६५.** (१) उपविधी विचारात घेण्याचा महानगरपालिकेचा उद्देश आहे, यासंबंधीची नोटीस, ज्या दिवशी महानगरपालिका अशा उपविधीवर अंतिमरीत्या विचार करणार असेल त्या दिवसाच्या निदान सहा आठवड्यांपूर्वी [८][**शासकीय राजपत्रात**] आणि स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिद्ध करून देण्यात आलेली असल्यावाचून कोणत्याही उपविधीस, महानगरपालिकेला अंतिम मान्यता देता येणार नाही.

(२) महानगरपालिका, उपविधीला मान्यता देण्यापूर्वी व तत्संबंधी जो कोणताही आक्षेप किंवा जी कोणतीही सूचना कोणतीही व्यक्ती उक्त सभेच्या दिवसापूर्वी लेखी सादर करील, तो आक्षेप किंवा ती सूचना महानगरपालिका स्वीकारील व विचारात घेईल; आणि कोणत्याही उपविधीस आक्षेप घेऊ इच्छिणाऱ्या कोणत्याही व्यक्तीने उक्त सभेच्या दिवसापूर्वी दहा दिवसांपेक्षा कमी नाही इतक्या अवधीच्या आत,

त्याच्या आपेक्षांच्या स्वरूपाविषयी लेखी नोटीस महानगरपालिकेच्या अध्यक्षास दिल्यानंतर

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ४३ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २३२(अ) अन्वये " पाचशे रुपयांपर्यंत " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २३२(ब) अन्वये " वीस रुपयांपर्यंत " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] भारतीय विधी अनुकुलन परिषद आदेशान्वये " शासनाने " या शब्दांऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] विधी अनुकुलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[६] भारतीय विधी अनुकुलन परिषद आदेशाअन्वये " मागील दोन पूर्ववर्ती कलमांपैकी कोणत्याही एका कलमाअन्वये केलेला " हा मजकूर वगळण्यात आला.

[७] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १९३ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[८] भारतीय विधी अनुकुलन परिषद आदेशाअन्वये " **मुंबई सरकार राजपत्र** " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

महानगरपालिकेस त्याची बाजू खुद्द त्याच्याकडून किंवा त्याचा सल्लागार, न्यायवादी किंवा अभिकर्ता यांच्यामार्फत महानगरपालिकेच्या उक्त सभेत ऐकून घेता येईल, मात्र आक्षेपाच्या त्याच बाबीसंबंधाने एकाहून अधिक व्यक्तींची बाजू ऐकून घेण्यात येणार नाही.

प्रस्तावित उपविधी लोकांना निरीक्षणाकरिता खुले असणे.

**४६६.** (१) ज्या सभेत महानगरपालिका एखाद्या उप विधीबाबत अखेरचा विचार करणार असेल त्या सभेच्या दिवसाच्या निदान एक महिना अगोदर अशा उप विधीची एक छापील प्रत महानगरपालिकेच्या मुख्य कार्यलयात लोकांना निरीक्षणासाठी ठेवण्यात येईल आणि कोणत्याही वाजवी वेळी, प्रत्येक व्यक्तीस ती विनामूल्य पाहण्याची परवानगी देण्यात येईल.

(२) तसेच, प्रस्तावित उप विधीच्या छापील प्रती ज्या व्यक्तीस पाहिजे असतील त्या कोणत्याही व्यक्तीस, [१][आयुक्त, प्रत्येक प्रतीसाठी पंचवीस रुपयांहून अधिक नसेल अशी जी फी निर्धारित करील] ती भरण्यात आल्यावर देण्यात येतील.

केंद्र सरकारने किंवा [३][राज्य] शासनाने कायम केलेले उप विधी [४][**शासकीय राजपत्रात**] प्रसिद्ध करणे.

**४६७.** [२][यथास्थिति केंद्र सरकार किंवा [३][राज्य] शासन] कोणत्याही उपविधी कायम करील तेव्हा तो [४][**शासकीय राजपत्रात**] प्रसिद्ध करण्यात येईल आणि तद्‌नंतर तो कायदा म्हणून अंमलात येईल.

उपविधींच्या छापील प्रती विक्रीस ठेवणे.

**४६८.** (१) [५][आयुक्त]**,** त्या वेळी अंमलात असलेले, सर्व उपविधी छापून घेण्याची तजवीज करील आणि त्यांच्या छापील प्रती ज्या व्यक्तीस हव्या असतील त्या कोणत्याही व्यक्तीस [६][वेळोवेळी आयुक्त निश्चित करील अशी प्रत्येक प्रतीची फी] भरण्यात आल्यावर त्या देण्याची तजवीज करील.

(२) उपविधीच्या प्रती उक्त किंमतीस उपलब्ध असल्याबाबत तसेच त्या ज्या जागी मिळू शकतील ती जागा व ज्या व्यक्तीकडून मिळू शकतील ती व्यक्ती याबाबत, आयुक्त वेळोवेळी स्थानिक वृत्तपत्रांत जाहिरात देऊन, नोटीस देईल.

(३) फलकांवर उपविधी छापून किंवा उपविधींच्या छापील प्रती लावून, असे फलक महानगरपालिका कार्यालयाच्या एखाद्या ठळक भागात व आयुक्तास योग्य वाटेल त्याप्रमाणे सार्वजनिक राबत्याच्या जागी, बाजारात, कत्तलखान्यात व त्यांच्याशी संबंध येणाऱ्या इतर कामांच्या जागी किंवा इतर जागांत लावील किंवा चिकटवील आणि उक्त फलक आयुक्त वेळोवेळी नवीन करून देईल.

उपविधी प्रदर्शित करण्याकरिता असलेले फलक निरीक्षणासाठी खुले असणे, मात्र त्यांची हानी होऊ न देणे.

**४६९.** (१) निकटपूर्वीच्या कलमाखाली आयुक्ताने तरतूद केलेल्या कोणत्याही फलकावरील मजकुरांचे निरीक्षण करण्याची ज्या कोणत्याही व्यक्तीची इच्छा असेल, तिला त्याचे याप्रमाणे निरीक्षण करण्यास कोणताही महानगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी कोणत्याही वाजवी वेळी प्रतिबंध करणार नाही.

---

[१] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २३४ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेश या अन्वये "सरकार अन्वये" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाअन्वये "**मुंबई सरकार राजपत्र**" या शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[५] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १९५, १९६ अन्वये "महापौरांसह परिषद" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम १४ अन्वये "प्रत्येक प्रतीची फी दोन आणे" या शब्दाऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(२) कोणत्याही व्यक्तीला कायदेशीर प्राधिकारावाचून असे कोणतेही फलक नष्ट करता येणार नाहीत, ते पाडून टाकता येणार नाहीत, त्यांची हानी होऊ देता येणार नाही किंवा ते खराब करता येणार नाहीत.

कलम ४६१अ खालील उपविधींना कलम ४६६, ४६८ व ४६९ लागू करणे.

[१][**४६९अ.** (१) कलम ४६१अ खाली केलेल्या किंवा करण्याचे आवश्यक असलेल्या किंवा करण्याचे प्रस्तावित केलेल्या उपविधींच्या बाबतीत, कलमे ४६६, ४६८ व ४६९ यांच्या तरतुदी, जणू काही " आयुक्त " या शब्दाऐवजी " महाव्यवस्थापक " हा शब्द दाखल केलेला असावा आणि जणू काही कलम ४६८ यात लोकांची ने-आण करण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या [२][ बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन उपक्रमाच्या ] प्रत्येक वाहनात संबंद्ध उपविधी प्रदर्शित करण्याची तरतूद करण्यात आलेली असावी, त्याप्रमाणे ते लागू होतील.]

यथास्थिती, केंद्र सरकारला किंवा [३][[४][राज्य] शासनाला] उपविधी निरसित करता येतील.

**४७०.** (१) जर, [३][ [४][राज्य] शासनाचे] कोणत्याही वेळी असे मत होईल की, कोणत्याही उपविधीत [५][फेरबदल केले पाहिजेत किंवा] ते सर्वस्वी किंवा अंशतः निरसित केले पाहिजेत तर, [६][ते] त्याचे असे मत असण्याबाबतची [६][आपली] कारणे महानगरपालिकेला कळविण्याची तजवीज करील आणि महानगरपालिकेला त्याप्रमाणे अभिवेदन कधी सादर करता येईल तो कालावधी त्यांस योग्य वाटेल त्याप्रमाणे विहित करील.

(२) अशा प्रकारे अभिवेदन सादर करण्यात आल्यानंतर आणि त्याचा विचार केल्यानंतर किंवा दरम्यानच्या अवधीत असे अभिवेदन सादर करण्यात आले नाही, तर, विहित कालावधी संपल्यानंतर [३][ [४][ राज्य] शासनास] [७][ **शासकीय राजपत्रातील**] अधिसूचनेअन्वये अशा उपविधींत कोणत्याही वेळी [८][ फेरबदल करता येईल किंवा] तो सर्वस्वी किंवा अंशतः निरसित करता येईलः

[९][ परंतु, कोणत्याही उपविधीत फेरबदल करण्यास किंवा तो अंशतः निरसित करण्यास महानगरपालिकेने पूर्वोक्तप्रमाणे कालावधीत आक्षेप घेतला तर [३][ [४][राज्य] शासन] असा फेरबदल करणार नाही किंवा तो अशा रीतीने अंशतः निरसित करणार नाही.]

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ४४ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(३) अन्वये "बॉम्बे वीजपुरवठा व परिवहन उपक्रमाच्या" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाअन्वये "गव्हर्नर इन कौन्सिल" या शब्दांऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] विधि अनुकूलन आदेश १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[५] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ५७अ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[६] भारतीय विधी अनुकूलन परिषद आदेशान्वये "तो" आणि "त्याचा" या शब्दांऐवजी अनुक्रमे "ते" आणि "आपली" हे शब्द दाखल करण्यात आले.

[७] वरील आदेशान्वये **"मुंबई सरकार राजपत्र"** या शब्दांऐवजी **"शासकीय राजपत्र"** हे शब्द दाखल करण्यात आले.

[८] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ५७ब अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[९] वरील अधिनियमाच्या वरील कलमान्वये मूळ परंतुकाऐवजी हे परंतुक दाखल करण्यात आले.

(३) पोट-कलम (२) खाली उपविधीत [1][फेरबदल करणे किंवा] तो निरसित करणे ही गोष्ट [2][ [3][ राज्य ] शासन ] उक्त अधिसूचनेत विनिर्दिष्ट करील अशा तारखेपासून किंवा जर अशी कोणतीही तारीख विनिर्दिष्ट करण्यात आली नसेल तर, उक्त अधिसूचना [4][ **शासकीय राजपत्रात** ] प्रसिद्ध केल्याच्या तारखेपासून, मात्र अशा तारखेपूर्वी केलेली, केल्याचे खपवून घेतलेली किंवा करण्याचे वर्जिलेली कोणतीही गोष्ट खेरीज करून परिणामक होईल.

(४) उक्त अधिसूचना स्थानिक वृत्तपत्रातदेखील प्रसिद्ध करण्यात येईल.

[5][ (५) या कलमान्वये [2][ [3][ राज्य ] शासनास ] प्रदान केलेले अधिकार हे, कलम ४६१, खंड (स) खाली केलेल्या कोणत्याही उपविधीच्या संबंधात, केंद्र सरकारचे अधिकार असतील. ]

## प्रकरण अठरा

## शास्ती

दंडाची शिक्षा होण्याजोगे विवक्षित अपराध.

[6][ **४७१.** जो कोणी–

(अ) पुढील तक्त्याच्या पहिल्या स्तंभात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कलमांच्या, पोट-कलमांच्या किंवा खंडांच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही विनियमाच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील; अथवा

(ब) उक्त कलमे, पोट-कलमे किंवा खंड यांपैकी कोणतेही कलम, पोट-कलम किंवा खंड यांखाली त्यास कायदेशीरपणे दिलेल्या कोणत्याही फर्मावणीचे अनुपालन करण्यात कसूर करील,

त्यास, अशा प्रत्येक अपराधाबद्दल उक्त तक्त्याच्या तिसऱ्या स्तंभात त्याबाबत नमूद केलेल्या रकमेइतका वाढवता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल; [7][ तथापि हा दंड उक्त तक्त्याच्या चौथ्या स्तंभामध्ये नमूद केलेल्या दंडापेक्षा कमी नसेल इतका किमान दंड असण्याच्या अधीन असेल. ]

**स्पष्टीकरण**.–उक्त तक्त्याच्या “ विषय ” या शीर्षकाखालील दुसऱ्या स्तंभातील नोंदी या पहिल्या स्तंभातील उल्लेख केलेली कलमे, पोट-कलमे व खंड यात वर्णिलेल्या अपराधाची व्याख्या म्हणून योजिलेल्या नाहीत किंवा ती कलमे, पोट-कलमे व खंड यांचा सारांश म्हणून योजिलेली नाहीत, तर पहिल्या स्तंभात ज्याचे क्रमांक दिले आहेत त्या कलमांच्या, पोट-कलमांच्या व खंडांच्या विषयीच केवळ उल्लेख म्हणून त्या दाखल केलेल्या आहेत.

---

[1] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ५७(ब) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[2] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये “ गव्हर्नर इन कौन्सिल ” या शब्दांऐवजी “प्रांतिक सरकार” हे शब्द दाखल करण्यात आले.

[3] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये “ प्रांतिक ” या शब्दांऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[4] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाअन्वये “ मुंबई सरकार राजपत्र ” या शब्दांऐवजी “ शासकीय राजपत्र ” हे शब्द दाखल करण्यात आले.

[5] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशाअन्वये हे पोट-कलम समाविष्ट करण्यात आले.

[6] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ५८ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम ४७१ दाखल करण्यात आले.

[7] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ५४(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

**Scan-2 (H 4167) (Page No. 448-469) (Side No. 500-521)**



| [१][अनु क्रमांक | कलम, पोट-कलम किंवा खंड | विषय | लादता येईल असा दंड | लादण्यात येईल असा किमान दंड |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | कलम १४९ | हक्काच्या हस्तांतरणासंबंधी नोटीस देणे. | दोन हजार रुपये | पाचशे रुपये |
| २ | कलम १५० | हस्तांतरणाचा लेख हजर करण्याविषयी फर्माविणे. | दोन हजार रुपये | पाचशे रुपये |
| ३ | कलम १५२ | नवीन इमारत उभारणे वगैरे, यासंबंधी नोटीस देणे. | दोन हजार रुपये | पाचशे रुपये |
| ४ | कलम १९१-अ पोट-कलम (३) | कुत्र्याच्या मालकाने किंवा तो ज्याच्या ताब्यात असेल अशा व्यक्तीने विवरण सादर करणे. | एक हजार रुपये | दोनशे पन्नास रुपये |
| ५ | कलम १९१-ह | नाट्यगृह कर भरण्यास पात्र असलेल्या व्यक्तीने विवरण पाठविणे. | दोन हजार पाचशे रुपये | पाचशे रुपये |
| ६ | कलम २२३, पोट-कलम (१) | परवानगीवाचून नाल्यांवर इमारत, वगैरे न उभारणे. | पाच हजार रुपये | एक हजार रुपये |
| ७ | कलम २२९ | कलम २२७ किंवा २२८ यानुसार जी तरतूद केली असेल, तिला अनुसरून असेल ते सोडून एरव्ही महानगरपालिकेच्या नाल्या वगैरेंशी इतर नाल्या न जोडणे. | पाच हजार रुपये | एक हजार रुपये |
| ८ | कलम २२९अ, पोट-कलम (१) | परवानगीवाचून कोणत्याही नाल्यांवर इमारती वगैरे न उभारणे. | पाच हजार रुपये | एक हजार रुपये |
| ९ | कलम २३०अ | जमिनीच्या मालकाने आपल्या जमिनीतून नाल्या नेण्याची इतरांना परवानगी देणे. | दोन हजार पाचशे रुपये | पाचशे रुपये |
| १० | कलम २३१ | महानगरपालिकेच्या नालीपासून शंभर फुटांच्या आतील जलनिःस्सारण व्यवस्था नसलेल्या परिवास्तूंमध्ये जलनिःस्सारणाची व्यवस्था करण्यास फर्माविणे. | दोन हजार पाचशे | पाचशे रुपये |
| ११ | कलम २३२. | महानगरपालिकेच्या नालीपासून शंभर फुटांच्या आतील जलनिःस्सारणाची व्यवस्था नसलेल्या परिवास्तूंमध्ये जलनिःस्सारणाची व्यवस्था करण्यास फर्माविणे. | दोन हजार पाचशे रुपये | पाचशे रुपये |
| १२ | कलम २३३, पोट-कलम (१), खंड (ब). | नालींचा वापर मर्यादित करण्यासंबंधीचा निदेश किंवा वेगळी नाली बांधण्यास फर्माविण्यासंबंधीची नोटीस. | दोन हजार रुपये | पाचशे रुपये |
| १३ | कलम २३३अ, खंड (ब). | केवळ मालमत्तेसाठी वापरावयाच्या नाल्या, मालमत्तेच्या मालकाने किंवा तिच्या भोगवटादाराने सुस्थितीत ठेवणे, इत्यादी. | दोनशे पन्नास रुपये | पन्नास रुपये |

[१] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४,कलम ३ अन्वये मूळ तक्त्यांऐवजी हा तक्ता दाखल करण्यात आला.

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १४ | कलम २३४ | नाल्या बांधल्यावाचून नवीन इमारती न बांधणे. | दंड पाच हजार रुपयांपेक्षा अधिक असू नये. | ...... |
| १५ | कलम २३५ | मलमूत्रादि पदार्थ मलकुंडीत न टाकणे | पाच हजार रुपये | एक हजार रुपये |
| १६ | कलम २३६. | नाल्याच्या मालकांनी इतरांस नाल्याचा वापर करू देणे किंवा त्यांची सामाईक मालकी होऊ देणे. | दोन हजार पाचशे रुपये. | पाचशे रुपये |
| १७ | कलम २४० | नाल्या इमारतींच्या खालून जातील, अशा रीतीने न बांधणे. | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये |
| १८ | कलम २४१ | मलकुंड्यांच्या जागेविषयी तरतुदी | दहा हजार रुपये | दोनशे रुपये |
| १९ | कलम २४३ पोट-कलम (२) | नाली किंवा मलकुंडी झाकण्यास किंवा वायुवीजन होईल, अशी व्यवस्था करण्यास फर्माविणे. | दोन हजार पाचशे रुपये | पाचशे रुपये |
| २० | कलम २४६अ, पोट-कलम (१). | परवानगीवाचून किंवा विहित अटींचे उल्लंघन करून जलधौत संडास व संडास न बांधणे. | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये |
| २१ | कलम २४७ | नव्याने बांधलेल्या किंवा पुन्हा बांधलेल्या इमारतींत जलधौत संडासांची व इतर व्यवस्था करणे. | दहा हजार रुपये. | दोन हजार रुपये. |
| २२ | कलम २४८ पोट-कलम (१). | संडास वगैरेची तरतूद करण्याविषयी फर्माविणे. | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये |
| २३ | कलम २४९ | कारखाने वगैरे यांकरिता संडासांची तरतूद करण्यास फर्माविणे. | दहा हजार रुपये | पाच हजार रुपये |
| २४ | कलम २४९अ | अनारोग्यकारी संडासांसंबंधात फर्माविणे | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये |
| २५ | कलम २५०, पोट-कलम (१). | संडासांविषयी तरतुदी | दोन हजार रुपये | पाचशे रुपये |
| २६ | कलम २५१ परंतुक. | जलधौत संडासांविषयी तरतुदी | दोन हजार रुपये | पाचशे रुपये |
| २७ | कलम २५१अ | संडास व जलधौत संडास यांविषयी तरतुदी | दहा हजार रुपये | दोन हजार पाचशे रुपये. |
| २८ | कलम २५१ब | स्नानाच्या किंवा कपडे अगर गृहोपयोगी भांडी धुण्याच्या जागेचा उपयोग करण्याविषयी तरतुदी. | दोन हजार पाचशे रुपये | पाचशे रुपये |
| २९ | कलम २५७ | स्वच्छताविषयक दुरुस्ती वगैरे करण्याविषयी फर्माविणे. | दोन हजार पाचशे रुपये | पाचशे रुपये |
| ३० | कलम २५९अ, पोट-कलमे (१) व (४). | लायसनदार नळकारागीर नोकरीवर ठेवणे व कामाचा उपयोग करणे यांविषयी तरतुदी. | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये |
| ३१ | कलम २५९अ, पोट-कलमे (२) व (३). | लायसनदार नळकारागिराने सही करून प्रमाणपत्र देणे. | दोन हजार पाचशे रुपये | पाचशे रुपये |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ३२ | कलम २६८, पोट-कलम (१). | पाण्याच्या मुख्य नळावर परवानगीवाचून इमारत, वगैरे न बांधणे. | पाच हजार रुपये | एक हजार रुपये |
| ३३ | कलम २६९ पोट-कलम (३). | सार्वजनिक पाणीपुरवठ्यातून पाणी विक्रीसाठी न नेणे आणि असे पाणी परवानगीवाचून पिंप वगैरेतून न नेणे. | पाच हजार रुपये | पाचशे रुपये |
| ३४ | कलम २७० पोट-कलम (२). | विशिष्ट प्रयोजनासाठी अलग राखून ठेवलेला सार्वजनिक पाणीपुरवठा इतर प्रयोजनासाठी न वापरणे. | पाच हजार रुपये | एक हजार रुपये |
| ३५ | कलम २७०अ | पुरेसा पाणीपुरवठा असल्यासंबंधी आयुक्ताने प्रमाणपत्र दिलेले असल्याखेरीज परिवास्तूचा भोगवटा न करणे. | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये |
| ३६ | कलम २७१, पोट-कलम (२). | खाजगी पाणीपुरवठा मिळविण्यास आणि पुरवठा करणारे नळ व वाटप करणारे नळ वगैरेंची तरतूद करण्यास फर्माविणे. | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये |
| ३७ | कलम २७२, पोट-कलम (१). | महानगरपालिका जलदाय व्यवस्थेशी नळ जोडणे व त्यांचे नवीकरण करणे, यासंबंधी तरतुदी. | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये |
| ३८ | कलम २७२, पोट-कलम (५). | महानगरपालिका जलदाय व्यवस्था वगैरेशी अनधिकृतरित्या नळ जोडण्यासंबंधाने तरतूद. | दोन हजार पाचशे रुपये | पाचशे रुपये |
| ३९ | कलम २७४ | हौदाची किंवा कोणत्याही हौदाकडे जाऊन पोहोचता येईल अशा साधनांची तरतूद करण्यास फर्माविणे. | दोन हजार पाचशे रुपये | पाचशे रुपये |
| ४० | कलम २७४अ | हौद कुलूपबंद ठेवण्याची तरतूद करण्यास फर्माविणे. | दोन हजार पाचशे रुपये | पाचशे रुपये |
| ४१ | कलम २७५ | परिवास्तूच्या मालकाने किंवा भोगवटादाराने पुरवठा नळ किंवा वितरण नळ, इत्यादी कार्यक्षमपूर्ण स्थितीत ठेवणे. | दोन हजार पाचशे रुपये | एक हजार रुपये |
| ४२ | कलम २७८ पोट-कलम (२) | मीटर (पुरवठा नळ किंवा वितरण नळ) वगैरे यात आढळून येणारा दोष काढून टाकण्यास फर्माविणे. | पाच हजार रुपये | पाचशे रुपये |
| ४३ | कलम २८० | पाण्याच्या वापरासंबंधीच्या शर्तीचे उल्लंघन न करणे. | पाच हजार रुपये | एक हजार रुपये |

Scan-2 (H 4167) (Page No. 448-469) (Side No. 500-521)



| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ४४ | कलम २८२ | कपटाने व अनधिकृतपणे पाण्याचा वापर करण्यास मनाई. | पाच हजार रुपये | एक हजार रुपये. |
| ४५ | कलम २८७ब, पोट-कलम (१). | प्रकरण दहा खालील काम लायसनदार नळ कारागिराने करणे. | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये. |
| ४६ | कलम २८७ब, पोट-कलम (२). | लायसनदार नळ कारागिराचे नाव कळविणे | एक हजार रुपये | दोनशे पन्नास रुपये |
| ४७ | कलम २९७, पोट-कलम (३). | सडकेच्या नियमित रेषेच्या आत परवानगी-वाचून इमारत बांधणे. | पंचवीस हजार रुपये. | पाच हजार रुपये |
| ४८ | कलम ३०४, पोट-कलम (१). | नोटिशीचा अवधी संपेपर्यंत किंवा आयुक्ताने दिलेल्या निदेशानुसार असेल त्याहून अन्यथा जमिनीचा इमारतीसाठी उपयोग न करणे व खाजगी सडकांची आखणी न करणे. | पंचवीस हजार रुपये. | पाच हजार रुपये |
| ४९ | कलम ३०५ | खाजगी सडका समतल करण्यास व त्यात नाल्या बांधण्यास फर्मावणे. | पाच हजार रुपये | एक हजार रुपये |
| ५० | कलम ३०८, पोट-कलम (१). | सडका वगैरे यांवर प्रक्षेप येण्यास मनाई | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये |
| ५१ | कलम ३०८, पोट-कलम (२). | प्रक्षेप काढून टाकण्यास फर्मावणे | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये |
| ५२ | कलम ३०९, पोट-कलम (१). | सन १८७२ चा मुंबई अधिनियम क्र. ३ हा अंमलात येण्यापूर्वी केलेले प्रक्षेप वगैरे काढून टाकण्यास किंवा त्यात फेरबदल करण्यास फर्मावणे. | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये |
| ५३ | कलम ३११ | तळमजल्याचे दरवाजे वगैरे, सडकांवर बाहेरच्या बाजूने न उघडणे. | एक हजार रुपये | दोनशे रुपये |
| ५४ | कलम ३१२, पोट-कलम (१). | ज्यामुळे सडकांमध्ये अडथळा होतो, अशा बांधकामांस किंवा खिळण्यांना मनाई. | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये |
| ५५ | कलम ३१३, पोट-कलम (१). | सडकांमध्ये वस्तू ठेवणे, वगैरे यास मनाई. | दोन हजार रुपये | दोनशे पन्नास रुपये |
| ५६ | कलम ३१३अ | सार्वजनिक जागी किंवा सडकेवर लायसनवाचून वस्तू फेरीने विकण्यास मनाई. | दोन हजार पाचशे रुपये | पाचशे रुपये |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ५७ | कलम ३१३ब | सार्वजनिक जागी किंवा सडकेवर लायसनवाचून हस्तव्यवसायातील कौशल्याचा उपयोग करण्यास किंवा कामे करण्यास मनाई. | दोन हजार पाचशे रुपये | पाचशे रुपये |
| ५८ | कलम ३१५ | कलम ३१२ अंमलात येण्यापूर्वी उभारलेले किंवा केलेले कोणतेही बांधकाम किंवा खिळण्या काढून टाकण्यास फर्माविणे. | पाच हजार रुपये | एक हजार रुपये |
| ५९ | कलम ३१६, पोट-कलम (१). | सार्वजनिक सडकांवर जनावरे बांधण्यास मनाई. | एक हजार रुपये | दोनशे रुपये |
| ६० | कलम ३१९, पोट-कलम (२). | ज्या सडकेत काम चालू असेल ती सडक बंद करण्याविषयी निदेश. | दोन हजार पाचशे रुपये | पाचशे रुपये |
| ६१ | कलम ३२१, पोट-कलम (२). | महानगरपालिकेचे काम चालू असताना सार्वजनिक सुरक्षिततेसाठी वापरलेले लाकडीटेके किंवा कुंपण, इत्यादी न काढणे. | दोन हजार पाचशे रुपये | पाचशे रुपये |
| ६२ | कलम ३२२, पोट-कलम (१). | परवानगीवाचून सडका न उखडणे किंवा न खोदणे, तसेच तिच्यावर इमारती सामान न ठेवणे. | दोन हजार पाचशे रुपये | पाचशे रुपये |
| ६३ | कलम ३२३ | ज्या व्यक्तींना कलम ३२२ खाली परवानगी देण्यात आली असेल, त्या व्यक्तींनी सार्वजनिक सुरक्षिततेसाठी घ्यावयाची खबरदारी. | दोन हजार पाचशे रुपये | पाचशे रुपये |
| ६४ | कलम ३२४, पोट-कलम (१). | कलम ३२२ खाली परवानगी देण्यात आलेल्या व्यक्तींनी सडका पूर्ववत करणे. | दोन हजार पाचशे रुपये | पाचशे रुपये |
| ६५ | कलम ३२५ | कलम ३२२ खाली परवानगी दिलेल्या व्यक्तींनी त्यांच्या कामामुळे अडथळा येत असेल तेव्हा वाहतूक इत्यादी, यांसाठी तरतूद करणे. | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये |
| ६६ | कलम ३२६ | सडकेलगत असलेल्या कोणत्याही इमारतीवर काम चालू असताना आडपडदा घालणे. | दोन हजार पाचशे रुपये | पाचशे रुपये |
| ६७ | कलम ३२७, पोट-कलम (२). | सडकेचे नाव, परिवास्तूचे किंवा परिवास्तूच्या भागाचे क्रमांक किंवा पोट क्रमांक नष्ट न करणे किंवा विरुपित न करणे. | एक हजार रुपये | दोनशे रुपये |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ६८ | कलम ३२८, पोट-कलम (१). | परवानगीवाचून आकाशचिन्हे न उभारणे किंवा न ठेवणे. | पाच हजार रुपये | एक हजार रुपये |
| ६९ | कलम ३२८अ, पोट-कलम (१). | विवक्षित ठिकाणे, वाहने वगैरे यांवर परवानगीवाचून जाहिराती प्रदर्शित न करणे. | पाच हजार रुपये | एक हजार रुपये |
| ७० | कलम ३२९, पोट-कलम (१). | धोक्याच्या जागा दुरुस्त करण्यास, सुरक्षित करण्यास किंवा त्यास कुंपण घालण्यास फर्मावणे. | दोन हजार पाचशे रुपये | पाचशे रुपये |
| ७१ | कलम ३३१ | दिवे काढून नेणे, वगैरे यांस मनाई | पाच हजार रुपये | एक हजार रुपये |
| ७२ | कलम ३३३, पोट-कलमे (१), (२) व (३). | गॅसचे नळ घालण्याच्या रीतीविषयी तरतूद | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये |
| ७३ | कलम ३३४, पोट-कलम (१). | गॅसचे नळ, वगैरे यांची जागा बदलण्यास फर्मावणे. | एक हजार रुपये | दोनशे रुपये |
| ७४ | कलम ३३५, पोट-कलम (१). | महानगरपालिकेच्या गॅसच्या नळांवर परवानगी-वाचून इमारती, वगैरे न उभारणे. | पाच हजार रुपये | एक हजार रुपये |
| ७५ | कलम ३४४अ, | इमारतींची व कामाची देखरेख करण्याबाबत तरतूद. | दहा हजार रुपये | .... |
| ७६ | कलम ३४७, पोट-कलम (१). | नोटीस दिल्यावाचून कामास सुरुवात न करणे. | पन्नास हजार रुपये | दहा हजार रुपये |
| ७७ | कलम ३४७अ | आयुक्ताच्या परवानगीवाचून इमारत इतर प्रयोजनांसाठी न वापरणे. | दहा हजार रुपये | .... |
| ७८ | कलम ३४७ब | मुळात मानवी वस्तीसाठी बांधलेली किंवा तशी वापरण्याचा प्राधिकार असलेली इमारत रुपये किंवा इमारतीचा कोणताही भाग, परवानगीवाचून गोदाम, वगैरे म्हणून न वापरणे. | वीस हजार रुपये | पाच हजार रुपये |
| ७९ | कलम ३४७क | मुळात मानवी वस्तीसाठी बांधलेल्या किंवा तशी वापरण्याचा प्राधिकार असलेल्या इमारतीत, ती गोदाम, वगैरे म्हणून वापरण्याच्या प्रयोजनासाठी परवानगीवाचून कोणतेही फेरबदल न करणे. | पंचवीस हजार रुपये. | पाच हजार रुपये |
| ८० | कलम ३४९ | इमारतींची छप्परे व बाहेरच्या भिंती ज्वालाग्राही वस्तूंच्या न बनविणे. | दोन हजार रुपये | चारशे रुपये |
| ८१ | कलम ३४९अ, आणि ३४९ब | इमारतींच्या उंचीबाबत तरतूद. | वीस हजार रुपये. | चार हजार रुपये |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ८२ | कलम ३४९क | ढाचेदार इमारतींच्या उंचीबाबत तरतूद | पन्नास हजार रुपये. | दहा हजार रुपये |
| ८३ | कलम ३४९ड, | आग लागली असता सुरक्षितपणे बाहेर पडण्यासाठी जिन्यात फेरबदल करणे आणि जिन्याची तरतूद करणे. | वीस हजार रुपये. | चार हजार रुपये |
| ८४ | कलम ३५३ | इमारती व भिंती यांसंबंधीच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्याबाबत तरतुद. | पन्नास हजार रुपये. | दहा हजार रुपये |
| ८५ | कलम ३५३अ | समाप्ती प्रमाणपत्रासंबंधी तरतुदी. | पंचवीस हजार रुपये | पाच हजार रुपये |
| [१][८५अ. | कलम ३५३ब | बांधकाम सुस्थितीबाबत तरतुदी. | पंचवीस हजार रुपये किंवा इमारतींच्या एका वर्षाच्या काला-वधीच्या मालमत्ता कराएवढी रक्कम, यापैकी जी अधिक असेल ती रक्कम. | पंचवीस हजार रुपये किंवा इमारतींच्या एका वर्षाच्या कालावधीच्या मालमत्ता कराएवढी रक्कम, यापैकी, जी अधिक असेल ती रक्कम.] |
| ८६ | कलम ३५४अअ, पोट-कलम (७). | घोषणेचे उल्लंघन करुन कोणतीही इमारत बांधणे किंवा पुन्हा बांधणे. | वीस हजार रुपये. | चार हजार रुपये |
| ८७ | कलम ३५४ आरके, पोट-कलम (८) | कोणत्याही पुर्नविकास क्षेत्रात इमारत परवानगीवाचून बांधणे किंवा पुन्हा बांधणे. | दहा हजार रुपये. | दोन हजार रुपये |
| ८८ | कलम ३५६ | लायसनदार सर्वेक्षक व नळकारागीर यांसाठी विहित केलेले विनियम. | एक हजार रुपये. | दोनशे रुपये. |
| ८९ | कलम ३५७ | लायसनदार नळकारागिराने विहित केलेल्या फी पेक्षा अधिक रक्कम न मागणे किंवा न घेणे. | एक हजार रुपये | दोनशे रुपये. |
| ९० | कलम ३५८ | लायसनदार नळकारागिरावर काम योग्य रीतीने पार पाडण्याची बंधने असणे. | एक हजार रुपये | दोनशे रुपये |
| ९१ | कलम ३६८ पोट-कलमे (१), (२), (३) व (४) | कचरा गोळा करणे, काढून टाकणे व तो ठेवणे आणि कचऱ्याच्या कुंड्यांची तरतूद. | दहा हजार रुपये | दोन हजार पाचशे रुपये. |
| ९२ | कलम ३७० | विवक्षित बाबतीत मलमूत्रादि व प्रदूषित पदार्थ गोळा करणे व काढून नेणे यांबाबत भोगवटादाराने तरतूद करणे. | एक हजार रुपये | दोनशे पन्नास रुपये. |

[१] सन १९९० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ६, कलम ३ अन्वये “८५अ” हे कलम समाविष्ट करण्यात आले.

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ९३ | कलम ३७१ | विवक्षित बाबतीत हलालखोराची कामे खाजगी व्यक्तींनी परवानगीवाचून न करणे. | पाचशे रुपये | शंभर रुपये |
| ९४ | कलम ३७२ खंड (अ), (ब), (क), (ड), (ई), व (फ). | कचरा हलविण्यासंबंधीची तरतूद | दोन हजार रुपये | पाचशे रुपये |
| ९५ | कलम ३७२, खंड (ग). | जनावरांची मढी हलवण्याबाबत व कातडी सोलण्याबाबत तरतूद. | पाच हजार रुपये | एक हजार रुपये. |
| ९६ | कलम ३७५ | इमारत स्वच्छ करण्यास व तिला चुना लावण्यास फर्माविणे. | पाच हजार रुपये | एक हजार रुपये. |
| ९७ | कलम ३७५अ | कोणत्याही परिवास्तुतून इमारतीचे सामान वगैरे काढून नेण्यास फर्माविणे. | पाच हजार रुपये | एक हजार रुपये. |
| ९८ | कलम ३७६ | भोगवट्यात नसलेल्या किंवा सोडून दिलेल्या परिवास्तूत उपद्रवास मनाई करणे. | पाच हजार रुपये | एक हजार रुपये. |
| ९९ | कलम ३७७ | दुर्लक्षित परिवास्तू स्वच्छ वगैरे करावयास फर्माविणे. | पाच हजार पाचशे रुपये | पाचशे हजार रुपये. |
| १०० | कलम ३७७अ, पोट-कलमे (१) व (२). | इमारतींच्या छपरांतून पाणी गळण्याच्या उपद्रवाचा उपशम करण्यास किंवा ते पुन्हा होऊ देण्याला प्रतिबंध करण्यास फर्माविणे. | दोन हजार रुपये | एक हजार रुपये. |
| १०१ | कलम ३७८, पोट-कलम (२). | मानवी वस्तीस अयोग्य अशा इमारतीसंबंधी तरतूद. | पाच हजार रुपये | एक हजार रुपये |
| १०२ | कलम ३७९ | घराच्या मालकाने किंवा त्याच्या भोगवटादाराने नोटीस मिळाल्यानंतर सात दिवसांच्या आत निवासाविषयी विवरण देणे. | पाच हजार रुपये | एक हजार रुपये. |
| १०३ | कलम ३७९अ, पोट-कलम (१). | अतिगर्दी कमी करण्याविषयी महानगर दंडाधिकाऱ्याने फर्माविणे. | दोन हजार रुपये | चारशे रुपये |
| १०४ | कलम ३७९अ, पोट-कलम (३). | पोट-कलम (१) खाली दिलेल्या आदेशानुसार मालकाने फर्माविणे. | दोन हजार रुपये | चारशे रुपये |
| १०५ | कलम ३८० | अनारोग्यकारी झोपड्या काढून टाकण्यास किंवा त्यात फेरबदल करण्यास फर्माविणे. | दोन हजार पाचशे रुपये | पाचशे रुपये |
| १०६ | कलम ३८१ | उपद्रवकारक असतील अशी डबकी, वगैरे बुजवण्यास फर्माविणे. | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये. |

Scan-2 (H 4167) (Page No. 448-469) (Side No. 500-521)



| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १०७ | कलम ३८१अ, पोट-कलम (१). | परवानगीवाचून विहीर वगैरे, खोदणे किंवा बांधणे. | पाच हजार रुपये | दोन हजार रुपये. |
| १०८ | कलम ३८१अ, पोट-कलम (२). | विहीर वगैरे बुजविण्यास किंवा पाडून टाकण्यास फर्माविणे. | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये. |
| १०९ | कलम ३८१ब | कोणत्याही जमिनीवरील साचलेल्या पाण्यात डासांची पैदास होण्यास अटकाव करणे. | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये. |
| ११० | कलम ३८२, | धोकादायक असे दगडखाणीचे काम बंद करण्यास फर्माविणे. | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये. |
| १११ | कलम ३८३, पोट-कलम (१). | झाडे, झुडपे किंवा कुंपणे काढून टाकण्यास किंवा छाटून टाकण्यास फर्माविणे. | एक हजार रुपये | दोनशे रुपये |
| ११२ | कलम ३८४, पोट-कलम (१). | जनावरे पाळण्यास मनाई | दोन हजार पाचशे रुपये. | पाचशे रुपये |
| ११३ | कलम ३८४ अ | राहत्या घरामध्ये जनावरे बांधण्याचे किंवा धान्य साठवून ठेवण्याचे बंद करण्यास वगैरे फर्माविणे. | दोन हजार पाचशे रुपये. | पाचशे रुपये |
| ११४ | कलम ३८५, पोट-कलम (२). | आयुक्ताच्या प्राधिकारपत्राविना जनावरांची मढी हलविण्याकरिता आरोग्य विभागास तातडीची सूचना देणे. | एक हजार रुपये | शंभर रुपये |
| ११५ | कलम ३८८ खंड (इ), (फ), आणि (ग) | आदेश किंवा विनियम याविरुद्ध स्नान वगैरे करण्यास मनाई. | पाच हजार रुपये | दोनशे पन्नास रुपये. |
| ११६ | कलम ३९०, पोट-कलम (१). | कारखाना वगैरे परवानगीवाचून नव्याने स्थापन न करणे किंवा न चालविणे. | पन्नास हजार रुपये | दहा हजार रुपये. |
| ११७ | कलम ३९० पोट-कलम (३). | कारखाना वगैरे स्थापन करण्यासाठी दिलेली लेखी परवानगी रद्द केल्यानंतर कारखान्याचे कामकाज चालू ठेवण्यास किंवा सुरू करण्यास मनाई. | पन्नास हजार रुपये | दहा हजार रुपये |
| ११८ | कलम ३९२ पोट-कलम (१). | कारखान्याचे आरोग्यविषयक विनियमन करण्यास फर्माविणे. | पंचवीस हजार रुपये. | पाच हजार. रुपये. |
| ११९ | कलम ३९३, पोट-कलम (१). | परवानगीवाचून वाफेची शिट्टी, इत्यादी वापरण्यास मनाई. | एक हजार रुपये. | दोनशे रुपये. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १२० | कलम ३९४, पोट-कलम (१), खंड (अ) (दोन) आणि (ब) ते (फ). | लायसनवाचून विवक्षित वस्तू न ठेवणे किंवा विवक्षित उदीम, प्रक्रिया व क्रिया पार न पाडणे. | पंचवीस हजार रुपये. | पाच हजार. रुपये. |
| १२१ | कलम ३९४ पोट-कलम (६). | लायसन परिवास्तूवर ठेवणे, ठेवलेल्या वस्तूंचे स्वरूप दर्शवणारा किंवा चालवण्यात येणारा उदीम दर्शवणारा फलक प्रदर्शित करणे आणि लायसनयोग्य वस्तूंवर योग्य खूणचिठ्ठ्या लावणे. | दोन हजार पाचशे रुपये. | पाचशे रुपये. |
| १२२ | कलम ३९५, पोट-कलम (१). | रासायनिक द्रव्यांनी, वगैरे पाणी खराब करण्यास मनाई. | वीस हजार रुपये. | चार हजार रुपये. |
| १२३ | कलम ३९७, पोट-कलम (१). | परिटांनी कपडे धुण्याच्या बाबतीतील विनियम. | दोन हजार रुपये. | चारशे रुपये. |
| १२४ | कलम ४०१, पोट-कलम (१). | लायसनवाचून महानगरपालिका बाजारात विक्री करण्यास मनाई. | दोन हजार पाचशे रुपये. | पाचशे रुपये. |
| १२५ | कलम ४०२, पोट-कलम (२). | नवीन खाजगी बाजार मंजुरीवाचून न उघडणे. | पन्नास हजार रुपये. | दहा हजार. रुपये. |
| १२६ | कलम ४०३, पोट-कलम (१). | लायसनवाचून खाजगी बाजार किंवा कत्तलखाना उघडा न ठेवणे किंवा उघडा ठेवण्यास परवानगी न देणे. | दहा हजार रुपये. | दोन हजार रुपये. |
| १२७ | कलम ४०४ | अनधिकृत खाजगी बाजारांत विक्री करण्यास मनाई. | एक हजार रुपये. | दोनशे पन्नास रुपये. |
| १२८ | कलम ४०५ | खाजगी बाजाराच्या इमारतींत व कत्तलखान्यांत फरशी घालण्यास व नाल्या बांधण्यास फर्माविणे. | पाच हजार रुपये. | एक हजार रुपये. |
| १२९ | कलम ४०६ | बाजार व कत्तलखाने यांसबंधी तयार केलेले विनियम. | एक हजार रुपये. | दोनशे पन्नास रुपये. |
| १३० | कलम ४०७अ | कोणत्याही महानगरपालिका कत्तलखान्यातून, बाजारातून किंवा परिवास्तुतून गुरे, मेंढरे, बकरे किंवा डुकरे काढून नेणे. | एक हजार रुपये. | पाचशे रुपये. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १३१ | कलम ४०८ पोट-कलम (२). | बाजारांत व कत्तलखान्यांत लावलेले विनियम आणि विक्रिकेंद्र आकार, फी व भाडे यांचा तक्ता नष्ट न करणे किंवा विरूपित न करणे. | पाचशे रुपये. | शंभर रुपये. |
| १३२ | कलम ४१० पोट-कलम (१). | बाजाराखेरीज इतरत्र जनावरे वगैरे विकण्यास मनाई. | दोन हजार पाचशे रुपये. | पाचशे रुपये. |
| १३३ | कलम ४११ | खाटीक आणि जनावरांचे मांस विकणाऱ्या किंवा पुरविणाऱ्या व्यक्ती, यांना लायसने देणे. | दहा हजार रुपये. | दोन हजार रुपये. |
| १३४ | कलम ४१२अ | लायसनवाचून दूध, लोणी इत्यादी न विकणे. | दोन हजार पाचशे रुपये. | पाचशे रुपये. |
| १३५ | कलम ४२१ | वैद्यक व्यावसायींनी घातक रोग किंवा मूळ कारण माहीत नसेल असा सतत येणारा ताप अस्तित्वात असल्याबाबत माहिती देणे. | पाच हजार रुपये. | एक हजार रुपये. |
| १३६ | कलम ४२३, पोट-कलम (२) | ज्यामुळे घातक रोग होण्याचा संभव असेल, असे पाणी पिण्याकरिता वापरण्यास मनाई. | पाच हजार रुपये. | एक हजार रुपये. |
| १३७ | कलम ४२४ पोट-कलम (२). | रुग्णांना रुग्णालयात नेण्याविषयी निदेश. | पाच हजार रुपये. | एक हजार रुपये. |
| १३८ | कलम ४२५, पोट-कलम (१). | इमारती निर्जंतुक करण्यासाठी फर्माविणे. | पाच हजार रुपये. | एक हजार रुपये. |
| १३९ | कलम ४२६अ, पोट-कलम (१). | आडगिऱ्हाइकी कपडे व बिस्तरा आयुक्तास माहिती न देता किंवा त्यांची तपासणी करून न घेता शहरात न आणणे. | दहा हजार रुपये. | दोन हजार रुपये. |
| १४० | कलम ४२६अ, पोट-कलम (४). | आयुक्तांकडून प्रमाणपत्र देण्यात येईपर्यंत, शहरात आणलेले आडगिऱ्हाइकी कपडे व बिस्तरा यांची व्यवस्था न करणे किंवा त्यांची विल्हेवाट न लावणे. | दहा हजार रुपये. | दोन हजार रुपये. |
| १४१ | कलम ४२७, पोट-कलम (२). | दूषित झालेल्या वस्तू धुण्यासाठी जागा नेमून देण्यात आली असेल तेव्हा, अशा वस्तू अशा रितीने नेमून न दिलेल्या जागी न धुणे. | दोन हजार पाचशे रुपये | पाचशे रुपये. |
| १४२ | कलम ४२७, पोट-कलम (३). | दूषित झालेल्या वस्तू रोगजंतुरहित करण्याविषयी किंवा नष्ट करण्याविषयी निदेश. | दोन हजार पाचशे रुपये | पाचशे रुपये. |

Scan-2 (H 4167) (Page No. 448-469) (Side No. 500-521)



| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १४३ | कलम ४२८ पोट-कलम (१) | घातक रोग झालेल्या व्यक्तींनी, त्याविषयी न कळवता सार्वजनिक वाहनात न शिरणे. | एक हजार दोनशे पन्नास रुपये. | दोनशे पन्नास रुपये. |
| १४४ | कलम ४३० | घातक रोग झालेल्या व्यक्तींना सार्वजनिक वाहनातून नेण्यासंबंधी तरतूद. | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये. |
| १४५ | कलम ४३१ | घातक रोग झालेल्या व्यक्तींस ज्या सार्वजनिक वाहनातून नेले असेल, ते रोगजंतुरहित करणे. | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये. |
| १४६ | कलम ४३२, पोट-कलम (१). | रोगजंतुदूषित वस्तू, आधी रोगजंतुरहित केल्यावाचून न पाठविणे वगैरे. | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये |
| १४७ | कलम ४३३, पोट-कलम (१). | रोगजंतुदूषित इमारत प्रथम रोगजंतुरहित केल्यावाचून भाड्याने न देणे. | दहा हजार रुपये | दोन हजार. रुपये |
| १४८ | कलम ४३५ | प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी असलेल्या जागांची नोंदणी करणे. | पाच हजार रुपये | एक हजार. रुपये |
| १४९ | कलम ४३७ | प्रेतांची विल्हेवाट लावण्यासाठी परवानगीवाचून नव्या जागा न उघडणे. | पंचवीस हजार रुपये. | पाच हजार. रुपये |
| १५० | कलम ४४०, पोट-कलम (१). | पूजाअर्चेच्या जागी परवानगीवाचून प्रेते पुरण्यास अगर उकरून काढण्यास मनाई. | दहा हजार रुपये | दोन हजार. रुपये |
| १५१ | कलम ४४१ | प्रेतांची विल्हेवाट लावण्याच्या संबंधात मनाई केलेली कृत्ये. | पाच हजार रुपये. | एक हजार. रुपये |
| १५२ | कलम ४४६, पोट-कलम (१). | जन्मासंबंधीची माहिती सात दिवसांच्या आत देणे. | दोन हजार पाचशे रुपये | पाचशे रुपये |
| १५३ | कलम ४४७ | नवजात मूल आढळल्यास त्याबाबत माहिती देणे. | दोन हजार पाचशे रुपये. | पाचशे रुपये. |
| १५४ | कलम ४४९ | मृत व्यक्तीच्या प्रेताची विल्हेवाट लावण्याच्या वेळी मृत्यूबाबत माहिती देणे. | दोन हजार पाचशे रुपये. | पाचशे रुपये. |
| १५५ | कलम ४५०, पोट-कलम (१). | मृत व्यक्तींवर ज्याने औषधोपचार केला असेल, त्या वैद्यक व्यवसायीने त्या व्यक्तीच्या मृत्यूच्या कारणाबाबत प्रमाणपत्र देणे. | दोन हजार पाचशे रुपये. | पाचशे रुपये. |
| १५६ | कलम ४५७ | कोऱ्या अनुसूची व विवरणपत्रे भरण्याचे आबंधन. | एक हजार रुपये. | दोनशे रुपये. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १५७ | कलम ४५९ | सैनिक, नाविक व पोलीस अधिकारी व इतर विवक्षित व्यक्ती यांनी, आवश्यक असल्यास प्रगणक म्हणून काम करणे. | एक हजार रुपये. | दोनशे रुपये. |
| १५८ | कलम ४६९, पोट-कलम (१). | उप-विधी प्रदर्शित करण्यांकरिता असलेले फलक निरीक्षणासाठी खुले असणे. | एक हजार रुपये. | दोनशे रुपये. |
| १५९ | कलम ४६९, पोट-कलम (२). | फलक खराब, विरूपित, इत्यादी न करणे. | पाचशे रुपये. | शंभर रुपये. |
| १६० | कलम ४७९, पोट-कलम (५). | प्रतिग्रहीत्यावर लायसन किंवा लेखी परवानगी सादर करण्याचे बंधन असणे. | एक हजार रुपये. | दोनशे रुपये. |
| १६१ | कलम ४८५अ, पोट-कलम (२). | कोणत्याही परिवास्तूत असलेल्या हितसंबंधाच्या स्वरूपासंबंधी माहिती पुरविण्यास फर्मावणे. | एक हजार रुपये. | दोनशे रुपये.. |
| १६२ | कलम ५०७, पोट-कलम (३). | लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाने आदेश दिल्यानंतर आठ दिवसांनी इमारतीच्या किंवा जमिनीच्या भोगवटादाराने मालकास या अधिनियमाच्या तरतुदी वगैरेचे अनुपालन करण्यासाठी सवलती मिळवून देणे. | दहा हजार रुपये. | दोन हजार. रुपये..] |

[१][**४७२.** जी कोणतीही व्यक्ती—— अपराध चालू राहणे.

(अ) पुढील तक्त्याच्या पहिल्या स्तंभात नमूद केलेल्या कोणत्याही कलमांच्या, पोट-कलमांच्या किंवा खंडाच्या कोणत्याही तरतुदीचे किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही विनियमाचे उल्लंघन केल्याबद्दल तिला सिद्धापराध ठरविण्यात आले असता; अथवा

(ब) उक्त कलमांखाली, पोट-कलमांखाली किंवा खंडांखाली तिला कायदेशीरपणे दिलेल्या कोणत्याही फर्मावणीचे अनुपालन करण्यात कसूर केल्याबद्दल सिद्धापराध ठरविण्यात आले असता,——

उक्त तरतुदींचे उल्लंघन करण्याचे चालू ठेवील किंवा फर्मावणीचे अनुपालन करण्यात हयगय करण्याचे चालू ठेवील किंवा, यथास्थिति, उक्त तरतुदींचे उल्लंघन करून केलेले कोणतेही काम किंवा कोणतीही गोष्ट काढून टाकण्यात किंवा सुधारण्यात कसूर करील, तर तिला, ज्या ज्या दिवशी असा अपराध चालू राहील. त्या प्रत्येक दिवसाबद्दल उक्त तक्त्याच्या तिसऱ्या स्तंभात, त्याबाबत नमूद केलेल्या रकमेपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल. [२][तथापि, हा दंड उक्त तक्त्याच्या चौथ्या स्तंभामध्ये नमूद केलेल्या रकमेपक्षा कमी नसेल इतका किमान दैनिक दंड असणाच्या अधीन असेल.]

[१] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ५८ अन्वये मूळ कलमाऐवजी ४७२ हे कलम दाखल करण्यात आले.

[२] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ५५ (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

| [१][अनु क्रमांक | कलम, पोट-कलम किंवा खंड | विषय | लादता येईल असा दैनिक दंड | लादण्यात येईल असा किमान दैनिक दंड |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | कलम २२३, पोट-कलम (१). | परवानगीवाचून नगरपालिकेच्या नाल्यांवर इमारती वगैरे न उभारणे. | एक हजार रुपये. | दोनशे रुपये. |
| २ | कलम २२९ | कलम २२७ किंवा २२८ यानुसार असेल ते खेरीजकरून एरव्ही, महानगरपालिकेच्या नाल्या, वगैरे यांच्याशी इतरनाल्या न जोडणे. | एक हजार रुपये. | दोनशे रुपये. |
| ३ | कलम २२९अ, पोट-कलम (१). | कोणत्याही नाल्यावर परवानगीवाचून इमारती वगैरे न उभारणे. | एक हजार रुपये. | दोनशे रुपये. |
| ४ | कलम २३०(अ) | जमिनीच्या मालकाने आपल्या जमिनीतून नाल्या नेण्याची इतरांना परवानगी देणे. | पाचशे रुपये | शंभर रुपये. |
| ५ | कलम २३१ | महानगरपालिकेच्या नालीपासून शंभर फुटांच्या आत असून जलनिस्सारण व्यवस्था नसलेल्या परिवास्तूंमध्ये जलनिस्सारणाची व्यवस्था करण्यास फर्मावणे. | पाचशे रुपये | शंभर रुपये. |
| ६ | कलम २३२ | महानगरपालिकेच्या नालीपासून शंभर फुटांच्या आत नसून जलनिस्सारणाची व्यवस्था नसलेल्या परिवास्तूंमध्ये जलनिस्सारणाची व्यवस्था करण्यास फर्मावणे. | पाचशे रुपये | शंभर रुपये. |
| ७ | कलम २३३, पोट-कलम (१), खंड (ब). | नाल्यांचा वापर मर्यादित करणारा निदेश किंवा वेगळी नाली बांधण्यास फर्माविण्या-संबंधीची नोटीस. | पाचशे रुपये | शंभर रुपये. |
| ८ | कलम २३३अ, खंड (ब). | मालमत्तेच्या मालकाने किंवा तिच्या भोगवटा दाराने केवळ मालमत्तेच्या वापरासाठी असलेली नाली चांगल्या दुरुस्त स्थितीत, इत्यादी ठेवणे. | पाचशे रुपये | शंभर रुपये. |
| ९ | कलम २३६ | नाल्यांच्या मालकानी इतरांस त्या नाल्यांचा वापर करू देणे किंवा त्यांना सामाईक मालक होऊ देणे. | पाचशे रुपये | शंभर रुपये. |

[१] सन २००६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २४ कलम ४ अन्वये मूळ तक्त्याऐवजी हा तक्ता दाखल करण्यात आला.

Scan-2 (H 4167) (Page No. 448-469) (Side No. 500-521)



| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| १० | कलम २४० | नाल्या इमारतींच्या खालून न काढणे. | एक हजार रुपये. | दोनशे रुपये. |
| ११ | कलम २४३, पोट-कलम (२). | नाली किंवा मलकुंडी झाकण्याची किंवा वायुवीजन ठेवण्याची व्यवस्था करण्यास फर्माविणे. | पाचशे रुपये | शंभर रुपये. |
| १२ | कलम २४८ पोट-कलम (१). | संडास वगैरेंची तरतूद अंमलात आणण्यास फर्माविणे. | पाचशे रुपये | शंभर रुपये. |
| १३ | कलम २४९ | कारखाने इत्यादींकरिता संडासाची तरतूद करण्यास फर्माविणे. | दोन हजार रुपये | पाचशे रुपये. |
| १४ | कलम २४९अ | अनारोग्यकारी संडासांसंबंधात फर्मावणे. | दोन हजार रुपये | पाचशे रुपये. |
| १५ | कलम २५०, पोट-कलम (१). | संडासांविषयी तरतुदी. | पाचशे रुपये | शंभर रुपये. |
| १६ | कलम २५१ | जलधौत संडासांविषयी तरतूद | पाचशे रुपये | शंभर रुपये. |
| १७ | कलम २५७ | स्वच्छताविषयक दुरुस्त्या वगैरे करण्याविषयी फर्मावणे. | एक हजार रुपये | दोनशे रुपये. |
| १८ | कलम २५९अ, पोट-कलम (१) व (४). | लायसनदार नळ कारागीर कामावर लावणे व कामाचा उपयोग करणे, यांविषयी तरतुदी. | पाच हजार रुपये | एक हजार रुपये. |
| १९ | कलम २५९अ, पोट-कलमे (२) व (३). | लायसनदार नळ कारागिराने प्रमाणपत्र देणे व त्यावर सही करणे. | एक हजार रुपये. | दोनशे रुपये. |
| २० | कलम २६८, पोट-कलम (१). | पाण्याच्या मुख्य नळावर परवानगीवाचून इमारत वगैरे न उभारणे. | एक हजार रुपये. | पाचशे रुपये. |
| २१ | कलम २७०अ | पुरेसा पाणीपुरवठा असल्यासंबंधी आयुक्ताने प्रमाणपत्र दिलेले असल्यावाचून परिवास्तूचा भोगवटा न करणे. | पाच हजार रुपये. | एक हजार रुपये. |
| २२ | कलम २७१, पोट-कलम (२). | खाजगी पाणीपुरवठा मिळवण्यास आणि पुरवठा नळ व वितरण नळ, इत्यादींची तरतूद करण्यास फर्मावणे. | एक हजार रुपये. | दोनशे रुपये. |
| २३ | कलम २७४ | हौद व खिळण्या पुरवण्यास किंवा कोणत्याही हौदाकडे पोहोचता येईल अशी साधने पुरवण्यास फर्मावणे. | एक हजार रुपये. | दोनशे रुपये. |
| २४ | कलम २९७, पोट-कलम (३). | सडकेच्या नियमित रेषेच्या आत परवानगी- वाचून इमारती न बांधणे. | दहा हजार रुपये | तीन हजार रुपये. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| २५ | कलम ३०५ | खाजगी सडका समतल करण्यास व त्यात नाल्या बांधण्यास फर्मावणे. | एक हजार रुपये | दोशशे रुपये. |
| २६ | कलम ३१२, पोट-कलम (१). | ज्यामुळे सडकांवर अडथळा होतो अशा बांधकामांस किंवा खिळण्यांस मनाई. | दोन हजार रुपये | पाचशे रुपये. |
| २७ | कलम ३१३, पोट-कलम (१). | सडकांवर वस्तू ठेवणे, वगैरे यांस मनाई. | दोन हजार रुपये | पाचशे रुपये. |
| २८ | कलम ३१३अ | सार्वजनिक जागी किंवा सडकेवर लायसनवाचून कोणतीही वस्तू फेरीने विकण्यास किंवा विक्रीसाठी मांडण्यास मनाई. | पाचशे रुपये | शंभर रुपये. |
| २९ | कलम ३१३ब | सार्वजनिक जागी किंवा सडकेवर लायसनवाचून हस्तव्यवसायातील कौशल्याचा उपयोग करण्यास किंवा कामे करण्यास मनाई. | पाचशे रुपये | शंभर रुपये. |
| ३० | कलम ३१५ | कलम ३१२ अंमलात येण्यापूर्वी उभारलेली किंवा केलेली बांधकामे किंवा खिळण्याकाढून टाकण्यास फर्मावणे. | एक हजार रुपये | दोनशे रुपये. |
| ३१ | कलम ३२२, पोट-कलम (१). | परवानगीवाचून सडका न उखडणे किंवा न खोदणे, तसेच त्याच्यावर इमारती सामान न ठेवणे. | पाच हजार रुपये | एक हजार रुपये. |
| ३२ | कलम ३२३ | कलम ३२२ खाली ज्या व्यक्तींना परवानगी देण्यात आली असेल त्या व्यक्तींनी सार्वजनिक सुरक्षिततेसाठी घ्यावयाची खबरदारी. | पाच हजार रुपये | एक हजार रुपये. |
| ३३ | कलम ३२४, पोट-कलम (१). | कलम ३२२ खाली परवानगी देण्यात आलेल्या व्यक्तींनी सडक पूर्ववत करणे. | एक हजार रुपये | दोनशे रुपये. |
| ३४ | कलम ३२६ | सडकेच्या लगत असलेल्या कोणत्याही इमारतीवर काम चालू असताना आडपडदा उभारणे. | दोन हजार रुपये . | पाचशे रुपये. |
| ३५ | कलम ३२८, पोट-कलम (१). | आकाशचिन्हे परवानगीवाचून न उभारणे किंवा न ठेवणे. | एक हजार रूपये | चारशे रुपये. |
| ३६ | कलम ३२८अ, पोट-कलम (१). | विवक्षित ठिकाणी, वाहने वगैरे यांवर परवानगीवाचून जाहिराती प्रदर्शित न करणे. | एक हजार रुपये | दोनशे रुपये. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ३७ | कलम ३२९, पोट-कलम (१). | धोक्याची जागा दुरुस्त करण्यास किंवा सुरक्षित करण्यास किंवा तिला कुंपण घालण्यास फर्माविणे. | एक हजार रुपये. | पाचशे रुपये |
| ३८ | कलम ३३४, पोट-कलम (१). | गॅसचे नळ, वगैरे यांची जागा बदलण्यास फर्माविणे. | एक हजार रुपये. | दोनशे रुपये |
| ३९ | कलम ३३५, पोट-कलम (१). | परवानगीवाचून महानगरपालिकेच्या गॅसच्या नळांवर इमारत वगैरे न उभारणे. | एक हजार रुपये. | दोनशे रुपये |
| ४० | कलम ३४७, पोट-कलम (१). | नोटीस दिल्यावाचून कामास सुरूवात न करणे. | पंधरा हजार रुपये. | तीन हजार रुपये. |
| ४१ | कलम ३४७ब | मानवी वसतिस्थान म्हणून मुळात बांधलेली किंवा तशी वापरण्याचा प्राधिकार असलेली इमारत किंवा इमारतीचा कोणताही भाग परवानगी-वाचून गोदाम वगैरे म्हणून न वापरणे. | दहा हजार रुपये | तीन हजार रुपये. |
| ४२ | कलम ३४७क | मानवी वसतिस्थान म्हणून मुळात बांधलेल्या किंवा तशी वापरण्यास प्राधिकृत केलेल्या इमारतीत, ती गोदाम वगैरे म्हणून वापरण्याच्या प्रयोजनासाठी परवानगीवाचून फेरबदल न करणे. | दहा हजार रुपये | तीन हजार रुपये. |
| ४३ | कलम ३४९ | इमारतीची छपरे व बाहेरच्या भिंती ज्वालाग्राही वस्तूंच्या न बनविणे. | एक हजार रुपये | दोनशे रुपये. |
| ४४ | कलम ३४९अ आणि ३४९ब. | इमारतीच्या उंचीबाबत तरतुदी. | दहा हजार रुपये | दोन हजार . रुपये. |
| ४५ | कलम ३४९क | ढाचेदार इमारतींच्या उंचीबाबत तरतुदी | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये. |
| ४६ | कलम ३४९ड | आग लागली असता सुरक्षितपणे बाहेर पडण्यासाठी जिन्यात बदल करणे आणि जिन्यांची तरतूद करणे. | दोन हजार रुपये | पाचशे रुपये. |
| ४७ | कलम ३५३अ | समाप्ति प्रमाणपत्रे, भोगवटा करण्यास वापर करण्यास परवानगी यासंबंधी तरतूद. | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये. |
| ४८ | कलम ३५४अअ, पोट-कलम (७). | घोषणेचे उल्लंघन करून कोणतीही इमारत बांधणे किंवा पुन्हा बांधणे. | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ४९ | कलम ३५४ रके, पोट-कलम (८). | कोणत्याही पुर्नविकास क्षेत्रात इमारत परवानगीवाचून बांधणे किंवा पुन्हा बांधणे. | दहा हजार रुपये | तीन हजार रुपये. |
| ५० | कलम ३५८ | लायसनदार नळ कारागिरावर काम योग्य रितीने पार पाडण्याचे बंधन असणे. | एक हजार रुपये | दोनशे रुपये. |
| ५१ | कलम ३६८, पोट-कलमे (१), (२), (३), (४) व (५). | कचरा गोळा करणे, काढून टाकणे व तो ठेवणे आणि कचऱ्याच्या कुंड्यांची तरतूद. | एक हजार रुपये | दोनशे रुपये. |
| ५२ | कलम ३७२ | कचरा काढून टाकण्याविषयी तरतूद. | एक हजार रुपये | दोनशे रुपये. |
| ५३ | कलम ३७५ | इमारत स्वच्छ करण्यास व तिला चुना लावण्यास फर्माविणे. | पाचशे रुपये | शंभर रुपये. |
| ५४ | कलम ३७५अ | कोणत्याही परिवास्तूतुन इमारती सामान वगैरे काढून नेण्यास फर्मावणे. | एक हजार रुपये | दोनशे रुपये. |
| ५५ | कलम ३७७ | दुर्लक्षित परिवास्तू स्वच्छ, वगैरे करण्यास फर्मावणे. | पाचशे रुपये | शंभर रुपये. |
| ५६ | कलम ३७७अ, पोट-कलमे (१) व (२). | इमारतींच्या छपरांतून पाणी गळण्याचे बंद करण्यास किंवा ते पुन्हा गळू न देण्यास फर्मावणे. | दोन हजार रुपये | पाचशे रुपये. |
| ५७ | कलम ३७९ | घराच्या मालकाने किंवा त्याच्या भोगवटादाराने नोटीस मिळाल्यापासून सात दिवसांच्या आत राहत्या जागांविषयी विवरण देणे. | दोन हजार रुपये | चारशे रुपये. |
| ५८ | कलम ३७९अ, पोट-कलम (१). | अतिगर्दी कमी करण्याविषयी महानगर दंडाधिकाऱ्याने फर्मावणे. | दोन हजार रुपये | चारशे रुपये. |
| ५९ | कलम ३७९अ, पोट-कलम (३). | पोट-कलम (१) खालील आदेशानुसार मालकाने फर्मावणे. | दोन हजार रुपये | चारशे रुपये. |
| ६० | कलम ३८० | अनारोग्यकारी झोपडी काढून टाकण्यास किंवा तिच्यात फेरफार करण्यास फर्मावणे. | पाचशे रुपये | शंभर रुपये. |
| ६१ | कलम ३८१ | उपद्रवकारक अशी डबकी वगैरे बुजवण्यास फर्मावणे. | दोन हजार रुपये | पाचशे रुपये. |
| ६२ | कलम ३८१अ, पोट-कलम (२). | विहीर, वगैरे बुजवण्यास किंवा पाडून टाकण्यास फर्मावणे. | दोन हजार रुपये | पाचशे रुपये. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ६३ | कलम ३८१ब | कोणत्याही जमिनीवरील पाण्याच्या साठ्यात डासांची पैदास होण्यास अटकाव करणे. | दोन हजार रुपये | पाचशे रुपये. |
| ६४ | कलम ३८२ | धोकादायक दगडखाणीचे काम बंद करण्यास फर्माविणे. | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये. |
| ६५ | कलम ३८३, पोट-कलम (१). | झाडे, झुडपे किंवा कुंपणे काढून किंवा छाटून टाकण्यास फर्माविणे. | पाचशे रुपये | शंभर रुपये. |
| ६६ | कलम ३८४, पोट-कलम (१). | जनावरे पाळण्यास मनाई. | एक हजार रुपये | दोनशे रुपये. |
| ६७ | कलम ३८४अ | राहत्या घरांमध्ये जनावरे बांधण्याचे बंद करण्यास, वगैरे फर्मावणे. | दोन हजार रुपये | पाचशे रुपये. |
| ६८ | कलम ३९०, पोट-कलम (१). | लेखी परवानगीवाचून स्थापन केलेला कारखाना, वगैरे चालू ठेवण्यास मनाई. | पन्नास हजार रुपये | दहा हजार रुपये. |
| ६९ | कलम ३९०, पोट-कलम (३). | कारखाना वगैरे स्थापन करण्यासाठी दिलेली लेखी परवानगी रद्द केल्यानंतर कारखान्याचे कामकाज इत्यादी चालू ठेवण्यास किंवा पुन्हा सुरू करण्यास मनाई. | पन्नास हजार रुपये | दहा हजार रुपये. |
| ७० | कलम ३९२, पोट-कलम (१). | कारखाने वगैरे यांचे आरोग्यविषयक विनियमन करण्यास फर्माविणे. | दहा हजार रुपये | तीन हजार रुपये. |
| ७१ | कलम ३९४, पोट-कलम (१), खंड (अ)(दोन) आणि (ब) ते (फ). | लायसनवाचून विवक्षित वस्तू न ठेवणे आणि लायसनवाचून विवक्षित उदीम, प्रक्रिया व क्रिया पार न पाडणे. | वीस हजार रुपये | चार हजार रुपये. |
| ७२ | कलम ३९४, पोट-कलम (६). | लायसन परिवास्तूमध्ये ठेवणे, ठेवलेल्या वस्तूंचे स्वरूप दर्शविणारा किंवा चालवण्यात येणारा उदीम दर्शविणारा फलक प्रदर्शित करणे, वस्तू इत्यादींवर योग्य खूणचिठ्ठ्या लावणे. | दोन हजार रुपये | पाचशे रुपये. |
| ७३ | कलम ३९५, पोट-कलम (१). | रासायनिक द्रव्यांनी वगैरे पाणी दूषित करण्यास मनाई. | पन्नास हजार रुपये | दहा हजार रुपये. |
| ७४ | कलम ३९७, पोट-कलम (१). | परिटांनी कपडे धुण्याच्या बाबतीतील विनियम. | एक हजार रुपये | दोनशे रुपये. |

| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
|---|---|---|---|---|
| ७५ | कलम ४०३, पोट-कलम (१). | लायसनवाचून खाजगी बाजार उघडे न ठेवणे किंवा उघडे ठेवण्यास परवानगी न देणे आणि कोणतीही जागा कत्तलखाना म्हणून न वापरणे किंवा वापरण्यास परवानगी न देणे. | पाच हजार रुपये | एक हजार रुपये. |
| ७६ | कलम ४०५ | खाजगी बाजार इमारतीत व कत्तलखान्यात फरसबंदी करण्यास व नाली बांधण्यास फर्माविणे. | पाच हजार रुपये | एक हजार रुपये. |
| ७७ | कलम ४११ | खाटीक आणि जनावरांचे मांस विकणाऱ्या किंवा पुरवणाऱ्या व्यक्तींना लायसन देणे. | एक हजार रुपये | दोनशे रुपये. |
| ७८ | कलम ४१२अ | लायसनवाचून दूध, लोणी वगैरे न विकणे. | एक हजार रुपये | दोनशे रुपये. |
| ७९ | कलम ४२५, पोट-कलम (१). | इमारती रोगजंतुरहित करण्यास फर्माविणे. | एक हजार रुपये | दोनशे रुपये. |
| ८० | कलम ४२६अ, पोट-कलम (१). | आडगिऱ्हाइकी कपडे व बिस्तरा आयुक्ताला माहिती न देता व त्यांचे निरीक्षण होऊ न देता शहरात आणणे. | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये. |
| ८१ | कलम ४२६अअ, पोट-कलम (४). | आयुक्त प्रमाणपत्र देईपर्यंत, शहरात आणलेले आडगिऱ्हाइकी कपडे व बिस्तरा यांची व्यवस्था न करणे किंवा त्यांची विल्हेवाट न लावणे. | दहा हजार रुपये | दोन हजार रुपये. |
| ८२ | कलम ४७९, पोट-कलम (५). | लायसन किंवा लेखी परवानगी हजर करण्याचे प्रतिग्रहीत्यावर बंधन असणे. | एक हजार रुपये | दोनशे रुपये. |
| ८३ | कलम ४८५अ, पोट-कलम (२). | कोणत्याही परिवास्तूत असलेल्या हितसंबंधाच्या स्वरूपाविषयी माहिती पुरविण्यास फर्माविणे. | एक हजार रुपये | दोनशे रुपये. |
| ८४ | कलम ५०७, पोट-कलम (३). | लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाने आदेश दिल्यापासून आठ दिवसानंतर इमारतीच्या किंवा जमिनीच्या भोगवटादाराने, मालकास या अधिनियमाच्या तरतुदींचे वगैरे अनुपालन करता यावे, यासाठी सुविधा उपलब्ध करून देणे. | पाच हजार रुपये | एक हजार रुपये.] |

**४७३.** (१) जी कोणतीही व्यक्ती, या कलमात यापुढे नमूद केलेली या अधिनियमाची कलमे, पोट-कलमे किंवा खंड यापैकी कोणत्याही कलमाच्या, पोट-कलमाच्या किंवा खंडाच्या किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही विनियमांच्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील आणि जी कोणतीही व्यक्ती, उक्त कलम, पोट-कलमे, किंवा खंड यापैकी कोणत्याही कलमाखाली, पोट-कलमाखाली किंवा खंडाखाली तिला कायदेशीरपणे केलेल्या कोणत्याही फर्मावणीचे अनुपालन करण्यात कसूर करील, तिने या कलमात यापुढे भारतीय दंड संहितेच्या ज्या कलमाखाली अशी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल, ते कलम म्हणून या कलमात यापुढे अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेल्या उक्त संहितेच्या कलमाखाली शिक्षापात्र असलेला अपराध केला आहे, असे मानण्यात येईल :— दंड संहितेखाली शिक्षापात्र असलेले अपराध.

१८६० चा ४५.

| या अधिनियमाची कलमे (१) | भारतीय दंड संहितेच्या ज्या कलमांखाली अपराधी हे शिक्षेस पात्र असतील, अशी कलमे (२) |
|---|---|
| [1][* * * * * *] | |
| २८, खंड (ज) . . . . . . | १७७. |
| कलम १५५, पोट-कलमे (१) व (२), १८७ . . | यथास्थिति, १७६ किंवा १७७ |
| [2][ * * * * *] | |
| कलम ३८८, खंड (अ), (ब), (क) व (ड), ३८९. . | २७७. |
| कलम ४३४, पोट-कलम (१) . . . . | १८८. |

[3][**४७३अ.** महानगरपालिकेचा जो कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी, नाव दाखल करून घेण्यास पात्र असलेल्या व्यक्तींची चुकीची किंवा खोटी यादी जाणूनबुजून तयार करील किंवा अशी नोंद त्या यादीत करील, त्यास अपराधसिद्धीनंतर, दोहोंपैकी कोणत्याही वर्णनाची सहा महिन्यांपर्यंत वाढवता येईल इतकी कैदेची शिक्षा होईल किंवा पाचशे रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल.] मतदारांच्या खोट्या याद्या तयार करण्यासंबंधीच्या किंवा प्रभागांच्या याद्यांत खोट्या नोंदी करण्यासंबंधीच्या अपराधांबद्दल शिक्षा.

[1] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम १८ अन्वये कलमे १९(५) आणि (५अ) यांच्याशी संबंधित असलेली नोंद वगळण्यात आली.

[2] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ५२ द्वारे ही नोंद वगळण्यात आली.

[3] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ३० (३) अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

महानगरपालिकेशी केलेली संविदा, वगैरेत हिस्सा किंवा हितसंबंध संपादन करण्याबद्दल शिक्षा.

**४७४.** कलम १६ खाली जो कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध पालिका सदस्यास धारण करता येत असेल व जो धारण केल्याने, पालिका सदस्य होण्यास तो निरर्ह नसेल असा हिस्सा किंवा हितसंबंध याखेरीज, महानगरपालिकेशी किंवा महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत किंवा नोकरीत, जो कोणताही पालिका सदस्य, कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध जाणूनबुजून प्रत्यक्षपणे अगर अप्रत्यक्षपणे संपादन करील, त्या सदस्याने आणि जो हिस्सा किंवा हितसंबंध कलम १६, खंड (ह) व (के) खाली पालिका सदस्यास धारण करता येतो व जो धारण केल्याने पालिका सदस्य म्हणून तो निरर्ह ठरत नाही असा हिस्सा किंवा हितसंबंध वगळून जो कोणताही आयुक्त, [१][संचालक], उप आयुक्त, महानगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी महानगरपालिकेशी किंवा महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेत किंवा नोकरीत, कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध जाणूनबुजून प्रत्यक्षपणे अगर अप्रत्यक्षपणे संपादन करील, त्या आयुक्ताने, [१][संचालकाने,] उप आयुक्ताने, महानगरपालिका अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने भारतीय दंड संहितेच्या कलम १६८ अन्वये शिक्षापात्र ठरविलेला अपराध केला आहे, असे मानण्यात येईल. १८६० चा ४५.

प्रकरण पाच-अ खालील अधिकारांच्या कायदेशीर वापरास अडथळा केल्याबद्दल शास्ती.

[२][**४७४अ.** जी कोणतीही व्यक्ती, प्रकरण पाच-अ अन्वये किंवा त्याखाली प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकाराचा विधिसंमत वापर करण्याच्या कामी अडथळा करील, तिला अपराधसिद्धीनंतर [३][दोन हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल] तथापि, हा दंड, एक हजार रुपयांपेक्षा कमी नसेल इतका किमान दंड असण्याच्या अधीन असेल.]

कलम २६७ विरूद्ध केलेल्या अपराधाबद्दल शिक्षा.

**४७५.** (१) जो कोणी, कलम २६७ च्या पोट-कलम (१) च्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील, त्यास [४][सहा महिन्यांपर्यंत वाढविता येईल, इतकी कैदेची शिक्षा होईल किंवा पाचशे रुपयांपर्यंत वाढविता येईल, इतक्या दंडाची] शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(२) जेव्हा पोट-कलम (१) खाली कोणत्याही व्यक्तीस सिद्धापराध ठरवण्यात आले असेल तेव्हा, ज्या दंडाधिकाऱ्याने तिला सिद्धापराध ठरवले असेल, तो दंडाधिकारी ज्यासंबंधाने त्या व्यक्तीला सिद्धापराध ठरवण्यात आले असेल, अशी कोणतीही इमारत ताबडतोब काढून टाकण्याचा किंवा असे काम किंवा जमिनीचा वापर ताबडतोब बंद करण्याचा आदेश देऊ शकेल.

(३) जर पोट-कलम (२) खालील कोणताही आदेश पाळण्यात आला नाही किंवा त्याच्या अंमलबजावणीस प्रतिकार करण्यात आला तर अपराध्यास, एक महिन्यापर्यंत वाढवता येईल इतकी कैदेची शिक्षा होईल किंवा शंभर रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील.

कलम ३४७ च्या विरोधी असेल असे काम सुरू केल्याबद्दल शिक्षा.

[५][**४७५अ.** [६][कलमे ३५१ व ३५४ अन्वये] ज्या व्यक्तीविरुद्ध नोटीस बजावण्यात आली असेल त्या व्यक्तीने,—

(अ) पाया, जोते किंवा मजला, किंवा बांधकामाचे भाग किंवा भार पेलणाऱ्या भिंती पूर्ववत करण्यासंबंधीच्या नोटिसीचे अनुपालन केले नाही व त्यायोगे, अशी इमारत किंवा तिच्या

---

[१] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम १८ अन्वये हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९६१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १४, कलम १० अन्वये कलम ४७४अ समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ५६ अन्वये " एक हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ५७ अन्वये " एक महिन्यापर्यंत वाढवता येईल इतकी कैदेची शिक्षा होईल किंवा शंभर रुपयांपर्यंत वाढवता येईल, इतक्या दंडाची " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २३७ अन्वये कलम ४७५अ समाविष्ट करण्यात आले.

[६] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम २९ अन्वये " कलम ३५१ " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

शेजारची अन्य कोणतीही इमारत किंवा जागा याचा भोगवटा करणाऱ्या, आश्रय घेणाऱ्या किंवा त्या जवळून जाणाऱ्या कोणत्याही व्यक्तीच्या जीविताला आणि मालमत्तेला धोका निर्माण केला तर, त्या व्यक्तीला तीन महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु तीन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि दहा हजार रुपयापेक्षा कमी नसेल परंतु पन्नास हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल ; आणि अपराध चालू राहील त्या बाबतीत प्रत्येक दिवसासाठी एक हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल ; किंवा

(ब) अनधिकृत बांधकाम हलवणे, पाडून टाकणे यासंबंधीच्या नोटिसीचे अनुपालन केले नाही तर त्या व्यक्तीला एक महिन्यापेक्षा कमी नसेल परंतु एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची आणि पाच हजार रुपयांपेक्षा कमी नसेल परंतु पंचवीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल; आणि अपराध चालू राहील त्या बाबतीत प्रत्येक दिवसासाठी पाचशे रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या दंडाची शिक्षा होईल.]

कलम ३५१ किंवा ३५४अ अन्वये कार्यवाही करण्यात कसूर केल्याबद्दल शिक्षा.

[१][**४७५ब.** कोणत्याही इमारतीच्या उभारणीचे काम किंवा कलम ३४२ मध्ये दिलेल्या प्रकारानुसार, असे कोणतेही बांधकाम सुरू करणे हे कलम ३४२ किंवा ३४७ यांच्या तरतुदींच्या विरुद्ध किंवा अन्यथा अवैधपणे सुरू केल्याचे किंवा अवैधपणे चालू ठेवल्याचे पदनिर्देशित अधिकाऱ्याच्या निदर्शनास आणून देण्यात आले असेल ; आणि जर असा पदनिर्देशित अधिकारी, पुरेशा कारणांशिवाय, कलम ३५१ किंवा ३५४अ अन्वये तरतूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात कसूर करीत असेल तर, त्यास, दोषसिद्धीनंतर, तीन महिन्यांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा होईल किंवा वीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील.

विवक्षित अपराध आपसात मिटवणे.

**४७५क.** (१) आयुक्तास, सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, कार्यवाही सुरू करण्यापूर्वी किंवा सुरू केल्यानंतर, कलम ४७५अ खालील शिक्षायोग्य असलेला कोणताही अपराध आपसात मिटवता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये जेव्हा एखादा अपराध आपसात मिटविण्यात आला असेल तेव्हा, आपसात मिटविण्यात आलेल्या अपराधाच्या संबंधात अपराधी व्यक्तीविरुद्ध आणखी कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही आणि या अगोदरच कोणतीही कार्यवाही करण्यात आली असेल तर ती समाप्त होईल आणि अपराधी अभिरक्षेत असेल तर, त्यास मुक्त करण्यात येईल.

कलम ३९१ विरुद्ध केलेल्या अपराधाबद्दल शिक्षा.

**४७६.** जो कोणी कलम ३९१ च्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील, त्यास मग अपराध करणारी व्यक्ती ही, भट्टी ज्या परिवास्तूत असेल अशा परिवास्तूचा मालक किंवा भोगवटादार असो अथवा मालकाने किंवा भोगवटादाराने तिची व्यवस्था पाहण्यासाठी नेमलेला अभिकर्ता किंवा एखादी व्यक्ती असो, पहिल्या अपराधसिद्धीनंतर [२][पाचशे रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल, तथापि हा दंड दोनशे रुपयांपेक्षा कमी नसेल इतका किमान दंड असण्याच्या अधीन असेल] आणि, दुसऱ्या किंवा त्यानंतरच्या अपराधसिद्धीनंतर निकटपूर्वीच्या अपराधसिद्धीच्या वेळी ज्या रकमेपर्यंत दंड करता येईल, त्या रकमेच्या दुप्पट रकमेपर्यंत दंड होईल.]

मनाई करण्यात आलेल्या क्षेत्रांत लायसनवाचून विवक्षित घातक वस्तू ठेवल्याबद्दल शिक्षा.

[३][**४७६अअ.** जो कोणी कलम ३९४, पोट-कलम (१), [४][खंड (अ) (एक) ] किंवा कलम ३९४अ चे उल्लंघन करील, त्यास अपराधसिद्धीनंतर दोन वर्षांपर्यंत वाढविता येईल इतक्या अवधीच्या कैदेची व दोन हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल :

परंतु, न्यायालयाच्या अभिनिर्णयामध्ये त्याउलट कोणतीही विशेष व पुरेशी कारणे नमूद करण्यात आली नसतील तर, अशी कैदेची शिक्षा सहा महिन्यांहून कमी असणार नाही आणि असा दंड एक हजार रुपयांहून कमी असणार नाही. ]

---

[१] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ७ अन्वये कलम ४७५ब व ४७५क समाविष्ट करण्यात आली.

[२] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ५८ अन्वये "शंभर रुपयांपर्यंत वाढवता येईल, इतक्या दंडाची शिक्षा होईल " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम ५९ अन्वये मूळ कलमाऐवजी कलम ४७६अअ दाखल करण्यात आले.

[४] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २३८ अन्वये " खंड (अ) (दोन) " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

कलम ३९४ (१) (अ) किंवा ३९४अ यांचे उल्लंघन केल्याबद्दल वस्तू समपहृत करण्याची शिक्षा.

[१][**४७६अब.** कलम ३९४, पोट-कलम (१), खंड (अ) किंवा कलम ३९४ अ च्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन केल्याच्या अपराधाबद्दल एखाद्या व्यक्तीस सिद्धापराध ठरविण्यात आले असता, न्यायालयास त्या बाबतीत इतर जी कोणतीही शिक्षा देता य़ेत असेल त्याच्या भरीला असाही निदेश देता येईल की, ज्या वस्तूंच्या संबंधात अपराध करण्यात आला असेल, अशा वस्तूंचे त्या ज्या पात्रांत ठेवण्यात आल्या असतील, त्या पात्रांसह समपहरण करण्यात यावे.]

[३][बृहन्मुंबईत] किंवा [३][बृहन्मुंबईबाहेर] कोणतीही जागा लायसनवाचून कत्तलखाना म्हणून वापरल्याबद्दल किंवा वापरण्यास परवानगी दिल्याबद्दल शिक्षा.

[२][**४७६अ.** जो कोणी कलम ४०३, पोट-कलम (१), खंड (ब) किंवा खंड (क) च्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील, त्यास सिद्धापराध ठरविण्यात आल्यावर,—

(अ) पहिल्या अपराधाबद्दल [४][दोन हजार रुपयांपर्यंत] वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल ;

(ब) दुसऱ्या व त्यानंतरच्या अपराधाबद्दल [५][एक वर्षापर्यंत वाढविता येईल इतक्या अवधीची कैदेची शिक्षा आणि दोन हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल, इतक्या दंडाची] शिक्षा होईल :

परंतु, न्यायालयाच्या अभिनिर्णयामध्ये नमूद करावयाची, त्याउलट अशी विशेष व पुरेशी कारणे नसतील तर, अशी कैदेची शिक्षा [६][दोन महिन्यांपेक्षा कमी अवधीची असणार नाही आणि असा दंड चारशे रुपयांपेक्षा कमी असणार नाही.]

बृहन्मुंबईत गुरे, वगैरे आयात केल्याबद्दल शिक्षा.

**४७६ब.** जो कोणी कलम ४१२, पोट-कलम (१) च्या कोणत्याही तरतुदींचे उल्लंघन करील, त्यास अपराधसिद्धीनंतर,—

(अ) पहिल्या अपराधाबद्दल [७][दोनशे रुपयांपर्यंत] वाढविता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल ;

(ब) दुसऱ्या व त्यानंतरच्या अपराधाबद्दल [८][एक वर्षापर्यंत वाढविता येईल इतक्या अवधीची कैदेची शिक्षा आणि दोन हजार रुपयांपर्यंत वाढविता येईल, इतक्या दंडाची] शिक्षा होईल :

परंतु, न्यायालयाच्या अभिनिर्णयात नमूद करावयाची, त्याउलट अशी विशेष व पुरेशी कारणे नसतील तर, अशी कैद [९][दोन महिन्यांपेक्षा कमी असणार नाही आणि असा दंड चारशे रुपयांपेक्षा कमी असणार नाही.] .]

मालकाचे अभिकर्ते व विश्वस्त यांच्या शिक्षेसंबंधातील जबाबदारीची व्याप्ती.

**४७७.** जी कोणतीही व्यक्ती, कलम ३, खंड (म), उपखंड (एक), (दोन) व (तीन) मध्ये वर्णन केलेल्या कोणत्याही नात्याने कोणत्याही परिवास्तूचे भाडे घेईल, अशा व्यक्तीने अशा परिवास्तूचा मालक म्हणून तिने जे कृत्य करावयास पाहिजे, ते कृत्य करण्याचे वर्जिले असेल आणि अशी कसूर ही, आवश्यक असलेले कृत्य करण्याचा परिव्यय देण्यास पुरेसा होईल, असा मालकाचा किंवा मालकास द्यावयाचा पैसा तिच्याजवळ नसल्यामुळे घडली, असे तिने सिद्ध केले असेल तर, ती या अधिनियमाखालील कोणत्याही शास्तीस पात्र ठरणार नाही.

---

[१] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ६ अन्वये कलम ४७६अब समाविष्ट करण्यात आले.

[२] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४, कलम २१ अन्वये कलमे ४७६अ आणि ४७६ब समाविष्ट करण्यात आली.

[३] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६०(अ) अन्वये "एक हजार रुपयांपर्यंत" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम ६०(ब) अन्वये "सहा महिन्यापर्यंत वाढवता येईल इतक्या अवधीची कैदेची शिक्षा आणि एक हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल, इतक्या दंडाची" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ६०(क) अन्वये "एक महिन्यापेक्षा कमी अवधीची असणार नाही आणि अशा दंडाची शिक्षा दोनशे रुपयांपेक्षा कमी असणार नाही" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[७] वरील अधिनियमाच्या कलम ६१ (अ) अन्वये " शंभर रुपयांपर्यंत " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[८] वरील अधिनियमाच्या कलम ६१ (ब) अन्वये "सहा महिन्यापर्यंत वाढवता येईल इतक्या अवधीची कैदेची शिक्षा आणि एक हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल, इतक्या दंडाची" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[९] वरील अधिनियमाच्या कलम ६१(क) अन्वये "एक महिन्यापेक्षा कमी असणार नाही आणि असा दंड दोनशे रुपयांपेक्षा कमी असणार नाही" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][**४७८.** जी कोणतीही व्यक्ती, जकात देण्यास पात्र असलेली कोणतीही वस्तू, असा कर दिल्यावाचून [२][बृहन्मुंबईच्या] हद्दीत आणील, तिला अपराधसिद्धीनंतर सहा महिन्यांपर्यंत वाढवता येईल इतक्या अवधीच्या कैदेची किंवा एक हजार रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा दोन्ही शिक्षा होतील ; आणि या कलमाखाली अपराधाची संपरीक्षा करणाऱ्या न्यायालयास, अशा अपराधसिद्धीनंतर ज्या वस्तूच्या संबंधात अपराध करण्यात आला असेल, त्या वस्तूंचे अधिहरण करता येईल. जकाती संबंधातील अपराधाबद्दल शास्ती.

**४७८-१अ.** [२][बृहन्मुंबईत] आयात केलेली कोणतीही वस्तू जकात देण्यास पात्र असताना, जी कोणतीही व्यक्ती कर देण्याचे टाळण्याच्या उद्देशाने अशी कोणतीही वस्तू [२][बृहन्मुंबईच्या] हद्दीत आणिल किंवा आणण्याचा प्रयत्न करील किंवा आणण्याची व्यवस्था करील किंवा आणण्याच्या कामी सहाय्य करील व अशी वस्तू अशा रितीने आणण्याबद्दल त्यावर जी जकात देय असेल ती देण्यात किंवा देऊ करण्यात आली नसेल, तर अपराधसिद्धीनंतर त्या व्यक्तीला देय कराच्या रकमेच्या [३][पाच पटींपेक्षा कमी असणार नाही, परंतु त्या रकमेच्या] दसपट वाढवता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल. जकात देण्याचे टाळल्याबद्दल शास्ती.

[४][**४७८-१अअ.** (१) आयुक्तास किंवा आयुक्ताने याबाबतीत प्राधिकृत केलेल्या, सहायक आयुक्ताच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यास, आदेशाद्वारे, कार्यवाही सुरू करण्यापूर्वी किंवा त्यानंतर, जकात रक्कम तसेच देय जकात रकमेच्या दहापट इतकी आणखी रक्कम भरल्यावर जकात चुकवण्याबाबत कलम ४७८-१अ अन्वये शिक्षापात्र असलेला कोणताही अपराध आपसात मिटवता येईल. जकात चुकवण्याबाबतचा अपराध आपसात मिटवणे.

(२) पोट-कलम (१) अन्वये जेव्हा एखादा अपराध आपसात मिटविण्यात आला असेल तेव्हा आपसात मिटवलेल्या अपराधाच्या संबंधात आरोपी व्यक्तींविरुद्ध आणखी कोणतीही कार्यवाही करण्यात येणार नाही आणि अगोदर कोणतीही कार्यवाही करण्यात आली असेल तर, ती समाप्त होईल आणि आरोपी व्यक्ती अभिरक्षेत असली तर, तिला मुक्त करण्यात येईल.]

**४७८-१ब.** जी कोणतीही व्यक्ती, कलम १९५-१ब खाली करण्यात आलेल्या नियमांच्या तरतुदींपैकी कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करील किंवा अशा कोणत्याही तरतुदीखाली विधितः करण्यात आलेल्या कोणत्याही मागणीचे अनुपालन करण्यात कसूर करील, तिला, अपराधसिद्धीनंतर अशा प्रत्येक अपराधाबद्दल दोनशे पन्नास रुपयांपर्यंत वाढवता येईल इतक्या दंडाची शिक्षा होईल.] जकात नियमांचा भंग केल्याबद्दल शास्ती.

[५][* * * * * * *]

## प्रकरण एकोणीस

## कार्यपद्धती

### लायसने

**४७९.** (१) कोणत्याही प्रयोजनाकरिता लायसन किंवा लेखी परवानगी देता येईल अशी या अधिनियमात तरतूद करण्यात आली असेल तेव्हा, असे लायसन किंवा लेखी परवानगी, ज्या कालावधीकरिता आणि ज्या निर्बंधांच्या व शर्तींच्या अधीनतेने देण्यात आली असेल तो कालावधी आणि ते निर्बंध व शर्ती त्यांत विनिर्दिष्ट करण्यात येतील आणि असे लायसन किंवा लेखी परवानगी आयुक्ताच्या सहीने किंवा कलम ६८ खाली ती देण्यास अधिकार प्रदान केलेल्या महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या सहीने देण्यात येईल. लायसने व लेखी परवानगी यांत, ती ज्या शर्तींवर वगैरे देण्यात आली असेल त्या शर्ती विनिर्दिष्ट करणे.

---

[१] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम १८ अन्वये कलमे ४७८, ४७८-१अ, ४७८-१ब ही कलमे, कलम ४७८ ऐवजी दाखल करण्यात आली.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (१) "ग्रेटर बॉम्बे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १२, कलम ७ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २८, कलम ३ अन्वये "कलम ४७८-१अअ" समाविष्ट करण्यात आले.

[५] वरील अधिनियम कलम ८ अन्वये कलमे ४७८-अ व ४७८-ब वगळण्यात आली.

आकारवयाची फी.

(२) अशा प्रत्येक लायसनसाठी किंवा लेखी परवानगीसाठी महानगरपालिकेच्या मंजुरीने [1][आयुक्त] वेळोवेळी निश्चित करील अशा दराने फी आकारता येईल.

लायसने व लेखी परवानगी रद्द करता येणे, वगैरे.

(३) कलम ४०३, [2][खंड (ड) व (डड)] यांच्या तरतुदींच्या अधीनतेने, या अधिनियमाखाली दिलेले कोणतेही लायसन किंवा लेखी परवानगी ही, ती जीला देण्यात आली असेल अशा व्यक्तीने तिच्या कोणत्याही निर्बंधाचा किंवा शर्तींचा भंग केला असेल किंवा त्या बाबतीत टाळाटाळ केली असेल तर किंवा जर उक्त व्यक्ती, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचा किंवा ज्या बाबींशी अशा लायसनचा किंवा लेखी परवानगीचा संबंध असेल त्या कोणत्याही बाबींसंबंधातील याखाली केलेल्या कोणत्याही विनियमाचा किंवा उपविधीचा भंग केल्याबद्दल सिद्धापराध ठरवण्यात आली असेल तर असे लायसन किंवा लेखी परवानगी कोणत्याही वेळी आयुक्तास निलंबित किंवा रद्द करता येईल.

लायसन किंवा लेखी परवानगी रद्द वगैरे करण्यात आली असेल तेव्हा प्रतिग्रहीता हा विना लायसन किंवा विना लेखी परवानगी असल्याचे मानणे.

(४) जेव्हा असे कोणतेही लायसन किंवा लेखी परवानगी निलंबित किंवा रद्द करण्यात आलेली असेल किंवा ज्या कालावधीसाठी ती देण्यात आली असेल तो कालावधी संपलेला असेल तेव्हा, असे लायसन किंवा लेखी परवानगी निलंबित किंवा रद्द करण्यासाठी आयुक्ताने दिलेला आदेश आयुक्त रद्द करीतोपर्यंत किंवा लायसनचे किंवा लेखी परवानगीचे नवीकरण करण्यात येईतोपर्यंत या अधिनियमाच्या सर्व प्रयोजनांकरिता असे लायसन किंवा लेखी परवानगी जीला देण्यात आली असेल अशी व्यक्ती विना लायसन किंवा विना परवानगी असल्याचे मानण्यात येईल.

प्रतिग्रहीत्यावर लासयन किंवा लेखी परवानगी हजर करण्याचे बंधन असणे.

(५) असे कोणतेही लायसन किंवा लेखी परवानगी जीला देण्यात आली असेल अशी प्रत्येक व्यक्ती, अशी लेखी परवानगी किंवा असे लायसन अंमलात असेपर्यंत सर्व वाजवी वेळी आयुक्ताने ते हजर करण्याविषयी फर्माविल्यास, असे लायसन किंवा अशी लेखी परवानगी हजर करील.

## सार्वजनिक नोटिसा व जाहिराती

सार्वजनिक नोटिसा कशा प्रसिद्ध कराव्यात.

**४८०.** जेव्हा जेव्हा या अधिनियमान्वये अशी तरतूद करण्यात आली असेल की, कोणत्याही गोष्टीची सार्वजनिक नोटीस देता येईल किंवा देण्यात येईल, तेव्हा तेव्हा अशी सार्वजनिक नोटीस, आयुक्ताच्या [3][किंवा महाव्यवस्थापकाच्या] किंवा कलम [4][६८ किंवा ६८ब] खाली अशी नोटीस देण्याचा अधिकार प्रदान केलेल्या महानगरपालिका अधिकाऱ्याच्या सहीने लेखी देण्यात येईल आणि ज्या वसतिक्षेत्रास ती लागू असेल त्या वसतिक्षेत्रातील प्रमुख सार्वजनिक जागी तिच्या प्रती लावून किंवा तिच्यासंबंधी दवंडी पिटवून, किंवा स्थानिक वृत्तपत्रात तिची जाहिरात देऊन किंवा या साधनांपैकी कोणत्याही दोन किंवा अधिक साधनांनी आणि योग्य वाटेल अशा इतर कोणत्याही साधनाने तिला विस्तृत प्रसिद्धी देण्यात येईल.

[1] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १९६ अन्वये " महापौरासह परिषद " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[2] सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२, कलम १४ अन्वये " खंड (ड) " या ऐवजी " खंड (ड) व (डड) " हा मजकूर दाखल करण्यात आला.

[3] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ४६ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[4] वरील अधिनियमान्वये " ६८ " या आकड्याऐवजी हे आकडे, शब्द व अक्षरे दाखल करण्यात आली.

**४८१.** जेव्हा जेव्हा या अधिनियमान्वये अशी तरतूद करण्यात आली असेल की, स्थानिक वृत्तपत्रांत जाहिरात देऊन नोटीस देण्यात येईल किंवा स्थानिक वृत्तपत्रांत अधिसूचना अथवा कोणतीही माहिती प्रसिद्ध करण्यात येईल तेव्हा अशी नोटीस, अधिसूचना किंवा माहिती, व्यवहार्य असल्यास, [१][बृहन्मुंबईत] प्रसिद्ध होणाऱ्या किमान दोन इंग्रजी वृत्तपत्रात, एका मराठी वृत्तपत्रात व एका गुजराथी वृत्तपत्रात दाखल करण्यात येईल.

जाहिराती कशा प्रसिद्ध कराव्यात.

**४८२.** जेव्हा जेव्हा या अधिनियमाखाली कोणतीही गोष्ट करणे किंवा ती करण्याचे वर्जिणे हे किंवा कोणत्याही गोष्टीची विधिग्राह्यता ही [२][आयुक्ताने किंवा महाव्यवस्थापकाने] [३][किंवा संचालकाने] किंवा उप आयुक्ताने किंवा कोणत्याही महानगरपालिका अधिकाऱ्याने संमती किंवा मान्यता देणे किंवा घोषित करणे, मत देणे, किंवा खात्री करून घेणे, यांवर अवलंबून असेल तेव्हा, तेव्हा [२][आयुक्त किंवा महाव्यवस्थापक] [४][किंवा संचालक] किंवा असा उप आयुक्त, किंवा महानगरपालिका अधिकारी यांनी सही केलेला व अशी संमती किंवा मान्यता दिल्याचे घोषित केल्याचे, किंवा मत दिल्याचे किंवा खात्री करून घेतल्याचे व्यक्त करणारा किंवा मांडणारा आहे असा आशय असलेला लेखी दस्तऐवज हा, अशी संमती किंवा मान्यता दिल्याबद्दल किंवा घोषित केल्याबद्दल किंवा मत दिल्याबद्दल किंवा खात्री करून घेण्याबद्दल पुरेसा पुरावा असेल.

[२][आयुक्त, महा-व्यवस्थापक वगैरे] यांची संमती इत्यादी, त्यांनी सही केलेल्या लेखी दस्तऐवजाने सिद्ध करता येईल.

## नोटिसा वगैरे बजावणे

**४८३.** कोणत्याही व्यक्तीवर, हा अधिनियम किंवा या अधिनियमाखाली केलेला कोणताही विनियम किंवा उपविधी यानुसार बजावावयाच्या, काढावयाच्या किंवा सादर करावयाच्या किंवा द्यावयाच्या नोटिसा, बिले, अनुसूच्या, समन्स किंवा असे इतर दस्तऐवज हे महानगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी किंवा याबाबत [२][आयुक्ताने किंवा महाव्यवस्थापकाने] प्राधिकृत केलेली इतर व्यक्ती बजावील, काढील, सादर करील किंवा देईल.

नोटिसा, वगैरे कोणी बजावणे किंवा सादर करणे.

**४८४.** जेव्हा कोणत्याही व्यक्तीवर, हा अधिनियम, किंवा या अधिनियमाखाली केलेला कोणताही विनियम किंवा उपविधी यानुसार बजावावयाची, काढावयाची किंवा सादर करावयाची कोणतीही नोटीस, बील, अनुसूची, समन्स किंवा असा इतर दस्तऐवज, कलम ४८५ मध्ये ज्या बाबतीत अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली असेल तेवढे खेरीज करून एरव्ही, बजावण्याचे, काढण्याचे किंवा सादर करण्याचे काम हे पुढीलप्रमाणे पार पाडण्यात येईल :—

परिवास्तूच्या मालकांवर व इतर व्यक्तींवर नोटीस कशी बजावावयाची.

(अ) अशा व्यक्तीस उक्त नोटीस, बील, अनुसूची, समन्स किंवा इतर दस्तऐवज देऊन किंवा देऊ करून, अथवा

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २(१), अनुसूची (१) ४ (१) अन्वये "ग्रेटर बाम्बे" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ४७ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम १९(अ) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम १९(ब) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

(ब) जर अशी व्यक्ती सापडत नसेल तर [१][बृहन्मुंबईतील] ती शेवटी राहत असल्याचे माहीत असलेल्या जागी उक्त नोटीस, बील, अनुसूची, समन्स किंवा इतर दस्तऐवज ठेवून किंवा तिच्या कुटुंबातील कोणत्याही [२][प्रौढ व्यक्तीस] किंवा नोकरास देऊन किंवा देऊ करून, अथवा

(क) जर अशी व्यक्ती [१][बृहन्मुंबईत] राहत नसेल तर आणि तिच्या इतर ठिकाणचा पत्ता [३][आयुक्ताला किंवा महाव्यवस्थापकाला] माहीत असेल तर, उक्त नोटीस, बील, अनुसूची, समन्स किंवा इतर दस्तऐवज उक्त पत्ता असलेल्या लखोट्यात घालून व त्या व्यक्तीकडे डाकेने पाठवून ; अथवा

(ड) जर पूर्वोक्तपैकी कोणताही मार्ग उपलब्ध नसेल तर, उक्त नोटीस, बील, अनुसूची, समन्स किंवा इतर दस्तऐवज ज्या इमारतीसंबंधी किंवा जमिनीसंबंधी असेल त्या इमारतीच्या किंवा जमिनीच्या ठळक भागी लावण्याची तजबीज करून.

परिवास्तूंच्या मालकांवर किंवा भोगवटादारावर नोटीस कशी बजावावयाची.

**४८५.** जेव्हा कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकावर किंवा भोगवटादारावर, हा अधिनियम किंवा या अधिनियमाखाली केलेला कोणताही विनियम किंवा उपविधी या अन्वये कोणतीही नोटीस, बील, अनुसूची, समन्स किंवा इतर दस्तऐवज बजावावयाचे, काढावयाचे किंवा सादर करावयाचे असतील तेव्हा त्या इमारतीचा किंवा जमिनीचा मालक किंवा भोगवटादार याचा तीमध्ये नामनिर्देश करण्याची आवश्यकता असणार नाही आणि ते बजावणे, काढणे किंवा सादर करणे हे निकटपूर्वीच्या कलमाच्या तरतुदींनुसार परिणामक न होता पुढीलप्रमाणे परिणामकारक होईल :—

(अ) मालकास किंवा भोगवटादारास उक्त नोटीस, बील, अनुसूची, समन्स किंवा इतर दस्तऐवज देऊन किंवा देऊ करून किंवा जर मालक किंवा भोगवटादार एकापेक्षा अधिक असतील तर अशा इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकांपैकी किंवा भोगवटादारांपैकी कोणत्याही एका मालकास किंवा भोगवटादारास देऊन किंवा देऊ करून, किंवा

(ब) जर मालक किंवा भोगवटादार किंवा मालकांपैकी किंवा भोगवटादारांपैकी कोणताही एक मालक किंवा भोगवटादार सापडत नसेल तर उक्त नोटीस, बील, अनुसूची, समन्स किंवा इतर दस्तऐवज त्याच्या कुटुंबातील कोणत्याही [२][प्रौढ व्यक्तीस] किंवा कुटुंबाच्या नोकरास देऊन किंवा देऊ करून, किंवा

(क) जर पूर्वी सांगितल्यापैकी कोणताही मार्ग उपलब्ध नसेल तर, उक्त नोटीस, बील, अनुसूची, समन्स किंवा इतर दस्तऐवज ज्या इमारतीसंबंधी किंवा जमिनीसंबंधी असेल त्या इमारतीच्या किंवा जमिनीच्या ठळक भागी लावण्याची तजवीज करून.

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (१) अन्वये " ग्रेटर बाम्बे " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[२] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६३ अन्वये " प्रौढ पुरुष व्यक्तीस " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८ याच्या कलम ४७ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१][**४८५अ.** (१) जेव्हा कोणतीही नोटीस (हिच्यामध्ये कोणत्याही नोटिशीच्या कोणत्याही प्रतीचा समावेश होतो) बजावण्याबाबत आयुक्तास प्राधिकृत केले असेल किंवा त्यास तसे करणे भाग असेल तेव्हा आयुक्तास, अशी कोणतीही नोटीस बजावणे त्यास शक्य व्हावे म्हणून, कोणत्याही परिवास्तूच्या किंवा तिच्या कोणत्याही भागांशाच्या मालकास किंवा तिच्या भोगवटादारास लेखी नोटीस देऊन तिच्याद्वारे, आयुक्त याबाबत विहित करील अशा वाजवी कालावधीत, त्या परिवास्तूत असलेल्या आपल्या हितसंबंधाचे स्वरूप आणि त्यात हितसंबंध असलेल्या व त्यात हितसंबंध असल्याचे त्यास माहीत असलेल्या इतर कोणत्याही व्यक्तीचे नाव व पत्ता—मग असा हितसंबंध हा, पूर्ण मालकीने धारण करणारा म्हणून असो, गहाण घेणारा म्हणून असो किंवा पट्ट्याने घेणारा म्हणून असो किंवा इतर नात्याने असो—लेखी नमूद करण्यास फर्मावता येईल.

परिवास्तूंच्या मालकीसंबंधी माहिती मागवण्याचा आयुक्ताचा अधिकार.

(२) पोट-कलम (१) यास अनुसरून, आयुक्तास कोणतीही माहिती देण्याबाबत आयुक्ताने फर्मावलेली कोणतीही व्यक्ती त्याबाबत अनुपालन करण्यास आणि तिच्या संपूर्ण माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे खरी माहिती पुरविण्यास बांधलेली असेल.]

**४८६.** निकटपूर्वीच्या [२][चार] कलमांतील कोणतीही गोष्ट दंडाधिकाऱ्याने या अधिनियमाखाली काढलेल्या समन्सच्या बाबतीत लागू होणार नाही.

शेवटची [२][चार] कलमे दंडाधिकाऱ्याने काढलेल्या समन्सला लागू नसणे.

[३][**४८६अ.** कलमे ४८३, ४८४ व ४८५ यांत काहीही अंतर्भूत असले तरी—

करांची बिले डाकेने बजावणे.

[४][ (अ) ] कोणत्याही महानगरपालिका कराचे बील, असा कर देण्यास दायी असलेल्या व्यक्तींवर पुढील रितीने बजावता येईल, म्हणजे अशा व्यक्तीच्या नावे, [५][बृहन्मुंबईतील] तिच्या शेवटच्या माहीत असलेल्या राहण्याच्या जागेच्या किंवा धंद्याच्या जागेच्या पत्त्यावर आगाऊ हशील भरलेले पत्र साधारण डाकेने पाठवून व त्याबद्दलचे प्रेषण प्रमाणपत्र मिळवून बजावता येईल आणि याप्रमाणे पाठवलेले प्रत्येक बील हे, ज्या तारखेस असे पत्र डाकेने पाठवले असेल त्या तारखेच्या लगतनंतरच्या दिवशी बजावण्यात आले होते असे मानण्यात येईल आणि ते अशा रितीने बजावल्याचे सिद्ध करताना त्या पत्रावर योग्य रितीने पत्ता लिहिला होता व प्रेषण प्रमाणपत्र मिळवून त्या डाकेत टाकले होते, हे सिद्ध करणे पुरेसे होईल] ;

[६][ (ब) मागणी नोटीस नोंदणीकृत डाकेने बजावता येईल.]

---

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम २९ अन्वये कलम ४८५अ समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ३० अन्वये "तीन" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९५२ चा मुंबई अधिनियम क्रमांक २०, कलम २० अन्वये कलम ४८६ अ समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४, कलम २२ अन्वये हे कंस व अक्षर समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (१) अन्वये मूळ मजकुराऐवजी वरील मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४, कलम २२ अन्वये हा खंड समाविष्ट करण्यात आला.

नोटिसा, वगैरेंवर सहीचा शिक्का मारता येईल.

**४८७.** (१) ज्यावर या अधिनियमान्वये किंवा अधिनियमाखाली तयार केलेला कोणताही विनियम किंवा उपविधी या अन्वये आयुक्ताची [१][ किंवा महाव्यवस्थापकाची] किंवा कोणत्याही महानगरपालिका अधिकाऱ्याची सही असणे आवश्यक असेल असे प्रत्येक लायसन, लेखी परवानगी, नोटीस, बील, अनुसूची, समन्स किंवा इतर दस्तऐवज यांवर यथास्थिति, आयुक्ताच्या [१][ किंवा महाव्यवस्थापकाच्या] किंवा अशा महानगरपालिका अधिकाऱ्याच्या प्रतिरूप सहीचा शिक्का असेल तर त्यावर रीतसर सही केलेली आहे, असे मानण्यात येईल.

(२) या कलमातील कोणतीही गोष्ट, कलम ११३ खालील महानगरपालिका निधीवर [२][ किंवा कलम ४६०बब याखाली किंवा कलम ४६०केके, पोट-कलम (३) या खाली किंवा कलम ४६०लल, पोट-कलम (४) याखाली [३][ बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीवर] काढलेल्या धनादेशाच्या बाबतीत लागू होते, असे मानण्यात येणार नाही.

## प्रवेश करण्याचा अधिकार

आयुक्त, वगैरेस निरीक्षण किंवा सर्वेक्षण करण्याकरिता किंवा आवश्यक कामे पार पाडण्याकरिता कोणत्याही परिवास्तूत प्रवेश करण्याचा अधिकार असणे.

**४८८.** आयुक्त [४][किंवा महाव्यवस्थापक] यास हा अधिनियम किंवा या अधिनियमाखाली केलेला कोणताही विनियम किंवा उपविधी या अन्वये जे कोणतेही निरीक्षण किंवा सर्वेक्षण करण्यास किंवा जे कोणतेही काम पार पाडण्यास त्यास प्राधिकृत केले असेल किंवा या अधिनियमाच्या किंवा अशा कोणत्याही विनियमाच्या किंवा उपविधीच्या कोणत्याही प्रयोजनांकरिता किंवा त्यांच्या कोणत्याही तरतुदींस अनुसरून जे कोणतेही निरीक्षण किंवा सर्वेक्षण करणे किंवा जे कोणतेही काम पार पाडणे आवश्यक असेल असे कोणतेही निरीक्षण किंवा सर्वेक्षण करण्यासाठी किंवा असे कोणतेही काम पार पाडण्यासाठी मदतनीस व कामगार यांच्यासह किंवा यांच्याशिवाय कोणत्याही इमारतीत किंवा जमिनीवर प्रवेश करता येईल :

परंतु—

(अ) या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली असेल तेवढे खेरीज करून एरव्ही कोणताही असा प्रवेश सुर्यास्तापासून सुर्योदयापर्यंतच्या दरम्यान करता येणार नाही ;

(ब) या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे तरतूद केली असेल तेवढे खेरीज करून एरव्ही मानवी वसतिस्थान म्हणून वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही इमारतीत तिच्या भोगवटादाराच्या संमतीवाचून असा प्रवेश करता येणार नाही. तसेच उक्त भोगवटादारास असा प्रवेश करण्याच्या इराद्यासंबंधी आणि कोणत्याही पुरेशा कारणाने अशी माहिती पुरवणे इष्ट नाही असे वाटत असेल तेवढे खेरीज करून एरव्ही त्याच्या कारणासंबंधी चोवीस तासांहून कमी नसेल इतक्या अवधीची आगाऊ लेखी नोटीस दिलेली असल्याखेरीज पूर्वोक्तप्रमाणे प्रवेश करता येणार नाही ;

(क) कोणत्याही परिवास्तूमध्ये, नोटीस न देता इतर रीतीने प्रवेश करण्याचा अधिकार असला तरीही प्रत्येक बाबतीत, स्त्रियांकरिता राखून ठेवलेल्या कोणत्याही कक्षात राहणाऱ्या व्यक्तींना त्या परिवास्तूतील दुसऱ्या ज्या भागात त्याच्या एकांततेस बाध येणार नाही अशा भागात निघून जाता यावे म्हणून पुरेशी नोटीस देण्यात येईल ;

(ड) ज्या परिवास्तूत प्रवेश केलेला असेल त्या परिवास्तूच्या भोगवटादारांच्या सामाजिक व धार्मिक परिपाठांकडे, ज्या प्रयोजनाकरिता प्रवेश केलेला असेल त्या प्रयोजनाच्या निकडीशी सुसंगत असेल तेथवर, नेहमी योग्य लक्ष पुरविले पाहिजे.

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ४८ (एक) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ४८ (एक) अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[३] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (५) द्वारे "मुंबई वीज पुरवठा व परिवहन निधी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ४९ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[1][ **निष्कासनाचा अधिकार**

**४८८अ.** (१) जेव्हा कलमे ३५४रई, ३७८क किंवा ३७८फ या अन्वये कोणतीही इमारत किंवा तिचा भाग रिकामा करून घेणे आयुक्ताला भाग असेल तेव्हा, त्यास त्याच्या मते त्यासाठी वाजवी रीतीने आवश्यक असतील अशा उपाययोजना करता येतील किंवा उपाययोजना करण्याची तजवीज करता येईल आणि अशा बळाचा वापर करता येईल किंवा अशा बळाचा वापर करण्याची तजवीज करता येईल. आयुक्त विवक्षित प्रकरणी व्यक्तींना विनासोपस्कार निष्कासित करू शकेल.

(२) आयुक्तास, पोट-कलम (१) खाली निष्कासित केलेल्या व्यक्तींना पूर्ण पंधरा दिवसांची नोटीस दिल्यानंतर अशा इमारतीतील राहिलेली कोणतीही मालमत्ता काढून टाकता येईल किंवा काढून टाकण्याची तजवीज करता येईल किंवा जाहीर लिलाव करून तिची विल्हेवाट लावता येईल.

(३) पोट-कलम (२) खाली मालमत्ता विकण्यात आली असेल तेव्हा, विक्री करून आलेल्या उत्पन्नाची रक्कम, विक्रीसाठी झालेला खर्च वजा करून, ज्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना ती मिळण्याचा हक्क आहे असे आयुक्तास दिसून येईल, त्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना देण्यात येईल.]

**कामे, वगैरे पार पाडण्याकरिता आदेशांची अंमलबजावणी**

**४८९.** (१) जेव्हा पोट-कलम (२) मध्ये नमूद केलेल्या या अधिनियमाच्या कोणत्याही कलमाखाली, पोट-कलमाखाली किंवा खंडांखाली लेखी नोटीस देऊन, आयुक्ताने किंवा ज्या कोणत्याही महानगरपालिका अधिकाऱ्यास कलम ६८ खाली याबाबत अधिकार दिला असेल त्या अधिकाऱ्याने कोणतीही फर्मावणी केली असेल किंवा कोणताही आदेश दिला असेल तेव्हा अशा नोटीशीत अशी फर्मावणी किंवा आदेश अंमलात आणण्याची वाजवी कालावधी विहित करण्यात येईल आणि जर, या प्रमाणे विहित केलेल्या कालावधीत अशा फर्मावणीचे किंवा आदेशाचे किंवा अशा फर्मावणीच्या किंवा आदेशाच्या कोणत्याही भागाचे अनुपालन करण्यात आले नाही तर, आयुक्तास याप्रमाणे केलेली फर्मावणी किंवा दिलेला आदेश रीतसर परिणामक करण्याकरिता त्यांच्या मते आवश्यक असतील अशी उपाययोजना करता येईल किंवा असे काम बजावण्याची किंवा अशी गोष्ट करण्याची तजवीज करता येईल ; आणि या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे तरतूद केलेली नसल्यास त्यासाठी झालेला खर्च ज्या व्यक्तीच्या किंवा व्यक्तींच्या नावे अशी फर्मावणी केली असेल किंवा आदेश दिला असेल ती व्यक्ती किंवा त्या व्यक्तींपैकी कोणतीही एक व्यक्ती देईल. जी कामे पार पाडण्याविषयी कोणत्याही व्यक्तीस फर्माविले असेल ती कामे विवक्षित प्रकरणी अशा व्यक्तीच्या परिव्ययाने आयुक्तास पार पाडता येतील.

[2][ (२) पोट-कलम (१) मध्ये निर्दिष्ट केलेली या अधिनियमाची कलमे, पोट-कलमे व खंड पुढीलप्रमाणे आहेत :—

कलम २३०, पोट-कलम (५).

कलम २३१.

कलम २३२.

कलम २३३, खंड (ब).

कलम २३३अ, पोट-कलम (ब).

कलम २४३, पोट-कलम (२).

कलम २४८, पोट-कलम (१).

---

[1] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम ३१ अन्वये हे शीर्षक व कलम ४८८अ समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९०५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ५९ अन्वये मूळ पोट-कलमाऐवजी कलम ४८९ चे पोट-कलम (२) दाखल करण्यात आले.

कलम २४९अ.
कलम २५७.
कलम २७१, पोट-कलम (२).
[१][ कलम २७२, पोट-कलम (५).
कलम २७४, पोट-कलमे (१) व (४-अ).
कलम २७४अ, पोट-कलमे (१) व (२).]
कलम २७८.
कलम ३०५.
कलम ३०८, पोट-कलम (२).
कलम ३०९, पोट-कलम (१).
कलम ३११.
कलम ३१५
कलम ३२५.
कलम ३२६, पोट-कलम (३).
[२][ कलम ३२७, पोट-कलम (१), खंड (ड).]
[३][ कलम ३२८, पोट-कलम (३).]
[४][ कलम ३२८अ, पोट-कलम (३).]
कलम ३२९, पोट-कलम (१).
कलम ३३४, पोट-कलम (१).
कलम ३३८, पोट-कलम (२).
कलम ३४९, पोट-कलम (२).
कलम ३५२.
कलम ३५३.
कलम ३५४.
[४][ कलम ३६३ , पोट-कलमे (१), (२), (३) व (४).]
कलम ३७५.
[५][ कलम ३७५अ.]
कलम ३७६.
कलम ३७७.
[५][ कलम ३७७अ.]
कलम ३८०.
कलम ३८१.
[१][ कलम ३८१अ, पोट-कलम (२).]
कलम ३८२.
कलम ३८३, पोट-कलम (१).

---

[१] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ४३ अन्वये या नोंदी समाविष्ट करण्यात आल्या.
[२] सन १९११ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम २० अन्वये ही नोंद समाविष्ट करण्यात आली.
[३] सन १९२१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम १३ अन्वये ही नोंद समाविष्ट करण्यात आली.
[४] सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १, कलम २८ (१) अन्वये मूळ नोंदीऐवजी ही नोंद दाखल करण्यात आली.
[५] वरील अधिनियमाच्या कलम २८ (२) अन्वये या नोंदी जादा दाखल करण्यात आल्या.

कलम ३९२, पोट-कलम (१).

कलम ४०५.

[१][ कलम ४२५, पोट-कलम (१).]

(३) आयुक्तास, या कलमाखाली, कोणताही उपाय करता येईल, कोणतेही काम पार पाडता येईल किंवा कोणतीही गोष्ट करण्याची तजवीज करता येईल—मग ती फर्मावणी किंवा तो आदेश पाळण्यात ज्या व्यक्तीने कसूर केली असेल ती व्यक्ती शिक्षेस पात्र असो वा नसो, किंवा अशी कसूर केल्याबद्दल तिच्याविरुद्ध खटला भरलेला असो वा नसो किंवा तिला कोणतीही शिक्षा देण्यात आलेली असो वा नसो.

आयुक्ताला कलमे ३१४, ३१५, ३५४ व ३८० यांखाली (सामान वगैरे) काढून नेण्याबाबत आलेल्या खर्चाची वसुली.

**४९०.** (१) कलम ३१४ [२][ किंवा कलम ३२२, पोट-कलम (३)] खाली (सामान वगैरे) काढून नेण्याबाबत आयुक्तास आलेला खर्च अथवा कलम ३१५, पोट-कलम (१) किंवा [३][ कलम ३५४अ चे, पोट-कलम (२) किंवा (३)] किंवा कलम ३८० खाली दिलेल्या लेखी नोटिशीचे अनुपालन करण्यात आले नसेल अशा प्रसंगी कलम ४८९ खाली आयुक्तास आलेला खर्च, काढून नेलेल्या सामानाची विक्री करून वसूल करण्यात येईल आणि अशी विक्री करून जे उत्पन्न येईल ते पुरेसे नसल्यास, बाकीची रक्कम उक्त सामानाचा मालक देईल.

(२) परंतु, सामान वगैरे काढून नेण्याबाबत झालेला खर्च हा, जर कोणत्याही प्रकरणी, अशा सामानाची विक्री करण्यापूर्वी देण्यात आला तर, त्या सामानाची विक्री करण्यात येण्यापूर्वी किंवा इतर रीतीने त्याची विल्हेवाट करण्यात येण्यापूर्वी कोणत्याही वेळी त्या सामानाच्या मालकाने त्याबाबत हक्कमागणी केल्यावर आणि आयुक्तास त्या बाबतीत कोणताही इतर खर्च आला असल्यास किंवा त्याची विक्री करण्याचा किंवा त्याची विल्हेवाट करण्याचा जो इरादा असेल त्या बाबतीत कोणताही इतर खर्च आला असल्यास, तो सर्व खर्च मालकाने दिल्यावर, आयुक्त ते सामान मालकास परत देईल.

(३) जर सामानाच्या मालकाने त्याची हक्कमागणी केली नसेल तर, [४][ सामान नाशिवंत असल्यास,] आयुक्तास योग्य वाटेल त्याप्रमाणे त्याची विक्री किंवा इतर रीतीने विल्हेवाट ताबडतोब करण्यात येईल, [४][ आणि ते नाशिवंत नसेल तर ] त्याची विक्री व विल्हेवाट, ते काढून नेल्याच्या तारखेपासून एक महिन्यानंतर सोईस्करपणे शक्य तितक्या लवकर करण्यात येईल—मग ते काढून नेण्याबाबत झालेला खर्च दरम्यानच्या काळात देण्यात आलेला असो वा नसो—आणि सामानाची विक्री करून किंवा इतर रीतीने त्याची विल्हेवाट करून जे कोणतेही उत्पन्न येईल त्यातून अशी विक्री करण्यासाठी किंवा इतर रीतीने अशी विल्हेवाट करण्यासाठी आणि आवश्यक असल्यास ते काढून नेण्यासाठी झालेला परिव्यय वजा करून जी रक्कम राहील ती महानगरपालिका निधीच्या खाती जमा करण्यात येईल व ती महानगरपालिकेची मालमत्ता होईल.

---

[१] सन १९१३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम ११ अन्वये ही नोंद समाविष्ट करण्यात आली.

[२] वरील अधिनियमाच्या कलम १२ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २४०(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[४] सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम १९ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[१][ (४) या अधिनियमात काहीही अंतर्भूत असले तरी, कलम ३१४ खाली कोणतेही सामान काढून नेण्यात येईल तेव्हा, त्या सामानाच्या मालकाने, असे सामान काढून नेण्यासाठी आलेल्या खर्चाच्या भरीला, आयुक्त विनिर्दिष्ट करील त्याप्रमाणे [२][ एक हजार रुपयांपेक्षा ] अधिक नसेल अशी रक्कम शास्ती म्हणून द्यावी, असा निदेश देऊ शकेल व अशी रक्कम देण्यात आली नाही तर, ती, असे सामान काढून नेण्यासंबंधात आलेला खर्च ज्या रीतीने वसूल करता येतो त्याच रीतीने वसुलीयोग्य असेल. ]

## आयुक्ताने [३][ व महाव्यवस्थापकाने ] करावयाची खर्चाची वसुली

या अधिनियमाखाली वसुलीयोग्य असलेला खर्च मागणीवरून देय असणे; आणि मागणीवरून तो न दिल्यास तो मालमत्ता कराच्या थकबाकी प्रमाणे वसूल करता येणे.

**४९१.** (१) जेव्हा जेव्हा हा अधिनियम किंवा या अधिनियमाखाली केलेला कोणताही विनियम किंवा उपविधी याखाली आयुक्तांच्या [४][ किंवा महाव्यवस्थापकाच्या ] किंवा कलम ६८ [५][* * * * ] खाली याबाबत अधिकार प्रदान केलेल्या कोणत्याही महानगरपालिका अधिकाऱ्यांच्या आदेशान्वये किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही कामाच्या किंवा केलेल्या कोणत्याही उपाययोजनेच्या किंवा केलेल्या कोणत्याही गोष्टीच्या संबंधात झालेला खर्च कोणत्याही व्यक्तीने द्यावयाचा असेल तेव्हा तो मागणीवरून देण्यात येईल.

(२) उक्त खर्च मागणीवरून देण्यात आला नाही, तर आयुक्ताने [६][ किंवा महाव्यवस्थापकाने ], कलम ५०३, पोट-कलम (२) याच्या तरतुदींच्या अधीनतेने कसूरदाराचा माल व चीजवस्तू अटकावून व विकून, अशा खर्चाची रक्कम जणू ती उक्त कसूरदाराने देणे असलेली मालमत्ता कराची रक्कम असावी, त्याप्रमाणे वसूल करण्याजोगा असेल.

कसूरदार हा, ज्या परिवास्तूच्या संबंधात खर्च देणे असेल त्या परिवास्तूचा मालक असेल तर,भोगवटादार-देखील तो खर्च देण्यास दायी असणे.

**४९२.** (१) जर उक्त खर्च हा, एखाद्या इमारतीवर किंवा जमिनीवर किंवा तिच्या संबंधाने केलेल्या एखाद्या कामाच्या किंवा गोष्टीच्या बाबतीत येणे असेल किंवा तो एखाद्या इमारतीच्या किंवा जमिनीच्या संबंधाने केलेल्या एखाद्या उपाययोजनेच्या बाबतीत येणे असेल [७][ किंवा तो एखाद्या कामाच्या किंवा गोष्टीच्या बाबतीत किंवा कलम ३७७, पोट-कलम (१-अ) खाली केलेली कोणतीही फर्मावणी किंवा दिलेला कोणताही आदेश परिणामक करण्याकरिता केलेल्या उपायाच्या बाबतीत येणे असेल ] आणि कसूरदार अशा इमारतीचा किंवा जमिनीचा [८][ किंवा यथास्थिति, कलम ३७७,

---

[१] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१, कलम १९ अन्वये पोट-कलम (४) जादा दाखल करण्यात आले.

[२] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २४० (ब) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ५० (एक) अन्वये हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या वरील कलमान्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २४०(ब) अन्वये " किंवा ६८ब " हा मजकूर वगळण्यात आला.

[६] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ५० (एक) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[७] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ४४ (१) (अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[८] वरील अधिनियमाच्या कलम ४४ (१) (ब) अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

पोट-कलम (१-अ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या परिवास्तूचा ] मालक असेल, तर उक्त खर्चाची रक्कम देण्यात येण्यापूर्वी कोणत्याही वेळी जी कोणतीही व्यक्ती अशा [१][ इमारतीचा, जमिनीचा किंवा परिवास्तूचा ] भोगवटा उक्त मालकाच्या विद्यमाने करीत असेल त्या व्यक्तीकडून अशी रक्कम मागता येईल ; आणि अशा व्यक्तीने अशी रक्कम देण्यात कसूर केल्यास ती, उक्त व्यक्तीचा माल व चीजवस्तू अटकावून व विकून, जणू ती तिने देणे असलेली मालमत्ता कराची रक्कम असावी त्याप्रमाणे वसूल करता येईल :

(२) परंतु,—

(अ) उक्त [१][ इमारतीच्या, जमिनीच्या किंवा परिवास्तूच्या ] संबंधाने उक्त व्यक्तीने देय असलेली भाड्याची रक्कम आणि ती ज्या व्यक्तीस देय असेल त्या व्यक्तीचे नाव व पत्ता याविषयी खरी माहिती देण्यास आयुक्ताने [२][ किंवा महाव्यवस्थापकाने ] विनंती केली असता उक्त व्यक्तीने अशी माहिती देण्याची हयगय केली नाही किंवा ती देण्याचे नाकारले नाही, तर उक्त व्यक्ती मागणीच्या वेळेपर्यंत उक्त [१][ इमारतीच्या, जमिनीच्या किंवा परिवास्तूच्या ] भाड्याबद्दल मालकास जी रक्कम देण्यास दायी असेल त्यापेक्षा कोणतीही अधिक रक्कम उक्त खर्चाबद्दल देण्यास ती दायी असणार नाही ; मात्र उक्त व्यक्तीकडे मागणी करण्यात आलेली रक्कम ही उक्त व्यक्तीने मालकास देय असलेल्या रकमेपेक्षा अधिक आहे असे सिद्ध करण्याची जबाबदारी उक्त व्यक्तीवर असेल ;

(ब) उक्त खर्चाबद्दल उक्त व्यक्तीने दिलेली किंवा तिने वसूल केलेली कोणतीही रक्कम मालकाच्या खाती जमा करण्याचा उक्त व्यक्तीला हक्क असेल ;

(क) पूर्वोक्तप्रमाणे असे कोणतेही काम, गोष्ट किंवा उपाययोजना करण्याचा खर्च देण्याच्या बाबतीत उक्त व्यक्ती व तिच्या भोगवट्यात असलेल्या [३][ इमारतीचा, जमिनीचा किंवा परिवास्तूचा ] मालक यांच्या दरम्यान केलेल्या कोणत्याही करारास या कलमातील कोणत्याही तरतुदीमुळे बाध येणार नाही.

आयुक्तांस [४][किंवा महाव्यवस्थापकास] खर्चाची रक्कम हप्त्यांनी स्वीकारण्यास कबूल होता येईल.

**४९३.** पूर्वोक्तप्रमाणे असा कोणताही खर्च यात यापूर्वी तरतूद केलेल्या कोणत्याही रीतीने वसूल करण्याऐवजी, आयुक्तास [५][ किंवा महाव्यवस्थापकास योग्य वाटेल तर व [६][ यथास्थिति, स्थायी समितीच्या किंवा बृहन्मुंबई वीज पुरवठा व परिवहन समितीच्या ] मान्यतेने ] येणे असलेली अशा खर्चाची संपूर्ण रक्कम त्यावरील व्याजासह ज्यायोगे वसूल होईल अशा रकमेच्या हप्त्यांनी व अशा कालांतरांनी पाच वर्षांपेक्षा अधिक नाही अशा कालावधीत देण्याबाबत जी व्यक्ती अशी

---

[१] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ४४ (१) (क) व (२) अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ५१ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ४४ (२) अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

[४] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ५२ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[५] वरील अधिनियमाच्या वरील कलमान्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १९७ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

रक्कम देण्यास दायी असेल त्या व्यक्तीकडून कबुलायत करून घेता येईल ; [१][ असे व्याज हे, दरसाल दर शेकडा नऊपेक्षा अधिक नाही असा जो दर [२][ स्थायी समिती ] वेळोवेळी निश्चित करील त्या दराने ] आकारण्यात येईल.

कोणता खर्च सुधारणा खर्च असल्याचे घोषित करता येईल.

**४९४.** जर वसूल करण्यात यावयाचा खर्च हा, कलमे २२७, खंड (क), २३०, २३१, २३३, खंड (ब), २४८, पोट-कलम (१), २५७, २७२, २७४, पोट-कलम (१), ३०५, ३५२, पोट-कलम (१), ३७६, ३८१ आणि ४०५ यांपैकी कोणत्याही कलमात नमूद केलेल्या कोणत्याही कामाच्या बाबतीत झालेला असेल तर आयुक्तास, त्यास योग्य वाटेल तर महानगरपालिकेच्या मान्यतेने, असा खर्च सुधारणा खर्च असल्याचे घोषित करता येईल ; [३][ आणि अशी घोषणा करण्यात आल्यानंतर असा खर्च हा कलम ४९५ खाली त्यावर प्रदेय असलेल्या व्याजासहित, ज्या परिवास्तूच्या संबंधाने किंवा ज्या परिवास्तूच्या लाभार्थ तो करण्यात आला त्या परिवास्तूवर भार म्हणून राहील. ]

सुधारणा खर्च कोणी द्यावयाचा.

**४९५.** (१) सुधारणा खर्च हा, [४]* * * * * * त्याची त्यावरील व्याजासह फेड होण्यास, पुरेशा अशा रकमेच्या हप्त्यांनी—अशी रक्कम कोणत्याही परिवास्तूच्या बाबतीत प्रतिवर्षी बारा रुपयांपेक्षा कमी असणार नाही—व पुरेशा अशा कालांतरानी आयुक्त, महानगरपालिकेच्या मान्यतेने प्रत्येक बाबतीत तीस वर्षांपेक्षा अधिक नसेल असा जो कालावधी ठरवील अशा कालावधीच्या आत वसूल करता येईल ; वर सांगितलेले व्याज हे दर साल दर शेकडा सहा या दराने आकारण्यात येईल.

(२) [५][असा खर्च व त्यावरील व्याज] यांचा भार ज्या परिवास्तूवर टाकण्यात आला असेल त्या परिवास्तूचा भोगवटादार उक्त हप्ते देईल किंवा असा खर्च देण्यासाठी निश्चित केलेला कालावधी संपण्यापूर्वी किंवा अशी रक्कम व पूर्वोक्तप्रमाणे तिच्यावरील व्याज यांची संपूर्ण फेड होण्यापूर्वी कोणत्याही वेळी ती परिवास्तू भोगवट्यावाचून राहिली असेल अशा प्रसंगी ती भोगवट्यावाचून राहील तोपर्यंत, उक्त परिवास्तूचा त्या त्या वेळी जो मालक असेल तो उक्त हप्ते देईल.

सुधारणा खर्चाचा प्रमाणशीर हिस्सा भाड्यातून वजा करता येईल.

**४९६.** (१) ज्या भोगवटादाराने, कोणताही सुधारणा खर्च [६][ व त्यावरील व्याज ] दिलेले असेल तो भोगवटादार, ज्या कोणत्याही परिवास्तूवर असा खर्च [६][ व त्यावरील व्याज] यांचा प्रभार ठेवण्यात आला असेल ती परिवास्तू जबर भाड्यापेक्षा कमी नाही अशा भाड्याने धारण करीत असेल, तेव्हा भोगवटाकारांस असा खर्च [६][ व पूर्वोक्तप्रमाणे त्यावरील व्याज ] याबद्दल त्याने दिलेल्या रकमेच्या तीन-चतुर्थांश इतकी रक्कम त्याने जमीन मालकास देय असलेल्या भाड्याच्या रकमेतून वळती करण्याचा हक्क असेल ; आणि जर तो अशी परिवास्तू जबर भाड्यापेक्षा कमी भाड्याने धारण करीत असेल तर, त्याला त्याने याप्रमाणे प्रदेय असलेल्या भाड्याच्या रकमेतून असा खर्च [६][ व पूर्वोक्तप्रमाणे त्यावरील व्याज] याबद्दल त्याने दिलेल्या रकमेच्या तीन-चतुर्थांश इतक्या रकमेचा जो भाग, त्याच्या भाड्याचे जबर भाड्याशी जे प्रमाण बसते त्या प्रमाणात असेल तो भाग वळता करण्याचा हक्क असेल.

(२) आणि ज्या जमीन मालकाच्या भाड्यातून याप्रमाणे वजावट करण्यात आली असेल तो स्वतःच ज्या परिवास्तूच्या संबंधात वजावट करण्यात आली असेल त्या परिवास्तूचे भाडे देण्यास दायी असेल आणि ती परिवास्तू ही, ज्या अवधीपैकी वीस वर्षांपेक्षा कमी नसेल इतका अवधी संपलेला नसेल त्या अवधीसाठी (परंतु अन्य अवधीसाठी नव्हे) धारण करीत असेल तर, त्यास त्याने याप्रमाणे प्रदेय असणाऱ्या रकमेतून असा भाग वळता करता येईल की जो भाग, त्याने प्रदेय असलेल्या भाड्याच्या रकमेचे त्यास प्रदेय असणाऱ्या भाड्याच्या रकमेशी जे प्रमाण बसते

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम ३२ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १९७ अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६ कलम ३५ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ३४ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[५] वरील अधिनियमाच्या वरील कलमान्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[६] वरील अधिनियमाच्या कलम ३५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला

त्या, प्रमाणात असेल. त्याच परिवास्तूचा त्यापुढील क्रमाक्रमाने जमीनमालक असणारा जो जमीनमालक (ज्या अवधीपैकी वीस वर्षापेक्षा कमी नसेल, इतका अवधी संपलेला नसेल, त्या अवधीसाठी परिवास्तू धारण करणारा) त्याच परिवास्तूच्या संबंधात भाडे घेत असेल व देण्यासही दायी असेल, त्यास याप्रमाणे वजावट करता येईल :

(३) परंतु, एखाद्या व्यक्तीला, तिला प्रदेय असलेल्या भाड्यातून वजा करण्यात आलेल्या संपूर्ण रकमेपेक्षा अधिक रक्कम, तिने प्रदेय असलेल्या रकमेतून वजा करण्याचा हक्क प्राप्त होतो, अशा या कलमातील कोणत्याही गोष्टीचा अन्वय लावता येणार नाही.

सुधारणा खर्चादाखल भाराचे विमोचन.

**४९७.** कोणताही सुधारणा खर्च [१][ व त्यावरील व्याज ] देण्यासाठी असलेला कालावधी संपण्यापूर्वी कोणत्या वेळी, ज्या परिवास्तूवर त्याचा प्रभार ठेवण्यात आला असेल त्या परिवास्तूच्या मालकास किंवा तिच्या भोगवटादारास, उक्त खर्च [२][ व कोणतेही व्याज येणे असेल ते व्याज, यांच्या रकमेपैकी जो भाग आधीच चुकता करण्यात किंवा वसूल करण्यात आला नसेल तो ] आयुक्ताकडे भरून अशा भाराचे विमोचन करता येईल.

कलमे ४९३ व ४९५ यांखाली येणे असलेल्या हप्त्यांची वसुली.

**४९८.** जर, कलम ४९३ किंवा ४९५ खाली प्रदेय असलेला कोणताही हप्ता, तो ज्यावेळी देणे झाला असेल त्यावेळी देण्यात आला नसेल तर, आयुक्तास [३][ किंवा महाव्यवस्थापकास ], असा हप्ता, तो ज्या व्यक्तीकडून येणे असेल त्या व्यक्तीचा माल व चीजवस्तू अटकावून व विकून, जणू तो उक्त व्यक्तीकडून येणे असलेला मालमत्ता कर असावा, त्याप्रमाणे वसूल करता येईल.

परिवास्तूच्या मालकाने आवश्यक ते काम पार पाडण्यात कसूर केल्यास तिच्या भोगवटादारास ते पार पाडता येईल व त्याचा खर्च मालकाकडून वसूल करता येईल.

[४][ **४९९.** (१) कोणत्याही इमारतीचा किंवा जमिनीचा मालक या अधिनियमाखाली किंवा या अधिनियमाखाली केलेला कोणताही विनियम अथवा उपविधी या खाली पार पाडणे आवश्यक असलेले कोणतेही काम पार पाडण्यात कसूर करील, तेव्हा तेव्हा अशा इमारतीचा किंवा जमिनीचा कोणीही भोगवटादार असल्यास, त्याला, पोट-कलम (२) मध्ये घालून दिलेल्या रीतीने असे काम पार पाडण्याचा हक्क असेल.

(२) अशा कामात हितसंबंध असणाऱ्या भोगवटादारास किंवा भोगवटादारांस असे काम पार पाडण्याकरिता आयुक्ताची मान्यता घेता येईल. आयुक्त, त्याने उक्त काम पार पाडण्यासाठी अन्य उपाययोजना केल्या नसतील तर, मान्यता देईल. मान्यता देताना आयुक्त कामाचे स्वरूप विनिर्दिष्ट करील. अशी मान्यता देण्यात आल्यावर भोगवटादार उक्त काम करण्यास हक्कदार असतील व अशा कामाकरिता करण्यात आलेला खर्च हा, सर्व प्रयोजनांकरिता मालकावर बंधनकारक असेल. तसेच भोगवटादार अशा कामाकरिता करण्यात आलेल्या खर्चाची रक्कम, मालकास त्यांनी वेळोवेळी देणे असलेल्या भाड्याच्या रकमेतून वळती करण्यास किंवा अन्यथा अशी रक्कम, त्यांच्याकडून वसूल करण्यास हक्कदार असतील :

परंतु, असे काम जेव्हा भोगवटादारांनी संयुक्तरित्या पार पाडले असेल तेव्हा प्रत्येक, भोगवटादाराने वळती करावयाच्या किंवा वसूल करावयाच्या रकमेचे प्रमाण हे, तिने तिच्या परिवास्तूच्या संबंधात देय असलेल्या भाड्याच्या रकमेचे, अशा कामाकरिता करण्यात आलेल्या खर्चाच्या एकूण रकमेशी जे प्रमाण असेल त्याच प्रमाणाइतके असेल :

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम ३६ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या वरील कलमान्वये हे शब्द मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आले.

[३] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ५३ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[४] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६४ अन्वये मूळ कलम ४९९ ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

परंतु आणखी असे की, अशा प्रकारे वळती केलेली किंवा वसुलीयोग्य असलेली एकूण रक्कम अशा कामावर खर्च करण्यात आलेल्या रकमेपेक्षा अधिक असणार नाही.

**स्पष्टीकरण एक.—**या कलमाच्या प्रयोजनांसाठी "अशा कामाकरिता करण्यात आलेला खर्च" या शब्दप्रयोगाचा अर्थ, आयुक्ताने किंवा *मुंबई भाडे नियंत्रण आणि हॉटेल व निवासगृह दर नियंत्रण अधिनियम, १९४७ च्या प्रयोजनांसाठी राज्य शासनाने अधिसूचित केलेल्या वास्तुशास्त्रज्ञांच्या नामिकेतील वास्तुशास्त्रज्ञाने प्रमाणित केलेला एकूण परिव्यय व असे काम पूर्ण करण्यात आल्याच्या तारखेपासून, ती रक्कम वळती करण्यात आल्याच्या किंवा वसूल करण्यात आल्याच्या तारखेपर्यंतच्या कालावधीसाठी अशा रकमेवर दर साल दर शेकडा दहा टक्के दराने गणना करण्यात आलेले सरळ व्याज असा आहे. (१९४७ चा मुंबई ५७.)

**स्पष्टीकरण दोन.—**या कलमाखाली देण्यात आलेल्या मान्यतेत कामाच्या अंमलबजावणीच्या प्रयोजनासाठी इमारतीत किंवा जमिनीत प्रवेश करण्याच्या हक्काचाही अंतर्भाव असेल ].

अभिकर्ता किंवा विश्वस्त किंवा मालक याच्या दायित्वाची मर्यादा.

**५००.** जी कोणतीही व्यक्ती कलम (३), खंड (म), उपखंड (एक), (दोन) व (तीन) मध्ये वर्णन केलेल्या कोणत्याही नात्याने कोणत्याही परिवास्तूचे भाडे घेत असेल, ती व्यक्ती या अधिनियमान्वये मालकास जी गोष्ट करणे भाग असेल ती करण्यास उत्तरदायी असणार नाही. मात्र त्याबद्दल पैसे देण्यासाठी तिच्याजवळ मालकाचा किंवा मालकास येणे असलेला पुरेसा निधी असेल, तर ती गोष्ट वेगळी.

## भरपाई देणे

आयुक्त [१][किंवा महाव्यवस्थापक] नुकसानीबद्दल भरपाई देऊ शकेल.

**५०१.** या अधिनियमात अन्यथा स्पष्टपणे तरतूद केलेली नसेल अशा कोणत्याही बाबतीत, आयुक्त [२][ किंवा महाव्यवस्थापक, [३][ यथास्थिति, स्थायी समितीच्या किंवा बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीच्या ] पूर्वमान्यतेने, ] या अधिनियमान्वये आयुक्तामध्ये [२][ किंवा महाव्यवस्थापकामध्ये ] किंवा कोणत्याही महानगरपालिका अधिकाऱ्यामध्ये किंवा कर्मचाऱ्यामध्ये निहित असलेल्या कोणत्याही अधिकाराचा वापर केल्यामुळे ज्या कोणत्याही व्यक्तीस नुकसान सोसावे लागत असेल त्या व्यक्तीस भरपाई देऊ शकेल.

या अधिनियमाविरुद्ध अपराध करणाऱ्या व्यक्तींनी केलेल्या कोणत्याही नुकसानीबद्दल त्यांनी द्यावयाची भरपाई.

**५०२.** (१) जर कोणत्याही कृत्यामुळे किंवा वर्तनामुळे, कोणत्याही व्यक्तीस या अधिनियमाविरुद्ध किंवा या अधिनियमाखाली केलेला कोणताही विनियम किंवा उपविधी यांविरुद्ध एखादा अपराध केल्याच्या बाबतीत सिद्धापराध ठरविण्यात आले असेल, आणि उक्त व्यक्तीच्या या कृत्यामुळे किंवा वर्तनामुळे महानगरपालिकेच्या कोणत्याही मालमत्तेचे नुकसान झाले असेल तर, उक्त अपराधाबद्दल तिला कोणतीही शिक्षा देण्यात आली असली तरीही, उक्त व्यक्ती उक्त नुकसानीबद्दल भरपाई देईल.

(२) विवाद उत्पन्न झाल्यास, उक्त व्यक्तीने भरपाईदाखल द्यावयाची रक्कम ही, उक्त अपराध केल्याबद्दल ज्याच्यासमोर तिला सिद्धापराध ठरविण्यात आले असेल असा दंडाधिकारी निर्धारित करील आणि याप्रमाणे निर्धारित केलेली भरपाईची रक्कम भरण्यात न आल्यास, ती अशा दंडाधिकाऱ्याने काढलेल्या अधिपत्राद्वारे जणू काही ती देण्यास दायी असलेल्या व्यक्तींना दंडाधिकाऱ्याने ठोठावलेला दंड असावा, त्याप्रमाणे वसूल करण्यात येईल.

---

[१] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ५४ अन्वये हे शब्द जादा दाखल करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या वरील कलमान्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १९८ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

* महाराष्ट्र भाडे नियंत्रण अधिनियम, १९९९ (सन २००० चा महा. अधिनियम क्रमांक १८) पहा.

## विवादाच्या प्रकरणी खर्चाच्या किंवा भरपाईच्या रकमेची वसुली.

[१][**५०३.** (१) जेव्हा आयुक्त [२][ किंवा महाव्यवस्थापक ] हा, कलम ४९१ खाली कोणताही खर्च देण्यासंबंधी मागणी करील तेव्हा, अशा खर्चाची मागणी करण्यासंबंधीचा त्याचा हक्क किंवा अशा मागणीची रक्कम याबाबत विवाद उत्पन्न झाला असेल तर किंवा कलम ३२९, पोट-कलम (२) खाली तात्पुरत्या उपाययोजना करताना आयुक्ताने केलेल्या खर्चाच्या बाबतीत अशा तात्पुरत्या उपाययोजनांच्या आवश्यकतेसंबंधी विवाद उत्पन्न झाला असेल तर [२][ यथास्थिति ], आयुक्त [२][ किंवा महाव्यवस्थापक ] ती बाब लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाकडे निर्देशित करील.

कलम ४९१ खाली येणाऱ्या प्रकरणांच्या बाबतीत लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाने विवादांचा निर्णय करणे.

(२) मुख्य न्यायाधीश निर्णय देईपर्यंत, [२][ यथास्थिति ], आयुक्त [२][ किंवा महाव्यवस्थापक ] त्याने हक्कमागणी केलेल्या रकमेच्या वसुलीसंबंधीच्या पुढील कार्यवाह्या आस्थगित करील आणि निर्णय देण्यात आल्यानंतर त्याअन्वये जेवढी रक्कम देणे म्हणून विनिश्चित करण्यात येईल तेवढीच रक्कम, जर अशी कोणतीही रक्कम असेल तर, वसूल करण्यास सुरुवात करील.

[३][ (३) विवादग्रस्त रक्कम विचारात घेऊन, त्या व्यक्तीला किंवा व्यक्तींना त्या वादग्रस्त रकमेच्या निम्मी रक्कम न्यायालयात जमा करण्याचा निदेश देण्यात यावा असा अर्ज आयुक्ताला किंवा महाव्यवस्थापकाला मुख्य न्यायाधीशांकडे करता येईल ; आणि लागोलाग मुख्य न्यायाधीश त्या अर्जावर, व्यवहार्य असेल तेथवर, पंधरा दिवसांच्या आत निर्णय देईल.

(४) ज्या बाबतीत मुख्य न्यायाधीश, संबंधित व्यक्तीचे किंवा व्यक्तींचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर, विवादग्रस्त रकमेच्या निम्मी रक्कम किंवा त्यास योग्य वाटेल एवढा त्या रकमेचा वाजवी भाग विनिर्दिष्ट तारखेपर्यंत जमा करण्याचा निर्देश देईल त्या बाबतीत, आयुक्त किंवा महाव्यवस्थापक, ती रक्कम काढून घेण्यास सक्षम असतील. ]

[१][**५०४.** कलम ४९१ खाली न येणाऱ्या कोणत्याही प्रकरणी, या अधिनियमान्वये किंवा या अधिनियमाखाली केलेला कोणताही विनियम किंवा उपविधी याअन्वये, कोणत्याही व्यक्तीने खर्चाबद्दल किंवा भरपाईबद्दल कोणतीही रक्कम देणे भाग असेल तर, याप्रमाणे द्यावयाची रक्कम आणि आवश्यक असेल तर, तिची संविभागणी ही कलमे ५०२ आणि ५१५ यांत अन्यथा तरतूद करण्यात आली असेल ते खेरीज करून एरव्ही विवादाच्या बाबतीत, लघुवाद न्यायालयाचा मुख्य न्यायाधीश अशा खर्चाची किंवा भरपाईची रक्कम ज्या तारखेस प्रथम हक्कमागणी करण्याजोगी झाली असेल त्या तारखेपासून एक वर्षाच्या आत कोणत्याही वेळी या प्रयोजनाकरिता त्याच्याकडे अर्ज करण्यात आल्यावरून निर्धारित करील.]

विवादाच्या सर्व प्रकरणी खर्चाची किंवा भरपाईची रक्कम लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाने निर्धारित करणे.

---

[१] कलम ५०३ किंवा कलम ५०४ खालील निर्णयावर उच्च न्यायालयाकडे अपील करण्यासाठी सन १८८८ चा अधिनियम क्रमांक १२, कलम ३ पहा. अशा अपिलांसाठी असलेल्या मुदत मर्यादेसाठी त्याच अधिनियमाचे कलम ५ पहा.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ५५ अन्वये हा शब्द/हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९८९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २१, कलम ६५ अन्वये पोट-कलमे (३) व (४) जादा दाखल करण्यात आली.

लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशाने निवाड्याने देवविलेल्या खर्चाची किंवा भरपाईची रक्कम ही आवश्यक असेल तर, जणू काही ती न्यायालयाच्या हुकूमनाम्या-खाली येणे असलेली रक्कम असावी त्याप्रमाणे वसूल करणे.

**५०५.** जर, निकटपूर्वीच्या कलमानुसार विनिश्चित केलेली खर्चाची किंवा भरपाईची कोणतीही रक्कम, मागणी केल्यानंतर ती भरण्यास दायी असलेल्या व्यक्तीने भरली नाही तर, ती जणू काही लघुवाद न्यायालयाच्या हुकूमनाम्याखाली येणे असलेली रक्कम असावी, त्याप्रमाणे वसूल करण्यात येईल.

खर्च किंवा भरपाई देण्यास दायी असलेल्या व्यक्तींवर त्याच्या वसूलीसाठी दावा लावता येईल.

**५०६.** कोणत्याही खर्चाबद्दल किंवा भरपाईबद्दल द्यावयाची जी रक्कम यात यापूर्वी तरतूद केल्याप्रमाणे विनिश्चित केलेली असेल ती वसूल करण्याकरिता पूर्वोक्तप्रमाणे कोणत्याही रीतीने कार्यवाही चालवण्याऐवजी अथवा अशा कार्यवाह्या अयशस्वी रीतीने किंवा, अंशतः यशस्वी रीतीने चालवल्यानंतर, यथास्थिति, येणे असलेली रक्कम किंवा येणे असलेल्या रकमेची बाकी ही, ती देण्यास दायी असलेल्या व्यक्तीवर सक्षम अधिकारिता असलेल्या कोणत्याही न्यायालयात दावा लावून वसूल करता येईल.

## लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशापुढील कार्यवाह्या

इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकास या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदींच्या अनुपालनाच्या कामी तिचा जो भोगवटादार प्रतिबंध करील, त्या भोगवाटादारा-विरुद्ध अशा मालकास करता येईल असा इलाज.

**५०७.** (१) जर कोणत्याही इमारतीच्या किंवा जमिनीच्या मालकास, या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचे किंवा या अधिनियमाखाली केलेल्या कोणताही विनियमाचे किंवा उपविधीचे अनुपालन करण्यास किंवा अशा इमारतीच्या किंवा जमिनीच्या संबंधाने हा अधिनियम किंवा कोणताही असा विनियम किंवा उपविधी याखाली दिलेल्या कोणत्याही फर्मावणीचे अनुपालन करण्यास अशा इमारतीच्या किंवा जमिनीच्या भोगवटादाराने प्रतिबंध केला तर, मालकास लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशाकडे अर्ज करता येईल.

(२) उक्त मुख्य न्यायाधीशास, असा कोणताही अर्ज मिळाल्यावर, व अशा आदेशाद्वारे अशा इमारतीच्या किंवा जमिनीच्या भोगवटादारास, त्याने उक्त तरतुदीचे किंवा फर्मावणीचे अनुपालन करण्यासाठी मालकास सर्व वाजवी सोयी देण्यास फर्मावणारा लेखी आदेश काढता येईल, तसेच त्याला योग्य वाटल्यास तो अशा अर्जासाठी व आदेशासाठी झालेला परिव्यय भोगवटादाराने द्यावा असा निदेश देऊ शकेल.

(३) अशा कोणत्याही आदेशाच्या तारखेपासून आठ दिवसानंतर, उक्त आदेशात विहित करण्यात येईल त्याप्रमाणे, भोगवटादाराने पूर्वी सांगितलेल्या प्रयोजनासाठी मालकास सर्व वाजवी सवलती उपलब्ध करून देणे त्याचे अवश्य कर्तव्य असेल ; आणि तो तसे करण्यास सतत नकार देईल त्या प्रसंगी, अशा नकार देण्याचे चालू राहील त्या कालावधीत, उक्त तरतुदीचे किंवा बजावणीचे अनुपालन करण्यात त्याने कसूर केल्यामुळे अशा मालकास इतर रीतीने जे कोणतेही दायित्व प्राप्त होईल त्यातून त्याची मुक्तता करण्यात येईल.

**५०८.** (१) या अधिनियमाखाली कोणतीही चौकशी करण्याच्या किंवा कोणतीही कार्यवाही चालवण्याच्या प्रयोजनाकरिता, लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशास इलाखा लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८२ अन्वये लघुवाद न्यायालयाच्या प्रकरणाच्या बाबतीत ज्या साधनांची व ज्या रीतीची तरतूद करण्यात आली असेल त्याच साधनांनी व शक्यतो त्याच रीतीने साक्षीदारांना समन्स पाठविता येईल व हजर राहण्यास भाग पाडता येईल. त्यास साक्ष देण्यास व दस्तऐवज हजर करण्यास सक्ती करता येईल आणि मुख्य उक्त न्यायाधीश अशा कोणत्याही चौकशीशी किंवा कार्यवाहीशी संबंध असलेल्या सर्व बाबतीत उक्त अधिनियमाच्या तरतुदी जेथवर लागू असतील तेथवर त्यांचे सर्वसाधारणपणे अनुसरण करील.

१८८२ चा १५.

साक्षीदारांना समन्स पाठविण्याचा व दस्तऐवज हजर करण्यास सक्ती करण्याचा अधिकार.

(२) जर कोणत्याही अशा चौकशीच्या किंवा कार्यवाहीच्या वेळी, ज्या व्यक्तीविरूद्ध तक्रार किंवा अर्ज करण्यात आला असेल त्या व्यक्तीने हजर राहण्यासाठी तिला रीतसर समन्स पाठवूनही हजर राहण्यात कसूर केली तर, उक्त मुख्य न्यायाधिशास अशा व्यक्तीच्या गैरहजेरीत प्रकरणाची सुनावणी करून त्यासंबंधी निर्णय देता येईल.

(३) अशा प्रत्येक चौकशीचा किंवा कार्यवाहीचा उक्त मुख्य न्यायाधिशाने निर्धारित केलेला परिव्यय, उक्त मुख्य न्यायाधीश निदेश देईल अशा पक्षांनी व निदेश देईल अशा प्रमाणात प्रदेय असेल; आणि आवश्यक असल्यास अशा परिव्ययाची रक्कम जणू काही लघुवाद न्यायालयाने दिलेल्या हुकूमनाम्याखाली येणे असलेली रक्कम असावी त्याप्रमाणे वसूल करण्यात येईल :

[१][परंतु, कलम ४९४ खाली जो खर्च सुधारणा खर्च असल्याचे घोषित केले असेल त्या खर्चासंबंधी निर्माण झालेल्या विवादासंबंधाने अशी चौकशी किंवा कार्यवाही असेल तर, ज्या परिवास्तूच्या संबंधात किंवा ज्या परिवास्तूच्या लाभासाठी सुधारणा खर्च करण्यात आला असेल त्या परिवास्तूच्या मालकाने किंवा तिच्या भोगवटादाराने जो परिव्यय देण्याविषयी उक्त मुख्य न्यायाधीशाने त्यास आदेश दिला असेल त्या परिव्ययाची रक्कम अशा परिवास्तूवर प्रभार म्हणून राहील व तसेच, ती कलम ४९५ मध्ये विहित केलेल्या रीतीने वसूल करता येईल.]

**५०९.** (१) [२][[३][राज्य] शासनास,] वेळोवेळी [४][**शासकीय राजपत्रातील**] अधिसूचनेद्वारे—

लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधिशा-पुढील कार्यवाह्यांच्या बाबतीत द्यावयाची फी.

(अ) या अधिनियमाखाली लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाकडे करण्यात आलेल्या अर्जाच्या किंवा अपिलांच्या किंवा निर्देशित करण्यात आलेल्या कोणत्याही प्रकरणाच्या बाबतीत;आणि

(ब) या अधिनियमाखाली उक्त मुख्य न्यायाधीशाने चालवलेल्या कोणत्याही चौकशीत किंवा कार्यवाहीत कोणतीही समन्से किंवा इतर आदेशिका काढण्यापूर्वी जी कोणतीही फी दिली पाहिजे, ती फी विहित करता येईल :

परंतु, दाव्याच्या किंवा विषयाच्या मूल्याचा पैशाच्या रूपात अंदाज करता येत असेल अशा बाबतीत खंड (अ) खाली जी कोणतीही फी विहित करण्यात आली असेल ती, दाव्याचे किंवा विषयाचे मूल्य त्याच रकमेइतके असेल अशा बाबतीत इलाखा लघुवाद न्यायालय अधिनियम, १८८२ च्या तरतुदीखाली जी फी त्या त्या वेळी बसवण्यात आली असेल त्यापेक्षा अधिक असणार नाही.

१८८२ चा १५.

---

[१] सन १९३५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३२, कलम १५ अन्वये हे परंतुक जादा दाखल करण्यात आले.

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये "गव्हर्नर इन कौन्सिल" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] वरील आदेशान्वये मुंबई **राजपत्रातील** या शब्दाऐवजी **शासकीय राजपत्रातील** हे शब्द दाखल करण्यात आले.

(२) खंड (अ) खाली विहित केलेली कोणतीही फी कोणत्या व्यक्तीने द्यावयाची हे तशाच अधिसूचनेअन्वये [1][[2][राज्य] शासनास] वेळोवेळी निर्धारित करता येईल.

(३) खंड (अ) खालील कोणताही अर्ज, अपील किंवा निर्देशित करावयाचे प्रकरण यासाठी विहित करण्यात आलेली कोणतीही फी देण्यात येईपर्यंत उक्त मुख्य न्यायाधीशाला असा अर्ज, अपील किंवा प्रकरण स्वीकारता येणार नाही.

फी देण्याच्या बाबतीत गरीब व्यक्तींना माफी.

**५१०.** लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशास, जेव्हा जेव्हा त्यास वाटेल तेव्हा तेव्हा कलम ५०९ खाली विहित केलेली फी न देता किंवा अशा फीचा काही भाग देऊन, गरीब व्यक्तीने किंवा तिच्या वतीने केलेला अर्ज किंवा अपील किंवा निर्देशित केलेले प्रकरण स्वीकारता येईल आणि कोणत्याही अशा व्यक्तीच्या वतीने आदेशिका काढता येईल.

सुनावणीपूर्वी तडजोड झाली असता निम्मी फी परत देणे.

**५११.** जेव्हा जेव्हा या अधिनियमाखाली लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशाकडे केलेल्या कोणत्याही अर्जाची, अपिलाची किंवा निर्देशित केलेल्या कोणत्याही प्रकरणाची तडजोड, सुनावणी होण्यापूर्वी पक्षकारांत झालेल्या सहमतीने होईल, तेव्हा तेव्हा उक्त मुख्य न्यायाधीश त्या वेळेपर्यंत देण्यात आलेल्या, सर्व फीची निम्मी रक्कम ज्या ज्या पक्षकारांनी ती दिली असेल त्या त्या पक्षकारांना परत देईल.

विवक्षित अधिकार प्रत्यायोजित करण्याचा आणि नियम करण्याचा लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशास प्राधिकार.

**५१२.** लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशास—

(अ) या अधिनियमाखालील अर्ज, अपिले आणि निर्देशित केलेली कोणतीही प्रकरणे स्वीकारण्यासाठी आणि असे अर्ज, अपिले आणि निर्देशित केलेली प्रकरणे यासंबंधी, त्यांची सुनावणी करणे आणि त्यांवर अभिनिर्णय देणे खेरीजकरून इतर कर्तव्ये बजावण्याचा अधिकार उक्त न्यायालयाच्या इतर कोणत्याही न्यायाधीशांकडे सर्वसाधारणतः किंवा विशेषतः प्रत्यायोजित करता येईल.

(ब) कोणत्याही कारणाकरिता उक्त कलमात विहित केलेल्या मर्यादित कालावधीत त्याच्याकडे कलम २० खाली करण्यात आलेला कोणताही अर्ज निकालात काढण्याकरिता असे करणे आवश्यक असेल तर, उक्त न्यायालयाच्या कोणत्याही इतर न्यायाधीशाकडे उक्त अर्जाची सुनावणी करण्याचा आणि त्यावर अभिनिर्णय देण्याचा अधिकार प्रत्यायोजित करता येईल.

(क) वेळोवेळी [1][[2][राज्य] शासनाच्या] मान्यतेने या अधिनयमाशी विसंगत नसतील असे, आणि ज्याबाबतीत विनिर्देशपूर्वक तरतूद करण्यात आलेली नसून व जी बाब या अधिनियमान्वये त्याच्याकडे सोपविण्यात आलेल्या अधिकारितेच्या वापराशी संबंधित असेल, अशा कोणत्याही बाबीकरिता तरतूद करण्यासंबंधी नियम करता येतील.

## दंडाधिकाऱ्यांपुढील कार्यवाह्या

अपराधाची दखल घेणे.

**५१३.** या अधिनियमाविरुद्ध किंवा या अधिनियमाखाली केलेला कोणताही विनियम किंवा उपविधी याविरुद्ध केलेल्या सर्व अपराधांची दखल–मग असे अपराध शहरात घडलेले असोत किंवा शहराबाहेर घडलेले असोत—इलाखा शहर दंडाधिकाऱ्यास घेता येईल; आणि असा कोणताही दंडाधिकारी हा, कोणताही महानगरपालिका कर देण्यास तो दायी आहे किंवा महानगरपालिका निधीपासून त्यास

[1] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " गव्हर्नर इन कौन्सिल " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[2] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[1][1[राज्य] शासनास] मान्येतेन



लाभ होतो याच केवळ कारणामुळे अशा कोणत्याही अपराधाची किंवा याद्वारे निरसित करण्यात आलेल्या कोणत्याही अधिनियमाविरुद्ध केलेल्या अपराधाची दखल घेण्यास सक्षम आहे असे मानले जाणार नाही. [1][* * * * *]

[2][**५१३अ.** (१) हा अधिनियम किंवा त्याखाली केलेला कोणताही विनियम किंवा उपविधी याविरुद्ध केलेल्या अपराधांची संपरीक्षा करण्यासाठी [3][4[राज्य] शासनास] महानगरपालिकेच्या संमतीने, इलाखा शहर दंडाधिकाऱ्यांची एक किंवा अधिक पदे निर्माण करता येतील ; आणि अशा पदावर कोणत्याही व्यक्तीची नेमणूक करता येईल, तसेच, त्यास अशा कोणत्याही दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयाकरिता त्यास आवश्यक वाटतील असे प्रशासी अधिकारी नेमता येतील : इलाखा शहर दंडाधिकाऱ्यांची नेमणूक.

परंतु, या कलमाखाली एका किंवा अधिक इलाखा शहर दंडाधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आलेली असली तरीही, मुख्य इलाखा शहर दंडाधिकाऱ्यास, इलाखा शहर दंडाधिकाऱ्यांच्या न्यायालयांच्या १८९८ चा पाच. कामकाजाच्या वाटणीचे विनियमन करणाऱ्या फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८, कलम २१ खाली केलेल्या व त्या त्या वेळी अंमलात असलेल्या नियमांच्या अधीनतेने, त्याच्या मते काम सक्षम रीतीने निकालात काढण्यास ज्यायोगे जास्तीत जास्त मदत होईल अशा रीतीने इलाखा शहर दंडाधिकाऱ्यांच्या (या कलमाखाली नेमलेला दंडाधिकारी धरून) न्यायालयापुढे चालू असलेल्या अशा अपराधांच्या संपरीक्षेचे काम व इतर सर्व कामे यांची वाटणी करता येईल.

(२) अशा दंडाधिकाऱ्यांस किंवा दंडाधिकाऱ्यास आणि त्यांच्या आस्थापनांस [3][4[राज्य] शासन] वेळोवेळी निश्चित करील असे वेतन, निवृत्तिवेतन आणि रजा व इतर भत्ते देण्यात येतील.

(३) पोट-कलम (२) खाली निश्चित केलेले वेतन, निवृत्तिवेतन, रजा भत्ते व इतर भत्ते आणि इतर सर्व आनुषंगिक आकार यांच्या रकमांची महानगरपालिका राज्य शासनाला प्रतिपूर्ती करील : [5][* *]

परंतु, [3][4[राज्य] शासनास] महानगरपालिकेच्या सहमतीने असा निदेश देता येईल की, या कलमाखाली प्रदेय असलेल्या रकमांऐवजी [3][4[राज्य] शासन] याबाबत निश्चित करील अशा तारखेस, अशा निदेशाच्या तारखेच्या निकटपूर्वीच्या तीन वर्षात [3][4[राज्य] शासनाने] या कलमाखाली महानगरपालिकेकडून वसूल केलेल्या एकूण रकमांच्या सरासरीवर आधारलेली अशी जी रक्कम [3][4[राज्य] शासन] याबाबत निर्धारित करील, ती रक्कम महानगरपालिकेने राज्य शासनास प्रतिवर्षी द्यावी.]

---

[1] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[2] सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम ४ अन्वये नवीन कलम ५१३अ समाविष्ट करण्यात आले.

[3] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये "सरकार" या शब्दाऐवजी "प्रांतिक सरकार" हे शब्द दाखल करण्यात आले.

[4] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक" या शब्दाऐवजी "राज्य" हा शब्द दाखल करण्यात आला.

[5] भारतीय विधि अनुकूलन परीषद आदेशान्वये हा मजकूर वगळण्यात आला.

या अधिनियमाखाली शिक्षापात्र असलेल्या अपराधासंबंधीच्या तक्रारी ज्या मुदत मर्यादेत स्वीकारण्यात येतील ती मुदत मर्यादा.

[1][**५१४.** या अधिनियमान्वये शिक्षापात्र ठरवलेल्या कोणत्याही अपराधाबद्दल, त्याबाबत यात यापुढे विहित केलेल्या अवधीत इलाखा शहर दंडाधिकाऱ्याकडे तक्रार करण्यात आलेली असल्या-खेरीज अशा अपराधाबद्दल कोणतीही व्यक्ती शिक्षेस पात्र होणार नाही. हा विहित अवधी पुढील-प्रमाणे :—

(अ) अपराध, कलम १५५ च्या तरतुदींविरूद्ध घडलेला असेल तर, असा अपराध घडल्याच्या लगतपुढील सहा महिने ;

(ब) अपराध, कलमे [2][२२३, २२९अ, २४०, २५८,] २७२(१), [3][२७२ (५), २७४अ)] २८१, २८४, [4][२८७ब (एक), २८७ब (२)] [5] * * * किंवा ३९० यांच्या तरतुदींविरूद्ध, [6][किंवा कलम ४६१ (ब) खाली करण्यात आलेल्या कोणत्याही उपविधींविरूद्ध] घडलेला असेल तर, असा अपराध, घडल्याच्या किंवा तो उघडकीस आल्याच्या लगतपुढील तीन महिने ;

(क) अपराध या अधिनियमाच्या कोणत्याही इतर तरतुदींविरूद्ध घडलेला असेल तर, असा अपराध घडल्याच्या लगतपुढील तीन महिने.]

उपद्रवांसंबंधी तक्रार.

[7][**५१५.** (१) [8][बृहन्मबंईत] राहत असलेल्या कोणत्याही व्यक्तीस कोणताही उपद्रव होत असल्याची किंवा कलम २२४, २४४, २४५, २४६ किंवा ३६७ यांअन्वये प्रदान केलेल्या कोणत्याही अधिकाराचा वापर करताना किमान व्यवहार्य उपद्रवापेक्षा अधिक उपद्रव निर्माण झाल्याची तक्रार इलाखा शहर दंडाधिकाऱ्याकडे करता येईल.

(२) अशी कोणतीही तक्रार आल्यानंतर दंडाधिकारी, आवश्यक वाटेल अशी चौकशी केल्यानंतर त्यास योग्य वाटेल तर, पुढील गोष्टी करण्याविषयी आयुक्तास निदेश देऊ शकेल :—

(अ) या अधिनियमाची कोणतीही तरतूद अंमलात आणताना किंवा अशा उपद्रवास प्रतिबंध करण्याकरिता, त्याचे उपशमन करण्याकरिता, तो कमी करण्याकरिता, किंवा त्यासंबंधी उपाययोजना करण्याकरिता असा दंडाधिकाऱ्यास व्यवहार्य आणि वाजवी वाटतील असे उपाय योजणे ;

(ब) उक्त तक्रारीचा व तक्रारीसंबंधीचा आणि आदेशाचा व आदेशासंबंधीचा जो वाजवी परिव्यय उक्त दंडाधिकारी निर्धारित करील तो तक्रारदारास देणे व त्यामध्ये अशी तक्रार दाखल करण्यात तक्रार करणाऱ्या व्यक्तीचा जो वेळ वाया गेला असेल त्याबद्दल द्यावयाच्या भरपाईच्या रकमेचा समावेश होतो.

(३) असा प्रत्येक आदेश पाळणे, हे आयुक्ताचे अवश्यकर्तव्य असेल.

---

[1] सन १९११ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम २१ अन्वये मूळ कलमाऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[2] सन १९१८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ८, कलम २० अन्वये हे आकडे व हे अक्षर समाविष्ट करण्यात आले.

[3] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ४५ अन्वये हे आकडे, अक्षरे व कंस समाविष्ट करण्यात आले.

[4] सन १९२० चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ६ अन्वये हे आकडे व कंस निरसित करण्यात आले.

[5] वरील अधिनियमाच्या वरील कलमाअन्वये हे आकडे व कंस वगळण्यात आले.

[6] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ४५ अन्वये हे शब्द, आकडे, कंस व अक्षर समाविष्ट करण्यात आले.

[7] कलम ५१५ खालील आदेशावरून उच्च न्यायालयाकडे अपील करण्यासाठी सन १८८८ चा अधिनियम क्रमांक १२, कलम ४ पहा. अशा अपिलांसाठी असलेल्या मुदत मर्यादेसाठी त्याच अधिनियमाचे कलम ५ पहा.

[8] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ६ (१) अन्वये "शहरात" या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

(४) कलम २२४, २४४, २४५, २४६ किंवा ३६७ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या कोणत्याही अधिकाराचा वापर करून केलेल्या कोणत्याही कृत्यामुळे ज्याला नुकसान सोसावे लागले असेल किंवा ज्याच्या मालमत्तेस नुकसान पोहोचले असेल अशा कोणत्याही व्यक्तीस त्याबद्दल नुकसानभरपाई वसूल करण्याचा जो हक्क असेल त्यास या अधिनियमातील कोणत्याही गोष्टीमुळे अडथळा येणार नाही.

१८९८ चा ५. [1] [**५१५अ.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १८९८ याच्या कलम ३२ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमाखाली अपराधांची संपरीक्षा करणाऱ्या कोणत्याही दंडाधिकाऱ्याने त्या कलमात विनिर्दिष्ट केलेल्या आपल्या अधिकारांचा अतिक्रम करून या अधिनियमाखाली दंडाचा शिक्षादेश देणे किंवा कोणतीही शिक्षा देणे हे विधिसंमत असेल.]

या अधिनियमाखालील दंड व इतर शिक्षा यांसंबंधात विशेष तरतूद.

## अपराध्यास अटक करणे

**५१६.** (१) जेव्हा कोणतीही व्यक्ती एखाद्या पोलीस अधिकाऱ्याच्या मते हा अधिनियम किंवा या अधिनियमाखाली केलेला कोणताही विनियम किंवा उपविधी याविरुद्ध अपराध करील आणि अशा व्यक्तीचे नाव व पत्ता त्या अधिकाऱ्यास माहीत नसेल ; आणि अशी व्यक्ती तिचे नाव व पत्ता देण्यास सांगितले असता तसे करण्याचे नाकारील किंवा जे नाव व पत्ता खोटा आहे असे अशा अधिकाऱ्यास सकारण वाटेल असे नाव व पत्ता देईल तर, असा पोलीस अधिकारी तिला अटक करू शकेल.

या अधिनियमाविरुद्ध अपराध करणाऱ्या व्यक्तीस विवक्षित बाबतीत पोलीस अधिकारी अटक करू शकतील.

[2] [ (२) याप्रमाणे अटक करण्यात आलेल्या कोणत्याही व्यक्तीचे खरे नाव व पत्ता याविषयी खातरजमा करून घेतल्यानंतर किंवा अगदी नजिकच्या दंडाधिकाऱ्याच्या आदेशावाचून, अशा व्यक्तीस, तिला अटक केल्यापासून चोवीस तासांपेक्षा अधिक कालावधीपर्यंत अभिरक्षेत अटकावून ठेवता येणार नाही. वरील कालावधीत अटकेच्या जागेपासून अशा दंडाधिकाऱ्याच्या न्यायालयाच्या जागेपर्यंत येण्यास जितका वेळ आवश्यक असेल तो वगळण्यात येईल.]

[3] [**५१६अअअ.** कलमे ३१३, ३१३अ किंवा ३१३ब याखालील अपराध दखली व जामीनयोग्य असेल.]

कलमे ३१३, ३१३अ आणि ३१३ब याखालील अपराध दखली व जामीनयोग्य असणे.

---

[1] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम १९ अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[2] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये मूळ पोटकलमाऐवजी हे पोटकलम दाखल करण्यात आले.

[3] सन १९७५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५१, कलम २० अन्वये कलम ५१६ अअअ समाविष्ट करण्यात आले.

कलमे ३९४ व ३९४अ यांखालील अपराध दखली असतील आणि कलम ३९४, पोटकलम (१) खंड (अ) (एक) आणि कलम ३९४अ यांखालील अपराध जामीनयोग्य नसतील.

[1] [**५१६अअ.** (१) कलम ३९४ किंवा कलम ३९४अ याच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन करण्याचा अपराध दखली असेल.

(२) कलम ३९४, पोटकलम (१), खंड (अ) (१) किंवा कलम ३९४अ यांचे उल्लंघन करण्याचा अपराध जामीनयोग्य नसेल.]

कलम ४०३ (१) (ब) किंवा (क) खालील अपराध दखली असणे.

[2] [**५१६अ.** कलम ४०३, पोटकलम (१), खंड (ब) किंवा (क) खालील अपराध दखली असेल.]

कलमे ४६५अ व ४७५ब यांखालील अपराध दखलपत्र व जमानतयोग्य असणे.

[3] [**५१६ब.** कलम ४७५अ व ४७५ब यांखालील अपराध दखलपात्र व जमानतयोग्य असतील.]

### वैध कार्यवाह्या

दिवाणी व फौजदारी कार्यवाही दाखल करणे वगैरे यासंबंधी असलेल्या तरतुदी आणि विधिविषयक सल्ला घेणे.

**५१७.** (१) आयुक्तास पुढील गोष्टी करता येतील—

(अ) ज्या कोणत्याही व्यक्तीवर—

(एक) या अधिनियमाविरुद्ध कोणताही अपराध केल्याबद्दल ;

(दोन) ज्या कोणत्याही अपराधामुळे महानगरपालिकेच्या कोणत्याही मालमत्तेस किंवा हितसंबंधास किंवा या अधिनियमाचे यथोचित प्रशासन होण्यास बाध येत असेल किंवा बाध येण्याचा संभव असेल असा अपराध केल्याबद्दल ;

(तीन) कोणत्याही प्रकारचा उपद्रव केल्याबद्दल ;

आरोप ठेवण्यात आला असेल त्या व्यक्तीविरुद्ध कार्यवाही करणे किंवा ती मागे घेणे ;

(ब) या अधिनियमाविरुद्ध करण्यात आलेल्या कोणत्याही अपराधाबाबत त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कायद्याखाली कायदेशीरपणे आपसाती करता येत असेल अशा अपराधाबद्दल आपसाती करणे ;

(क) निवडणुकीसंबंधी जो कोणताही विनंती अर्ज कलम ३३ खाली सादर केला असेल त्या विनंती अर्जाच्या कामात प्रतिवाद करणे ;

(ड) कलम २१७ खाली करयोग्य मूल्य [4][किंवा यथास्थित भांडवली मूल्य] किंवा कर याविरुद्ध केलेल्या कोणत्याही अपिलाच्या कामात प्रतिवाद करणे, अपील दाखल करून घेणे किंवा त्याबाबत तडजोड करणे ;

(ई) खर्च किंवा भरपाई याबद्दल जी रक्कम महानगरपालिकेला येणे आहे असा दावा सांगण्यात आला असेल ती वसूल करण्याकरिता कलम ५०२, पोटकलम (२), ५०३, ५०४ व ५०५ यांखाली कार्यवाही करणे, ती मागे घेणे किंवा ती बाबत तडजोड करणे ;

---

[1] सन १९६२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ७ अन्वये कलम ५१६अअ समाविष्ट करण्यात आले.
[2] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४, कलम २८ अन्वये कलम ५१६अ समाविष्ट करण्यात आले.
[3] सन २०१२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २, कलम ९ अन्वये कलम ५१६ब समाविष्ट करण्यात आला.
[4] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ५३ अन्वये, हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(फ) आयुक्ताने कोणत्याही व्यक्तीबरोबर केलेल्या संविदेखाली प्रदेय असलेल्या शास्तीच्या संबंधाने अशा व्यक्तीविरुद्ध पाचशे रुपयांहून अधिक नसेल इतक्या रकमेकरिता जी कोणतीही हक्कमागणी केली असेल ती मागे घेणे किंवा तिच्याबाबत तडजोड करणे किंवा [१] [ स्थायी समितीची ] मान्यता घेऊन पाचशे रुपयांहून अधिक अशा रकमेकरिता अशी जी कोणतीही हक्कमागणी केली असेल ती मागे घेणे किंवा तिच्याबाबत तडजोड करणे ;

(ग) महानगरपालिकेविरुद्ध किंवा आयुक्ताविरुद्ध किंवा उप आयुक्ताविरुद्ध किंवा महानगरपालिकेचा अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुद्ध, त्यांनी आपल्या पदीय नात्याने, कोणतीही गोष्ट केल्याबद्दल किंवा ती करण्याचे वर्जिल्याबद्दल जो कोणताही दावा किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात आली असेल त्या दाव्याच्या किंवा कार्यवाहीच्या कामात प्रतिवाद करणे ;

(ह) [१] [ स्थायी समितीच्या ] मान्यतेने पूर्वोक्तप्रमाणे कोणतीही गोष्ट केल्याबद्दल किंवा ती करण्याचे वर्जिल्याबद्दल महानगरपालिकेविरुद्ध किंवा आयुक्ताविरुद्ध किंवा उप आयुक्ताविरुद्ध किंवा महानगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी यांच्याविरुद्ध केलेली हक्कमागणी, दावा किंवा कायदेशीर कार्यवाही दाखल करून घेणे किंवा त्याबाबत तडजोड करणे ;

(आय) तशाच मान्यतेने, कोणताही दावा दाखल करणे व चालू ठेवणे किंवा महानगरपालिकेच्या किंवा आयुक्ताच्या नावाने दाखल करण्यात आलेला कोणताही दावा किंवा खंड (फ) मध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या प्रकारच्या हक्कमागणीहून अन्य कोणतीही हक्कमागणी मागे घेणे किंवा त्याबाबत तडजोड करणे ;

(के) या कलमाच्या पूर्वगामी खंडांमध्ये उल्लेख केलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी किंवा कोणताही महानगरपालिका प्राधिकारी किंवा महानगरपालिका अधिकारी अथवा कर्मचारी याने त्याच्यामध्ये निहित केलेल्या कोणत्याही अधिकाराचा विधिसंमत वापर करण्याची किंवा त्याच्यावर लादलेले कोणतेही कर्तव्य पार पाडण्याची तरतूद करण्यासाठी जो कायदेविषयक सल्ला व सहाय्य मिळविणे त्यास, वेळोवेळी आवश्यक किंवा इष्ट वाटेल किंवा जो कायदेविषयक सल्ला व सहाय्य त्याने मिळवावे अशी महानगरपालिकेची किंवा [१] [ स्थायी समितीची ] इच्छा असेल असा कायदेविषयक सल्ला व सहाय्य मिळविणे :

(२) परंतु, आयुक्त, खंड (ग) खाली चालू असलेल्या कोणत्याही दाव्यात किंवा कायदेविषयक कार्यवाहीत तत्संबंधी सर्वप्रथम विधिविषयक सल्ला घेतल्यावाचून प्रतिवाद करणार नाही ; आणि जो कोणताही दावा दाखल केला पाहिजे व चालला पाहिजे असे महानगरपालिका निर्धारित करील तो दावा दाखल करील व चालवील.

[२] [ (३) [३] [ बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रम ] संपादन करणे, त्यात वाढ करणे, त्याचे प्रशासन करणे, तो चालवणे व सुस्थितीत ठेवणे यांमधून निर्माण झालेल्या कायदेविषयक कार्यवाह्यांच्या संबंधात (७ ऑगस्ट १९४७ पासून मुंबई वीजपुरवठा व ट्राम मार्ग कंपनी, मर्यादित यांच्याकडून केलेल्या उक्त उपक्रमाच्या संपादनातून निर्माण झालेल्या कोणत्याही कार्यवाह्या असल्यास त्या खेरीजकरून), पोटकलमे (१) व (२) मधील तरतुदी या जणू काही " आयुक्त " या शब्दाऐवजी " महाव्यवस्थापक " हा शब्द [४] [व " स्थायी समिती " या शब्दांऐवजी " मुंबई वीजपुरवठा आणि परिवहन समिती " हे शब्द अनुक्रमे दाखल केलेले असावेत त्याप्रमाणे लागू होतील. ] ]

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १९९ अन्वये ' महापौरासह परिषद ' या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ५६ अन्वये हे पोटकलम जादा दाखल करण्यात आले.

[३] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (३) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १९९ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[१] [ (४) कलम ६१, खंड (क्यू) खाली असलेले महानगरपालिकेचे अधिकार व कर्तव्ये यांतून निर्माण झालेल्या कायदेविषयक कार्यवाह्यांच्या संबंधात, पोट-कलम (१) च्या तरतुदी या , जणू काही " स्थायी समिती " या शब्दांच्या ऐवजी " शिक्षण समिती " हे शब्द दाखल केलेले असावेत त्याप्रमाणे लागू होतील. ]

प्रकरण वीस

## नियंत्रण

कोणत्याही महानगरपालिका प्राधिकाऱ्याने कर्तव्ये पार पाडण्यात कसूर केल्यास ती पार पाडण्याची तरतूद करण्याचा [२][ [३][ राज्य ] शासनाचा ] अधिकार.

**५१८.** (१) जर, [२][ [३][ राज्य ] शासनाकडे ] तक्रार करण्यात आल्यावरून आणि त्याने त्यास योग्य वाटेल अशी चौकशी केल्यानंतर कोणत्याही वेळी त्यास असे दिसून आले की, कलमे [४][६१, ६२, ६२क, ६२ड ], [५][ ६२ई ], ८९फ , १३४, २२५ [६][ ३८१, ३८१अ, ] ४३४, [७][ ४३८ आणि ५३१अ ] यांच्या तरतुदींपैकी कोणतीही तरतूद रीतसर पार पाडलेली नाही किंवा तिची रीतसर अंमलबजावणी केलेली नाही तर [२][ [३][ राज्य ] शासनास ] ज्या कालावधीच्या आत जशी तरतूद पार पाडण्यात आली पाहिजे किंवा तिची अंमलबजावणी करण्यात आली पाहिजे तो कालावधी आदेश देऊन विहित करता येईल :

(२) परंतु [२][ [३][ राज्य ] शासनाच्या ] मते निकडीची परिस्थिती उद्‌भवली असेल त्या व्यतिरिक्त एरव्ही, महानगरपालिकेवर आणि [२] [ [३] [ राज्य ] शासनास ] योग्य वाटल्यास आयुक्तावर एक लेखी नोटीस बजावून तिच्याद्वारे असा आदेश का देऊ नये याविषयी कारण दाखवण्यास फर्मावल्यानंतर अशा नोटिशीच्या तारखेपासून एक महिन्याचा अवधी संपेपर्यंत तसेच, जे कोणतेही कारण दर्शवण्यात येईल त्याचा [२][ [३][ राज्य ] शासन ] विचार करीतोपर्यंत असा कोणताही आदेश देण्यात येणार नाही.

(३) पोट-कलम (१) खाली दिलेल्या आदेशात विहित केलेल्या कालावधीत अशी तरतूद पार पाडण्यात आली नाही किंवा तिची अंमलबजावणी करण्यात आली नाही तर, [२][ [३][ राज्य ] शासनास ] ती पार पाडण्यासाठी किंवा तिची अंमलबजावणी करण्यासाठी एखाद्या व्यक्तीची नेमणूक करता येईल, आणि अशी तरतूद पार पाडण्यासाठी किंवा तिची अंमलबजावणी करण्यासाठी लागणारा खर्च व ती पार पाडणाऱ्या किंवा तिची अंमलबजावणी करणाऱ्या व्यक्तीस द्यावयाचे [२][ [३][ राज्य ] शासन ] निर्धारित करील असे वाजवी पारिश्रमिक आणि या कलमाखालील कार्यवाह्यांचा परिव्यय हा महानगरपालिका निधीतून द्यावा, असा निदेश तो देऊ शकेल.

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम १९९ अन्वये पोट-कलम (४) समाविष्ट करण्यात आले.

[२] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " गव्हर्नर इन कौन्सिल " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] विधि अनकूलन आदेश, १९५०, अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[४] सन १९०७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३, कलम २१ अन्वये हे आकडे व अक्षरे समाविष्ट करण्यात आली.

[५] सन १९२५ चा मुंबई अधिनियम क्रमांक १२, कलम ४ अन्वये " ६२ई " हे आकडे व अक्षर समाविष्ट करण्यात आले.

[६] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५, कलम ४६ अन्वये हे आकडे व अक्षर समाविष्ट करण्यात आले.

[७] सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक १०, कलम ५ अन्वये मूळ शब्द व आकडे " ४३८ आणि " याऐवजी हे आकडे, हा शब्द व अक्षर दाखल करण्यात आले.

**५१९.** (१) [१] [ [२] [ राज्य ] शासनाने ] कलम २६४ खाली विहार जलदाय व्यवस्थेचे निरीक्षण करण्याकरिता नेमलेल्या कोणत्याही व्यक्तीच्या प्रतिवृत्तावरून [१] [ [२] [ राज्य ] शासनास, ] असे दिसून आले की, उक्त जलदाय व्यवस्थेचा कोणताही भाग सुस्थितीत आणि कार्यक्षम स्थितीत नाही तर, [१] [ [२] [ राज्य ] शासनास, ] [१] [ [२] [ राज्य ] शासनाच्या ] सचिवाच्या सहीनिशी नोटीस देऊन उक्त जलदाय व्यवस्थेचा उक्त भागांश नोटिशीत विहित केलेल्या वाजवी काळात दुरुस्त करण्यात, सुधारण्यात किंवा इतर रीतीने सुस्थितीत आणण्यात आणि कार्यक्षम करण्यात यावा, असे फर्मावता येईल.

विहार जलदाय व्यवस्थेची दुरुस्ती, वगैरे करण्याचा [१] [ [२] [ राज्य ] शासनाला] अधिकार.

(२) उक्त नोटीस महानगरपालिकेस आणि आयुक्तास संबोधून लिहिण्यात येईल आणि महानगरपालिकेने आणि आयुक्ताने आपापल्या अधिकाराच्या कक्षेत, ती अंमलात आणणे हे त्यांचे अवश्य कर्तव्य असेल. जर, ती अंमलात आणली गेली नाही तर, [१] [ [२] [ राज्य ] शासनास, ] आवश्यक ते काम करण्याची तजवीज करता येईल आणि त्याचा खर्च आयुक्ताने द्यावा, असा निदेश देता येईल.

**५२०.** (१) कलम ५१८, पोट-कलम (३) किंवा कलम ५१९, पोट-कलम (२) मध्ये नमूद केलेला कोणताही आदेश देण्यात आला असेल तेव्हा, महानगरपालिका, [१] [ [२] [ राज्य ] शासनाच्या ] सचिवाने सही केलेल्या कोणत्याही मागणीपत्रात, उक्त आदेशास अनुसरून राज्य शासनाने वेळोवेळी ज्या रकमेची किंवा ज्या रकमांची मागणी केली असेल ती रक्कम किंवा त्या रकमा [१] [ [२] [ राज्य ] शासनाला ] देण्याची तजवीज करील.

कलमे ५१८ व ५१९ याखाली अंमलात आणलेल्या उपाय-योजनांचा खर्च कसा वसूल करावा.

(२) आणि कोणतेही असे मागणीपत्र सुपूर्द करण्यात आल्याच्या तारखेपासून चौदा दिवसांच्या आत अशा मागणीपत्राचे अनुपालन करण्यात आले नाही तर, [१] [ [२] [ राज्य ] शासनास, ] आपल्या सचिवांपैकी एका सचिवाने सही केलेल्या लेखी आदेशाद्वारे महानगरपालिका निधी ज्या बँकेत ठेवला असेल त्या बँकेकडून उक्त आदेशात नमूद केलेली रक्कम किंवा नमूद केलेल्या रकमा घेण्यासाठी एखाद्या व्यक्तीस प्राधिकृत करता येईल व तसे करण्याविषयी त्यास निदेश देता येईल.

(३) उक्त लेखी आदेश हजर करण्यात आल्यावर, उक्त बँक उक्त रक्कम किंवा रकमा घेण्यासाठी त्याद्वारे प्राधिकृत करण्यात आलेल्या व्यक्तीस अशी रक्कम किंवा अशा रकमा ताबडतोब देईल आणि तिने महानगरपालिका निधीतून याप्रमाणे दिलेल्या कोणत्याही रकमेबाबत किंवा रकमांबाबत महानगरपालिकेसंबंधी अशा बँकेचे जे दायित्व असेल त्या सर्व दायित्वातून उक्त लेखी आदेशाने तिची पुरेशा रीतीने मुक्तता होईल.

### [३] [ पाण्यासाठी निकडीच्या प्रसंगी करावयाच्या तरतुदी

**५२०अ.** (१) या अधिनियमात किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या इतर कोणत्याही कायद्यात काहीही अंतर्भूत असले तरी, पाण्याची तीव्र टंचाई असल्यामुळे, पिण्यासाठी व घरगुती वापरासाठी पाणीपुरवठा होत असणाऱ्या रहिवाशांना त्यांना त्यासाठी कोणत्याही महानगरपालिका जलदाय व्यवस्थेतून किंवा कोणत्याही इतर जलदाय व्यवस्थेतून उपलब्ध होणारा पाणीपुरवठा तसाच चालू रहावा किंवा त्याचे समन्याय वाटप व्हावे, याची निश्चिती करण्यासाठी तसे करणे आवश्यक किंवा इष्ट आहे असे राज्य शासनाचे मत असेल तर, त्यास **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, आणि त्यास योग्य वाटेल अशा इतर रीतीने, असा पाणीपुरवठा होत असलेल्या, आदेशात

पाण्याच्या टंचाईमुळे उद्‌भवणाऱ्या निकडीच्या प्रसंगी, महानगरपालिकेस निदेश देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

[१] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " सरकार " या शब्दाऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये " प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

[३] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम ७ अन्वये हे शीर्षक व कलम ५२०अ समाविष्ट करण्यात आले.

विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा उपक्रमांना किंवा उपक्रमांच्या वर्गाला आदेशात विनिर्दिष्ट दिवसांतील विनिर्दिष्ट करण्यात येणाऱ्या वेळी आणि कालावधीत किंवा कालावधींमध्ये अशा कोणत्याही महानगरपालिका जलदाय व्यवस्थेतून किंवा कोणत्याही इतर जलदाय व्यवस्थेतून होणाऱ्या पाणीपुरवठ्याचे विनियमन करण्याचा किंवा त्यास प्रतिबंध करण्याचा महानगरपालिकेस किंवा जलदाय व्यवस्थेचा प्रभारी असलेल्या कोणत्याही इतर व्यक्तीस निदेश देता येईल.

(२) पोट-कलम (१) अन्वये प्रदान केलेल्या अधिकारांच्या सर्वसाधारणतेला बाध न आणता, त्याखाली काढलेल्या आदेशात पुढील गोष्टींची तरतूद करता येईल :—

(अ) कोणत्याही उपक्रमाला किंवा उपक्रमाच्या कोणत्याही विभागाला आदेशात विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही दिवशी किंवा दिवसांत किंवा कोणत्याही दिवसाच्या किंवा दिवसांच्या विनिर्दिष्ट केलेल्या वेळी किंवा वेळात किंवा विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत किंवा कालावधींमध्ये पाणी घेता येणार नाही ;

(ब) देशाच्या संरक्षणाच्या कार्यामध्ये गुंतलेले उपक्रम किंवा तांत्रिक कारणांसाठी ज्यांनी काम सतत चालू ठेवले पाहिजे किंवा ज्यात खंड पाडता येत नाही अशा कामात गुंतलेले उपक्रम यांसारख्या उपक्रमांचे स्वरूप लक्षात घेऊन, आदेशाच्या तरतुदींमधून अशा उपक्रमांना किंवा त्यांच्या कोणत्याही विभागांना वगळणे ;

(क) पूर्वोक्त प्रयोजने परिणामक करण्यासाठी ज्या बाबी राज्य शासनास आवश्यक किंवा इष्ट वाटतील अशा कोणत्याही, प्रासंगिक किंवा आनुषंगिक किंवा पूरक बाबींसंबंधी तरतूद (कोणत्याही परिवास्तूत प्रवेश करण्यासंबंधीच्या व त्या परिवास्तूंचे निरीक्षण करण्यासंबंधीच्या तरतुदींसह) करणे.

**स्पष्टीकरण.**—या कलमातील " उपक्रम " म्हणजे कोणताही उद्योग, उदीम किंवा धंदा किंवा इमारती बांधकाम या स्वरूपात असलेला कोणताही उपक्रम.

(३) (अ) कोणतीही व्यक्ती या कलमाखाली काढलेल्या कोणत्याही आदेशाच्या कोणत्याही तरतुदींचे अनुपालन करण्यात कसूर करील किंवा तिचे उल्लंघन करील, तर ती अपराधाबद्दल दोषी ठरेल आणि या अधिनियमाखाली किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही इतर कायद्याखाली ती ज्या कोणत्याही इतर शास्तीस पात्र असेल तीस बाध न आणता अपराधसिद्धीनंतर, तिला सहा महिन्यांच्या अवधीपर्यंत वाढवता येईल अशी कैदेची किंवा एक हजार रुपयांहून अधिक नसेल इतक्या दंडाची शिक्षा होईल किंवा या दोन्ही शिक्षा होतील.

(ब) जेव्हा या कलमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल तेव्हा, असा अपराध घडला त्यावेळी अशा कंपनीची प्रभारी असलेली आणि त्या कंपनीचे कामकाज चालवण्यास कंपनीस जबाबदार असलेली प्रत्येक व्यक्ती आणि तसेच, ती कंपनी ही, त्या अपराधाबद्दल दोषी आहे असे मानले जाईल आणि तिच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास पात्र ठरेल आणि त्याप्रमाणे तिला शिक्षा दिली जाईल :

परंतु, जर, तो अपराध आपल्या नकळत घडला किंवा असा अपराध घडू नये म्हणून आपण सर्वप्रकारे यथायोग्य तत्परतेने वागलो होतो असे ती व्यक्ती सिद्ध करील, तर या पोट-कलमातील कोणत्याही गोष्टीमुळे अशी कोणतीही व्यक्ती कोणत्याही शिक्षेस पात्र ठरणार नाही.

(क) या पोट-कलमात काहीही अंतर्भूत असले तरी, या कलमाखालील अपराध एखाद्या कंपनीने केला असेल आणि तो अपराध कंपनीचा कोणताही संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर कोणताही अधिकारी याच्या संमतीने किंवा त्याने डोळेझाक केल्यामुळे किंवा त्याने हयगय केल्यामुळे घडला आहे, असे सिद्ध होईल तर, असा संचालक, व्यवस्थापक, सचिव किंवा इतर अधिकारीदेखील त्या अपराधाबद्दल दोषी आहे, असे मानण्यात येईल आणि त्याच्याविरुद्ध कार्यवाही केली जाण्यास व त्याप्रमाणे त्यास शिक्षा दिली जाण्यास तो पात्र होईल.

**स्पष्टीकरण.**—या पोट-कलमाच्या प्रयोजनाकरिता–

(एक) " कंपनी " म्हणजे कोणताही निगमनिकाय आणि तीत भागीदारी संस्थेचा किंवा इतर व्यक्ति अधिसंघाचा समावेश होतो ; आणि

(दोन) एखाद्या भागीदारी संस्थेच्या संबंधात " संचालक " म्हणजे त्या भागीदारी संस्थेतील भागीदार.

(४) या कलमाच्या तरतुदींनुसार सद्भावपूर्वक केलेल्या कोणत्याही कृतीबद्दल कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही दावा किंवा खटला किंवा इतर कायदेविषयक कार्यवाही दाखल करता येणार नाही ; आणि या कलमाच्या तरतुदींनुसार सद्भावपूर्वक केलेल्या कोणत्याही कृतीमुळे झालेल्या किंवा होण्याचा संभव असलेल्या कोणत्याही नुकसानीबद्दल शासन किंवा कोणतेही स्थानिक प्राधिकरण यांच्याविरुद्ध कोणताही दावा किंवा इतर कायदेविषयक कार्यवाही दाखल करता येणार नाही.]

विवक्षित प्रकरणांमध्ये महानगरपालिकेचा किंवा इतर प्राधिकरणाचा कोणताही ठराव किंवा आदेश, इत्यादी निलंबित किंवा विखंडित करण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

[१][**५२०ब.** (१) राज्य शासनाचे असे मत होईल की, महानगरपालिकेच्या किंवा इतर कोणत्याही प्राधिकरणाच्या कोणत्याही ठरावाची किंवा आदेशाची अंमलबजावणी किंवा महानगरपालिकेने किंवा अशा प्राधिकरणाने केलेली किंवा त्यांच्या वतीने करण्यात येणार असलेली किंवा करण्यात येत असलेली कोणतीही कृती ही, हा अधिनियम किंवा त्या त्या वेळी अंमलात असलेला इतर कोणताही कायदा याद्वारे किंवा याखाली प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचे उल्लंघन करून किंवा त्याचा अतिक्रम करून केलेली कृती आहे किंवा त्यामुळे लोकहिताच्या विरुद्ध [२][किंवा महानगरपालिकेच्या आर्थिक हितसंबंधाविरुद्ध किंवा व्यापक लोकहिताविरूद्ध] होईल अशा रीतीने महानगरपालिका निधीचा दुरुपयोग किंवा गैरवापर होण्याचा किंवा त्याचा अपव्यय होण्याचा संभव आहे तर, राज्य शासनास, लेखी आदेशाद्वारे त्यात विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा कालावधीपर्यंत किंवा कालवधींपर्यंत, अशा ठरावाची किंवा आदेशाची बजावणी निलंबित करता येईल किंवा अशी कोणतीही कृती करण्यास प्रतिबंध करता येईल अशा आदेशाची प्रत राज्य शासन महानगरपालिकेला आणि आयुक्ताला किंवा महाव्यवस्थापकाला तात्काळ पाठवील.

(२) पूर्वोक्त आदेशाची प्रत मिळाल्यावर, महानगरपालिकेस किंवा आयुक्तास किंवा महाव्यवस्थापकास, त्यास योग्य वाटल्यास, उक्त आदेशाविरुद्ध राज्य शासनाकडे अभिवेदन करता येईल.

(३) राज्य शासनास, महानगरपालिका किंवा आयुक्त किंवा महाव्यवस्थापक यांच्याकडून मिळालेल्या कोणत्याही अभिवेदनावर विचार केल्यानंतर, आणि तसे कोणतेही अभिवेदन तीस दिवसांच्या कालावधीच्या आत मिळाले नसेल त्या बाबतीत, पोट-कलम (१) खाली त्यांनी काढलेला आदेश, एकतर रद्द करता येईल, त्यात फेरबदल करता येईल किंवा तो कायम करता येईल किंवा त्या प्रकरणाची सर्व परिस्थिती लक्षात घेऊन, त्याच्या मते न्याय किंवा इष्ट असेल अशी त्या बाबीच्या संबंधात इतर कार्यवाही करता येईल. पोट-कलम (१) खाली काढलेला कोणताही आदेश कायम करण्यात आला असेल त्या बाबतीत, राज्य शासन असा निदेश देऊ शकेल की, पोट-कलम (१) खाली ज्याच्या संबंधात निलंबन आदेश देण्यात आला असेल असा महानगरपालिकेचा किंवा तिच्या प्राधिकरणाचा ठराव किंवा आदेश हा विखंडित करण्यात आल्याचे मानण्यात यावे.

[१] सन १९७३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४, कलम ५ अन्वये कलम ५२०ब समाविष्ट करण्यात आले.
[२] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम १५ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

(४) पोट-कलम (३) खाली राज्य शासन कोणताही आदेश काढील त्या बाबतीत अशा आदेशाचे अनुपालन करणे हे, प्रत्येक पालिका सदस्याचे व महानगरपालिकेचे आणि इतर कोणत्याही संबंधित प्राधिकरणाचे किंवा अधिकाऱ्यांचे कर्तव्य असेल.]

राज्य शासनाचा अनुदेश किंवा निदेश देण्याचा अधिकार.

[१][**५२०क.** या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, राज्य शासनास, महानगरपालिकेची कर्तव्ये आणि कार्ये यांबाबत महानगरपालिकेने अनुसरावयाच्या धोरणात्मक बाबीसंबंधात महानगरपालिकेला सर्वसाधारण अनुदेश देता येतील, आणि विशेषतः त्यास व्यापक लोकहितासाठी, किंवा केंद्र सरकारची वा राज्य शासनाची धोरणे आणि राष्ट्रीय वा राज्यस्तरीय कार्यक्रम, प्रकल्प आणि योजना यांची अंमलबजावणी करण्यासाठी, निदेश देता येतील. असे अनुदेश किंवा निदेश दिल्यावर, असे अनुदेश किंवा निदेश अंमलात आणणे हे, महानगरपालिकेचे कर्तव्य असेल :

परंतु, राज्य शासन या कलमाखालील कोणतेही अनुदेश किंवा निदेश देण्यापूर्वी, महानगरपालिकेला असे अनुदेश किंवा निदेश का देण्यात येऊ नयेत याबाबत पंधरा दिवसांच्या आत अभिवेदन सादर करण्यास कसूर केली किंवा, अभिवेदन सादर केल्यास, असे अभिवेदन विचारात घेतल्यावर, तसे अनुदेश किंवा निदेश देणे आवश्यक आहे, असे राज्य शासनाचे मत झाले असेल तर, राज्य शासन तसे निदेश देईल.]

शंका दूर करणे.

[२][**५२०कक.** शंका दूर करण्यासाठी याद्वारे घोषित करण्यात येत आहे की, मुंबई महानगरपालिका (सुधारणा) अधिनियम, १९९८ आणि मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९९८ द्वारे सुधारित अशा मुख्य अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानरपालिका [३][* * * *] कोणत्याही वेळी, मुंबई शहराला स्वतंत्र दर्जा देण्यात किंवा महाराष्ट्र राज्यातून मुंबई शहर विभक्त होण्यात त्याची परिणती किंवा परिणाम होईल असा कोणताही ठराव संमत करण्यात किंवा अशी कोणतीही कारवाई किंवा कृती करण्यास सक्षम असणार नाही. अशा रीतीने विभक्त होण्यास ज्याची परिणती होते किंवा ज्याचा असा परिणाम होतो असा मांडलेला कोणताही ठराव किंवा सुरू केलेली किंवा प्रस्तावित केलेली कोणतीही कारवाई किंवा कृती प्रारंभापासूनच बेकायदेशीर व निरर्थक होईल.]

१९९८ चा महा. १०. १९९८ चा महा. १३.

महानगरपालिका विसर्जित करण्याचा अधिकार.

[४][**५२०ड.** जर राज्य शासनाच्या मते—

(अ) महानगरपालिका, या अधिनियमाद्वारे किंवा तदन्वये किंवा त्या-त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्याद्वारे किंवा त्या अन्वये तिच्यावर सोपविण्यात आलेल्या कर्तव्याचे पालन करण्यास सक्षम नसेल ; किंवा

[१] सन २०११ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ९, कलम ३ अन्वये कलम ५२० क ऐवजी हे कलम दाखल करण्यात आले.

[२] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २३, कलम २० अन्वये हे कलम समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २०१ अन्वये हा मजकूर वगळण्यात आला.

[४] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २४६ अन्वये ही कलमे समाविष्ट करण्यात आली.

(ड) ज्यामुळे या अधिनियमाच्या तरतुदींनुसार महानगरपालिकेचे प्रशासन चालविणे शक्य नसेल ; अशी परिस्थिती निर्माण झाली असेल ; किंवा

(ई) महानगरपालिकेची वित्तीय स्थिती आणि पत अतिशय धोक्यात आलेली असेल तर, राज्य शासनास, महानगरपालिकेला तिचे म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यावर **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे, त्यामध्ये महानगरपालिका विसर्जित करण्याची कारणे नमूद करून ती महानगरपालिका विसर्जित करता येईल.

**५२०ई.** कलम ५२०ड अन्वये महानगरपालिका विसर्जित करण्यात आली असेल त्या बाबतीत, पुढील परिणाम होतील :— विसर्जनाचे परिणाम.

(अ) विसर्जनाच्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट करण्यात आलेल्या दिनांकापासून महानगरपालिकेचे सर्व पालिका सदस्य आपली पदे रिक्त करतील ;

(ब) या अधिनियमान्वये किंवा त्या-त्या वेळी अंमलात असलेल्या कोणत्याही अन्य कायद्यान्वये महानगरपालिका, [1][* * *] महापौर आणि विविध समित्या आणि पालिका सदस्य यांच्याकडे निहित असलेले किंवा त्यांनी वापरण्याजोगे सर्व अधिकार आणि पार पाडण्याजोगी कर्तव्ये, राज्य शासनाने याबाबत वेळोवेळी नियुक्त केलेल्या शासनाच्या एका किंवा अनेक अधिकाऱ्यांकडे निहित होतील आणि त्याच्याकडून वापरण्यात किंवा पार पाडण्यात येतील आणि असा किंवा असे अधिकारी, यांना राज्य शासन वेळोवेळी निर्धारित करील त्याप्रमाणे महानगरपालिका निधीमधून पारिश्रमिक मिळेल ;

(क) विसर्जनाच्या कालावधीत महानगरपालिकेकडे निहित असलेली सर्व मालमत्ता राज्य शासनाकडे निहित होईल.

**५२०फ.** कलम ५२०ड अन्वये महानगरपालिका विसर्जित करण्यात आलेली असेल त्याबाबतीत, महानगरपालिकेची रचना करण्याकरिता, राज्य निवडणूक आयुक्त विनिर्दिष्ट करील त्या दिनांकाला, सार्वत्रिक निवडणूक घेण्यात येईल : विसर्जनानंतर महानगर-पालिकेची पुनर्रचना.

परंतु, महानगरपालिकेची रचना करण्यासाठी घ्यावयाची निवडणूक महानगरपालिकेच्या विसर्जनाच्या दिनांकापासून सहा महिन्यांचा कालावधी संपण्यापूर्वी घेण्यात येईल.]

प्रकरण एकवीस

## पूरक तरतुदी

**५२१.** [2][(१)] आयुक्त, [3][संचालक, उप आयुक्त,] [4][महाव्यवस्थापक] व प्रत्येक पालिका सदस्य आणि या अधिनियमाखाली नेमण्यात आलेला महानगरपालिकेचा प्रत्येक अधिकारी किंवा कर्मचारी [5][आणि कलम २१८ब, पोट-कलम (१) खाली मूल्यांकन करण्याकरिता नेमण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती ] हे, आणि महानगरपालिकेचा कोणताही कर गोळा करण्यासाठी असलेला प्रत्येक कंत्राटदार किंवा अभिकर्ता आणि अशा कोणत्याही कंत्राटदाराने किंवा अभिकर्त्याने कामावर ठेवलेला प्रत्येक कर्मचारी किंवा इतर व्यक्ती हे भारतीय दंड संहितेच्या कलम २१ च्या अर्थांतर्गत लोकसेवक आहेत, असे मानले जाईल. (१८६० चा ४५.) पालिका सदस्य, वगैरे लोकसेवक आहेत असे मानणे.

[2][ (**२**) प्रत्येक पालिका सदस्याला भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ याचे कलम २ च्या खंड (ग) च्या अर्थांतर्गत लोकसेवक मानण्यात येईल.] (१९८८ चा ४९.)

[6][ **५२१अ.** फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याचे कलम १९७ आणि भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, १९८८ याचे कलम १९ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, उक्त कलमे १९७ व १९ अनुसार आवश्यक असल्याप्रमाणे, पालिका सदस्याच्या बाबतीत, पूर्वमंजुरी देण्याकरिता राज्य शासन सक्षम असेल.] (१९७४ चा २. १९८८ चा ४९.) पूर्वमंजुरी देण्याचा राज्य शासनाचा अधिकार.

---

[1] सन १९९९ चा अधिनियम क्रमांक २७, कलम २०२ अन्वये "महापौरासह परिषद" हा मजकूर वगळण्यात आला.
[2] सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम २ अन्वये कलम ५२१ ला त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात आला त्यानंतर पोट-कलम (२) जादा दाखल करण्यात आले.
[3] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम २० अन्वये "आणि उप आयुक्त" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.
[4] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ५७ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.
[5] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम ३७ अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.
[6] सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३४, कलम ३ अन्वये कलम ५२१अ समाविष्ट करण्यात आले.

पोलिसांचे सहकार्य.

**५२२.** (१) पोलीस आयुक्त स्वतः होऊन व आपल्या हाताखालील कर्मचाऱ्यांमार्फत, या अधिनियमांच्या तरतुदी परिणामक करण्यासाठी व त्या अंमलात आणण्यासाठी आणि [१][बृहन्मुंबईत] सुव्यवस्था राखण्यासाठी आयुक्तांशी [२][आणि महाव्यवस्थापकाशी] शक्य तेथवर सहकार्य करील.

(२) [१][बृहन्मुंबईतील] प्रत्येक पोलीस अधिकाऱ्याने, या अधिनियमांविरुद्ध किंवा या अधिनियमाखाली केलेला कोणताही विनियम किंवा उपविधी याविरुद्ध कोणताही अपराध करण्याच्या कारस्थानाची किंवा कोणताही अपराध केल्याबद्दल त्याला जी कोणतीही माहिती मिळालेली असेल ती विनाविलंब योग्य त्या महानगरपालिका अधिकाऱ्यास कळविणे, हे त्याचे कर्तव्य असेल, आणि [३][आयुक्ताने, महाव्यवस्थापकाने] किंवा कोणत्याही महानगरपालिका अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने, या अधिनियमाखाली [३][आयुक्तामध्ये, महाव्यवस्थापकामध्ये] किंवा अशा महानगरपालिका अधिकाऱ्यांमध्ये किंवा कर्मचाऱ्यांमध्ये निहित असलेल्या कोणत्याही अधिकाराचा विधितः वापर करण्यासाठी वाजवी रीतीने त्याची मदत मागितली असता, त्यांना सहाय्य करणे हे त्याचे कर्तव्य असेल.

उपनगरांतील किंवा [५][वाढवलेल्या उपनगरांतील] जमिनीचे भाडे वसूल करण्यासाठी सहाय्य.

[४][**५२२अ.** महानगरपालिकेमध्ये निहित असलेल्या किंवा तिने अन्यथा धारण केलेल्या उपनगरांतील [५][किंवा वाढवलेल्या उपनगरांतील] कोणत्याही जमिनीबाबत तिला कोणत्याही व्यक्तीकडून भाड्यादाखल येणे असलेल्या कोणत्याही रकमेच्या वसुलीसाठी, मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९ * , कलमे ८६ व ८७ यांच्या अर्थांतर्गत, महानगरपालिका ही अशा जमिनीची वरिष्ठ धारक आहे आणि अशी प्रत्येक व्यक्ती ही त्या जमिनीचा कनिष्ठ धारक आहे असे मानले जाईल ; आणि वरिष्ठ धारक या नात्याने, अशी रक्कम वसूल करण्याकरिता, कनिष्ठ धारकाने वरिष्ठ धारकास द्यावयाचे भाडे किंवा जमीन महसूल वसूल करण्याच्या कामी उक्त कलमांखाली वरिष्ठ धारकास जे सहाय्य मिळण्याचा हक्क असेल ते सर्व सहाय्य मिळण्याचा महानगरपालिकेला हक्क असेल.

१८७९ चा ५.

अवधी संगणित करणे.

**५२३.** (१) ज्या कोणत्याही तारखेपूर्वी किंवा प्रसंगापूर्वी किंवा ज्या कोणत्याही तारखेपासून किंवा प्रसंगापासून किंवा ज्या कोणत्याही तारखेनंतर किंवा प्रसंगानंतर कोणतीही कृती करण्यासाठी किंवा कोणत्याही कार्यवाह्या प्रस्तुत करण्यासाठी या विधिनियमांन्वये किंवा त्याखाली जो कोणताही मर्यादित अवधी नेमून दिला असेल किंवा ज्या कोणत्याही मर्यादित अवधी संबंधाने परवानगी दिली असेल तो अवधी संगणित करताना ती तारीख ज्या दिवशी आली असेल किंवा तो प्रसंग ज्या दिवशी घडला असेल तो दिवस अशा अवधीच्या बाबतीत वगळण्यात आला आहे असे धरले जाईल ; आणि असा अवधी यथास्थिति, निकटपूर्वीच्या दिवसाच्या शेवटी संपतो किंवा लगतनंतरच्या दिवसांच्या प्रारंभी सुरू होतो, असेही समजले जाईल.

(२) जेव्हा मर्यादित अवधी कोणत्याही तारखेपासून किंवा तारखेनंतर किंवा कोणत्याही प्रसंगापासून किंवा प्रसंगानंतर संगणित करावयाचा असेल तेव्हा, ती कृती किंवा कार्यवाही पूर्वोक्तप्रमाणे संगणित केलेल्या मर्यादित अवधीच्या उशिरात उशिरा शेवटच्या दिवशी केलेली किंवा प्रस्तुत केलेली असली पाहिजे ; मात्र शेवटचा दिवस हा रविवार किंवा सार्वजनिक सुटीचा दिवस असेल तर किंवा लघुवाद न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशापुढे प्रस्तुत करावयाच्या प्रकरणाच्या किंवा कार्यवाहीच्या बाबतीत, उक्त न्यायालय अशा शेवटच्या दिवशी बंद असेल, तर ही तरतूद लागू

---

[१] सन १९९६ चा मुंबई अधिनियम क्रमांक २५, कलम (२) अनुसुची ४(१) अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ५८ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] वरील अधिनियमाच्या वरील कलमान्वये मूळ शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ३२ अन्वये कलम ५२२अ समाविष्ट करण्यात आले.

[५] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम २५ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

* आता, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (१९६६ चा महाराष्ट्र ४१) पहा.

होणार नाही आणि अशा बाबतीत कोणतीही कृती किंवा कार्यवाही यथास्थिति, अशा रविवारच्या लगतनंतरच्या दिवशी किंवा सार्वजनिक सुटी संपण्याच्या लगतनंतरच्या दिवशी किंवा असे न्यायालय ज्या दिवशी पुन्हा उघडेल त्या पहिल्या दिवशी करण्यात किंवा प्रस्तुत करण्यात आली असेल तर नियत अवधीत करण्यात किंवा प्रस्तुत करण्यात आली आहे, असे मानले जाईल.

(३) जेव्हा या अधिनियमान्वये कोणतीही कृती किंवा कार्यवाही एखाद्या विवक्षित दिवशी करण्याविषयी किंवा प्रस्तुत करण्याविषयी निदेश देण्यात आला असेल किंवा परवानगी देण्यात आली असेल आणि तो दिवस रविवारचा किंवा सार्वजनिक सुटीचा असेल तेव्हा, ती कृती किंवा ती कार्यवाही अशा रविवारच्या किंवा अशा सार्वजनिक सुटीच्या लगतनंतरच्या दिवशी करण्यात किंवा प्रस्तुत करण्यात आली असेल तर, ती नियत अवधीत करण्यात किंवा प्रस्तुत करण्यात आली आहे असे मानण्यात येईल.

अंतर मोजणे.

**५२४.** या अधिनियमात नमूद केलेली अंतरे ही क्षितिज-समांतर सरळ रेषेत मोजण्यात येतील.

निर्धारण, वगैरे करण्यात उपचारदोष घडल्यास किंवा प्रमाद घडल्यास त्यामुळे अशी निर्धारणे वगैरे विधिअग्राह्य ठरतात असे न मानणे.

**५२५.** (१) या अधिनियमाखाली किंवा या अधिनियमाखाली केलेला कोणताही विनियम किंवा उपविधी *[१][किंवा नियम] याखाली केलेल्या कोणत्याही निर्धारणात किंवा केलेल्या कोणत्याही अटकावणीत किंवा काढलेल्या कोणत्या नोटिशीत, बिलात, अनुसूचीत, समन्सात किंवा इतर दस्तऐवजात कोणताही उपचारदोष, लेखनप्रमाद, वर्जन किंवा इतर दोष घडून आल्यास तो कोणत्याही वेळी शक्य तेथवर, सुधारता येईल.

(२) या अधिनियमाच्या आणि याखाली केलेल्या विनियमांच्या, *[२][ उपविधीच्या व नियमांच्या ] तरतुदींचे तत्त्वार्थाने व वास्तविकरीत्या अनुपालन केलेले असल्यास, असा कोणताही उपचारदोष, लेखनप्रमाद, वर्जन किंवा इतर दोष यामुळे उक्त निर्धारण, अटकावणी, नोटीस, बिल, अनुसूची, समन्स किंवा इतर दस्तऐवज विधिअग्राह्य किंवा अवैध होतो असे मानता येणार नाही ; परंतु असा कोणताही उपचारदोष, लेखनप्रमाद, वर्जन अथवा इतर दोष घडल्यामुळे कोणत्याही व्यक्तीचे विशेष नुकसान झाले असल्यास तीस, उक्त अधिकारिता असलेल्या न्यायालयात दावा करून, त्याबद्दल भरपाई वसूल करण्याचा हक्क असेल.

कामकाज अभिलेख वगैरेमधून उतारे मागवण्याचा [४][राज्य] शासनाचा अधिकार.

**५२६.** [३][[४][राज्य] शासन] कोणत्याही वेळी, महानगरपालिकेस, तिच्या, स्थायी समितीच्या किंवा या अधिनियमाखाली रचना करण्यात आलेल्या कोणत्याही समितीच्या कोणत्याही कामकाज अभिलेखातून किंवा महानगरपालिकेच्या नियंत्रणाखालील कोणत्याही अभिलेखातून कोणतेही उतारे आणि या अधिनियमाच्या प्रशासनाशी संबंधित व त्याच्याशी निगडित असलेली कोणतीही आकडेवारी आपणास पुरविण्यास फर्मावू शकेल ; आणि महानगरपालिका, कोणताही गैरवाजवी विलंब न लावता, ती पुरवील.

---

[१] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ७६(१) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[२] वरील अधिनियमाच्या कलम ७६(२) अन्वये " व उपविधीच्या " या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] भारतीय विधि अनुकूलन परिषद आदेशान्वये " गव्हर्नर इन कौन्सिल " या शब्दांऐवजी " प्रांतिक सरकार " हे शब्द दाखल करण्यात आले.

[४] विधि अनुकूलन आदेश, १९५० अन्वये "प्रांतिक " या शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

* सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ८० पुढीलप्रमाणे आहे :—

कलमे ६४, ६५, ६७, ६८ व ७६ अन्वये केलेल्या सुधारणांना पूर्वलक्षी प्रभाव असणे.

८०. (१) कलमे ६४, ६५ व ६७ यांअन्वये करण्यात आलेल्या सुधारणा या, दिनांक १५ ऑगस्ट १९४७ रोजी करण्यात आलेल्या आहेत व त्या, त्या दिनांकापासून परिणामक आहेत, असे मानण्यात येईल.

(२) कलमे ६८ व ७६ याअन्वये करण्यात आलेल्या सुधारणा या, दिनांक १४ मार्च १९४४ रोजी करण्यात आल्या आहेत व त्या, त्या दिनांकापासून परिणामक आहेत, असे मानण्यात येईल आणि या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी उक्त अधिनियमाखाली काढण्यात आलेला कोणताही आदेश किंवा केलेली कार्यवाही, या अधिनियमान्वये सुधारणा करण्यात आल्याप्रमाणे असलेल्या उक्त अधिनियमाखाली काढण्यात आल्याचे किंवा करण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि यथास्थिति, कोणत्याही अशा आदेशानुसार किंवा कार्यवाहीनुसार सद्‌भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचा इरादा असलेल्या कोणत्याही गोष्टीबद्दल, कोणत्याही व्यक्तीविरुद्ध कोणताही खटला, दावा किंवा इतर कार्यवाही करता येणार नाही.

या अधिनियमाखाली कृती करणाऱ्या व्यक्तीचे दाव्यांपासून संरक्षण.

**५२७.** (१) या अधिनियमास अनुसरून किंवा या अधिनियमाची अंमलबजावणी करताना किंवा अंमलबजावणी करण्याचा इरादा असताना केलेल्या कोणत्याही कृतीच्या संबंधात किंवा या अधिनियमाची अंमलबजावणी करताना केलेल्या अभिकथित हयगयीच्या किंवा कसुरीच्या संबंधात, महानगरपालिकेविरुद्ध किंवा [१][आयुक्ताविरुद्ध, महाव्यवस्थापकाविरुद्ध] [२][किंवा संचालकाविरुद्ध] किंवा उपआयुक्ताविरुद्ध किंवा महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्याविरुद्ध किंवा कर्मचाऱ्याविरुद्ध करावयाचा कोणताही दावा हा,—

(अ) दाव्याचे कारण आणि दावा करण्याचा ज्याचा इरादा असेल अशा वादीचे आणि त्याचा कोणताही मुखत्यार किंवा अभिकर्ता असेल त्याचे नाव व राहण्याची जागा यांविषयी योग्य ती तपशीलवार माहिती जीत देण्यात आली असेल अशी लेखी नोटीस अशा दाव्याच्या प्रयोजनासाठी महानगरपालिकेच्या बाबतीत महानगरपालिकेच्या मुख्य कार्यालयात ठेवण्यात आल्यानंतर आणि [१][आयुक्ताच्या, महाव्यवस्थापकाच्या] [२][किंवा संचालकाच्या] किंवा महानगरपालिका उप आयुक्ताच्या किंवा महानगरपालिका अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या बाबतीत ती त्यास सुपूर्द करण्यात आल्यानंतर किंवा त्याच्या कार्यालयात किंवा राहण्याच्या जागी ठेवण्यात आल्यानंतर एक महिना होईपर्यंत ; तसेच*

(ब) दाव्याचे कारण घडल्यापासून लगतनंतरच्या सहा महिन्यांच्या आत दावा सुरू केला असल्याखेरीज ;

दाखल करता येणार नाही.

(२) अशा कोणत्याही दाव्याच्या संपरीक्षेत—

(क) दाव्याचे जे कारण पूर्वोक्तप्रमाणे सुपुर्द केलेल्या अथवा ठेवलेल्या नोटिशीत वादीने नमूद केले असेल ते खेरीज करून इतर कोणत्याही कारणासंबंधी पुरावा देण्याची परवानगी वादीस दिली जाणार नाही ;

(ड) हक्कमागणी ही नुकसानभरपाईसाठी असेल तर, ती दाखल करण्यापूर्वी प्रतितोषादाखल पुरेशी रक्कम देण्यात आल्यास किंवा दावा दाखल केल्यानंतर पुरेशी रक्कम न्यायालयात भरण्यात आल्यास उक्त हक्कमागणी खर्चासह खारीज करण्यात येईल.

(३) अशा कोणत्याही दाव्यात जर प्रतिवादी हा महानगरपालिका अधिकारी किंवा कर्मचारी असेल तर, दाव्यास किंवा दाव्यामुळे त्याने द्यावयाची कोणतीही रक्कम किंवा रकमेचा कोणताही भाग–मग तो परिव्ययाच्या, आकारांच्या, खर्चाच्या झालेल्या नुकसानीबद्दलच्या भरपाईच्या किंवा इतर कोणत्याही बाबतीत असो–[३][स्थायी समितीच्या किंवा बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन समितीच्या] [४][पूर्व] मंजुरीने, यथास्थिति, महानगरपालिका निधीतून किंवा [५][बृहन्मुंबई वीजपुरवठा व परिवहन निधीतून] देण्यात येईल.

---

[१] सन १९४३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ५९ अन्वये मूळ शब्दाऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[२] सन १९८१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ५३, कलम २१ अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[३] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २०३ अन्वये हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९३० चा मुंबई अधिनियम क्रमांक १९, कलम २० अन्वये " पूर्व " हा शब्द समाविष्ट करण्यात आला.

[५] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१)४(५)अन्वये हा मजकूर मूळ मजकुराऐवजी दाखल करण्यात आला.

* मूळ इंग्रजी अधिनियमातील मुद्रणदोष सुधारण्यात आल्यामुळे मूळ शब्दाऐवजी हा शब्द दाखल करण्यात आला.

१८७९ चा मुंबई ५.

[1][**५२७अ.** मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९, कलमे ४८, ६५, ६६ आणि ६७ यांच्या तरतुदींत काहीही अंतर्भूत असले तरी—

मुंबई जमीन महसूल संहिता, १८७९ ** च्या विवक्षित तरतुदींबाबत व्यावृत्ती.

(१) या अधिनियमाच्या तरतुदींखाली उपनगरांतील [2][किंवा वाढवलेल्या उपनगरांतील] कोणत्याही जमिनीचा ज्या कोणत्याही प्रयोजनासाठी विधितः उपयोग करता येईल त्या प्रयोजनासाठी उपयोग करण्यास, उक्त संहितेद्वारे किंवा तीखाली प्रदान केलेले अधिकार वापरून मनाई करता कामा नये.

(२) शेतीच्या प्रयोजनासाठी निर्धारण करण्यात आलेल्या किंवा धारण करण्यात आलेल्या, उपनगरांतील [2][किंवा वाढवलेल्या उपनगरांतील] जमिनीच्या कोणत्याही भोगवटादाराने, शेतीशी संबंध नसलेल्या कोणत्याही प्रयोजनासाठी धारण केलेल्या आपल्या जमिनीचा किंवा तिच्या भागाचा उपयोग करण्याकरिता, कोणतेही बदललेले निर्धारण व दंड असल्यास तो भरण्याच्या शर्तीच्या अधीनतेने, उक्त संहितेच्या कलम ६५ खाली परवानगीचा हक्क मिळण्यासाठी त्याने या अधिनियमाच्या व त्याखाली करण्यात आलेल्या उपविधींच्या सर्व आवश्यक बाबींचे अनुपालन केले आहे, याविषयी जिल्हाधिकाऱ्याची खात्री करून देणे हे पुरेसे होईल.]

[3][* * * * *]

## अनुसूची अ

(कलम २ पहा.)

**निरसित केलेल्या अधिनियमिती.**

| अधिनियमाचा क्रमांक आणि वर्ष (१) | नाव किंवा विषय (२) | निरसनाची व्याप्ती (३) |
|---|---|---|
| | **गव्हर्नर जनरल इन कौन्सिल यांचा अधिनियम** | |
| सन १८६० चा ४८. | सन १८५६ चा अधिनियम क्रमांक १३ सुधारण्याबाबत अधिनियम. | कलम १७ हे सन १८८२ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४ यानुसार सुधारल्याप्रमाणे आणि कलम १९, खंड (१६). |
| | **मुंबईचे गव्हर्नर यांचे अधिनियम** | |
| सन १८६३ चा ६. | मुंबई शहर, उपनगरे व बंदर यांतील सार्वजनिक वाहनांचे विनियमन करण्याबाबत अधिनियम. | कलम ७ यातील "पोलीस आयुक्तांनी मुंबईच्या महा-नगरपालिका आयुक्ताच्या खाली आणि" हे शब्द. |

[1] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७७, कलम ३३ अन्वये, कलम ५२७अ समाविष्ट करण्यात आले.

[2] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम २६ अन्वये, हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[3] सन १९९८ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १०, कलम २४८ अन्वये कलम ५२८ वगळण्यात आले.

** आता महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ पहा.

**अनुसूची अ—चालू**

| अधिनियमाचा क्रमांक आणि वर्ष<br>(१) | नाव किंवा विषय<br>(२) | निरसनाची व्याप्ती<br>(३) |
|---|---|---|
| सन १८७० चा ३. | मुंबई शहराचे जस्टिसेस ऑफ पीस यांच्या कॉर्पोरेशनने सरकारला विवक्षित रकमा देण्याबाबत अधिनियम. | संपूर्ण |
| सन १८७२ चा ३. | मुंबई नगरपालिका अधिनियम, १८७२. | संपूर्ण |
| सन १८७९ चा ४. | मुंबई नगरपालिका अधिनियम सुधारणा आणि चालू ठेवण्याबाबत अधिनियम, १८७८. | संपूर्ण |
| सन १८७८ चा ६. | मुंबई नगरपालिका अधिनियम सुधारणा आणि चालू ठेवण्याबाबत अधिनियम, १८७८ याच्या विवक्षित तरतुदी केव्हा अंमलात आणण्याचे योजिले त्यासंबंधीच्या शंका दूर करण्याबाबत अधिनियम. | संपूर्ण |
| सन १८८० चा १. | मुंबई नगरपालिकेचा एकत्रित कर्जाबाबत अधिनियम, १८८०. | संपूर्ण |
| सन १८८१ चा २. | नगरपालिकेच्या प्रकरणांमध्ये इलाखा शहर दंडाधिकाऱ्यांची अधिकारिता कायम करण्याबाबत अधिनियम. | संपूर्ण |
| सन १८८२ चा ६. | सन १८७२ व १८७८ चे मुंबई नगरपालिका अधिनियम सुधारण्याबाबत अधिनियम. | संपूर्ण |
| सन १८८५ चा २. | मुंबई आंतरराष्ट्रीय प्रदर्शनाच्या हमी निधींसाठी अभिदान देण्याकरिता व इतर प्रयोजनांकरिता मुंबई शहर महानगरपालिकेस अधिकार प्रदान करण्याबाबत अधिनियम. | पूर्वी निरसित करण्यात आला नसेल तितका. |
| सन १८८५ चा ३. | मुंबई शहराकरिता महानगरपालिका उप आयुक्तांच्या प्रासंगिक नेमणुकीकरिता तरतूद करण्याबाबत अधिनियम. | संपूर्ण |
| सन १८८६ चा १. | सन १८७२ व सन १८७८ चे मुंबई नगरपालिका अधिनियम, कलम ९ब यांच्या अन्वयासंबंधीच्या विवक्षित शंका दूर करण्याबाबत अधिनियम. | संपूर्ण |
| सन १८८६ चा २. | नगर-शुल्कांमधून महसूल वाढविणे मुंबई शहर महानगरपालिकेस शक्य व्हावे याकरिता अधिनियम. | संपूर्ण |

## अनुसूची ब

(कलम २४ पहा.)

(शहराची प्रभागांमध्ये विभागणी) सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम १९ अन्वये वगळण्यात आली.

## अनुसूची क

(कलम ११० पहा.)

### ऋणपत्राचा नमुना

क्रमांक रु. करिता

[१][बृहन्मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या] सामर्थ्याने, आम्ही, [२][बृहन्मुंबई ] महानगरपालिका, उक्त अधिनियमांच्या प्रयोजनांसाठी, अ. ब. राहणार
यांनी आम्हांला दिलेल्या रु. च्या रकमेचे प्रतिफल म्हणून, उक्त अ. ब. त्यांचे वारस, मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक व अभिहस्तांकिती यांस उक्त रक्कम रु. त्यावर दरसाल दरशेकडा या दराने द्यावयाच्या व्याजासह, दर सहा महिन्यांनी दिनांक रोजी व दिनांक रोजी देण्याचे वचन देत आहोत.

आणि, उक्त रक्कम दिली जाण्यासाठी प्रतिभूती म्हणून आम्ही, उक्त अ.ब., त्याचे वारस, मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक व अभिहस्तांकिती यांस (गहाण ठेवलेल्या करांपैकी) उक्त अधिनियमाच्या सामर्थ्याने प्राप्त किंवा प्रोद्भूत होणाऱ्या पैशांपैकी, उक्त करांच्या पतीवर कर्जाऊ घेतलेल्या किंवा कर्जाऊ घेण्यात येईल अशा सर्व रकमेशी वरील रकमेचे जे प्रमाण असेल किंवा होईल त्या प्रमाणाइतका भाग या लेखाच्या तारखेपासून पूर्वोक्त रक्कम पूर्वोक्त दराने तिच्यावरील होणाऱ्या व्याजासह संपूर्णपणे देण्यात व फेडण्यात येईपर्यंत उक्त अ.ब., त्याचे वारस, मृत्युपत्रव्यवस्थापक, प्रशासक व अभिहस्तांकिती यांनी धारण करण्यासाठी देत आहोत व त्याचे अभिहस्तांकन करून देत आहोत.

आणि याद्वारे असेही अधिकथित करण्यात येत आहे की, उक्त मुद्दलाची परतफेड दिनांक रोजी १८ (पैसे जेथे देण्यात येतील त्या जागेचे नाव), येथे करण्यात येईल.

दिनांक १८

(महानगरपालिकेची सामान्य मुद्रा उमटवावी) (सही)

महानगरपालिका आयुक्त,
महानगरपालिकेच्या वतीने.

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४ (९) अ अन्वये "बॉम्बे महानगरपालिका अधिनियम" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २, अनुसूची (१) ४(९) ब अन्वये "ग्रेटर बॉम्बे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

या ऋणपत्रावर [१][आमच्या समक्ष बृहन्मुंबईच्या महानगरपालिकेची सामान्य मुद्रा उमटवण्यात आली आहे.

(सह्या)

१. ................................... }
} स्थायी समितीचे सदस्य.]
२. ................................... }

## अनुसूची ड

(सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम ३८ अन्वये वगळण्यात आली.)

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २०४ अन्वये, "प्रभारी सदस्याच्या समक्ष बृहन्मुंबईच्या महानगरपालिकेची सामान्य मुद्रा उमटवण्यात आली आहे. सही ....................... प्रभारी सदस्य." या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## अनुसूची ई

(कलम १५० पहा)

### हस्तांतरण हे संलेखाद्वारे करण्यात आले असेल तेव्हा द्यावयाच्या हस्तांतरण नोटिशीचा नमुना

महानगरपालिका आयुक्त [1][बृहन्मुंबई] यांस

मी, अ.ब., यांद्वारे [2][मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या] कलम १४९ या अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे मालमत्तेच्या पुढील हस्तांतरणाची नोटीस देत आहे :—

| | | | | मालमत्तेचे वर्णन | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| नोटिशीची तारीख | संलेखाची तारीख | विक्रेत्याचे किंवा अभिहस्तांकनकर्त्याचे नाव | खरेदीदाराचे किंवा अभिहस्तांकितीचे नाव | प्रतिफलाची रक्कम | ती कशीची मिळून बनते | स्थान | निर्धारण पुस्तकातील क्रमांक | जिल्हाधिकाऱ्याचा क्रमांक | जमिनीची मिती | हद्दी | संलेखाची नोंदणी करण्यात आली असल्यास, नोंदणीची तारीख | शेरा |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) | (११) | (१२) | (१३) |

(स्वाक्षरी) अ. ब.

[1] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (१०) अ अन्वये "ग्रेटर बॉम्बे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[2] वरील अधिनियमाच्या कलम २, अनुसूची (१) ४(१०) ब अन्वये "बॉम्बे महानगरपालिका अधिनियम" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## अनुसूची फ

(कलम १५० पहा)

### संलेखाद्वारे नव्हे तर अन्यथा हस्तांतरण करण्यात आले असेल तेव्हा द्यावयाच्या हस्तांतरण नोटिशीचा नमुना

महानगरपालिका आयुक्त [१][बृहन्मुंबई] यांस—

मी, अ.ब., यांद्वारे [२][मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या] कलम १४९ या अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, मालमत्तेच्या पुढीलप्रमाणे होणाऱ्या हस्तांतरणाची नोटीस देत आहे :—

| नोटिशीची तारीख | आयुक्ताच्या अभिलेखात मालमत्ता सध्या ज्या नावावर नोंदलेली आहे ते नाव | मालमत्ता कोणाच्या नावावर हस्तांतरित करावयाची आहे | मालमत्तेचे वर्णन | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | ती कशाची मिळून बनली आहे | स्थान | निर्धारण पुस्तकातील क्रमांक | जिल्हाधिकारी यांचा क्रमांक | जमिनीची मिती | हद्दी | शेरा |
| (१) | (२) | (३) | (४) | (५) | (६) | (७) | (८) | (९) | (१०) |

(स्वाक्षरी) अ. ब.

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (११) अ अन्वये “ग्रेटर बॉम्बे” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.
[२] वरील अधिनियमाच्या कलम २, अनुसूची (१) ४(११) ब अन्वये “बॉम्बे महानगरपालिका अधिनियम” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1][* * * *]

[2][**अनुसूची ग–१**

(कलम १९१ ई पहा)

रंगभूमी/नाट्यगृह कर

| | **करमणुकीचा प्रकार** | **कराची कमाल रक्कम** |
|---|---|---|
| (१) | वातानुकूलित चित्रपटगृह . . . . | प्रत्येक खेळामागे रुपये ६० |
| (२) | वातानुकूलित नसलेले चित्रपटगृह . . | प्रत्येक खेळामागे रुपये ४५ |
| (३) | नाटक, जलसा, करमणुकीचे विविध कार्यक्रम किंवा तमाशा. | प्रत्येक खेळामागे रुपये २५ |
| (४) | सर्कस आणि आनंदमेळा . . . . | प्रतिदिनी रुपये २५ |
| (५) | इतर कोणतीही करमणूक . . . . | प्रत्येक खेळामागे रुपये २५<br>स्वतंत्र खेळ नसतील तर प्रतिदिन रु. ३०. |

---

[1] सन २००२ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ३० अन्वये अनुसूची ' ग ' वगळण्यात आली.

[2] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ५४ अन्वये ' अनुसूची ग-१ ' दाखल करण्यात आली.

## [1][अनुसूची ह

(अधिनियम कलम १९२ (१) पहा)

**जकात देण्यास पात्र असलेल्या वस्तू**

| अनु-क्रमांक | वस्तू | आकारण्याजोगे जकातीचे कमाल दर |
|---|---|---|
| (१) | (२) | (३) |
| | **गट - अ** | |
| १. | **खाद्यपदार्थ.**—कोको, कोकोच्या बिया व चॉकलेट्स, केक, फळांचे रस, सर्व पेये, ग्लुकोज, डेक्स्टोज किंवा कोणतीही फळांची साखर, अन्नामध्ये वापरावयाचे सर्व प्रकारचे रंग आणि खाद्य पदार्थ बनविण्यासाठी लागणारी रसायने, अर्क, इतर सर्व तऱ्हेची ग्लुकोज, सातूचे सत्व, आईस्क्रीम, खाद्य पदार्थ बनविण्यासाठी लागणारी सर्व प्रकारची संहते आणि अर्क, अन्नाला पर्यायी पदार्थ आणि इतरत्र खास तरतूद न केलेले सर्व प्रकारचे अन्न पदार्थ व पेये. | यथामूल्य ७ टक्के. |
| २. | मादक पेये, दारु, स्पिरीट आणि बियर | |
| ३. | मेथीलेटेड आणि डिनेचर्ड स्पिरीटस व औद्योगिक अल्कोहोल्स. | |
| ४. | फटाके, दारुकाम आणि त्याचे घटक आणि कच्चा माल, कॅल्शियम कार्बाईड आणि सेफ्टी फ्युजेस. | |
| ५. | चिरूट आणि सिगारेट धरण्याच्या नळ्या, धुम्रपानाकरिता वापरावयाच्या नळ्या, सिगारेटचा कागद, सिगारेट फिल्टर रॉडस्, तंबाखुच्या डब्या आणि तोसदाने (पाऊचेस), चिरूट आणि सिगारेटच्या डब्या, हुक्का आणि धुम्रपानास आवश्यक असलेली साधने आणि सिगारेट प्रज्वलक, चिरूट, सिगारेट्स, तंबाखु इतर सर्व तंबाखुचे पदार्थ, तंबाखुसहित अथवा तंबाखुविरहित पानमसाला. | |
| ६. | इमारती लाकूड आणि दरवाजे, खिडक्या, चौकटी, फर्निचर खुंट्या, जिने यांसह लाकडापासून तयार केलेल्या वस्तू, चंदनी लाकूड आणि अशा तऱ्हेच्या लाकडापासून तयार केलेल्या वस्तू. | |
| ७. | स्तरफलिका, नरम फलिका, कठीण फलिका, मॅसोनाईट आणि कोणत्याही घटकांपासून बनलेले त्यांचे पर्याय आणि कोणतेही घटक असलेले कृत्रिम प्रक्रियेने तयार करण्यात | |

[1] शासकीय अधिसूचना, नगरविकास, क्रमांक बी.एम.सी. २३२०/२०९२ प्र. क्र. ८२/२००० नवि. २१, दिनांक २७ एप्रिल २००० अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

**अनुसूची ह**—चालू

| (१) | (२) |
|---|---|
| आलेले इतर कोणत्याही प्रकारचे लाकूड आणि त्यापासून बनविलेल्या वस्तू, सनमायका, फोरमायका आणि तत्सम वस्तू. | |
| ८. संगमरवर आणि ग्रॅनाईट–खंड, लादी किंवा पॉलिश केलेल्या स्वरूपात, संगमरवर आणि ग्रॅनाईटचे कापलेले तुकडे आणि फरशा आणि त्यापासून तयार केलेल्या वस्तू. | |
| ९. केसाचे तेल, सुगंधी तेले, सौंदर्य प्रसाधने, सर्व प्रकारची सुगंधी द्रव्ये, सुगंध अत्तरे, सुगंधी साहित्य, सुवासिक कांड्या, सुगंधी रसायने, स्नानाचा साबण, शेव्हिंग क्रिम, शेव्हिंग स्टीक्स, पोमेड, इतरत्र विनिर्दिष्ट केलेल्या वस्तू वगळता सर्व प्रकारच्या प्रसाधनाच्या वस्तू. | |
| **गट--ब** | |
| १०. खाद्य पदार्थ, ते असे , . . खारवून वाळविलेले डुकराचे मांस आणि डुकराच्या ढोपराचा भाग, जेवणात वापरावयाचे लोणी, जेवणात वापरावयाच्या लोण्याशिवाय इतर लोणी, वनस्पती किंवा चरबीपासून तयार केलेले कृत्रिम लोणी, तूप, वनस्पती, उदजनित तेले, वाळविलेली अथवा टिकवून ठेवलेली फळे अणि ओल्या किंवा सुक्या खजुरांसह कठीण कवचाची फळे आणि त्यांच्यापासून बनविलेले पदार्थ, हवाबंद डब्यातील मासे किंवा मांस, ताजे अथवा कोणत्याही वापरासाठी टिकून ठेवलेले मांस, चीज, मिठाई, मुरंबा आणि साखरमिश्रित फळांचा रस, सॉसेस, केचअप्स्, घट्ट केलेले आणि टिकविलेले दूध, दुधाची मलई, चक्का, आईस्क्रीम व्यतिरिक्त इतर सर्व दुग्धजन्य पदार्थ, सर्व प्रकारच्या पिठांचे पदार्थ, लोणची, मावा, बेकींग पावडर, बिस्कीटे, मध, पापड, डुकराची पातळ चरबी अथवा प्राण्यांची खाद्योपयोगी चरबी, टिकविलेले खाद्यान्न. | [१][यथामूल्य ५.५ टक्के. (नोंद क्र. २५ वगळता, नोंद क्र. २५ करिता सध्याचा दर म्हणजे यथामूल्य ४.५ टक्के कायम राहील)] |
| ११. झुंबरे, कंदील, चिमण्या, विद्युत दिवे आणि विद्युत नलिका, विजेच्या अथवा वायूच्या प्रकाशासाठी लागणाऱ्या वस्तू. | |
| १२. धुण्याचा साबण व सर्व प्रकारची निर्मलके, पोटॅश, रिठा, सोडा, तुरटी, क्षारयुक्त पदार्थ, शिकेकाई, धुण्याचा सोडा, | |

[१] शासकीय अधिसूचना, नगरविकास, क्रमांक बी.एम.सी. २२३२/३४७३/नवि-२१, दिनांक ३१ जुलै २००२ अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

**अनुसूची ह**—चालू

| (१) | (२) |
| --- | --- |
| कॉस्टीक सोडा, शुद्ध सोडा, फिनाईल, धुण्यासाठी व स्वच्छतेसाठी वापरावयाचे इतर सर्व पदार्थ आणि त्यांच्यासाठी लागणारा कच्चा माल. | |
| १२अ. किटकनाशके, किटकनाशके म्हणून वापरण्यात येणारी तेले, किटकनाशके, बुरशीनाशके व तणनाशके. | |
| १३. बल्ल्या, वेत, बांबू आणि त्यापासून तयार केलेल्या वस्तू. | |
| १४. सर्व प्रकारचे रंगलेप, डिस्टेंपर, रंग, वॉर्निश, अळशीचे उकळविलेले तेल, टर्पेन्टाईन, झिंक ऑक्साईड आणि रेड ऑक्साईड रंगाची द्रावणे आणि घटक. | |
| १५. रंगद्रव्ये, काळवट रंग, नीळ आणि छपाईचा लगदा व शाई आदींसह रंगाच्या सर्व वस्तू. | |
| १६. सर्व प्रकारचे पॉलीश. | |
| १७. ग्रीस आणि पेट्रोलियम जेली. | |
| १८. अखाद्य वनस्पती तेले अखाद्य तेलाच्या तेलबिया आणि मेद. | |
| १९. (अ) दात घासण्याची पावडर, दात घासण्याची पेस्ट, कंगवे, ब्रश, आरसे, केसाच्या पिना, बांगड्या, ब्रीचेस, गार्टस आणि सस्पेन्डरस. | |
| (ब) कात्र्या, वस्तरे, सुरक्षित वस्तरे, पाती, सुऱ्या, चाकू, चमचे, काटे, घरगुती उपयोगाची सर्व तऱ्हेची तीक्ष्ण हत्यारे, सर्व प्रकारच्या सुया, कुलपे आणि किल्ल्या, स्टोव्ह व पेट्रोमॅक्स आणि त्याचे भाग व उपसाधने, लोखंडी सामानाच्या वस्तू, सर्व प्रकारचे धातुचे फर्निचर आणि त्याचे सुटे भाग. | |
| (क) लेस, टेप्स, लाकडी आणि धातुची कडी, भरतकामाच्या वस्तू, कंचकडे आणि कचकड्यांच्या वस्तू, सर्व प्रकारचे मणी, नकली मोती, नकली जडजवाहिर आणि नकली अलंकाराच्या वस्तू. | |
| (ड) प्लास्टिक आणि त्यांचा कच्चा माल, प्लास्टिक पावडर, प्लास्टिकच्या वस्तू, मोल्डींग पावडर, पी.व्ही.सी ची. राळ, बेकलाईट आणि त्याचा कच्चा माल बेकलाईटच्या वस्तू, ॲक्रेलिकचे तंतू, प्लास्टिकची राळ आणि त्यापासून बनविलेल्या वस्तू. | |
| (ई) सर्व प्रकारची खेळणी. | |
| (फ) सर्व प्रकारचे जिलेटीन. | |

**अनुसूची ह**—चालू

| (१) | (२) |
|---|---|
| २०. काच, बाटल्या, कुप्यासहित काचेच्या वस्तू आणि इतर तत्सम वस्तू. | |
| २१. सर्व प्रकारची क्रॉकरी. | |
| २२. काचमृष्ठी विटा, फरशा, सर्व प्रकारची वाळू, भट्टीच्या विटा, विटा, सर्व प्रकारची छपरी कौले, मोझेक किंवा सिमेंटच्या जमिनीच्या फरशा, चायना मोझेक चिपा, इतर मोझेक अथवा टेरॅझो फरशा, संगमरवरी किंवा ग्रॅनाईटच्या फरशां व्यतिरिक्त खडबडीत किंवा पॉलीश केलेल्या दगडी फरशा, मातीचे नळ, चिनीमातीचे नळ, सिमेंटचे नळ आणि ॲसबेस्टॉस सिमेंटचे पत्रे आणि इमारती, रस्ते व इतर बांधकामासाठी वापरात येणाऱ्या इतर तत्सम वस्तू. | |
| २३. चामडे आणि त्यापासून तयार केलेल्या सर्व वस्तू. | |
| २४. सर्व प्रकारची पादत्राणे. | |
| २५. सर्व प्रकारची वाहने, मोटारगाड्या, बसगाड्या, लिमोझीनस्, ट्रक, यारी, अनुयान, टेंपो, रिक्शा, फोर्क-लिफ्टस, उत्खनक, रोड रोलर, मोटार सायकल, स्कूटर, लॉरी, बलीवर्द यंत्र, कर्षित्र, कॉन्क्रीट मिश्रक, न्याधार, त्याचे घटक आणि सुटे भाग. | |
| २६. इतरत्र तरतूद केलेल्या व्यतिरिक्त सर्व प्रकारचे टायर, ट्युब आणि फ्लॅप. | |
| २७. (अ) यंत्रसामग्री आणि तिचे घटक भाग व सुटे भाग-वीजनिर्मिती, पारेषण आणि वितरण यासाठी विद्युत यंत्रसामग्री आणि चलित्रे व जनित्रे आणि त्यांचे घटक भाग व सुटे भाग, विद्युत घटक, बॅटऱ्या आणि तांब्याच्या पट्ट्या, विद्युत कर्णासह विजेच्या वस्तू, विद्युत विसंहारक, विजेच्या जोडण्या आणि साहित्य, शीतकपाटे आणि धुलाई यंत्र. थाळ्या धुण्याचे यंत्र यासारखी विजेची घरगुती उपयंत्रे, सर्व प्रकारची विजेची यंत्रसामग्री, नियंत्रण स्विच गियर, जनित्रे, प्रत्यावर्तित्रे आणि विद्युत जनित्रे, चलित्रे, परिवर्तित्रे आणि टर्बोजनन सेट, कृषी यंत्रसामग्री आणि तिचे भाग, तेल इंजिने, डिझेल इंजिने, वाफेची इंजिने, पेट्रोल आणि गॅस इंजिने आणि जनशक्तीवर चालणारी यंत्रे आणि | |

अनुसूची ह—चालू

| (१) | (२) |
|---|---|
| त्यांचे भाग, सर्व प्रकारची हत्यारे, मुद्रणालयाची यंत्रे आणि त्याचे सुटे भाग, विनिर्देशपूर्वक तरतूद न केलेली इतर कोणतीही यंत्रसामग्री व तिचे घटक आणि सुटे भाग. | |
| (ब) सर्व प्रकारच्या झडपा, तोट्या, सॅनिटरी वेअर्स आणि त्यांच्या जोडण्या. | |
| (क) उपकरणे, साधने, उपयंत्रे आणि त्यांचे भाग, मोठी घड्याळे, मनगटी घड्याळे, टंकलेखन यंत्रे आणि त्यांचे सुटे भाग, ट्रांझिस्टर्स, रेडिओ, रेडीओग्राम, दूरचित्रवाणी संच, चित्रफित मुद्रक, चित्रफित प्लेयर, द्रुकश्राव्य फिती, रेकॉर्डिंग सिस्टिम, फित मुद्रक, व्हिडिओगेम्स, वॉकमन, स्टीरिओ सिस्टिम, ध्वनिक्षेपक, ग्रामोफोन, ध्वनिवर्धक, बिनतारी संदेश यंत्रणेसाठी लागणाऱ्या वस्तू, दूरध्वनी उपकरणे, दूरध्वनी केबल्स, केबल्स जोडण्यासाठी आयुधिका आणि त्यांचे घटक व सुटे भाग, छायाचित्रणाची यंत्रसामग्री, छायाचित्रणाची रसायने, कॅमेरा, भिंगे यासह छायाचित्रणाच्या वस्तू व साहित्य, फॅक्स मशीन्स, फोटोकॉपीअर सिस्टिम्स, फोटो प्रोसेसिंग मशीन, प्रकाश झोताची साधने फिल्म्स आणि माऊन्टस व त्याचे घटक आणि सुटे भाग. चलतचित्र प्रक्षेपणाची यंत्रसामग्री, त्याचे घटक, सुटे भाग आणि त्यामध्ये वापरण्यात आलेले साहित्य, सर्वेक्षण साधने, शास्त्रीय उपकरणे, दृष्टीसहायक वस्तू आणि त्यांचे सुटे भाग आणि दृष्टीसहायक भिंगासह उपसाधने, सायंटिग्राफिक साधने, स्कॅनर्स, क्ष-किरण यंत्रे, स्क्रिनिंग यंत्रे, इ.सी.जी. यंत्रे इलेक्ट्रो मेडिकल उपयंत्रे, दृष्टीपरीक्षण उपकरणे यांच्यासह वैद्यकीय, शल्यचिकित्साविषयक, दंतवैद्यक व पशुवैद्यक शास्त्रात वापरली जाणारी सर्व प्रकारची उपकरणे, उपयंत्रे व साधने आणि रुग्णालयासाठी आवश्यक असणाऱ्या इतर सर्व वस्तू आणि त्यांचे सुटे भाग व उपसाधने, मुशी आणि कापसाच्या दोरासह गिरण्या व सरकी काढण्याचे यंत्र या विषयीचा माल, सिम्युलेटर्स, आधारसामग्री संस्करण यंत्रसामग्री, संगणक यंत्रणा आणि पेरीफेरल्स् व त्यांची उपसाधने | |

**अनुसूची ह**—चालू

| (१) | (२) |
|---|---|
| व सुटे भाग, राईड्स आणि गेम्स, सर्व प्रकारची साधने आणि उपयंत्रे, त्यांचे सुटे भाग. | |
| २८. लाकूड, दगड, माती अथवा धातू यांच्या नक्षीकाम केलेल्या वस्तू आणि तत्सम इतर वस्तू. | |
| २९. सिनेमा फिल्म्स, सर्व प्रकारच्या कच्च्या फिल्म्स, प्रक्रिया केलेल्या सिनेमा फिल्म्स आणि रिळे. | |
| (अ) बृहन्मुंबईमध्ये प्रक्रिया केलेल्या फिल्म्सवर प्रथम प्रवेशाच्या वेळीसुद्धा जकात आकारली जाणार नाही. | |
| (ब) बृहन्मुंबईच्या बाहेर प्रक्रिया केलेल्या सिनेमा फिल्म्सवर फक्त प्रवेशाच्या वेळी जकात आकारण्यात येईल. | |
| ३०. विशुद्ध, खनिज, खनिजविरहीत अथवा वायुमिश्रित पाणी. | |
| ३१. कागद— | |
| (अ) वृत्तपत्री कागद वगळता कोणत्याही घटकांनी बनलेले व कोणत्याही जाडीचे सर्व प्रकारचे कागद. | |
| (ब) कार्डबोर्डस्, स्ट्रॉबोर्डस्, ग्रेबोर्डस्, मिलबोर्डस् आणि त्यापासून तयार केलेल्या वस्तू. | |
| (क) कागदापासून बनविलेल्या वस्तू. | |
| ३२. (अ) नियतकालिके, मासिके-बांधणी केलेली अथवा सुटी, निर्देशिका, तालिका, रेस कार्डस्, लेखा पुस्तके, रोजनिशा, दिनदर्शिका, वार्षिक अहवाल, ताळेबंद इत्यादी छापील साहित्य, विविध प्रयोजनांकरिता अर्जाची प्रपत्रे, शुभेच्छा पत्रिका, निमंत्रण पत्रिका, ह्युमर पोस्ट कार्डे, चित्र पोस्ट कार्ड, विशेष प्रसंगांकरिता कार्डे, नाम पत्रिका, लग्नपत्रिका, छिद्रक यंत्राकरिता कार्डे, कोरी कार्डे, छायाचित्र संग्राहिका, तिकीट संग्राहिका, कोऱ्या कार्यालयीन फायली, पत्ते, समभागाची कोरी प्रपत्रे आणि कोरी धनादेश पुस्तके, लॉटरी तिकीटे. | |
| **गट - क** | |
| ३३. संपूर्ण अथवा पावडर स्वरूपात मसाल्याचे पदार्थ करी पावडर, चहा, कॉफी, कॉफीच्या बिया, चिकोरी आणि चिकोरीच्या बिया. . . | [१][यथामूल्य ३ टक्के. (नोंद क्र. ५० वगळता नोंद क्र. ५० करिता सध्याचा दर म्हणजे यथामूल्य २.२५ टक्के कायम राहील)] |
| ३४. मलई रहित दुधाची पावडर. | |
| ३५. विडी. | |
| ३६. सर्व प्रकारचे सिमेंट. | |

[१] शासकीय अधिसूचना, नगरविकास, क्रमांक बी.एम.सी. २३२२/३४७३/नवि-२१, दिनांक ३१ जुलै २००२ अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

**अनुसूची ह**—चालू

| (१) | (२) |
|---|---|
| ३७. कोल टार, ॲस्फाल्ट, बिटुमेन, मॅगनीज, कुरूंदाचा दगड, अथवा भुकटी, खडूची भुकटी, दगडाचे तुकडे, इमारती दगड, क्लिंकर, कोळशाची राख आणि रुफींग फेल्ट, पिवळी माती, लाल माती खेरीज इतर कोणतीही माती. | |
| ३८. कापूस, लोकर, रेशीम, लिनन, सण, ताग, कृत्रिम आणि कोणतेही घटक असलेली सिंथेटीक सामग्री यापासून तयार केलेल्या कापडांचे तागे आणि संपूर्णतः किंवा अंशतः यापासून बनविलेल्या वस्तू, होजीयरी महल, सॅनिटरी टॉवेल्स, नॅपकीन्स, डिस्पोजेबल बेबी डायपर, गाद्या व उश्या. | |
| ३९. सरकी काढलेला अथवा न काढलेला कापूस, शल्य-चिकित्सेसाठी लागणारा कापूस व कापसाचा कचरा/ निरूपयोगी कापूस. | |
| ४०. कच्ची अथवा न कातलेली लोकर, रेशीम, सण, ताग, नारळीचे आणि इतर तंतू दोरखंड आणि त्यापासून बनविलेल्या वस्तू. | |
| ४१. सूत आणि सर्व प्रकारचे धागे, धाग्याचा कचरा, टाकाऊ सूत आणि हार्ड वेस्ट. | |
| ४२. सर्व प्रकारच्या कांज्या, साबूदाना-तांदूळ आणि पीठ, आरारूट, टॅपिओका आणि त्याचे पीठ, चिंचोक्याचे पीठ, कांजीचे पीठ आणि पांजणी सामग्री, चरबी, पांजणी तेले आणि अशा वस्तूंच्या पर्यायी वस्तू. | |
| ४३. चामडी आणि कातडी. | |
| ४४. रबर, रबराच्या वस्तू, गट्टा परचा आणि संपूर्णतः किंवा अंशतः त्यापासून बनविलेल्या वस्तू, रबर द्रावण, कच्चा रबर आणि रबराच्या झाडाचा चिक, रबर रसायने, अडॅसिव्हस् आणि त्यांचे पदार्थ. | |
| ४५. लोखंड आणि पोलाद.— | |
| (अ) कच्चे लोखंड | |
| (ब) ब्लूम्स, चकत्या आणि चिपा | |
| (क) रचनात्मक— | |
| (एक) कडी पाटे | |
| (दोन) वाहिका | |
| (तीन) सारख्या आकाराचे किंवा वेगवेगळ्या आकाराचे कोन | |
| (चार) बल्ब किंवा टोज | |

**अनुसूची ह**—चालू

| (१) | (२) |
| --- | --- |
| (पाच) हलका रूळ | |
| (सहा) हलक्या लोहमार्गासाठी लागणाऱ्या जोडपट्ट्या, | |
| (सात) शेल, पोलादी लगडी, ब्लूम्स, चकत्या आणि गज | |
| (आठ) सपाट किंवा पन्हळीदार काळे अथवा जस्त विलेपित पत्रे | |
| (नऊ) पट्टीका, बाष्पित्र आणि उच्च ताण सामर्थ्याच्या जहाज बांधणीच्या किंवा बंदुकीच्या गोळ्यांची अभेद्य असणाऱ्या पोलादासह सामान्य मृदू पोलाद | |
| (दहा) गज आणि सळ्या | |
| (अकरा) बोल्टस्, नटस्, वॉशर्स, रिव्हेटस आणि इतर तत्सम वस्तू | |
| (बारा) काटेरी, टेलिग्राफट्या किंवा काळ्या जस्त विलेपित इतर प्रकारच्या तारा | |
| (तेरा) तार खिळे | |
| (चौदा) स्प्रिंग, पोलाद, वाहनाचे किंवा सपाट गज | |
| (पंधरा) कड्या, पट्ट्या आणि ओतकाम | |
| (सोळा) पाईप | |
| (सतरा) लोखंड व पोलादाचे भंगार आणि घरगुती वापराची तीक्ष्ण हत्यारे, लोखंडी सामानाच्या वस्तू, फर्निचर किंवा त्यांचे सुटे भाग, यंत्रे अथवा यंत्रांचे भाग या व्यतिरिक्त खास तरतूद न केलेल्या लोखंड अथवा पोलाद यापासून तयार केलेल्या इतर वस्तू | |
| ४६. सर्व प्रकारचे अलोह धातू, त्यांचे मिश्र धातू, तारा, पत्रे, लगडी, वर्तुळे आणि त्यांचे भंगार, भांडी (फर्निचर आणि त्यांचे सुटे भाग वगळून) | |
| ४७. दुचाकी, बाबागाड्या, तिचाकी, वाहनगाड्या आणि चाकाच्या धावा व ट्यूबसह त्यांचे घटक आणि सुटे भाग | |
| ४८. शिवणयंत्रे आणि त्यांचे सुटे भाग | |
| ४९. वाद्ये आणि त्यांचे सुटे भाग | |
| ४९अ. खेळाचे आणि व्यायाम शाळेचे साहित्य आणि सामग्री आणि त्याचे सुटे भाग. | |
| ५०. वृत्तपत्री कागद | |
| ५१. लाख आणि कॉर्क झाडाची साल आणि त्यापासून बनविलेल्या वस्तू | |

**अनुसूची ह**—समाप्त

| (१) | (२) |
| --- | --- |
| ५२. क्रॉकरी वगळता पोर्सेलिनची भांडी, मातीची भांडी, इनामेलची भांडी, चिनीमातीच्या वस्तू आणि चिनीमातीची भांडी | |
| ५३. सर्व प्रकारची जीवनसत्त्वे, औषधी द्रव्ये (अधिसूचित केलेल्या जीवन रक्षक औषधी द्रव्याव्यतिरिक्त). | |
| ५४. लोणारी कोळसा, कोळसा, दगडी कोळसा आणि जळाऊ लाकूड. | |
| ५४अ. सर्व प्रकारची खनिज तेले, डिझेल ऑईल, पेट्रोल, विमानाचे स्पिरीट, सर्व प्रकारची वंगणाची तेले, व्हाईट ऑईल, वातीचे तेल, भट्टीचे तेल, नैसर्गिक वायू आणि लिक्वीफाईड पेट्रोलियम गॅस यासह पेट्रोलियमजन्य वस्तू, मावा ऑईल, सेवासॉल, द्रावक तेल, इंधनाची इतर तेले, नैसर्गिक गॅसोलीन, टर्की रेड ऑईल, खनिज तेलापासून मिळणारी जोड उत्पादने आणि क्रुड ऑईल, सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत विक्री करण्यात आलेले केरोसिन वगळून अन्य केरोसिन. | |
| **गट—ड** | |
| ५५. सर्व प्रकारची साखर (ग्लुकोज, डेक्स्ट्रोज आणि कोणतीही फळाची साखर वगळून) सॅकरिन . . | [१][यथामूल्य २ टक्के.] |
| ५६. मूल्यवान धातू, चांदी आणि त्यापासून बनविलेल्या वस्तू, सर्व प्रकारचे हिरे, मोती, रत्न व खडे आणि त्यापासून बनविलेल्या वस्तू | |
| ५७. हेलिकॉप्टर्ससहित सर्व प्रकारची विमाने व त्यापैकी कोणतेही घटक, भाग व उप साधने | [१][यथामूल्य ०.१ टक्के.] |
| **गट—ई** | |
| ५८. सोने-चांदी, सोने व त्यापासून बनविलेल्या वस्तू . . | |
| **गट—फ (अवशिष्ट)** | |
| ५९. ह्या अनुसूचीमध्ये यापूर्वी आलेल्या नोंदीमध्ये आणि अनुसूची ह-१ मध्ये तरतूद केलेल्या वस्तू व्यतिरिक्त इतर सर्व वस्तू.] | [१][यथामूल्य ५.५ टक्के.] |

[१] शासकीय अधिसूचना, नगरविकास, क्रमांक बी.एम.सी. २३२२/३४७३/नवि.-२१, दिनांक ३१ जुलै २००२ अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

[1][**अनुसूची ह-१**

[मुंबई महानगरपालिका अधिनियम याचे कलम १९२ (६) पहा]

**जकातमुक्त वस्तूंची यादी**

| अनुक्रमांक (१) | वस्तू (२) |
|---|---|
| १ | गवार, सोयाबीन, भाजलेले धान्य व भातसाळी यासह अन्नधान्य पीठ, डाळी आणि सर्व प्रकारची तृण धान्ये. |
| २ | सर्व प्रकारचा गुळ. |
| ३ | सकस दूध, बनीव दूध, मलईरहित दुधाची पावडर आणि दही. |
| ४ | पाव. |
| ५ | असोला, नारळ, सुका, नारळ व खोबरे. |
| ६ | मिरच्या, बडी शेप, ओवा, हळद, धणे, मेथी, शेपा-अखंड किंवा भुकटी, अख्खे किंवा सोललेले चिंचोके. |
| ७ | खाद्यतेले आणि खाद्यतेलांच्या तेलबिया. |
| ८ | मीठ. |
| ९ | ऊस. |
| १० | ताजा भाजीपाला, बटाटे, रताळी, सुरण (याम), आले, कांदे, लसूण, ताजी फळे, विड्याची पाने आणि गवती चहा. |
| ११ | ताजे व सुके मासे. |
| १२ | पाळीव खाद्य पक्षी, अंडी आणि पाळीव खाद्यपक्ष्यांचे मांस. |
| १३ | नागवेलीच्या पानांपासून तयार करण्यात आलेले पान, तांदूळ, विडा किंवा पट्टी. |
| १४ | केळीची पाने, पळसाची पाने, पत्रावळ, द्रोण. |
| १५ | विडीची पाने. |
| १६ | विशुद्ध, खनिज, खनिज विरहित अथवा वायुमिश्रित पाणी वगळता पाणी, साधे पाणी, इंजेक्शनसाठी असलेले पाणी. |
| १७ | बर्फ व सुका बर्फ. |
| १८ | फुलांचे बी, फळांचे बी, भाज्यांचे बी, विलायती गवत व इतर वैरणचारा यांचे बी, तागाच्या व अंबाडीच्या बिया, कंद, दाणे, मूळरूपी कांडे, चोषक कांडे व ग्रंथी असलेली खोडे (खाद्यग्रंथी खोडासहित), डोळ्यावर केलेली कलमे, छेद कलमे, दाब कलमे, बीज रोपे व वनस्पती. |
| १९ | ताजी फुले. |
| २० | खते, रासायनिक खते व रसायनयुक्त खतांसह खते. |

[1] शासकीय अधिसूचना, नगरविकास, क्रमांक बी.एम.सी. २३२०/२०९२/प्र.क्र.-८२/२०००/नवि.-२१, दिनांक २७ एप्रिल २००० अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

**अनुसूची ह -१**—समाप्त

| (१) | (२) |
|---|---|
| २१ | निवास बदलल्यामुळे येणारे जुने, वापरलेले घरसामान. |
| २२ | सर्व प्रकारच्या छत्र्या आणि त्यांचे सुटे भाग. |
| २३ | झाडू. |
| २४ | सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत विक्री करण्यात आलेले केरोसिन. |
| २५ | (सामान्यतः दारूकाम म्हणून वापरण्यात येणाऱ्या आगपेट्या वगळून) सुरक्षित आगपेट्या. |
| २६ | सर्व प्राणी, वन्य प्राणी, पाळीव प्राणी. |
| २७ | प्राण्यांची हाडे, शिंग, खूर, प्राण्यांचे मृतदेह. |
| २८ | सर्व प्रकारचे खाद्य पक्षी, बदके व पक्षी. |
| २९ | रेशमाच्या किड्यांची अंडी व रेशमाच्या किड्यांचे कोश. |
| ३० | मानवी केस व प्राण्यांचे केस. |
| ३१ | मधमाशांच्या पोळ्यातील मेण, बेरीबेरीपासून मिळणारे मेण, पेट्रोलियम मेण वगळता इतर मेण. |
| ३२ | पुस्तके, पंचांग, वापरलेल्या कार्यालयीन फायली आणि दस्त ऐवज, वह्या आणि चित्रकलेच्या वह्या, उत्तरपत्रिका (कोऱ्या अथवा वापरलेल्या) बंध पोष्टकार्ड, वर्तमानपत्र, कागदाच्या धार्मिक भित्तीपत्रिका, चित्रकृती आणि तसबिरी. |
| ३३ | सर्व प्रकारच्या पाट्या, दगडी पेन्सिली, खडू, रंगकांड्या, शिसपेन्सिली, दर्शकपत्रे, ग्लोब व त्यांचे भाग, नकाशे, फाऊंटन पेन्स, बॉल पेन्स, स्टाइलोग्राफ पेन्स, इत्यादी सर्व प्रकारच्या पेन्स, प्रॉपेसिंग पेन्सिली व रिफिल्स, लिहिण्याची शाई. |
| ३४ | गारगोट्या आणि गोट्या. |
| ३५ | सर्व प्रकारची जहाजे व त्यांचे घटक, भाग व उप साधने. |
| ३६ | आयुक्तांनी वेळोवेळी अधिसूचित केलेली जीवनरक्षक औषधी द्रव्ये आणि |
| ३७ | रक्त आणि रक्ताचे उत्पादित घटक. |
| ३८ | अभ्रक, ग्रॅफाइट, अॅक्टिवेटेड अर्क (सक्रियित माती) व लाल माती. |
| ३९ | मूर्त्या, सार्वजनिक ठिकाणी उभारावयाचे पुतळे. |
| ४० | चलनी नोटा व नाणी. |
| ४१ | काकवी. ] |

[१][* * * * * *]

[२][**अनुसूची 'ज'**

[कलम २०३ आणि २०७ अ, पोट-कलम (३) पहा.]

**अटकावणीच्या किंवा जप्तीच्या अधिपत्राचा नमुना**

.......................... यांस,

(अधिपत्र बजावण्याचे काम ज्या अधिकाऱ्याकडे सोपविले असेल त्याचे नाव येथे दाखल करावे.)

**ज्याअर्थी**, श्री. अ. ब. राहणार............. .................यांनी दिनांक...........१९.......... रोजी सुरू होणाऱ्या (किंवा संपणाऱ्या) सहामाहीच्या (किंवा तिमाहीच्या) संबंधात, समासात नमूद केलेल्या * कराबद्दल येणे असलेल्या रक्कम ...................... ची आणि [३][उक्त अ.ब. यांच्याकडे उक्त रकमेची रीतसर लेखी मागणी करून त्या मागणीची नोटीस/आदेश त्यांच्यावर बजावल्यापासून पंधरा दिवस होऊन गेले ] असूनसुद्धा त्यांनी ती रक्कम भरलेली नाही [४][* * * * * *] ;

**त्याअर्थी,** यावरून तुम्हास असा आदेश देण्यात येत आहे की, उक्त अ.ब. यांचा........ इतक्या उक्त रकमेचा, आणि उक्त रकमेच्या वसुलीचा परिव्यय भागवण्यास पुरेसा होईल असा आणखी रकमेचा माल व चीजवस्तू (किंवा यथास्थिति, ज्या परिवास्तूच्या बाबतीत उक्त कर येणे आहे त्या परिवास्तूवरील कोणताही माल व चीजवस्तू) अटकावून ठेवावी/कोणतीही मालमत्ता जप्त करावी आणि या अधिपत्राखाली तुम्ही अटकावून ठेवलेला माल व चीजवस्तू यांचा/जप्त केलेल्या मालमत्तेचा सर्व तपशील प्रमाणित करून अधिपत्रासह ताबडतोब माझ्याकडे पाठवावा.

दिनांक १९ .

(सही)

[५][बृहन्मुंबई] महानगरपालिका आयुक्त.]

---

[१] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ५५ अन्वये अनुसूची आय वगळण्यात आली.

[२] सन १९५३ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६४, कलम २५ अन्वये मूळ अनुसूचीऐवजी ही अनुसूची दाखल करण्यात आली.

[३] सन २००९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११, कलम ५६ (२) अन्वये हा मजकूर बदली दाखल करण्यात आला.

[४] वरील अधिनियमाच्या कलम ५६ (१) अन्वये "किंवा ती न भरण्याबद्दल माझे समाधान होईल असे पुरेसे कारण दाखलेले नाही" हा मजकूर वगळण्यात आला.

[५] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१)४(१३) अन्वये मूळ मजकूराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

* येथे कराचे वर्णन करावे.

## अनुसूची ‘ के ’

(कलम २०५ पहा)

**वस्तूसूचीचा व नोटिशीचा नमुना**

श्री. अ. ब. राहणार..........................यांस नोटीस देण्यात येते की, मी आज रोजी दिनांक.................. १९...........पासून सुरू होणाऱ्या (किंवा संपणाऱ्या) सहामाहीच्या (किंवा तिमाहीच्या), समासात नमूद केलेल्या कराबद्दल * येणे असलेल्या.............एवढ्या रकमेकरिता खाली दिलेल्या वस्तूसूचीत विनिर्दिष्ट केलेल्या मालाचे व चीजवस्तूचे अधिग्रहण केले आहे ; आणि जर या नोटिशीच्या तारखेपासून पाच दिवसांच्या आत........................ येथील महानगरपालिकेच्या कार्यालयात उक्त येणे रक्कम, वसुलीच्या परिव्ययासह भरली नाही तर तो माल आणि चीजवस्तू विकण्यात येईल.

आज दिनांक .................. सन १९..........

(अधिपत्र बजावणाऱ्या अधिकाऱ्याची सही).

**वस्तूसूची**

(येथे अधिग्रहण केलेल्या मालाचा व चीजवस्तूचा तपशील द्यावा)

[१][* * * * * * * * ]

[२][**अनुसूची ‘ म ’**

(कलम ३९४ पहा)

**भाग एक**

**कोणत्याही परिवास्तूत किंवा परिवास्तूवर लायसनवाचून ठेवण्यात येणार नाहीत अशा वस्तू**

**स्फोटके**

**गट एक**

**बंदुकीची दारू (सुरुंग दारू)**

**गट दोन**

अक्वेनाईट, ॲक्वेरेक्स, अक्वेरम, जीएन-१, पॉवरफ्लो-१, पॉवरफ्लो-२, पॉवरफ्लो-३, नोबेलाईट, पल्वेरेक्स, ॲक्वेडाईन, ॲक्वेनाल, गॉडीन, पॉवरफ्लो-२, सुपरजेल मरिनेक्स-जी, ॲक्वेडाईन-दोन-१९७५.

पॉवरेक्स, पॉवराईट, पॉवरप्लास्ट, पीआरएम-१०१, पीआरएम-१०२, पीआरएम-१०३, पीआरएम-आयएल, एनर्जेल, फॉर्मडाइन, फॉर्माजेल, मोनोडाइन, मोनोएक्स, सुपरडाय, नोमोनाईट, अनफो.

---

[१] सन १९७६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४२, कलम १७ अन्वये अनुसूची ‘ ल ’ वगळण्यात आली.

[२] **महाराष्ट्र शासन राजपत्र,** असाधारण, भाग एक-अ, दिनांक २६ ऑक्टोबर १९७९ यामध्ये पृष्ठे ८१-१०१ (इंग्रजी) यांवर प्रसिद्ध करण्यात आलेली शासकीय अधिसूचना, नगरविकास व सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक बीएमसी. १०७८/२७/यूडी-३, दिनांक २६ ऑक्टोबर १९७९ अन्वये अनुसूची ‘ म ’बदली दाखल करण्यात आली.

* येथे कराचे वर्णन द्यावे.

## गट तीन

### विभाग १

अजॅक्स-जी, कॅलिस्टाइट, बॅलेक्स जी-आय सुरुंगाचे जिलेटीन, कॉर्डेइट, कॉर्डाइट-ए, कॉर्डाइट-एएन, कॉर्डाइट-सीडी, कॉर्डाइट-एमडी, कॉर्डाइट-डब्ल्यू, कॉर्डाइट-डब्ल्यूएम, जिलेटिन, जिलेटिन डायनामाईट, जेलिग्नाईट, जिओफेक्स, गोमिया जिलेटिन ४० टक्के, गोमिया जिलेटिन ५० टक्के.

सिस्मिक जिलेटिन ९० टक्के, सिस्मिक जिलेरिंग ८० टक्के, सिस्मोपाक, सॉलिजेक्स, विशेष जिलेटिन, सबमरिन ब्लास्टिंग जिलेटिन, युनिफ्रेक्स, हेक्टराइट, हायड्रोबेल, सुधारित बेलिस्टाइट, अल्फाजेल, अल्फाप्रुफ, नोबेल ग्लासगो शॉटगन पावडर, नोबेल पॅरबेलम पावडर, नोबेल रिमफायर पावडर, ओपेनालास्ट जेलिग्नाइट, प्लास्टर जिलेटिन.

हे धरून व्यवस्थापनाचा निव्वळ परिव्यय सुरूवातीस सर्वसाधारण लेख्याच्या खर्च खाती टाकण्यात येईल ; व प्रत्येक वित्तीय वर्षाच्या अखेरीस, भांडवली लेखा व सर्वसाधारण लेखा यांमध्ये [२][स्थायी समिती] निर्धारित करील त्या प्रमाणात संविभाजित करण्यात येईल.]

---

## [३][**अनुसूची बबअ**

## कलम १२३क खाली लेखे ठेवणे

**१.** कलम १२३क खाली ठेवावयाचे लेखे हे शिक्षण निधि लेख्याच्या नमुन्यामध्ये ठेवण्यात येतील.

**२.** महानगरपालिकेला किंवा तिच्या वतीने मिळालेला सर्व पैसा आणि महानगरपालिकेने कलम ६१, खंड (क्यू) च्या प्रयोजनांसाठी द्यावयाची सर्व अंशदाने शिक्षण निधि लेख्याकडे जमा करण्यात येतील व त्यामध्ये पुढील रकमांचा समावेश करण्यात आला पाहिजे—

(अ) उक्त खंडाच्या प्रयोजनांसाठी महानगरपालिकेने धारण केलेल्या कोणत्याही मालमत्तेची विल्हेवाट करून मिळालेले सर्व उत्पन्न ;

(ब) उक्त खंडाच्या प्रयोजनांसाठी धारण केलेली कोणतीही स्थावर मालमत्ता पट्ट्याने दिल्यामुळे मिळणारे सर्व भाडे ;

---

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम ३२(४) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २०६ अन्वये “ महापौरासह परिषद ” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[३] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ७८ अन्वये अनुसूची **बबअ** समाविष्ट करण्यात आली.

(क) महानगरपालिका शाळांमध्ये (कलम १२० च्या तरतुदी ज्यास लागू आहेत त्या दंडाची रक्कम वगळता) मिळालेल्या सर्व फीच्या व दंडांच्या रकमा ;

(ड) उक्त खंडाच्या प्रयोजनांसाठी महानगरपालिकेने धारण केलेल्या पैशांतून केलेल्या कोणत्याही संव्यवहारापासून उद्‌भवणारे सर्व व्याज किंवा नफा ;

(ई) प्राथमिक शिक्षणाच्या प्रयोजनांसाठी राज्य शासनाकडून किंवा इतर कोणत्याही साधनापासून अंशदान, दान किंवा अनुदान म्हणून मिळालेला सर्व पैसा ; [१]*

[२][(फ) सर्वसाधारण कर या शीर्षाखाली मागील वर्षात महानगरपालिकेने वसूल केलेल्या प्रत्यक्ष निव्वळ रकमा, किंवा सर्वसाधारण कराऐवजी दिलेल्या रकमा, (थकबाकी व आगाऊ दिलेल्या रकमा धरून) यांच्या पाच पटीइतक्या रकमेस, उक्त वित्तीय वर्षासाठी सर्वसाधारण कराचा जो दर निश्चित केलेला असेल त्या दराने भागून आलेली रक्कम ;]

[३][(७) महानगरपालिकेने कलम १२९ खाली अंतिम स्वरूपात अंगीकारलेले कलम २६-क, खंड (क-१) खाली अंदाजलेली रक्कम.]

**३.** कलम ६१, खंड (क्यू) च्या प्रयोजनांसाठी महानगरपालिकेने केलेला सर्व खर्च व पुढे दिलेला सर्व खर्च शिक्षण निधी लेख्याच्या खर्चखाती घालण्यात येईल :—

(अ) शिक्षण अधिकाऱ्यांचे वेतन व भत्ते ;

(ब) शिक्षण अधिकाऱ्यांच्या अधीन त्यांच्या कार्यालयात काम करणाऱ्या सर्व महानगरपालिका अधिकाऱ्यांची व कर्मचाऱ्यांची वेतने व भत्ते ;

(क) महानगरपालिकेने चालवलेल्या प्राथमिक शाळांत कामावर नेमलेले सर्व मास्तर, शिक्षक व इतर व्यक्ती यांची वेतने व भत्ते ;

(ड) उप-खंड (अ), (ब) किंवा (क) मध्ये उल्लेख केलेल्या जागांपैकी कोणत्याही जागेवर कामावर नेमलेल्या किंवा पूर्वी कामावर असलेल्या अधिकाऱ्यांस व कर्मचाऱ्यांस किंवा त्यांच्या बाबतीत महानगरपालिकेने भविष्य निर्वाहनिधी, निवृत्तीवेतने, उपदाने, आणि अनुकंपा भत्ते यांसाठी द्यावयाची अंशदाने ;

(ई) कलम ६१, खंड (क्यू) च्या प्रयोजनांसाठी आयुक्तास प्रदान केलेल्या किंवा त्यांच्यावर लादलेल्या अधिकारांपैकी कोणताही अधिकार वापरताना किंवा कर्तव्यांपैकी कोणतेही कर्तव्य बजावताना त्याने केलेला सर्व परिव्यय व खर्च ; अशा रकमेत भरपाई म्हणून त्यास देणे आवश्यक आहे किंवा देण्याचा अधिकार प्रदान करण्यात आला आहे अशा सर्व रकमांचा समावेश होतो ;

(फ) कलम ६१, खंड (क्यू) च्या प्रयोजनांसाठी महानगरपालिकेने हाती घेतलेल्या कारवाईतून उद्‌भवलेल्या कोणत्याही कार्यवाहीत महानगरपालिकेच्या विरूद्ध किंवा पदसिद्ध नात्याने आयुक्त किंवा शिक्षणाधिकारी यांजविरूद्ध दिवाणी किंवा फौजदारी न्यायालयाच्या हुकूमनाम्याखाली किंवा आदेशाखाली किंवा तत्सम परिस्थितीत कोणताही दावा किंवा इतर कायदेविषयक कार्यवाही किंवा हक्कमागणी या संबंधाने कलम ५१७ खाली केलेल्या तडजोडीखाली देण्याजोगी प्रत्येक रक्कम ;

---

[१] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ८(१) अन्वये " आणि " हा शब्द वगळण्यात आला.

[२] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम २७ अन्वये मूळ खंडाऐवजी हा खंड दाखल करण्यात आला. ही सुधारणा १ जानेवारी १९५१ पासून केली असल्याचे मानण्यात येईल.

[३] सन १९५८ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ८(२) अन्वये हा खंड जादा दाखल करण्यात आला.

(ग) शाळांच्या इमारती बांधण्यासाठी किंवा अन्यथा कलम ६१, खंड (ग) च्या प्रयोजनांसाठी उभारलेल्या कर्जांच्या बाबतीतील सर्व व्याज व ऋण आकार ; आणि

(ह) शाळा चिकित्सालये चालवण्यासाठी व शाळेतील मुलांच्या वैद्यकीय निरीक्षणासाठी केलेल्या परिव्ययाची व खर्चाची रक्कम.]

---

## [1][अनुसूची कक

(कलम ३५४ एस पहा)

### [2][प्रकरण १२-अ खाली] जमिनीच्या संपादनाचे विनियमन करणाऱ्या भूमि संपादन अधिनियम, १८९४ यांचे भागांश

**भाग एक**—प्रारंभिक, कलम ३, खंड (ई) व (फ) खेरीज करून.

**भाग दोन**—संपादन करणे, कलम ४, पोट-कलम (१), कलम ६ व कलम १७, पोट-कलम (२) खेरीज करून.

**भाग तीन**—न्यायालयांकडे पाठविलेली प्रकरणे व त्यासंबंधीच्या कामाची कार्यपद्धती, कलम २३, पोट-कलम (२) व कलम २४, खंड (६) व (७) खेरीज करून.

**भाग चार**—भरपाईच्या रकमेचे संविभाजन.

**भाग पाच**—प्रदान.

**भाग सहा**—जमिनीचा तात्पुरता भोगवटा.

**भाग आठ**—संकीर्ण.]

---

## [1][अनुसूची डड

(कलम ३५४ एस पहा)

### सुधारणा प्रयोजनांसाठी करावयाच्या सक्तीच्या संपादनासाठी जादा भरपाईचे प्रमाण

| दिलेल्या भरपाईची रक्कम | कलम ३५४-एस खाली द्यावयाच्या अधिक रकमेची टक्केवारी. |
|---|---|
| दहा हजार रुपयांहून अधिक नाही अशा रकमेवर किंवा रक्कम दहा हजार रुपयांहून अधिक असेल तर पहिल्या दहा हजारांवर. | सहा टक्के |
| दहा हजारांहून अधिक परंतु पन्नास हजारांहून अधिक नाही अशा रकमेच्या बाबतीत दहा हजारांहून जेवढी रक्कम अधिक असेल त्यावर. | चार टक्के |
| पन्नास हजार रुपयांहून अधिक परंतु एक लाखाहून अधिक नाही अशा रकमेच्या बाबतीत पन्नास हजारांहून जेवढी रक्कम अधिक असेल त्यावर. | तीन टक्के |
| एक लाखाहून अधिक अशा रकमेच्या बाबतीत एक लाखाहून जेवढी रक्कम अधिक असेल त्यावर. | अडीच टक्के.] |

---

[1] सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक १३, कलम ३७ अन्वये ही अनुसूची समाविष्ट करण्यात आली.

[2] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम ३२ अन्वये "सुधारणेच्या प्रयोजनांसाठी" याऐवजी हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

## [१][**अनुसूची ईई**

(कलम १३६ पहा)

### महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाची कर्तव्ये व अधिकार

**१.** (१) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक, या अधिनियमाच्या कलम ७८-ब खाली नेमलेले सहायक लेखापरीक्षक, लिपिक व कर्मचारी यांचे सहाय्य घेऊन, यात यानंतर तरतूद केल्याप्रमाणे महानगरपालिकेच्या लेख्यांची लेखापरीक्षा करील.

(२) या अनुच्छेदाखाली आपली कार्ये बजावताना महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक--

(एक) महानगरपालिकेच्या महसुलातून केलेला [२]** खर्च, कर्ज उभारून केलेल्या कामामुळे आलेला खर्च आणि विशेष निधींतून केलेला [२]** खर्च यांची लेखापरीक्षा करील व त्यामध्ये संवितरण केल्याचे म्हणून दाखवलेला पैसा ज्या प्रयोजनांसाठी व सेवेसाठी उपयोजित करण्यात आला किंवा खर्च करण्यात आला त्या प्रयोजनासाठी किंवा सेवेसाठी तो कायदेशीररीत्या उपलब्ध होता व उपयोजित करण्यात आला किंवा कसे याची आणि ज्या प्राधिकाराद्वारे तो खर्च शासित होत असेल त्या प्राधिकारान्वयेच तो खर्च करण्यात आला आहे किंवा कसे याची खात्री करून घेईल.

(दोन) महानगरपालिकेचे [२]** ऋण, ठेव, कर्जनिवारण निधी, आगाऊ दिलेल्या रकमा, निलंबन आणि भरणा केलेल्या रकमा यांच्या लेख्यांची लेखापरीक्षा करील आणि त्या लेख्यासंबंधाने आणि त्या संबंधातील शिल्लक रकमा बरोबर आहेत किंवा नाहीत, यासंबंधीच्या पडताळणीतून निष्पन्न झालेल्या गोष्टीसंबंधाने अहवाल देईल.

(३) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक, महानगरपालिकेच्या कोणत्याही विभागामध्ये चालवलेल्या वाणिज्यिक सेवांच्या संबंधातील लेख्यांच्या विवरणांची तपासणी व लेखापरीक्षा करील ; त्यामध्ये उदीम, वस्तुनिर्माण आणि नफा व तोटा विषयक लेखे आणि जर असे लेखे [३][महानगरपालिका], [४][स्थायी समिती किंवा मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रम समिती] यांच्या आदेशाखाली ठेवण्यात येत असतील तर ताळेबंद यांचा समावेश असेल ; आणि तो हे लेखे प्रमाणित करील व त्यावरील अहवाल देईल.

(४) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षक [५][स्थायी समितीशी] विचारविनिमय करून आणि महानगरपालिकेने दिलेल्या कोणत्याही निदेशांच्या अधीनतेने, महानगरपालिकेच्या लेख्यांवरील त्याचे

---

[१] सन १९३८ चा मुंबई अधिनियम क्रमांक २, कलम ९ अन्वये ही अनुसूची समाविष्ट करण्यात आली.

[२] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७६, कलम ४२ अन्वये "संपूर्ण" हा शब्द वगळण्यात आला.

[३] सन १९४८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४८, कलम ६० अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[४] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २०७(अ) (एक) अन्वये "महापौरासह परिषद" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[५] वरील अधिनियमाच्या कलम २०७ (अ)(दोन) अन्वये "महानगर लेखा समितीशी" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

अहवाल कोणत्या नमुन्यात व कोणत्या रीतीने तयार केले पाहिजेत तो नमुना व ती रीत निर्धारित करील आणि हे अहवाल तयार करण्यासाठी आवश्यक असेल ती माहिती देण्यासाठी महानगरपालिकेच्या कोणत्याही अधिकाऱ्यास बोलावण्याचा प्राधिकार त्यास असेल.

**२.** (१) महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास, त्यास महानगरपालिकेच्या ज्या लेख्यांची लेखापरीक्षा करावी लागणार असेल अशा कोणत्याही लेख्याच्या संबंधात त्यास योग्य वाटेल अशी विचारणा करता येईल व अभिप्राय व्यक्त करता येतील आणि अशा लेख्यासंबंधी त्यास योग्य वाटतील अशी प्रमाणके, विवरणपत्रे, विवरणे, आणि स्पष्टीकरणे मागवता येतील.

(२) पूर्वोक्तानुसार अशी प्रत्येक विचारणा किंवा अभिप्राय, ज्याला उद्देशून लिहिण्यात आला असेल असा अधिकारी किंवा प्राधिकारी तो तात्काळ विचारात घेईल आणि आवश्यक प्रमाणके, दस्तऐवज, किंवा स्पष्टीकरण यांसहित विनाविलंब मुख्य लेखापरीक्षकाकडे परत पाठवील.

(३) महानगरपालिकेच्या महसुलातून केलेला खर्च अमान्य करण्यासंबंधीचे महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाचे अधिकार व अशा खर्चाच्या संबंधातील आक्षेप निकालात काढण्याच्या संबंधातील कार्यपद्धती ही, [१][स्थायी समितीने मुख्य लेखापरीक्षकाशी विचारविनिमय करून तयार केलेल्या व खर्च महानगरपालिका निधीतून केला जात असेल तर, महानगरपालिकेने मंजुरी दिलेल्या व मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रम निधीतून केला जात असेल तर मुंबई वीजपुरवठा व परिवहन उपक्रम समितीने] मंजुरी दिलेल्या नियमांनी किंवा आदेशांनी विहित केल्याप्रमाणे असेल.

**३.** ज्या लेख्यांची लेखापरीक्षा करणे आवश्यक असेल अशा कोणत्याही लेख्यांच्या संबंधातील संपूर्ण लेखापरीक्षेचे काम किंवा लेखापरीक्षेच्या कोणत्याही भागांशाचे काम असे लेखे मूलतः ज्या कार्यालयांतील असतील त्या कार्यालयांत चालवणे आवश्यक आहे असे महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास वाटेल तर त्यास, हे लेखे, त्या संबंधातील सर्व पुस्तके व दस्तऐवज यांसहित उक्त कार्यालयांत निरीक्षणासाठी, सर्व सोईस्कर वेळी उपलब्ध करून देण्याबाबत फर्मावता येईल.

**४.** महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास त्यास ज्या लेख्यांची लेखापरीक्षा करणे आवश्यक असेल अशा लेख्यांसंबंधातील कोणतीही पुस्तके किंवा इतर दस्तऐवज निरीक्षणासाठी पाठवण्याविषयी फर्माविण्याचा अधिकार असेल :

परंतु, जर दस्तऐवज गोपनीय असतील तर त्यांतील मजकूर उघडकीस न येऊ देण्यास तो जबाबदार असेल.

**५.** महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकास लेखापरीक्षेच्या संबंधातील, विशेषकरून लेखापरीक्षा लागू करण्याची पद्धत व तिची व्याप्ती आणि आक्षेप उपस्थित करणे व त्यांचा पाठपुरावा करणे यांसंबंधातील, सर्व बाबतीत नियम तयार करता येतील आणि निदेश देता येतील.

**६.** महानगरपालिका मुख्य लेखापरीक्षकाने खर्चास दिलेल्या मंजुरीसंबंधीची लेखापरीक्षा ही महानगरपालिकेने नामनिर्दिष्ट करावयाचा अधिकारी करील.]

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २०७ब अन्वये मूळ मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[1][**अनुसूची फफ** *

[मुंबई नगरपालिका (हद्दी वाढवण्याबाबत) अधिनियम, १९५०, कलम ३४]

**विशेष व संक्रमणकालीन तरतुदी**

**१.** नेमलेल्या तारखेस उपनगरांतील स्थानिक प्राधिकरणासमोर किंवा अशा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही प्राधिकाऱ्यासमोर प्रलंबित असलेल्या ज्या कार्यवाह्या, मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदींखाली आयुक्तापुढे दाखल करणे किंवा आयुक्ताने हाती घेणे आवश्यक असतील अशा सर्व कार्यवाह्या त्याच्याकडे हस्तांतरित करण्यात आल्या आहेत व त्या त्याने चालू ठेवल्या आहेत असे मानण्यात येईल, आणि अशा ज्या इतर कार्यवाह्या, उक्त अधिनियमाच्या तरतुदींखाली ज्या प्राधिकाऱ्यासमोर दाखल करावयाच्या असतील किंवा ज्या प्राधिकाऱ्याने त्या हाती घ्यावयाच्या असतील त्या प्राधिकाऱ्याकडे, शक्य असेल तेथवर हस्तांतरित करण्यात आल्या आहेत आणि त्या अशा अधिकाऱ्याने चालू ठेवल्या आहेत असे मानण्यात येईल.

**२.** उपनगरांतील स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही प्राधिकाऱ्यासमोर, नेमलेल्या तारखेस प्रलंबित असलेली सर्व अपिले, व्यवहार्य असेल तेथवर, ती दाखल करण्यात आली त्यावेळी जणू काही ती उपनगरे [2][बृहन्मुंबईत] समाविष्ट असावीत त्याप्रमाणे निकालात काढली जातील.

**३.** उपनगरांतील स्थानिक प्राधिकरणाने किंवा त्याच्या वतीने दाखल केलेले सर्व खटले आणि नेमलेल्या तारखेस प्रलंबित असलेले व अशा स्थानिक प्राधिकरणाने किंवा अशा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही प्राधिकाऱ्याने किंवा त्याच्या विरुद्ध दाखल केलेले सर्व दावे किंवा इतर कायदेविषयक कार्यवाह्या या, असा खटला, दावा किंवा कार्यवाह्या दाखल करण्यात आल्या त्यावेळी जणू काही तो उपनगर [2][बृहन्मुंबईत] समाविष्ट केलेली असावीत त्याप्रमाणे यथास्थिति, आयुक्तांनी किंवा महानगरपालिकेने अथवा आयुक्ताविरुद्ध किंवा महानगरपालिकेविरुद्ध चालवल्या जातील.

**४.** (१) उपनगरांतील प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाचे सर्व अधिकार नेमलेल्या तारखेस महानगरपालिकेमध्ये निहित होतील.

(२) उपनगरांतील कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाला येणे असलेल्या सर्व रकमा—मग त्या कोणत्याही कराबद्दल किंवा इतर कोणत्याही बाबीबद्दल येणे असोत—आयुक्ताने वसूल करण्याजोग्या असतील आणि अशा वसुलीच्या प्रयोजनासाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियम अंमलात आला नसता आणि उक्त उपनगरे [2][बृहन्मुंबईत] समाविष्ट करण्यात आली नसती तर अशा स्थानिक

---

[1] सन १९५० चा मुंबई अधिनियम क्रमांक ७, कलम ३४ अन्वये अनुसूची 'फफ' जादा दाखल करण्यात आली.

* उक्त अधिनियमाखाली रचना केलेल्या नगरपालिका प्राधिकरणांच्या प्राधिकारांच्या अधीनतेने हद्दी वाढवल्यामुळे होणाऱ्या परिणामांसंबंधीच्या व त्यातून उद्‌भवणाऱ्या बाबींचे विनियमन करण्याकरिता अनुसूचित समाविष्ट असलेली तरतूद व तिच्याशी संबद्ध इतर बाबी मूळ मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये अधिनियमित केलेल्या असाव्यात त्याप्रमाणे प्रवर्तनात येतील.

[2] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(१८)ब अन्वये "ग्रेटर बॉम्बे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

प्राधिकरणाला किंवा अधिकाऱ्याला जी उपाययोजना करता आली असती किंवा जी कार्यवाही दाखल करता आली असती अशी कोणतीही उपाययोजना करण्यास किंवा कार्यवाही दाखल करण्यास तो सक्षम असेल.

(३) नेमलेल्या तारखेच्या निकटपूर्वी उपनगरातील कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने किंवा त्याच्या वतीने घेतलेली व उक्त तारखेस अस्तित्वात असलेली सर्व ऋणे व आबंधने आणि केलेल्या सर्व संविदा या, आयुक्ताने, [१][मुंबई महानगरपालिका अधिनियमान्वये] त्याला मिळालेल्या अधिकारांचा वापर करून घेतलेली ऋणे, आबंधने किंवा केलेल्या संविदा आहेत असे मानले जाईल. १८८८ चा मुंबई ३.

(४) मुंबई उपनगर जिल्ह्याच्या जिल्हा शाळा मंडळाचे व मुंबई उपनगर जिल्ह्याच्या जिल्हा स्थानिक मंडळाचे [२][बृहन्मुंबई] समाविष्ट न केलेल्या, केवळ त्यांच्या प्राधिकाराच्या अधीन असलेल्या क्षेत्राबाबतचे हक्क, येणे असलेल्या रकमा, ऋणे, आबंधने यांच्या संबंधात हा परिच्छेद जणू " महानगरपालिका " व " आयुक्त " या शब्दांऐवजी " यथास्थिती, ठाणे जिल्ह्याचे जिल्हा शाळा मंडळ किंवा ठाणे जिल्ह्याचे जिल्हा स्थानिक मंडळ " हे शब्द दाखल केलेले असावेत आणि जणू काही मुंबई महानगरपालिका अधिनियमासंबंधाने केलेला उल्लेख हा, यथास्थिति, मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७ किंवा मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३ याचा उल्लेख असावा त्याप्रमाणे लागू होईल. १९४७ चा मुंबई ६१. १९२३ चा मुंबई ६.

५. (१) मुंबई महानगरपालिका अधिनियमाचे कलम ३४९ई यात जी तरतूद केली असेल ती खेरीज करून, नेमलेल्या तारखेपूर्वी मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१ मुंबई नगरपालिका बरो अधिनियम, १९२५, मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३, मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९३३, आणि मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७ खाली केलेली, काढलेली किंवा मंजूर केलेली कोणतीही अधिसूचना, नोटीस, आदेश, परियोजना, परवाना, लायसन, परवानगी, नियम, उपविधी किंवा नमुना हा, यथास्थिति, मुंबई महानगरपालिका अधिनियम किंवा मुंबई शहर प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९२० याच्या तरतुदींशी विसंगत नसेल तेथवर यथास्थिती, मुंबई महानगरपालिका अधिनियम, किंवा मुंबई शहर प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९२० याखाली केलेल्या, काढलेल्या, किंवा मंजूर केलेल्या कोणत्याही अधिसूचनेअन्वये, नोटिशीअन्वये, आदेशान्वये, परियोजनेअन्वये, लायसनअन्वये, परवानगीअन्वये, नियमान्वये, उप विधिअन्वये किंवा नमुन्यान्वये त्याचे अधिक्रमण करण्यात येणार नाही तोपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहील. १९०१ चा मुंबई ३. १९२५ चा मुंबई १८. १९२३ चा मुंबई ६. १९३३ चा मुंबई ६. १९४७ चा मुंबई ६१. १९२० चा मुंबई १५.

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४(१८)अ अन्वये " बॉम्बे महानगरपालिका अधिनियमान्वये " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २, अनुसूची (१) ४(१८)ब अन्वये " ग्रेटर बॉम्बे " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

१९०१ चा मुंबई ३. १९२५ चा मुंबई १२. १९२३ चा मुंबई ६. १८८९ चा मुंबई १. १९३३ चा मुंबई ६.

(२) मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१, मुंबई नगरपालिका बरो अधिनियम, १९२५, मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३, मुंबई ग्रामस्वच्छता अधिनियम, १८८९ किंवा मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९३३ याखाली केलेली सर्व निर्धारणे, मूल्यांकने, मोजण्या व विभागण्या या, मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदींशी त्या सुसंगत असतील तेथवर, या अधिनियमाखाली केलेल्या आहेत असे मानण्यात येईल.

(३) उप-परिच्छेद (४) ते (९) (दोन्ही धरून) यांच्या तरतुदींच्या अधीनतेने, नेमलेल्या तारखेच्या निकटपूर्वी, मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हा स्थानिक मंडळ आणि मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हा शाळा मंडळ यांहून अन्य असे उपनगरातील कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेत असणारे सर्व अधिकारी व कर्मचारी हे, मुंबई महानगरपालिका अधिनियमाखाली महानगरपालिकेने कामावर नेमलेले अधिकारी व कर्मचारी असतील आणि नेमलेल्या तारखेच्या निकटपूर्वी संबंधित स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेत असताना त्यांना सेवेच्या ज्या शर्ती लागू होत्या त्यापेक्षा कमी हितकारक नसतील अशा सेवेच्या शर्ती त्यांस लागू होतील.

(४) नेमलेल्या तारखेपूर्वी उक्त अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने धारण केलेल्या पदाचे स्वरूप काहीही असले तरी, उक्त अधिकारी किंवा कर्मचारी यांच्या अर्हता, अनुभव व पूर्वीच्या वित्तलब्धी विचारात घेऊन, महानगरपालिकेच्या किंवा आयुक्ताच्या मते योग्य असेल अशा कोणत्याही पदावर उक्त अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास नेमण्यास महानगरपालिका किंवा आयुक्त सक्षम असेल.

(५) नेमलेल्या तारखेपूर्वी अशा अधिकाऱ्यांनी केलेली सेवा ही, महानगरपालिकेत करण्यात आलेली सेवा आहे असे मानण्यात येईल.

(६) नेमलेल्या तारखेच्या निकटपूर्वी, भत्ते वगळून ज्यांचे मासिक वेतन पाचशे रुपयांहून जास्त नव्हते असे अधिकारी व कर्मचारी यांच्या बाबतीत आयुक्त किंवा इतर अधिकारी व कर्मचारी यांच्या बाबतीत महानगरपालिका ही, जो कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी, आयुक्ताच्या किंवा महानगरपालिकेच्या मते महानगरपालिकेच्या सेवेसाठी आवश्यक किंवा योग्य नसेल अशा अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास त्याच्या सेवेच्या शर्तीअनुसार, त्यास देणे अवश्य असेल, अशी नोटीस त्यास दिल्यानंतर त्याची सेवा बंद करण्यास सक्षम असेल आणि याप्रमाणे सेवा बंद केलेल्या प्रत्येक अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास, जर महानगरपालिका व इतर नगरपालिका प्राधिकरणांच्या प्राधिकाराखालील क्षेत्राच्या हद्दी उपनगरांपर्यंत वाढवण्यात आल्या नसत्या तर असमर्थतेमुळे सेवा बंद केल्याने जी रजा किंवा जे निवृत्तिवेतन किंवा जे उपदान मिळण्याचा त्यास हक्क मिळाला असता ती रजा, ते निवृत्तिवेतन किंवा ते उपदान मिळण्याचा हक्क असेल.

(७) मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हा स्थानिक मंडळ, वांद्रे बरो नगरपालिका, कुर्ला बरो नगरपालिका, पार्ले-अंधेरी बरो नगरपालिका व घाटकोपर-किरोळ बरो नगरपालिका यांच्या मुख्य अधिकाऱ्यांना किंवा अशा मुख्य अधिकाऱ्यांपैकी कोणाही एकास किंवा अनेकांस, महानगरपालिकेच्या मते ते ज्या नेमणुकांसाठी अर्ह असतील अशा महानगरपालिकेच्या अखत्याराखालील नेमणुकांवर, नेमलेल्या तारखेपासून नेमण्यात महानगरपालिका सक्षम असेल :

परंतु, याप्रमाणे मुख्य अधिकारी नेमला नसेल तर महानगरपालिकेच्या व इतर महानगरपालिका प्राधिकरणांच्या अखत्याराखालील क्षेत्राच्या हद्दी उपनगरांपर्यंत वाढवण्यात आल्या नसतील तर, उक्त मुख्य अधिकाऱ्यास संबंधित स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतून असमर्थ ठरल्याप्रमाणे कमी केले असता जी रजा, जे निवृत्तिवेतन किंवा उपदान मिळाले असते ती रजा, ते निवृत्तिवेतन किंवा ते उपदान त्यास देण्यात येईल.

(८) राज्य शासनास, आदेशाद्वारे, नेमलेल्या तारखेच्या निकटपूर्वी मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हा स्थानिक मंडळ किंवा मुंबई उपनगर जिल्ह्याचे जिल्हा शाळा मंडळ याच्या सेवेत असलेल्या कोणत्या अधिकाऱ्यांना किंवा कर्मचाऱ्यांना किंवा कोणत्या वर्गातील अधिकाऱ्यांना किंवा कर्मचाऱ्यांना महानगरपालिकेच्या, ठाणे जिल्ह्याच्या जिल्हा स्थानिक मंडळाच्या आणि ठाणे जिल्ह्याच्या जिल्हा शाळा मंडळाच्या सेवेत घेण्यात आले पाहिजे ते विनिर्दिष्ट करता येईल. असा आदेश काढल्यानंतर महानगरपालिका, ठाणे जिल्ह्याचे जिल्हा स्थानिक मंडळ आणि ठाणे जिल्ह्याचे जिल्हा शाळा मंडळ अशा आदेशाचे अनुपालन करील आणि उप परिच्छेद (३) ते (६) याच्या तरतुदी आवश्यक त्या फेरफारांसह अशा अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या बाबतीत लागू होतील.

(९) या परिच्छेदाखाली अशा कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची महानगरपालिकेच्या ठाणे जिल्ह्याच्या जिल्हा स्थानिक मंडळाच्या किंवा ठाणे जिल्ह्याच्या जिल्हा शाळा मंडळाच्या सेवेसाठी बदली करण्यात आली असेल आणि महानगरपालिकेने किंवा अशा जिल्हा स्थानिक मंडळाने किंवा शाळा मंडळाने दिलेल्या कोणत्याही आदेशामुळे असा कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी व्यथित झाला असेल तर अशा अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास राज्य शासनाकडे अपील करता येईल.

**६.** मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७ खाली मंजूर झालेली किंवा मंजूर झाल्याचे मानण्यात आलेली आणि नेमलेल्या तारखेच्या निकटपूर्वी उपनगरातील कोणत्याही क्षेत्रात अंमलात असलेली सक्तीच्या शिक्षणाची प्रत्येक योजना ही जणू काही, मुंबई शहर प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९२०, कलम ३ खाली अशा क्षेत्राच्या संबंधात महानगरपालिकेने घोषणा केलेली असावी त्याप्रमाणे अंमलात येईल. (१९४७ चा मुंबई ६१. १९२० चा मुंबई १५.)

**७.** मुंबई शहर रचना अधिनियम, १९१५, यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, उक्त अधिनियमाखाली उपनगरातील कोणत्याही क्षेत्राच्या बाबतीत केलेली किंवा मंजूर केलेली कोणतीही परियोजना किंवा हाती घेतलेली कोणतीही कार्यवाही ही, उक्त अधिनियमाखाली स्थानिक प्राधिकरण म्हणून महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या संबंधात केलेली किंवा मंजूर केलेली परियोजना आहे किंवा हाती घेण्यात आलेली कार्यवाही आहे हे मानण्यात येईल. (१९१५ चा मुंबई १.)

**८.** मुंबई शहर पोलीस अधिनियम, १९०२, कलम ४५ खाली मुख्य इलाखा शहर दंडाधिकाऱ्याने नेमलेल्या तारखेपूर्वी उपनगरांतील नगरपालिकेस दिलेला कोणताही निदेश हा, उक्त कलमाखाली वसुली करण्याच्या प्रयोजनाकरिता उक्त कलमाखाली आयुक्तास दिलेला निदेश आहे असे मानण्यात येईल. (१९०२ चा मुंबई ४.)

**९.** नेमलेल्या तारखेच्या निकटपूर्वीच्या तारखेपर्यंत कालावधीसाठी उपनगरांतील स्थानिक प्राधिकरणांच्या लेखापरीक्षेच्या बाबतीत आणि अशा लेखापरीक्षेशी संबंधित असलेल्या किंवा त्यातून निर्माण झालेल्या सर्व इतर गोष्टींच्या बाबतीत, जणू काही मुंबई स्थानिक निधि लेखापरीक्षा अधिनियम, १९३० याच्या तरतुदी या [१][ मुंबई महानगरपालिका अधिनियमाखाली ] महानगरपालिका व इतर नगरपालिका प्राधिकरणे यांच्या प्राधिकाराखालील क्षेत्राच्या हद्दी उपनगरांपर्यंत वाढवण्यात आलेल्या नसाव्यात, त्याप्रमाणे लागू असण्याचे चालू राहील : (१९३० चा मुंबई २५.)

परंतु, उक्त अधिनियमांतील स्थानिक प्राधिकरणाचा सभापती किंवा स्थानिक प्राधिकरण यासंबंधीचे सर्व उल्लेख हे, आयुक्तासंबंधीचे उल्लेख आहेत असे मानण्यात येईल.

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (१८)अ अन्वये "बॉम्बे महानगरपालिका अधिनियम" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**१०.** (१) महानगरपालिका, नेमलेल्या तारखेपासून सहा महिन्यांच्या कालावधीत, तिला योग्य वाटतील अशा हद्दींसह उपनगरांचे, तिला योग्य वाटतील अशा संख्येइतके प्रभाग पाडील आणि उक्त प्रभागांत अठरा पालिका सदस्य वाटून देईल.

१८८८ चा मुंबई ३. (२) नेमलेल्या तारखेच्या निकटपूर्वी [१][मुंबई महानगरपालिका अधिनियम,] कलम २४ खाली शहराचे जितके प्रभाग पाडण्यात आले असतील, तितके प्रभाग धरून, अशी रीतीने हद्दी करून बनवलेले प्रभाग हे उक्त कलमाचे पोट-कलम (२) च्या तरतुदींच्या अधीनतेने, नेमलेल्या तारखेस व त्या तारखेपासून [२][बृहन्मुंबईची] विभागणी, सर्व प्रयोजनांकरिता ज्या प्रभागांमध्ये करण्यात आली असेल असे प्रभाग असतील.

(३) महानगरपालिकेने, उप परिच्छेद (१) प्रमाणे आवश्यक असलेली कार्यवाही, त्यामध्ये विहित केलेल्या कालावधीच्या आत करण्यात कसूर केल्यास राज्य शासनास, अशी कार्यवाही करण्याच्या प्रयोजनासाठी एखादी व्यक्ती नेमता येईल, आणि अशा नेमणुकीनंतर उक्त अधिनियमांचे कलम ५१८, पोट-कलम (३) व कलम ५२० च्या तरतुदी, शक्य तेथवर, लागू होतील.

१९६५ चा महा. ८. १९६६ चा महा. ३३. [३][(४) मुंबई महानगरपालिका (विधानसभा मतदार याद्यांचा व एक-सदस्य मतदारसंघांचा अंगीकार करणे) अधिनियम, १९६४, [४][आणि मुंबई महानगरपालिका (तिसरी सुधारणा) अधिनियम, १९६६] या अन्वये सुधारणा केल्याप्रमाणे असलेल्या कलम १९ खाली जेव्हा प्रभागांची पुनर्रचना करण्यात येईल, तेव्हा या परिच्छेदाच्या पूर्वगामी तरतुदी परिणामकारक असणे, बंद होईल.]

**११.** नेमलेल्या तारखेनंतर पालिका सदस्यांची प्रभागातील पहिली सार्वत्रिक निवडणूक होईपर्यंत, परिच्छेद १० खाली उपनगरांकरिता रचना केलेल्या किंवा करावयाच्या प्रभागांसाठी वाटून दिलेल्या पालिका सदस्यांच्या अठरा जागा भरण्यासाठी पुढील विशेष तरतुदी लागू असतील :—

(अ) नेमलेल्या तारखेच्या निकटपूर्वीच्या तारखेस पुढील तक्त्यात विनिर्दिष्ट केलेल्या स्थानिक प्राधिकरणाच्या यथास्थिति, पालिका सदस्याचे किंवा सदस्यांचे अधिकारपद धारण करणाऱ्या व्यक्ती त्या त्या स्थानिक प्राधिकरणाच्या यथास्थिति, पालिका सदस्यांमधून किंवा सदस्यांमधून उक्त तक्त्यात त्यापुढे दाखविलेल्या संख्येइतके पालिका सदस्य, परिच्छेद १२ मध्ये विहित केलेल्या रीतीने निवडून देतील :—

| | स्थानिक प्राधिकरणाचे नाव | स्थानिक प्राधिकरणाच्या पालिका सदस्यांनी किंवा सदस्यांनी निवडून द्यावयाच्या पालिका सदस्यांची संख्या |
|---|---|---|
| १. | वांद्रे बरो नगरपालिका . . . . | ६ |
| २. | पार्ले-अंधेरी बरो नगरपालिका . . . . | ३ |
| ३. | घाटकोपर-किरोळ बरो नगरपालिका . . . . | १ |
| ४. | जुहू नगरपालिका . . . . | २ |
| ५. | जिल्हा स्थानिक मंडळ, मुंबई उपनगर जिल्हा . . | ३ |

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (१८)अ अन्वये "बॉम्बे महानगरपालिका अधिनियम" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २, अनुसूची (१) ४ (१८)ब अन्वये "ग्रेटर बॉम्बे" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[३] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम २० अन्वये हा उप परिच्छेद जादा दाखल करण्यात आला.

[४] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ७ अन्वये हे शब्द, कंस व आकडे समाविष्ट करण्यात आले.

(ब) महानगरपालिका, उप परिच्छेद (अ) खाली निवडलेल्या पालिका सदस्यांनी अधिकारपद ग्रहण केल्यानंतर, शक्य असेल तितक्या लवकर, ती निर्धारित करील अशा रीतीने नेमलेल्या तारखेच्या निकटपूर्वी प्रवर्तनात असलेल्या कुर्ला बरो नगरपालिकेच्या नगरपालिका मतदारांच्या यादीत ज्यांची नावे दाखल केलेली असतील, अशा व्यक्तींमधून ३ व्यक्ती [१][मुंबई महानगरपालिका अधिनियम,] कलम १६ च्या तरतुदींच्या अधीनतेने पालिका सदस्य म्हणून नेमील. १८८८ चा मुंबई ३.

**१२.** परिच्छेद ११, उप परिच्छेद (अ) च्या प्रयोजनांकरिता पालिका सदस्यांच्या निवडणुकीच्या बाबतीत पुढील तरतुदी अंमलात येतील :—

(अ) आयुक्त, उक्त उप परिच्छेद (अ) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाच्या पालिका सदस्यांनी किंवा सदस्यांनी, नेमलेल्या तारखेच्या पंधरा दिवसांच्या आत, पालिका सदस्यांची निवडणूक करण्याच्या बाबतीत, स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन उमेदवारांच्या नामनिर्देशनाची तारीख, निवडणुका लढवण्यात येतील त्या प्रसंगी मतनोंदणीची तारीख, वेळ व जागा आणि मतमोजणीची तारीख, वेळ व जागा या गोष्टी निश्चित करील :

परंतु, उमेदवारांच्या नामनिर्देशनासाठी निश्चित केलेली तारीख ही, नोटिशीच्या तारखेनंतरच्या दहा दिवसांहून अगोदरची असणार नाही :

परंतु, आणखी असे की, नोटिशीची प्रत निवडणुकीशी संबंध असलेल्या परिच्छेद ११ च्या उप परिच्छेद (अ) मध्ये उल्लेख केलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या माहीत असलेल्या शेवटच्या पत्त्यावर नोंदणी डाकेने पाठवण्यात येईल.

(ब) नामनिर्देशनपत्र हे यासोबत जोडलेल्या नमुना “अ” मध्ये असेल आणि निवडणुकीत मतदानाचा हक्क असलेल्या दोन व्यक्ती, प्रस्तावक आणि अनुमोदक म्हणून त्यावर सही करतील आणि ते अनुमत करतील व नामनिर्दिष्ट केलेली व्यक्ती याप्रमाणे नामनिर्दिष्ट केले जाण्यास राजी असल्याचे प्रतीक म्हणून त्यावर तिची सही असेल ;

(क) उपरोक्तप्रमाणे सही केलेले व अनुमत केलेले प्रत्येक नामनिर्देशनपत्र उमेदवारांच्या नामनिर्देशनासाठी निश्चित केलेल्या दिवशी दुपारी पाच वाजण्यापूर्वी आयुक्ताच्या कार्यालयात सुपूर्द करण्यात येईल ;

(ड) प्रत्येक उमेदवाराचे नामनिर्देशन स्वतंत्र नामनिर्देशनपत्राने करण्यात येईल, मात्र, निवडणुकीत मतदान करण्याचा हक्क असलेल्या कोणत्याही व्यक्तीस, जितक्या रिकाम्या जागा असतील तितक्या जागांसाठी नामनिर्देशनपत्रे अनुमत करता येतील, परंतु त्यापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे अनुमत करता येणार नाहीत ;

(ई) जर कोणतीही व्यक्ती, जितक्या रिकाम्या जागा भरावयाच्या असतील त्याहून अधिक नामनिर्देशनपत्रे अनुमत करील, तर कमाल अनुज्ञेय नामनिर्देशनपत्रे मिळाल्यानंतर मिळालेली व अशा व्यक्तीने अनुमत केलेली नामनिर्देशनपत्रे विधिअग्राह्य असल्याचे मानण्यात येईल ;

(फ) जर नामनिर्दिष्ट केलेली कोणतीही व्यक्ती परिच्छेद ११ खाली निवडणुकीस पात्र नसेल, तर आयुक्त, अशा व्यक्तीचे नामनिर्देशन विधिअग्राह्य असल्याचे घोषित करील ;

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (१८)अ अन्वये “बॉम्बे महानगरपालिका अधिनियम” या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

(ग) जर कोणतेही विधिग्राह्य नामनिर्देशन नसेल तर, प्रस्तुत रिकाम्या जागेच्या किंवा जागांच्या बाबतीत निवडणूक घेणे निष्फळ झाल्याचे मानण्यात येईल ;

(ह) विधिग्राह्य नामनिर्देशनपत्रांची संख्या रिकाम्या जागांच्या संख्येपेक्षा कमी असेल तर, विधिग्राह्यरीत्या नामनिर्दिष्ट केलेल्या व्यक्ती निवडून आल्याचे आणि उरलेल्या जागेसाठी किंवा जागांसाठी निवडणूक घेणे निष्फळ झाल्याचे मानण्यात येईल ;

(आय) जर विधिग्राह्य नामनिर्देशनपत्रांची संख्या रिकाम्या जागांच्या संख्येइतकी असेल तर, नामनिर्दिष्ट केलेल्या व्यक्ती निवडून आल्याचे मानण्यात येईल ;

(ज) जर विधिग्राह्य नामनिर्देशनपत्रांची संख्या रिकाम्या जागांच्या संख्येपेक्षा अधिक असेल तर, आयुक्त, स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात देऊन विधिग्राह्यरीत्या नामनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तींची नावे व वर्णने प्रसिद्ध करील आणि पालिका सदस्यांच्या निवडणुकीसाठी, मतनोंदणीकरिता निश्चित केलेल्या तारखेस मतदान घेण्यात येईल ;

(के) मतनोंदणी, यासोबत जोडलेल्या नमुना ब मध्ये गुप्त मतदान पद्धतीने आणि जातीने करण्यात येईल आणि प्रतिनिधीमार्फत कोणतीही मते स्वीकारली जाणार नाहीत ;

(ल) उप परिच्छेद (ज) खाली जिचे नाव विधिग्राह्यरीत्या नामनिर्दिष्ट केलेले नाव म्हणून प्रसिद्ध करण्यात आले नसेल, अशा कोणत्याही व्यक्तीसाठी कोणत्याही मताची नोंद केली जाणार नाही ;

(म) प्रत्येक मतदारास, निवडणुकीत जितके पालिका सदस्य, निवडून द्यावयाचे असतील, तितकी मते असतील आणि अशी सर्व मते त्यास एका उमेदवारास देता येतील किंवा, त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे उमेदवारांमध्ये ती विभागून देता येतील ;

(न) ज्यास सर्वांत जास्त विधिग्राह्य मते मिळालेली असतील तो उमेदवार किंवा जेव्हा एकाहून अधिक पालिका सदस्य निवडून द्यावयाचे असतील तेव्हा, निवडून द्यावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येपेक्षा अधिक नसतील, असे सर्वांत जास्त विधिग्राह्य मते मिळालेले उमेदवार निवडून आल्याचे घोषित करण्यात येईल :

परंतु, जेव्हा कोणत्याही उमेदवारांना मते समसमान मिळाल्याचे आढळून येईल आणि एका मताची भर घातली असता, त्या उमेदवारांपैकी कोणत्याही एका उमेदवारास निवडून आल्याचे घोषित केले जाण्याचा हक्क प्राप्त होणार असेल तेव्हा, कोणत्या उमेदवाराला किंवा उमेदवारांना असे जादा मत देण्यात आले आहे, असे मानण्यात यावे, हे आयुक्त निर्धारित करील अशा रीतीने त्यांच्यासमक्ष चिठ्ठ्या टाकून ठरवण्यात येईल ;

(ओ) प्रत्येक उमेदवार आणि याबाबतीत प्रत्येक उमेदवाराने प्राधिकृत केलेला फक्त एक प्रतिनिधी यांना मतमोजणीच्या वेळी उपस्थित असण्याची मुभा असेल, आणि त्यांना, मोजणीसाठी मतपत्रिका वाटण्यात आल्यानंतर मतपत्रिका न हाताळता त्यांचे निरीक्षण करण्याची व कोणतीही मतपत्रिका नामंजूर ठरवण्यासंबंधाने अचूकतेविषयी हरकत घेण्याची वाजवी संधी देण्यात येईल ;

१८८८ चा मुंबई ३.

(प) या परिच्छेदात विनिर्देशपूर्वक तरतूद न केलेल्या कोणत्याही बाबतीत, निवडणुकीच्या संबंधात अनुसरावयाची कार्यपद्धती ही, शक्य असेल तेथवर, मुंबई महानगरपालिका अधिनियम, आणि त्याच्या कलम २९ याखाली केलेले नियम, यांच्या तरतुदीखाली प्रभागाच्या निवडणुकांमध्ये अनुसरण्यात येणाऱ्या कार्यपद्धतीस अनुसरून असेल ;

(क्यू) प्रत्येक निवडणुकीचा निकाल हा, कोणतेही उमेदवार निवडून आलेले असल्यास, त्यांची नावे आणि लढवण्यात आलेल्या निवडणुकीच्या बाबतीत प्रत्येक उमेदवारासाठी नोंदण्यात आलेल्या मतांची संख्या प्रमाणित करणारी व आयुक्ताने सही केलेली नोटीस मुख्य महानगरपालिका कार्यालयात एखाद्या ठळक जागी शक्य तितक्या लवकर लावून घोषित केला जाईल ;

(र) या परिच्छेदाखाली पालिका सदस्य म्हणून निवडून आलेल्या सर्व उमेदवारांची नावे आयुक्त, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करील, आणि अशा रीतीने नावे प्रसिद्ध झाल्यावर असे उमेदवार अधिकारपदावर आल्याचे मानण्यात येईल.

**१३.** निवडणूक घेणे निष्फळ झाले असेल तर, किंवा कोणत्याही पालिका सदस्यांची निवडणूक रद्द ठरविण्यात आली असेल आणि त्याच्या जागी निवडून आल्याचे मानता येईल असा दुसरा कोणताही उमेदवार नसेल तर महानगरपालिका ती निर्धारित करील अशा रीतीने, परिच्छेद ११, उप परिच्छेद (अ) खाली पालिका सदस्य म्हणून निवडली जाण्यास जी व्यक्ती पात्र ठरली असती, तिला रिकाम्या झालेल्या जागेवर पालिका सदस्य म्हणून नेमील आणि अशी व्यक्ती ही, सर्व प्रयोजनांसाठी पालिका सदस्य म्हणून निवडून आली आहे, असे मानण्यात येईल.

**१४.** परिच्छेद ११, १२ किंवा १३ यांच्या तरतुदींखाली निवडून दिलेले किंवा नेमलेले पालिका सदस्य हे मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदींच्या अधीनतेने, दिनांक १ एप्रिल १९४८ रोजी जे पालिका सदस्य अधिकारपदावर आले, ते पालिका सदस्य ज्या कालावधीपर्यंत अधिकारपद धारण करतील तेवढ्याच कालावधीपर्यंत अधिकारपद धारण करतील. १८८८ चा मुंबई ३.

**१५.** परिच्छेद ११, १२ किंवा १३ यांच्या तरतुदींखाली निवडून दिलेल्या किंवा नेमण्यात आलेल्या कोणत्याही पालिका सदस्यांचे अधिकारपद परिच्छेद १४ मध्ये विनिर्दिष्ट केलेला कालावधी संपण्यापूर्वी कोणत्याही कारणामुळे रिकामे झाल्यास, उक्त रिकामे पद शक्य तितक्या लवकर, त्याबाबतीत यथोचित अर्हताप्राप्त व्यक्तीची, यथास्थिति निवडणूक किंवा नेमणूक करून भरले जाईल आणि, परिच्छेद ११, १२ किंवा १३ च्या तरतुदी शक्य असेल तेथवर, अशा निवडणुकीस किंवा नेमणुकीस लागू होतील :

परंतु, जर कोणत्याही पालिका सदस्यांचे अधिकारपद परिच्छेद १४ मध्ये विहित केलेला पदावधी ज्या तारखेस संपणार असेल, त्या तारखेपूर्वीच ४ महिन्यांत रिकामे होणार असेल, तर अशी रिकामी जागा भरणे आवश्यक असणार नाही.

**१६.** (१) या अनुसूचीच्या तरतुदींखाली झालेल्या किंवा केलेल्या कोणत्याही निवडणुकीच्या किंवा नेमणुकीच्या विधिग्राह्यतेबाबत कोणताही विवाद उत्पन्न झाल्यास, [१][मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या] कलम ३३ च्या तरतुदी या, शक्य असेल तेथवर, विवादाच्या निर्णयाच्या प्रयोजनासाठी, जणू ती निवडणूक किंवा नेमणूक त्या अधिनियमाच्या तरतुदींखाली झालेली निवडणूक असावी, त्याप्रमाणे लागू होतील. १९८८ चा मुंबई ३.

(२) उक्त कलमाच्या तरतुदींस अनुसरून, हरकत न घेतलेली प्रत्येक निवडणूक किंवा नेमणूक ही सर्व उद्देशासाठी योग्य व विधिग्राह्य निवडणूक किंवा नेमणूक आहे, असे मानण्यात येईल.

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१)४(१८)अ अन्वये "बॉम्बे महानगरपालिका अधिनियम" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

**१७.** [१][(१) नेमलेल्या तारखेपासून सुरू होणाऱ्या व ३१ मार्च १९५१ रोजी संपणाऱ्या कालावधीकरिता,] परंतु, उप परिच्छेद (३), (४) व (५) ज्या तरतुदींच्या अधीनतेने उपनगरांतील कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने लादलेले व अशा स्थानिक प्राधिकरणाच्या अखत्याराखालील अधिकारक्षेत्राच्या हद्दीत [२][नेमलेल्या तारखेच्या] निकटपूर्वी बसवलेले सर्व कर, महानगरपालिका
१८८८ चा मुंबई ३. अन्यथा निर्धारित करील ते खेरीजकरून एरव्ही [३][मुंबई महानगरपालिका अधिनियमाखाली] बसवण्याजोग्या करांऐवजी अशा हद्दीत बसविण्याचे व वसूल करण्याचे महानगरपालिका चालू ठेवील आणि या उप परिच्छेदाखाली बसवण्यात येणाऱ्या करांपैकी कोणताही कर बसवण्यासाठी आणि याप्रमाणे बसवण्याजोगे असलेले कर निर्धारित करण्याच्या व गोळा करण्याच्या प्रयोजनासाठी उक्त अधिनियमात तरतूद करण्यात आली नसली तरी आयुक्ताला, स्थानिक प्राधिकरण किंवा स्थानिक प्राधिकरणाचा कोणताही प्राधिकारी किंवा अधिकारी यांस मुंबई नगरपालिका (हद्दी वाढवण्याबाबत)
१९५० चा मुंबई ७. अधिनियम, १९५० अंमलात आला नसता, तर जे अधिकार वापरता आले असते ते सर्व अधिकार असतील :

परंतु, राज्य शासनास, महानगरपालिकेच्या विनंतीवरून, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे या उप परिच्छेदाखाली बसवता येण्याजोगे कर ज्या कालावधीकरिता बसवण्याचे चालू ठेवता येईल, तो कालावधी वेळोवेळी वाढवता येईल, मात्र, उक्त कालावधी नेमलेल्या तारखेपासून दोन वर्षे संपल्यानंतर अशा प्रकारे कर बसवण्याचे चालू राहील, अशा रीतीने वाढवता येणार नाही.

(२) उप परिच्छेद (१) मधील कोणत्याही तरतुदींमुळे, जो कर राज्यात बसवण्यात राज्य विधानमंडळ, सक्षम नसेल असा कोणताही कर बसवण्याचा प्राधिकार प्राप्त होणार नाही.

१८८८ चा मुंबई ३. (३) [३][मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या] तरतुदींस अनुसरून बृहन्मुंबईच्या संपूर्ण क्षेत्रासाठी नगर शुल्क बसवण्यात येईल आणि नेमलेल्या तारखेस व त्यानंतर [३][मुंबई
१९६४ चा महा. ३२. महानगरपालिका (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९६४ या अन्वये बदलीदाखल केल्याप्रमाणे असलेल्या कलम १९२ खाली जकात प्रथम बसवण्यात येईतोपर्यंत] उपनगरातील कोणत्याही क्षेत्रात कोणतीही जकात किंवा सीमा कर बसवता येणार नाही.

१८८८ चा मुंबई ३. (४) महानगरपालिकेस, उप परिच्छेद (१) खाली निर्देश केलेल्या कालावधीत कोणत्याही वेळी, [३][मुंबई महानगरपालिका अधिनियमाचे] कलम १३४ याच्या तरतुदींचे अनुपालन करण्याच्या प्रयोजनासाठी तसे करणे तिला योग्य वाटेल तर, उप परिच्छेद (१) खाली बसवलेल्या कोणत्याही कराचा दर राज्य शासनाच्या मंजुरीने वाढवता येईल.

(५) महानगरपालिकेस, एक महिन्यापेक्षा कमी नसेल इतक्या कालावधीची जाहीर नोटीस
१८८८ चा मुंबई ३. दिल्यानंतर [५][उप परिच्छेद (१) मध्ये उल्लेख केलेल्या कालावधीत] कोणत्याही वेळी, [३][मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या] तरतुदींस अनुसरून, उपनगरात कर बसवता येतील आणि असा कर बसवण्याच्या तारखेस आणि त्या तारखेपासून उप परिच्छेद (१) च्या तरतुदी, अशा तारखेपूर्वी येणे झाली असेल अशी कोणतीही रक्कम गोळा करण्याच्या व निर्धारित करण्याच्या प्रयोजनांव्यतिरिक्त इतर प्रयोजनासाठी, यथास्थिति, उपनगरात किंवा उपनगरातील एका किंवा अधिक क्षेत्रात प्रवर्तनात असण्याचे बंद होईल.

---

[१] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३०, कलम ७(१)(अ) अन्वये "नेमलेल्या तारखेपासून एक वर्षाच्या कालावधीकरिता" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमानुसार "उक्त तारखेच्या" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१)४(१८) अन्वये "बॉम्बे महानगरपालिका अधिनियम" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल केला.

[४] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम २१ अन्वये हा भागांश जादा दाखल करण्यात आला.

[५] सन १९५१ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३०, कलम ७(१)(ब) अन्वये हे शब्द समाविष्ट करण्यात आले.

[१][**१७अ.** (१) या परिच्छेदच्या तरतुदींच्या अधीनतेने, मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदींस अनुसरून, उपनगरांतील इमारतींवर व जमिनींवर दिनांक १ एप्रिल १९५१ पासून मालमत्ता कर बसवण्यात येतील.] १८८८ चा मुंबई ३.

(२) यासोबत जोडलेल्या यादी एकमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांतील [२][ज्या इमारतींचे व जमिनींचे करयोग्य मूल्य वर्षात पंच्याहत्तर रुपयांपेक्षा अधिक असेल] अशा सर्व इमारतींवर व जमिनींवर आणि यासोबत जोडलेल्या यादी दोनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांतील उद्योगांच्या प्रयोजनांकरिता भोगवट्यात असलेल्या इमारतींवर व जमिनींवर पुढील कालावधीकरिता व पुढील दराने सर्वसाधारण कर बसवण्यात येईल :—

(एक) १ एप्रिल १९५१ पासून ३१ मार्च १९५४ पर्यंतच्या कालावधीकरिता, प्रत्येक वर्षातील त्याच्या करयोग्य मूल्याच्या दहा टक्के या दराने ;

(दोन) १ एप्रिल १९५४ पासून ३१ मार्च १९५६ पर्यंतच्या कालावधीकरिता प्रत्येक वर्षातील त्याच्या करयोग्य मूल्याच्या बारा टक्के या दराने ;

[३][(तीन) १ एप्रिल १९५६ पासून ३१ मार्च १९५८ पर्यंतच्या कालावधीकरिता, प्रत्येक वर्षातील त्याच्या करयोग्य मूल्याच्या चौदा टक्के या दराने ;

(चार) १ एप्रिल १९५८ पासून ३१ मार्च १९६० पर्यंतच्या कालावधीकरिता, प्रत्येक वर्षातील त्याच्या करयोग्य मूल्याच्या सोळा टक्के या दराने ;

(पाच) १ एप्रिल १९६० पासून उक्त अधिनियमाचे कलम १२८ याखाली महानगरपालिका निर्धारित करील अशा दराने.]

[४][(२अ) यादी एकमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रातील ज्या इमारतींचे व जमिनींचे करयोग्य मूल्य एका वर्षात पंच्याहत्तर रुपयांपेक्षा अधिक नसेल तर सर्व इमारतींवर व जमिनींवर पुढील कालावधीसाठी व पुढील दराने सर्वसाधारण कर बसवण्यात येईल.—

(एक) १ एप्रिल १९५६ पासून ३१ मार्च १९५८ पर्यंतच्या कालावधीकरिता, प्रत्येक वर्षातील त्यांच्या करयोग्य मूल्याच्या आठ टक्के या दराने ;

(दोन) १ एप्रिल १९५८ पासून ३१ मार्च १९६० पर्यंतच्या कालावधीकरिता, प्रत्येक वर्षातील त्यांच्या करयोग्य मूल्याच्या दहा टक्के या दराने ;

(तीन) १ एप्रिल १९६० पासून उक्त अधिनियमाच्या कलम १२८ याखाली महानगरपालिका निर्धारित करील अशा दराने ;

(३) उक्त यादी दोनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांतील (उद्योगांच्या प्रयोजनांकरिता भोगवट्यात असलेल्या इमारती व जमिनींहून अन्य) सर्व इमारतींवर व जमिनींवर पुढील कालावधी करिता व पुढील दराने सर्वसाधारण कर बसवण्यात येईल :—

(एक) १ एप्रिल १९५४ पासून ३१ मार्च १९५६ पर्यंतच्या कालावधीकरिता, प्रत्येक वर्षातील त्यांच्या करयोग्य मूल्याच्या शेकडा आठ टक्के दराने ;

---

[१] सन १९५१ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३०, कलम ७(२) अन्वये हा परिच्छेद समाविष्ट करण्यात आला.

[२] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५१, कलम २(१)(अ) अन्वये हा मजकूर समाविष्ट करण्यात आला.

[३] वरील अधिनियमाच्या कलम २(१)(ब) अन्वये मूळ खंड (तीन) ऐवजी हे खंड दाखल करण्यात आले.

[४] वरील अधिनियमाच्या कलम २(२) अन्वये हा उप परिच्छेद समाविष्ट करण्यात आला.

(दोन) १ एप्रिल १९५६ पासून ३१ मार्च १९५८ पर्यंतच्या कालावधीकरिता, प्रत्येक वर्षातील त्यांच्या करयोग्य मूल्याच्या शेकडा दहा टक्के दराने ;

(तीन) १ एप्रिल १९५८ पासून ३१ मार्च १९६० पर्यंतच्या कालावधीकरिता, प्रत्येक वर्षातील त्यांच्या करयोग्य मूल्याच्या शेकडा बारा टक्के दराने ;

(चार) १ एप्रिल १९६० पासून उक्त अधिनियमाच्या कलम १२८ याखाली महानगरपालिका निर्धारित करील अशा दराने.

(४) पूर्वगामी उप परिच्छेदांमध्ये काहीही अंतर्भूत असेल तरी, उक्त अधिनियमाचे कलम १४३, पोट-कलम (१) याखाली अनुज्ञेय असेल अशा कोणत्याही माफीस बाध येऊ न देता प्रत्येक बाबतीत अनुक्रमे विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीत पुढील इमारतींना व जमिनींना सर्वसाधारण कराची माफी देता येईल.—

(एक) उक्त यादी दोनमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांतील (उद्योगांच्या प्रयोजनांकरिता भोगवट्यात असलेल्या इमारती व जमिनी यांहून अन्य) सर्व इमारतींना व जमिनींना १ एप्रिल १९५१ पासून ३१ मार्च १९५४ पर्यंतच्या कालावधीत सर्वसाधारण कराची माफी देता येईल.

[१] * * * * *

(तीन) ज्या इमारतींचे व जमिनींचे एका वर्षातील करयोग्य मूल्य रु. पंच्याहत्तरपेक्षा अधिक नाही अशा, उक्त यादीमध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांतील सर्व इमारतींना व जमिनींना १ एप्रिल १९५४ पासून ३१ मार्च १९६० पर्यंतच्या कालावधीत सर्वसाधारण कराची माफी देता येईल.

(५) या परिच्छेदेच्या प्रयोजनांकरिता,—

(अ) 'उद्योगाच्या प्रयोजनाकरिता भोगवट्यात असलेली इमारत किंवा जमीन' या शब्दप्रयोगात कारखाना अधिनियम, १९४८ यात व्याख्या केल्याप्रमाणे कारखाना म्हणून भोगवट्यात असलेल्या किंवा वापरलेल्या प्रत्येक परिवास्तूचा समावेश होतो. मात्र, तीत केवळ कुटीर उद्योगाकरिता वापरण्यात येणाऱ्या कोणत्याही परिवास्तूचा समावेश होत नाही ; आणि

१९४८ चा ६३.

(ब) 'कुटीर उद्योग' या शब्द प्रयोगाचा अर्थ, एखाद्या कामगाराने आपल्या स्वतःच्या घरात चालवलेला कोणताही उद्योग असा आहे.

**यादी एक**

खालील गावांच्या हद्दीतील क्षेत्रे :—

(१) बोर्ले.
(२) चकाला.
(३) देवनार.
(४) हरियाली-जी.आय.पी. रेल्वे लाईनच्या पश्चिमेकडील भाग.
(५) कोन्डिवटे (बामणपुरी).
(६) मजास.
(७) मरोळ.
(८) मोहिली.
(९) ओशिवरे.

[१] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५१, कलम २(२) अन्वये खंड (दोन) वगळण्यात आला.

(१०) वरसोवा गाव (वेसावे).

(११) विक्रोळी-जी. आय. पी. रेल्वे लाईनच्या पश्चिमेकडील प्रदेश.

(१२) चेंबूर व वडवली या गावात पुढे दिल्याप्रमाणे, निर्वासित व्यक्तींकरिता असलेल्या कँपने व्यापलेले क्षेत्र :—

| गाव (१) | भूमापन क्रमांक (२) | हिस्सा क्रमांक (३) | क्षेत्र (४) | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | एकर | गुंठे | आणे |
| वडवली . . | एस.एस.तीन भाग | . . | ३ | ११ | ३ |
| वडवली . . | ९८अ२ | . . | ० | २० | १५ |
| वडवली . . | ८९ | . . | ० | ८ | ० |
| वडवली . . | ९७अ | . . | ० | १ | ४ |
| वडवली . . | ९८अ | ४ | १ | ११ | १४ १/४ |
| वडवली . . | ९८अ | १ भाग | ० | २४ | ३ |
| वडवली . . | ८५ | १ | ० | ४ | ८ |
| वडवली . . | ८६ | १ | ० | १२ | ८ |
| वडवली . . | ८६ | ४ | ० | ८ | १२ |
| वडवली . . | ८६ | ६ | ० | ० | ४ |
| वडवली . . | ८७ | २ | ० | १३ | ० |
| वडवली . . | ८७ | ४ | ० | ३४ | ० |
| वडवली . . | ९८अ | २ | ० | ४ | ५ |
| वडवली . . | ९८अ | १ भाग | ० | १८ | ८४ |
| वडवली . . | कृषितर १००/ब | . . | ० | ११ | ० |
| वडवली . . | कृषितर ९८/ब | २ भाग | ० | २ | ० |
| वडवली . . | ८८ | . . | ० | ३१ | ४ |
| वडवली . . | ८५ | २ | ० | ४ | ० |
| वडवली . . | ८५ | ३ भाग | ० | ३ | ० |
| वडवली . . | ८६ | २ | ० | १० | ० |
| वडवली . . | ८६ | ५ | ० | ७ | ८ |
| वडवली . . | ८७ | १ | १ | ३ | ० |
| वडवली . . | ८७ | ३ | ० | १५ | ४ |
| वडवली . . | ८७ | ५ | ० | २ | ४ |
| वडवली . . | ९८अ | ३ भाग | ० | ३७ | ४ |
| वडवली . . | ८६ | ३ | ० | १० | ४ |
| वडवली . . | ५० | १ | ० | ९ | १२ |
| वडवली . . | ५१ | २ | ० | २७ | १२ |

| गाव (१) | | भूमापन क्रमांक (२) | हिस्सा क्रमांक (३) | क्षेत्र (४) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | एकर | गुंठे | आणे |
| वडवली | . . | ५२ | २ | ० | ३६ | १२ |
| वडवली | . . | ९६ | १ | ० | ३५ | ० |
| वडवली | . . | ९७ब | २ | ० | ८ | ८ |
| वडवली | . . | ५० | २ | ० | २२ | ८ |
| वडवली | . . | ५२ | ३ | ० | ३७ | १२ |
| वडवली | . . | ५१ | १ भाग | ० | २६ | ० |
| वडवली | . . | ५१ | ३ | ० | १२ | ४ |
| वडवली | . . | ५१ | १ भाग | ० | २ | ८ |
| वडवली | . . | ९७ब | १ | ० | १० | ० |
| चेंबूर | . . | कृषितर ३४ भाग | . . | ० | २२ | ० |
| चेंबूर | . . | कृषितर ३४ भाग | . . | १ | ११ | ० |
| चेंबूर | . . | १८० भाग | . . | ० | ८ | ४ |
| वडवली | . . | ९०अ<br>९०ब<br>एस.एस.तीन | | | | |
| चेंबूर | . . | ४०७ (भाग)<br>१७७ (भाग) | | ६ | २ | ८ |
| वडवली | . . | एस.एस.तीन | . . | . . | . . | . . |
| | | भाग (१२०) | . . | १ | ८ | ० |
| | | भाग (१२१) | . . | ० | १० | ० |
| | | भाग (१२२) | . . | ६ | ३२ | ० |
| | | भाग (१२३) | . . | १ | २० | ० |
| वडवली | . . | ९० भाग | . . | ० | ४ | ० |
| वडवली | . . | १७७अ<br>१७७ब१ भाग<br>१७७ब२ भाग<br>एस.एस.क्र. तीन<br>चेंबूर | . . | २५ | २५ | ० |
| | | | सरकारी जमिनी | | | |
| वडवली | . . | पी.डब्ल्यू.डी. बंगला | . . | ० | १६ | १२ |
| | | एस.एस.तीन भाग | . . | ० | ३० | ० |
| | | एस.एस.तीन भाग | . . | ० | १६ | ० |
| | | सी.एस.रेल्वे भाग | . . | २ | ३२ | ० |

## यादी दोन

पुढील गावांच्या हद्दीतील क्षेत्रे :—

(१) आंबिवली (पूर्वीच्या पार्ले-अंधेरी बरो नगरपालिकेत समाविष्ट केलेला भागांश वगळून).
(२) अनिक.
(३) आसल्पे (असप).
(४) बांदिवली (पूर्वीच्या पार्ले-अंधेरी बरो नगरपालिकेत समाविष्ट केलेला भागांश वगळून).
(५) बापनाळा.
(६) भांडुप-जी.आय.पी.रेल्वे लाईनच्या पूर्वेकडील भागांश.
(७) ब्राम्हणवाडा.
(८) चेंदवली.
(९) हरियाली-जी.आय.पी.रेल्वे लाईनच्या पूर्वेकडील भागांश.
(१०) कांजूर-जी.आय.पी.रेल्वे लाईनच्या पूर्वेकडील भागांश.
(११) किरोळ –खालाई.
(१२) कोळे-कल्याण (पूर्वीच्या वांद्रे बरो नगरपालिकेत समाविष्ट केलेला भागांश व विमानतळ क्षेत्र वगळून).
(१३) कोपरी.
(१४) मढ.
(१५) माहुल.
(१६) माण बुद्रुक.
(१७) मांडला.
(१८) मानखुर्द.
(१९) मरवली.
(२०) मोग्रे (पूर्वीच्या पार्ले-अंधेरी बरो नगरपालिकेत समाविष्ट केलेला भागांश वगळून).
(२१) मुळगाव.
(२२) नानला.
(२३) परजपूर.
(२४) पासपोळी.
(२५) पवई.
(२६) साकी.
(२७) शहार.
(२८) तिरंदाज.
(२९) तुर्भे.
(३०) तुंगवे.
(३१) वडवली (यादी एक मध्ये समाविष्ट केलेले क्षेत्र वगळून).
(३२) विक्रोळी-जी.आय.पी.रेल्वे लाईनच्या पूर्वेकडील भागांश.
(३३) व्यारोळी].

**१८.** (१) १ एप्रिल, १९५० पासून प्रारंभ होणाऱ्या सरकारी वर्षासाठी असलेले अर्थसंकल्पीय अंदाज “ ड ” हे शक्य तितक्या लवकर तयार करून महानगरपालिकेकडे सादर करण्यात येतील आणि नेमलेल्या तारखेपासून चार महिन्यांचा कालावधी संपण्यापूर्वी महानगरपालिका ते अंगीकृत करील.

(२) आयुक्तास, नेमलेल्या तारखेपासून चार महिन्यांपेक्षा अधिक नसेल अशा कालावधीसाठी मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या सर्व तरतुदी विचारात घेऊन, त्यास आवश्यक व योग्य वाटेल त्याप्रमाणे, स्थायी समिती विहित करील अशा लेख्यांच्या प्रधान शीर्षाखाली, अधिकृत खर्चाच्या अनुसूचीच्या अधीनतेने उपनगरांच्या नगरपालिका शासनाच्या संबंधात खर्च करता येईल :

१९८८ चा मुंबई तीन.

परंतु, १ एप्रिल, १९५० पासून सुरू होणाऱ्या सरकारी वर्षासाठी असलेला अर्थसंकल्पीय अंदाज " ड " चा महानगरपालिकेने अंतिमरित्या अंगीकार करताच अशी अनुसूची प्रवर्तनात असण्याचे बंद होईल.

१९८८ चा मुंबई तीन.

**१९.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या तरतुदी परिणामक करताना कोणतीही अडचण निर्माण झाली तर राज्य शासनास, आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनाकरिता, प्रसंगानुसार त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, नेमलेल्या तारखेपासून दोन वर्षांचा कालावधी संपल्यानंतर या परिच्छेदाखाली कोणताही आदेश काढता येणार नाही.

**नमुना अ.**

[परिच्छेद १२ (ब) पहा.]

**नामनिर्देशन पत्र.**

उमेदवार, प्रस्तावक आणि अनुमोदक, हे ज्याचे पालिका सभासद किंवा सदस्य असतील, त्या स्थानिक प्राधिकरणाचे नाव ..........

उमेदवाराचे नाव ..........

वडीलांचे/पतिचे नाव ..........

प्रस्ताविकाचे नाव ..........

अनुमोदकाचे नाव ..........

अनुमोदकाची सही ..........

**उमेदवाराचे अधिकथन,**

मी, याद्वारे अधिकथित करतो की, हे नामनिर्देशन मला मान्य आहे.

दिनांक : (उमेदवाराची सही.)

(हा मजकूर आयुक्ताने भरावा.)

सुपूर्दगी प्रमाणपत्र.

अनुक्रमांक

हे नामनिर्देशनपत्र माझ्याकडे माझ्या कार्यालयात (दिनांक..........(तारीख) रोजी...................... (वेळ) वाजता सुपूर्द करण्यात आले.

(आयुक्ताची सही.)

**नमुना ब.**

[परिच्छेद १२ (के) पहा.]

**मतपत्रिकेचा नमुना**

**मतपत्रिकेच्या दर्शनी बाजूचा नमुना**

स्थळपत्र

अनुक्रमांक ............

स्थानिक प्राधिकरण (ज्यामधून निवडणूक करण्यात येत असेल त्या प्राधिकरणाचे नाव येथे लिहावे.)

मतदाराचे नाव ..................

मतदाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा.

देयपत्र.

| उमेदवाराचे नाव | फुली |
|---|---|
| | |
| | |

**टीप.—** मतपत्रिकेचे संपूर्ण देयपत्र हे उमेदवारांची नावे व मत नोंदणीसाठी सोडलेल्या जागा ज्यात असतील अशा चौकटीने व्यापलेले असणे महत्त्वाचे आहे.

देय पत्राची मागील बाजू.

१. तुम्हांस ............ मत आहे/मते आहेत.

२. फुलीचे चिन्ह (×) करून मत दर्शवण्यात यावे. प्रत्येक चिन्ह म्हणजे एक मत होय.

३. मतपत्रिकेवर तुम्ही एकूण ............फुली (ल्यां) पेक्षा अधिक फुल्या करता कामा नयेत.

४. तुम्ही आपली सर्व मते एकाच उमेदवाराला देऊ शकता किंवा ती तुम्हाला योग्य वाटेल त्याप्रमाणे उमेदवारांमध्ये विभागून देऊ शकता.

अनुक्रमांक ..........

---

**[१][अनुसूची ' फफअ '**

[१][मुंबई महनगरपालिका (हद्‌दी आणखी वाढवणे आणि अनुसूची बबअ (सुधारणा)) अधिनियम, १९५६ याचे कलम २८.]

**वाढवलेल्या उपनगरांतील क्षेत्रांसंबंधी विशेष आणि संक्रमणकालीन तरतुदी.**

(१) मुंबई महानगरपालिका [हद्‌दी आणखी वाढवणे आणि अनुसूची बबअ (सुधारणा)] अधिनियम, १९५६, याच्या प्रारंभाच्या तारखेस (जिचा ह्या अनुसूचीत यापुढे " नेमलेला दिवस " असा उल्लेख केला आहे) वाढवलेल्या उपनगरांतील स्थानिक प्राधिकरणापुढे किंवा अशा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही प्राधिकाऱ्यापुढे प्रलंबित असलेल्या सर्व कार्यवाह्या व [२][मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या] तरतुदींअन्वये आयुक्तापुढे दाखल करणे किंवा त्याने ती होती घेणे आवश्यक असलेल्या सर्व कार्यवाह्या त्याच्याकडे हस्तांतरित करण्यात आल्या आहेत व त्याने त्यापुढे चालू ठेवल्या आहेत, असे मानण्यात येईल आणि अशा इतर सर्व कार्यवाह्या, उक्त अधिनियमाच्या तरतुदींअन्वये त्या ज्या प्राधिकाऱ्यापुढे दाखल करावयाच्या असतील त्या प्राधिकाऱ्याकडे शक्य असेल तेथवर हस्तांतरित करण्यात आल्या आहेत आणि त्या त्या प्राधिकाऱ्याने चालू ठेवल्या आहेत, असे मानण्यात येईल.

१९५६ चा मुंबई ५८.

१८८८ चा मुंबई तीन.

---

[१] सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८, कलम २८ अन्वये अनुसूची फफअ जादा दाखल करण्यात आली.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ चे कलम २, अनुसूची (१) ४(१९)अ द्वारे, "बॉम्बे महानगर पालिका अधिनियम" या शब्दांऐवजी हे शब्द घेतले.

(२) वाढवलेल्या उपनगरांतील स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही प्राधिकाऱ्यापुढे नेमलेल्या दिवशी प्रलंबित असलेली सर्व अपिले व्यवहार्य असतील तेथवर, जणू ती अपिले दाखल करण्यात आली त्यावेळी वाढवलेली उपनगरे [१][बृहन्मुंबईत] समाविष्ट करण्यात आलेली असावीत, त्याप्रमाणे निकालात काढण्यात येतील.

(३) वाढवलेल्या उपनगरातील स्थानिक प्राधिकरणाने किंवा त्याच्या वतीने दाखल केलेले व नेमलेल्या दिवशी प्रलंबित असलेले सर्व खटले आणि अशा स्थानिक प्राधिकरणाने किंवा अशा प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्याने किंवा त्याच्याविरुद्ध दाखल केलेले व नेमलेल्या दिवशी प्रलंबित असलेले सर्व दावे किंवा इतर कायदेविषयक कार्यवाह्या ह्या, असा खटला, दावा किंवा कार्यवाही दाखल करण्यात आली त्यावेळी वाढवलेली उपनगरे जणू [१][बृहन्मुंबईत] समाविष्ट केलेली असावीत त्याप्रमाणे यथास्थिति, आयुक्ताने किंवा महानगरपालिकेने किंवा आयुक्ताविरुद्ध किंवा महानगरपालिकेविरुद्ध पुढे चालविण्यात येतील.

(४) (एक) वाढवलेल्या उपनगरातील प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाचे सर्व हक्क, नेमलेल्या दिवशी, महानगरपालिकेमध्ये निहित होतील.

(दोन) वाढवलेल्या उपनगरातील कोणत्याही स्थानिक प्राधिकरणास येणे असलेल्या सर्व रकमा– मग त्या कोणत्याही कराबद्दल किंवा इतर कोणत्याही बाबीबद्दल येणे असोत–आयुक्ताने वसूल करण्याजोग्या असतील, आणि अशा वसुलीच्या प्रयोजनाकरिता, तो, जर [२][मुंबई महानगरपालिका अधिनियम] अंमलात आला नसता किंवा वाढवलेली उपनगरे बृहन्मुंबईत समाविष्ट करण्यात आली नसती, तर, त्या प्राधिकरणास किंवा अशा स्थानिक प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांस जी कोणतीही उपाययोजना करता आली असती किंवा जी कोणतीही कार्यवाही दाखल करता आली असती अशी कोणतीही उपाययोजना करण्यास किंवा अशी कोणतीही कार्यवाही दाखल करण्यास सक्षम असेल. (१८८८ चा मुंबई ३.)

(तीन) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी उपनगरांतील कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने किंवा त्याच्या वतीने घेतलेली व उक्त दिवशी अस्तित्वात असलेली सर्व ऋणे व आबंधने आणि केलेल्या सर्व संविदा, आयुक्ताने [२][मुंबई महानगरपालिका अधिनियमाद्वारे] त्यास प्रधान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून घेतलेले ऋण किंवा केलेल्या संविदा आहेत, असे मानण्यात येईल. (१८८८ चा मुंबई ३.)

(चार) ठाणे जिल्ह्याच्या जिल्हा शाळा मंडळाचे व ठाणे जिल्ह्याच्या जिल्हा स्थानिक मंडळाचे, [१][बृहन्मुंबईत] समाविष्ट न झालेल्या, केवळ त्या त्या प्राधिकरणाच्या प्राधिकाराखालील क्षेत्रासंबंधीचे हक्क, येणे असलेल्या रकमा, ऋणे व आबंधने यांच्या बाबतीत हा परिच्छेद जणू काही "महानगरपालिका" व "आयुक्त" या शब्दांच्या ऐवजी "यथास्थिति, ठाणे जिल्ह्याचे जिल्हा शाळा मंडळ किंवा ठाणे जिल्ह्याचे जिल्हा स्थानिक मंडळ" हे शब्द दाखल केलेले असावेत त्याप्रमाणे व जणू काही [२][मुंबई महानगरपालिका अधिनियम] यासंबंधीचा संदर्भ हा, यथास्थिति, मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७ किंवा मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३, यासंबंधीचा संदर्भ असावा, त्याप्रमाणे लगू होईल. (१८८८ चा मुंबई ३. १९४७ चा मुंबई ६१. १९२३ चा मुंबई ६. १८८८ चा मुंबई ३.)

(५) (एक) [२][मुंबई महानगरपालिका अधिनियम,] याचे कलम ३४९ई यात जी तरतूद केलेली असेल ती खेरीज करून, मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१, मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३, *मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९३३ व मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७ यांखाली, नेमलेल्या दिवसापूर्वी काढलेली कोणतीही अधिसूचना, नोटीस, दिलेला कोणताही आदेश, केलेली कोणतीही परियोजना, दिलेला कोणताही परवाना, लायसन, परवानगी, केलेला कोणताही नियम, उपविधी किंवा नमुना यथास्थिति, [२][मुंबई महानगरपालिका अधिनियम] किंवा मुंबई शहर प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९२०, याखाली यथास्थिति केलेल्या, काढलेल्या किंवा दिलेल्या कोणत्याही अधिसूचनेवरून, नोटिशीवरून, आदेशावरून, परियोजनेवरून, परवान्यावरून, लायसनवरून, परवानगीवरून, नियमावरून, उपविधीवरून किंवा नमुन्यावरून अधिक्रांत करण्यात येईपर्यंत अंमलात असण्याचे चालू राहील. (१९०१ चा मुंबई ३. १९२३ चा मुंबई ६. १९३३ चा मुंबई ६. १९४७ चा मुंबई ६१. १८८८ चा मुंबई ३.)

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २ अनुसूची (१) ४(१९)ब अन्वये "ग्रेटर बॉम्बे" या शब्दा ऐवजी हे शब्द घातले.

[२] वरील अधिनियमाचे कलम २, अनुसूची (१) ४(१९)अ द्वारे, "बॉम्बे महानगर पालिका अधिनियम" या शब्दां ऐवजी हे शब्द घेतले.

*आता मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८(१९५९ चा मुंबई तीन) पहा.

(दोन) मुंबई जिल्हा नगरपालिका अधिनियम, १९०१, मुंबई स्थानिक मंडळ अधिनियम, १९२३, मुंबई ग्राम स्वच्छता अधिनियम, १८८९ किंवा* मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९३३ याखाली केलेली सर्व निर्धारणे, मूल्यमापने, मोजण्या व विभागण्या या सर्व गोष्टी [१][मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या] तरतुदीशी सुसंगत असतील तेथवर, त्या अधिनियमाखाली केलेल्या आहेत, असे मानण्यात येईल.

१८८८चा मुंबई ३.
१९२० चा मुंबई १५.

(तीन) उप परिच्छेद (चार) ते (नऊ) (दोन्ही धरून) यांच्या तरतुदींच्या अधीनतेने, नेमलेल्या दिवसांच्या निकटपूर्वी ठाणे जिल्ह्याचे जिल्हा स्थानिक मंडळ आणि ठाणे जिल्ह्याचे शाळा मंडळ यांहून अन्य, वाढवलेल्या उपनगरातील कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतील सर्व अधिकारी व कर्मचारी हे, [१][मुंबई महानगरपालिका अधिनियमाखाली] महानगरपालिकेने कामावर ठेवलेले अधिकारी व कर्मचारी असतील आणि नेमलेल्या दिवसांच्या निकटपूर्वी त्या त्या स्थानिक मंडळाच्या सेवेत असताना ज्या, अटी व शर्ती लागू होत्या त्यांहून कमी हितकारक नसतील अशा अटींना व शर्तींना ते हक्कदार असतील.

१९०१चा मुंबई ३.
१९२३ चा मुंबई ६.
१८८९ चा मुंबई १.
१९३३ चा मुंबई ६.
१८८८चा मुंबई ३.
१८८८ चा मुंबई ३.

(चार) नेमलेल्या दिवसापूर्वी उक्त अधिकाऱ्याने किंवा कर्मचाऱ्याने धारण केलेल्या पदाचे स्वरूप कसेही असले तरी, उक्त अधिकाऱ्याच्या किंवा कर्मचाऱ्याच्या अर्हता, अनुभव आणि पूर्वीच्या उपलब्धी विचारात घेऊन महानगरपालिकेच्या किंवा आयुक्ताच्या मते योग्य असेल अशा कोणत्याही नात्याने उक्त अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास कामावर ठेवण्यास महानगरपालिका किंवा आयुक्त सक्षम असेल.

(पाच) अशा अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी, नेमलेल्या दिवसापूर्वी केलेली सेवा ही महानगरपालिकेतील सेवा आहे, असे मानण्यात येईल.

(सहा) नेमलेल्या दिवसांच्या निकटपूर्वी ज्या अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे मासिक वेतन, भत्ते वगळता पाचशे रुपयांहून अधिक नव्हते, त्या अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या बाबतीत आयुक्त किंवा इतर अधिकाऱ्यांच्या व कर्मचाऱ्यांच्या बाबतीत महानगरपालिका, जो कोणताही अधिकारी व कर्मचारी आयुक्ताच्या किंवा महानगरपालिकेच्या मते, महानगरपालिकेतील सेवेच्या गरजांच्या दृष्टीने आवश्यक किंवा योग्य नसेल त्या अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास त्याच्या सेवेच्या अटी व शर्ती यांनुसार देणे आवश्यक असेल अशी नोटीस दिल्यानंतर त्याच्या सेवा बंद करण्यास सक्षम असेल आणि याप्रमाणे ज्याच्या सेवा बंद करण्यात आल्या असतील त्या प्रत्येक अधिकाऱ्यास किंवा कर्मचाऱ्यास जर महानगरपालिकेच्या व इतर महानगरपालिका प्राधिकाऱ्यांच्या प्राधिकाराखालील क्षेत्रांच्या हद्दी वाढविलेल्या उपनगरापर्यंत वाढवण्यात आल्या नसत्या तर, असमर्थ ठरल्याने त्यांच्या सेवा बंद केल्यामुळे जी रजा, निवृत्तिवेतन व उपदान घेण्यास किंवा मिळवण्यास तो हक्कदार झाला असता ती रजा, निवृत्तिवेतन किंवा उपदान मिळविण्याचा त्याला हक्क असेल.

(सात) महानगरपालिका, वाढविलेल्या उपनगरातील नगरपालिका मुख्य अधिकाऱ्यांची , तिच्या मते महानगरपालिकेच्या अखत्याराखालील ज्या जागांसाठी ते अर्ह असतील त्या जागांवर नेमलेल्या दिवसापासून नेमणूक करण्यास सक्षम असेल :

परंतु, याप्रमाणे मुख्य अधिकारी नेमण्यात आला नसेल तर त्याबाबतीत, महानगरपालिकेच्या व इतर महानगरपालिका प्राधिकरणांच्या प्राधिकाराच्या अधीन असणाऱ्या क्षेत्रांच्या हद्दी वाढवलेल्या उपनगरापर्यंत वाढवण्यात आल्या नसत्या तर त्यास असमर्थ ठरल्यामुळे संबंधित स्थानिक प्राधिकरणाच्या सेवेतून कमी केले असता जी रजा, निवृत्तिवेतन व उपदान मिळाले असते ती रजा, निवृत्तिवेतन किंवा उपदान त्याला देण्यात येईल.

---

[१] १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ चे कलम २, अनु. (१) ४ (१९)अ द्वारे, "बॉम्बे महानगर पालिका अधिनियम" या शब्दांऐवजी हे शब्द घेतले. अनुसूची (१) ४ (१९)ब प्रमाणे "ग्रेटर मुंबई" या शब्दांऐवजी हे शब्द घेतले.

*आता मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८(१९५९ चा मुंबई तीन) पहा.

(आठ) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी ठाणे जिल्ह्याच्या जिल्हा स्थानिक मंडळाच्या किंवा ठाणे जिल्ह्याच्या जिल्हा शाळा मंडळाच्या सेवेतील कोणता अधिकारी किंवा कर्मचारी अथवा कोणत्या वर्गातील अधिकारी किंवा कर्मचारी महानगरपालिकेच्या, ठाणे जिल्ह्याच्या जिल्हा स्थानिक मंडळाच्या व ठाणे जिल्ह्याच्या जिल्हा शाळा मंडळाच्या सेवेत घेण्यात येतील, हे राज्य शासनास आदेशाद्वारे विनिर्दिष्ट करता येईल. असा आदेश दिल्यावर महानगरपालिका, ठाणे जिल्ह्याचे जिल्हा स्थानिक मंडळ आणि ठाणे जिल्ह्याचे जिल्हा शाळा मंडळ अशा आदेशाचे अनुपालन करतील आणि उप परिच्छेद (तीन) ते (सहा) यांच्या तरतुदी योग्य त्या फेरफारांसह अशा अधिकाऱ्यांस व कर्मचाऱ्यांस लागू असतील.

(नऊ) या परिच्छेदाखाली अशा कोणत्याही अधिकाऱ्यांस किंवा कर्मचाऱ्यांस जिच्या सेवेत त्यास पाठवण्यात आले असेल अशा महानगरपालिकेने, ठाणे जिल्ह्याच्या जिल्हा स्थानिक मंडळाने किंवा ठाणे जिल्ह्याच्या जिल्हा शाळा मंडळाने दिलेल्या कोणत्याही आदेशामुळे जर कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी व्यथित झाला असेल तर, अशा अधिकाऱ्यास राज्य शासनाकडे अपील करता येईल.

१९४७ चा मुंबई ६१. १९२० चा मुंबई १५. (६) मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७ याखाली मंजूर झालेली किंवा मंजूर झाल्याचे मानण्यात येणारी आणि नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी वाढवलेल्या उपनगरातील कोणत्याही क्षेत्रात अंमलात असलेली सक्तीची प्रत्येक परियोजना ही जणू काही मुंबई शहर प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९२० यांच्या कलम ३ खाली अशा क्षेत्राच्या संदर्भात महानगरपालिकेने घोषणा काढलेली असावी, त्याप्रमाणे परिणामकारक होईल.

१९१५चा मुंबई १. १९५५चा मुंबई २७. (७) मुंबई नगररचना अधिनियम, १९१५ किंवा मुंबई नगररचना अधिनियम, १९५४ यात काहीही अंतर्भूत असले तरी, उक्त अधिनियमांपैकी कोणत्याही अधिनियमाखाली, वाढवलेल्या उपनगरांतील कोणत्याही क्षेत्राच्या बाबतीत तयार केलेली किंवा मंजूर झालेली कोणतीही परियोजना किंवा हाती घेतलेली कोणतीही कार्यवाही अशा अधिनियमाखाली स्थानिक प्राधिकरण म्हणून महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या संबंधात केलेली परियोजना आहे किंवा हाती घेतलेली कार्यवाही आहे असे मानण्यात येईल.

(८) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वीच्या तारखेपर्यंतच्या कालावधीसाठी वाढवलेल्या उपनगरांतील स्थानिक प्राधिकरणाच्या लेखापरीक्षेच्या बाबतीत आणि तिच्याशी संबंधित असलेल्या किंवा तिच्या-

१८८८ चा मुंबई ३. १९३० चा मुंबई २५. तून उद्‌भवणाऱ्या इतर सर्व बाबींच्या बाबतीत जणू [१][मुंबई महानगरपालिका अधिनियमाखाली] महानगरपालिकेच्या आणि इतर महानगरपालिका प्राधिकाऱ्यांच्या प्राधिकाराखालील क्षेत्रांच्या हद्दी वाढवलेल्या उपनगरापर्यंत वाढवण्यात आलेल्या नसाव्यात त्याप्रमाणे मुंबई स्थानिक निधी लेखापरीक्षा अधिनियम, १९३० याच्या तरतुदी लागू असण्याचे चालू राहील :

परंतु, स्थानिक प्राधिकरणाचा सभापती किंवा स्थानिक प्राधिकरण यासंबंधीचे उक्त अधिनियमातील सर्व उल्लेख हे आयुक्तासंबंधीचे उल्लेख आहेत असे मानण्यात येईल.

(९) (एक) महानगरपालिका, नेमलेल्या दिवसापासून सहा महिन्यांच्या कालावधीच्या आत वाढवलेल्या उपनगरांचे, तिला योग्य वाटतील अशा हद्दी ठरवून तिला योग्य वाटतील इतके प्रभाग पाडील व उक्त प्रभागांमध्ये सात सदस्य वाटून देईल.

१८८८ चा मुंबई ३. (दोन) ज्या प्रभागामध्ये [१][मुंबई महानगरपालिका अधिनियम] याचे कलम २४, आणि त्या अधिनियमाची अनुसूची " फ फ " हिचा परिच्छेद दहा याखाली महानगरपालिका क्षेत्राची विभागणी करण्यात आली होती ते भाग धरून, नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी अशा रितीने हद्दी ठरवून बनवलेले प्रभाग, उक्त कलमांचे पोट-कलम (२) याच्या तरतुदींच्या अधीनतेने नेमलेल्या दिवशी आणि त्या दिवसापासून सर्व प्रयोजनांसाठी ज्या प्रभागांमध्ये [१][बृहन्मुंबईची] विभागणी करण्यात आली आहे, असे प्रभाग म्हणून असतील.

(तीन) उप परिच्छेद (एक) अन्वये आवश्यक असल्याप्रमाणे, त्यात विहित केलेल्या कालावधीच्या आत महानगरपालिकेने उपाययोजना केली नाही तर त्याबाबतीत राज्य शासनास अशी उपाययोजना

[१] १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५ चे कलम २, अनुसूची (१) ४ (१९)अ द्वारे, "बॉम्बे महानगर पालिका अधिनियम" या शब्दांऐवजी हे शब्द घेतले. अनुसूची (१) ४ (१९)ब प्रमाणे "ग्रेटर मुंबई" या शब्दाऐवजी हे शब्द घेण्यात आले.

करण्याच्या प्रयोजनासाठी एखाद्या व्यक्तीची नेमणूक करता येईल आणि अशी नेमणूक करण्यात आल्यावर उक्त अधिनियमाचे कलम ५१८, पोट-कलम (३) व कलम ५२० यांच्या तरतुदी, शक्य असेल तेथवर, लागू असतील.

[१][(चार) मुंबई महानगरपालिका (विधानसभा मतदार याद्यांचा व एक-सदस्य मतदारसंघाचा अंगीकार करणे) अधिनियम, १९६४ [२][आणि मुंबई महानगरपालिका (तिसरी सुधारणा) अधिनियम, १९६६] यांखाली सुधारणा केल्याप्रमाणे असलेल्या कलम १९ खाली जेव्हा प्रभागांची पुनर्रचना करण्यात येईल तेव्हा [२][या परिच्छेदाच्या पूर्ववर्ती तरतुदी परिणामकारक असल्याचे बंद होईल.] १९६५ चा महाराष्ट्र ८. १९६६ चा महाराष्ट्र ३३.

(१०) (अ) लोकप्रतिनिधीत्व अधिनियम, १९५० याच्या तरतुदीखाली तयार केलेली मुंबई विधानसभेची आणि परिच्छेद (९), उप परिच्छेद (१) खाली हद्दी ठरवून बनवलेल्या प्रभागात समाविष्ट केलेली उक्त विधानसभा मतदारसंघाच्या भागांकरिता अंमलात असलेली मतदारांची यादी ही अशा प्रभागाच्या मतदारांची यादी आहे, असे मानण्यात येईल. १९५० चा ४३.

(ब) आयुक्ताने याबाबत पदनिर्देशित केलेला अधिकारी अशा प्रत्येक प्रभागासाठी मतदारांची यादी तयार करील.

(क) उप परिच्छेद (ब) खाली मतदारांची यादी तयार झाल्यानंतर अशी यादी,—

(एक) अशा प्रत्येक प्रभागासाठी असलेली मतदारांची यादी आहे असे मानण्यात येईल, आणि या अधिनियमाचे कलम २१ याच्या अर्थांतर्गत ती महानगरपालिका मतदार यादीचा भाग म्हणून असेल,

(दोन) या अधिनियमाच्या तरतुदींनुसार ती सुधारण्यास पात्र असेल, आणि

(तीन) दिनांक १९ डिसेंबर १९६० पर्यंत ती प्रवर्तनात असण्याचे चालू राहील.

(११) नेमलेल्या दिवसाच्या लगतनंतर सदस्यांची प्रभागातील पहिली सार्वत्रिक निवडणूक होईपर्यंत वाढवलेल्या उपनगराकरिता परिच्छेद (९) खाली रचना केलेल्या किंवा करावयाच्या प्रभागांत वाटून दिलेल्या सदस्यांच्या सात जागा भरण्यासाठी पुढील विशेष तरतुदी लागू असतील :—

(अ) नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वीच्या तारखेस पुढील तक्त्यात विनिर्दिष्ट केलेल्या स्थानिक प्राधिकरणात पालिका-सदस्यांचे किंवा यथास्थिति सदस्यांचे पद धारण करणाऱ्या व्यक्ती, त्या त्या स्थानिक प्रधिकाऱ्याच्या पालिका-सदस्यांमधून किंवा सदस्यांमधून तक्त्यात त्यापुढे दर्शवलेल्या संख्येइतके सदस्य परिच्छेद (१२) मध्ये विहित केलेल्या रीतीने निवडून देतील :—

| | स्थानिक प्राधिकरणाचे नाव (१) | स्थानिक प्राधिकरणाच्या पालिका सदस्यांनी किंवा सदस्यांनी निवडून द्यावयाच्या पालिका सदस्यांची संख्या (२) |
|---|---|---|
| १. | मालाड नगरपालिका .. .. .. | २ |
| २. | कांदिवली नगरपालिका .. .. .. | १ |
| ३. | मुलुंड नगरपालिका .. .. .. | १ |
| ४. | दहिसर ग्रामपंचायत .. .. .. | १ |

[१] सन १९६५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ८, कलम २१ अन्वये हा उपपरिच्छेद जादा दाखल करण्यात आला.
[२] सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३३, कलम ७ अन्वये हे शब्द, कंस व आकडे समाविष्ट करण्यात आले.

(ब) महानगरपालिका, उप परिच्छेद (अ) खाली निवडून देण्यात आलेल्या पालिका सदस्यांनी अधिकारपद धारण केल्यानंतर सोईस्करपणे शक्य असेल तितक्या लवकर, ती निर्धारित करील त्याप्रमाणे नेमलेल्या दिवसांच्या निकटपूर्वी प्रवर्तनात असलेल्या–

(एक) बोरिवली नगरपालिकेच्या मतदारांच्या यादीत,

(दोन) गोरेगाव ग्रामपंचायतीच्या मतदारांच्या यादीत,

१८८८ चा मुंबई ३. ज्यांची नावनोंदणी झाली असेल अशा व्यक्तींमधून प्रत्येकी एक अशा दोन व्यक्ती, [१][मुंबई महानगरपालिका अधिनियम], कलम १६ च्या तरतुदींच्या अधीनतेने पालिका सदस्य म्हणून नेमील:

परंतु, जर इतर नगरपालिकांपैकी कोणतीही नगरपालिका किंवा इतर स्थानिक प्राधिकरणांपैकी कोणतेही स्थानिक प्राधिकरण, मुंबई नगरपालिका (हद्दी आणखी वाढविणे व अनुसूची बबअ) (सुधारणा), अधिनियम, १९५६ याच्या प्रारंभापूर्वी अधिक्रांत झाले असेल तर, महानगरपालिकेच्या नेमलेल्या दिवसाच्या निकटपूर्वी प्रवर्तनात असलेल्या अशा नगरपालिकेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या नगरपालिका मतदारांच्या यादीत किंवा मतदारांच्या यादीत ज्यांची नावनोंदणी झाली असेल, अशा व्यक्तींमधूनच या परिच्छेदाचा उप परिच्छेद (अ) यात अशा नगरपालिकेच्या किंवा स्थानिक प्राधिकरणांच्या संबंधात विनिर्दिष्ट करण्यात येईल इतक्या संख्येइतक्या व्यक्ती पालिका सदस्य म्हणून नेमील. (१९५६ चा मुंबई ५८.)

(१२) परिच्छेद (११), उप परिच्छेद (अ) याच्या प्रयोजनांकरिता पालिका सदस्यांच्या निवडणुकीसंबंधाने पुढील तरतुदी परिणामक होतील :–

(अ) आयुक्त, उक्त उप परिच्छेद (अ) यात विनिर्दिष्ट केलेल्या प्रत्येक स्थानिक प्राधिकरणाच्या पालिका सदस्यांनी किंवा सदस्यांनी नेमलेल्या दिवसापासून पंधरा दिवसाच्या आत पालिका सदस्यांची निवडणूक करण्याच्या संबंधात स्थानिक वत्तपत्रात जाहिरात देऊन उमेदवारांचे नामनिर्देशन करण्याची तारीख, निवडणुका लढवण्यात येतील त्या प्रसंगी मत नोंदणीची तारीख, वेळ आणि जागा आणि मत मोजणीची तारीख, वेळ व जागा या गोष्टी निश्चित करील:

परंतु, उमेदवाराच्या नामनिर्देशनासाठी निश्चित केलेली तारीख नोटिशीच्या तारखेनंतर दहा दिवसांपेक्षा आधीची असता कामा नये:

परंतु, आणखी असे की, नोटिशीची एक प्रत निवडणुकीशी संबंधित असलेल्या व परिच्छेद (११), उपपरिच्छेद (अ) मध्ये निर्दिष्ट केलेल्या प्रत्येक व्यक्तींच्या माहीत असलेल्या शेवटच्या पत्त्यावर नोंदणी डाकेने पाठविण्यात येईल ;

(ब) नामनिर्देशनपत्र हे यासोबत जोडलेला नमुना अअ याप्रमाणे असेल आणि निवडणुकीत मतदानाचा हक्क असलेल्या दोन व्यक्ती प्रस्तावक व अनुमोदक म्हणून त्यावर सही करतील आणि ते अनुमत करतील व नामनिर्दिष्ट केलेली व्यक्ती याप्रमाणे नामनिर्दिष्ट केले जाण्यास राजी असल्या चे प्रतीक म्हणून त्यावर तिची सही असेल;

(क) पूर्वोक्ताप्रमाणे सही केलेले व अनुमत केलेले प्रत्येक नामनिर्देशनपत्र उमेदवारांच्या नामनिर्देशनासाठी निश्चित केलेल्या दिवशी सायंकाळी पाच वाजण्यापूर्वी आयुक्ताच्या कार्यालयात सुपूर्द करण्यात येईल;

(ड) प्रत्येक उमेदवाराचे नामनिर्देशन स्वतंत्र नामनिर्देशनपत्राद्वारे करण्यात येईल, मात्र निवडणुकीत मतदानाचा हक्क असलेल्या कोणत्याही व्यक्तीस जितक्या जागा भरावयाच्या असतील तितक्या जागांसाठी नामनिर्देशनपत्रे अनुमत करता येतील, परंतु त्यापेक्षा अधिक नामनिर्देशनपत्रे अनुमत करता येणार नाहीत;

(इ) कोणतीही व्यक्ती जितक्या रिकाम्या जागा भरावयाच्या असतील त्यांहून अधिक नामनिर्देशपनत्रे अनुमत करील तर, कमाल अनुज्ञेय नामनिर्देशनपत्रे मिळाल्यानंतर मिळालेली व अशा व्यक्तीने अनुमत केलेली नामनिर्देशनपत्रे विधिअग्राह्य असल्याचे मानण्यात येईल;

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (१९)अ अन्वये, "बॉम्बे महानगरपालिका अधिनियम" या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(फ) नामनिर्दिष्ट केलेली कोणतीही व्यक्ती, परिच्छेद (११) खाली निवडणुकीस पात्र नसेल तर, आयुक्त अशा व्यक्तीचे नामनिर्देशन विधिअग्राह्य झाल्याचे घोषित करील ;

(ग) कोणतेही विधिग्राह्य नामनिर्देशनपत्र नसेल तर, संबंधित रिकाम्या जागेच्या किंवा जागांच्या बाबतीत निवडणूक निष्फळ झाली असल्याचे मानण्यात येईल ;

(ह) विधिग्राह्य नामनिर्देशनपत्रांची संख्या रिकाम्या जागांच्या संख्येपेक्षा कमी असेल तर, विधिग्राह्यरीत्या नामनिर्दिष्ट केलेल्या व्यक्ती निवडून आल्याचे आणि उरलेल्या जागेसाठी किंवा जागांसाठी निवडणूक निष्फळ झाली असल्याचे मानण्यात येईल ;

(आय) जर विधिग्राह्य नामनिर्देशनपत्रांची संख्या रिकाम्या जागांच्या संख्येइतकी असेल तर, नामनिर्दिष्ट केलेल्या व्यक्ती निवडून आल्याचे मानण्यात येईल ;

(ज) जर विधिग्राह्य नामनिर्देशनपत्रांची संख्या रिकाम्या जागांच्या संख्येपेक्षा अधिक असेल तर, आयुक्त स्थानिक वृत्तपत्रांत जाहिरात देऊन विधिग्राह्यरीत्या नामनिर्दिष्ट केलेल्या व्यक्तींची नावे व वर्णने प्रसिद्ध करील आणि पालिका-सदस्यांच्या निवडणुकीसाठी, मतनोंदणीच्या प्रयोजनासाठी निश्चित केलेल्या तारखेस मते घेण्यात येतील ;

(के) मत नोंदणी ही यासोबत जोडलेल्या नमुना बब मधील मतपत्रिकेद्वारे आणि जातीने करण्यात येईल आणि प्रतिनिधीमार्फत कोणतीही मते स्वीकारली जाणार नाहीत ;

(ल) उपपरिच्छेद (ज) खाली ज्याचे नाव विधिग्राह्यरीत्या नामनिर्दिष्ट केलेले नाव म्हणून प्रसिद्ध करण्यात आले नसेल त्या व्यक्तीसाठी कोणत्याही मताची नोंद केली जाणार नाही ;

(म) प्रत्येक मतदारास निवडणुकीत जितके पालिका-सदस्य निवडून द्यावयाचे असतील तितकी मते असतील आणि त्यास अशी सर्व मते एका उमेदवारास देता येतील किंवा त्यास योग्य वाटेल त्याप्रमाणे उमेदवारामध्ये ती विभागून देता येतील ;

(न) ज्यास सर्वात जास्त विधिग्राह्य मते मिळाली असतील तो उमेदवार किंवा जेव्हा एकाहून अधिक पालिका-सदस्य निवडून द्यावयाचे असतील तेव्हा निवडून द्यावयाच्या पालिका-सदस्यांच्या संख्येपेक्षा अधिक नसतील असे, सर्वात जास्त विधिग्राह्य मते मिळालेले उमेदवार निवडून आल्याचे घोषित करण्यात येईल :

परंतु, कोणत्याही उमेदवारांना मते समसमान मिळाल्याचे आढळून येईल आणि एका मताची भर घातली असता त्या उमेदवारांपैकी कोणत्याही उमेदवारास निवडून आल्याचे घोषित केले जाण्याचा हक्क प्राप्त होणार असेल तेव्हा कोणत्या उमेदवाराला किंवा उमेदवारांना असे जादा मत देण्यात आले आहे असे मानण्यात यावे, हे आयुक्त निर्धारित करील अशा रीतीने त्याच्या समक्ष चिठ्ठ्या टाकून ठरवण्यात येईल ;

(ओ) प्रत्येक उमेदवार आणि या बाबतीत प्रत्येक उमेदवाराने प्राधिकृत केलेला त्याचा फक्त एक प्रतिनिधी यांना मतमोजणीच्या वेळी हजर राहण्याची मुभा असेल आणि त्यांना, मोजणीसाठी मतपत्रिका वाटण्यात आल्यानंतर, मतपत्रिका न हाताळता त्यांचे निरीक्षण करण्याची व कोणतीही मतपत्रिका नामंजूर ठरवण्यासंबंधीच्या अचूकतेविषयी हरकत घेण्याची वाजवी संधी देण्यात येईल.

(प) या परिच्छेदात विनिर्देशपूर्वक तरतूद न केलेल्या कोणत्याही बाबतीत, निवडणुकीच्या संबंधात अनुसरावयाची कार्यपद्धती ही, शक्य असेल तेथवर, [१][मुंबई महानगरपालिका अधिनियम] आणि त्याचे कलम (२९) खाली केलेले नियम याच्या तरतुदी खालील, प्रभागांच्या निवडणुकांमध्ये अनुसरण्यात येणाऱ्या कार्यपद्धतीस अनुसरून असेल ; १८८८ चा मुंबई ३.

(क्यू) प्रत्येक निवडणुकीचा निकाल, शक्य तितक्या लवकर, कोणतेही उमेदवार निवडून आलेले असल्यास त्यांची नावे आणि लढवण्यात आलेल्या निवडणुकीच्या बाबतीत प्रत्येक

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (१९) अ अन्वये " बॉम्बे महानगरपालिका अधिनियम " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

उमेदवारांसाठी नोंदण्यात आलेल्या मतांची संख्या प्रमाणित करणारी व आयुक्ताने सही केलेली नोटीस मुख्य महानगरपालिका कार्यालयात एखाद्या ठळक जागी लावून घोषित करण्यात येईल ;

(र) या परिच्छेदाखाली पालिका-सदस्य म्हणून निवडून आलेल्या सर्व उमेदवारांची नावे आयुक्त, **शासकीय राजपत्रात** प्रसिद्ध करील आणि याप्रमाणे नावे प्रसिद्ध झाल्यानंतर असा उमेदवार अधिकारपदावर आल्याचे मानण्यात येईल.

(१३) निवडणूक घेणे निष्फळ झाले असेल तर किंवा कोणत्याही पालिका-सदस्यांची निवडणूक रद्द ठरवण्यात आली असेल आणि त्याच्या जागी निवडून आल्याचे मानता येईल असा दुसरा उमेदवार नसेल तर महानगरपालिका ती निर्धारित करील अशा रीतीने, परिच्छेद (११), उप परिच्छेद (अ) अन्वये सर्व प्रयोजनासाठी पालिका-सदस्य म्हणून निवडली जाण्यास जी पात्र ठरली असती अशा व्यक्तीस रिकाम्या झालेल्या जागेवर पालिका-सदस्य म्हणून नेमील.

(१४) परिच्छेद (११), (१२) किंवा (१३) यांच्या तरतुदींखाली निवडून दिलेले किंवा नेमलेले पालिका-सदस्य हे, [१][मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या] तरतुदींच्या अधीनतेने दिनांक १ एप्रिल १९५२ रोजी जे पालिका-सदस्य अधिकारपदावर आले ते पालिका-सदस्य ज्या कालावधीपर्यंत अधिकारपद धारण करतील, त्याच कालावधीपर्यंत अधिकारपद धारण करतील.

१८८८ चा मुंबई ३.

(१५) परिच्छेद (११), (१२) किंवा (१३) यांच्या तरतुदींखाली निवडून दिलेल्या किंवा नेमण्यात आलेल्या कोणत्याही पालिका-सदस्याचे अधिकारपद, परिच्छेद (१४) मध्ये विनिर्दिष्ट केलेला अवधी संपण्यापूर्वी कोणत्याही कारणामुळे रिकामे झाल्यास उक्त रिकामी जागा शक्य तितक्या लवकर, त्याबाबतीत यथोचित अर्हताप्राप्त व्यक्तीची निवडणूक किंवा यथास्थिति, नेमणूक करून भरण्यात येईल आणि परिच्छेद (११), (१२) किंवा (१३) यांच्या तरतुदी आवश्यक असतील तेथवर, अशा निवडणुकीस किंवा नेमणुकीस लागू होतील :

परंतु, कोणत्याही पालिका-सदस्याचे अधिकारपद परिच्छेद (१४) मध्ये विहित केलेला पदावधी ज्या तारखेस संपणार असेल त्या तारखेपूर्वीच्या चार महिन्यांच्या आत रिकामे होत असेल तर, अशी रिकामी जागा भरण्याची आवश्यकता असणार नाही.

(१६) (एक) या अनुसूचीच्या तरतुदींखाली केलेल्या कोणत्याही निवडणुकीच्या किंवा नेमणुकीच्या विधिग्राह्यतेबाबत कोणताही विवाद उत्पन्न होईल तर, [१][मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या] कलम ३३ च्या तरतुदी शक्य असेल तेथवर विवादाच्या निर्णयाच्या प्रयोजनासाठी, जणू ती निवडणूक किंवा नेमणूक, उक्त अधिनियमाच्या तरतुदींखाली केलेली निवडणूक असावी त्याप्रमाणे लागू होतील.

१८८८ चा मुंबई ३.

(दोन) उक्त कलमाच्या तरतुदींस अनुसरून हरकत न घेतलेली प्रत्येक निवडणूक किंवा नेमणूक ही सर्व प्रयोजनांसाठी योग्य व विधिग्राह्य निवडणूक किंवा नेमणूक आहे, असे मानण्यात येईल.

(१७) (एक) नेमलेल्या दिवशी प्रारंभ होणाऱ्या व ३१ मार्च १९५८ रोजी संपणाऱ्या कालावधीकरिता, परंतु उपपरिच्छेद (तीन), (चार) व (पाच) यांच्या तरतुदींच्या अधीनतेने, वाढवलेल्या उप-नगरांतील कोणत्याही स्थानिक प्राधिकरणाने लादलेले व अशा स्थानिक प्राधिकरणाच्या क्षेत्राच्या आत उक्त दिवसाच्या निकटपूर्वी बसवलेले सर्व कर महानगरपालिका अन्यथा निर्धारित करील तेवढे खेरीज करून एरव्ही, [१][मुंबई महानगरपालिका अधिनियमाखाली] बसवण्याजोग्या करांऐवजी अशा हद्दीत बसवण्याचे आणि गोळा करण्याचे महानगरपालिका चालू ठेवील आणि या उपपरिच्छेदाखाली बसवण्याजोग्या करांपैकी कोणताही कर बसवण्यासाठी आणि अशा रीतीने बसवण्याजोगे कर आकारण्याच्या आणि वसूल करण्याच्या प्रयोजनासाठी उक्त अधिनियमांत तरतूद करण्यात आली नसली तरी आयुक्ताला, स्थानिक प्राधिकरणास किंवा स्थानिक प्राधिकरणाच्या कोणत्याही अधिकाऱ्यास मुंबई नगरपालिका [हद्दी आणखी वाढवणे व अनुसूची बबअ (सुधारणा)] अधिनियम, १९५६ हा अंमलात आला नसता तर जे अधिकार वापरता आले असते ते सर्व अधिकार असतील ;

१८८८ चा मुंबई ३.

१९५६ चा मुंबई ५८.

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (१९) अ अन्वये " बॉम्बे महानगरपालिका अधिनियम " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

(दोन) उपपरिच्छेद (एक) मधील कोणत्याही तरतुदींमुळे, जो कर राज्यात बसवण्यास राज्य विधानमंडळ सक्षम नसेल, असा कोणताही कर बसवण्याचा प्राधिकार प्राप्त होणार नाही.

(तीन) [१][मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या] तरतुदींस अनुसरून [२][बृहन्मुंबईच्या] संपूर्ण क्षेत्रासाठी नगर शुल्क बसवण्यात येईल आणि [३][मुंबई महानगरपालिका (दुसरी सुधारणा) अधिनियम, १९६४ याअन्वये बदलीदाखल केल्याप्रमाणे असलेल्या कलम १९२ खाली जकात प्रथम बसवण्यात येईतोपर्यंत] नेमलेल्या दिवशी व त्यानंतर वाढवलेल्या उपनगरातील कोणत्याही क्षेत्रात जकात किंवा सीमा कर बसवता येणार नाही. १८८८ चा मुंबई ३. १९६४ चा महाराष्ट्र ३२.

(चार) महानगरपालिकेस उपपरिच्छेद (एक) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कालावधीत कोणत्याही वेळी [१][मुंबई महानगरपालिका अधिनियमाचे] कलम १३४ याच्या तरतुदींचे अनुपालन करण्याच्या प्रयोजनांसाठी तसे करणे तिला योग्य वाटेल तर उपपरिच्छेद (एक) खाली बसविलेल्या कोणत्याही कराचा दर राज्य शासनाच्या मंजुरीने, वाढवता येईल. १८८८ चा मुंबई ३.

(पाच) महानगरपालिका, एक महिन्यापेक्षा कमी नाही इतक्या अवधीची जाहीर नोटीस दिल्यानंतर कोणत्याही वेळी [१][मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या] तरतुदींनुसार वाढवलेल्या उपनगरांत कर बसवू शकेल आणि अशा कर बसवण्यास सुरुवात होण्याच्या तारखेस व तारखेपासून उपपरिच्छेद (एक) च्या तरतुदी, अशा तारखेच्या पूर्वी येणे झाली असेल अशी कोणतीही रक्कम गोळा करण्याच्या किंवा निर्धारित करण्याच्या प्रयोजनासाठी असेल तेवढे खेरीज करून एरव्ही वाढवलेल्या उपनगरात किंवा यथास्थिति, उपनगरांतील क्षेत्रात किंवा क्षेत्रांत प्रवर्तनात असण्याचे बंद होईल. १८८८ चा मुंबई ३.

(१८) (एक) आयुक्त, ३१ मार्च १९५७ रोजी संपणाऱ्या कालावधीसाठी, [१][मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या] सर्व तरतुदी विचारात घेऊन, त्यास आवश्यक व योग्य वाटेल त्याप्रमाणे, नेमलेल्या दिवसापासून दोन महिन्यांहून अधिक नसेल अशा कालावधीत स्थायी समितीने मंजूर केलेल्या मुख्य लेखा शीर्षाखालील प्राधिकृत खर्चासंबंधीच्या अनुसूचीच्या अधीनतेने वाढवलेल्या उपनगराच्या महानगरपालिका शासनाच्या संबंधात असा खर्च करण्यास सक्षम असेल. १८८८ चा मुंबई ३.

(दोन) [१][मुंबई महानगरपालिका अधिनियम] यात काहीही अंतर्भूत असले तरी, १ एप्रिल १९५७ रोजी प्रारंभ होणाऱ्या सरकारी वर्षाचे अर्थसंकल्पीय अंदाज "फ" हे नेमलेल्या दिवसाच्या शक्य तितक्या लवकर तयार करण्यात येतील व महानगरपालिकेपुढे मांडण्यात येतील आणि ३१ मार्च १९५७ रोजी किंवा तत्पूर्वी महानगरपालिका त्यांचा अंगीकार करील. १८८८ चा मुंबई ३.

(१९) (एक) या परिच्छेदाच्या तरतुदींच्या अधीनतेने, १ एप्रिल १९५८ पासून मालमत्ता कर हे, [१][मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या] तरतुदीं अन्वये वाढवलेल्या उपनगरांतील इमारतींवर किंवा जमिनीवर बसवण्यात येतील. १८८८ चा मुंबई ३.

(दोन) या अधिनियमान्वये नाहीशा केलेल्या बोरीवली, कांदिवली, मालाड आणि मुलुंड या नगरपालिका जिल्ह्यांचा आणि दहिसर व गोरेगाव या ग्रामपंचायतींचा भाग म्हणून असलेल्या क्षेत्रांतील सर्व इमारतींवर व जमिनींवर संबंधित स्थानिक प्राधिकरणाने त्या नाहीशा करण्यात येण्यापूर्वी ज्या दरांनी एकत्रित मालमत्ता कर बसवला असेल त्या दरांनी १९५८-५९ या सरकारी वर्षाकरिता सर्वसाधारण मालमत्ता कर बसवण्यात येतील.

(तीन) उप परिच्छेद (दोन) मध्ये नमूद केलेल्या कोणत्याही क्षेत्राच्या बाबतीत, जर याप्रमाणे बसवलेला दर हा [१][मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या] कलम १२८ खाली शहरांतील सर्वसाधारण मालमत्ता कराचा जो दर निर्धारित करण्यात आला होता त्या दरातून कमी असेल तर, तो कलम १२८ खाली निर्धारित केलेल्या दराइतका होईपर्यंत प्रत्येक बाबतीत एक सोडून एक येणाऱ्या प्रत्येक वर्षी दोन टक्क्यांनी वाढवण्यात येईल. १८८८ चा मुंबई ३.

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (१९) अ अन्वये " बॉम्बे महानगरपालिका अधिनियम " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियमाच्या कलम २, अनुसूची (१) ४ (१९) ब अन्वये "ग्रेटर बॉम्बे" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

[३] सन १९६४ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३२, कलम २२ अन्वये हा मजकूर जादा दाखल करण्यात आला.

(चार) वाढवलेल्या उपनगरांतील, उप परिच्छेद (दोन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांहून अन्य क्षेत्रांत औद्योगिक प्रयोजनांसाठी भोगवट्यात असलेल्या सर्व इमारतींवर व जमिनींवर त्यांच्या करयोग्य मूल्यांच्या चौदा टक्के या दराने सर्वसाधारण कर बसवण्यात येईल ; आणि तो कलम १२८ खाली निर्धारित केलेल्या दराइतका होईपर्यंत एक सोडून एक येणाऱ्या प्रत्येक वर्षी २ टक्के या दराने वाढविण्यात येईल.

(पाच) वाढवलेल्या उपनगरांतील उपपरिच्छेद (दोन) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या क्षेत्रांहून अन्य क्षेत्रांत [1][ज्या इमारती व जमिनी औद्योगिक प्रयोजनांसाठी भोगवट्यात नसतील] अशा सर्व इमारतींवर व जमिनींवर त्यांच्या करयोग्य मूल्याच्या ६ टक्के या दराने सर्वसाधारण कर बसवण्यात येईल व तो, कलम १२८ खाली निर्धारित केलेल्या दराइतका होईपर्यंत एक सोडून एक येणाऱ्या प्रत्येक वर्षी महानगरपालिका वेळोवेळी निर्धारित करील. अशा करयोग्य मूल्यांच्या एक टक्क्याहून कमी नाही व २ टक्क्यांहून अधिक नाही इतक्या दराने वाढवण्यात येईल.

१९६२ चा महा. ४०. [2][(पाच-अ) नागरी स्थावर मालमत्ता कर (नाहीसा करणे) आणि सर्वसाधारण कर (कमाल दरात वाढ) अधिनियम, १९६२ याच्या प्रारंभाच्या निकटपूर्वी, वाढवलेल्या उपनगरांतील ज्या कोणत्याही क्षेत्रात नागरी स्थावर मालमत्ता कर बसवण्यात येत होता त्या कोणत्याही क्षेत्रात महानगरपालिकेने उक्त अधिनियमाच्या प्रारंभानंतर त्या क्षेत्रातील इमारतींवरील व जमिनींवरील सर्वसाधारण कराच्या दरात अशा इमारती व जमिनी यांच्या करयोग्य मूल्याच्या शेकडा पाच टक्क्यांहून अधिक होणार नाही इतक्या रकमेने वाढ करणे विधिसंमत असेल. अशा रीतीने त्या दरात वाढ केल्यामुळे या परिच्छेदाच्या पूर्ववर्ती तरतुदींखाली त्यात जी कोणतीही वाढ करण्यात आली असेल किंवा करावयाची असेल अशा वाढीस बाध येणार नाही.]

१८८८ चा मुंबई ३. (सहा) [3][मुंबई महानगरपालिका अधिनियमाचे] कलम १४३, पोट-कलम (१) खालील कोणत्याही ग्राह्य माफीस बाध न येता ज्या इमारतींचे किंवा जमिनींचे करयोग्य मूल्य एका वर्षात ७५ रुपयांहून अधिक नसेल त्या इमारतींस व जमिनीस ३१ मार्च १९६५ पर्यंत माफी देण्यात येईल.

१९५६ चा मुंबई ५८. (२०) मुंबई महानगरपालिका [हद्दी आणखी वाढवणे व अनुसूची बबअ (सुधारणा)] अधिनियम, १९५६ यांच्या तरतुदी परिणामक करण्यात कोणतीही अडचण निर्माण झाली तर, राज्य शासनास, आदेशाद्वारे, ती अडचण दूर करण्याच्या प्रयोजनाकरिता प्रसंगानुसार त्यास आवश्यक वाटेल अशी कोणतीही गोष्ट करता येईल :

परंतु, नेमलेल्या दिवसापासून दोन वर्षांचा अवधी संपल्यानंतर या परिच्छेदाखाली असा कोणताही आदेश देता येणार नाही.

---

[1] सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ६, कलम ६ अन्वये " आणि निवासी प्रयोजनांसाठी भोगवटा करण्यात येणाऱ्या " या मजकुराऐवजी हा मजकूर बदली दाखल करण्यात आला व सन १९५६ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५८ ज्या तारखेला अंमलात आला त्या तारखेपासून तो बदली दाखल केला असल्याचे मानण्यात येईल.

[2] सन १९६३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक १३, कलम २ अन्वये उप परिच्छेद (पाच-अ) समाविष्ट करण्यात आला.

[3] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (१९) अ अन्वये " बॉम्बे महानगरपालिका अधिनियम " या मजकुराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

## नमुना अअ

[परिच्छेद १२ (ब) पहा.]

### नामनिर्देशनपत्र

उमेदवार, प्रस्तावक आणि अनुमोदक हे ज्याचे पालिका सदस्य किंवा सदस्य असतील त्या स्थानिक प्राधिकरणाचे नाव ..................................................................................

उमेदवाराचे नाव ..................................................................................

वडिलांचे/पतीचे नाव ..................................................................................

प्रस्तावकाचे नाव ..................................................................................

प्रस्तावकाची सही ................................

अनुमोदकाचे नाव ..................................................................................

अनुमोदकाची सही ....................................................................

### उमेदवाराचे अधिकथन

मी, याद्वारे अधिकथन करतो की, हे नामनिर्देशन मला मान्य आहे.

दिनांक : (उमेदवाराची सही)

..................................................................................................................

(हा मजकूर आयुक्ताने भरावा.)

### सुपूर्दगी प्रमाणपत्र.

अनुक्रमांक

हे नामनिर्देशनपत्र माझ्याकडे माझ्या कार्यालयात दि. ............................ (तारीख) रोजी ...................... (वेळ) वाजता सुपूर्द करण्यात आले.

(आयुक्ताची सही)

**नमुना बब**

[परिच्छेद १२ (के) पहा.]

**मतपत्रिकेचा नमुना**

(मतपत्रिकेच्या दर्शनी बाजूचा नमुना.)

स्थळपत्र देयपत्र

अनुक्रमांक ..................................

| | उमेदवाराचे नाव | फुली |
|---|---|---|
| स्थानिक प्राधिकरण . . . . | ............................................ | |
| (ज्यामधून प्राधिकरणातून निवडणूक करण्यात येत असेल त्या प्राधिकरणाचे नाव येथे लिहावे) | ............................................ | |
| मतदाराचे नाव . . . . | ............................................ | |
| मतदाराची सही किंवा अंगठ्याचा ठसा . . | ............................................ | |

**टीप.**—मतपत्रिकेचे संपूर्ण देयपत्र (आउटरफॉइल) हे उमेदवारांची नावे व मत नोंदणीसाठी सोडलेल्या जागा ज्यात असतील अशा चौकटीनी व्यापलेले असणे महत्त्वाचे आहे.

**देयपत्राची मागील बाजू**

१. तुम्हास ...................................... मत आहे/मते आहेत.

२. फुलीचे चिन्ह (X) करून मत दर्शवण्यात यावे. प्रत्येक चिन्ह म्हणजे एक मत होय.

३. मतपत्रिकेवर तुम्ही एकूण ............................ फुली (ल्यां) पेक्षा अधिक फुल्या करता कामा नयेत.

४. तुम्ही आपली सर्व मते एकाच उमेदवाराला देऊ शकता, किंवा ती तुम्हाला योग्य वाटेल त्याप्रमाणे उमेदवारांमध्ये विभागून देऊ शकता.

अनुक्रमांक

---

[१][**अनुसूची 'गग'**

**विवक्षित आदेशांची विधिग्राह्यता व ते प्रवर्तनात येण्याची तारीख**

१. सक्तीने संपादन करण्याबाबतचा आदेश किंवा निपटारा आदेश राज्य शासनाने कायम केल्यानंतर शक्य तितक्या लवकर आयुक्त, **शासकीय राजपत्रात** व [२][बृहन्मुंबईमध्ये] प्रसृत होणाऱ्या तीन किंवा

[१] सन १९५४ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३४, कलम ३४ अन्वये अनुसूची गग, हह आणि आयआय या समाविष्ट करण्यात आल्या.

[२] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (२०) अन्वये "ग्रेटर बॉम्बे" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

अधिक वृत्तपत्रात एकाच वेळी एक नोटीस प्रसिद्ध करील, आणि त्या नोटिशीत हा आदेश कायम करण्यात आला आहे हे नमूद करून कायम केलेला आदेश व त्यात निर्दिष्ट केलेला आराखडा यांची प्रत सर्व वाजवी वेळी ज्या जागी पाहता येईल त्या जागेचा नामनिर्देश करील.

२. पूर्वोक्तप्रमाणे दिलेल्या अशा आदेशामुळे किंवा राज्य शासनाने पुनर्विकास योजना किंवा एखादी नवीन योजना मान्य केल्यामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, उक्त आदेश कायम केल्याची किंवा योजना मान्य केल्याची नोटीस प्रसिद्ध केल्यानंतर ६ आठवड्यांच्या आत मुंबई येथील शहर दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधीशाकडे अपील करता येईल. शहर दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधीशाचा निर्णय अंतिम असेल.

३. असे कोणतेही अपील रीतसर दाखल करण्यात आले असेल, तेव्हा न्यायालयास—

(एक) अंतरिम आदेश देऊन त्याद्वारे उक्त आदेशाचे प्रवर्तन किंवा योजनेची मान्यता अपिलाचा अखेरचा निर्णय होईपर्यंत सर्वसाधारणपणे किंवा अपीलकर्त्याच्या कोणत्याही मालमत्तेशी त्याचा किंवा तिचा जेथवर संबंध असेल तेथवर निलंबित करता येईल ; आणि

(दोन) त्या अपिलाच्या सुनावणीनंतर त्याची अशी खात्री होईल की, उक्त आदेश देणे किंवा योजना मान्य करणे ही गोष्ट या अधिनियमाच्या अधिकारांतील नाही किंवा या अधिनियमाच्या कोणत्याही आवश्यक गोष्टींचे अनुपालन न केल्यामुळे अपीलकर्त्याच्या हितसंबंधांना बव्हंशी बाध आला आहे तर त्यास उक्त आदेश किंवा योजनेची मंजुरी एक तर सर्वसाधारणपणे किंवा अपीलकर्त्याच्या कोणत्याही मालमत्तेशी त्यांचा किंवा तिचा जेथवर संबंध येत असेल तेथवर, रद्दबातल करता येईल.

४. निकटपूर्वीच्या खंडाच्या तरतुदींच्या अधीनतेने या अधिनियमाच्या तरतुदींनुसार, आदेश किंवा योजनेची मान्यता कायम केल्याची नोटीस ज्या तारखेस प्रसिद्ध करण्यात आली असेल त्या तारखेपासून सहा आठवडे संपल्यानंतर उक्त आदेश किंवा योजनेची मान्यता प्रवर्तनात येईल.

५. सक्तीने संपादन करण्याबाबत आदेश किंवा निपटारा आदेश प्रवर्तनात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, उक्त आदेश, राज्य शासनास, तो कायम करण्यासाठी सादर करण्यासंबंधीच्या आयुक्ताच्या इराद्यांविषयी ज्या व्यक्तीवर त्याने नोटीस बजावली असेल त्या प्रत्येक व्यक्तीवर आयुक्त उक्त आदेश त्याची प्रत देऊन बजावील.

---

## अनुसूची हह

### सक्तीने संपादन करण्याबाबत आदेश.

१. सक्तीने संपादन करण्याबाबतच्या आदेशात आराखड्याचा संदर्भ देऊन, ज्या जमिनीच्या संबंधात तो लागू असेल त्या जमिनीचे वर्णन केलेले असेल.

२. आदेश राज्य शासनाला सादर करण्यापूर्वी, आयुक्त—

(अ) असा आदेश देण्यात आला आहे हे नमूद करणारी व त्यात समाविष्ट असलेल्या क्षेत्राचे वर्णन जिच्यात आहे व त्यात उल्लेख केलेल्या आदेशाची व आराखड्याची एक प्रत ज्या जागी सर्व वाजवी वेळी पाहता येईल त्या जागेचा नामनिर्देश जिच्यात केलेला असेल अशी एक नोटीस **शासकीय राजपत्रात** आणि [१][बृहन्मुंबईमध्ये] प्रसृत होणाऱ्या तीन किंवा अधिक वृतपत्रांत एकाच वेळी प्रसिद्ध करील ; आणि

(ब) या आदेशाचा ज्या कोणत्याही जमिनीशी किंवा इमारतीशी संबंध असेल त्या जमिनीवर किंवा इमारतीवर या अधिनियमाखाली बसवण्याजोगा मालमत्ता कर देण्यास प्रथमतः दायी म्हणून आयुक्ताच्या निर्धारण पुस्तकात ज्या व्यक्तीचे नाव आढळेल त्या प्रत्येक व्यक्तीवर ज्या नोटिशीत

---

[१] सन १९९६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २५, कलम २, अनुसूची (१) ४ (२१) अन्वये "ग्रेटर बॉम्बे" या शब्दांऐवजी हे शब्द दाखल करण्यात आले.

आदेशाचा परिणाम व तो कायम करण्यासाठी लवकरच राज्य शासनास सादर करण्यात येणार आहे असे नमूद केलेले असेल व ज्या (एकवीस दिवसांपेक्षा कमी नसणाऱ्या) अवधित त्याच्याविरुद्ध हरकती आयुक्ताला सादर करता येतील तो अवधी विनिर्दिष्ट केलेला असेल अशी नोटीस बजावील.

३. सक्तीने संपादन करण्याबाबतच्या आदेशासंबंधातील नोटिसा प्रसिद्ध करणे व बजावणे यांविषयीच्या पूर्वगामी तरतुदींचे अनुपालन केल्यानंतर, आयुक्त, या अनुसूचीच्या खंड २ खाली आलेले कोणतेही आक्षेप व त्या संबंधात त्यास करावयाशा वाटतील अशा कोणत्याही सूचना [१][सुधारणा समितीला] सादर करील.

४. [२][सुधारणा समिती,] अशा कोणत्याही आक्षेपांचा व सूचनांचा विचार केल्यानंतर, या आदेशाच्या बाबतीत तिला योग्य वाटतील असे फेरबदल करील आणि त्यानंतर आयुक्त, सुधारणा समितीने फेरबदल केलेला आदेश राज्य शासनाला तो कायम करण्यासाठी सादर करील.

---

## अनुसूची आयआय

(कलम ३५४ सअ पहा)

### भरपाई न्यायाधिकरणाची रचना व अधिकार.

**१.** (१) न्यायाधिकरण हे, अध्यक्ष व दोन न्यायसहायक यांचे मिळून बनलेले असेल. न्यायाधिकरणाची रचना.

(२) न्यायाधिकरणाचा अध्यक्ष हा, राज्य शासन उच्च न्यायालयाशी विचारविनिमय करून निवडील असा मुंबई शहर दिवाणी न्यायालयाचा न्यायाधीश असेल.

(३) न्यायसहायकांची नेमणूक राज्य शासन करील.

(४) न्यायाधिकरणाच्या प्रत्येक न्यायसहायकाला राज्य शासन निर्धारित करील असे पारिश्रमिक मिळेल. पारिश्रमिकाची रक्कम महानगरपालिका, न्यायाधिकरणाच्या अध्यक्षास तिचे संवितरण केले जाण्यासाठी देईल.

१९०८ चा ५. **२.** (१) राज्य शासनास, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे, या अधिनियमाखाली स्थापन झालेल्या न्यायाधिकरणाने काम चालवण्यासंबंधी दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ हिच्याशी विसंगत नसतील असे नियम करता येतील. राज्य शासनाने कार्यपद्धतीचे नियम तयार करणे.

(२) असे सर्व नियम आगाऊ प्रसिद्ध करण्याच्या शर्तीच्या अधीन असतील.

**३.** (१) भूमिसंपादन अधिनियमाखाली न्यायाधिकरणाने करावयाचा निवाडा निर्णीत करण्याच्या प्रयोजनासाठी— न्यायाधिकरणाचा निवाडा निर्णीत करावा.

(अ) जमिनीचे मोजमाप किंवा नुकसानभरपाईची रक्कम किंवा मंजूर करावयाचा परिव्यय किंवा सुधारणा आकार निर्धारित करणे यासंबंधाने कोणताही मतभेद निर्माण झाल्यास, न्यायाधिकरणाच्या बहुसंख्य सदस्यांच्या मतास अनुसरून निर्णय देण्यात येईल ;

(ब) ज्या व्यक्तींना भरपाई द्यावयाची त्या व्यक्ती निर्धारित करण्यासंबंधीच्या किंवा भरपाईची संविभागणी निर्धारित करण्यासंबंधीच्या प्रश्नाची संपरीक्षा करण्याच्या व निर्णय देण्याच्या बाबतीत

---

[१] सन १९९९ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक २७, कलम २०८ (अ) अन्वये "महापौरांसह परिषदेला" या मजुकराऐवजी हा मजकूर दाखल करण्यात आला.

[२] वरील अधिनियममाच्या कलम २०८ (ब) अन्वये "महापौरांसह परिषदेला" या मजुकराऐवजी "सुधार समिती" हा मजकूर त्याच्या व्याकरणिक फेरफारांसह दाखल करण्यात आला.

न्यायाधिकरणाच्या अध्यक्षास न्यायसहायकांची उपस्थिती अनावश्यक वाटेल तर न्यायाधिकरणाच्या अध्यक्षास न्यायसहायकांच्या अनुपस्थितीत पूर्वोक्तप्रमाणे संपरीक्षा करता येईल व निर्णय देता येईल आणि त्या प्रश्नांची याप्रमाणे संपरीक्षा करण्यात व निर्णय देण्यात आल्यावर अध्यक्षाने दिलेला निर्णय हा न्यायाधिकरणाचा निर्णय आहे असे मानण्यात येईल ;

(क) पूर्वगामी खंड (अ) व (ब) यांत काहीही अंतर्भूत असले तरी, कायद्यासंबंधीच्या व कार्यपद्धतीसंबंधीच्या सर्व प्रश्नांचा निर्णय सर्वस्वी न्यायाधिकरणाचा अध्यक्षच करील.

(२) दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८, खाली दिवाणी न्यायालयास ज्या मार्गाने व (शक्य होईल तेथवर) ज्या रीतीने प्रतिज्ञालेखावरून वस्तुस्थितीचा पुरावा मिळवता येईल, साक्षीदारांस समन्स पाठवून बोलावता येईल व त्यांस हजर राहण्यास भाग पाडता येईल, दस्तऐवज हजर करण्यास सक्ती करता येईल, साक्षीदारांची तपासणी करण्यासाठी आयोगपत्रे काढता येतील, त्याच मार्गाने व त्याच रीतीने न्यायाधिकरणाच्या अध्यक्षास वरील गोष्टी करता येतील. १९०८ चा ५.

(३) न्यायाधिकरणापुढील कार्यवाह्या भारतीय दंड संहितेची कलमे १९३ व २२८ यांच्या अर्थांतर्गत न्यायिक कार्यवाह्या आहेत असे मानण्यात येईल.] १८६० चा ४५.

---

[१][**अनुसूची जज**

(कलमे ३९८, ४०६ आणि ४६१ पहा.)

एक. तंतुयुक्त माल—

(१) कापूस (सरकी काढलेला व सरकी न काढलेला).

(२) ताग.

दोन. तृणधान्ये—

(१) गहू.

(२) भात (सडलेला व बिन सडलेला).

(३) ज्वारी.

(४) बाजरी.

(५) नागली.

(६) वरी.

(७) कोद्रू.

(८) मका.

(९) सरसव.

(१०) बावटो.

(११) जव.

(१२) बंटी.

(१३) चीणी.

---

[१] सन १९५५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५४, कलम १२ अन्वये ही अनुसूची समाविष्ट करण्यात आली.

तीन. कडधान्ये—

(१) तूर.

(२) हरभरा.

(३) उडीद.

(४) मूग.

(५) वाल.

(६) चवळी.

(७) लांग (लाख).

(८) मठ.

(९) वाटाणा.

(१०) कुळीथ.

(११) डाळी.

(१२) मसूर.

चार. गळीत धान्ये—

(१) भुईमूग (न फोडलेला व फोडलेला).

(२) जवस.

(३) तीळ.

(४) करडई.

(५) अंबाडी.

(६) नारळ.

(७) सरकी.

(८) एरंड्या.

(९) खुरसणी.

(१०) कारळे तीळ.

पाच. अमली पदार्थ—

तंबाखू

सहा. गूळ, साखर व ऊस

सात. फळे—

(१) आंबा.

(२) मोसंबी.

(३) संत्री.

(४) लिंबू.

(५) केळी.

(६) द्राक्षे.

(७) डाळिंबे.

(८) अंजीर.

(९) चिकू.

(१०) स्ट्रॉबेरी.

(११) खरबुजे.

(१२) कलिंगड.

(१३) पोपई.

(१४) पेरू.

(१५) बोरे.

(१६) फालसा.

आठ. भाजीपाला—

(१) बटाटे.

(२) कांदे.

(३) टोमॅटो.

(४) सुरण.

(५) पालेभाज्या व ताज्या भाज्या.

(६) कोनफळ.

(७) रताळी.

(८) कोचरा.

नऊ. पशुसंवर्धनजन्य उत्पादने—

(१) अंडी.

(२) कुक्कुट.

(३) गुरे.

(४) मेंढरे.

(५) बकऱ्या.

(६) लोकर.

(७) लोणी.

(८) तूप.

(९) दूध.

दहा. व्यंजने, मसाले व इतर पदार्थ—

(१) हळद.

(२) आले.

(३) लसूण.

(४) धने.

(५) मिरची.

(६) वेलची व मिरी.

(७) बडीशेप.

(८) सुपारी.

(९) नागवेलीची पाने.

(१०) काजू.

(११) जिरे.

(१२) राई.

(१३) मेथी.

(१४) इसब गोल.

अकरा. गवत व वैरण—

बारा. गुरांचे खाद्य—

(१) गवार.

(२) पुनवड.]

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.